

आगरकर-वाङ्मय

खंड १

संपादक

म. गं. नातू । दि. य. देशपांडे

आगरकरांची स्वतंत्र बुद्धी परंपरा व राजशासन या दोहोंचेही प्रसंगी उल्लंघन करून आपली सत्यनिष्ठा कायम ठेवावी, या मताचा पुरस्कार करीत होती. याच त्यांच्या स्वतंत्र बुद्धीमुळे त्यांनी जहाल राजकारण व जहाल समाजकारण, यांची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोविली, आणि आपल्या संस्कृतीच्या गुणानुवादात तिचे दोष विसरू नका व जगातील इतर राष्ट्रातील यशस्वी सामाजिक व राजकीय तत्त्वांचा आनंदाने स्वीकार करा, असा उपदेश महाराष्ट्रीयांना केला.

—आचार्य श. द. जावडेकर

आगरकर-वाङ्मय : खंड १



गोपाळ गणेश आगरकर

जन्म १४ जुलै १८५६)　　　(मृत्यू १७ जून १८९५

आगरकर - वाङ्मय

खंड १

(सुधारणाविभाग - पूर्वार्ध)

संपादक
म. गं. नातु
दि. य. देशपांडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

■
प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई - ४०००१४.

■
प्रथमावृत्ती : जानेवारी १९८४
पुनर्मुद्रण : डिसेंबर, १९९९

■
मुद्रक :
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-अ, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सिताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.

■
किंमत : रु. १८४/-

निवेदन

महाराष्ट्रातील सुधारकाचे अग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांचे वाङ्मय कित्येक वर्षे अत्यंत दुर्मिळ झाले आहे. या लेखनाचे अभ्यासपूर्वक संपादन करून ते श्री. म. गं. नातू आणि दि. य. देशपांडे यांनी प्रथम महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सहकार्याने १९८४ मध्ये प्रसिद्ध केले. आगरकरांची विवेकवादी जीवनदृष्टी आणि समतावादी तत्वज्ञान उमजूनही समाजाच्या पचनी पडले आहे असे वाटत नाही. आजही या थोर समाजसुधारकाचे विचार समाजाने पूर्वग्रहरहित दृष्टीने समजावून घेण्याची गरज आहे. म्हणून आगरकर वाङ्मयातील सुधारणा विभाग - पूर्वार्ध या ग्रंथाची दुर्मिळ झालेली नवीन आवृत्ती आज महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुनर्मुद्रित करीत आहे. चिकित्सक वाचक याही आवृत्तीचे मन:पूर्वक स्वागत करतील असा मला विश्वास वाटतो. पुस्तकाचे मुद्रक, स्नेहेश प्रिंटर्स, मुंबई यांनी पुस्तकाची छपाई वेळीच करून दिल्याने तसेच मंडळाचे सचिव, चंद्रकांत वडे यांनी या पुस्तकाच्या छपाईच्या कामात स्वत: लक्ष घातल्याबद्दल त्यांचेही आभार.

द. मा. मिरासदार
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

आश्विन, शुद्ध नवमी, १९२१
दसरा, १९९९
(१९ ऑक्टोबर, १९९९)

प्रस्तावना :

उत्पादनाच्या साधनांत जसजसा बदल होत जातो तसतसा इतिहासात पण बदल होत जातो, ही कार्ल मार्क्सने एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे. 'ज्ञान' हेही एक प्रकारचे उत्पादन मानले तर ज्ञान मिळविण्याच्या साधनांत, प्रक्रियेत, जसजसा बदल होईल तसतसा सामाजिक इतिहासाच्या जडणघडणीत पण बदल होईल हे उघड आहे. इ. स. १८१८त पेशवाईचा शेवट होऊन इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात सुरू झाली. १८३५ साली लॉर्ड मेकॉलेने इंग्रजी शिक्षणपद्धती या देशात आणली. त्यायोगे येथील ज्ञानक्षेत्रात क्रांतीकारक बदल घडून आला. याविषयी शंका नाही. हा सर्व बदल सामाजिकच होता. अर्थात या बदलाला राजकीय पुटे पण होती. कारण ज्याला आपण 'राजकीय' म्हणतो तोही सामाजिक प्रक्रियेचाच एक भाग असतो. पण इतिहासाच्या काही कालखंडांत राजकीय पुटे अधिक तीव्रतेने जाणवतात. विशेषत: ज्या देशात राजकीय स्थित्यंतर झालेले असते, एक सत्ता जाऊन दुसरी सत्ता आलेली असते, त्या ठिकाणी सामाजिक प्रश्नांची राजकीय पुटे स्वतंत्र रूपाने उभी राहतात; आणि त्यातून राजकीय प्रश्न जणू काही स्वतंत्र प्रश्न आहे, असा आभास उत्पन्न होतो. १८१८ त पेशवाई संपली, १९४७ त इंग्रजी सत्ता संपुष्टात आली. या सव्वाशे वर्षांत एक दशकसुद्धा असे गेले नसेल की, जेव्हा देशाच्या काही भागात राजकीय उद्रेक झाले नाहीत. त्यात आपल्या खास डोळ्यात भरणारे म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध, वासुदेव बळवंत फडके यांचे बंड, रँड साहेबाचा चाफेकर बंधूंनी केलेला वध, बंगाल-पंजाबमधील दहशतवादी चळवळ, बॅरिस्टर सावरकर आणि गदरपक्ष यांनी उभारलेली चळवळ, लाहोर आणि काकोरी इत्यादि नावांनी प्रसिद्ध असलेले राजकीय कट, सुभाषचंद्र बोसांनी केलेली आझाद हिंद सेनेची स्थापना, त्याचप्रमाणे टिळक, गांधी, इत्यादींनी केलेल्या स्वदेशी, असहकार, 'भारत छोडो' आदि चळवळी, इत्यादीही राजकीय विचारांनी घेतलेली दृश्य रूपे म्हणून सांगता येतील. अर्थात अशा चळवळींच्या मागे पण एक विचार असतो, तो सामाजिक असतो आणि इतर सामाजिक विचारांपासून पूर्णपणे अलिप्त राहून तो वाढत

नसतो. तो तसा वाढता तर सरंजामशाहीतून साम्राज्यशाही किंवा वसाहतवादातून उत्पन्न होणारे दास्य समाजात कधी दिसले नसते. असा बदल घडून येण्याकरिता समाजातील सर्व क्षेत्रात बदल होत जावा लागतो आणि असा बदल सर्वश: सामाजिक असतो. समाजातील पुढारी आपल्या 'जाणी'प्रमाणे या बदलाच्या वेगवेगळ्या अंगांवर भर देतात व त्यातून सामाजिक प्रश्न वेगळे आहेत असा आभास पण उत्पन्न व्हावयास लागतो. लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या संदर्भात अशाच तऱ्हेचा आभास उत्पन्न झाला होता, असे मला वाटते, कारण या दोघांनी आपल्या जीवनात सामाजिक बदलाच्या वेगवेगळ्या अंगांवर भर दिला होता. गोपाळ गणेश आगरकरांना राजकीय प्रश्नांचे वावडे होते; किंवा टिळकांना सामाजिक प्रश्नांचे वावडे होते; असा याचा अर्थ होत नाही. डोंगरीच्या तुरुंगात आगरकरांनी जे दिवस काढले त्याला काय आपण केवळ 'सामाजिक तुरुंगवास' म्हणून संबोधावयाचे? केसरीतून आगरकरांनी राजकीय लेख लिहिलेच नाहीत की काय? पण इंग्रजी राज्य आल्यानंतर आमच्या देशातील विद्वान आणि तेजस्वी समाज-प्रबोधकांनी आपल्या समाजाचे जे विश्लेषण केले त्यामुळे समाजाच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर भर द्यावा असे त्यांना वाटू लागले, आणि त्यातून वेगवेगळ्या प्रकारच्या चळवळी निघाल्या. विष्णुबुवा ब्रह्मचारी, राजारामशास्त्री भागवत, महात्मा ज्योतिबा फुले, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, अण्णासाहेब कर्वे इत्यादी महर्षींनी सामाजिक बदलाच्या निरनिराळ्या अंगांवर भर दिला. सर्वांची साधने वेगळी, पण साध्य एकच होते. सुराज्य उत्पन्न करणे, सुव्यवस्थित, सुशिक्षित, समाजाधिष्ठित समाज उत्पन्न करणे. अशा सुराज्यासाठी, 'स्वराज्य' मिळविणे आवश्यक आहे असे काहींना वाटले, (त्यातही स्वराज्य मिळविण्याच्या मार्गासंबंधी मतभेदही झाले.) तर काहींना स्वराज्य मिळविण्याकरिता, जातिभेद, स्त्रीशिक्षण आदि सामाजिक सुधारणा करून येथील सरंजामशाहीचे रूप बदलविणे आवश्यक वाटले. यातून टिळकपंथ आणि आगरकरपंथ निघाले. पण बुद्धिनिष्ठता मात्र या दोन्ही पंथांच्या मागे होती आणि बेंथम-मिलच्या उदारमतवादी प्रेरणेचा कमीअधिक स्पर्शही दोघांनाही झाला होता हे निश्चित. आपल्या समाजाचे मागासलेपण नाहीसे झाले पाहिजे हे दोघांनाही वाटत होते. त्यांच्याच सहकाऱ्यांपैकी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हटले, आणि त्या काळच्या सर्व प्रबोधकांना ते मान्य होते; ते काय केवळ राजकीय सत्तांतर घडवून आणण्याकरिता की काय? त्या वेळेच्या वातावरणातच सामाजिक बदल ही कल्पना दरवळून राहिली होती. त्यामुळेच महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापून ब्राह्मण्याचे

वाभाडे काढले व स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार इत्यादि कार्यक्रम हाती घेतले; न्यायमूर्ती रानडे, तेलग, आदींनी प्रार्थनासमाज स्थापन करून हिंदुधर्मात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला, आणि असा बदल घडवून आणता येणे अशक्य आहे असे वाटल्यावरून गोरेशास्त्रीसारखे काही लोक खिश्चनपण झाले. आणि इंग्रजी राज्य ही 'देवाची देण' आहे असा विचार पण काही लोकांनी मांडला. पण वरपांगी विरोधी वाटणाऱ्या या विचाराचे मूळ शोधता आपणांस असे निश्चितच आढळेल की, या सर्वांना आपल्या मागासलेल्या समाजात बदल घडवून आणावयाचा होता, पेशवाई का गेली आणि इंग्रजांचे राज्य का आले याचे विश्लेषण करावयाचे होते; एक सामाजिक चळवळ करावयाची होती; या सामाजिक चळवळीकरिता साहित्य निर्माण करावयाचे होते. त्यामुळेच लोकहितवादीपासून ते केशवसुतांपर्यंत मोठमोठे लेखक, कवी, विचारवंत या महाराष्ट्रात उत्पन्न होऊ शकले. पण समाजाचे पुनरुत्थान करणे, समाजाचे प्रबोधन करणे हा या सर्व विचारवंतांच्या कार्याच्या मागील हेतू होता. या प्रबोधनाच्या चळवळीत कै. गोपाळ गणेश आगरकर यांचे स्थान अनन्यसाधारण होते; यात शंकाच नाही.

आगरकरांचे साहित्य, त्यांचे केसरी-सुधारकांतील लेख, आज जवळ जवळ दुर्मिळ झाले आहेत. ते पुनश्च प्रकाशित करून नव्या पिढीला उपलब्ध करून द्यावे, हा या ग्रंथप्रकाशनामागचा एकमेव हेतू. आगरकर, फुले, टिळक, कर्वे, आंबेडकर हे सर्व जनतेच्या सदैव स्मृतीत असले पाहिजेत, तरच समाज जागृत होत राहील. गेल्या वर्षी माझे मित्र श्री. दिनकर साक्रीकर यांच्याशी 'टिळक-आगरकर' या नाटकावर बोलत असता साक्रीकर म्हणाले : 'आगरकर यांच्या विचारधनाचे स्वतंत्रपणे मूल्यांकन व्हावयास पाहिजे. गेल्या शतकातील आगरकर-टिळक वादापासून आगरकरांच्या विचाराचे मूल्यांकन टिळक-विचाराच्या मंधिप्रकाशात केले जाते; ते आता तरी थांबले पाहिजे. टिळकांचा ज्याप्रमाणे स्वतंत्रपणे विचार केला जातो तसा आगरकरांचाही व्हावयास पाहिजे.' याविषयी साक्रीकरांप्रमाणेच माझ्याही मनात कधी शंका नव्हती. असा विचार कोण करू शकतो, हेही मला माहीत होते. त्यामुळे माझ्या सुहृद प्रा. श्रीमती म. गं. नातू आणि प्रा. दि. य. देशपांडे यांनी जेव्हा माझ्याजवळ आगरकरांचे साहित्य, 'साहित्य आणि संस्कृती मंडळा'ने पुनर्मुद्रित करावे असा प्रस्ताव मांडला; तेव्हा तो मला माझ्या मनोगताचा प्रतिध्वनीच वाटला. अर्थातच मी त्याचे मन:पूर्वक स्वागत केले. एवढेच नव्हे, तर त्या ग्रंथाचे संपादनही त्यांनीच करावे आणि त्याला एक दीर्घ, स्वतंत्र प्रस्तावनाही लिहावी अशी विनंती मी केली. आज ही

विनंती आकारास येत आहे यात मला साफल्याचा आनंद आहे. या दोघांचाही आगरकरांचा प्रगाढ अभ्यास आहे. आगरकरांवर निष्ठा आहे. त्यांनी आगरकरांचा लेखसंग्रह डोळसपणे संपादित करून त्याला दीर्घ, सर्वांगसुंदर आणि आगरकरांच्या विचाराची स्वतंत्रपणे मूल्यांकन करणारी प्रस्तावना लिहिली हे त्यांचे साहित्य आणि संस्कृति मंडळावर न फिटणारे ऋण झाले आहे. माझ्या शब्दाचा त्यांनी मान राखला; हा त्यांनी मजवरही मोठाच अनुग्रह केला आहे.

प्रा. नातू यांचा माझा परिचय गेल्या जवळ जवळ ३० वर्षांचा आहे. तेजस्वी बुद्धी, प्रगाढ व्यासंग आणि समाजसुधारणेची अनिवार तळमळ हे त्यांचे गुण सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्या स्त्रीस्वातंत्र्याच्या फार मोठ्या कैवारी. आगरकरांचे विचार सक्रियपणे जीवनात उतरविणाऱ्या ज्या काही स्त्रिया मी पाहिल्या आहेत, त्यापैकी प्रा. नातू या एक होत! प्रा. दि. य. देशपांडे यांचा माझा संबंध तर आणखी जुना, सुमारे ४८ वर्षांचा. विद्यापीठात ते माझ्या दोन वर्षे पुढे होते. त्यांना 'वाट पुसतच' मला माझा अभ्यास पुरा करता आला. प्रगाढ व्यासंग व कुशाग्र बुद्धी या आपल्या गुणांमुळे त्यांनी आमच्या पिढीलाच नव्हे, तर पुढील अनेक पिढ्यांना भारून टाकले आहे. या दोघांनी अंगावर घेतलेले काम पुरे केले याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद.

नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन बनहट्टी यांनी हे काम अल्पावधीत पूर्ण केले याबद्दल त्यांना व त्यांच्या मुद्रणालयाच्या कामगारांनाही धन्यवाद.

आगरकरांचे साहित्य पुनर्मुद्रित करून साहित्य आणि संस्कृती मंडळाने आपल्या कार्याचा एक मोठा यशस्वी टप्पा गाठला आहे, असे मी समजतो.

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

मुंबई,
दि. १ जानेवारी १९८४

संपादकीय निवेदन :

महाराष्ट्रातील विवेकवादाचे अध्वर्यू, सुधारकाचार्य गोपाळ गणेश आगरकर यांचे वाङ्मय गेली कित्येक वर्षे अतिशय दुर्मिळ झाले आहे. जे उपलब्ध आहे तेही अतिशय जीर्ण आणि बहुधा अपुरेही असते. या थोर विचारवंताचे वाङ्मय याप्रमाणे मिळेनासे व्हावे या गोष्टीची खंत बऱ्याच वर्षांपासून मनाला लागून राहिली होती. कारण आगरकरांचे वाङ्मय केवळ ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करावा असे नाही, तर ते आज सुमारे शंभर वर्षांनंतरही अजून ताजेच आहे. त्यानी पुरस्कारलेली विवेकवादी जीवनदृष्टी आणि समतावादी तत्त्वज्ञान अल्पांशानेही आपण अजून आत्मसात केलेले नाही. उलट आज आपण पुन्हा अंधश्रद्धा आणि विषमतावादी विचारसरणीच्या मोठ्या प्रमाणात आहारी चाललो आहोत. हे वाङ्मय जर पुन्हा उपलब्ध झाले तर त्याच्या वाचनाने सध्या चाललेल्या परागतीला थोडा तरी लगाम घातला येईल असे वारंवार वाटे. म्हणून आमचे मित्र व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांच्याजवळ आम्ही आगरकर वाङ्मयाचे पुनर्मुद्रण करण्याचे काम मंडळाने करावे, असा प्रस्ताव मांडला. त्याला त्यांनी तात्काळ संमती दिली, व अल्पावधीतच मंडळाची मान्यताही मिळवून दिली. त्यामुळेच हे बहुमोल वाङ्मय पुन्हा उपलब्ध होण्याचा योग येत आहे.

या ग्रंथात आगरकरांचे संपूर्ण वाङ्मय पुनर्मुद्रित केलेले नाही: फक्त त्यांचे पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले वाङ्मयच आम्ही पुनर्मुद्रित केले आहे. हे वाङ्मय प्रकाशनकालक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहे :

१. **डोंगरीच्या तुरुंगांत आमचे १०१ दिवस**, १८८२
२. **विकारविलसित अथवा शेक्सपिअरकृत हॅम्लेट नाटकाचे भाषांतर**, १८८३.
३. **वाक्यमीमांसा आणि वाक्यांचें पृथक्करण**, १८८८.
४. **विविधविषयसंग्रह**, १८९१.
५. **निबंधसंग्रह**, भाग-१, १८९५ (प्रकाशक-शिराळकर आणि कंपनी)
६. **निबंधसंग्रह**, भाग-२, १९१७ (प्रकाशक-ठोसर)
७. **निबंधसंग्रह**, भाग-३, १९१८ (प्रकाशक-फडतरे)

यांपैकी **विकारविलसित** नाटकाची आतापर्यंत अनेक पुनर्मुद्रणे झाली आहेत. तसेच **डोंगरीच्या तुरुंगात आमचे १०१ दिवस**, आणि **विविधविषयसंग्रह** यांचेही प्रत्येकी एकेक, आणि **वाक्यमीमांसा** या ग्रंथाची दोन पुनर्मुद्रणे झाली आहेत. **निबंधसंग्रह** भाग १ चे १९१९ मध्ये एक पुनर्मुद्रण झाले असून प्रा. मा. दा. आळतेकरांनी **संपूर्ण आगरकर** या नावाने १९३७ मध्ये प्रकाशित केलेल्या तीन भागांपैकी पहिला भाग म्हणजे **निबंधसंग्रह**, भाग १ चे दुसरे पुनर्मुद्रण आहे. आळतेकरांचे भाग २ व भाग ३ म्हणजे **निबंधसंग्रह**, भाग २ चेच पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असून, त्यांनी संपादलेल्या **संपूर्ण आगरकर** या ग्रंथात **निबंधसंग्रह**, भाग ३ समाविष्टच झालेला नाही. त्यामुळे या भागाचे **आगरकर-वाङ्मय** या ग्रंथात पहिलेच पुनर्मुद्रण होत आहे. प्रस्तुत ग्रंथात ही सर्व पुस्तके प्रथमच एकत्रित स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

प्रस्तुत **आगरकर-वाङ्मय** या ग्रंथात वरील वाङ्मयाची तीन खंडात पुढीलप्रमाणे विभागणी केली आहे:

खंड १ : सुधारणाविभाग - पूर्वार्ध
खंड २ : सुधारणाविभाग - उत्तरार्ध
खंड ३ : विविधविषयविभाग

यापैकी **सुधारणाविभागात** वर उल्लेखलेले **निबंधसंग्रह** भाग १, २, व ३ यांचा समावेश असून, **विविधविषयविभागात डोंगरीच्या तुरुंगात आमचे १०१ दिवस**, **विकारविलसित**, **वाक्यमीमांसा**, आणि **विविधविषयसंग्रह** हा सुधारकातील सुधारणेतर विषयांवरील निबंधाचा संग्रह यांचा समावेश केला आहे. कालक्रम सोडून वरील प्रकारची विभागणी करण्यामागील हेतूच्या स्पष्टीकरणार्थ दोन शब्द लिहिणे अवश्य आहे. आगरकरांच्या वाङ्मयापैकी प्रमुख भर अर्थातच त्यांच्या सुधारणाविषयक लिखाणावरच द्यायला हवा. महाराष्ट्र; आगरकरांना प्राधान्याने सुधारक म्हणूनच ओळखतो, आणि सुधारणा विषयानेच त्यांचे बहुतेक वाङ्मय व्यापले आहे. म्हणून आगरकर-वाङ्मयाचे प्रथम सुधारणाविभाग व विविधविषयविभाग असे दोन विभाग करून, नंतर त्यांतील सुधारणाविभाग पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा दोन खंडांत विभागून प्रत्येकी सुमारे ५०० पृष्ठांचे तीन खंड करण्याचे आम्ही योजले.

एक प्रश्न वाचकांच्या मनांत उद्भवण्याचा संभव आहे. तो म्हणजे **केसरीतील** आगरकरांच्या निबंधाचा समावेश आम्ही या ग्रंथात का केला नाही, हा! याबाबतीत आमच्या मते मोठी अडचण **केसरीतील** कोणते लेख निःसंशय आगरकरांचे आहेत हे ठरविण्याची होती. **केसरीतील निवडक निबंध**, पुस्तक १ व २ या

खुद्द आगरकरांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांत समाविष्ट झालेल्या निबंधापैकी आगरकरांचे कोणते हे बऱ्याच प्रमाणात अनुमानानेच ठरवावे लागते, आणि त्याबाबतीत मतभेद आहेत. म्हणून **केसरी**तील निर्विवादपणे आगरकरांचेच म्हणून अन्य पुराव्यावरून माहीत असलेले लेख तेवढे आम्ही या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात समाविष्ट केले आहेत.

या ग्रंथात समाविष्ट केलेले आगरकरांचे लेख मुळात **सुधारका**च्या ज्या अंकांत प्रकाशित झाले त्यांच्या तारखा देण्याची आमची इच्छा होती. **निबंधसंग्रह**, भाग ३ या पुस्तकात या तारखा दिलेल्या आहेत,पण **निबंधसंग्रह**, भाग १ व २ यांत तारखांचा निर्देश नाही. त्यामुळे त्यांतील लेखांचा लेखनकाळ कळू शकत नाही, आणि अभ्यासकांची अडचण होते. म्हणून **निबंधसंग्रह**, भाग १ व २ यातील निबंधाच्या तारखा मिळविण्याचा आम्ही प्रयत्न केला, पण दुर्दैवाने आम्हाला यात अपयश आले. कलकत्ता येथील राष्ट्रीय ग्रंथालय, दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागार, मुंबई येथील रॉयल एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय, केसरी-मराठा ग्रंथशाळा, वाडिया ग्रंथालय, फर्ग्युसन कॉलेज, पुणे, हिंद सेवक समाज ग्रंथालय, पुणे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, शासकीय ग्रंथालय, पुणे, या आणि आणखीही अनेक ग्रंथालयांकडे आम्ही विचारणा केली. परंतु तेथे कोठेही सुधारकांचे अंक एक तर मुळीच नाहीत; किंवा असलेच तर फार थोडे, १-२ वर्षांचे, आणि तेही फुटकळ आहेत असे कळले. त्यामुळे नाइलाजाने **निबंधसंग्रह** भाग १ व २ मधील निबंध मुळातल्याप्रमाणे तारखांशिवाय छापले आहेत.

या ग्रंथाच्या पहिल्या दोन खंडांची (म्हणजे सुधारणाविभागाची) सूची दुसऱ्या खंडाच्या शेवटी येणार आहे. तिसऱ्या खंडाची (म्हणजे विविधविषयविभागाची) प्रस्तावना व सूची त्या खंडात येतील.

आता शेवटी ऋणनिर्देश! हे कार्य तडीस नेण्यास ज्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्ष हातभार लावला, त्यांच्या मदतीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आम्हांला फार आनंद होत आहे. या श्रेयनामावलीत पहिला मान महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांचा. त्यांनी मनावर घेतले नसते तर हे काम होणे अतिशय दुर्घट होते. त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत. या ग्रंथाचे साहित्य जमविण्याच्या कामी ज्यांची बहुमोल मदत झाली त्यात **आगरकरांशी ओळख** या ग्रंथाचे कर्ते श्री. पु. पां. गोखले यांचे आम्ही फार आभारी आहोत. त्यांनी आमच्या योजनेचे मन:पूर्वक स्वागत केले, काही सूचना दिल्या, आणि आपल्या ग्रंथातून काही साहित्य वापरण्यास परवानगीही दिली. ह्या साहित्यांत 'सुधारकाचे जाहीर पत्रक' आणि आगरकरांच्या हस्ताक्षराचे छाप


यांचा समावेश आहे. मुंबईच्या अभिनव प्रकाशनचे श्री. वा. वि. भट यांनी आम्हाला कोठेही मिळू न शकलेल्या **विविधविषयसंग्रह** या ग्रंथाची झेरॉक्स प्रत काढून पाठविली, त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. आगरकरांच्या ग्रंथांच्या प्रथमावृत्ती मिळविण्याचा शक्यतो प्रयत्न आम्ही केला. त्यात नागपूर विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांनी आपुलकीने **डोंगरीच्या तुरुंगात आमचे १०१ दिवस** आणि **वाक्यमीमांसा** या ग्रंथांच्या प्रथमावृत्ती पुरविल्या. **निबंधसंग्रह**, भाग २ या ग्रंथाची प्रथमावृत्ती आम्हाला नागपूर येथील हिंदु धर्म-संस्कृति मंडळाच्या ग्रंथालयातून श्री. ना. ग. बैतुले यांच्या सौजन्याने मिळाली. **वाक्यमीमांसा** या ग्रंथाची एक प्रत पुणे विद्यापीठातील मराठी विभागाचे डॉ. मा. दि. फडके यांनी पुरविली. आगरकरांचे छायाचित्र आणि **सुधारक** पत्राच्या अंकाच्या पहिल्या पृष्ठाचे छायाचित्रही डॉ. बाबा आढाव यांनी अतिशय कार्यव्यग्र असतानाही वेळात वेळ काढून पुरविली. या सर्वांच्या बहुमोल मदतीबद्दल आम्ही त्यांचे ऋण मानावे तेवढे थोडेच. कलकत्ता येथील राष्ट्रीय ग्रंथालयातील मराठी विभागाचे प्रमुख श्री. श्री. बा. जोशी यांनी आमच्या पत्राला ताबडतोब उत्तर देऊन पुष्कळ उपयुक्त माहिती पुरविली. तसेच डॉ. स. गं. मालशे यांनीही प्रकृति-अस्वास्थ्य असूनही, आमच्या अनेक पत्रांना अविलंब उत्तरे देऊन उपयुक्त माहिती दिली. याबद्दल या दोघांचे आम्ही आभारी आहोत. आमच्या उपक्रमास नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांनी मन:पूर्वक प्रोत्साहन दिले. प्रा. ग. प्र. प्रधान, डॉ. य. दि. फडके, डॉ. अशोक केळकर, श्री. राम पटवर्धन, डॉ. अनिल अवचट, श्री. वसंत पळशीकर, श्री. यदुनाथ थत्ते, श्रीमती दुर्गाबाई भागवत, श्री. वामन निंबाळकर व श्री. अंबादास देवळे यांनीही बहुमोल साह्य केले. या सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत. नागपूर विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्रपाठक डॉ. भा. ल. भाळे आणि रसायनशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. रा. ह. सहस्रबुद्धे यांनी या उपक्रमात खूपच रस घेऊन आम्हाला प्रोत्साहित केले याबद्दल आम्ही त्यांचे अतिशय आभारी आहोत. शेवटी हा प्रथम खंड सुबक छपाई करून तयार करून दिल्याबद्दल येथील नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन पांडुरंग बनहट्टी व श्री. श्रीकृष्ण पांडुरंग बनहट्टी या बंधुद्वयांचे आणि या ग्रंथाचे वेष्टन आणि सजावट आकर्षक करून दिल्याबद्दल चित्रकार श्री. संजय धोतरकर यांचेही आम्ही आभारी आहोत.

१४, अंबाझारी लेआउट, म. गं. नातू


नागपूर ४४० ०१० दि. य. देशपांडे

अनुक्रमणिका

निबंधसंग्रह-भाग २


put the Sudharak in every detail true as
you have secured at Nagpur but my
physical & mental weakness make me
entirely unfit [illegible] a [illegible]
We have been trying our best to
make the paper as interesting and [illegible]
as possible with a view to secure the
largest possible number of subscribers. It
will be impossible to conduct it on the
reduced rate of subscription unless we are
able to secure not less than 2500 paying
subscribers before the end of [illegible]
The rate at which they are coming in
has not yet given us reason to [illegible]
[illegible]
Will you kindly let me know what is the
opinion of R. K. Pandit about [illegible]
From the lots of letters that we receive every
week it appears that it is becoming popular
among the lower ranks of the Society.
Yours [illegible]
Yours very sincerely
G. G. Agarkar.

आगरकर यांचे इंग्रजी हस्ताक्षर



आगरकरांचे बाळबोध व मोडी हस्ताक्षर

विवेकधिष्ठित सर्वांगीण सुधारणेचे उद्‌गाते

गोपाळ गणेश आगरकर

'...खरी सुधारणा कशात आहे हे फारच काळजीने ठरविले पाहिजे. कारण वारंवार होते काय की विशिष्ट वासनाधीश किंवा सत्ताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशात आहे हे नीट न समजून, जेवढे जुने असेल तेवढे फेकून देण्यात व कसल्या तरी नवीन गोष्टींचा अंगीकार करण्यात आपण सुधारणा करीत आहो असा भ्रम होतो ! असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षा दुर्धारक म्हणणे हेच बरे ! उदाहरणार्थ, हिंदु धर्मात बरीच व्यंगे आहेत म्हणून यहुदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देता येणार नाही...ज्या देशात आपले शेकडो पूर्वज जन्मास आले, वाढले, व मरण पावले, ज्या देशातील हजारो पिढ्यांनी अनेक गोष्टींत मोठ्या कष्टाने केलेल्या अनेक सुधारणांचे फळ आपणांस ऐतेच प्राप्त झाले-अशा देशातील धर्माचा व रीतिरिवाजांचा, व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकांची पदवी कधीही शोभणार नाही. स्वभूमीत, स्वलोकांत, स्वधर्मात आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यांतच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे, याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहीत, तर फक्त शृंखलांतर करतात!'[१]

—गो. ग. आगरकर

एकोणिसावे शतक हे भारताच्या इतिहासातील प्रबोधनयुग म्हणून ओळखले जावे. या शतकात इंग्रजी राजवटीबरोबर येथे आलेल्या प्रगत अशा पाश्चात्य संस्कृतीचे भारतीय संस्कृतीतील आचार-विचारांना तीव्र धक्के दिले. भारतीयांना सर्वथा अपरिचित अशा व्यक्तिस्वातंत्र्य, समता, लोकशाही इत्यादि मूल्यांचा त्यांना परिचय झाला, आणि पूर्वी कधी नव्हत्या इतक्या समस्या राष्ट्रांसमोर उभ्या राहिल्या. उलटसुलट विचारांच्या प्रचंड वावटळी उठल्या व त्यांनी समाज घुसळून निघाला. या विचारमंथनातून राष्ट्राची नवीन जडणघडण होऊ लागली.

---

१. आगरकर-वाङ्मय, खंड १, पृ. १८३. यापुढे अवतरणांच्या शेवटी कंसांत दिलेले पृष्ठांक या ग्रंथातील आहेत असे समजावे.

इ. स. १८१८ साली शनिवारवाड्यावर इंग्रजाचे निशाण लागून सबंध भारतावर ब्रिटिश सत्तेचे शिक्कामोर्तब झाले. त्यावेळी स्वातंत्र्यापहारामुळे दुःखी होण्याऐवजी जनता हर्षभरीत झाली. उत्तर पेशवाईत महाराष्ट्रात जी विलक्षण बेबंदशाही माजली होती, तिचा नवीन सत्तेने बीमोड केल्यामुळे लोकांना साहजिकच हायसे वाटले; आणि तिचे स्वागत करण्यातच त्यांना धन्यता वाटू लागली. ही ब्रिटिश सत्ता अनेक दृष्टींनी अतिशय जबरदस्त होती. पराक्रमाबरोबरच तिच्याजवळ विकसित संस्कृती, शिस्तबद्ध राजवट, वैज्ञानिक सामर्थ्य, इत्यादि अनेक आयुधे होती. शिवाय भारतीयांचे कल्याण करण्याकरिता आपण आलो असल्याचा मोहक मुखवटा तिने धारण केला होता. त्यामुळे भारतीय जनता तिच्यावर अगदी भाळून गेली, तिच्या तेजामुळे ती पार दिपून गेली, आणि तिची स्थिती मोहनिद्रेत निपचित पडल्यासारखी झाली.

परंतु ही स्थिती फार काळ राहिली नाही. १५-२० वर्षांच्या आतच राष्ट्राला जाग येण्याची चिन्हे दिसू लागली. इंग्रजी शिक्षणाने लाभलेल्या नवीन दृष्टीमुळे हळूहळू नवविचाराचे, उत्साहाचे व उमेदीचे वारे सर्वत्र वाहू लागले. आपला धर्म व समाजरचना यांतील उणीवा जाणवू लागल्यामुळे त्या दूर करून त्यांची पुनर्रचना करण्याची निकड विचारवंतांना तीव्रतेने भासू लागली. त्याचबरोबर पारतंत्र्याचे वाढते चटकेही त्यांना बसू लागून त्याचे पाश तोडण्याचे आव्हान त्यांच्यासमोर उभे ठाकले.

महाराष्ट्राच्या इतिहासात १८३० ते १९०० हा काळ सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा देदीप्यमान ठरला. देशोद्धाराच्या ध्येयाने झपाटलेल्या उत्तुंग कर्तृत्वाच्या किती व्यक्ती या काळात निर्माण व्हाव्यात? 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयो नच धूमायितं चिरं' या वचनाचा प्रत्यय देणाऱ्या बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, यांसारख्या अल्पायुषी महापुरुषांनी आपल्या लोकोत्तर कर्तृत्वाने काळावर मात करून चिरंजीवित्व मिळविले, व ज्यांना सुदैवाने दीर्घायुष्य लाभले त्या लोकहितवादी, महात्मा जोतीबा फुले, न्यायमूर्ति रानडे, लोकमान्य टिळक आदि महाभागांनी आपल्याला लाभलेल्या आयुष्याचे पुरेपूर माप देशाच्या पदरात टाकले. आपल्या विद्वत्तेने, त्यागाने, अविरत कष्टाने व निष्कलंक चारित्र्याने त्यांनी या प्रदेशाचे 'महाराष्ट्र' हे नाव सार्थ केले. प्रत्येकाची प्रकृती, सामर्थ्य, दृष्टिकोण आणि कार्यपद्धती भिन्न भिन्न असली तरी देशसेवेच्या खडतर व्रताचा अंगीकार प्रत्येकाने सारख्याच उत्कटतेने केला असल्यामुळे त्या सर्वांच्या कर्तृत्वाने हा काळ उजळून निघाला.

या समाजधुरीणांपैकी सुधारकाचार्य गोपाळ गणेश आगरकर यांच्या

जीवनाचा आणि कार्याचा विचार येथे करावयाचा आहे.

विवेकवादाचे अध्वर्यू गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १८५६ साली झाला आणि १८९५ साली त्यांची जीवितयात्रा संपली. म्हणजे त्यांना अवघे एकोणचाळीस वर्षे आयुष्य लाभले. या अल्पायुष्यातही अनेक प्रकारच्या बिकट व प्रतिकूल परिस्थितीला त्यांना तोंड द्यावे लागले. परंतु कोणत्याही आपत्तीला न जुमानता त्यांनी जी कामगिरी केली तिला अर्वाचीन इतिहासात तोड नाही. संबंध जीवनाचे विवेकवादी तत्त्वज्ञान त्यांनी महाराष्ट्राला दिले (मराठीत लिहिण्याचा त्यांचा कटाक्ष होता; नाहीतर उभ्या हिंदुस्थानाला त्यांनी हे तत्त्वज्ञान दिले असे म्हणता आले असते.) समाजाची विवेकशक्ती जागृत करण्यासाठी आणि त्याला न्यायाने, समतेने आणि स्वाभिमानाने जगण्यास समर्थ करण्यासाठी ते अहर्निश झटले. 'टाकातून अर्थबोधक अक्षरे काढण्याचे सामर्थ्य असेल, व ती वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोपर्यंत', 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' हे आपले व्रत त्यांनी आमरण पाळले; धार्मिक, सामाजिक आणि राजकीय विचार विवेकाच्या कसोटीवर पारखले; जीवनाच्या सर्व अंगांवर साचलेली रूढीची, अंधश्रद्धेची, दुराग्रहाची व अज्ञानाची जाळीजळमटे मुक्त बुद्धीने शोधून ती दूर करण्याचे कळकळीचे आवाहन समाजाला केले; आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीस आवश्यक असे विवेकवादाचे बहुमोल तत्त्वज्ञान त्याला दिले. या तत्त्वज्ञानास आपल्या निष्कलंक, निःस्वार्त व कृतिशील चारित्र्याची जोड देऊन विवेकी जीवनाचा आदर्श त्याच्यापुढे ठेवला.

परंतु अशा या थोर विचारवंताची महाराष्ट्राने सतत उपेक्षाच केली. त्यांच्या कार्यासंबंधी अनेक गैरसमज व प्रतिकूल ग्रह निर्माण झाले आणि त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान नीट समजून न घेताच त्याने त्याकडे पाठ फिरविली. ही पूर्वग्रहाची पटले दूर करून त्यांच्या तत्त्वज्ञानाचे यथार्थ स्वरूप दाखविण्याचा हा एक नम्र प्रयत्न.

१

आगरकरांच्या जीवनाकडे पाहिले की, 'लौकिक दृष्ट्या ध्येये म्हणजे दुःखे, पण या दुःखांतच उच्च व सात्त्विक आनंद भरलेला आहे' या वा. म. जोशी यांच्या वचनाची प्रचीती येते. त्यांच्या आयुष्याचा चरित्रपट कालदृष्ट्या तोकडा. पण या लहानश्या पटावर रेखले गेलेले कर्तृत्वचित्र केवढे भव्य आणि उदात्त असावे ! सर्वभक्षक कालही महान व्यक्तींपुढे हात टेकतो तो असा!

आगरकरांचे आयुष्य म्हणजे झुंज, सर्वत्र झुंज, आणि तीही एकाकी झुंज. प्रथम विद्यार्जन करताना दारिद्र्याशी, कष्टांशी, त्यातून उद्भवलेल्या दम्याशी,

पुढे आयुष्यभर अंगीकृत कार्याप्रीत्यर्थ शासनाशी, जनतेशी, प्रिय आप्तांशी जिवलग मित्रांशी व अखेर मृत्यूशी!

आगरकरांचा जीवनपट अंतश्चक्षूंसमोर उलगडू लागला की त्यातील अनेक धीरोदत्त व करुण चित्रांनी आपले मन एकाच वेळी स्तिमित आणि व्याकुळ होते. सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडजवळील टेंभू या गावी १४ जुलै १८५६ रोजी गरीब पण सत्त्वशील मातापित्यांच्या पोटी जन्मलेला हा एक जीव. घरोघरी आढळणाऱ्या इतर अनेक जीवांसारखा! महानतेचे किंवा अद्‌भुततेचे कोणतेही वलय त्याच्याभोवती नव्हते. उलट प्रतिकूल परिस्थितीच्या वेढ्यात तो गुरफटला होता. त्याचे पहिले चित्र डोळयांपुढे येते ते अगदी प्राथमिक शिक्षणासाठीही घर सोडावे लागणाऱ्या चिमुरड्या गोपाळाचे. टेंभूस शाळा नसल्यामुळे कऱ्हाडला आजोळी जाऊन समवयस्क दत्तूमामाबरोबर 'बारा वर्सांविरी इंग्रजीची तीन बुके' करणारा बुद्धिमान, सभाधीट, लेखनपटू असा गोपाळ. अभ्यासाप्रमाणेच कृष्णाकोयनेच्या संगमात पोहण्यात, झाडांवर, डोंगरांवर चढण्यात व हुतुतू खेळण्यातही पटाईत! आपल्याला निर्भेळ आनंद देणारे असे गोपाळाचे हे एकमेव चित्र. त्यानंतर आपल्यासमोर येते ते शिक्षणासाठी दाही दिशा वणवण हिंडणाऱ्या व त्यापायी बाल्य कोळपून गेलेल्या गोपाळाचे. दत्तूमामा आणि बरोबरचे इतर सवंगडी पुढील शिक्षणासाठी पुण्यास जातात; पण कऱ्हाडमधील नागपूरकर मुन्सफांच्या निबंधस्पर्धेत बक्षिसे मिळविणाऱ्या गोपाळाला मात्र दारिद्र्यापायी त्याच मुन्सफांच्या कचेरीत खर्डेघाशी पत्करावी लागते. पण पुढील शिक्षणाची संधी शोधण्यात चित्त गुंतलेल्या या ज्ञानतृषार्तास आपले एक लांबचे चुलते रत्नागिरीस 'ड्पुटी' असल्याचे कळते आणि लगेच त्याचे चिमुकले पाय रत्नागिरीकडे चालू लागतात. दीडशे मैलांची पायपीट करून रत्नागिरी गाठलेल्या गोपाळाला चुलत्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. पण न डगमगता तो तेथेच वार लावून, माधुकरी मागून व शागिर्दी करून जिद्दीने विद्यार्जन चालू ठेवतो. तेवढ्यात दुर्दैवाने चुलते एकाएकी निवर्तल्यामुळे तो परत कऱ्हाडास येऊन कंपौडरी करू लागतो. नंतर मामीला अकोल्यास पोचविण्याचे निमित्त मिळताच शिक्षणाच्या आशेने तिकडे धावतो. त्यांच्याबरोबर परत यावे लागल्यामुळे तो पुणे गाठतो. तेथेही सोय न लागल्यामुळे अखेरीस पुन्हा अकोल्यास येतो व तेथे भागवतमामांच्या घरी राहून विष्णू मोरेश्वर महाजनी यांच्या मदतीने तीन वर्षे शिकून प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण होतो. पण येथेही प्रश्न संपत नाहीत. चिंता मिटत नाही. पुढील शिक्षणासाठी स्वारी पुण्यास दाखल होते, व कोठे 'वऱ्हाड समाचारा'त लिही, निबंधस्पर्धेत व वक्तृत्वस्पर्धेत बक्षिसे मिळव, शिष्यवृत्ती मिळव, कधी नाटक लिही, अशा तऱ्हेने

अनेक अडचणींना तोंड देत देत तो बी. ए. होतो. पण यापायी झालेल्या साऱ्या दगदगीने त्याची मूळची सुदृढ प्रकृती ढासळते. आनुवांशिक दमा डोके वर काढतो. व पुढील धकाधकीच्या जीवनात आणि आपणहून स्वीकारलेल्या दारिद्र्यात योग्य औषधोपचार, विश्रांती व स्वास्थ न मिळाल्यामुळे तो कायमचे ठाण मांडून असतो.

यानंतर सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देत देत एम. ए. होण्याची प्रतिज्ञा पूर्ण करणारे दृढनिश्चयी आगरकर; एम. ए. झाल्यानंतर अध्यापनात गढलेले, विद्यार्थ्यांवर जीव ओतून प्रेम करणारे आगरकर; आणि तेजस्वी संपादनाने केसरीची जोपासना करून मराठी वृत्तसृष्टीत आगळ्या तेजाने तळपणारे संपादक आगरकर-अशी त्यांची एकाहून एक विलोभनीय चित्रे आपल्यासमोर येतात. मात्र ही चित्रे आता एकट्या आगरकरांची नसतात, तर टिळक-आगरकरांची असतात.

धकाधकीच्या विद्यार्थिदशेत आगरकरांना एकदाच काय तो निश्चित व आनंदी जीवन जगण्याची सधी मिळाली. १८७८ साली बी. ए. झाल्यावर फेलोशिप मिळाल्यामुळे एम. ए. चा अभ्यास करताना आगरकरांच्या मागची पैशाची विवंचना बरीच दूर झाली होती. याच वेळी बाल गंगाधर टिळक एल्‌एल. बी. च्या अभ्यासासाठी डेक्कन कॉलेजच्या वसतिगृहात राहावयास आले होते. या वास्तव्यात या दोन समानशील, तेजस्वी, ध्येयवादी तरुणाची गाढ मैत्री जमली. त्या काळात त्यांनी मातृभूमीच्या उद्धाराचे अनेक बेत रचले. त्यासंबंधी मनमुराद वादविवाद करण्यात रात्रीच्या रात्री घालविल्या. सरकारी नोकरी न पत्करता केवळ निर्वाहापुरतेच वेतन घेऊन शिक्षणकार्यात सर्व आयुष्य घालविण्याचा त्यांनी संकल्प केला. एम. ए. होताच यासंबंधात आगरकरांनी आपल्या आईला लिहिले, ''आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील. असे मोठाले मनोरथ, आई, तू करीत असशील. पण मी आत्ताच तुला सांगून टाकतो की विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हाव न धरता, मी फक्त पोटापुरत्या पैशांवर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार.'

१८८० साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी सरकारी नोकरीची रुपेरी बेडी तोडली आणि लोकशिक्षणाकरिता स्वतंत्र शाळा स्थापण्याचा मनोदय जाहीर केला. तो कळताच आगरकर व टिळक हे दोघेही त्यांना येऊन मिळाले व या तीन शक्तींच्या एकोप्याने महाराष्ट्रात एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. स्वातंत्र्यप्राप्ती आणि त्यासाठी लोकशिक्षण या समान ध्येयावर या त्रिमूर्तीने आपले लक्ष केंद्रित केले, आणि त्यामुळे देशोन्नतीच्या चळवळीला स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाचे एक

नवे परिमाण मिळाले. सरकारी शाळांतील निःसत्त्व शिक्षणपद्धतीत स्वत्वाचा जिव्हाळा ओतून शिक्षण 'तलवारीच्या पोलादासारखे कठीण व लखलखीत' करण्यासाठी त्यांनी १ जानेवारी १८८० रोजी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. एम. ए. ची परीक्षा आटोपून आगरकर १८८१ मध्ये शाळेस येऊन मिळाले आणि टिळकांच्या हातात हात घालून त्यांनी देशसेवेस प्रारंभ केला. समान ध्येयामुळे त्या दोघांतील स्नेह इतका दृढ झाला की, महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणावर 'टिळक-आगरकर' हा द्वंद्व समास कोरला गेला तो कायमचाच. आगरकर हे नाव तर कधी एकट्याने उच्चारले जातच नाही. त्यामागोमाग आपल्या अंतःकरणात 'टिळक' हे नाव निनादतेच. दोन स्वयंभू, तुल्यबल व महान नेत्यांची एवढी जूट होण्याचे अपूर्व भाग्य महाराष्ट्रास लाभले होते. सरकारी नोकरी न पत्करता देशोद्धारार्थ जीवन वेचण्याची दीक्षा या दोघांनीच प्रथम महाराष्ट्रास दिली व त्यायोगे एक नवा पायंडा घातला.

शाळेस प्रथमपासूनच महादेव बल्लाळ नामजोशी व नंतर संस्कृतचे गाढे पंडित वामन शिवराम आपटे हे लाभले होते. या 'ग्राज्वेट पांडवां' च्या बाहेर असामान्य कर्तृत्वाने शाळेचा लौकिक एका वर्षातच सर्वत्र पसरला. परंतु शाळेबाहेर असलेल्या असंख्य लोकांचे प्रबोधन त्याने कसे होणार? देशापुढील इतर समस्या कशा सुटणार? त्यासाठी २ जानेवारी १८८१ रोजी टिळकांच्या संपादकत्वाखाली **मराठा** हे इंग्रजी, आणि ४ जानेवारी १८८१ रोजी टिळकांच्या संपादकत्वाखाली **केसरी** हे मराठी, अशी दोन वृत्तपत्रे मंडळीने काढली. त्यामुळे त्यांच्या हातांत जनताजागृतीचे एक प्रभावी शस्त्र आले. त्यातून सरकारच्या अन्यायाला वाचा फोडली गेली आणि इंग्रजी राजवटीच्या बाह्य झगमगाटाने दिपून गेलेल्या जनतेच्या डोळ्यात अंजन पडू लागले. परंतु वृत्तपत्रांच्या अंगी असलेल्या या सामर्थ्याबरोबरच त्यांच्यावर गंडांतरे येण्याचे धोकेही पुष्कळ असतात, याचा प्रत्यय या संपादकद्वयाला एका वर्षातच आला. कोल्हापूर संस्थानचे दिवाण माधवराव बर्वे यांच्या राजकारणामुळे कोल्हापूरच्या गादीवर असलेल्या शिवाजी महाराजांचा अनन्वित छळ होत असल्याबद्दल, या पत्रांनी त्यांच्याविरुद्ध आवाज उठविताच बर्व्यांनी दोन्ही संपादकांवर खटला भरला व १३ जुलै १८८२ रोजी त्यांना चार महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा ठोठावली जाऊन या दोन स्नेह्यांची डोंगरीच्या तुरुंगात रवानगी झाली. यापूर्वी चारच महिने आधी १७ मार्च १८८२ रोजी चिपळूणकर वयाच्या बत्तिसाव्या वर्षी एकाएकी निर्वतल्यामुळे संस्थेवर मोठाच आघात झाला होता. त्यांच्यावरील मृत्यूलेखात आगरकरांनी लिहिले: 'आमचे धैर्य आणि कार्यनिष्ठा ही कसास लागण्याची संधी आली आहे, असे

आम्ही समजतो.' या कसोटीस मंडळी उतरली. कोल्हापूर प्रकरणात झालेल्या खर्चासाठी आगरकरांनी तुरुंगात **विकारविलसित** हे हॅम्लेटचचे भाषांतर पुरे केले. व **डोंगरीच्या तुरुंगात आमचे १०१ दिवस** हे कैद्याच्या जीवनावरील मराठीतील पहिले पुस्तक तेथेच लिहिले. तुरुंगातून सुटका होताच् हजारो लोकांनी प्रथम मुंबईत व नंतर पुण्यात या दोघांच्या मिरवणुका काढून सत्कार केला व मानपत्रे दिली. यात महात्मा जोतीबा फुले यांनी मोठ्या उत्साहाने व आपुलकीने पुढाकार घेतला होता.

तुरुंगातून सुटल्यावर सर्वजण पुन्हा दुप्पट जोमाने कामास लागले. आगरकरांच्या कुशल संपादनामुळे व प्रभावी लेखनसामर्थ्यामुळे **केसरी**ची गर्जना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात निनादली व त्याने लोकांची मने जिंकली. न्यू इंग्लिश स्कूलच्या यशाची कमानही सतत उंचावत होती. या यशात आपट्यांचे असमान्य अध्यापयकौशल्य आणि समर्थ प्रशासन यांचा वाटा मोठा होता. सामुदायिकरीत्या काम करण्यास आवश्यक तेवढा संयम व बंधने आपसांतील मतभेद बाजूस ठेवून सर्वांनीच पाळली. त्यामुळे त्यांच्या कार्याचा व्याप वाढू लागला. १८८४ च्या अखेरीस डेक्कन एज्युकेशन सोसायटीची त्यांनी स्थापना केली, व १८८५ साली सोसायटीचे फर्ग्युसन कॉलेज सुरू झाले.

परंतु कालांतराने, संस्थेच्या सभासदांतील मतभेदाची दरी रुंदावू लागली व त्यांच्यातील ऐक्य दुभंगू लागले. १८८४ साली बैरामजी मलबारी या पारशी समाजसुधारकाचे बालविवाह व विधवाविवाह यासंबंधीचे टिपण प्रसिद्ध झाले, आणि टिळक व आगरकर यांच्यातील मतभेद जाहीर झाले. बालविवाहाचा प्रश्न आगरकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा होता. बालविवाहामुळे स्त्रियांवर ओढवणाऱ्या वैधव्य, केशवपन, आदि आपत्तींनी आगरकर त्या हतभागी स्त्रियांइतकेच व्यथित होत असत. त्यामुळे सतीच्या चालींप्रमाणेच बालविवाहाची चालही कायद्याने बंद करणे त्यांना अत्यावश्यक व अपरिहार्य वाटत होते. ही चाल त्यांना अगदी पहिल्यापासूनच एका अर्थाने सतीच्या चालीहूनही क्रूर वाटत होती. **केसरीच्या** पहिल्याच वर्षाच्या तेविसाव्या अंकातील 'बालविवाहापेक्षा सतीच बरी!' या लेखात ते म्हणतात : 'समजंस वाचकहो, हा बालविवाह नव्हे, आमच्या देशाला महाक्षयरोग लागला आहे.'[२] त्यांच्या मते सतीची चाल म्हणजे 'एक घाव तीन तुकडे' या म्हणीप्रमाणे तात्काळ प्राण घेणारी, तर बालविवाहाची चाल एखाद्या वृक्षाला हळूहळू नष्ट करणाऱ्या किड्यासारखी, अतएव अधिक घातक होती.

---

२. केसरीतील निवडक निबंध, दुसरे पुस्तक, आवृत्ती दुसरी, १९४०, पृ. १११.

त्यामुळे अखेरीस आगरकरांना या प्रश्नावरून २५ ऑक्टोबर १८८७ रोजी अपत्यवत वाढवलेला **केसरी** सोडावा लागला. पण हा तीव्र दु:खाचा घोट त्यांनी पचविला व एकाच वर्षाने १५ ऑक्टोबर १८८८ रोजी गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या सहकार्याने एक स्वतंत्र पत्र काढले, आणि त्याला **'सुधारक'** हे त्या काळी निंदाव्यंजक असलेले, पण आपल्या उद्दिष्टांचे स्वरूप व्यक्त करणारे नाव दिले.

आता त्यांच्या ऊर्जस्वल लेखणीला सारे मैदान मोकळे झाले. विचारांची परिपक्वता आणि आविष्काराचे पूर्ण स्वातंत्र्य यामुळे **सुधारक** चढत्या वाढत्या तेजाने तळपू लागला. आगरकरांचे संपूर्ण व्यक्तिमत्व प्रतिबिंबित करणाऱ्या **सुधारकातून** अवघ्या सात वर्षांत विवेकाच्या पायावर जहाल राजकीय व जहाल सामाजिक सुधारणेची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. हे बिकट कार्य करताना त्यांना अर्थातच एकाच वेळी राजक्षोभास, लोकक्षोभास, एवढेच नव्हे तर जिवलग आप्तांच्या व निकटतम मित्रांच्या रोषासही सामारे आवे लागले. प्रसंगी खुनाच्या धमक्यांनाही तोंड द्यावे लागले. पण हे दिव्य त्यांनी मुळीच न डगमगता केले. आगरकरांच्या चरित्रातील हे सर्वांत महान धीरोदत्त पर्व!

सर्व बाजूंनी होणाऱ्या विरोधास तोंड देता देता शरीर थकले, पार खचले; पण त्यांचा उत्साह व उमेद इतकी प्रचंड की 'मन सुधारकी रंगले, अवघे जन सुधारक झाले' अशी मनोहर स्वप्ने ते पाहात होते. पण वास्तव फार कठोर असते. 'कोण स्वस्थ बसणार? सुधारक अं!' असा प्रश्न दृढ आत्मविश्वासाने प्रतिपक्ष्यास विचारणाऱ्या आगरकरांवर एकामागून एक बिकट आपत्ती कोसळत होत्या. शाळा व कॉलेज यांचा भरभक्कम आधारस्तंभ असलेल्या आपट्यांचा अवघ्या चौतिसाव्या वर्षी मृत्यू; त्यांच्या पत्नीचे जुलमाने झालेले केशवपन; या मागोमाग धारप व केळकर याही सहकाऱ्यांचा मृत्यूने घेतलेला बळी-अशा निर्घृण आघातांनी आगरकरांचे स्नेहार्द्र व हळवे अंत:करण होरपळून गेले. यानंतर फर्ग्युसन कॉलेजची नवी इमारत पाहताना एकीकडे आपट्यांच्या स्मरणाने कष्टी झालेल्या, पण दुसरीकडे ईप्सित गाठल्यामुळे आनंदित झालेल्या आगरकरांना पाहून थोडा दिलासा मिळतो. पण क्षणभरच. कारण मृत्यूने आपले पाश त्यांच्यावरही टाकलेलेच असतात ! पण त्याची चाहूल लागल्यावरही न डगमगता त्यांनी आपले कार्य अखेरपर्यंत चालू ठेवले. आपल्या मागे आपल्या पत्नीने केशवपन करू नये म्हणून तिच्या मनाची तयारी केली, आणि स्वाभिमानाने व स्वावलंबनाने मुलांचा सांभाळ करावा असे तिला सांगितले. आपल्या प्रेतदहनाची इतरांना झीज लागू नये म्हणून पैशांची एक पुरचुंडी बांधून ठेवली. आणि १७ जून १८९५ रोजी पहाटे 'झोप येते, मी स्वस्थ निजतो, तुम्हीही निजा' असे

पत्नीला सांगून स्थितप्रज्ञाप्रमाणे ते मृत्यूला सामोरे गेले!

या धक्क्याने सारा महाराष्ट्र हळहळला. 'माझ्या प्रेतदहनार्थ' हे शब्द लिहिलेली ती पैशांची पुरचुंडी पाहून गोखल्यांना रडू कोसळले. हजारो शिष्यांच्या व मित्रांच्या शोककल्लोळात मुळामुठेचा तीर बुडाला. **केसरीतला** 'आगरकरां'-वरील मृत्युलेख लिहीत असता टिळक घळघळा रडत होते, व तो दोन कॉलमांचा लेख लिहिण्याला त्यांना या उमाळ्याच्या अडथळ्यामुळे चार तासही पुरले नाहीत, असे सांगतात.. ...टिळकांनी....लिहिले :"देशी वर्तमानपत्रास हल्ली जर काही महत्त्व आले असले तर ते बऱ्याच अंशी आगरकर यांच्या विद्वतेचे व मार्मिकतेचे फल होय, यात शंका नाही."[३] २४ जूनच्या **सुधारकातील** आगरकरांवरील इंग्रजी मृत्युलेखाचा आरंभ गोखल्यांची शेक्स्पिअरने अँटनीच्या तोंडी घातलेल्या ब्रूटसविषयीच्या पुढील उद्‌गाराने केला:

.....the elemen.s
So mixed in him that Nature minght stand up
And say to all the world, 'this was a man!'

आगरकरांचा 'एक विद्यार्थी' **सुधारकाच्या** त्याच अंकात लिहिलेल्या पत्रात म्हणतो :'कै. प्रिन्सिपालसाहेब! ज्या अज्ञान देशबांधवांसाठी आपल्या कुटुंबाची, मित्रांची, ज्ञातीची व प्रसंगी त्या देशबंधूंची इतराजी तुम्ही आनंदाने, खुशीने, दृढनिश्चयाने सहन केली, तथापि त्यास म्हणून सोडलेच नाही; शत्रूही बोलणार नाही असे शब्द आपल्या निकट मित्रांनी सार्वजनिकरीत्या आपणावर टाकिले तरी आपण डगमगला नाही; पतित मनुष्याची जी अवस्था करू नये ती आपल्या मूर्ख विद्यार्थ्यांनी व दुराग्रही प्रतिपक्षीयांनी पुण्यासारखा शहरात केली तरी त्या लोकांच्या हिताकडे किंचितही आपण दुर्लक्ष केले नाही; ज्या स्वार्थबुद्धीचा आपणांस जन्मातही स्पर्श झाला नाही तिचाच आरोप करण्यास जरी कोणी फारसे कचरले नाहीत तरी आपण त्यांस चिकटूनच राहिला.... दारिद्र्यावस्थेत विद्याभ्यास करून तारुण्यावस्थेतही निष्कांचनतेच्या पदरी जो पडला, आणि हजारो रुपये प्राप्तीची सुंदर आशा पुढे असता तिला ज्याने लाथाडले, त्याची निरपेक्षता किती असेल? ज्याने आपल्या विचारांची दिशा थोडीशी तरी बदलली असती तरी लोकप्रीतीने मेहेरनजर दाखविली असती-अशा स्थितीतही ज्याने मनाला चांगले वाटेल तेच लिहून व करून काही काळ तरी समाजद्वेष संपादून सुखावर पाणी सोडले, त्याची लोकहितैकनिष्ठा किती तीव्र व दृढ असेल बरे?'[४]

---

३. न. चिं. केळकर, लो. टिळक यांचे चरित्र (पूर्वार्ध), पृ. २०१.

४. मा. दा. अळतेकर, गोपाळ गणेश आगरकर, पृ. ४६१.

२

आता आपण आगरकरांच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय तत्वज्ञानाकडे वळू.

आगरकरांच्या सर्व विचारांचा पाया विवेक हा होता. त्यांनी मानवी जीवनाची जी समीक्षा केली, त्याचे जे दोष सांगितले, त्यात ज्या नवीन सुधारणा सुचविल्या, त्या सर्व विवेकाच्या आधारावर. वृत्तपत्राच्या माध्यमातून विवेकवादाचा सर्वांगीण ऊहापोह करणे त्यांना शक्य नव्हते. तरीही त्याच्या मूलभूत तत्त्वांचे प्रसंगोपात्त विवेचन त्यांनी केले आहे. ते एकत्र केल्यास त्यातून विवेकवादाचे प्रतिपादन व बरेच तपशीलवार विवरण आपल्याला मिळू शकते.

परंतु हे करण्यापूर्वी 'विवेकवाद' या शब्दाविषयी थोडे लिहिणे जरूर आहे. इंग्रजी भाषेतील 'rationalism' या शब्दाचा पर्याय म्हणून मराठीत 'बुद्धिवाद', 'बुद्धिप्रामाण्यवाद' 'विवेकवाद' हे शब्द वापरले जातात. यांपैकी पहिले दोन शब्द न वापरता, तिसरा, 'विवेकवाद' हा शब्द येथे वापरला आहे, त्याचे थोडे समर्थन देणे अवश्य आहे. 'Retionalism' हा शब्द लॅटिन भाषेतील 'ratio' या शब्दापासून बनलेला असून त्याला इंग्रजीत 'reason' हा पर्याय आहे. या 'reason' चा समानार्थी म्हणून 'बुद्धी' हा शब्द आपण वापरतो. परंतु त्यात एक अडचण अशी आहे की 'बुद्धी' हा शब्द 'intellect' आणि 'intelligence' या आणखी दोन इंग्रजी शब्दांचा पर्याय म्हणूनही सर्रास वापरला जातो, आणि त्यामुळे नेमका अर्थ व्यक्त करणे कठीण होऊन बसते. या तीन इंग्रजी शब्दांपैकी 'intelligence' चा पर्याय म्हणून 'बुद्धी' हा शब्द मानसशास्त्रीय परिभाषेत रूढ आहे. म्हणून अर्थाचा गोंधळ टाळण्याकरिता 'reason' ला 'बुद्धी' हा शब्द वापरणे योग्य नाही. 'Reason' आणि 'intellect' हे शब्द स्थूलमानाने एकाच अर्थाचे आहेत, म्हणून त्यांचा पर्याय म्हणून 'विवेक' हा शब्द वापरणे उचित होईल. 'Reason' च्या अनेक कार्यांपैकी सत्यासत्याचा, तसेच इष्टानिष्टाचा विवेक करणे हे कार्य प्रमुख आहे; त्यामुळे 'reason' ला 'विवेक' हा पर्याय योग्य वाटतो. आगरकरांनीही सामान्यपणे 'विवेक' हाच शब्द वापरला आहे.

आपले संपूर्ण जीवन विवेकाने नियंत्रित असावे असा आगरकरांचा आग्रह होता. ते म्हणतात : 'विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोपर्यंत विश्वासाने किंवा श्रद्धेने प्रत्येक गोष्टीत आपला अंमल चालविला यात काही वावगे झाले नाही. जसा लोकांस तसा मनास कोणी तरी शास्ता पाहिजे; व ज्याप्रमाणे मुळीच राजा नसल्यापेक्षा कसला तरी राजा असणे बरे, त्याप्रमाणे वर्तनाचे नियमन करणारे असे कोणतेच तत्त्व नसण्यापेक्षा विश्वासासारखे एखादे स्खलनशील तत्त्व असणे

देखील इष्ट आहे. पण हे कोठपर्यंत? अधिक चांगले तत्त्व अस्तित्वात आले नाही तोपर्यंत. ते आले की जुन्या प्रमादी तत्त्वाने आपली राजचिन्हे श्रेष्ठ तत्त्वाच्या स्वाधीन केली पाहिजेत. हे सरळ अधिकारांतर येथून पुढे विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे व तसे होण्यातच मनुष्यतेस प्राप्त होण्यासारखे ऐहिक व पारमार्थिक सुख लौकर प्राप्त होऊ लागणार आहे. अशी आमची समजूत आहे. व ती तशी असल्यामुळे विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आच देऊन झाळून पाहणे, हे **सुधारकाच्या** अनेक कर्तव्यांपैकी एक कर्तव्य होऊन बसते.' (५७) पण विवेक म्हणजे काय? आणि विवेकाने जीवनाचे नियंत्रण करावयाचे म्हणजे काय करावयाचे? असे प्रश्न यातून उद्भवतात. आपल्या जीवनाची ज्ञान व कर्म ही दोन प्रमुख क्षेत्रे आहेत. त्यांपैकी ज्ञानार्जनाच्या क्षेत्रात आपल्याला सत्यासत्याचा विवेक करावा लागतो व कर्माच्या क्षेत्रात इष्टानिष्टाचा विवेक करावा लागतो. विधानांच्या सत्यासत्यतेची शहानिशा केल्यावरच त्यांचा स्वीकार करावा, आणि कोणते कर्म इष्ट किंवा युक्त आहे याची शहानिशा केल्यावरच ते करावे असे विवेकवादाचे सांगणे आहे. आता विधानांची सत्यासत्यता आणि कर्मांची इष्टानिष्टता निश्चित करण्याचे आपल्याजवळ विवेकाशिवाय अन्य साधन नाही. त्यामुळे विवेकावादाचे समर्थन करण्याकरिता सत्यासत्यता आणि इष्टाइष्टता यांचे विवेकदत्त निकष कोणते आहेत ते सांगणे, आणि विवेकाखेरीज अन्य जे तथाकथित उपाय सांगितले जातात त्यांचे वैयर्थ्य दाखविणे अगत्याचे आहे.

ज्ञान म्हणजे काय किंवा सत्य विधान कशाला म्हणावे या प्रश्नाचे उत्तर गेल्या काही शतकांत विज्ञानाने पूर्णावस्थेस नेले आहे. विश्वास काय काय आहे आणि त्यांचे स्वरूप काय आहे हे निश्चित करण्याची रीत म्हणजे वैज्ञानिक पद्धती. ही पद्धत म्हणजे इंद्रियानुभव व त्याच्यावर आधारलेली अनुमाने असे स्थूलमानाने म्हणता येईल. आपल्याला ज्ञान होते ते एकतर इंद्रियांनी होते किंवा ऐंद्रिय ज्ञानावरून केलेल्या अनुमानाने होते. विज्ञान नावाची जी एक विराट ज्ञानसंहती आता प्रस्थापित झाली आहे आणि जिची प्रगती अव्याहत चालू आहे, ती सर्व शेवटी इंद्रियानुभवावर आधारलेल्या अनुमानांच्या साह्यानेच झाली आहे. या दोन आधारस्तंभाखेरीज ज्ञानाचा अन्य उपाय नाही असे विवेकाचे सांगणे आहे. तेव्हा ज्ञानाचे याखेरीज जे कोणते मार्ग आहेत असे मानले जाते त्यांचे स्वरूप आणि त्यांचा अधिकार काय आहे याचा विचार आता करणे अवश्य आहे.

विज्ञानाचे पराक्रम जरी मोठे असले तरी त्याचे क्षेत्र मर्यादित आहे, तसेच त्याने उपलब्ध करून दिलेले ज्ञान अंतिम नव्हे, असे मानणारे बरेच लोक आगरकरांच्या काळी होते आणि आजही त्यांची संख्या कमी नाही. ते म्हणतात

की विज्ञानाचे क्षेत्र बोलून चालून दृश्य किंवा इंद्रियगोचर जग. परंतु या जगाच्या पलीकडेही विश्व आहे आणि त्याची जाणीवही विज्ञानाला नाही. हे जग अतींद्रिय आहे. त्याला परलोक, पारमार्थिक सत्ता, परमेश्वर, इत्यादी नावांनी संबोधले जाते. ह्या पारमार्थिक जगाचे ज्ञान आपल्याला श्रुतींतून मिळते आणि साक्षात्काराने त्याची प्रचीती येते. ज्याला आपण धर्म म्हणतो त्याचे हेच सांगणे आहे आणि धर्माधिष्ठित तत्त्वज्ञानाचेही तेच प्रतिपादन आहे. उदा. भारतीय तत्त्वज्ञानात असे सांगितले आहे की अंतिम सत्याचे किंवा परमार्थाचे ज्ञान मिळविण्याचा एकमेव उपाय म्हणजे श्रुती. त्या अपौरुषेय असून ईश्वरकृत आहेत आणि त्यामुळे त्यात चूक किंवा न्यून काहीही असणे अशक्य आहे. त्यावर अनन्य श्रद्धा ठेवून त्यातील शिकवणीवर प्रदीर्घ काल चिंतन केल्यावर शेवटी आपल्याला परम सताचा साक्षात्कार होतो. त्यातून मग आपल्याला कळते की एक अद्वितीय असे परम तत्व आहे, आपण जीव त्याचेच अंश आहोत; आपले मूळ स्वरूप परमात्मरूपच होते, पण काही कारणामुळे त्या स्वरूपापासून आपण भ्रष्ट झालो आणि आपण इहलोकात जन्म घेतला. आपले परम प्राप्तव्य म्हणजे आपल्या मूळ परमात्मस्वरूपाची प्राप्ती हेच होय. ह्यालाच मोक्ष म्हणतात. मोक्षाहून श्रेष्ठ असे साध्य मानवापुढे नाही. हा मोक्ष कसा मिळवावयाचा याचे मार्ग श्रुतीतच आपल्याला सांगितलेले आढळतात. आणि भिन्न भिन्न दर्शनांनी त्यांचीच वेगवेगळी स्पष्टीकरणे दिली आहेत. आपल्या या संबंध विश्वावर कर्मसिद्धांताची अधिसत्ता आहे. प्रत्येक मनुष्याला आपल्या कर्माची फळे चाखावीच लागतात आणि त्याकरिता त्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो, इत्यादि.

हे जे वर भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान यांचे प्रतिपादन संक्षेपाने दिले आहे, त्याच धर्तीची प्रतिपादने थोड्याफार फरकाने पृथ्वीच्या पाठीवर अन्य भागात जे धर्म आणि तत्त्वज्ञाने उद्‌भवली आहेत, त्यांनीही केली आहेत. आगरकर म्हणतात: 'धर्ममंदिराची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे, असे हिंदू धार्मिकांचेच म्हणणे आहे असे नाही. पृथ्वीवरील कोणत्याही प्रकारच्या धार्मिकास विश्वासाशिवाय त्राता नाही व थारा नाही. या संबंधाने बुद्धिवादाचे नाव काढले की त्यांच्या अंगावर काटा उभा राहतो!....त्यांना अशी भीती वाटते की, ते हिणकस ठरल्यास, पुढे काय करावे? आम्हास असे वाटते की असले भित्रपण फार दिवस चालावयाचे नाही. (५६-५७)

विवेकवादाच्या निकषावर धर्माची चिकित्सा केल्यास त्याची काय अवस्था होते हे पाहण्याकरिता आपण आपल्याला परिचित अशा हिंदू धर्माचे उदाहरण घेऊ. या संबंधात पहिला प्रश्न उपस्थित होतो तो हा की, आपण वर जे या धर्माचे प्रतिपादन दिले आहे ते सत्य मानण्यास आधार काय? श्रुतींच्या सत्यत्वाचा पुरावा

काय? याला उत्तर असे दिले जाते की श्रुती परमेश्वराचे शब्द आहेत आणि परमेश्वर पूर्ण असल्यामुळे तो असत्य बोलू शकत नाही. यातून दोन प्रश्न उद्‌भवतात. एक, परमेश्वर आहे कशावरून? आणि दोन, श्रुती त्याने केल्या कशावरून? यांपैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर निर्णायक देता येत नाही असा शेकडो वर्षांच्या हजारो विचारवंतांच्या चर्चेचा मथितार्थ आहे. परमेश्वर नाही असे सिद्ध करणारी निर्णायक प्रमाणे जरी उपलब्ध नसली, तरी तो आहे याचाही निर्णायक पुरावा नाही. त्यामुळे तो नाही हे निदान शक्य आहे हे मान्य केले पाहिजे. परंतु तो आहे हे जरी मान्य केले तरी त्याने श्रुती निर्मिल्या, ह्याला पुरावा काय हा प्रश्न शिल्लकच राहतो; आणि याला कसलाही सयुक्तिक पुरावा देता येत नाही. धार्मिक लोक म्हणतात की खुद्द श्रुतीतच असे म्हटलेले आहे की, त्या परमेश्वराची निःश्वसिते आहेत. पण ह्या युक्तिवादातील दोष अगदी उघड आहे. आगरकर म्हणतात, "अशा प्रकारच्या विचारशैलीस तर्कशास्त्रात परिवृत्तिवाद म्हणतात. अशा प्रकारच्या कोटिक्रमाने संशयनिवृत्ति होत नाही, कारण यातील विचार परस्परावलंबी असतात. 'पृथ्वी कोठे आहे?' 'शेषाच्या मस्तकावर', 'शेष कोठे आहे?' 'पृथ्वीच्या खाली!' अशा प्रकारची वरील प्रश्नोत्तरावली आहे."[५]

श्रुतिप्रमाण्यावर एक फार निर्णायक आक्षेप घेता येतो. तो म्हणजे श्रुती खऱ्या मानायचे ठरविले तरी कोणत्या श्रुती खऱ्या मानायच्या? कारण सर्वच श्रुती एकच गोष्ट सांगत नाहीत. उपनिषदांत अनेक मते आहेत. जसे अद्वैती मत त्यात सापडते तसेच द्वैती मतही सापडते. तेव्हा दोन श्रुतींमध्ये जर वाद निर्माण झाला तर कोणत्या श्रुतीचे आपण ऐकायचे? एका धर्माची मर्यादा ओलांडून आपण इतर धर्माच्या श्रुती पाहू लागलो म्हणजे तर ही आपत्ती विशेषच जाचक स्वरूप धारण करते. कारण बायबल, कुराण, इत्यादि जे इतर श्रुतिग्रंथ आहेत त्यांचाही दावा आपण ईश्वराचे बोल ऐकवत आहोत असाच असतो. परंतु त्यात अत्यंत भिन्न गोष्टी ईश्वरप्रणीत म्हणून सांगितलेल्या आढळतात. त्या सर्वच खऱ्या असणे शक्य नाही. मग त्यांपैकी खऱ्या कोणत्या मानायच्या? यावर सामान्यपणे स्वीकारला जाणारा मार्ग म्हणजे जो ज्याचा धर्म; त्याची श्रुती त्याच्यावर बंधनकारक. म्हणजे प्रत्येक धर्माच्या अनुयायांच्या दृष्टीने अंतिम सताचे स्वरूप भिन्न आहे असे मानावे लागले. पण हे तर सर्वथा असमर्थनीय आहे. सत्य हे आत्मविसंगत

---

५. 'धर्मग्लानीबद्दल उपरति-२' आगरकर-वाङ्मय, खंड २ मध्ये समाविष्ट होणार असलेल्या निबंधांतील उताऱ्यांचे पृष्ठांक देणे शक्य नसल्यामुळे त्या निबंधांची नावेच तळटीपांत दिली आहेत.

असू शकत नाही. अंतिम सताचे स्वरूप काही तरी एकच असले पाहिजे. त्याची भिन्न श्रुतिकारांनी भिन्न वर्णने दिले असतील तर त्या सर्वांचे प्रतिपादन अप्रमाण मागण्यावाचून गत्यंतर नाही.

जी गोष्ट श्रुतींची तीच साक्षात्काराचीही. श्रुतीमध्ये सांगितलेल्या सताचा साक्षात्कार होण्याकरिता फार दीर्घ साधना करावी लागते हे प्रसिद्ध आहे. ही साधना म्हणजे साधकाच्या मनाला अखंड दिले जाणारे प्रशिक्षण असते. या प्रशिक्षणाचे स्वरूप बारकाईने तपासल्यास ते auto-suggestion सारखे, आत्ममंत्रणासारखे, असते असे दिसून येते. ज्याप्रमाणे मोहनिद्रेत संमोहक जे सांगेल तसा अनुभव संमोहित व्यक्तिला येतो, त्याचप्रमाणे साक्षात्कारातही साधकाने प्रदीर्घ काळपर्यंत जे ध्यान केलेले असते, सताचे जे स्वरूप आपल्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केलेला असतो, तेच स्वरूप शेवटी त्याला साक्षात् दिसते. यात आश्चर्य काही नाही. पण यावरून साक्षात्कार हा यथार्थ अनुभव आहे असे सिद्ध होत नाही. उलट एका विशिष्ट साक्षात्काराकरिता साधकाची तयारी सतत चाललेली असते, त्याला अनुकूल अशी मनोभूमिका त्यासाठी तयार केली जात असते. यावरून तो भ्रामक असतो हेच सिद्ध होते. त्यामुळेच हा साक्षात्कार प्रत्येक धर्माच्या साधकाला, एवढेच नव्हे, प्रत्येक साधकाला, वेगवेगळा येतो. उदा. रामभक्ताला धनुर्धारी रामाचा येतो, तर कालीच्या शिष्याला महिषासुरमर्दिनीचा येतो, इत्यादि.

याप्रमाणे इंद्रियानुभव व त्यावरून केलेला तर्क ह्यांखेरीज ज्ञानसाधने म्हणून जी सांगितली जातात ती, म्हणजे शब्द आणि साक्षात्कार, ज्ञानसाधने म्हणून निरुपयोगी आहेत हे सिद्ध झाले, व विवेकाचा ज्ञानक्षेत्रातील आग्रह रास्त आहे हे प्रस्थापित झाले. आता विवेकाचा कर्मक्षेत्रातील अधिकारही कसा समर्थनीय आहे ते पाहू.

ज्याप्रमाणे ज्ञानक्षेत्रातील प्रमुख प्रश्न 'मी काय खरे मानावे?' हा आहे. त्याप्रमाणे कर्मक्षेत्रातील प्रमुख प्रश्न 'मी काय करावे?' हा आहे. त्याचेही प्रचलित स्वीकृत उत्तर 'धर्म' हेच आहे. धर्माची दोन अंगे असतात. ज्ञानात्मक किंवा विश्ववर्णनात्मक आणि कर्मात्मक. त्याचे पहिले अंग भ्रामक आहे हे आपण पाहिले. आता त्याच्या कर्मोपदेशक अंगाकडे वळू. आम्हा हिंदूंच्या कर्मांचे नियंत्रण करणारे जे धर्मशास्त्र आहे त्याला स्मृतीही म्हणतात. या स्मृतींनी कर्मांचे चार प्रकार सांगितले असून ते अनुक्रमे नित्य, नैमित्तिक, काम्य आणि निषिद्ध हे होत. ह्या चतुर्विध कर्मांचे वर्णाश्रमधर्मात आणखी विभाजन होते. मनुष्यसमाजाचे चार वर्णांत विभाजन करून त्या वर्णांचे प्रत्येकी चार आश्रमात विभाजन केले आहे, आणि

प्रत्येक आश्रमात कोणी केव्हा काय करावयाचे याची विस्तृत आणि तपशीलवार नोंद केली आहे. आपले कर्तव्य काय आहे? निषिद्ध कर्मे कोणती? आणि अनुज्ञेय कर्मे कोणती? यांचा संपूर्ण तपशील या स्मृतीग्रंथातून दिला आहे. तसेच धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे मानवाचे चार पुरुषार्थ सांगितले असून त्यांपैकी मोक्ष हा सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ होय असे म्हटले आहे.

आता यासंबंधाने पहिले उत्तर असा उद्भवतो की, आपण स्मृतीचे आदेश का पाळायचे? याला पहिले उत्तर जे मिळते ते असे की स्मृती ऋषीप्रणीत असून ऋषींना ईश्वराकडून प्रेरणा मिळालेली आहे. यावर अनेक प्रश्न संभवतात. पहिला प्रश्न असा आहे की स्मृतीतील आदेश सर्वशक्तिमान परमेश्वराने दिलेले आहेत म्हणून ते आपल्यावर बंधनकारक आहेत, की ते चांगले, हितकर आहेत म्हणून परमेश्वराने ते आपल्याला दिले आहेत? जर सर्वशक्तिमान परमेश्वराने ते दिले आहेत म्हणून ते आपण ते पाळले पाहिजेत असे आपण म्हणालो तर त्यात जे जे शक्तिमान ते ते चांगले असे गृहीत धरल्यासारखे होते. पण शक्ती म्हणजे चांगुलपणा नव्हे हे उघड आहे. शक्ती म्हणजे चांगुलपणा असे म्हणणे म्हणजे गुलामांची नीती स्वीकारणे होईल. अशा नीतीविरुद्ध आपली नैतिक बुद्धी बंड करून उठते. पण जर आपण दुसरा पर्याय स्वीकारला आणि असे म्हणालो की ईश्वराचे आदेश आपण पाळले पाहिजेत, कारण ते हितकर आहेत आणि म्हणूनच ईश्वराने ते दिले आहेत, तर त्यावरही आपत्ती येते. कारण तसे मानले तर त्या आदेशांचे हितकरत्व ही स्वतंत्र गोष्ट आहे; आणि ईश्वराने ते दिले याच्याशी त्यांच्या हितकरत्वाचा संबंध नाही हे मान्य करावे लागते. यावरून नीती ईश्वरावर अवलंबून नाही हे स्पष्ट होते.

हिंदुधर्मप्रणीत नीतीची शिकवण भगवद्गीतेत आलेली आहे, असे सामान्यपणे मानले जाते. तिच्यानुसार मनुष्याचे सर्वोच्च प्राप्तव्य म्हणजे मोक्ष. मोक्ष म्हणजे सुटका. कशातून? तर सर्व प्रकारच्या दु:खांतून. परंतु या सुटकेचे लौकिक उपाय कामाचे नाहीत, कारण आपल्या बहुविध दु:खांचे खरे कारण आपला इहलोकीचा जन्म हेच आहे. जीवन दु:खमय आहे आणि त्याचा संपूर्ण नाश होईपर्यंत पूर्ण दु:खनाश अशक्य आहे. यावर एक उपाय असा सुचेल की 'मग आत्महत्या हे मोक्षाचे साधन होईल.' पण हे उत्तर बरोबर नाही, कारण मृत्यूनंतर पुनर्जन्म अटळ असतो म्हणजे मृत्यूने मोक्ष मिळत नाही. या ठिकाणी आपल्या तत्त्वज्ञानातील एका प्रमुख आणि महत्त्वाच्या सिद्धांताचा उल्लेख करावा लागेल. तो सिद्धांत म्हणजे कर्मसिद्धांत. ह्या सिद्धांताचे प्रतिपादन असे आहे की, प्रत्येक मनुष्याला आपल्या प्रत्येक कर्माचे फळ, सत्कर्माचेही फळ, भोगावेच

लागते, आणि त्याकरिता पुनर्जन्म घ्यावा लागतो. मग आपले सर्वश्रेष्ठ प्राप्तव्य जे मोक्ष, त्याचा उपाय कोणता? या प्रश्नाला गीतेचे उत्तर आहे-निष्कामकर्म. जोपर्यंत प्राण आहेत तोपर्यंत कर्म टाकणे कोणालाच शक्य नाही. पण त्या कर्मफळांचे बंधन चुकविण्याचा एक उपाय आहे, तो म्हणजे कर्मे फळांच्या अभिलाषेने न करता, केवळ कर्तव्ये म्हणून करणे. या पद्धतीने विहित कर्मे केली म्हणजे त्यांची फळे आपल्याला भोगावी लागत नाहीत आणि जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून आपली सुटका होऊन आपण आपल्या मूळ स्वरूपास प्राप्त होतो.

आता हे नीतिशास्त्र एका अतिभौतिकावर (metaphysics), अध्यात्मशास्त्रावर, आधारलेले आहे हे उघड आहे. हे अध्यात्मशास्त्र आपण मानले नाही तर त्याच्यावर आधारलेले नीतिशास्त्रही आपण टाकू शकतो. आता हे अध्यात्मशास्त्र पूर्णत: श्रुतींवर आधारलेले आहे. पण श्रुती निराधार आहेत, हे आपण वर पाहिलेच आहे. मग या अध्यात्मशास्त्राच्या सत्यत्वाचे प्रमाण काय? या प्रश्नाला उत्तर नाही, आणि म्हणून विवेकाच्या निकषावर ते क्षणभरही टिकणारे नाही. उदा. कर्मसिद्धांताचे प्रतिपादन खरे कशावरून? याला अनेकदा कार्यकारणाच्या सिद्धांताचा आधार दिला जातो. प्रत्येक घटनेला कारण असते व प्रत्येक घटनेला कार्यही असते, या सर्वमान्य नियमावरून कर्मसिद्धांत निष्पन्न होतो असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे कोणतीही घटना घडली की तिचे काही तरी कार्य घडतेच, त्याचप्रमाणे आपण कोणतेही कर्म केले तर त्याचेही फळ येणारच. पण या ठिकाणी फार मोठा गोंधळ आहे. कारणाच्या नियमात अभिप्रेत असलेली कार्याची संकल्पना आणि कर्मसिद्धांतात अभिप्रेत असलेली फळाची संकल्पना या अतिशय भिन्न कल्पना असून त्यांचा परस्परांशी कसलाही सबंध नाही. कर्मफळ ही कल्पना नैतिक आहे, कारण ही फळे चांगली किंवा वाईट अशी दोन प्रकारची असतात, आणि ती अनुक्रमे सत्कर्म आणि दुष्कर्म यांना येतात असे म्हणतात. परंतु कारणाच्या नियमात अभिप्रेत असलेली कार्याची संकल्पना ननैतिक (amoral) आहे. तिचा सत्कर्म व दुष्कर्म यांच्याशी कसलाही संबंध नाही. शिवाय कर्म करणारा आणि इतर यांतील कर्मसिद्धांताला अभिप्रेत असणारा भेद कारणाच्या नियमाच्या दृष्टीने पूर्णपणे अप्रस्तुत आहे. कर्माचे फळ कर्म करणाऱ्यालाच भोगावे लागते, पण कार्य कर्ता व इतर दोघांवरही घडू शकते. तसेच कारणाच्या नियमात अभिप्रेत असलेली कार्ये कारणानंतर तत्काळ घडतात, तर कर्मसिद्धांतास अभिप्रेत असलेली फळे पुढच्या जन्मास येतात. शिवाय कर्मसिद्धांत खरा असण्याकरिता सबंध विश्व कोणातरी नैतिक शक्तीच्या नियंत्रणाखाली आहे असे मानावे लागेल. पण त्याचा कसलाही साधक पुरावा

सापडत नाही. उलट बाधक पुरावा भरपूर आहे या सर्व कारणास्तव असा निष्कर्ष काढणे भाग आहे की, कर्मसिद्धांत ही पूर्णपणे निराधार अशी एक उपपत्ती आहे. कर्मसिद्धांत गेला की मोक्षकल्पनाही गेलीच. आणि म्हणून मोक्षप्राप्तीकरिता सांगितलेली गीताप्रणीत नीतीही निष्प्रयोजन ठरते.

शिवाय वर धर्माच्या ज्ञानात्मक अंगावर जो आक्षेप घेतला आहे तोच कर्मात्मक अंगालाही लागू आहे. तो म्हणजे विविध धर्मांनी कर्तव्य आणि निषिद्ध म्हणून सांगितलेले आचार अतिशय भिन्न आणि प्रसंगी परस्परविरुद्धही असतात. तेव्हा त्यांपैकी कोणते बंधनकारक समजावयचे? याला उत्तर, ज्या त्या धर्माच्या अनुयायाने आपापल्या धर्माने सांगितलेल्या मार्गाने जावे असे आहे. पण यातून अशी अडचण निर्माण होते की एकच कर्म, (उदा. मूर्तिपूजा), हिंदूने केले तर ते सत्कर्म ठरते, पण मुसलमानांनी केले तर मात्र ते पाप ठरते; ही अवस्था विवेकास मुळीच पटण्यासारखी नाही हे उघड आहे.

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा काढता येईल की, ज्याप्रमाणे ज्ञानाच्या क्षेत्रात धर्माला स्थान नाही; त्याचप्रमाणे कर्माच्या क्षेत्रातही त्याला स्थान नाही. आपण काय करावे आणि काय करू नये हे ठरविण्याचे धर्माखेरीज अन्य उपाय आपल्याजवळ आहेत. नीतिशास्त्राचे ते काम आहे. यासंबंधात आगरकरांनी 'धर्मग्लानीबद्दल उपरति-१' या निबंधात मांडलेले विचार फार महत्त्वाचे आहेत. 'सत्य बोलणे, परोपकार करणे, अपकार न करणे, सदुद्योगात गढून असणे, वाडवडिलांचा योग्य मान ठेवणे, स्वदेशावर प्रीती करणे, राजनिष्ठ असणे, वगैरे गोष्टी सर्वानुमते सद्गुण ठरल्या आहेत....मनुष्याचे सामाजिक हित वाढत जाण्यास त्या अत्यंत आवश्यक आहेत अशी सर्वांची खात्री झाली आहे. पण या व यांसारख्या गोष्टींशिवाय पुष्कळ इतर वस्तूंचा धर्म किंवा धर्मशास्त्र या संज्ञांत समावेश करतात....वेद, बैबल, कुराण ही सारी ईश्वरप्रणीत पुस्तके असून ज्याप्रमाणे ती साऱ्यांस तशी आहेत असे वाटत नाही, व ज्याला त्याला आपले धर्मपुस्तक तेवढे ईश्वरप्रणीत आहे असे वाटते, त्याप्रमाणे वेद ईश्वरप्रणीत मानाणाऱ्यांतही अनेक मतभेद आहेत. शिवाय धर्मशास्त्रात आचारप्रकरणही बरेच शिरते, किंबहुना धर्माचा मुख्य भाग तेच होऊन बसते....धर्ममंत्राबरोबरच जे तंत्राचे लचांड असते ते एकाचे दुसऱ्यास बिलकुल पटत नाही. ब्राह्मण म्हणतो शेंडी ठेवली पाहिजे; मुसलमान म्हणतो ती काढली पाहिजे; ख्रिस्त्याला दोन्ही गोष्टींचे काहीच वाटत नाही' म्हणून 'अलीकडील विद्वान लोक....नीतितत्त्वांचा विचार धर्मविचारापासून निराळा करतात....नीतितत्त्वांचा अभ्यास पृथक्पणाने केला असता तो फार सोपा जातो, म्हणून सर्वमान्य नीतितत्त्वांचा धर्मात समावेश न

करता त्या तत्त्वांचे स्वतंत्र शास्त्र कल्पून त्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करवावा.'[६]

येथे महात्मा गांधींच्या धर्मविषयक एका मताचा उल्लेख करणे उद्बोधक होईल. सर्व धर्म सारखेच सत्य आणि पूज्य आहेत असे ते प्रतिपादीत. याच्या उलट आगरकरांचे म्हणणे सर्व धर्म सारखेच तुच्छ होत; असे होते. आता गांधीजी जेव्हा म्हणतात की सर्व धर्म सारखेच पूज्य आहेत; त्यावेळी त्यांना सर्व धर्मात शिकविली जाणारी समान नीतितत्त्वे अभिप्रेत असावीत हे उघड आहे. खरे बोलावे, परोपकार करावा, चोरी करू नये, हिंसा करू नये, इत्यादी नीतितत्त्वे सर्वच धर्मांनी वंद्य मानली आहेत हे स्वत: आगरकरही म्हणतात. परंतु असे असूनही सर्व धर्म सारखेच तुच्छ आहेत असे ते म्हणतात; याचे कारण असे आहे की, कोणत्याही धर्माचे तद्धर्मत्व, (म्हणजे हिंदुधर्माचे हिंदुधर्मत्व, इस्लामचे इस्लामत्व, इ.), तो धर्म आणि इतर धर्म यांत समान असणाऱ्या गोष्टींत असत नाही, तर तो धर्म आणि इतर धर्म यांतील भेदांत असते. आगरकर म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येक धर्मात तंत्राचे लचाड असतेच आणि हे प्रत्येक धर्माचे वेगवेगळे असते; ते वेगळे असते यातच प्रत्येक धर्माचे वेगळेपण असते, आणि म्हणूनच दोन भिन्न धर्मांतच नव्हे, तर एकाच धर्मातील दोन पंथांतही कडवा विरोध असतो आणि प्रसंगी त्याच्यात प्राणघातक संघर्षही पेटतात शिया-सुनी, कॅथॉलिक-प्रॉटेस्टंट, अकाली-निरंकारी यांच्यातील हाडवैर याचेच द्योतक आहे. परंतु ह्या तंत्रात्मक, कर्म-कांडात्मक वेगळेपणाची चिकित्सा केल्यास त्याचे नैतिक मूल्य शून्य असते, असे सहज लक्षात येते. हिंदूने शेंडी राखणे, गंगास्नान करणे आणि गाय पवित्र मानणे, आणि मुसलमानाने सुंता करणे, मक्केची यात्रा करणे, डुकराचे मांस न खाणे या गोष्टींना नीतीच्या दृष्टीने काही महत्त्व नाही. त्यामुळे सर्व धर्म सारखेच तुच्छ होत हे आगरकरांचे मत; अधिक ग्राह्य आहे असे म्हणावे लागते.

आता 'आपण काय करावे?' याचे धर्मप्रणीत उत्तर आपण त्याज्य ठरविल्यामुळे त्याचे विवेकप्रणीत उत्तर काय असेल ते पाहू.

या संबंधात आगरकर नि:संदिग्धपणे सांगतात की, समाजास हितकारक असे आचार कोणते ते ठरविण्याचे सामर्थ्य पूर्वीच्या ऋषींप्रमाणेच आजच्या विचारवंतांतही आहे. 'कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता. तितकाच आम्हांसही आहे; ....बऱ्या वाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धी त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही

---

६. 'धर्मग्लानीबद्दल उपरति-२.'

आहे; अनुयायांसाठी त्यांचे अंत:करण जितके कळवळत होते, तितके किंवा त्याहून अधिक आमचेही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितके त्यांस होते, तितके किंबहुना त्याहून बरेच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनी घालून दिलेल्या नियमांपैकी जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागी आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार.' (२८३)

हे नवीन आचार घालताना विवेकवादी व्यक्तीची विचारसरणी स्थूलमानाने पुढीलप्रमाणे असेल.

प्रत्येक मनुष्य आपल्या इच्छा पूर्ण करण्याकरिता धडपडत असतो. त्या पूर्ण झाल्या म्हणजे त्याला सुख, संतोष किंवा समाधान होते. त्या विफल झाल्या म्हणजे त्याला दु:ख, असंतोष किंवा असमाधान होते. परंतु आपला प्रश्न; मनुष्य काय करतो ? हा नाही. त्याने काय करावे? किंवा काय करणे त्याचे कर्तव्य आहे ? हा आहे. याचे उत्तर मनुष्यस्वभावास अनुसरून द्यावयाचे तर असे म्हटले पाहिजे की, हे इच्छापूर्तीचे समाधान जास्तीत जास्त प्रमाणात जास्तीत जास्त लोकांना ज्याने मिळेल ते आचरण युक्त किंवा विवेकी होईल. या दृष्टीने विचार करता पुढील गोष्टी ध्यानात येतात.

(१) आपल्या इच्छा अनंत असतात. त्यापैकी कोणतीही पूर्ण करायची म्हटली तरी इतर अनेक अपूर्ण ठेवाव्या लागतात. तेव्हा आपल्या एकूण इच्छांचा असा समन्वय घडवून आणला पाहिजे की त्यामुळे जास्तीत जास्त इच्छापूर्ती होईल आणि कमीत कमी इच्छा विफल होतील. त्याकरिता दूरदृष्टी ठेवावी लागेल. आगरकर म्हणतात : 'सुखोपभोगासाठी सर्व प्राणिमात्र धडपडत असतो व ज्यास जे प्राप्त होईल त्याने त्यापासून आनंद करून घ्यावा, हे योग्य आहे; पण ज्या सुखोपभोगामुळे निरंतर तो घेता येण्याची शक्यता नाहीशी होते; बुद्धीस मांद्य येते; गात्रे नि:शक्त होतात; उत्साह नाहीसा होतो, आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होता उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो, अशा सुखोपभोगात निमग्न असण्यात काय फायदा आहे बरे? ...सुदैवाने ज्यांना सुखोपभोग करून घेता येत असेल त्यांनी सुखांची निवड करताना ती आपणास व इतरांस शेवटपर्यंत हितावह होतील किंवा नाही, येवढे पाहात जावे म्हणजे झाले.' (४६-४७)

(२) दुसरी गोष्ट म्हणजे ज्या जास्तीत जास्त इच्छांची पूर्ती करण्याकरिता धडपडावे असे वर म्हटले त्या सर्व इच्छा ऐहिक असल्या पाहिजेत. पारलौकिक सुख किंवा समाधान ही गोष्ट केवळ मानीव असून ती पूर्णपणे निराधार आहे

असे विवेकाचे म्हणणे आहे. तेव्हा त्यांचा मुळीच विचार न करता आपण केवळ इहलोकात पूर्ण होणाऱ्या इच्छाच विचारात घेतल्या पाहिजेत.

(३) वरील विवेचनावरून असे निष्पन्न होते की, ज्याने त्याने आपल्याला महत्तम सुख मिळवावे. पण यावर असा आक्षेप घेतला जाईल की असे मानले तर परोपकार, समाजहितार्थ झटणे, इत्यादी गोष्टींना नीतीत स्थान राहणार नाही. परंतु हा आक्षेप मनुष्यस्वभावाचे अपुरे आकलन दाखविणारा आहे. मनुष्यास आपल्या इच्छांची पूर्ती प्रिय असते हे निर्विवाद आहे. पण म्हणून तो केवळ स्वार्थी असतो असे नव्हे. स्वसुखार्थ इच्छा ज्याप्रमाणे त्याच्या ठिकाणी असतात, त्याचप्रमाणे परसुखार्थ इच्छाही असतात. करुणा, परोपकार, सहानुभूति इत्यादी भावना मनुष्यस्वभावाचे अविभाज्य अंग आहेत. केवळ परोपरकारार्थ झटणारे महात्मे सोडून दिले तरी सामान्य मनुष्यांतही या भावना थोड्याफार प्रमाणात असतात. आपल्या कुटुंबातील व्यक्ती, आपले मित्र, आपले देशबांधव यांच्या दु:खाने तो व्यथित होतो आणि त्यांच्या सुखाने तो संतोष पावतो. त्यामुळे परार्थात स्वार्थही मोठ्या प्रमाणात आढळून येतो.

(४) आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, समाजातील बहुतेक व्यक्ती इतक्या दुर्बळ आणि अज्ञ असतात की त्यांनी स्वसुखार्थ कितीही धडपड केली तरी त्यांना फारसे सुख मिळण्याची आशा नसते. म्हणून सर्वांच्या, निदान अनेकांच्या सुखार्थ झटावे अशी नीती रूढ केली तर सर्वांना थोडेबहुत सुख मिळण्याचा संभव कितीतरी वाढतो. म्हणजे सार्वजनिक सुख हे आपल्या कर्माचे ध्येय लोकांपुढे ठेवल्याने प्रत्येकास सुख मिळण्याची शाश्वती वाढते. बेंटम, मिल, इत्यादि तत्त्वज्ञांनी म्हणूनच भूयिष्ठांचे भूयिष्ठ सुख (greatest happiness of the greatest number) हे ध्येय मानवसमाजाचे अंतिम ध्येय असले पाहिजे असे म्हटले आहे.

(५) मात्र सुख इष्ट आहे असे म्हणताना आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे सर्व सुखे एकाच योग्यतेची असतात असे विवेक सांगत नाही. मनुष्याच्या बऱ्याच इच्छा पशूंच्या इच्छांहून भिन्न नसतात हे खरे असले, तरी सुसंस्कृत मनुष्यास ज्ञानानंद, कलास्वाद, परोपकार, आत्मार्पण आदि केवळ मानवासच शक्य असलेल्या सुखांची फार मातब्बरी वाटते. ज्यांनी या उच्च सुखांचा अनुभव घेतलेला असतो, ते या सुखांचे माहात्म्य आग्रहपूर्वक प्रतिपादतात. तेव्हा या सुखांकडे आपण दुर्लक्ष करता कामा नये.

सारांश, बहुविध ऐहिक सुख जास्तीत जास्त प्रमाणात जास्तीत जास्त व्यक्तींच्या वाट्यास येणे हे आपल्या नैतिक जीवनाचे अंतिम ध्येय आहे आणि

म्हणून आपल्या समाजाची रचना, त्याच्या संस्था, त्यातील चालीरीती, त्याचे कायदे इत्यादींच्या मूल्यांचा निकषही तोच आहे. कोणताही आचार विवेकाच्या निकषावर घासून पाहणे याचा अर्थ आता स्पष्टपणे सांगता येईल. तो असा की वरील अर्थी भूयिष्ठांचे सुख निर्माण करणारा आचार युक्त आहे किंवा तो सदाचार आहे, आणि त्याहून कमी सुखोत्पत्ती ज्याने होते किंवा जो अनावश्यक दु:खास कारणीभूत होतो. तो आचार अयुक्त आहे, दुराचार आहे.

विवेकवादावर अनेक आक्षेप घेतले गेले आहेत आणि आजही घेतले जात आहेत. त्यांपैकी एक दोन महत्त्वाच्या आक्षेपांचा विचार करून हे विवेकवादाचे विवेचन संपवू. एक नेहमी घेतला जाणारा आक्षेप असा आहे की, विवेकवादानुसार आपल्या संपूर्ण जीवनाचे नियमन विवेकाने करावयाचे असल्याने मानवी स्वभावातील अन्य घटकांकडे दुर्लक्ष होणे अपरिहार्य आहे. विशेषत: भावना हे जे मानवी जीवनाचे एक अतिशय महत्त्वाचे अंग आहे त्याची विवेकवादी जीवनात उपेक्षा झाल्यावाचून राहणार नाही. पण मग मानवी जीवन रूक्ष, नीरस होणार नाही काय? प्रेम, वात्सल्य, मित्रांचा स्नेह, कलास्वाद, सौंदर्योपासना इत्यादी गोष्टींना फाटा मिळणार नाही काय? हा विवेकवादावर घेतला जाणार प्रमुख आक्षेप आहे. पण तो पूर्ण गैरसमजातून उद्‌भवला आहे. विवेकवादी जीवनात भावनांच्याकडे दुर्लक्ष होईल असे आक्षेपक कशाच्या आधारे म्हणतात ते कळत नाही. भावनेला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे हा निर्णय शेवटी करते कोण? भावना की विवेक? हा निर्णय विवेकाचाच आहे. कारण भावनेच्या ठिकाणी निर्णय करण्याचे, नियमन करण्याचे, सामर्थ्यच नाही. प्रेम, क्रोध, भय, जुगुप्सा इत्यादि भावना त्यांना अनुकूल अशा परिस्थितीत आपल्या मनात उद्भवतात. परंतु त्या सर्वच प्रसंगी त्यांचा उद्‌भव आणि त्याची मात्रा योग्य किंवा इष्ट असते असे आपण म्हणत नाही. उलट काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर या भावना मानवाचे षड्रिपु आहेत, आणि स्नेह, करुणा, सहानुभूति इत्यादि भावना त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत असे आपण मानतो. यावरून सर्वच भावना सर्वदा सर्वत्र चांगल्या किंवा इष्ट असतात असे आपण मानीत नाही हे उघड आहे. पण अमुक भावना उच्च आणि अमुक भावना नीच, किंवा अमुक भावनेचा याप्रसंगी झालेला अविष्कार अतिरेकी होता तर त्याप्रसगी तो युक्त प्रमाणात होतो, असे निर्णय आपण घेतो; यावरून भावना ही गोष्ट अंध आहे आणि तिला नियमनाची गरज आहे हेच आपण मान्य करतो. क्रोध किंवा भय या भावना नेहमीच अयुक्त असतात असेही आपण मानीत नाही. अन्यायाचा क्रोध आला पाहिजे, पापाचरणाचे भय वाटले पाहिजे हेही आपण म्हणतो. तसेच करुणा व परोपकार अपात्री दाखविल्यास

त्यापासून अपायच होतो हेही आपल्या परिचयाचे आहे. या सर्वांवरून हेच निष्पन्न होते की भावनेच्या ठिकाणी शक्ती आहे, पण ती अंध आहे; म्हणजे ती स्वत:चे मार्गदर्शन करू शकत नाही. तिला मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. हे मार्गदर्शन तिला विवेकाशिवाय कोण करू शकणार? याप्रमाणे भावनेचे जीवनात महत्त्वाचे स्थान आहे, हे शेवटी विवेकच ठरवितो आणि म्हणून विवेकवादी जीवन भावनाशून्य होईल ही भीती निराधार आहे. आणि खरे पाहिले तर कोणाही विवेकवाद्याने भावनेचा तिरस्कार करावयास सांगितलेले नाही. खुद्द आगरकराचे जीवन आणि कार्य यांकडे पाहिल्यास विवेकवाद्याचे जीवन भावनाशून्य होईल या मताचे पूर्ण खंडन होते. विवेकवाद्यांना अपेक्षित विवेकवादी नीतीचे वर जे वर्णन केले त्यात ज्या बहुविध सुखांचा उल्लेख केला आहे, त्यात कौटुंबिक प्रेम, मित्रप्रेम, परोपकार, कलास्वाद यांच्याही सुखांचा अंतर्भाव आपण केला आहेच.

असाच आणखी एक आक्षेप गैरसमजातून उद्भवलेला आहे आणि तोही मोठमोठ्या लोकांकडून घेतला जातो. खुद्द लोकमान्य टिळकांनी तो आक्षेप घेतला आहे. आगरकरांच्या आणि आपल्या स्वत:च्या सुधारणेविषयीच्या भूमिकांची तुलना करतांना ते म्हणतात : 'धर्मदृष्ट्या आगरकर केवळ बौद्धिकवादी होते आणि तोच पंथ सामाजिक बाबतीतही निदानपक्षी आपल्या लेखांत त्यांनी स्वीकारला होता..... सुधारणा नको असे 'केसरी' चे म्हणणे केव्हाही नव्हते, पण केवळ बौद्धिकदृष्ट्या किंवा तर्कदृष्ट्या सुधारणेचा विचार करण्यास केसरी तयार नव्हता.'[७] या विधानाचा काळजीपूर्वक विचार केल्यास अनेक प्रश्न उद्भवतात. केवळ बौद्धिकदृष्ट्या सुधारणा करावयाच्या म्हणजे काय करावयाचे? आणि तसे करण्यात गैर काय आहे? तसेच केवळ बौद्धिकदृष्ट्या सुधारणा करणे चूक असेल तर आणखी कोणती दृष्टी ठेवली पाहिजे? या प्रश्नांचा विचार करू लागल्याबरोबर टिळकांच्या वरील आक्षेपातील दोष स्पष्ट होऊ लागतात.

टिळकांच्या आक्षेपात 'बौद्धिकदृष्ट्या किंवा तर्कदृष्ट्या' असे शब्द आले आहेत. त्यावरून 'बुद्धी' व 'तर्क' हे दोन शब्द ते समानार्थी मानतात असे दिसते. पण हे समीकरण पूर्णपणे बरोबर नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. बुद्धीच्या (किंवा विवेकाच्या) अनेक कार्यांपैकी एक कार्य तर्क किंवा अनुमान करणे हे सर्वश्रुत आहे. परंतु बुद्धीची तर्काखेरीज अन्यही कामे आहेत हे लक्षात घेणे जरूर आहे. अवकर्षण (abstraction) करणे, संकल्पना (concepts) तयार करणे, साम्य-भेद ओळखणे, तारतम्य करणे, हीही कामे बुद्धीचीच आहेत. निदान ही

---

७. लो. टिळकांचे 'केसरी'तील लेख, भाग ४, पृ. ५३४-३५.

कामे करण्याचे बुद्धीखेरीज आणखी कोणते साधन असू शकेल याची कल्पना करणे कठीण आहे. आता बुद्धीचे स्वरूप स्पष्ट केल्यानतर केवळ बौद्धिकदृष्ट्या सुधारणा करणे म्हणजे काय व तसे करण्यात गैर काय आहे या प्रश्नाकडे आपण वळू शकतो. टिळकांच्या एकंदर विवेचनाचा अभिप्राय असा दिसतो की केवळ बुद्धीवर सुधारणा न आधारता, त्या करताना आपल्या सांस्कृतिक परंपरांचाही विचार केला पाहिजे. आपल्या सांस्कृतिक परंपरांचा समूळ उच्छेद न करता त्यांच्याशी अविरोधी अशा सुधारणा केल्या पाहिजेत असे टिळकांचे म्हणणे होते. हा युक्तिवाद प्रथमदर्शनी सयुक्तिक दिसतो. पण त्यात अनेक हेत्वाभास दडलेले आहेत. त्यात असे गृहीत धरलेले आहे की सामाजिक रूढीची इष्टानिष्टता ठरविण्याचे बुद्धीखेरीज आणखी एक प्रमाण आहे, ते म्हणजे स्वसंस्कृती किंवा स्वपरंपरा. परंतु एखादी रूढी किंवा चाल आपल्या संस्कृतीचा भाग आहे एवढ्यानेच केवळ ती रक्षणीय होते असे मानणे चूक आहे, हे खुद्द टिळकांनाही मान्य होते; कारण बालविवाह, अस्पृश्यता, इत्यादि आपल्या सस्कृतीतील गोष्टी अनिष्ट असून त्या सुधारल्या पाहिजेत असे त्यांनेही मत होते. पण या रूढी अनिष्ट आहेत आणि त्या बदलल्या पाहिजेत, हा निर्णय आपल्या बुद्धीचा आहे हे उघड आहे. म्हणजे एखादी रूढी आपल्या संस्कृतीचा भाग आहे ही गोष्ट तिच्या रक्षणीयत्वाकरिता पुरेशी होऊ शकत नाही. ती हितकरही असली पाहिजे; निदान ती अहितकर असता कामा नये हेही त्याकरिता अवश्य आहे. आणि ती हितकर आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार फक्त बुद्धीचा असल्यामुळे सुधारणा करायची की नाही; आणि करायची असल्यास कोणती करायची याचा निर्णय शेवटी बुद्धीचाच असणार! आता आपल्या सर्वच गोष्टी लज्जास्पद आहेत असे मानून परक्यांची सर्वच बाबतीत नक्कल करणे आगरकरांनाही मान्य नव्हते. म्हणूनच त्यांनी सुधारणेच्या पहिल्याच प्रतिज्ञेत 'भारतीय आर्यत्व न सांडता' हे शब्द घातले आहेत. आपल्या रूढींपैकी ज्या गोष्टी चांगल्या आहेत त्यांचे तर आपण रक्षण केलेच पाहिजे; पण ज्या अहितकर नाहीत अशा गोष्टीही त्यागण्यात काही शहाणपणा आहे असे त्यांना वाटत नव्हते. ते म्हणतात, 'आमचे काही रीतिरिवाज मूर्खपणाचे आहेत म्हणून प्रत्येक गोष्टीत परकीयांचे अनुकरण करणे हेही कोणत्याही दृष्टीने त्याचे त्याला किंवा इतरांला परिणामी विशेष सुखावह होण्याचा संभव नाही, असे आम्हांस वाटते. उदाहरणार्थ, कित्येक प्रसंगी धोतरे नेसणे सोईस्कर नाही म्हणून युरोपियन लोकांप्रमाणे दिवसभर पाटलोण घालून बसणे, किंवा ते लोक विशेष कामाकडे कागदांचा उपयोग करतात म्हणून आपणही तसे करणे हे केवढे मूर्खपण आहे बरे ?'(१८३) त्यांचे एवढेच म्हणणे होते की,

आपल्या रूढींचे रक्षणीयत्व अथवा अरक्षणीयत्व निश्चित करताना त्या हितकर आहेत की अहितकर आहेत याचा निर्णय करावा लागेल; आणि हा करताना त्या आपल्या संस्कृतीचा भाग आहेत, ही गोष्ट आपण पूर्ण दृष्टीआड केली पाहिजे. परंपरावाद्यांवर त्यांचा आक्षेप होता तो हा, की परंपराभिमानामुळे त्यांची बुद्धी किंवा विवेकशक्ती शृंखलाबद्ध होते आणि ते हिताहिताचा विवेक नीट करू शकत नाहीत. म्हणून टिळकांचा वरील आक्षेप बरोबर नाही हे दिसून येईल.

३

विवेकवादाचा अंगीकार केल्यास ज्ञान व कर्म या दोन्ही क्षेत्रांतील आपल्या परंपरागत आचारविचारात प्रचंड उलथापालथ होणे अपरिहार्य आहे, हे आपण वर पाहिले. आता विवेकवादाच्या आधाराने आगरकरांनी मांडलेल्या सुधारणा विचाराचे स्वरूप पाहावयाचे आहे.

सुधारणा म्हणजे काय, ती का करावयाची व कशी करावयाची, ती करताना कोणती दक्षता घ्यावयाची इत्यादि सर्व प्रश्नांचे सविस्तर विवेचन आगरकरांनी केले आहे. ते म्हणतात, 'सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाही, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशी बरोबरीने वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंत:करणातून वागू लागला, म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस आरंभ होतो.' (३१-३२) मात्र खरी सुधारणा कशात आहे हे फार काळजीने ठरविले पाहिजे, असे ते आवर्जून सांगतात. जेवढे जुने असेल तेवढे फेकून देऊन कसल्यातरी नवीन गोष्टींचा अंगीकार करणे म्हणजे सुधारणा नव्हे असे ते स्पष्ट बजावतात. या बाबतीत त्यांनी आणखी एक महत्त्वाची खबरदारी घ्यावयास सांगितली आहे. ती ही; की कोणतीही सुधारणा जाणूनबुजून अंगीकारली तरच ती चिरस्थायी व फलप्रद होऊ शकते. प्रवाहपतित होऊन केलेले वर्तनांतर कधीही फलदायी होणे शक्य नाही. जाणूनबुजून उपाय योजणे यातच मनुष्याचे मनुष्यपण आहे. वस्तुस्थितीचा गुलाम होऊन ती वागवील तसे वागणे म्हणजे मनुष्यांत व इतर प्राण्यांत काही अंतर नाही असे दाखविण्यासारखे आहे. म्हणून कालावर व वस्तुस्थितीवर अवलंबून न राहता ज्या सुधारणा अत्यंत आवश्यक वाटत असतील, त्या करण्याविषयी बुद्धिपूर्वक प्रयत्न करण्यास लागले पाहिजे.

आगरकरांचा सुधारणाविचार अतिशय व्यापक होता. राजकीय, सामाजिक, धार्मिक आदि सुधारणांपैकी कोणत्याही एका सुधारणेस अग्रक्रम देणे त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या मते हे वर्ग केवळ व्यवस्थेकरिता केलेले आहेत. 'ते सर्व मनुष्यांच्या वेगवेगळ्या व्यवहारांचे व्यंजक होत, व त्या सर्वांची एक समयावच्छेदेकरून

सुधारणा होत जाणे, म्हणजेच मनुष्याची सुधारणा झाली असे म्हणता येईल.' (३८१)

'सुधारक काढण्याचा हेतु' या सुधारकातील पहिल्याच लेखात मनुष्य सुधारणेचे अत्यावश्यक तत्त्व सांगताना ते म्हणतात, 'समाजाचे कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढी बंधने अपरिहार्य आहेत, तेवढी कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका द्यावयाचा, हे अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचे मुख्य तत्त्व आहे.' (८) या अवतरणातील 'समाजाचे कुशल राहून' या शब्दसंहतीचे स्पष्टीकरण करणे जरूर आहे. कारण समाजाच्या कुशलाच्या नावाखाली व्यक्तिस्वातंत्र्याची पार गळचेपी करणारे तत्त्वज्ञान आज जगाच्या फार मोठ्या भागावर आधिपत्य गाजवीत आहे. समाजास जीविशरीराची उपमा देऊन त्यावरून समाज व व्यक्ती यांचा परस्परसंबंधाविषयी अनेक भ्रामक आणि चुकीचे निष्कर्ष काढण्याचा राज्यशास्त्रज्ञांचा, प्राचीन काळापासून परिपाठ आहे. त्यातील हेत्वाभास व धोके आगरकरांनी फार मार्मिकपणे विशद केले आहेत. ते म्हणतात, 'मनुष्याचे स्वच्छंदी वर्तन दोन प्रकारांनी विघातक होण्याचा संभव असतो; एक दुसऱ्याला आणि दुसरे त्याचे त्याला. जर कोणत्याही व्यक्तीची वागणूक त्याची त्याला किंवा दुसऱ्याला अपायकारक होण्याचा संभव नसेल तर त्याला ती हवी तशी करू देण्यास प्रत्यवाय कशासाठी करावा हे समजत नाही.' (३३-३४) पण हे वर्तनतत्त्व व्यवहारास लावू लागले असता फार अडचणी येतात. कारण जरी प्राण्याच्या शरीरातील अवयवांप्रमाणे समाजाचे अवयवही निरनिराळे असतात, व त्यांना वेगवेगळी कामे लागतात, तरी हे अवयव परस्परावलंबी असल्यामुळे त्यांना एकमेकांस साह्यही करावे लागते. तसे न झाल्यास, ज्याप्रमाणे शरीरातील चैतन्यतत्त्वाचा लय होऊन सर्व अवयवांचा नाश होईल, त्याप्रमाणे समाजाचीही वाताहत होऊन प्रत्येक व्यक्तीस आपल्या चरितार्थासाठी आणि संरक्षणासाठी खुद्द स्वत:वर अवलंबून राहावे लागेल. परंतु हे साम्य येथेच संपते. आगरकर म्हणतात, 'व्यक्तींच्या शरीरातील अवयवांत व समाजाच्या शरीरातील अवयवांत एक मोठा भेद आहे; तो हा की, ज्याप्रमाणे समाजाच्या प्रत्येक अवयवास ज्ञानसंवेदन, इच्छा इत्यादि मनोधर्म पृथकत्वाने असल्यामुळे सुखदु:खाचा अनुभव प्रत्येकास होत असून, ते संपादण्याविषयी किंवा टाळण्याविषयी प्रत्येकाचा प्रयत्न निरंतर चालू असतो, त्याप्रमाणे व्यक्तीच्या शरीरातील प्रत्येक अवयवाची स्थिती नाही. त्यापैकी प्रत्येकास मन नाही. त्या सर्वांचे व्यापार नीट चालणे ही गोष्ट ज्या एका व्यक्तीचे ते अवयव आहेत; त्या व्यक्तीस कल्याणकारक आहे. समाज हा काल्पनिक पुरुष

आहे. समाजाचे कल्याण म्हणजे या काल्पनिक पुरुषांचे कल्याण नव्हे, तर त्याच्या अवयवांचे कल्याण होय. व्यक्तीची तशी गोष्ट नाही. व्यक्तीच्या अवयवांस स्वतंत्र मन नसल्यामुळे व्यक्तीचे जे कल्याण तेच त्यांचे कल्याण होय. व्यक्तिशरीर आणि समाजशरीर यातील या महत्त्वाच्या भेदामुळे त्याविषयी विचार करताना व लिहिताना ही गोष्ट नेहमी डोळ्यापुढे ठेवावी लागते की, व्यक्तीच्या अवयवांच्या हितासाठी जे नियम घालावयाचे असतात; व समाजाच्या हितासाठी जे नियम करावयाचे ते वास्तविक पाहता, समाजाच्या अवयवांच्या हितासाठी असतात. तेव्हा व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष झाले तरी हरकत नाही, समाजाचे हित साधले म्हणजे झाले, असे बोलणे म्हणजे असंबद्ध प्रलाप करण्यासारखे होय; कारण व्यक्तीच्या हिताहून निराळे असे समाजाचे हित नाही. तथापि अशा अर्थाची वाक्ये नेहमी उच्चारण्यात येतात, व ती चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडून येतात.... त्यांचा खरा भावार्थ असा असतो की, समाज म्हणजे त्यातील बहुतेक किंवा निदान प्रमुख लोक. अशा अर्थानुरोधाने ज्या समाजात वर्तन होत असते, त्यात एका पक्षाकडे संपत्ती आणि सत्ता, व दुसऱ्याकडे दारिद्र्य आणि दास्य, अशी वाटणी झालेली असते. अशा समाजातील सामान्य लोकांस शुद्ध वन्यावस्थेतील सुखाहून अधिक सुख होत असेल असे जरी मानिता आले, तरी त्यात त्यांचे पूर्ण समाधान होण्यासारखे ते नसलेच पाहिजे हे उघड आहे.' (३४-३५)

आगरकरांच्या सुधारणाविचारास व्यक्तिस्वातंत्र्य व समता ही दोन तत्त्वे आधारभूत आहेत हे वरील उताऱ्यावरून स्पष्ट होते. या तत्त्वांनुसार प्रत्येक मनुष्याला आपल्या इच्छेप्रमाणे आपले जीवन घडविण्याचे स्वातंत्र्य असणे अवश्य आहे. आगरकर म्हणतात : 'सर्व मानवप्राणी जन्मत: सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणे हे केवळ त्यांच्या कमीअधिक बुद्धिविकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे.'[८] या तत्त्वानुसार समाजाची रचना करावयाची म्हणजे समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल करणे भाग पडते. वर्तमान व्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य व समता या दोन्ही तत्त्वांना फार मोठ्या प्रमाणात हरताळ फासला गेला आहे. स्त्रीपुरुष विषमता, जातिभेद, अस्पृश्यतापालन, इत्यादि अनेक आचार याची साक्ष देतात. समाजाच्या प्रथमावस्थेत जे सामर्थ्यवान होते ते सत्ताधीश बनणे व दुर्बलांना त्यांचे दास्य पत्करावे लागणे स्वाभाविक होते. त्या स्थितीत जीवनातील विविध व्यवहार बलात्काराने होत असत. अशा समाजात त्याच्या सर्व अवयवांना सुखाचा सारखा

---

८. 'आणखी एक मुद्दा.'

वाटा मिळणे अशक्य असते. परंतु जो जो मनुष्याची सुधारणा होत जाते, तो तो त्यांच्या अन्योन्यव्यवहारातील बलात्काराचे तत्त्व लयास जाऊन त्याच्या जागी संमतितत्त्व प्रस्थापित होते; व या कारणास्तव येथून पुढे राजा व प्रजा, कुलाधिपती व कुलावयव, पति व पत्नी, मातापितरे व अपत्ये, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक यांतील व्यवहार आणि संबंध, उत्तरोत्तर बलात्काराने न होता, संमतिपूर्वक होत जाणार आहेत.' (३३) असे झाले तरच सर्वांस सारखे- निदान बरेच सारखे- सुख मिळणे शक्य होईल.

परंतु संमतितत्त्व प्रस्थापित होण्यास फार काळ लागतो व मोठी यातायात पडते. कारण त्याकरिता संमति देणारा आणि संमति मागणारा यांचा दर्जा समान असावा लागतो. समतेशिवाय संमतीला अर्थ नाही. उदा. कोणतीही गोष्ट पतीने पत्नीच्या संमतीने करणे याचा अर्थ म्हणजे ती संमती देण्याचे किंवा नाकारण्याचे स्वातंत्र्य पत्नीला असणे अवश्य आहे. सध्या पतीकडून पत्नीला असे स्वातंत्र्य मिळणे दुरापास्त आहे. आगरकर म्हणतात : 'संपत्ती, अधिकार व विद्या ही ज्यांस प्राप्त होतात त्यांस ती आपणच बळकावून बसावे, असे वाटू लागते! तसे करणे आपला हक्क आहे; तसे करण्यात आपले व दुसऱ्याचे परमहित आहे; अशीच व्यवस्था असावी असा परमेश्वराचा किंवा सृष्टीचा आद्य हेतू होता किंवा आहे, असा तर्कवाद मोठमोठे विद्वान, धनिक व अधिकारी दिवसाढवळ्या बेलाशक करीत आले आहेत, व आणखी अनेक शतके करीत राहतील!' (१९७)

दुसरी अडचण ज्या घटकाला स्वातंत्र्य द्यावयाचे त्याच्याकडूनच निर्माण होते. एक तर स्वातंत्र्य म्हटले की त्याबरोबर जबाबदारी आली, व त्याकरिता वैचारिक श्रम करणे आले. पण शारीरिक श्रमापेक्षा मानसिक श्रमाचा मनुष्याला फार कंटाळा असतो. गुलामगिरी ही त्याच्या अगदी अंगवळणी पडून गेलेली असते. शेकडा नव्याण्णव लोक मळलेल्या वाटेने जाण्यातच आपले हित आहे असे मानतात. शिवाय त्यांच्यावर धर्म, रूढी, लोकापवाद यांचा जबरदस्त पगडा असतो. 'पूर्वापार चालत आलेल्या चालीत विचारदृष्ट्या कितीही विसंगतता दिसली तरी त्या सोडणे किती जिवावर येते, हे बालविवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चालींचा विचार करता तेव्हाच लक्षात येणार आहे' (३१७)

वर प्रतिपादलेल्या विवेक, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बलात्कार विरुद्ध संमति-या तत्त्वांच्या आधारे आगरकरांनी आपल्या सर्व आचारविचारांचे कठोर परीक्षण केले. आपल्या समाजरचनेत त्यांना अनेक गंभीर दोष आढळले. ते त्यांनी निर्भयपणे लोकांपुढे मांडून त्यांतील अन्यायाची, निर्घृणतेची त्यांना जाणीव करून दिली; ते दोष दूर करून त्यांच्या जागी नवीन आचारविचार सुचविले, आणि

लोकांनी त्यांचा स्वीकार करावा यासाठी ते अविरत झटले.

आगरकरांचा सुधारणाविचार सर्वस्पर्शी होता. या विचाराची सुरुवात त्यांनी कुटुंबाच्या सुधारणेपासून केली. ते म्हणतात, ''समाजाचे मुख्य घटक कुटुंबे होत, व कुटुंबाचे मुख्य घटक स्त्रीपुरुष होत. तेव्हा कुटुंबांचा विचार करतांना प्रथम स्त्रीपुरुषांमधील संबंधाचा विचार केला पाहिजे.' (३७) हा विचार करू लागल्यावर आपल्याला असे दिसते की आपली समाजरचना पुरुषप्रधान असल्यामुळे स्त्रीवर अतिशय अन्याय करणारी आहे. तिची स्थिती गुलामापेक्षा विशेष चांगली आहे असे म्हणवत नाही. बलात्कारतत्त्वाचा अंमल कुटुंबात फार मोठ्या प्रमाणात अजूनही चालू आहे.

आगरकरांच्या काळी तर स्त्रीची स्थिती फारच शोचनीय होती. बालविवाह, आर्थिक पारतंत्र्य, शिक्षणाचा अभाव इत्यादींनी स्त्रीचे जीवन पूर्ण जखडून टाकले होते. त्यातही उच्चवर्णीय स्त्रीची अवस्था काही बाबतीत अधिकच दुर्धर होती. खालच्या वर्गात स्त्रीला मिळणाऱ्या घटस्फोट व पुनर्विवाह या सवलती उच्चवर्णीय स्त्रीला नव्हत्या. तिचा विवाह एकदाच होऊ शकत होता, व तोही अतिशय अल्पवयात, बारा वर्षे वयाच्या आत; पण पुरुषाला मात्र कोणत्याही वयात कितीदाही विवाह करण्याची मोकळीक होती. बालाजरठ विवाहामुळे असंख्य मुलींच्या कपाळी वैधव्य येणे अपरिहार्य असे, आणि ते एकदा आले की कायमचे राही; कारण पुनर्विवाहाचा स्त्रीला अधिकार नव्हता. त्यामुळे कित्येक मुलींना संसारसुखाचा स्पर्शही न होता आमरण वैधव्य भोगावे लागे. शिवाय विधवांचे केशवपन करण्यात येऊन त्यांना विद्रूप केले जाई, त्यांना अशुभ मानले जाई आणि उरलेले संबंध आयुष्य त्यांना आप्तांच्या संसारातील काबाडकष्ट उपसण्यात व्यतीत करावे लागे. तसेच अल्पवयी कन्यकांवर त्यांच्या प्रौढ नवऱ्यांकडून अकाली संभोगामुळे जायबंदी होण्याचे आणि क्वचित मृत्युमुखी पडण्याचे दुर्दैव ओढवे. स्त्रीची ही सारी भयानक दुरवस्था आगरकरांना आपल्या भोवती प्रत्यही दिसत होती. तिच्या दु:खाची आच ते प्रत्यक्ष अनुभवीत होते. त्यामुळे साहजिकच त्यांचे लक्ष प्रथम प्रामुख्याने या प्रश्नाकडे वळले. बालविवाह, घटस्फोट, पुनर्विवाह, केशवपन या प्रश्नांवर त्यांनी प्रखर शस्त्र उगारले. या सुधारणा करण्यासाठी कायद्याचीही मदत घ्यावी असे त्यांचे मत होते. कायद्याने सुधारणा करण्याच्या याच प्रश्नावरून त्यांचा लो. टिळकांशी संघर्ष झाला, तेव्हा या चालीतील अन्याय व क्रौर्य वेशीवर टांगण्याकरिता आगरकरांनी **सुधारकाचे** अंकचे अंक खर्ची घातले. स्त्रीची शतकानुशतके होत आलेली दुर्दशा, अवहेलना आणि विटंबना पाहून ते विलक्षण व्याकुळ होत, संतप्त होत व मग त्यांच्या लेखणीतून एकच

वेळी करुण व रौद्र उद्‌गार बाहेर पडत. कायद्याने बालविवाहाचा प्रतिबंध केल्यास आईबापांच्या स्वातंत्र्याचा उच्छेद होतो असे म्हणणाऱ्या लोकांवर ते त्वेषाने तुटून पडतात : 'वाहवा! मूर्ख आईबापांनी कधी अज्ञानाने, कधी लोकापवादभयाने व कधी लोभाने आपल्या अल्पवयस्क मुलांचे आमरण नुकसान करावे, आणि ते करण्याचा हक्क त्यांच्याकडे राहू देण्याबद्दल सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या ''थंड्या'' सुधारकांनी अखिल वातावरण आपल्या आक्रोशाने भरून सोडावे, याहून अधिक विस्मयजनक देखाव्याची कल्पना करणे देखील कठीण आहे! दुसऱ्यास कुरूप करण्याचा हक्क! पोटच्या पोरीचे कुंकू पुसण्याचा अधिकार! मुलाच्या बायकोस नापितापुढे बसविण्याचे स्वातंत्र्य! असले हक्क, असले अधिकार, असले स्वातंत्र्य राखण्याबद्दल अकांडतांडव करणाऱ्यास हक्क, अधिकार व स्वातंत्र्य यांचा अर्थ व उपयोग मुळीच समजत नाही, आणि यासंबंधाने यांचे बोल स्वातंत्र्याच्या शुद्ध वल्गना होत, असे म्हणणे भाग आहे.' (९५) बालाजरठविवाहाने विषण्ण होऊन ते लिहितात : 'एखादी जाईची कळी निवडुंगावर, किंवा सोनचाफ्याचे फूल कोरांटीवर आणून टाकण्यात काय शहाणपण व भूषण असेल ते असो.' (८१) संमतिवयाच्या बिलाच्या निमित्ताने ब्रिटिश सरकारला आपल्या धर्माचारात हात घालू देणे बरोबर नाही असे म्हणणाऱ्या लोकांना ते संतापून उपहासाने विचारतात, 'भेकड, प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनो, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनी ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठी कोकणपट्टीत तुमचे अनन्वित हाल केले, त्यावेळेस तुमचा धर्माभिमान कोठे गेला होता? विषयलंपट, नि:शक्त वाचाळ बाबूंनो, जेव्हा महंमदीयांनी हिंदुस्थानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत साऱ्या हिंदु लोकांस धर्मवेडाने जर्जर करून सोडले....तेव्हा धर्मरक्षणासाठी आताप्रमाणे तुम्ही नुसता आरडा तरी करावयाचा होता!.... आणि आता दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकारबुद्धीने आपल्या लहान पोरींवर जुलूम करून नका, येवढे अदबीने सांगत असता त्यावर तुम्ही आपले धर्मास्त्र सोडता, आणि कामाच्या झपाट्यात निराश्रित कुमारिकांची अंगे विदारण्याचा हक्क आमच्या धर्माने आम्हांस दिला आहे, व जर सरकार तो घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला आमच्या असंतोषाचे फळ भोगावे लागणार, अशी धमकी घालता! धिक्कार असो तुम्हाला, तुमच्या धर्माला, आणि तुमच्या हक्काला!!!' (१३६)

आगरकरांच्या स्त्रीसुधारणेचा आवाका फार मोठा होता. संपूर्ण स्त्रीवर्गाच्या पुरुषार्थाला कोणतीही आडकाठी असणे त्यांना मान्य नव्हते. पुरुषांना जे जे स्वातंत्र्य, हक्क आणि अधिकार आहेत; ते सर्व स्त्रियांना दिले पाहिजेत असे त्यांचे म्हणणे होते. पुरुषांना जे शिक्षण आपण देतो हे सर्व शिक्षण स्त्रियांनाही

द्यावे, आणि तेही एकत्र द्यावे, असा त्यांचा आग्रह होता. आज शिक्षणाभावी स्त्रियांच्या बुद्धीची नासाडी होत आहे, त्यामुळे त्यांचे जसे नुकसान होते तसेच समाजाचेही होत आहे. स्त्रीला कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे असे ते म्हणत. त्यामुळे 'कित्येक पुरुषांना घरी बसून मुले खेळविण्याचे, लुगडी धुण्याचे, भांडी घासण्याचे, स्वयंपाक करण्याचे, दळणकांडण करण्याचे काम करावे' (२०१) लागले तरी त्याला आगरकरांची तयारी होती. ते म्हणत की, 'स्त्रीला मुले होतात म्हणून प्रपंचातील हलकी कामेही तिनेच केली पाहिजेत असे नाही' तसेच 'सध्या स्त्रियांना जीं इतकी मुलें होतात ती त्यांच्या संतोषाने होतात असे आम्हांस वाटत नाही. यासंबंधाने पुरुषांकडून स्त्रियांवर जुलूम होतो असा आमचा समज आहे.... स्त्रियांप्रमाणे त्यांनाही कधी कधी प्रसूतिवैराग्य होण्याचा संभव असता, तर उभयतांच्या संयमाने बराच भूभार कमी होता.... विवाहाच्या कामी स्त्रीपुरुषांची संमति जितकी अवश्य आहे तितकीच संमति विवाहाच्या अमलातही दृष्टीस पडू लागली पाहिजे. तसे होऊ लागेल तेव्हाच स्त्रियांची पुष्कळ विपत्ति टळेल.' (२०१-२०२) याप्रमाणे स्त्रीशिक्षण, अर्थार्जन, स्वयंवर, घटस्फोट, पुनर्विवाह, संततिनियमन, इत्यादी सर्व सुधारणांचा आगरकरांनी पुरस्कार केला आहे. पुरुष म्हणून त्यांनी हातचे काहीही राखून ठेवले नाही.

हे हक्क फक्त उच्चवर्णीय स्त्रियांनाच नव्हेत, तर सर्व स्त्रियांना मिळाले पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादले आहे. उदा. ब्राह्मण स्त्रीवर जसे केशवपन, पुनर्विवाहबंदी, इत्यादि जुलूम होत होते, त्याचप्रमाणे मराठा स्त्रीस गोषात ठेवल्यामुळे तिच्यावर अनेक बंधने घातली गेली होती. म्हणून जेव्हा सयाजीराव गायकवाड महाराजांनी स्त्रीशिक्षणाविषयी आगरकरांना प्रश्न विचारला, तेव्हा त्यासंबंधात ते लिहितात : 'श्री. सयाजीराव महाराज गायकवाड मुलांच्या शिक्षणाप्रमाणेच मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबद्दलही सक्तीचा कायदा करतील, तर उच्च कुलातल्या मराठ्यांनी आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषात कोंडून घातल्यामुळे जी अपकीर्ति संपादली आहे तिचे परिमार्जन होऊन प्रख्यात लोकशास्त्यांच्या नाममालिकेत त्यांचे नाव चिरस्थाई होऊन बसेल.' (१९६)

आगरकरांचा सुधारणाविचार समाजाचे सर्व जीवन व्यापून टाकणारा होता. तुम्हाला 'समाजात सुधारणा हव्या तरी किती?' ह्या एका सोलापूरकर 'अपरिचित' मित्राने विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात ते म्हणतात :'त्याच्या [सुधारकाच्या] सुधारणाबुभुक्षेस मर्यादाच नाही, असे म्हटले तरी चालेल!... मनुष्याच्या स्थितीत पूर्णता येणे बहुधा अशक्य आहे; पण ती येईतोपर्यंत सुधारकाच्या मनाची शांती व्हावयाची नाही! सध्या आपल्या देशात ज्या सुधारणांची वाटाघाट चालली आहे

त्या अमलात आल्यावर जातिभेद मोडणे, धर्मसुधारणा करणे, मदिरा व मांस यांचे सेवन बंद होणे, वगैरे अनेक गोष्टींकडे लोकांचे लक्ष लागले पाहिजे. सर्वांत सार्वजनिक शिक्षणाची फार आवश्यकता आहे. हिंदुस्थानातील एकूण एक प्रौढ स्त्री-पुरुषास लिहिता वाचता आले पाहिजे; तसेच प्रत्येक व्यक्तीस आपला चरितार्थ चालविण्यासारखा एखादा तरी धंदा येत असला पाहिजे... इतकेच नाही तर सहजगत्या उदरपोषण करता येऊन दिवसाचा काही वेळ आत्मचिंतनाकडे, आवडत्या शास्त्राच्या अभ्यासाकडे, मनास रुचेल ती करमणूक करण्याकडे किंवा विश्रांतीकडे लावता आला पाहिजे.' (१६०-६१)

स्त्रीपुरुषविषमतेप्रमाणेच जातिभेद आणि तदंतर्गत अस्पृश्यता अतिशय अन्याय्य असून ती आमच्या समाजोन्नतीच्या मार्गातील फार मोठा अडथळा आहे हे आगरकरांनी वारंवार सांगितले आहे. या व्यवस्थेत मनुष्याला शिक्षण, व्यवसाय, प्रतिष्ठा इत्यादी गोष्टी विशिष्ट जातीत जन्म मिळाला, तरच प्राप्त होत होत्या. त्यामुळे आपल्या योग्यतेप्रमाणे पुरुषार्थ गाजविण्याची माणसाला मोकळीक नव्हती. विशिष्ट जातीत जन्मणे हे माणसाच्या हातात नसते; पण अशा सर्वस्वी यादृच्छिक घटनेने माणसाचे भवितव्य निश्चित केले जात होते. जातीच्या आधारानेच तो उच्च किंवा नीच ठरविला जात होता. आजही ही स्थिती बऱ्याच प्रमाणात कायम आहे. आगरकर म्हणतात, 'ब्राह्मणांनी विद्या संपादावी, क्षत्रियांनी राज्य करावे, वैश्यांनी व्यापार करावा, आणि शूद्रांनी कनिष्ठ प्रतीची सेवा करावी, ही आमची पूर्वीची व्यवस्था. (१९७) अशा व्यवस्थेत साहजिकच सर्वांत जास्त झळ पोहोचते ती अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गाला. समाजाची घाण उपसून त्यांचे आरोग्य सांभाळणाऱ्या वर्गाबद्दल कृतज्ञ राहावयाचे सोडून आम्ही त्यांनाच अस्पर्श्य मानले व वाळीत टाकले. आगरकरांनी या अस्पृश्यतापालनातील क्रौर्य, अन्याय, मौर्ख्य, विचारशून्यता अतिशय भेदकपणे दाखविली आहेत, आणि जातिभेदानिर्मूलनाखेरीज आमच्यात खरे ऐक्य होणे शक्य नाही व त्यामुळे आमचा राजकीय लढाही यशस्वी होणार नाही, तसेच तो न्याय्य व सुसंगतही ठरणार नाही हे वारंवार बजावले आहे. ''महारांची सावली पडली असताही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून 'आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झाले? रंगावर काही मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाही' वगैरे गोष्टी प्रतिपादू लागले, तथापि त्यांच्या शब्दास जोर येण्याचा संभव नाही, व त्याचा परिणामही होणे नाही. त्या शब्दांस जोर येऊन, इतरांनी ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' हे पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून

बसण्यास महारास मोकळीस दिली पाहिजे'' (३८३)

अस्पृश्यांशी होणारा आपला व्यवहार किती भयंकर आणि निंद्य आहे हे दाखविताना ते म्हणतात : 'जोड्यांचा आमचा सकाळसंध्याकाळ नित्य सहवास असतो! पण चमत्कार हा की, हा सर्वोपयोगी पदार्थ तयार करणारे चर्मकार अपवित्रेची खाण होऊन बसले आहेत! त्यांच्या हातांतील जोडे घेताना 'अरे दुरून टाक, दूर हो, विटाळ करशील,' अशी एकच ओरड करून दिली पाहिजे! मेलेल्या किंवा मारलेल्या जनावराच्या कातड्यापेक्षा जिवंत मनुष्य विशेष अस्पर्श्य काय! पण धर्मासंबंधात विचार करतो कोण?'' (३३) कोणी असे म्हणतील की, महार, ढोर वगैरे जातीचे लोक निंद्य आहार व आचार करतात, त्यामुळे त्यांना अस्पृश्य मानणे स्वाभाविक आहे. त्यावर आगरकर म्हणतात की या आक्षेपावर फार सोपे उत्तर आहे. 'क्षणभर अशी कल्पना करा की, ढोर, भंगी, महार, धेड व चांभार यांनी आपापले धंदे काही वेळ न करण्याचा कट केला, तर स्वतःस उच्च मानून घेणाऱ्यांची काय अवस्था होईल? .... समाजाच्या विलक्षण रहाटीमुळे उच्चनीचत्व अस्तित्वात येऊन तदनुसार जो व्यवसायविभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गात जन्मास आलेल्या लोकांनी नीच वर्गात जन्माला, आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पृश्य मानणे, याहून मनुष्याच्या विचारीपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाही. ...ज्यांचा धर्म व आचार हिंदु, जे अनादि कालापासून हिंदुस्थानचे रहिवासी, ज्यांच्या हातून गोवध होत नाही, ज्यांना मदिरापानादि मनुष्यतेचा भ्रंश करणाऱ्या व्यसनांचा म्हणण्यासारखा नाद नाही, अशा हिंदूंचा आम्ही तिरस्कार करतो, त्यांना स्पर्श करण्यास भितो, आणि त्यांहून अनेक कारणांमुळे अस्पर्श्य अशा परकीयांस दृढालिंगन देतो, हा केवढा प्रमाद होय!' (६४-६५)

अस्पृश्यतेच्या रूढीमुळे आपल्या धर्मावर व देशावर येऊ घातलेल्या संकटाचा इशाराही आगरकरांनी देऊन ठेवला होता. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या संकटाची भयावहता दाखविताना ते म्हणतात 'आम्ही चालू हिंदू धर्मावर कितीही तीक्ष्ण प्रहार केले; तथापि आमचा देश ख्रिस्ती व्हावा ही नुसती कल्पनाही आम्हास सहन होणारी नाही. आमच्यातील अतिशूद्र लोकांस आम्ही अगदी दूर टाकल्यामुळे त्यांची एकसारखी ख्रिस्ती धर्माकडे धाव चालू आहे, ही गोष्ट आम्हास अत्यंत उद्वेगजनक आहे, व या लोकांस आम्ही जवळ घेऊ लागून त्यांचा तिकडील ओघ परत फिरेल तो सुदिन असे आम्हास वाटत आहे!' ते पुढे म्हणतात, 'ब्राह्मणेतरांच्या हातचा चहा पिण्यात आम्हांस दोष वाटत नाही. इतकेच नाही, तर आमच्या नीच मानलेल्या महारांची

स्थिती सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांची एक पंगत झालेली जर आम्हांस पाहता येती, तर आम्ही स्वतःस मोठे कृतार्थ मानले असते ही गोष्ट आमच्या बांधवांपासून आम्ही चोरून ठेवीत नाही.'[९] यावरून अस्पृश्यता निर्मूलनाची त्यांची मागणी गुळमुळीत आणि वरवरची नसून निःसंदिग्ध व मूलगामी स्वरूपाची होती हे स्पष्ट होते.

अस्पृश्यांप्रमाणे श्रमजीवी वर्गावरील अन्यायही त्यांच्या नजरेतून सुटला नाही. या संबंधात त्यांनी मांडलेला पुढील विचार मूलगामी स्वरूपाचा आहे. ते म्हणतात, 'विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे; जे सांप्रत काली प्रत्येक देशात तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात,ते कायमचे नव्हते. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम ही समप्रमाणाने करावी लागून साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे; व जो जो ती तशी होत जाईल, तो तो खरी उन्नती होऊ लागली असे म्हणता येऊ लागेल.' (४७)

कोणत्याही अन्यायाला वाचा फोडताना आगरकर त्याची मूलगामी कारणमीमांसा करीत आणि तो दूर करण्याचे उपायही सुचवीत. ह्याचे एक उदाहरण म्हणजे रेल्वे कंपन्यावरील त्यांचे लेख. जी. आय. पी. आणि एस. एम. या दोन रेल्वे कंपन्यांतील युरोपियन आणि नेटिव्ह नोकरांच्या पगारांत, कामात आणि सवलतीत असलेल्या विलक्षण पक्षपाताविषयीच्या लेखास 'यांना कोणी विचारता नाही काय?' असे खरमरीत शीर्षक ते देतात. त्यात ते म्हणतात. 'एकटा युरोपियन कधी कधी पन्नास नेटिवांचे अन्न गट्ट करून बसतो! व काम म्हणाल तर दोन नेटिवांइतके देखील होण्याची मारामार!' नेटिव्ह नोकरांच्या बाबतीत 'रेल्वेची नोकरी म्हणजे शुद्ध गुलामगिरी होऊन बसली आहे...नोकरी करणारांची शरीरे ओतीव लोखंडाची केली असली तरी ती सुद्धा चारसहा महिन्यात झिजून जाऊन मोडकळीस येतील असे वाटते! मग हाडामांसाच्या माणसांची कथा काय!' सरकार आणि रेल्वे कंपन्या यावरील दोन निबंधांत उतारू, व्यापारी व नोकरवर्ग यांची सर्व प्रकारे होणारी गैरसोय दाखवून ते म्हणतात की नेटिव्ह लोक बरेच कडवे असते तर युरोपिअन लोकांप्रमाणे त्यांचाही मानमरातब राहता. नेटिव्ह नोकरांची शोचनीय अवस्था दूर होण्याकरिता त्यांनी संघटना कशी करावी, आपल्या न्याय्य मागण्या मान्य होत नसतील तर कट (संप) कसा करावा, तो करताना मारामाऱ्या, धमक्या, यांपासून पूर्ण अलिप्त राहून आपला लढा कायदेशीर (कॉन्स्टिट्यूशनल)

---

९. 'इति श्रीचहाग्रामण्यप्रकरणं समाप्तम्।'

असण्याविषयी त्यांनी जागरूक कसे राहावे, आणखी कोणकोणती दक्षता घ्यावी हे सारे ते सविस्तर सांगतात. कोणत्याही क्षेत्रातील कामगारांना मार्गदर्शक ठरतील अशा मोलाच्या सूचना त्यांनी या निबंधातून दिल्या आहेत.

आपल्या अर्थकारणाचाही आगरकरांनी सांगोपांग विचार केला आहे. भारतातील वाढत्या दारिद्र्याबद्दल त्यांनी सरकारला तर धारेवरच धरलेच, पण त्याचबरोबर समाजालाही दारिद्र्य दूर करण्याचे उपाय सांगितले. ते म्हणतात की, 'व्यापारवृद्धि हा समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक आहे. मनुष्याच्या उद्योगांचे जे दोन मुख्य भेद आहेत, म्हणजे एक नियामक (उदा. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, शिक्षक इत्यादि) आणि दुसरा उत्पादक (उदा. शेतकरी, कोष्टी, सुतार गवंडी, कारागीर, धंदेवाले) यांपैकी ज्या देशात उत्पादक उद्योग करणाऱ्यांची संख्या मोठी असते, व केवळ नियामक उद्योग करणाऱ्यांची संख्या अगदी स्वल्प असते, तो देश सुखी असतो, व ज्या देशात याच्या उलट स्थिती असते, तेथे क्रांत्या होतात. १७८९ साली फ्रान्स देशात जी मोठी राज्यक्रांती झाली तिच्या अनेक कारणांपैकी फाजील अंमलदार हे एक मुख्य कारण होते असे ते म्हणतात. आपल्याकडील सुशिक्षित लोकांनी सगळा जीव सरकारी नोकरीवर ठेवल्यामुळे आपली किंमत फार कमी करून घेतली आहे. 'कोठे १०/१२ रुपयांची जागा रिकामी झाली की, तीबद्दल शेपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवाराचे अर्ज! धिक् तुमची विद्या आणि तुमचे कर्तृत्व! कष्टाने संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय? विद्यार्जनाने विकसित झालेली मने स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हास अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होता स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आता कोठे राहिली आहे?' (६९-७०)

अर्थकारणावरील आगरकरांचे बरेच लेख मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असल्यामुळे त्यांचा परामर्श त्यांच्या राजकीय सुधारणा विचारात घेऊ.

या विविध विषयांप्रमाणेच आगरकरांनी हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नावरही फार परखड विचार मांडले आहेत. मुंबईत १८९३ साली हिंदू-मुसलमानांचा दंगा झाला आणि त्याचे पडसाद इतरत्र उमटून या दोन जमातींमधील तेढ वाढू लागली. तेव्हा त्या विषयावर अनेक निबंधांतून आगरकरांनी जे विचार प्रकट केले ते आजही लक्षात ठेवण्यासारखे आहेत. मुसलमानांना नेहमी झुकते माप देणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना ते निर्भयपणे बजावतात : 'राज्य काबीज करण्यात भेद करण्याने कदाचित फायदा होत असेल; (पण) संपादिलेल्या राज्याचे संरक्षण

होऊन सर्व प्रजा संतुष्ट राहण्यास नि:पक्षपाती न्यायासारखे दुसरे साधन नाही.'[१०] ज्या इंग्रजी अधिकाऱ्यांना मुसलमानांची विशेष कळकळ येत असेल त्यांनी त्यांना पाहिजे तर स्वत:चे पगार लावून द्यावे; पण गरीब हिंदूंवर त्यांचेसाठी विनाकारण इतराजी करू नये; कारण, हिंदू हा जरी पराकाष्ठेचा कृतज्ञ, राजनिष्ठ व शांतिप्रिय प्राणी आहे, तरी अन्यायाचा अतिरेक झाला असता त्याचे सुद्धा स्वस्वामित्व नाहीसे होणे हे अगदी स्वाभाविक आहे, हे असल्या अधिकाऱ्यांनी हमेशा ध्यानात ठेवले पाहिजे.'[११]

याच सुमारास इस्माइल खान नावाच्या एका गृहस्थाने लिहिलेले एक पत्र लंडन टाइम्सने प्रसिद्ध केले. त्यात तो लिहितो, 'मुसलमान लोक जरी संख्येने हिंदूंहून फार कमी आहेत, तथापि हिंदूंच्या बरोबरीने त्यांस सर्व हक्क मिळाल्यावाचून ते स्वस्थ बसणार नाहीत.....गत काली आमचे पूर्वज हिंदुस्थानावर आपला अंमल गाजवीत होते, हे आम्ही अद्याप विसरलो नाही; व ज्या राष्ट्रास आम्ही एकदा पादाक्रांत केले होते, त्या गर्विष्ठ व दुराग्रही राष्ट्रापुढे डोके वाकविण्याचे काम आमच्या हातून कालत्रयीही व्हावयाचे नाही.'[१२] या पत्रात इस्माइलखानाने दिलेल्या धमकीची खरपूस हजेरी घेऊन आगरकरांनी मुसलमानांना त्यांची जागा स्पष्ट शब्दांत दाखवून दिली आहे. ते लिहितात, 'इस्माइलखानाच्या पत्रास लंडन टाइम्सने जागा कशी दिली, याचाच आम्हास मोठा चमत्कार वाटतो. एखाद्या हिंदूने असे पत्र लिहिले असते तर ते खचित राजद्रोही ठरले असते. .... हिंदुस्थानचे राज्य इंग्रजांनी मुसलमानांपासून घेतले हे (इस्माइलखानाचे) म्हणणे बरोबर नाही. रजपूत, मराठे व शीख यांनी इंग्रजी होण्यापूर्वी मुसलमानांची पादशाही जमीनदोस्त केली होती..... आम्ही हिंदू लोकांस ठोकून काढून नाहीसे करू, असल्या शुष्क वल्गना करण्यात मुसलमानांनी कधीही समाधान मानू नये. ऐन सद्दीच्या दिवसांत जी गोष्ट करता आली नाही, ती आता साधण्याचा मुळीच संभव नाही.... मुसलमान लोकांचा खरा तरणोपाय हिंदू लोकांशी एकमत करण्यात आणि जोडीने ज्ञान, संपत्ति व राजकीय हक्क संपादण्यात आहे, असे आम्हास वाटते.'[१३] असे न केल्यास त्यांनी हे लक्षात ठेवावे की 'जेव्हा आम्ही हिंदू लोक ब्रिटिश पलटणीची परवा न करता ब्रिटिश लोकांच्या हातून आपले राज्य हिसकावून

---

१०. 'हिंदु व मुसलमान यांचे ऐक्य कशानें होईल?

११. 'रास्त गोष्टीस भितो कोण?'

१२. 'हिंदु व मुसलमान यांच्यांत तंटे कां होतात?'

१३. 'हे विचारीपणाचें कृत्य नव्हे.'

घेण्यास तयार होऊ तेव्हा त्याबरोबर त्यांना टेकू देणाऱ्या मुसलमान लोकांचाही समाचार आम्हांस सहज घेता येणार आहे!'[१४]

'अशाने निभाव कसा लागेल?' या निबंधात आगरकर हिंदू लोक आणि हिंदू धर्म यांच्या शांति व सहिष्णुता या अनन्यसाधारण गुणांचा गौरवपूर्ण उल्लेख करतात आणि त्यांचा जर कोणी अंत पाहील तर स्वधर्मरक्षणासाठी तेही प्रतिटोला हाणल्यावाचून राहणार नाहीत असा खणखणीत इशाराही देतात. ते म्हणतात, 'हिंदू लोक जात्या गरीब आहेत; ते आपण होऊन विनाकारण कोणाच्याही अंगावर तुटून पडावयाचे नाहीत; एका दृष्टीने त्यांच्या धर्मासारखा दुसरा धर्म नाही; व्यावृत्ति हा या धर्माचा प्रशंसनीय गुण होय; परधर्माच्या लोकांनी हिंदू व्हावे अशी या धर्माची बिलकुल इच्छा नाही. ... मुसलमानांपेक्षा किंवा ख्रिस्ती लोकांपेक्षा हिंदू लोकांच्या वृत्तीत जी शांति दिसते तिचे हेच कारण होय. ... तथापि जोपर्यंत दुसऱ्या लोकांची डोकी धर्मवेडांनी भणभणून गेली आहेत, तोपर्यंत त्यांच्याशी संबंध पडणाऱ्या लोकांतही धर्मभिमानाचे थोडेस वारे असले पाहिजे; नाहीतर त्यांच्या हातून स्वधर्माचे संरक्षण व्हावयाचे नाही. हिंदू लोकांचा धर्माभिमान इतक्यापुरता आहे, व तो श्लाघ्य आहे.'

वरील नि:संदिग्ध उद्गारांतून आगरकरांना हिंदुधर्माबद्दल असलेली गाढ आत्मीयता, रास्त अभिमान व त्याच्या संरक्षणाची तळमळ व्यक्त होते. त्यांच्यावर धर्मबुडवेपणाचा आरोप करणाऱ्यांनी हे उद्गार लक्षात घेण्यासारखे आहेत.

आगरकरांच्या सुधारणाविचाराचा परामर्श घेताना आपण प्रथम त्यांच्या राज्यशास्त्रीय विचाराकडे दृष्टिक्षेप टाकलाच आहे. विशेषत: स्वातंत्र्य, समता आणि संमतितत्त्व ही तत्त्वे मूलत: राज्यशास्त्रीयच आहेत; परंतु आगरकरांच्या दैनंदिन राजकारणविषयक विचारांचा परामर्श आपण अजून घेतला नाही. त्याकडे आपण वळू.

आगरकर म्हणजे सामाजिक सुधारणा असे समीकरण अनेकांच्या अंत:करणात ठाण मांडून बसले आहे. परंतु आगरकर जसे जहाल समाजसुधारक होते तसेच ते जहाल स्वराज्यवादीही होते ही गोष्ट बहुतेकांना अज्ञात आहे, असे म्हणावे लागते. आगरकरांच्या जहाल स्वराज्यनिष्ठेबद्दल वाटेल तितका पुरावा त्यांच्या निबंधातून देता येईल. पण तो देण्यापूर्वी खुद्द लोकमान्य टिळकांनी दिलेली पुढील साक्ष निर्णायक समजण्यास हरकत नसावी.

इ. स. १९१६ मध्ये आगरकरांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त केसरीत

१४. 'रास्त गोष्टीस भितो कोण?'

लिहिलेल्या लेखात आगरकरांना केवळ सामाजिक सुधारक म्हणणाऱ्यांना उद्देशून टिळक लिहितात : "जणू काय सुधारणेखेरीज आगरकरांनी काहीच कामगिरी केली नाही. ... आगरकरांची राजकीय मते काय होती याची यांनी चौकशी केली होती काय? १८८८ सालापर्यंत केसरीत जे राजकीय विषयावर लेख आले ते बहुतेक आगरकरांचे आहेत आणि त्यानंतर सुधारकांतही अशा प्रकारचे बरेच निबंध आले आहेत. या सर्वांचे सूक्ष्म निरीक्षण केले असतां असे दिसून येईल की, आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते. ... राजकीय व औद्योगिक अवनति पाहून त्यांचे चित्त केशवपनादि चालींच्या निरीक्षणांपेक्षांही अधिक संतप्त व दु:खित होत असे. ... जो तार्किकपणा समाजसुधारणेसंबंधाने त्यांच्या अंगी वसत होता तोच तार्किकपणा त्यांनी राजकीय बाबींवरील आपल्या लेखांतही पूर्णपणे उपयोगांत आणिला आहे. ... ज्यांना बाकीच्या बाबती पाहवयाच्या नव्हत्या त्यांना सगळा आगरकर नको होता. किंबहुना तो त्यांच्या पचनीही पडला नसता."[१५]

आगरकरांच्या निबंधाच्या आधारानेही हाच मुद्दा सिद्ध होतो. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या विकसित संस्कृतीबद्दल व तिच्यामुळे झालेल्या आपल्या प्रबोधनाबद्दल जरी त्यांना आदर व कौतुक असले, आणि त्यांच्या अमलांत सामाजिक सुधारणा करण्यास अनुकूल काल प्राप्त झाला आहे असेही ते मानीत असले, तरी त्याबरोबर आलेले देशाचे पारतंत्र्य त्यांना अतिशय दु:सह होत होते. इतके की, त्यापुढे प्रसंगी त्यांना सामाजिक सुधारणा कमी महत्त्वाची वाटे. 'फेरजमाबंदी आणि लष्करी खर्च' या निबंधात ते म्हणतात, "मागे एका प्रसंगी आ. मि. जस्टिस तेलंग यांनी अत्युत्कृष्ट रीतीने प्रतिपादन केल्याप्रमाणे सामाजिक सुधारणांपेक्षाही राजकीय सुधारणा विशेष आवश्यक आहेत, आणि म्हणून राजकीय सुधारणा सामाजिक सुधारणांच्या अगोदर झाल्या पाहिजेत. सुधारणांचा वास्तविक पाहाता असा क्रम असून आमचे सरकार त्याचा व्युत्क्रम करू पाहते, हे आश्चर्य नव्हे काय! ... विशिष्ट प्रकारच्या राजकीय व्यवस्था समाजाच्या अस्तित्वाला अत्यावश्यक आहेत; म्हणजे त्या नसल्या तर समाजाची वाताहत होते. सामाजिक सुधारणांची तशी गोष्ट नाही. त्या समाजास शोभा देतात, किंवा विशेष प्रकारचा आनंद उत्पन्न करतात. तेव्हा त्या मागून झाल्या तरी चालतील. जातिभेद, बालविवाह, असंमत वैधव्य, केशवपन वगैरे दुष्ट चालींपासून आम्हास पुष्कळ त्रास होत आहे; पण मिठावरील जबरदस्त कर, दर तीस वर्षांनी आमच्या जमिनीच्या बोकांडीस बसणारा रेव्हिन्यू सर्वेचा फेरा, व यमोदराप्रमाणे प्रतिवर्षी कोट्यवधी

---

१५. न. चिं. केळकर, **लो. टिळक यांचे चरित्र**, पृ. २०१-२.

रुपये भक्ष्यस्थानी पडले तरी फिरून आपले हापापल्यासारखे करणारे लष्करी खाते, इत्यादिकांपासून आम्हास जो त्रास होत आहे, त्यापुढे सामाजिक शोचनीय दुराचारांपासून होणारा त्रास काहीच नाही, असे म्हटले तरी चालेल. या घटकेस ज्या विधवा वैधव्यदु:ख भोगीत आहेत, किंवा येथून पुढे आणखी शेपन्नास वर्षांत ज्यांना ते भोगावे लागेल, त्या सर्वांचे दु:ख एके ठिकाणी केले तरी ते १८७५-७६-७७ सालच्या दुष्काळांत जी साठ लक्ष मनुष्ये अन्नान्न करून मेली, त्यांच्या दु:खाबरोबर येणार नाही अशी आमची खात्री आहे.''

पारतंत्र्यामुळे देशाचे सर्व बाजूंनी किती नुकसान होते हे आगरकरांनी वारंवार दाखविले आहे. परकीय अंमलामुळे आमच्या देशावर आलेली प्रेतकळा, आमच्यावर प्रत्यही ओढवणारे मानहानीचे प्रसंग, आमच्या द्रव्याला लागलेली कायमची ओहोटी, आमचा व्यापार, कला, सण, खेळ व इतर गुणांचा दिवसानुदिवस होत असलेला ऱ्हास, इत्यादि असंख्य दोष साधार दाखवून, ही दु:स्थिती दूर करण्यासाठी आपला राज्यकारभार आपल्या हाती घेण्याखेरीज आपला तरणोपाय नाही, असे त्यांनी वेळोवेळी स्पष्टपणे म्हटले आहे.

हिंदुस्थानचे वाढते दारिद्र्य आगरकरांना कमालीचे बोचत असे. ब्रिटिशांनी हिंदुस्थानची जी लूट चालविली होती तिच्यामुळे येथील लोक दिवसानुदिवस अधिकाधिक दरिद्री होत चालले असून त्यांचे राज्य कायम असेपर्यंत तिच्यापासून सुटका नाही हे त्यांना स्वच्छ दिसत होते. अर्थकारणावर आगरकरांनी जे अनेक लेख लिहिले त्यांपैकी बहुतेक इंग्रजांच्या आर्थिक धोरणाचा खरपूस समाचार घेणारे आहेत, हे 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचे घोर दारिद्र्य', 'हिंदुस्थानास क्षय लागला!', 'इंग्लिश राज्यांत पोटभर अन्न मिळत नाही', 'हिंदुस्थानांतील अन्नान्न दशेचे परिणाम', 'भांडवल गेले व्यापार गेला' अशा नुसत्या शीर्षकांवरूनही दिसून येते. 'गुलामांचे राष्ट्र' या निबंधात ते लिहितात, ''या शंभर वर्षांत हिंदुस्थानचे उत्पन्न सरासरीने चाळीस कोटी पडले असे धरिले आणि त्याचा फक्त अर्धा भाग प्रतिवर्षी इंग्लिश लोकांच्या खिशांत पडला असे मानिले, तरी एका शतकांत दोन निखर्व रुपये या देशातून परदेशात गेले असा हिशेब होतो. ...आणखी पाच पंचवीस वर्षे असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानातील लोक एकमेकांस खाऊ लागतील, किंवा भुकेच्या दु:सह यातनांमुळेच बेफाम होऊन जाऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचे जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील, असे डोळ्यापुढे ढळढळीत दिसून आल्यावाचून राहील काय?'' (१६५-६६)

हिंदुस्थानातील ब्रिटिश अंमलदारांवर होणारा खर्च आणि विशेषत:

लष्करावर होणारा अवाढव्य खर्च यामुळे हिंदुस्थानातील लोक अक्षरश: नागविले जात होते. ब्रिटिश अंमलदार आणि येथील देशी प्रजा यांच्याबाबतीत राज्यकर्त्यांकडून होणारा विलक्षण पक्षपात किती क्रूर आहे याची जाणीव ते सरकारला निर्भयपणे सतत करून देत होते. उदाहरणार्थ, रुप्याचाभाव उतरल्यामुळे युरोपिअन अंमलदारांचे नुकसान होते म्हणून त्यांच्या पगाराची भरपाई करण्यासाठी दोन तीन कोटी रुपये उभे करण्याच्या हेतूने एखादा जबरदस्त कर हिंदी लोकांवर लादण्याचा विचार पुढे आला, तेव्हा आगरकरांनी 'राज्यकर्त्यांनो, ''लोभमूलानि पापानि'' हे वचन ध्यानात ठेवा', 'अतितृष्णा न कर्तव्या, चक्रं भ्रमति मस्तके', 'शेळी जाते जिवानिशी खाणारा म्हणतो वातड!', 'जावई पाहुणा आला म्हणून टोणगा पान्हवेल काय' असे अनेक अतिशय प्रखर व सडेतोड लेख लिहून तो विचार किती अन्याय्य आणि अनर्थावह होणार आहे हे स्पष्टपणे दाखवून दिले. 'कोणाच्याही सुखाचा तिसरा हिस्सा कमी होणे, आणि अन्नावाचून कोणालाही उपाशी मरावे लागणे यातील भेद तुम्हाला कळत नाही काय?' असे ते सरकारला ठणकावून विचारतात. 'हिंदुस्थानातील अर्ध्या लोकांस प्रतिदिवशी अर्धपोटी झोपावे लागते' ह्या डॉ हंटरसारख्या 'प्रमुख स्टॅटिस्टिकवाल्या' एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या अभिप्रायाचा हवाला देऊन आगरकर म्हणतात की, अशा स्थितीत राज्यकर्त्यांनी आगगाड्या, पोस्ट ऑफिसे, कॉलेजे, टोलेजंग इमारती, समर्थ फौजफाटा इत्यादि आमचे डोळे दिपवून टाकणाऱ्या अनेक सुखसोयींनी देश ''कितीही नटवला असला तरी तो अंतर्यामी सुखी असेलच, असे खात्रीने म्हणवणार नाही. एखादे प्रसंगी मयासुराने निर्माण केलेल्या मायावी बाजारात खरेदी करून बनलेल्या गिऱ्हाइकाप्रमाणे आमची स्थिती होण्याचा संभव आहे!'' (३१६)

राष्ट्रीय सभेसंबंधी आगरकरांनी जे विचार मांडले त्यांत त्यांचे राजकीय ध्येय स्पष्टपणे व्यक्त झाले आहे. 'अद्यापि राष्ट्रीय सभेचे काम झाले नाही' या निबंधात ते म्हणतात, 'आमच्या राष्ट्राला खरे राष्ट्रपण आणण्यासाठी आमच्या राष्ट्रसभेची स्थापना झाली आहे असे आम्ही समजतो. ... कोणत्याही राष्ट्राला राष्ट्रपण येणे म्हणजे त्यावर अम्मल करणाऱ्या सरकारचे नियंत्रण किंवा नियमन त्यांतील लोकांचे हाती येणे होय.'

राष्ट्रसभा मि. ए. ओ. ह्यूमसाहेबांनी अस्तित्वात आणली आणि आपले सामर्थ्यसर्वस्व खर्च करून तिचे हरएक प्रकारे सात वर्षे संरक्षण केले. त्यांनी हिंदुस्थानच्या भयप्रद दारिद्र्याबद्दल जेव्हा एक पत्रक काढले, तेव्हा त्यांच्यावर त्यांच्या जातभाईनी राजद्रोहाचा बडगा उचलला हे पाहून आमच्यातले शहाणेसुर्ते

म्हणविणारे काही लोकही त्यांच्यावर तुटून पडू लागले. तेव्हा संतप्त होऊन आगरकर उद्‌गारतात, 'खासा न्याय! खासे धैर्य! खासी देशभक्ती!. ...ह्यूमसाहेबांसारखी आमची आम्हास कळकळ असती तर राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाही आरोप आपणांवर आणून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास आम्ही तयार झालो असतो.' (१६५-६६)

सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा या देशात सुरू न करण्याची जी कारणे व्हाइसरॉय लॉर्ड लॅन्सडौनने दिली, ती पाहून आगरकर अत्यंत संतप्त व उद्विग्न होतात. या कारणांत एक कारण असे होते की, हिंदुस्थानची राज्यव्यवस्था सुरळीत चालण्यास युरोपियन अधिकाऱ्यांची जी संख्या राखणे अत्यंत अवश्य आहे, ती ही परीक्षा, या देशी सुरू केल्याने मुळीच राखता येणे शक्य नाही. दुसरे कारण परीक्षेवरच लायकी ठरविल्याने दुसरा असा एक अन्याय होण्याचा संभव आहे की, ज्यांना अधिकार गाजविण्याची पूर्वापार सवय झालेली आहे असे मुसलमान, शीख वगैरे लोक ही परीक्षेची कटकट त्यांच्याने उरकत नसल्याने मोठ्या जागांस नालायक ठरणार, व त्यांच्या अनेक गुणांस सरकार मुकणार. या कोटिक्रमास आगरकरांनी 'वेळ मोठी आणीबाणीची आहे, यावेळी स्वस्थ बसाल तर फसाल' या आपल्या झणझणीत लेखात खरमरीत उत्तर दिले आहे. ते विचारतात की, 'मुसलमान लोकांनी येथे मोठाले दिग्विजय केले आहेत म्हणून ते जर मोठ्या अधिकाराची कामे करण्यास लायक ठरतात, तर त्यास त्राहि त्राहि करावयास लावून अटकेपर्यंत आपला झेंडा नेणारे मराठे, त्या कामास नालायक का ठरावेत? मराठ्यांच्या पूर्वजांनीही बादशाही गाजविली नाही काय? पण या गोष्टी आता बोलून काय उपयोग? "पंके निमग्ने करिणि भेको भवति मूर्धगः" असो. अशा प्रकारे एका जातीस व्यर्थ महती देऊन दुसरीचा नाहक पाणउतारा करणे हे "दुही माजवा आणि राज्य करा" या मूर्ख तत्त्वाचा अवलंब करणारांस शोभो.'

आमच्या राज्यकर्त्यांची आमच्या बाबतीतील हीच पक्षपाती दृष्टी आमच्या व्यापारासंबंधीच्या त्यांच्या धोरणातही सतत दिसत होती. रुप्याची किंमत कमी झाल्यामुळे हिंदुस्थानच्या तिजोरीस आलेली साडेतीन कोटींची तूट भरून काढण्याकरिता परदेशातून येणाऱ्या मालावर पाच टक्के जकात बसविण्याचे, पण त्याला परदेशी कापडाचा अपवाद करण्याचे, घाटत होते. परंतु आयात व्यापारापैकी निम्मा भाग कापडाचा असल्यामुळे या जकातीमुळे सरकारला केवळ दीड कोटी रुपये उत्पन्न होणार होते. उरलेली तूट भरून काढण्याकरिता मग आमचा इन्कमटॅक्स वाढवावा व आधीच दरिद्री होत चाललेल्या जनतेस आणखी पिळून काढावे हा सरकारचा हेतू ओळखून आगरकर म्हणतात, 'ज्या गोष्टीचा

संबंध इंग्लंडच्या तिजोरीशी, तेथील व्यापाराशी किंवा इंग्रजांच्या अन्य हिताहिताशी पोचत असेल अशा बाबतीत इंग्लंडने हिंदुस्थानचे कल्याण केल्याचे व येथील लोकांस इंग्लंडपासून न्याय मिळाल्याचे क्वचितच उदाहरण दाखविता येईल.'[१६] वास्तविक कापडावर जकात बसविल्यास हिंदुस्थानची सर्व तूट भरून आली असती व मँचेस्टरवाल्यांचेही काडीइतके नुकसान होण्याचा संभव नव्हता. तरी सरकार हा विलक्षण अन्याय धडधडीत करीत होते आणि वर त्याचे मंडन करीत होते. हे पाहून आगरकर 'उघड अन्यायाचे निःशंक मंडन' या जळजळीत लेखात म्हणतात की, 'आमच्या भावी सुस्थितीबद्दल आम्हास मोठी भीति उत्पन्न झाली आहे. माजी स्टेट सेक्रेटरी लॉर्ड किंबर्ले यांनी यासंबंधात हौस ऑफ लॉर्डस्‌मधे केलेल्या भाषणात स्पष्ट सांगितले की 'ग्रेट ब्रिटनने आपल्या स्वतःच्या हिताकडे दृष्टी देणे हे त्याचे प्रमुख कर्तव्य होय. ... तथापि अगदी आणीबाणीची वेळ येईल तर मात्र हिंदुस्थानचा तरणोपाय कशात आहे हे प्रथम पाहणे अवश्य होईल.' यावर आगरकर सरकारला 'हिंदुस्थानच्या प्राणांतसमयी तरी इंग्लंड त्यास अंतर देणार नाही, हे त्याचे महद्भाग्यच समजले पाहिजे' असा औपरोधिक टोमणा देतात व शेवटी बजावतात की, त्यांची ही अरेरावी सदैव चालणे सर्वथा अशक्य आहे. आज ना उद्या आपल्या या राजनीतीत त्यांना बदल करावाच लागेल.

राज्यकर्त्यांच्या अमर्याद स्वार्थाचे व जुलमाचे दुष्परिणाम किती भयानक होतात, हे इतिहासातील अनेक उदाहरणे देऊन आगरकरांनी दाखविले आहे. प्रजेच्या सामर्थ्याबाहेर करवाढ करून ती वसूल करण्यास सरकारी अंमलदार जेव्हा जुलमाचा अतिरेक करतात तेव्हा सर्वत्र मारामाऱ्या सुरू होऊन अनवस्था कशी माजते, प्रजा एकदा बंड करून उठली की तिचा क्रोधाग्नी किती भडकतो हे सोदाहरण दाखवून सरकारला सावध करण्यास आगरकर मुळीच कचरत नाहीत. ते स्वच्छ शब्दांत सांगतात, 'प्रजा कितीही राजनिष्ठ असली तरी अचेतन वस्तूप्रमाणे पाहिजे तसली वागणूक ती हवा तेवढा वेळ सहन करील, असे समजणे हे शुद्ध मूर्खपण होय. ... सरकारी अंमलदारांचा जुलूम असह्य झाल्यामुळे लोकांनी हत्यारांस हात घालून छळ करणाऱ्या राजास आणि त्याच्या साथ्यांस कंठस्नान घातल्याची उदाहरणे पुष्कळ आहेत.'(३१३) ते पुढे म्हणतात, 'सारी प्रजा बेजार होऊन गेल्यावर काय प्रसंग गुदरतो याचे उदाहरण फ्रान्स देशात १७८९ साली जी प्रचंड राज्यक्रांती झाली ती देत आहे! शंभर वर्षांपूर्वी फ्रान्स

१६. 'हिंदुस्थानची तिजोरी आणि घाटत असलेला अन्याय.'

देशात लोकसंतापाग्नीचे जे भयंकर होमकुंड पेटले त्यात कित्येक शतकेपर्यंत अनाथ प्रजेवर जुलूम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आणि सिंहासनस्थ राजाराणीच्या आहुत्या पडल्या!' (३१५)

परकीय राज्यकर्त्यांशी एवढ्या झुंजार वृत्तीने टक्कर घेणाऱ्या या व्यक्तीस नुसते जहाल राजकारणी नव्हे, तर ज्वलज्जहाल राजकारणी म्हणणेच सार्थ ठरणार नाही काय? आणि अशा व्यक्तीस आणखी आयुष्य लाभते तर १८९६ च्या भयानक दुष्काळातील सरकारची निर्घृण बेपर्वाई आणि १८९७ च्या प्लेगातील रँड साहेबांची उद्दाम अरेरावी पाहून तिने काय केले असते, हे सांगण्यास एखाद्या भविष्यवाद्याची आवश्यकता आहे काय?

४

समाजहितार्थ आपले सर्वस्व वेचणाऱ्या या विचारवंताबद्दल महाराष्ट्रात अनेक गैरसमज होते, आणि आजही आहेत, असे या लेखारंभी म्हटले आहे. आता त्या गैरसमजांचा क्रमशः परामर्श घेऊन हे विवेचन संपवू.

आगरकरांबद्दल जनतेत अप्रीती किंवा उदासीनता निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे टिळकांसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या लोकमान्य नेत्यांशी झालेला त्यांचा मतभेद. आपल्या असामान्य कर्तृत्वाने भारतीय जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेल्या टिळकांसारख्या महान व्यक्तीशी आगकरांनी संघर्ष केला, त्यांच्यावर ते सर्व सामर्थ्यानिशी तुटून पडले, ही गोष्ट बहुसंख्य लोकांना धक्का देणारी वाटावी हे स्वाभाविक आहे. परंतु या दोघांतील मतभेदाची कारणमीमांसा निःपक्षपातीपणे केल्यास आगरकरांविषयी विरोधकांची अप्रीती सर्वस्वी निराधार आहे हे आपल्या लक्षात येईल.

टिळक-आगरकर यांच्याविषयी विचार करताना आपण हे ध्यानात बाळगले पाहिजे की, एकाच साली (१८५६) जन्मलेल्या या दोघा महापुरुषांपैकी आगरकर फक्त एकोणचाळीस वर्षे जगले, तर सुदैवाने टिळकांना आणखी पंचवीस वर्षे लाभली. टिळकांचे अखिल भारतीय नेतृत्व हे आगरकरांच्या मृत्यूनंतर त्यांना प्राप्त झाले. कोल्हापूरप्रकरणी टिळक प्रथम तुरुंगात गेले ते आगरकरांसह. त्यानंतर पहिला राजद्रोहाचा खटला झाला तो १८९७ मध्ये, म्हणजे आगरकरांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी. यावेळी जर आगरकर हयात असते तर त्यांचे राजकीय विचार टिळकांपेक्षा कमी जहाल झाले असते म्हणण्यास, त्यांचे आपण जे एतद्विषयक विचार पाहिले त्यावरून कसलेही कारण दिसत नाही.

१८८१ ते १८९५ या पंधरा वर्षांत पहिली सात वर्षे या दोघांनी सहकार्याने महाराष्ट्रात एक इतिहासात घडवला. दोघेही स्वयंभू, मनस्वी, प्रखर तत्त्वनिष्ठ व

आपापल्या विचारसरणीबद्दल दृढविश्वास बाळगणारे, परंतु देशोद्धाराचे त्यांचे ध्येय जरी समान असले, तरी त्याविषयीच्या त्यांच्या संकल्पना भिन्न होत्या. त्यामुळे त्यांचे मतैक्य फार काळ टिकणे अशक्य होते. राजकीय स्वातंत्र्याचे महत्त्व दोघांना सारखेच वाटत होते. मतभेद होता तो सामाजिक व धार्मिक सुधारणा कोणत्या करावयाच्या, केव्हा करावयाच्या व कशा करावयाच्या यासंबंधात. टिळकांच्या मते आपली सर्व शक्ती प्रथम स्वातंत्र्यप्राप्तीच्या कामी लावली पाहिजे. सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या मागे लागल्यास जनतेची मने दुखावतील व आपली शक्ती कमी होईल. त्या सुधारणा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण सहज करू शकू. यावर आगरकर म्हणत की, राजकीय स्वातंत्र्य जाणे म्हणजे शरीरांतील चैतन्यसारतत्त्वच नाहीसे होणे होय, म्हणून राष्ट्रसभादि साधनांच्या द्वारे ते फिरून प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न आम्ही करीतच आहोत. परवशता ही अत्यंत शोच्य आहे हे निर्विवाद आहे. परंतु ती दूर करण्याचे कार्य करीत असताना सांप्रतकाळ सामाजिक सुधारणेस अनुकूल असल्यामुळे आम्ही स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नाबरोबरच आमची सामाजिक व धार्मिक स्थितीही सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज आमचे राज्यकर्ते परके असल्यामुळे आमच्या राष्ट्रातील धार्मिक व सामाजिक दोष ते पाहू शकतात, एवढेच नव्हे तर, सतीच्या चालीसारखी अमानुष चाल लोकांच्या विरोधास न जुमानता त्यांनी कायद्याने बंदही केली आहे. तेव्हा राज्यकर्त्यांच्या या दृष्टीचा फायदा घेऊन राजकीय हक्कांबरोबरच आमचा धार्मिक व सामाजिक सुधारणांची मागणीही आम्ही शक्य तेवढी पुढे रेटली पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सुधारणा कराव्या हे म्हणणे बरोबर नाही; कारण राजकीय स्वातंत्र्य असूनही सामाजिक व धार्मिक गोष्टींत अत्यंत तीव्र दास्यपाशाने सर्वप्रकारे जखडलेले असे अनेक समाज असतात. कारण स्वतंत्र देशांतील जे सरकारी अधिकारी असतात, ते नव्याण्णव वाटांनी जुन्या मतांना चिकटून असतात. तसे नसते तर प्रत्येक स्वतंत्र देशातील प्रसिद्ध आद्य सुधारकांचा इतका छळ का झाला असता? म्हणून इंग्रजांशी लढता लढताच आम्ही स्वत:शीही लढून सर्वांगीण सुधारणा केली पाहिजे. नाही तर मिळालेले स्वराज्य आम्ही टिकवू शकणार नाही, व ते टिकले तरीही त्यात सर्व प्रजेस न्याय व सुख मिळू शकणार नाही. कारण जोपर्यंत जाती-जातींतील श्रेष्ठ-कनिष्ठ भाव, स्त्रीपुरुषांतील विषमता यासारखे दोष कायम राहतील, तोपर्यंत सर्वांना न्याय मिळणे अशक्य आहे. सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा करण्याची गरज नाही असे टिळकांनी केव्हाही व कोठेही म्हटले नाही हे खरे. परंतु त्यांना आगरकरांइतकी या सुधारणांची निकड वाटत नव्हती. तत्कालीन रूढींतील क्रौर्य तितके त्यांना झोंबत नव्हते, त्यांतील अमानुषता तेवढी असह्य होत नव्हती.

त्यामुळे त्यांनी कधी कायद्याच्या मदतीला हरकत घेऊन, कधी आईबापांना दु:ख होण्याचे निमित्त सांगून, कधी समाजाच्या रोषाची भीती दाखवून, तर कधी आपला धर्म व संस्कृती यांना धक्का पोचण्याची सबब सांगून, या सुधारणांना आडवळणाने सतत विरोधच केला. या संबंधात डॉ. य. दि. फडके यांनी दिलेले उदाहरण अतिशय बोलके आहे. ते म्हणतात, ''संमतिवयाच्या विधयेकामुळे 'आमच्या रूढीस व शास्त्रास धक्का बसतो हाच आमचा मुख्य मुद्दा' असल्याचे टिळकांनी केसरीतही लिहिले आहे.''[१७] डॉ. फडके पुढे लिहितात, 'संमतिवयाचे विधेयक मंजूर झाल्यानंतरही, त्याविरुद्ध सरळ व्हिक्टोरिया राणीकडे दाद मागण्याचाही टिळकांनी घाट घातला होता असे दिसते. त्यासाठी मुंबईला भरविलेल्या सभेत हिंदू पुढाऱ्यांप्रमाणेच मुसलमान मौलवींचीही भाषणे झाली. या निमित्ताने धर्माभिमानी हिंदु-मुसलमानांची संयुक्त आघाडी तयार करण्याचा टिळकांनी प्रयत्न केला.'[१८] स्त्रीला सर्व बाजूंनी दास्यात जखडून ठेवणाऱ्या मुसलमान धर्माशी संमतिवयाच्या विरोधकाला विरोध करताना त्यांनी हातमिळवणी केली, यावरून त्यांचा संस्कृतीचा अभिमान कोणत्या टोकाला जाऊ शकत होता हे दिसून येते. टिळक आगरकरांच्या या प्रकृतिभेदाचे वर्णन आचार्य जावडेकर यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. 'लो. टिळकांनी. ... आपल्या संस्कृतीच्या अभिमानाच्याच परंपरागत पायावर जहाल राजकारणाचा पाया घातला. आगरकरांच्या जहाल राजकीय विचारांचा पाया केवळ जनतेचे वाढते दारिद्र्य आणि स्वातंत्र्याची, समतेची आणि सत्यनिष्ठेची सार्वत्रिक आकांक्षा हा होता.'[१९] टिळकांच्या या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नास जरी तत्काळ मोठे यश मिळाले, तरी त्याचे दूरगामी परिणाम अतिशय घातक झाले असे दिसते. यासंबंधात आचार्य जावडेकरांचे विवेचन विचारार्ह आहे. ते म्हणतात : 'लोकमान्यांनी सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या आधारावर जे राष्ट्रीयत्व निर्माण केले, त्यामुळे त्यांच्या हयातीत महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जनतेत फारशी राजकीय जागृती झाली नव्हती व त्यांच्या मृत्यूनंतरच्या परिस्थितीत याच सांस्कृतिक राष्ट्रीयत्वाचा आधार घेऊन त्यांचे अनुयायी म्हणविणारे काही लोक पुढे राष्ट्रसभेला विरोध करू लागले, व आमची विशिष्ट संस्कृती रक्षण होत नसेल तर ते स्वराज्य आम्हास नको, म्हणून परकीय सत्तेशी सहकार्यही करू लागले! यावरून स्वसंस्कृतीचा अभिमान हा नेहमी प्रखर राष्ट्रीय

---

१७. शोध : बाळगोपाळांचा, पृ. ६८.

१८. तत्रैव, पृ. ७०.

१९. आधुनिक भारत (आवृत्ती तिसरी, १९६८), पृ. २२९.

राजकारणास पोषक होईल, असे म्हणता येत नाही!'[२०]

या संबंधात आगरकर म्हणत की, आपल्या धर्मांतील व संस्कृतीतील हितावह भाग घेणे जसे आवश्यक, तसेच अहितकर भाग टाकून देणेही तितकेच आवश्यक आहे. 'भारतीय आर्यत्व न सांडता' प्रगत देशांतील व संस्कृतींतील यशस्वी तत्त्वांचा स्वीकार जर आपण केला नाही, तर देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाला तरी खऱ्या अर्थाने आपण स्वतंत्र होणार नाही.

धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या बाबतीत टिळकांचे आणखी असे म्हणणे होते की इंग्रजी शिक्षण मिळालेले बहुतेक सुशिक्षित लोक सामाजिक प्रश्नांविषयी विचार करू लागले आहेत व उत्तरोत्तर त्यांच्या विचारांचा परिणाम त्यांच्या आचरणावर होईलच. व्यापारधंदा, सरकारी नोकऱ्या, आगगाडीचा प्रवास इत्यादि कारणांनी जातिबंध आपल्या आपण शिथिल होऊ लागले आहेत, ते वाईट आहेत असे म्हणून एकमेकांस दुखविण्याची गरज नाही. शास्त्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर धर्मसंबंधी वेडेपणाच्या समजुती लयास जातील. सबब त्यावरच टीका करण्याची गरज नाही. यावर आगरकर म्हणत की, प्रवाहपतित होऊन केलेले वर्तनांतर कधीही फलदायी होणे शक्य नाही.

या दोन मतांपैकी कोणाचे मत अचूक ठरले हे पाहण्यापूर्वी, प्रथम आगरकरांच्या कार्याबद्दल जो दुसरा एक गैरसमज आहे तो लक्षात घ्यावा लागेल. यासंबंधी बहुतेकांचे मत असे आहे की बालविवाह, केशवपन, पुनर्विवाह आदि ज्या सुधारणांसाठी आगरकर झगडले, त्या सर्व आता झाल्या असल्यामुळे आज आगरकर संपले आहेत. परंतु हा समज निखालस चुकीचा आहे. आगरकरांना अभिप्रेत असलेल्या सुधारणांचा आवाका केवढा प्रचंड होता हे आपण वर पाहिलेच आहे. त्यांच्या जवळपासही आपण अजून गेलो नाही. ज्या काही सुधारणा झालेल्या आज आपणास दिसत आहेत त्यांचा समाजाला अपेक्षित इष्ट लाभ झालेला नाही, कारण आगरकरांच्या पद्धतीप्रमाणे आपण त्या केल्या नाहीत. बालविवाहाचेच उदाहरण घ्या. आगरकरांनी स्पष्ट सांगितले होते की 'बालविवाहाचे खंडन म्हणजे स्वयंवराचे मंडन. ...जी स्वयंवरे नाहीत त्या सर्वांस आम्ही बालविवाहच समजतो! ज्याचे त्याने लग्न करणे म्हणजे स्वयंवर! एकाचे दुसऱ्याने करणे म्हणजे बालविवाह!' (२८४) हीच दृष्टी स्त्रीविषयक सर्व सुधारणांच्या बाबतीत बाळगण्यास त्यांनी सांगितले होते. उदा. स्त्रीला शिक्षण द्यावयाचे ते स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचा अंगीकार करून द्यावयाचे. स्त्री हा समाजाचा एक स्वतंत्र

२०. तत्रैव, पृ. २३०.

घटक आहे हे लक्षात घेऊन तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याकरता तिला शिकवले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. परंतु आम्ही ह्या सुधारणा केल्या, त्या सुशिक्षित वराकडून प्रौढ व शिक्षित वधूची मागणी होऊ लागली म्हणून केल्या. म्हणजे पुरुषाचे साधन म्हणूनच स्त्रीकडे पाहिले गेले. त्यामुळे आज जरी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण दिले जात आहे व त्यांना सर्व व्यवसायांत प्रवेश मिळत आहे, तरी त्यांचे समाजातील स्थान फारसे बदलले नाही. वरसंशोधन, हुंडा, मानपान इत्यादि स्त्रीचे दुय्यम स्थान दर्शविणाऱ्या रूढी अजूनही कायम आहेत. एवढेच नव्हे तर त्या वाढत आहेत. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीला स्वतःच्या पैशाचा आपल्या इच्छेनुसार विनियोग करण्याचे स्वातंत्र्य असल्याचे दिसत नाही. सासरच्या छळापायी स्त्रियांनी स्वतःस जाळून घेतल्याच्या किंवा त्यांना जाळल्याच्या बातम्या आपण प्रत्यक्ष वाचतो. तेव्हा स्त्रियांची स्थिती पूर्वीइतकीच दुर्धर आहे असे म्हणावे लागते. आगरकरांच्या म्हणण्याप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वास अनुसरून जर आम्ही हेतुपुरस्सर ह्या सुधारणा केल्या असल्या, तर त्यायोगे स्त्रीचे मन स्वतंत्र झाले असते, तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व लाभले असते व त्यामुळे स्वतंत्रपणे जगण्यास आवश्यक असे सामर्थ्य व धैर्य तिच्या अंगी आले असते. परंतु या सुधारणा काळाच्या ओघात आपोआप झाल्या व परिस्थितिशरण होऊन आम्ही त्या स्वीकारल्या, म्हणून शंभर वर्षानंतरही आज स्त्रीची दुरवस्था कायम आहे. जातिभेदनिर्मूलनाच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. जातिभेदातील अन्याय व अनिष्टता लक्षात घेऊन आपण ही सुधारणा केली नाही, तर टिळकांच्या अपेक्षेप्रमाणे व्यापार, प्रवास व नोकरीच्या निमित्ताने विविध जातींशी संपर्क आल्यामुळे जातिभेदाची बंधने आपोआप शिथिल झाली. पण त्यामुळेच आज संधी मिळेल तेथे प्रत्येक जात आपापला सवता सुभा निर्माण करून आपले स्वतंत्र बळ वाढवीत आहे व त्यामुळे राष्ट्राच्या ऐक्यास धोका निर्माण स्वतंत्र अस्पृश्यतानिर्मूलनाच्या बाबतीत तर मोठे अपयश आले आहे. मीनाक्षीपुरमचा राष्ट्राला हादरा देणारा धर्मांतराचा प्रसंग; त्या अपयशाचा ज्वलंत पुरावा आहे. याबाबतीत आगरकरांनी इशारा देऊन ठेवला होता हे आपण पाहिलेच आहे. त्यांनी अतिशय तळमळीने सांगितले होते की, अस्पृश्यतेच्या रूढीतील विलक्षण अविचार, अन्याय, क्रौर्य, अमानुषता ही सर्वथैव असमर्थनीय असल्यामुळे आपण तिचा समजून उमजून व मनापासून त्याग केला पाहिजे. पण आपण तसे न केल्यामुळे आज अस्पृश्यतेची मगरमिठी आपल्या मनावर पूर्वीइतकीच पक्की बसलेली आहे. सारांश, आगरकरांना अभिप्रेत असलेल्या फार थोड्या सुधारणा झाल्या आहेत, व त्याही अगदी वरवरच्या स्वरूपात झाल्या आहेत. त्यामुळे

आगरकरांचे कार्य इतिहासजमा झाले आहे हे म्हणणे आत्मवंचक व दिशाभूल करणारे आहे. आपण आजही आगरकरांच्या विचारांच्या शंभर वर्षे मागे आहोत. यासंबंधी टिळक-आगरकरांच्या कार्याचा अतिशय बारकाईने व तटस्थपणे शोध घेणारे डॉ. य. दि. फडके यांचे पुढील विधान चिंत्य आहे. ते म्हणतात, 'पूर्वगौरवावर आधारलेली राष्ट्रीय अस्मिता चेतवून स्वराज्यप्राप्तीसाठी जनआंदोलन संघटित करण्यात टिळकांनी आपले उभे आयुष्य वेचले, पण स्वराज्य मिळाल्यानंतर येणाऱ्या काळाचा वेध घ्यावा असे भूतकाळात रमणाऱ्या टिळकांना कधीच वाटलेले दिसत नाही. याउलट टिळकांसारखेच पक्के स्वराज्यवादी असलेले आगरकर मात्र या भविष्याची नुसती चाहूल लागूनही बेचैन झालेले दिसतात. म्हणूनच स्वराज्यप्राप्तीबरोबर टिळकांच्या ऐतिहासिक कार्याची सांगता झाली असे म्हणता येते, पण जातीजातींमधील स्त्रीपुरुषांमधील विषमता जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत आगरकरांचा विचार इतिहासजमा झाला असे म्हणता येणार नाही.' [२१]

आगरकरांवर घेतला जाणारा दुसरा आक्षेप म्हणजे त्यांनी पुरस्कारलेले तत्त्वज्ञान भारतीय नव्हते; हा. त्यांनी ते पाश्चात्यांकडून उसने घेतले होते. याबद्दल त्यांना अनेक भारतीयांनी दोष दिला आहे, आणि त्यांची परभृत आणि परप्रत्ययनेय अशी संभावना केली आहे. परंतु हा आक्षेप वस्तुत: अगदी विपर्यस्त आहे. या आक्षेपानुसार आपण आपल्या पूर्वजांचे विचार जसेच्या तसे स्वीकारले, त्यांची कसलीही चिकित्सा केली नाही, तरी ते दूषणास्पद नाही, उलट ते भूषणावह आहे, स्वाभिमानाचे व देशाभिमानाचे द्योतक आहे. पण परकीयांचे विचार कितीही चांगले असले तरी ते स्वीकारणे दूषणास्पद आहे. यांत असे गृहीत धरले आहे की विचारांच्या क्षेत्रात ते सयुक्तिक आहेत की अयुक्तिक आहेत, समंजस आहेत की असमजंस आहेत, हा प्रश्न अगदी गौण आहे. महत्त्वाचा प्रश्न आहे तो ते विचार कोठे उत्पन्न झाले हा. आणि म्हणून टिळकांनी गीतारहस्यात आपल्या पूर्वजांच्या विचारांचा अनुवाद केला, त्यांचेच मंडन केले, म्हणून ते अनुकरणकार, परभृत ठरत नाहीत. परंतु आगरकरांनी पाश्चात्यांच्या विचारांचा स्वीकार केला म्हणून ते देशाभिमानशून्य आणि अनुकरणकार ठरतात. पण शांतपणे विचार केल्यास हे मत क्षणभरही टिकणे शक्य नाही. कारण कोणत्याही विचाराचा स्वीकार किंवा त्याग करावयाचा तो; तो विचार बरोबर आहे किंवा नाही, त्याच्या बाजूने पुरेशी प्रमाणे आहेत की नाहीत, या कसोटीने ठरविला पाहिजे. एखादा विचार

२१. शोध : बाळ-गोपाळांचा, पृ. ७९.

केवळ आपला आहे म्हणून तो आपण स्वीकारला पाहिजे हा आग्रह अगदी असंमजसपणाचा आहे हे कोणासही कबूल करावे लागेल. तेव्हा कोणत्याही विचाराचा पुरस्कार करताना तो कोठे निर्माण झाला याचा विचार करणे गौण आहे. त्याची साधक बाधक प्रमाणे पाहून, तो जर खरा किंवा युक्त असण्याचा संभव असेल, तरच तो स्वीकारला पाहिजे. आगरकरांनी असेच केले होते.

आगरकर स्वतंत्र तत्त्वज्ञ नव्हते हे एका अर्थी खरे आहे. आपले विचार त्यांनी कौंत (Comte), मिल आणि स्पेन्सर यांच्या तत्त्वज्ञानातून काही प्रमाणात उचलले हेही खरे आहे. पण स्वकीयांची थोरवी गाण्याच्या हजारो वर्षांच्या रूढीने त्यांच्या काळातील बहुतेक विचारवंत बद्ध असताना, त्यांनी स्वकीयांच्या विरोधास न जुमानता परकीयांचे विचार स्वीकारले; यात त्यांची स्वतंत्र व निर्भय वृत्तीच दिसून येते. त्यातही परकीयांच्या विचारांपैकी कोणते विचार त्यांनी स्वीकारले हेही त्यांच्या बुद्धिमत्तेचे आणि स्वतंत्र प्रज्ञेचे द्योतक आहे. त्यावेळी इंग्लंडमध्ये फक्त मिल, स्पेन्सर यांचेच तत्त्वज्ञान प्रचलित होते असे नव्हे, धार्मिक तत्त्वज्ञानही बरेच होते. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचाही मोठा बोलबाला होता. पण आगरकरांनी नेमके विवेकवादी, लोकशाहीवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी असेच तत्त्वज्ञान उचलले व त्याला आपल्या देशाच्या परिस्थितीला अनुरूप असे वळण दिले. यावरून त्यांची स्वतंत्र विचार करण्याची वृत्तीच सिद्ध होते. वास्तविक टिळकांनीही लोकशाहीवादी राजकीय तत्त्वज्ञान पाश्चात्यांकडूनच घेतले. तसेच महात्मा गांधींनाही सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान टॉलस्टॉय, रस्किन आणि थोरो यांच्या तत्त्वज्ञानांतून स्फुरले. पण या दोघांना कोणी अनुकरणकार किंवा परभृत म्हणत नाही. आता हे खरे आहे की टिळक आणि गांधीजी आपल्याला रामायण, महाभारत आणि गीता यांतून स्फूर्ति मिळाली असे सांगतात, आणि आगरकर मात्र कोणत्याही भारतीय विचारवंताला आपल्या विचारांचे मूळ मानीत नव्हते. पण हा स्वभावधर्माचाही परिणाम आहेच. टिळक आणि गांधीजी अतिशय धार्मिक वृत्तीचे होते, तर आगरकर प्रथमपासूनच धार्मिक प्रभावापासून पूर्णपणे मुक्त होते!

आगरकरांवर केला जाणारा आणखी एक गंभीर आरोप म्हणजे ते धर्मबुडवे, भारतीयत्वाविषयी कसलाही अभिमान नसलेले, भारतीय संस्कृतीचे द्वेष्टे, आंग्लाळलेले व स्वजनद्रोही होते. या आरोपात आक्षेपकांचे आगरकरांचे जीवन व त्यांचे कार्य याबद्दलचे गाढ अज्ञानच दिसून येते. भारताच्या उन्नतीसाठीच तर त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले आणि लोकांच्या छळाला किंवा रोषाला न

भिता विवेकी जीवनाचे माहात्म्य त्यांना पटविण्याचा अविरत प्रयत्न केला. त्यांनी हिंदुधर्मातील असंख्य दोषस्थळे निर्भीडपणे आणि कठोरपणे दाखविल्यामुळे हिंदुधर्माचे त्यांना काही सोयरसुतक नव्हते असा अनेकांचा समज झाला. परंतु बाह्यत: विध्वंसक दिसणारे हे कार्य, वस्तुत: विधायक स्वरूपाचे-हिंदुधर्मातील दोषस्थळे दूर करून त्याला शुद्ध स्वरूप देण्याचे-होते हे लक्षात घेणे जरूर आहे. आपल्या धर्माच्या आणि संस्कृतीच्या अत्यंत अन्याय्य, क्रूर आणि अमानुष आज्ञांचे लोकांकडून शतकानुशतके निमूटपणे होत असलेले पालन पाहून आगरकर कमालीचे अस्वस्थ होत. धर्मपाशांनी चोहोकडून पूर्ण जखडले गेल्यामुळे हीनदीन जिणे जगणाऱ्या आपल्या लोकांची त्यांना विलक्षण चिंता वाटे. आपली बुद्धी गहाण टाकल्यामुळे त्यांना ही दशा आली आहे असे त्यांना ते समजावीत, त्यासाठी त्या धर्माज्ञांतील विसंगती, अन्याय, असमंजसपणा स्पष्ट करून दाखवीत आणि धर्माच्या आज्ञा कोठवर पाळाव्यात याचा आम्ही विचार केला पाहिजे, असे त्यांना शिकवित. ते म्हणत, 'हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढे काही खरोखर निर्दोष आणि हितावह आहे त्याला कशाचीही भीती नाही.' (१२८) पण जे काही सदोष व अहितकारक आहे त्याचा आपण निर्धाराने त्याग केला पाहिजे, आणि त्याच्या जागी पाश्चात्य संस्कृतीतील हितकर मूल्यांचा स्वीकार करण्यास तयार असले पाहिजे. नाहीतर जीवनकलहात आमचा निभाव लागणे अशक्य आहे. जर आपण नवीन गोष्टींचे चिंतन आणि चर्चा करणार नाही तर रूढ विचारातले प्रमाद दूर होणार कसे?

हे प्रमाद दूर करण्यासाठीच त्यांनी आपल्या धर्मातील दोषस्थळांवर प्रखर हल्ले केले. या हल्ल्यांमुळे धर्मग्लानी येण्याचे भय आहे असे म्हणणाऱ्यांविषयी ते लिहितात, 'यांच्या धर्मग्लानीच्या बऱ्याच भागास आम्ही धर्मग्लानी न समजता धर्मोत्कर्ष समजतो! मूर्तिपूजा अजीबात नाहीशी होणे, यज्ञयागाचे थोतांड क्रमाक्रमाने शिथिल होत जाणे, वर्णसंकर होऊन पाहिजे त्याला पाहिजे त्याशी अन्नोदकव्यवहार करण्याची किंवा लग्न लावण्याची सदर परवानगी असणे, पाहिजे त्याने पाहिजे त्या शास्त्रांचा किंवा धर्मग्रंथांचा अभ्यास करणे, स्त्री-पुरुषांनी हव्या त्या वयापर्यंत किंवा मुळीच अविवाहित राहणे. स्त्रियांस हवी ती विद्या संपादू देणे किंवा हवा तो धंदा करू देणे, ज्याचे त्याने आपल्या तब्येतीप्रमाणे लग्न करणे, अशौचादि कोणत्या प्रकारच्या कारणाने कोणासही कुरूपता न येणे, और्ध्वदैहिकादि गलिच्छ व अमंगल संस्कार बंद पडणे- वगैरे गोष्टी प्रचारात आल्यास कोणत्याही प्रकारची धर्मग्लानी होणार आहे असे आम्हांस वाटत नाही. अशा प्रकारच्या आचारांनी हिताहून अहितच अधिकच होत आहे, असा

आमचा समज आहे.'[२२]

वस्तुत: आगरकर निधर्मी म्हणजे कोणताही धर्म न मानणारे होते. असे असताना ते हिंदु धर्माचा कैवार घेत ही गोष्ट सकृद्दर्शनी विसंगत दिसते. परंतु एका व्यापक-निधर्मी-अर्थाने आगरकर हिंदूच होते असे म्हणणे योग्य होईल. ज्या समाजात ते जन्मले आणि वाढले तो समाज हिंदू होता, त्यामुळे त्यांनी अनायासे आत्मसात केलेला जीवनप्रकारही हिंदूच होता. त्या जीवनप्रकारांत त्यांना अनेक दोषस्थळे दिसली, व ती त्यांनी आपल्या स्वत:च्या जीवनातून काढून टाकली, तरी त्यांचा बाकीचा एकूण व्यवहार-पोषाख; आहार, सण इत्यादि-हिंदूंचाच होता. शिवाय ते ज्या समाजात वाढले त्यातील लोकांविषयी त्यांना अतिशय आत्मीयता वाटत होती, आणि त्यांच्या कल्याणाकरिताच ते सतत झटत होते. म्हणून इतर धर्मीयांनी हिंदू धर्माला नावे ठेवली, त्यावर हल्ला केला किंवा हिंदूचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांच्यावर तुटून पडत, व त्यांना बजावीत की तुमच्या धर्मात आमच्या धर्माहून काही कमी दोष नाहीत, उलट जास्तच आहेत.

हिंदुधर्माच्या श्रेष्ठत्वाबद्दल त्यांना वाटणारा अभिमान आणि हिंदुधर्मरक्षणाची त्यांनी दिलेली हाक, हिंदु-मुसलमानांवरील त्यांच्या लेखांत स्पष्टपणे प्रगट झाली असल्याचे आपण वर पाहिलेच आहे. अस्पृश्यांच्या धर्मांतराने त्यांना वाटणारी चिंताही त्यांच्या धर्मरक्षणाच्या तळीमळीची द्योतक आहे. आपल्या धर्माची व संस्कृतीची प्राचीनता आणि त्यांनी केलेली प्रगती दाखविण्याकरिता त्यांनी 'भारतीय कलांचे पुराणत्व' ही दीर्घ लेखमाला लिहिली. तिच्यात ते म्हणतात, 'महंमदीय लढवय्यांप्रमाणे धर्मवेडाने युरोप व आशिया खंडांतील मोठमोठे देश आम्ही उध्वस्त केले नाहीत, व राज्यलोभाने लाखो लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति, क्रूरनिष्ठुरता जगाच्या इतिहासात अमर केली नाही ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषानखनन इत्यादि शिल्पकलांचा येथे अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धी झाली होती की त्यासंबंधाने आजमितीस सुद्धा आम्हांस कोणापुढेही खाली पाहण्याची अवश्यकता नाही.' (३२३)

पण त्याचबरोबर एवढा उज्ज्वल वारसा लाभलेले आम्ही गेली दोन हजार वर्षे गतानुगतिक झाल्यामुळे आज आमची झालेली दुर्दशाही त्यांना पाहावत नव्हती. 'आमचे दोष आम्हास कधी दिसू लागलीत?' अशी त्यांना तळमळ

---

२२. 'बंधने कोण व कोणती घालणार?'

लागून राहिली होती. पण त्याचा फायदा घेऊन जर परकीय लोक आमच्यावर भलतेसलते आरोप करू लागले तर ते त्यांचा खरपूस समाचार घेत. मि. ॲशबर्नर नावाच्या एका इंग्रजाने आमच्या हतभाग्य हिंदू विधवांवर त्या 'सनदी स्वेच्छाचारिणी' आहेत असा असभ्य, खोडसाळ व असत्यप्रचुर आरोप केला तेव्हा आगरकरांनी त्याला सुनावले की, 'ज्या देशात पतिव्रतापदप्राप्त्यर्थ लक्षावधि तरुण स्त्रियांनी पति-चितेवर आपणांस जिवंत जाळून घेण्याचे लोकोत्तर धैर्य दाखविले, ... त्या देशातील स्त्रियांस 'chartered libertines' (सनदी स्वेच्छाचारिणी) हा किताब देणाराने आपण काय म्हणतो याचा त्रिवार विचार करावयास पाहिजे होता!' कर्नल मन्रो या त्यांच्याच एका विद्वानाने हिंदु स्त्रियांना दिलेले पुढील प्रशस्तिपत्र उद्धृत करून ते त्यांना नामोहरम करतात : 'कोणत्याही देशातील स्त्रियांस, व इंग्लंडच्याही स्त्रियांस, त्यांचे वर्तन ब्राह्मणी किंवा वरिष्ठ हिंदू स्त्रियांहून कमी शुद्ध नाही, असा दाखला मिळणे म्हणजे आपली मोठी वाखाणणी झाली, असे मानण्यास हरकत नाही.' (४०१) तसेच कॅ. ऑगस्टस वुइलर्ड या लष्करी अधिकाऱ्याने आमच्या संगीताच्या चिजांवरून आमच्या स्त्रियांच्या नीतिमत्तेबद्दल अकलेचे तारे तोडले, तेव्हा 'आणखी एक शहाण्याचा कांदा' अशी त्यांची संभावना करून आगरकरांनी त्याला ठणकावले की, 'कोणत्याही देशातील लोकांनी दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचे धाडस करू नये, म्हणून आम्ही इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयी काही एक म्हणत नाही; तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर आणू लागतील, तर तुमच्या मडमांनी आमच्या स्त्रियांचे तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावे, इतक्या त्या पवित्र आहेत, असे म्हणण्यास आम्ही कधीही सोडणार नाही! हिंदुस्थानातील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतके शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशात सापडणार नाही.' (४०६-७)

आगरकरांवर स्वजनद्रोहाचा केला जाणारा आरोप तर फारच असमंजस व विपर्यस्त आहे. त्यांचा सारा आटापिटा केवळ स्वजनहितासाठीच होता. म्हणून तर त्यांनी साऱ्यांच्या तीव्र विरोधाचे हलाहल पचवले. आता हे खरे आहे की अतिशय वेडगळ व क्रूर आचारविचारांचे मंडन करणाऱ्यांवर ते तुटून पडत. कारण या आचारविचारांतील दोषांकडे डोळेझाक करणे त्यांना आत्मघातकीपणाचे वाटत होते. परंतु सामान्य लोकांना त्यांनी कधीही दोष दिला नाही. ते म्हणत की त्यांच्याकडून या गोष्टी अज्ञानाने होत आहेत. म्हणून त्यांच्यावर रागावणे बरोबर नाही. तसेच वृद्धांनाही त्यांनी कधी दोष दिला नाही. उलट त्यांच्या स्थितिप्रियतेचीही समाजाला आवश्यकता आहे हे सांगताना ते म्हणतात की, वृद्ध,

'हे समाजनौकेचे भरताड होत, तरुण शिडे होत ! पहिल्याशिवाय समाजात स्थिरता राहणार नाही; दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाही !' (५०) त्यांचा रोष होता तो सुशिक्षितांवर, स्वार्थाकरता जाणूनबुजून अनिष्ट रूढींचे समर्थन करणाऱ्यांवर, आणि लोकानुरंजनासाठी त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या पुढाऱ्यांवर. या सर्वांवर रागावण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नव्हते, कारण हेच लोक समाजाचे आधारस्तंभ होते. हे जर सुधारले नाहीत तर समाज प्रगत होणेच शक्य नव्हते. शिवाय प्रसंगी ते जरी कठोर वाक्ताडन करीत तरी अनेकदा त्यांचा अनुनयही करीत. 'तरुण सुशिक्षित मित्रहो!', 'प्रिय देशबांधवहो!', 'धर्मप्रेमी बांधवहो!' अशा आर्त संबोधनांनी त्यांना आवाहन करून, 'हा सुधारक एवढा कंठशोष करून तुमची आळवणी करीत आहे, त्याची अवहेलना करू नका' अशी त्यांची विनवणी ते करतात. पानापानातून त्यांची प्रगाढ स्वजननिष्ठा दिसून येते. ते अतिशय तळमळीने म्हणतात, 'सुशिक्षित देशबांधवहो, जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरे म्हणून घ्यावयाचे असेल, व तुमची आज जी स्थिती आहे तीहून तुमच्या मुलांची व नातवंडाची स्थिति अधिक वाईट होऊ नये अशी तुम्हांस वास्तविक इच्छा असेल तर ज्या दुर्मतानी, दुराग्रहांनी व दुराचारांनी महारोगाप्रमाणे या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्यांचा हजारो वर्षे फडशा चालविला आहे, त्याचे यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत उचित होय'. (पृ. ४८) तसेच सुधारकांना जातीतून हुसकून काढू पाहणाऱ्या सनातन्यांवर मुळीच न रागवता ते त्यांना समजावून सागतात की, ''सुधारकांचे प्रयत्न केवळ त्यांच्या सुखापुरते असते तर तुम्हापासून वेगळे होण्यास तुमच्या ग्रामण्याची त्यांनी वाटच पाहिली नसती. परंतु समाजसुधारणा ही त्यांस स्वतःच्या सोईहून अधिक महत्त्वाची वाटत असल्यामुळे तुम्हांस सोडल्यावर त्यांनी सुधारणा करावी तरी कोणाची? ... तुम्ही त्यांचा कितीही द्वेष करा, त्यांस कितीही झिटकारा, पण फिरून ते येऊन तुम्हास चिकटलेले आहेत असे तुमच्या दृष्टीस पडेल. ... त्यांच्या तुम्हांवरील भक्तीस पाहिजे तर विरोधभक्ति म्हणा. पण तिचे तुमच्याने सत्त्वहरण होणार नाही; व सरतेशेवटी आपल्या प्रभावाने 'मन सुधारकी रंगले अवघे जन सुधारक झाले' असे करून टाकल्याशिवाय राहणार ती नाही.''[२३]

म. गं. नातू
दि. य. देशपांडे

---

२३. 'इति श्रीचहाग्रामण्यप्रकरणं समाप्तम्'

[illegible]

[illegible]

सुधारकाचें जाहीर पत्रक

ज्यांना हिंदुस्थानचा इतिहास यत्किंचित अवगत असेल, त्यांना येथें इंग्रजांचा अंमल कायम होण्यापूर्वी आमची स्थिती कशी होती, व तो झाल्यापासून तीत किती बदल झाला आहे आणि पुढे किती होण्यासारखा आहे, हे स्वल्प विचाराअंती समजण्यासारखें आहे. मोंगलांच्या तीन-चारशे वर्षांच्या, किंवा मराठ्यांच्या दीडदोनशे वर्षांच्या अमलांत; ज्या राज्यविषयक, समाजविषयक, नीतिविषयक व शास्त्रविषयक विचारांचा, लोकांत आविर्भाव झाला नाही, ते विचार इंग्रज लोकांचे राज्य सर्वत्र स्थापित झाल्यापासून पुरती शंभर वर्षे झाली नाहींत तोंच चोहोकडे पसरून जाऊन, हिंदुस्थानच्या स्थितीस्थापकताप्रिय लोकांस एक प्रकारची अज्ञातपूर्व अशी जागृतावस्था झाल्यासारखी दिसत आहे, व आजमितीस हिचा अनुभव येथील लोकसंख्येच्या मानाने तिच्या अगदी स्वल्प अंशास होत आहे, हे जरी खरे आहे, तरी थोड्या वर्षात, विद्याप्रसाराचा क्रम प्रस्तुतप्रमाणें अव्याहत चालल्यास, हा अनुभव बहुतेक लोकांस होऊ लागेल हे उघड आहे. तेव्हा आता असा प्रश्न उत्पन्न होतो की, ह्या नूतन जागृदवस्थेचा परिणाम होणार तरी काय? ज्यांची चालू घटकेवर दृष्टी असेल व ज्यांना मागे पुढे पाहण्याची दगदग नको असेल, त्याना हा प्रश्न सुटण्याचा संभव नाही, आणि तो त्यास कोणी सुचविला तरी ते त्यास उत्तर देण्याच्या कटकटीत पडणार नाहीत. पण ज्यांना राष्ट्रास अधोगती, दुर्गती किंवा उन्नती कशी येते, हे थोडेंबहुत समजलें आहे, त्यांना अशा प्रकारचें औदासीन्य धरतां येत नाही. मुसलमान लोक आम्हांहून म्हणण्यासारखे सुधारलेले नव्हते, म्हणून त्यांच्या अमलांत आम्ही अगदीच नष्ट झालों नाही. पण सध्या ज्या लोकांचा अंमल आपणांवर आहे, त्यांच्या-आमच्या सुधारणेंत बहुतेक बाबतींत जमीनअस्मानाचे अंतर असल्यामुळें, त्यांच्यांतील अनुकरण करण्यासारख्या गोष्टी आम्ही लवकर उचलल्या नाहींत, व जें जुनें व घरचें तें सारें चांगलें, हा हेका धरून बसलों तर, उत्तर अमेरिकेंतील इंडिअन लोकांप्रमाणें आमची दशा होईल. हा भयंकर प्रसंग आपणांवर न यावा व भारतीय आर्यत्व अगदी नष्ट न व्हावें. हें इष्ट असेल तर जपानचीनाप्रमाणें आम्ही आपले डोळे नीट उघडूं लागून, व जीवनार्थ कलहांत आमचा निभाव कसा लागेल हे

शोधून काढून, तदनुसार वर्तन करण्यास प्रवृत्त झाले पाहिजें; आणि हा स्थूल विचार पुढे ठेवून तदनुरोधानें साऱ्या समंजस लोकांचे लिहिणे व बोलणे चाललें पाहिजे. पण अलीकडे याहून बराच उलट प्रकार कित्येक शिकलेल्या लोकांच्या भाषणांत व लेखांत दिसू लागला आहे. हा प्रकार दिवसेंदिवस अधिकाधिक फैलावत जाऊ न देण्यास व आपले पाऊल पुढें पडण्यास्तव राजकीय, सामाजिक, नैतिक व शास्त्रीय विषयांत आम्हांस कोणत्या प्रकारचें वळण लावून घेतले पाहिजे; हे लोकांच्या नजरेस वारंवार आणण्यास प्रस्तुत स्थितीत वर्तमानपत्रासारखे सोईचें दुसरें साधन नाही, असे वाटल्यावरून 'सुधारक' नावांचे नवीन साप्ताहिक वर्तमानपत्र आम्ही सोमवार ता. १५ ऑक्टोबरपासून काढणार आहोत.

या पत्राच्या नामार्थाला शोभतील असेच लेख यांत येतील, हे सांगायला पाहिजे असें नाही. वर सांगितलेला हेतू मनात धरून कोणत्याही व्यक्तीस किंवा वर्गास विनाकारण न दुखविता ज्या मार्गांनें आपलें पाऊल पुढें पडून आपणांस सुदिन येईल, तो मार्ग शुद्ध अंत:करणानें दाखवायचा असा आमचा निश्चय आहे.

एकदा सर्वच पत्र मराठींत काढावें असें वाटलें होतें; पण तसें केलें असता ज्या गोष्टीविषयी पत्राचा असेल तसा अभिप्राय सरकारपुढे ताबडतोब येणें अवश्य असतें; त्या गोष्टीविषयीं तो तसा व तितक्या जलदीनें येऊं शकत नाही, असें कित्येक मित्रांनी सुचविल्यावरून **सुधारकांत** एक इंग्रजी आर्टिकल व दोन-तीन लहानसे स्फुट लेख घालण्याचा विचार केला आहे. इंग्रजी मजकुरानंतर फार जपून लिहिलेलें असें निदान एक मराठी आर्टिकल, व त्यानंतर चालू विषयांवर आर्टिकलवजा बरेच स्फुट लेख येतील. पत्रांतील वाचनांगाचा अर्धा भाग बहुश: अशा प्रकारचा असेल. बाकी राहिलेल्या भागांत सारी मौज! थोड्याशा जागेंत पुण्याची हालहवाल, कामदारांच्या नेमणुका, बदल्या, बडतर्फा, वगैरे झाल्यावर पुढें इंग्रजी व मराठी पत्रांतून फार परिश्रमानें काढलेलें अतिशय निवडक वर्तमानसार येत जाईल. हें झाल्यावर कधी मजेदार विनोद, कधी बोधपर, सुरस गोष्ट, कधी एखाद्या विख्यात पुरुषांचे मनोवेधक चरित्र, कधी अत्यंत उपयुक्त व मनोरंजक शास्त्रीय माहिती, कधी आश्चर्यजनक वस्तूंची हकीकत, व कधी अद्‌भुत गोष्टींची वर्णनें- ह्याप्रमाणें स्थलावकाशानुरूप घालवेल तितका मजकूर घालून, **सुधारकास** जितकी उपयुक्तता व मनोरंजकता आणिता येईल तितकी आणण्याचा आमचा हेतू आहे. शिवाय कित्येक विद्वान व नावाजलेल्या गृहस्थांनी या पत्रास मधून मधून लेखनद्वारें मदत करण्याचें वचन दिलें आहे. ठिकठिकाणाहून वेळोवेळी बातमीचीं पत्रे आणण्याचा आमचा विचार आहे. सुशिक्षित स्त्रियांना स्त्रीशिक्षणादि विषयांवर प्रकट करितां यावे, व आमच्या वाचकंसही ते वाचण्यास मिळावे;

म्हणून स्त्रीलिखित लेखांकरिता स्वतंत्र स्थल राखून ठेवण्याची आम्ही योजना केली आहे. सारांश, हे पत्र हाती धरलें असता शेवटपर्यंत वाचल्याशिवाय तें खाली ठेवण्याची बुद्धि वाचकांस होऊं नये, असे स्वरूप त्याला आणावें अशी आमची इच्छा आहे. सध्या यापलीकडे लिहीत सुटण्यात अर्थ नाही.

सर्व गोष्टीचा विचार करून पत्राचा साचा तूर्त **केसरीएवढा** धरला आहे, व किंमत दोन रुपये ठेविली आहे. बाहेरच्या वर्गणीदारांस किंमतीशिवाय १३ आणे टपालहंशील पडेल. ज्यांना घेण्याची इच्छा असेल त्यांनी आपली वर्गणी म्यानेजर, आर्यविजय छापखाना, बुधवार पेठ, पुणे; या पत्त्यावर पाठवावी. ज्यांना हे पत्र घ्यावेंसे वाटत असेल, पण ते बाहेर पडल्याशिवाय वर्गणी भरण्याचे धाडस होत नसेल, त्यांनी वरील पत्त्यावर सध्या आपली नावें कळविली तरी बस होणार आहे.

पुणे, तारीख १ ऑगस्ट १८८८.

गोपाळ गणेश आगरकर, एम. ए.
गोपाळ कृष्ण गोखले, बी. ए.

A New Anglo-Vernacular Weekly Journal to be called

THE SUDHARAK or REFORMER

Shear physical force, as an instrument of political, social or moral conversion, has ceased to exist, and the days of intellectual persuasion have come. Those therefore that want to contribute what little they can to a right understanding of the many problems lying before the Indian public, need offer no apology for availing themselves of one of the best means of intellectually reaching the people-the Newspaper.

The **Sudharak** or Reformer, a weekly Anglo-vernacular paper, will make its first appearance on Monday the 15th of October 1888. The very name of the journal sufficiently indicates its nature and its purpose. Even countries like China-so well known for ultra-conservative tendencies- have begun to realize the fact that if they want to hold their own in the universal struggle for survival, they must adopt the essenital principles, as also the methods of work, of European Civilization. After so many years of liberal English education, this sense should have been more awakened in us than in any other Asiatic people. But unfortunately there has, of

late, become visible a tendency not only to conceal or cover our national defects, but also to misinterpret and misrepresent even what is best in Western Civilization. It is to combat this tendency, to point out our faults, and to impress upon the minds of our countrymen the idea that in a modified adoption of many of the essential elements of Western Civilization lies the real salvationn of our country, that we are going to start our paper. Many learned and distinguished friends have not only expressed their sympathy with our object, but also promised occasional contributions.

The **Sudharak** will, for the present, be of the size of the **Kesari**. It will contain one English article written with great care and thought, and two or three notes in English on current topics. The rest of the matter will be given in Marathi. The annual price will be Rs. 2, or Rs. 2.13 annas including postage.

Poona,	Gopal Ganesh Agarkar, M. A.
1 st August 1888.	Gopal Krishna Gokhale, B. A.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

सुधारक काढण्याचा हेतु

पर्वत, नद्या, सरोवरें, झाडें, पाणी, रानें, समुद्रकिनारे, हवा, खाणीं, फुलें व जनावरें ज्यांत स्पष्टपणे दाखविलीं आहेत असा एक, व ज्यांत पारधी व पारधीचीं हत्यारें, शेतकरी व शेतकीची अवजारे, बाजार व त्यातील कोट्यवधि कृत्रिम जिन्नस, न्यायसभा व त्यांत येणारे शेकडों लोक, राजसभा व त्यांत बसणारे-उठणारे सचिव, मंत्री वगैरे प्रमुख पुरुष, भव्य मंदिरें व उत्तम देवालयें, बागा व शेतें, झोपड्या व गोठे, अनेक पदवीचे व अनेक धंदे करणारे पुरुष व स्त्रिया आणि त्यांची अर्भके, ही ज्यांत व्यवस्थित रीतीनें काढली आहेत असा एक, मिळून प्रत्येक खंडातील ठळक देशाचे दोन दोन चित्रपट तयार करवून ते पुढें ठेवले, आणि त्याकडे नि:पक्षपातबुद्धीनें काही वेळ पहात बसले, तर विचारी पुरुषांच्या मनावर काय परिणाम होतील बरें? प्रथम सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचे अवलोकन केले तर त्यावरून असें दिसून येईल की, विस्तृतता, बहुविधता, मनोरमता, अद्भुतता, उपयुक्तता व विपुलता यांपैकी कोणत्याही गुणांत या भरतखंडाचा त्रिकोणाकृति पट ग्रीस, इटली, ऐर्लंड, युनायडेट स्टेट्स्, ऑस्ट्रेलिया यांपैकी पाहिले त्या रमणीय देशाच्या चित्रपटापाशीं तुलना करण्याच्या हेतूनें मांडिला तर असें म्हणावें लागेल कीं, आमच्या वांट्यास सर्वोत्तम न म्हटला तरी उत्तमांपैकी एक देश आला आहे. सह्य, विंध्य व कैलास यांसारख्या प्रचंड पर्वतांनी ज्यांची तटबंदी झाली आहे; सिंधु, भागीरथी, नर्मदा, तापी, कृष्णा इत्यादि नदांनी व नद्यांनी ज्यांतील क्षेत्रे सिंचण्याचे व उतारूंची व व्यापाराचीं गलबतें व आगबोटी वाहण्याचे काम पत्करले आहे; हिंदी महासागरानें ज्याला रशना होऊन शेकडो बंदरें करून दिलीं आहेत; गुजराथ, माळवा, बंगाल, वऱ्हाड, खानदेश इत्यादि सुपीक प्रांतांनी ज्यास हवे इतके अन्नवस्त्र पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे; ज्याच्या उदरांत कोठें ना कोठें तरी हवा तो खनिज पदार्थ पाहिजे तितका सांपडण्यास पंचाईत पडत नाही; ज्याच्या रानांत पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या वनस्पति वाढत आहेत, व सर्व प्रकारचे पशुपक्षी संचार करीत आहेत; ज्यांत कोठें उष्ण कटिबंधातली, कोठें शीत कटिबधातली व कोठें समशीतोष्ण कटिबंधातली हवा खेळत आहे; सारांश, ज्यांतील कित्येक अत्यंत रमणीय प्रदेशांस 'अमरभूमि',

'नंदनवन', 'इंद्रभुवन','जगदुद्यान' अशा संज्ञा प्राप्त झाल्या आहेत, असा हा आमचा हिंदुस्थान देश आधिभौतिक संपत्तीत कोणत्याही देशास हार जाईल, किंवा यांतील सृष्ट पदार्थांचा चित्रपट दुसऱ्या कोणत्याही देशाच्या चित्रपटापेक्षां कमी मनोरम ठरेल असें वाटत नाहीं.

याप्रमाणें सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचे अवलोकन करून पूर्ण समाधान पावल्यावर दुसऱ्या पटांकडे वळल्याबरोबर चित्तवृत्तींत केवढा बदल होतो पहा! या दुसऱ्या ऐतिहासिक चित्रपटाच्या केवळ लांबीचाच विचार केला तर कदाचित आमच्या पटाची लांबी सर्वांत अधिक भरण्याचा संभव आहे. वैदिक कालापासून आजतारखेपर्यंत आम्हांस जितकी शतकें मोजता येणार आहेत, तितकी बहुश: दुसऱ्या कोणत्याही देशास मोजता येणार नाहीत. या विस्तीर्ण कालावधीत अनेक राष्ट्रांची उत्पत्ति, अभिवृद्धि व लय होऊन ती प्रस्तुत नामशेष मात्र राहिली आहेत; व काहींचा ऱ्हास झाला तरी त्यांनीं संपादिलेल्या विद्यांची व कलांची रूपांतरे कोठकोठे अद्यापि दृष्टीस पडत असल्यामुळें ती त्यांच्या गत वैभवाची साक्ष देत आहेत. ज्याप्रमाणें काही वनस्पति व कीटक परिणतावस्था प्राप्त झाली असतां, आपले तेज नूतनोत्पन्न अंकुरांत ठेऊन आपण पंचत्वाप्रत पावतात, त्याप्रमाणें अमेरिकेंतील व आशियांतील आणि विशेषत: युरोपातील पुष्कळ राष्ट्रांची स्थिति झाली. ग्रीक विद्या आणि कला रोमन लोकांच्या हाती पडून ग्रीस देशाचा अंत झाला. रोमन लोकांची सुधारणा अर्वाचीन युरोपीन राष्ट्रांकडे येऊन रोमन लोक नष्ट झाले. आशिया व अमेरिका यांतील जुन्या राष्ट्रांचीही काही अंशी अशीच स्थिती झाली, व त्यांच्या सुधारणेच्या कांही खुणा अद्यापि कोठेंकोठें दृष्टीस पडतात. चीन व हिंदुस्थान हे दोन देश मात्र खूप जुने असून काळाच्या जबड्यांतून वांचले आहेत, व कदाचित् आणखीही अनेक शतकें वांचण्याचा संभव आहे. पण अशा प्रकारच्या केवळ वांचण्यांत विशेष पुरुषार्थ आहे की काय; हा मोठा विचारणीय प्रश्न आहे. अशा प्रकारचें केवळ वांचणे म्हणजे बऱ्याच अंशी योगनिद्रेंत प्राण धरून राहिलेल्या योग्याच्या जगण्यासारखे होय. हिंदुस्थानच्या अस्तित्वाशी तोलून पहातां, जुन्या ग्रीक व रोमन लोकांचे अस्तित्व काहींच नाहीं असें म्हणता येईल. पण तेवढ्या स्वल्प काळांत त्यांनी केवढाले पराक्रम केले व केवढी अमर कीर्ति संपादिली! भाषापरिज्ञानप्रवीणांनी अलीकडे असा सिद्धांत केला आहे की, हिंदू लोक, ग्रीक लोक व रोमन लोक, व जर्मन शाखेपासून निघालेले अर्वाचीन युरोपांतील इंग्लिश, डच वगैरे लोक एकाच पूर्वजांपासून झालेले असावे. या सर्वांस ते आर्यकुलोद्भव राष्ट्रें म्हणतात. हें खरें असेल तर काय सिद्ध होतें की, एकाच झाडाचें बी चार प्रकारच्या जमिनींत पडून त्यापासून चार प्रकारच्या वृक्षांचा

उद्भव व्हावा, व प्रत्येकाला निराळ्या तऱ्हेची वाढ लागून त्यांचा शेवटही निराळ्या तऱ्हेचा व्हावा, त्याप्रमाणे एकाच आर्यकुलापासून उत्पन्न झालेले आम्ही सर्व खरे, पण स्थानांतराप्रमाणे आम्हा सर्वांचा इतिहास निराळ्या प्रकारचा झाला! आर्य लोकांची युरोपांत जी शाखा गेली, तीपासून ग्रीस देशांत एक उत्तम राष्ट्र उद्भवले. त्याचीच एक मुळी इताली देशांत जाऊन तीपासून जो नवीन अंकुर उत्पन्न झाला, त्याने मातृवृक्षास नाहीसे करून आपला विस्तार बराच दूरवर नेला. पुढे त्यालाही वार्धक्यावस्था येऊन त्याचा ऱ्हास होण्याच्या सुमारास त्यापासून बरीच नवीन रोपें अस्तित्वात आली. ती ही अर्वाचीन युरोपांतील राष्ट्रें होत.

इकडे हिंदुस्थानांत आर्यलोकांची जी शाखा आली, तिचा निराळ्याच तऱ्हेचा इतिहास झाला. तिकडे जुन्या वृक्षाने नव्या अंकुरात आपले गुण ठेऊन आपण नाहीसे व्हावे, पुनः त्या नवीन अंकुरानें तसेंच करावे व प्रत्येक नवीन राष्ट्रोद्भव पहिल्यापेक्षा बहुतेक गुणांत वरिष्ठ व्हावा, असा प्रकार झाला. इकडे अशा प्रकारची राष्ट्रोद्भवपरंपरा अस्तित्वात आली नाही. मूळ आर्यशाखा येथे येऊन तिच्यापासून जे झाड येथे लागलें, तेंच आजमितीपर्यंत अस्तित्वांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. ग्रीक, रोमन, सिथियन, तार्तर, मोगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या, त्यांमुळे त्याला बराच त्रास झाला. कधी त्याच्या कांही फांद्या मोडून पडल्या; कधीं ते मुळापासून उपटून पडत आहे की काय असें वाटलें; पण कर्मधर्मसंयोगानें युरोपांतील ग्रीक व रोमन शाखांवर आणि इकडील इराणी शाखेवर जो प्रसंग गुदरला, तो या भारतीय आर्यशाखेवर गुदरला नाही ! त्यामुळें हें जरठ झाड कसें तरी अजून उभें आहे! पण त्यांत काहीं त्राण उरलेलें नाही ! ते आंतून अगदी शुष्क होत आलें आहे, व त्यांचे खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व यापासून नवीन शाखांचा उद्भव होऊन यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी द्यावयाचे ! असें केलें तरच त्यांचे पूर्वस्वरूप पूर्ण नष्ट न होतां, त्यापासून नूतनशाखावृत वृक्ष अस्तित्वात येईल; पण तसें न केलें तर त्यावर प्रस्तुतकालीं चोहोकडून जे तीव्र आघात होत आहेत, त्याखाली तें अगदी जेर होऊन अखेरीस जमिनीवर उलथून पडेल.

हिंदुस्थानचा पूर्व इतिहास व सांप्रत स्थिती सुधारकाच्या वाचकांच्या लक्षांत थोडक्यात यावी, यासाठी वर ज्या रूपकांचे साहाय्य घेतलें आहे, त्यांपासून लेखकाचा भाव त्यांच्या मनात उतरला असेल अशी त्याची आशा आहे. त्याचें स्पष्ट म्हणणें असें आहे कीं, हिंदू लोक रानटी अवस्थेंतून निघाल्यावर काही

शतकेपर्यंत राज्य, धर्म, नीति वगैरे कांही शास्त्रें, वेदांत, न्याय, गणितादि कांही विद्या व काव्य, गीत, नर्तन, वादनादि कांही कला-यांत त्याचें पाऊल बरेंच पुढें पडल्यावर त्यांच्या सुधारणेची वाढ खुंटली, व तेव्हापासून इंग्रजी होईपर्यंत ते कसें तरी राष्ट्रत्व संभाळून राहिले! यामुळें त्यांचा इतिहासपट इतर देशांच्या इतिहासपटांहून फारच कमी मनोवेधक झाला आहे. आमची गृहपद्धती, आमची राज्यपद्धति, आमची शास्त्रे, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीति-सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघाताने दगडाप्रमाणे कठिण झालेल्या लांकडासारखें किंवा हाडकासारखें शेकडो वर्षे होऊन राहिलें, असे म्हणण्यास हरकत नाही.

ही आमची शिलावस्था आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे. आजमितीस या शिक्षणाच्या टाकीचे आघात फारच थोड्यावर घडत आहेत. पण दिवसेंदिवस ते अधिकाधिकांवर घडूं लागतील असा अजमास दिसत आहे. ज्यांना या टांकीपासून बराच संस्कार झाला आहे, ते समुदायापासून अगदी विभक्त झाल्यासारखे होऊन उभयतांत सांप्रत काली एका प्रकारचे वैषम्य उत्पन्न झालें आहे. या वैषम्यास विशेष कारण कोण होत आहेत हें येथें सांगण्याची गरज नाहीं. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं, मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडता, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आमच्या राजकर्त्यांकडून येत आहेत म्हणून त्या आम्ही स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाही. त्यांचे अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे, असें जे आम्ही म्हणतो तें अशासाठी की त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेंच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे. म्हणून लोकांस लयास जावयांसे नसेल त्यांनी त्यांचे अवलंबन केलेंच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाही. समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढी बंधनें अपरिहार्य आहेत तेवढी कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका द्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे, व हें ज्याच्या अंत:करणांत बिंबले असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हे उघड आहे, ही दोषस्थलें वारंवार लोकांच्या नजरेस आणावी, ती दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण

करण्यासारखें काय आहे, ते पुन: पुन: दाखवावें, यास्तव हे **सुधारक** पत्र काढले आहे. कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाविषयी जे लोकमत असेल ते पुढें आणणें हेंच काय तें पत्रकर्त्यांचे कर्तव्य असे जे मानीत असतील, ते तसे खुशाल मानोत. लोकमत अमुक टप्प्यापर्यंत येऊन पोंचलें आहे, सबब कोणत्याही व्यक्तीनें किंवा सरकारनें यापुढें जाऊ नये असें म्हणणें, म्हणजे झाली आहे तेवढी सुधारणा बस आहे, पुढे जाण्याची गरज नाही, असेंच म्हणण्यासारखें होय. व्यक्तीने किंवा सरकारने साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें किंवा कायदे करणें हे सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगी लोकांच्या गाढ अज्ञानामुळे किंवा दुराग्रहामुळें व्यक्तीस लोकांची पर्वा न करिता स्वतंत्रपणे वर्तावे लागते व सरकारास लोकमताविरुद्ध कायदे करावे लागतात. बारकाईचा विचार केला तर असें दिसून येईल की, प्रजासत्ताक राज्यांत सुद्धां अनेकदां बहुमताविरुद्ध अधिकृत लोकांचे म्हणजे सरकारचें वर्तन होत असतें. तथापि सामान्यत: सरकारचें वर्तन लोकमतास धरून असेल तितकें बरें. पण जे लोक हा सिद्धांत कबूल करतात; ते लोकमत दिवसेंदिवस सुधारत चाललें आहे असें समजतात. तेव्हा आतां असा प्रश्न उत्पन्न होतो की, लोकमताची सुधारणा व्हावी तरी कशी? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढे जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा? लोकाग्रणींनी हे काम पत्करलें नाही तर तें कोणी पत्करावयाचें? जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाही; इतकेंच नाही, तर त्याची चालू स्थितीसुद्धां कायम न राहतां उलट त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल, म्हणून कोणी तरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें, व समाजांतील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढे आणण्याचें, अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारे धैर्य ज्या समाजांतील कांही व्यक्तींच्या सुद्धां अंगी नसेल त्या समाजांनी वर डोकें काढण्याची आशा कधींही करूं नये.

हे विचार बरोबर असतील; तर त्यांवरून हें दिसून येईल की, जे कोणी कोणत्याही मिषानें किंवा रूपानें लोकांपुढे लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील त्यांनी लोकांची मर्जी संपादण्यासाठी, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठी, किंवा परोपकारांचे ढोंग करून स्वहित साधण्यासाठी त्यांच्या दोषांचे किंवा दुराग्रहांचे संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी त्यांस सुमार्ग न दाखवितां केव्हा एखाद्या खड्ड्यात नेऊन घालतील हे सांगवत नाही. प्रस्तुत स्थितींत अशा लोकग्रणींचे वर्तन आमच्या देशास फारच विघातक

होणार आहे. ज्यांना समाजाच्या घटनेची, अभिवृद्धीची व लयाची कारणें ठाऊक नाहीत; कदाचित पितृतर्पणापुढें ज्यांचे ज्ञान गेलेलें नाही; विषयोपभोगाशिवाय अन्य व्यवसाय ज्यांना अवगत नाही; वरिष्ठाची प्रशंसा आणि कनिष्ठाशी गर्वोक्ति यांहून अन्य प्रकारचे भाषण ज्यांस फारसे माहीत नाही; अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनी अहर्निश परिश्रम करून पदार्थधर्माचे केवढें ज्ञान संपादिले आहे, विपद्विनाशक व सुखवर्धक किती साधनें शोधून काढली आहेत, व राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत, हें ज्यांना ऐकून सुद्धां ठाऊक नाही, अशा गृहस्थांनी आम्ही हिंदु लोक नेहमी परतंत्रच असलो पाहिजे; कांही केलें तरी अधिक राज्याधिकार उपभोगण्याची पात्रता आमच्या अंगी यावयाची नाही; राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्ही कधी स्वप्नांत सुद्धां आणू नये. स्थानिक स्वराज्य, राष्ट्रीय परिषद, कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद, स्वसतोषाने शिपाईगिरी करण्याची इच्छा धरणें-या व या तऱ्हेच्या दुसऱ्या उठाठेवीत आम्ही पडणें हे शुद्ध मूर्खपण होय, अशा प्रकारचें प्रतिपादन करणाऱ्या लोकांस लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रू म्हटले असता वावगें होणार नाही. तसेंच जेवढी जुनी शास्त्रें तेवढी सारी ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणे हे घोर पातक, अशी ज्याची समजूत; जगत्कारणाच्या तोंडातून, हातांतून, मांडीतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयी कल्पना; पंचामृतानें व धूपादीपाने केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा विशेष प्रशस्त मार्ग नाहीं, असे ज्यांचे धर्मविचार; आहे ही सामाजिक स्थिती अत्युत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेही अवकाश नाही; सध्या येथें स्त्रियांचे पुरुषांशी, मुलांचे आईबापांशी, जे संबंध चालत आहेत तेच उत्तम आहेत व अनत काल तेच चालले पाहिजेत; ज्ञान संपादणे हे पुरुषाचे कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियाचे कर्तव्य; पुरुष स्वामी, स्त्री दासी; स्वातंत्र्य पुरुषांकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे, विवाहाशिवाय स्त्रीस गति नाही, व गृहाशिवाय तिला विश्व नाही; वैधव्य हे तिचें महाव्रत व ज्ञानसपादन हा तिचा मोठा दुर्गुण; अशा प्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजविषयक कल्पना -असे लोकाग्रणी काय कामाचे? अशांच्या उपदेशाने व उदाहरणानें आम्हांस चांगले वळण कसें लागणार व इतर सुधारलेल्या राष्ट्रांस होत असणाऱ्या सुखाचा लाभ आम्हांस कशानें होणार? निदान **सुधारकास** तरी असले लोकाग्रणी व त्यांचे वर्तन मान्य नाहीं. ज्या तत्त्वाचे अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चालली आहेत त्या तत्त्वाचा स्वीकार करण्यास आम्ही आनंदानें तयार झालें पाहिजे. ती तत्त्वें हा **सुधारक** महाराष्ट्र लोकांपुढे वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज ज्याचा जारीने अंमल चालत आहे त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार

असल्यामुळें, फार त्रास पडणार आहे. पण त्याची तो पर्वा करीत नाही; कारण ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीने विचार केला असतां असे दिसून येईल की, बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षा अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय. कोट्यवधी अक्षरशत्रु व विचारशून्य मनुष्यांनी आपल्या अडाणी समजुतीप्रमाणे चांगलें म्हटलें किंवा वाईट म्हटले; अज्ञान व धर्मभोळ्या लोकाच्या अचरट धर्मकल्पनाची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून, त्यापासून निघेल तेवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण उदरंभरू हजारो टवाळानी शिव्यांचा वर्षाव केला किंवा छी: थू: करण्याचा प्रयत्न केला; शेकडो अविचारी व हेकड लोकांनी नाके मुरडली किंवा तिरस्कार केला-सारांश ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचे रूप बिलकूल समजले नाहीं किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हे ठाऊक नाही; अशांच्या प्रर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पडल्या तरी-जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणे यांतच ज्यांचे समाधान आहे- अशाने वरच्यासारख्या क्षुद्र लोकाच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावे व सांगावें हेच त्यास उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचे हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे.

*

आमचें काय होणार ?

राज्य, धर्म, व्यवहार इत्यादि सामाजिक गोष्टींच्या संबंधानें सध्या या देशांत ज्या पद्धति, जे पंथ, आणि जे आचार रूढ आहेत त्यांपैकी काही हळू हळू नाहीतसे व्हावे, काहींत थोडाबहुत फेरफार व्हावा, व कांही अगदी नवीन अस्तित्वांत यावे असे अलीकडे पुष्कळांस वाटूं लागलें आहे, आणि त्यांचा स्थलावकाशाप्रमाणे **सुधारकासारख्या** पत्रांत अवश्य विचार झाला पाहिजे, व होईल. पण तो करूं लागण्यापूर्वी एक गोष्ट करणें फार जरूर आहे. ती ही की, सामाजिक सुधारणेच्या ज्या तत्त्वांच्या अनुरोधानें आम्ही सध्या येथें रूढ असलेल्या राजकीय, धार्मिक किंवा व्यावहारिक संस्थांत फेरफार करावा, अथवा त्यापैकी कांही मुळींच नाहीशा करून त्यांच्या ठिकाणी नवीनांची स्थापना करावी, असें म्हणणार, ती तत्त्वें कोणती हें अगदी थोडक्यांत कां होईना, पण प्रथम सांगितलें पाहिजे. त्याशिवाय पुढील लेख नीट समजणार नाहींत. तारवास जसें सुकाणूं, समुद्रपर्यटण करणाऱ्यांस जसें दिङ्‌निर्णायक यंत्र, सुवर्णकारास जशी निकषशिला, अंधास जशी यष्टी, व इमारतीस जसा पाया तशी सामाजिक रचनेस, व्यवस्थेस व स्थित्यंतरास हीं तत्त्वें आहेत. ऐरिश लोकांस स्वतंत्र पार्लमेंट सभा स्थापूं देण्यासाठी मि. ग्लाडस्टन याने ब्रिटिश पार्लमेंटात आणिलेलें बिल बऱ्याच प्रतिनिधीस नापसंत झाले, तेव्हां तो असे म्हणू लागला की ''या माझ्या बिलांतील पुष्कळ कलमें किंवा सारी कलमे जरी तुम्हांस नापसंत झालीं तरी त्याबद्दल माझें काही एक म्हणणें नाही. त्यांच्या जागीं मला किंवा तुम्हाला दुसरी घालता येतील. माझी सध्या तुमच्यापुढें एवढीच प्रार्थना आहे कीं, ज्या तत्त्वावर हे बिल रचिलें आहे त्या तत्त्वास तुम्ही आपली संमति द्या.'' तात्पर्य काय की, कोणत्याही कामास हात घालण्यापूर्वी त्याचें पर्यवसान कोठें आहे, हे अगोदर स्पष्टपणें पाहिले पाहिजे. आपणांस अमुक गोष्ट अमुक वळणावर न्यावयाची आहे, किंवा नेली पाहिजे, असे एकदां कळून आलें म्हणजे त्या वळणावर ती गोष्ट नेण्याचे बरे वाईट उपाय ठरविण्यांत म्हणण्यासारखा त्रास पडत नाही. आमची तर अशी समजूत आहे कीं, आज ज्या कित्येक सामाजिक गोष्टींविषयी आमच्या लोकांत विशेष मतांतर दिसत आहे, ते अस्तित्वात येण्यास पुष्कळ अंशी सामाजिक सुधारणेच्या मूल

तत्त्वांचे अपूर्ण आकलनच कारण होत आहे. कोणत्याही प्रयत्नानें जर त्यांस त्यांचे पूर्ण आकलन होईल तर सामाजिक सुधारणा अडथळा न होता मोठ्या झपाट्याने होऊं लागेल. रोगाचे निदान झाल्यावर औषधांची योजना करणे, अर्थ समजल्यावर त्याचें स्पष्टीकरण करणें, व उत्तर समजल्यावर रीति बसविणें फार कठीण जात नाही!

तेव्हां आतां 'आमचे काय होणार?' किंवा 'आमची भावी स्थिती काय होणार?' या प्रश्नास उत्तर देण्यापूर्वी एकंदर मनुष्यसुधारणेचा कल कोणीकडे आहे हे पाहिले पाहिजे. तर मग आतां आम्ही या छोटेखानी पत्राच्या चार दोन कालमांत मानवी सुधारणेचा ओघ कोणीकडे आहे हे ठरविणार ! **मिल्ल, कोंट, स्पेन्सर** यांसारख्या प्रचंड तत्त्ववेत्यांस ज्या गोष्टीचा निर्णय पांच पांचशे पानांच्या स्वतंत्र ग्रंथात बरोबर करतां आला नाही, तो हे फिनिक्सवृत्ति **सुधारकबोवा** एक दोन आर्टिकलांत करणार ! अशा प्रकारचा उपहास कोणी केल्यास त्यास आम्ही पात्र नाही असें म्हणता येणार नाही. तथापि ज्याप्रमाणें मुंगीपासून हत्तीपर्यंत जीवनकोटींतल्या प्रत्येक प्राण्यास जीवनरक्षणासाठी कसल्या तरी प्रकारच्या अन्नाची अवश्यकता आहे, आणि म्हणून ज्याप्रमाणें त्यानें तें संपादण्याचा आणि सेवन करण्याचा प्रयत्न करणें वास्तविक रीत्या उपहासास्पद नाही, त्याप्रमाणे थोडाबहुत विचार करून, अनुकूलता असल्यास, तो आपल्या बांधवांपुढें मांडणे हें प्रत्येक सुशिक्षित मनुष्यांचे कर्तव्य होय, व तो तसे करूं लागेल तर त्यांत उपहास करण्यासारखे काही नाही. कवीनें म्हटले आहे,

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षी।
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी।।

शिवाय दुसरी आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही की, कोणत्याही बिकट कूटांचे उत्तर काढणें व काढलेलें उत्तर समजून घेऊन दुसऱ्यास थोडक्यांत सांगणें, हा दोहोत फार अंतर आहे. कमीत कमी शेंकडा नव्याण्णव लेखकांचा व्यवसाय दुसऱ्या प्रकारचा असतो, आणि **सुधारकाचा** कर्ता त्यांतच मोडतो, हें काहीं सांगायला पाहिजे असें नाही ! असो; आता मनुष्यसुधारणेच्या मुख्य तत्त्वाची कोणती दिशा आहे, हे प्रथम पहावयाचें.

या दिवसांत संध्याकाळी सात वाजण्याचे सुमारास आकाशाकडे पाहिलें असता त्यांत एक दक्षिणोत्तर पसरणारा पट्टा दृष्टीस पडेल. या पट्ट्यास आमचे लोक 'आकाशगंगा' किंवा 'स्वर्नदी' म्हणतात. इंग्लिश लोक त्याला 'क्षीरपथ' (Milky Way) म्हणतात. नग्न चक्षूनें या क्षीरपथाकडे पाहिले असता, चोहोंकडे धुके पसरलें आहे की काय असा भास होतो. पण याच धुक्यावर मोठीशी दुर्बीण

लाविली, आणि तिच्या भिंगांतून त्याकडे पाहिले म्हणजे धुके नाहीसे होऊन आकाशांतील इतर प्रदेशांत उपनेत्राच्या साहाय्याशिवाय स्पष्ट दिसणाऱ्या मोठमोठ्या तारकावृंदांप्रमाणे नवीन तारकावृंद दिसू लागतात, व त्यापलीकडे दुसरे एक धुकें दिसते! या धुक्यावर पुन: आणखी मोठी दुर्बीण लाविली असता तसाच परिणाम होतो! म्हणजे या दुसऱ्या धुक्यांत चकचकणारा नवीन तारकावृंद दिसू लागून त्यापलीकडे तिसरे धुके दिसते ! अशा रीतीनें क्षीरपथाचें अवलोकन ज्याने एकवार केले आहे तो या विश्वांतील कोणत्याही गोष्टीचा अंत आपणास स्पष्टपणे दिसून आला आहे असें म्हणण्यास धजणार नाही. तथापि कोणत्याही समंजस मनुष्यास ही गोष्ट कबूल केली पाहिजे की, ज्याला दुर्बिणीचे किंवा सूक्ष्मदर्शक यंत्राचे साहाय्य आहे, त्याला ज्या गोष्टी स्पष्ट दिसतात, त्या ज्याला त्यांचे साहाय्य नाही, त्याला दिसत नाहीत; तसेच ज्याने शास्त्राभ्यास केला आहे, ज्याने इतिहास वाचला आहे, ज्यानें जगाचा पुष्कळ अनुभव घेतला आहे, व ज्याने विचारात दीर्घ काल घालविला आहे, अशा तत्त्ववेत्त्यास मनुष्यप्रवृत्तीची दिशा जितकी नीट समजणार आहे, तितकी अशिक्षितास समजण्याचा संभव नाही. ज्याप्रमाणें अंधारात सगळ्या रंगांचा लोप होतो; त्याप्रमाणे फार दूरच्या भविष्यकालाविषयी विद्वान आणि अविद्वान यांचे सारखेच अज्ञान असते. तथापि ज्याप्रमाणे दुर्बिणवाल्यास त्या यंत्राच्या साह्यामुळे दूरस्थ तारकासमूहाविषयी दुसरे काही समजलें नाही, तरी त्याच्या अनंतत्वाविषयी खात्री होते, त्याप्रमाणे विद्यारूप दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे त्याच्या ज्ञानचक्षूस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीने न्याहाळता आली नाही, तरी तिच्या उन्नतीला सीमा नाही, येवढें पक्के दिसून येतें. अशिक्षिताची तशी खात्री होत नाही. ज्याप्रमाणे साधारण मनुष्यास आकाश जसें दिसतें तसेंच ते असेल असें वाटते, त्याप्रमाणे सामाजिक स्थित्यंतराविषयी ज्यानें म्हणण्यासारखा विचार केलेला नाही, त्याला समाजाच्या स्थितीत विशेष बदल होईल असें वाटत नाही. या विश्वातील कोणतीही सचेतन किंवा अचेतन वस्तु स्थिर नाही; प्रत्येक क्षणास प्रत्येकीत दृश्य किंवा अदृश्य फेरफार होत आहेत, असें एकदां कळून येणे फार महत्त्वाचे आहे. कारण जग सारखे बदलत चाललें आहे अशी खात्री झाल्याने विचारी मनुष्यास एवढाच विचार येतो की, ज्याअर्थी स्थित्यंतराचे रहाटगाडगें सदा फिरत रहाणार, त्याच्या गतीस कोणीही प्रत्यवाय करूं शकत नाहीं, त्याअर्थी जेणेंकरून त्याची गती आपणास सुखावह होईल असें वर्तन करणें आपल्या ताब्यांत असल्यास निदान तसें तरी करावें, म्हणजे बरें सुख मिळेल. सध्या पृथ्वीवर जे ज्ञानी पुरुष आहेत त्या सर्वांच्या अंत:करणाची अलीकडे अशी खात्री होत चालली आहे कीं, जगाची

स्थित्यंतरें अनादि व अनंत आहेत. तस्मात् आपणांस अनुकूल अशा स्थित्यंतरांस आपण सहाय्यभूत व्हावें हें आपणास योग्य आहे.

वरील सर्व लेखावरून वाचकांच्या ही गोष्ट ध्यानात येऊन चुकली असेल की मनुष्य सुधारणेचा ओघ कोणीकडे वहात आहे, हे प्रथम दाखविण्यांत आमचा इतकाच हेतु आहे की त्या ओघापुढे जशी इतर देशांची, तशी आमच्या या हिंदुस्थान देशाचीही प्रतिष्ठा बिलकुल चालणार नाही. त्यांच्या जुवास ज्याप्रमाणें इतर देशांतील लोकांनी आपले खांदे बिनतक्रार लाविले आहेत, त्याप्रमाणे आजउद्यां आम्हांसही तसें केलें पाहिजे. जर आम्ही अगदी नष्ट न झालो, तर तो प्रवाह आम्हांस जिकडे घेऊन जाईल तिकडे जाण्याचा धीर केला पाहिजे, आणि याप्रमाणे बुद्धीची जर एकवार खात्री झाली, तर पुढला मार्ग फार सोपा आहे. तेव्हा मनुष्यसुधारणेचा अनिवार्य कल कोणीकडे आहे हे दाखवूं लागण्यांत सांप्रत विषयाचा खरा आरंभ आहे. आतापर्यंत फक्त प्रस्तावना झाली.

आतां विषयप्रवेश करावयाचा. तो करताना मनुष्यसुधारणेचा अनिवार्य कल कोणाकडे आहे हे प्रथम पहावयाचें.

मनुष्यसुधारणेचा ओघ कोणीकडे वहात आहे हें थोडक्यात समजण्यास मनुष्याच्या व्यवहाराच्या मुख्य शाखांचा उगम कसा व कोठे झाला; पुढें त्यांत काय काय फेरफार होत गेले; त्यांची साप्रत स्थिती कशी आहे; व या स्थितीवरून पुढे त्यांस कोणत्या प्रकारचे स्वरूप येण्याची चिन्हें दिसत आहेत; - हे पाहिलें पाहिजे.

सुलभ रीतीने विषयाचे प्रतिपादन व आकलन होण्यासाठी मनुष्यांच्या सामान्य सामाजिक व्यवहारांचे राज्यविषयक, धर्मविषयक, व अवांतर असे तीन वर्ग कल्पून क्रमाने प्रत्येकाचा थोडाथोडा विचार करू.

पृथ्वीवरील अगदी रानटी लोकाशिवाय बाकी सर्व लोकांत कशा प्रकारची तरी राज्यव्यवस्था स्थापित होऊन 'राजा' आणि 'प्रजा', 'शास्ता' आणि 'शासित', असे दोन भेद दृष्टीस पडू लागतात. मनुष्यजातीतील व्यक्तींचे असे दोन वर्ग होणे अगदी स्वाभाविक आहे. अशा वर्गांशिवाय मनुष्यसमाज अस्तित्वातच फार वेळ राहणार नाही. रानटी देशात राजापासून प्रजेस केवढाही त्रास होत असो, ही गोष्ट निर्विवाद आहे की, तशा स्थितीत पराकाष्ठेचा क्रूर व जुलमी असा राजा जरी असला तरी त्यापासून समाजाला नुकसानाहून अधिक फायदा होतो; कारण ज्या स्थितीत साधल्यास प्रत्येक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास मारण्यास व लुटण्यास टपलेला असतो, त्या स्थितीत एकच इसम अरेराव होऊन, पाहिजे त्यास मारील व लुटील, पण तसे करण्यात बाकीच्यांची आपापसांतील मारामारी व लुटालूट

होऊ देणार नाही; तर त्या एकट्याच्या जुलुमापासून समाजास होणारी पीडा एकंदरीने अधिक हितावह होते. अशा स्थितीत व्यक्तिमात्राचा किती छळ होतो, हें पहात बसून चालावयाचे नाही. सारी दृष्टी समाजाच्या अस्तित्वावर दिली पाहिजे. कसा तरी तो चालेल तरच व्यक्तिमात्राचे हाल कमी होत जाण्याचा संभव असतो. मनुष्यासारख्या बलहीन प्राण्यास क्रूर पशूच्या व आपल्या जातीतील पशुतुल्य व्यक्तींच्या त्रासांतून सुटण्यास कसा तरी समाज करून राहणे, व आपल्याचपैकी एखाद्या बलवंताच्या छत्राचा आश्रय करणे, याहून स्वरंक्षणाचा दुसरा मार्ग नसतो. व्याघ्रसिंहादी जे सामर्थ्यवान व क्रूर हिंस्र पशू आहेत, ते एकमेकांच्या सहवासाची मुळीच पर्वा करीत नाहीत. किंबहुना एकांतवासच त्यांना विशेष प्रिय असतो. भूक लागेल तेव्हा एखाद्या सावजावर झडप घालावी, तहान लागली म्हणजे एखाद्या डबक्यांत तोंड घालावे, व या दोहोंपासून पीडा होत नसली म्हणजे एखाद्या घळींत, झाडींत, किंवा गुहेत स्वस्थ झोप घेत पडून रहावे, असा त्यांचा आयुष्यक्रम असतो! तीव्र दाढा, प्रखर नखें, आणि प्रचंड शक्ति यांच्या जिवावर त्यांना आपल्या जातभाईची किंवा दुसऱ्या कोणत्याही प्राण्यांची मैत्री करण्याची इच्छाच होत नाही! कळप करणें, समाज करणें, एके ठिकाणी रहाणे, एकमेकांस मदत करणें, शत्रूवर साऱ्यानी जमून जाणें, किंवा त्याचा हल्ला आला असतां एका जुटीने वागून स्वसंरक्षण करणें- हीं सारी लचांडे बलहीन किंवा बल असून संरक्षणाचे कोणतेंही साधन नाहीं अशा जनावरांच्या पाठीमागें लागलीं आहेत. ज्या मानाने स्वसंरक्षणाची साधनें अधिक त्या मानानें समाजाचा जास्त तिटकारा व एकांतवासाची जास्त आवड जनावरांत दिसून येतात. मुंगीसारख्या क्षुद्र कीटकापासून हत्तीसारख्या धिप्पाड पशूपर्यंत हा नियम लागू पडण्यासारखा आहे. याला कदाचित एखाद-दुसरा अपवाद असेल; पण त्याने या स्थूल नियमास क्षीणता न येता उलट बळकटी येते. मनुष्य तरी संयमनशील होण्याचें हेंच कारण. राजाने किंवा त्याच्या अधिकाऱ्यांनी कितीही त्रास दिला तरी तो सहसा बंड करावयास प्रवृत्त होत नाही, याचेही मुख्य कारण हेंच आहे. उद्यां जर मनुष्याला एकाएकीं सिंहाच्या दाढा आणि पंजे येऊन त्यांचा उपयोग करण्यासारखे सामर्थ्यही प्राप्त होईल, तर तो आता जसा समाजप्रिय आहे तसा मुळीच रहाणार नाही. तात्पर्य काय कीं मनुष्य जात्या बलहीन असल्यामुळें राजापासून कितीही त्रास झाला तरी तो सोसून समाजांत राहणें यांतच त्यांचे अधिक कल्याण आहे. तो तशा रीतीनें रहात आला आहे हेंच त्या गोष्टीचे प्रमाण होय. एकंदरीनें अशा स्थितींत त्याला अधिक सुख न होतें तर तो समाज करून रहाताचना.

एकदां समाज होऊन आपापसांतील तंटे बंद झाल्यावर, राजापासून व त्याच्या अधिकाऱ्यांपासून होणारी पीडा कशी टळेल इकडे लोकांचे लक्ष लागतें.

या संकटातून ते लवकर पार पडत नाहीत. तसे न होण्यास अनेक कारणें होतात. मनुष्याच्या निरनिराळ्या समाजाला कुटुंब, टोळी, जात, राष्ट्र वगैरे विशेष कारणासाठी पृथक संज्ञा देण्यात आल्या आहेत. या संज्ञांनी निर्देश होत असलेल्या मनुष्यसमूहांत वारंवार तंटेबखेडे व मारामाऱ्या होत असतात. त्यांतून आपला बचाव होण्यासाठी कुटुंबांतील माणसं त्यातील प्रौढ व सामर्थ्यवान् इसमाच्या अंकित होऊन राहतात, व ज्याअर्थी इतर कुटुंबाच्या त्रासापासून त्यांचे संरक्षण करण्यास कुटुंबाधीश आपला प्राण धोक्यांत घालण्यास तत्पर असतो इतकेंच नाहीं, तर तें काम त्यांकडूनच होण्यासारखें असतें, त्याअर्थी ती सारी त्याच्या तंत्रानें वागतात, आणि त्यानें हवा तसा अंमल चालविला तरी तो निमूटपणे सोसून घेतात. ज्या रीतीनें एका कुटुंबात एका मनुष्यांचे वर्चस्व होते त्याच रीतीने एका टोळीत, जातींत, व राष्ट्रात एका पुरुषाचे आणि त्याच्या आप्तांचे वर्चस्व स्थापित होऊन त्याला 'राजा', 'लोकपाल', 'लोकनियंता', 'प्रजापति' अशी नांवें प्राप्त होतात, आणि तो सांगेल तें करण्याची आणि तो वागवील तसें वागण्याची सवय लागते. अशा रीतीनें जे एकवार परवश झाले त्यांना तीच स्थिती बरी वाटूं लागते. बुद्धिबळ किंवा शरीरबळ, ऐश्वर्य आणि सौंदर्य, यांबद्दल मनुष्यांच्या अंत:करणांत जन्मत: पूज्यबुद्धीची बीजें असतात. पिढ्यान्‌पिढ्या यांचे संगोपन करीत गेले असतां ती इतकी दृढ होऊन जातात कीं, पुढें ज्यांना एकदां पूज्य मानण्याची मनाला सवय लागली ते त्या पूज्यतेस मुळीच पात्र नसले, तरी त्यांचा अवमान किंवा धिक्कार करणें बरें वाटत नाहीं. ही पूज्य मानणारांची गोष्ट झाली. दुसऱ्या पक्षींही बऱ्याच अंशी असाच प्रकार घडतो. ज्यांना नेहमी प्रशंसा करून घेण्याची सवय असते, त्यांच्या मनांत आपण त्या प्रशंसेस पात्र आहो अशी वृत्ति उद्भवून, ती पुढें इतकी दृढ होऊन जाते की, कांही राजकुलांतील व उच्च कुलांतील स्त्रीपुरुषांच्या अंगी कोणत्याही प्रकारचा प्रसंशनीय गुण नसतां, त्यांस आपण परमपूज्य आहों, असें वाटूं लागतें, आणि लोकांनी आपण होऊन मान दिला नाहीं तर त्यांना दंडून त्यांच्याकडून तो घेण्याचा ते प्रयत्न करितात ! या रीतीनें एका पक्षाकडून स्तुति करून घेण्याविषयीं उत्सुकता, व दुसऱ्या पक्षाकडून ती करण्याविषयी उत्कंठा असल्यामुळे थोड्या वर्षांच्या आंत राजघराण्यांतील पुरुषांस विशेषत: सिंहासनस्थ राजास 'ईश्वरांश', 'ईश्वरावतार', 'कालकरण', 'न्यायमूर्ती', 'सद्‌गुणनिधान', 'कृपासागर', अशी विशेषणें लावण्याचा प्रघात पडतो; व अज्ञान लोकांच्या मनांत त्यांविषयी असल्या कल्पना पूर्णपणे बिंबून जातात. या

अतिशयोक्तीमुळे राजे उद्धट व क्रूर आणि प्रजा नीच व भेकड होत जातात. राजाचा जुलूम प्रजेस दु:सह होऊं लागतो. जोपर्यंत हा राजकीय जुलूम शस्त्रहीन अनाथ प्रजेवर होत असतो, तोपर्यंत तिची दाद कोठेंही लागत नाही. पण तोच राज्यांतील मोठमोठ्या कुलांवर होऊ लागला म्हणजे राज्यांत दुफळ्या होऊ लागतात. राजा आणि त्याच्या पक्षास अनुकूल असलेल्या सरदारांची घराणी एकीकडे आणि गांजलेले सरदार व प्रजा दुसरीकडे, असे दोन तट होऊन तंट्यास आरंभ होतो. ह्या तंट्याचा परिणाम भांडणारांच्या मगदुराप्रमाणे कोठे राजांच्या अनियंत्रित सत्तेची छाटाछाट, व कोठे तिची अधिक वृद्धि असा होतो. जेथे राजसत्तेचा अंमल कमी होतो, व मोठ्या कुलांतील पुरुष पुढे सरसावतात, तेथें पुढेंपुढे त्यांचीच सत्ता प्रबल होत जाऊन राजसत्ता संपुष्टात येते, किंवा मुळीच लयास जाते. कालेकरून राज्य करणारी श्रीमंतांची कुलेंही पूर्वीच्या राजांप्रमाणे जुलमी होत जातात, व पुन: सामान्य लोकांत आणि त्यांत तंटे होऊन लोक आपली सत्ता चालवूं लागतात. अशा रीतीने ज्या लोकांच्या अंगी काही नैसर्गिक ओज आहे ते हळूहळू राजांच्या, व श्रीमंत किंवा लढाऊ सरदारकुळांच्या जुलमांतून सुटून अखेरीस राज्याधिकार आपल्या हातात घेतात. युरोपांतील मोठमोठ्या जुन्या व नव्या देशांत राज्यक्रांत्या होऊन क्रमाने वर सांगितल्याप्रमाणें स्थित्यंतरें घडून आली आहेत. ज्या लोकांत म्हणण्यासारखा तक्वा नसतो, ते फार त्रास झाला असता थोडीशी धडपड करतात, आणि फिरून आपल्या अनादिसिद्ध पद्धतीप्रमाणे वर्तूं लागतात! आम्हीं हिंदू लोक, मुसलमान लोक, चिनी लोक हे सारे या दुसऱ्या कोटींतले लोक आहों.

राजसत्तेंत होणाऱ्या रूपांतराच्या या ऐतिहासिक स्वल्प विवेचनावरून असे दिसून येईल कीं, राजसत्ता कधी एकाच्या व कधी अनेकांच्या हाती असते. ज्या देशांत ती अनेकांच्या हाती असेल, तेथे ती त्यांतील मोठमोठ्या सरदारकुलांच्या, लोकांच्या किंवा त्यांनी निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातात असतें. जेथें ती राजाकडून निघून श्रीमंत कुलांकडे येते, तेथें ती कालांतराने लोकांकडे कोणत्या तरी रूपाने गेल्याशिवाय रहात नाहीं. तेव्हा आता थोडक्यांत येवढेच ध्यानांत ठेवावायचें की, काही राष्ट्रांत राजसत्ता एकाच्या व कांहीत अनेकांच्या हाती असते. युरोपांतील बहुतेक राष्ट्रांत ती कांही अंशी तरी अनेकांच्या म्हणजे लोकांच्या हातांत, व आशिया खंडांत ती बहुतेक पूर्णपणे एकाच्या म्हणजे राजाच्या हातांत आहे. दोहोंतील हा भेद त्यांतील लोकांच्या प्रकृतींतील मूळ भेदामुळे झाला आहे असे वाटतें, व हा, कांही केलें तरी, समूळ नाहीसा होईल किंवा नाही याची शंका आहे.

राष्ट्र एकसत्तात्मक असो, किंवा अनेकसत्तात्मक असो, विवक्षित स्थितींत

त्याला दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करून त्यावर आपला अंमल बसविता येतो. वास्तविक पाहिले असतां अनेकसत्तात्मक राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्रावरील अंमल त्यांतील लोकांस एकसत्तात्मक राष्ट्राच्या अमलापेक्षा अधिक सुखावह व्हावा असें प्रथमदर्शनी वाटते. पण सर्व बाबतीत तसा प्रकार घडून येईलच असें खात्रीने सांगता येत नाही.

येथपर्यंत राजसत्तेच्या आद्य स्थितीचे आणि सांप्रत स्थितीचे, आणि तीत होणाऱ्या फेरफारांचे स्वल्प दिग्दर्शन झालें. तिच्या भावी स्थितीविषयी व तीत होणाऱ्या फेरफाराविषयीं विशेष लिहिण्यात अर्थ नाहीं; कारण या प्रकरणाच्या संबंधाने आजपर्यंत जे असल्या भविष्यकथनांत पडले त्यांस फारसे यश आलेलें नाही. तथापि विषयपूर्ततेसाठी यासंबंधाने मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांनी जें लिहिले आहे, त्याचा पांच-चार वाक्यात गोषवारा देऊन या मुद्याचा निरोप घेतों. त्यांच्या विचारांचा असा झोंक आहे की, पृथ्वीवर राजकीय घडामोडी होता होता तींत अखेरपर्यंत जी राष्ट्रें टिकतील त्या सर्वांत हरएक प्रकारचा राज्यव्यवहार अगदी सौम्य अशा लोकसत्तात्मक राजसभेकडून होत जाईल; म्हणजे सर्व देशांत राजसत्ता लोकांच्या किंवा लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातांत असून तिची मर्यादा अत्यंत संकुचित असेल, व तिचा अंमल अतिशय सुखदायक व सौम्य असेल. प्रथम युरोपखंडांतील सर्व देशांत लोकसत्तात्मक राज्यांची दृढ स्थापना होईल, व पुढें आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रेलेशिया वगैरे सर्व लहान थोर खंडांत व बेटांत लोकसत्ताक राज्यें स्थापण्यांत येतील; हे झाल्यावर ज्या ज्या लोकसत्तात्मक राष्ट्रांची काही कारणांमुळे विशेष मैत्री झाली असेल, त्यांचे पृथक् राष्ट्रीय समूह होतील; व असें होतां होता अखेरीस पृथ्वीवरील सर्व लोकसत्तात्मक राष्ट्रांचे एक राष्ट्र झाल्यासारखे होऊन सर्व देशांतील सर्व प्रकारचे लोक एकमेकांशी सहोदरांप्रमाणे वागूं लागतील!

तत्त्ववेत्त्यांच्या या स्वप्नसृष्टीवरून, व सांप्रतकाळी राजसत्तेस जें स्वरूप प्राप्त झालें आहे त्यावरून, राजकीय उठाठेवींत पडलेल्या किंवा राजकीय विषयांविषयी चर्चा करून सामान्य जनांस बुद्धिवाद सांगणाऱ्या आमच्या देशांतील लोकाग्रणींनी येवढीच गोष्ट ध्यानांत आणावयाची की, जीवनार्थ कलहांत भारतीय आर्यांचा शेवटपर्यंत निभाव लागावा हे इष्ट असेल, तर ज्या उपायांनी राजसत्ता त्यांच्या हाती येईल ते आपण करीत असलों म्हणजे आपले कर्तव्य झालें, असे समजून स्वस्थ बसता कामा नये; तर ज्या उपायांनी राजसत्ता प्राप्त झाली असतां तिचे संरक्षण व तिचा सदुपयोग करतां येईल, असें शिक्षण त्यांस अगोदर दिलें पाहिजे, हे ध्यानात आणून त्या कामास अगोदर लागलें पाहिजे.

धर्मविचार

मागल्या अंकात राज्यविषयक विचार कोठपर्यंत येऊन ठेपला आहे, हे सांगितले. आज धर्मविचारांचा इतिहास थोडक्यात सांगावयाचा.

धर्मसंबंधाने लिहिणाऱ्या कोणत्याही मनुष्याचे तद्विषयक विचार कसेही असोत, त्यानें ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे कीं, ज्या विषयाचे आकलन फक्त मनुष्यासच होत आहे इतकेंच नाहीं, तर जो विषय मनुष्याच्या डोक्यांत विचारवृत्ति उद्बुद्ध झाल्यापासून कोणत्या तरी रूपानें येऊ लागतो, व त्याच्या स्थितींत कितीही बदल झाला तरी त्याच्या डोक्यांतून जो समूळ निघत नाहीं, अशा विषयाविषयीं लिहिताना पराकाष्ठेच्या शांततेचें आणि समीक्षतेचें अवलंबन केले पाहिजे. काम, क्रोध, मद, मत्सर, दया, अनुकंपा, लोभ वगैरे बऱ्यावाईट मनोवृत्ति जशा मनुष्यांत नैसर्गिक आहेत तशी धर्मवृत्तीही नैसर्गिक आहे. जशा इतर वासना किंवा वृत्ति, तशी धर्मवृत्ति किंवा धर्मवासना समजली पाहिजे. मनुष्याच्या मनोवृत्तींपैकी काहीं स्वाभाविक व काहीं आगंतुक असें कधींही म्हणतां येणार नाहीं. आतां ज्या वृत्तीपासून मनुष्यास सामाजिक स्थितींत विशेष सुखप्राप्ति होत असेल, किंवा होण्याचा संभव असेल तिचें काळजीपूर्वक संगोपन करून ती होईल तितकी दृढ व विस्तृत करणें व ज्या वृत्तीमुळें समाजास पीडा होत असेल किंवा होण्याचा संभव असेल, तिची वाढ खुंटवून ती हळू हळू समूळ नाहीशी करून टाकण्याचा प्रयत्न करणें; या अगदीं निराळया गोष्टी आहेत. यांचा त्या त्या वृत्तींच्या अस्तित्वांशी काहींएक संबंध नाहीं. त्या आपल्या मनुष्याच्या विवक्षित स्थितींत अस्तित्वांत यावयाच्याच.

धर्मसंबंधानें लिहितांना समता ठेवण्याचें आणखी एक मोठें कारण असें आहे कीं, दुसऱ्या कोणत्याही वृत्तीपेक्षां या वृत्तीपासून मनुष्याच्या आचरणावर व विचारावर विशेष महत्त्वाचें परिणाम घडले आहेत. अंत:करणावर ज्या वृत्तीचा पक्का अंमल बसला असतां, सिंहासनस्थ राजांना अधिकार व ऐश्वर्य यांचा त्याग करून, व आप्तमित्रांस सोडून देऊन, अरण्यांत संचार करणें, व फलमूलांवर आहार करणें यांत काहींच कठिण वाटेनासें होतें; ज्या वृत्तीमुळे विवाहित स्त्रियांनी आपले पति व विवाहित पुरुषांनी आपल्या स्त्रिया यांबद्दल पर्वा न करतां आपल्या मनास शुद्ध वाटलेले वर्तन करण्यास मागेंपुढे पाहिलें नाही; ज्या वृत्तीमुळें मातापितरांस अपत्यवात्सल्याचा घट्ट पाश तोडून त्याविषयी उदासीन होण्यास, किंबहुना त्यांचा नाश करण्याविषयीं प्रवृत्त होण्यासही शंका वाटत नाहीं; जी वृत्ति प्रबल झाली असतां नानातऱ्हेच्या यातना सोसण्यास, जाळून घेण्यास, बुडवून घेण्यास किंवा पुरून घेण्यास मनुष्य तयार होतो; ज्या वृत्तीचें एखाद्या राष्ट्रावर

वर्चस्व झालें असतां ते दुसऱ्या राष्ट्रांस जाळण्यास, कापण्यास, लुटण्यास किंवा पाहिजे तें करण्यास बिलकुल भीत नाही; सारांश, ज्या वृत्तींमुळे कधीं कधीं लोकांच्या नीतिमत्तेस, विद्येस, भूतदयेस व सदाचरणास पराकाष्ठेचें साहाय्य झालें आहे, व कधीं कधी जिच्यामुळें लोकांत साहस, क्रौर्य, विचार व अमानुषपणा यांची परमावधि झाली आहे, अशा वृत्तीविषयी लिहितांना किंवा बोलताना पराकाष्ठेची सरलता राखली पाहिजे, हें उघड आहे. असें न केल्यास कोणत्याही पक्षाचा फायदा न होता उलट मोठें नुकसान होण्याचा संभव आहे. ज्या वादांत मनुष्याच्या वृत्तींत खिळून गेलेल्या प्रबल आग्रहाच्या हाती सुकाणूं आहे, तो वाद करतांना फारच खबरदारी ठेविली पाहिजे, हे जितकें सांगावें तितकें थोडें होणार आहे.

पण धर्मसंबंधानें आज आम्हांस जें लिहावयाचें आहे त्यांत कोणत्याही प्रकारचा वाद उत्पन्न होण्याचा संभव नाही; कारण प्रस्तुत लेखांत कोणत्याही प्रकारच्या धर्ममतांवर टीका करण्याला किंवा ती मोडून काढून त्यांच्या जागीं अमुक बरीं आहेत असें म्हणून त्यांचे मंडन करीत बसण्याला जागा नाहीं. तसें करणें केवळ अप्रासंगिक होणार आहे. मनुष्याच्या अंत:करणांत धर्मवृत्तीचा आविर्भाव झाल्यापासून तीत आजपर्यंत कोणकोणते फेरफार झाले आहेत, व धर्मकल्पना साम्प्रत काळी मोठमोठ्या विचारी पुरुषांच्या लिहिण्यांत कोठपर्यंत येऊन पोंचली आहे, येवढेच काय ते प्रस्तुत निबंधांत तिऱ्हाइताच्या नात्यानें सांगावयाचें आहे; दुसरें कांहीं नाहीं.

मनुष्याला एकदां पूर्णावस्था प्राप्त झाली होती, पण तींतून तो कांही कारणामुळें भ्रष्ट झाला, हें मत आम्हांस संमत नाहीं, असें जें मागें म्हटलें आहे, तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आमच्या अल्प समजुतीप्रमाणें मनुष्याची पूर्णावस्था अजून यावयाची आहे. कदाचित सध्या आपल्या दृष्टीपुढें जें विश्व आहे, व ज्या पृथ्वीवर आपण रहात आहों, तें विश्व व ती पृथ्वी अस्तित्वात येण्यापूर्वीं दुसरें एक विश्व व दुसरी एक पृथ्वी असून तीवर आपल्यासारखे प्राणी होतें, व ते प्रथम अस्तित्वांत आले तेव्हां त्यांची पूर्णावस्था होती, पण कांही कारणांमुळें ते पतित होऊन त्या विश्वाचा व त्या पृथ्वीचा लोप झाला, असें पाहिजे तर मानितां येईल. पण तसें करण्यांत काहीं फायदा दिसत नाही; कारण एक तर तसें मानण्यात काही एक आधार नाहीं; दुसरें, तसें मानिलें तरी आपल्या डोळ्यांपुढें जी सृष्टि आहे, व ज्या भूगोलावर आपण वास करीत आहों, त्यासंबंधाने एकदां पूर्णावस्था होती असे मानण्यास बिलकूल जागा नाहीं. आम्ही ज्या विश्वांत आहों त्याच्यापूर्वी दुसरीं विश्वें होऊन गेलीं असतील किंवा नसतील; त्यांविषयीं वाद करीत बसण्यांत

अर्थ नाहीं; कारण त्या विश्वाचा इतिहास समजण्याची साधनें आम्हाला अनुकूल नाहींत; तेव्हां आमचा जो वादविवाद व्हावयाचा तो सांप्रत विश्वाविषयीं, व विशेषत: तदंतर्गत आपल्या भूगोलाविषयीं आणि त्यावरील प्राण्यांत अतिश्रेष्ठ प्राणी जे आपण; त्याविषयी व्हावयाचा व व्हावा, हें योग्य आहे.

मनुष्याच्या अंत:करणांत धर्मवृत्ति नैसर्गिक आहे. असें जें वर म्हटलें आहे तेवढ्यावरून असें समजतां कामा नये कीं, मनुष्याच्या पाहिजे त्या अवस्थेंत ही वृत्ति स्पष्टपणें दिसत असते. ज्याअर्थी विवक्षित स्थितीत ती दिसूं लागते. त्याअर्थी तिचीं बीजें सूक्ष्मरूपानें त्याच्या अंत:करणांत असलीं पाहिजेत हे उघड आहे. पण त्यांना दृश्य स्वरूप येण्यास कांही ठिकाणी काल जावा लागतो. काही असे प्राणी आहेत कीं, त्यांना मनुष्य म्हटल्याखेरीज इलाज नाही. पण त्यांच्या भाषेंत देव, धर्म वगैरे अर्थसूचक शब्द नाहींत. तेव्हां त्या वस्तूंच्या कल्पनाही त्यांना नसल्या पाहिजेत हें उघड आहे. कारण ज्यांना भाषेचा उपयोग समजूं लागला आहे, त्यांना थोड्या दिवसांत आपल्या मनांतील पाहिजे ती कल्पना व्यक्त करण्यासारखी शब्दयोजना करतां येते. निदान एकाला दुसऱ्याच्या मनांतील भाव समजण्यास शब्दांसारखे दुसरें साधन नाहीं. ज्या लोकांस भाषेचा उपयोग ठाऊक झाला आहे, पण ज्यांमध्ये धर्मविषयक कल्पना व्यक्त करणारे शब्द दृष्टीस पडत नाहींत, ते धर्मसंबंधानें विचार करीत असतील, असें म्हणणे म्हणजे पशुपक्ष्यादि जीवकोटींतील खालच्या प्रतीचे प्राणीही सृष्टिकर्त्याविषयी प्रतिदिवशी मनांतल्या मनांत ध्यान व प्रार्थना करीत असतील असे म्हणण्यासारखे होय. तात्पर्य काय कीं, प्राण्यांच्या शब्दांवरून व कधीं कधीं त्यांच्या बाह्य कृतींवरून त्यांचे मनांतील विचार आपणांस समजतात. ज्या गोष्टीविषयी या दोहोंचा अभाव असेल त्या गोष्टीविषयीं तें चिंतन करीत असतील, असें पाहिजे तर आग्रहाने म्हणतां येईल; पण दुसऱ्यास तें सिद्ध करून देतां येणार नाहीं. तेव्हा धर्मसंबंधाने अज्ञान लोकांचे म्हणणें कांहींही असलें तरी ज्यांना अर्वाचीन न्याय, मीमांसा, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रांतील सिद्धांत मान्य झाले आहेत, व ज्ञानसंपादनार्थ भूगोलभर प्रवास करण्यांत आयुष्य घालविणाऱ्या सत्यप्रिय शोधकांनी प्रसिद्ध केलेली माहिती व पुस्तकें ज्यांनी थोडी बहुत पाहिली आहेत, त्यांना मनुष्याच्या विवक्षित स्थितीत त्याच्या अंत:करणांत कोणत्याही प्रकारची धर्मकल्पना नसते, असें कबूल करावें लागतें. पुढें जेव्हां तिचा आविर्भाव होऊं लागतो, तेव्हां त्याच्या बाकीच्या कल्पनांप्रमाणें ती फार ग्राम्य असते. रानटी स्थितींतील मनुष्याला विश्वाचे व्यापार, पदार्थांचे धर्म, वस्तूंत होणाऱ्या रूपांतरांची कार्यकारणें समजत नसल्यामुळे तो अगदी भांबावून गेलेला असतो, व स्वत:च्या मनांतील ज्या वृत्तींचा अनुभव त्यांस प्रत्येक क्षणीं

होत असतो, त्याच प्रकारच्या वृत्ति ज्या अनंत वस्तु त्याच्या सभोंवती असतात त्यांचे ठायींही वसत असतील, अशी भावना त्यास होऊं लागते. ह्या भावनेचें स्वरूप ज्याना नीटपणे, जाणण्याची इच्छा असेल त्यानी अगदी लहान मुलांच्या बोलण्याचालण्याकडे लक्ष द्यावें, म्हणजे तें त्यांस कळून येईल. जमिनीवर पडलें असतां जमिनीला मारणे, खेळाच्या घोड्यास व गाड्यास आपल्यासारखीच समजूत असेल असे वाटणें, मांजर, कुत्री, राघू वगैरे प्राण्यांना आपल्यासारखे समजून त्यांशी लडिवाळपणा करणे, त्यांवर रागावणें, किंवा त्याना मारणें, आणि त्याच्याविषयीं वडील माणसांपाशीं कागाळ्या सांगणें-वगैरे बाललीला ज्यांनी ज्ञानदृष्टीने पाहिल्या असतील त्यांना मनुष्याच्या रानटी स्थितीतील धर्मकल्पनांचे स्वरूप तेव्हाच समजणार आहे. सुधारलेल्या देशांतील मुलांच्या बाल्यावस्थेंतील कल्पना आणि रानटी लोकातील प्रौढांच्या कल्पना-यांत फारसा भेद असत नाहीं. रानटी लोकांस ऊन, पाऊस, वारा, वीज, पूर वगैरे निर्जीव सृष्टपदार्थापासून व व्याघ्रसिंहादि वन्य पशूंपासून आपला बचाव कसा करावा हें समजत नसल्यामुळें त्याची भीति त्यांस उत्पन्न होते, व ज्या कारणांनी आपले मनोविकार क्षुब्ध व सतुष्ट होतात, त्याच कारणांनी त्यांचेही मनोविकार क्षुब्ध व संतुष्ट होत असतील असें वाटू लागते. या वाटूं लागण्यात धर्मकल्पनेचा मूळ आरंभ आहे. ज्या बाह्य सृष्टपदार्थांपासून आनंद होईल त्याला मित्र म्हणावा, ज्यांपासून त्रास होईल त्याला शत्रु म्हणावा; मित्राची मर्जी राखण्याचा व शत्रूस दंड करण्याचा प्रयत्न करावा-या रीतीनें पदार्थपूजा अस्तित्वांत येते. बाह्य सृष्टीतील वस्तुसमुदायांस व प्राणिसमुदायांस आपल्यासारखीच मनें आहेत, अशी भावना एकदा झाली म्हणजे मनुष्य कोणत्या निर्जीव वस्तूस, किंवा कोणत्या झाडास, किंवा जनावरास भिऊं लागणार नाही, व देव म्हणून स्तवूं लागणार नाहीं, हे सांगता येणार नाहीं.

धर्मविचारांची वाढ

सृष्टींतील सचेतन व अचेतन वस्तूंपासून होणारा त्रास व आनंद यांच्या प्राथमिक अनुभवामुळे अज्ञानावस्थेंतील मनुष्यांच्या अंतःकरणांतील धर्मकल्पनाबीजास अकुर कसा फुटतो, हें मागल्या अंकांत सांगितलें. आज या अंकुराची बुद्धि कशी होत जाते, व आतांपर्यंत तिची वाढ किती झाली आहे, हे पहावयाचे.

सृष्टीतील एकंदर वस्तुसमुदायांचे सचेतन व अचेतन असे दोन स्थूल विभाग करण्यास हरकत नाहीं. मात्र अचेतन वस्तूंत चंद्रसूर्यापासून अत्यंत सूक्ष्म परमाणु घेतले पाहिजेत व सचेतन वस्तूंत शेवाळापासून मनुष्यापर्यंत लहान मोठ्या हरएक वनस्पतीचा, कीटकाचा व मोठ्या प्राण्यांचा समावेश केला पाहिजे; किंवा सोईसाठी

निर्जीव वस्तु, वनस्पति आणि प्राणी असे तीनं वर्ग कल्पिले तरी चालेल. धर्मसंबंधानें या तीन वर्गांतील वस्तूंचा विचार केला असता असें दिसून येईल कीं, प्रत्येक देशांतील लोकांनी विवक्षित स्थितींत या वर्गांपैकी प्रत्येक वर्गांतील कांहीं वस्तूंस देव मानिलें आहे. हे वस्त्वधिष्ठायी किंवा वस्त्वंतर्गत देव अगदी साध्या प्रकारचे असतात, व त्यांत आणि त्यांच्या पूजकांत फारसें अंतर नसतें, हे स्वल्प विचाराअंत दिसून येईल. मनुष्याप्रमाणें यांनाही भुकेपासून व तहानेपासून पीडा होते! मनुष्याप्रमाणेंच हे मांस व धान्य खातात, व पाणी आणि सुरा पितात! ज्या गोष्टींपासून मनुष्यास सुखदु:खें होतात, त्यांपासून तीं यांसही होतात! ज्याप्रमाणे मनुष्यांना मरण आहे, त्याप्रमाणें यांनाही आहे! मनुष्य ज्या रीतीनें जन्मास येतो, त्याप्रमाणें हेही येतात ! दोहोंत भेद येवढाच कीं, मनुष्यांच्या वासनांहून यांच्या वासना विशेष प्रबल; मनुष्यांच्या कर्तृत्वाहून यांचें कर्तृत्व विशेष मोठें; व मनुष्यांच्या उपभोगासामर्थ्याहून व आयुर्मर्यादेहून यांचे उपभोगसामर्थ्य आणि आयुर्मर्यादा विशेष विस्तृत ! असल्या देवांच्या आपापसांत लढाया व तह होतात, ते एकमेकांच्या स्त्रिया पळवून नेतात व त्यांच्या पातिव्रत्यांचे हरण करतात! आणि मनुष्यांत कांहीं कारणांमुळें संग्राम माजला तर ते आपापल्या मनुष्यभक्तांस मदत करण्यास येतात! सारांश, पाहिजे त्या देशांतील मनुष्यांच्या पूर्वस्थितीची आणि विचारांची माहिती काढून पहा, तींत देवांच्या संबंधानें अशा प्रकारच्या कल्पना सांपडल्याशिवाय राहणार नाहींत. सृष्टींतील ठळक ठळक निर्जीव वस्तूंत प्रथम सचेतनत्व व क्रियाकर्तृकत्व भासून पुढे जसजसा कार्य कारणांचा संबंध कळत गेला असेल, तसतसे हे गुण त्यांच्यांतून काढून घेऊन त्यांचा आरोप मनुष्यांनी वनस्पतीवर व प्राण्यांवर केला असेल, असें वेदादि जुन्या ग्रंथांवरून दिसतें, असें अलीकडील पंडितांचे म्हणणें आहे. धर्मसंबंधाने ज्यांचे विचार फार पुढें गेले आहेत त्यांची गोष्ट राहूं द्या; ज्यांना अजून पूर्वधर्मविचारांनी सोडलें नाहीं, त्यांच्या वृत्तीकडे किंचित् पहा, म्हणजे वर जें म्हटलें आहे त्याचें यथार्थत्व दिसून येईल. आमच्या रोजच्या संध्या, आमच्या देव्हाऱ्यांतील देवांच्या पूजा, आणि आमच्या श्रावण्यांतील मंत्र यांचा अर्थ समजण्याचा किंचित् प्रयत्न केला, व त्यांतील तंत्रांकडे तत्त्वदृष्टीने क्षणभर पाहिलें, तर मनुष्यांच्या अंत:करणांत उत्पन्न झालेल्या धर्मकल्पनांच्या वृद्धीचा इतिहास समजण्यास बरेंच साहाय्य होणार आहे. सूर्य, चंद्र, अग्नि, मृत्तिका, पाषाण, धातू वगैरे अनेक निर्जिव वस्तूपैकी कांही आम्हीं साक्षात देव मानतों व कांहींस देवांच्या प्रतिमा करण्याकडे लावतों. या प्रतिमा कांहींशा जनावरांच्या व मनुष्यांच्या वळणावर केलेल्या असतात. सारांश काय कीं, निर्जीव वस्तूंपैकी कांहींत देवत्व आहे, असें अद्यापि आपण मानितों;

व कांहींस इतर दैवतांची पूजोपकरणें केलें आहे.

निर्जीव वस्तूंच्या विचारानंतर वनस्पतींकडे वळलें असतां, त्यांपैकीं कांहींस आपण देव मानतों, हें सर्वांस कबूल केलें पाहिजे. आपट्याची व शमीची पूजा कोणत्याही जातीच्या हिंदु लोकांस ठाऊक नसेल असें वाटत नाहीं. उंबर, वड, पिंपळ यांच्या पूजेचे प्रसंग ठरीव आहेत, पण तुळशीची मात्र तशी गोष्ट नाही, शूचिर्भूत ब्राह्मणाच्या घरांत एका बाजूनें "पूजा व वैश्वदेव" आणि दुसऱ्या बाजूनें 'तुळशीला पाणी आणि प्रदक्षिणा" ही नित्य होत नाहींत, असे बहुश: दृष्टीस पडणार नाही. ज्याप्रमाणें निर्जीव वस्तूंपैकी कांही देव मानिल्या असून, कांहीं देव मानलेल्या दुसऱ्या वस्तूंच्या पूजेस उपयोगी पडतात, त्याप्रमाणें वनस्पतींपैकी ज्यांस देव मानिलें आहे, त्यांपैकी कांहीं व न मानिलेल्यांपैकीं काहीं, देव मानिलेल्या इतर वस्तूंच्या पूजेस उपयोगी पडतात. बेलाच्या झाडांची पूजा फारशी प्रचारांत नाहीं, पण त्याच्या त्रिदलांशिवाय शिवाची पूआ सांग व शिवकारक होत नाही. तुळस पूजा घेत असून पूजोपकरण झाली आहे, या दोहोंशिवाय पुष्कळ झाडांची पानें व फुलें देवास प्रिय आहेत, हें सर्वांस ठाऊकच आहे. निदान फुलांविषयीं तरी कोणासही शंका येणार नाहीं. ज्यांना पानांविषयीं किंचित् भ्रांती पडल्यासारखें होईल त्यांनी श्रावणांतल्या मंगळागौरी, आणि त्यांच्या पूजेसाठी, 'पत्र्या' गोळा करण्याविषयीं तरुण कन्यकांची उत्कंठा मनांत आणावी म्हणजे झालें! रुईच्या पानांच्या आणि फुलांच्या माळांचा हनुमंताला किती हव्यास आहे हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच !

पाषाणादि निर्जीव वस्तु व अर्कवृक्षादि वनस्पति मात्र देवतात्वाप्राप्त पावल्या आहेत इतकेंच नाहीं, तर प्राणिवर्गाच्याही अनेक अवयवांची पूजा आपण फार वर्षांपासून अंगीकारली आहे. मच्छ, कूर्म, वराह, नरसिंह हे परमेश्वराचे अवतार! उंदीर गणपतीचें वाहन! गाय तर हिंदूंस पूज्य! हिच्या दुधानें, तुपानें, व दह्यानें आमची पुष्टि होते, आणि हिच्या शेणाच्या आणि मूत्राच्या सेवनानें आमच्या पापांचे क्षालन होतें! गिरिजारमण नंदिवाहनावर आरूढ होऊन कैलासावर संचार करणार, तेव्हां 'शिववंदनकामांही वंदावा प्रथम देव नंदी न' असे मुळींच होण्याचा संभव नाहीं. तेव्हां शिवालयांत प्रवेश करतांना व त्यांतून परत फिरतांना, द्वारस्थ जो नंदी, त्याची कृपा होण्यासाठीं आर्जव करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यांतील सर्वांत कार्यकर मार्गाचें अवलंबन जनावरेंही आम्हांस पूज्य झालीं आहेत. पण त्यांचा येथें उल्लेख करीत बसून जागा अडविण्याची गरज नाही, कारण एक तर प्रस्तुत विषयाचा हा ऐतिहासिक विचार चालला आहे; दुसरें असें कीं, जनावराच्या ठायी देवत्वाची कल्पना करून त्यांस पुजणें व भजणें ह्या गोष्टी हिंदु लोकांतच

आढळतात असें नाहीं. इतिहासाच्या वाचकास त्या प्रत्येक देशाच्या इतिहासांत दिसून येतात. भेद इतकाच कीं, हिंदुस्थानांत उंदरांची आणि सापांची पूजा होत असली तर ईजिप्तांत सुसरीची किंवा मांजरांची होत असेल!

या सर्व विवेचनावरून आतां वाचकांच्या ध्यानांत ही गोष्ट येईल की, मनुष्याची शुद्ध पश्वस्था किंचित नाहींशी होऊन तो विचार करूं लागला, म्हणजे सृष्टीतील भव्य जड पदार्थांविषयी, झाडझुडपांविषयीं, व लहान मोठ्या जंतूंविषयीं त्याला एका प्रकारची भीती उत्पन्न होऊन, त्याच्या अंत:करणांत धर्मकल्पनेचा आविर्भाव होतो, व उत्तरोत्तर तिचा स्पष्ट विकास होत जाऊन ती शुद्ध होत जाते. वारा, पाऊस, पूर, चंद्रसूर्यांच्या गति वगैरे गोष्टीची कारणें, व त्या घडून येण्याचे प्रसंग नीट कळून येऊं लागले, म्हणजे त्या वस्तूंवरील धर्मश्रद्धा हळू हळू उडूं लागते, व असाच प्रकार देव मानलेल्या वनस्पतींच्या व जनावरांच्या संबंधाने हळूहळू घडून येतो. हे सर्व विचारांनंतर होण्यास विशेषत: कार्यकारणाचें ज्ञान कारण होतें. अशा रीतीनें मनुष्याच्या धर्मकल्पनात थोडा थोडा फरक होतां होतां, बहुतेक अचेतन व सचेतन पदार्थांतील देवतात्व नाहीसे होऊन, त्या सर्वांचे आदिकारण एक परमेश्वर आहे, असा बुद्धीचा ग्रह होतो. नंतर या परमेश्वराच्या गुणांविषयीं व स्वरूपाविषयीं नानातऱ्हेच्या कल्पना निघूं लागतात. पहिल्या मूर्तिपूजेचा अंमल अगदीं नाहींसा न होतां, एकेश्वरापर्यंत धर्मकल्पना जाऊन थडकली, तर आचार आणि विचार यांचे द्वंद्व लागून विलक्षण तऱ्हेचा धर्म उत्पन्न होतो. तोंडानें वारंवार परमेश्वर निर्गुण आहे असें म्हणत असावें, व हातानें पार्थिव करून त्याची अक्षतांनीं, बिल्वपत्रांनी व पंचामृतांनी पूजा करीत असावें! जो मेला तो पंचत्वाप्रत मिळाला, असे मनांत वाटत असावें, पण क्षौर, सपिंडी, व शय्यादान केल्याशिवाय व अशौच धरल्याशिवाय स्वास्थ वाटूं नये! वर्णव्यवस्था मनुष्यकृत आहे अशी खात्री होऊन जावी, पण अतिशूद्राचा स्पर्श झाला असता सचैल स्नान करण्याची बुद्धि व्हावी! बहुतेक व्यवहार सृष्टिनियमांप्रमाणे चालत आहेत, असें एकीकडे वाटत असून तदनुसार वर्तन होत असावें, पण कोणत्याही अडचणींत साधारण उपाय चालत नाहींत, असें दिसल्याबरोबर ज्योतिष्यांच्या व मंत्राक्षऱ्यांच्या घरीं खेटे घालावें, किंवा देवांच्या मूर्ति पाण्यांत कोंडून ठेवाव्या, अथवा त्यांवर अभिषेकाची धार धरावी, अशी इच्छा उत्पन्न व्हावी! पण अलीकडे या दुटप्पी वृत्तीचा लोप थोडाथोडा होऊं लागला आहे.

धर्मविचारांची उन्नतावस्था

आतांपर्यंत या विषयाच्या संबंधानें जें लिहिण्यांत येऊन गेलें आहे तेवढ्यावरून वाचकांच्या हें ध्यानांत आलें असेल कीं मनुष्य अज्ञानावस्थेंत असतां

बाह्य सृष्टींतील सचेतन व अचेतन वस्तूंच्या व्यापारांचे जे परिणाम त्यांच्या अंत:करणावर घडतात, त्यामुळें त्या पदार्थांचे ठायी आपल्या मनोवृत्तीसारख्या मनोवृत्ति असतील अशी त्याची भावना होऊन तो निर्जीव वस्तूंची, प्राण्यांची, वनस्पतींची, व अखेरीस विश्वाची पूजा करूं लागतो. या वस्तूंच्या पूजनांत कांही अर्थ नाही; यांच्या ठायीं आपल्यासारख्या मनोवृत्ति असतील असे मानणें चूक आहे; मनुष्य हाच सर्वांत श्रेष्ठ प्राणी होय; निर्जीव व सजीव वस्तूंचे व्यापार व्यवस्थित नियमानें चालतात; या वस्तूंपासून आपला उपयोग करून घ्यावयाचा असेल तर, त्यांच्यावर रागावण्यांत, त्यांना शिक्षा करण्यांत किंवा त्यांची प्रार्थना करण्यांत काही हंशील नाहीं; त्यांच्या व्यापारांचे नियम शोधून काढून तद्नुसार त्यांपासून आपली कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे; अशी मनुष्याच्या मनाची खात्री होण्यास फार काल लागतो. ज्यांची अशा प्रकारची खात्री झाली आहे ते वनस्पतिपूजकांस, प्राणिपूजकांस व विश्वपूजकांस नांवें ठेवतात व त्यांस मूढ समजतात. पण हे त्यांचें करणें कांहीं अंशीं चुकीचे आहे. अगदीं लहान मुलांस जर आपण असें सांगू लागलों कीं पृथ्वी व सूर्य यांमध्ये चंद्र आल्यानें त्यास ग्रहण लागतें, आणि ते त्यांना समजलें नाहीं, तर त्याबद्दल त्यांवर रागावण्यांत काय हंशील आहे ? कोणतीही क्लिष्ट,गोष्ट समजण्यास अगोदर तिच्या घटकांचे ज्ञान झालें पाहिजे. साखर, तांदूळ, केशर, पाणी, व विस्तव यांची माहिती असल्याशिवाय साखरभात कसा करतां येईल? तसेंच शास्त्राभ्यासामुळें ज्यांना खऱ्या कार्यकारणसंबंधाचा निश्चय कसा करावा हें कळूं लागलें आहे, त्यांनी ज्यांना तो कळत नाही त्यांस मूर्ख म्हणण्यांत व त्यांचा धिक्कार करण्यांत काय अर्थ आहे ? रानटी किंवा अज्ञान मनुष्यास मन म्हणजे काय हे बिलकुल समजत नसतें, त्यामुळे पहिल्यापासून त्याला दोन प्रकारच्या सत्त्वांचा भास होत असतो. जागृदवस्थेत होणारे अनुभव आणि स्वप्नावस्थेंत होणारे अनुभव यांत फारसा भेद वाटत नाहीं. पहिल्या स्थितींतील सुखदु:खानुभव त्याला जितका खरा वाटतो, तितकाच दुसऱ्या स्थितींतीलही वाटतो. ज्याप्रमाणें निजलेल्या मनुष्यांचे एका प्रकारचें स्वत्व मंद पडून दुसऱ्या प्रकारचें स्वत्व पुढें होतें, त्याप्रमाणे मेलेल्या मनुष्याचेंही एका प्रकारचे स्वत्व नाहींसे होऊन दुसऱ्या प्रकारचें स्वत्व येत असावें व तो एका तऱ्हेंने आपणांतून नाहींसा झाला तरी दुसऱ्या तऱ्हेनें तो जिवंत असला पाहिंजे, व आपल्या सभोंवती वावरत असला पाहिजे ही कल्पना मनुष्याच्या प्रथमावस्थेत प्रत्येक ठिकाणीं अस्तित्वात असते. आपल्या मेलेल्या आप्तांची शरीरें नाहींशी झालीं तरी त्यांचे आत्मे नाहीसे झाले नाहींत, हा विश्वास सर्व ठिकाणच्या रानटी लोकांत आढळून येतो व याच विश्वासापासून हळू हळू पदार्थपूजा,

प्राणिपूजा, वनस्पतिपूजा व विश्वपूजा अस्तित्वांत येतात. जिवंतपणी ज्यांचे वर्तन आपणांस सुखावह झालें असेल, ते मरणोत्तरही पिशाचरूपानें किंवा वायुरूपानें आपला निरंतर परामर्ष घेत जातील, अशी कल्पना उत्पन्न होऊन त्यांची मर्जी प्रसन्न ठेवण्यासाठी त्यांच्या थडग्यात किंवा चितेवर त्यांना प्रिय अशा वस्तु अर्पणें, त्यांची प्रार्थना करणे, कांही संकट आलें असतां त्यांचा सल्ला विचारणें व साहाय्य मागणें- सारांश जिवंतपणी कोणाचीही मर्जी संपादण्याचे जे मार्ग त्यांचे मरणोत्तरही अवलंबन करण्याचा प्रचार पडतो ! याच्या उलट जे जिवंतपणी आपणांस प्रतिकूल असतील ते मेल्यावरही पिशाचरूपानें आपणास त्रास देत रहातील असें वाटून पंचाक्षऱ्याकडून किंवा मांत्रिकाकडून त्यांना दंडण्याचा व गाडण्याचा प्रयत्न करणें, अथवा ज्या वस्तु त्यांना प्रिय होत्या असें ठाऊक असेल, त्या त्यांना विवक्षित काली पोंचविण्याचें कबूल करून त्यांस वश करून घेण्याची खटपट करणें वगैरे प्रचार अस्तित्वांत येतात! पुढें अनेक कारणांमुळें हीच पिशाचें वृक्षांच्या व जनावरांच्या रूपानें आपणांस आनंद देणारी किंवा पीडा देणारी होतात, असें वाटू लागून झाडांची आणि जनावरांची आराधना करण्यास प्रारंभ होतो. येथपर्यंत धर्मविचारांची मजल आल्यावर, मग पृथ्वीवरील मोठमोठ्या वस्तूंत आपल्या प्रसिद्ध आप्तांनी मरणोत्तर प्रवेश केला असेल असें वाटणें अगदीं साहजिक आहे; व या वाटण्यास आरंभ झाला म्हणजे प्रथम नद्या, पर्वत, अरण्यें वगैरे वस्तु सचेतन अशा भासूं लागून, अखेरीस चंद्रसूर्यादि तारकागणही सचेतन वाटू लागतात, आणि त्याचा आपल्या पूर्वजांशी संबंध आहे, किंवा ते आपले पूर्वजच आहेत, असा विश्वास उत्पन्न होऊन त्यांची पूजा करण्याचा प्रघात पडतो!

अशा रीतीनें धर्मकल्पनेची उत्पत्ति व अभिवृद्धि होते. आपल्या देशांत धर्मसंबंधाने असल्या नानाविध कल्पना रूढ आहेत. तसल्या इतर देशांतही आहेत. सर्वांचा आरंभ पिशाचकल्पनेपासून झाला आहे, व प्रत्येक देवता मनुष्यांनी आपल्या स्वभावाच्या वळणावर नेली आहे. देशकालभिन्नत्वामुळें निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वस्तूंस देवता मानण्याचा प्रघात पडतो, व एकाच देशांत एका देवतेहून दुसरी देवता विशेष पूज्य, व एका स्थानाहून दुसरें स्थान देवतांच्या वासास विशेष प्रिय, अशा प्रकारच्या कल्पना अस्तित्वात येऊ लागतात. जो तो आपापली देवता इतर देवतांहून श्रेष्ठ मानू लागतो, आणि तिचा अभिमान धरून तिच्यासाठी इतरांशी भांडूं लागतो! ही भांडणें पुढे धर्मयुद्धांस कारण होतात, व शेवटीं साऱ्या देवता दुय्यम प्रतीच्या ठरून त्या सर्वांहून श्रेष्ठ असा एक देवाधिदेव किंवा परमेश आहे, अशी कल्पना होते. ज्याप्रमाणे मनुष्यांत राजा सर्वांत श्रेष्ठ त्याप्रमाणे देवतांत परमेश्वर श्रेष्ठ; व ज्याप्रमाणे प्रजा राजांच्या आज्ञा पाळतात,

त्याप्रमाणें दुय्यम प्रतीच्या देवता या सर्वश्रेष्ठ परमेश्वराची आज्ञा पाळतात, आणि त्याच्या हुकमांत वागतात, असें वाटू लागते.

येथून पुढला पल्ला फार थोडा आहे. दुय्यम प्रतीच्या देवतांचे देवतात्व नाहींसे होऊन सर्वश्रेष्ठ परमेशाच्या कृपेनें सारें विश्व झालें आहे, त्याच्या इच्छामात्रेंकरून अनंत ब्रह्मांडे अस्तित्वात येतात व लयास जातात; तो सर्वव्यापी आहे; तो अविनाशी आहे; तो निरंतर आहे; तो निराकार आहे, तथापि तो सर्व लहान वस्तूंहून लहान व सर्व थोर वस्तूंहून थोर आहे, वगैरे परस्परांशी असंबद्ध व परस्परविरोधी अशा गुणांचे स्थान होऊन बसतो; व याच्या पुढेंही मनुष्याचा धर्मविचार थोडासा गेला म्हणजे परमेशास्वरूप जीवास अगम्य आहे, अशी बुद्धीची भावना होऊ लागते.

याप्रमाणें धर्मकल्पनेच्या वंशावळीची हकीगत आहे. ती येथें विस्तारपूर्वक दाखविता आली नाही, आणि म्हणून ती पुष्कळांस दुर्बोध होण्याचा संभव आहे. पण त्या गोष्टीस इलाज नाहीं. येथें या विषयाच्या संबंधानें अधिक लिहिणें म्हणजे विषयांतर होणार आहे. शिवाय, हा विषय इतका विस्तृत आहे, व त्यासंबंधानें अलीकडे इतके शोध झाले आहेत कीं आज त्याविषयीं जी माहिती मिळण्यासारखी आहे, तिचा एक शतांश देण्यास सुधारकांचे पंधराचे पंधरा कॉलम दर आठवड्यास भरून काढले, तरी दोन वर्षांत ती सविस्तर दिली जाणार नाहीं! आतापर्यंत जें लिहिलें आहे, तेवढ्यावरून धर्मकल्पना प्रथम अस्तित्वांत येते कशी, पुढे तिचीं जीं रूपांतरें होतात तीं कोणत्या कारणांमुळें, व तिची मजल कोठवर जाऊन पोंचते-इतक्या गोष्टींचे स्थूल स्वरूप वाचकांच्या लक्षांत आले म्हणजे आमचें काम झालें. राज्यकल्पना व धर्मकल्पना यांच्या अभिवृद्धींत बराच फरक आहे. राजकीय संबंधानें राजसत्ता प्रथम एकाकडे असणें योग्य वाटत असून हळू हळू ती अनेकांकडे असणें योग्य वाटूं लागतें. एकसत्तात्मक, अनेकसत्तात्मक, व सर्वसत्तात्मक-अशी राजकीय कल्पनेची वाढ आहे. धर्मकल्पनेचा प्रकार हिच्या उलट आहे. देवतात्व प्रथम विश्वांतील सर्व वस्तूंत भासते; नंतर तें त्यांतील ठळक ठळक वस्तूंत भासूं लागतें; व अखेरीस तें फक्त एका वस्तूंत गोळा होतें! ज्यांना विश्वांतील सचेतन व अचेतन पदार्थांचे धर्म समजले आहेत; ज्यांची मूर्तिपूजेवरील भक्ति उडाली आहे: ज्यांना सृष्टीचा कर्ता सृष्टींतील कोणत्याही निर्जीव किंवा सजीव वस्तूहून निराळ्या तऱ्हेचा आहे, असें वाटूं लागलें आहे, ते या शेवटल्या कोटींत असतात; म्हणजे त्यांना या विश्वांचे एक आदिकारण आहे असें वाटत असून त्यांचे स्पष्ट ज्ञानही आपणांस आहे, किंवा करून घेता येईल असें वाटत असतें. जे लोक असें कारण असेल असें मानीत नाहींत, त्यांस वरील कोटींतले

लोक नास्तिक म्हणून त्यांचा तिरस्कार करतात, व त्यांस पतित मानतात, एका अंगाला नास्तिक म्हणजे बेधडक परमेश्वर नाहीं असे म्हणणारे थोडेसे लोक, व दुसऱ्या अंगाला एकच परमेश्वर आहे, व त्याच्या स्वरूपाचे आणि गुणांचे ज्ञान मनुष्यमात्रास करून घेता येतें इतकेंच नाही, तर तें करून घेणे, त्याला शरण जाणें, त्याला भजणें, त्याच्या इच्छेप्रमाणे वर्तन करणें हेच मनुष्यास योग्य आहे, व असे करणारे, मनुष्य जन्ममरणापासून मुक्त होऊन त्या ईशस्वरूपांत जाऊन मिळतात किंवा मोक्षाप्रत पावतात, असें मानणारे दुसरे लोक यांच्या दरम्यान कांही लोक आहेत. ते असें म्हणतात कीं, जगत्कारण आहे हे आम्हांस कबूल आहे, पण आमच्या सध्याच्या ज्ञानेंद्रियांनी त्याच्या स्वरूपाचें खरें ज्ञान आम्हांस कधीही होण्याचा संभव नाही. येथील कित्येक तत्त्ववेत्त्यांचा विचार येथपर्यंत येऊन ठेपला असून इतर सुधारलेल्या देशांतही अलीकडे हेंच मत प्रबल होत चाललें आहे. तेव्हा ईशस्वरूप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियास अगम्य आहे, हा धर्मसंबंधाचा शेवटचा सिद्धांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाही.

अन्य सामाजिक प्रवृत्तींचा कल

काहीं आठवडे दुसऱ्या विषयांच्या प्रसंगोपात्तत्वामुळे या विषयाकडे दुर्लक्ष करावें लागलें; त्यामुळें कदाचित् वाचकांस असें वाटलें असेल कीं, त्याचा शेवट न लावतां तो आम्ही कांही विशेष कारणासाठी अपुरताच सोडून दिला असावा. कित्येकांनी तर अशीही शंका घेतल्याचें आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, या विषयावर लिहीत असतां एकदोन ठिकाणीं जीं वादग्रस्त स्थलें आलीं व ज्याविषयीं निदान अप्रत्यक्ष रीतीनें तरी, तो थोडा स्पष्टपणे अभिप्राय देणें आम्हांस भाग पडलें, तो पुष्कळांस न रुचण्यासारखा असल्यामुळे, व तसें झाल्यास या नवीन वर्तमानपत्रास धक्का पोंचण्याची भीति वाटल्यामुळें, आम्ही कांही एक न बोलता हळूच त्याची वाट सोडून दिली, व बाकीच्या पत्रकर्त्यांप्रमाणें वाचकसमुदायास रुचतील असे सामान्य विषय घेऊन त्यांवर लिहूं लागलों ! ही दिव्य कल्पना कांही अंशी **सुधारक** थोड्या महिन्यांनी अजिबात बंद होणार, किंवा दुसऱ्या एखाद्या पत्राच्या बगलेत शिरणार म्हणून जी कंडी उठली होती, व कंडीखोराच्या कृपेनें जी कंडी पुन:ही उठण्याचा संभव आहे तिच्या माळेंतीलच आहे, असे म्हणण्यास हरकत नाहीं ! नेहमीं लोकांस आवडतील, म्हणजे ज्यांतील अभिप्राय सर्वथैव व सर्वदा सर्वांस पसंत पडतील असेच लेख **सुधारकांत** येत जातील, असे आम्ही कधीं कोठें लिहून किंवा बोलून गेल्याचे आम्हांस स्मरत नाहीं; व तसें करण्यापासून **सुधारकाच्या** नामार्थास सार्थकत्व येईल, असेंही वाटत नाहीं.

आता येवढें खरें आहे की, ज्याप्रमाणें कित्येक लोकांस आपल्या लेखावरून कांहीतरी मजा व्हावी, किंवा 'येन केन प्रकारेण' त्यांकडे वाचकांचे लक्ष वेधावें, अशासाठी ज्या बाबतीत सामान्य जनांच्या विचाराप्रमाणें आपले विचार असतां, त्यांहून ते उलट प्रकारचे आहेत असें दाखविण्यांत, किंवा ज्या गोष्टींत लोकांहून आपलें मत निराळें आहे. अशाविषयी तें त्यांच्यासारखेंच आहे, असे भासविण्यात मोठा पुरुषार्थ वाटतो; तसें करणें मात्र आम्हांस पसंत नाही. ज्या प्रश्नाविषयी विरोध नाहीं त्याविषयीं तो आहे, असें बुद्ध्याच प्रतिपादणे; व ज्याविषयी एकमत नाहीं त्याविषयी तो आहे, असें दाखविणें; या दोन्हीही गोष्टी अप्रामाणिकत्वदर्शक आहेत, आणि वर्तमानपत्र काढण्यात चरितार्थासाठी कांही तरी धंदा चालविता यावा येवढाच ज्यांचा हेतु असेल, त्यांशिवाय इतरांच्या हातून वरच्यासारखें अप्रामाणिकपणाचें वर्तन सहसा होणार नाही. याहून यासंबंधानें येथे अधिक पाल्हाळ करणे म्हणजे निष्कारण विषयांतर होणार आहे; सबब त्या दोषाची दिशा टाळून कांही दिवस खाली ठेवलेले विषयसूत्र पुनः हाती घेतो.

या विषयाचे राज्यविषयक, धर्मविषयक व अवांतर असे तीन भाग कल्पिले आहेत, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. यांपैकी पहिल्या दोहोंचे विवेचन आजपर्यंत बरेंच झालें आहे, तेव्हां आज अवशिष्ट राहिलेल्या भागांस हातीं धरण्यास हरकत नाहीं. पहिल्या भागाविषयीं शेवटची कल्पना सार्वत्रिक लोकसत्तेची, व दुसऱ्याविषयीं जगत्कारणाच्या अगम्यत्वाची आहे, हे वाचकांच्या ध्यानांत असेलच.

अवांतराच्या भागांत अर्थात् अनेक प्रकरणांचा समावेश होतो. पण विस्तारभयास्तव त्या सर्वांचा अगदी स्वल्प विचारसुद्धा येथें करतां येण्याचा संभव नाहीं. येथें त्या सर्वांस जी दिशा लागणार आहे तिचे दिग्दर्शन करून व पांच चार ठळक प्रकरणाविषयी चार शब्द लिहून, हें व्याख्यान समाप्त केलें पाहिजे. तेव्हा आतां राज्यविषयक व धर्मविषयक गोष्टीशिवाय ज्या इतर सामाजिक गोष्टी राहिल्या, त्यांस कोणती दिशा लागणार हे पहावयाचें. ज्यांनी मोठ्या समाजास प्राप्त झालेल्या स्थित्यंतरांचा इतिहास थोडासा वाचला असेल, त्यांना मनुष्याच्या सामाजिक व्यवहारांस कोणती दिशा लागत चालली आहे, हें सहज समजण्यासारखें आहे. अनियंत्रित राजांचा अंमल कमी होत जाणें, व सृष्ट्यंतर्गत सामर्थ्यांचे आपण गुलाम आहों, व त्यांच्या सर्वशक्तिमत्त्वापुढें आमचें काहीं एक न चालतां त्यांच्या इच्छेनुरूप आम्हांस निरंतर वागलें पाहिजें, या चुकीच्या कल्पनेचा लय होत जाऊन, मनुष्य प्रयत्न करील तर सृष्ट्यंतर्गत पदार्थांचे ज्ञान त्यास प्राप्त करून घेतां येऊन कालांतराने त्या पदार्थांसच त्यास आपले दास

करून घेतां येईल, असा विश्वास वाढत जाणें- या दोनच गोष्टींचा नीट विचार केला तरी बाकीच्या गोष्टींविषयी बरीच समजूत पडणार आहे. सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशी बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्यांच्या अंत:करणांत वागूं लागला, म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस आरंभ होतो. जोपर्यंत त्याच्या मनांत या वृत्तीचा प्रादुर्भाव झाला नाहीं तोपर्यंत त्याच्या हातून घडत असलेल्या क्रिया किंवा त्यांचे वर्तन बलात्कारानें, जबरदस्तीने किंवा सक्तीने होत असतें, असे म्हणण्यास हरकत नाही. अशा रीतीनें होत असलेले वर्तन केवळ वाईटच असेल असा नियम नाही. पुष्कळदा तें चांगलेंही असण्याचा संभव आहे. पण तें परप्रेरित असल्यामुळे त्याच्या चांगुलपणाची किंवा वाईटपणाची जबाबदारी त्या वर्तन करणारावर असत नाही. शिवाय, असें वर्तन बळजोरीने करविण्यांत तें करविणाऱ्यांचे विशेष लक्ष स्वहिताकडे असल्यामुळे, अनेक प्रसंगी ते करणाऱ्यांचे हित मुळींच साधत नाहीं. त्यामुळे जोपर्यंत कोणत्याही राष्ट्रांतील लोकसमूहांत स्थूल मानानें स्वामी आणि किंकर असे दोनच भाग होऊन राहिलेले असतात, तोपर्यंत त्यांत सुखावस्थेची परमावधि होण्याचा संभव नाहीं. स्वातंत्र्य हें स्वभावत: सुखावह, आणि पारतंत्र्य हें स्वभावत: दु:खावह असें आहे. पण मनुष्याच्या व कांहीं इतर प्राण्यांच्या शरिराची व मनाची घटना विशेष प्रकारची असल्यामुळे त्यांस आपले स्वाभाविक स्वातंत्र्य मर्यादित करून घेण्यांत व समाजावस्थेंत अवश्य असणाऱ्या पारतंत्र्याचा अंगीकार करण्यात दु:खाहून अधिक सुख प्राप्त होतें; आणि म्हणूनच तो कितीही त्रास सोसावा लागला तरी समाज सोडून जात नाही; पण यावरून असे सिद्ध होत नाहीं की, स्वभावत: सुखावह असें जें स्वातंत्र्य त्याचा आवश्यकतेबाहेर संकोच करून घेण्यांत कोणत्याही प्रकारचा फायदा आहे. पण चमत्कार असा आहे की, मनुष्य एकांतावस्था टाकून जसजसा समाजप्रिय होत जातो, तसतशी त्याची स्वातंत्र्यसक्तिही थोडीशी क्षीण होत जाते, व अखेरीस त्यास ही शुद्ध दास्यावस्थाही असह्य वाटेनाशी होते. पण ही त्याची अंत्यावस्था नव्हे. आपणांस जे स्वामी म्हणवीत असतात अशांचे दुष्ट वर्तन व त्यामुळें मनास व शरीरास वारंवार होणारी पीडा यामुळें अत्यंत सहनशील मनुष्यास आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची इच्छा उत्पन्न होते. एकदां या इच्छेनें त्याच्या अंत:करणांत बळकट मूळ धरलें की, त्याच्या उन्नतावस्थेत आरंभ झाला म्हणून समजावे. ज्यांना नेहमीं दुसऱ्यावर जुलूम करण्याची किंवा सक्तीचा अंमल बजावण्याची संवय असते, ते असें म्हणतात कीं, मनुष्य आप्पलपोटी प्राणी आहे; स्वहितासारखी त्याला दुसरी प्रिय वस्तु नाहीं; व कोणतीही गोष्ट करण्यांत

स्वहितसाधनाहून त्याचा अन्य हेतु असत नाहीं. जुलमी लोकच अशा तत्त्वशास्त्राचे प्रतिपादक व प्रसारक असण्याचें कारण असें की, एक तर ज्या वृत्तीच्या धोरणानें त्यांचे वर्तन अहोरात्र होत असतें त्या वृत्तीशीं इतर वृत्तीपेक्षा त्यांचा विशेष सहवास असल्यामुळे त्यांच्या डोळ्यापुढें सर्वत्र तीच दिसत असते; व आपल्या अंत:करणाप्रमाणें इतरांच्या अंत:करणांतही तिचेंच साम्राज्य असेल अशी त्यांची भावना होते. दुसरें असें की त्यांच्या जुलमास कंटाळलेले व त्रासलेले लोक संतापून जाऊन स्वसंरक्षणासाठी हवें तें धाडस करण्यास प्रवृत्त होत असतात. त्यामुळें त्यांना आसमंतातील सर्व सचेतन जगत् स्वार्थपरायण होऊन आपल्या नाशास उद्युक्त झाले आहे असें वाटत असतें, व आपणच त्यांच्या संतापाचें व धाडसांचे आदिकारण आहो यांचे भानही नाहींसे होतें! परंतु स्वातंत्र्याचा उपभोग प्राप्त होत असलेल्या मनुष्यांचे वर्तन ज्यांनी थोडया काळजीनें पाहिलें असेल त्यांना असें दिसून आलें असेल की, स्वातंत्र्याचा नित्य अनुभव घेणारा मनुष्य स्वहितपरायण असत नाहीं. इतकेंच नाहीं, तर बराच परोपकारी, निदान परहितचिंतक तरी असतो. आपल्या श्रमाचें सारें फल आपणासच उपभोगावयास सांपडावें, ही मनुष्याच्या अंत:करणाची पूर्णावस्था नव्हे; त्या फलाची हवी तशी व्यवस्था लावण्याची मोकळीक आपणास असावी, ही त्याची आकांक्षा असते; व ही जसजशी परिपूर्ण होत जाते तसतशी त्याची स्वार्थबुद्धि क्षीण होत जाऊन तो पराकाष्ठेचा परहितैषी होत जातो. तात्पर्य काय कीं, बलात्कार, जबरदस्ती, बळजोरी, शक्ति इत्यादि शब्दांनी व्यक्त होत असलेल्या अर्थांच्या व्यवहारांपासून मनुष्याच्या सुखास पूर्णावस्था येण्याचा संभव नसल्यामुळें तसले व्यवहार नाहीसे होत असून त्यांच्या जागीं समय, संमति, अनुरोध, रुकार, पसंती इत्यादि शब्दांनी व्यक्त होत असलेल्या अर्थांच्या व्यवहारांचा प्रचार सर्वत्र पडत आहे. तेव्हां येथून पुढें राजा व प्रजा; कुलेश व कुलावयव; पति आणि पत्नी; मातापितरें व अपत्यें; स्वामी आणि सेवक; गुरु आणि शिष्य; विक्रेता आणि ग्राहक, यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलत्कारानें न होता संमतिपूर्वक होत जाणार आहेत.

बलात्कार विरुद्ध संमति

मागल्या लेखांत असे सांगितलें आहे कीं, जों जों मनुष्यांची सुधारणा होत जाते तों तो त्यांच्या अन्योन्यव्यवहारांतील बलात्काराचें तत्त्व लयास जाऊन त्याच्या जागीं संमतितत्त्व प्रस्थापित होतें; व या कारणास्तव येथून पुढें राजा व प्रजा, कुलाधिपति व कुलावयव, पति व पत्नी, मातापितरें व अपत्यें, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेत आणि ग्राहक यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्काराने न होतां, संमतिपूर्वक होत जाणार आहेत.

मनुष्याचें स्वछंदी वर्तन दोन प्रकारांनी विघातक होण्याचा संभव असतो; एक दुसऱ्याला; आणि दुसरें त्यांचे त्याला. जर कोणत्याही व्यक्तीची वागणूक त्याची त्याला किंवा दुसऱ्याला अपायकारक होण्याचा संभव नसेल तर त्याला ती हवी तशी करूं देण्यास प्रत्यवाय कशासाठी करावा, हे समजत नाहीं. आता येवढें खरें आहे कीं, हें वर्तनतत्त्व अशा भावार्थानें किंवा विविक्तत्वानें सांगितलें असतां ते कळण्यास सुलभ व आचरण्यास सुकर असें वाटतें. पण नित्य व्यवहारांस तें लावूं लागलें असतां फार अडचणी येतात. कारण ज्याप्रमाणें प्राण्यांच्या शरीरांतील अवयव निराळे आहेत, व त्यांना पृथक् कामें करावी लागतात, तरी त्या सर्वांना एकमेकांवर कमी अधिक अवलंबून असावे लागून एकमेकांस सहाय्यभूत व्हावें लागतें. त्याप्रमाणें समाजाचे अवयवही जरी निराळे आहेत, आणि ते पृथक् कामें करीत असतात, तरी त्यांचे एकमेकांवर अवलंबन असून त्यांना एकमेकांस साहाय्यभूत व्हावे लागतें; आणि असें न होईल तर, ज्याप्रमाणें शरीरांतील चैतन्याचा लय होऊन त्याबरोबर सर्व अवयवांचा नाश होईल, त्याप्रमाणें समाजाचे अवयवही एकमेकांस साहाय्य न करतील तर समाजाची वाताहत होऊन प्रत्येकास आपापल्या चरितार्थासाठी व संरक्षणासाठी खुद्द स्वतःवर अवलंबून रहावें लागेल. व्यक्तीच्या शरीरांतील अवयवांत आणि समाजाच्या शरीरांतील अवयवांत एक मोठा भेद आहे तो हा कीं, ज्याप्रमाणें समाजाच्या प्रत्येक अवयवास ज्ञान, संवेदन, इच्छा इत्यादि मनोधर्म पृथक्त्वाने असल्यामुळे सुखदुःखाचा अनुभव प्रत्येकास होत असून, ते संपादण्याविषयीं किंवा टाळण्याविषयीं प्रत्येकाचा प्रयत्न निरंतर चालू असतो, त्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील प्रत्येक अवयवाची स्थिति नाही. त्यांपैकी प्रत्येकास मन नाहीं. त्या सर्वांचे व्यापार नीट चालणें ही गोष्ट ज्या एका व्यक्तीचे ते अवयव आहेत त्या व्यक्तीस कल्याणकारक आहे. समाज हा काल्पनिक पुरुष आहे. समाजांचे कल्याण म्हणजे या काल्पनिक पुरुषाचें कल्याण नव्हे; तर त्याच्या अवयवांचे कल्याण होय. व्यक्तीची तशी गोष्ट नाहीं. व्यक्तीच्या अवयवांस स्वतंत्र मन नसल्यामुळें व्यक्तींचे कल्याण तेंच त्यांचे कल्याण होय. व्यक्तिशरीर आणि समाजशरीर यांतील या महत्त्वाच्या भेदामुळे त्याविषयी विचार करताना व लिहिताना ही गोष्ट नेहमी डोळ्यापुढें ठेवावी लागते कीं, व्यक्तीच्या अवयवांच्या हितासाठी जे नियम घालावयाचे ते वास्तविक पहातां; ते ज्या व्यक्तीचे अवयव असतील त्या व्यक्तीच्या हितासाठीं असतात; व समाजाच्या हितासाठी जे नियम करावयाचे तें वास्तविक पहातां, समाजाच्या अवयवांच्या हितासाठी असतात. तेव्हां व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं, समाजाचें हित साधलें म्हणजे झालें, असें बोलणें

म्हणजे असंबद्ध प्रलाप करण्यासारखें होय; कारण व्यक्तींच्या हिताहून निराळं असें समाजाचें हित नाही. तथापि अशा अर्थाचीं वाक्यें नेहमी उच्चारण्यात येतात, व तीं चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडून येतात; तेव्हा वरील अर्थाहून त्यांचा कांही तरी भिन्न अर्थ असला पाहिजे. सूक्ष्म विचारांती असें दिसून येईल कीं, जेव्हा अशा प्रकारचे लोक समाजाच्या हिताविषयी कळकळ व व्यक्तींच्या हिताविषयी उदासीनता दाखवितात. तेव्हां त्यांचा खरा भावार्थ असा असतो कीं, समाज म्हणजे त्यांतील बहुतेक किंवा निदान प्रमुख लोक. व्यक्तींच्या फायद्याची परवा करण्याची गरज नाही, म्हणजे कोणत्याही गोष्टीमुळें पुष्कळांचे कल्याण होत असून थोड्यांस पीडा होत असेल तर ती बेधडक करण्यास हरकत नाहीं. कित्येकजण हा स्थूल अर्थ संकुचित करून, राष्ट्राच्या राजाचें किंवा समाजाचें कल्याण असा विशिष्ट अर्थ करतात. अशा अर्थानुरोधानें ज्या समाजांत वर्तन होत असतें, त्यांत एका पक्षाकडे संपत्ति आणि सत्ता, व दुसऱ्याकडे दारिद्र्य आणि दास्य, अशी वाटणी झालेली असते. अशा समाजांतील सामान्य लोकांस शुद्ध वन्यावस्थेतील सुखाहून अधिक सुख होत असेल असें जरी मानितां आलें, तरी त्यांत त्यांचे पूर्ण समाधान होण्यासारखें ते नसलेंच पाहिजे. हें उघड आहे. प्रत्येकाने पशूप्रमाणे रानोमाळ फिरत असावें, यापेक्षा ओबडधोबड समाजरचना होऊन काहींनी स्वामी व कांहींनी किंकर व्हावें, ही स्थिति बरी. कारण कशा तरी रीतीनें समाज एकवार अस्तित्वात आल्याशिवाय, त्यांतील अवयवास त्यापासून होणाऱ्या सुखाचा लाभ होऊ लागणें अशक्य आहे. पण मनुष्यें समाज स्थापूं लागल्याबरोबर त्यात जी शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्यांचे इतरांहून श्रेष्ठ असतील त्यांच्या हातीं सत्ता व बहुतेकांच्या श्रमांचे फळ जाणें अगदी स्वाभाविक आहे. तेव्हा समाजाच्या प्रथमावस्थेंत जें सामर्थ्यवान असतील त्यांच्या हाती सत्ता असणें व दुर्बलांना दास्य करावें लागणें, हें ज्या दिशेकडे उतार असेल त्या दिशेस पाण्याचा ओघ जाण्यासारखें होय. हा ओघ बंद करून सर्वांस सारखें, निदान होईल तितकें सारखें, सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणें, म्हणजे सुधारणा होत जाणें असें म्हणण्यास हरकत नाहीं, ज्या देशांत अशी व्यवस्था होऊं लागली नाहीं, त्या देशांत खऱ्या सुधारणेस आरंभ झाला नाहीं, व तेथे पुढे झालेल्या कवींनी आपल्या पूर्वजांच्या स्थितीचे काल्पनिक चित्र कितीही मनोरम काढलें असले तरी, त्याकडे जो इतिहासदृष्टीनें पाहील त्याला त्यांत बरेच मिथ्यात्व भासल्याशिवाय राहणार नाहीं. रानटी स्थितींतील तत्त्वशोधकास, भ्रामक व मिश्र रंगांचे पृथक्करण करून मूळ रंग कसे आहेत हें स्पष्टपणें प्रतीतीस आणून देणाऱ्या विचाररूप उपनेत्रांचें साहाय्य असल्यामुळें, असें स्पष्ट दिसून येतें कीं, ज्या काव्यांत, पुराणांत, किंवा

कोणत्याही प्रकारच्या दुसऱ्या ग्रंथांत कवींनी किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या लेखकांनी राजांचे जें हित, ते समाजाचे हित, किंवा समाजांतील विशिष्ट वर्गाचें जे हित ते समाजाचे हित, असें प्रतिपादण्याचा प्रयत्न केला असेल तें काव्य, ते पुराण, किंवा तो ग्रंथ वाचण्यास कितीही रसाळ असला तरी ऐतिहासिक दृष्टीनें त्यावरून त्या वेळची समाजाची स्थिति सुधारलेली नसावी, त्यांत बलात्काराचा बराच अंमल चालत असावा, स्वातंत्र्यसुखाचा अनुभव फार थोड्यांस होत असून बाकीच्यांस दास्यत्वाचे कष्ट सोसणें भाग पडत असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. तात्पर्य काय कीं, समाजाच्या आद्यस्थितीत बहुतेक व्यवहार बलात्कारानें होत असतात; आणि म्हणून त्याच्या सर्व अवयवांस सुखाचा सारखा वाटा मिळत नाहीं., तो मिळू लागण्यास ते व्यवहार समाजघटकांच्या अन्योन्यसंमतीने होऊ लागले पाहिजेत. हे संमतितत्व प्रस्थापित होण्यास फार काल लागतो व मोठी यातायात पडते. कारण कोणतीही गोष्ट दुसऱ्याच्या संमतीने करणें, म्हणजे ती संमति देण्याचे किंवा न देण्याचें स्वातंत्र्य त्याकडे असणें अवश्य आहे. अशा प्रकारचे स्वातंत्र्य प्रत्येक वयांत आलेल्या मनुष्यास उपभोगण्यास मिळणें, म्हणजे त्याहून वयांत आलेल्या इतर लोकांची अशी खातरी होऊन जाणें कीं, प्रत्येक सुजाण इसमास आपापल्या समजुतींप्रमाणें जें वाटेल ते करण्याची व वाईट वाटेल तें न करण्याची मोकळीक देण्यातच समाजाचे हित आहे. पण अशी समजूत एकाएकी कोठून होणार? ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागाच्या वर्तनाचा संबंध इतर भागांशी मुळीच नाही असे होऊं शकत नाही, त्याप्रमाणे समाजांतील कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनाचा संबंध साक्षात् किंवा परंपरेनें इतर व्यक्तींस थोडाबहुत पोचत नाही, असें होऊ शकत नाही. या बाबतीत व्यक्तीच्या शरीराच्या आणि समाजाच्या शरीराच्या स्थितींत फार साम्य आहे. ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरास कोणत्याही भागास झालेल्या दुखापतीचा परिणाम सर्व शरीरभर पसरतो, त्याप्रमाणें समाजांतील कोणत्याही स्थितींतला इसम घेतला तरी त्याच्या प्रत्येक कृत्याचा बरावाईट परिणाम सर्वांस जाऊन पोहोचतो, असें सहज दाखवितां येईल. येवढे खरें आहे कीं, तो इसम अगदी क्षुद्र असला तर त्याच्या वर्तनाचा परिणामही अगदी क्षुद्र होईल; पण क्षुद्र तरी झालाच पाहिजे, मुळींच होत नाही असें कधींही म्हणतां येणार नाहीं. जमीनीवर जेवढ्या जोरानें आपण चालतो तेवढ्या जोरानें पायाखालची जमीन खालीं जात असते; किंवा जेवढ्या जोराने आपण पर्वतास टिचकी मारतों तेवढ्या जोरानें पर्वत मागें सरतो;- या पदार्थशास्त्रांतील गोष्टी जशा नाकबूल करतां येणार नाहींत, त्याप्रमाणेंच समाजावर घडत असलेल्या व्यक्तीच्या वर्तनाची गोष्ट होय. पाण्यांत टाकलेल्या

खड्यानें त्याच्या परमाणूंस आघात होऊन उत्पन्न होणाऱ्या व पसरत जाणाऱ्या वर्तुळाप्रमाणें व्यक्तीच्या वर्तनाची गोष्ट आहे. त्या वर्तनाचा समाजावर जो परिणाम होतो तो त्या वर्तनांचे स्वरूप, समाजाची स्थिती, काल, आणि अंतर यांच्या प्रमाणांत असतो. या चार गोष्टींनी तो मर्यादित होत असल्यामुळें, कित्येक प्रसंगी तो अगदी सूक्ष्म असतो. तथापि तो मुळींच होत नाहीं, असें नसल्यामुळें एका व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तनाविषयीं उदासीन होतां येत नाहीं. कारण उदासीन होणें म्हणजे त्या वर्तनापासून स्वतःवर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष करण्यासारखें होय. तेव्हा समाजातील मनुष्यें एकमेकांच्या वर्तनाकडे लक्ष देणार, व आपापल्या समजुतींप्रमाणे दुसऱ्यास वागविण्याचा प्रयत्न करणार, व करीत आलीं आहेत, असें विचारानें आणि इतिहासावरून दिसून येते. दुसऱ्याच्या वर्तनाचा आपणावर जो परिणाम होतो तो आपणास सुखकर व्हावा, म्हणून मनुष्यांनें दुसऱ्याच्या वर्तनास आपल्या मर्जीप्रमाणें वळण लावण्याचा केलेला जो प्रयत्न; त्यामुळें समाजाच्या आद्य स्थितीत बलात्कारत्व प्रस्थापित होतें, व उत्तरोत्तर त्या तत्त्वांचे अनुसरण करण्यांत आपलें व्हावें तितकें हित होत नाहीं, अशी सर्वांची खात्री होत जाऊन त्याचा ऱ्हास होऊं लागतों; आणि त्याच्या जागीं संमतितत्त्व रूढ होऊं लागतें. अशा प्रकारचे वर्तनतत्त्वांतर आमच्या देशांत कसें व किती होत आलें आहे, हें पुढल्या खेपेस पांच-चार ठळक उदाहरणांनी दाखवून जमल्यास सांप्रत विषयाच्या या भागाचा निरोप घेऊ.

नवरा-बायको

समाजाचे मुख्य घटक कुटुंबे होत, व कुटुंबाचे मुख्य घटक स्त्रीपुरुष होत. तेव्हां कुटुंबाचा विचार करताना प्रथम स्त्रीपुरुषांमधील संबंधाचा विचार केला पाहिजे. हाच विचार प्रथम करण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, ज्याप्रमाणें अन्नसेवनानें व्यक्तींचे पोषण होऊन तो जिवंत राहतो, त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या समागमाने जातीचे पोषण होऊन ती अस्तित्वांत रहाते. व्यक्तीच्या अस्तित्वास जसें अन्न, त्याप्रमाणें समाजाच्या अस्तित्वास कशा तरी प्रकारचें लग्न आवश्यक आहे. तेव्हा समाजाच्या अस्तित्वासच जी गोष्ट अपरिहार्य आहे, तिचाच विचार प्रथम करणें योग्य आहे.

सांप्रत कालीं या देशांतील उंच जातींतल्या लोकांतही स्त्रीपुरुषांचे जे संबंध आहेत, ते फार समाधानकारक आहेत असे नाहीं. त्यांत सुधारणा करण्यास पुष्कळच अवकाश आहे. इंग्लंड किंवा अमेरिका यासारख्या फार पुढें गेलेल्या देशांतील स्त्रीपुरुषांचे संबंध पाहिले म्हणजे आमचा मागसपणा आमच्या डोळ्यांपुढे ढळढळीत उभा राहून तो नाहीसा करण्याविषयीं आम्ही पराकाष्ठेचे उत्कंठ होतों

आणि त्यांच्या गृहस्थितीप्रमाणें आमची गृहस्थिति केव्हा होईल म्हणून विचार करूं लागतों. युरोपिअन किंवा अमेरिकन लोकांतील कुटुंबांची स्थिती सर्वांशी निर्दोष आहे, किंवा तींतील प्रत्येक गोष्ट आम्ही अनुसरण्यासारखी आहे असें आमचें म्हणणे नाही. तथापि त्या लोकांच्या कुटुंबस्थितीहून आमची कुटुंबस्थिति शतपटीनें बरी व त्या लोकांनीच आमचें अनुकरण करणे योग्य आहे, असें जे कित्येक मिथ्या देशाभिमान्यांचे म्हणणें आहे, तें मात्र आम्हांस संमत नाही. दोष वर्ज करतां एकंदरीने युरोपीय किंवा अमेरिकन कुटुंबस्थिती आमच्याहून श्रेष्ठ आहे, व आम्ही कितीही कांकू केले तरी विद्याप्रसार होत जाईल त्याप्रमाणे आमची कुटुंबेही त्याच वळणावर जाणार; याबद्दल आम्हांस बिलकुल शंका नाही. मनुष्यसुधारणेची अत्यंत परिणत तत्वें आज युरोपांत दृष्टीस पडत आहेत. व ज्या देशांस आपली सुधारणा करून घ्यावयाची असेल त्यास देशकालानुरोधानें त्याच तत्त्वांचा कमी अधिक अंगीकार केला पाहिजे; आणि हे जर बरोबर असेल तर विवाहसंबंधानेंच युरोपीय लोकांचा कित्ता आम्ही घेणार नाहीं, असे म्हणून कसे चालेल, हे आम्हांस समजत नाहीं. या गोष्टींच्या संबंधाने त्यांच्यात जेवढें कांहीं त्याज्य आहे तेवढें टाकणे बरोबर आहे. पण जेवढे चांगले आहे (आणि तेच पुष्कळ आहे) तेवढे उचलण्यास हरकत नाही, आणि उचललेच पाहिजे; कारण विवाहपद्धतीची सुधारणा करावयाची असेल तर त्यांच्या विवाहपद्धतीत जेवढा चांगला भाग आहे, तेवढा उचलण्याशिवाय ती करण्याचा दुसरा मार्ग नाही.

येवढ्यावरून असें कोणी समजूं नये की, युरोपीय विवाहपद्धति पूर्णावस्थेप्रत पावली आहे. विवाहपद्धतीचशी काय, मनुष्यांच्या संस्थांपैकी कोणतीच संस्था अजून सुष्ठुतेच्या पूर्णत्वास गेली नाहीं, असे आम्हांस वाटतें. आमचें इतकेंच म्हणणे आहे की, एकंदरीने युरोपीय लोकांची विवाहपद्धती बरी आहे, व आम्हीही हळू हळू तिच्याच वळणावर जाणार. ती आमच्यापेक्षां बरी आहे; पण आमचीही अगदी रानटी आहे असें नाहीं. दहा वर्षांच्या आंतील मुलीची लग्नें लावून त्यांस आईबापें हव्या तसल्या नवऱ्यांच्या माथीं मारतात; शरीरयष्टीची धनुकली झालेले वृद्ध कपी

परोपकाराय भवेदवश्यं । वृद्धस्य भार्या करदीपिकेव ।।

या सुभाषितास यथार्थत्व आणण्यासाठी आठ नऊ वर्षांच्या मुलीशी लग्न लावून प्रपंचास पुन: आरंभ करण्याचा आव घालतात; लग्न म्हणजे काय वस्तु आहे हेही ज्यांस कळलें नाहीं अशांस त्या पाशांत गुंतावें लागून दुर्दैवानें तो तुटला म्हणजे नैसर्गिक मनोविकारापासून व समाजकृत अनेक प्रतिबंधांपासून होणारा छल आमरण सोसावा लागतो; अल्प वयांत पारतंत्र्य आल्यामुळें व संसाराची गोणी

पाठीवर बसल्यामुळें, उपयुक्त ज्ञानाचा संग्रह करण्यास, शरीराची वाढ पूर्ण होऊ देण्यास, ज्याच्याशीं किंवा जिच्याशीं सारा जन्म कंठावयाचा, त्याचा् किंवा तिचा स्वभाव, रूप, योग्यता वगैरे पाहण्यास वधूवरांस मुळींच मोकळीक नाहीं, इत्यादि गोष्टी अत्यंत शोचनीय आहेत, त्यांत बलात्काराचा पुष्कळ भाग आहे, आणि तो काढून टाकण्याविषयीं प्रत्येक देशहितेच्छूनें व परसुखचिंतकानें प्रयत्न केला पाहिजे, हें उघड आहे. तथापि या संबंधाचा पूर्वापार इतिहास पाहिला असता असे दिसून येईल कीं, रानटी लोकांत स्त्रियांस जे कष्ट भोगावे लागतात, व त्यांवर जो बलात्कार होतो, त्यापुढें आमच्या स्त्रियांवर होत असलेला बलात्कार आणि त्यांना भोगावे लागत असलेले कष्ट हे कांहींच नाहीत. जातीच्या अस्तित्वास अत्यंत अवश्य जो स्त्रीपुरुषांचा समागम तो आजपर्यंत एकंदरीत तीन प्रकारांनी घडून आला आहे १ला. पुरुषांनी स्त्रिया जिंकून किंवा चोरून मिळवायच्या; २ रा. स्त्रिया बापापासून किंवा इतर पालकांकडून विकत घ्यावयाचा; ३ रा. स्त्रीपुरुषांचा विवाह त्यांच्या संमतीनें व्हावयाचा. हे तीनही प्रकार हिंदुस्थानांत एकेवेळी अस्तित्वांत होते, व अजूनही कमी अधिक प्रमाणानें आहेत. गोंड वगैरे जे रानटी लोक आहेत त्यांत बायका चोरण्याची पद्धत अजूनही थोडीबहुत दृष्टीस पडते. मुलींचा विक्रय तर हिमालयाच्या पायथ्यापासून कन्याकुमारीपर्यंत प्रत्येक दिवशीं होत आहे. मुलीच्या बापास बरीच किंमत दिल्याशिवाय उतारवयाच्या बिजवराला नवरी मिळत असेल असे वाटत नाही. लग्नाचा तिसरा प्रकार मात्र आमच्या देशांत फारसा दृष्टीस पडत नाहीं, वधूस वर व वरास वधू पसंत होऊन मग त्यांच्या गाठी बांधल्या जाव्या, हा जो विवाहाचा प्रशस्त प्रकार; तो पुराणांत व संस्कृत नाटकांत मात्र कित्येक स्थळी पाहण्यांत येतो, आणि 'स्वयंवर' म्हणून जो शब्द आपल्या कानीं वारंवार पडतो, त्यावरून काही अंशी अशा तऱ्हेची विवाहपद्धति लोकांस एकदां थोडीबहुत प्रशस्त वाटली असावी, असें दिसतें. पण येवढ्यावरून त्याविषयी कोणत्याही प्रकारचे निश्चयात्मक अनुमान करता येत नाही. कारण ज्या देशांत किंवा जातींत खऱ्या स्वयंवराची किंवा संमतिपूर्वक विवाहाची चाल आहे किंवा होती असें म्हणतां येईल, त्या देशांत किंवा त्या जातींत बहुभार्यत्वाची चाल असण्याचा संभव नाहीं. तरुण वधूस संमत असेल तो वर वरण्याची परवानगी असेल तर जो पांच-चार बायका आधींच करून बसला आहे, व सहावींचे पाणिग्रहण करूं पहात आहे अशास ती कधींही वरणार नाही; हें स्पष्ट आहे; बहुभर्तृकत्व आणि बहुभार्यत्व या विवाहपद्धति ज्या देशांत बायका चोरून आणण्याचा किंवा विकत घेण्याचा प्रघात असतो; त्यांत विशेष दृष्टीस पडतात. संमतितत्त्वास अनुसरून विवाह होऊं लागले म्हणजे एकपत्नीकत्वच

स्थापित झालें पाहिजे. बहुभर्तृकत्व आणि बहुभार्यत्व ही स्त्रियांच्या निकृष्ट अवस्थेचीं व त्यावर होत असलेल्या बलात्काराची उत्तम दर्शक आहेत. पराराष्ट्राशीं लढाई करून जय झाला असतां, धरून आणिलेल्या कैद्यांपैकी पुरुषांस मारून टाकून, मुलांस व बायकांस विकण्याची चाल पूर्वी सर्वत्र प्ररूढ होती. या चालीमुळेंच बहुपत्नीक विवाह होऊं लागले असावे, असें दिसतें, बहुभर्तृकत्वापेक्षां बहुभार्यात्वाची चाल बरी आहे, व बहुश: पहिल्या चालीचा लय होऊं लागला म्हणजे दुसरी अस्तित्वांत येते असें म्हणण्यास हरकत नाही; पण या दोनही अप्रशस्त चाली एकाच कालीं एका देशांत किंवा जातींत असूं शकणार नाहींत, असें म्हणता येणार नाही. ज्या द्रौपदीस कवींनी महापतिव्रता करून सोडिलें आहे, व जिला पांच पांडवांकडे आळीपाळीनें जावें लागत असे, त्याच द्रौपदीच्या नवऱ्यांपैकी एकानें सुभद्रा नांवाची बलरामभगिनी कपटाने काढून नेऊन बलात्कारानें आपली बायको केली होती! याच नरपुंगवाचा साथी जो भगवान श्रीकृष्णपरमात्मा; त्यानें अर्वाचीन चट्साऱ्या सुलतानांस हटवून टाकिलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं! या वृंदावनस्थ जारशिरोमणीनें अथवा "शिनळानें" सोळा सहस्र व्रजनारींस आपल्या जनानखान्यांत आणून टाकिलें होतें! तुर्कस्थानच्या सुलतानाच्या जनानखान्यात सोळाशें कामनयना असतील किंवा नाहीं याची शंका आहे! सारांश, आपल्या महाभारताकडे जे कोणी ऐतिहासिक दृष्टीनें पहातील, त्यांना या देशांत फार प्राचीन काळीं आर्यस्त्रिया पुष्कळ नवरे करीत व आर्यपुरुष पुष्कळ बायका करीत; आणि या बायका चोरून, मारामारी करून, अथवा किंमत देऊन मिळविण्याची चाल असे, असें सिद्ध करून दाखविण्यास त्यांत हवा तितका पुरावा सांपडणार आहे; तसेंच या कालापूर्वी, म्हणजे बहुभर्तृकत्वाची आणि बहुभार्यत्वाची चाल पडण्यापूर्वी, स्त्रीपुरुषांच्या संबंधास कोणत्याही प्रकारचा आळा नसे, व अगदीं जवळच्या आप्तांशींही पतिपत्नीचा संबंध ठेवण्यास शंका वाटत नसे, हें ब्रह्मदेवादिकांच्या आख्यायिकांवरून स्थापित करतां येण्यासारखें आहे. अशा स्थितींत स्त्रियांवर किती जुलूम होत असेल, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ही स्थिती नाहींशी होऊन बहुभर्तृकत्वाची चाल पडली तरी स्त्रियांच्या स्थितींत म्हणण्यासारखा बदल होत असेल असें वाटत नाहीं; कारण पांचचारजणांनी एक बायको राखणें, किंवा पांचपंचविसांनी पांचचार बायका राखणें, म्हणजे कोणत्या तरी कारणांनीं समाजांत स्त्रियांची तूट पडत असली पाहिजें, किंवा बऱ्याच स्त्रिया अविवाहित रहात असल्या पाहिजेत असें मानणें भाग पडतें. अनेक स्त्रिया अविवाहित रहात असल्यामुळें विवाह करणाऱ्या स्त्रियांस अनेक नवरे करावे लागत असतील, ही कल्पना बरोबर नाहीं; कारण अशी कल्पना करणें म्हणजे

स्त्रियांस स्वातंत्र्य असतें, असे मानावें लागतें. पण समाजाच्या अशा स्थितींत तें स्वप्नांत सुद्धां असण्याचा संभव नाही. तेव्हा स्त्रियांची तूटच पडत असावी, असें मानणें जरूर आहे. ही तूट दुष्काळाच्या भयानें मुली मारून टाकण्याच्या प्रघातामुळें पडत असो, किंवा प्रबल शत्रूंनीं चाल करून बायका पळवून नेल्यामुळें पडत असो; या किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या काहीं कारणांनी ती पडत असली पाहिजे यांत संशय नाहीं. याच्या उलट ज्या स्थितींत बहुभार्यकत्वाची चाल रूढ असते, त्या स्थितींत शत्रूकडील बायका लुटून आणिल्यामुळें, किंवा पुष्कळ पुरुष अविवाहित रहात असल्यामुळें स्त्रिया फाजील होत असाव्या, हें उघड आहे. तथापि यासंबंधानें येवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ज्या ठिकाणी बहुभार्यकत्वाची चाल पूर्णपणे रूढ असेल तेथेंही फार थोड्यांसच पुष्कळ बायकांशी विवाह करण्यास सांपडत असेल. पुष्कळ बायकांशी विवाह करून त्यांपासून होणाऱ्या विपुल संततीचे संगोपन करण्यास विपुल संपत्ति पाहिजे; व ज्याअर्थी अशी संपत्ति कोणत्याही देशांत फारच थोड्यांच्या वांट्यास येते, त्या अर्थी अशा प्रकारची सुलतानी चैन करण्याचें भाग्य फारच थोड्यांस प्राप्त होत असेल हें उघड आहे. बहुभार्यत्व हें स्त्रीविक्रयाचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. बालविवाहावरून कन्येचा आणि पुत्राचा विक्रय करण्याचा हक्क आईबापांस आहे, असें अप्रत्यक्ष रीतीनें सिद्ध होतें. सारांश, आतांपर्यंत विवाहप्रकरणांत आमच्या देशांत एका किंवा दुसऱ्या रूपानें बलात्कारतत्त्वच अंमल गाजवीत आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. तथापि थोड्या वर्षांत हें मागें पडून संमतितत्त्व तत्स्थानापन्न होईल अशी चिन्हें अलीकडे उपस्थित झालेल्या सामाजिकविषय वादविवादावरून दिसूं लागलीं आहेत.

कुटुंब

मागल्या लेखांत कुटुंबाचे मुख्य अवयव जे पति आणि पत्नी, त्यांमधील संबंधाचें विवेचन करून असें दाखविलें कीं, जोपर्यंत समाजाची स्थिति रानटी असते, एका समाजाच्या इतर समाजांशीं वारंवार लढाया होत असतात, व बहुतेक व्यवहार बलात्कारानें होत असतात, तोंपर्यंत स्त्रियांची स्थिती सुधारत नाहीं. त्यांना गुलामांप्रमाणें काम करावें लागतें इतकेंच नाहीं, तर समाजांतील अनेक पुरुष लढाईत पडत असल्यामुळें, व दुसऱ्या समाजांतील बायका कैद करून किंवा पळवून आणण्याची चाल असल्यामुळे स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येहून फार मोठी होते, व त्यामुळें ज्याच्या अंगी पोसण्याचें सामर्थ्य असेल त्यालाच हव्या तितक्या बायका करतां येतात. हें बहुभार्यकत्व प्रत्येक देशाच्या पूर्वइतिहासांत दृष्टीस पडतें. बहुभार्यकत्वाबद्दल आमची निर्भर्त्सना करणारे जे युरोपिअन लोक

त्यांतही ही चाल एकदा प्ररूढ होती; पण त्यांच्यांतून ती आम्हांपेक्षां फार लौकर नाहींशी झाली. ती नाहींशी होण्यास मुख्य कारण बलात्काराचा ऱ्हास आणि समताप्रस्थापक संमतितत्त्वाचा उदय. लढाया कमी होऊन स्त्रीपुरुषांची संख्या सारखी होऊं लागली, व उद्योगवृद्धि होऊन श्रमविभागाची आणि श्रमानें उत्पन्न केलेल्या जिनसांची अदलाबदल करण्याची पद्धत पडूं लागली, म्हणजे एकपत्नीक विवाह अधिकाधिक होत जाऊन स्त्रियांवर कमी बलात्कार होऊं लागतो. समाजांत ज्यांच्याकडे लढाईसारखी मर्दुमकीचीं कामें असतात, किंवा ज्यांच्या पदरी पुष्कळ संपत्ति असते, तेवढेच काय ते अरेराव बनून जाऊन हव्या तितक्या बायका करतात किंवा अंगवस्त्र ठेवतात; इतरांस एकेका बायकोवर निर्वाह करावा लागून प्रपंचव्यवस्था बऱ्याच अंशी तिच्या धोरणानें व संमतीनें करावी लागते.

याप्रमाणें, समाजाच्या स्थित्यंतराप्रमाणें कुटुंबातील मुख्य अवयव जे पति आणि पत्नी त्यातील संबंधांत अंतर होत असतें, हें इतक्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यांनांत स्पष्टपणे आलें असेल. तेव्हा आता पतिपत्नीचा पृथक् विचार करणें सोडून सर्व कुटुंबाचा विचार करूं लागण्यास कांहीं हरकत नाहीं.

ज्याप्रमाणें इंग्लंडांतील विद्वान लोकांस त्याप्रमाणें येथील विद्वान लोकांसही **सर हेनरी मेन** यांचे नांव अवगत आहे. हा गृहस्थ पराकाष्ठेचा शोधक होता. हा नुकताच परलोकवासी झाला. हा पूर्वी हिंदुस्थानांत असून सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलचा मेंबर होता. याचे **एन्शेंट लॉ, व्हिलेज कम्युनिटीज** वगैरे ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांत यानें आशिया खंडांतील व युरोप खंडांतील आर्य लोकांच्या सांप्रत राज्यपद्धति, धर्मपद्धति व अवांतर सामाजिक पद्धति कोणत्या पूर्वपद्धतींपासून उत्पन्न झाल्या, या गोष्टींचा मोठ्या बारकाईचा विचार केला आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, आर्य लोकांत आज जे राजकीय किंवा सामाजिक आचार प्ररूढ आहेत त्यांचे बीज आर्य लोकांच्या पूर्वकुटुंबव्यवस्थेंत दिसून येतें. हीं जुनी आर्यकुटुंबे मनुष्याच्या इतर जातींतील कुटुंबाहून फार निराळ्या तऱ्हेचीं होती. या कुटुंबांत कुलपतीचा अधिकार फार जारीनें चालत असे. कुटुंबातील पाहिजे त्या इसमानें संपादिलेल्या वित्ताची हवी तशी व्यवस्था करणें, पाहिजे त्याला हवी ती शिक्षा करणें, प्रसंगविशेषी एखाद्यास ठारसुद्धां मारणें-अशा प्रकारची जबर सत्ता कुलाधिपतीच्या हातांत असे. कुटुंबांतील मुलें व बायका त्याच्या धाकांत असत; आणि तो गेल्यानंतर कुटुंबांत जो सर्वांत वडील असेल त्याकडे त्याचे अधिकार जात. कुटुंब चालविणारा वडील भाऊ मेला असतां, तत्स्थानापन्न होणाऱ्या धाकट्या भावाकडे मेलेल्या भावाच्या बायकांची व्यवस्था येऊन, पाहिजे तर त्याला त्या आपल्या बायका करतां येत असत ! या सर्व

प्रकारांवरून अशा मेनसाहेबानें पॅट्रिआर्कल फ्यामिलीझ् म्हणजे श्रेष्ठायत्त कुटुंबें अशी संज्ञा दिली आहे; व त्याचें असें म्हणणें आहे कीं, ही आर्य कुटुंबांची आद्यस्थिति होती, व हिच्यापासून त्यांच्या पुढील सर्व राज्यपद्धतींचा आणि कुटुंबपद्धतींचा उद्भव झाला. यासंबंधानें अलीकडे ज्यांनी विशेष शोध केले आहेत ते मेनसाहेबाच्या या विचारसरणीवर दोन आक्षेप घेतात. ते असे म्हणतात कीं, श्रेष्ठायत्त कुटुंब हेंच आर्यलोकांचे आद्यकुटुंब धरून चालणे बरोबर नाही; कारण अशा प्रकारची कुटुंबव्यवस्था स्थापित होण्यापूर्वी तिच्यापेक्षां वाईट प्रकारची व्यवस्था अस्तित्वात असली पाहिजे व होती, हें आर्यांच्या जुन्या ग्रंथांचे नीट पर्यालोचन केले असतां, व सध्या पृथ्वीवर जे रानटी लोक आहेत, व ज्यांची बरीच माहिती विश्वसनीय प्रवाशांकडून प्रसिद्ध झाली आहे, ती पाहिली असतां दिसून येईल. कोणत्याही लोकांत आद्यकुटुंबव्यवस्था सर मेन म्हणतो त्या प्रकारची असूं शकण्याचा संभव नाहीं. श्रेष्ठायत्त कुटुंबव्यवस्थेहून मनुष्याची आद्यकुटुंबव्यवस्था विशेष निकृष्ट असली पाहिजे. अशा स्थितींत कोणत्याही प्रकारची विवाहपद्धति स्थापित झालेली नसते. पशूप्रमाणें स्त्रीपुरुषांचे समागम हवे तसे होत असतात. कोणी कांहीं संपत्ति जोडली असली तर ती सारी त्याच्या पश्चात वडील मुलाकडे जाईल, किंवा त्याच्या साऱ्या मुलांस सारखी वाटून मिळेल, असें नसतें. बहुश: ती मेलेल्या इसमाच्या बायकोकडे किंवा तिच्या मुलींकडे जाते. मुलास आपला चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य आले म्हणजे तो बापापासून निघून मन मानेल तिकडे चालता होतो, व वयांत आलेल्या मुलीस बाप विकून टाकतो; नाही तर कोणी तरी तिला पळवून नेतो. सारांश, मनुष्यांची प्रथमावस्था बऱ्याच अंशी पशुव्यवस्थेसारखी असते, असें म्हणण्यास हरकत नाहीं, आणि वास्तविक पहातां जोपर्यंत मनुष्यें शिकारीवर किंवा पारधीवरच चरितार्थ करीत असतात, तोंपर्यंत पारध करून राहणाऱ्या जनावरांपेक्षां त्यांची स्थिति विशेष श्रेष्ठ कां असावी, हें समजत नाहीं. मनुष्यास आपली स्थिति उत्तरोत्तर सुधारीत नेण्याची नैसर्गिक बुद्धिशक्ति आहे, व ज्याप्रमाणे तो तिचा उपयोग करीत जातो, त्याप्रमाणें त्याची स्थिति सुधारत जाते, व ती पशूंच्या स्थितीहून भिन्न आणि श्रेष्ठ होत जाते, हें खरें आहे. पण जोंपर्यंत त्यांच्याकडून तिचा बराचसा उपयोग होऊं लागला नाहीं, तोपर्यंत त्याच्या आणि त्याच्या खालच्या पशूंच्या वर्तनांत फारसें अंतर पडण्याचा संभव नाहीं. आर्य लोकांत श्रेष्ठायत्त कुटुंबव्यवस्था स्थापित होण्यापूर्वी ते पारध करून रहात असले पाहिजेत. श्रेष्ठायत्त कुटुंबव्यवस्था कोणत्याही केवळ पारध करून वनचरांप्रमाणें आयुष्य कंठणाऱ्या लोकांत दिसून येत नाहीं. तिचा प्रादुर्भाव मनुष्यांच्या दुसऱ्या अवस्थेंत म्हणजे गुरें बाळगूं लागून

धनगरासारखे राहूं लागले म्हणजे होतो.

या स्थितींत शत्रूंपासून गुरांचे संरक्षण करण्यासाठीं, त्यांच्या पोटाकरितां गवतांची रानें हुडकून काढण्यासाठीं, व काढलेल्यांचा बंदोबस्त ठेवण्यासाठीं, आणि जनावरांची नित्य व्यवस्था ठेऊन, त्यांच्या धारा वगैरे काढण्यासाठीं व दुधदुभते करण्यासाठीं, कुटुंबांतल्या कुटुंबात निरनिराळीं कामें निरनिराळ्या इसमांकडे वांटून द्यावीं लागतात, आणि गरज पडल्यास परक्या कुटुंबांशीं भांडण्यास व मारामारी करण्यासही सर्वांस तयार असावें लागतें. या स्थितींत गृहकृत्यांत जो प्रमुख असतो, त्याच्याच धोरणानें बाह्य कृत्येंही चालत असतात. त्यामुळें जशी घरांत त्याची जरब असते, तशी ती बाहेरही असते. सारांश काय कीं, मनुष्यांस धनगरावस्था प्राप्त झाली असतां त्यांच्यांत श्रेष्ठायत्त कुटुंबाची व्यवस्था स्थापित होऊन तिचींच तत्त्वें त्यांच्या बाह्य वर्तनासही मार्गदर्शक होतात. या स्थितीत कांहीं काल लोटल्यावर मनुष्यांस शेतकीची युक्ति सुचते, आणि ते शेतकी बनतात. या स्थितींतही कुटुंबव्यवस्था पूर्ववत् चालते. शेतकऱ्याच्या स्थितीत कांहीं दिवस काढल्यावर मनुष्यें हळूहळू औद्योगिक पंथाचा स्वीकार करून तद्नुसार वर्तन करूं लागतात. याप्रमाणे मनुष्यांच्या गृहस्थितींत सुधारणा होत असतां, तीं ज्या समाजांत असतात, त्याचीही सुधारणा होत असते; कारण समाज म्हणजे अनेक कुलांचा समुदाय किंवा संघ होय. तेव्हां हे स्वाभाविकच आहे कीं, अवयवांत सुधारणा होऊं लागली तर ती अवयवींत झालीच पाहिजे; कारण अवयवी, अवयवांहून भिन्न नाहीं. ज्याप्रमाणे कुटुंबाचा स्वामी दक्ष, उद्योगी, निःपक्षपाती, व ममताळू असल्यानें कुटुंबांतील माणसे आनंदी व सुखी असतात, त्याप्रमाणें समाजपति गुणज्ञ, निःपक्षपाती, उद्योगी आणि निश्चयी असला तर त्याची प्रजा संतुष्ट राहून त्याला फार चहाते. तेव्हां पारधीवृत्ति, धनगरवृत्ति, शेतकरीवृत्ति, आणि व्यापारीवृत्ती अशा मनुष्यसुधारणेच्या मुख्य चार वृत्ति झाल्या. जी कुटुंबे आणि राष्ट्रें या चार वृत्तींतून गेलेलीं असतात, तीं बरीच सुधारलेलीं असतात. यानंतर कुटुंबस्थितींत व राष्ट्रस्थितींत जे फेरफार होत जातात, त्यांचे स्थलसंकोचनामुळें आजच वर्णन करण्याची सोय नसल्यामुळें, आज येथेंच मुक्काम करणें भाग आहे.

*

तरुण सुशिक्षितांस विज्ञापना

तरुण सुशिक्षित देशबांधवहो, हा **सुधारक** अत्यंत प्रेमपूर्वक जी विज्ञापना तुम्हांस पुढे करीत आहे तीकडे लक्ष द्याल आणि तिची सार्थकता करण्याविषयीं प्रयत्न कराल अशी आशा आहे.

असें म्हणतात कीं, ज्या देशांतील लोकांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य स्थापिलें आहे; ज्या देशांतील लोकांनी राजांचा जुलूम नाहीसा करून प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापिल्या आहेत; ज्या देशांतील लोक, सामाजिक व धार्मिक गोष्टींची सुधारणा करण्यासाठीं, सरकारवर अवलंबून न रहातां, ती आपली आपण करूं लागले आहेत; आणि ज्या देशांतील लोकांस सर्व प्रकारच्या प्रक्रांतीस लागणाऱ्या साधनांची अनुकूलता साध्य झाली आहे; त्या देशांतील युनिव्हर्सिट्यांतले शिक्षक आणि शिष्य पूर्वसंप्रदायप्रिय असतात. कोणतीही जुनी पद्धत टाकणें, नवीचा अंगीकार करणें वगैरे गोष्टी त्यांस आवडेनाशा होतात. सारांश, जें चालत आलें आहे, तेंच बरें आहे; त्याची सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्यानें नवीन लचांडे उद्‌भवण्याचा संभव आहे, आणि त्यांचा परिहार कसा करावा हे ठाऊक नसल्यामुळें त्यापासून हित न होतां उलट नुकसान होण्याची भीती आहे; सबब जें चालू आहे त्याचेच संरक्षण करावें आणि त्यापासून होईल तितकें सुख उपभोगावें, असें त्यांस वाटत असतें; आणि काहीं अंशीं असें होणें फार स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें जलोदधीचा अत्यंत क्षोभ करणारा प्रचंड प्रभंजन कांहीं वेळ मोठ्या जोरानें वाहिल्यावर, आणि समुद्रावर व जमिनीवर त्यानें अनेक उत्पात करून सोडल्यावर, जणुं काय विगलितवीर्य होत्साता शांत होतो, आणि वातावरणांत पराकाष्ठेची निश्चलता उत्पन्न होऊन, सर्व सचेतन व अचेतन वस्तु जागच्याजागी निश्चेष्ट झाल्यासारख्या भासूं लागतात, त्याप्रमाणें ज्या देशांत मोठमोठ्या राज्यक्रांत्या झाल्या आहेस; ज्यांतील लोकांनीं राज्यस्वातंत्र्यासाठी व विचारस्वातंत्र्यासाठीं अनेक तुंबळ युद्धें केलीं आहेत; जो देश अनेक वर्षांनीं शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागला आहे; व ज्यांतील लोकांस विशेष गुरुत्वाचा कोणताही अन्याय दूर करणें राहिलें नाहीं; - अशा देशांतील लोकांस थोडीशी स्तिमितता यावी - विशेषत: राज्यक्रांति म्हणजे काय, ती घडवून आणण्यास केवढे प्रयास पडतात,

ती होऊं लागली म्हणजे प्रजेस किती हाल सोसावे लागतात, वगैरे गोष्टी ज्यांस नीटपणे समजतात, अशा त्या देशांतील सुशिक्षित लोकांस तरी ती यावीं, हें अगदी स्वाभाविक आहे. तेव्हा इंग्लंडासारख्या देशांतील युनिव्हर्सिट्यांच्या प्रोफेसरांनी व कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी ग्लाडस्टनसारख्या मंत्रिगणशिरोमणीस विरुद्ध होऊन हार्टिंग्टनसारख्या संकुचित दर्शनाच्या व मर्यादित औदार्याच्या लोकाग्रणींचे प्रोत्साहन करावें, आणि तद्नुषाने वागण्याविषयीं तत्परता दाखवावी, यांत काहीं आश्चर्य नाही. पण ज्या देशांतील लोकांस राजकीय, सामाजिक व धार्मिक असमता, अज्ञान आणि अन्याय यांपासून पराकाष्ठेचा त्रास होत आहे, किंवा परवशता प्राप्त झाली आहे; ज्या देशांतील सामान्य लोकांस गूढ अज्ञानानें व्यापिले आहे; पण त्याच्या लोकांस विपत्तीपासून होणाऱ्या यातना सोसाव्या लागत आहेत, पण त्यांच्या परिहारार्थ काय करावें हे समजत नाहीं; सारांश ज्या देशात राजकीय समता नाही, विद्या नाहीं, वित्त नाहीं, शारीरिक व मानसिक सामर्थ्य म्हणण्यासारखे नाही, अशा देशांतील युनिव्हर्सिट्यांत आणि कॉलेजांत इतर ठिकाणांपेक्षा थोडीशी अधिक चळवळ नसेल तर त्या देशाची अखेर गति काय होईल, हें सांगतां येणें फार कठिण आहे. विचार करणे, सुखदु:खांचा अनुभव घेणे व क्रिया करणें या तीन गोष्टीपैकी पहिलींत, दुसरीत किंवा तिसरीत प्रत्येक मनुष्य चूर होऊन गेलेला असतो. मोठमोठ्या ग्रथांची पारायणें करावीं, रात्रीच्या रात्री चिंतनांत घालवाव्या, विचार व्यवस्थित झाला कीं तो पुस्तकद्वाराने किंवा दुसऱ्या कोणत्या तरी साधनाने लोकांपुढे आणावा, अशा रीतीने कित्येक आपली आयुष्यें कंठीत असतात. अशांस बाह्य सुखाचा फार उपभोग सापडत नाहीं, व बाह्य क्रिया करतां येत नाहीं. वाचनापासून होणारा जो आनंद तोच यांचें स्थाईक व आवडते सुख, आणि विचार करण्यास व लिहिण्यास लागणारी जी शारीरिक हालचाल तीच त्यांची बाह्य क्रिया. दुसरा वर्ग सुखाभिलाषी लोकांचा. यांस मानसिक सुखापेक्षां शरीरसुखाची चाड विशेष असते. वारुळात जशी एक खुशालचेंडू राणी मुंगी असते म्हणून सागतात, तीसारखे हे सुखपरायण लोक होत. सुखोपभोगासाठी सर्व प्राणिमात्र धडपडत असतो, व ज्यास जो प्राप्त होईल त्यानें त्यापासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे; पण ज्या सुखपभोगामुळे निरंतर तो घेतां येण्याची शक्यता नाहीशी होते; बुद्धीस मांद्य येतें; गात्रें नि:शक्त होतात; उत्साह नाहींसा होतो; आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो. अशा सुखोपभोगांत निमग्न असण्यांत काय फायदा आहे बरें? पण असे लोक कोणत्याही देशांत थोडथोडके नसतात. ज्या ठिकाणी अविद्या आणि वित्त यांचा संयोग दृष्टीस पडतो,

त्या ठिकाणी व्यसनासक्ति दृष्टीस पडत नाहीं असें सहसा होत नाही. सुदैवानें ज्यांना सुखोपभोग करून घेतां येत असेल, त्यांनी सुखांची निवड करतांना तीं आपणास व इतरांस शेवटपर्यंत हितावह होतील किंवा नाहीं, येवढें पहात जावें म्हणजे झालें. या सुखपरायण वर्गाशिवाय लोकांचा आणखी एक तिसरा वर्ग असतो. या वर्गांतील लोकांची क्रियाप्रवृत्ति फार जबरदस्त असते; व एका दृष्टीनें यांस समाजाचे आधारस्तंभ म्हणतां येईल. यांनी काबाडकष्ट करून आवश्यकतेचे आणि चैनीचे पदार्थ उत्पन्न करावे, आणि त्यांचा उपभोग वरील दोन वर्गांतील किंवा मधल्या वर्गांतील लोकांनी घ्यावा, असें आजपर्यंत बऱ्याच अंशीं होत आलें आहे, व पुढेही अल्प काळांत या स्थितीत विशेष फेरबदल करता येईल असें वाटत नाही. तथापि निरपेक्ष बुद्धीनें व आस्थापूर्वक परिश्रम केले असतां, ही असमता थोड्या वर्षांत बरीच दूर करतां येण्यासारखी आहे. ज्या देशांत ही असमता वाढत जाऊं लागली असेल, त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला आहे, असे समजावें. जेव्हां या असमतेची परमावधी होते, तेव्हां घनघोर राज्यक्रांति होऊन समाजचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात, किंवा त्यांत अपूर्व स्थित्यंतरें होतात. निरंतर कष्ट साहण्यास, खालच्या प्रतीचे प्राणीसुद्धां तयार असत नाहींत तर मनुष्य कसा असेल? कष्ट साहणें म्हणजे जीविततत्त्व क्षीण करून घेणें होय; आणि तसें करून घेण्यास बहुतेक मनुष्यें तयार होतील, तर हळू हळू सारी मनुष्यजात नाहीशी होईल! परंतु मनुष्यें अस्तित्वांत आली आहेत, व दिवसेदिवस त्यांची संख्या वाढत आहे, यावरूनच त्यांच्या नाशास अनुकूल अशा कारणांपेक्षा त्यांच्या अस्तित्वास व वृद्धीस अनुकूल अशीं कारणें या पृथ्वीतील परमाणुसंघांत निगूढ आहेत, असें सिद्ध होते तेव्हां काय दिसून येतें कीं, विचार करणारे, उपभोग घेणारे, व काम करणारे असे जे सांप्रतकालीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते कायमचे नव्हेत. हळू हळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम ही समप्रमाणाने करावीं लागून, साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे; व जों जो ती तशीं होत जाईल, तों तो खरी उन्नति होऊं लागली असें म्हणता येऊं लागेल. येवढें खरें आहे की, काही झालें तरी सर्वांच्या बुद्धि सारख्या तीव्र होतील, व पाहिजे त्या कामांत पाहिजे त्याला पडतां येऊन ते उत्तम रीतीनें वठवितां येईल, असे पूर्णपणें होण्याचा संभव फार थोडा आहे. तथापि प्रस्तुतकालीं निरनिराळ्या वर्गांतील लोकांत व स्त्रीपुरुषांत जें विलक्षण अंतर दृष्टीस पडत आहे तें पुष्कळ संकुचित करतां येणार आहे; आणि ज्या देशांत तें तसें करण्याचा प्रयत्न झपाट्यानें चालत राहील, तेच देश अखेरीस तगतील. बाकीचे सर्वत्र जो जीवनार्थ कलह मोठ्या निकरानें चालला आहे त्यांत

भांडतां भांडतां नाहीसे होतील. यासाठीं ज्यांना हें अस्तित्वतत्त्व स्पष्टपणें कळून आलें असेल, व ज्यांच्या मनात कर्तव्यबुद्धि व परोपरकारबुद्धि पूर्णपणे जागृत झाली असेल त्यांनी, आपापल्या देशाचा जीवनार्थ कलहांत टिकाव लागण्यासाठी, रात्रंदिवस निरपेक्ष बुद्धीनें झटलें पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून जे स्तब्ध राहतील, त्यांच्या माथ्यावर देशास विपद्दशा आणिल्याची, आणि त्याचा नाश अपरिहार्य केल्याची, भयंकर जबाबदारी येणार आहे. म्हणून सुशिक्षित देशबांधवहो, जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरें म्हणून घ्यावयाचें असेल, व तुमची आज जी स्थिती आहे तीहून तुमच्या मुलांची व नांतवंडांची स्थिति अधिक वाईट होऊं नये अशा तुम्हांस वास्तविक इच्छा असेल, तर ज्या दुर्मतांनी, दुराग्रहांनी, व दुराचारांनी महारोगांप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षे फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय. या कामीं तुमच्याकडून हलगरज झाल्यास या देशाला लौकरच जे दिवस येणार आहेत; त्यांचा नुसता विचार डोळयांपुढे आला तरी भय वाटल्यावाचून रहात नाहीं! इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड स्टेट्स् वगैरे देशांतल्या सर्व वर्गांतील लोकांमधले व स्त्रीपुरुषांमधले संबंध कसे आहेत, हें नित्य नजरेपुढे येत असूनही, जर तुम्ही आपले डोळे मिटाल, व बालविवाहासारख्या अनेक व्याधि तुम्हांस अत्यंत पीडित असून, त्यांच्या प्रतीकारार्थ कांहींच न कराल, तर तुमच्या संततीस तुमच्या मूर्खपणाबद्दल, आळसाबद्दल, व आप्पटपोटेपणाबद्दल फारच त्रास सोसावा लागेल. तसें होऊ न देणें हे तुमचे कर्तव्य आहे, व ते अल्पायासानें कसें करतां येईल हें सांगावें, येवढाच या लेखाचा उद्देश आहे.

आज जीं सुधारलेली राष्ट्रें आहेत त्यांपैकी प्रत्येकांत विचार करणारे, उपभोग घेणारे, व श्रम करणारे असे तीन ठळक वर्ग दृष्टीस पडत असून ते उत्पन्न करणारीं कारणें दिवसेंदिवस क्षीण होत आहेत, आणि जसजशीं तीं अधिकाधिक क्षीण होत जातील तसतशी समाजस्थ असमता नाहींशी होऊन विचार, उपभोग आणि शरीरश्रम ह्या गोष्टी सर्वांत सम प्रमाणानें कराव्या लागतील आणि तसें झालें म्हणजे समाजास खरी बळकटी आणि स्थिरता आली व उन्नतावस्था प्राप्त झाली असें म्हणतां येईल, असें मागें सांगितलें आहे; तसेंच ही असमता दूर करण्याच्या खटपटीचा विशेष बोजा पहिल्या वर्गांतील लोकांवर पडतो; हेही सांगितलें आहे.

इंग्रजी शिक्षण मिळालेले बहुतेक सुशिक्षित लोक सामाजिक प्रश्नांविषयी विचार करूं लागले आहेत, व उत्तरोत्तर त्यांच्या विचारांचा परिणाम त्यांच्या

आचरणावर होऊं लागेल यांत संशय नाहीं. पण अशा रीतीनें जें वर्तनांतर होतें तें स्थाईक होण्याचा संभव असत नाही. इतकेंच नाहीं; तर कोणतीही गोष्ट चांगली आहे तेव्हां ती करणें जरूर आहे असें वाटून तीं करू लागणें यांत जें मनास शिक्षण मिळते, तें अप्रत्यक्ष रीतीनें घडून येणाऱ्या वर्तनांतरापासून कधींच प्राप्त होत नाहीं. आसमंतांतील वस्तुस्थितीच्या आधीन होऊन ती नेईल तिकडे जाणें यांत कोणताही पुरुषार्थ नाहीं. ज्या ठिकाणी स्त्रीचा वाराही येण्याचा संभव नाही, अशा ठिकाणी ब्रह्मचर्य आचरल्याबद्दल फुशारकी मारण्यांत काय हांशील आहे? आपणावर अमुक प्रकारचें संकट येणार आहे असें कळून त्याच्या परिहारार्थ जाणूनबुजून उपाय योजणें, यांतच मनुष्याचें मनुष्यपण आहे. लोकसंख्या वाढत जाऊन अन्नाची पंचाईत पडूं लागली म्हणजे विवाहकाल सहजच लांबत जाईल, आपण होऊन तो लांबविण्याची गरज नाहीं; व्यापारधंदा, सरकारी नोकऱ्या, आगगाडीचा प्रवास इत्यादि कारणांनी जातिबंध आपल्या आपण शिथिल होऊं लागले आहेत, तेव्हां ते वाईट आहेत असें म्हणून एकमेकांस दुखविण्याची गरज नाहीं; सामान्य शिक्षणाचा व विशेषत: शास्त्रज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशा धर्मसंबंधी वेडेपणाच्या समजुती लयास जातील, सबब त्यांवरच टीका करण्याची गरज नाहीं; कोणतीहि सुधारणा करण्याविषयीं लोकांच्या मनांत दृढ इच्छा उद्भवल्याशिवाय, केवळ कायद्याच्या जुलमानें सुधारणा होऊं शकत नाहीं, व ती इच्छा उद्भवली असतां कायदा करण्याची आवश्यकता रहात नाहीं, व कारण मग ती लोकांचे लोकच करतात; पराधीनांस बलहीनता येते व बलहीनांच्या कपाळी पराधीनता ब्रह्मदेवांने लिहिली आहे, सबब हिंदुस्थानच्या लोकांनी राष्ट्रोन्नति करण्याचा प्रयत्न करणें शुद्ध वेडेपण होय; - अशा रीतीनें सामाजिक व राजकीय प्रश्नांविषयीं विचार करणाऱ्या लोकांस विचारी म्हणावें किंवा नाही, याचा संशय आहे. हे; असल्या विचारांनी मनुष्यांत आणि इतर प्राण्यांत कांहीं अंतर नाहीं, असें दाखवूं पहातात ! मागल्या पिढ्यांस आलेल्या संकटांची माहिती आणि त्यांच्या परिहारार्थ त्यांनी योजिलेल्या उपायांचे ज्ञान, त्यांच्या साहाय्यानें म्हणजे पूर्व पिढ्यांच्या अनुभवानें भावी विपत्ति टाळण्याचा प्रयत्न मनुष्य करणार नाहीं, व वस्तुस्थितीचा गुलाम होऊन ती वागवील तसें वागेल तर प्राणिवर्गात त्यास प्राप्त झालेलं श्रेष्ठत्व त्याचेकडे कसें राहील, आणि सध्या जीं सुखें उपभोगण्यास सांपडत आहेत तेवढ्यांचा तरी त्यास कायम उपभोग कसा लाभेल, हें सांगतां येत नाहीं. तात्पर्य, अगदी शुष्क गोष्ट असली तरी तिच्यासाठी बुद्धिपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. जे लोक असें करीत नाहींत. ते हळूहळू दैववादी बनून निरुद्योगी व निरुत्साही होत्साने क्षीण होत जातात व शेवटीं समूळ नष्ट होतात.

तस्मात् सुशिक्षित बांधवहो, तुम्हांस अशी प्रार्थना आहे की, वर जें म्हटलें आहे तें तुम्हास मान्य असेल तर तुम्हीं कालावर व वस्तुस्थितीवर अवलंबणें पुरे करून, ज्या सुधारणा तुम्हांस अत्यंत अवश्यक अशा वाटत आहेत त्या करण्याविषयीं बुद्धिपूर्वक प्रयत्न करण्यास लागलें पाहिजे. त्या आवश्यक सुधारणांपैकी कांही अशा आहेत की त्या वृद्ध लोकांच्या हातून होण्याचा संभव नाही इतकेंच नाहीं, तर त्यांपैकी पुष्कळांस त्यांची संमतीही मिळण्याची आशा नाहीं. उदाहरणार्थ पुनर्विवाह व ऋतूत्तर कन्याप्रदान. तसेंच, कित्येक तरुण सुशिक्षितास या दोन गोष्टी व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी कितीही चांगल्या वाटूं लागल्या असल्या, व त्यांची आवश्यकता भासूं लागली असली, तरी त्या करण्यास प्रवृत्त होण्यास त्यांची छाती होणार नाहीं. केवळ सगळेच असे असतील असें आमचें म्हणणें नाहीं. एखाद्याचें धैर्य, निश्चय, व कार्यनिष्ठा असामान्य असल्यास, तो लोकमताची किंवा अगदी जवळच्या आप्तांचीही पर्वा न करतां, आपल्या मनास जी गोष्ट प्रशस्त वाटली ती करण्यास प्रवृत्त होईल. पण असे लोक फार विरळ असतात. अशांची संख्या वाढेल तितकी वाढणें इष्ट आहे, आणि तिच्या कमीअधिक वाढीवर समाजाची सुधारणा शीघ्र होणें किंवा न होणें हें अवलंबून आहे. तथापि सध्याचे जग सामान्य विचाराच्या, सामान्य धैर्याच्या, व सामान्य समजुतीच्या लोकांचे झालेलें आहे. वृद्धतरुणांच्या आचारविचारांत कालमानानें व शिक्षणभेदाने थोडाबहुत फरक होतो, पण त्यामुळें त्यांत जमीनअस्मानाचें अंतर पडतें असें नाहीं, व असें होणे इष्टही नाहीं; कारण असें होऊं लागेल तर कोणत्याही घरी कोणासही सुखाचा लवलेश मिळेनासा होऊन साऱ्या समाजांत अहोरात्र चलबिचल माजून राहील, कोणाचा धाक कोणावर चालणार नाहीं, व सगळ्याच प्रकारच्या सुधारणास प्रचंड व्यत्यय येईल. सुधारणा करण्याची इच्छा जशी तरुणांस असते तशी वृद्धांस असत नाहीं. समाजाच्या असलेल्या स्थितीचे संरक्षण करण्याविषयी वृद्ध लोक अत्यंत उत्कंठ असतात. त्याचें पाऊल पुढें पडावें, अशी तरुणांस आकांक्षा असते. हे समाजनौकेचे भरताड होत; तरुण शिडे होत! पहिल्याशिवाय समाजांत स्थिरता राहणार नाहीं; दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाही ! तेव्हां ज्यांच्या मनांत समाजाचें कल्याण व्हावें असें असेल, ते या दोहोचे फारकत व्हावें असें कधीही चिंतणार नाहीत. दोहोंचाही उपयोग आहे; व दोघांनाही आपापला कार्यभाग उरकण्याची मोकळीक पाहिजे. प्रत्येक गोष्टींत बाबानें बेट्याला आपलें दळण गिरविण्यास लावणें हें जसें वाईट, तसें आपली प्रत्येक गोष्ट बाबा ऐकून घेत नाहींत म्हणून बेट्याला त्याचा विषाद येणें हेंही वाईट. दोघांच्या संमतीनें जेवढें चालेल तेवढें हवेच आहे; पण ज्या गोष्टीत दोघांचे ऐक्य होण्याचा संभव

नसेल त्या ज्याच्या त्यास आपल्या मनाप्रमाणें करावयास सांपडल्या तरच घरांत व बाहेर शांतता आणि समाधान राहण्याचा संभव आहे. आज ज्यांचे अर्धे अधिक वय होऊन गेलें आहे; वागण्याची पूर्व पद्धत ज्यांच्या अंगी खिळून जाऊन स्वभावतुल्य झाली आहे; अनेक वर्षांच्या विश्वासामुळें व तदनुसार आचरणामुळें ज्यांच्या धर्मविषयक व नीतिविषयक कल्पना वज्रलेप झाल्या आहेत; जुनाट झालेल्या झाडाप्रमाणें ज्यांची मनें किंवा शरीरें वळण्याची आशा उरली नाहीं; अशांनीं आम्ही ज्या गोष्टी पुढे सांगणार आहों, त्यात पडावें, अशी आमची इच्छा नाहीं, व तुम्ही त्यांत पडा, असें आम्ही त्यांस म्हणणारही नाही. जे आज अपत्यवंत आहेत, ते आपल्या अपत्यांची व्यवस्था कशीही लावोत; त्याबद्दल आम्ही कुरकुर करणार नाहीं. पण ज्यांच्यावर अद्यापि संसाराचा भार पडलेला नाहीं; ज्यांच्याकडे पितृत्वाचा अधिकार अद्यापि आलेला नाहीं; नवीन ज्ञान संपादण्याचें व विचार कायम करण्याचें ज्याचें वय अद्यापि गेलें नाहीं; ज्यांच्या ईर्षेला पराभव ठाऊक नाहीं; ज्यांची हिंमत कशानेंही खचलेली नाहीं; जगाच्या दु:खमय अनुभवामुळें ज्यांच्या अंत:करणांत अनौदार्य, संशय, परदु:खपराङ्मुखता आणि परहितौदासीन्य यांचा प्रादुर्भाव झाला नाहीं -- अशा विद्यालयीन व इतरस्थ तरुण सुशिक्षितांनीं आम्ही जी कल्पना सुचवीत आहों तिचा विचार करून तो अमलात आणण्याविषयी मंडळी स्थापावी, अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

आम्हांमधील बालविवाहाची चाल इतर सर्व वाईट चालीपेक्षा आम्हांस विशेष विघातक होत आहे, हें अलीकडे सर्व समंजस लोकांस कबूल झालें असून, ती बंद व्हावी अशी इच्छा बरीच पसरली आहे, असे म्हणण्यास हरकत नाहीं; पण ती बंद करण्याचा उपाय मात्र आमच्याकडून झाला नाही; व जोपर्यंत तो करण्याचें काम अनपत्यवान तरुण सुशिक्षित लोक आपल्या अंगावर घेणार नाहीत तोपर्यंत त्याची योजना मनापासून कोणीही करणार नाहीं, असे आम्हांस वाटते. ही गोष्ट तरुणांनी मनावर घेतली असतां आजपासून पंचवीस वर्षांच्या आंत हा रोग येथे कधीं होता किंवा नव्हता, अशा रीतीने त्याची त्यांस वाट लाविता येईल! तेव्हां असा हा रामबाण असावा तरी काय हे जाणण्याची वाचकांस मोठी उत्कंठा झाली असेल यांत संशय नाही; पण स्थलसंकोचामुळे ती आज पुरविता येत नाहीं हें पाहून फार दिलगिरी वाटते; तथापि, ज्यांनी इतके दिवस दम काढला त्यांना आणखी आठ दिवस तो सहज काढता येईल, असे समजून फार खेद न करतां सध्या रजा घेतों!

तरुण सुशिक्षितांनी जो विषय आपल्या हातीं घ्यावा म्हणून आज आम्ही प्रत्यक्षपणें सुचविणार आहों, त्याची गेल्या दोन लेखांत जितकी प्रस्तावना

करावयाला पाहिजे होती तितकी केली आहे. आज आम्हांस ज्या सुधारणा करणें अवश्य आहे, त्यांपैकी बहुतेक जुन्या पिढीच्या लोकांकडून होण्यासारख्या कां नाहींत याचें दिग्दर्शन मागे केलें आहे; तें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या घटकेस हिंदुस्थानांत नव्या व जुन्या कल्पनांचा ज्या प्रकारचा झगडा सुरू आहे तशा प्रकारचा झगडा येथें पूर्वी कधीही झाला नसेल. आजपर्यंत हिंदुस्थानावर ज्यांनी स्वाऱ्या केल्या, किंवा येथें आपली राज्यें स्थापिली त्यांच्या आणि आम्हां एतद्देशीय हिंदूंच्या राजकीय आणि सामाजिक विचारांत विशेष अंतर नसल्यामुळें हिंदूंनीं आपल्या जिंकणारांपासून अवश्य शिकले पाहिजे असें विशेष कांही नव्हतें. किंबहुना हिंदू लोकांपाशीच आपल्या परकी राज्यकर्त्यांस शिकविण्यासारख्या कांही गोष्टी होत्या. यामुळें आजपर्यंत ज्यांनी हिंदुस्थानास जिंकून त्यांत आपली सत्ता स्थापिली, त्यांनी हिंदूंचा शारीरिक किंवा बाह्य पराभव केला इतकेच म्हटलें पाहिजे. पण इंग्रजांनी आम्हांवर जें राज्य स्थापिलें आहे त्याची अगदी निराळी गोष्ट आहे. या राज्यामुळे आमच्या स्थितींत पराकाष्ठेचा बदल होत आहे. प्रथम प्रथम या स्थित्यंतराचें स्वरूप आमच्या लक्षात बरोबर आलें नाहीं. पण अलीकडे पाचपंचवीस वर्षांत पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून जेवढे म्हणून त्याच्या पाशांत सांपडले आहेत, त्यांची स्थिति विलक्षण होऊन गेली आहे; व उत्तरोत्तर या शिक्षणाचा परिणाम बहुतेकांवर होणार हें स्पष्ट दिसत आहे. पुष्कळांचे असें म्हणणें आहे कीं, पाश्चिमात्य शिक्षण फार थोड्यांस प्राप्त झाले असल्यामुळें, त्यानें हिंदू लोकांच्या स्थितीत विशेष फेरफार झाला आहे, असें म्हणतां येणार नाहीं. पण आमच्या मतें असें समजणारांची चूक आहे. केवळ शाळांच्या द्वारें पाश्चिमात्य विचारांचा प्रसार होऊन त्यामुळें आमचें जें स्थित्यंतर होत आहे तेवढ्याचाच विचार केला तर तें विशेष विस्तृत नाहीं, हें कबूल करावें लागेल. पण शाळांशिवाय ज्या दुसऱ्या अनेक द्वारांनी हिंदू समाजांतील प्रत्येक वर्गातल्या लोकांवर परिणाम घडत आहेत त्यांचा नीट विचार केला तर असें दिसून येईल कीं, ज्याच्या आचारांत व विचारात पाश्चिमात्य कल्पनांनी थोडाबहुत तरी फेरफार झाला नाहीं, असा एक वर्गही नाहीं, शाळाखात्याशिवाय इतर खात्यांचा संबंध प्रत्येक दिवशीं प्रत्येक वर्गांतील वयांत आलेल्या मनुष्यांशी येऊन पोंचत आहे, व तदनुषंगानें त्यांस आपल्या वागणुकींत प्रतिदिवशीं कमी अधिक फेरफार करावा लागत आहे. मोजणीखाते, जमीनजमाबंदीखातें, न्यायखातें, पब्लिक वर्क्सखातें, वैद्यकखातें, लष्करी खातें, स्यानिटरी खातें, अबकारी खातें, इत्यादिकांनी आमच्या इकडील शेतकऱ्यांवर, कारागिरांवर, व्यापाऱ्यांवर, सावकारांवर, वाण्याउमद्यांवर, व सामान्य मजुरांवर केवढे परिणाम घडत आहेत. या खात्यांशी लोकांचा जो

व्यवहार होतो तो सरकारानें घालून दिलेल्या नियमांप्रमाणेंच व्हावा लागतो. त्यामुळें त्या नियमांचें वळण त्यास नकळत लागत चाललें आहे; व तें नकळत लागत आहे म्हणून मुळींच लागत नाहीं असें म्हणणें बरोबर नाहीं. याशिवाय तारायंत्र, आगगाडी, पोष्टखातें, सेव्हिंग्स ब्यांक्स, पोस्टल ब्यांक्स, वगैरे ज्या गोष्टी सरकारनें किंवा खाजगी मंडळयांनी व्यापाराच्या सोईसाठी व इतर सोईसाठी स्थापिल्या आहेत, त्यांचा लोकांच्या धर्मविचारांवर, नीतिविचारांवर व नित्याचरणांवर केवढा परिणाम होत आहे, याचा तो लक्षपूर्वक विचार करील त्याला आणखी शेंपन्नास वर्षे असाच क्रम चालला तर हिंदुस्थानच्या पहिल्या स्थितीचा मागमूस नाहींसा होण्याइतकें त्याचें स्थित्यंतर होणार आहे, असें कबूल करावें लागेल. तात्पर्य काय कीं, जिकडे पहावे तिकडे पाश्चिमात्य कल्पनांनी व आचारांनी आम्हांस वेढल्यासारखें झालें आहे व त्यांच्या पेंचांतून आम्हांस निसटून जातां येईल, असं वाटत नाहीं! पण निसटून जाण्याचा तरी प्रयत्न करण्याची काय गरज आहे?ज्या युरोपीय कल्पनांचा प्रघात इकडे पडत आहे त्यांपैकी जेवढ्या अहितकारक असतील तेवढ्या वर्ज्य करून बाकीच्याचा अंगीकार करण्यास काय हरकत आहे? दुसऱ्या विषयाविषयीं लिहीत असता असें दाखविलें आहे कीं, युरोपांत आज जी सुधारणा दृष्टीस पडत आहे ती मागील अनेक सुधारणांचे सार आहे, व ज्या राष्ट्रांस जीवनार्थकलहांत टिकावयाचें असेल, त्यांना त्या सुधारणेचा स्वीकार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हें खरें असेल तर ती सुधारणा आपल्या घरी चालून आली असून आपण तिचा निषेध करणें, म्हणजे आपल्या हातानें जाणूनबुजून आपलें नुकसान करून घेण्यासारखें होय. निदान आमची तरी अशी समजूत आहे कीं, इंग्रजांच्या राज्यामुळें ज्या गोष्टी येथे प्रस्थापित झाल्या आहेत व होऊं पहात आहेत त्यांपैकी बहुतेक स्वीकरणीय व अनुकरणीय आहेत. सबब त्यांचा येथें जो आपोआप प्रसार होत आहे त्यास विरुद्ध जाणें हें तर इष्ट नाहींच; पण ज्यांना त्यांचे चांगुलपणा समजण्यासारखे शिक्षण मिळालें आहे, त्यांनी बुद्धिपुरःसर त्यांचा स्वीकार व प्रसार केला पाहिजे. असें केलें तरच त्या लौकर मूळ धरतील आणि त्यांच्या फलांचा लाभ थोड्या वर्षांत आम्हांस होऊं लागून जीवनार्थकलहांत हार न जाण्याची आशा आम्हांस करतां येऊ लागेल. हें बुद्धिपुरःसर सुधारणा करण्याचें काम तरुण सुशिक्षितांशिवाय इतरांच्यानें होण्यासारखें नाहीं, म्हणून इतकां वेळ त्यांची विनवणी चालविली आहे.

तरुण सुशिक्षित मित्रहो, 'शरीर धड तर मन धड' (A sound mind in a good body) अशी जी इंग्रजी भाषेंत सुप्रसिद्ध म्हण आहे; ती तुम्हां सर्वांच्या ऐकण्यांत आलीच असेल. ज्याप्रमाणें जोरदार वृक्ष निपजण्यास मूळ अंकुर जोरदार

पाहिजे, त्याप्रमाणें देशांत सुदृढ स्त्रीपुरुषें निपजण्यास, सुदृढ मुलें होण्यास वैद्यशास्त्रांत जो खऱ्या विवाहाचा काल सांगितला त्याचें कोणाकडूनही उल्लंघन होतां कामा नये. या कालांचे उल्लंघन आम्हांकडून अनेक वर्षे होत असल्यामुळें आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी, श्रम करण्यास नादान, उत्साहशून्य, व भेकड अशी होत आहे. आमच्या शरीरसामर्थ्याचा लोप होत असल्यामुळे आमचें मानसिक सामर्थ्यही नाहीसें होत आहे. याशिवाय बालविवाहापासून आम्हांवर जी इतर अरिष्टें गुदरत आहेत, त्यांचा येथें अगदी अल्प उल्लेख करण्यासाठी जागा नाहीं. बालविवाह बंद झाल्यास, आज प्रत्येक घरीं ज्या एकदोन हतभाग्य बालविधवा दृष्टीस पडतात, त्या दृष्टीस पडेनाशा होतील; पुरुषांच्या अंगी अधिक पौरुष दृष्टीस पडू लागेल; तरुणांस अधिक उद्योग करण्याची हिंमत येईल, व धाडसाची कामें अंगावर घेण्याची छाती होऊ लागेल; ज्याला त्याला आपापल्या मनाप्रमाणें आपली बायको पसंत करण्याची सवड मिळूं लागल्यामुळें, स्त्रीपुरुषांच्या सुखाची वृद्धि होऊन संसारयात्रा अधिक रमणीय होईल. विवाहापूर्वी मुलींस ज्ञान संपादण्यास अधिक फुरसत मिळाल्यामुळे पुढें त्यांच्याकडून अपत्यसंवर्धनाचे व प्रपंच चालविण्याचें काम चांगल्या रीतीने होऊं लागेल. पण हें सर्व होण्यास बालविवाहाची चाल बंद झाली पाहिजे, व ती बंद होणें किंवा न होणें सर्वथैव तुमच्याकडे आहे.

या कामासाठी सर्व सुशिक्षित तरुणांनी **महाराष्ट्रबालविवाहनिषेधक** नावांची मंडळी स्थापावी, अशी आमची सूचना आहे. आज जे अशा मंडळीचे सभासद होण्यास तयार असतील त्यांनी एकत्र जमून "आम्ही आपले, आपल्या मुलांचे, व ज्या मुलींचें व मुलांचे पालकत्व आमच्याकडे येईल त्यांचे, अल्पवयांत विवाह करणार नाही" अशा शपथा घ्याव्या. जर अशा मंडळीस खरोखरीच कांही सुधारणा व्हावी अशी उत्कट इच्छा असेल तर मुलींचे लग्न बारा वर्षे झाल्यावर व मुलांचे लग्न अठरा वर्षे झाल्यावर करावयाचे, असा निर्बंध कायद्यानें करून घेतला पाहिजे. जो अशा मंडळीचा सभासद झाला; त्यानें तींत नवीन तरुण लोक आणण्याचा होईल तितका प्रयत्न केला पाहिजे. असा क्रम कांही वर्षे चालला तरी **बालविवाहनिषेधक** मंडळीच्या सभासदांची संख्या दोन हजारांवर सहज जाईल; व इतकी मंडळी समान उद्देशानें एका कामांत निगडित झाली म्हणजे तिला दुसऱ्या सुधारणाही झपाट्यानें करतां येतील. प्रत्येक सभासदानें वर्षांची रुपया दीड रुपया वर्गणी देण्यास तयार झालें पाहिजे. या वर्गणीपासून जो फंड उभारला जाईल त्याच्या मदतीनें अनेक आवश्यक व उपयुक्त गोष्टी करतां येतील. अलीकडे पांचचार ठिकाणी अशा प्रकारच्या मंडळ्या स्थापित झाल्या आहेत, व

अशा प्रकारची मंडळी स्थापावयाची झाली म्हणजे काय काय करावें लागतें, अशाविषयीं राजे, सर टी. माधवरावसारख्यांनी पुष्कळ शोध करून टिप्पणें प्रसिद्ध केलीं आहेत; तेव्हां अशा मंडळांचे नियम वगैरे कसे असावे, याविषयी येथें विशेष लिहिण्याची गरज नाहीं. अगोदर अशी मंडळी स्थापण्याविषयी व कायदेशीर बंधनें करून घेण्याविषयीं कांहीचा निर्धार झाला पाहिजे. तो एकदां झाला, म्हणजे पुढचा मार्ग सोपा आहे. आम्हांस अशी आशा आहे कीं, कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी हें काम आपल्या हातीं घेतल्यास त्यांस तावडतोब यश येणार आहे. ज्यांच्या अंगी विचारशक्ति आणि उत्साह यांचा संगम झालेला असतो. त्यांना कोणतीही सुधारणा करण्यास अवघड जात नाही. सबब येथील डेक्कन कॉलेजांतील, फर्ग्युसन कॉलेजांतील, व सायन्स कॉलेजांतील, त्याप्रमाणेंच मुंबई येथील एल्फिन्स्टन, फ्री चर्च वगैरे सर्व कॉलेजांतील सुशिक्षित, सुज्ञाण, सुविचारी व प्रौढ विद्यार्थ्यांस आमची अशी विनंती आहे की, त्यांनी या स्वहितकर व राष्ट्रहितकर कार्यांत पुढारीपण घ्यावें. पुढील देशस्थिती सर्वांशी त्यांच्या हाती आहे. वरील विद्यालयांत सध्या असणाऱ्या विद्यार्थ्यांनी या कामास प्रारंभ केल्यास, त्यांच्या पाठीमागून त्यांच्या जागीं येणारे विद्यार्थी त्यांचे अनुकरण करतील, येवढेंच नाही, तर कॉलेजांतील विद्यार्थी अशा कामांत पडल्यास त्याचा परिणाम शाळांतील प्रौढ मुलांवरही होऊं लागेल, व या रीतीनें धाग्याशीं धागा लागून जाऊन अल्पकाळात सुंदर सुधारणापट तयार होईल, आणि ज्यांना तो वापरण्यास सांपडेल, त्यांची अनेक प्रकारची आपदा नाहींशी होईल. इतकेंच नाहीं; तर त्यास अननुभूतपूर्व अशा अनेक संसारसुखांचा उपभोग मिळूं लागेल.

✱

सोंवळयाची मीमांसा

ऐसे कैसें रे सोंवळे । शिवतां होतसे ओवळें।।

—रामदास

या प्रांतांत व बंगाल प्रांतांत मत्स्याशन करणाऱ्या कांही वरिष्ठ जाती आहेत, त्यांच्या सोंवळ्याची एक मौज सांगतात. ती अशीं की, क्षारोदकांत वाढणारी ही भाजी त्यांनी घरीं आणिली आणि ती धुऊन व चिरून पाकसिद्धीसाठीं एखाद्या पातेल्यांत व्यवस्थेने ठेऊन दिली आणि मग ती तिला एखादें आंगरखा घातलेलें पोर शिवलें, कीं ती विटाळून जाऊन पोक्त स्त्रियांच्या व पुरुषांच्या आहारास अयोग्य होते! असें झाल्यावर तिची वाट लावण्याचें काम घरांतील नोकरांवर किंवा सोंवळे नेसूं न लागलेल्या बाळंतिणीवर आणि लहान मुलींवर अथवा मुंज न झालेल्या मुलांवर येऊन पडतें! हा आचार खरोखरीच कोठें रूढ असल्यास, तो पाहून आम्हां महाराष्ट्रीय ब्राह्मणांस त्याच्या वैलक्षण्याबद्दल हसूं आल्यावांचून रहाणार नाही. पण आमच्यांत जे विचारी असतील त्यांनीं हीं गोष्ट ऐकून आपलें हसू आवरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण या आचारांत जितकी हास्यास्पदता आहे तितकी, किंबहुना तीहून कांकणभर अधिक, हास्यास्पदता आम्हां महाराष्ट्रीय ब्राह्मणांत रूढ असलेल्या अनेक आचारांत आहे. तेव्हां नकट्यांनी नकट्यांस हंसत सुटण्यांत काय अर्थ आहे? विचारी पुरुषांनी ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जे आचार चमत्कारिक धर्मकल्पनांवर बसविलेले असतात, ते विवेकाच्या कसाला लावून पहाण्यांत कांही अर्थ नाहीं. जे लोक तसल्या आचारांचे अनुसरण करीत असतात त्यांच्या मनांत त्यांच्या औचित्याचा विचार कधीच येत नाहीं. पूर्वापार चालत आलेल्या गाढ विश्वासशृंखलांनी निगडित होऊन गेल्यामुळें, मागून आलेलें लोण डोळे मिटून पुढल्यांस नेऊन पोचविणें, येवढेच ते आपलें कर्तव्य समजतात. धर्ममंदिराची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे, असें हिंदू धार्मिकांचेंच म्हणणें आहे असें नाही. पृथ्वीवरील कोणत्याही प्रकारच्या धार्मिकांस विश्वासाशिवाय त्राता नाहीं व थारा नाहीं. या संबंधानें बुद्धिवादांचे नांव काढलें कीं त्यांच्या अंगावर काटा उभा रहातो! एखाद्या दिवाळखोर कर्जबाजाऱ्यास

ज्याप्रमाणें आपल्या प्राप्तीचा आंकडा आपल्या खर्चाच्या आंकड्याशी ताडून पाहण्याचें धैर्य होत नाही, किंवा, ज्यांची जीविताशा फार प्रबल झाली आहे, त्यांना आपल्या रोगाची चिकित्सा सुप्रसिद्ध भिषग्वर्याकडून करवत नाहीं, त्याप्रमाणें श्रद्धाळू धार्मिकांस आपल्या धर्मसमजुती व त्यांवर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशीत घालण्याची छाती होत नाहीं. या तीव्र धगीचा खरपूस ताव देण्यास तयार होण्यांत त्यांची धडगत दिसत नाही! त्यांना अशी भीति वाटते कीं, ते हिणकस ठरल्यास, पुढें काय करावें? आम्हांस असें वाटतें कीं, असलें भित्रेपण फार दिवस चालावयाचे नाहीं. विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोपर्यंत विश्वासानें किंवा श्रद्धेनें प्रत्येक गोष्टींत आपला अंमल चालविला, यांत कांही वावगें झालें नाही. जसा लोकांस तसा मनास कोणी राजा असणें बरें, त्याप्रमाणें वर्तनाचें नियमन करणारें असें कोणतेंच तत्त्व नसण्यापेक्षां विश्वासासारखें एखादें स्खलनशील तत्त्व असणें देखील इष्ट आहे. पण हें कोठपर्यंत? अधिक चांगले तत्त्व अस्तित्वांत आलें नाहीं तोपर्यंत. तें आलें कीं जुन्या प्रमादी तत्त्वानें आपली राजचिन्हें श्रेष्ठ तत्त्वाच्या स्वाधीन केली पाहिजेत. हें सरळ अधिकारांतर येथून पुढें विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे, व तसें होण्यांतच मनुष्यतेस प्राप्त होण्यासारखें ऐहिक व पारमार्थिक सुख लौकर प्राप्त होऊं लागणार आहे, अशी आमची समजूत आहे. व ती तशी असल्यामुळें विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आंच देऊन झाळून पहाणें, हें सुधारकाच्या अनेक कर्तव्यांपैकी एक कर्तव्य होऊन बसतें; आणि तें त्यांने अगदींच बजावले नाहीं तर त्याच्या नांवास अयथार्थत्व येईल, असें वाटून प्रस्तुतचा कांहीं अंशी अप्रिय असा विषय हातीं घेतला आहे.

सोंवळ्या-ओंवळ्याचा विधिनिषेध ब्राह्मणेतर जातींत नाहीं, तेव्हां आजचा विषय कांहीं अंशी एकदेशीय आहे, असें म्हटलें पाहिजे. अर्थात् 'ब्राह्मण' शब्दांत ब्राह्मण व शूद्र यांच्या दरम्यान जितक्या पोटजाती आहेत, व ज्यांनी ही कटकट आपल्या पाठीमागें लावून घेतली आहे, त्या सर्वांचा समावेश केला पाहिजे, हें उघड आहे. या विषयाच्या संबंधानें एका विचारी व सुशिक्षित गृहस्थाशीं बोलत असतां, त्यानें असें म्हणून दाखविलें कीं, आम्हा ब्राह्मणांच्या घरांत गैरसोय होण्यास मुख्य दोन कारणें होतात. एक जुन्या व निरुपयोगी वस्तु पिढ्यान्‌पिढ्या पोटाशीं धरून ठेवण्याची हौस; व दुसरें, सोंवळ्या-ओंवळ्यांची रिपरीप! पहिल्या गोष्टीमुळें घरांत जागेची अडचण होऊन त्रास होतो; दुसरींमुळें बायकांची व पुरुषांची कामें निरर्थक वाढून कालहानि होते, व दुखण्याबाण्यांत कधीं कधीं फारच वाईट परिणाम होतात. ज्या गृहस्थानें आमच्या सोंवळ्या-ओंवळ्याविषयीं असें

मत दिलें त्यानें तें देतांना अर्थात् त्याच्या उपयोगीपणावर विशेष नजर दिली होती, हें सांगायला पाहिजे असें नाहीं. सोंवळें किंवा शुचिता आणि ओंवळें किंवा अमंगलता यांपैकी पहिला गुण संग्रहणीय व दुसरा त्याज्य आहे, हें कोणाही समंजस मनुष्यास कबूल केलें पाहिजे, व शुचितेची हिंदुस्थानांतील सर्व वर्गांत जितकी वृद्धि होईल तितकी होणें इष्ट आहे. पण ह्या शुचितेचें आम्हीं जें प्रस्थ करून ठेवलें आहे, त्या अर्थाची शुचिता आदरणीय आहे किंवा नाहीं, व तिच्यापासून फायदा आहे किंवा नाहीं हें बरेच विचारणीय आहे. ब्राह्मण लोकांचे स्वयंपाकघर व स्वयंपाकाची भांडीं; जेवणाचीं ताटें व पाणी पिण्याची भांडीं; मुखमार्जन व स्नानविधि; झाडणें-सारवणें; वगैरे गोष्टींत जी बरीच स्वच्छता दिसून येते, ती इतर वर्गांनी अनुकरण करण्यासारखी आहे; आणि ही नको असें म्हणणें म्हणजे महिषीवृत्तीविषयीं प्रेम प्रकटित करण्यासारखें होय. तेव्हा ज्या सोंवळ्याचा स्वच्छतेशी संबंध आहे, तें सोंवळें रक्षणीय आहे. तसेंच जें ओंवळें म्हणजे अमंगलता; तें त्याज्य आहे. पण यापलीकडे सोंवळ्या-ओंवळ्याचा बडेजाव करणें व तें धर्मांची एक प्रचंड बाब करून ठेवणें म्हणजे व्यवहारांत नसत्या अडचणी उपस्थित करणें आणि वर्गांवर्गांत सलोखा न होण्यासारखी अट घालून ठेवण्यासारखें होय. या अर्थाच्या सोवळ्याचे मंडन विवेकदृष्ट्या करतां येणें अत्यंत दुर्घट आहे. केवळ दीर्घकालीन आग्रहाशिवाय त्याचा पाठपुरावा करतां येणार नाहीं. त्याला विवेकाची कातरी लाविली कीं त्याच्या चिंधड्या होतात! शिवाय, फार दिवसांच्या सलगीमुळें आम्हांस उघडपणें जरी त्याचा अनादर करवेनासा झाला आहे, तरी जेथें जेथें म्हणून त्याकडून व्यवहारांस अडचण येते, तेथें तेथें आम्ही त्याला कांहीं तरी शास्त्रार्थ काढून धाब्यावर बसवून ठेवतों! या संबंधानें आम्हांत व पूर्वपद्धतीच्या लोकांत वादस्थल म्हणून येवढेंच आहे कीं, जेथें फार मोठी नड येईल तेथेंच सोंवळ्याचा बंध ढिला करावा असें ते म्हणतात; आमचें असें म्हणणें आहे की, ज्या गोष्टींत तो रक्षणीय असेल तेवढ्याशिवाय अन्य गोष्टींत आपण त्याची पर्वा करूं नये. जेवढें आवश्यक सोवळें तेवढें ठेवावें असें आमचें म्हणणें आहे; जेवढ्यानें व्यवहार अत्यंत दुर्घट होतो तेवढेंच सोवळे काढून टाकावें, असें पूर्वपद्धतीच्या लोकांचे म्हणणें आहे. हा मतभेद दिसण्यांत थोडा दिसतो, पण प्रत्येक पक्ष आपापल्या मताप्रमाणें आचरण करूं लागेल, तर त्यांत जमीनअस्मानाचें अंतर पडेल. आमच्या समजुतीप्रमाणें खरकटें आणि निर्लेप ओंवळ्यातलीं धोतरें आणि मुकटे; लुगड्याला कुणब्याचा स्पर्श आणि पांढऱ्या कपड्याला कुणब्याचा स्पर्श; हरणाचें कातडें आणि इतर जनावराचें कातडें- यांतील भेदाभेद उरत नाही. पूर्वपद्धतीच्या लोकांस हें आमचें म्हणणें बिलकुल

पसंत पडावयाचें नाहीं. आमच्या युक्तिवादांचे खंडन त्यांस करता येणार नाहीं, अशी आमची पक्की खातरी आहे. त्यांपाशीं जें एक हत्यार आहे तें आम्हापाशीं नसल्यामुळें आमचें काहीं चालत नाहीं. आम्हांकडे युक्ति आहे; त्यांच्याकडे रूढि आहे. पण रूढि ही शास्त्राहून बलीयसी आहे इतकेंच नाहीं, तर युक्तीहूनही ती प्रबलतर आहे. तथापि पूर्वी ध्वनित केल्याप्रमाणें ज्याअर्थी, आज नाहीं उद्यां, युक्तीचा विजय होणार आहे; त्याअर्थी तरुण लोकांच्या हितासाठी् वृद्धांस अप्रिय असे लेख कधीं कधीं लिहिणें आम्ही आपलें कर्तव्य समजतो!

ज्यांना आपल्या सोंवळयाओंवळयाची हास्यास्पदता पहावयाची असेल त्यांनी पुढील विशिष्ट उदाहरणांकडे किंचित नजर फेंकावी. हरणाच्या कातड्यांस पवित्र समजून आम्ही त्यांचे तुकडे जानव्यांत घालतों. वृद्ध संन्यासी त्याचे जोडे करतात, व ते घालून ओंवळे न होतां पुडीस जातात! पूजाब्रह्मयज्ञादि धर्मकर्मे करण्यास या कातड्यासारखीं पवित्र आसनें नाहींत! या संबंधानें आमचा असा प्रश्न आहे कीं, हरणाच्या किंवा वाघाच्या कातड्यासच इतकी शुचिर्भूतता कोठून आली? ज्या गाईच्या मूत्रप्राशनानें आणि मललेपनानें आम्ही आपणांस श्रावणमासीं पुनीत करून घेतों; त्या गाईच्या कातड्यांत हरणाच्या कातड्याइतकी पवित्रता कां नसावी? तसेंच, यज्ञांत ज्याचें मांसभक्षण करून आम्हांस अनंत पिढ्यांचा उद्धार करतां येतो, व कदाचित् जन्ममरणाच्या क्लेशापासून सोडवणूक करून घेतां येते, त्या आजच्या उबदार व कमावलेल्या कातड्यास हरणाच्या कातड्याइतकें पवित्र मानून संध्यादि कर्मे करतांना त्याचीं आसनें कां वापरूं नये? आतां तंतुपटाच्या सोंवळयाओंवळयाची थोडीशी चिकित्सा करूं. सध्या यासंबंधानें सोंवळयाच्या ज्या कल्पना रूढ आहेत त्यांप्रमाणें नव्या धोतरास विटाळ नाहीं; कुणब्याच्या स्पर्शानें धोतरें विटाळत नाहींत; क्षौर करवून अंगरखा व पागोटें घालण्यास प्रत्यवाय नाहीं! याप्रमाणें वनस्पतीपासून उत्पन्न होणाऱ्या तंतूंची हालहवाल आहे. या सदरांत कागद, बोटवाती, सूतपुतळ्या वगैरे कापसाच्या चिल्हर वस्तूंचा समावेश करण्यास हरकत नाहीं, शाईचा ठिपका पडला कीं कोरा कागद सोंवळा झाला! जणुं काय या कृष्ण कलंकांतच शुचिर्भूतत्व आहे! कुंकुमार्चनानें सूतपुतळ्या; विधवांनीं सुद्धा सोंवळयांत वापरण्यासारख्या होतात. परटाकडील भाताची खळ लाविलेलीं चिरगुटें एका शिंतोड्यानें शुद्ध होतात. हा एक सोंवळयाचा चमत्कारिक प्रकार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे! वास्तविक पहातां कृमिज तंतूस किंवा जनावरांच्या लोकरीपासून केलेल्या तंतूस विशेष ओंवळेंपण चिकटलेलें असावें, पण त्यास कापसाच्या चिरगुटांपेक्षां अधिक किंमत पडत असल्यामुळें त्याचीं वस्त्रें कापसाच्या वस्त्रांहूनही शुद्ध होऊन बसली आहेत!

पीतांबराचें शुद्धत्व कशानेंच बिघडत नाहीं! धाबळी तर सोवळ्याची खाण होऊन बसली आहे! हलक्या किंमतीच्या नित्य वापरण्याच्या मुकट्यात व पीतांबरांत म्हणण्यासारखा फरक नसतां, दुसऱ्यापेक्षा अधिक शुद्ध! अलीकडे वनस्पतिज तागी मुकटाही, कृमिज मुकट्यांशी प्रतिस्पर्धा करूं लागला आहे! ही वापरण्याच्या चिजांची स्थिति झाली. खाण्याचा-पिण्याच्या वस्तूंची दशाही यांपेक्षां विशेष बरी आहे असें नाहीं. एका दृष्टीने पहातां या खात्यांत जितका गोंधळ व जितकी असंबद्धता आहे तितकी दुसरीकडे सहसा सांपडणार नाही! हरभऱ्याची डाळ भिजवून वाटली, आणि तिची चटणी केली तर ती निर्लेप होऊन फराळास चालते! पण तीच डाळ अगोदर भिजवून पाट्यावर न चिरडता, अगोदर जात्यांत चिरडून मग तिच्या पिठांत पाणी घातलें कीं ते खरकटें झालें! त्यांचे पिठलें मुकटा लावून घेतल्याशिवाय तोंडात घालण्याची सोय नाही! भडबुजाकडच्या पोह्याकुरमुऱ्यांसारख्या भाताच्या जाती राजरोसपणें खाण्यास कांहीं हरकत नाहीं. पण बाजारच्या भाजीभाताकडे किंवा पावबिसकुटाकडे ब्राह्मणाने पहाण्याची सोय नाहीं! दवाखान्यांत कोणत्याही माणसाने कसलेही औषध दिलें तरी तें चालतें, पण ट्रेचरच्या दुकानचें लेमोनेड किंवा सोडावॉटर उघडपणें पिणे म्हणजे ब्राह्मण्याला हरताळ लावण्यासारखें होय! आगगाडीनें किंवा साध्या गाडीने प्रवास करताना डब्यांतील दशम्यास किंवा त्याहून अधिक मोलाच्या फराळास कशाचाही स्पर्श झाला तरी चालतो, पण आपत्कालींही कुणबिणीने केलेल्या भाकरीस स्पर्श करतां कामा नये! अशा प्रकारची खेंकटी किती म्हणून सांगावी? याप्रमाणेच मडकी, चुली, मेणबत्त्या, साबणाच्या वड्या वगैरे दुसऱ्या प्रकारच्या वस्तूंचीही विलक्षण स्थिति आहे. यांपैकी कित्येकांत चरबी असते हे ठाऊक असून त्या वापरण्याचा प्रघात पडत चालला आहे, व तसें करणें कोणासही वावगें दिसत नाही. अलीकडे व्हाइट मिक्श्चर, शापोटोचा बालकुक्कुटार्क, व इतर मांसनिर्मित औषधें गुपचिपपणें घेण्याचा परिपाठ पडत आहे! असें असून ब्राह्मण्य जसेच्या तसें कायम ठेवूं पहाणारांच्या धर्माभिमानास किंवा अविचारास काय म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. कसेंही झालें तरी थोड्या वर्षांत अशा प्रकारच्या सोंवळ्याओवळ्याच्या संबंधानें बराच फेरफार होणार आहे व झाला पाहिजे, यांत शंका नाहीं. पण हा फेरफार बुद्धिपुरःसर प्रयत्न केल्याशिवाय हवा तसा व लौकर होण्याचा संभव नाही.

*

सोंवळ्या-ओंवळ्याची पुरवणी

सीतोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः।

एक पसतीस वर्षांची विधवा काशीस जात होती. तिकिट थेटचें काढलें असल्यामुळे, व किती मैल प्रवास झाल्यावर एक दिवसाची विश्रांती घेतां येते, हे ठाऊक नसल्यामुळें पुण्यास गाडींत पाय ठेवल्यापासून काशीच्या स्टेशनावर उतरेतोंपर्यंत या बाईने सारा वेळ डब्यांत काढला! खांडव्याच्या पुढें गाडी जाऊन दक्षिणेकडील लोकांची गर्दी कमी झाल्यावर, तिनें असा विचार केला कीं आतां पोटमार करण्यांत काय हांशील आहे? बोलूनचालून पापक्षालनाकरिता आपण काशीविश्वेश्वराच्या दर्शनार्थ चाललो आहों; तेव्हां ज्याच्या दर्शनेंकरून आपल्या हातून आजपर्यंत घडलेल्या पापांचा लय होणार, त्याला क्षुधेच्या त्रासानें आगगाडींत केलेल्या फराळापासून उत्पन्न होणाऱ्या पापाचें निरसन करण्यास अवघड पडणार आहे काय? या तर्क मनांत येतांच, तिनें आपला मुकटा उभा लावून घेतला, आणि बरोबर घेतलेल्या भाजणीच्या दशम्या आणि लोणचें यांचा फडशा करण्यास आरंभ केला! ही गोष्ट ज्या यात्रेकरूंनी प्रत्यक्ष पाहून आम्हांस सांगितली, त्याशिवाय इतरांस खरी सुद्धां वाटणार नाहीं; व आम्हांस देखील ती खरी न वाटती, पण ज्यांच्याकडून ती आम्हांस आली, त्यांच्या सत्यपणाबद्दल कधींच शका घेतां येणार नाहीं, अशा आप्तांकडून ती आम्हांपर्यंत आली आहे. असो! या गोष्टीने या विषयावरील या दुसऱ्या लेखाचा आरंभ करण्यांत इतकाच हेतु आहे कीं, आजमितीस सोवळ्याचें संरक्षण करण्याची मुख्य जबाबदारी जरी आम्हीं स्त्रियांवर, व त्यांतूनही तारुण्यतील विधवांवर टाकिली आहे, तरी त्याही आपत्काल प्राप्त झाला असतां या प्रतिबंधाचा पीळ थोडासा सैल करण्यास मागें-पुढें पहात नाहीत! पण ही संकटावस्थेंतील गोष्ट झाली. अशी अडचण नसूनही, धर्माभिमानी म्हणविणाऱ्या उच्च वर्गांतील स्त्रियांनी व पुरुषांनी सोंवळ्या-ओंवळ्याची अशी बजबजपुरी करणे योग्य आहे काय? आम्हीं असा प्रश्न येथें घालणें बरोबर नव्हतें. पण आम्हीं असें ऐकतों कीं, या विषयावरील आमचा पहिला लेख लिहून गेल्यापासून कांही सोवळी मंडळी आमच्यावर फारच खप्पा होऊन गेली आहे,

व त्यांचे असें म्हणणे आहे कीं त्या लेखांत दिलेली उदाहरणें आमच्या सोंवळ्याओंवळ्यांतील असंबद्धता सिद्ध करण्यास पुरेशी नाहींत! हा दोषारोप खरा असेल तर त्यावर आमचें येवढेंच उत्तर आहे कीं, जें म्हणून जुने आहे त्यावर कंटाळा येण्यासारखी टीका करीत बसणें, हें आम्हीं आपलें कर्तव्य समजत नाहीं. जुन्या आचारांवर जी टीका करावयाची ती त्यांचे अनुसरण करणारांस राग उत्पन्न करण्यासाठी नव्हें, तर त्यांत जी असंबद्धता असेल ती त्यांच्या नजरेस आणून ती त्यांनी दूर करण्याचा प्रयत्न करावा, व निर्दोष अशा नवीन आचारांचा स्वीकार करावा, यासाठी होय; आणि या विषयांवरील ही आजची पुरवणी काढण्याचा, व तींत जीं आणखी उदाहरणें दिली आहेत ती देण्याचा दुसरा कोणताही हेतु नाही. जे कोणी या सोवळ्याओवळ्याच्या प्रश्नांत आपले मन नीटपणें घालतील त्यांना या अडचणींमुळें आमच्या देशाचारांत प्रचंड विचारशून्यता ओतप्रोत भरून चालली आहे, असें कबूल केल्याशिवाय राहवणार नाहीं. ब्राह्मण लोक इतर जातींच्या हातचें पाणी पीत नाहींत, असें म्हणतात! आमचें असें म्हणणें आहे कीं, थोडा विचार केला असतां ते तशा प्रकारचें पाणी पितात असें दाखवितां येईल इतकेंच नाही, तर एका प्रकारच्या जड पदार्थांचेही सेवन करतात असें दाखविता येईल. कोळ्याच्या किंवा तांबोळ्याच्या घरचा ओला चुना ज्यांनी कधींही खाल्ला नाहीं, असे शुचिर्भूत ब्राह्मण किती सांपडतील? गवळ्याच्या घरचें दूध न घेणारे किती ब्राह्मण निघतील? तथापि गवळ्याच्या दुधांत पाणी पडतें, अशी कुरकुर ज्यांनीं कधींही केली नाहीं अशाची संख्या किती भरेल? पण हेंही असो. मुंबईपुण्यासारख्या शहरांत ब्राह्मणमराठ्यांसाठी अंगास अंग लागलेल्या ब्रह्मी जुळ्यांसारखे हौद किंवा तोट्या आहेत. या हौदांतील पाणी एकमेकांत यथेच्छ खेळत असतें; मात्र ज्या द्वारानें तें खेळत असतें तें द्वार सहसा दृष्टीस पडण्यासारखें नसतें. यामुळें आज कित्येक वर्षे दगडाच्या एकाच भांड्यांतून पाणी भरीत असतां, त्यांस आपण तें निरनिराळ्या सांठवणांतून भरीत आहों, असें वाटून सर्व उदकव्यवहार यथास्थितपणें चालला आहे! ही सपाटीवरच्या पाण्याची गोष्ट झाली. धरण धरलेल्या किंवा तलाव केलेल्या ठिकाणाहून स्वयंपाकघराच्या मोरीपर्यंत पाणी येऊन पोंचेपर्यंत त्यास जागोजाग किती प्रकारच्या उदकनिर्भेद्य दट्ट्यांतून जावें लागतें, याचा कोणीं कधीं विचार केला आहे काय? रबर, कातडें, चरबी वगैरे निषिद्ध वस्तूंच्या साहाय्याशिवाय तोट्यांचे पाणी दूरवर नीटपणें जात असेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि बूच फिरविला की, पाणी पडूं लागण्यांत मोठी सोय व सुख असल्यामुळें, परंपरेने घडलेल्या कातड्याचा संयोग, किंवा सूक्ष्मरूपानें मिसळून असलेले चरबीचे कण यांविषयी विशेष

चिकित्सा न करणें हें खऱ्या धर्माभिमान्यांस योग्य वाटू लागलें आहे! तसेंच, न्हाव्यांनी किंवा गुरवांनी आणलेल्या रसाच्या केळ्यांतील रस व म्हारांनी आणिलेल्या उसाच्या मोळीतील ऊस यांचा नि:शंकपणें अंगीकार करणें, हें तरी खऱ्या ब्राह्मणधर्मानुचाऱ्यांस योग्य आहे काय? तसेंच लसूण, कांदा वगैरे पदार्थांस अत्यंत निषिद्ध मानणाऱ्या शुचिर्भूत ब्राह्मणांनीं हिंग, साबूदाणा, साखर, मीठ वगैरे पदार्थ तयार होऊन वाण्यांच्या दुकानांत येऊन पडते; तोंपर्यंत त्यांचा किती अमंगळ पदार्थांशी संयोग घडत असतो, हें ठाऊक असूनही मोठमोठ्या उपवासांत व श्राद्धपक्षास त्यांचा बिनदिक्कत उपयोग करावा, हें केवढें आश्चर्य आहे! तसेंच, मुलींच्या भावल्या, डोकीस घालण्याच्या पगड्या, जिनें, खोगरें, खळ, पुस्तकें, जोडे वगैरे निन्य वापरण्याच्या वस्तु कोण तयार करितों, त्यांचे घटक काय आहेत, व त्यामुळे नीट विचार केला आहे काय? सर्वांपेक्षा जोड्यांची गोष्ट विशेष आश्चर्य करण्यासारखी आहे. जोडे मेलेल्या किंवा मारलेल्या जनावरांच्या कातड्याचे केलेले असून, कातड्याच्या किंवा सुताच्या दोरांनी चांभारांनी शिवलेले असतात, हे सर्वप्रसिद्ध आहेच! या जोड्यांचा आमचा सकाळ संध्याकाळ नित्य सहवास असतो! पण चमत्कार हा कीं, हा सर्वोपयोगी पदार्थ तयार करणारे चर्मकार अपवित्रेची खाण होऊन बसले आहेत! यांच्या हातांतील जोडे घेतांना 'अरे दुरून टाक, दूर हो, विटाळ करशील', अशी एकच ओरड करून दिली पाहिजे! मेलेल्या किंवा मारलेल्या जनावराच्या कातड्यापेक्षा जिवंत मनुष्य विशेष अस्पर्श्य काय! पण धर्मसंबंधांत विचार करतो कोण? कुत्र्याप्रमाणेंच मांजरेंही मांसभक्षक आहेत; पण एकाला जेवणाचे ताटापाशीं घेऊन बसावयाचें, व चित्रावती खाऊं द्यावयाच्या; आणि दुसऱ्याला ओटींची पायरीच चढू द्यावयाची नाही. केवढा हा पक्षपात? कुत्री इमानानें नोकरी करतात, आणि मांजरें लहान मुलांच्या तेलकट टाळू चाटतात व चावतात म्हणून तर हा पक्षपात नसेलना! हेंही असो; प्रत्येकास सकाळ संध्याकाळ परसांतल्या अमंगळ स्थानीं काहीं वेळा काढणें भाग पडतें! त्या ठिकाणी असतां इकडून तिकडे व तिकडून इकडे घोंगावणाऱ्या धर्मभ्रष्ट माशांस दंड करण्याचा विचार कोणाच्या मनांत कधी तरी येतो काय? धारवाडाकडे धुतलेले वस्त्र नेसलें असतां त्यावर कसलाही व्यवहार केला तरी तें धुंगणाचें सुटेपर्यंत ओवळें होत नाहीं, असें म्हणतात- वऱ्हाड-खानदेशाकडे बाळंतिणींची पहिल्या बारा दिवसांतील कांही सेवा मांगिणीकडून करून घेण्याचा परिपाठ आहे, असें जें म्हणतात, तें जरी चुकीचे मानिलें तरी आपल्या इकडील बायकांचा तीन चार महिने कुणबिणीशीं हरएक प्रकारचा व्यवहार होत असतो, ही गोष्ट कोणालाही नाकबूल करिता येणार नाही! या पुन: पुन: बाटणाऱ्या बायका पुन: पुन: सोंवळ्या

कशा होतात, हें समजणें किंचित् कठीण आहे! एखाद्या ब्राह्मणपुरुषानें दर दोन वर्षांत चार महिने अन्नोदकादि सर्व व्यवहार कुणबिणीशीं करावयाचे असें ठरविलें तर चालेल काय? पुरुषाला बाळंत व्हावयाचें नाहीं, हें आम्ही कबूल करितो! पण बायकांना बाळंत व्हावयाचं असतें, म्हणून शूद्राशीं व्यवहार केल्यानें त्या धर्मभ्रष्ट होत नाहींत, असे कसें म्हणतां येईल! तसेच, नगराकडें ब्राह्मण, शूद्र, मुसलमान वगैरे एकत्र पाणी भरण्याचा जो परिपाठ आहे तो किंवा कोकणपट्टीतील कांही भागांत थोड्या सवडीनें कुणब्याच्या हातचें पाणी घेण्याचा परिपाठ आहे तो, किंवा उत्तर हिंदुस्थानांत व आणखी काहीं ठिकाणीं ब्राह्मणांनी शूद्राचे हातचे पाणी नि:शंकपणे वापरण्याचा जो परिपाठ आहे तो, शुद्ध ब्राह्मण्यास धरून आहे, असें कसें म्हणता येईल? या आचारांहूनही दुसरे आचार आहेत ते विशेष गमतीचे आहेत! कथाकीर्तनांत न्हाव्याकडे मशाली धरण्याचें व दिवे साफ ठेवण्याचें काम राजरोसपणे सोपविण्यात येते! अशा प्रसंगी देवच्या देवळांत शास्त्रोवैदिकांच्या रांगामधून प्रशस्तपणे फिरण्याची त्यांस सनद आहे! लग्नाकार्यात तर सोवळ्याची समिधाच शेकलेली असते! देवक बसल्यापासून तें उठतोंपर्यंत लग्नगृहांत ओवळ्याला थारा नाही! तसेच नौकेंत, राजदरबारांत, व बाजारात जो समाज जमतो, त्यामुळें ओवळे इतकें पातळ होऊन जाते कीं, त्याचा निदान अलीकडे तरी कोणासही विधिनिषेध वाटेनासा झाला आहे!

या सर्व आचारांचा येथें उल्लेख करण्यांत येवढाच हेतु आहे कीं, आमच्या लोकांनी हिंदू समाजांतील खालच्या वर्गांतल्या लोकांच्या ठायीं जी इतकी अपवित्रता व अस्पृश्यता मानिली आहे ती कितपत सयुक्तिक आहे, याचा विचार करूं लागावें. अतिशूद्रादि लोक साहेब लोकांच्या नौकरीस रहातात; साहेब लोक आम्हांस अस्पर्श्य नाहींत; असें असूनही अतिशूद्राला स्पर्श करण्यास आमची छाती होत नाहीं; हा कोण व्यामोह? तसेंच, एका दृष्टीनें मुसलमान लोक हिंदूतील कोणत्याही अतिनीच वर्णापेक्षा विशेष अस्पर्श्य आहेत, असें मानणें भाग आहे; कारण कोणताही हिंदू गोवध करून त्या मांसावर उपजीविका करीत नाहीं. मुसलमानास व युरोपिअनास तसें करण्यास प्रत्यवास नसून म्हार, मांग, धेड, ढोर, वगैरे हिंदूंपेक्षा ते आम्हांस पवित्र व स्पर्श्य वाटतात; त्यांच्याशी आम्ही हरएक प्रकारचा बाह्य व्यवहार करतो; त्यांची व आमची मुलें एका शाळेंत व एका वर्गात शिकतात; आणि ते व आम्ही सभांत, कौन्सिलात, व कॉंग्रेसात 'शेकह्यांड' करतो, व एकत्र बसतों, उठतों, असें असून कांही हिंदू जाती आम्हांस इतक्या अस्पर्श्य वाटाव्या हें नवल नाहीं काय? या सर्व आचारांत विचाराचा भाग किती स्वल्प आहे बरें? कोणी असें म्हणतील कीं, म्हार, ढोर वगैरे जातींचे

लोक जो निंद्य आहार व आचार करतात त्यामुळें त्यांस अस्पर्श्य मानणें स्वाभाविक आहे. असे असेल तर या आक्षेपावर फार सोपे उत्तर आहे. क्षणभर अशी कल्पना करा की, ढोर, भंगी, महार, धेंड, व चांभार यांनीं आपापले धंदे कांही वेळ न करण्याचा कट केला, तर त्यांस उच्च मानून घेणाऱ्यांची काय अवस्था होईल? सारें उच्चनीचत्व एकीकडे ठेऊन प्रत्येक कुटुंबाला आपल्या घरांतील घाण कशी तरी काढावी लागणार नाहीं काय? वासरूं किंवा रेडकूं मेलें असतां, ते आपण होऊन गांवाबाहेर ओढून नेऊन टाकावें लागणार नाहीं काय? समाजाच्या विलक्षण रहाटीमुळे उच्चनीचत्व अस्तित्वांत येऊन तद्नुसार जो व्यवसायविभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गांत जन्मास आलेल्या लोकांनी नीच वर्गांत जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पर्श्य मानणें, याहून मनुष्याच्या विचारीपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाहीं, **'न वदेत् यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि'** येवढा ज्या महंमदीयांविषयी आम्हांस तिरस्कार होता, त्या गोहत्या करणाऱ्या म्लेच्छांचे व तत्समान युरोपिअनांचे, राज्याधिकारामुळे आम्हांस काहीच वाटेनासे होऊन, ज्यांना वैदिक धर्म शिरसावंद्य, ज्यांचा धर्म व आचार हिंदू, जे अनादि कालापासून हिंदुस्थानचे रहिवासी, ज्यांच्या हातून गोवध होत नाही, ज्यांना मदिरापानादि मनुष्यतेचा भ्रंश करणाऱ्या व्यसनांचा म्हणण्यासारखा नाद नाही, अशा हिंदूंचा आम्ही तिरस्कार करतों, त्यांना स्पर्श करण्यास भितों, आणि त्यांहून अनेक कारणांमुळे अस्पर्श्य अशा परकीयांस दृढालिंगन देतों, हा केवढा प्रमाद होय! यावरून कोणीं असें समजू नयें कीं, हिंदूंतील श्रेष्ठ जातींनी नीच हिंदूंप्रमाणें परकीयांचाही तिरस्कार करूं लागावें, असें आमचे म्हणणे आहे; आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, त्यांनी वरच्यांशीं निदान परकीयांप्रमाणें तरी वागण्यास मागें पुढें पाहूं नयें.

*

समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक

(व्यापारवृद्धि)

आपल्या भाषेंतील 'व्यापार' शब्द अत्यंत व्यापक आहे. शरीराच्या व मनाच्या कोणत्याही चलनावस्थेस व्यापार म्हणतात. 'व्यापारा'च्या या मूळ अर्थापासून बाकीचे अर्थ निघालेले आहेत. सांप्रत निबंधावलींत त्याचा सार्वत्रिक अर्थ घेऊन तत्संबंधानें कांहीं विचार वाचकांपुढे आणण्याचा इरादा आहे.

ज्यांनी सामाजिक स्थित्यंतरांचा लक्षपूर्वक विचार केलेला असतो, त्यांस असें वाटत असतें कीं, मृगयेवर चरितार्थ करून राहणारे रानटी लोक, पशुपालन किंवा कृषिकर्म करून राहणाऱ्या लोकांपेक्षा विशेष उद्योगी असतील. पण ही त्यांची चुकीची समजूत आहे. मांस, स्तन्य आणि धान्य ही मनुष्यांच्या उपजीविकेची मुख्य साधनें होत. यांपैकी कोणत्याही एकावर, दोहोंवर, किंवा साऱ्या तिहींवर मनुष्यास आपला चरितार्थ करतां येतो. शिकार करणें, मेंढरें, गाई, ससे, कोंबडीं, डुकरें वगैरे जनावरें पाळणें, व दुधदुभतें करणें, आणि जमीन तयार करून तींत धान्य, भाजीपाला, व फळफळावळ उत्पन्न करणें— या तीन गोष्टींपैकी पहिलीपेक्षा दुसरीस, व दुसरीपेक्षा तिसरीस, अधिक श्रम, अधिक आत्मसंयमन, व अधिक दूरदृष्टि लागतात, हें सहज समजण्यासारखें आहे. तेव्हां ज्या लोकांत उपजीविकेंची ही तिन्ही साधनें अस्तित्वांत आलीं असून त्यांची आवश्यकता पडूं लागली असेल, ते लोक पहिल्या, किंवा पहिल्या आणि दुसऱ्या साधनानें उपजीविका करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक उद्योगी असले पाहिजेत, हें उघड आहे.

मनुष्याशिवाय इतर प्राण्यांपैकीं कांहीं केवळ मांसाहारी, कांहीं केवळ उद्भिज्जाहारी, व कांहीं मांसोद्भिज्जाहारी असे आहेत. फक्त मनुष्य मात्र या तीन प्रकारांच्या आहारांपैकी पाहिजे तो आहार करू राहूं शकतो. पण जसजशी त्याला उन्नतावस्था येत जाते, तसतसा त्याचा मांसाहार कमी होत जाऊन उद्भिज्जाहार वाढूं लागतो, व शेवटी तो केवळ उद्भिज्जाहारी होईल किंवा होणें त्यास भाग पडेल, असें कित्येकांचें मत आहे. पण येथें आपणांस त्याची चर्चा करीत बसण्याची गरज नाहीं. येथें इतकेंच ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, मनुष्याशिवाय इतर प्राण्यांचे

जे तीन वर्ग आहारभेदावरून वर केले आहेत, त्यांपैकी कोणत्याही वर्गांतील प्राण्यास आपले भक्ष्य 'गोपालवृत्ती' चे किंवा 'कृषीवलवृत्ती' चें अवलंबन करून संपादिता येत नाही. अशा रीतीनें आपला चरितार्थ करण्याची बुद्धि व सामर्थ्य फक्त मनुष्यांतच आहे. मनुष्याशिवाय इतर प्राणिसंख्येची बुद्धि नैसर्गिक प्राण्युत्पत्तीवर व भूमिगत उद्भिज्जोपत्तीवर अवलंबून असते. ती कमी झाली कीं त्यांची संख्या कमी होते, व अधिक झाली की, अधिक होते. मनुष्याची तशी गोष्ट नाही. त्याच्या शरीराच्या व मनाच्या विशिष्ट रचनेमुळें त्याला आपल्या उपजीविकेस लागणाऱ्या वस्तु हव्या तितक्या उत्पन्न करतां येतात. यामुळें मनुष्याची संख्या आणि त्यांस लागणारें अन्न ही एकसारखी वाढत आहेत.

मनुष्यांत व इतर प्राण्यांत दुसरा आणखी एक भेद आहे तो हा कीं, मनुष्यांची उपभोगेच्छा, इतर प्राण्यांच्या उपभोगेच्छेसारखी मर्यादित नाही. इतर प्राण्यांस उदरपोषण आणि सजातिवर्धन यांशिवाय इतर सुखांची कल्पनाही नसते, असें म्हणण्यास हरकत नाही. यामुळें त्यांच्या या दोन क्षुधांचे समाधान होत असलें म्हणजे ते सुखी असतात. मनुष्यांची तशी गोष्ट नाहीं. इतरांप्रमाणें या दोन क्षुधांची पीडा त्यांच्या पाठीमागें लागली असून, शिवाय त्यांस अनेक प्रकारचे मानसिक व शारिरिक उपभोग घेतां येण्यासारखीं मनें व शरीरें प्राप्त झालीं आहेत, व या अनेकविध उपभोगांकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. हें अनेक उपभोग घेण्याचें त्यांचें अंगी जे सामर्थ्य आहे, त्यामुळें ते इतर प्राण्यांपेक्षा अधिक सुखी आहेत किंवा नाहींत, हा वादग्रस्त प्रश्न आहे, व याचें समाधानकारक उत्तर देतां येईल असेंही वाटत नाहीं. थोड्या वासना आणि थोडी तृप्ति व पुष्कळ वासना आणि पुष्कळ तृप्ती- या दोन स्थितींपैकी इष्टतर कोणती, याचा निर्णय करण्यास कोण समर्थ होणार आहे? या वादांत समंजस मनुष्यानें कधीही पडूं नये. मनुष्यांस विचार करतां येऊ लागल्यापासून कांही पहिला व कांही दुसरा, पक्ष घेऊन भांडत आहेत, व तदनुरोधानें **निवृत्ति व प्रवृत्ति** असे दोन विचार व आचारपंथ झाले आहेत. फलमूलाशन करून रहावें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वतांच्या गुहांत वास करावा, आणि संसाराच्या भानगडीत पडूं नये, असें **निवृत्तिपंथाचे** प्रचारक आज शेंकडों वर्षे सांगत असतां, व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिकाधिक जात चाललें आहे. तेव्हां सामान्य विचाराअंती असें दिसून येईल की, अनेक उपभोग भोगल्यापासून मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा अधिक सुखी होवो किंवा न होवो, त्या गोष्टीचा निर्णय करण्याच्या भरीस मुळीच न पडतां अनेक उपभोगाची वांच्छा करावी, ते प्राप्त होण्यासाठी रात्रंदिवस झटावें, आणि त्यांपासून होईल तितकें सुख करून घ्यावें, असा मनुष्यांचा

सामान्य स्वभाव आहे, व याच स्वभावामुळे मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या वर्तनांत इतके अंतर पडलें आहे.

मनुष्यांच्या आहारवस्तु कष्टसाध्य आहेत, व त्यांची उपभोगेच्छा अमर्याद आहे, येवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत आल्या म्हणजे त्यांस इतर प्राण्यापेक्षां शेंकडोंपट अधिक उद्योग का केला पाहिजे, हें सहज समजणार आहे. हें ज्यास पक्के समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाहीं. याशिवाय, निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हें ज्यास कळलें असेल तो तर स्वत: उद्योगी होईल इतकेंच नाहीं, तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्याचे सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य चालविणें शक्य आहे. पण कोणत्याही कारणानें उद्योगी मनुष्याशीं गांठ पडल्यास एक तर त्याच्याप्रमाणें उद्योग करण्यास, किंवा त्याच्या आधीन होऊन तो ठेवील त्या स्थितीत राहण्यास तयार झालें पाहिजे. सध्या आम्हां निरुद्योगी हिंदू लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशी गांठ पडली आहे. तेव्हां एक तर आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे, किंवा ते ज्या स्थितीत ठेवतील त्या स्थितीत राहण्यास सिद्ध असलें पाहिजें, **आमचें भावी स्वातंत्र्य, अथवा आमचें निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.**

मनुष्यांच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणीत मानसिक व शारीरिक चलनावस्थेचे दोन भेद आहेत. एक नियामक व दुसरा उत्पादक. नियामक उद्योग म्हणजे ज्या उद्योगामुळें मनुष्यांस आपल्या समाजांस व्यवस्था ठेवतां येते. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलीस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे; म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत. शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व धंदेवाले लोक दुसऱ्या वर्गांत येतात, म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील कांहीं लोक पहिल्या प्रकारचा, कांही दुसऱ्या प्रकारचा, व कांहीं दोनही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणें या निरनिराळ्या वर्गांतील लोकांचे प्रमाण कमी अधिक होत असतें. केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते, तो विशेष सुखी असतो. अमेरिकेंत सध्यां अशी स्थिती आहे. त्यामुळे तेथील लोक इतर देशांतील लोकांपेक्षां प्रत्येक बाबतींत फार पुढें सरसावलें आहेत. अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचें जणुं काय वेड लागून गेलें आहे, व त्यामुळें **संयुक्त संस्थानें** इंद्रलोकतुल्य

होऊन गेलीं आहेत. या संस्थानांच्या खालोखाल इंग्लंड व फ्रान्स हे देश आहेत. सगळ्याच देशांतील लोकांस सारखा उद्योग करण्याचीं स्वाभाविक व कृत्रिम साधनें असतील, व सान्यांस सारखे वैभव प्राप्त करून घेता येईल, असें आमचे म्हणणें नाहीं. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक आहे कीं, कोणत्याही देशांतील लोकांस प्राप्त होण्यासारखं जें सुख असेल, ते त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीने उद्योग केल्याशिवाय कधीही प्राप्त होणार नाहीं. ज्या लोकांस- उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व कांही हौस असली तर नियामक उद्योगाची - असे लोक मोठेपणास कधीही चढणार नाहीत. पण सध्या तर आमची तशी स्थिती होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हावयाला पाहिजे. सगळ्यांनीच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यावर चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ति व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांत चैन तरी कोठून करतां येणार? अंमलदार मुळीच नकोत, असें आमचें म्हणणें नाहीं. पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ, अशी स्थिती काय कामाची? १७८९ सालीं फ्रान्स देशांत जी मोठी राज्यक्रांति झाली तिच्या अनेक कारणांपैकी फाजील अंमलदार हें एक मुख्य कारण होतें. जिकडे तिकडे अंमलदारांचा सुळसुळाट होऊन गेल्यामुळें देशांतील वार्षिक संपत्तीचे उत्पन्न अगदीं संतुष्टात आलें होते इतकेंच नाहीं, तर जे थोडे उत्पादक लोक काबाडकष्ट करून थोडीबहुत संपत्ति उत्पन्न करीत, त्यांवर पराकाष्ठेचा जुलूम होऊं लागला होता. अंमलंदार वाजवीपेक्षा अधिक झाल्यानें उत्पादक रयतेचें दोन प्रकारांनीं नुकसान होतें. एक, त्यांच्या पगारासाठी तिला आपल्या प्राप्तीचा बराच वांटा द्यावा लागतो. दुसरें, त्यांच्या जुलूमामुळें केलेलें उत्पन्न आपल्या हातीं लागेल किंवा नाहीं, अशाविषयीं तिला संशय येऊं लागतो. या दोन कारणांमुळे उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसें झालें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होतें. हाच परिणाम सरकारी अंमलदारांशिवाय इतर प्रकारचे अनुत्पादक लोक वाढल्यानेंही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीतिप्रसारक, फाजील शिक्षक, फाजील अडते, फाजील लेखक (पत्रकर्ते, पुस्तककर्ते, वगैरे), फाजील वकील, फाजील राज्यकारस्थानी, या सर्वांच्या फाजीलपणांत, म्हणजे त्यांची वाजवीपेक्षां जास्त संख्या होण्यांत, कष्टाळू रयतेचा फार तोटा आहे. अशा प्रकारचे लोक मुळींच नसावेत, असें आमचे म्हणणें नाहीं. तसें झाल्यास समाज मुळीच सुरळीत चालावयाचा नाहीं. पण त्यांचें कमीपण त्याला जितकें विघातक आहे, तितकेंच त्यांचे अधिकपणही विघातक आहे. आमच्या इकडील अलीकडल्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेविल्यामुळें आपली किंमत किती कमी

करून घेतली आहे बरें. हाडांचीं काडें करून, शेंकडों रुपये खर्च करून, बी.ए. पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढें फळ काय? तर रेव्हिन्यू खात्यांत, किंवा शाळाखात्यांत, ३०/३५ रुपये दरमहाची नोकरी! चांगला सुतारसुद्धा तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५/३० रुपये सहज मिळवितो, हें या ग्राजुएटांस समजूं नये काय? तसेंच कोठे १०/१२ रुपयांची जागा रिकामी झाली कीं, तीबद्दल शेंपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज! धिक् तुमची विद्या आणि तुमचें कर्तृत्व! कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय? विद्यार्जनानें विकसित झालेली मनें स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होता स्वत:च्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आता कोठे राहिली आहे?

*

आमचें अजून ग्रहण सुटलें नाहीं

गेल्या शुक्रवारच्या ग्रहणासारखी पर्वणी आली म्हणजे आमच्या समाजांत जी चलबिचल होऊन जाते, विशेषत: वरिष्ठ वर्गांतील अशिक्षित पुरुषांची व स्त्रियांची जी धांदल उडून गेलेली असते, ती पाहून आमच्या बुद्धीचें ग्रहण अद्यापि सुटलें नाहीं, असें कोणत्याहीं विचारी पुरुषास वाटणार आहे. अशा प्रसंगी अगदीं अज्ञ लोकांचे वर्तन जसें व्हावें तसें आमचें वर्तन होत असतें. ज्या रानटी लोकांस सूर्य एका दिशेने येऊन दुसऱ्या दिशेंने निघून जातो कसा; चंद्राच्या बिंबास क्षय व वृद्धि कशानें होते; एकाएकी सूर्याच्या व चंद्राच्या भोवतीं खळी पडतात कशी; उदककणवाही अभ्रांनी आकाश व्यापृत झालें असतां किंवा ईषत् वर्षाव होऊं लागला असतां, आकाशांतील ज्या प्रदेशांत सूर्य असेल त्याच्या उलट प्रदेशांत नानातऱ्हेच्या रंगांची विशाल धनुराकृति कशी पडते; शुक्रासारखे कांही ग्रह कांही महिने क्षितिजापासून वर येत असल्यासारखें दिसत असून पुन: खालीं कसें उतरूं लागतात, व कांहीं दिवसांनी मुळींच दिसेनासें कां होतात; आकाशस्थ कांहीं तारे परस्परांमधील अंतर कधींच बदलीत नाहींत, व आज या तारकासमूहापाशीं, उद्यां त्या तारकासमूहापाशीं, अशीं एकसारखीं स्थानांतरे करीत असतात, यांचें कारण काय; सूर्यप्रकाशांत उभें राहिलें असतां पडणारी छाया साऱ्या वर्षभर सारखी कां पडत नाहीं; तेजोमय शिखा किंवा पुच्छ असलेले असाधारण प्रचंड तारे एकाएकी कोठून येतात, व थोडे दिवस दिसत राहून मग नाहींसे कसे होतात, आणि इतर ताऱ्यांप्रमाणें फिरून लौकर कां दिसत नाहींत; एखाद्याच्या गळयांतील मौक्तिकहार तुटून पडावा, त्याप्रमाणें नभोमंडलांतील तारकाहार त्रुटित होऊन, त्यांतील भव्य मणी अनेक दिशांस विदारल्यासारखें कशामुळें दिसतात; भलत्याच ठिकाणी एखादें वेळी उपलवृष्टि कशी होते, मोठमोठी वादळें कशीं सुटतात; डोक्यावरील अफाट पोकळींत पाणी जमतें कसें, आणि पर्जन्यधारा येतात कोठून; चंद्र व सूर्य नित्याप्रमाणें शांतपणें आकाशपंथ आक्रमीत असतां, एकाएकीं त्यांच्या तेजाचा अपहार करून मनुष्यलोकांस कधीं गाढ तिमिरांत, व कधीं अर्धवट संध्येंत, चाचपण्यास कोण लावतो- वगैरे प्रश्नांची समाधानकारक उत्तरें देतां येणें अशक्य असल्यामुळें, त्यांनी आश्चर्यकारक दृग्विषयाविषयीं हवे तसे तर्क लढवून,

त्यासंबंधानें आपल्या शोधक मनाची हवी तशी समजूत घालून घ्यावी, आणि त्या समजुतीच्या अनुरोधानें आचरण करावें, हें त्यांच्यासंबंधानें अगदी स्वाभाविक आहे, व त्याबद्दल त्यांस अणुमात्र दोष लावतां येणार नाहीं; कारण तसें केल्याखेरीज त्यांस गत्यंतरच नाही. पण ज्या लोकांस या विषयांचे खरें ज्ञान झालें आहे. त्यांनीही त्यांच्याप्रमाणेंच वर्तन करणें म्हणजे अमूढ असून मूढाप्रमाणें आचरण करणे होत नाही काय? कोणी असे म्हणतील कीं, ज्योति:शास्त्राचे ज्ञान अद्यापि जितके पसरावें तितके पसरलें नाहीं, त्यामुळें सध्यांचा वेडेपणाचा प्रकार दृष्टीस पडतो. या आक्षेपावर आमचे असे उत्तर आहे कीं, कोणत्याही विषयाच्या संबंधानें कितीही ज्ञान वाढले, व लोकांत त्याचा कितीही प्रसार झाला, तरी जुन्या पद्धती सोडून देऊन तद्नुसार नव्या पद्धतीने वागण्याचें धैर्य आल्याशिवाय, ज्ञानाच्या वृद्धीपासून किंवा त्यांच्या प्रसारापासून म्हणण्यासारखा फायदा होत नाही. ग्रहणें कशी होतात, चंद्रसूर्यास खळी कशी पडतात वगैरे गोष्टी युरोपांतील सर्व लोकांस समजल्या आहेत, असें म्हणता येणार नाहीं. पण जेवढ्यास त्या पक्क्या कळून आल्या त्यांनी पूर्वापार चालत आलेल्या रूढीस न जुमानता, अगोदर आपले वर्तन बदलून नंतर दुसऱ्यांचे वर्तन बदलण्याचा प्रयत्न केला, यामुळे तिकडील लोकांच्या बुद्धीस ज्या राहूने ग्रासलें होतें त्याच्या जबड्यांतून त्यांचा लौकर मोक्ष झाला. आमच्या इकडील पंडितांची तशी गोष्ट नाही. त्यांना लोकापवादाचें भय फार असल्यामुळे, ते आपल्या पांडित्यप्रदर्शनापलीकडे सहसा जात नाहीत. हा आमच्या राष्ट्रीय प्रकृतींत नैसर्गिक दोष आहे, व यामुळे आमचें अतिशय नुकसान होत आहे. कोणत्याही विषयाच्या सबंधानें जोपर्यंत आपली पक्की खातरी झाली नाही तोंपर्यंत सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें आचरण करणें दूष्य होणार नाहीं, कारण विनाकारण रूढ पद्धति सोडण्यात कोणत्याही प्रकारचा फायदा नाही. सर्व जुन्या राष्ट्रांत ज्योति:शास्त्राविषयीं नानातऱ्हेचे ग्रह पसरलेले होते, व त्यांच्या अनुरोधानें त्यांचे वर्तन होत होतें. लढाईला जावयाचें झालें, विवाह करावयाचा झाला, कोणत्याही मोठ्या कामासाठी बाहेर पडावयाचें झाले की, प्रथम त्या त्या गोष्टीस ग्रहांची अनुकूलता कशी काय आहे, हें जोश्याकडून पहावयाचें, आणि त्यानें ते अनुकूल आहेत, अशी खात्री दिल्यास मग तिला आरंभ करावयाचा, असा प्रकार आशिया व युरोपखंडांतील सर्व जुन्या लोकांत रूढ होता. मनुष्यांचे मन जात्या शोधक असल्यामुळें, ज्या ठिकाणी त्याची मति खुंटते, त्या ठिकाणी तें पाहिजे तसल्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तयार होतें. पृथ्वीवर घडून येणाऱ्या मोठमोठ्या चमत्कारांचीं मीमांसा आतांप्रमाणें त्या वेळेस करतां येणें शक्य नसल्यामुळें आकाशांत भ्रमण करणाऱ्या

तेजोनिधींकडून ते होत असावे, अशी कल्पना त्या वेळेस होणें फार साहजिक होतें. तसेंच अनेक वर्षे लक्षपूर्वक आकाशाचें अवलोकन केल्यावर तारे आणि ग्रह यांतील भेद लक्षांत यावा; ग्रह मागें पुढें होतात ते आम्हांस सुख किंवा दुःख देण्यासाठी होत असावेत; श्वेत व रमणीय शुक्र सुखप्रद व बलवर्धक असावा; रक्तवर्ण मंगळास रुधिराची प्रीति असावी; मंद व निस्तेज शनीचा स्वभाव दुष्ट असून मनुष्यांना पीडा देण्यांत त्यास मोठा आनंद होत असावा- अशा कल्पना येऊं लागून अखेरीस मनुष्यांच्या मुख्य मुख्य वृत्तींचा आरोप, निरनिराळ्या ग्रहांवर, त्यांच्या त्यांच्या स्वरूपाच्या अनुरोधानें, व कवींच्या आणि जोश्यांच्या तर्कांप्रमाणें, करण्यांत आला यांत काहीं नवल नाहीं, व सामान्य लोकांनीं तत्कालीन श्रेष्ठ व सुज्ञ लोकांच्या पदपंक्तींचे अनुसरण केलें यांतही कांहीं वावगें झालें नाहीं. पण अमुक गोष्ट अमुक रीतीनें घडत नाही, अमुक रीतीनें घडते, असें ज्यास पक्कें समजून आले आहे, तो जर लोकांचा गैरसमज दूर करण्याचें धैर्य न करील, तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार होऊन सुधारणा व सुखवृद्धि कशी व्हावी? आपल्या इकडील तत्त्ववेत्त्यांत आणि शास्त्रज्ञांत एक मोठा दोष दिसून येतो तो हा कीं, त्यांना आपल्या समजुतीप्रमाणें आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होत नाहीं. ''पुराणांतलीं वांगी पुराणात'' अशा पद्धतीने आमच्यांतील विद्वान म्हणविणाऱ्यांचे वर्तन बहुधा होत असल्यामुळें दुर्मति, दुराग्रह आणि दुष्ट चाली यांचें ठाणें या देशांत कायम झाल्यासारखें झालें आहे. बाकी ज्या देशांत भास्कराचार्यांसारखे ज्योतिषी होऊन गेले, त्या देशांत अजूनपर्यंत चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण आलें असता कांही वेळ थंड पाण्यांत निष्कारण बुड्या मारण्याची, उपवास करण्याची, भलभलत्या वस्तूंची दानें करण्याची, मूर्खपणाच्या मंत्राचा जप व सिद्धि करण्याच्या फंदांत पडण्याचीं, पापड-लोणच्यावर व दहींदुधावर तुळशींपत्रें घालीत बसण्याची, आणि जणुं काय आपणांस सुतक्यानेंच स्पर्श केला आहे कीं काय असें समजून, स्त्रीपुरुषांनीं धोत्रापात्रांसकट डोक्यावरून पाणी घेण्याची चाल अजूनपर्यंत दृष्टीस पडावी काय? पण आमच्या भास्कराचार्यांसच हा प्रकार अप्रशस्त म्हणण्याची छाती कोठें होती? भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व फक्त वेधशाळेंत! आचार्य तिच्याबाहेर पडलें कीं, ''यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं ना करणीयं नाचरणीयं'' या उपदेशाचे अनुयायी! **ग्यालीलिओ - कोपरनिकसादि** युरोपीय ज्योतिर्विदांनी अशा प्रकारचेंच आचरण केलें असतें तर युरोपांत ज्ञानरवीचा प्रकाश फांकून अज्ञानतिमिरांचा विध्वंस झाला असता काय, व आज त्या खंडास जो सुदिन प्राप्त झाला आहे तो होता काय? तसें इकडे व्हावें अशी इच्छा असेल, तर लोकापवादांचें भय टाकून, आपल्या मनास शुद्ध दिसेल तें लोकांस सांगण्याचें,

व तदनुसार वागण्याचें, धैर्य केलें पाहिजे; आणि तसें पुष्कळांकडून होऊ लागलें, तरच अज्ञान राहूनें ग्रासलेल्या या आमच्या हतभाग्य देशाचें ग्रहण लौकर सुटणार आहे!

*

स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची अवश्यकता

थोड्या दिवसांपूर्वी येथल्या व मुंबईच्या कांही वर्तमानपत्रांत एका विलक्षण विषयाविषयीं मोठ्या मौजेची चर्चा चालली होती. मुंबईस कोणी एक मनुष्य मेला, तेव्हां त्याचे बायकोस ते दु:ख असह्य होऊन तिनें जीव दिला. ही गोष्ट बाहेर पडतांच कलमबहाद्दर वीरांना पत्ररूप समरभूमीवर पूर्वोत्तरपक्ष करण्याची आयती नामी संधि सांपडली. वादाचा मुख्य मुद्दा, खरी साध्वी कोणास म्हणावें, हा होता. त्यांत कांहींनीं आपले साफ मत असें दिलें कीं, नवऱ्याच्या मरणाची बातमी ऐकल्याबरोबर जी स्त्री मूर्च्छित होऊन प्राणोत्क्रमण करते, ती पहिल्या नंबरची साध्वी; व जिला प्राण घालविण्यासाठी अफूसारख्या एखाद्या विषारी द्रव्याची, किंवा विहिरीसारख्या एखाद्या उदकसंचयाची, प्रार्थना करावी लागते, ती नंबर दुय्यमची साध्वी. याहून ज्यांचे वर्तन निराळें होतें त्यांना काय म्हणावें हें या महापंडितांनीं स्पष्ट म्हटलेलें नाही. तथापि त्यांच्या लिहिण्याच्या झोंकावरून अशा स्त्रियांस काय म्हणावें, असा प्रश्न जर कोणी त्यांस करता तर अशा स्त्रियांस 'अधमाधमा', 'कुलांगारा', 'राक्षसकुलोद्भवा', 'पाषाण-हृदया', अशा प्रकारची नावे दिली पाहिजेत, असें त्यांनी बिनदिक्कत सांगितलें असतें!

पति मेला कीं 'संसार असार' व 'जगण्याचें कारण राहिलें नाहीं' असें स्त्रियांस वाटून त्यांना सहज मृत्यू यावा. किंवा निदान त्यांनी आत्महत्या तरी करून घ्यावी, याहून स्त्रियांस अत्यंत शुद्ध पातिव्रत्याचें किंवा सद्गुणांचे दुसरें निदर्शक नाहीं, असें मानण्याचे विचारांत चांगुलपणाचा भाग मुळींच नाही, असें कोणीही नि:पक्षपाती मनुष्य म्हणूं शकणार नाही? एकाच्या किंवा अनेकांच्या सुखासाठी रात्रंदिवस कष्ट करण्यास सिद्ध असावें, त्यास यत्किंचित दु:ख झालें की, ते स्वत:स झाल्यासारखें वाटावें. स्वत:च्या सुखाविषयी बेपर्वाई उत्पन्न होऊन दुसऱ्याकरतां तन, मन, व धन खर्ची घालण्यांतच आनंद वाटावा- ही मनुष्याच्या अंत:करणाची अत्यंत प्रशंसनीय वृत्ति होय. पण हीहूनही विशेष प्रशंसनीय अशी दुसरी वृत्ति नाहीं असें नाहीं. शिवाय, अशी वृत्ति केवळ परोपरकारबुद्धीनेंच उत्पन्न झाली असेल, तरच ती पूज्य होय. जर तींत स्वार्थाचा अंश असेल तर ती बिलकुल स्तुत्य नाहीं. ''हा माझा नवरा मेला; आता माझें काय होईल; हे

दुष्ट सासूसासरे मला ताबडतोब सोंवळी करून आजपर्यंत मजकडून झालेले जे त्यांचे अपराध त्यांबद्दल माझा आमरण छळ करतील; व ज्या मी, आजपर्यंत या माझ्या पतीच्या जीवावर जगाची मुरवत ठेविली नाहीं, त्या मला येवढ्यातेवढ्यासाठी ज्याच्यात्याच्यापुढें तोंड वेंगाडावे लागून, कोणी कांही म्हटलें तरी मान खाली घालून बटकीप्रमाणें वागावें लागेल; सोन्यासारख्या पोरांचे हाल डोळ्यांनी पहावे लागतील, किंवा त्याची ताडातोड करून घ्यावी लागेल. तेव्हां अशा स्थितींत जगण्यापेक्षां मरणें हेंच बरें'' असा विचार करून जिनें जीव देण्याचा धडा केला तिला 'साध्वी' म्हणण्यापेक्षा स्वार्थी म्हणणें विशेष शोभणार आहे.

जगाच्या सांप्रत स्थितीत स्वहितनिरपेक्षबुद्धीस जो महिमा प्राप्त झाला आहे तो फार योग्य आहे. जगांत अद्यापि जी अनिर्वचनीय विपत्ति आहे तिचा लय होत जाण्यास जशी ही बुद्धि उपयोगी पडणार आहे, तसे दुसरे कांहीही पडणार नाही हें आम्हांस कबूल आहे. सृष्टींत प्रतिदिवशीं घडणारे कोट्यवधि अपघात, रोग, अज्ञान, दुष्ट लोकांची पीडा, अकाली मृत्यु, विषारी व हिंस्र प्राण्यापासून होणारा त्रास इत्यादिकांमुळे बऱ्याच मनुष्यास व्हावे तसें सुख होत नाही, व कांहींस तर त्यांचे जीवित दु:सह होतें; यामुळे जे कोणी स्वत: दु:ख सोसून आमरण दुसऱ्याच्या सुखासाठी झटत असतात, आणि गरज पडल्यास त्यांसाठी मरण्यासही तयार होतात, ते मान्यता पावतात, हे अगदीं नीट आहे; आणि अशा प्रकारचे लोक अधिकाधिक होत गेले तरच जगातील बहुतेक विपत्तींचा बीमोड होण्याची आशा आहे. प्रस्तुत स्थितींत जो तो स्वार्थपरायण होईल तर जगांतील विपत्तीचा अंत कधीच होणार नाहीं. पण येवढ्यावरून असे होत नाहीं की, आज जी स्वहितत्यागास योग्यता प्राप्त झाली आहे तीच निरंतर राहील. आजमितीस जे परोपकारात पुरुष हयातींत आहेत, किंवा जे पुढे होतील, त्यांच्या परिश्रमानें या जगांतील दु:खकारणें बरीच नाहीशी झालीं, व दुसऱ्यांकडून उपकार करून घेणें हे बहुतेकाना संकटावह वाटूं लागलें, व जो तो कोणाकडूनही उपकार करून न घेतां आपणच दुसऱ्यावर ते करण्याविषयीं आतुर होऊं लागला म्हणजे मग निरपेक्षबुद्धीचा दर कमी होणार नाहीं काय? तेव्हा काय झालें की, आजच्या स्थितीत एकानें दुसऱ्याकरतां मरणास तयार होणें किंवा मरणें हे कितीही प्रशंसनीय किंवा अवश्य असलें तरी एकाला दुसऱ्याबद्दल कोणत्याही कारणानें मरावें लागणे किंवा मरावेंसे वाटणें, यात कांहीं तरी उणेपण आहे, व जगाच्या अत्युत्कृष्ट स्थितींत तसें कोणासही करावे लागणार नाहीं, व तसें करण्याची कल्पना कोणासही प्रशस्त वाटणार नाहीं, असें विचाराअंती कबूल करणें अवश्य आहे.

एकानें दुसऱ्याकरतां सहज मरणें, बुद्ध्या मारून घेणें, किंवा नाहीं नाही ते

हाल भोगणें हें सर्वथैव इष्ट असेल तर, स्त्री मेल्यावर पुरुषानेंही तिच्याबद्दल प्राण सोडणे, प्राणहत्या करणें, किंवा वैधव्यव्रताचे सेवन करणें प्रशस्त होईल, किंवा झालें असते! बायको मेल्याची वार्ता येतांच बेशुद्ध होऊन परलोकवासी झालेल्या भार्यारतांची उदाहरणें कधीं तरी आपल्या ऐकण्यांत येतात काय? किंवा स्त्रीबरोबर सहगमन केलेल्या प्रियोंकरतांची उदाहरणें कोणत्याही देशाच्या पुराणांत किंवा इतिहासांत कोणी वाचलीं आहेत काय? किंवा बायकोस देवाज्ञा झाल्यामुळें, नित्य भगवी वस्त्रें परिधान करणारे, क्षौराच्या दिवशी डोक्याच्या किंवा तोंडाच्या कोणत्याही भागावरील केंसांची काडीमात्र दयामाया न ठेवणारे, भाजणीच्या थालिपिठाशिवाय दुसऱ्या कोणत्याही आहारास स्पर्श न करणारे, अरिष्ट गुदरल्यापासून चारसहा महिने कोणास तोंड न दाखविणारे, पानतंबाखूची किंवा चिलिमविडीची, त्या अत्यंत खेदजनक दिवसापासून आमरण समिध शेकणारे, व मंगलकार्यात किंवा कामासाठी घरांतून बाहेर पडणाऱ्या इसमापुढें येण्यास भिणारे नवरे कोणी पाहिले आहेत काय? जर नसतील, तर स्त्रियांची अशा तऱ्हेची वागणूक सतीत्वाची, साध्वीत्वाची, पतिव्रतात्वाची, एकनिष्ठ प्रेमाची व अलौकिक सद्धर्मित्वाची साक्ष देणारी कशी होतें, हे कोणी उघड करून सांगेल काय? जो सागेल त्यास आम्ही बृहस्पतीचा बृहस्पति मानूं!

आमची तर अशी समजूत आहें कीं, नवरा मेल्यामुळें आमच्यांतील ज्या स्त्रिया आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात त्या पराकाष्ठेच्या अविचारी, साहसी, भेकड किंवा आम्ही निष्ठुरपणे पुढे त्यांची जी छलना करतों, तिच्या भयंकर स्वरूपाने घाबरून जाणाऱ्या अधीर स्त्रिया असल्या पाहिजेत. जिचा नवरा मेला तिचे होईल तितक्या उत्तम रीतीनें संगोपन करण्याची उदार चाल आमच्या देशांत असती, तर सहगमनाची रूढी येथें कधीच न पडती! इतकेंच नाहीं, तर पतिवियोगामुळें एकाएकीं प्राण सोडणारी किंवा आत्महत्या करणारी स्त्री देखील येथे कधीही दृष्टीस न पडती. व्यक्तीसाठीं किंवा व्यक्तिसमुदायासाठीं मरणें श्लाघ्य आहे, पण केव्हां? त्या मरणाने त्या व्यक्तिसमुदायाचें मरण टळत असेल, किंवा त्याला बऱ्याच चिरस्थायी सुखाचा लाभ होत असेल तर. असें नसतां ज्या ठिकाणी सहज किंवा बुद्धिपुरःसर एक इसम दुसऱ्यांकरतां मरण्यास प्रवृत्त होत असेल; त्या ठिकाणच्या रूढी अत्यंत अन्यायाच्या, दुष्टपणाच्या व पराकाष्ठेच्या कोणत्या समजुतीच्या असल्या पाहिजेत, हे उघड आहे. असलीं दुःखकारक उदाहरणें येथील खालच्या जातींतल्या स्त्रियांत किंवा कोणत्याही जातींतील पुरुषांत मुळींच सापडत नाहींत. त्यांचा सारा भरणा ब्राह्मण, शेणवी, परभू इत्यादि वरिष्ठ जातींतील स्त्रियांत आहे; व त्यांतच तो आहे, याचें कारण त्यांचें परावलंबन व स्वचरितार्थ

हटकून चालवितां येईल अशा प्रकारचा कोणताही प्रशस्त धंदा त्यांस न येणें हें होय. या जातींतील सुखवस्तु घराण्यांतल्या स्त्रियांस विद्यानंदांत काळ घालविण्यास शिकविण्याचा परिपाठ पडेल व गरीब लोकांच्या मुलींस थोडाबहुत लिहिणेंवाचणें शिकवून, त्याबरोबरच एखाद्या धंद्यांचे ज्ञान करून देण्यांत येऊ लागेल, तर नवऱ्याच्या मृत्युवार्तेबरोबर आपोआप मरणारी किंवा मारून घेणारी स्त्री दिसेनाशी होईल इतकेंच नाही, तर ज्यांच्यावर दुर्दैवानें तो दुःखाचा डोंगर कोसळेल, त्या हळूं हळूं त्याचा भार विसरूं लागून आपलें, आपल्या मुलाबाळांचें, व इतरांचें अस्तित्व होईल तितकें सुखावह करण्यास झटूं लागतील!

*

विवाहनिराकरण अथवा घटस्फोट

चांगलें काय हें समजत असलें, आणि मग तें जरी मिळण्यासारखें नसलें, तरी तें हवेसे वाटतें. निरोगी हवा, सुरेख घर, सुदृढ प्रकृति, सदय अंत:करण, तीव्रबुद्धि, छंदानुवर्ती बांधवजन, अवश्य द्रव्यानुकूलता, आणि ज्ञानसंग्रह व ज्ञानतृष्णा; इत्यादि गोष्टींचे चांगलेंपण बहुधा सर्वांस समजत असल्यामुळें, त्या दुष्प्राप्य असल्या तरी अर्जनीय आहेत असें प्रत्येकास वाटतें. त्याप्रमाणेंच तारुण्य, सौंदर्य स्वभावसाम्य, व स्वातंत्र्य इत्यादि वस्तूंतील रहस्य ज्यांस समजलें आहे त्यांस त्या मिळण्यासारख्या नसल्या तरी हव्याशा वाटतात. हे सामान्य विचार आमच्या देशांतील विवाहपद्धतीस जितकें लागूं पडतात तितके कदाचित् दुसऱ्या कशासही लागूं पडत नसतील. आमची पुराणें, नाटकें, आणि काव्यें यांचे वाचन; प्रौढ वयांत विवाह करणाऱ्या इंग्रजी स्त्रीपुरुषांची प्रत्यक्ष उदाहरणें; जर्मनी, फ्रान्स, युनायटेड स्टेट्स वगैरे देशांविषयीं यासंबंधाने साक्षात् किंवा परंपरेने मिळविलेली माहिती; आणि प्रत्येकाचा थोडाबहुत स्वानुभव आणि अनुमान-यामुळें आमचें बरेंच विचारांतर होऊन मनांतल्या मनांत ज्या प्रकारच्या पाणीग्रहणाचा अभिलाष आम्हांस उत्पन्न झाला आहे, तें पाणिग्रहण एका तऱ्हेंचे आहे, व ज्याच्या पाशानें येथील असंख्य अप्राप्तयौवन वधूवरें प्रतिवर्षी जखडली जात आहेत, तें पाणिग्रहण निराळयाच तऱ्हेचे आहे. तारुण्यवसंत प्राप्त होऊन शरीरद्रुमावर पालवी, मोहर व सूक्ष्म फलनिर्भर याचा आविर्भाव झाला असतां ते किती रमणीय दिसतात, हें कोणास सांगायला पाहिजे असें नाहीं. ही रमणीयता पराकाष्ठेची मोहक आहे, व हिच्या भरांत पाणिग्रहण केल्याने कधीं कधी प्रमाद होण्याचा संभव आहे हेंही आम्हांस कबूल आहे. पण याच गोष्टीबरोबर ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे की, विवाहापासून उत्पन्न होणाऱ्या अत्युत्कृष्ट सुखाचा उपभोग अशा ऋतूंत युवकयुवतींस स्वेच्छेनुरूप पाणिग्रहण करूं दिल्यानेंच होण्याचा संभव आहे. निर्दोष अशी, या जगांत कोणती वस्तु आहे? गुलाबांचें सुंदर फूल कांट्यातून काढावें लागतें; मौक्तिकासाठी समुद्रमन्थन करावें लागतें; सुवर्णकण मृत्कणांशीं मिसळलेले असतात; तात्पर्य काय कीं, येथली कोणतीही वस्तु, संस्था, रीति किंवा स्थिती घ्या, तींत बिलकुल उणेपणा नाहीं, असें कधींही व्हावयाचें नाहीं,

तेव्हां कोणत्याही गोष्टीचा अंगीकार किंवा त्याग करणें; तो तींतील चांगलेवाईटपणाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. जींत वाईटपणाचा भाग अधिक असेल तिचा आपण अनादर करतो, व जींत चांगलेपणा विशेष असेल ती आपण स्वीकारतों. लग्न लहानपणीं करा, तरुणपणी करा, किंवा उतार वयांत करा, तें करतांना कांही तरी चुका व्हावयाच्याच! तें आपलें आपण करा किंवा दुसऱ्याकडून करवा- त्यांतही अनेक दोष असावयाचेच! पण तेवढ्यावरून जर कोणीं असें म्हणत असतील कीं, सर्वच विवाहपद्धति सदोष आहेत, तर मग एक टाकून देऊन दुसरी घालण्यात काय अर्थ आहे? तर त्यास असें उत्तर आहे कीं, सर्व विवाहपद्धति सदोष आहेत हें जरी खरें आहे तरी त्या सर्वांत दोषाचा अंश सारखा आहे, हें खरें नाहीं. तो निरानिराळ्या पद्धतीत कमी अधिक आहे, व स्वयंवरांत तो अत्यल्प आहे!

हें आमचें मत प्रस्तुतकालीं बहुतेकांस पसंत होणार नाहीं हें आम्ही जाणून आहों; पण दुसऱ्या कोणत्याही विवाहपद्धतीपेक्षां या विवाहपद्धतीपासूनच मनुष्यास विशेष सुख होण्याचा संभव आहे, व सध्यां आम्हांत जी रूढ पद्धति आहे तीपासून आम्हांस फारच कमी सुख आणि अतिशय त्रास होत आहे, अशी आमची पक्की खातरी झाली आहे; म्हणून जेणेंकरून पहिलीचा प्रचार लौकर पडेल, व दुसरीचा लोप होईल, तें सारें चांगलें मानण्याचा आमच्या मनाचा कल होऊं लागला आहे, व हाच कल सांप्रत विषयाची चर्चा आरंभण्यास कारण झाला आहे.

कोणत्याही अप्रिय किंवा पीडादायक गोष्टीचा प्रतीकार करण्याचे उपाय दोन प्रकारचे असतात. एक, ती गोष्ट ज्या कारणांनी घडत असते तीं कारणें नाहीशीं करणें; दुसरा, तीं कारणें नाहींशी करतां येण्याजोगीं नसतील तर त्या गोष्टीस बाहेरून कांहीं तरी अडथळा आणणें. उदाहरणार्थ, एखाद्याचें मूल चोरटें असलें तर त्याची ती खोड दोन रीतींनी घालवितां येईल. एक, त्याला चोरीचे परिणाम सांगून व सदुपदेश करून व्यसन टाकण्याविषयीं त्याचें मन वळविणें. दुसरा, त्याच्या वागणुकीवर नेहमी डोळा ठेवणें, व त्याच्या हातीं कोणतीही मौल्यवान् वस्तु न पडेल असा बंदोबस्त राखणे. अशाच दोन मार्गांनीं आम्हांस अनेक वर्षे भोंवून राहिलेल्या बालविवाहरूप व्यसनाचाही प्रतीकार करतां येणार आहे. बालविवाहापासून होणारे दुष्परिणाम लोकांच्या मनांत भरवून, त्यापासून त्यांस परावृत्त करणें, हा निर्दोष व राजमार्ग होय. पण येवढ्यानें कार्यसिद्धि लौकर न होतां, त्यापासून अनेक वर्षे नुकसान होण्याचा संभव असेल, तर त्याच्या मदतीला दुसऱ्या प्रतीचे कांही उपाय देतां येण्यासारखे आहेत. कांहीं दिवसांपूर्वी

बालविवाहनिषेधार्थ कायद्याची वाटाघाट चालली होती ती या मार्गांपैकींच होय. थोड्या दिवसांपूर्वी मलबारी शेट यांनी ऋतुप्राप्ती न झालेल्या स्त्रीवर आगळीक करणाऱ्या नवऱ्यास शिक्षा करण्याबद्दल कायदा असावा, म्हणून जी चर्चा चालविली होती, तीही याच प्रकारची होय, व आज आम्ही जी शक्कल पुढें आणीत आहों, तीही याच माळेची आहे! या आमच्या लिहिण्याच्या पद्धतीवरून कोणास असें वाटण्याचा संभव आहें कीं, ज्या उपायांवर खुद्द आमचाच भरंवसा नाहीं, असें कांही तरी उपाय आम्ही उगाच लोकांपुढें स्वत:स हास्यास्पद करून घेण्याकरिता आणींत आहों; पण असें समजणें मोठी चूक होणार आहे. तथापि येवढे खरें आहे कीं, बालविवाहासारख्या दुष्ट चालीचा जरी आम्हांस पराकाष्ठेचा तिरस्कार आहे, तरी त्याचा प्रतिकार करता येण्यासारखे जे अनेक उपाय आहेत, त्या साऱ्यांस एकाच माळेंत ओंवण्याइतक्या विचारपराङ्मुखतेचे अवलंबन करण्यास आम्ही तयार झालेलों नाहीं. विचारशक्तीचा अगदींच लोप झाल्याशिवाय उत्तम, मध्यम, व कनिष्ठ या तीन संज्ञा अभेद आहेत, असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. 'असें जर आहे तर मग राजमार्ग सोडून आड वाटेचें अवलंबन तुम्ही कां करतां?' असा प्रश्न कोणी करील, तर त्यास आमचें असें उत्तर आहें कीं, देशाच्या, कालाच्या व व्यक्तीच्या विवक्षित स्थितींत सौम्योपायांचें अवलंबन न करतां, तीव्रोपाय करणेंच विशेष श्रेयस्कर असतें. अगदी लहान मुलांस वेदांताच्या गप्पा सांगून फळ नाहीं. त्याला तोंडाचा किंवा छडीचा धाकच दाखविला पाहिजे. तसेंच, एखाद्यास वेड लागून तो बेफाम झाला, तर त्यावर अगोदर तीव्र उपाय चालवून त्याचा वायु उतरला म्हणजे मग सौम्य औषधींनी त्याचा रोग समूळ काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याला खून करण्याची खोड लागली आहे त्याला देहांतप्रायश्चित्ताशिवाय दुसरा दंड नाहीं, त्याप्रमाणेंच लोकांच्या आचारांत जेवढा अत्यंत क्रूरपणाचा व अविचाराचा भाग असेल तेवढा साधेल तर तीव्र उपायांनीं नाहींसा करण्यास हरकत नाहीं. आमच्यामधील सतीची चाल अशा प्रकारच्या सक्त उपायांनींच बंद करण्यासारखी होती; व आठदहा वर्षांच्या पोरींच्या गळ्याभोंवती, विवाहाचे फांस घालून त्यांचा आमरण छळ करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आईबापांचें मूर्खत्वही अशाच रीतीनें बंद करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें आमचे मत आहे. पण तें आमच्या सध्याच्या नीचावस्थेंत कोणास पसंत पडणार? सरकार तर बोलून चालून परकें. आम्ही आपल्या मुलींचे व मुलांचे गळे धर्माच्या नावानें कापण्याचा आग्रहच धरून बसलों, तर तसें न करण्यास्तव आम्हांवर सक्ती करून, आमच्या असंतोषानें आपल्या शांतींत व्यत्यय आणून घेण्याची त्यांस काय गरज पडली आहे? त्यांच्या भूतदयेस व राज्यास कलंक आणण्यासारखी सतीची

चाल होती तेवढी त्यांनीं आमच्या अधर्मी धर्मास आणि मूर्ख शहाणपणास एकीकडे गुंडाळून ठेऊन एकदम बंद केली. पण बालविवाहाची चाल तितकी अमानुष नसल्यामुळें त्यांनी तींत आपलें मन घातलें नाहीं. त्यांना असें वाटलें कीं, शिक्षणाचा प्रसार झाल्यानें ही चाल सहज मोडण्यासारखी आहे. पण आम्ही कसले निगरगट्ट! सरकार हात घालीत नाहीं, असें दिसल्याबरोबर आम्ही तट्ट फुगून गेलों, व जी गोष्ट सरकारानें केवळ मेहेरबानीखातर केली नाहीं, ती करण्याचा त्यास अधिकार नव्हता, किंवा ती त्यास करतां आली नसती, असें आम्ही प्रपादूं लागलों! पण जर हें ब्रिटिश सरकार, अकबराप्रमाणें, ऋतु प्राप्त होण्यापूर्वी कोणीही आपल्या कन्येचा विवाह करूं नये, असा कायदा सतीच्या कायद्याबरोबर करून जातें, तर त्यास प्रतिबंध करण्याची आम्हांपैकी कोणाची तरी प्राज्ञा होती काय? दूर कशाला? **लॉर्ड ल्यान्सडौन** यांनीं ऑफिशिअल सीक्रेट ॲक्टाप्रमाणें उद्यां तसला कायदा कायद्याच्या घिरटांतून एकाएकीं काढला, तर त्यास आड येण्यास आम्हांपैकीं एकाची तरी छाती होणार आहे काय? ''नाहीं देखिलें पंचानना, तोंवरी जंबुक करी गर्जना'' अशी आमची स्थिति आहे! आम्ही इतके धीट आहों की, चवदावे रत्न आमच्या दृष्टीस पडले कीं पुरे; आम्ही आपले पाय लाऊन पळत सुटलोंच!! अशी बालविवाहाची, जशी विधवाविवाहाची, तशीच **विवाहनिराकरणाची** अथवा घटस्फोटाची गोष्ट होय. उद्यां जर सरकारानें असा कायदा केला कीं, 'अज्ञानपणीं आईबापांनीं केलेलें लग्न मला मान्य नाहीं,' अशी फिर्याद कोर्टापुढें कोणी आणील तर कोर्टानें तें रद्द होण्याचा दावा दिला पाहिजे; तर आमचे लोक शुष्क वल्गनेहून विशेष कांहीं करूं शकतील काय? ''सुधारणा मुंगीच्या पायानें होते; उतावीळ सुधारकांचे वर्तन देशाच्या हितास कारण न होतां उलट नुकसानास कारण होतें; चांगल्यावाईटाचा भेदाभेद लोकांस समजूं लागून जें वाईट असेल तें त्यांनी आपण होऊन टाकण्यांत व चांगलें असेल त्याचा स्वीकार करण्यांत त्यांचा विशेष फायदा आहे; सक्तीच्या कायद्यापासून कोणताही लाभ नाहीं'' इत्यादि पोकळ तत्त्वज्ञानाच्या लांब लांब गप्पा मारण्यांत मोठें शहाणपण व भूषण आहे, असें आम्हांस वाटतें. पण दहाबारा वर्षांच्या पोरीस किंवा पंधरासोळा वर्षांच्या पोरास संसाराचे विंचू लावण्यांत, ज्या कन्यांना ऋतु देखील प्राप्त झाला नाहीं; अशांस वैधव्याग्नीनें पोळण्यांत अथवा एखादी जाईची कळी निवडुंगावर, किंवा सोनचाफ्याचें फूल कोरांटीवर आणून टाकण्यांत काय शहाणपण व भूषण असेल तें असो!

*

घटस्फोट अथवा काडीमोड

या विषयावरील मागल्या अंकांतले आर्टिकल लेख प्रसिद्ध झाल्यापासून आमच्याकडे जीं पत्रे आलीं आहेत, त्यांपैकी कांहींत असा प्रश्न केला आहे कीं, याच प्रसंगीं, हा वादग्रस्त विषय आम्हीं उपस्थित केला याचें कारण काय? लौकरच "सामाजिक सुधारणापरिषद" बालविवाहाच्या निषेधार्थ मंडळी स्थापन करून ती नोंदविणार आहे, व त्या मंडळीचे सभासद होऊं इच्छिणाऱ्या लोकांच्या सह्या घेण्याचा प्रयत्न चालूं आहे. मुंबई ग्याझिट्यनेसुद्धां या मंडळीची स्तुति केली आहे व हिनें आरंभिलेला उद्योग तडीस गेल्यास या प्रांतांतील लोकांचें पुष्कळ हित होणार आहे, असें म्हटलें असून आम्ही ही 'खाजवून नवी खरूज' कशासाठी काढतों?' 'टेबलापाशीं बसून हवे तसे तारे तोडणारांच्या तब्येतींप्रमाणें किंवा इच्छेप्रमाणें समाजाची गति होत नसतें; समाजाची स्थिति भरलेल्या गाड्यासारखी आहे. तो टपालाच्या टांग्याच्या वेगानें कधींही जाऊं शकणार नाहीं. त्याला ओढणारी तट्टें फार बुजरट असतात; त्यांच्याकडून समाजशकट ओढण्याचें काम करून घ्यावयाचें असेल, तर त्यांना गोंजरून व चुचकारून तें त्यांकडून करून घेतलें पाहिजे. त्यांच्यावर विनाकारण शब्दप्रतोदप्रहार केल्यास, व त्यांना भंडाऊन सोडल्यास, तीं जूं फेंकून देऊन चार दिशांस उधळून जातील किंवा शकटाशीं धिंगाणा घालून त्याची मोडतोड करतील! सबब, जें करणें व बोलणे तें धिमेपणाचें असलें पाहिजे. ज्या गोष्टी लोकांच्या हातून आज होण्याचा संभव नाही, त्या त्यांच्यापुढें आणून त्यांना भिवविण्यात काय अर्थ आहे? "उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग" असें करण्यांत कोणाचाही फायदा नाहीं. सबब, दुसरे लोक लग्नाची मर्यादा बेताबातानें वाढविण्याचे सौम्य उपाय करूं लागले असतां आम्ही स्वयंवराच्या आणि घटस्फोटाच्या वादविवादांत पडणें बरोबर नाहीं. किल्ल्याचा पहिला तट सर केल्यावर, त्यावर उभें राहून दुसरा तट घेण्याच्या मसलती चालवाव्या, कीं पायथ्याशीं उभें राहून त्याच्या अत्युच्च प्रदेशावर निशाण कसें फडकवितां येईल हे घाटींत बसावें?"

चांगल्यावाईटाची निवडानिवड करण्याची ज्यांना शक्ति नाहीं किंवा इच्छा नाहीं; नवीन गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे कड्याखाली उडी घेणें, असें

ज्यांस वाटल्याशिवाय रहात नाहीं; जें बरें दिसेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य ज्यांचे अंगीं वसत नाहीं; गतानुगतिकत्व हें ज्याच्या वर्तनाचें आदितत्त्व; चरितार्थसंपादन, द्रव्यार्जन व विषयोपभोग यांतच मनुष्यकर्तव्यतेची परमावधि आहे, असा ज्यांचा निश्चल समज; जुन्या कल्पनांची व आचारांची ज्यांच्या पायांस घट्ट मगरमिठी पडली आहे; व कोणी तरी फरफटून ओढल्याशिवाय ज्यांना आपल्या नित्यकर्दमांतून बाहेर पडण्याची इच्छा व्हावयाची नाहीं- अशा लोकांकडून वरच्यासारखा कोटिक्रम होत असतो. त्यांच्या मतें समाजाच्या प्रकृतींतच आपल्या आपण पुढें सरण्याचें गूढ सामर्थ्य आहे! त्याच्या घटकांपैकीं कोणीही हालला नाहीं, तरी जसजसे दिवस लोटत जातील तसतसा तोही पुढें गेलाच पाहिजे! पण या अद्वितीय पंडितांना असें समजत नाहीं कीं, समाज ही कांहीं स्वतंत्र मूर्तिमंत वस्तु नाहीं. समाजांतील घटक हालले तर समाज हालतो, ते मंदावले तर तो मंदावतो, आणि ते मागें हटूं लागले, तर तो मागें हटतो! त्यांची उन्नति ती याची उन्नति, व त्यांची अधोगति आणि ऱ्हास ती याची अधोगति आणि ऱ्हास. ''मी स्वस्थ बसेन, बाकीच्यांनी मात्र उद्योग करावा'', असें जर समाजांतील प्रत्येक घटक म्हणूं लागेल, तर त्याचे पाऊल बिलकुल पुढें पडणार नाहीं, हें उघड आहे. तसेंच अमुक प्रकारचें आचरण साऱ्यांनी करावें व अमुक प्रकारचें बोलणें साऱ्यांनीं बोलावें, असा नियम करण्यापासूनही समाजाचा फायदा न होता, उलट मोठें नुकसान होण्याचा संभव आहे. बुद्धि ही काहीं सर्वांस सारखी वाटलेली नाहीं. कोणाच्या डोक्यांतून केव्हां काय कल्पना निघेल, आणि तीपासून समाजाचा केवढा फायदा होणार असेल, निदान ती कितीजणांना ग्राह्य होण्यासारखी असेल, हें निश्चयात्मक कधींही सांगतां येण्यासारखें नाहीं. सबब, सभ्यपणाची मर्यादा न सोडतां समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल; ती त्यानें उघडपणें बोलून दाखविणें यांतच समाजाचें कल्याण आहे. शिवाय, ज्या मतांस आपण तऱ्हेवाईक मतें असें म्हणतों तीं त्यांच्या नवीनत्वामुळें बहुधा तऱ्हेवाईक वाटतात. तीं पुनः पुनः कानावर पडूं लागलीं म्हणजे त्यांचा धाक वाटेनासा होऊन, हळू-हळू त्यांतील गुणावगुणांचा विचार करण्याची बुद्धि होऊं लागते, आणि अखेरीस त्यांपैकीं जीं पसंत पडतील तीं अंगीकारण्याची इच्छा होते. दुसरें, समाजांतील सामान्य मनुष्यांपैकीं एखाद्यास जर कांहीं विशिष्ट मतें बरींशी वाटली तर तीं तशीं वाटण्यासारखे दुसरे पुष्कळ लोकही त्या समाजांत असले पाहिजेत, असें सिद्ध होतें. ज्याप्रमाणें भाताच्या एक दोन शितांवरून सारा भात शिजला आहे किंवा नाहीं, हें सांगतां येतें, त्याप्रमाणें समाजांतील पांचचार गृहस्थांच्या बोलण्याच्या व लिहिण्याच्या झोंकावरून, त्याचा मगदूर कसा काय आहे, यांचे

अनुमान करतां येतें. सुधारकांत स्वयंवर हा विवाहाचा सर्वोत्तम मार्ग असें प्रतिपादण्यांत येणें; यावरून त्याच्या चालकांचें तऱ्हेवाईकपण सिद्ध होत नाहीं, तर स्वयंवरपद्धति बरी असें वाटण्यास ज्या प्रकारची मतें असली पाहिजेत, तसलीं मते या देशांत बरींच आहेत, व पुष्कळ सहज तशीं होण्यासारखी आहेत, असें सिद्ध होतें. पण क्षणभर वादासाठी असेंही मानिले कीं, वास्तविक स्थिती अशी नाहीं, तरी सुद्धां आम्हांस जें बरें दिसत आहे तें आम्हीं कां न बोलावें, हें आम्हांस समजत नाहीं. ज्या कारणांनीं आमच्या देशाच्या पाठीमागें आज कित्येक युगें दास्यचक्र लागलें आहे; ज्या कारणांनीं आमच्या अंगीं स्त्रैण्य आलें आहें; ज्या कारणांमुळे आमची संसारयात्रा अत्यंत नीरस किंवा कष्टावह झाली आहे; ज्या कारणांमुळें इतर राष्ट्रें आमची छी: थू: करीत आहेत; व ज्या कारणामुळें आम्ही बुद्धीनें, नीतीनें, व शरीरसामर्थ्यानें अधिकाधिक क्षीण होत असून, थोड्या वर्षांत आमच्या मुळींच मागमूस नाहींसा होईल कीं काय, अशी भीति वाटत आहे, तीं कारणें अल्प समजुतीच्या, कोत्या विचाराच्या, स्वार्थी, भेकड किंवा मत्सरी लोकांच्या दूषणाला भिऊन उघड सांगण्यास कचरणारे सारेच होतील तर या भारतीय समाजाचें किंवा त्यांतील कोणत्याही व्यक्तींचे डोकें वर निघण्याचा संभव नाहीं. पाण्याच्या धारेस लागलेली नांव झपाट्यानें खाली जाऊं लागली असतां, तींतील एका व्यक्तीसच कोणत्याही तीरास कसें लागतां येणार? समाज सोडून दिल्याखेरीज त्याच्या उन्नतीचे व अधोगतीचे वांटेकरी न होणें हें अशक्य आहे. तेव्हां केवळ स्वार्थदृष्टीनें जरी या गोष्टीचा विचार केला, तरीही हें कबूल करावें लागतें की, ज्याच्या मनांत समाजांत राहून आपली उन्नति करून घ्यावी अशी उत्कट इच्छा झाली असेल, त्यानें अगोदर समाजाची उन्नति करण्याच्या प्रयत्न केला पाहिजे. समाजच खालीं खालीं जात असेल तर हाच वर कोठून येणार?

येणेंप्रमाणें अनेक गोष्टी मनांत आणून प्रस्तुत विषय आम्हीं हातीं घेतला आहे. तो सध्यांच हातीं घेण्याचें कारण येवढेंच कीं, 'सामाजिकसुधारणापरिषदे'-कडून बालविवाहनिषेधार्थ जी खटपट चालली आहे तीपासून आमच्या समजुतीप्रमाणें विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं. सर्व लोकांनीं दहा वर्षांच्या आंत मुलीचे आणि सोळा वर्षांच्या आंत मुलांचे लग्न करावयाचेंच नाहीं असा निश्चय केला असतां, त्या यत्तेखालच्या कोणत्याही वर्षांच्या मुलीचा विवाह होऊन तिचा नवरा मेला असतां, तीवर जें वैधव्य संकट येत असे, तेवढें या अल्पनिषेधानें टळणार आहे; म्हणजे दहा वर्षांपुढे मुलींचीं लग्नें होऊ लागल्यास सात आठ किंवा नऊ वर्षांच्या पोरींच्या कपाळाचें वैधव्य तेवढें टळेल. हळू हळू बारा वर्षांची इयत्ता रूढ झाल्यास आणखी कांहींची आपदा वांचेल. पण दहा आणि बारा या

दोन आंकड्यांच्या दरम्यानच जोंपर्यंत आम्ही भटकत आहों, तोंपर्यंत प्रौढ वयांत वधूवरांनीं स्वसंमतीने एकमेकांस वरल्यापासून होणाऱ्या गृहस्थावस्थेंतील अनुपमेय सुखाचा लाभ, आणि त्यामुळे समाजाच्या सविस्तर घटनेवर होणारे हितकारक परिणाम यांचा प्रादुर्भाव येथें कसा होऊं लागणार? बारापासून चौदावर आम्हीं कसे जाणार? या दोहोंच्या दरम्यान धर्मानें जी अटकनदी घातली आहे ती कशी उतरणार? हवें तें करून ती उतरून पलीकडे जाण्याचा निर्धार केल्याखेरीज, बालविवाहनिषेधार्थ केलेल्या तुमच्या लुटुपुटीच्या उपायापासून कांहीएक तात्त्विक फायदा होण्याची बिलकुल आशा नाहीं.

*

प्रियाराधन

अन्नसेवनानें व्यक्तिसंरक्षण होतें व स्त्रीपुरुषसमागमानें जातिरक्षण होतें. प्रकृति व पुरुष किंवा परब्रह्म आणि माया यांचा संयोग झाला तेव्हा जगदुत्पत्ति झाली व जें समागमत्व जगाच्या आद्योत्पत्तीस कारण झालें तेंच त्यांतील चैतन्योत्पत्तीस कारण होत आहे. आकर्षण आणि निराकरण, किंवा स्नेह आणि द्वेष या दोन अनादि सामर्थ्यांमुळें जगांतील चैतन्यबीजापासून प्राणिवर्ग कसा उत्पन्न झाला व त्याच्या जाति आणि उपजाति कशा होत गेल्या, हें अलीकडे पुष्कळ युरोपीय ग्रंथकारांनी दाखविलें आहे. पण परवा आमच्या वाचण्यांत एक लेख आला, त्यांत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता कीं, स्वयंवराची पद्धति प्राणिवर्गांतच दृष्टीस पडते असें नाहीं, तर कांही प्रकारच्या वनस्पतींतही दृष्टीस पडते! व चांगला शोध केला असतां, सर्व वनस्पतिवर्गासही ही पद्धत लागू आहे, असें कदाचित दिसून येईल! युरोपांत व अमेरिकेंत होत असलेल्या असल्या विलक्षण शोधांचे वर्तमान ऐकून तरी आमचे लोक आपल्या विवाहपद्धतीकडे विचारपूर्वक पाहूं लागतील काय? स्त्रीझाडांचा पुरुषझाडांशी अन्योन्यांच्या संमतीशिवाय संयोग होत नाहीं व ती संमति मिळविण्यासाठीं तीं अतोनात प्रयत्न करीत असतात, हें सिद्ध होईल तर आम्ही अप्रबुद्ध झालों आहों, असें म्हणावें लागणार नाहीं काय? अन्नापासून प्राणत्राण होतें, तेव्हा चांगले अन्न सेविलें असतां चांगली शरीरपुष्टी होईल, व निःसत्त्व अन्नाचे सेवन केलें असतां, शरिरास क्षीणता येईल, हें पोरासोरास देखील समजण्यासारखें आहे. ''अन्नमयप्राण:'' व ''प्राणमयपराक्रम:'' ह्या दोन म्हणी या देशांत सर्वतोमुखी झाल्या आहेत त्या अगदी योग्य आहेत. आतां प्राणरक्षणाशीं अन्नसेवनाचा जितका संबंध आहे, तितकाच जातिरक्षणाशीं स्त्रीपुरुषसमागमाचा आहे, हें कोणीही कबूल करील; तसेंच हा समागम अत्यंत फलप्रद होण्यास म्हणजे त्यापासून विस्तृत जात्युत्पत्ति होण्यास, तो जसा व्हावा तसा झाला पाहिजे, हेंही प्रत्येक सुविचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे. वनस्पतींत व मनुष्याशिवाय इतर प्राण्यांत स्त्रीपुरुष किंवा नरमादी यांच्या संयोगांचे नेमलेले काळ किंवा ऋतु आहेत. ते काळ किंवा ऋतु प्राप्त झाल्याशिवाय, त्यांत संयोग होऊं शकत नाहीं, व संयोग न झाल्यामुळे

संतानोत्पत्तिही होऊं शकत नाहीं. मनुष्याप्रमाणें त्यांतही हा संयोगकाल अत्यंत सुखावह असला पाहिजे, असें त्यांच्या त्या वेळच्या स्वरूपावरून व बाह्य वर्तनावरून स्पष्ट दिसतें. वसंत ऋतूच्या सुमारास बहुतेक झाडें किती मनोरम दिसूं लागतात. हें पुष्कळांच्या पहाण्यांत असेलच; तसेंच पानांचा, फुलांचा बहर येऊन गेला म्हणजे तीं किती फिकट व निस्तेज दिसतात, हेही पुष्कळांनी पाहिलें असेल. कांहीं झाडें व किडे यांची संतानोत्पत्ति झाली म्हणजे त्यांचे चैतन्यसाफल्य होतें आणि त्यांच्या अस्तित्वाचा शेवट होतो. बहुतेक सारीं गवतें अशाच प्रकारची आहेत. जीं झाडें व जे प्राणीं असे नाहींत, त्यांत दुसऱ्या प्रकारचें धरबंध आहेत. आम्ही सुबुद्ध मनुष्यांनीं मात्र या कामी अगदी ताळ सोडिला आहे, व त्यांतल्या त्यांत आम्हीं हिंदु लोकांनीं तर बेतालपणाची परमावधी केली आहे. सृष्टीनियम आपला अंमल थोडाबहुत आम्हा ज्ञानवान् मनुष्यजातीवरही चालवितात म्हणून बरें आहे, नाहीं तर आम्ही शहाण्या हिंदु लोकांनीं एक महिन्याची मुलगी आणि दीड महिन्याचा मुलगा यांच्या गर्भाधानाचा सोहळा पाहण्यास सोडिलें नसतें! किंवा नव्वद वर्षांच्या थेरड्यांबरोबर नव्वद दिवसांच्या पोरींचे लग्ने लाऊन देऊन त्यांच्या 'अशुभाची' आणि 'अमंगलाची' मोठ्या उत्कंठेने किंवा 'सावधान' चित्तानें वाट पहात बसलों असतों! पण काय करावें? महिन्याच्या पोरीच्या डोहाळजेवणाचा समारंभ करण्यास सृष्टिनियम परवानगी देत नाहीं, यामुळें आमचा अगदीं नाइलाज होऊन गेला आहे! तथापि त्यांचें निराकरण आमच्या हातून जितकें होईल तितके करण्याची आम्हीं आपल्याकडून होईल तितकी काळजी घेत आहों. कित्येक गृहस्थ व बायका आपणांस पुढें होणाऱ्या मुलांच्या व मुलींच्या लग्नाचे ठराव, आपणांस मुलें होणार आहेत किंवा नाहींत, हें सिद्ध होऊं लागण्यापूर्वीच करीत असतात! व कांहीजण गर्भांतल्या पोरीचे व गर्भांतल्या पोराचे वाङ्‌निश्चय करून ठेवतात! व कांहीजण एक संवत्सराच्या आंत आपल्या संततीकडून पाणिग्रहण करवितात! अशा रीतीनें तयार केलेली दादलाबायलें एके ठिकाणी होतील केव्हां, आणि आपल्याप्रमाणें त्यांनाही गर्भांतल्या आणि बाहेरल्या पोरांच्या लग्नाचे ठराव करण्याचा नाद लागेल केव्हा; याविषयी येथील स्त्रीपुरुषांस पराकाष्ठेची आतुरता उत्पन्न झालेली असते! इतक्यांत सून किंवा कन्या ऋतुमती झाली म्हणजे मग त्या आनंदास काय पारावार! मुलीच्या बाजूनें मुलगा होण्याच्या या शक्यतेस 'मुलगा झाला' असें मानून, आप्तमित्रांस साखरेसह ही आनंदाची खबर द्यावयाची आणि ताबडतोब मखराच्या आणि गर्भाधानाच्या तयारीस लागावयाचें! सोळा दिवसांच्या आंत मुहूर्त पहाण्याची गरज नाहीं, असा शास्त्रार्थ आहे! मग लौकर लौकर सारी सिद्धता करून, व जमतील तेवढे उभय पक्षांकडील लोक गोळा

करून, त्या अवकाशाच्या आंत भटांनी, आईबापांनी, लहान मोठ्या घराच्या व परघराच्या बायांनीं, समवयस्क मित्रांनी व मैत्रिणींनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत होमहवनांत, ओटया-हळदकुंकवांत, व जेवणफराळांत दिवस व रात्रीचा पूर्वभाग घालून, दहा अकरांच्या सुमारास, ज्यांच्या अंगावरून कामवासनेची कधीं झुळुकही गेली नसेल, अशा दोन पोरांस रत्युपभोगासाठी विशेष काळजीनें व खर्चानें शृंगारलेल्या अशा एका खोलीत जबरीने ढकलून देऊन तिचीं दारे लाऊन घ्यावयाची आणि जन्मास येऊन जें पहावयाचें तें पाहिलें व करावयाचें तें केलें, अशा समाधानकारक विचारांत आपल्या स्थळीं जावयाचें, आणि मन्मथकारागृहांत कोंडलेल्या त्या पोरांची कशी स्थिती होईल, याच्या चिंतनांत अंथरुणावर अंग टाकून निद्राप्रियेची मर्जी सुप्रसन्न होण्यासाठी, या अंगावरून त्या अंगावर लोळत रहावयाचें!

याहून स्त्रीपुरुषांच्या रतिसुखाचा भंडवडा आणि मातेरें करण्याची अधिक मूर्खपणाची रीत शक्य किंवा कल्पनीय असेल काय? ज्यांना या रीतीतील मूर्खपण कळत नाहीं व ज्यांना तदनुसार वर्तन करणें हेंच आपलें कर्तव्य आहे, असें वाटत आहे त्यांना क्षमा केली पाहिजे. पण ज्या आम्हां अलीकडील सुशिक्षित लोकांस अशा प्रौढवयांत, कामविकार जागृत होण्यापूर्वी, बारा तेरा वर्षांच्या मुलीस व सोळासतरा वर्षांच्या मुलांस या नादी लावण्यापासून त्यांचे किती नुकसान होतें, हें आमच्या देशाच्या पूर्वेतिहासाच्या वाचनानें व इतर लोकांच्या उदाहरणानें स्पष्टपणें कळूं लागलें आहे. त्या आम्हीही ही निंद्य एकदम नाहींशी करण्याचा प्रयत्न करूं नये, व 'दहा बारा' आणि 'सोळा अठरा' करीत बसावें, ही अत्यंत शरमेची गोष्ट नाहीं काय? फ्रान्स, जर्मनी, रशिया, इतली, ग्रीस, पोर्तुगाल, ऐर्लंड व ब्रॅझील येथील लोकांनीं राजकीय हक्क संपादण्यासाठी केलेल्या व चालविलेल्या खटपटी पाहून, आम्हांसही महाजनसभा, सार्वजनिकसभा, प्रेसिडेन्सी असोसिएशन, इंडिया असोसिएशन- व साऱ्यांवर ताण करणारी पंचसांवत्सरिक राष्ट्रीयसभा- असल्या मंडळ्या स्थापण्यांत आपण मोठा पुरुषार्थ केला, असें वाटूं लागले आहे! पण आमच्या मतें हा वृथा भ्रम आहे. आम्ही अद्यापि टिकाऊ असें कांहींएक केलेलें नाहीं. या साऱ्या सभा पोकळ डोले आहेत! हे केव्हा थंडे होतील याचा भरंवसा नाही! राष्ट्राची खरी मजबुती कुटुंबाच्या आणि त्यांतील व्यक्तींच्या मजबुतीवर सर्वथैव अवलंबून आहे. त्या कुटुंबाची व त्याच्या लहानमोठ्या अवयवांची स्थिति जोपर्यंत आतां आहे तशीच राहील, तोंपर्यंत राज्य, धर्म, नीति, उद्योग यांपैकी कोणत्याही गोष्टींत आमचें पाऊल वास्तविकपणें पुढें पडलें असें कधींही म्हणतां येणार नाहीं! ज्या लोकांना कोणी तरी पसंत केलेल्या बायका

चालतात; ज्या लोकांना रत्युपभोगासाठीं दुसऱ्यांनी कोंडून घालावें लागतें; ज्या लोकांना ज्ञानसंपादन, द्रव्यसंपादन, लौकिकसंपादन, सामर्थ्यसंपादन, विषयसौख्यसज्ञानसंपादन, यांपैकीं कोणतीही गोष्ट कमविण्यापूर्वी 'जबरीचा संभोग' करण्याची चटक लागली आहे व ज्यांच्या हातून या पापामुळे प्रतिदिवशीं प्रेमाचे हजारों खून पडत आहेत, शारीरिक व मानसिक अनंत यातना भोगाव्या लागत आहेत, विद्या व वित्त संपादण्याची बिलकुल कुवत राहिलेली नाहीं, खऱ्या जातिविशिष्टसुखाची कल्पना ज्यांच्या स्वप्नांतसुद्धां कधीं येत नाहीं, ज्यांना संसार असार होऊन गेला आहे, व आयुष्य हें ज्यांनी दुर्धर ओझ्यासारखें वाटत आहे, अशा लोकांनीं राष्ट्रीय सभांच्या फंदात पडून आपल्या मनासारखे राज्यकर्ते वरण्याची इच्छा कशाला धरावी?

*

वल्लभोपासना

ती शीतळोपचारीं जागी झाली हळूंच मग बोले।
औषध नलगे मजला! परिसुनि जननी बरें म्हणुनि डोले।।

मनुष्याच्या अंत:करणाची खरी प्रवृत्ति कोणीकडे आहे, हें पहावयाचे असेल तर त्याला नकळत त्याच्या आचरणाचें अवलोकन केलें पाहिजे. कोणी संभावित गृहस्थानें कांहीं वस्तु लांबविली असावी. असा संशय आला असेल तर त्याला "अहो, तुम्ही अमुक वस्तु घेतली आहे काय?" असा प्रश्न विचारला असता, तो तिचा पत्ता लागूं देईल, असें कधींही व्हावयाचें नाहीं! सबब, असा गृहस्थ झोपेंत काय चावळतो, किंवा गेलेल्या वस्तूविषयीं गोष्टी निघाल्या असतां त्याची चर्या कशी होते, हें बारकाईने पाहून, त्यावरून अनुमान बांधावे, असा जो व्यवहारदक्ष वडील माणसे उपदेश करीत असतात, त्यांत बराच ग्राह्यांश आहे! पुस्तक लिहीत असतां, सभांत बोलत असतां, व दुसऱ्यासमक्ष कांहीं करीत असतां, प्रत्येक मनुष्य स्वत:चें व्यंग उघडें न पडूं देण्याविषयी आपणाकडून होईल तितकी खबरदारी ठेवीत असतो. त्यामुळें त्याच्या लेखावरून, भाषणावरून किंवा त्यानें दहाजणांपुढे केलेल्या आचरणावरून, त्याचे खरे विचार कसे असतील, हें हटकून सांगतां येणें कठिण आहे. तेव्हां कोणत्याही मनुष्याच्या वास्तविक आचाराची व विचाराची ठेवण कशी आहे, हें जाणावयाचें असेल तर, आपणावर कोणाचाही डोळा नाहीं, असें त्यास वाटत असतां त्याचें जे वर्तन होत असतें, व त्याच्या तोडातून जे उद्‌गार निघत असतात, ते लक्ष देऊन पाहिले तर, त्याच्या स्थाईक कृतीची बिनचूक अटकळ सहज करतां येणार आहे. कोटिक्रमाची अस्त्रे पाजळून जो वादाला बसला, तो आपल्या खऱ्या मतांची दाद सहसा लागूं द्यावयाचा नाहीं! आळस, निरुद्योगीपणा, धनातितृष्णा, परस्त्री किंवा परपुरुष-चिंतन या गोष्टी अत्यंत त्याज्य आहेत, हें कोणत्या सुशिक्षित स्त्रीस किंवा पुरुषास कळत नाहीं, किंवा त्या तशा आहेत, असें बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कोण म्हणत नाहीं? तथापि या अमंगल गोष्टींचा आपणांस कधींही विटाळ झाला नाहीं, असे किती स्त्रिया व पुरुष छातीला हात लाऊन म्हणूं शकणार आहेत? तात्पर्य, मनुष्यांच्या वास्तविक स्थितींत व जाणूनबुजून, दुसऱ्यापुढें त्यांचे जें बोलणे चालणें

होत असतें त्यांत, बरेंच अंतर असतें. हें अंतर नाहींसे होत जाणें, व सर्वकाळी त्याचें एकच स्वरूप दिसूं लागणें हें एक त्यांच्या सुधारणेंचे व्यंजक होय. ज्या लोकांत ही विषमता विशेष दृष्टीस पडतें, ते लोक सुधारणेंत फार मागें आहेत असें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. कारण त्या विषमतेवरून हें सिद्ध होतें कीं, जी गोष्ट विचारदृष्ट्या त्यांस बरी दिसते, तदनुसार वर्तन करण्यास ते तयार झालेले नाहींत. ते भेकड किंवा दांभिक आहेत!

हे विचार खरे असतील, तर एका गोष्टींत आम्हा हिंदूंसारखे भेकड अथवा दांभिक असे दुसरे कोणतेही लोक नसतील, असें म्हणणें भाग पडते! इंग्रजी कादंबऱ्या किंवा संस्कृत नाटकें वाचतांना, अथवा रंगभूमीवर त्यांचे प्रयोग पहात असतांना, ज्या गोष्टी वाचून व पाहून आम्हांस पराकाष्ठेचा आनंद होतो, त्यावरून विवाहपद्धतीविषयीं आमचे विचार कसे असतील, याविषयीं कोणी त्रयस्थ पुरुष अनुमान करूं लागले, तर स्वयंवराचें आम्हीं मोठे चहाते असलों पाहिजे, व तीच विवाहपद्धति आम्हांत रूढ असली पाहिजे, तसें असल्याखेरीज अशा प्रकारच्या कादंबऱ्यांच्या व नाटकांच्या वाचनापासून किंवा त्यांचे प्रयोग पाहण्यापासून इतका आनंद होण्याचा संभव नाहीं, असें त्यांस सहज वाटणार आहे! पण खरी स्थिति किती उलट आहे! मातापितरांची आज्ञा घेतल्याशिवाय कण्वदुहिता शकुंतला प्रियंवदेच्या सल्ल्यानें लतामंडपांत दुष्यन्ताची एकांती गाठ घेते व तेथें त्याचा गान्धर्वविवाह होऊन त्याचा यथोचित्त परिणामही घडतो, आणि तो सारा प्रकार आम्ही मोठ्या औत्सुक्याने पाहतों, व विशेष रसाच्या ठिकाणी **वन्स मोअर** (आणखी एकवार) असें म्हणून पात्रांकडून आपल्या पसंतीस उतरलेली चीज पुनः म्हणवितों, किंवा उत्तम वाटलेला अभिनय पुनः करवितों! मालतीमाधव वाचतांना अथवा त्याचा प्रयोग पहातांनाही आमची तशीच दशा होते. वडिलांच्या इच्छेविरुद्ध प्रेमानुरोधानें मालती-माधवांचा झालेला विवाह, किंवा तो घडवून आणण्यासाठी कामंदकीनें दिलेलें साहाय्य यांत आम्हांस अप्रशस्त असें कांहीं तरी वाटतें काय? हेंही असो. सुभद्र काबीज करण्यासाठी अर्जुनानें जो त्रिदंडी संन्यास धारण केला, व श्रीकृष्ण परमात्म्याच्या मदतीनें बलरामाच्या हातावर ज्या तुरी दिल्या, अथवा घटोत्कचादिकांच्या साहाय्यानें अभिमन्यूनें जें वत्सलाहरण केलें, ते पाहून तरी आम्हांस कधी विषाद झाला आहे काय? देवांनी घातलेल्या मागण्यांच्या धिक्कार करून, दमयंतीनें जें नळास वरिलें त्यांबद्दल मनांतल्या मनांत तरी तिच्या औद्धत्याबद्दल आम्ही तीवर कधीं रागावलों आहों काय? जर नसेल तर स्वयंवराची रीत पुनः पाडावी, असें कोणी म्हटल्यास आमचें पित्त इतकें कां खवळतें बरें? शकुंतला, मालती, सुभद्रा, वत्सला, दमयंती किंवा इतर पौराणिक अथवा

काल्पनिक स्त्रिया, व दुष्यंत, माधव, अर्जुन, अभिमन्यू, नल अथवा इतर पौराणिक आणि काल्पनिक पुरुष यांच्या प्रकृतीत आणि आमच्या प्रकृतींत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे, असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं. तारुण्य, आरोग्य, बुद्धि, संपत्ति, स्वरूप, विद्या व ललितकलानैपुण्य जितकें त्यांना प्रिय होतें तितकें आम्हांसही आहे. दु:खाचा कंटाळा आणि सुखाचा अभिलाष जितका त्यांना होता तितका आम्हांसही आहे. त्यावेळीं ज्या वयांत कामवासना जागृत होत असे, त्याच वयांत आतांही होते. त्या वेळी वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांस आपल्या मनास रुचेल त्याच्याशीं किंवा तिच्याशी विवाह करण्यापासूनच आपणांस अत्युत्कृष्ट वैवाहिक सुख प्राप्त होईल, असें वाटून तीं कोणासही न जुमानंता, वाटेल तसा विवाह करीत, व सुखी होत, त्याप्रमाणें आतांही होण्याचा संभव आहे. असें असतां, नऊ दहा वर्षांच्या मुली व चौदा पंधरा वर्षांचे मुलगे यांच्या विवाहांत आपण पडून, मुलीं, तेरावें आणि मुलांस सतरावें वर्ष लागलें नाहीं, तोच त्यांना खोलीत कोंडून घालण्याविषयीं येवढा आग्रह आम्ही कशासाठी धरून बसतों? असलें निंद्य नर्मसाचिव्य आम्हीं केलें नाहीं, तर सारीं स्त्रीपुरुषें अविवाहित राहतील, प्रजोत्पत्ती बंद पडून जगाचा अंतसमय येऊन ठेपेल, किंवा चहूंकडे अनीतीचें साम्राज्य होऊन, साऱ्या संततीस जारजत्वाचा कलंक लागेल- अशा भीतीनें तर आम्ही बालविवाहाचे इतके एक निष्ठ भक्त बनलों नाहीं ना? स्वयंवरामुळें जर असला कहर पौराणिक कालांतील स्त्रीपुरुषांवर गुदरला नाहीं, व सध्याही इतर देशांतील स्त्रीपुरुषांवर गुदरतो, असें वाजवी रीतीनें म्हणता येणार नाहीं, तर तो आम्हांवरच गुदरेल असें कसें म्हणता येईल? कोणी असें म्हणतात कीं, स्वयंवराची किंवा संमति विवाहाची चाल येथें पाडली असतां, इंग्लिश लोकांप्रमाणें आमची लिंगविशिष्ट नीति शिथिल होईल. या आक्षेपावर पहिलें उत्तर असें आहे कीं, इंग्लिश लोकांची नीति आम्हांहून शिथिल आहे, असें म्हणण्यास काय आधार आहे? त्यांच्या देशांत विवाहनिराकरणाचीं कोर्टें आहेत, व त्यांत प्रतिवर्षीं पुष्कळ फिर्यादी लागतात, येवढ्यावरून त्यांच्यामध्यें या संबंधाचा आम्हांहून अधिक अनाचार होत असेल, असा तर्क करणें न्याय्य नाहीं; किंवा तिकडील **सेन्सस रिपोर्टांत** जारजांची जी बरीच मोठी संख्या नमूद केलेली असते, तीवरूनही आम्ही या बाबतीत त्यांहून अधिक शुद्ध आहों,असें खात्रीनें म्हणता येणार नाही. कारण, गुन्हे जगापुढें आले नाहींत, म्हणून ते घडत नाहींत, असें म्हणणें कधींही बरोबर होणार नाहीं. अमक्या अमक्याची बायको वाईट निघाली, किंवा अमकीतमकीचा नवरा 'शिनल' निघाला, असला दुर्लौकिक करून घेण्याची भीति वाटून, आमच्यामधील अनेक दुर्दैवी स्त्रिया आणि पुरुष जारपतीशीं किंवा

जारिणीपत्नींशी, कष्टानेंच कां होईना, आपलें आयुष्य कशावरून कंठीत नसतील? शिवाय, आमचा समाज जर इतका सोंवळा आहे, तर विधवांनीं गुप्त कर्मे छपविण्यासाठीं केलेले निर्दयपणाचे प्रयत्न उघडकीस कसे येतात? गतभर्तृकांनीं दुराचारी निघूं नये म्हणून त्यांना आम्ही कारागृहातल्या कैद्याप्रमाणें वागवितों. असें असून नद्यांत, रस्त्यांवर व अनाथगृहांत लहान मुलांची प्रेते, आणि सजीव मुलें कोठून येऊन पडतात? फिरून आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे ती ही कीं, गतभर्तृका अथवा एका विवाहित स्त्री दुराचारी निघाली असतां ती अनेक पुरुषांच्या सद्‌गुणास विघातक होते व जेवढें तिच्या नादी लागलेले असतात तेवढे सारे विवाहित असल्यास जारपति होतात, असें म्हटलें पाहिजे. अशा रीतीने गुप्त रीतींचा भ्रष्टपणा आमच्या समाजांत किती होतो व इंग्लिश समाजांत किती होतो. याचा स्पष्ट निर्णय कसा करता येणार आहे? पण हेंही असो; आज प्रत्येक शहरांत ज्या शेंकडों क्षियोषिता दृष्टीस पडतात, त्यांचे आश्रयदाते कोण आहेत? ज्याप्रमाणें दारूचें एक नवीन दुकान निघाले कीं, शेकडों लोकांस मद्यपी होण्यास उत्तेजन मिळतें, त्याप्रमाणें एका वेश्येमुळे शेंकडो लोक बिघडत असतात व ज्याअर्थी वेश्यागमनाचें व्यसन या देशांत इंग्लंडाहून कमी आहे, असें म्हणण्यास आम्हापाशी कांहीएक आधार नाहीं, त्याअर्थी लिंगविशिष्ट नीतीचा विध्वंस या व्यसनांमुळें या देशांत इंग्लंडाइतकाच होत असेल, असे मानण्यास कांही हरकत दिसत नाहीं. युरोपिअन लोकांच्या या प्रकारच्या शुद्धतेविषयीं आम्हीं ज्या कुकल्पना करतों, त्या त्यांच्या समाजांच्या केवळ बाह्य स्वरूपावरून करतों, हें उघड आहे. पण तसें करणें नीट नाहीं. बंगाली लोकांपेक्षां किंवा मुसलमान लोकांपेक्षां आम्ही आपल्या स्त्रियांस विशेष स्वातंत्र्य ठेविलें आहे. पण एवढ्यावरूनच जर ते लोक असें म्हणूं लागतील कीं, आमच्या नीतीहून महाराष्ट्रीयांची नीति क्षीणतर असलीच पाहिजे, तर त्यांचे म्हणणें जसें सप्रमाद होणार आहे, तसेंच युरोपिअन लोकांच्या नीतिविषयीं आमचें मत होणार आहे. तथापि वादासाठी क्षणभर असेंही घेऊन चाललों कीं, युरोपिअन लोकांत आम्हापेक्षां पतित स्त्रियांची व पुरुषांची संख्या थोडी अधिक आहे, तरी तेवढ्यावरून असें कोण सिद्ध करून देईल कीं, त्यांच्यांत स्वयंवराची पद्धति रूढ आहे, म्हणून तेथें तसा प्रकार आहे व येथें बालविवाह रूढ आहे, म्हणून तसा प्रकार नाहीं? क्षणभर असेंही मानिलें कीं, बालविवाहामुळेंच ही विशेष शुद्धि आम्हांस दृष्टीस पडत आहे, तर तेवढीसाठीं या दुष्ट चालीपासून दुसरे जे अनेक तोटे होत आहेत, ते करून घेण्यास आम्ही तयार व्हावें काय? इंग्लंडांत शंभर कुलटा असल्या तर येथें पंचाण्णवच असाव्या, येवढ्यासाठीं बहुतेक स्त्रीपुरुषांस नाउमेद, निरुत्साह निःशक्त, व निर्वीर्य करून सोडणें श्लाघ्य

आहे काय? ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे; ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागावर तारुण्याचे तेज चकाकत आहे; विषयवासना जागृत झाल्यामुळें उल्हासानें व उत्कंठेने अननुभूत सुखस्वादाच्या अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत, दृष्टीत व चर्येत लज्जा, अधीरता, साशंकपणा वगैरे परस्परविरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्याचे हरएक प्रयत्न चालले आहेत, विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनी आपणास होईल तितके अलंकृत करून, अन्योन्यास मोह पाडण्याविषयीं जे अहोरात्र झटत आहेत, ज्यांना आपण रतिमन्मथाचे पुतळे आहों, व विधात्यानें आपली विवाहमैत्री व्हावी, असे योजूनच त्याने आपणास निर्माण केले, आणि आपल्याहून अधिक सुखी असे दांपत्य कोठेंही असूं शकण्याचा संभव नाहीं, असे वाटूं लागले आहे; अन्योन्यसमागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यास युगतुल्य झाला असून, जे सूर्याच्या अश्वास मंदगतित्वाबद्दल निंदूं लागले आहेत व यामिनीस आपली समागमकारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे जे डोळे लावून बसले आहेत; अशा स्त्रीपुरुषाच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणीकडे? आणि पंतोजीच्या मार खाणाऱ्या व अभ्यासाखाली अर्धमेल्या झालेल्या, दुर्बल, भेकड आणि लुक्कान अशा आमच्या सोळा सतरा वर्षांच्या बहुतेक पोराच्या, आणि बाव्हलाबाव्हलीचा व भातुकलीचा ज्यांचा खेळ नुकताच सुटला आहे, व नवरा म्हणून ज्याच्याशी आपला एकप्रकारें विशेष संबंध झाला आहे, असा पुरुषजातीपैकीं कोणी एक इसम आहे, असें कोठे नुकतेच समजू लागले आहे, अशा आमच्या बारा तेरा वर्षांच्या निस्तेज, लाजाळू व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या महालाची बहार कोणीकडे? पण स्वतंत्रपणे विचार करून तदनुसार वर्तन करण्यास लागणाऱ्या धैर्यानें ज्या आम्हांस अनेक शतके सोडले आहे, त्या आम्हास बलाढ्य रूढीच्या अमलाविरुद्ध बंड करून, दास्यशृंखला झुगारून देण्याची, व उभय सुखांतील महदन्तराचा विचार करण्याची हिंमत कोठून असणार? कोणी लोकापवादाला भिऊन, कोणी धर्माला भिऊन, कोणी अज्ञानामुळे, कोणी स्वल्प अशा वर्तमानहिताच्या आशेने; कोणी मूर्ख लोकांकडून बरें म्हणवून घेण्यासाठी, व कोणी यत्किंचित् स्वार्थासाठी- म्हणून कोणत्या तरी सबबीने आम्ही आपल्या पोराचे व पोरींचे जीवित निःसार करीत आहों, भावी संततीच्या दुःसह विपत्तीचा पाया घालीत आहों, व दारिद्र्य, बुद्धिमांद्य, दौर्बल्य आणि पारतंत्र्य यांच्या पंकांत या भरतखंडास अधिकाधिक रोंवीत आहों, हें आम्हांस समजूं लागणार तरी कधीं?

*

स्वातंत्र्याच्या वृथा वल्गना

कायद्यानें बालविवाहाचा प्रतिबंध करणें म्हणजे सांप्रत काली लहान मुलांवर व मुलींवर त्यांच्या मातापितरांकडून व पालकांकडून जो जुलूम होत आहे तो दूर करणें याहून दुसरें कांहीं नाहीं. कोणासही स्वातंत्र्य देण्यासाठी केलेला जो कायदा तो जुलमाचा कायदा कसा होईल? तथापि आधुनिक अनेक मित सुधारकांचें असें म्हणणें पडतें कीं, अशा कामांत कायद्याचा प्रवेश होऊं देणें म्हणजे आईबापांस जें स्वातंत्र्य आहे त्याचा उच्छेद करणें होय! वाहवा! मूर्ख आईबापांनीं कधीं अज्ञानानें, कधीं लोकापवादभयानें व कधीं लोभानें आपल्या अल्पवयस्क मुलांचे आमरण नुकसान करावें, आणि तें करण्याचा हक्क त्यांच्याकडें राहूं देण्याबद्दल सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या 'थंड्या' सुधारकांनीं अखिल वातावरण आपल्या आक्रोशांनीं भरून सोडावें, याहून अधिक विस्मयजनक देखाव्याची कल्पना करणें-देखील कठिण आहे! दुसऱ्यास कुरूप करण्याचा हक्क! पोटच्या पोरींचे कुंकू पुसण्याचा अधिकार! मुलाच्या बायकोस नापितापुढें बसविण्याचें स्वातंत्र्य! असले हक्क, असले अधिकार, असलें स्वातंत्र्य राखण्याबद्दल अकांडतांडव करणाऱ्यांस हक्क, अधिकार व स्वातंत्र्य यांचा अर्थ व उपयोग मुळींच समजत नाहीं, आणि यासंबंधानें यांचे बोल स्वातंत्र्याच्या शुद्ध वल्गना होत; असें म्हणणें भाग आहे.

यावर कोणी असें उत्तर देतात कीं, विवाहाच्या व वपनाच्या संबंधानें आम्हांकडून ज्या चुका होत आहेत, त्या आमच्या आम्हांस कळूं लागल्या आहेत, व आमच्याकडून होईल तितकी आम्ही त्यांची दुरुस्तीही चालविली आहे. सबब जी गोष्ट आमची आम्ही करण्यास तयार झालों आहों, तींत सरकारनें पडूं नये, हें इष्ट आहे. सरकारच्या मध्यस्थीनें नफा न होतां उलट नुकसान होणार आहे. बालविवाहादि गोष्टी वाईट आहेत हें तुम्हांस कळूं लागलें आहे काय? व त्या नाहींशा करण्यासाठी तुमचे प्रयत्न चालू आहेत काय? ठीक आहे. ज्यांना या दुष्ट रुढींतील दोष कळूं लागले असतील, व त्यांचे निर्दालन करण्याचा आपणाकडून होण्यासारखा प्रयत्न जे करूं लागले असतील, त्यांना आमचें कांहींएक म्हणणें नाहीं. पण जर असें करणारे कोणी नसतील, व चालू रूढींसच चिकटून राहण्याचा त्यांचा निग्रह असेल तर त्यांच्यासंबंधानें काय करावयाचें?

''पण असें होईल कसें! शिक्षणाची टांकी सतत चालली असतां, दुसऱ्यांची उदाहरणें नित्यशः डोळ्यांपुढें येऊं लागलीं असतां, मुलांकडून व मुलींकडून अडथळा येऊं लागला असतां, जे यासंबंधानें आपला हक्क सोडण्यास किंवा आपले वर्तन फिरविण्यास राजी होणार नाहींत, असे लोक सांपडणें अशक्य आहे. कालांतरानें या गृहसुधारणा सरकारच्या मध्यस्थीवांचून झाल्याशिवाय राहणार नाहींत. शिक्षणासारखी गृहव्याधीवर दुसरी जालीम मात्रा नाहीं. हिच्या योगानें पाहिजे ती सुधारणा थोड्या विलंबानें, पण कोणत्याही प्रकारचें नुकसान न होऊं देतां, करतां येणार आहे.'' या उत्तरावर आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, तुमची शिक्षणाची जबर मात्रा तुम्ही गृहव्याधींसाठींच कां राखून ठेवतां? सर्व व्याधींचा नाश करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. लोकांस ज्ञान प्राप्त झालें, चांगलें व वाईट कळूं लागलें, म्हणजे त्यांच्या वर्तनांत आपोआपच सुधारणा होत जाणार आहे; सबब सरकारानें मांडलेलीं शेंकडों खातीं बंद करून, सर्व जमा शाळाखात्याकडेच कां लावूं नये? सारी प्रजा एकदां विद्वान करून सोडली म्हणजे कशाचीही गरज उरली नाहीं. तोपर्यंत थोडासा त्रास झाला तरी हरकत नाहीं. पण लोकांच्या मानसिक शक्तींचा विकास होऊन, त्यांच्या अनुषंगानें झालेली जी सुधारणा; ती जितकी रमणीय, चिरस्थाई व सुखावह होणार आहे तशी कायद्याच्या सक्तीनें घडून आणविलेली सुधारणा कधींही होणार नाहीं. उद्यां सकाळी लष्करी खातें, पोलिसखातें, न्यायखातें वगैरे टोलेजंग खर्चाच्या बाबी बंद केल्या, आणि सर्व प्रकारची व्यवस्था शाळापंतोजीच्या ताब्यांत दिली तर किती खासें काम होणार आहे बरें? कोणी कोणास शिवीगाळ केली, कोणी कोणाशी मारहाण केली, कोणीं कोणाच्या घरावर दरवडा घातला, कोणीं कोणाचा खून केला, कोणी कोणावर स्वारी केली तर काय हरकत आहे? अज्ञान आहे तोपर्यंत अशा गोष्टी घडणारच! जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल तसतसे हे अनर्थ नाहींसे होत जातील! ते होईतोंपर्यंत त्यांपासून जेवढी पीडा होईल तेवढी निमूटपणें सोशिली पाहिजे! या गोष्टी वाईट आहेत हें आम्हांस कळत आहे, व त्या दूर करण्याचा प्रयत्न आमचे आम्ही करीत आहों; सरकारच्या मध्यस्थीनें फायदा न होतां उलट नुकसान होणार आहे; कालांतरानें त्या आमच्या हातूनच तडीस जाणें इष्ट आहे. एका शिक्षणाच्या आधीन सारें आहे. तेवढें देण्याची तजवीज झाली म्हणजे झालें! गरम सुधारक, थंडे सुधारक, मिट्ठे सुधारक, कडू सुधारक, दुर्धारक, सुधारणानिंदक, मठ्ठ, मूढ व हेकट असे अनंत समाजघटक यांपैकी कितीजणांस वरील व्यवस्था मान्य होणार आहे? आमच्या मतें ती फार थोड्यांस मान्य होईल. तात्पर्य काय कीं, ज्या गोष्टी सध्यां सरकाराकडून होत आहेत, व ज्या सरकाराकडून

होण्यानें आमचा व्यवहार सुखावह होत असून त्या आम्हांस आज करतां येण्याचा संभव नाही, त्या आम्ही सरकाराकडून करून घेणें पसंत करतों. कोणत्याही व्यक्तीस अमुक एक गोष्ट व्हावीं, असें वाटत असलें, आणि ती त्यास स्वत: करतां येत नसली; म्हणजे ती घडवून आणण्यांत दुसऱ्यांचे साहाय्य घेण्याची इच्छा त्यास स्वाभाविकपणें उत्पन्न होते. अशा स्थितीत थोड्यांनी किंवा पुष्कळांनी तिसऱ्याचें साहाय्य घेण्यास प्रवृत्त होण्यांत कांहीं विशेष आहे, असें नाहीं, जी गोष्ट बहुतेकांना चांगली वाटली ती तरी त्यांनी सरकारच्या मदतीने थोड्यांवर कां लादावी? गावांतल्या कांही लोकांस वाईट शौचकूप चालत असेल, पण पुष्कळांस नको असले, तर पुष्कळांनी थोड्यांवर ते पाडून टाकण्याबद्दल जुलूम कां करावा? यावर कोणी असे उत्तर देतील कीं, थोड्या लोकांच्या स्वसंरक्षणासाठीं थोड्यावर जुलूम करणें, व त्यांस आपल्या मनाप्रमाणें वागण्यास भाग पाडणे यांतच न्याय आहे. या म्हणण्याचा वास्तविक अर्थ असा आहे कीं, ज्या पक्षाकडे विशेष सामर्थ्य असेल, त्यानें क्षीण पक्षाला हवे तसें वागविण्यांतच न्याय आहे! असे असेल तर थोड्या लोकांच्या हातीं पुष्कळ सामर्थ्य असल्यास, त्यांनीही आपल्या तब्येतीप्रमाणें पुष्कळांस वागविण्यांत न्याय असला पाहिजे. पुष्कळ आईबापांस मुलाचीं हव्या त्या वयांत लग्ने करणे योग्य वाटत आहे, म्हणून त्यांना तसेच करूं देणें न्याय्य असेल, तर ज्या थोड्या लोकांस लहानपणीं लग्नें करणें अप्रशस्त वाटत आहे, त्यांनींही आपल्या परिश्रमानें व सरकारच्या साहाय्यानें आपल्या पक्षाकडे उलट पक्षापेक्षां अधिक सामर्थ्य संपादन करून घेऊन, पुष्कळ लोकांस बालविवाह टाकून देण्यास लावणें न्याय्य कां नाहीं, हें आम्हांस समजत नाहीं. सक्ती करण्यांत कोणत्या बाजूकडे किती व्यक्ति आहेत, हा मुख्य प्रश्न नाहीं; तर कोणत्या बाजूकडे किती शक्ति आहे, हा मुख्य आहे. वैवाहिक जुलूम पुष्कळांना, बरा वाटत आहे, व त्यांचें एकवट झालेलें सामर्थ्य विशेष आहे, म्हणून ते आम्हां थोड्यांवर सक्ती करीत आहेत, व आपल्या बाजूस न्याय आहे असें भांडत आहेत. तेव्हा आम्हींही आपल्या बाजूस सरकारची मदत घेऊन, व तिचें सामर्थ्य उलट पक्षाच्या सामर्थ्याहून अधिक करून, जी गोष्ट समाजास अत्यंत हितावह होईल, असें आम्हांस विचारपूर्वक वाटत आहे तिचा आमच्या उलट पक्षावर सक्ती करण्याचा प्रयत्न कां करू नये? इंग्रज सरकार गुलामांचा व्यापार बंद करूं लागलें, त्या वेळेस ज्या स्वार्थपरायण, अज्ञान, किंवा दुराग्रही लोकांनीं तो व्यापार बंद करण्यांत, सरकाराकडून आपल्या स्वातंत्र्यावर हल्ला होतो; असा गिल्ला केला, त्या प्रकारचा कल्ला आमचे प्रतिपक्षी करीत आहेत. ज्यांनीं गुलामांच्या व्यापारविरुद्ध उचल केली, ब्रिटिश पार्लमेंटाचें मन वळवून त्याच्याद्वारें त्या व्यापाराचें निर्मूलन केलें

त्यांच्या खटपटीसारखी आमची खटपट आहे. आम्हीं सरकारच्या साह्यानें वैवाहिक गुलामगिरीचा अंत लौकर करूं पहात आहों; आमचे प्रतिपक्षी ती आपणांस वाटेल तितकी वर्षे राखून ठेवण्याबद्दल धडपड करीत आहेत! परके सरकार असल्यामुळें तें, आमचें म्हणणें न्याय्य व हितावह असून, आमच्याकडे व्यक्तिसमुदाय मोठा नाही म्हणून आमचा पक्ष घेण्यास भीत आहे, व आमच्या प्रतिपक्ष्यांचे वर्तन निर्दय व अपायकारक असून त्यांकडे व्यक्तिसमुदाय मोठा आहे, म्हणून त्यांच्या झोंकाप्रमाणें वागत आहे, ही शोचनीय स्थिति सरकाराच्या परकेपणामुळें चालली आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड स्टेट्स वगैरे देशांत असल्या गुलामगिरीचा केव्हांच अंत झाला असता, या देशांत स्वराज्य असते आणि त्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या डोक्यात ही कल्पना येती तर त्यांनीं ती केव्हांच अमलांत आणून सोडली असती. बारीक विचार करतां, युरोपांतही या क्षणीं देखील थोड्या शहाण्यांची पुष्कळ मूर्खांवर सक्ती चालली आहे, असें दाखवितां येईल, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतील राजसभांत जे ठराव होतात, ते त्या देशांतील बहुतेक लोकांस मान्य असतातच, असें म्हणण्यास विशेष आधार नाहीं. तथापि त्या सभांत जे ठराव होतात ते त्या सभांच्या सभासदाकडे अधिकार, शहाणपण व संपत्ति असल्यामुळे इतरास निमूटपणें ऐकावे लागतात. सुदैवानें येथील सरकारची सामाजिक मते आम्हांस इष्ट अशीं आहेत, पण दुर्दैवानें तें परकें असल्यामुळे त्यांस पुष्कळांवर सक्ती करून, त्यात असंतोष उत्पन्न करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेववत नाही व या त्याच्या भेकडपणामुळे पुष्कळांचा जुलूम आम्हांस सहावा लागत आहे. खरें म्हटले म्हणजे त्यांनी आमच्या पक्षास पूर्ण साह्य करून, आमची शक्ति आमच्या प्रतिपक्ष्यांवर चालूं द्यावी. आम्ही स्वातंत्र्यस्थापनासाठीं सक्ती करूं पहात आहों, हे जसें आम्हांस तसें त्यांसही समजत आहे; पण परकेपणामुळें ते आमच्या म्हणण्यांत आपले मन नीट घालीत नाहीं; आणि त्यांच्या या कर्तव्यपराङ्मुखतेमुळें आमच्या प्रतिपक्ष्यांचे येवढे ढंग चालले आहेत! नाहीं तर सतीची चाल बंद करण्याच्या कामीं त्यांच्याकडून आम्हांस जशी मदत मिळाली, तशी आतांही मिळाली, तर नऊ दहा वर्षांच्या पोरी विधवा कशा होत्या, पंधरा सोळा वर्षांच्या मुली, पांच- चार मुलांच्या गलित आया कशा होत्या, सतरा अठरा वर्षांच्या मुलांस खोल्यांत ढकलून घालून भर्तृकर्तव्य उरकणें कसें भाग पडते व पंधरा सोळा वर्षांच्या तरुणांगनांच्या अंगास स्पर्श करण्यास सक्षुर नापिक कसे धजावेत, हें पाहिलें असतें! पण काय करावें! या देशांत सध्यां अक्कल व अंमल यांचा काडीमोड झाला आहे! ✱

सामाजिक स्थित्यंतरें

कोणत्याहि समाजांत जीं चांगलीं किंवा वाईट स्थित्यंतरें होत असतात, तीं त्या समाजांतील मनुष्यांच्या चांगल्यावाईट क्रियांमुळें होत असतात. या क्रिया दोन प्रकारच्या आहेत; पहिल्या स्वप्रचोदित, व दुसऱ्या परप्रचोदित. अमुक गोष्ट आपणाला व दुसऱ्याला, आतां व पुढें सुखावह होणार आहे, असें प्रत्येकास समजत असून तदनुसार साऱ्या किंवा बहुतेक लोकांचे वर्तन होत असणें ही समाजाची उत्तमावस्था होय; हें आम्हांस पूर्णपणे कबूल आहे. तथापि ही स्थिति एका दिवसांत, महिन्यांत, वर्षांत किंवा शतकांत सुद्धा प्राप्त होण्यासारखी नसते. मनुष्याच्या कोणत्याही समाजाला ती अद्यापि आलेली नाहीं. ज्या देशांना तुम्ही सुधारणेंची माहेरघरें समजतां, त्या देशांत सुद्धां अनेक व्यक्तींच्या अनेक क्रिया स्वप्रचोदित नाहींत. इंग्लंड घ्या, फ्रान्स घ्या, पाहिजे तो देश घ्या, कोठेंही अमुक गोष्ट लोकांकडून सक्तीनें करवावी लागत नाहीं, असें दिसणार नाहीं. कोठें एखादा बलाढ्य इसम आणि त्याचे मदतनीस, कोठें शेपन्नास श्रीमंत घराणीं, कोठे लष्करी अधिकारी, कोठें मध्यम स्थितींतले हजार पांचशें सुशिक्षित लोक, कोठें लोकनियुक्त प्रातिनिधिक सभा- राज्य करीत असून, आपणांस बऱ्या वाटतील त्या गोष्टी समाजांतील साऱ्या घटकांकडून सक्तीनें करवीत आहेत, व त्या मानानें प्रत्येक ठिकाणीं थोडा बहुत जुलूम होत आहे. सबब, "जुलूम" या शब्दांचा येवढा धाक बाळगण्याची गरज नाहीं. बालविवाह व केशवपनादि निंद्य चाली कायद्यानें बंद केल्या असतां, आपणांवर मोठा जुलूम होईल म्हणून जे ओरड करीत असतात, ते नकळत या जुलमाहून दुस्तर जुलमानें ग्रासले आहेत हें कोठें त्यांच्या लक्षांत आहे? चौदापंधरा वर्षांच्या निरपराधी कन्येस किंवा स्नुषेस कुरूपता आणणें, हें निंद्य कर्म होय, हें पुष्कळ आधुनिक विद्वान् कबूल करतात, व त्यांनीं थोडीशी गैरसोय सोसण्याचा निश्चय केला, किंवा लोकापवादाविषयीं थोडीशी बेपर्वा पतकरिली तर, कायद्याची मदत न घेतां, या समाजलांछनांचें निरसन त्यांस सहज करतां येणार आहे, असें आ. रा. ब. नूलकर यांचे म्हणणेंही आहे. हें जर खरें आहे; तर वरील गोष्ट अत्यंत अप्रशस्त मानणारे सुशिक्षित ठिकठिकाणीं इतके दृष्टीस पडू लागले असून, थोड्याशा मानसिक धैर्यानें व स्वल्प गैरसोय

सोसण्यानें जे समाजदूषण व दु:खकारण सहज नाहींसे होणार आहे, त्याचा अजून जारी अंमल कां सुरू आहे? अमुक गोष्ट चांगली आहे अशी पक्की खातरी झाली असून, आपणांस शहाणेसुर्ते म्हणवून घेणाऱ्या अनेक लोकांस तिला हात घालवत नसेल, तर क्रियाप्रवर्तक साऱ्या कारणांचा संनिधि त्या ठिकाणीं झाला नांहीं, असें अनुमान करणें, हेंच योग्य आहे. अलीकडे या देशांतील सुशिक्षित लोकांस अनेक चांगल्या गोष्टींचे ज्ञान झालें असून व त्यांचा प्रघात येथें पडणें अवश्य आहे, अशी पक्की खातरी झाली असून, त्या करूं लागण्यास त्यांची छाती होत नाहीं, हें आता निर्विवाद झालें आहे. समाज तर प्रतिदिवशीं थोडाबहुत पुढें पुढें गेलाच पाहिजे. जो समाज पुढें जात नाहीं तो मागें जात असतो, म्हणजे ज्याची उन्नति होत नसते, त्याची अवनति होत असते. समाजाच्या उन्नतीची इच्छा धरणें, हे त्यांतील प्रत्येक समंजस व्यक्तीचे कर्तव्य आहे. कारण, सारी होडी पुढें गेल्याशिवाय, तींतील कोणत्याही उतारूस पुढें जाता येत नाहीं. आता राष्ट्राची प्रगति त्यांतील लोकांच्या सत्क्रियांवर अवलंबून असतें, हें कोणीही कबूल करील. सत्क्रियांत दुष्क्रिया वजा जातां, सत्क्रियांची जेवढी बाकी निघेल त्या मानानें प्रगति होत असते. या सत्क्रिया स्वेच्छेनें होत असोत किंवा दुसऱ्याच्या धाकानें होत असोत, ज्या देशांत यांचें दुष्क्रियांहून आधिक्य नसेल, तो देश अवनतीप्रत जात असलाच पाहिजे. पाश्चिमात्य शिक्षणाचा येथें बराच प्रसार झाल्यापासून, देशोन्नतीस अत्यवश्य गोष्टी कोणत्या, व देशाचा ऱ्हास कोणत्या कारणांनीं होतो, हें आम्हांपैकीं बऱ्याच जणांस समजूं लागलें आहे. पण त्या अमलांत कशा आणाव्या, हें मात्र पुष्कळांस कळत नाहीं. त्यामुळें ज्ञान असून जिकडे तिकडे क्रियाशून्यता दृष्टीस पडत आहे. अनेक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, बराच विद्याप्रसार झाल्यावर आम्हांस जें पाहिजे आहे तें आपोआप घडून येऊं लागेल! पण आजपर्यंत जो विद्याप्रसार झाला आहे, त्यामुळें म्हणण्यासारख्या क्रियाप्रवृत्तीचा प्रादुर्भाव आम्हांत कां होऊं लागला नाहीं, व शिक्षण किती फैलावलें म्हणजे तो होऊं लागेल, याचा नीट विचार कोणीच करीत नाहीं. ज्यानें उठावें त्यानें शिक्षण सर्वांच्या मुळाशीं आहे, स्वप्रचोदित क्रिया अत्यंत कल्याणकारक आहे, सरकारी सक्ती पराकाष्ठेची विघातक आहे, असें म्हणत सुटावें व हातानें कांहीं करूं नये, अशा प्रकारचा खुळा बाजार सर्वत्र माजला आहे! पण कोणत्या स्थितींत लोक आपण होऊन चांगल्या कामास प्रवृत्त होतात, राजानें आणि त्याच्या मंत्र्यांनी चांगल्या गोष्टींत सक्ती करण्यास हरकत नाहीं अशी देशस्थिति कोणती, लोकप्रतिनिधींनी बहुमतानें अंमल केला असतां, कोणत्या देशस्थितींत तो सुखावह होतो, व सरकारी अंमल अगदीं संपुष्टांत आणून, बहुतेक क्रिया लोकांच्या लोकांस

करूं देण्याचा काल कोणता, हें कोणीही पाहत नाहीं. हा दुष्परिणाम आमच्या लोकांतील श्रेष्ठ जातींच्या पूर्वकालीन बुद्धिपरिणतत्वामुळें झाला आहे, असें आम्हांस वाटतें. जे लोक आर्टस् कॉलेजांत जातात, आणि स्पेन्सर व मिल्ल यांच्या ग्रंथांसारखे ग्रंथ वाचतात, त्यांच्या मनावर त्या वाचनांचे विलक्षण परिणाम होतात. स्पेन्सरसारख्यांच्या ग्रंथांतील विषय या परिणतबुद्धीच्या वाचकास कळण्यास मुळींच मुष्कील पडत नाही. पण ते वाचण्यांत त्यांची एक मोठी चूक होते ती ही की, त्यांचे कोणते विचार समाजाच्या कोणत्या स्थितीला लागू पडण्यासारखे आहेत, हे कोणी नीट पहात नाही "जेथे सरकारचा अधिकार अत्यंत मर्यादित असेल, व बहुतेक चागलीं कामे लोक आपली आपण करीत असतील, तो देश खरा सुधारलेला, व त्यांतील लोकासच विशेष सुखप्राप्त होण्याचा संभव आहे,'' असे स्पेन्सर म्हणतो ना! ठीक आहे तर! आजपासून कोणत्याही सुधारणेच्या कामात सरकारचा हात न शिरेल अशी आपण खटपट करणार! स्पेन्सरमिल्लप्रभृति तत्त्ववेत्त्याच्या ग्रंथवाचनाने असला वेडगळपणाचा परिणाम ज्यांच्या मनावर झाला नाही, असे या देशात थोडेच सुशिक्षित असतील. हें अविचारी व अधीर वाचनाचे फळ! पाहिजे त्या समाजस्थितीत सरकारी अमल संकुचित करणे व लोकांकडे क्रियास्वातंत्र्य ठेवणें, हें त्यांस हितावह होणार आहे, असें त्या तत्त्वशोधकांनी कोठेही म्हटलेलें नाही. समाजाच्या कोणत्या स्थितीत सरकारकडे कोणत्या प्रकारचा व किती अंमल असावा, याविषयी आपल्या वाचकांचा गैरसमज न व्हावा, म्हणून त्यानी केवढी खबरदारी घेतली आहे! पण तिचा बिलकुल उपयोग होत नाहीं. ज्याला त्याला असें वाटतें कीं, त्यांनी समाजाच्या उत्तमावस्थेची जीं चित्रे काढिली आहेत, व ती अवस्था प्राप्त होण्यास लोकांचा सरकारशीं व सरकारचा लोकांशी जो संबंध असावा, म्हणून सांगितले आहे, तो संबंध येथील सरकारांत व लोकांत स्थापण्याची धडपड केली म्हणजे ती उत्तमावस्था आपणांस सहज प्राप्त होईल! याहून विशेष मूर्खपणाचा भ्रम असणे शक्य आहे काय? पण त्याने ज्यांना घेरलें नाहीं, असे सुशिक्षित या देशांत किती निघणार आहेत? फारच थोडे, असें आम्हांस वाटतें. ज्याच्या त्याच्या तोंडावाटें स्वातंत्र्याच्या वृथा वल्गनांचा अहोरात्र घोष चालला आहे! सत्क्रियेच्या नांवाने मात्र आवळ्यायेवढें पूज्य ! तथापि त्यांतल्या त्यांत मोठ्या आनंदाची ही गोष्ट कीं, जरी सर्व वस्तूंच्या संबंधानें हे अविचारी वाक्पटु स्वातंत्र्याची टिमकी पिटीत असतात, तरी सामाजिक गोष्टींशिवाय इतर गोष्टींत सरकारनें आपणांवर जुलूम करण्याबद्दल हे सरकारच्या घरीं खेटे घालण्यांत आपले जोडे नित्य फाडीत असतात! यांना जर लोकस्वातंत्र्याचें रहस्य इतकें समजलें आहे, तर त्यांनी असें

नादान कर्म कां करावें? "हे सरकारा, आम्ही गचाळ लोक आपण होऊन आपल्या धेनु कसायास विकतों. तेव्हां मेहेरबान होऊन गाई विकणारांस व त्या घेणारांस दंड कर! हे दयानिधे इलाखाधिपते, आम्ही प्रतिदिवशीं मदिरापाशात अधिकाधिक गुरफटत आहो, याकरिता दारू पिणारांचें व विकणारांचें शासन कर! हे सर्वश्रेष्ठ राष्ट्रप्रतिनिधे, आम्ही पामर लोक अज्ञानतिमिरांत ठेंचा खात आहों, व्यापार धंदा बुडाल्यामुळें उपाशीं मरत आहों, नीतीचा लय झाल्यामुळें पतित होत आहों, व धर्मभय सुटल्यामुळें पापनिधीत बुडतों आहों, याकरतां आमच्याकडून हवा तेवढा कर चोपून घे, व हवे तसले प्रखर कायदे कर, पण घातलेल्या शाळा उठवूं नको इतकेच नाहीं, तर त्यांवर जितका अधिक खर्च करवेल तितका कर; आम्हांस उद्योग करतां येण्यासाठी यंत्रशिक्षणाच्या व धंदेशिक्षणाच्या शाळा काढ; आमची नीति सुधारण्यासाठी नीतिशिक्षक लाव, व आमच्या नास्तिक्याचें निरसन होण्यासाठीं वेदप्रणीत धर्मक्रिया आम्हांकडून नित्य करव" असली रडगाणी आम्हांकडून सरकाराकडे जात नाहीत. असा एक दिवस तरी लोटत आहे काय? वाचाल मंद सुधारकांनो, या तुमच्या असंबद्ध वर्तनाचा विचार तुम्ही कधी केला आहे काय? सामाजिक सुधारणांविषयी इंग्रज सरकार परकीयत्वामुळें अत्यंत उदासीन आहे, म्हणूनच त्यासंबंधानें स्वातंत्र्याची तुम्ही येवढी ऐट मिरविता, हें खरें नाहीं काय? तसें नसेल व तुम्ही खरेच स्वातंत्र्यप्रिय असाल, तर मग इतर गोष्टींत सरकारची गुलामगिरी कां पतकरतां?

*

करून कां दाखवीत नाहीं?

सुधारक लोक अमुक गोष्ट चांगली, तमुक गोष्ट वाईट; अमक्या गोष्टीसाठीं कायदा करावा, तमकीसाठीं मंडळी स्थापावी, अशी जी एकसारखी वटवट करीत असतात, ती कशासाठी? अमक्या अमक्या गोष्टी करण्यांत आपला व दुसऱ्यांचा फायदा आहे, अशी त्यांची पक्की खातरी झाली असेल, तर त्यांनी त्या करून दाखविण्यास कां प्रवृत्त होऊं नये? असा प्रश्न वारंवार पुष्कळ लोक करीत असतात, व बोलण्याप्रमाणें सुधारकांचे आचरण नाहीं, तेव्हां त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्यांत कांही अर्थ नाहीं, असा गर्वयुक्त प्रलाप करून, आपल्या कोणत्या समजुतीने आपलें समाधान करून घेत असतात! या अज्ञान जातींत तीन प्रकारच्या लोकांचा समावेश होतो. एक, ज्यांना नवीन गोष्टींचे चांगलेपण कळण्याची अक्कलच नाहीं असे. असल्या लोकांच्या कानापाशीं हवा तितका आक्रोश करा, प्रमाणें दाखवा, मारा, तोडा-काय पाहिजे तें करा, हे कांही म्हणून केलें तरी आपला ग्रह सोडावयाचे नाहींत! गव्याच्या धावेसारखी यांची धाव असते. वयांत येईपर्यंत कसले बसले जे ग्रह झाले असतील ते यांची जन्माची पुंजी! तींत नवें जुनें कधींही व्हावयाचें नाहीं! यांचे ज्ञान अत्यंत स्वल्प असतांही, यांना सर्वज्ञतेची फारच मोठी घमेंड असते, व नवीन विचारांचा व ज्ञानाचा तिरस्कार करण्यांत हे कोणासही हार जाण्यासारखे नसतात! सारांश, ओंतीव लोखंडाप्रमाणें यांचे आचार व विचार असतात, व कोणाचाही यांच्याशीं सामना झाला असतां त्यापासून रागाच्या ठिगण्या पडण्याखेरीज दुसरा कोणताही परिणाम होत नाहीं! दुसऱ्या प्रकारांत समंजस पण भेकड असे लोक येतात. यांना चांगलें काय व वाईट काय, त्याज्य काय व संग्रहणीय काय हें समजत असतें; पण जें योग्य वाटत असेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य यांच्या अंगी बिलकूल नसतें. ते लोकापवादाच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले असतात. डोळे बांधलेला तेल्याचा बैल ज्याप्रमाणें घाण्यासभोंवती एकसारखा फेऱ्या घालीत असतो, त्याप्रमाणें हे पोटांत ज्ञान असूनही लोकलज्जेमुळे अंध होऊन पूर्वापार चालत आलेल्या रूढीचें व विचारांचे लोण पुढल्या पिढीपर्यंत पोंचवीत असतात! एकीकडे तुम्ही यांच्याशीं वाद करीत बसाल असला, तर कदाचित् ते असें कबूल करतील कीं, तुमचें म्हणणें बरोबर आहे,

व तद्नुसार लोकांचे वर्तन होऊं लागल्यास, त्यांत त्यांचे कल्याण होण्याचा संभव आहे. पण असलें काम करण्यास आम्ही प्रवृत्त होणार नाहीं, व असल्या गोष्टींचा उघडपणें स्वीकार करण्याचें धैर्य आमच्या अंगी नाहीं, असें ते तुम्हांस साफ सांगतील. असले लोक बहुशः दुसऱ्यांच्या आचाराविषयीं व विचारांविषयीं उदासीन असतात. पण आणीबाणीचा प्रसंग आल्यास हे आपल्या विचारशक्तीस गुंडाळून ठेवून, पहिल्या प्रकारच्या अज्ञान, अविचारी व आग्रही लोकांचे अनुगमन करतात! या दोहोंशिवाय सुधारणानिंदकांचा आणखी एक प्रकार आहे, तो मात्र अतिशय खडतर आहे, असें म्हणणें भाग आहे. यांतील लोक पहिल्याप्रमाणें मूढ नसतात, व दुसऱ्याप्रमाणें भेकड नसतात. बरेंवाईट यांस कळत असतें, व उचित दिसेल ते करण्याचें किंवा बोलण्याचें धैर्य यांचें अंगी असत नाहीं, असेंही मानतां येत नाहीं. असे असतां सुधारणेस या लोकांकडून जितका अडथळा होतो, तितका दुसऱ्या कोणाकडूनही होत नाहीं. हा होण्याचें कारण यांची अमर्याद स्वार्थपरायणता. हिला तृप्त करण्यासाठीं हे काय करतील आणि काय करणार नाहींत, हें ब्रह्मदेवाला देखील सांगवणार नाहीं! यांची स्वार्थपरायणता म्हणजे यांचा द्रव्याभिलाषच नव्हे. यांना नुसता पैशाचाच हव्यास असता, व त्यांच्या अंगीं तेवढाच दुर्गुण असता तर त्यांचें वर्तन जितकें निंद्य होत आहे तितकें कधींच होते ना! त्यांची स्वार्थपरायणता पराकाष्ठेची व्यापक आहे, कोणतीही गोष्ट कितीही चांगली असली, तरी जर तीपासून त्यांचें कोणत्याही प्रकारचें यत्किंचित नुकसान होण्याचा संभव असला, तर ते ती हाणून पाडण्यासाठीं आकाशपाताळ एक करून सोडण्याचा प्रयत्न करतील! यांच्या वर्तनाचा बराच भाग लबाडीचा असतो. पूजाअर्चा वगैरे सारे धर्मविचार झूट आहेत अशी यांची पक्की खातरी झाली असून, हे प्रतिदिवशीं तास दोन तास संध्या-ब्रह्मयज्ञांत घालवतील; सर्वांगाला भस्म फांसून घेतील; श्रावणीचे दिवशी शेर दोन शेर पंचगव्य पितील व नखशिखांत शेणमाती चोपडतील! चौदा वर्षांच्या पोराचे गळ्यांत आठ वर्षांच्या पोरीचे लोढणें बांधणें म्हणजे त्याची सर्व प्रकारची पुढील गति खुंटविणें होय, हे यांस पक्कें समजत असून कर्ज काढून अल्पवयस्क पोरी विकतील, व मनासारखी किंमत आल्यास आपलें पोरगें विकत देतील! स्वतःच्या घेऱ्याचा किंवा मिशीचा एक केंस फाजील कापला गेला तर जे नित्याच्या न्हाव्यावर वाघासारखे चवताळून जावयास सोडावयाचे नाहींत, व मातापितरांपैकीं एखाद्याचा अंत होऊन, आपल्या मुखभूषणावर स्वल्पकालीन गदा आली, तर ज्यांस मरणप्राय दुःख झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं, अशा या लोकांना घरीं आलेल्या सुनेस किंवा मुलीस जवळचें पर्व साधून जबरीने न्हाव्याच्या ताब्यांत देण्यास काडीयेवढें देखील वाईट

वाटावयाचे नाहीं. चोरटेपणानें हे पाहिजे तसली कुकर्में करतील. एकांतांत किंवा ठरीव कंपूंत इंग्रजी भाषेंतील बँडी या शब्दांतून निघणाऱ्या ड्यंत त्रयींपैकी कोणतीही वस्तू यांना कदाचित् वर्ज्य असणार नाहीं; पण समाजांत हे अपेयपानाचा, अगम्यगमनाचा, व अभक्ष्यभक्षणाचा इतका तिटकारा दाखवतील कीं, तो पाहून एखाद्या भोळसटास हे शुद्धत्वाचे खंदकच आहेत कीं काय, असा भास होईल! तात्पर्य बहुसमाजाकडून 'शाबास' म्हणवून घेण्यासाठीं, व आपल्या मिळकतीस धक्का पोंचूं न देण्यासाठीं दंभ, निष्ठुरता व अविचार यांचा हे किती अवलंब करतील, हें सांगतां येणें अशक्य आहे। असल्या लोकांनी सुधारकांस "तुम्ही करून कां दाखवीत नाहीं, निराळी जात कां स्थापीत नाही, उदाहरण का घालून देत नाहीं?" असे प्रश्न करण्यांत विशेष पुढारीपण घेऊन, आपण पूर्वाचाराचे भजक, तारक, व प्रवर्तक आहों, अशी सामान्य लोकास भुरळ पाडून त्यांस प्रतिदिवशीं चकवावे, आणि स्वार्थसिद्धीसाठी त्यांना हवे तसे बुचाडून सन्मार्गाकडे त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति सहसा होऊं देऊं नये, हे अत्यंत स्वाभाविक आहे.

या तीन प्रकारच्या सुधारणानिंदकास आम्हीही "करून कां दाखवीत नाहीं?" हाच प्रश्न घालतों. बालविवाह आणि केशवपन यांचा निषेध करण्यासाठीं कायद्याचें साहाय्य घेणें अप्रयोजक होय, असे यांचें म्हणणे आहे. सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें हे अपायकारक आहे, अशी यांची खातरी झाली असेल तर वेश्यागमन, मदिरापान वगैरे व्यसनें बंद करण्यास किंवा कमी करण्यास यांनी सरकारास कां आळवावें, हें समजत नाहीं! विवाहित स्त्रीच्या नाकावर टिच्चून जो पण्यांगना घरांत ठेवील, किंवा प्रतिदिवशीं बुद्धिभ्रंशक आसवाचे नेमानें एकदोन ग्लास झोकील, त्यास अमुक इनाम किंवा पदवी द्यावयाची, असें सरकारानें ठरविले आहे, असे निदान आमच्या तरी ऐकण्यांत आलेलें नाहीं! किंवा आम्ही ज्याप्रमाणें अल्पवयस्क मुलांस व मुलींस मदनहालांत जबरीनें कोंडून घालतों, त्याप्रमाणें कुलटावाटिकांत नागरिकांस किंवा जानपदांस लोटण्यासाठीं, अथवा लहान मुलांस ज्याप्रमाणें आपण पायांवर घालून त्यांच्या मर्जीविरुद्ध काही औषध पाजतों, त्याप्रमाणें आमच्या नाकपुड्या मिटून व आमची तोंडें उघडून, त्यांत दारूचे औंस दोन औंस ओतण्यासाठीं, सरकारानें एखादें स्वतंत्र खातें ठेविलें आहे, असेंही कोणास म्हणतां येणार नाहीं! या व्यसनांविषयीं आम्हास जी आसक्ती उत्पन्न झाली आहे ती आमच्याच अविचाराचें फळ आहे. असें असून, तिच्या शमनार्थ आम्हीं सरकारकडें धांव घ्यावी, आणि आपला कमकुवतपणा उघडा करावा, हें योग्य आहे काय? पण आम्हांस अक्कल कोठून असणार? 'आपलें तें सोनें आणि दुसऱ्याचें तें कारटें' असें कोणत्या अविचारी मनुष्यांस वाटत

नाहीं? त्याचप्रमाणें बुद्धिविकासक शिक्षण, यांत्रिकशिक्षण, धंदेशिक्षण, व्यापार, आरोग्य, वगैरेंची गोष्ट होय. या कामांतही सरकाराकडे तुम्ही कां जाता? यासंबंधानें ज्या सुधारणा तुम्हांस हव्या असतील त्या तुमच्या तुम्ही कां करून दाखवींत नाहीं? असा प्रश्न या तीन वर्गांतील लोकांस घालण्याचा अधिकार यांच्याच विचारशैलीप्रमाणें आम्हांस येत नाहीं काय?

पण हेंही असो. ज्या गोष्टींविषयीं आतां कोणत्याही समाजांत मतभेद उरलेला नाहीं, म्हणजे ज्या अपायकारक व निंद्य आहेत, अशाविषयीं कोणासही शंका राहिलेली नाहीं, अशा गोष्टींच्या निषेधासाठीं तरी सरकारची मदत कशासाठीं मागावी? चोरी करणें, खोटी साक्ष देणें, खोटे कागद करणें, करार मोडणें, शिवीगाळ करणें, अब्रू घेणें, दहशत घालणें, खोटें बोलणें, निरुद्योगी असणें, मारामारी करणें वगैरे गोष्टी तर सर्वानुमतें वाईट ठरल्या आहेत ना? मग अशा प्रकारची आगळिक जर कोणाकडून झाली तर त्याला दंड करण्यासाठी सरकाराकडे कशासाठीं जावे? पण ज्या देशांत अशा अपराधाबद्दल शिक्षा देण्याचें काम सरकाराकडें नाहीं, असा एक तरी सुधारलेला देश आहे काय? किंवा अशा अपराधांची चौकशी करणें व त्यांबद्दल योग्य दंड करणें हे सरकारांचें कर्तव्य नाहीं, असें प्रतिपादणारे 'थंडे सुधारक' कोणत्याही सुधारलेल्या देशांत असतील काय? असतील असें आम्हांस वाटत नाहीं. उलट आमची अशी समजूत आहे कीं, कोणत्याही देशांत जों जों अधिकाधिक सुधारणा होत जाते तों तों त्यांतील लोकांच्या अंगीं अधिकाधिक सूक्ष्मवेदित्व किंवा शीघ्रग्राहित्व येत जातें, व त्यामुळें त्यांचा एकमेकांपासून एकमेकांस जितका कमी त्रास होईल तितका होऊं देण्यासाठीं, व प्रत्येकास अधिकाधिक स्वातंत्र्याचा उपभोग मिळण्यासाठीं, प्रतिदिवशीं नवीन नवीन गोष्टींत सरकाराचें साहाय्य घेऊन, कायद्यांची संख्या वाढविण्याचा आणि त्याप्रमाणें न्याय देण्यासाठी न्यायाधीशांचें काम अधिकाधिक कठीण करण्याचा क्रम, एकसारखा चालू आहे. अशा प्रकारच्या बाह्य बंधनांनीं मनुष्यांच्या अंत:करणांतील दुष्प्रवृत्तींचा मोड हळू हळू होत जाऊन, त्यांचें बहुतेक वर्तन सहजगत्या नीतिमंत किंवा न्यायानुसारी होऊं लागल्याशिवाय या क्रमास खळ पडणार नाहीं, असें वाटते. समाज हा स्वाभाविकपणें ज्यास अनेक पैलू आहेत अशा खड्यासारखा आहे. असला खडा खाणींतून नुकताच काढला असल्यास, विशिष्ट आकार, सफाई किंवा तेज यांपैकीं कोणतेच गुण त्यांत नसतात; पण कल्पक सुवर्णकारांकडून जसजसें त्यावर घर्षण होत जातें, तसतसें त्यास मोहक स्वरूप येत जातें. देशांतील विचारी लोक हे कल्पक सुवर्णकार होत व समाज हा त्यांच्या हातीं दिलेला पैलूदार खडा होय. या खड्यावर सरकारी

साहाय्य, स्वत:चा प्रयत्न वगैरे हत्यारांनीं काम करून ते त्यास मोहकपणा आणितात. ज्या कामास ज्या वेळीं जें हत्यार पाहिजे असेल तें घेतले पाहिजे. आजमित्तीस आमच्या समाजाची अशी दीनवाणी स्थिती झाली आहे कीं, प्रत्येक गोष्टींत, आमच्या मनांत असो किंवा नसो, थोडेंबहुत सरकारचें साहाय्य घेतल्याशिवाय आमच्या हातून कांहीएक होत नाहीं. कोणी लोकशिक्षणाचा पैलू घांसून वाटोळा करण्यासाठीं सरकारची मदत मागतात! कोणीं सद्‌गुणाच्या पैलूवरील मदिरादि व्यसनांचा मळ उडविण्यासाठीं हेंच करतात! आम्हीं आमच्याकडे घेतलेल्या पैलूस इतर पैलूंप्रमाणें चांगला आकार व सफाई आणण्यासाठीं तेंच करीत आहों! सबब आम्हीं मात्र तें काम सद्य:स्थितींत स्वप्रयत्नाच्या हत्यारानें करावें, आणि दुसऱ्यांनी सरकारी हत्याराची हवी तितकी मदत घ्यावी, हें म्हणणें वाजवी नाहीं! सरकारी हत्यार न वापरण्याचे दिवस येतील तेव्हां ते साऱ्यांसच येतील! आज त्यावांचून कोणाच्या हातून काहींच होण्यासारखें नाहीं, हे सूक्ष्म विचाराअंतीं प्रत्येक समंजस मनुष्यास समजण्यासारखे आहे. सगळे पैलू साफ झाल्याखेरीज समाजखडा कोहिनुराप्रमाणें कधींच चमकूं लागणार नाहीं, हें ज्यानें त्यानें ध्यानांत वागवून, आपापल्या पैलूवर होईल तितकी मेहनत करीत असावें, आणि मत्सर व क्षुद्र बुद्धि यांचा त्याग करून दुसऱ्यास होईल तितका हातभार लावावा, हाच सुधारणेचा अत्यंत प्रशस्त मार्ग होय.

*

जात कां करीत नाहीं?

सुधारकांची विचारसरणी ज्यांस मोडून काढतां येत नाही, पण ''तुमचे म्हणणें बरोबर आहे'' असे उघडपणें कबूल करण्याची उदारता ज्यांचें अंगीं नाहीं, ते त्यास ''तुम्ही आपली जात का करीत नाही.'' असा एक प्रश्न करीत असतात. हा प्रश्न करण्यांत, या सुधारणाप्रतिपक्ष्यांची कमकुवत पूर्णपणें व्यक्त होते. बालविवाहाचें अपायकारित्व, विधवाविवाहनिषेधाचें मूर्खत्व आणि तरुणागनांच्या केशवपनाचें अमानुषत्व हीं आतां भूमितीच्या सिद्धांताप्रमाणें ठरून गेलीं असल्यामुळें, त्यांचें मंडन करण्याचें धैर्य पूर्वपद्धतीच्या एखाद्या महामहोपाध्यासच होऊं शकतें. ज्यावर पाश्चिमात्य विद्येचा थोडाबहुत संस्कार झाला आहे, त्यास वरील गोष्टी निर्दोष व संग्रहणीय आहेत, असें निदान उघडपणें तरी म्हणतां येत नाहीं. तेव्हां तो आपल्यासाठीं त्यांतल्या त्यांत सवड काढीत असतो. वरील सुधारणा अत्यंत इष्ट आहेत. पण त्यांचा अनुक्रम करण्याचा अजून काळ आला नाहीं, ही एक त्यांची बोलण्याची पद्धत होय. कधीं कधीं तो आपण त्या करण्यास तयार आहों, पण इतरांची तयारी नसल्यामुळें आपणास त्यांबरोबर रखडावें लागत आहे, असे म्हणत असतो. ''मला अर्वाचीन शिक्षण मिळाल्यामुळें माझें मन विकसित झालें आहे व मला चांगलें वाईट कळूं लागलें आहे; पण शेकडों लोकांस त्या शिक्षणाचा फायदा मिळाला नसल्यामुळे त्या सुधारणांचे महत्त्व व आवश्यकता हीं त्यांस समजत नाहींत व तीं त्यांस आपल्या आपण समजूं लागेतोंपर्यंत त्यांवर त्या लादणें बरोबर नाही. याकरितां त्या सुधारणांचा स्वीकार करण्याची तयारी सर्वांकडून होईपर्यंत मलाही त्यांचेंच अनुसरण केलें पाहिजे.शुद्ध असलें तरी लोकविरुद्ध असें आचरण करून त्यातून बाहेर पडण्यांत काय अर्थ आहे? साऱ्या लोकांची जी सुधारणा, ती खरी सुधारणा. तथापि ''उतावीळ'' सुधारकांना आपल्या सुधारणांचा अंमल लौकर बसावा, असें वाटत असेल तर त्यांनी आपली एक लहानशी जात काढून, त्या सुधारणा प्रचारांत आणाव्या आणि त्या हितावह आहेत, असें प्रत्यक्षपणें लोकांच्या अनुभवास आणून द्यावें, म्हणजे लोकही त्यांचें तेव्हांच अनुसरण करूं लागतील. म्हटलें आहे, ''बोले तैसा चाले त्याची वंदावीं पाउलें'' इत्यादि. हें वाग्जाल पसरणारे दोन मतलब साधण्यास

पहात असतात. दुसऱ्यांवर उलटून पडून आपलें भागूबाईपण छपवावयाचें आणि आपले विचार उदार असल्याबद्दल शेखी मिरवावयाची, आपण होऊन रूढ चालीविरुद्ध प्रसिद्धपणें कांहीं बोलावयाचें नाही, व आचरणांत सामान्य लोकांच्यापुढें जावयाचें नाहीं, पण शिळोप्याच्या सभांत विचाराची बरीच उदारता जपून जपून प्रकट करावयाची - हा नेहमीचा थाट! एखादे प्रसंगी कोणी घुलवीत घुलवीत गळ्यांत घोंगडें घालण्याचा प्रसंग आणिलाच, तर तद्दिशी मोर्चा फिरवून "तुम्हींच कां करून दाखवीत नाहीं, तुम्ही स्वतंत्र जात कां स्थापीत नाहीं?" असा प्रलाप करूं लागावयाचें!

असलें ढोंगी लोक "जात कां करीत नाहीं" म्हणून आपण आपल्या प्रतिपक्षांस जो प्रश्न करतात, त्यांत त्यांचे अनेक प्रकारचे हेतु असतात. जे कोणी सुधारणेंचे पाऊल पुढें पडावें म्हणून व्याख्यानें, संभाषणें, वाद किंवा लेखी चर्चा करीत असतात, त्यांचा आपणांस मोठा कंटाळा आहे, या लोकांस वेळ अवेळ अगदी समजत नाहीं, संसारांतल्या अडचणी त्यांस माहीत नाहींत, व्यर्थ वल्गना करण्याखेरीज त्यांचे हातून कांहीं होत नाहीं, अशी आपली पक्की खातरी होऊन गेली आहे, असें दाखविण्यासाठी "उतावीळ" सुधारकांचे तोंड बंद करण्याच्या इराद्यानें हे हा दांभिकपणाचा प्रश्न त्यांस करीत असतात, अशी त्यांविषयीं आमची एक कल्पना आहे. दुसरें आम्हांस असें वाटतें कीं, हें खरोखरीच भेकड असतात. यांना अमुक सुधारणा चांगल्या आहेत, आणि त्या होतील तर फार चांगलें होणार आहे, असें खरोखरींच वाटत असते. पण त्या करण्यास आपण होऊन हात घालण्याचें धैर्य त्यांच्या अंगीं नसतें. आपण होऊन कोणतीही गोष्ट करूं लागण्याचें धैर्य तर एकीकडेच राहिलें; पण कोणतीही अरूढ गोष्ट प्रशस्त आहे, असें उघडपणें प्रतिपादण्याचें धैर्यही या बाबूंच्या अंगीं असत नाहीं. लोकांस अप्रिय असें बोलणें लोकांनी बोलावें; त्यापासून होईल ती नाचक्की करून घ्यावी; पाद्रयासारखा चिवटपणा करून वर्षानुवर्ष संक्षोभक विषयांची चर्चा चालवावी, व असें करतां करतां त्यासंबंधानें लोकांची नजर बरीच स्थिर झाली, म्हणजे तसले विषय कानीं आले असतां ते भांबावून न जातां त्यासंबंधाचा वाद, ते नाके मुरडीत कां होईना, पण थोडाबहुत ऐकूं लागले, म्हणजे मग हे एखादे वेळीं चोरूनमारून त्याला अनुकूल असा एखादा शब्द काढूं लागतात! पुढें आचरणाचा प्रसंग येतो! तो आला कीं यांचें घोडें अगदींच उभें रहातें. दुसऱ्यांनीं प्रारंभ करून अगदीं नवीन चाल पुर्ती प्ररूढ झाली म्हणजे मग हे महाजनाच्या ओघाबरोबर तिच्याप्रमाणें व्यवहार करूं लागणार! पर्वतीच्या तळ्यावर कोणी जवळ नसतां जर त्यांना तुम्ही असें विचाराल कीं, 'जेवायला बसतांना मुकटा लावून घेण्यांत कांहीं अर्थ आहे

असें तुम्हांस वाटतें काय?' तर ते तुम्हांपाशीं असें कबूल करितील कीं, 'कांही अर्थ नाहीं'; पण याच कबुलीच्या जोरावर त्यांना तुम्ही पुढें जर असा प्रश्न कराल कीं, 'रावजी, जर त्यांत तुम्ही कांही अर्थ नाहीं, असें म्हणतां, तर ज्या वेळेस तुम्हीं आणि बायको येवढी दोनच माणसें घरांत असतां, तेव्हा बायकोकडून ओंवळ्यानेंच स्वयंपाक कां करवीत नाहीं? व तुम्ही ओंवळ्यानें कां जेवीत नाहीं?' अशा प्रश्नावर त्यांचेकडून असें उत्तर येईल कीं, 'छे: बोवा, तें आमच्यानें व्हावयाचें नाहीं. सारें लोक ओंवळ्यानें जेवू लागले; घरांतील बायकांना ओंवळ्याचें काहीं वाटेनासें झालें, मोठमोठ्या समाराधनांत, श्राद्धपंक्तीत व लग्नकार्यांतील मेजवान्यांत ओंवळ्यानें जेवावयास बसण्याचा प्रघात सर्वत्र सुरू झाला, म्हणजे मग आम्ही ओंवळ्यानें जेवायाला बसण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं! तोंपर्यंत आम्ही आपला आहे हा क्रम चालू ठेवणार! जर तुम्हांस धैर्य असेल तर तुम्ही आपले ओंवळ्यानें बसूं लागा, आणि आम्हीही तुमच्यासारखेंच लौकर करूं लागावें, अशी तुमची इच्छा असेल, तर तुम्ही खटपट करून थोड्या दिवसांत बहुतेक लोक तद्नुसार वर्तन करतील, असें करा; म्हणजे आमची तयारी आहेच!' तात्पर्य काय कीं, कोणतीही सुधारणा झाल्यावर ती करूं लागण्यास प्रवृत्त होणारे हे 'थंडे' सुधारक होत! म्हणजे एखादी नवीन चांगली गोष्ट स्थापित होऊन तिला जुनेपणांचे स्वरूप येऊं लागले, किंबहुना तीप्रमाणें आचरण न करणाराचा उपहास होण्याचे दिवस येऊन ठेपले, म्हणजे हे विचारी सुधारक पुढें सरसावून लोकापवादास न जुमानतां, देशास कल्याणकारक अशा सुधारणेचा अवलंब करण्यास निघणार. अशा सुधारकांस सुधारक म्हणावे किंवा त्यांनी काढलेल्या दुर्धारक संज्ञेनें त्यांचा व्यपदेश करावा, याचा निश्चय करणें वाचकांवरच सोंपवितों.

'जात कां करीत नाहीं?' असा प्रश्न करणारे आपण काय बरळतों याचा क्षणभर तरी विचार करतात काय? जात करणें म्हणजे कां चिखलाचें पार्थिव करून दोन घटकांनीं फेंकून देणें कीं, नदीला गढूळ पाणी असतां, तिच्या कांठावर वाळूंत झरा उकरणें, कां उन्हाळ्यासाठीं घरापुढलें अंगण खणून सारवून स्वच्छ करणें, कां चार दिवसांच्या उत्सवासाठीं लव्हाळ्यानें आच्छादिलेला मंडप घालणें – कीं आहे तरी काय? 'जात करा'! आजपर्यंत काय थोड्या जाती झाल्या आहेत? परब्रह्म आणि माया या पहिल्या दोन जाती! पुढें हिंदुस्थान वसविण्यासाठीं ब्रह्मदेवाच्या मुखांतून, बाहूंतून, ऊरूंतून, व पायांतून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार जाती अवतरल्या! या देवकृत चार जाती आम्हांस पुरेशा न होऊन, आम्ही केवढा जातिपसारा करून ठेवला आहे! हें या प्रश्नकारांस ठाऊक नाहीं काय? जातीच्या अनेकपणापासून होणाऱ्या दुष्परिणामांची फळें आम्ही प्रतिदिवशीं

भोगीत असतां हे अविचारी, स्वार्थसाधु, किंवा भेकड लोक आम्हांस नवीन जात करावयास सांगतात, तेव्हां यांच्या शहाणपणाला काय म्हणावें? अथवा तें यांच्या अंगीं आहे किंवा नाहीं याचाच संशय आहे! जातींमुळें आपला देशाभिमान किती संकुचित झाला आहे; जातीमुळें ज्ञान, कला, शास्त्रें वगैरे जेथल्या तेथे कशी कोंडल्यासारखीं झालीं आहेत; जातींमुळें धर्मविचारांत व आचारांत किती मतभेद उत्पन्न होऊन ती परस्पर वैरास, छलास, व मत्सरास कारण झाली आहे; जातींमुळें अन्नव्यवहार, विवाह वगैरेंच्यासंबंधाने किती गैरसोय झाली आहे; जातींमुळें देशांतल्या देशांत किंवा परदेशीं प्रवास करणें किती कठिण झालें आहे; जातींमुळें परद्वीपस्थ व परधर्मीय लोकांपासून अलग रहावें लागत असल्यामुळें केवढें नुकसान होत आहे; जातींमुळे आमची भूतदया, आमचें बंधुप्रेम, आमची उदारता, धर्मबुद्धि, आमची परोपकाररति, आमचे विचार; यांचें क्षेत्र किती मर्यादित झालें आहे, याची या 'धीर' सुधारकांच्या मनांत खरी कल्पना कधींच येत नाहीं काय? किंवा ती येत असूनही ते आम्हांस आणखी एक नवीन जात काढण्यास सांगतात काय? कदाचित् एके काळीं या इतक्या जातीं कांहीं विशेष कारणांमुळें अस्तित्वांत येणें अपरिहार्य होतें. पण येथून पुढें जो या देशांत नवीन जात काढण्याचा प्रयत्न करील, तो त्याचा हितचिंतक न समजतां दुष्ट शत्रूच समजला पाहिजे. आज ज्या आम्ही अनेक विपत्ति भोगीत आहों त्यांपैकी ज्यांचे जनन आमच्यांतील जातिभेदापासून झालें नाहीं, असें म्हणतां येणार आहे, अशा फारच थोड्या असतील! धर्मविषयक किंवा राज्यविषयक गोष्टीच्यासंबंधानें मतभेद होऊन निरनिराळे पंथ किंवा पक्ष उपस्थित होणें हा प्रकार आमच्यांतील जातिभेदांहून फार निराळा आहे. तसेंच, अध्ययन व व्यवसाय यांच्या भेदाप्रमाणें तत्ववेत्ते, कवि, राजकारस्थानी, शिल्पी, वैद्य, वकील, सावकार, शेतकरी, ऋणको असे लोकसंख्येचे अनेक वर्ग होणें, यांतही कोणत्याही प्रकारचा अस्वाभाविकपणा नाहीं. पण येथे ज्या प्रकारचा जातिभेद रूढ आहे त्या प्रकारचा जातिभेद वृद्धिंगत न होतां जितका क्षीण होत जाईल तितका बरा, असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. असें असतां जो मतभेद दहापांच वर्षांत, चर्चेची टकळी चालली असतां, रसातळास जाणार, व ज्या सुधारणा पाश्चिमात्य शिक्षणाचा सपाटा आणि ब्रिटिश अंमल यामुळें शेपन्नास वर्षांत सहज घडून येणार, त्यासाठीं नवीन जात करण्यास सल्ला देणारांचें सौजन्य किंवा दूरदर्शित्व यांचें काय वर्णन करावें?

*

सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रत काल

सुमारें तीन पिढ्यांपूर्वी म्हणजे पाऊणशें वर्षांपूर्वी आम्ही राष्ट्रीयस्वातंत्र्य-शैलीच्या शिखरांवर होतों. तें स्थान तरी आम्हीं मुसलमानांपासून मोठ्या कष्टानें काबीज करून घेतले होतें. आमच्या अंगांत राज्यकौशल्य असतें तर ते स्थान आम्हीं जाऊं दिले नसतें. पण तसें कोठून होणार? पूर्वीपासून खऱ्या देशाभिमानाची कल्पना या हिंदू लोकांस नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ती असली तरी मुसलमानांस देखील आम्ही येथें पादशाही स्थापूं दिली नसती. पण तो 'राम' आम्हांत केव्हाहीं नव्हता. व्यक्तिशौर्य येथे आढळत नाहीं असें नाहीं. तें बरेंच आहे. तसेंच, रजुपतासारख्या कांहीं, जातीच्या जाती रणशूर आहेत. पण उपयोग काय? जेथें शौर्य आहे, तेथें अक्कल नाहीं, व जेथें अक्कल आहे तेथें शौर्य नाही अशी आमची चिरकालीन स्थिती होऊन बसली आहे. कांहीं विशेष कारणामुळे या महाराष्ट्र देशांतील लोकांत अक्कल आणि शौर्य यांचा स्वल्पकालीन संयोग झाल्यामुळे त्यांनीं मुसलमानांचें पारतंत्र्य जूं झुगारून दिलें, व काहीं वेळ स्वराज्याचा उपभोग घेतला. पण मुसलमानांहून वरिष्ठ शत्रूंशीं झगडण्याचा प्रसंग आल्याबरोबर तेही आपले कष्टार्जित स्वातंत्र्य गमावून बसले! इंग्रजांसारख्यांशीं आमची गाठ पडून, साऱ्या भारतीयांस परवशता आली, ही गोष्ट तर फार वाईट झाली, यांत संशय नाही. पण तीबद्दल विशेष खेद करणें आम्हांस बरोबर दिसत नाहीं. इंग्रजांपूर्वी आम्ही मुसलमानांचे गुलाम कशासाठीं झालों? ज्या आम्हांला मुसलमानांसारख्या शुद्ध दांडग्या व धर्मवेड्या लोकांपासून आपल्या स्वातंत्र्याचा बचाव करता आला नाहीं, ते आम्ही बकऱ्यांसारखे चतुर, शूर व कारस्थानी आंग्लभौमांच्या स्वाधीन झालों यांत नवल तें कोणतें? मुसलमानांनीं आम्हांस पादाक्रांत केलें. त्याच वेळेस असें सिद्ध झालें कीं; या भरतखंडांत राहणाऱ्या आर्य लोकांत स्वातंत्र्यरक्षणाचें सामर्थ्यं राहिलें नाहीं. मुसलमानांच्या पाठीमागून आम्हांस इंग्रज न जिंकते तर त्यांचे काका दुसरे कोणी तरी जिंकते! इंग्रजांबरोबर किंवा त्यांच्या पूर्वीपासूनही पोर्तुगीज, दच, फ्रेंच वगैरे युरोपिअन लोक आपलें राज्य येथे स्थापण्याची खटपट करीतच होतें! आज आम्ही इंग्रजांची प्रजा नसतो तर पोर्तुगीज, दच, किंवा फ्रेंच लोकांची असतो! आणि उद्यां इंग्रजांचें राज्य नाहीसें

झालें तर आम्ही स्वतंत्र होणार आहो कीं काय? त्याचें नांव कशाला? ती गोष्ट स्वप्नांतसुद्धां आणावयाची गरज नाही! इंग्रज गेले तर रूस आमच्या छातीवर पाय देण्यास तयार आहेतच! तात्पर्य काय कीं, राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्यास लागणाऱ्या गुणांचा आम्हांत पूर्णपणे लोप झाला आहे व त्यांचा फिरून आविर्भाव होऊं लागून त्यांची बरीच वृद्धि होईपर्यंत, ते फिरून प्राप्त होण्याची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे. राजकीय स्वातंत्र्य जाणें ही अत्यंत खेदजनक गोष्ट खरी. हें जाणें म्हणजे शरीरातील सर्व इंद्रियें आणि त्यांचे व्यापार यांचे पोषक असें जें चैतन्यसारतत्त्व तें नाहीसें होणें होय. पण तें गेले म्हणून रुदन करीत बसण्यांत काय फायदा आहे? जगावयाचें असेल व तें जगणें चांगल्या प्रकारचें जगणें हवें असेल, तर तें चैतन्यसारतत्त्व फिरून आपल्या हातीं येण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व सांप्रत कालीं राष्ट्रसभादि साधनांच्या द्वारें तो जितका होण्यासारखा आहे तितका आम्ही करीत आहों. तेव्हां त्यासंबंधानें आज येथें विशेष लिहिण्याची आमची इच्छा नाहीं. चालू घटकेची आमची परवशता राजकीय दृष्टीनें अत्यंत शोच्य आहे, हें निर्विवाद आहे; पण कोणतीही स्थिति सर्वांशी दु:खमय असत नाही, असा जो पुरातन न्याय आहे, तदनुरोधानें आमची सांप्रत शोच्य परवशता सुद्धां केवळ दु:खमय आहे, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. व परवशतेमुळें राज्यप्रकरणांत आम्ही शून्यत्वाप्रत पावलों आहों, व त्या शून्यत्वामुळें आमच्या कर्तृत्वशक्तीचा बराच ऱ्हास होत आहे, हे नि:संशय आहे. तथापि आम्ही थोडे हातपाय हालवूं, तर याच परवशतेपासून आम्हांस आपलें फार दिवस नष्ट झालेलें सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य स्थापितां येणार आहे.

जे लोक राजकीय प्रकरणांत स्वतंत्र असतात, ते सामाजिक व धार्मिक प्रकरणांत स्वतंत्र असतातच, असा नियम नाहीं. किंबहुना राजकीय स्वातंत्र्य असूनही, सामाजिक व धार्मिक गोष्टींत अत्यंत तीव्र दास्यपाशानें सर्व प्रकारें जखडलेले असे अनेक लोक असतात. कांहीं अंशी नष्ट झालेलें राजकीय स्वातंत्र्य फिरून संपादणें सवघड आहे. कारण, तें हिरावणारा शत्रु परका असतो, व त्याचा मोड केला म्हणजे तें फिरून प्राप्त होण्यासारखें असतें. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीची तशी गोष्ट नाहीं. अगोदर फार वर्षांच्या सवईमुळें अशा प्रकारची गुलामगिरी; गुलामगिरी आहे, असें पुष्कळांस वाटेनासें झालेलें असतें. ज्याप्रमाणें शरीरांत अनेक वर्षें ठाणें करून राहिलेल्या व्याधीपासून फारसा त्रास होईनासा होतो, त्याप्रमाणें जे कष्टावह सामाजिक व धार्मिक आचार- ते आपणापाठीमागें केव्हां लागले, ते परिहार्य आहेत किंवा अपरिहार्य आहेत, त्यांचा अंमल आपणावर कोणाकडून होत आहे, तो अंमल करण्याचा त्यांस काय अधिकार आहे, वगैरे

गोष्टींविषयी आपणास गूढ अज्ञान असतें - ते आचार त्रयस्थास कितीही पीडाकार वाटले तरी खुद्द आपणास ते तसे वाटत नाहींत. तथापि त्यांपासून आपल्या शरीरावर व मनावर जे दुष्परिणाम होण्यासारखे असतात. ते होतच असतात. मादक द्रव्यांचे सेवन नित्य करणाऱ्या मनुष्याच्या ज्ञानतंतूस येणारी क्षीणता; त्याची त्याला किंवा त्यासारख्या इतर व्यसनी लोकांना नीट समजली नाहीं, म्हणून ती येत नाहीं, असें म्हणणें ज्याप्रमाणें बरोबर होणार नाहीं, त्याप्रमाणें मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक आचारापासून राष्ट्रस्थितीवर होणारे दुष्परिणाम या राष्ट्रांतील लोकांच्या लक्षांत आले नाहींत, म्हणून ते होत नाहींत, असें म्हणणेंही बरोबर होणार नाहीं. जोंपर्यंत अशा रीतीनें क्षीण झालेल्या लोकांस त्यांहून श्रेष्ठ अशा लोकांशीं झगडण्याचा प्रसंग आलेला नसतो, तोपर्यंत त्यांची आयुष्ययात्रा केवळ कष्टमय असते, असें म्हणतां येत नाहीं. पण जेव्हा त्यांचा वरिष्ठांशीं प्रसंग येऊन ठेपतो, तेव्हां त्यांस आपल्या क्षीणतेचें भान होऊं लागतें व एकाएकीं जाग्रदवस्था त्यांस प्राप्त झाल्यासारखें होऊन, आपली अशी दशा कां झाली असावी, असे विचार त्यांचे मनात येऊं लागतात. हा उद्‌बोध योग्य वेळीं होणें, ही दैवाधीन गोष्ट आहे. शरीरांतील व मनांतील सारा जोम नाहींसा झाल्यावर जर हा उद्‌बोध झाला, तर त्यापासून कांही एक फायदा होत नाहीं. नाड्या ठार बंद पडल्यावर संजीवनींचे तरी काय चालणार? रुधिराभिसरण थोडेंबहुत सुरू असलें; छातींत, हातांत व पायांत तें चालू आहे, असें यत्किंचित् जर व्यक्त होत असलें; तरच मात्रांचे वेढे उगाळण्यांत आणि ते जिभेला लावण्यांत कांहीं अर्थ आहे. शेवटच्या श्वासावाटें प्राणवायु बाहेर पडून सारें शरीर थंड झाल्यावर, मात्रांचा मारा करीत सुटण्यांत जसा काहीं अर्थ नाहीं, त्याप्रमाणें फार प्राचीन धार्मिक व सामाजिक दुराचारांमुळें ज्या राष्ट्रांतील सारा तक्वा नाहींसा झाला आहे, त्या राष्ट्रांतील लोकांचा सुधारलेल्या राष्ट्राशीं संबंध घडून त्यांचा मूर्खपणा त्यांस कळू लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्राणोत्क्रमणाचे वेळीं वाचा बसल्यावर कांही तरी बोलण्यासाठीं धडपड करणाऱ्या मरणोन्मुखाची जी स्थिती असते, ती असल्या लोकांची असते. वरिष्ठ लोकांच्या सान्निध्यामुळें असले लोक अखेरीस नामशेष होतात! आम्हांवर कसा प्रसंग गुदरणार आहे हें आजच खात्रीनें सांगवत नाहीं. राजकीय दृष्टीनें सध्यां आम्ही मेल्यासारखेच आहों. पण ज्यांनीं आम्हांस राजकीय शून्यता आणिली आहे, त्यांच्याच सान्निध्यामुळें आमच्या धार्मिक व सामाजिक गूढ मूढतेस धक्के बसूं लागले आहेत. इंग्रज लोक आम्हांस जे शिक्षण देत आहेत व त्यांच्या अमलांत विचारस्वातंत्र्याचा जो उपयोग आम्हांस प्राप्त होत आहे, त्या शिक्षणाच्या आणि विचारस्वातंत्र्याच्या वळशांनीं आम्हांस जी जागृति होऊं लागली आहे, ती

हवी असल्यास आम्हांस पाहिजे तितकी कल्याणकारक करून घेतां येणार आहे. पुष्कळांचा असा समज आहे कीं, सुधारणेचा आरंभ होणें, तो राजविषयक सुधारणेपासून झाला पाहिजे. राजकीय सुधारणेविषयी फारसा मतभेद असत नाहीं; त्यामुळें ती घडवून आणण्यासाठीं एकमेंकास मदत करण्याच्या कामीं एकाचा दुसऱ्याशीं म्हणण्यासारखा विरोध येऊं शकत नाहीं. स्वातंत्र्य हें सर्वांस प्रिय आहे. आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुन:प्राप्तीविषयीं प्रयत्न करणें होय. ही गोष्ट जितकी आम्हां महाराष्ट्रीयांस तितकीच वंगवाश्यांस, गुर्जरस्थांस, तेलंगणस्थांस, कर्नाटकीयांस, पारसीकांस, महंमदीयांस व इतरांस इष्ट असणें स्वाभाविक आहे, व म्हणून त्यांचें एकीकरण होणें शक्य आहे, व तें होऊं लागलें आहे. सामाजिक व धार्मिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. यासंबंधानें आमची कांहीं प्रिय वस्तु कोणीं नेली आहे, आणि आम्हांस फिरून ती संपादावयाची आहे, असें नाहीं. उलट आमची आहे ती स्थितीच उत्तम आहे, व तींत फेरफार करण्याचा प्रयत्न करणें हाच प्रमाद होय असें आम्हांपैकीं पुष्कळांस वाटत असल्यामुळें, जे थोडे वेडेपीर सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या छंदास लागले आहेत, ते समाजांस निष्कारण असंतोष व कलह उत्पन्न करून, स्वत:स कांहीं फायदा नसतां अप्रिय करून घेत आहेत! हें असें न करतील तर सर्वांस इष्ट अशा ज्या राजकीय, व्यापारीय, शिक्षणीय व इतर सामान्य सुधारणा, त्या एकमतानें करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होणार आहे. सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयीं तंटे उपस्थित केल्यामुळें, राजकीय गोष्टींत एकदिलानें वागणें दुरापास्त झाले आहे!

अशा प्रकारच्या आक्षेपकांस आम्ही असा प्रश्न करतों कीं, इंग्रज लोकांनीं तुम्हांस जिंकलें त्या वेळेस तुम्हांत कोणत्याही प्रकारचे सामाजिक किंवा धार्मिक तंटे नव्हते. त्यावेळेस राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून, सामाजिक व धार्मिक प्रकरणांत पूर्ण ऐकमत्य होतें. असें असून परशत्रूस तुम्ही हार कां गेलां? सैन्यबल, द्रव्यबल, संख्याबल इत्यादि यशाचीं बाह्योपकरणें तुमच्या हातीं असून, व धार्मिक आणि सामाजिक गोष्टींत तुम्हांस द्वैत माजलेलें नसून, तुमची अशी दाणादाण कां झाली? व पंचवीसचाळीस वर्षांच्या आंत तुम्ही इतके वीर्यहीन कसे झालांत? आम्हास असें वाटतें की, पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक व धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती; तशी नव्हती म्हणून झाला. आणि तेथून पुढेंही आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहण्यास, आम्हीं आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्यास अत्यंत अनुकूल काल सांप्रत काल आहे. चांगली राजकीय स्थिति ही चांगल्या गृहस्थितीचें फळ आहे. सबब या दोहोंच्या सुधारणेस प्रथम लागलें पाहिजे. ✳

सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रत काल

(नंबर २)

गर्भस्थ पिंड पहिले कांही महिने एकरूप असतो. त्यांत अवयवभेद किंवा मज्जा, स्नायु, मांसपेशी, शिरा, नाड्या असा भेद नसतो. सारा पिंड एका द्रव्याचा गोळा असतो. पुढें त्यांत हळू हळू विकार होत जाऊन मेंदू, काळीज, फुफ्फुसें, कोठा, असे शरीराच्या आंतल्या भागांत असणारे अवयव अस्तित्वांत येऊं लागतात, व हातपाय, नाकडोळे वगैरे बाह्य अवयवही हळूहळू दृग्गोचर होऊं लागतात. सारांश एकरूपता आणि एकधर्मता यांचा क्रमाक्रमानें लोप होत जाऊन बहुरूपता आणि बहुधर्मता प्राप्त होत जाणे हा जसा वनस्पतींच्या व प्राण्यांच्या शरीराचा अनादिसिद्ध नियम आहे, त्याप्रमाणेंच समाजदेहसुद्धां प्रथमावस्थेंत एकरूप असतो. प्राथमिक किंवा आद्य समाजांत राजकीय, सामाजिक आणि धार्मिक आचारांचे पृथक्करण झालेलें नसते. मनूचें धर्मशास्त्र घेतलें तर त्यांत राजकीय, सामाजिक व धार्मिक आचारांचा स्पष्ट भेद नसून त्या सर्वांस एका दावणीत गोवलें आहे, असें दिसून येतें. ज्याप्रमाणें समाजाच्या प्रथमावस्थेंत मनुष्यांना हे तीन आचार पृथक् आहेत असें वाटत नाहीं, त्याप्रमाणें त्या आचारांचें शासनही निरनिराळ्या व्यक्तींकडून करविण्याची कल्पना त्यांच्या मनांत येऊं शकत नाहीं. त्या स्थितींत समाजनायक म्हणजे 'राजा' हाच राजकीय, सामाजिक व धार्मिक आचारांचा शास्ता असतो. राष्ट्राच्या वतीनें सामदाम वगैरे करावयाचें झालें, तरीं तें राजानेंच करावयाचें; एखाद्यानें रूढ धर्माविरुद्ध आचरण केलें तर त्याला जो दंड करावयाचा तोही राजानेंच करावयाचा. तसेंच कोणी कोणत्या प्रकारचा पोषाख करावा, कोणीं कोणतीं पिकें करावी, कोणीं कोणता व्यापार करावा, कोणीं कसे रहावें, कोणते खेळ खेळावे, कोणत्या करमणुकी चालू असाव्या, कोणत्या विद्या शिकाव्या - वगैरे हरएक प्रकारच्या सामाजिक व्यवहाराचा निश्चयही राजाकडूनच होतो. ज्याप्रमाणें झाडाला फांद्या फुटूं लागण्यापूर्वी बरेच दिवस त्याचा एकच कोंब किंवा सोंट असतो, व पुढें अस्तित्वांत येणाऱ्या शाखा तदन्तर्गत असतात, त्याप्रमाणे समाज बराच वाढला, अथवा जुना झाला म्हणजे

त्यांत ज्याप्रमाणें निरनिराळ्या शाखा उद्भवतात आणि स्वतंत्र खातीं करून बसतात, त्या त्याच्या शैशवांत किंवा प्रथमावस्थेंत एकमेकांत गुंतून गेलेल्या असून, बुद्धीस त्यांतील भेद कळत नसतो. तेव्हां अशा स्थितींत अमुक सुधारणा आधीं होते, व अमुक मागाहून होते असें आग्रहानें म्हणणें हें शुद्ध साहस आहे. हे तीन आचार निराळे वाटूं लागून, त्यांत सुधारणा करण्याची इच्छा होणें हा प्रकार बहुधा एकाच कालीं घडूं लागत असावा, असें अनुमान करणें हेच प्रशस्त आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं धर्म, राज्य आणि सामाजिक व्यवहार यांतील भेद एकसमयावच्छेदेंकरून होणार आहे. समाजाच्या एकाच बुडख्याला या तीन खांद्या किंवा हे तीन अंकुर एकदम फुटतात. ते फुटल्यावर पुढें असा प्रश्न निघतो कीं, त्यांपैकीं प्रथम कोणती खांदी वाढीस लागते, व कोणत्या खांदीच्या वाढीनें बाकीच्या खांद्यांच्या वाढीस मदत होते? या प्रश्नाविषयीं पुष्कळ मतभेद आहेत. कित्येकांचे असें म्हणणें पडतें कीं, ज्याप्रमाणें प्राण्याच्या शरीराचा कोणताही भाग विशेष पुष्ट होऊं लागला, म्हणजे रक्ताचा बराच भाग त्याच्या पोषणाकडे जाऊन बाकीच्यास त्याचा स्वल्प अंश मिळूं लागतो, व त्या मानानें त्याची वाढ मागसते, त्याप्रमाणें, धर्म, राज्य व सामाजिक व्यवहार ह्या ज्या समाजाच्या मुख्य तीन क्रियाशाखा, त्यांपैकीं कोणत्याही एकीच्या सुधारणेकडे समाजाचें विशेष लक्ष वेधलें, तर इतरांकडें तें तितकें कमी पडून, त्या मानानें त्यांची सुधारणा मागें पडते. दुसऱ्या कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, धार्मिक, राजकीय, आणि सामाजिक आचार यांचा उद्भव जरी सामान्य कारणापासून एकाच वेळीं होत असला तरीं पुढें त्यांपैकी एकाची वाढ आधीं आणि बाकीच्यांची मागून होणें अवश्य असतें. प्राण्याच्या शरीरांत ज्याप्रमाणें मेंदू, काळीज व कोठा हे मुख्य तीन भाग आहेत, त्याप्रमाणें समाजाच्या शरीराचे धर्माचार, राज्याचार आणि समाजाचार हे मुख्य तीन भाग आहेत; व दिसण्यांत जरी तीन सारख्या महत्त्वाचे दिसतात, तरी सूक्ष्म विचार करतां ते कमी अधिक महत्त्वाचे आहेत, व त्यांत जो अधिक महत्त्वाचा असतो,त्याच्या वाढीवर इतरांची वाढ अवलंबून असते; असें दिसून येतें.या मतानुरोधानें कित्येक असें म्हणतात कीं, प्राण्यांच्या शरीराचे व्यापार यथास्थित चालण्यास, ज्याप्रमाणें सर्वांआधीं त्याचा मेंदू साफ असणें जरूर आहे, त्याप्रमाणें समाजशरीर नीट चालण्यास त्याच्या मज्जास्थानीं किंवा मेंदूच्या जागीं असणारी जी त्याची शासनपद्धति म्हणजे राज्यव्यवस्था ती शाबूद पाहिजे. तींत यत्किंचित् बिघाड झाला कीं, साऱ्या शरीरास अस्वास्थ उत्पन्न होणार. दुसरें असें म्हणतात कीं, राज्यपद्धतीचा एवढा महिमा गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. रक्त

शुद्ध करण्याचें साधन जें काळीज; तें धड असेल व त्यांत हवें तितकें चलन एकसारखें होत असेल तरच प्रकृति दुरुस्त राहून, शरीरांतस्थ इतर कारणांचे यथास्थित संगोपन व वृद्धि होणार आहेत! रक्त बिघडलें कीं सारें बिघडलें, व तें न बिघडणें हें काळिजाच्या बळकटीवर अवलंबून आहे. सबब ज्याप्रमाणें शरीरांतील दुसऱ्या इंद्रियांपेक्षां या इंद्रियाची विशेष काळजी वाहणें अवश्य आहे, त्याप्रमाणें समाजशरीराचें हृदय किंवा काळीज जो धर्म; त्याविषयीं लोकांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. धर्मसंशोधन हें लोकांचें आद्य कर्तव्य होय. धर्मग्लानि, धर्मकलुषता, धर्मशैथिल्य, धर्मावहेलना हीं समाजाच्या अस्वास्थाचीं निश्चयात्मक निदर्शकें होत. तेव्हां ज्यांना समाजशरीराची पुष्टि राहून त्याचे सर्व व्यापार यथास्थित चालावे अशी इच्छा असेल, त्यांनीं त्याच्या धर्महृदाची कोणत्याही प्रकारची हयगय करतां कामा नये. समाजाचें बरें-वाईट सर्वथैव त्याच्या आधीन आहे. तिसरे म्हणतात कीं, मेंदू व काळीज याहून कोठ्याची मातब्बरी फार आहे. जीवित्वास आधार जें अन्नपाणी तें अगोदर या ठिकाणीं येतें. त्याचें पचन होऊन त्याचा एक प्रकारचा द्रव होतो. हा द्रव पुढें काळिजांत शुद्ध होऊन रक्त होतो, आणि सर्व शरीरभर पसरून सर्व अवयवांस जीवन देतो. हा द्रव या कोठ्यांत तयार न होईल तर काळीज असून नसल्यासारखेंच आहे. तेव्हां जीवित्वरक्षक रसांचा झरा जो कोठा किंवा पक्वाशय त्याहून कोणतेंही अंतरिंद्रिय अधिक महत्त्वाचें नाहीं. सबब त्याविषयीं सर्वांहून अधिक काळजी घेणें जसें आवश्यक आहे, तसेंच समाजशरीरात पक्वाशयस्थानीय जो आचारसमूह त्यांबद्दल इतर आचारांहून अधिक खबरदारी ठेवणें फार अगत्याचें आहे. या आचारसमूहास कोणी गृहाचार किंवा कुटुंबस्थिति असें म्हणतात. ज्याप्रमाणें शरीराच्या सर्व प्रकारच्या पोषक रसांचा परिपाक कोठ्यांत होतो, त्याप्रमाणें समाजपोषक सर्व सामर्थ्यांचा संगम कुटुंबांत होऊन तेथें त्यांस परिपक्वता येते. येथून तीं कच्चीं किंवा सदोष अशीं बाहेर पडलीं तर त्यांनीं समाजशरीराचें चांगलें पोषण कधींच व्हावयाचें नाहीं. तेव्हां सर्वांआधीं गृहाचाराचें संशोधन केलें पाहिजे, म्हणजे कुटुंबस्थिति सुधारली पाहिजे. याप्रमाणें कोणी राजकीय, कोणी धार्मिक, व कोणी सामाजिक आचारांस प्रमुखत्व देऊन बाकीच्यांस तदनुषंगी करतात. थोड्या वर्षांपूर्वी आ. का. त्रिं. तेलंग यांनी मुंबईस जें एक सुरस व्याख्यान दिलें, व जें त्यावेळी लोकांस अत्यंत प्रिय झालें, त्यांत त्यांनीं सामाजिक सुधारणेच्या अगोदर राजकीय सुधारणा झाली पाहिजे व बहुशः होते, अशा मताचें प्रतिपादन केल्याचें स्मरतें; व तेंच मत ज्यांस मान्य आहे, असे युरोपांत पुष्कळ विद्वान व विचारी लोक आहेत; उलट धर्मसुधारणा झाल्याखेरीज दुसरी कोणतीही सुधारणा होणें शक्य नाहीं, असे

प्रतिपादणारेही तिकडे पुष्कळ विद्वान आहेत. हे विद्वान नेहमीं असें म्हणतात कीं, आज जी युरोपांत असामान्य सुधारणा दृष्टीस पडत आहे; ती त्या खंडात सोळाव्या शतकांत जी प्रचंड धर्मक्रांति झाली तिचें फळ होय. ख्रिस्ती धर्मांत शिरलेल्या अप्रशस्त आचारांचा त्याग आणि मूर्ख मतांचें खंडन, हें करण्याचा त्या वेळी ज्यांनीं निश्चय केला त्यांना त्याबद्दल जरी अनेक यातना व संकटें भोगावीं लागलीं तरी त्यांनीं आपला निश्चय यत्किंचितही ढळूं दिला नाहीं. या निश्चयाचा यूरोपाच्या अलीकडील इतिहासावर केवढा परिणाम झाला आहे, हें अद्यापि पुष्कळांस बरोबर समजत नाहीं. तथापि तत्त्वशोधक अनेक इतिहाकारांचें असें म्हणणें आहे कीं, सत्पक्षमंडनाचा जो आवेश त्या शतकांत उद्‌भूत झाला, त्यामुळें अलीकडील बहुतेक राजकीय सुधारणा झाल्या आहेत, व होत आहेत. या दोहोंहून भिन्न असा आणखी एक पक्ष आहे; त्याचें असें म्हणणें पडतें कीं, गृहसुधारणा झाल्याखेरीज खरी व टिकाऊ धर्मसुधारणा व राज्यसुधारणा कधींच व्हावयाची नाहीं. ज्याप्रमाणें व्यक्ति कुटुंबाचे घटक होत, त्याप्रमाणें कुटुंबें राष्ट्रांचे घटक होत. कुटुंबें सुधारल्याखेरीज राष्ट्रसुधारणा किंवा राजकीय सुधारणा कधींच व्हावयाची नाहीं. ज्या देशांतील कुटुंबांत, कुटुंबाधिपति सुलतान व कुटुंबांतील इतर सर्व माणसें गुलाम, अथवा जेथले यच्चावत् भ्रतार प्राणपति आणि विवाहित स्त्रिया विनम्र दासी; किंवा जेथे पुरुषांनीं सशास्त्र अथवा अशास्त्र रीतीनें हव्या तितक्या स्त्रियांशीं हव्या तेवढ्या वयापर्यंत रममाण व्हावें, परंतु जेथें अत्युच्च व सुशिक्षित वर्णांतील कोणत्याही वयाच्या स्त्रीचा भर्ता निवर्तला तर तिला फिरून पुरुषस्पर्श मिळावयाचा नाहीं; इतकेंच नाहीं, तर तिच्या मनांत त्या सुखाची कल्पना न येऊं देण्यासाठीं, किंवा तिला पहाणाराच्या मनांत तिच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न होण्यासाठी मंडन, वसन व भोजन इत्यादि सर्व गोष्टींत तिला संन्याशाशीं प्रतिस्पर्धा करण्यास लावण्याचा प्रघात- अशा देशाची स्थाईक राजकीय सुधारणा कधींच व्हावयाची नाही; कारण, ती करण्यासारखे स्त्रीपुरुष अशा कुटुंबात कधींच निपजावयाचे नाहींत, असें या पक्षांतील लोकांचे म्हणणें पडतें; व तें आम्हांस बऱ्याच अंशी रास्त आहेसें वाटते. ज्या वस्तूचा प्रत्येक घटक सदोष आहे, ती सारी वस्तू सदोष असलीच पाहिजे. ज्या देशांतील कुटुंबांत गुलामगिरी व क्रौर्य यांचा अंमल जारीनें गाजत आहे, त्या देशांतील राज्यपद्धतींत ते दुर्गुण पूर्णपणें प्रतिबिंबित झालेच पाहिजेत, व तींत त्यांचें प्रतिबिंब पडलें म्हणजे त्या राष्ट्रास विकळा आलीच पाहिजे. अशा विकळेचें आज कित्येक शतकें आम्ही सर्वोत्कृष्ट भाजन होऊन बसलों आहों. ही भाजनता आम्हांस अलीकडे प्राप्त होत असलेल्या पाश्चिमात्य शिक्षणामुळें अप्रिय वाटूं लागली आहे. आम्हांस ती खरोखरीच नकोशी

झाली आहे असें आजच आमच्यानें खात्रीनें सांगवत नाहीं. तसें असतें तर ती नाहींशी करण्याचा जो खरा उपाय आहे तो आम्ही केव्हांच करूं लागलों असतो. तो करण्यास अत्यंत अनुकूल असा काल प्राप्त झाला असूनही आम्ही आपले जागच्या जागीं झुलत आहों, याचा अर्थ काय हें आम्हांस समजत नाहीं! राजकीय, धार्मिक, व सामाजिक सुधारणांपैकीं प्रथम कोणती होते व करावी, याविषयीं कितीही मतभेद असला तरी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास आज आम्हांस जितका अनुकूल काल प्राप्त झाला आहे, तितका पूर्वी कधींच प्राप्त झाला नव्हता; याविषयीं मतभेद होण्याचें बिलकूल कारण नाहीं, असें वाटतें, आणि हे खरें असले तर या घटकेस हातपाय न हालविणें म्हणजे जाणूनबुजून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होण्यासारखें होय!

*

अशी वेळ कधीं आली नव्हती

राजकीय सुधारणा आधीं होते किंवा सामाजिक सुधारणा आधीं होते, हे जरी निश्चयानें सांगतां आलें नाहीं, तरी एवढें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, सामाजिक सुधारणा करण्यास आजमित्तीस आम्हांस जितकी अनुकूल वेळ आली आहे तितकी पूर्वी कधींही आली नव्हती. समाजाच्या प्राथमिक स्थितींत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचार व क्रिया एकमेकांत गुंतलेल्या असतात, व उत्तरोत्तर त्यांचे पृथक्करण व विश्लेष होत जातो, हें मागें सांगितलेंच आहे. तशा प्रकारचा भेद येथें बराच झाला आहे. निदान राजकीय विषय सामाजिक व धार्मिक विषयांपासून स्पष्टपणें निराळे झाले असून, त्यांची व्यवस्था आमच्या सरकारानें आपल्या शिरावर घेतली आहे, व बाकी राहिलेले दोन भाग आम्हांकडे ठेविले आहेत. हे दोन भाग अजून चांगलेसे वेगळे करण्यासारखे झालेले नाहींत. यामुळें त्यांचा विचार एके ठिकाणीं करणें भाग पडतें.

सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास सांप्रत काल फार अनुकूल आहे, असें आम्हीं जें एकसारखें म्हणत आहों, याचें कारण काय, असा प्रश्न आतांपर्यंत पुष्कळांनीं केला असेल, व त्याचें उत्तर देणें जरूर आहे. देश स्वतंत्र असला म्हणजे ज्याप्रमाणें कांहीं प्रकारच्या सुधारणा करणें सुलभ असतें, त्याप्रमाणें कांहीं प्रकारच्या सुधारणा करणें अवघडहीं असतें. आम्ही स्वतंत्र असतों तर अमेरिकेप्रमाणें परक्या देशांतून येणाऱ्या मालावर हवी तेवढी जकात आम्हांस ठेवतां आली असती, व तसें करून या देशांतील कित्येक धंद्यांना उत्तेजन देतां येऊन, ते आम्हांस व इतर देशांस फायदेशीर होतील, अशी त्यांची स्थिति करतां आली असती. येथें कापूस पिकतो; मजुरीचे दर माफक आहेत; लांकूड व कोळसा हवा तितका पैदा होण्यासारखा आहे; असें सांगून येथला कापूस परदेशास जातो, आणि तेथें त्याचें सूत व कापड बनून तें येथें विकण्यास येतें व येथील कापडाहून ते सवंग मिळतें! वास्तविक पाहतां हिंदुस्थानांत उत्पन्न होणारें कापड, अमेरिकेतील कापडाइतकें सवंग पडायला पाहिजे आहे. पण ज्या साधनांनीं अमेरिकेंतील कापडाच्या कारखान्यांस उत्तेजन आलें; ती साधनें हिंदुस्थानांतील कापसाच्या कारखान्यांस उत्तेजन देण्याच्या कामीं लावण्याचें सामर्थ्य आमचें अंगीं नसल्यामुळें,

सरकारच्या मदतीवांचून ते जसे चालवितां येतील, तसे चालविणें आम्हांस भाग पडत आहे. याचप्रमाणें येथल्या इतर व्यापारीय व राजकीय सुधारणांची गोष्ट होय. जबरदस्त परक्या सरकारच्या हातींपायी पडून किंवा त्यांशीं थोडी बहुत वर्दळ घालून, त्यापासून जेवढें प्राप्त होईल तेवढ्यांत यासंबंधानें समाधान मानून घेणें याशिवाय आम्हांस सध्यांचे स्थितीत गत्यंतर नाहीं.पण सामाजिक व धार्मिक गोष्टींचा तसा प्रकार नाहीं. या कामांत सरकार ढुंकूनसुद्धां पहात नाही. त्यासंबंधानें हवें तें करण्यास आज आम्हांस पूर्ण मुभा आहे. आम्हीं स्वतंत्र असतों तर असें झालें नसतें. आजमितीस जे सरकारी अधिकारी आमच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांच्यासंबंधानें अगदीं तिऱ्हाइताच्या वृत्तीचें अवलंबन करून बसले आहेत, तसें त्या स्थितींत झालें नसतें. आम्ही स्वतंत्र असतों तर मोठमोठ्या अधिकारांच्या जागाही आमच्याच लोकांच्या हातीं असत्या; व या जागांवर असलेल्या अधिकाऱ्यांनीं आपला अधिकार व वजन आपणांस मानतील त्या सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या उत्कर्षांकडे लाविलें असतें, व ज्या सुधारणा त्यांस मान्य झाल्या नसत्या त्यांचें डोके वर निघूं न देण्यासाठीं त्याच अधिकाराचा व वजनाचा उपयोग त्यांनीं केला असता. तसेच त्या स्थितींत म्हणजे आम्ही स्वतंत्र असतों तर आमच्यातील अनधिकारी पण धनाढ्य व वजनदार लोकांचें आणि धर्माधिकाऱ्यांचे वजनही आतांहून विशेष पडतें. पण आजच्या स्थितींत काय विलक्षण मौज झाली आहे पहा. स्वतंत्र स्थितींत समाजाग्रणी आणि धर्माधिकारी यांस सरकारी अधिकाऱ्याचे बरेंच पाठबळ असतें. ज्या अधिकाऱ्यांस जीं धर्ममतें किंवा जे सामाजिक आचार ग्राह्य असतात; त्या मतांचें व आचारांचें मंडन व प्रसार करण्यास त्यांकडून समाजाग्रणीस आणि धर्माधिकाऱ्यांस पुष्कळ मदत होते. यामुळे त्या स्थितींत कोणत्याही रूढ मताविरुद्ध वागणें, बोलणें किंवा लिहिणें अतिशय कठिण असतें. येथे कोणी अशी शंका घेतली कीं, एका प्रकारच्या अधिकाऱ्यांस एका प्रकारचीं सामाजिक व धार्मिक मतें आवडली तर दुसऱ्यांस दुसऱ्या प्रकारचीं आवडतील; व त्यामुळें त्या स्थितींत प्रत्येक प्रकारच्या मतांस थोडेबहुत पुरस्कर्ते मिळण्याचा संभव आहे. पण दुर्दैवाने बहुशः असें होत नाहीं. सुदैवानें तसे झाल्यास स्वतंत्र देशांत राजकीय, सामाजिक व धार्मिक सुधारणा होण्यास फारच थोडा काळ लागणार आहे. वास्तविक प्रकार बहुशः असा घडतो. जे सरकारी अधिकारी असतात, ते सामाजिक व धार्मिक जुन्या मतांनाच नव्याण्णव वांट्यांनीं अनुकूल असतात. यामुळें स्वतंत्र देशांत सामाजिक व धार्मिक गोष्टींच्या संबंधानें नवीन मत स्थापणें किंवा नवीन आचार पाडणें फार कठिण असतें. तसें नसतें तर प्रत्येक स्वतंत्र देशांतील प्रसिद्ध आद्य सुधारकांचा इतका छळ कां झाला

असता? सरकारी अधिकाऱ्यांनी व धर्माधिकाऱ्यांनीं अशा सुधारकांस जाळल्याचीं, पुरल्याचीं, तोडल्याचीं, सोलल्याचीं, कड्यावरून लोटल्यांची, हत्तींच्या पायाशी बांधल्याचीं, व फांशीं दिल्याची, अनेक उदाहरणें इतिहासांत सांपडण्यासाराखी आहेत. यावरून काय दिसतें कीं, सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास पारतंत्र्य जितकें अनुकूल आहे, तितके स्वातंत्र्य नाहीं! प्रथमदर्शनीं हा सिद्धात कांहीं अंशीं विपरीत वाटण्यासारखा आहे, हें आम्ही कबूल करतो. पण सूक्ष्म विचाराअती त्यांत बरेंच तथ्य आहे, असे दिसून आल्याशिवाय रहाणार नाही अशी आमची खात्री आहे. एवढें खरें आहे कीं, स्वतंत्र देशांतील प्रत्येक मनुष्याच्या अंगांत परतंत्र देशांतील मनुष्यापेक्षां विशेष रग असते, व त्यांतील सुधारकात तर तिची परमावधि झालेली असते. यामुळे तसल्या देशात कधीं कधी एकटा मनुष्य साऱ्या देशाशीं लढण्यास व भांडण्यास तयार होतो, व सारे जग त्याविरुद्ध उलटलें तरी तो डरण्यासारखा नसतो. ग्यालिलिओ, ल्यूथर, ब्रूनो वगैरेंची चरित्रे अशा प्रकारचीं आहेत. यांच्या पक्षाकडे सत्य असल्यामुळें हळूं हळूं त्यांस अनुयायी मिळून पुढे ते सर्वत्र प्रस्थापित झाले ही गोष्ट वेगळी. पण आरंभी या सुधारकाना किती छलना करून घ्यावी लागली हें सर्वांना ठाऊक आहेच.

तेव्हां आमचे सांप्रत पारतंत्र्य हेच सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास कांहीं अंशीं अनुकूल झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. स्वतंत्र देशांतील प्रत्येक पक्षांत व पंथांत वजनदार लोक असतात. त्यांच्या वजनामुळें त्यांना मोठमोठे अनुयायी वर्ग जडलेले असतात. पक्षाग्रणीनें कांही विशेष महत्त्वाची गोष्ट आपल्या अनुयायांपुढें आणिली, व तीविषयी त्यांची समजूत घालून देऊन ती तुम्ही पत्करा, असें म्हटलें, तर त्यांना तिचा स्वीकार करणें भाग पडतें. उलट अनुयायांच्या मतासही थोडाबहुत मान देणें अग्रणीस अवश्य असतें. याप्रमाणें एकमेकांच्या साहाय्यानें साधारण सुधारणा स्वतंत्र देशांत, कायद्याच्या मदतीशिवाय, सहज होत असतात. आमच्या पारतंत्र्यामुळें आमची अगदीं वेगळी स्थिती झाली आहे. आमचें म्हणण्यासारखे सरकारी अधिकारी उरले नाहींत इतकेंच नाहीं, तर त्या अधिकाऱ्यांच्या लोपाबरोबर आमचे धर्माधिकारी व समाजाग्रणीही दुर्बल झाले आहेत. ज्याप्रमाणें या भरतभूमीवर पसरलेल्या पारतंत्र्यरूप गाढ अंधतमसांत राजापासून रंकापर्यंत साऱ्यांस एकसारखी अवनतावस्था प्राप्त झाली आहे; तीपुढे कोणाचेंही तेज पडत नाही, ज्याप्रमाणे माळेचे सूत्र तुटलें असतां, तींतील मणी चार दिशांस पसरतात, त्याप्रमाणे समाजघटकांस ग्रथित करणारें आमचें सरकारसूत्र भग्न झाल्यामुळें, आमची पराकाष्ठेची वाताहात झाली आहे, व इंग्रजांनीं आम्हां साऱ्यांस एकाच करंड्यात भरून ठेवलें आहे. आम्हां सर्वांला करंड्याच्या परिघाचा

आळा आहे, व त्याबाहेर आम्ही पडूं शकत नाहीं, हे जरी खरें आहे, तरी आंतल्या आंत एक इसम दुसऱ्या इसमाशीं चिकटून रहात नाही , हेंही खरें आहे. तात्पर्य, सध्यांच्या आमच्या स्थितींत अमुक एकाचें अमुकावर वजन आहे, असें म्हणणें प्रमाद करण्यासारखें होय, असें दिसतें.

आमच्या पुढाऱ्यांचें व आमच्या धर्माधिकाऱ्यांचे वजन कमी होण्यास आणखी एक कारण झालें आहे, तें असे. ज्या सामाजिक व धार्मिक सुधारणा व्हाव्या, असें आमच्या पाश्चिमात्य शिक्षणामुळे आम्हांस अलीकडे वाटू लागले आहे, त्या इंग्लंडांत केव्हाच होऊन गेल्या असल्यामुळे नुसत्या राजकीय खात्यांतच इंग्लिश लोक आमचे वरिष्ठ होऊन बसले आहेत असे नाहीं, सामाजिक व धार्मिक गोष्टींतही त्यांची आमच्यावर सरशी आहे. ज्यास पाश्चिमात्य शिक्षण मिळतें त्याच्या विचारांत मोठें अंतर पडून, त्यास आपल्या लोकांची सामाजिक व धार्मिक सुधारणा यूरोपाच्या वळणावर जावी, असे वाटूं लागतें, व तद्नुसार त्याचें वर्तन होऊं लागले असता, सरकारास साहजिकपणें तें आवडतें होतें. जुन्या लोकास हे शिक्षण मिळालें नसल्यामुळे राज्य, धर्म व समाज यांविषयी त्यांच्या पहिल्याच कल्पना कायम आहेत. तसेंच, धर्माधिकारीवर्गातही त्यांचा अजून प्रवेश झाला नाहीं, त्यामुळें तो वर्गही आपल्या पहिल्याच विचारांत अद्यापि दंग आहे. पण कांहीस पाश्चिमात्य शिक्षण मिळून त्यांचें विचारांतर होत असल्यामुळें व कांही जसेच्या तसे रहात असल्यामुळें, सुधारणेचा कोणताही प्रश्न निघाला कीं, उभयतांत कलह होण्यास प्रारंभ होतो, व सरकार उदासीनपणें त्याकडें पहात बसतें! नवीन लोकांस हें पक्कें ठाऊक झालें आहे कीं, जुन्या लोकांचे धार्मिक व सामाजिक विचार सरकारास बिलकुल पसंत नाहीत. पण जुन्या लोकांस वाटत आहे कीं, अद्यापि आपल्या बाजूस बहुजनसमाज आहे. तेव्हां आपणांस या नव्या लोकांना हार जाण्याची गरज नाहीं इकडे नव्या लोकांस असें वाटतें कीं, आपल्या मतास सरकारची अनुकूलता आहे, तेव्हां आपण जुन्या लोकांची फारशी प्रतिष्ठा बाळगण्याची गरज नाहीं. त्याप्रमाणें प्रत्येकास आग्रह धरून बसण्यास एकेक कारण सांपडलें असल्यामुळें उभयतांत तोडजोड होण्याची आशा मुळींच दिसेनाशी झाली आहे. तात्पर्य, सध्या जरी म्हणण्यासारखी सुधारणा होऊं लागली आहे असे नाहीं, तरी ती करण्यास अडथळा करणाऱ्या जुन्या लोकांवर हवें तसें तुटून पडण्यास सांपडावें, आणि कोणाचे पाठबळ नसल्यामुळें ते जेरीस येऊन त्याना आपले दुराग्रह हळू हळू भाग पडावें, हा कांहीं लहान फायदा नाहीं.

*

इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार

गेल्या चोविसाव्या तारखेच्या सुधारकांत बोलके सुधारक, कर्ते सुधारक आणि सुधारणानिंदक असे जे लोकांचे तीन वर्ग दिले आहेत व त्यांच्या उत्पत्तीचे जे काल सांगितले आहेत, ते वाचकांच्या स्मरणांत असतील. आज या पत्राच्या चालकांस सुधारणेचा कोणता पंथ मान्य आहे, याचा विशेष खुलासा करावयाचा आहे. त्या खुलाशाचें सार ''इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल तें करणार'' या शिरोलेखांत आणिलें आहे. पण त्यावरून साऱ्या वाचकांस स्पष्ट बोध होण्याचा संभव नाहीं; म्हणून थोडासा विस्तार करण्याची अवश्यकता आहे.

सांप्रत स्थितींत आपणांस कोणती गोष्ट प्रतिकूल आहे व कोणती अनुकूल होईल, ही गोष्ट बहुधा यच्चावत् प्राणिमात्रात सहज स्वभावधर्मानें समजते. भूक लागली असतां कांही तरी अन्न खावें, तहान लागली असतां पाणी प्यावें, ऊन लागले असता सावलीत जावें, थंडी लागल्यास उबाऱ्याची जागा पहावी, पीडा देणाराच्या हातून निसटून जाण्याचा प्रयत्न करावा- वगैरे जीवितरक्षणास अत्यवश्य लागणाऱ्या गोष्टींची संख्या अत्यंत स्वल्प आहे, व ती सहजगत्या जंतूंच्या वर्तनावर परिणाम करते. किंबहुना तसें न होईल तर जीवाची उत्पत्ति व अभिवृद्धि ही अशक्य होणार आहे. तेव्हां इतर प्राण्यांच्या समवेत मनुष्यांनी कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हें येथें सांगण्याची गरज नाहीं; कारण त्या न केल्या तर मनुष्यांची जातच राहणार नाही. तथापि जातां जातां ही गोष्ट येथें सांगण्यास हरकत नाहीं कीं, जरी इतर प्राण्यांप्रमाणें क्षुधादि इंद्रियसुखें हीच मनुष्यांची सारीं सुखें नाहीत, तरी तीं त्यांच्या इतर सुखांस अत्यंत आधारभूत असल्यामुळें, प्रत्येक देशांतील लोकांनीं तीं संपादण्याविषयीं अत्यंत दक्ष असलें पाहिजे ज्या राष्ट्रांतील लोकांस पोटभर अन्न मिळत नाहीं व थंडीवाऱ्यापासून आपलें रक्षण करतां येत नाही, असल्या राष्ट्रांतील लोकांस वरिष्ठ सुखें मिळणें अशक्य आहे. तेव्हां बोलके सुधारक, कर्ते सुधारक व सुधारणानिंदक या तिघांचा जीवितरक्षणास लागणाऱ्या अत्यंत अवश्य गोष्टींच्या संबंधानें तरी मतभेद होण्याचा संभव नाही. प्राण सर्वांस प्रिय आहेत; व त्यांचें रक्षण करणें सर्वांसच इष्ट वाटत आहे. तेव्हा धान्याची समृद्धि होण्यासाठी शेतकीची सुधारणा करणे, वस्त्रादि शीतोष्ण निवारक साधानांची

समृद्धि होण्यास यंत्रांचे कारखाने घालणें, आणि यांत्रिक शिक्षणाचा प्रसार करणें, व्याधींच्या शमनार्थ वैद्यकादि शास्त्रांचा अभ्यास चालू ठेवणें वगैरे गोष्टींस कोणत्याही पक्षाकडून हरकत होण्याचा संभव नाहीं; परंतु मनुष्यांच्या सुखांचा व सुधारणेचा वैषयिक सुखापाशीं व सुधारणेपाशींच शेवट होत नसल्यामुळें, त्यामध्यें वैमनस्यें उत्पन्न होण्यास कारणें होतात. इतर प्राण्यांच्या शरीररचनेपेक्षां मनुष्याची शरीररचना कांहीं निराळी असल्यामुळें किंवा झाल्यामुळे, आणि त्यांची मानसिक रचना तर इतरांच्या रचनेहून फारच निराळी असल्यामुळें, इतर प्राण्यांच्या एका वर्गांतील निरनिराळ्या व्यक्तीच्या आचरणांत जितका भेद दृष्टीस पडतो, त्याहून शेकडोपट अधिक भेद मनुष्यवर्गांतील निरनिराळ्या व्यक्तींत दृष्टीस पडतो. धर्मकल्पना तर प्राण्यांत असतील असें वाटत नाहीं, निदान त्या असल्या तरी आम्हास समजण्याचा संभव नाहीं. संपत्ति जमविण्याची कल्पना किंवा साधन इतर प्राण्यांपाशीं नाहीं; तसेंच नानाप्रकारच्या सृष्टपदार्थांपासून नानाप्रकारचीं सुखें करून घेण्याचे सामर्थ्य त्यांस नाहीं. मनुष्याच्या भाषेसारखी विस्तृत भाषा आणि भाषेहूनही कांहीं अंशीं विशेष उपयोगी अशी जी लेखनकला ती त्यांस अवगत व साध्य नाहीं. या व अशाच दुसऱ्या अनेक कारणांमुळें इतर प्राणिवर्गांतील व्यक्तींत मनुष्याइतका कलह दृष्टीस पडत नाहीं. मनुष्यांना आपल्या सुखांची वृद्धि करण्याचें व त्यांना चिरस्थाईपणा आणण्याचें सामर्थ्य आहे, व एकमेकांस साहाय्य करून सर्वांस सारख्या सुखोपभोग मिळेल अशी इच्छा धरून ती पुरविण्यासारखें वर्तन करण्याची अक्कल जरी त्यांना आहे, तरी याच गोष्टीमुळें इतर प्राण्यापेक्षां त्यांच्या समाजांत विशेष क्रूर लढाया, विशेष श्रीमंती, विशेष दारिद्र्य, विशेष नीतिमत्ता, विशेष नीतिपराङ्मुखता, विशेष ज्ञान, विशेष अज्ञान,विशेष प्रेम, विशेष- द्वेष- यांसारख्या समाजोपकारी आणि समाजापकारी वस्तूंचा आविर्भाव होतो. कोणता पाहिजे तो मनुष्यसमाज घ्या, त्यांत अशा प्रकारच्या गोष्टींनी नित्य कमी अधिक रण चाललें आहे, असें दिसून येईल. हें एका समाजांतील व्यक्तींविषयीं झालें. पण दोन अथवा अधिक समाजांचा संबंध घेतला तरी त्यांतही हाच प्रकार दिसून येतो. कोणत्याही दोन समाजांची स्थिति सर्वांशीं सारखी असत नाहीं. तसेंच, विषयसुखांच्या किंवा आधिभौतिक संपत्तीच्या संबंधाने तर एकाचा दुसऱ्याशी सतत कलह चाललेला असतो. त्यामुळें दोन असमान राष्ट्रांपैकी श्रेष्ठाचा कनिष्ठावर अंमल झाला, म्हणजे कनिष्ठास किती पीडा भोगावी लागेल, यांचे अनुमान करणें कठीण आहे. तात्पर्य, मनुष्यसमाजांतील व्यक्तींत व समाजासमाजांत तंटे होण्यास अनंत कारणें आहेत. तीं दूर होऊन ऐकमत्य व्हावें आणि सर्वांनी एकदिलानें वागावें हें फार इष्ट आहे. पण हा योग आणखी दहापांच

हजार वर्षांशिवाय येईल असें वाटत नाहीं! व कधी काळीं तो येणार असेल तर त्याला खऱ्या ज्ञानप्रसाराशिवाय दुसरे साधन नाहीं हे उघड आहे. यासाठीं ज्यांना आपल्या जातीचा; म्हणजे मनुष्यजातीचा उद्धार व्हावा, असें मनापासून वाटत असेल त्यांनीं तो उद्धार होण्यासाठी जीं साधनें आपणास योग्य वाटत असतील त्यांचा निर्भीडपणें व निर्भयपणें रात्रंदिवस खल केला पाहिजे, आणि होतां होईल तो मनास शुद्ध वाटलेल्या रीतीप्रमाणे वागवून दाखविले पाहिजे.

तेव्हां, आतां हे निर्विवाद झालें की, आणखी अनेक युगे मनुष्यांचीं भिन्न मतें आणि भिन्न आचार अस्तित्वांत राहून त्यांमध्ये अर्थातच कमीअधिक कलह चालणार. हा कलह कधीं मोठ्या निकरानें चालतो, व कधी अगदी मदपणानें चालतो. सध्यां धार्मिक विषयांच्या संबंधानें तो मोठ्या निकरानें चालविण्याचा प्रसंग या देशांत प्राप्त झाला आहे. मुसलमानांच्या धर्मवेडामुळे त्यांच्याशीं धर्मयुद्धे करावीं लागलीं. पाश्चिमात्य शिक्षणामुळें येथें नवीन धर्मकल्पनांचा, नवीन राज्यकल्पनांचा व नवीन सामाजिक कल्पनांचा प्रादुर्भाव झाला आहे. नवीन पिढ्यांपैकी कांहीं लोक या कल्पनांचे कट्टे भक्त बनले आहेत. ज्यांना पाश्चिमात्य शिक्षणाचा संपर्क लागलेला नाहीं, असे लोक एका बाजूस आणि वरील कट्टे भक्त दुसऱ्या बाजूस, असे दोन तट झाले आहेत. ज्यांच्यापासून लोकांस हे पाश्चिमात्य शिक्षण मिळत आहे, त्या राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या धर्माचरणांत व सामाजिक आचारांत सहसा हात घालावयाचा नाही, असा संकल्प केला आहे; कारण तसें करणें हितावह आहे, असे त्यांस आपल्या इतिहासावरून व दुसऱ्यांच्या इतिहासांवरून कळून आलें आहे. तथापि त्यांचा ओढा हिंदू सुधारकाकडे आहे, हें निर्विवाद आहे; कारण हे सुधारक त्यांचेकडून मिळत असलेल्या शिक्षणाचेच फळ आहेत. जुन्या लोकांपैकीं समंजस लोकांस पाश्चिमात्यांची राज्यपद्धति व राज्यविषयक विचार पसंत पडूं लागून नवीन सुशिक्षिताबरोबर ते ती पद्धति आणि ते विचार अंगीकारू लागले आहेत, हें राष्ट्रसभेस जी सामान्य अनुकूलता सर्वत्र दृष्टीस पडते तीवरून व्यक्त होत आहे. पण याच राष्ट्रसभेबरोबर किंवा वर्षभरानें तिच्या पाठीमागून अस्तित्वांत आलेली जी सामाजिक परिषद ती मात्र जुन्या लोकांस नको आहे! पण ती कशी टळणार? राष्ट्रसभा ज्या विद्येचे फळ आहे त्याच विद्येचे फळ सामाजिक परिषद आहे. ज्या ज्ञानामुळें तेलंग आणि रानडे यांस आमची राजकीय सुधारणा व्हावी असें वाटतें, त्याच ज्ञानामुळें त्यांस आमची सामाजिक सुधारणाही व्हावी, असें वाटतें; व ज्या कारणांमुळें त्यांचे राजकीय विचार आम्हांस मान्य होतात आणि ते व्यक्तिदृष्टीनें पूज्य वाटतात, त्याच कारणांमुळें त्यांचे सामाजिक विचारही आम्हांस मान्य होऊन व्यक्तिदृष्टीनें ते

आम्हांस पूज्य झाले पाहिजेत. पण एका प्रकारच्या गोष्टींत आम्ही त्यांचा उत्सव करीत असतों, पवाडें गातो, आणि त्यांस आपले पुढारी म्हणून त्यांचें अनुकरण करण्यास तयार होतों; व दुसऱ्या प्रकारच्या गोष्टींत त्यांची टवाळी करण्यास, त्यांना अद्वातद्वा दोष देण्यास, आणि हे आमचे पुढारी नव्हत म्हणून हिंदुस्थानसरकारकडे अर्ज करण्यास प्रवृत्त होतो. तेव्हां आमच्या असंबद्ध मूर्खपणास किंवा मूर्ख असंबद्धतेस काय म्हणावे कोण जाणें! धार्मिक व सामाजिक विषयांच्या संबंधाने आमच्या लोकांचें ज्ञान ''अकटो'' पर्यंत जाऊन धडकले होतें; राज्यविषयक गोष्टीत मात्र आम्हीं दीर्घश्रवे होतों. तेव्हां पाश्चात्यांपासून व पाश्चात्यविद्यांकित हिंदूंपासून राज्यविचारांपलीकडे आम्हांस कांहीएक शिकावयाचें नाहीं, असा जुन्या पद्धतीच्या सर्व लोकांचा समज दिसतो! पाश्चिमात्य शिक्षण मिळालेल्या नवीन पिढीतील ज्या लोकांनी धार्मिक किंवा सामाजिक विषयांचा विचार केलेला नाहीं, किंवा करून ज्यांस लोकसमुदायाची भीड तुटत नाहीं, असें लोकही रानडे- तेलंगप्रभृति नवीन विद्वानांचा सामाजिक गोष्टींच्या संबंधानें उपहास करण्यास तयार होतात. पण या जुन्या पद्धतीच्या सर्व बड्या लोकांनीं आणि आंधळेपणाने त्यांच्या पाठीमागें जाणाऱ्या असंख्य मूढांनीं असें समजू लागावें की, देशात ज्या विद्येचा पाय शिरला आहे ती आमच्या राज्यविषयक विचारांप्रमाणें आमच्या धार्मिक व सामाजिक विचारांतही प्रचंड क्रांती करणार आणि तद्नुसार आमचें आचरण बदलत जाणार. हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढे कांही खरोखर निर्दोष व हितावह आहे त्याला कशाचीही भीति नाहीं, मनु आणि पाराशर यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे. पण जें काहीं सदोष व अहितकारक आहे, निदान सध्यांचे स्थितीत ज्याच्या अपकरित्वाबद्दल संशय नाहीं, तें सारें पाश्चिमात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार! एखाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची कथा काय? आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेंकडों मनूंचे व सहस्रवधि पाराशरांचे आधार दाखविलेत, व त्यांचा प्रसार न व्हावा म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान, आणि उठावणीचे आरडे यांचे अडथळे आणून घातलेत तरी ज्याप्रमाणें पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगानें कड्यावरून पडूं लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्याच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळीच संभव नाहीं. उलट हेच त्यांत होरपळले जाण्याचा संभव आहे! ✱

होऊंच द्या तर दोन हात!

सध्यां जें तुंबळ वादसंगर चाललें आहे, त्यांत आमच्या प्रतिपक्ष्यांची विशेष भिस्त त्यांच्या हाती असलेल्या तीन तोफांवर आहे. या तीन तोफा आम्हीं सर केल्या तर त्यांना या रणांतून पळ काढून, प्राणत्राणाकरितां कोठे तरी दडून बसावें लागेल, किंवा आमच्या स्वाधीन होऊन तहाची मागणी घालावी लागेल. * * * सांप्रतकालीं हिंदुस्थानसरकारानें रा. रा. दा. अ. खरे आणि इतर अनेक समजंस लोक म्हणतात त्याप्रमाणे, अप्राप्ततारुण्य भारतीय आर्यकन्यकांवर विषयलंपट, विचारशून्य, व अधीर नरपशूंकडून जो जुलूम कित्येक शतकें होत आहे, तो थोडाबहुत तरी कमी व्हावा, म्हणून केवळ परोकारबुद्धीने कृपावंत होऊन, हिंदुस्थानच्या फौजदारी कायद्यांतील एका कलमांत जो लहानसा फेरफार करण्याचा विचार चालविला आहे, तो फेरफार ताबडतोब अमलांत येण्यासाठीं ज्या पत्रांनीं व ज्या विद्वानांनीं खऱ्या धर्माचा, यथार्थ देशाभिमानाचा, व एकोणिसाव्या शतकांतील सुशिक्षित मनुष्यपणास अत्यंत उचित अशा भूतदयेचा पक्ष घेऊन प्रामाणिकपणानें व आस्थेनें आपणांकडून होईल तेवढी खटपट करावयाला पाहिजे होती, तीं पत्रें व ते विद्वान श्रुतिस्मृतींचे भलभलते अर्थ करीत आहेत. जीं सामाजिक व राजकीय विचारतत्वें आमच्या मागासलेल्या, अज्ञानमग्न, व स्वावलंबनहीन देशास प्रस्तुतकालीं लागू केलीं असतां, अत्यंत विघातक होणार आहेत; तींच लावणे अवश्य आहे अशा विपरीत प्रतिपादनानें असंख्य अजाण लोकांस अपायकारक स्वातंत्र्याचें आमिष दाखवून, व मिथ्या धर्माभिमानाचे मादक चषक त्यांच्यापुढें धरून, त्यांच्या माथ्यांत मतिभ्रम उत्पन्न करीत आहेत. हिंदुस्थानसरकारनें हातांत घेतलेल्या बिलाविरुद्ध त्यांना होईल तितकें प्रतिकूल करण्याचा, तें बिल बहुतेक लोकांस पसंत नाहीं, असा प्रचंड टाहो त्यांचेकडून फोडविण्याचा, त्या बिलामुळें १८५७ च्या जाहीरनाम्यास न जुमानतां हिंदुधर्मावर लोकांच्या मर्जीविरुद्ध सरकारने हात घातला आहे असें सिद्ध करून दाखविण्यासाठीं, धर्मशास्त्राची हवी तशी संगति लावून देण्याचा व कांहीं कारण नसतां उदार, सदय व लोककल्याणेच्छू सरकाराविषयीं राजनिष्ठ प्रजेचीं मतें कलुषित करण्याचा अप्रशस्त प्रयत्न करीत आहेत; ही गोष्ट प्रो. सेल्बीसारख्या

त्रयस्थ परक्या गृहस्थास किंवा आपली दु:खस्थिति दूर होण्याकरिता कळवळ्यानें परिश्रम करीत असलेल्या एतद्देशीय **सुधारकांस** कितीही शोचनीय, कितीही निंद्य, व कितीही लज्जास्पद वाटली तरी त्यांना ती प्रशंसनीय वाटली पाहिजे, हें उघड आहे!

संमतीच्या बिलावर ज्या आक्षेपरूप तीन तोफा चालू केल्या आहेत त्यांपैकी फक्त एकीचा मारा उघड आहे व दोहोंचा आडून आहे. त्यांच्या गोलंदाजास असे वाटत आहे कीं, यांच्या माऱ्यानें सुधारकचमूची दाणादाण होऊन जाऊन त्यांस "**त्राहि त्राहि**" असें होईल. पण वास्तविक पहातां या तिघींचा मारा अंगावर घेणें, अथवा नित्यापेक्षा किंचित् जलदीचीं दोन पावलें टाकून त्या सर करणें, हें अगदी स्वल्प काम आहे. आमच्यापैकीं दोघांचौघांनी फक्त हातपिस्तुलांचे पांच चार बार काढले नाहींत तों आमच्या प्रतिपक्ष्यांची कोण गाळण होऊन गेली आहे ती पहा! जर **मृत्युवदना, यमप्रिया, विश्वघ्ना,** अशा तीन पराक्रमी शक्तींचे आपणांस साहाय्य आहे असे त्यांस वाटत असेल, तर त्यांनीं एवढ्यांतच इतकें भेदरून कां जावें? "अरे उठा; ही का झोंप घेण्याची वेळ? ज्याप्रमाणें राहू चंद्रास ग्रासतो त्याप्रमाणें शत्रूने आपल्या धर्मचंद्रास अगदीं ग्रासून टाकलें आहे; करतां जो कोणी खरा द्विजकुलोद्भव म्हणजे पक्का शंभर नंबरी ब्राह्मण असेल, त्यानें आपल्या विचाराकडे, कारुण्याकडे, किंवा देशाच्या भावी नुकसानीकडे बिलकुल दृष्टि न देतां, पूर्वीच्या मुसलमानांचें वंद्य व अनुकरणीय उदाहरण ध्यानांत ठेऊन सरकारास वेळेवर अशी इशारत द्यावी कीं, आमच्या परमपूज्य धर्मकर्त्यांनी आमच्या अल्पवयस्क व कामनाभिज्ञ कन्यकांची हवी तसली छलना व विटंबना करण्याचा आम्हांस जो अद्वितीय हक्क दिला आहे, व ज्याचा उपभोग आम्ही कमींत कमी आज दोन अडीच हजार वर्षें घेत आहों, तो काढून घेण्याचें धाष्टर्य तुम्ही करीत आहां. पण सांभाळा; जर असल्या साहसानें **सत्तावन** सालचा दुर्धर प्रसंग तुम्हांवर फिरून गुदरला, तर त्याबद्दल आम्ही मग बिलकुल जबाबदार होणार नाहीं" - इत्यादि प्रकारचा जो आकांत या भेकड लोकांनीं चालविला आहे, व ठिकठिकाणीं वेड्या पिरांचे थवे गोळा करून हिंदुस्थानसरकाराकडे जे खलिते हे पाठवीत आहेत, त्यांमुळे यांनीं घेतलेल्या धास्तीबद्दल यांची कींव करावी, किंवा यांच्या सांद्र मौर्ख्याबद्दल हांसत रहावें, हें आम्हांस समजत नाहीं! असला दिसण्यांत भयंकर खटाटोप केल्यानें, हिंदुस्थानसरकार किंवा खरे सुधारक, आपल्या कर्तव्यापासून अणुमात्र ढळतील, असें यांनीं स्वप्नांत सुद्धां आणूं नये. या हिंदुस्थानदेशाच्या क्षितिजावर ज्ञानार्काचा स्पष्ट उदय झाला आहे, तेव्हां अंधकारप्रिय वाघुळांनीं केवढाही किलकिलाट केला, तरी तो अर्क क्षणोक्षणीं वर

येत जाऊन व आपल्या पुण्य रश्मींनी येथील अज्ञानतमाचा थोड्या वर्षांत ध्वंस करून सर्व ठिकाणी न्याय व दया वृद्धीस मदत करणार, यांत शंका नाहीं. पृथ्वीवरील इतर देशांत अशा प्रकारचें स्थित्यंतर एकसारखें होत आहे; ज्यांनीं या अपरिहार्य व अनिवार्य सृष्टिनियमाच्या उलट जाण्याचा प्रयत्न केला आहे ते नष्ट झाले आहेत; व जर हिंदु लोक अविचारी, मूर्ख, निर्दय, दुराग्रही व दुराभिमानी पुढाऱ्यांचें अंध गुलाम होऊन तसें करतील, तर त्यांचीही तीच दशा होईल हें त्यांनी पक्कें ध्यानांत ठेवावें.

आजमितीस संमतीच्या बिलाविरुद्ध येथील अज्ञान लोक आणि एका दृष्टीनें यांहूनही अधिक अज्ञान असे त्यांचे म्होरके जसल्या कोट्या लढवीत आहेत तसल्याच कोट्या **बेंटिकसाहेबांनीं** सती जाण्याचा अमानुष प्रघात बंद केला, त्या वेळेसही करण्यांत आल्या होत्या; व पुन: ज्या ज्या प्रसंगीं अशा प्रकारची फार जुनी दुष्ट चाल कायद्यानें बंद करण्याचा प्रसंग येईल त्या वेळेसही धर्माच्या नांवावर तिचें मंडन करणारे, आणि सामाजिक व धार्मिक गोष्टींत लोकांची सुधारणा करणें हें कोणत्याही सरकारचें काम नव्हे, विशेषत; इंग्लिश सरकारसारख्या परधर्मी सरकारास हिंदू लोकांसारख्या पराभूत लोकांनीं आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवहारांत हात घालूं दिल्यास त्यांचें अमर्याद नुकसान होणार आहे, अशा थापा देऊन मूढ लोकांच्या मनांत सरकाराविषयीं व त्यांना नि:संशय अत्यंत हितावह अशा कायद्याविषयीं त्यांच्या मनांत द्वेषभाव उत्पन्न करणारें शेंकडो लोक निघतील. पण ज्या सरकारास भूतदयेच्या तंत्रानें चालावयाचें असेल त्यानें असल्या हेकड व अज्ञान लोकांच्या बरळण्याकडे बिलकूल लक्ष देऊं नये. असले लोक कांही वेळ ओरड करून स्वस्थ बसतात; इतकेंच नाहीं तर थोड्याच वर्षांत त्यांचा मूर्खपणाही त्यांच्या प्रत्ययास येऊं लागतो. * * नवऱ्याच्या प्रेताबरोबर त्याच्या जिवंत बायकोस जाळणें किंवा जळूं देणें हे आज आम्हांस जितके भयंकर वाटत आहे, तितकेंच तीस-पसतीस वर्षांनी, ऋतु प्राप्त झाला आहे येवढ्याच कारणासाठी, बारा वर्षांच्या आंतील मुलीकडे पाहिजे त्या वयाच्या तिच्या नवऱ्यास शास्त्रप्रणीत गर्भाधान करण्यासाठी जाऊं देऊन, तिचा हवा तसला छळ करण्याचा मार्ग खुला ठेवणें व तो केल्याबद्दल त्याला कडक शिक्षा देतां न येणें हें त्यांस भयंकर वाटणार आहे. दिवसेंदिवस मनुष्यांची सदयता वाढत जात नसती, व कोणी कोणाचें मन अथवा शरीर विनाकारण दुखविणें अन्याय्य आहे, अशी लोकांची खात्री न होती, तर जुन्या **ग्रीस** देशांतील वक्त्यांप्रमाणें किंवा लेखकाप्रमाणें आतांच्या वक्त्यांनी व लेखकांनीं पाहिजे त्याविरुद्ध पाहिजे तें लिहिणें व बोलणें अलीकडील कायद्यांत दंडनीय मानिलें गेलें नसतें, व अमुकानें

त्यांचें उल्लंघन केलें आहे असा न्यायाधिशानें किंवा पंचांनीं आपला अभिप्राय दिला तरी तशा व्यक्तीस डोंगरीची हवा खाली लागली नसती! पण यावर (हे म्होरके) कदाचित असे म्हणतील कीं, जी गोष्ट बहुतास पसंत वाटेल तिची बाकीच्यांवर सक्ती करण्यांस कांही हरकत नाही; बहुतेकांची इच्छा तोच न्याय, हेंच कायद्याचें मुख्य तत्त्व आहे! असें जर (बहुजन समाजाच्या या वकिलांचे) उत्तर असेल, तर त्याचा अर्थ इतकाच समजला पाहिजे की, कोणत्याही गोष्टीचें चांगलेवाईटपण ठरविण्यास बहुमताशिवाय दुसरें साधनच नाहीं; व ज्याअर्थी सामर्थ्यही या बहुमताकडेच असण्याचा संभव आहे त्याअर्थी लघुमताकडील लोकांनी बहुमताकडील लोकांचें म्हणणें निमूटपणें ऐकलें पाहिजे! तात्पर्य, 'जिकडे बल तिकडे न्याय' हाच टिळकांच्या प्रस्तुत वकिलीचा इत्यर्थ असेल, व त्याच्या जोरावर ते सांप्रत प्रकरणांत लोकांचा पक्ष घेऊन भांडत असतील, तर ते मोठा प्रमाद करीत आहेत, असं म्हणणे भाग आहे; कारण, हिंदुस्थानच्या पंचवीस कोटी क्षुद्र जंतूंकडे खरोखरीच बलाधिक्य असतें तर लाख सव्वालाख टोपीवाल्यांस हिंदुस्थानचें राज्य एक दिवस देखील चालवितां आलें नसतें! निदान 'जिकडे बळ तिकडे न्याय' हे तत्त्व सर्व बाबतींत ब्रिटिश सरकार तरी मान्य करण्यास व लागू करण्यास तयार नाहीं, म्हणूनच या संमतीच्या बिलाविरुद्ध इतक्या बाष्फळपणाची बडबड करण्याची सवलत आपणास मिळत आहे, हें (या वकिलांच्या) अनेक मूढ पक्षकारांस न समजलें तरी खुद्द त्यांस समजलें पाहिजे! तात्पर्य, आजपर्यंत सरकारानें संमतीचा कायदा केला नाहीं, तो लोकांच्या भीतीनें केला नाहीं, असें कोणालाही वाटण्याची गरज नाहीं. सरकारास असें वाटलें होते कीं, पांच पचवीस वर्षे शिक्षण दिल्यानें, असल्या अनाचारांचें अमानुषत्व लोकांच्या नजरेस येऊन, ते अनाचार ते आपण होऊन बंद करतील; निदान सरकारानें ते बंद करण्याचा प्रयत्न केल्यास सुशिक्षित लोकांकडून त्या कामीं त्यास मदत मिळेल; पण चांगले सुशिक्षित लोकच जर असले भयंकर प्रचार एकदम नाहींसे करण्याचे कामी सरकारास मदत देणें तें एकीकडे गुंडाळून ठेऊन, त्यांत त्यास विरोध करण्यासाठीं असजंमस लोकांचें वकीलपत्र घेतील, आणि असल्या सत्कृत्याविरुद्ध व तें करण्यास निघालेल्या सरकाराविरुद्ध त्यांचीं मनें क्षोभविण्यास प्रवृत्त होतील, तर असल्या सुशिक्षितांची सरकारानें एक क्षणभर तरी मुर्वत कां ठेवावीस हें आम्हांस समजत नाहीं! आम्हांस तर असें वाटलें होतें कीं, या मर्यादित बिलापासून जरी व्हावा तितका फायदा होण्याचा संभव नाहीं; तरी जर सरकारानें तें आपण होऊन लोकांपुढें आणिलें, तर हिमालयाच्या पायथ्यापासून कन्याकुमारीपर्यंत ज्याला ज्याला म्हणून प्रत्यक्ष रीतीनें किंवा परंपरेनें पाश्चिमात्य

उदार शिक्षणाचा गंध लागला असेल ती असल्या बिलास विरोध करणार नाहीं इतकेंच नाहीं, तर सुज्ञ व समंजस असे आपले देशबांधव यांच्यामध्यें पडून, "या बिलांतील प्रतिबंधांस धर्माची प्रतिकूलता नाहीं, या प्रतिबंधामुळें मुलांचे व मुलींचे व त्यांच्या द्वारें हिंदुस्थांनातील भावी संततीचे मोठें कल्याण होणार आहे; आणि आपल्या प्रियदेशाच्या मुखश्रीवरील एक मोठा कलंक नाहींसा होणार आहे. या बिलास विरोध करणें म्हणजे खऱ्या धर्माचें उल्लंघन करून "आपल्या अंत:करणांतील पशुता व्यक्त करणें होय"- असा उपदेश तो त्यांस करीत सुटेल, व "देशांतील बहुतेक लोकांच्या पूर्ण संमतीनें हा कायदा आम्हांस पसार करतां आला, यावरून आम्ही त्यांस जें शिक्षण देणे आहों, त्याचे त्यांच्या बुद्धीवर व अंत:करणावर उत्तम परिणाम होऊं लागले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं" असें सर्टिफिकिट हिंदुस्थानसरकारकडून मिळविण्यास सहायभूत होईल! पण ही अटकळ करण्यांत आम्ही अगदीं ठकलों हें आतां आम्ही कबूल करतों, आणि सर रोमेशचंद्रांसारखे पुरुष बंगाल इलाख्यांत, सर टी. माधवरावांसारखें मद्रास इलाख्यांत,आणि रा. टिळकांसारखे या इल्याख्यांत, लोकांच्या नांवानें संमतीच्या बिलाचा पाडाव करण्यास उभे राहिले आहेत, हें पाहून खेदानें व लज्जेनें आपली मान खालीं घालतों!!

येथपर्यंत सारें ठीक आहे. पण **सुधारकबोवा**, वर म्हटल्याप्रमाणें आपली मान आपल्याच गुडघ्यात अडकवून देऊन, आपण मुळूमुळू करीत बसणार, आणि आपल्या शत्रूप्रमाणेंच आपल्या मनावरही पाश्चिमात्य उदार शिक्षणाचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं, असे जगास जाहीर करणार, कीं ज्या बऱ्यावाईट कोट्यांनीं तुमचे प्रतिपक्षी लोकांची मनें बिघडवीत आहेत व भलतीकडें नेत आहेत, त्यांचें यथाशक्ति व यथावकाश खंडन करणार? कोण स्वस्थ बसणार? **सुधारक** अं! टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल, व तीं वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैणकर्म **सुधारकाला** स्पर्श करूं शकणार नाहीं! धर्मसंबंधाने या पत्रांत आलेल्या मजकुरावर **केसरीच्या** गेल्या अंकांत जी चर्पटपंजरी केली आहे, तीवर सशास्त्र उत्तर पुढल्या खेपेस देऊं. येथें या संमतीच्या बिलावर जे आडून दोन गोळे येत असतात, त्यांचा थोडासा समाचार घेतों; आणि हा बराच वेळ चाललेला ससत्त्व काथ्याकूट पुरा करतों!

एकानें दुसऱ्याचें काम सतत केलें असतां दुसऱ्याला तें करितां येईनासें होऊन तो अगदी पंगू होतो, आणि मग पहिल्यास त्यावर हवा तसा जुलूम करतां येतो; सबब सरकारानें होतां होईल तों सर्व गोष्टींत, विशेषत: सामाजिक व धार्मिक गोष्टींत हात घालूं नये, त्या लोकांच्या लोकांस करूं द्याव्या, असें **हरबर्ट स्पेन्सर**

म्हणतो. नवऱ्यानें आपल्या बायकोकडे केव्हां जावें; हें ठरविणें समाजाच्या किंवा धर्माच्या अखत्यारांतलें काम आहे तेव्हां सरकारनें त्यांत पडणें अप्रशस्त आहे, हें सिद्ध झालें! **स्कोबल** साहेब, बोला आतां; या असूचिभेद्य कोटिक्रमावर तुम्हांस काय बोलावयाचें असेल तें! जर कांहीं बोलतां येत नसेल आणि बोलतां येणारच नाहीं हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे, तर घ्या आपलें बिल मुकाट्यानें परत, आणि म्हणा माझी चुकी झाली! पण प्रतिपक्ष्यांच्या या एकदेशीय चोरट्या कोटिक्रमावर उत्तर देण्यास **स्कोबलसाहेब** नको आहेत, ती कामगिरी या आपल्या गरीब खरडेघाशासही अगदीं निरुत्तर करण्याइतक्या सफाईनें करतां येण्यासारखी आहे! ''अमुक यज्ञ करून ब्राह्मणांनीं दारू प्यावी, मांस खावें, किंवा असलेंच दुसरें एखादें कर्म करावें'' अशी स्पष्ट शास्त्राज्ञा असून ती लोकांपुढें मांडतांना जर तिचा एक भाग आणि तो 'अमुक यज्ञ करून' हा मुख्य भाग तुम्ही आपल्या डोक्यांत किंवा पोथींत चुकीनें किंवा बुद्ध्या राहूं द्याल, आणि ''ब्राह्मणांनीं मांस खावें व दारू प्यावी,'' असें लोकांस सांगत फिराल, तर तुमच्या वाचनाविषयीं, बुद्धिविषयीं, विचारसरणीविषयीं व प्रामाणिकपणाविषयी जें त्यांस वाटेल तेंच तुम्ही **स्पेन्सरचें** वरील विचारतत्त्व आमच्या समाजास लाऊं पहातां तेव्हा तुम्हांविषयीं आम्हांस वाटतें! तुम्हीं तर स्पेन्सरच्या ग्रंथांचीं पारायणें केलीं आहेत, तेव्हां त्यानें ''राजे निरर्थक आहेत; लोकसत्तात्मक राज्यपद्धतीसारखी राज्यपद्धति नाहीं; लोकसत्तात्मक राज्यांतील लोकनियुक्त प्रतिनिधिसभेच्या अध्यक्षाकडेही म्हणण्यासारखे अधिकार असूं नयेत; लोकांस शिक्षण देणें हें सरकारचें काम; व्यापार, कलाकौशल्य, आगगाड्या, सर्व संग्रहालयें, पुस्तकालयें, दवाखाने वगैरे गोष्टींकडे सरकारानें आपल्या मनाप्रमाणें कराचा पैसा लावणें म्हणजे लोकांच्या पैशाचा अन्यायानें दुरुपयोग करणें होय;'' -'अशीं जीं विधानें केलीं आहेत तीं आपणांस अवगत नसतील असें मानणें अशक्य आहे. तर मग त्यांवर आपलें काय म्हणणें आहे; व वरील कामांपैकी कोणतीं कामें आपण हिंदुस्थानसरकाराकडून काढून घेण्यास तयार आहां, तें कृपा करून आम्हांस सांगा; आणि इंग्लिश लोकांस या देशांतून पिटाळून लावण्यासाठीं किंवा त्यांच्या डोक्यास आज कित्येक शतकें बेजार करून टाकीत असलेला त्यांच्या राजघराण्यांच्या खर्चाचा बोजा काढून टाकण्याकरितां; काय उपाय चालविले आहेत तें येथील व इंग्लंडांतील लोकांस विदित करा, म्हणजे त्यांवर तुमचे मोठे उपकार होतील! लोकांस हितावह कोणती गोष्ट आहे, याचा निर्णय झाल्यावर ती करावी कोणीं अशी पंचाईत पडते. जर आपण होऊन लोक ती करण्यास धजत नसतील तर ती सरकारनें त्यांस करावयास लावण्यांत काय जुलूम आहे कोण जाणें! लोक करीत असतील तर

सरकाराने ती न करावी, हें ठीक आहे. तुम्ही आपण होऊन सतीची चाल बंद करण्याचा, बालहत्येचा भयंकर प्रघात मोडण्याचा, व भर्तृरूपी कामी राक्षसाच्या तावडीतून मुग्ध कुमारिकांस सोडविण्याचा प्रयत्न केला असता तर सरकार तुमच्या वाटेस कशाला गेले असतें बरें? लोक मट्ठ असतात तोपर्यंतच सरकारास सक्ती करतां येते; त्यांच्या अंगी तरतरी आली म्हणजे त्यास स्वस्थ बसावें लागतें. लोक आणि सरकार यांचा अशा प्रकारचा अनादिसिद्ध संबंध आहे. तेव्हां सरकारने कोणत्याही कामांत, विशेषत: धार्मिक व सामाजिक कामांत, पडूं नये अशी तुमची इच्छा असेल तर देशोन्नतीच्या ज्या गोष्टींविषयीं ज्ञात्यांस शंका राहिलेली नाही, अशा गोष्टी आपण होऊन करूं लागा, म्हणजे **स्कोबलसाहेब** आपले चबूगबाळें आटोपून आपल्या साथ्यासह चालते होतील! पण तुम्ही आपले जडभरतासारखे पडून रहाल, तर मात्र सरकार आणि सुधारक कायद्याच्या अटकेत तुम्हास दिल्याशिवाय कधीही सोडणार नाहींत! या आमच्या म्हणण्यालाही स्पेन्सराचा आधार देतां येईल अशी आमची खातरी आहे! तेव्हां तुमचा स्पेन्सर खरा कीं आमचा स्पेन्सर खरा! आमच्या मतें दोघेही खरे आहेत. भेद इतकाच कीं, सध्या या देशांत **आमच्या स्पेन्सरच्या** धोरणानें चालले पाहिजे, व **तुमचा स्पेन्सर** भावी सत्ययुगासाठी ''धवलगिरीच्या'' हिमाच्छादित शिखरावर बर्फांत पुरून ठेविला पाहिजे.

आतां, ब्रिटिश सरकारला आपल्या धर्मांत हात घालूं देणें बरोबर नाही, या विधानांत किती जीव आहे तें पाहूं. धर्मांत हात घालणे म्हणजे त्यांत फेरफार करणें. लोकांच्या अन्य विचारांत फेरफार होते गेले म्हणजे त्यांच्या धर्मविचारांतही फेरफार होत जातात, हें कोणत्याही धर्माच्या इतिहासावरून सिद्ध करून देतां येणार आहे. पाश्चिमात्य शिक्षणामुळें व कारणामुळे आम्हांसही आमच्या धर्मांत थोडाबहुत फेरफार करावा, असें वाटूं लागलें आहे. तेव्हां हा आतां करावयाचा कोणीं? सारे शंकराचार्य नि:सत्त्व होऊन बसले आहेत; सरकार परधर्मीचे आहे; लोकांस आपण होऊन चळवळ करून नव्या स्मृति घालण्याचें सामर्थ्य नाहीं! तेव्हां सध्यांच्या स्थितीस अनुकूल असे फेरफार कोण करणार? प्रतिपक्षी म्हणतात कीं ते लोकांनीं करावें; आम्हीं म्हणतों कीं मोठमोठे फेरफार सरकारच्या साहाय्यावांचून व्हावयाचेच नाहींत; निदान आम्हीं जसल्या स्थितींत आहों, तसल्या स्थितींत तरी व्हावयाचे नाहींत. धर्मासंबंधीं फेरफारांचा दुसऱ्या एका दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, त्यांपैकी कांहीं लोकांच्या इच्छेनें, कांही त्यांच्या इच्छेविरुद्ध, व कांहीं सहजगत्या होत असतात. 'गाई माराव्या किंवा न माराव्या', 'कलालांचीं दुकानें घालावीं किंवा न घालावीं,' 'यात्रांवर किंवा

देवस्थानांवर कर बसवावे किंवा नाही' - या व अशा प्रकारच्या इतर गोष्टींविषयी सरकारनें आमचें मत विचारलें नाहीं, व आम्हीं कधीं दिले नाहीं. घरांतल्या घरांत थोडीबहुत दुरदुर केली असेल, पण उघडपणे असल्या गोष्टींत सरकारास विरोध करण्याचे धैर्य आम्ही कधींही दाखविलें नाहीं. या गोष्टी सरकारच्या फायद्याच्या होत्या, आणि त्याने त्यांविषयीं आमचें काय म्हणणें आहे,हें पहात न बसतां, त्या बेलाशक करून टाकल्या! यावरून असें दिसते कीं आमच्या तोंडात मारणारा जबरदस्त इसम आम्हांला भेटला कीं, आम्हीं आपला गाल निमूटपणें त्याच्यापुढें करतो! पण जर तोच इसम केवळ आमच्या कल्याणाकरितां अमुक गोष्ट करूं कीं नको, असें आम्हास विचारील तर आम्हीं आपल्या अधिकाराचा तोरा मिरविल्याशिवाय कधींही रहावयाचे नाही! भेकड प्रतिष्ठाखोर हिंदू लोकांनों, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनी ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठीं कोंकणपट्टीत तुमचे अनन्वित हाल केले त्या वेळेस तुमच्या धर्माभिमान कोठें गेला होता? विषयलंपट नि:शक्त वाचाळ बाबूंनो, जेव्हां महंमदीयांनीं हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत साऱ्या हिंदू लोकांस आपल्या धर्मवेडानें जर्जर करून सोडलें, व तुम्हां हिंदूंच्या मानांवर असिधारा ठेवून, तुम्हांकडून तुमच्या शेंड्या काढविल्या आणि तुम्हांस गोमास चारिले, तेव्हा धर्मरक्षणासाठीं आताप्रमाणें तुम्ही नुसता ओरडा तरी करावयाचा होता! त्या मुसलमानांच्या भीतीनें अजून तुम्हीं आपल्या बायका कुलपांत घालून ठेवल्या आहेत, हें तुम्हांस कळत नाहीं काय? आणि आतां दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकारबुद्धीनें आपल्या लहान पोरींवर जुलूम करूं नका, येवढें अदबीनें सांगत असतां त्यावर तुम्ही आपलें धर्मास्त्र सोडतां, आणि कामाच्या झपाट्यांत निराश्रित कुमारिकांचीं अंगे विदारण्याचा हक्क आमच्या धर्मानें आम्हांस दिला आहे, व जर सरकार तो घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला आमच्या असंतोषाचें फळ भोगावें लागणार, अशी धमकी घालतां! धिक्कार असो तुम्हांला, तुमच्या धर्माला, आणि तुमच्या हक्काला!!! जर तुम्हांस तुमच्या धर्माची इतकी प्रतिष्ठा वाटत आहे, तर पूर्वी ज्यांनीं ज्यांनीं त्यांचें उल्लंघन केलें त्यांचें तुम्ही शासन कां केलें नाहींत! रजपुतांनी आपल्या बायका मुसलमानांच्या घरांत कशासाठीं नेऊन घातल्या? थेट शनवारच्या वाड्यांत थोरल्या बाजीरावानें एका यवनीस आणून तिच्याशीं राजरोस व्यवहार ठेवला तेव्हां त्याला वाळींत का टाकलें नाहींत? शिवाजीनें प्रथम प्रथम केवळ द्रव्यलोभानें व अधिकारलोभानें ब्राह्मणांचे व इतर जातींचे जे खून केले यांबद्दल त्यास काय प्रायश्चित्त दिलेंत? पण तुमच्यासारख्या शेंदाडशिपायांवर असले शब्दप्रहार तरी करण्यांत काय अर्थ आहे?

हेही असो; ही तुमच्या पौरुषाभावाची कहाणी झाली! पण अलीकडे जे तुम्ही सहजगत्या किंवा जाणूबुजून धर्माच्या उलट जातां, ते काय म्हणून? पोटांत कांटे भरतां येत नाहींत म्हणून महार, धेड व मुसलमान यांना चाकरींत ठेवणाऱ्या साहेब लोकांचे बूट उचलण्यास नेहमीं एका पायावर तुम्ही उभें असतां, याबद्दल तुम्हांला जरी क्षमा केली, तरी जेव्हां तुम्ही बाजारांतून, आगगाड्यांतून, आगबोटींतून, हपिसांतून पाहिजे त्याशी आंग घांसून घरीं परत येतां, तेव्हां सचैल स्नान न करण्यामुळें तुमच्या हातून धर्माचें जें उल्लंघन होते त्याबद्दल तुम्हांस कां क्षमा करावी? पण हेंही असो; नित्याच्या व्यवहाराच्या अपरिहार्यत्वामुळें अशा प्रकारच्या गोष्टींबद्दल आम्ही तुम्हांस फारसा दोष देत नाहीं. पण येवढ्याने तुमची कर्मकथा संपली असें कोण समजेल? अलीकडे कांही कारण नसतां, तुम्ही आपण होऊन आपल्या धर्मरूप जिवाच्या कलिजाचे जे प्रतिदिवशीं असंख्य खून पाडीत असतां ते कशासाठीं? कलालांची दुकानें सरकार काढते म्हणून त्याच्या नावानें खडे फोडतां! पण झक् मारायाला तुम्ही त्या दुकानांकडे जातां कां, आणि आपल्या धर्माची, प्रकृतींची, चित्ताची, व अब्रूची खराबी करून घेतां कां? दारू पिणारांस, मांस खाणारांस, पार्शी, मुसलमान किंवा खिस्ती यांचे घरीं अन्नोदकसेवन करणारांस, प्रसिद्धपणे घरांत अंगवस्त्रें बाळगणारांस व गटारांत पडणारांस, आणि उघडपणे हॉटेलांत पुख्खे झोडणारांस अपंक्त कां करीत नाहीं? पण तुमची अशी समजूत झाली आहे कीं, कोणी प्रतिवर्षी पळीभर पंचगव्य आनंदानें घेईल, अंडी, ब्रँड्री व गरज पडल्यास गोमांसाचा अर्क देखील केवळ औषधासाठीं घेतों म्हणून म्हणेल; वर्षांतून एकदां किंवा दोनदा दहापांच भटांस पुडीला बोलावून चांगलीशी दक्षणा देण्यास तयार असेल; विशिष्ट आप्त वारल्यास किंवा कोणत्याही कारणाने एखाद्या मोठ्या क्षेत्री गेल्यास क्षौर करून घेण्यास नाखुष नसेल; साराश, जो धर्मांचे ढोंग करण्यास आणि भिक्षुकाची तोंडे दाबण्यास कबूल असेल त्याने हवे ते अनाचार खुशाल करावे!त्याला तुम्ही धर्मोल्लंघनाबद्दल दोष देणार नाही, इतकेच नाहीं; तर असल्या भोंदूस धर्मरक्षक समजून त्याच्या पायावर लोटांगणें घालाल, त्याचे स्तुतिपाठ व पवाडे सकाळसंध्याकाळ गाल, छबिना काढून त्याची मिरवणूक कराल; व त्याचा स्वार्थ बाहेर न पडेल तर धर्माच्या नांवावर त्याला पाहिजे तें करूं द्याल इतकेंच नाहीं, तर आंधळ्याप्रमाणें त्याचा हात धरून तो नेईल तिकडे जाण्यास किंवा खाड्यांत लोटून घेण्यासही राजी व्हाल! धिक्कार असो अशा प्रकारच्या तुमच्या व तुमच्या वाटाड्याच्या धर्मनिष्ठेला आणि पापभीरुत्वाला! तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा! तुमचा धर्माभिमान त्याहून शतपट खोटा! अशा प्रकारच्या धर्महीन कपटपटू लोकांनी धर्माचा बागुलबोवा करून

संमतीच्या बिलासारख्या बिलास विरोध करावा, याहून अधिक असंबद्ध, अधिक उपहासास्पद, अधिक लज्जास्पद, व विशेष खेदजनक काय आहे, हें आम्हांस कळत नाहीं!

*

शहाण्यांचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार

एखाद्या राजाच्या किंवा त्यासारख्याच दुसऱ्या एखाद्या मोठ्या पुरुषाच्या प्रेताचें दहन करतांना किंवा त्याला समाधि देतांना शेंदोनशे बकरीं, बैल, अथवा घोडे, पांचपन्नास दासी, लग्नाच्या बायका, किंवा ठेवलेल्या वेश्या, दहापांच स्नेही, प्रधान किंवा अगदीं जवळचें आप्त— अशांचे तुकडे करून ते त्यांच्या स्वामीच्या शवाबरोबर जाळले किंवा पुरले तर तशा कृत्याला; वाचकहो, तुम्ही काय म्हणाल? अर्थात् रानटी किंवा क्रूर म्हणाल! कोणत्याही ठिकाणीं असा प्रघात असेल तर त्या ठिकाणचे लोक अत्यंत निष्ठुर, अत्यंत अविचारी, व अत्यंत अज्ञान असें कोणाच्यानेंही म्हटल्यावाचून राहवणार नाहीं. पण हा 'कोण' अलीकडच्या शतकांतील एखाद्या सुधारलेल्या देशांतला इसमच असूं शकणार आहे. तीनचार हजार वर्षांपूर्वीचा एखादा आर्य किंवा हिंदुस्थानाचा आद्य रहिवासी अशा आचारास क्रूर म्हणतो किंवा नाहीं, याचा संशय आहे. या घटकेस या पृथ्वीवर असे प्रदेश आहेत कीं, जेथें असले आचार अत्यंत प्रशंसनीय, धर्मसंमत व अवश्य मानले जात असून, प्रतिदिवशीं ते घडून येत आहेत. अशा देशांत जेव्हां एखादा राजा, सेनापति अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा प्रमुख मनुष्य मरतो, तेव्हां त्याच्या कुटुंबांतले व मित्रमंडळांतले कांहीं इसम मोठ्या खुषीनें त्याच्याबरोबर सती जाण्यास तयार होतात; व प्रजा, नोकर, गुलाम वगैरे त्याच्या ताब्यातील कित्येक लोक आणि पशु त्याचेबरोबर जुलुमानें घालवितात. जे इसम अशा आपखुषीनें मरण्यास तयार होतात; त्यांची अशी कल्पना असते कीं, ज्या धन्याची आपण इहलोकीं प्रेमपूर्वक सेवा केली, ज्या आप्ताचें सहवाससुख यथेच्छ भोगिलें, व ज्या मित्रास मोठमोठ्या लढायांत साहाय्य देऊन त्याची मर्जी सुप्रसन्न करून घेतली, त्याच्याशीं ते ते व्यवहार मरणोत्तर परलोकीही आपणांस येथल्याप्रमाणें करतां येतील! अलीकडील विचारी लोकांस ही कल्पना अज्ञानमूलक व हास्यास्पद वाटेल हें खरें आहे; तथापि तींत आश्चर्य वाटण्यासारखे किंवा शंका येण्यासारखें कांहींच नाहीं. असें मानणारे लोक आजमितीस अनेक रानटी प्रदेशात अस्तित्वांत आहेत. इतकेच नाहीं, तर या सुधारलेल्या भरतखंडांतील लोकांच्या कल्पनाही अशाच होत्या, असें येथें सांप्रत कालीं रूढ असलेल्या प्रेतसंस्कारांवरून

स्पष्ट अनुमान करण्यास बिलकूल हरकत दिसत नाही. आम्ही आपल्याला कितीही सुधारलेले किंवा शहाणे म्हणवीत असलों तरी या संबंधानें आपण अद्यापि बरेच मूर्ख आहों, असें विचाराअंतीं प्रत्येकास कबूल करावें लागेल!

आजपर्यंत ज्या बायका आपल्या नवऱ्यांबरोबर आपण होऊन सती गेल्या किंवा घालविल्या असतील, त्यांच्या सती जाण्यांत आणि वरील अमानुष आचारांत बरेच सादृश्य आहे, असें कोण म्हणणार नाहीं? सतीची चाल आपल्या देशांतली म्हणूनच तिचा पवाडा गावयाचा, आणि जिवंत मुलास किंवा मुलीस बापाबरोबर अथवा आईबरोबर मूठमाती देण्याची चाल परक्या ठिकाणची म्हणून तिची निंदा करावयाची- ही निःपक्षपातानें विचार करण्याची अलीकडील देशाभिमान्यांची व धर्माभिमान्यांची पद्धत; सामान्य बुद्धीच्या व सामान्य विचारांच्या मनुष्यांस पसंत नसल्यामुळें ते दोनहीं चालींस एकाच माळेत गोवितात, आणि सतीहून कमी निष्ठुर, पण सतीच्या तत्त्वाचाच ज्यास आधार आहे; अशा दुसऱ्या चालीस ते दोष देतात. लोकांना अनेक शतकें पूर्णपणें मान्य झालेले आचार कितीही निर्दय किंवा गूढ असले तरी त्याचें मंडन करीत सुटणें, हें अजागळ लोकांच्या शाबासकीस हपापलेल्या डंकेखोरास, अथवा पाहिजे तें भाषण करून किंवा लेख लिहून दोन पैसे जोडण्यासाठी रात्रंदिवस धडपड करणाऱ्या नीच लोभ्यांसच योग्य आहे! लोकांचें अज्ञान कशांत आहे हें ज्यास समजलेसें वाटत आहे, व तें दूर होऊन सदाचार आणि सुख यांचा त्यांमध्यें प्रसार व्हावा अशी ज्यास बळकट इच्छा आहे, तो लोकाच्या उपहासास व छलास न भितां आपले विचार उघडपणें बोलत सुटेल तरच त्याचा हेतु सिद्धीस जाण्याचा संभव आहे. विनाकारण कोणी कोणाचे मन दुखविणे हे अश्लाध्य होय; पण वैद्यानें रोग्याच्या व ज्ञात्यांनीं मूढांच्या तब्यतींप्रमाणें वागणें आणि यांना ग्रासून टाकणाऱ्या शारीरिक व मानसिक रोगांचा आपल्या शक्तीप्रमाणें परिहार करण्याचा निर्भीडपणे प्रयत्न न करणें हें अधिकच अश्लाध्य होय, असें आम्हांस वाटतें; आणि म्हणूनच सध्यां "पांचजन्याचा हंगाम" चालू आहे हें ठाऊक असतां, व गतवर्षी याच हंगामांत पुण्यांतील सुबंधूंनीं आपला प्रेतसंस्कार केला हें ध्यानांत असतां, या अप्रिय विषयाची चर्चा करण्याचें धैर्य आम्ही करीत आहों. 'प्रेतविधीविषयीं' आमचे पुढील विचार वाचून त्यांबद्दल प्रथमदर्शनीं आम्हांविषयीं जो संताप उत्पन्न होईल तो विसरण्याचा जे कोणी प्रयत्न करतील, त्यांना त्यांत सत्याचा बराच अंश आहे असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. देशपरत्वें व धर्मपरत्वें उत्तरक्रियांचे अनेक प्रकार झाले आहेत. जाळणे, पुरणें, बुडविणे, सडविणें किंवा गिधाडांकडून खावविणें हे मेलेल्या शरिरांची वाट लावण्याचे मुख्य पांच मार्ग होत. त्यांपैकीं कोणत्याही एका मार्गानें

शवाचा निकाल लावला म्हणजे हें काम आटपतें तर त्याबद्दल केव्हांही विशेष चर्चा करण्याची गरज पडतीना. पण प्रत्येक धर्मानें या दु:खदायक कामामागें त्याहूनही दु:खदायक अशा विधींचे दुट्टें लाऊन दिलें आहे. ख्रिस्ती, पारशी, मुसलमान, हिंदु, बुद्ध- सारांश कोणत्या पाहिजे त्या धर्माचा मनुष्य घ्या. मेलेल्या मनुष्याच्या प्रेताचा चट्दिशी कांहीं तरी निकाल लाऊन मी आपला मोकळा होईन, असें कोणलाहि म्हणतां येत नाहीं. प्रेताचें आणि आपले बरेच हाल केल्याशिवाय आणि करून घेतल्याशिवाय त्याचा शेवटचा निरोप घेणे अशक्य झालें आहे; पण त्यांतल्या त्यांत हिंदू लोकांनी; विशेषत: वैदिक धर्माचे प्यारे भक्त जे ब्राह्मण त्या आम्हीं, हे और्ध्वदेहिक प्रकरण करवेल तितकें भयप्रद, अमंगळ व कष्टमय केलें आहे; निदान आम्हांस तरी आमच्या अंत्यक्रियापद्धतींत नांवाजण्यासारखें कांहींएक दिसत नाहीं. प्रेताला, प्रेताच्या आत्म्याला आणि प्रेताच्या आप्तांला ब्राह्मणी प्रेतनिर्हार एकसारखा त्रासदायक आहे. प्रेत लहानाचें असो किंवा थोराचें असो; स्त्रीचें असो किंवा पुरुषांचें असो; निष्कारण त्रास म्हणून चुकावयाचा नाहीं. पोरांच्या प्रेतास न्हाऊं घातलें पाहिजे; त्याची ताळू भरली पाहिजे; त्याला हळद लाविली पाहिजे. सवाष्ण स्त्रीला न्हाऊं घालून पातळ नेसविल्याशिवाय व मळवट भरून तिची ओटी भरल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. याप्रमाणेंच कमी अधिक त्रासाची थोरल्या पुरुषांच्या व विधवांच्या प्रेतांची प्राथमिक व्यवस्था. नंतर तिरडीवर बांधणें व स्मशानांत नेणें वगैरे गोष्टीही शास्त्रविहित मार्गानेंच झाल्या पाहिजेत. पण स्मशानांत आल्यावर ज्या तिरस्कारक व संतापजनक गोष्टी कराव्या लागतात त्यांपुढे येथपर्यंत झालें ते कांहींच नाहीं, असें म्हणावें लागतें. चितेच्या गोवऱ्या रचावयास लागण्यापासून प्रेताची राख होईपर्यंत विधीच विधि! हे भीषण, बीभत्स, अमंगल हिंदुधर्मा, तुझ्या आज्ञेनें आज शेंकडो वर्षे स्मशानभूमींत आम्हीं जीं क्षौरें केली; डोळयातून पाणी गळत असतां कणकीचें गोळे करून ते प्रेताच्या अनेक भागांवर ठेविले; क्रव्यादाग्नीच्या भयाण ज्वालांभोवतीं मातीच्या गळत्या घागरी डोक्यावर घेऊन ज्या प्रदक्षिणा घातल्या व उत्तरीयानें गळ्यांत दगड बांधून घेऊन व तोंडाला हात लावून तुझ्या नांवानें काढूं नये तसेल ध्वनि काढले, त्या सर्वांबद्दल तूं आम्हांस काय दिलें आहेस? निर्दय वंचका! गाईचें दूध पिणें, नानाप्रकारचे जिन्नस यथेच्छ खाणें, पालखींत किंवा घोड्यावर बसणे, जोडा घालून सहल करणें, शवाबरोबर जाळलेल्या प्रियपत्नीच्या केंसांच्या धुराच्या वासावरूनच जी आपणास प्राप्त झाली आहे अशी कल्पना करून तिच्यासमवेत शय्येवर विहार करणें किंवा विश्रांति घेणें, मृत्युलोक सोडून वायुरूपानें पाताळाकडें किंवा स्वर्गाकडे संचार करीत असतां कोणी शत्रु भेटला तर तलवारीनें किंवा सोडग्यानें

त्याच्या समाचार घेणें ; व अनेक प्रकारच्या दुर्गंधी द्रव्यांच्या समुद्रांतून प्रवास करण्याचा प्रसंग आला दर्भाच्या होडग्यांत बसणें, अथवा तहान लागली असता मडक्यांत घालून दिलेल्या पाण्यानें ती भागविणें- असल्या गोष्टी मेलेल्या मनुष्याच्या आत्म्याकडून किंवा जिवाकडून घडण्याचा संभव तरी आहे काय? मुळींच नाहीं. पण जबरदस्त पंचाक्षऱ्याप्रमाणें आम्हां साऱ्या अज्ञ लोकांस त्वां भारून टाकून केवळ गुलाम केलें असल्यामुळें, आज कित्येक युगें अशक्य गोष्टी आम्हीं शक्य मानीत आहों; व अत्यंत निंद्य कृत्यें वंद्य मानून तुझ्या संतोषाकरतां ती बेलाशक करीत आहों! पण ध्यानांत ठेव; या तुझ्या अश्लाघ्य निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल अगदीं समीप येऊन ठेपला आहे! आजपर्यंत त्वां आम्हांस ज्या असह्य यातना भोगण्यास लाविलें आहे, व अनन्वित कर्मे आम्हांकडून करविली आहेस, त्या सर्वांबद्दल तुझीं पाळेंमुळे खणून काढून विचारकुंडांत पेटलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्होळांत तुझी आहुति देणाऱ्या नवीन ऋत्विग्वर्गांचा अवतार नुकताच झाला आहे! तेव्हां जर तुला आपल्या अस्तित्वाची आकांक्षा असेल तर वेळेवर शुद्धीवर ये आणि आमच्या सर्व शरीरभर कांचन असलेले तुझे पाश काढून घे; नाहीं तर भरतखंडांत तुझें नांव देखील राहणार नाही! मित्रत्वाच्या नात्यानें आज तुला ही लहानशी नोटीस दिली आहे, व आमच्यानें होतील तेवढ्या आणखीही देण्यांत येतील. तेवढ्यांनी तूं वृत्तीवर आलास आणि कालास उचित असें वर्तन करूं लागलास तर ठीकच आहे! नाहीं तर तुझें नशीब तुझ्याबरोबर!!

मनुष्य मेल्यानंतर त्याच्या प्रेताची कांहीं तरी वाट लावलीच पाहिजे, नाहीं तर तें सडून त्याला दुर्गंधी सुटेल, व त्यापाशीं उभें रहावेनासें होईल. तेव्हां ज्याची तुमची मृत्यूनें ताडातोड केली त्यांचे शरीर तुम्हांस कितीही प्रिय असलें, आणि त्याच्या संवर्धनार्थ तुम्हीं कितीही खर्च व कष्ट केले असले तरी त्याला समाधि देण्याच्या, किंवा ते मूकोत्सेधांत (अथवा नि:शब्द मनोऱ्यांत, TowerofSlience) नेऊन ठेवण्याच्या तयारीस लागलें पाहिजें. मनुष्याच्या सुधारणेंत पाहिजे तेवढे फेरफार होवोत, त्याच्या हातीं अमरत्व आल्याशिवाय, हा दु:खकारक प्रसंग कोणत्याही रीतीनें त्याला टाळतां येण्यासारखा नाही. आता प्रश्न येवढा आहे कीं, हा अनावर प्रसंग कमींत कमी दु:खप्रद कशानें करतां येईल? आमच्या लोकांत जे अमंगल प्रेतसंस्कार रूढ आहेत ते राहूं दिल्यानें किंवा त्यांना फांटा दिल्यानें? प्रेतांस मूठमाती देण्यापेक्षां किंवा नि:शब्द मनोऱ्यांत तीं नेऊन तेथें गिधाडांकडून तीं खावविण्यापेक्षां चित्तेवर त्याचें दहन करणें हें फार चांगलें, हें कोणाही विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे, व हळूहळू हा प्रघात सर्वत्र रूढ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. खिस्त्याप्रमाणें किंवा मुसलमानांप्रमाणें हिंदू लोकांनीं प्राय:

प्रेतें पुरण्याची चाल पसंत न करतां तीं जाळण्याची रीति पाडली, ही फार शहाणपणाची गोष्ट केली, आणि म्हणून ती अत्यंत रक्षणीय आहे असें आम्हांस वाटतें. पण यापलीकडे मात्र यासंबंधानें त्यांची तारीफ करण्यांत यत्किंचित् देखील जागा नाहीं. सुधारलेल्या इतर लोकांत प्रेतसंस्कार आहेत, नाहींत असें नाहींत; पण आमच्या इतका तऱ्हेवाईक आचरटपणा बहुश: कोठेही दृष्टीस पडावयाचा नाहीं! या आचरटपणांत एकदां श्रद्धेचा पुष्कळ अंश होता आणि अजूनही कांहीं आहे, हें आम्ही कबूल करतों. मरावयास टेंकलेल्या बऱ्याच हिंदू लोकांस आपल्या पाठीमागें आपली क्रिया नीट रीतीनें व्हावी असें वाटत असतें. इतकेंच नाहीं, तर तीबद्दल ते कधीं कधी विशेष व्यवस्थाही करून ठेवतात. तसेंच जे क्रिया करतात त्यांपैकी कित्येकांना अशा क्रियेपासून मृतांना सद्गति प्राप्त होते व स्वत:स पुण्य लागते, निदान पाप लागत नाहीं, असें वाटते! अशा प्रकारच्या लोकांवर तीक्ष्ण शब्दांचे प्रहार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एकतर त्यांना जें बरें वाटत आहे तें करूं दिलें पाहिजे; किंवा युक्तीयुक्तीनें त्यांचे मन वळविलें पाहिजे. तथापि त्यांच्या कृत्यांत जेवढा निर्दयपणाचा किंवा अमानुषपणाचा भाग असेल तेवढ्याबद्दल त्यांची कानउघाडणी करणें जरूर आहे. कोणत्याही मनुष्यानें आपल्या बापाखातर, आईखातर, बायकोखातर, किंवा दुसऱ्या कोणत्याही आप्ताखातर एक वेळेसच काय, पण दरपंधरवड्यास जरी नखशिखांत क्षौर केलें तर त्याबद्दल आम्ही त्यास फारसा दोष देणार नाहीं; पण जो कोणी दुसऱ्याच्या मर्जीविरुद्ध त्याच्या एका केंसाला धक्का लावण्याचा प्रयत्न करील; त्याला त्याबद्दल दोष दिला पाहिजे इतकेंच नाहीं, तर दंडही केला पाहिजे असें आम्ही समजतों! दुसऱ्याला त्रास होऊं न देतां, ज्याला जी गोष्ट पसंत असेल त्याला ती करण्याचा पूर्ण हक्क आहे. पण अविचारी मनुष्याची वारंवार काय चुकी होत असते कीं, ज्या गोष्टी त्याला स्वत:ला हितावह अशा वाटत असतात, त्या दुसऱ्यालाही तशा वाटत असतील अशा भ्रमानें तो आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून त्या दुसऱ्यावर लादीत असतो. प्रेतसंस्काराच्यासंबंधाने अशा प्रकारचा जुलूम आमच्या समाजांत जितका होत आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही समाजांत होत नसेल. मनुष्याला संकटावस्थेंत गांठून धर्मबुद्धीनें, लोभानें, मत्सरानें किंवा दुसऱ्या कोणत्याही दुष्ट विकारानें त्याचा असा छल करणें हा शुद्ध अधमपणा होय! जे लोक भाविकपणानें आज शेंकडों वर्षें अशा प्रकारचा जुलूम आपला आपल्यावर व दुसऱ्यावर करीत आहेत, त्यांना आम्ही विनयपूर्वक असें विचारतों "तुम्ही इतके गतानुगतिक कशासाठीं होऊन बसलां आहां? मनुष्याच्या जन्माला येऊन असें मेषासारखें वर्तन कां करतां? डोक्यात जो थोडाबहुत मेंदू असेल त्याच्याकडून

कांही एक काम करून न घेतां त्याची माती किंवा राख कां होऊं देतां? तुम्ही जे प्रेतविधि करतां; त्यावरून जिवंत मनुष्य आणि मेलेला मनुष्य यांतला भेद तुम्हांला कळत नाहीं, असें म्हणणें भाग पडतें. जिवंत मनुष्याच्या आहारोपभोगास लागणारे पदार्थ तुम्ही मेलेल्या मनुष्यास अर्पण करतां याचा अर्थ काय? पहाणें, हुंगणें, खाणें, स्पर्श करणें, हिंडणें, फिरणें बोलणेंसवरणें - हे सारे शरीरनिबद्ध व्यापार आहेत. मृत शरीराला अग्निकाष्ठ देऊन त्याची राख झाल्यावर त्याच्या नांवानें जे अन्नपाणी तुम्ही देतां, त्याचा उपभोग कोण घेतो? मेलेल्यांच्या आत्म्याला डोळे, नाकें, तोंडे, त्वचा, हातपाय, व काळीज-फुफ्फुसें आहेत की काय? जर नसतील तर तुम्हीं दिलेल्या अन्नोदकापासून त्यांना काय फायदा होत असेल? पण असतील तर त्यांच्या चैतन्यावस्थेंत आणि मृतावस्थेंत भेद काय? नसेल तर वर्षांतून फक्त एकदां परामर्ष घेतल्यानें त्यांचा निभाव कसा लागेल? शिवाय, त्यांच्या रहाण्यासवरण्याची व्यवस्था काय? जिवंतपणी त्यांना जसलीं घरें लागत, तसलींच मेल्यावरही बांधून देणें अवश्य नाहीं काय? तसेंच, दर आठवड्यांस न्हावी, परीट वगैरे कारागीर त्यांच्या सेवेला हजर ठेवण्याची जरूर नाहीं काय? हेही असो; तुम्हाला हें ठाऊक आहे कीं, ज्याप्रमाणें जनन आणि मरण यांची गांठ बांधलेली आहे, त्याप्रमाणेंच अन्न खाणाराच्या पाठीमागें बहिर्दिशेला जाणें लागलें आहे. ही त्यांची अडचण दूर करण्यासाठी तुमच्याकडून आजपर्यंत कांहींच योजना झाली नाहीं हें कसें? पैशाचाव्यवस्थेंतील **सॅनेटरी कमिशनरांकडून** (आरोग्य अधिकाऱ्यांकडून) तुमच्या अनंत पूर्वजांस प्रतिदिवशीं खडाखड दंड होत नसतील काय? पुन: इतक्यांनीं इतकी वर्षे उरकलेल्या देहधर्मांमुळें उत्पन्न होणाऱ्या रोगजनक वायूंचे निर्दलन करण्यासारखे **फेनिलाचे** प्रवाह चोहोंकडे वहात नसतील, आणि गंधकाच्या व डांबराच्या होळ्या जेथें तेथें पेटलेल्या नसतील, तर सारें वातावरण रोगकृमींनी व्याप्त होऊन जाऊन, डेंग्यू, कॉलरा, इन्फ्ल्यूएन्झा वगैरे प्राणनाशक साथींनी ते जर्जर होऊन गेले नसतील काय? जर गेले असतील असें मानणें स्वाभाविक आहे; तर होमोपथिक, इलेक्ट्रोहोमोपथिक किंवा ॲलोपथिक रामबाण टिंक्चरे किंवा ग्लोब्युल्स अथवा आर्यवैद्यकांतील खाशा खाशा मात्रा आणि काढे त्यांस देण्याची व कै. बापू मेहेंदळ्यासारख्या बहुश्रुत वैद्यांकडून त्यांची परीक्षा करविण्याची कांहीं सोय कधी केली आहे काय? अन्नवस्त्र तेवढें मधून मधून द्यावयाचें आणि बाकी सर्व गोष्टींविषयीं उदासीन रहावयाचें- हें तुमच्यासारख्यांच्या पितृभक्तीस, धर्मबुद्धीस, आणि विचारशीलतेस बिलकुल शोभत नाही! खुळ्यांनो, असे पोरांपेक्षा पोर कसे झालांत? तुमच्या वयाला निदान तीन-साडेतीन हजार वर्षे झालीं असून, मनुष्यपणाच्या शैशवावस्थेंत असलेल्या

रानटी लोकांप्रमाणे विचार करण्यास व वागण्यास तुम्हांस लाज कशी वाटत नाहीं? गरुडपुराणांतल्या किळस आणणाऱ्या गप्पांवर भरंवसा ठेवणाऱ्या मूढांनो, आरबी भाषेंतील चमत्कारिक गोष्टींसारख्या गोष्टींवर श्रद्धा ठेवून त्यांना पुराणाच्या पदवीला चढवाल तरी देखील कांहींसें बरें होणार आहे. तसें केल्यानें तुमच्या मनुष्यपणावरील थोडासा कलंक तरी धुऊन गेल्यासारखा होईल. मनुष्यांच्या आत्म्यांविषयी तुमचा येवढा पक्षपात कशासाठी? ज्या गाईचे दूधतूप खाऊन तुम्ही इतके धष्टपुष्ट होतां, ज्या बैलांच्या श्रमानें हजारों खंडी धान्य पिकवितां, ज्या घोड्यावर बसून युद्धास जातां, आणि ज्या कुत्र्याच्या साहाय्यानें आपल्या संपत्तींचे संरक्षण करतां; त्या साऱ्या उपयोगी जनावरांचीं तुम्ही श्राद्धें कां करीत नाही? त्यांच्यासाठीं उत्कुंभ कां देत नाहीं? **गाईला आत्मा नाहीं** (The cow has not a soul) असें पाद्र्याप्रमाणे तुमचें तर मत नाहींना? जर नसेल, तर या अत्यंत उपयोगी जनावरांच्या आत्म्यांविषयीं तुम्ही इतके उदासीन कसे? वास्तविक पहातां यांच्याकरतां तुम्हीं स्वतंत्र श्राद्धें करावयाला पाहिजे होतीं; पण तसें करणे अवघड झालें असल्यास निदान पितरांबरोबर त्यांची आठवण करण्यास काय हरकत आहे? मेलेल्या आईच्या, बापाच्या किंवा बायकोच्या पिंडांबरोबर देवाज्ञा झालेल्या आवडत्या गाईच्या, घोड्याच्या किंवा कुत्र्याच्या नांवानें दोन पिंड सोडले म्हणून काय झाले? शिवाय, आणखी एक अशी शंका येते कीं, फार झालें तर तुम्ही आजापणजापर्यंत आपल्या पितरांचा समाचार घेतां; पण आजांच्या आजांची आणि पणजांच्या बापांची काय वाट? त्यांनीं थंडा फराळ करून नित्य दिगंबर असावें काय? वास्तविक पहातां विशेष वार्धक्यामुळें त्यांचे समाचार अगोदर घेणें विशेष अगत्याचें असून तुम्ही त्यांचे नांव देखिल काढीत नाहीं, हे आश्चर्य नव्हे काय? किंवा तुमची अशी समजूत आहे काय कीं, अमुक वर्षे पिशाचयोनींत घालविल्यावर देवयोनींत किंवा मर्त्ययोनींत त्यांचा प्रवेश होतो? जर अशी तुमची समजूत असेल; तर ती कशामुळें झाली आहे हें तुम्ही कोणास समजावून देऊं शकाल काय? पिशाचयोनीप्रत पावलेला जीव किती वर्षें त्या स्थितींत रहातो, आणि पुढें त्यांचें स्थित्यंतर होण्यास काय कारणें होतात, हें तुमच्यापैकीं कोणाची सांगण्याची प्राज्ञा आहे काय? अशा प्रकारचें स्थित्यंतर होत नाहीं असें तुमचें म्हणणें असेल तर ते पिशाचयोनींतच नेहमीं राहतात, असें अनुमान करणें भाग आहे; आणि असें अनुमान करण्याची मोकळीक द्याल, तर हे कोट्यवधि पिशाचरूपी आप्तात्मे रहातात कोठें, आणि आपला चरितार्थ कसा चालवितात, हें सांगण्याची मेहरबानी कराल काय? जर जुन्या भुतांना किंवा पिशाचांना अथवा मृतपित्रात्म्यांना अन्नपाण्याची, वस्त्रपात्रांची, स्त्रीपुत्रांची, आप्तस्नेह्यांची, गडीमाणसांचीव घरागुरांची

गरज नसेल, तर जे तुमच्या डोळ्यांपुढे मरतात त्यांच्याकरतां तरी असले हास्यास्पद संस्कार तुम्ही कां करतां? हा सगळा मूर्खपणा तुमच्या हातून घडण्यास विचारशक्तीस तुम्ही करून दिलेला काडीमोड कारण होत आहे! आमचे ऐकून तिला फिरून घरांत घ्याल व प्रीतिपूर्वक नांदवूं लागाल तर तुमची वागणूक पूज्य व प्रशंसनीय होऊं लागेल.''

परलोक म्हणजे काय आणि तो आहे कोठें तें कोण जाणें! तथापि अशा प्रकारच्या अज्ञात परलोकीं प्रेतांची उर्फ मेलेल्यांची नीट व्यवस्था लागावी म्हणून येथें आम्ही जे अनेक उपाय करतों, त्यांविषयी आतांपर्यंत थोडीशी चर्चा झाली. परंतु आमची पितृभक्ती येवढ्यानेंच संपत नाहीं. देह्याला जे उपभोग आवश्यक आहेत तेच विदेह्याला किंवा देहातीतालाही आवश्यक आहेत, अशी कल्पना करून ब्राह्मणद्वारानें, अग्निद्वारानें, किंवा दुसऱ्या कोणत्याही द्वारानें जीं दानें आम्ही देतों तीं तर देतोंच; पण त्यांशिवाय आणखी एका विशेष प्रकारचीं दानें त्यास देणें अपरिहार्य झालें आहे; ही दानें कोणतीं म्हणाल तर मागें राहिलेल्या आत्म्यांस निष्कारण सोसावा लागणारा त्रास! या त्रासाचें प्रमाण आप्तपणाच्या सान्निध्यावर बरेंच अवलंबून आहे. हिंदु क्षौराचा आणि अशौचाचा जो कोणी तात्त्विक दृष्टीनें विचार करील; त्याला हिंदू लोक मरणें हें एक प्रकारचें महापातक मानीत असावे असें वाटल्यावाचून रहाणार नाही. समुद्र-पर्यटन, अभक्ष्यभक्षण, अपेयपान, अभोग्यभोग वगैरे दोषांस क्षौरादिकांचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत व ज्याअर्थी प्रेताच्या मुलाला किंवा बायकोलाही तेंच प्रायश्चित्त द्यावें लागतें; त्याअर्थी बाप किंवा नवरा मरणें हें मुलाच्या व बायकोच्या हातून घडणारें दंडनीय पातक आहे, असा आमच्या लोकांचा -म्हणजे आम्हां सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या-अत्यंत मूर्ख ब्राह्मण लोकांचा समज असला पाहिजे हे उघड आहे! विचाराची प्रतिष्ठा, नीतीची बढाई व अकलेची ऐट मिरविणाऱ्या मतिमंद ब्राह्मणांनो, **अ** गृहस्थाचा **ब** आप्त वारल्यानें **अ** ला कोणत्या कारणानिमित्त तुम्ही सुतकी किंवा अस्पर्श्य ठरवितां हें सांगू शकाल काय? **ब** मेला यांत **अ** नें काय केलें? **ब** च्या मरणाबद्दल **अ** ला दहा दिवस वाळीत कां टाकतां? व पंचहौदमिशनांत **अ**नें चहा घेतला नसून त्यानें क्षौर केलेंच पाहिजे, असा आग्रह धरून कां बसतां? विटाळ म्हणजे काय, हें तुम्हाला बिलकूल कळत नाहीं, असें वाटतें. जर तें तुम्हांला कळत असतें, तर सुतकाहून सोयराचा विटाळ तुम्हीं अधिक दूष्य मानला असता, व ऋतुमती झालेल्या कन्येच्या उभय कुलांतील संबंध्यांस निदान एक महिनाभर तरी निराळें रहाणें अवश्य करून ठेविलें असते! जनन, मरण, आणि ऋतुप्राप्ति या देह्याच्या मुख्य तीन अवस्थांच्या विचारानें तुमचीं माथीं अगदीं बिघडून गेल्यासारखीं

दिसतात! मेलेल्या बापाचा मुलाच्या मिशांशी अर्थाअर्थी काय संबंध आहे? डोकीचे, दाढीचे, व मिशांचे तुटके तोळा दीड तोळा केस प्रेताला कोणत्या रीतीनें उपयोगी पडणार? पिशाचयोनीप्रत पावलेले अशरीरी जीव असले केंस खातात किंवा पांघरतात अशी कल्पना केल्याशिवाय त्यांना ते अर्पण करण्याचा हेतु काय असावा, हें समजणें फार कठीण आहे! कोणी असें म्हणतात कीं, क्षौर केल्यानें प्रेताला मान दिल्यासारखा होतो. हें जर खरें असले तर मेल्याबरोबर मनुष्याच्या मानकल्पना बदलून जातात, असें समजलें पाहिजे. कोणालाही मान देणें म्हणजे आपल्या दर्शनानें त्याला बरें वाटेल अशा रीतीनें त्याच्यापुढें येणें हा मानाचा अर्थ आहे. दाढीमिशा काढून सारें तोंड असोल्या नारळासारखें गुळगुळीत केले आहे; गळ्यांत दगडाच्या पदकाची फडक्याची माळ घातली आहे; मातीची भोक पाडलेली घागर डोक्यावर घेतली असून तिच्या भोंकांतून सर्वांगावर पाण्याची धार पडत आहे; व ढुंगणास लावलेल्या एका पंचाशिवाय बाकी सारें अंग उघडेबंब केलें आहे; व क्वचित् प्रसंगी पांचजन्यरव करीत आहे- अशा थाटानें जर कोणी कोणास भेटावयास गेला तर त्याला काय वाटेल? जिवंतपणी असलें नटणें कोणास आवडत नसतां शेवटचा श्वासोच्छ्वास केल्याबरोबर मनुष्याच्या किंवा त्याच्या पिशाचाच्या सौंदर्यकल्पनांत येवढें अंतर कां पडावें हें समजत नाहीं! आम्हांस तर हे सारे विधि रानटी स्थितींतील दुष्ट आचारांचे अवशिष्ट प्रतिनिधि वाटतात. मेलेल्या इसमाबरोबर कांही इसम जाळण्याच्या किंवा पुरण्याच्या प्रघातात हळू हळू बदल होत जातां जातां केशदान व वेणींदान हें त्याचें शेवटलें क्षीण रूप राहिलें आहे, यांत संशय नाहीं. प्रथम जनावरें व इतर माणसें मारण्याची चाल बंद पडली असेल; मग जवळचे आप्तही मरण्यास नाखुष दिसूं लागले असतील; पुढें हातपाय, काननाक, हातपायाची बोटें किंवा दुसरा एखादा अवयव देऊन मृताची समजून करण्याची तोड निघाली असेल; अखेरीस असें करणेंही कष्टावह व निरर्थक आहे असें अनुभवास आल्यावरून एकदां काढले तरी महिन्याभरानें फिरून येणारे, कांहीं दिवस नसल्यानें मोठीशी गैरसोय न होणारे, विशेष कुरुपता उत्पन्न न करणारे, काढतांना म्हणण्यासारखा त्रास न पडणारे- असे केंस पूज्य व आवडत्या पितरांस द्यावे आणि तेवढ्यानें त्यांचे होईल तेवढें समाधान करावें- हाच मार्ग प्रशस्त व सुखावह आहे असें दिसून आलें असेल? आणखी थोडेसें पुढें जाण्यास जागा आहे, व हें कांहीं वर्षांनी घडून येईल असें या मागल्या इतिहासावरून मानण्यास बराच आधार वाटतो.

पण हें सारें पुरुषांच्या संबंधाचें झालें. बायकांची काय वाट? ज्याप्रमाणें पुरुषांच्या, त्याप्रमाणें बायकांच्या पाठीमागेंही ही वपनपीडा लावली असून स्त्रियांचे

वपनक्लेश पुरुषांच्या वपनक्लेशापेक्षां सहस्रपटींने जास्त असह्य करून ठेवण्यांत आले आहेत. युरोपिअन लोकांपेक्षां आमच्या लोकांतील नवराबायकोचें प्रेम विशेष दृढ असतें, असा कित्येक अर्वाच्य देशाभिमानी प्रलाप करीत असतात; आणि त्यांचें प्रमाण काय तर बायको मेल्यावर नवरा क्षौर करून घेऊन आमरण अविवाहित राहतो हें नव्हे, तर नवरा मेल्यावर त्याच्या बायकोला आम्ही हव्या त्या वयांत जुलमानें सोंवळी करून मरेतोंपर्यंत तिच्याकडून संन्यासवृत्तीचें आचरण करवितो! हे दयार्द्र ब्राह्मणांनो, खासे तुमचें प्रेम! खाशी तुमची दया!! आणि खास तुमचा न्याय!!! निर्घृण मंदधींनो, ज्याला तुम्ही प्रेम म्हणतां तें प्रेम नव्हे, तर तुमच्या हाडामासांत खिळून गेलेला स्त्रीजातीविषयीं तो तुमचा प्रचंड मत्सर होय! ज्या प्रेमाच्या तुम्ही येवढ्या वल्गना करतां तें प्रेम तुमच्या अंत:करणांत खरोखरीच वसत असतें; तर एका बायकोकरतां स्मशानांतून पिंड देऊन आलां नाहीं तों दुसरीचा हात धरून भोल्यावर चढतां काय? आणि अशी गोष्ट निर्लज्जपणानें पाहिजे त्या वयांत करण्यास राजी होतां काय? सर्वांगावर मृत्यूची दाट छाया पडली आहे असें स्पष्ट दिसत असून ज्या कन्येनें नातवंडाप्रमाणें मांडीवर लोळावें; अशीशीं बहुधा अस्तास गेलेल्या कामवासनेची तृप्ति करण्यासाठी लग्न लावण्यास प्रवृत्त होऊन तिला न्हाव्याच्या तावडींत देण्याची आणि तिचे सर्व प्रकारचे आशांकुर खुडून टाकण्याची खात्रीची तयारी करून ठेवतां, हें तुमच्या स्त्रीप्रेमाचें स्तुत्य निदर्शनच असेल! जे लोक नीतीच्या, धर्माच्या, सोईच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही मिषानें पतिमरणोत्तर स्त्रियांवर वपनसारखा जुलूम करतात; त्यांनीं स्त्रीप्रेमाच्या केवढ्याही वल्गना केल्या तरी ते लोक स्त्रियांविषयीं अत्यंत निष्ठुर व मत्सरी आहेत असे मानिलें पाहिजे. जिवंतपणी बायकोचें दुसऱ्याशीं बोलणें किंवा दुसरीकडे पहाणें हें देखील ज्याला फारसें खपत नाहीं, त्याला आपल्या पाठीमागें आपल्या बायकोस आणि न्हाव्यास कोणी तरी एका खोलींत कोंडून घालून ती गाईप्रमाणें हंबरडा फोडीत असतां व आपणाकडून होईल तेवढा प्रतीकार करीत असतां तिच्या अंगास स्पर्श करून तिचे केंस वस्तऱ्यानें उतरू द्यावे- यांती कांहींच वाटूं नये, हें खऱ्या स्त्रीप्रेमाचें चिन्ह नव्हे. आपल्या पाठीमागें आपल्या बायकोची अशा दशा होणार आहे,अशी कल्पना मनांत आल्याबरोबर ज्याचें पित्त खवळून जात असेल, डोक्यापासून पायापर्यंत ज्यांच्या अंगास ताप आल्यासारखा होत असेल, व असले राक्षसी प्रघात मोडून टाकण्यासाठीं आपणाकडून होण्यासारखें असेल तें केलेंच पाहिजे, अशी वृत्ति ज्याच्या अंत:करणांत निदान त्या वेळेपुरती तरी उत्पन्न होत असेल; त्याच्या अंत:करणांत स्त्रीजातीबद्दल खऱ्या प्रीतीचें कांहीं बीज आहे, असें म्हटलें

तर क्षणभर चालेल. पण दोन अथवा अधिक बायकांस एका शय्येवर घेऊन बसणाऱ्या, तोंडाचें बोळकें झालें तरी नऊ वर्षांच्या पोरीशीं लग्न लावणाऱ्या, पाहिजे त्या वयाच्या मुलीचें, सुनेचें किंवा भावजईचें वपन करणाऱ्या लोकांच्या अंत:करणांत खरें स्त्रीप्रेम असूं शकेल असें मानणें, म्हणजे पृथ्वीच्या दक्षिण किंवा उत्तरध्रुवाजवळ हिममय प्रदेशांत विषुववृत्तांत अनुभवास येणारी सूर्यरश्मीची उष्णता मिळूं शकेल असेंच मानण्यासारखें होय! कांहीं लोक असें म्हणतात कीं, आम्ही शहाणेसुर्ते ब्राह्मण स्त्रियांची जी अशी करुण विटंबना करतो; ती त्यांच्या व आमच्या नीतीच्या रक्षणासाठीं! स्त्रीपुरुषांच्या नीतीचा बचाव होण्यास विधवांचें नित्य क्षौर अपरिहार्य असेल; तर ज्या लोकांत हा जुलूम रूढ नाहीं त्यांच्या साऱ्या विधवा जारिणी असून त्यांच्या संसर्गदोषामुळें बायका असलेले बहुतेक लोकही स्वस्त्रीपराङ्मुख होऊन जार बनत असतील, असें मानावयाचें कीं काय? अशीच कल्पना करणें वाजवी असेल तर नीतीचा प्रकाश काय तो विधवांचें मुंडन करविणाऱ्या आम्हां ब्राह्मण लोकांत झळकत आहे, आणि इतर लोकांत निबिड अनीतितम पसरलें आहे, असें मानणें जरूर नाहीं काय? गतभर्तृकांचे केस काढून त्यांना कुरूप करण्यांत जर नीतीचें संरक्षण व संवर्धन होत असेल, तर ज्या मानानें ही कुरूपता अधिक होईल त्या मानानें नीतीचा अधिकाधिक फैलाव झाला पाहिजे, व तो करणें प्रत्येक नीतीच्छूनें आपलें कर्तव्य मानिलें पाहिजे. गतभर्तृकांची कृत्रिम कुरूपता राष्ट्राच्या नीत्युन्नतीस अवश्य आहे असें ज्यांचें मत असेल, ते त्यांचें वपनच करून कां थांबतात कोण जाणें! शरीरांत कुरूपता आणिल्याने वयपरत्वें कमी अधिक जोरानें पेट घेणाऱ्या विकाराग्नीच्या उपशम करणें जर शक्य असेल, तर गतभर्तृकांचे पाय तोडावे म्हणजे त्या परक्याकडे जाणार नाहींत; डोळे काढावे म्हणजे त्या परपुरुषाकडे पांहू शकणार नाहींत; हात तोडावे म्हणजे कोणतेंही दुष्कृत्य त्यांस करता येणार नाहीं; त्यांच्या जिभा उतराव्या म्हणजे विषयवासनांविषयीं त्यांस उद्‌गार काढतां येणार नाहींत; त्यांचीं नाकें कापावीं म्हणेज त्यांच्या हिडिस तोंडाकडे कोणी पहाणार नाहीं; त्यांना कांहीं खाऊं न घालतां कोंडून घालाव्या म्हणजे त्यांचे कामविकार प्रबल होणार नाहींत व त्यांना कोणाशीं संबंध ठेवतां येणार नाहीं; किंबहुना त्यांना अफूच्या लहानशा गोळ्या किंवा सोमलाच्या पुड्या देण्याचा प्रचार पाडला अथवा पूर्वीच्या सतीच्या चालीचा जीर्णोद्धार केला तर त्यांच्या हातून अनीति घडण्याचा मुळीच संभव रहाणार नाहीं, हें उघड आहे!!! जर हें करणें अमानुष असेल, तर नवऱ्याचा जीव गेला नाहीं तो आईबापांनी सर्व अपत्यवासल्य एकीकडे गुंडाळून स्वप्राणाहून प्रिय मानलेल्या तरुण मुलींची डोकीं न्हाव्याच्या स्वाधीन करण्यात तयार होणें, हें त्यांच्या

मनुष्यपणास शोभतें असें कसें म्हणतां येईल? शिवाय, स्त्रीच्या अनीतीपासून उत्पन्न होणारे अवान्तर दुष्परिणाम कितीही वाईट असले तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, स्त्रीच्या अनीतीबरोबर पुरुषासही अनीतिमान व्हावे लागते. पुरुष आपली नीति भ्रष्ट होऊं देणार नाहीत, तर स्त्रियांच्या हातून अनीति घडणें अशक्य होणार आहे. जातिविशिष्ट अनीतींत स्त्री व पुरुष उभयतांकडून सारखा दोष घडत असून, आमच्या नीतिकर्त्यांनी स्त्रियांचे वर्तनच इतके दंड्य व दूष्य कां मानिले आहे, हें समजत नाहीं. आम्हांस तर असें वाटतें कीं, पुरुषांचा स्वार्थ, पुरुषाचा मत्सर, व पुरुषांचे अधिक बल हें या पक्षपाताचें, या विषमतेचे, या गर्हणीय अन्यायाचें कारण होय. या निर्दय मात्सर्यामुळे वन्यपशूंहून आम्ही अधिक क्रूर झालों आहों, आणि जोपर्यंत हा क्रौर्यकलंक नाहींसा करण्याचा आम्ही प्रयत्न करणार नाहीं, तोपर्यंत इतर सुधारलेलीं राष्ट्रें आमची फजिती उडविण्यास आणि आमच्या तोंडावर थुंकण्यास कधीही मागे पहाणार नाहीत. आठदहा वर्षांच्या पोरीस साठसत्तर वर्षांच्या थेरड्याच्या कबजांत देणाऱ्या, किंवा जिला बारावें वर्ष देखील लागलेले नाहीं अशा मुलीच्या विपत्तीचा विचार न करतां तिच्याशीं संभोग करण्याचा हक्क नवऱ्यास आहे असे प्रपादण्याऱ्या, अथवा नवऱ्याच्या प्रेताबरोबर त्याच्या बायकोचे केंस जाळले तरच त्यास सद्‌गति मिळते, अशी बडबड करणाऱ्या अमानुष लोकानीं इंग्लिश लोकांसारख्या स्वातंत्र्याभिलाषी, दयावान् व न्यायी लोकांपुढें आम्हांस राजकीय हक्क द्या, म्हणून तोंड वेंगाडणें आणि प्रत्येक वर्षी लाखों रुपये खर्च करून राष्ट्रीय सभेचा गोंधळ घालणे हें अत्यंत विसंगत व अस्वाभाविक आहे. बाहेरची गुलामगिरी नको असेल तर अगोदर घरची गुलामगिरी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गृहसुधारणेस प्रतिकूल असणाऱ्या लोकांनीं कांहीं काळपर्यंत केवढीही हुल्लड करून दिली तरी अखेरीस ते मागें पडल्याशिवाय रहात नाहींत हें इजिप्शीयन, मुसलमान, पर्शियन, वगैरे लोकांच्या इतिहासापासून समजण्यासारखें आहे. ज्या देशांतील गृहे पारतंत्र्याच्या आणि जुलमाच्या शाळा आहेत, त्या देशांत महापुरुषांचीं परंपरा निर्माण कशी व्हावी, आणि ज्ञान, कला, संपत्ति, व स्वातंत्र्य वगैरे इष्ट वस्तूंची त्यांस प्राप्ति होऊन त्यांचा उपयोग त्यांना चिरकाल कसा मिळावा, हें आम्हांस समजत नाहीं. ब्राह्मण विधवा ही हिंदु लोकांच्या निष्करुणेची, मात्सर्याची, अविचाराची, विपरीत व रानटी धर्मश्रद्धेची, आणि त्यांच्या हाडास खिळलेल्या त्यांच्या अन्यायीपणाची खूण आहे. ही नाहींशी करण्याचे धैर्य आमचे अंगीं आल्याशिवाय आमच्या हातून म्हणण्यासारखें कांहींएक होणार नाहीं. पण ही नाहींशी करण्यास आम्ही आपल्या प्रेतसंस्कारांच्या एका भागाला गचाळ समजून अजिबात फांटा देण्यास तयार झाले पाहिजे. इतकी

मर्दुमकी आमचे ठाई उरली आहे, असें वाटत नाहीं.

आतांपर्यंत प्रेतसंस्कारांविषयीं जे अवश्य दिसलें तें लिहिलें. तथापि त्यांचा निरोप घेण्यापूर्वी त्यांशीं संलग्न असलेल्या चारपांच किरकोळ गोष्टींचा येथे उल्लेख करणें जरूर आहे असें वाटल्यावरून आणखी दोन अडीच कालमांचा बळी त्यांस देत आहों. येवढ्यानें त्यांचें समाधान होऊन आमच्या पाठीमागचा त्यांचा त्रास चुकणार आहे असें नाहीं. या संस्कारपिशाचांनीं कमींत कमी तीन हजार वर्षे तरी आमचे झाड धरिलें आहे; तेव्हां अशा जुन्या वतनदारांना हुसकून लावण्याचें काम कांहीं सोपें नाहीं! **सुधारकाहून** शेंकडोपटीनें बलवत्तर असे अनेक पंचाक्षरी अस्तित्वांत येऊन ते आपल्या मंत्रांनी, तंत्रांनी, व प्रतोदांनीं, शेपन्नास वर्षे त्यांना बेदम करीत रहातील तेव्हां कदाचित् त्यांची वरची पीडा नाहीशी होईल! आम्ही या सत्कृत्याचा आज केवळ उपक्रम केला आहे; तें तडीला नेणे पुढल्या पिढ्यांच्या परिश्रमावर अवलंबून आहे. तथापि या कामाचा साधेल तसला नकाशा कोणी केव्हांही काढला तरी त्यांपासून झाला तर थोडाबहुत फायदाच होणार आहे.

आमच्या लोकांत प्रेतें जाळण्याची जी चाल पडली आहे ती अत्यंत प्रशस्त आहे, हें मागें म्हटलेंच आहे. तथापि प्रेतें स्मशानांत नेण्याच्या व तीं जाळण्याच्या कामांत सुधारणा करण्यास जागा आहे. आसन्नमरण झालेल्या मनुष्याचें प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर त्यासभोंवतीं बसलेले निकट आप्त दु:खानें व शोकानें अत्यत विव्हल होतात, व दु:खाचा पहिला उमाळा येऊन जाईतोंपर्यंत पुढल्या तयारीस लागण्यास ते असमर्थ असतात. तो येऊन गेल्यावर त्यांत जो सर्वांत वडील पुरूष असतो तो आपला शोक आवरून अन्य आप्तमित्रांस बोलावणीं पाठवितों, आणि ते आल्यावर त्यांच्या साहाय्यानें पुढील कार्यभाग उरकतो. प्रेताची वाट लावण्याची आमच्यांतील ही सामान्य पद्धति झाली. पण कित्येक प्रसंगीं गरीब लोकांना मनुष्यबल अनुकूल नसल्यामुळें फारच त्रास पडतो. जिकडेतिकडे काळोखमिट्ट झालें आहे; थंडीचा कडाका पडला आहे अथवा पावसाची संततधार लागली आहे; कोणास बोलावणें पाठविण्यास जवळ मनुष्य नाहीं, व हाक मारली असतां कोणी येईल अशी आशा नाहीं; दहनाची जागाही थोड्या अंतरावर नाहीं व दहनापुरता जवळ पैसा नाही- अशा स्थितींत ज्याचा संबंधी मरतो तो केवढ्या संकटांत पडतो बरें! कुणबी, वाणी वगैरे जातींत अशा संकटाचे वेळीं जी साहाय्यतत्परता दिसून येते, ती आम्ही शहाण्या व श्रेष्ठ म्हणविणाऱ्या ब्राह्मणांनीं खरोखरीच अनुकरण करण्यासारखी आहे. परोपकारबुद्धीनें प्रेताला खांदा देण्यास तयार होणें तर एकीकडेच राहूं द्या, मुंबईतले चाळवाले आणि पुण्यांतील

बिऱ्हाडकरू आसपास कोणी मनुष्य मेला आहे किंवा तास अर्ध तासांत मरणार आहे, अशी बातमी लागतांच आपापली दारें लाऊन घेऊन घाईनें जेवायला बसतील किंवा डोकींवर पगड्या ठेऊन घरांतून बाहेर पडतील! असला निष्ठुरपणा फक्त आम्हां नागरिक ब्राह्मणांतच दृष्टीस पडतो. हें निर्दय व नीच औदासीन्य कदाचित् आमच्या वरिष्ठ सुधारणेचें फळ असेल; पण तें कोणत्याही प्रकारें कल्याणकारक किंवा प्रशंसनीय नाहीं, हें प्रत्येक समंजस मनुष्यास कबूल केलें पाहिजे. यासंबंधानें ब्राह्मण लोक आपण होऊन अधिक मनुष्यपणा दाखवूं लागतील तर बरेंच आहे; नाहीं तर साऱ्या जातीनें किंवा सरकारानें आमच्या अंगचा हा दुर्गुण घालविण्यासाठीं कांहीं तरी कडक उपाय योजणें गैरशिस्त होणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. जुन्या ग्रीक व रोमन लोकांत यासंबंधानें फार सक्तीचे नियम असत, व येथेंही कांही जातींत तसेंच आहेत असें दिसते. मुंबईतील कॉरोनराच्या पंचनाम्याकरितां ज्याप्रमाणें हवा त्याला पकडून आणितात, पोलिसानें छाप दिला कीं पुढें पाऊल टाकण्याची कोणाचीही प्राज्ञा होत नाहीं, त्याप्रमाणें प्रेताला मदत करण्यासाठी कोणाकडूनही बोलावणें आलें तरी त्याला नाहीं म्हणण्याची कोणाचीही छाती होऊं नये. अशा प्रकारचा निर्बंध जातीनें किंवा सरकारानें केल्यास कोणी विशेष हरकत घेईल असें वाटत नाहीं. कोणी कोणाला निष्कारण त्रास देऊं नये, हा सामान्यपणें चांगला नियम आहे, व त्याच्या अनुरोधानें बहुतेक सामाजिक व्यवहार चालतो. पण ज्याप्रमाणें इतर नियमांलाही कांहीं अपवाद असतात, त्याप्रमाणे यालाही हा संकटाचा प्रसंग अपवाद करणें प्रशस्त होणार आहे. जेव्हां एखाद्या भयंकर रोगाची साथ येते, तेव्हां असल्या अपवादाची विशेष अवश्यकता दिसते. अशी सक्ती करणें नीट नसेल तर गांवोगांवीं आणि शहरोंशहरीं लोकांच्या किंवा सरकाराच्या खर्चानें अनाथ प्रेतांचे दहन करण्याचीं काही व्यवस्था झाली पाहिजे. लहानसहान गावीं पाटीलकुळकर्ण्यांवर यासंबंधानें बरीच जबाबदारी टाकण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. मोठ्या शहरांत हें काम मामलतदारावर व पोलिस अधिकाऱ्यांवर सोपवावें. होतां होईल तो, जो तो आपली व्यवस्था आपण करतो व करीलच. पण जर क्वचित् प्रसंगीं एखाद्याला ती करतां येत नसली, तर वर सांगितलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणा एकानें तरी अडचणींत असलेल्या मनुष्याकडून निरोप आल्याबरोबर, दहनापुरती लागेल तेवढी मदत त्यांस विलंब न लावतां कसेंही करून दिली पाहिजें; प्रसंगविशेषीं खुद्द त्यानें खांदा देण्यास तयार असलें पाहिजे.

स्मशानांत प्रेतें नेण्याच्या पद्धतींतही सुधारणा करण्यास पुष्कळ अवकाश आहे. कामाठी, जंगम, गोसावी वगैरे लोकांत प्रेतांचे स्वरूप होईल तितकें कमी

भयंकर करण्याच्या व प्रेतांच्या आप्तांच्या दु:खास होईल तितका विसर पाडण्याच्या इराद्यानें प्रेत नेण्याच्या योजना केल्या आहेत असें वाटते. केळीचे मखर बांधणें, सिंहासन किंवा देव्हारा करणें, फुलें पसरणें, धूपदीप जाळणें, व वाद्यें वाजविणें वगैरे गोष्टी केवळ आवश्यक आहेत असे नाहीं. तथापि कळकाच्या दोन तुकड्यांवर कडब्याची पेंढी दीडपेंढी पसरून तीवर प्रेत ठेवणें आणि मग त्याचे हात, पाय, डोकें वगैरे अवयव सुतळीने करकचून आंवळून बांधून मानेपर्यंत एक कोरें फडकें पसरणें आणि तोंड उघडे ठेऊन **बोलो भाई रामाचा** कर्णकटु आणि भयप्रद प्रचंड रव करीत तें स्मशानात नेणें हेही बरें नाहीं. प्रेताला अशा रीतीनें करकचून बांधण्याचा किंवा दोऱ्या कांचून तें खालीं पडण्याचा प्रसंग टाळतां येईल तर बरें होणार नाहीं काय? तसेंच प्रत्येक प्रेताला नवीन तिरडी तरी करण्याची काय गरज आहे? ज्याप्रमाणें भिक्षावळीला किंवा वरातीला पुणेमुंबईसारख्या शहरांत भाड्यानें पालख्या मिळतात त्याप्रमाणें प्रेतें नेण्यासाठीं विशेष रीतीनें तयार केलेल्या पालख्या आणि त्या वहाणारे प्रत्येक जातीचे भोई मिळूं लागले तर केवढी सोय होणार आहे! किंबहुना बैलांच्या लहानशा गाड्यांतून प्रेतें नेण्यास काय हरकत आहे? स्मशानांतील क्रिया चालविणाऱ्या कारट्यांनीं किंवा द्रव्य संपादण्यासाठीं येथें आलेल्या तेलंगी ब्राह्मणांनीं अशा जिनसांचा संग्रह केला तर त्यांचा पुष्कळ फायदा होणार आहे; तसेच या लोकांनीच गोवऱ्या, लाकडें, पेंड, कडबा, रॉकिल, कणीक, तीळ, गुलाल वगैरे वस्तु विक्रीस ठेवल्या तर नामी होणार नाहीं काय? सारांश, अमुक वयाच्या प्रेताच्या दहनाला अमुक रुपये दिले म्हणजे प्रेताच्या आप्तास कोणतीही दगदग पडेनाशी होईल तर श्रमविभागाच्या तत्त्वापासून आम्हांस अननुभूतपूर्व असे सुख होऊं लागणार आहे! ज्या ठिकाणीं प्रेत नेणारी माणसें मिळत नाहींत, व प्रेतें जाळण्याची जागा फार दूर असते, त्या ठिकाणी किती त्रास पडतो, याचा अनुभव साताराच्या लोकांना पाहिजे तर विचारावा! आपल्या देशांत प्रेतें गाडींत घालून नेण्याची चाल कधीं काळीं पडणार असेल तर ती प्रथम साताऱ्यास पडेल, यांत संशय नाहीं! गांवाच्या बाहेर नदीच्या किंवा ओढ्याच्या कांठीं प्रेतें जाळण्याचा जो परिपाठ आहे तो फार चांगला आहे. पण नदीचा कांठ धुंडाळीत लांब जावयाचें तरी किती? कोठें सातारा आणि कोठें माहुली? पण सातारचीं प्रेते माहुलीस नेल्याशिवाय गत्यंतर नाहीं! बरें एक प्रेत नेऊन तरी कोठें आटपतें? दुसरें किंवा तिसरे दिवशी राख गोळा करावयास गेलें पाहिजे, व दिवसही तेथेंच केले पाहिजेत!

राख गोळा करण्याचें काम म्युनिसिपालिट्यांकडे कां देऊं नये, हें आम्हांस समजत नाहीं! नानाप्रकारच्या रोगी मनुष्यांच्या राखा व हाडें नदींत किंवा ओढ्यांत

टाकून त्यांचे पाणी घाण करण्यापेक्षा म्युनिसिपालिट्यानीं असल्या राखा भरून नेण्याचा मक्ता एखाद्या केर वाहणाऱ्या कंत्राटदारास दिला तर गांवचें पाणी स्वच्छ राहून, म्युनिसिपालिट्यासही थोडेंबहुत उत्पन्न होईल! यावर कदाचित कोणी असा आक्षेप घेतील कीं, नदींत टाकलेल्या अस्थि परंपरेने जाऊन समुद्रास मिळतात, व त्याच्या पुण्योदकानें त्या पावन होतात! त्यावर आमचे असें उत्तर आहे कीं, एक तर त्या अस्थि समुद्रास जाऊन पोहोंचतात याला अनुमानाशिवाय दुसरें कांहीं सबळ प्रमाण नाहीं; पोहोंचलात तर कदाचित् त्यांचा एखादा तुकडा किंवा कण पोहोंचत असेल. पण अशा प्रकारच्या अनिश्चित साधनावर अवलंबून राहण्यापेक्षां त्या खात्रीनें समुद्रांत किंवा गंगेत जाऊन पडतील अशी तजवीज करणे कांहीं कठीण नाहीं. मुंबईच्या कारट्यांनीं व काशीच्या आणि प्रयागाच्या गयावळांनीं त्या समुद्राच्या किंवा गंगेच्या पाण्यांत टाकून देणाऱ्या एजन्स्या स्थापिल्या, व त्या टाकल्याबद्दल पावती पाठविण्याचा पत्कर घेतला, तर थोड्या खर्चांत केवढी कामगिरी होणार आहे? म्युनिसिपालिट्यांच्या नोकरांकडून पाहिजे ती हाडें आणवून ठेवावीं, आणि सवडीप्रमाणें हरणाच्या कातड्यांच्या किंवा रेशमाच्या लहानशा पिशवींत तीं घालून टपालानें मुंबईस, प्रयागास किंवा काशीस रजिस्टर करून पाठवावी म्हणजे दगदग न पडतां व पैसा खर्च न होतां, प्रेताची हाडें, क्षेत्रांत पडून त्याला सद्‌गति प्राप्त होईल, व त्याला ती प्राप्त करून देणाऱ्या इसमाच्या पदरी पुण्याची जोड होईल!

दुखवट्याच्या भेटी व लेख यांविषयीं येथें विशेष लिहिण्याची गरज नाहीं. निरनिराळ्या देशाचाराप्रमाणें अशा प्रसंगीं एकमेकांनीं भेटावयास जाऊन दोन उपदेशपर गोष्टी सांगणे व हातून कांहीं मदत होण्यासारखी असल्यास ती करणें हे सुधारलेल्या मनुष्यस्वभावास उचितच आहे. तथापि आमच्या देशांत या सभ्यपणाच्या रीतीपासून व्हावा तितका फायदा होत नाहीं. नवऱ्याच्या मरणासारखें स्त्रीवर दुसरे संकट नाहीं. तथापि अशा संकटाच्या वेळीं तिच्या नवऱ्याच्या अगदीं जिवलग मित्रांसही तिच्या उपयोगी पडतां येत नाहीं. नवरा जिवंत आहे तोंपर्यंत ज्यांच्याशी बोलण्याचालण्यास व कांहीं काम सांगावयास देखील तिला संकोच वाटत नसतो, त्या मित्रांना नवरा मेल्याबरोबर तोंड दाखविणें सुद्धां जर तिला दुरापास्त होते, तर त्यांच्यांशीं मन मोकळें करून बोलण्याचें धैर्य तिला कोठून होणार? काय करील बिचारी? केशकलाप दूर केलेलं मस्तक, कुंकूं पुसलेलें कपाळ, कांकणें वाढविलेलं हात, मंगळसूत्र तोडलेला गळा- अशा रीतीनें सर्व अवयवास विकलता आणून एका तांबड्या वस्त्रानें झांकलेला व अत्यंत अशुभ मानलेला देह परपुरुषापुढें घेऊन येण्यास त्या अनाथ अबलेचें धैर्य कोठून होणार?

भारतीय आर्यांनों, कुटुंबवात्सल्याविषयीं तुमची सर्वत्र प्रसिद्धि असून, अनाथ स्त्रीसंबंधानेंच तुम्ही इतके निष्करूण कां होतां बरें? स्त्री जात्याच अबला असल्यामुळें व तीं तुमच्या आदरास नित्य पात्र असतां, दुःसह दुःखाच्या ऐन भरांत तुम्ही तिचा असा दुर्वह छल कां करतां? तुम्हीं जें करतां तेच सर्वथैव वंद्य व कल्याणकारक आहे असा हट्ट धरून बसू नका. आपल्या सभोवतालची वस्तुस्थिती प्रतिदिवशीं कशी बदलत चालली आहे, तें डोळे उघडून पहा, आणि खऱ्या तत्त्वविचारास, खऱ्या नीतीस, व खऱ्या धर्मास मान्य अशा आचाराचा अंगीकार करा. श्राद्धानें, क्षौरानें, व वपनानें मृताला सद्गति प्राप्त होते, आणि परमात्मा समाधान पावतो, असल्या अज्ञानमय धर्मकल्पनांचा अव्हेर करा, आणि स्वातंत्र्य, समता, करुणा, वगैरे सर्वमान्य सद्‌गुणांचें संरक्षण व संवर्धन होऊन सर्वांची संसारयात्रा सुखावह होईल अशा धर्माचें अवलंबन करा. अशा रीतीनें लौकर वागूं लागलां तरच तराल; नाहीं तर ठार बुडाल!

*

सुधारणा आणि कलह

दुसरीकडे एका सोलापूरकर "अपरिचित मित्राचें" पत्र छापलें आहे. त्या पत्रावरून असें दिसेल कीं, अलीकडे समाजांत चाललेली चळवळ पाहून, विशेषत: सामाजिक अनेक प्रश्नांविषयीं जो चोहोंकडे खडाजंगी वादविवाद चालला आहे तो डोळ्यापुढें येऊन, या आमच्या "अपरिचित मित्राचें" डोकें बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें आहे! आणि तें ठीकच आहे. आपणांस अमुक दिशेनें अमुक ठिकाणीं जावयाचें आहे, असा संकेत करून ठेवल्याशिवाय, जे कोणी अफाट दर्यांत आपला पडाव घालतात, त्यांची अशीच अवस्था होते! वाऱ्याच्या प्रत्येक झुळकेनें त्यांच्या नौकेस हेलकावे बसतात इतकेंच नाहीं, तर तिच्या जोरानें ते भलत्याच दिशेस लागतात! आणि दुर्दैवानें एखादे प्रसंगी सोसाट्याचा वारा लागला तर त्याचीं शिडें, वल्हीं, व सुकाणूं हीं मोडून, एखाद्या अनेपक्षित खडकावर तें वहात जाऊन आदळतें, आणि त्यांतील उतारुंवर जलसमाधि घेण्याचा प्रसंग येऊन गुदारतो! तेव्हां ज्यांना निर्भयपणें दूरचें जलपर्यटण करावयाचें असेल, त्यांनीं त्या प्रवासास निघण्यापूर्वी सर्व प्रकारची नीटनेटकी तयारी केली पाहिजे. अगोदर ज्या बंदरास जावयाचें असेल तें आहे कोठें व किती लांब आहे; वाटेनें वरवा करण्याची किंवा वादळांत सापडल्यास आश्रय घेण्यासारखीं कोणकोणतीं ठिकाणें आहेत; ज्या जहाजांत प्रवास करावयाचा तें मजबूत आहे किंवा नाहीं; ज्या खलाशांच्या आणि तांडेलांच्या स्वाधीन आपले प्राण करावयाचे ते आपल्या कामांत पक्के वाकबगार आहेत किंवा नाहींत, आणि त्यांचेपाशी होका वगैरे समुद्रतरणास अवश्य लागणाऱ्या साधनांची हवी तशी सामुग्री आहे किंवा नाहीं- इत्यादि गोष्टींची नीट चौकशी करून, मग जलधिगमनास जे प्रवृत्त होतील; ते सहसा कोणत्याही प्रकारच्या धोक्यांत पडणार नाहींत, व पडले तरी त्यांतून सहज निभावतील! पण सामान्य लोक बहुधा इतकी काळजी घेत नाहींत, व त्यांनीं ती घेणें शक्यहीं नाहीं. जगाच्या सध्याच्या स्थितींत त्यांतील नऊदशांश लोकांस शुद्ध अंधाप्रमाणें कसें तरी चांचपडत त्यांतून निघून जावें लागतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बहुतेकांची अशी दशा आहे, म्हणून आम्ही त्यांचा उपहास करतो असे कोणीं समजूं नये. निरुपायास्तव त्यांना तसें करावें लागतें, हें आम्हांस पक्कें

ठाऊक आहे. मनुष्य वयांत येण्यापूर्वी व बऱ्याच विषयांचें बरेंच ज्ञान संपादण्यापूर्वी संसारांत पडेल, आणि रात्रंदिवस त्यांत चूर होऊन राहील, तर जग चाललें आहे कोणीकडे व त्यानें जावें कोणीकडे, हें त्याला नीटपणें समजण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें समोर येऊन भिडलेल्या शत्रूंशीं लढण्यांत निमग्न झालेल्या शिपायांस आपण आहों कोठें, व चाललों आहों कोणीकडे, यांचे भान रहात नाहीं, त्याप्रमाणें संसारसमरांत मेटाकुटीने झगडणाऱ्या सामान्य सांसारिकांस समाजाची खरी स्थिति आहे कशी आणि ती असावी कशी, हें समजत नाहीं. ज्याप्रमाणें समुद्रपृष्ठावर सुयंत्र नौका चालविणें हें सुकर्णधराचें काम आहे, किंवा लढाईत गुंतलेल्या शिपायांस योग्य हुकूम सोडणें हें थोड्यां अंतरावरून रणदिनचर्येचें शांत दृष्टीनें अवलोकन करणाऱ्या सेनापतींचे काम आहे, त्याप्रमाणें समाजाची स्थिति कशी आहे, व समाजास कोणतें वळण लागावें, याची चर्चा करून निश्चय करणें हेंही एका प्रकारच्या विशेष व्यक्तींचे काम आहे. जन्मास आल्यासारखें होईल तेवढें स्वहित साधण्यांत व अहोरात्र प्रपंचांत गढून असण्यांतच ज्यांना जीवितसार्थकता वाटत नाहीं; सुदैवानें ज्यांना दोन अक्षरें प्राप्त झाली आहेत, विचार करण्याची ज्यांस हौस आहे, उद्योग करून ज्ञान संपादण्याचा ज्यांना छंद लागला आहे; प्राणिमात्राची, विशेषत: मनुष्याची आणि त्यांतल्या त्यांत स्वदेशबांधवांची विपत्ति कमी व्हावी, अशी ज्यांना स्वाभाविक इच्छा असून, तदनुसार थोडेंबहुत तरी वर्तन करण्याची सोय आहे- अशांनीं सामाजिक विषयाच्या वाटाघाटींत पडणें विशेष श्रेयस्कर होणार आहे, असें आम्हांस वाटतें. पण बहुतेकांचा असा समज नसतो. वैद्यक, चित्रकला, गायन, सुतारकाम, वक्तृत्व, शिवणकाम किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही उद्योगास लागणारें चातुर्य अंगीं नसल्यास तें नाहीं, असें उघडपणें कबूल करण्यास किंवा तशा प्रकारचें एखादें काम कर, असें कोणीं सांगितल्यास, त्याची मला माहिती नाही, आणि म्हणून तें मला करतां येणार नाहीं, असें म्हणण्यास कोणालाही बहुधा लाज वाटत नाहीं. पण राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक विषयांविषयी अशा प्रकारचें अज्ञान कबूल करण्यांत बहुतेकांस मोठी शरम वाटते! दहा वर्षांच्या पोरापासून अक्षरशत्रु व विचारानभिज्ञ साठ वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत किंवा म्हातारीपर्यंत वर सांगितलेल्या विषयांत, विशेषत: सामाजिक व धार्मिक विषयांत, आपण पटाईत नाहीं, व दुसऱ्यास पढविण्याचा व नियम घालून देण्याचा आपणांस अधिकार नाहीं, असें वाटणारें शेंकडा पांच इसम निघतील किंवा नाहीं, याची बरीच शंका आहे! तथापि कांहीं अंशीं ज्याला त्याला असें वाटत असणें, हें अपरिहार्य आहे. राजकीय, सामाजिक, व धार्मिक आचारांची व कल्पनांची प्रत्येकास थोडीबहुत ओळख असते; तसेंच

ज्या आचारांत, ज्या कल्पनांत आपण वाढतों त्या कितीही दोषार्ह असल्या तरी रोजच्या रहाटीमुळें यांची दोषार्हता लक्षांत येत नाहीं. इतकेंच नाहीं, तर त्याच प्रशंसनीय व सुखावह वाटूं लागतात, आणि त्यांहून भिन्न आचार व कल्पना विशेष श्लाघ्य व कल्याणप्रद असतील, अशी शंका देखील येत नाहीं! उलट ज्याप्रमाणें ज्वर आलेल्या मनुष्यास जें अन्न स्वत:च्या तोंडांत घालवत नाहीं तें दुसरी माणसें मोठ्या आवडीनें खात आहेत, असें पाहून मोठें आश्चर्य वाटतें इतकेच नाहीं, तर त्यांचा तो आधाशीपणा पाहून कधी कधीं कळमळूनही येतें. त्याप्रमाणें ज्यांना सामाजिक व धार्मिक विषयांविषयीं विशेष विचार करण्यास अवकाश सांपडलेला नाहीं, त्यांना आपणांस न रुचणारे तत्संबंधक विचार अत्यंत अमंगळ व तिरस्करणीय वाटतात यांत कांहीं नवल नाहीं! असल्या विचारांचें ताट त्यांचेपुढें आलें कीं त्यांस उमळून येतें व त्यांचेपुढें ते आणणारांवर ते क्रुद्ध होतात! तथापि ज्याप्रमाणे दुखणेकऱ्याचे हिंतचिंतक सुज्ञ आप्त किंवा ममताळू वैद्य त्यांच्याकडून त्यांतील पदार्थांचे होईल तेवढें सेवन कधीं धाकानें व कधीं आर्जव करून करवितात, त्याप्रमाणें सामाजिक व धार्मिक भिषक् आपल्या विचाररूप 'अप्रिय पण पथ्यकारक' अन्नाचा स्वीकार आपल्या देशबांधवांकडून अळेंबळें करवितात!

वरील लेखांत गर्वोक्ति आहे, असें कोणींही समजूं नये अशी आमची प्रार्थना आहे. विषयाच्या ओघांत असें लिहिणें भाग पडल्यावरून लिहिले आहे! राजकीय, धार्मिक व सामाजिक, विशेषत: शेवटल्या दोन विषयांविषयीं आज दोन अडीच वर्षे सुधारकांत जे विचार प्रसिद्ध होत आहेत, त्यांना वेडेवाकडें असले तरी एक ठरीव वळण आहे, एवढें तरी हें पत्र बरेच वेळां ज्यांनीं वाचलें असेल त्यांच्या ध्यानात येऊन चुकलें असेल. सामान्य लोकमतांहून भिन्न मतांचा स्वत: स्वीकार करून, शिवाय स्वदेशबांधवांत त्यांच्या प्रसार करण्याच्या हेतूनें थोडाबहुत लोकापवाद, उपहास व त्रास सोसण्यात जे प्रवर्त होत असतील त्यांनीं ते भिन्न विचार जाणूनबुजून व बऱ्याच शोधाअंतीं पतकरलें असतील, असें साधारण प्रतीच्या उदार व समंजस लोकांस कबूल करणे भाग आहे. तसेंच ज्यांनें आपल्या मनाशी बरीच ''भवति न भवति'' करून असल्या विचारांचा अंगीकार केला आहे, तो अडाणी म्हणजे अशा गोष्टींचा विशेष काथ्याकूट ज्यानें केलेला नाहीं; अशा प्रतिपक्ष्यांनी केलेल्या चमत्कारिक प्रश्नांस बुजणार नाहीं, किंवा त्यांचीं साफ उत्तरें देण्यास डरणार नाहीं, हेंही त्यांस मान्य केलें पाहिजे. आमच्या 'अपरिचित मित्रानें' आम्हांस जे प्रश्न केले आहेत, त्यासंबंधानें तो बराच 'अपरिचित' असावा, असें आम्हांस वाटतें. तथापि अशा प्रकारच्या प्रश्नांना आम्हांस

उचित वाटतात तीं उत्तरें देऊन, आपल्या प्रतिपक्ष्यांकडून किंवा उलट विचारांच्या लोकांकडून पक्षांतर किंवा विचारांतर करावें, हाच या सुधारकाच्या अवताराचा मुळ हेतु असल्यामुळें, आजपर्यंत अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें देण्यांत आलीं आहेत, व पुढेंही तसें करण्यांत येईल. यावरून आमच्या 'अपरिचित मित्रानें' असें समजूं नये कीं, ज्या शंका किंवा जे प्रश्न त्यास निरुत्तर किंवा अनुत्तर वाटताहेत, त्यांचें समाधान करणें कांहीं तरी लपंडाव करून आम्ही कलांतरावर टाकतों आहों. वास्तविक पहातां तसें करण्याचें बिलकुल प्रयोजन नाहीं. तथापि त्याने हें ध्यानात ठेविलें पाहिजे कीं, पत्रें पाठविणारांकडून ज्या शंका येतील त्यांचीं उत्तरें देत बसण्याचा प्रघात पडल्यास, अशा विषयाविषयीं ज्या पद्धतीनें लिहीत गेलें असतां, ते आमच्या वाचकांस सुगम होतील, असें आम्हांस वाटत आहे ती पद्धत आम्हांस सोडून द्यावी लागेल, आणि पत्रलेखकांच्या लहरीप्रमाणें या विषयावरून त्या विषयावर आम्हास उतरावें लागेल. असा प्रकार आम्हांस सोईचा नाहीं, व वाचकांस आवडणार नाहीं, तथापि 'अपरिचित मित्रास' अगदींच निराश करणें हेंही बरें नाहीं, म्हणून त्याच्या प्रश्नांपैकी कांहींस अगदीं स्वल्प उत्तरें देतों. एवढ्यानें त्याची समजूत होईल, असें नाही. तथापि नाईजास्तव त्यानें तेवढ्यातच गुजारा करून घेतला पाहिजे. आमच्या सोलापूरकर 'अपरिचित मित्राचे' जे चार प्रश्न आहेत त्यावर आम्ही दिलेलीं उत्तरें त्यास मानवतील, किंवा तीं सर्वांशीं बरोबर असतील, असाही आमचा अभिमान नाहीं. तथापि तीं चुकीचीं आहेत अशी आमची खातरी होईतोंपर्यंत आम्हीं ती बरोबर समजणार! आमच्या मित्राच्या प्रश्नांस उत्तरें देण्यास आरंभ करण्यापूर्वी, पुराणप्रिय मनुष्यांच्या अंत:करणांतील एका सामान्य प्रवृत्तीविषयीं येथे थोडासा उल्लेख करणें जरूर आहे. ती प्रवृत्ति ही- कांहीं मनुष्यें जुन्या चालीस व जुन्या विचारांस चिकटून असतात, किंवा आपण त्यास चिकटून आहों असें तरी त्यांना वाटत असतें- ही एका प्रकारच्या मनुष्यांची गोष्ट झाली. दुसऱ्या प्रकारचे लोक आसमंत स्थिति फिरली आहे असें पाहून, तिला अनुकूल असें वर्तनांतर आपण व दुसऱ्यांनी करावें असें इच्छितात, आणि जेवढ्या हितावह नवीन गोष्टी आपल्या हातून होण्यासारख्या असतात, तेवढ्या स्वत: करूं लागून त्यांचा चांगुलपणा लोकांच्या नजरेस आणितात, आणि त्या लोकांनीं कराव्या असा उघडपणें उपदेश करतात. या दोन प्रकारच्या लोकांत वास्तविक पाहतां विशेष अंतर नसतें. दोघांचेंही कमी अधिक प्रमाणानें वर्तनांतर होतच असतें; कारण, आसमंत स्थिती बऱ्याच अंशीं बदलली असतां वर्तनांतर होऊं न देणें ही मनुष्यांच्या आटोक्याबाहेरची गोष्ट आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, येथें मुसलमानांचा अंमल

होण्यापूर्वी येथील लोकांचें जें वर्तन होतें, तें ५।६ शें वर्षांच्या अमलांत अगदीं कायम राहिलें असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. तसेंच, येथे इंग्रजी राज्याचा पाया पडल्यापासून आतांपर्यंत ज्यांच्या वर्तनावर त्यांच्या अंमलाचा बिलकुल परिणाम घडला नाहीं, असा एकही इसम मिळणार नाहीं असें वाटतें. इंग्लिश लोकांनीं स्थापिलेली राज्यपद्धती, इंग्लिश लोकांकडून मिळत असलेलें शिक्षण, इंग्लिश लोकांशीं होत असलेला सहवास, इंग्लिश पद्धतीचे कारखाने, गिरण्या, आगगाड्या, तारायंत्रे, आगबोटी इत्यादि गोष्टींनी येथील सर्व वर्गांतल्या, सर्व पदवींच्या, व सर्व वयाच्या लोकांच्या वर्तनांत अलीकडील शंभर वर्षांच्या अंमलामुळें बराच फेरफार झाला आहे, यांत काडीमात्र संशय नाहीं. तथापि जे पुराणप्रिय लोक आहेत त्यांना आपण जशाचे तसेच आहों असें वाटत आहे! ज्याप्रमाणें वेगानें चालणाऱ्या आगगाडींत किंवा आगबोटीत, अथवा झपाट्यानें उडणाऱ्या विमानांत असणारांस आपण अगदीं स्थिर आहों, पण सभोंवतालच्या वस्तु मात्र वेगाने हालत आहेत असा दृग्भ्रम होतो, त्याप्रमाणें या लोकांच्या मनाची स्थिति असते. यांत आणि सुधारकांत भेद एवढाच कीं, ज्या दिशेला हे लोक कधीं नकळत व कधीं निरुपायास्तव इच्छेविरुद्ध जात असतात, त्याच दिशेला सुधारक जाणूनबुजून व मार्गांत जे अडथळें असतील ते होतील तितके दूर करून संतोषानें जात असतात. 'बालविवाहाचा' पगडा बराच कमी झाला आहे; 'स्त्रीशिक्षणाचा' प्रसार झपाट्याने होत आहे; 'विधवावपन' बरेंच मागें पडत चाललें आहे, शेंपन्नास 'स्त्रीपुनर्विवाह' झाले आहेत, व थोड्या वर्षांत त्यांची संख्या बरीच होऊन त्यांतील अधर्मतेचा व अप्रशस्तपणाचा भाग नाहींसा होईल, अशी चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत; 'संमतिवया' चा कायदा तर पसार होऊन गेला. या गोष्टी डोळ्यांपुढें धडधडीत घडून येत असतां किंवा आल्या असतां, व कामधंद्याच्या आणि प्रवासाच्या निमित्तानें नानाप्रकारच्या जातींच्या व आचारविचारांच्या लोकांचे संघटन होतें त्यामुळें धर्मविषयक, समाजविषयक व राज्यविषयक विचारांत व कल्पनांत प्रतिदिवशीं अंतर पडत असतां, जे कोणी आम्ही आहों तेथेंच आहों, व तसेंच करणें आम्हांस हितावह आहे असें विधान करतात, त्यांस अंध म्हणावें, का भ्रांतिष्ट म्हणावें, का वृथाभिमानी आणि हट्टी म्हणावें, हें आम्हास समजत नाहीं, तात्पर्य, सामान्य लोक कोणत्याही नवीन आचारास किंवा विचारास तो रूढ होईतोंपर्यंत नांवें ठेवीत असतात, व जेव्हां त्यांना न कळत किंवा समजूनउमजून ते त्यांच्या कक्षेंत सांपडून तींत भ्रमण करूं लागतात, तेव्हां ते त्यास नांवे ठेवीनासे होतात, असा साधारण नियम आहे, व हाच नियम त्यांस प्रत्येक गोष्टींत लागू पडतो असें दिसून आलें आहे. तेव्हां

स्त्रियांची दास्यस्थिति नाहींशी करणें, हिंदुधर्माचें संशोधन करून त्यास निर्विकल्प स्वरूप आणणें, किंवा जातिभेदाचें निर्मूलन करून ज्याला त्याला स्वत:च्या शारीरिक व मानसिक सामर्थ्यानुरूप स्वहितसाधन व परहितसाधन करूं देणें-वगैरे ज्या सुधारणांविषयीं अर्वाचीन **सुधारक** विचार करूं लागले आहेत, उघडपणें बोलूं लागले आहेत, व सामर्थ्यानुरूप आचरण करूं लागले आहेत, त्या सुधारणांच्या पाशांत हे स्वत:स 'सुधारणानिंदक' ,'सुधारणाद्वेष्टे' किंवा 'पुराणप्रिय' म्हणवून घेणारे लोक सांपडलें असून, त्यांच्या मनात असो किंवा नसो, भारलेल्या किंवा तोंडें बांधलेल्या चालत्या बोलत्या वस्तूंप्रमाणें ते त्यांच्या पाठीमागें जात असतां, जाणूनबुजून त्यांचा अंगीकार करणारांचा ते उपहास करीतात, किंवा कधीं कधीं त्यांचा छल करण्यासही प्रवृत्त होतात, हा केवढा चमत्कार? किंवा यांत चमत्कार तरी कसला? तो त्यांचा प्रकृतिगुणच आहे, आणि प्रकृतिगुणानुसार आचरण करण्याबद्दल त्यांना विशेष दोष लावणें हेंही उचित नाही. अशा लोकांकडून होणारा अडथळा व त्रास याबद्दल त्यांचा तिरस्कार न करतां, **मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन ह्या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणास न भितां, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त, कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हेंच त्यास उचित आहे.** अशा रीतीनें वागत असतां, जर पूर्वपद्धतीचा कोणी मनुष्य त्यास असा प्रश्न करील की, तुम्ही बोलता त्याप्रमाणें वागत कां नाहीं? तर त्यावर असें उत्तर द्यावें कीं, हा प्रश्न विचारण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं. तुम्हांस जीं मतें मान्य आहेत त्याप्रमाणें किंवा ज्या शास्त्रकारांस तुम्ही पूज्य मानतां, त्यांच्या आज्ञेप्रमाणें ज्या दिवशीं तुम्ही आपलें वर्तन ठेऊन दाखवाल,त्या दिवशीं हा प्रश्न तुम्हीं मला करण्यास या. तोंपर्यंत तुम्हांला जो मार्ग प्रशस्त वाटेल त्यानें तुम्ही जा, आणि मला वाटेल त्यानें मी जातो! असें खरमरीत उत्तर दिल्याशिवाय, उठल्याबसल्या सुधारकांच्या नांवानें खडे फोडणाऱ्या जुन्या कोल्ह्यांचें तोंड कोणासही बंद करतां येणार नाहीं! जुन्या पिढींतील लोकांत दुराचार व अधर्म काय थोडा आहे? खोटें बोलणें, पैसा खाणें, प्रशस्तपणें हिंदु किंवा अहिंदु जातीच्या अंगवस्त्राशीं व्यवहार ठेवणें वगैरे गोष्टीं सदोष आहेत, असेंही त्यांपैकी बऱ्याच जणांस वाटत नाहीं! वर्षप्रतिपदेपासून फाल्गुन वद्य अमावस्येपर्यंत अशा प्रकारच्या आचारांत गढून गेलेल्या लोकांनीं हव्या त्या यात्रा करून, दर पौर्णिमेला व अमावस्येला सगळ्या तोंडाचें क्षौर करविलें, महिन्यांतून चारपांच उपवास केले, मधून मधून ब्राह्मण जेऊं घातले, व प्रतिदिवशीं देवांच्या डोक्यावर फुलांच्या, दूर्वांच्या, व बिल्वपत्रांच्या लाखोल्या वाहिल्या, किंवा श्रावणी पौर्णिमेस

पंचगव्याच्या पंचपात्र्याच्या पंचपात्र्या पिऊन फस्त केल्या, तरी त्यांना अलीकडील आर्यसमाजाच्या, प्रार्थनासमाजाच्या, किंवा ब्रह्मसमाजाच्या कोणत्याही अनुयायांस दोष देण्यास अधिकार प्राप्त होतो, असे आम्हांस वाटत नाहीं; तसेंच हलवायाच्या घरची मिठाई, आगगाडींतल्या लाडू-करंज्या, आणि भाज्यांच्या गाडींतल्या किंवा तट्टावरच्या भाजणीच्या दशम्या शुद्ध म्हणून बिनदिक्कत खाणाऱ्या मनुष्यानें स्टेशनावरील घटांतले (चाटींतलें) पाणी, सोडावॉटरची बाटली, किंवा मेसमनानें आणून दिलेला चहाचा पेला यांनीं आपली तहान भागविणाऱ्यांस; किंवा पेपरमिठाच्या वड्यांचा, जंताच्या मोदकांचा, आणि इंग्रजी दवाखान्यांतील हवें ते औषध नि:शंकपणे घेणारानें भुलेश्वराच्या बाजारांतील भाज्या किंवा पुऱ्या विकत घेऊन, अथवा स्टेशनावरील फरलँडिसपासून किंवा नवरोजीपासून बिस्कुटांचा डबा घेऊन त्यावर आपली भूक भागविणारांस, धर्मभ्रष्ट म्हणून कां हंसावें, हें सांगणें कठिण आहे. तथापि धार्मिक व सामाजिक विषयांत सामान्य लोक स्वतंत्रपणे विचार करणारे असते, व अंधपरंपरेंसारखें गतानुगतिक नसते, तर येवढाली धर्मयुद्धे आणि घनघोर सामाजिक रणे कशाला झालीं असतीं? एकंदरींत थोड्याबहुत कलहाशिवाय मनुष्याचें पाऊल पुढें पडून, त्यास कोणत्याही प्रकारची उन्नतावस्था येणें अशक्य दिसतें, हें खरे असेल तर स्थाणुवत् आचरण करणारे जुने लोक **सुधारकांवर** हरएक गोष्टींत तुटून पडूं लागले तर त्यांनी तरी त्यांची येवढी मुर्वत कां ठेवावी, हें आम्हांस समजत नाहीं. प्रीति प्रीतीस व अवज्ञा अवज्ञेस प्रसवते, ही गोष्ट सर्वांनीच ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

आतां आमच्या मित्राच्या चार प्रश्नांस देववतील तितकीं स्वल्प उत्तरें देऊन या आजच्या सरमनाचा शेवट करून ''आमेन'' म्हणतों! सोलापुरकर 'अपरिचिता'चा पहिला प्रश्न असा आहे कीं, ''समाजांत एकंदर सुधारणा हव्यात तरी कोणत्या?'' **सुधारकाला** असा प्रश्न करणें म्हणजे, काय झालें असतां तूं **'सुधारक'** या 'पदवी'चा त्याग करण्यात तयार होशील, असें त्यास विचारण्यासारखेंच आहे! यावर त्यांचें उत्तर एवढेंच आहे कीं, बालविवाहाचें नांव नाहींसें झालें, प्रत्येक स्त्रीस शिक्षण मिळू लागले, विधवावपन अगदीं बंद झालें, स्त्रीपुनर्विवाह सर्वत्र रूढ झाला, व संमतिवयाच्या कायद्यासारखे अनेक कायदे पसार झाले तरी त्याची ''तृप्ति'' होण्याचा संभव नाहीं! त्याच्या सुधारणाबुभुक्षेस मर्यादाच नाहीं, असें म्हटले तरी चालेल! ज्याप्रमाणें समुद्राला नद्यांचा, चितेला प्रेतांचा, लोभ्याला द्रव्याचा, दुर्वासाला अन्नाचा, कर्णाला दानाचा, व धर्माला शांतीचा कंटाळा कधीं येत नाहीं किंवा आला नाहीं, त्याप्रमाणें **खऱ्या सुधारकाला** सुधारणेचा वीट येण्याचा कधीच संभव नाहीं. मनुष्याच्या स्थितीत पूर्णता येणें

बहुधा अशक्य आहे; पण ती येईतोंपर्यंत **सुधारकाच्या** मनाची शांति व्हावयाची नाहीं! तेव्हां अमुक झालें म्हणजे तुम्ही आपले तोंड बंद कराल काय? किंवा तमुक झालें म्हणजे स्वस्थ बसाल काय? असले वेडगळपणाचे प्रश्न त्यास करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यास अवश्य वाटत असेल ती सुधारणा झाल्यावर तो कदाचित् कांहीं दिवस विश्रांति घेईल, किंवा इतर गोष्टींत दुसऱ्यांशीं ऐक्य ठेवण्यासाठीं आपल्या विचारांचें घोडें फारसें पुढं ढकलणार नाहीं; पण तेवढ्यावरून त्याला सुधारणेचा किळस आला आहे, असें कोणींही समजूं नये. सध्या आपल्या देशांत ज्या सुधारणांची वाटाघाट चालली आहे त्या अमलांत आल्यावर जातिभेद मोडणें, धर्मसुधारणा करणें, मदिरा व मांस यांचें सेवन बंद होणे वगैरे अनेक गोष्टींकडे लोकांचें लक्ष लागलें पाहिजे. सर्वांत सार्वजनिक शिक्षणाची फार अवश्यकता आहे. हिंदुस्थानांतील एकूण एक प्रौढ स्त्रीपुरुषांस लिहितां वाचतां आलें पाहिजे; तसेंच प्रत्येक व्यक्तींस आपला चरितार्थ चालविण्यासारखा एखादा तरी धंदा येत असला पाहिजे. सारांश, वयांत आलेल्या कोणत्याही व्यक्तीस आपल्या उदरनिर्वाहासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी येऊ नये असें झालें पाहिजे. इतकेंच नाहीं, तर सहजगत्या उदरपोषण करतां येऊन दिवसाचा कांहीं वेळ आत्मचिंतनाकडे, आवडत्या शास्त्राच्या अभ्यासाकडे, मनास रुचेल ती करमणूक करण्याकडे, किंवा विश्रांतीकडे लावतां आला पाहिजे. या सर्व गोष्टी घडून येण्यास किती शतकें लागतील हें सांगतां येत नाहीं. पण ज्याअर्थी 'अपरिचित मित्रानें' समाजांत सुधारणा हव्यात तरी कोणत्या? असा प्रश्न केला आहे, त्याअर्थी कांहीं ठळक सुधारणांचें येथें दिग्दर्शन करणें भाग पडलें.

सोलापूरकराचा दुसरा प्रश्न असा आहे कीं, **सुधारक** तरी म्हणावे कोणाला? यावर आमचा असा उलट प्रश्न आहे कीं, सुधारकाच्या वर्तनावर किंवा विचारावर टीका करण्यास अधिकार तरी आहे कोणाला? जोपर्यंत या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कोणाकडूनही आलें नाहीं, तोपर्यंत **सुधारक** कोणास म्हणावें? **सुधारकाची** पदवी मिळण्यास कोणत्या प्रकारची योग्यता अंगीं असली पाहिजे? स्वधर्माचा, स्वाचारविचारांचा व देवांचा कंटाळा करून सुधारकपण येतें की काय? इंग्लिश लोकांच्या अनुकरणांत सुधारकपणा किती आहे? वगैरे निंदाप्रचुर प्रश्नांचें उत्तर देत बसण्याची गरज नाहीं. या प्रश्नांत गर्भित केलेल्या अर्थाची व्याख्या कोणत्याही सुधारकानें दिलेली नाहीं. अशा अर्थाची व्याख्या सुधारकांचे निंदक करतात. निंदकानीं केलेल्या व्याख्येकडे सुधारकांनीं लक्ष कां द्यावें हें समजत नाहीं. सुधारकांस निराळ्या प्रकारचें शिक्षण मिळालें असल्यामुळें त्यांचे राजकीय, सामाजिक, व धार्मिक विचार निराळ्या तऱ्हेचे बनले आणि म्हणून त्यांना पूर्वीचे

विचार नापसंत होऊं लागले, तर त्यांत त्यांचा काय दोष आहे? मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन अति गलिच्छ रीतीनें जो म्हारवाड्यांत आपलें आयुष्य काढतो; अशा मनुष्याच्या आचारविचारांत आणि एखाद्या पर्वताच्या शैलावर पिकलेलीं पानें खाऊन आत्मानात्मविचारांत सर्व जन्म काढणाऱ्या योग्याच्या विचारांत केवढें अंतर असलें पाहिजे बरें? सुधारणा करण्याचा विचार मनांत येण्यास आपल्या रीतीहून भिन्न रीति, आपल्या विचारांहून भिन्न विचार, आपल्या कल्पनांहून भिन्न कल्पना, आपल्या शास्त्रांहून भिन्न शास्त्रें, आपल्या धर्मांहून भिन्न धर्म, आपल्या भाषेहून भिन्न भाषा, आपल्या पेहरावाहून भिन्न पेहेराव- वगैरे अनेक गोष्टी अवलोकनांत येऊन त्यांपैकी बऱ्या कोणत्या व वाईट कोणत्या, याचा निवाडा करतां येण्यासारखें बुद्धिसामर्थ्य असलें पाहिजे. इंग्रजांचें राज्य होऊन, आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून अशा प्रकारच्या तारतम्याचा विचार करण्यास आम्हांस बरीच संधि सांपडूं लागली आहे. पण इंग्लिश लोकांच्या आणि आमच्या आचारविचारांत बरीच तफावत असल्यामुळें, व चांगुलपणाचें पारडे त्यांच्या अंगास झुकत असल्यामुळें, त्यांचें आचारविचार उचलण्याकडे ज्यांच्या मनाची प्रवृत्ति होते ते, ज्यांना पाश्चिमात्य शिक्षण न मिळाल्यामुळें जसेच्या तसेच राहिले आहेत अशा पूर्वपद्धतीच्या लोकांच्या द्वेषास पात्र होतात. पण या कलहाचा आणि द्वेषाचा लौकरच अंत होणार आहे. थोड्या वर्षांत पहिली खोडें नाहींशी होतील, आणि नवीन आचारविचारांचें चोहोंकडे साम्राज्य होईल. असें झाल्यावर पिढीपिढींत जेवढा मतभेद स्वाभाविकपणें होत जातो, तेवढ्यामुळेंच होणारा कलह मात्र या देशांत दृष्टीस पडूं लागेल. अशा प्रकारचा कलह सर्व काळीं सर्व देशांत कमी अधिक प्रमाणानेंच दृष्टीस पडतो. पण सध्या अगदीं भिन्न अशा दोन सुधारणांचें संघटन झालें असल्यामुळें उभयतांचा मोठाच संग्राम माजून राहिला आहे. थोड्या दिवसांनीं हिंदु सुधारणेच्या बऱ्याच भागांस पड खावी लागून रणांगणांतून आपला पाय काढून घ्यावा लागेल, आणि तिच्या जागीं विजयशाली पाश्चिमात्य सुधारणेचा बराच भाग स्थापित होईल. हिंदु लोकांच्या कमाईत जेवढा चांगला भाग आहे तेवढा गमावण्याची कोणासही भीति नको. जें चांगलें आहे तें कोणीही टाकीत नाहीं. तात्पर्य, फार थोड्या काळांत पूर्वपश्चिमसुधारणांतील अत्यंत हितकारी भाग जींत सामील झाले आहेत; अशा एका नामी सुधारणेची येथें स्थापना होऊन, भारतीय आर्य अननुभूतपूर्व अशा आधिभौतिक व आध्यात्मिक सुखाचा उपभोग घेऊं लागतील, असा आमचा तर्क आहे!

सोलापूरकराच्या तिसऱ्या व चौथ्या प्रश्नांचीं उत्तरें आतां निराळीं देण्याची गरज उरली नाहीं. सुधारकांना हिंदु धर्माचा कंटाळा आला आहे कीं काय?

धर्मावांचून मूढ जनांचा निर्वाह होईल किंवा नाही? श्री. शंकराचार्यांकडून धर्मसुधारणा करून घेतां येईल कीं नाहीं?- वगैरे नानाप्रकारच्या प्रश्नांस नानाप्रकारचे सुधारक नानाप्रकारचीं उत्तरें देऊं शकणार आहेत; व या नानात्वांतच सुधारणेचें रहस्य आहे! तथापि या प्रश्नांवर जीं आमचीं उत्तरें आहेत, त्यांचा आम्हीं ध्वनि तर केलाच आहे. याहून ज्यांना आमचीं मतें विस्तृत रीतीनें जाणण्याची इच्छा असेल, त्यांनीं सुधारकाचें वाचन नित्य सुरू ठेवावें! याशिवाय त्यांचे समाधान करण्याचा दुसरा मार्ग नाहीं, याबद्दल आम्हांस मोठी दिलगिरी वाटते!

*

गुलामांचें राष्ट्र

हिंदु लोक कायदे पाळणारे आहेत, अशी साहेब लोकांच्या तोंडून आमची स्तुति कधी कधी ऐकूं येत असते. भाषेनें, धर्मानें, आचारानें, अगदी भिन्न अशा देशांतील कांहीं इसमांनीं व्यापाराकरतां येथें येऊन शेपन्नास वर्षांत, पहिली पादशाही व इतर अंमल पादाक्रांत केले व आजपर्यंत कोणत्याही लोकांस ठाऊक नाहीं अशी अफाट सार्वभौमसत्ता स्थापिली, ही ऐतिहासिक पूर्वपीठिका ध्यानांत ठेविली असतां लॉर्ड क्लाइव्ह व वॉरन हेस्टिंग्ज यांचे जे तीन सव्वातीन लाख देशबांधव आजमितीस या देशांतील तीस कोटी प्रजेचें राज्य अव्याहत करीत आहेत; त्यांनीं आमच्या राजनिष्ठेची तारीफ करावी, आणि आम्हांस नियमभीरुत्वाचें वारंवार सर्टिफिकीट उर्फ शिफारसपत्र द्यावें, हें अगदी स्वाभाविक नाहीं काय? लोकांत कायदे पाळण्याची हौस असणें हा आम्हीही मोठा सद्गुण समजतों. ज्या लोकांच्या अंगीं हा सद्गुण नसेल त्यांना शांतीचा फारसा उपभोग मिळणार नाहीं, व शांतीवर अवलंबून असणाऱ्या शास्त्रांचा व कलांचा प्रसार त्यांत होणार नाहीं. तात्पर्य, शास्त्रज्ञांनीं घालून दिलेल्या नियमांचा अंतःकरण पूर्वक प्रतिपाल करणें, हेंच मनुष्यसुधारणेचें मुख्य कारण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण हें पालन दोन भिन्न हेतूंमुळें घडून येत असतें. इतकेंच नाही, तर हेतुभेदाप्रमाणें त्याच्या परिणामांत मोठा भेद दिसून येतो. कोणत्याही कायद्यामुळेंच जुलूम किंवा त्रास होत असला तर एकदम त्या कायद्याच्या विरुद्ध न जातां योग्य रीतीनें तो रद्द करविण्याची किंवा त्यांत फेरबदल करण्याची खटपट करणें, आणि ती खटपट तडीस जाईतोंपर्यंत त्यापासून होणारी पीडा निमूटपणें साहणें हें नियमपालन, दंडाच्या, तुरुंगाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही शिक्षेच्या भयानें कायद्याचा जुलूम वर्षेच्या वर्षे बिनतक्रार सोशीत रहाणें याहून अगदीं भिन्न आहे. हवा तो मनुष्य कायदा आपल्या हातांत घेऊन समाजांत अनवस्था उत्पन्न करील तर तीपासून सर्वांचेंच नुकसान होणार आहे, अशी पक्की खातरी झाल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांचा अंमल न तोडणें हें जितकें प्रशंसनीय आहे, तितकेंच शुद्ध भेकडपणामुळें युगेच्या युगें पारतंत्र्यांत राहणें खऱ्या मनुष्यपणास अत्यंत लाजिरवाणें आहे. मनुष्यत्व प्राप्त झालें असून गृहपशूप्रमाणें सदैव वागणाऱ्या,

व उन्नतावस्था प्राप्त होण्याबद्दल कोणत्याही प्रकारचे परिश्रम न करणाऱ्या लोकांस, मनुष्य म्हणण्यापेक्षां पशूच म्हणणे विशेष प्रशस्त आहे, व असले मनुष्यपशू किंवा नरपशू जगांतून होतील तितके लवकर नष्ट होऊन त्यांचे जागीं स्वोन्नतीसाठी एकसारखे झटणारे लोक येणे, हेंच इष्ट आहे! शुष्क स्वाभिमान एकीकडे ठेऊन जर आपण विचार करूं लागलों तर आपणांस असे कबूल करावें लागणार नाहीं काय कीं, हिंदुस्थान देशासारख्या प्रचंड देशांत हिंदु लोकासारख्या, भेकड, निरुद्योगी, उत्साहशून्य व तारतम्य न जाणणाऱ्या कोट्यवधि मनुष्यकीटकांनीं वास्तव्य करण्यापेक्षां इंग्लिश, फ्रेंच, जर्मन किंवा अमेरिकन लोकांसारख्या लोकांनी ही भरतभूमि आपलीशी करण्यांत जगाचा विशेष फायदा आहे? जोपर्यंत कोणताही रोग सुसाध्य किंवा कष्टसाध्य वाटत आहे तोंपर्यंत त्याच्या परिहारासाठी होईल तेवढा प्रयत्न करणें हें योग्य व अवश्य आहे; पण तो एकदां पराकाष्ठेचा दुःसह झाला व असाध्य ठरला म्हणजे त्याच्या अनंत यातना सोसणाऱ्या रोग्याचे डोळे जितके लौकर मिटतील तितके बरे, असे मनांत येणें दूषणीय आहे, असे आम्हांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच गुलामगिरी ज्या लोकांच्या हाडामांसास खिळून गेली आहे, व स्वतंत्र राष्ट्रमालिकेंत जे राष्ट्र कधींही गुंफले जाण्याची आशा नाहीं, असें राष्ट्र अजिबात नष्ट झालें तर कांहीं वावगें नाहीं, असें कोणी म्हणेल तर त्याला समर्पक प्रत्युत्तर देतां येणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या नेहमी अंकित रहाणें हे योग्य आहे असें समजणें म्हणजे मनुष्याच्या दोन पृथक जाती आहेत, व एकीचे पशूंशी विशेष साम्य असून सहजगत्या तीस मनुष्यपदवी देण्यांत आली आहे, असें म्हणण्यासारखें होय. प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे जुन्या ग्रीक तत्त्ववेत्त्याचा कांहीं अंशीं अशा प्रकारचा समज होता, व सांप्रत कालींही दुर्बल परक्या लोकांवर राज्य करणाऱ्या बलाढ्य राष्ट्रांतील कांहीं इसमांच्या तोंडूनही मधून मधून अशा प्रकारचे उद्‌गार निघतात. पण अलीकडे या मतास सामान्य विचारी मनुष्य बहुधा संमति देत नाहीं. हेलिनिक (ग्रीक) लोक मात्र राज्य करण्यास योग्य आहेत असा बुद्धिवाद आतां कोणी ऐकणार नाहीं. प्रयत्नानें पाहिजे त्या लोकांस पाहिजे ती स्थिती प्राप्त करून घेतां येणार आहे, असें वळण अलीकडील राज्यविषयक विचारास लागलें आहे. तथापि जर कोणी समाधानपूर्वक असें सिद्ध करून देईल कीं अमुक लोकांचे पाऊल कांहीं केले तरी पुढें पडण्याची आशा नाहीं, तर असे लोक केव्हां तरी समूळ नष्ट होतील असें म्हणणें हें खोटें तर्कशास्त्र नाहीं, किंवा असे लोक त्वरित नष्ट व्हावें अशी इच्छा करणें हें कोणत्याही नीतिशास्त्राला सदोष म्हणवणार नाहीं. हिंदु लोक या थराला येऊन पोंचले आहेत किंवा नाहींत याचा निश्चय आजच आमच्यानें करवत नाहीं; तथापि ते त्या अवस्थेप्रत

पावले आहेत, असें कोणास वाटत असेल तर तें बऱ्याच अंशीं सकारण होणार आहे. राष्ट्राचें ऐक्य होण्यास लागणारा एक तरी गुण आम्हांत भरपूर आहे काय? धैर्य नाहीं; उत्साह नाहीं; बल नाहीं; ज्ञान नाहीं; तर्क नाहीं; उद्योग नाहीं; कला नाही; खरा देशाभिमान नाहीं; खरी धर्मश्रद्धा नाहीं; खरें बोलण्याची किंवा खरें आचरण करण्याची संवय नाहीं; सारांश चांगले असें कांहीं नाहीं. ज्याची त्याची अहोरात्र वर्तमान क्षुद्र स्वार्थावर दृष्टि लागली असल्यामुळें आपल्या विचाराचा व आचाराचा भावी सततीवर काय परिणाम होणार, याचा कोणीही फारसा विचार करीत नाहीं. उदाहरणार्थ, अलीकडील राष्ट्रसभेची चळवळ घ्या. ही चळवळ आम्हास सर्वथैव कल्याणकारक व्हावी अशी तिची योजना केली आहे. कोणालाही उघडपणें या चळवळीत जाऊन मिळण्यास हरकत दिसत नाहीं. असें असून तीविषयीं केवढी हेळसांड ती पहा! अगदी खालच्या प्रतीच्या लोकांनीं अजून तिचें नांवही ऐकले नसेल. तेव्हां त्यांच्याकडून तिला द्रव्यद्वारा मदत होण्याची अपेक्षा करणें म्हणजे दुधाच्या आशेनें पारठ्या गाईचें आचळ ओढीत बसण्यासारखें होय! जे मध्यम प्रतीचे लोक आहेत, व ज्यांना या संस्थेचें महत्त्व समजत आहे, ते देखील तिला हवी तेवढी मदत करीत नाहींत हें आश्चर्य नव्हे काय? ह्यांच्या कांसा शुष्क नाहीत, पण राष्ट्रसभा ही आपलें वासरूं आहे, असें यांस वाटत नसल्यामुळें, हे आपल्या कासेला त्यास बिलकुल तोंड लावूं देत नाहीत! पण याहीपेक्षा विशेष चमत्कार व विस्मय वाटण्यासारखी गोष्ट ही कीं, ज्या ह्यूमसाहेबानें ही राष्ट्रसभा अस्तित्वांत आणिली आणि आपलें सामर्थ्यसर्वस्व खर्च करून तिचें हरएक प्रकारें आज सात वर्षें संरक्षण केले त्यावर त्याच्या जातभाईंनी राजद्रोहाचा बडगा उचलतांच आमच्यांतले शहाणेसुर्ते म्हणविणारे कांही लोकही त्यावर तुटून पडूं लागले! खासा न्याय! खासे धैर्य! खाशी देशभक्ती! हिंदुस्थानच्या काळींचें उत्पन्न सुमारें वीस कोटी रुपये आहे, व तेवढाच लष्करी खात्याचा खर्च आहे, हिंदुस्थानच्या सैन्याइतके महागडें सैन्य दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं, व या सैन्यावर होणाऱ्या धिप्पाड खर्चाचा बराच भाग हिंदु लोकांच्या खिशांत पडत नाहीं. जवळ जवळ याचप्रमाणें इतर खात्यांचीही व्यवस्था आहे. त्यामुळें हिंदुस्थानच्या पाऊणशें किंवा ऐंशी कोटी उत्पन्नापैकी सुमारें दोनतृतीयांश उत्पन्नापासून आम्हांस द्रव्यद्वारा कवडीचाही मोबदला मिळत नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असा प्रकार एक वर्ष नाहीं, दोन वर्षें नाहीं, सुमारे शंभर वर्षें चालला आहे. या शंभर वर्षांत हिंदुस्थानचें उत्पन्न सरासरीनें चाळीस कोटी पडले असें धरिलें, आणि त्याचा फक्त अर्धा भाग प्रतिवर्षीं इंग्लिश लोकांच्या खिशांत अचानक पडला असें मानिलें, तरी एका शतकांत दोन निखर्व रुपये या

देशांतून परदेशांत गेले, असा हिशोब होतो. ज्या देशाच्या द्रव्याला असा पाझर लागला आहे, त्या देशांतील लोकांना अन्नान्नदशा प्राप्त होणें हें किती स्वाभाविक आहे? इंग्रजी राज्यापासून या देशावर घडणाऱ्या या भयंकर परिणामाची पुरी कल्पना ज्यांच्या मनांत पक्की बिंबली असेल त्यांना, आणखी पांच पंचवीस वर्षे असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानांतील लोक एकमेकांस खाऊं लागतील, किंवा भुकेच्या दुःसह यातनांमुळें बेफाम होऊन जाऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचे जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील, असें डोळ्यांपुढें ढळढळीत दिसून आल्यावांचून राहील काय? व ज्यांच्या अंतःकरणांत खऱ्या देशाभिमानाचा व खऱ्या मनुष्यपणाचा कांहीं अंशी आहे, त्याला ही गोष्ट उघडपणे बोलल्यावांचून रहावेल काय? ह्यूमसाहेबांनीं आपल्या पत्रांत याहून अधिक काय म्हटले आहे? हिंदुस्थानच्या भयप्रद दारिद्र्याचे त्यांत जें भयंकर चित्र काढलें आहे तें खोटें आहे असें म्हणण्याची कोणाची छाती आहे? दादाभाई नौरोजी, सर एव्हेलियन बेअरिंग, डॉक्टर हन्टर, सर चार्लस् डिल्क वगैरे बहुश्रुत गृहस्थ तर राजद्रोही नाहींत ना? पण त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या हिशेबावरूनही असें उघड होतें की, ब्रिटिश अंमलांतील मनुष्याचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें तीन रुपयांपेक्षां अधिक नाहीं; तसेंच हिंदुस्थानांतील निम्मे किंवा दोनतृतीयांश लोक अर्ध्या पोटी सारा जन्म काढतात! राजनिष्ठ लोकांनीं अशी जबानी दिली असून ॲंग्लोइंडियन पत्राबरोबर आमच्या लोकांनीं ह्यूमसाहेब अतिशयोक्ति करतात, ह्यूमसाहेब पराचा कावळा करतात, वार्धक्यामुळें ह्यूमसाहेबांस वेड लागल्यासारखें झालें आहे, असें बरळणें हा केवढा प्रमाद व कृतघ्नपणा होय! चार साहेब लोकांकडून बरें म्हणवून घेण्यासाठीं हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या खऱ्या हितचिंतकावर अशा रीतीनें उलटून पडणे हें आम्हां भेकड, लोभी, अविचारी, व स्वार्थी हिंदु लोकांशिवाय दुसऱ्या कोणाच्यानेंही होण्यासारखें कर्म नाहीं. ज्यांनीं ह्यूमसाहेबांस भ्रमिष्ट ठरविलें आहे, त्यांनाच तसें ठरविणें विशेष उचित होणार आहे! ह्यूमसाहेबांसारखी आमची आम्हांस कळकळ असती तर राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाही आरोप आपणांवर आणून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास आम्ही तयार झालों असतों. ह्यूमसाहेबांस बेवकूफ ठरविणाऱ्या या वृद्ध शहाण्यांना येवढें तरी समजावयाला पाहिजे होतें की, ह्यूमसाहेबांस अगोदर फांशीं चढविल्याशिवाय फांसाचे पदर आपल्या गळ्याभोंवती बसण्याचा संभव नाहीं. पण इतकें धैर्य आमच्या अंगीं असतें तर आमची सांप्रत दास्यावस्था आम्हांस कोठून आली असती?

कोणताही नवीन प्रघात रूढ होण्यापूर्वी त्याला तीन पहाऱ्यांतून जावें लागतें. पहिला पहारा मनाचा, दुसरा वाणीचा, आणि तिसरा आचरणाचा. यांपैकीं प्रत्येक

पहाऱ्यांतून जात असतां त्याला 'मज्जाव' झाल्याखेरीज राहत नाहीं! लोकोत्तर पुरुषाची गोष्ट एकीकडे राहूं द्या; शेंकडा नव्याण्यव लोकांस नवीन कल्पना सुचत नाहीं, व सुचली तरी तिला डोक्यांत थारा द्यावा असें त्यांस वाटत नाहीं. सामान्य मनुष्याचें डोकें पूर्वापार चालत चाललेल्या व लहानपणापासून अनेक द्वारांनीं संपादिलेल्या साधारण कल्पनांनीं ठिक्कीसारखें गच्च भरून गेलेलें असतें. त्यांत एखादी नवीन कल्पना शिरूं देण्यास त्याला अतिशय प्रयास पडतात. खचून भरलेल्या व सुतळीनें तोंड शिवलेल्या पोत्याचे दोन तीन टांके तोडून त्यांतील पायली दोन पायली धान्य बाहेर काढल्याशिवाय ज्याप्रमाणें त्यात नवीन धान्य साठविणें शक्य नसतें, त्याप्रमाणें वेड्यावाकड्या विचारांनीं ज्याच्या मनांतील तीळन्तीळ जागा व्यापून टाकली आहे, त्याच्या मनांतील वतनदार होऊन बसलेल्या कांहीं विचारांस हुसकून लाविल्याशिवाय तेथें नवीन विचारांची डाळ मुळीच शिजत नाही! कोणतीही गोष्ट आचारांत आणण्यापूर्वी किंवा तिजविषयीं लोकांत चर्चा सुरू करण्यापूर्वी ती चांगली आहे, अशी ज्याच्या त्याच्या मनांत पक्की खात्री झाली पाहिजे. एकांतात बसला आहे; स्वच्छ उदकाप्रमाणें किंवा आरशाप्रमाणें मनाचे दर्पण पुढें मांडिलें आहे, आणि त्यांत प्रतिबिंबित झालेल्या विचारांचें व कल्पनांचें हुबेहूब स्वरूप अवलोकन करीत आहे; अशा स्थितींत आगंतुक विचाराचें प्रतिबिंब त्या दर्पणांत पडूं देऊन त्याच्या रूपाची व आकाराची इतरांच्या रूपाशीं व आकाराशीं तुलना करण्यास भीति कशासाठी वाटावी? अभ्यासाच्या खोलीचें दार लाऊन घेऊन मनाच्या कपाटाचीं दारे खुली टाकण्यास व त्यांतून पाहिजे त्या विचारांस बाहेर पडूं देण्यास व पाहिजे त्यांस आंत शिरूं देण्यास ज्यांची छाती होत नाहीं, तो मनुष्य कुचक्या कसपटापेक्षांही नादान होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण असलेच मनुष्य जगाच्या सांप्रत जेथें तेथें फार आढळतात; निदान हिंदुस्थानांत तरी ते असावे त्यापेक्षां फार फाजील आहेत; आणि हा फाजीलपणाच आमच्या चिरकालीन दैन्यावस्थेस आद्य कारण झाला आहे. स्वतंत्रपणें विचार करतां करतां तो बोलून दाखविण्याचें धैर्य येतें, व बोलतां बोलतां क्रिया करण्याचीही इच्छा उत्पन्न होते. मननाच्या देवडींतून जी कल्पना जोराने निसटते ती वाचेच्या किंवा कायेच्या देवडीवरील रखवालदारांस फारशी डगणारी नसते! मनांतल्या मनांत पाहिजे त्या विषयाविषयी हवा तसला विचार करण्यास कशाचीही भीति नसतां, पुष्कळांचीं मनें तसें करण्यास कां कचरतात कोण जाणें. बहुधा त्यांना अशी दहशत वाटत असेल कीं, जे विचार लोकमतानें अश्लाघ्य किंवा त्याज्य मानले आहेत त्यांना आपण आपल्या मनांत आश्रय दिला; तर कदाचित् आपल्या मनांतील चांगल्या विचारांस ते हुसकून लाऊन त्यांची

जागा बळाकावतील; आणि या आगंतुकांचें एकदां कां वर्चस्व झालें म्हणजे आपल्या तोंडावाटे ते बाहेर पडू लागतील, आणि न जाणों आपल्या आचरणावरही त्यांचा परिणाम होऊ लागून त्याबद्दल लोक आपणांस दूषण देऊं लागतील. नवीन विचाराविषयीं मनांत जी दुर्मुखता दृष्टीस पडते तिचे खरें कारण हेंच असेल, व त्यामुळें इतके लोक विचाराच्या कामीं गतानुगतिक होत असतील तर आम्हांस जी स्थिति प्राप्त झाली आहे, ती अगदी स्वाभाविकपणें प्राप्त झाली आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाही; कारण या देशांत अशाच लोकांचा भरणा फार आहे; व ह्या भरण्याचें प्रमाण असेंच राहणार असेल तर देशाचें डोकें वर निघण्याची आशा करणें शुद्ध वेडेपण होय. पृथ्वीवर आजपर्यंत जे स्वतंत्र व सुखी देश होऊन गेले आणि आजमितीस ज्या देशांत ती सुखें नांदत आहेत, त्या देशांत मधून मधून स्वतंत्रपणें विचार करणारे अनेक पुरुष होऊन गेले व होत आहेत, हें स्पष्टपणें दाखवितां येणार आहे. अशा पुरुषांकडून वेळोवेळीं बऱ्यावाईटाची चर्चा झाल्याखेरीज कोणत्याही देशाची प्रगति होण्याचा संभव नाही. अपसर्गकारी कारणांचा लय आणि उत्सर्गकारी कारणांची उत्पत्ति व अभिवृद्धि झाल्याशिवाय जिला आपण सुधारणा म्हणतो ती कशी होणार! ज्या गोष्टीपासून त्रास किंवा अडचण होते त्या दूर करणें, आणि ज्यांपासून सोय व सौख्य होतें त्या जवळ आणणें याचेंच नांव सुधारणा. तेव्हा चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट कोणत्या, याचा विचार करण्यासच जर कोणी तयार नसेल, व यदाकदाचित् तसें करण्यास कोणी प्रवृत्त झाला असतां त्याची विटंबना होईल, तर चांगल्यावाईटांचें परीक्षण होणार कसें आणि जें चांगले असेल तें लोकांपुढें येऊन ते त्यांच्या अंगीकारास पात्र होणार कसें? कोणतीही गोष्ट अंमलांत आणण्यापूर्वी तिचा हवा तितका खल करण्यास आमची बिलकूल हरकत नाहीं. इतकेंच नाहीं, तर तसें झाल्याखेरीज सामान्य लोकांनीं कोणत्याही नवीन गोष्टीचा स्वीकार करू नये असें आमचें मत आहे. पण जेवढें जुने तेवढें निर्दोष व चांगलें असा आग्रह धरून बसून जर कोणीं नवीन गोष्टीचें चिंतन व चर्चा करणार नाहीं; तर रूढ विचारांतले व आचारांतले प्रमाद दूर होणार कसे, व नवीन विचारांचे व आचारांचे चांगुलपण प्रस्थापित होऊन ते रूढ होणार कसे? आपल्या देशांतील लोकांस नवीन विचारांची जशी भीति वाटते तशी दुसरी कोणत्याही देशांतील लोकांस वाटत नसेल. उदाहरणार्थ, देव आहे किंवा नाहीं, हा प्रश्न आपला आपणास विचारण्याची कितीकांची छाती होणार आहे? तसेंच वेद पौरुष आहेत कीं अपौरुष आहेत; जातिभेद अस्तित्वांत कशामुळें आले, व ते चट्सारे मोडून टाकले असतां काय परिणाम होतील; मुंज, लग्न वगैरे संस्कार केव्हां, कोणीं, व कशासाठी स्थापिले, आणि ते मुळींच नाहींसे

केले तर काय होईल; पुरुषाप्रमाणें स्त्रियांनीं अविवाहित राहण्यास किंवा वाटेल तेव्हां हवें त्याशीं लग्न करण्यास काय हरकत आहे; पुरुषांप्रमाणें स्त्रियांस सारें राजकीय हक्क कां देऊं नये, एका बायकोनें पांचचार नवरे करण्यास, अथवा दहापांच लोकांनी पांचचार बायका ठेवण्यास किंवा करण्यास प्रत्यवाय कां असावा; जेवढीं रोगी व कुरूप मुलें अस्तित्वांत येतील तेवढीं एकदम मारून टाकण्याबद्दल कायदा कां नसावा; ज्या रोग्यांचे रोग वैद्यांच्या मतानें असाध्य ठरतील, व ज्या रोग्यांचें जीवित रोगांच्या असह्य यातनांमुळें अत्यंत कष्टमय झालें आहे, अशांस विष किंवा गोळी घालून यातनामुक्त कां करूं नये; रक्तपितीच्या रोग्यासारखे रोगी मोठ्या नदींत किंवा समुद्रांत बुडवून त्या रोगाचा बीमोड करण्यास काय हरकत आहे; पाहिजे त्याला पाहिजे त्या स्त्रीशीं समागम करण्याची परवानगी दिल्यास काय परिणाम घडतील; व्यक्तीचा अथवा कुटुंबाचा संपत्तीवरील हक्क नाहींसा करून देशांतील साऱ्या संपत्तीचे सारे लोक समाईक मालक कां न मानावे; आळीपाळीनें साऱ्यांस साऱ्या तऱ्हेंची कामें करण्यास लावून उच्चनीचत्वाचा भाव मोडून टाकण्याचा प्रयत्न कां करूं नये; लोकसत्ताक राज्यपद्धतीशिवाय इतर प्रकारच्या राज्यपद्धती नाहींशा करण्यास काय हरकत आहे; वगैरे प्रश्नांचा आपापल्या मनाशीं शांतपणानें विचार करण्याची गोष्ट तर राहूंच द्या, पण असले प्रश्न कानावर पडल्याबरोबर ज्यांचें धाबें गडबडणार नाहीं, व हे ऐकल्यानें आपल्या हातून मोठें पाप घडलें असें ज्यांस वाटणार नाहीं, असें किती लोक सापडणार आहेत? तथापि एका कालीं वैभवाच्या शिखरास चढलेल्या युरोपांतील कित्येक देशांतल्या तत्त्ववेत्त्यांनी, मनुष्यानें आपल्या आईशीं किंवा सख्ख्या बहिणीशी लग्न करण्यास काय हरकत आहे, किंवा ज्याला त्याला लग्न करण्याची व संतती वाढविण्याची सदर परवानगी असण्यापेक्षां ज्याप्रमाणें जातिवंत घोडे उत्पन्न करण्यासाठीं आपण विशेष प्रकारच्या व्यवस्था करतो, त्याप्रमाणें सदृढ व सुरूप मनुष्य उत्पन्न करण्यासाठीं मनुष्यपोळ संस्थानच्या खर्चानें कां ठेऊं नयेत, अशाही प्रश्नांचा यथास्थितपणें विचार केला आहे. इतकेंच नाही, तर त्या प्रश्नांस त्या तत्त्ववेत्त्यांनीं जीं उत्तरें दिलीं आहेत, त्यांच्या अनुरोधानें त्या देशांतील राज्यकर्त्यांनीं अनेक विलक्षण संस्था स्थापून त्या देशाच्या विचारांवर, नीतीवर, वर्तनावर, व इतिहासावर आश्चर्यकारक परिणाम घडवून आणिला. युरोप खंडातील जुन्या ग्रीक लोकांसारखे लोक या पृथ्वीतलावर पुन: अवतरतील किंवा नाही याची बरीच शंका आहे. या अद्भुत लोकांनी आपल्या विचारविहंगमांत पाहिजे तेवढ्या उंचीच्या भराऱ्या हव्या त्या दिशेनें मारू दिल्यामुळें, ते पराकाष्ठेचे काल्पनिक लोक ठरले आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांनीं आपल्या शौर्यानें जे पराक्रम केले

व बुद्धिसामर्थ्यानें ज्या अनेक शास्त्रांचे पाय घातले, ते आज अडीच तीन हजार वर्षानंतर शोधक विचारी लोकांच्या प्रशंसेस पात्र होत आहेत! तसेंच, राजकीय विषयांत रोमन लोकांनी जी कीर्ति संपादिली, ती मनुष्यजातीच्या अन्तापर्यंत टिकेल असें खात्रीनें म्हणता येणार आहे. युरोपांतील अर्वाचीन राष्ट्रें आज हजारपांचशें वर्षे प्लेटो, ॲरिस्टॉटल, जस्टिनिअन वगैरेंच्या ग्रंथाचें प्रेमपुरःसर चालन व अध्ययन करीत आहेत, पण अजून त्यांची तृप्तीच झाली नाहीं. तेव्हा त्यांचा त्यांस कंटाळा येण्याचें नांव कशाला पाहिजे? बरें, पण अलीकडील युरोपिअन लोकांना ग्रीक व रोमन लोकांविषयीं येवढी पूज्यबुद्धि आहे म्हणून ते त्यांचे दोषाविष्करण करण्यास मागेंपुढे पहातात, असे मात्र कोणीं समजतां कामा नये. त्यांच्या करामतीबद्दल तें त्यांची अतिशय प्रशंसा करतात हें जरी खरें आहे, तरी त्यांची प्रमादस्थलें ते कधीही छपवीत नाहींत. असा प्रकार कोणाकडून झालाच तर तो थोडाबहुत तिकडील धर्माभिमान्यांकडून होतो! आमची गोष्ट याहून अगदीं निराळी आहे. जें जें म्हणून जुनें आहे तें सारें आम्हांस निर्दोष, पूज्य व संरक्षणीय वाटतें. आमच्या मनाच्या या खोडीमुळें जमिनींत खोल पुरलेल्या खांबाप्रमाणें आमची स्थिति झाली आहे! जुन्या वेदांतापलीकडे वेदांत नाहीं; जुन्या गणितांपुढें गणित नाहीं; जुन्या अलंकाराहून अलंकार नाहींत; जुन्या व्याकरणापुढें गति नाहीं; जुन्या न्यायापेक्षां दुसऱ्या न्यायांत अर्थ नाहीं! असल्या भ्रमामुळें आमचे डोळे बांधल्यासारखे होऊन आज कित्येक शतकें तेल्याच्या बैलाप्रमाणें आम्ही जुन्या शास्त्रांच्या आणि पुराणांच्या घाण्याभोंवती घिरट्या घालीत आहों! हें आमचें परिभ्रमण केव्हां संपेल तें संपो; पण यांतून आमची सुटका झाल्याखेरीज कोणत्याही शास्त्रांत किंवा कलेंत आमचें पाऊल पुढें पडण्याचा संभव नाहीं. सायणाचार्य, पाणिनी, मंमट, दंडी, चरक, सुश्रुत, भास्कराचार्य वगैरे फार मोठे पुरुष होऊन गेले असें रोज सकाळी उठून म्हणा; आणि त्यांस व त्यांच्या ग्रंथांस पाहिजे तर साष्टांग नमस्कार घाला. पण यापलीकडे त्यांच्या नांवाचे पवाडे गात बसण्यांत किंवा त्यांच्या ग्रंथांना पुनः पुनः प्रेमानें कवटाळण्यांत काय अर्थ आहे? त्यांत जेवढा ग्राह्यांश असेल तेवढा अलबत् घ्या, व त्याचें काळजीपूर्वक रक्षण करा. पण त्यांच्या कृतींत जीं दोषस्थळें असतील तीं काढून टाकून तींत नवीन भर टाकण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तुमचा निभाव कसा लागेल? पुढील उपमेबद्दल कदाचित् कोणास वाईट वाटेल, पण सारासार विचार करतां एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेप्रमाणें आम्हां भारतीयांचीं स्थिति झाली आहे, असें आम्हांस वाटतें! पतिनिधनामुळें नवीन संतानाची आशा खुंटलेली ती गतभर्तृका ज्याप्रमाणें असलेल्या अपत्यांचें वारंवार दृढालिंगन करून 'आमचे पुरुष असे

होते, आमच्या पुरुषांनीं असें केलें, आमच्या पुरुषांनीं तसें केले' अशी प्रकारचे गुणानुवाद गाण्यांतच आपलें समाधान मानून घेतें, व आपल्या जीविताची कृतार्थता समजते, त्याप्रमाणें जुन्या थोर पुरुषांचे गुण गाण्यांतच आमच्या पुरुषार्थाची परमावधी होऊन बसली आहे!

आमचे लोकांस स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय किती कमी आहे, आणि तीमुळे आमचें किती नुकसान होत आहे, हें मागल्या अंकांत थोडक्यांत सांगितले. आज उघड बोलण्याच्या कामीं आम्ही किती भेकड आहों, हें पहावयाचें आहे.

आपल्या मनाशीं स्वतंत्रपणें विचार करण्यापेक्षां मनास शुद्ध वाटेल तें बेधडक बोलणें हें विशेष कठिण असल्यामुळे त्या मानानें आमचा भेकडपणाही विशेष व्यक्त होतो. पण भेकडपणास बहुधा तीन कारणें होतात; एक गुरुभय, दुसरें राजभय, व तिसरें लोकभय. गुरु शब्दांत ज्या आप्तांवर आपण अवलंबून असतों, ज्यांनी आपणांवर अनेक द्वारांनीं उपकार केलेले असतात, आणि ज्यांच्यापासून मागेंपुढें आपणांस पुष्कळ फायदा होण्याचा संभव असतो, अशांचें मन दुखावेल, आणि ते आपणावर रागावल्यामुळें आपलें नुकसान होईल, अशा प्रकारच्या भीतीस 'गुरुभय' म्हटलें आहे. वरिष्ठाची मर्जी खप्पा होईल, अधिकारी द्वेष करतील, व राजा दंड करील अशा भीतीनें त्यांना असंमत असलेल्या गोष्टींचा उच्चार न करणें, हा राजभयाचा परिणाम म्हणण्यास हरकत नाहीं. या दोन भयाहून इतर साऱ्या भयांचा एक व्यापक लोकापवादभयांत समावेश केला तरी चालेल, देवभयाचा येथें विचार करण्याची गरज नाहीं; कारण दैविक दोषाचे परिणाम प्रत्यक्ष व तात्कालिक नाहींत! शिवाय वडील, राजा व लोक यांना ज्या गोष्टी अप्रशस्त वाटतात त्याच देवांसही अप्रशस्त वाटतात. यांना प्रशस्त वाटत असून देवास अप्रशस्त वाटणारी गोष्ट सहसा सांपडावयाची नाहीं; आणि म्हणून जो ह्या ऐहिक त्रिकुटाची मर्जी खप्पा होऊं देणार नाहीं, तो बहुतकरून देवांच्या मर्जीसही उतरल्यावांचून रहाणार नाहीं!

चिंतन, चर्चा, आणि आचार यांचें राज्य, धर्म व रीति हे तीन मुख्य विषय होत व राजा, गुरु, आणि लोक हे त्यांचे मुख्य नियामक होत. या तिघांच्या अनुरोधानें पहिल्या तीन गोष्टी दुसऱ्या तीन विषयांच्या संबंधानें घडत असतात. पैकीं पहिली म्हणजे चिंतन अथवा मनन, ज्याचें त्यानें आपापल्या तब्येतीप्रमाणें चालविण्यास हरकत नाहीं असें आम्हांस वाटतें. बापाला वैदिक धर्म मान्य असून मुलानें आपल्या मनांत बौद्ध धर्म चांगला आहे असें ठरविलें, तर त्यानें पित्याची अवज्ञा केली असे कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. लढाई करावी असें राजाचें मत असून तह करावा असें विचाराअंतीं प्रधानास वाटलें, तर त्यावर राजद्रोहाचा

आरोप कोणीही ठेवणार नाहीं. चंद्राला ग्रहण लागतें तें राहूने त्यास ग्रासल्यामुळें लागतें, व स्नानावांचून आणि दानावांचून द्विजाचा तत्संबंधक दोषपरिहार होत नाहीं, असा सामान्य लोकांचा ग्रह असला तरी भास्कराचार्यासारख्या गणितज्ञानें राहू म्हणजे चंद्रावर पडणारी पृथ्वीची छाया असें मानण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही. जोपर्यंत हा सारा मतभेद ज्याच्या त्याच्या मनाशीं थबकून राहिला आहे तोंपर्यंत सारें ठीक आहे; कारण ज्याअर्थी कोणत्याही व्यवहाराला त्यामुळें म्हणण्यासारखा बाध येत नाहीं, त्याअर्थीं तो नसल्यासारखाच आहे. तथापि व्यक्तिविशेषाला त्यापासून कांहींच फायदा नाहीं असें नाहीं. वरील तीन भयांपैकीं कोणत्याही भयामुळें मनुष्याला आपले विचार बोलून दाखविण्याची छाती होत नसली तरी सामान्य लोकांची पावलें श्रमामुळें व अज्ञानामुळें वेडीवांकडी पडत आहेत; वारंवार त्यांस ठेंचा लागत आहेत; ज्ञानरश्मीचा मार्गदर्शक प्रकाश नसल्यामुळें मूढतेच्या गाढ विचारात त्यांस चाचपडावें लागत आहे; व असें हाल सोसावे लागत असूनही आम्ही सरळ मार्गानें चाललों आहों, आम्हांला वाटाड्याची किंवा मशालीची गरज नाहीं, आणि अशा रीतीनें आयु:पथ आक्रमिला तरच आम्ही सुखी राहून आमचें वर्तन देवादिकांस मान्य होणार आहे- अशा प्रकारच्या वल्गनांचा अहोरात्र घोष करणाऱ्या मूर्खांची दुर्दशा पाहून, ज्ञात्यास जो विस्मय व आनंद होतो त्याची गोडी त्यावांचून इतरांस कधीही समजावयाची नाहीं, व अशा गोडीचा उपभोग तो घेत असतां सामान्य ऐंद्रिय सुखांचें क्षुद्रत्व त्याच्या अनुभवास आल्यावांचून रहाणार नाही! आमच्या स्मशानांतील अत्यंत अमंगल व भयप्रद विधि; आमच्या गतर्भतृकांशी अमानुष वागणूक; आमच्या श्रावण्यांतील हास्यास्पद कवायत; आमच्या लग्नांतील मूर्खपणाचे सोहळे; आमचे उत्सव व तत्संबंधक मुक्तद्वार अन्यव्यय; धुळवडीसारखे आमचे खेळ- वगैरे गोष्टींचे अवलोकन करून, अनेक प्राचीन व अर्वाचीन विचारी पुरुषांस आमच्या धार्मिक व सामाजिक विचारशून्यतेबद्दल वाईट वाटलें असेल, तिरस्कार उत्पन्न झाला असेल, व कदाचित् करुणाही आली असेल. ज्ञानबलामुळें मनाची जी अशा प्रकारची स्थिति होते; तींत ते व्यग्र होऊन गेले असतां तत्त्वज्ञास जें समाधान होतें त्यापुढें त्याला सार्वभौमत्व देखील कस्पटाप्रमाणें वाटतें! तेव्हां स्वतंत्रपणें विचार करण्यापासून प्राप्त होणाऱ्या अशा प्रकारच्या असामान्य मानसिक सुखासाठी व धैर्यासाठीं तरी मनास त्याची होईल तितकी संवय लावणें फार अवश्यक आहे. पण त्याचे परिणाम बहुधा येथेंच थांबत नाहींत. बाहेरील दडपण फारच जबरदस्त असलें तर मात्र गोष्ट निराळी; बाकी कोणत्याही प्रकारच्या विचारांचें मनांत पक्कें वर्चस्व प्रस्थापित झाल्यावर त्यांचा भाषणावर व आचरणावर परिणाम घडल्यावाचून

रहात नाही; कारण कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाच्या संबंधानें आपल्या जातिबांधवांची चूक होत आहे, त्यांतील खरें तत्त्व आपणास पक्कें समजलें आहे, अशी ज्याची खातरी झाली आहे, त्याला मनाच्या स्वाभाविक चांचल्यामुळें वारंवार असा उमाळा येऊं लागतो कीं, आपणांस जें तत्त्व समजलें आहे त्याची होईल तितकी प्रसिद्धि करणें, व इतरांकडून हरएक प्रयत्नानें त्याचा अंगीकार करविणें हें आपले आद्यकर्तव्य किंवा चैतन्य कारण आहे. असल्या विचाराचा मनांत एकवार संचार झाला म्हणजे तो चैन पडूं देत नाहीं. निजतांउठतां, बोलतांचालतां, खातांपितां, सारांश; प्रत्येक क्रिया करतांना ती गोष्ट डोळ्यापुढें दिसूं लागून ज्याप्रमाणें कंसाचें मन कृष्णमय झालें त्याप्रमाणें त्याचे तन्मय होतें. अशी अवस्था झाल्यावर कोणाच्याही भयास्तव मनुष्याला आपले विचार गुप्त ठेवणें अशक्य होतें! तेव्हां आतां प्रश्न असा आहे कीं, ज्याचें मन त्याच्या स्वाधीन आहे अशी कल्पना केली; तर इतरांस असंमत असे आपले विचार त्यानें कोणासाठीं किती वेळ व्यक्त करूं नये.

पुष्कळांचे म्हणणें असें पडतें कीं, तुम्ही दुसऱ्या तिसऱ्याकरिता पाहिजे तर मुळीच पर्वा करूं नका; पण ज्या मातापितरांनी तुम्हांस जन्म दिला; ज्यांनीं रात्रंदिवस खस्ता खाऊन तुम्हांस लहानांचे थोर केलें; तुमच्यासाठी ज्यांचा जीव तिळतिळ तुटतो; तुमचें कल्याण व्हावें, लोकांनीं तुम्हांस चांगलें म्हणावें; तुम्हांस व तुमच्या संततीस कोणत्याही प्रकारचे कष्ट पडूं नयेत; - सारांश तुम्हांस सर्व व तुमच्या ऐहिक व पारमार्थिक सुख प्राप्त व्हावें असें ज्याचें अहोरात्र चिंतन चालतें, अशा मातापितरांस दुःख होण्यासारखे तुमचे विचार असतील तर तुम्ही ते त्यांचेपाशीं बोलूं नयेत, किंवा दुसऱ्यापाशीं बोलून तुम्ही त्या विचारांचे आहां, असें त्यांचे कानावर येऊं देऊं नये; अशा प्रकारच्या स्नेहार्द्र मातापितरांनीं डोळे झांकले, व तुमच्याकडे कुटुंबाधिपत्य आलें म्हणजे पाहिजे तर तुम्ही आपले विचार प्रसिद्ध करा. पण तो काल येण्यापूर्वीं तसें करून त्यांच्या अंतःकरणास दुखवूं नका, व कृतघ्नपणानें त्यांविषयी क्रूर निष्ठुरता प्रकट करूं नका. अशा प्रकारच्या विधानांत बरेंच अवसान आहे हें आम्ही कबूल करतों. सामान्य दृष्टीस तर अशीं विधानें स्मृतितुल्य भासतात! पण केवळ तत्त्वदृष्ट्या त्यांचा विचार केला तर तीं दिसतात तितकी मजबूत नाहींत असें लक्षांत आल्यावांचून रहाणार नाही. मनुष्याच्या कृतज्ञतेवर आईबापांचा जितका हक्क आहे तितका दुसऱ्या कोणाचाही नाहीं, हें आम्हांस कबूल आहे; तसेंच हा हक्क त्यांच्या निःसीम व निर्व्याज प्रेमामुळें त्यांस प्राप्त होतो, हेंही आम्हांस मान्य आहे. पण जर एखाद्या मातापितराकडून अशा प्रकारचें प्रेम दाखविण्यांत आलें नसेल, व जन्म देण्यापलीकडे त्यांनीं मुलाकरतां

कांहीं केलें नसले तर मुलाच्या कृतज्ञतेवर त्यांचा तितका हक्क पोंचूं शकेल काय? पुष्कळ अविचारी गरीब आईबापें आपणास प्रतिपाल न करण्याइतकीं संतानें अस्तित्वांत आणितात आणि उपजल्यापासून मरेंतोपर्यंत त्यांचें जीवित त्यांस शुद्ध दु:खभार करून ठेवतात. अशा आईबापांची कोरडी कळकळ काय कामाची? अशा आईबापांच्या अंत:करणांत खरें अपत्यवात्सल्य असतें तर त्यांना असली संतति जगांत आणिलीच नसती. कित्येक लोक असें म्हणतात कीं, मुलें होणें ही कांही कोणाच्या हातची गोष्ट नाहीं. नसेल बापडी! पण आम्हांस येवढें ठाऊक आहे कीं जरी प्रत्येक लग्न अपत्यावह होतेंच असें नाहीं, तरी लग्नावांचून म्हणजे स्त्रीपुरुषांच्या संयोगावांचून अपत्योत्पत्ति होते असें नाही. पावसाप्रमाणें मुलें आकाशांतून पडत असतीं, आणि स्वेच्छेने घडून येत असलेल्या स्त्रीपुरुषांच्या संयोगांशीं त्यांचा काहीं एक संबंध नसून त्यांची पीडा त्यांच्या पाठीमागें लागत असती, तर आईबापाचें नि:स्सीम व निर्व्याज प्रेम आणि त्याबद्दल मुलांची कृतज्ञता यांचे खरें महत्त्व कोणाच्याही मनांत बरोबर उतरलें असते. मुलें अस्तित्वांत आणणे यांत मुलावर आईबाप कोणता उपकार करतात हें समजणें थोडें कठिण आहे. जन्माच्या आधीची स्थिति ज्याची त्याला समजत असून कष्टमय असती, आणि तींतून मुक्त होण्यासाठी मुले आईबापांकडें प्रार्थना करण्यास येतीं, आणि आईबापें त्यांची विनंती मान्य करून आपल्या संयोगांमुळें त्यांस त्या कष्टावस्थेतून मुक्त करती, तर त्यांच्या हातून मुलांवर मोठे उपकार होते खरे! पण वास्तविक तसा प्रकार नाहीं. जन्मास येऊन कळूं लागल्यावर मरणें सहसा बरें वाटत नाहीं; हे जरी निर्विवाद आहे, तरी जन्मास येण्यापूर्वी जन्मास आतां काय, असा कोणास प्रश्न केला तर त्याकडून 'होय' असें उत्तर खास येईल असें वाटत नाही! निदान ज्यांनीं आयुष्यांतील सुखदु:खें अनुभवली आहेत, ते तरी फिरून जन्मास येण्याबद्दल रुकार देण्यापूर्वी बराच विचार करतील! तात्पर्य, अन्य कारणामुळें घडलेल्या संयोगापासून अस्तित्वांत आलेल्या संततीचा, केवळ जन्म दिला येवढ्याच मुद्याच्या आधारानें कृतज्ञतेवर म्हणण्यासारखा हक्क शाबीद करतां येत नाहीं! तसेंच मुलें अजाण असतां मातापितरांनीं प्रीतिपूर्वक केलेले त्यांचें संगोपनही त्या हक्कांचें विशेष पुष्टीकरण करीत नाही! कारण एक तर मुलांना तें प्रेम कळत नसतें, आणि शिवाय आईबापांकडून तें प्रेम कर्तव्य म्हणून नव्हे तर सहज घडत असतें; म्हणजे तसें प्रेम करणें हा त्यांचा स्वभावधर्मच आहे. क्रूर वाघीण देखील आपल्या पिलांवर मनुष्यस्त्रीसारखें प्रेम करते. तेव्हां जो स्वभाव बहुधा सर्व जीवनकोटीस साधारण आहे, त्याबद्दल मनुष्यसंततीनेंच विशेष कृतज्ञ कां असावें, हें समजत नाहीं! तथापि समजूं लागण्यापूर्वीं किंवा समजूं लागल्यावर कृतज्ञता

उत्पन्न होणें हाही मनुष्याचा स्वभावधर्म आहे, व ज्याअर्थी आईबापांइतकी निःसीम व निर्व्याज प्रीति कोणीही करीत नाहीं, त्याअर्थी मुलांनीं आईबापांस होईल तितकें सुख देण्याविषयीं व दुःख न होऊं देण्याविषयीं तत्पर असावें, हें त्यांचे कर्तव्य आहे. तथापि येवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, आपणांस कळूं लागल्यापासून आईबापें मरेतोंपर्यंत मुलांनीं हरएक गोष्टींत त्यांचे निखालस गुलाम होऊन रहावे. सामान्य गोष्टींत आईबापांची आज्ञा पाळणें, त्यांना गरज पडल्यास आपणाकडून होईल तेवढी मदत करणें, दुखणेंबाणें असल्यास प्रीतिपूर्वक त्यांस जपणे- सारांश होतां होईल तों त्यांस कोणत्याही प्रकारचे मानसिक किंवा शारीरिक क्लेश न होऊं देणें हें सुपुत्रांचे कर्तव्य होय. पण येवढ्यावरून एखादा बाप आपल्या मुलास असें म्हणूं लागेल कीं, राजकीय, सामाजिक, व धार्मिक विचारांच्या संबंधानें माझ्या मतापलीकडे एक तिळभर देखील तूं जाऊं नको, गेलास तर माझ्या मनाला पराकाष्ठेचे क्लेश होऊन मी मृत्यूच्या पंथास लागेन, किंवा त्यांच्या यातनांतून सुटण्यासाठीं मी आत्महत्या करून घेण्यास प्रवृत्त होईन, तर अशा बापापुढें त्या गरीब बिचाऱ्या मुलानें काय करावें? संध्या न केल्यामुळें किंवा गंध न लावल्यामुळें विहिरींत उडी टाकणारा बाप भेटला तर त्याला तसें करूं देऊन पितृहत्येचा दोष माथीं मारून घेण्यापेक्षां गंध लावावें आणि संध्या करावी हे बरें; पण तें लावण्यांत आणि ती करण्यांत अशी कुचराई करावी की तीबद्दल त्याला वाईट तर वाटावे, पण जीव देण्याची इच्छा मात्र होऊं नये! अशा प्रकारें लहानसान गोष्टींत त्याला वाईट वाटून घेण्याची संवय लागली म्हणजे पुढें मोठ्या गोष्टींतही तसें होऊं लागेल; व ज्या मानानें ही त्याची संवय दृढ होत जाईल त्या मानाने मुलानें आपला पाय अधिकाधिक सरकावीत असावें! जीं मुलें तापट आईबापांची खोड अशा रीतीनें काढून टाकण्याचा प्रयत्न करणार नाहीत, त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध एक ब्र देखील काढवणार नाहीं व तीं मरतोंपर्यंत आपले विचार आपल्याशीं धुमसत ठेऊन त्यापासून होणारे कष्ट सोसावे लागतील. पण अशा तंट्याच्या बाबतींत असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, सारी पड मुलांनींच कां घ्यावी? आईबापांचें म्हणणें सयुक्तिक असेल तर त्यांचा हट्ट मुलांनीं पुरवावा हें योग्य आहे; पण तें भलतेंच कांहीं धरून बसतील तर सयुक्तिक विचार गुप्त ठेवण्यापासून होणारें सारें दुःख मुलांनींच कां सोसावें? ज्याप्रमाणें मुलांनीं आईबापांविषयीं कृतज्ञ असणें अवश्य आहे, त्याप्रमाणें आईबापांनींही मुलांच्या सुखाविषयीं आपली पराकाष्ठा करणें हें त्याचें कर्तव्य आहे. जी आप्पलपोटीं, विचारशून्य आईबापें कालमानाचा विचार न करता साऱ्या शहाणपणाचा गड्डा आपल्याच हातीं आहे असें समजून मुलाच्या स्थितीकडे न पहातां त्यांवर

सुलतानगिरी चालवूं पहातात, अशा आईबापांस मुलांनींही जुलूमी अंमलदारांस भोगाव्या लागणाऱ्या त्रासाची झांक दाखविण्याचा अल्पस्वल्प प्रयत्न केला, तर त्यांस त्याबद्दल विशेष दोष देतां येणार नाहीं!

मागल्या अंकांत गुरुजनांच्या भयामुळें तोंड कितपत आवरून धरावें याचा विचार केला आहे. आज राजभय आणि लोकभय यांचा पगडा आपणावर कोठवर चालूं द्यावा, हें पहावायाचे आहे.

सामान्यपणें असा एक नियम घालतां येईल कीं, मनुष्याचे विचार कोणत्याही तऱ्हेचे कां असेनात, जर तो ते प्रसिद्ध करतांन म्हणजे भाषणद्वारा किंवा लेखनद्वारा स्पष्ट करतांना- बरीच खबरदारी घेईल तर त्याला ते प्रसिद्ध करण्यास मोठीशी पंचाईत पडणार नाहीं.

''माझ्या सारख्यांनीं लहान तोंडी मोठा घांस घेऊ नये; महान् महान् पूर्वाचार्यांनी लिहून ठेविलेल्या वचनांस चूक म्हणणें हे मोठें धाडस आहे; मी जे म्हणत आहे तें बरोबर आहे असा माझा मुळींच आग्रह नाहीं; त्यातील चुकीची दुरुस्ती करून घ्यावी, येवढाच माझा हेतु आहे. प्रत्येक गोष्टीस बहुधा दोन बाजू असतात; एका बाजूनें असें म्हटलें तर दुसऱ्या बाजूनें असें म्हणतां येईल येवढेच सांगण्याचा माझा हेतु आहे'' - अशा रीतीनें अत्यंत नम्रतापूर्वक जर उत्तरपक्ष केला, तर बहुधा कोणत्याही प्रकारचे विचार बोलून दाखविण्याची पंचाईत पडणार नाही असें वाटतें. तसेंच, बोलणें तऱ्हेवाईक असून आचरण रूढ पद्धतीस धरून असेल, तर देखील रूढ विचारांच्या उलट पाहिजे ते बोलण्यास कोणी फारसा अडथळा करणार नाहीं. सूर्योदयापूर्वी स्नान करून होमकुंडांतील अग्नीस आहुति देणारानें, किंवा प्रति दिवशीं नवीन तयार केलेल्या पार्थिवाची सहस्रबिल्वदलांसह यथासांग पूजा करणाऱ्याने, दुपारी विद्यार्थीवर्गास चार्वाकमतांचा पाठ दिला, तरी त्याला कोणी विशेष नांवे ठेवणार नाही. रूढ आचाराविरुद्ध सांगूनसवरुन इंचभर जाणें आणि रूढ विचाराविरुद्ध टनभर बोलणें यांपैकीं दुसरे पुरवेल, पहिलें बिलकुल पुरवणार नाहीं! असें नसतें, तर वेद पौरुष म्हणणारे धार्मिकांत मोडून जुन्या लोकांच्या स्तुतीस पात्र कां होते? व ख्रिस्त्याच्या हातचें चहाच्या पाण्यासारखें निरुपद्रवी पाणी घेण्यास्तव नैसर्गिक पितृवात्सल्यास पराङ्मुख होऊन वृद्ध मातापितरें पोटच्या गोळ्यास घरांतून बाहेर काढण्यास तयार कां होतीं, व नुकत्याच शेवटास लागलेल्या ग्रामण्यासारखीं प्रकरणें कां माजतीं? अविचारी लोकांस पुष्कळ प्रतिकूल बुद्धिवादापेक्षां यत्किंचित् प्रतिकूल आचार फार विघातक आहे, असें वाटत असल्यामुळें असा परिणाम घडतो हें उघड आहे. तथापि सध्यां लोकांस, अधिकाऱ्यांस व गुरुजनांस न रुचणारे विचार बोलतां येण्यास कोणत्या

हिकमती उपयोगी पडतात, येवढेंच सांगावयाचें असल्यामुळें या हिकमतशास्त्राची येथें विशेष चर्चा करण्याची गरज नाहीं! यांत थोडीबहुत फसवणूक आहे, हें कबूल केलें पाहिजे. पण जे लोक, किंवा जे अधिकारी, किंवा जे गुरुजन केवळ बुजऱ्या तट्टासारखे नवीन गोष्ट ऐकली कीं पाठीवरच्या स्वारीस फेंकून देण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्या डोळ्याला दांभिक आचरणाची झांपडें लावून व मिथ्या नम्रतेच्या शब्दांनीं त्यांस चुचकारून, शहाण्या मनुष्याने आपलें काम करून घेतलें पाहिजे! भास्कराचार्यांसारख्या पूर्वींच्या अनेक विद्वानांनीं अशा प्रकारची हूल दाखवून समकालीन लोकांची आपणांवरील श्रद्धा उडूं न देतां, आपल्या मताचा प्रसार केल्याचीं उदाहरणें या देशांत अगदींच ठाऊक नाहींत असे नाहीं! या गणित्यास चंद्रग्रहणाची खरी उपपत्ति अवगत असून व ज्योतिषशास्त्रविषयक त्याचे विचार सामान्य लोकांच्या समजुतीस अगदी विरुद्ध असून, तो अत्यंत भाविकांत मोडे; असें सांगतात: ठीकच आहे. चंद्रग्रहणांत लोक दोन स्नानें करीत असतील तर भास्करचार्यांनी तीन करून लोकांच्या दुप्पट दानें दिलीं म्हणजे ते आपल्या ग्रंथांत राहूला काय म्हणतात हें कोण पाहतो? तथापि हें दुहजबी वर्तन सर्वांनाच संमत होईल असे नाहीं. वागणें एका तऱ्हेचे आणि बोलणें दुसऱ्या तऱ्हेंचे- असतें वैपरीत्य बहुधा साऱ्यांच्या आचरणांत कमी अधिक प्रमाणानें दृष्टीस पडतें. तथापि ते हिंदु लोकांच्या वर्तनांत जितकें दृष्टीस पडतें; तितकें दुसऱ्या कोणत्याही सुधारलेल्या लोकांच्या वर्तनांस दिसत नाहीं. भाषण व वर्तन यांतील परस्पर विरोध हा आमच्या लोकांचा राष्ट्रीय दोष आहे. पर्वा ह्यूमसाहेबांनीं काय सांगितलें, तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आपले खरे विचार उघडपणें बोलून दाखविण्याचें धैर्य आमच्या अंगीं नाहीं, ही आमच्या अंगी मोठी गोम आहे, असें ते उघडपणें म्हणाले; आणि आम्ही तें माना खालीं घालून निमूटपणें ऐकून घेतलें! अशा प्रकारचा अप्रामाणिकपणा आमच्या हाडामांसास खिळून गेलेला आहे. साहेब लोकांमध्यें आमचें वजन न राहण्यास जीं अनेक कारणें झालीं आहेत, त्यांत हें प्रधान कारण आहे. युरोपांतील मोठ्या लोकांस असल्या अप्रामाणिकपणाचा पराकाष्ठेचा कंटाळा असतो. मतें कितीही विपरीत असलीं म्हणून काय झालें? मनुष्यांच्या अंगीं खरी योग्यता असेल, व लोकांच्या कल्याणाबद्दल त्याला खरी कळकळ वाटत असेल, तर लोकांच्या रागाची पहिली लाट निघून गेल्यावर ते त्याच्या बोलण्याचा शांतपणानें विचार करूं लागतात. या गोष्टींचे प्रत्यंतर हवें असल्यास अगदीं अलीकडले मि. ब्रॅडलॉ यांचें उदाहरण घ्या. हा पुरुष पक्का नास्तिक होता. या नास्तिकपणामुळें त्याला प्रथम किती हाल सोसावे लागले हें सर्वांना ठाऊक आहेच. पण कोणाची भीड किंवा मुर्वत न ठेवतां सत्यास निरंतर

जागृत राहून, गरीब लोकांच्या उन्नतीसाठीं आपला देह झिजवायचा, असा त्याचा निश्चय असल्यामुळें, याशीं मारामारी करणारें, याला पार्लमेंटांतून घालवून लावणारे, याला कारागृहांत पाठविणारे- सारांश, याला मनुष्यरूपी सैतान मानून याचा पाहिजे त्या प्रकारचा छळ करणारे व करविणारे याचे सामाजिक, राजकीय व धार्मिक कट्टे शत्रु अखेरीस याला वचकूं लागले. इतकेंच नाहीं; तर पूज्य मानूं लागले. एकदां याच्या जिवावरचें दुखणें गेलें तेव्हां लोकांनीं व धर्माधिकाऱ्यांनी देवालयांत जाऊन याच्या अनामयासाठीं प्रार्थना केल्या व घंटा वाजविल्या! पुढें या सत्यनिष्ठ पुरुषानें आमचा पक्ष घेतला तेव्हां आम्हीं त्याचा केवढा उत्सव केला हेंही सर्वश्रुत आहेच! हेंही असो. ग्लॅडस्टन-मोरले या जिवंत जोडप्याचे ठळठळीत उदाहरण या घटकेस आपल्या डोळ्यापुढें आहे. मि. मोरले यांचा नास्तिकपणा जसा सर्वांत श्रुत आहे; तसाच मि. ग्लॅडस्टन यांची धर्मश्रद्धाही सर्वांस ठाऊक आहे. धर्मसंबंधानें उभयतांत शुद्ध छत्तीसाचा आंकडा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें असून राज्यप्रकरणांत, विशेषत: ऐरिश प्रकरणांत ''शिवस्य हृदयं विष्णू, विष्णुस्य हृदयं शिव:'' या असंस्कृत सर्वप्रसिद्ध वचनाप्रमाणे यांची गट्टी जमली आहे! काहीं गोष्टींच्या संबंधानें, उदाहरणार्थ मनास शुद्ध वाटेल तें स्पष्ट बोलण्याच्या संबंधानें किंवा कोणत्याही प्रकारच्या लटपटीपासून अलिप्त राहण्यासंबंधानें, इंग्रज लोकांमध्यें मि. ग्लॅडस्टनपेक्षां मि. मोरले यांनाच कांकणभर अधिक मान मिळतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि हा सारा प्रकार मि. मोरले यांनीं आपलें नास्तिकपण कोणत्याही प्रकारें गुप्त ठेवलें नसून! तेव्हां काय दिसतें की, चार दोन गोष्टींत लोकांस न रुचणारें असे तुमचे विचार असले, आणि ते तुम्ही उघड बोललांत तर कांहीं दिवस ते तुम्हांस त्रास देतील, तुमचा तिरस्कार करतील, व तुमचें बोलणें ऐकून घेणार नाहींत, हें जरी खरें आहे तरी सत्य तुमच्या पक्षांत असेल, निदान कोणत्याही क्षुल्लक स्वार्थासाठीं हाती घेतलेल्या पक्षाच्या वतीनें तुम्ही भांडत नसाल, लोकांच्या कल्याणाची खरी कळकळ तुमच्या अंत:करणांत वसत असेल, व तें कल्याण घडवून आणण्यासाठीं निरपेक्षबुद्धीनें तुम्ही आपल्या जिवापाड श्रम करीत असाल, तर तुमच्या हातून ते कल्याण होवो अथवा न होवो, तुमचे चांगले हेतु आणि तुमचे निर्लोभी कष्ट, यामुळें लोकांच्या मनांत तुमच्याविषयीं उत्पन्न झालेला पीळ हळूं हळूं नाहींसा होत जाऊन अखेरीस त्यांना तुमच्या गुणांचें माहात्म्य समजूं लागेल, व तुम्हांपासून होणाऱ्या फायद्याबद्दल त्यांच्या मनांत तुम्हांविषयी कृतज्ञता व पूज्यबुद्धि उत्पन्न होतील. तेव्हां कोणत्याही पक्षाच्या किंवा पंथाच्या निशाणाखालीं जाऊन उभें रहाण्यापूर्वीं तो कसा आहे याचा आपल्या मनाशीं पक्का विचार करावा, आणि तो सत्पक्ष आहे अशी आपली

बालंबाल खात्री होईल तर बेलाशक त्याचा अंगीकार करावा, आणि त्याच्या प्रसाराकरतां भाषणद्वारा किंवा लेखनद्वारा आपणाकडून होईल तेवढी खटपट चालू करावी. कित्येक लोक असे विचारतात कीं, अशी खटपट करण्यापासून स्वतःच्या अन्नावरच पाय येत असेल तर ती करावी किंवा नाहीं? यावर आमचें साफ उत्तर असें आहे कीं, शेंकडा नव्याण्णव लोकांनीं शेंकडा नव्याण्णव बाबींत तसें करू नये. जर तुमचे अन्नच नाहींसें होईल तर तुमच्या हातून पुढें काय होणार? रिकामपोटी किंवा अर्धपोटी कोणतेंही काम चांगलें वठावयाचें नाहीं. कांहीं झालें तरी पोटभर भाकर आणि अंगभर कपडा यांची वाण पडावयाची नाहीं, अशी खात्री झाल्यावर मतप्रसाराकरतां पुढें सरण्याचें धैर्य करावें. तोंपर्यंत आंतल्याआंत तयारी करीत असावें. कित्येकदा अकाली वाफ दवडल्यापासून फार नुकसान होतें; तें थोड्या घाईनें करून घेऊं नये. वर्ष दोन वर्षे दम न खाल्ला; तर जें काम जेमतेम पांचचार वर्षे करता येईल तें तो दम खाल्ल्यानें जर पांच-पंचवीस वर्षे सुरेखपणानें करतां येणें शक्य असेल, तर उतावीळपणानें मताभिमानाच्या आधीन होऊन अकालीं फुटून निघणें, हे ज्याचें त्याला किंवा कोणालाच श्रेयस्कर नाहीं. असें समजा कीं, एका धनाढ्य गुजराचा किंवा ब्राह्मणाचा सोळा सतरा वर्षांचा मुलगा मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकलेला असून, समाजांत अलीकडे नेहमीं चर्चा होत असलेल्या बालविवाहनिषेधादि विषयांच्या संबंधानें नवीन लोकांच्या मतांसारखीं त्याची कांहीं मतें झाली आहेत. त्याला असें वाटूं लागले आहे कीं आपण आपलें लग्न स्वतःच्या कमाईनें, आपल्या वयाच्या पंचवीस-सत्ताविसावे वर्षी बऱ्याच वाढलेल्या म्हणजे अठरा एकुणीस वर्षांच्या वयाच्या मुलीशी किंवा त्याच वयाच्या गतभर्तृकेशीं करावें. बाप तर असा हट्ट घेऊन बसला आहे कीं, करावयाचे असेल तर मी सांगतों त्या आठ दहा वर्षांच्या मुलीशी लग्न करण्यास तयार हो, नाहीं तर या घटकेस माझ्या घरांतून नीघ आणि वाट फुटेल तिकडे भीक मागत चालता हो. माझें न ऐकशील तर माझ्या येवढ्या संपत्तींपैकीं एक कवडी देखील मी तुझ्या हातीं पडूं देणार नाहीं; मग येथून पुढें तुझ्या विद्याभ्यासाच्या खर्चाची गोष्ट कशाला पाहिजे? वाचकहो, अशा संकटांत अशा मुलानें काय करावें? आमचें तर असें म्हणणें आहे कीं, शेंकडा नव्याण्णव मुलांनीं अशा स्थितींत आपल्या आईबापांची आज्ञा निमूटपणें मानावी, आणि त्यांस संतुष्ट राखून त्यांनीं कमावलेल्या संपत्तीवर हवा तितका विद्याभ्यास करावा, आणि कालेंकरून त्यांचें डबोलें आपल्या हातीं आलें, म्हणजे त्याच्या आणि विद्येच्या जोरावर आपल्या पिढींत हवी तितकी सुधारणा करावी. भाविक व अभाविक, सुधारक व दुर्धारक, धर्मनिष्ठ व पाखंडी यांपैकीं नऊशें नव्याण्णव लोक

ईझीगोईंग म्हणजे खुशालचेंडू असतात! कोणत्याही गोष्टींकरतां मानेवर खडा ठेवून घेऊन किंवा भूकतहान वगैरे पडतील ते हाल सोसून श्रम करण्याचा त्यांचा मगदूर नसतो. व्याख्यानास जावें, गोडगोड बोलावें; पांचचार वर्तमानपत्रांस किंवा एखाद्या दुसऱ्या पुस्तकास उदार आश्रय द्यावा; मनाची फारच प्रसन्नता असल्यास एखादें छोटेखानी व्याख्यान झोडावें किंवा लहानसें आर्टिकल खर्डावें; आणि फारच झालें तर प्रसंगविशेषीं ज्यानें त्यानें पवित्र मानलेल्या कामाकरतां रुपया दोन रुपये वर्गणी द्यावी. इतकें केलें म्हणजे बहुतेकांची शिकस्त होते. ज्यांचा इतपतच मगदूर आहे (आणि बहुतेकांचा इतपतच असतो) त्यांनी आपली भाकरी कायम होईतोंपर्यंत आपल्या आईबापांचीं किंवा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी आपणांवर खप्पा न होऊं देण्याबद्दल फार जपत असावें. कारण अशांना दैन्यावस्थेनें घेरलें तर त्यांच्या हातून पुढे कांहीं व्हावयाचें नाहीं तेव्हां परावलंबन सुटेतोपर्यंत किंवा स्वतंत्रता प्राप्त होईतोंपर्यंत अशा लोकांनीं बहुधा तोंडास कुलूप घालून ठेवावें हेंच बरें. कधीं लाडक्या हट्टानें, कधीं गोडीगुलाबीनें, कधीं बुद्धिवाद करून, कधी मृदु भाषणानें अंत:करणास पाझर आणून, कधीं खोटेंच रुसून बसून जर यांना आपलें काम करून घेतां येत असेल, तर त्यांनी खुशाल करून घ्यावें! पण कोणत्याही कारणानें त्यांनीं आपलें सर्वस्वी नुकसान करून घेऊं नये. बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर वृत्ति आनंदमय होऊन एका प्रकारें ज्यांचें देहावसान सुटतें; असा एखादा महात्माच आईबापांची, गणगोताचीं, धनद्रव्यांची, जातीची, देशाची किंबहुना समग्र मनुष्यतेची पर्वा न ठेवतां अन्तररोत्थित अमर्याद प्रेरणाबलाच्या भरंवशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तें तडीस नेतो! सामान्य मनुष्यांनीं अशा नरवरांचें आश्चर्य करावें, पूजन करावें, स्मरण करावें, शिष्यत्व करावें, पण अनुकरण करूं नये. ज्यांच्या हातून कांहींच होत नाहीं व जे कोणाच्याही साहाय्यावांचून पाहिजे तें करूं शकतात, अशा दक्षिणोत्तर ध्रुवापाशीं असणाऱ्या दोन प्रकारच्या व्यक्तींच्या दरम्यान निरनिराळ्या वृत्तांत पडणारे निरनिराळ्या प्रकृतीचे मनुष्य आहेत. तेव्हां ज्यानें त्यानें आपल्या अंगीं शीतोष्ण साहण्याचें कितपत सामर्थ्य आहे याचा नीट विचार करून आपल्या भाषणानें आपल्या गुरुजनांस, आपल्या अधिकाऱ्यांस, किंवा आपल्या लोकांस किती नाखुष करावयाचें याचें अनुमान करावें!

आजपर्यंत या विषयावर लिहून गेलेल्या निबंधांत, विचार, उच्चार, आणि आचार या त्रयींपैकीं पहिल्या दोहोंची बरीच चर्चा झाली आहे, हें वाचकांच्या ध्यानांत असेल. आज आचारावर दोन ओळी लिहून तूर्त या विषयाचा निरोप घेण्याचा इरादा आहे.

शरीराच्या कोणत्याही भागांत परस्परांशीं संलग्न असलेलीं हाडें, स्नायु, आणि ज्ञानतंतु यांचा पृथक्त्वानें विचार कर्तव्य असला, तरी ज्याप्रमाणें एकाच्या संबंधाने लिहीत असतां, दुसऱ्या दोहोंचा उल्लेख केल्यावांचून चालत नाहीं, त्याप्रमाणें विमर्षण, भाषण आणि आचरण यांपैकीं एकाबद्दल भवति न भवति करीत असतां इतराविषयीं थोडेंबहुत लिहिल्यावांचून राहवत नाहीं. आपल्या विचारांचा आपल्या उद्‍गारांवर, आणि त्या दोहोंचा आपल्या वागण्यावर कमी अधिक परिणाम न होणें अशक्य आहे. तेव्हां; आतांपर्यंत जें लिहिण्यांत आलें आहे त्यांत आचार अगदींच अस्पष्ट राहिला आहे असें नाहीं. तथापि पहिल्या दोहोंपेक्षा हाच विशेष प्रमुख असल्यामुळें, त्याविषयीं थोडासा विस्तार करणें जरूर आहे.

विचारांच्या संबंधानें कोणी कोणाची मुरवत ठेवण्याची गरज नाहीं; वाटेल त्याने वाटेल त्या विषयावर वाटेल तसा विचार करावा, हें मत अलीकडील सर्व विचारी लोकांस मान्य झालें आहे, भाषणाच्या संबंधानें थोडा मतभेद आहे. पुष्कळांचे असें म्हणणे आहे कीं, खऱ्या कळवळ्यानें प्रीति करणाऱ्या मातापितरांस व ज्याच्या सुप्रसन्नतेवर आपला चरितार्थ अवलंबून असतो अशा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस होतां होईल तों आपल्या भाषणानें दुखवूं नये. यांपैकीं दुसऱ्यांची म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांची आमच्या मतें फारशी परवा करण्याची गरज नाहीं. बडतर्फ होऊन घरीं बसण्याचा प्रसंग येणार असला, व दुसऱ्या कोणत्याही रीतीनें बायकामुलांचें व स्वत:चें पोषण करण्याचा मार्ग नसला तर स्वमताविषयी उघडपणें विशेष आग्रह धरून बसणे एकंदरीनें चांगलें नाहीं. पण जर स्वमतप्रकाशन या धराला जाण्याचा संभव नसेल, तर तें बेलाशक प्रसिद्ध करावें. या दोहोंशिवाय तिसऱ्या कोणत्याही मनुष्याच्या भीतीनें मनास शुद्ध वाटेल तें बोलण्यास डरणें हें भित्रेपणाचेंच चिन्ह होय! वास्तविक पाहिलें तर ज्यांना आपण लोक म्हणतों व ज्यांच्या अपवादाला आपण भीत असतों, त्यांवर आपलें फारच थोडें अवलंबून असतें. लोकांना संतुष्ट राखण्याकरतां स्ववंचन करणें हें महापातक आहे असें समजलें पाहिजे. सामान्य लोक अंधासारखे गतानुगतिक असतात. विचारी पुरुष अशांच्या छंदानें नेहमीं वागतील, तर सत्पक्षाचा प्रसार कधींच व्हावयाचा नाहीं. तेव्हां अज्ञानमग्न, अविचारी, आणि ज्यांच्याशीं आपला अर्थाअर्थीं संबंध नाहीं अशा लोकसमुदायाच्या निंदेकडे आणि स्तुतीकडे दुर्लक्ष्य करून, ज्याच्या मनाला जीं मतें प्रशस्त वाटत असतील त्यांचें त्यानें निर्भयपणें प्रतिपादन करावें. असें केल्यानें उलट पक्षांचे म्हणणें ऐकून घेण्याची व विचारपूर्वक सत्यासत्याचा निर्णय करण्याची संवय सर्वांस लागेल.

आतां कोणते विचार अमलांत आणावे, हा एक कठिण प्रश्न राहिला. यांसंबंधानें बहुतेक देशांत फार मोठा मतभेद दृष्टीस पडतो. आचरण रूढपद्धतीप्रमाणें असल्यास, बोलणें तिला कितीही विरुद्ध असलें तरी खपतें, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. तेव्हां लोक वाईट म्हणतील म्हणून मळलेल्या वाटेबाहेर पाऊल टाकण्याचा मुळींच प्रयत्न करूं नये कीं काय, व करणें योग्य असेल तर तो कसा व किती करावा, याचा निश्चय करणें जरूर आहे. या प्रश्नाचा सहज रीतीनें उलगडा करतां यावा म्हणून मनुष्याच्या सामाजिक आचरणाचे दोन भाग करूं. एक ज्या आचरणाचा इतरांशीं प्रत्यक्ष संबंध आहे तें, व दुसरे ज्याचा तसा संबंध नाहीं ते. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, समाजांत रहाणाऱ्या कोणत्याही मनुष्याच्या आचरणाचा समाजाच्या बऱ्यावाईटाशीं मुळींच संबंध नाहीं; असे कसें होईल? हा आक्षेप केवळ नि:सत्त्व आहे असे आम्ही म्हणत नाहीं. तथापि सारासारविचार करून कोणत्या गोष्टींचा खासगी वर्तनांत आणि कोणत्यांचा लौकिक वर्तनांत समावेश केला पाहिजे; हें ठरविणें केवळ अशक्य नाही. कोणीं किती व कसलें अन्न खावें; कसल्या घरांत रहावें; कोणत्या प्रकारचे कपडे वापरावे; कोणता धंदा करावा; दानधर्म किती करावा; कोणते खेळ खेळावे; कशा प्रकारचा व्यायाम करावा- वगैरे गोष्टींचा लोकांशीं म्हणण्यासारखा संबंध नाहीं. अशा गोष्टींत ज्याचें त्याला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. याच्या उलट कोणत्याही मनुष्याशीं केलेले करार पाळणें; कोणासही निष्कारण पीडा न देणें; खरे बोलणें; शक्त्यनुसार परोपकार करणें; कायदे पाळणें; कर देणें वगैरे गोष्टींत लोकाशीं संबंध येतो, आणि म्हणून त्या गोष्टी रूढ राजकीय व सामाजिक नियमांस अनुसरून करणें जरूर आहे. पण हे नियम ज्याला मान्य नसतील त्यानें काय करावें? या प्रश्नांचे उत्तर देण्यापूर्वी लौकिक वर्तनाचेही जे दोन पोटविभाग आहेत; ते येथें सांगणें जरूर आहे. एक लोकांत संमत पण लोकांत अद्यापि रूढ न झालेलें वर्तन; दुसरें असंमत व अरूढ वर्तन. उदाहरणार्थ वेळाच्या संबंधानें कडक नियमितपणा हा गुण कोणालाही वाईट आहे असें तर म्हणवत नाहीं; पण त्याप्रमाणें करणारा मनुष्य सहसा लोकप्रिय होत नाहीं. कारण बहुतेक लोकांस 'वेळाचें मोल' समजत नसतें! याप्रमाणेंच सत्य भाषण, प्रामाणिकपणा, व्यवस्थितपणा वगैरे लोकसंमत पण लोकांच्या प्रत्यक्ष आचरणांत बाताबेतानेंच दृष्टीस पडणाऱ्या गुणांची गोष्ट आहे. अशा गुणांच्या संबंधानें लोक आपणास काय म्हणतील याचा बिलकुल विचार करूं नये. ज्यानें त्यानें आपल्या अंगी असेल तेवढ्या धैर्यानें असले गुण आपल्या वर्तनांत आणून लोकांत त्यांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आतां लोकांस असंमत पण स्वत:स पसंत वाटणाऱ्या गोष्टींच्यासंबंधानें काय

करावें, येवढ्या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें राहिलें, व तें उत्तर इतकेंच आहे की, ज्या असंमत वर्तनाचा लोकांशीं प्रत्यक्ष संबंध नसेल, पण जें स्वत:च्या मनाला प्रशस्त वाटत असेल, त्यांत त्यांच्या भीतीनें बिलकुल फेरफार करूं नये. 'मन:पूतं समाचरेत्' या मंत्राच्या खऱ्या अर्थाच्या अनुरोधानें असले वर्तन चालूं द्यावें. राहतां राहिलें लोकांशीं प्रत्यक्ष संबंध येण्यासारखें; पण त्यांस पसंत न पडणारें वर्तन. असें वर्तन परिणामीं लोकांस खरोखरीं कल्याणावह होणार आहे अशी ज्याची पक्की खातरी झाली असेल, त्यानें असा विचार केला पाहिजे कीं, आपण लोकांस न जुमानतां हवे तसें वागत सुटलों, तर परिणामीं आपल्या वर्तनांतील चांगुलपणा त्यांच्या नजरेस येऊन ते आपलें अनुकरण करतील किंवा त्यांस आपला तिटकारा येऊन ते आपणास मुळींच सोडून देतील. ज्याला आपण बहिष्कार म्हणतों तो अशाच प्रकारच्या तिटकाऱ्याचा परिणाम होय. ज्या बहिष्कारामुळें लोकांशीं मुळींच सबंध तुटण्याचा संभव आहे, म्हणजे ज्यामुळें बहिष्कृतांची कायमची निराळी जात होण्याचा संभव आहे, असा बहिष्कार होतां होईल तो टाळावा. कारण, लोकांची सुधारणा व्हावी अशी ज्याची खरी इच्छा असेल; ते लोकांपासून अजिबात तुटून निघाल्यानें ती कधींच होण्याचा संभव नाहीं. तथापि कांहीं वर्षे लोकांपासून निराळें राहिल्यानें; त्रास सोसल्यानें, ती होण्याची खात्री असेल, व त्या सुधारणेच्या चांगुलपणाचे उदाहरण त्यांस घालून देणें अवश्य असेल, तर मनुष्यजातीचें हित चिंतणाऱ्या सत्यनिष्ठ धीरांनीं तसें करण्यास मागेंपुढें पहातां कामा नये. तात्पर्य काय की लोकांच्या कल्याणाचा जो हेतु मनांत धरला असेल, तो कोणत्या उपायानें लौकर तडीस जाईल व कोणत्या साधनानें एकंदरीत आपल्याला किंवा दुसऱ्याला कमीत कमी त्रास होईल याचा शांतपणानें निश्चय ठरवून तदनुसार वर्तन करावें, हेंच सत्पुरुषास योग्य आहे. हा निश्चय करतांना खरी सुधारणा कशांत आहे हें फारच काळजीनें ठरविलें पाहिजे. कारण वारंवार होतें काय कीं विशिष्ट वासनाधीन किंवा मताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशांत आहे हें नीट न समजून, जेवढें जुनें असेल तेवढें फेंकून देण्यांत व कसल्या तरी नवीन गोष्टींचा अंगीकार करण्यांत आपण सुधारणा करीत आहों असा भ्रम होतो! असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षा दुर्धारक म्हणणें हेंच बरें! उदाहरणार्थ, हिंदु धर्मांत बरीच व्यंगें आहेत म्हणून यहुदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या मनुष्यास, विचारी ही संज्ञा सहसा देतां येणार नाहीं. तसेच, आमचे कांहीं रीतरिवाज मूर्खपणाचे आहेत म्हणून प्रत्येक गोष्टींत परकीयांचे अनुकरण करणे; हेंही कोणत्याही दृष्टीनें त्याचें त्याला किंवा इतरांला परिणामी विशेष सुखावह होण्याचा संभव नाहीं, असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ,

कित्येक प्रसंगीं धोतरें नसणें सोईस्कर नाहीं म्हणून युरोपियन लोकांप्रमाणें दिवसभर पाटलोण घालून बसणें, किंवा ते लोक विशेष कामाकडे कागदांचा उपयोग करतात म्हणून आपणही तसें करणें हें केवढें मूर्खपण आहे बरें? ज्या देशांत आपले शेंकडों पूर्वज जन्मास आले, वाढले, व मरण पावले; ज्या देशांतील हजारों पिढ्यांनीं अनेक गोष्टींत मोठ्या कष्टानें केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणास ऐतेच प्राप्त झालें- अशा देशांतील धर्माचा, रीतरिवाजांचा, व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधींही शोभणार नाहीं, स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत, आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छलास न भितां, त्यांच्याशीं कधीं भाडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें, यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहींत; तर फक्त शृंखलांतर करतात! अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींही सुटावयाची नाहीं, भरतखंडांत अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षां तें आहे त्या प्रकारचेंच **गुलामांचें राष्ट्र** राहिले तरी हरकत नाहीं! पण अलीकडील चिन्हांवरून आम्ही नवीन खोड्यात आपले हातपाय अडकूं न देतां ते जुन्या खोड्यांतून बाताबेतानें काढून घेण्यास समर्थ होऊं, अशी आशा दिसत आहे! या उप्पर भवितव्यात काय असेल कोण जाणे!!

*

शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय?

"Educate the people" was the first admonition addressed by Penn to the colony which he founded. "Educate the people" was the legacy of Washington to the nation which he had saved "Educate the peple" was the unceasing exhortation of Jefferson.

Speech on Education delivered by Lord Macaulay in the House of Commons in 1847.

हौस ऑफ् कॉमन्स सभेत प्रसिद्ध लॉर्ड मेकॉले यांनीं लोकशिक्षणावर १८४७ त जें भाषण केले त्यांतून वरील उतारा घेतला आहे. पेननें जी वसाहत केली तिला त्याचें पहिले सांगणे असें होते कीं, "लोकांस शिक्षण द्या." ज्या राष्ट्राला **वॉशिंग्टननें** दास्यांतून सोडविलें त्याकरतां "लोकांस शिक्षण द्या" या उपदेशांचे धन त्यानें मागें ठेविलें होतें. "लोकांस शिक्षण द्या"अशी जेफरसन याची अहर्निशा प्रार्थना असे.

पेन्सिलव्हॅनिआ प्रांताचा प्रख्यात प्रस्थापक **क्वेकर वुइल्यम पेन**, अमेरिकेस स्वातंत्र्य देणारा वीरमणि **जॉर्ज वॉशिंग्टन**, व अमेरिकेंत लोकसत्ताक राज्याचा मजबूत पाया घालण्यासाठीं ज्यानें आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें, तो सर्वश्रुत तिसरा प्रेसिडेंट **जेफरसन**- अशा तीन पुरुषांच्या नांवांचा उच्चार करण्यांत आपण आपल्या पक्षास मोठी सबळता आणीत आहों, असें लॉर्ड मेकॉले यांस वाटून त्यांनें ही तीन मोठीं नावें हौस ऑफ् कॉमन्स सभेत काढलीं असावीं हें उघड आहे. १८४७ मध्यें इंग्लंडांत प्राथमिक शिक्षणाबद्दल सरकारनें सक्तीचा कायदा करावा किंवा नाहीं, याविषयीं मोठा कडाक्याचा वाद चालला होता. मेकॉलेसाहेब अस्तिपक्षात होते. या प्रश्नाचा विचार करण्याकरतां जी कमिटी नेमिलि होती, तिचे ते सेक्रेटरी होते. विद्येपासून मनावर होणारे परिणाम आणि विद्याप्रसाराची अवश्यकता यासंबंधानें मेकॉलेच्या विचाराइतके विशाल व उदार विचार त्या पिढींत फारच थोड्या विद्वान् लोकांचे होते.- गरीब लोकांस थोडेंबहुत शिक्षण सरकारनें देणें, यांत सरकारकडून लोकांवर जुलूम होत नाहीं इतकेंच नाहीं, तर तशा प्रकारच्या शिक्षणाकरतां कमी अधिक सक्ती करणें हें सरकाराचें कर्तव्य

होय, असें त्याचें पक्कें मत झालेलें होतें. ज्यांना इंग्रजी येत असेल त्यांनीं मेकॉलेसाहेबांचे हे भाषण अवश्य वाचून पहावें. आम्हांस त्यांतील उतारा येथें घेण्याची बुद्धि होण्यास सध्यां बडोद्याकडे यासंबंधानें जी जागृति झाल्यासारखी दिसत आहे; ती कारण झाली. बडोद्याच्या एज्युकेशन कमिटीनें जे प्रश्न काढले आहेत त्यांत कंपल्सरी एज्युकेशनबद्दल म्हणजे सरकारानें कांहीं एक प्रकारच्या शिक्षणाबद्दल-लोकांवर सक्ती करणें योग्य आहे की नाही, असा प्रश्न घातला आहे; आणि शिक्षणाच्या संबंधानें दुसऱ्या कोणत्याही सूचना करण्यापूर्वी या प्रश्नाचें स्पष्ट उत्तर देणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें. लोकशिक्षणाशीं सरकारचा संबंध असावा किंवा नाहीं, व तो असावा असें असेल तर प्रत्येक व्यक्तीस थोडेबहुत शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करणें हे सरकारचें कर्तव्य आहे किंवा नाहीं, हे प्रश्न सयामी जुळयाप्रमाणें एकमेकांशीं संलग्न आहेत, महत्त्वाच्या इतर प्रश्नांप्रमाणें यांसही उपपत्ति आणि क्रिया अथवा शास्त्र आणि प्रयोग, अशीं दोन अंगें आहेत. गेल्या शतकाच्या अखेरीस व चालू शतकाच्या आरंभास या प्रश्नाविषयीं युरोपांत मोठा वादविवाद चालला होता. अलीकडे बहुतेक सुधारलेल्या लोकांत यासंबंधानें ऐकमत्य होऊन त्या वादाचा निरास झाला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. युरोपांतील बहुतेक देशांनीं लोकशिक्षण हें सरकारचें कर्तव्य मानून तें अमलांत आणण्यासाठीं निरनिराळ्या तऱ्हेचे कायदे केले आहेत. फक्त रशिया देशांत शिक्षणाबद्दल सक्तीचा कायदा नाहीं. पण याचा परिणाम असा झाला आहे कीं, रशियासारखी अज्ञान प्रजा दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं. मुसलमानी तुर्कस्थानांत देखील यासंबंधानें सक्तीचा कायदा झालेला आहे. आतां त्या लोकांच्या विशिष्ट प्रकारच्या सामाजिक व धार्मिक स्थितीमुळे त्यांचा नीट अंमल होत नाहीं, ही गोष्ट निराळी. पण साऱ्या लोकांस लिहितां, वाचतां व हिशेब करता येणें अत्यंत उपयोगी आहे अशी या शूर, मिजासखोर, बेपर्वा, आळशी, स्त्रीमत्सरी, व विधिप्रसक्त लोकांतील मुत्सद्यांची व राजकारणी पुरुषांचीही खात्री झाली आहे! आमच्या देशांत साऱ्या विद्येचा मक्ता ब्राह्मण जात बळकावून बसल्यामुळें, किंवा ज्यांनीं हा मक्ता बळकविला त्यांना आणि त्यांच्या वंशजांना, ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त होऊन बाकीचे लोक अक्षरशत्रू राहिल्यामुळे, या घटकेस या प्रश्नाहून अधिक महत्त्वाचा दुसरा प्रश्न दिसत नाहीं. आमच्या सांप्रत शोचनीय स्थितीचा जो कोणी शांतपणानें विचार करील, त्याला लोकशिक्षणाशिवाय ही आमची स्थिति सुधारण्याचा दुसरा उपाय नाहीं; असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. सरकारपाशीं हें काम तडीस नेण्याइतके पैसे असोत किंवा नसोत; सरकारानें किंवा लोकांनीं हें काम मनापासून हातीं

घेतल्याशिवाय आमची खरी, टिकाऊ व वाढत जाणारी सुधारणा होण्याचा बिलकुल संभव नाहीं. पण ही पैशाची अडचण फक्त ब्रिटिश अमलांतल्या प्रजेस लागू नाहीं; कारण, इंग्लिश राज्यामुळें नेटिव संस्थानिकांस स्वसंस्थानांतर्गत शांतिमय सुधारणाशिवाय दुसरें कांहींच करावयाचें राहिलेलें नाही. बहुतेक संस्थानिक स्वसुखाभिलाषी बनून जाऊन या; व इतर कर्तव्यांकडे मुळींच लक्ष देत नाहीत ही गोष्ट निराळी; पण देतील तर या किंवा दुसऱ्या खंडांतल्या कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रापेक्षांही त्यांस या कामांत विशेष यश कां मिळविता येऊं नये, हें आम्हांस समजत नाहीं.

लोकशिक्षणाविषयीं विचार करतांना गोंधळ होऊं न देण्यासाठीं ज्या दोन गोष्टी नेहमी डोळ्यापुढें ठेविल्या पाहिजेत; त्या ह्या. लोकशिक्षण म्हणजे उच्चप्रतीचें किंवा धंदेशिक्षण नव्हे. लहानापासून थोरास व गरीबापासून श्रीमंतास नित्याच्या व्यवहारला घडोघडी उपयोगी पडणारें असें जें बुद्धिविकासक अत्यंत स्वल्प प्राथमिक शिक्षण; त्याचाच सक्तीच्या शिक्षणांत अंतर्भाव केला पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या धर्ममतांशी या शिक्षणाचा बिलकुल संबंध नाहीं; तसेंच या शिक्षणापासून चरितार्थ चालविण्यास उपयोगी पडणाऱ्या कोणत्याही धंद्यांचे ज्ञान प्राप्त होत नाहीं. तसेंच, अशा प्रकारच्या शिक्षणाविषयीं सक्ती करणें म्हणजे अमुक प्रकारच्या शाळांत, अमुक फी देऊन, अमुक वर्षे मुलें पाठविणें असाच केवळ अर्थ नाहीं; तर अमुक एक शिक्षण, अमुक एक वयाच्या आंत प्रत्येक मुलीस व मुलास मिळण्याची खबरदारी त्यांच्या आईबापांनीं किंवा पालकांनीं घेतलींच पाहिजे, न घेतल्यास ते अमुक दंडास पात्र होतील, असा अर्थ आहे.. प्रजेचें हित चिंतणाऱ्या प्रत्येक सरकारानें असा नियम करून तो अमलांत आणावा, व त्याकरिता लागेल तेवढा खर्च आनंदानें करावा, असें आमचें मत आहे. तथापि कोणत्याही लोकांस किंवा सरकारास ज्ञानाचें खरे महत्त्व समजून येऊन या गोष्टीची योग्यता कळण्यास बरींच वर्षे लोटावीं लागतात! स्पार्टन व अथीनिअन लोकांस लोकशिक्षणाची थोरवी चांगली समजली होती, व त्यामुळें त्या दोन्हीही लोकांनीं सर्व प्रतीच्या लोकांस प्राथमिक शिक्षण मिळण्याबद्दल फार वाखाणण्यासारख्या सोई केल्या होत्या. रोमन लोकांनीं अर्ध्या अधिक पृथ्वींचे राज्य केलें, पण लोकशिक्षणाचें खरें महत्त्व त्यांस शेवटपर्यंत समजलें नाहीं. अलीकडील युरोपीय राष्ट्रपद्धतीचा मूळ प्रस्थापक फ्रेंच लोकांचा इतिहासप्रसिद्ध राजा शार्लमेन, यानें लोकांत विद्याप्रसार करण्यासाठीं पराकाष्ठेचे परिश्रम केले. त्यानंतर ल्यूथर व त्याचा मित्र मिलँक् थॉन यांसारखे या शिक्षणाचे कैवारी सोळाव्या शतकापर्यंत युरोपाच्या इतिहासांत दृष्टीस पडत नाहींत. या धर्मसुधारकांची बालंबाल अशी

खात्री होऊन गेली होती कीं, रुग्णावस्थेप्रत पावलेल्या ख्रिस्ती धर्माचे संशोधन करण्यास विद्याप्रसाराहून दुसरें चांगलें साधन नाहीं. या दोघांनीं या कामीं जी मेहनत घेतली तीमुळें युरोपांतील इतर लोकांपेक्षां जर्मन लोकांस विद्येचें खरे महत्त्व अगोदर समजून आलें, आणि म्हणून अलीकडील युरोपीय राष्ट्रांत विद्यावृद्धीच्या व विद्याप्रसाराच्या कामांत जर्मनीचा पहिला नंबर आहे. इंग्लंड, इटली, ऑस्ट्रिया, युनायटेड स्टेट्स वगैरे मोठमोठ्या देशांनीं प्राथमिक शिक्षणाकरतां सक्तीचे कायदे केले आहेत यांत कांहीं नवल नाहीं; पण पोर्तुगाल, स्वीडन, बेल्जम, डेन्मार्क इत्यादि व म्हैसूर, बडोदें, किंवा (निझाम) हैद्राबादसारख्या संस्थानतुल्य लहान लहान स्वतंत्र देशांनीं देखील प्रत्येक मुलास व मुलीस प्राथमिक शिक्षण मिळण्याकरतां नानातऱ्हेचे नियम करून, त्यांचा बरोबर अंमल होण्यासाठीं मोठा खर्च ठेविला आहे. इतर थोर पुरुषांप्रमाणें पीटर धी ग्रेट यालाही विद्याप्रसारांचें खरें महत्त्व समजलें होते, पण रशियन लोकांच्या मूढ अज्ञानामुळें व रानटीपणामुळें त्याच्या प्रयत्नास यश आलें नाहीं. चिनी लोक पूर्वीपासून या गोष्टीची महती जाणून आहेत. जपानी लोकांनीं अलीकडे प्रत्येक चांगल्या गोष्टींत युरोपिअन व अमेरिकन लोकांचें अनुकरण झपाट्यानें चालविलें आहे, हें आपणांस ऐकून व वाचून ठाऊक झालेंच आहे. आरंभीं दिलेला उतारा वाचल्यावर युनायटेड स्टेट्समध्ये यासंबंधानें कशी व्यवस्था असेल हें कोणासही सांगावयास नको. या सर्व गोष्टी मनांत आणिल्या असतां काय दिसून येईल कीं, आमच्या पूर्वेस आणि पश्चिमेस ज्ञानरवि कमी अधिक तेजानें प्रकाशूं लागला असून आम्ही मात्र अज्ञानाच्या गाढ तिमिरांत चांचपडत पडलों आहों! आम्ही खालसा मुलखांतले लोक त्यांतून केव्हां पार पडूं ते पडूं. पण मोठमोठ्या संस्थानिकांनीं आपापल्या संस्थानांत 'ज्ञानमय प्रदीपांचे' प्रज्वलन करण्यास मागें पुढें कां पहावें हें समजत नाहीं. यासंबंधानें त्यांच्या मनांत येण्यासारख्या ज्या चारदोन शंका आहेत त्या सहज परिहार करण्यासारख्या आहेत, असें आजच दाखविलें असतें; पण स्थलसंकोचामुळें पुढल्या आठवड्यापर्यंत लेखणीस व मनास ओढून धरणें भाग पडत आहे.

*

प्राथमिक शिक्षण सरकारचें अवश्य कर्तव्य आहे

सरकाराने काय करावें आणि काय न करावें याविषयीं युरोपांत पुष्कळ मतभेद आहे; पण त्या मतभेदांत आम्हांस पडण्याची गरज नाहीं; कारण, 'राजा कालस्य कारणम्' या तत्त्वाचे आम्ही आशिया खंडांतील लोक परम भक्त आहों. कुटुंबाधिपतीला कुटुंबांत जो अधिकार असतो तो राजाला राष्ट्रांत असावा, अशी आमची फार जुनी समजूत आहे. प्रजा राजाची लेंकरें; राजा प्रजेचा पिता; राजानें स्वापत्याप्रमाणें प्रजापालन करावें; सूर्याचे प्रखर किरण आपल्या शिरावर घेऊन ज्याप्रमाणें महावृक्ष आश्रयास येणाऱ्या पादचाऱ्यांस सुखकर छाया देतात, त्याप्रमाणें राजांनीं रात्रंदिवस कष्ट साहून लोकाराधन करावें हीच त्यांची खरी वृत्ति होय- अशा प्रकारच्या राजधर्मसंबंधक कल्पना ज्यांच्या हाडांस खिळून गेल्या आहेत; त्यांना 'राजानें लोकांस प्राथमिक शिक्षण अवश्य दिलें पाहिजे' असें प्रतिपादणारा कांहीं तरीं बहकतो आहे, असें कधींच वाटण्याचा संभव नाहीं. दुसरें, युरोपीय लोकांनीं राजाच्या किंवा सरकारच्या व्याख्येची व्याप्ति कितीही संकुचित केली तरी प्राथामिक शिक्षण तींत आल्यावांचून रहात नाहीं; कारण कर्तव्याची मर्यादा ज्यांनी अत्यंत सूक्ष्म केली आहे त्यांचें देखील असें म्हणणें आहे की, लोकांच्या मालमत्तेचें आणि जीवितांचे संरक्षण करणें हे सरकारचें आद्य कर्तव्य होय. सरकाराच्या कोणत्याही व्याख्येंत ही गोष्ट येत नाहीं असे होत नाहीं; आणि ही गोष्ट घडवून आणण्यास लोकशिक्षणासारखें प्रशस्त साधन नाहीं, तेव्हां लोकशिक्षण हें सरकाराचें अवश्य कर्तव्य आहे हें सिद्ध झालें. यावरून काय दिसतें कीं, राजा अथवा सरकार यांच्या कर्तव्याविषयीं पाश्चिमात्य लोकांची समजूत घ्या, किंवा पौर्वात्य लोकांची समजून घ्या; लोकांस थोडेंबहुत शिक्षण देण्याची जबाबदारी कोणत्याही शास्त्यास वाजवी रीतीनें टाळतां येणार नाहीं. यावर कोणी शंका घेतली कीं, हें कर्तव्य स्पष्ट आहे तर आजपर्यंत तें सर्व ठिकाणीं बजावण्यांत कां आलें नाहीं, व लोकांच्या मालमत्तेचें आणि जीविताचें संरक्षण करण्यास लोकशिक्षणाइतकेंच दुसरे प्रशस्त साधन कशावरून नाहीं? यांपैकी पहिल्या शंकेचे उत्तर असें आहे कीं, आजपर्यंत खुद्द राजे लोकांस किंवा सरकारास लोकशिक्षणाचें खरें महत्त्व नीट समजलें नव्हते; तेव्हां त्याबद्दल त्यांनीं म्हणण्यासारखी दक्षता

दाखविली नाहीं, त्याबद्दल त्यांच्याकडे दोष नाहीं. पण अलीकडे हें महत्त्व सर्वांस समजून आलें आहे किंवा समजावून देतां येण्यासारखी स्थिति प्राप्त झाली आहे; आणि म्हणून आतां किंवा येथून पुढें लोकानुशासनाचें काम ज्यांच्याकडे येईल त्यांनी लोकशिक्षणाची जबाबदारी आपल्या अंगावर न घेणें अत्यंत दूषणीय होणार आहे. दुसऱ्या शंकेच्या संबंधानें आम्ही उलट असा प्रश्न करतों कीं, लोकशिक्षण हें लोकांच्या मालमत्तेच्या आणि जीविताच्या संरक्षणाचें प्रशस्त साधन नसेल तर दुसरें कोणतें आहे? फटके मारणें, खोड्यांत घालणें, मुसक्या बांधणें, अंधेऱ्या कोठडींत कोंडून घालून कांजी पाजणें, साध्या किंवा सक्त मजुरीची शिक्षा देणें, बेड्या ठोकणें, गोळ्या घालणें- हींच प्रशस्त साधनें आहेत की काय? रोग होऊं देऊन मग ते तीव्र उपायांनीं बरे करीत बसणें; किंवा ते मुळींच न होऊं देणे हें प्रशस्त? रोगाविर्भाव झाल्यावर त्याचा प्रतिकार करणें प्रशस्त असेल तर देवी कशासाठी काढूं देता? महारोग्यांस इतरांप्रमाणें समाजांत हवें तसें मिसळूं कां देत नाहीं? घरांत व घराबाहेर घाण करणारास शिक्षा देण्याचे अधिकार म्युनिसिपालिट्यांस, लोकलबोर्डांस, पाटील-कुळकर्ण्यांस, मामलतदारांस आणि इतरांस कशासाठी दिले आहेत? वाख्याच्या उपद्रवाचा आरंभ झाला नाहीं तों पाण्याची स्वच्छता राखण्याबद्दल, एका गांवचे लोक दुसऱ्या गांवांत जाऊं न देण्याबद्दल, ठिकठिकाणी डांबराच्या व गंधकाच्या भट्ट्या पेटवून फिनाईलनें घाणीच्या जागा शिंपडण्याबद्दल इतकी धडपड कां करतां? कुजलेलें मांस, सडलेलीं फळें, व नासलेल्या भाज्या बाजारांत कां विकूं देत नाहीं? या सर्व गोष्टी झालेल्या रोगाच्या प्रतिकारार्थ आहेत, कीं ते न होऊं देण्याचे उपाय आहेत? तसेंच यासंबंधानें सरकारानें सक्ती करणें वाजवी आहे असें म्हणतां कीं गैरवाजवी आहे असें म्हणतां? जर या गोष्टी, रोगांची होता होईल तों उत्पत्ति किंवा त्याचा प्रसार न होऊं देण्यासाठीं करण्यांत येत असतील, आणि त्या सरकारानें करणें प्रशस्त व अवश्य असेल. तर बाकी साऱ्या रोगांहून अतिशय भयंकर व दुष्ट जो अज्ञानरोग; तो नाहींसा करण्यांबद्दल किंवा त्याचे दुष्परिणाम न घडूं देण्याबद्दल जो प्रशस्त उपाय आहे तो सरकारानें न करावा असें तुम्ही कोणत्या आधारावर म्हणणार? हा अज्ञानरोग तुम्हांस क्षुद्र वाटतो काय? जर तो तुम्हांस तसा वाटत असेल तर तुमच्या विचारांत मोठी चूक होत आहे. हा अज्ञानरोग सर्व शारीरिक रोगांच्या मुळाशीं आहे इतकेंच नाहीं, तर झाडून साऱ्या मानुषीय विपत्तीचें हाच बीज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पारतंत्र्याच्या यातना कोण सोशीत आहेत? दारिद्र्यानें कोण पीडिले आहेत? नित्याच्या चरितार्थाची कोणास पंचाईत पडते? दुसऱ्याच्या लाथाबुक्क्या नित्यश: कोणास खाव्या लागतात? यत्किंचित्

कारणास्तव मारामाऱ्या करण्यास व खून पाडण्यास कोण तयार होतात? तुरुंग बहुधा कोणत्या प्रकारच्या लोकांनीं भरलेले असतात? वेडेपणाच्या धर्मसमजुतीनें नानाप्रकारचे देहदंड कोण सोसतात व धर्मसंबंधी तंटे कोण माजवितात? अल्प वस्त्र, अल्प अन्न व अमंगल वसति यांच्या योगानें होणारे अनंत हाल कोणास भोगावे लागतात? या सर्व विपत्ति विशेषत: अज्ञान लोकांस छळीत नाहीं असें जर कोणी सिद्ध करून देईल तर लोकशिक्षणांत सरकारानें हात घालण्याची किंवा तें आपले अवश्य कर्तव्य आहे असें मानण्याची गरज नाहीं, असें आम्ही खुशाल कबूल करूं! कोणत्याही मनुष्यावर चोरीचा किंवा खुनाचा आरोप शाबीत झाला असतां त्यांच्या अपराधाच्या मानानें त्याला हवी ती शिक्षा ठोठावण्याचा अधिकार न्यायाधीशाकडे ठेवण्यांत जर तुम्हांला अवघड वाटत नाही तर त्या मनुष्याला चोर किंवा खुनी न होऊं देणाऱ्या साधनांचा उपयोग करण्याचा अधिकार त्याकडे ठेवण्यास, तुम्ही इतके आढेवेढे कशासाठीं घ्यावे हें समजत नाहीं.

या विचारसरणीवर कित्येक लोक असा आक्षेप घेतील कीं, अगोदर शिक्षणापासून किंवा ज्ञानार्जनापासून हटकून चांगले परिणाम होतात असें कोणासही म्हणतां येणार नाहीं, व ते होतात असें वादाकरितां क्षणभर मानिलें तरी तें शिक्षण सरकारानें सक्तीनें दिलेंच पाहिजे असें होत नाही; तें मुलाच्या आईबापांनीं किंवा लोकांचे लोकांनी दिले तरी चालणार आहे. अमुक गोष्ट चांगली आहे असें पक्कें समजल्यावर लोक ती आपण होऊन करतात; सरकारानें तीबद्दल सक्ती करण्याची गरज नाही. द्रव्य संपादन करणें, लौकिक मिळविणें, सुख भोगणें, रुचेल तो पदार्थ विकत घेणें वगैरे गोष्टी ज्याप्रमाणें जात्या इष्ट असल्यामुळें ज्याचा तो त्या मिळविण्याचा प्रयत्न करतो, व सरकारास त्याबद्दल सक्ती करावी लागत नाही, त्याप्रमाणेंच शिक्षण ही चांगली व इष्ट वस्तु आहे म्हणून ती ज्याचा ती आपल्या शक्त्यनुसार संपादन करील; तींत सरकारनें पडण्याची गरज नाहीं. या दोन आक्षेपांपैकी दुसऱ्याचें उत्तर फार थोडक्यांत देण्यासारखें आहे हें असें:- शिक्षणाचे महत्त्व साऱ्या लोकांस चांगलें समजून आलें आहे, असें असेल तर आजपर्यंत त्याचा आपोआप प्रसार कां झाला नाहीं? उदार लोकांच्या औदार्यानें किंवा समंजस लोकांच्या परिश्रमानें प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापण्यांत येऊन लोकसंख्येच्या मानानें त्यांची संख्या वाढत जाती; तर या कामीं सरकारने सक्ती करावी किंवा नाहीं, असा प्रश्न कधींच न उद्भवता, व कोणाही सरकारास त्यासंबंधानें सक्तीचे कायदे करावे न लागते. पण खरी स्थिति अशी आहे कीं, साऱ्या लोकांस शिक्षणाचें महत्त्व समजलेलें नाहीं, व ते समजलें तरी तें सर्वांस प्राप्त होण्याची तजवीज त्यांच्या हातून घडून येणें, या दोन अगदीं निराळ्या गोष्टी आहेत. आळस

हा घातक आहे असें कळत असून आळसांत वर्षेंच्या वर्षें लोटणारे, आणि ज्ञान फायदेशीर आहे हें समजत असून त्याची पर्वा न करणारे काय थोडे लोक आहेत! त्याप्रमाणेंच प्राथमिक शिक्षण अत्यंत उपयोगी आहे अशी साऱ्या लोकांचीं पक्की खातरी झाली; तरी सरकारानें थोडीबहुत सक्ती केल्याशिवाय प्रत्येक मुलीस व मुलास वयांत येण्यापूर्वी तें शिक्षण देण्याची व्यवस्था लोकांच्या हातून होईल असे आम्हांस वाटत नाही., मुलें घरच्या घरी शिकोत; जर्मनीप्रमाणें स्थानिक कमिट्यांनीं किंवा खाजगी लोकांनी घातलेल्या शाळांत शिकोत, किंवा इंग्लंडाप्रमाणें सरकारी किंवा मदतीच्या शाळांत शिकोत; सहा आणि चौदा किंवा आठ आणि चौदा वर्षांच्या दरम्यान त्यांस अमुक एक शिक्षण मिळालेच असले पाहिजे, अशी सरकारानें सक्ती केल्याशिवाय प्रत्येक प्रौढ स्त्रीस किंवा पुरुषास आपलें पत्र आपण लिहितां किंवा वाचतां येण्याची; व आपल्या निशाणीची रेष काढण्याकरतां दुसऱ्यास न बोलावण्याची वेळ कधींही येणार नाहीं. प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी कोणावरही पडो, तें दिलें आहे किंवा नाहीं, हें सरकारानें पाहिलेंच पाहिजे. लोकांकडून तें देण्याची तजवीज होईल तर सरकारानें त्यांत पडण्याची गरज नाहीं; पण त्यांच्याकडून तसें न होईल तर सरकारने त्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतलीच पाहिजे. साखरेसारखी उपभोग्य वस्तु ज्याचीं त्यानें मिळवावीं हें खरें; पण साखरेच्या आणि विद्येच्या खरेदींत फरक आहे. जो साखरेची खरेदी करीत नाहीं, त्याला साखरेवांचून रहावें लागतें एवढेंच काय तें! पण जो शिक्षण संपादित नाहीं तो स्वत: अशिक्षित रहातो. येवढेंच नाही; तर त्याच्या अशिक्षणापासून इतरांस त्रास होतो. एकापासून दुसऱ्याला निष्कारण त्रास न होऊं देणें हे सरकारचें आद्य कर्तव्य आहे, व ज्याअर्थी अशिक्षित मनुष्य इतरांस त्रासदायक होतो; त्याअर्थी त्याला सुशिक्षित किंवा सज्ञान करून तो इतरांस त्रासदायक न होईल असा करणें हें सरकारचें प्रमुख कर्तव्य आहे.आतां शिक्षणापासून नीति वाढतेच असें नाहीं, असा दुसरा आक्षेप राहिला. आम्हांस हें मत कांहीं अंशीं कबूल आहे. पण शिक्षणापासून नीति वाढत नसेल तर दुसऱ्या कोणत्या साधनानें वाढते, व शिक्षणापासून ती वाढत नसली तरी बिघडते कीं काय, असा आम्ही उलट प्रश्न करतों. नीत्याचारानें नीति वाढते असें कोणाचें म्हणणें असेल, तर अमुक गोष्ट नीतीची आहे आणि अमुक अनीतीची आहे, हें तरी कोण ठरवणार? शिवाय शिक्षणापासून नीति वाढत नाहीं असें मानिलें तरी त्यापासून जे दुसरे शेंकडों फायदे होतात त्यासाठीं तें देणें अवश्य नाहीं काय? बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता हे मनुष्याच्या मनाचे निराळे धर्म आहेत; असें मानिलें तरी त्यांचा एकमेंकावर कांहींच परिणाम घडत नाहीं, असें म्हणणें मोठी चूक

आहे. ज्याची दुराचरणाकडे स्वाभाविक प्रवृत्ति आहे, त्याला सुशिक्षण मिळालें तर त्याच्या हातून फार थोडा दुराचार घडेल, व ज्याला सदाचरणाची नैसर्गिक आवड आहे त्याची ती सुशिक्षणाचे दुप्पट होईल, असा मानसशास्त्रविशारदांनी पुष्कळ अनुभवांती ठाम सिद्धांत ठरवून ठेविला आहे तेव्हां शिक्षणाच्या कमी-अधिक प्रमाणाप्रमाणें नीतीस अडथळा न येतां उलट तिला त्यापासून साहाय्यच होणार आहे हें ध्यानांत ठेवून, सर्व राजांनीं व सरकारांनीं आपल्या प्रजेस निदान प्राथमिक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्ञानाचा नीतीवर कसला व किती परिणाम घडतो हा प्रश्न येथें काढण्याची गरज नाहीं; कारण त्यापासून जे दुसरे शेंकडो फायदे होतात त्यासाठींच तें संपादन करणें अवश्य आहे; हें आतांपर्यंत तत्संबंधानें केलेल्या चर्चेवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. मनुष्याचा व्यवहार सुरळीत चालण्यास व उत्तरोत्तर त्याचें पाऊल पुढें पडत जाण्यास ज्ञानवृद्धि आणि ज्ञानप्रसार यासारखें साधन नाहीं, हे कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राकडे नजर फेंकली असतां ध्यानांत येणार आहे. मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधानें वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारो पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध- इत्यादिकांनीं गांजून, पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे, असे आम्हांस वाटत नाहीं.

*

मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची अवश्यकता

गेल्या दोन अंकांत प्राथमिक शिक्षणाविषयीं सरकारानें सक्ती करावी असें जें म्हटलें आहे, तें मुलगे व मुली या उभयतांच्या शिक्षणाविषयीं म्हटलें आहे, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. नसलें आल्यास आमच्या लिहिण्याचा तसाच भाव होता, हें येथें उघडपणे सांगतों! लहान मुलांच्या शिकण्याबद्दल सरकारानें जितकी सक्ती केली पाहिजे तितकी मुलींच्या शिकण्याबद्दलही केली पाहिजे; किंबहुना मुलींच्या शिकण्याबद्दल थोडीशी अधिक केली पाहिजे! मुलींना मुलांबरोबर युनिव्हर्सिटीच्या मोठमोठ्या परीक्षा देण्यास व पदव्या मिळविण्यास सदर परवानगी असावी किंवा नाही, असा प्रश्न सध्यां आपल्यापुढें नाहीं; तूर्त प्राथमिक शिक्षणाच्या संबंधानें विचार चालला आहे, व हें शिक्षण वास्तविक पहातां मुलांपेक्षां मुलींस विशेष जरूरींचे आहे, असें विचाराअंतीं प्रत्येकास दिसून येणार आहे. अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते. आईच्या प्रकृतीचें, स्वभावाचे, व आचरणाचे परिणाम मुलीच्या प्रकृतीवर थेट गर्भाधानापासून होऊं लागतात. बायकोच्या व मुलांच्या चरितार्थास लागणारें द्रव्य बाप संपादितो; मुलें दुखणेकारी असलीं तर थोडीबहुत काळजी घेतो; बाहेर थकलाभागलेला घरी परत आला म्हणजे कदाचित् त्यांचे लाड करून आनंद पावतो. हें सारें बाप करतो, व त्यानें तें करणें जरूर आहे! पण मुलें स्वावलंबी होईतोंपर्यंत त्याबद्दल जी अहोरात्र खस्त खावी लागते; ती आईला किंवा कारणपरत्वे तत्स्थानापन्न जी स्त्री झाली असेल तिलाच खावी लागते. पापणीला पापणी लागूं न देतां उभ्या रात्री जागत काढणें, मोटाच्या मोटा धुणीं धुणें, कोणत्याही प्रकारच्या देहधर्मास कधीही कंटाळून न जाणें- तात्पर्य आपल्या प्राणापेक्षां, ज्याला आपण पोर म्हणतो त्यास जपणें हे अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे. पुरुषाच्यानें तें दोन दिवस देखील निभावयाचे नाहीं! तेव्हां ज्या स्त्रीवर अपत्यसंगोपनाचें येवढें जबाबदारीचे काम आपण सोंपवितों, तिला अक्षरशत्रु असू देणें अत्यंत अहितकार आहे असें आम्हांस वाटतें. सोल्जरांची कवाईत पुष्कळांनीं पाहिलीच असेल. या कवाईतीच्या ओनाम्याचा धडा प्राथमिक शिक्षण मिळालेल्या कांहीं इसमांस व तें न मिळालेल्या कांही इसमांस बरोबर दिला, तर थोड्या दिवसांत ज्यांना प्राथमिक

शिक्षण मिळालेलें आहे त्यांचा धडा; तें शिक्षण ज्यांना मिळालेलें नाहीं त्यांपेक्षां विशेष चांगला वठूं लागतों, हें जर्मन, फ्रेंच, व इंग्लिश पलटणींत फिरफिरून घेतलेल्या अनुभवावरून पूर्णपणें सिद्ध झालें आहे. व्यवस्थित रीतीनें हातपाय हलविण्याच्या कामांत प्राथमिक शिक्षणाचा जर येवढा परिणाम घडतो; तर चैतन्यवृक्षांचें बीजारोपण झाल्यापासून तो स्वावलंबी होईतोंपर्यंत त्याच्या संगोपनाचें काम जिच्यावर पडतें, तीवर प्राथमिक शिक्षणाचा निदान नवशिक्या कवाईतवाल्याइतका तरी परिणाम झालाच पाहिजे! सरासरीनें इतर गोष्टींत सारख्याच स्थितींत असलेल्या वीस स्त्रियांपैकी दहांना थोडेंबहुत शिक्षण मिळाले आहे आणि दहांना त्याचा स्पर्श झालेला नाहीं- अशीं स्थिति कोठें असेल तर तेथें शिकलेल्या स्त्रियांच्या मुलांचे संगोपन विशेष चांगल्या रीतीनें होत असून एकदरीत त्यांचे संसारही अधिक चांगल्या पद्धतीनें चालले आहेत असें दिसून आल्यावाचून रहाणार नाहीं. ''लहानपणीं लग्नें केलीं म्हणून काय होतें? स्त्रियांना अक्षरशत्रु ठेविल्या म्हणून काय होतें?'' अशा रीतीचा निरर्गल प्रलाप करणाऱ्या विचारशून्य, मतलबी, किंवा मत्सरी लोकांचीं तोंडें एकदम बंद करितां येत नाहींत, यांचें कारण असें आहे कीं, राजकीय, धार्मिक, व सामाजिक गोष्टींत पदार्थविज्ञान शास्त्रांतल्या प्रयोगांसारखें तत्काल खात्री करून देणारे प्रयोग करतां येत नाहींत. या गोष्टींतील बराच भाग अनुमानावर सोंपवावा लागतों; आणि हा पंथ एकदां पतकरला म्हणजे मग पाहिजे त्यानें पाहिजे तसें बहकत सुटावें अशी अनवस्था होऊन जाते! या अनवस्थेचा परिणाम असा होतो कीं, परस्परांशीं अगदी उलट असे दोन सिद्धांत दोन प्रकारच्या लोकांस बरोबर दिसूं लागतात व तदनुसार त्यांच्या आचारातही फरक पडतो! तथापि हा सारा गोंधळ कल्पनेच्या अनावरपणामुळें घडून येत असतो. अनुभव वाढत जाऊन कल्पनेचा जोर कमी होऊं लागला, आणि सारासार विचार वाढत चालला म्हणजे खऱ्या उपयुक्त गोष्टी सर्वांस ग्राह्य होऊं लागतात, इतकेंच नाहीं, तर त्या अमलांत आणण्याबद्दल सारे सहाय्य करूं लागतात. लोकशिक्षण व स्त्रीशिक्षण यांसंबंधानें अमेरिकेंत व युरोपांत वादी लोकांचीं अनेक तुंबळ रणें होऊन अखेरीस उभयपक्षांची आपापसांत समजी झाल्यासारखी दिसते. निदान प्राथमिक शिक्षणाच्या संबंधानें तरी आता फारसा मतभेद राहिलेला दिसत नाहीं. प्रत्येक मुलीस व मुलास चवदाव्या वर्षापर्यंत कोणाकडून तरी अमुक ज्ञान प्राप्त झालें आहे, हें पहाण्याची जबाबदारी सरकारानें किंवा संस्थानानें आपल्या शिरावर घेतली पाहिजे असें सारे लोक कबूल करतात. येथें अजून तें रण माजावयाचें आहे. पण ज्याप्रमाणें इतर गोष्टींत त्याप्रमाणेंच हींतही आम्हीं पाश्चिमात्य लोकांच्या परिश्रमाचा फायदा घेतला, तर कष्ट न करितां

त्याच्या फलाचा उपयोग आम्हांस आजच्या आज घेतां येणार आहे.

सार्वजनिक शिक्षणाची अवश्यकता ही अगदी अलीकडली कल्पना असल्यामुळें कोणत्याही जुन्या राष्ट्रांत स्त्रियांच्या शिक्षणाकडे लोकांचे मन गेलें नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. असीरिआ, इराण, ईजिप्त, हिंदुस्थान, चीन वगैरे जुन्या देशांत ज्ञानाचा बराच प्रसार झाला होता, पण ते ज्ञान त्या त्या लोकांतील एक किंवा अधिक वर्गांच्या हातीं असे; त्याशिवाय बाकीचे सारे लोक केवळ अडाणी असत. गार्गीबाचक्नवी किंवा वडवाप्रतियेयी अशा पूर्वकालीन स्त्रियांच्या नांवावरून किंवा रामायणमहाभारतादि पुराणांत अथवा कालिदासभवभूत्यादिकांच्या ग्रंथात, स्त्रीशिक्षणाचा जो अप्रत्यक्ष उल्लेख आला असेल त्यावरून भरतखंडात बायकांस शिक्षण देण्याचा परिपाठ होता; असें म्हणणें म्हणजे झांशीच्या लक्ष्मीबाईच्या उदाहरणावरून साऱ्या हिंदु स्त्रिया लढाऊ आहेत, किंवा अहिल्याबाईच्या उदाहरणावरून त्या राजकार्यकुशल आहेत असे म्हणण्यासारखेंच होय. पंडिता रमाबाईच्या वडिलासारख्या कांहीं असामान्य पुरुषानी आपल्या बायकास, मुलींस, सुनांस किंवा बहिणींस त्या काळी उपलब्ध असलेली सारी विद्या दिली असेल, कित्येक राजघराण्यांतील स्त्रियांस नर्तनगायनवादनहि कलाबरोबर वाचनलेखानादि कला शिकविण्याची रूढि असेल, वेदांतविषयाकडे मनाची विशेष प्रवृत्ति असल्यामुळें मुक्ताबाईसारख्या काही भाविक स्त्रियांनी तत्त्वज्ञानसंपादनाच्या अत्युत्कट इच्छेने कित्येक ग्रथाचें अवलोकन केलें असेल; पण तेवढ्यावरून मुलीस शाळेत पाठविण्याचा किंवा घरच्या घरीं लिहिण्यावाचण्यास शिकविण्याचा प्रचार कोणत्याही वर्गात रूढ होता, असें दाखविण्यास आम्हापाशी पुरावा नाहीं, सर्व देशांतील सामान्य लोकांच्या स्त्रिया अशिक्षित असत. नाही म्हणायला स्पार्टन लोकांत मात्र पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांस हरएक प्रकारचें शिक्षण देण्याचा परिपाठ होता. या परिपाठामुळें स्पार्टन कुटुंबांत स्त्रियांचें जितकें वजन असें, व त्यांच्या सुशिक्षितपणाचा त्यांच्या संततीवर जितका परिणाम घडे, तितकें वजन व तसा परिणाम दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांत दिसून आला नाहीं. आम्हांप्रमाणेंच आथेन्सचे लोक प्रसंगविशेषाशिवाय स्त्रियांस मोकळेपणानें समाजांत वावरूं देत नसत. स्पार्टन लोकांवर त्यांच्या स्त्रियांचा जो दाब असे; त्याबद्दल त्याना टोचून बोलतांना ''हे स्त्रीराज्यांतील लोक'' असें अथीनिअन्स म्हणत. रोमन लोकांत स्त्रियांना मोठा मान देत. इतकेंच नाहीं, तर लहान मुलांप्रमाणें ते मुलींनाहीं शाळेत धाडीत असत, असें म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. तथापि हा प्रचार सर्व वर्गांतील रोमन लोकांत रूढ असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. ग्रीक व रोमन लोकांचीं राज्यें लयास गेल्यावर जी

अलीकडील राज्यपद्धति स्थापित झाली, तिचा मूळ पाया घालणारा राजा शार्लमेन याने मुलांप्रमाणेच मुलींच्या शिक्षणाबद्दलही पुष्कळ व्यवस्था केल्या होत्या. तथापि युरोपांत धर्मक्रांति होईतोंपर्यंत स्त्रीशिक्षणाकडे लोकांनी फार लक्ष दिले नाही. ज्याप्रमाणे पुरुषांच्या त्याप्रमाणेच स्त्रियांच्या शिक्षणाविषयींही ल्यूथरचा मोठा आग्रह असे. बायबलांतील खरे रहस्य जसें पुरुषांना, तसें स्त्रियांना कळल्याशिवाय खरी धर्मसुधारणा होणार नाहीं; अतएव सर्वांनीं बायबल वाचण्यास शिकलें पाहिजे; अशा मुद्यावर तो सुधारक त्या वेळेस भांडत होता. युरोपियन धर्ममठांत ईश्वरभक्तिपरायण ज्या स्त्रिया असतात, त्यांस नन्स म्हणतात. या नन्स स्वत. सुशिक्षित असून इतर स्त्रियांसही त्या शिक्षण देत असत; तथापि अशाच्या परिश्रमानें स्त्रीशिक्षणाचा हवा तेवढा प्रसार होण्याचा संभव नव्हता व तो कधीही झाला नाहीं. स्त्रियांचें शिक्षण पुरुषांच्या शिक्षणाच्या मागून किंवा फार झाले तर बरोबर येणारें आहे आपल्या हातीं सत्ता असून आपण अज्ञान रहाणें आणि स्त्रियांस सज्ञान होऊं देणे इतकी परोपकारबुद्धि पुरुषांच्या हृदयांत खचित वसत नाहीं एका बाजूस ज्ञानाचा मुळीच गंध नाहीं व दुसऱ्या बाजूस पुरुषांप्रमाणें मोठमोठ्या विद्यालयांत पडून हव्या त्या पदव्या संपादण्याची व पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करण्याची सदर परवानगी, अशी जी विलक्षण स्थिति सांप्रत कालीं पृथ्वीच्या पाठीवर दिसत आहे; तीवरून अनुमान करतां, पुरुषांप्रमाणे स्त्रियांना ज्ञानमंदिराची द्वारें आम्हांस आज नाहीं उद्या खुलीं करून द्यावीं लागणार हें ध्यानांत आणून श्री. सयाजीराव महाराज गायकवाड मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच मुलीच्या प्राथमिक शिक्षणाबद्दलही सक्तीचा कायदा करतील तर उच्च कुलांतल्या मराठ्यांनीं आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषांत कोंडून घातल्यामुळें जी अपकीर्ति संपादिली आहे तिचें परिमार्जन होऊन प्रख्यात लोकशास्त्यांच्या नाममालिकेंत त्यांचें नाव चिरस्थाई होऊन बसेल.

*

स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाही?

या देशांत या प्रश्नांची एव्हां चर्चा करीत बसणें म्हणजे कांहीं अंशीं वेडेपणच आहे! विद्या ही एकप्रकारचें धन आहे, व इतर धनिकांप्रमाणें विद्यारूप धन ज्यांस प्राप्त झालें आहे त्यांपैकीं कित्येकांना तें दुसऱ्यास येऊं नये असें वाटतें. ग्रीक लोकांशिवाय इतर लोक विद्याधन संपादण्यास अपात्र आहेत असें अरिस्टॉटलचें मत होतें. ग्रीक लोकांनीं शास्त्रें पढावीं, ज्ञान संपादावें, ऐष आराम भोगावे, व अंमल करावा, आणि इतर लोकांनीं ग्रीक लोकांचे गुलाम होऊन रहावें; कारण ग्रीक लोकांच्या बरोबरीनें राहण्यास ते जात्याच असमर्थ आहेत, असा त्या जगत्प्रसिद्ध अथीनिअन तत्त्ववेत्याचा पूर्ण ग्रह झालेला होता. गुलामांचा व्यापार बंद होईतोंपर्यंत आफ्रिकेतील नीग्रो लोकांविषयी अनेक ख्रिस्ती लोकांचेही असेंच म्हणणें होतें; इतकेंच नाहीं, तर तदनुसार आचरणही होतें. राज्यविस्तार करण्याची ज्यांची महत्त्वाकांक्षा अद्यापि पूर्ण तृप्त झाली नाहीं, अशा कित्येक राष्ट्रांस या घटकेस असें वाटत आहे कीं, कांहीं लोकांनीं बादशाही मिरवावी आणि काहींनी नेहमीं त्यांचे पादांकित होऊन रहावें, हा नि:संशय सृष्टिनियम आहे! ब्राह्मणांनीं विद्या संपादावी, क्षत्रियांनीं राज्य करावें, वैश्यांनीं व्यापार करावा, आणि शूद्रांनीं कनिष्ठ प्रतीची सेवा करावी, ही आमची पूर्वीची व्यवस्था. तात्पर्य काय कीं, संपत्ती, अधिकार व विद्या ही ज्यांस प्राप्त होतात त्यांस तीं आपणच बळकावून बसावें, असें वाटूं लागतें. तसें करणें हा आपला हक्क आहे; तसें करण्यांत आपलें व दुसऱ्याचें परम हित आहे; अशीच व्यवस्था असावी असा परमेश्वराचा किंवा सृष्टीचा आद्य हेतु होता किंवा आहे, असा तर्कवाद मोठमोठे विद्वान, धनिक, व अधिकारी दिवसाढवळ्या बेलाशक करीत आले आहेत व आणखी अनेक शतकें करीत रहातील! पण वारंवार होतें काय कीं, यांच्याच कंपूंतून कांही इसम फितून होऊन उलट पक्षास मिळतात, आणि त्यांचे पुढारी होऊन त्यांच्या वतीनें पूर्वीच्या आपल्या जातभाईशीं भांडूं लागतात! कालांतरानें उलट पक्षांतही फांकडे लढवय्ये तयार होऊन हक्कवाल्या थोड्यांचा बिनहक्कवाल्या बहुतांशीं तुंबळ संग्राम होऊं लागतो, आणि बिनहक्कवाल्या सामान्य लोकांचा हक्कवाल्या मर्यादित वर्गाच्या गोटांत शिरकाव होतो. बहुजनसमाजाचें पाऊल जें हळूं हळूं पुढें पडत

चाललें आहे तें या रीतीनें पडत चाललें आहे. आपापल्या हिताकरिता होत असलेला कलह जसा कैलासपतीच्या घरीं, तसाच सर्व पृथ्वीच्या पाठीवर रात्रंदिवस चालू आहे! ''अमुक गोष्ट करूं नको, त्यांत तुझा फायदा नाही'' असा मायावी वेदांत एक दुसऱ्यांस सांगत रहाणार; व दुसरा आपल्या हितावर नजर देऊन पहिल्याशीं भांडत रहाणार,- हें या मृत्युलोकींचे शाश्वत चिन्हच असें म्हणण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत पुरुषापुरुषांचा संग्राम चालला आहे; तेथून पुढें तो स्त्रीपुरुषांत सुरू होणार आहे; किंबहुना कित्येक देशांत तो सुरू झाला आहे. येथें त्याचा प्रादुर्भाव होण्यास अजून बरीच वर्षे लागतील. इतर सुधारलेल्या राष्ट्रांना एवढें तरी वाटूं लागलें आहे कीं, झाडून साऱ्या स्त्रियांना व पुरुषांना व मुलाना आणि मुलींना प्राथमिक शिक्षण मिळालेले असावें अगर मिळावे. आमच्या येथें अजून असें वाटूं लागावयाचें आहे. ब्राह्मणेतर प्रत्येक जातीच्या मनुष्यास थोडेंबहुत शिक्षण मिळालें तर हिंदुस्थानावर दुर्धर प्रसंग गुदरणार नाहीं, अशी आमच्यांतील कित्येक शहाण्या म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांची व लोकमत लोकांपुढें व सरकारपुढें आणणाऱ्या आणि त्यास योग्य वळण लावणाऱ्या पत्रकर्त्यांची खातरी झाली पाहिजे. ती होण्यास निदान पांचपंचवीस वर्षे तरी लोटली पाहिजेत. ती झाल्यावर पुढें स्त्रीशिक्षणाचा विचार! किंवा सुदैवानें मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्या शिक्षणाविषयींही चर्चा सुरू झाली तर मुलांप्रमाणेच साऱ्या मुलींसही प्राथमिक शिक्षण जरूर आहे, अशी या लोकमतप्रकाशकांची किंवा स्वनियुक्त लोकप्रतिनिधींची खातरी होण्यास किती काळ लागेल कोण जाणें! बहुधा साऱ्या मुलींस प्राथमिक शिक्षण मिळालें पाहिजे, हें विधान त्यांच्या पसंतीस पूर्णपणें कधींही उतरणार नाहीं; पण लाजेकाजेस्तव ते त्याला आपली बाह्यात्कारी कबुली दाखवूं लागले, तरी ज्या वेळेस मुलींस मुलांप्रमाणें मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण द्यावें किंवा नाहीं असा प्रश्न निघेल; तेव्हां तें त्याचा निषेध करण्यासाठी आपल्या बुद्धिसामर्थ्याची, लेखनकुशलतेची, व वाक्यपांडित्याची पराकाष्ठा करून सोडतील याविषयीं आम्हांस शंका नाहीं! पुढें मागें इतर न्याय्य, अवश्य व कल्याणप्रद गोष्टींप्रमाणें या गोष्टींतही सुधारकांचा वरचष्मा होऊन या हताश, विचारशून्य, मत्सरी, भेकड, मूर्ख अथवा आपमतलबी आणि कोडग्या लोकांस आपलीं डोकीं गुडघ्यांत घालून मुळू मुळू रडत बसावें लागेल; हें तर त्यांचें कपाळ ठरलेलेच आहे! पण ते तशी वेळ येईतोंपर्यंत आपल्याकडून होईल तितक्या टिवल्याभावल्या व व्रात्यपणा केल्यांवाचून रहावयाचें नाहींत! ज्याप्रमाणें प्रत्येक मुलास व मुलीस आईबापांनीं किंवा बापानें प्राथमिक शिक्षण दिलें पाहिजें, असें अलीकडे लोकमत सर्वत्र झालें आहे, त्याप्रमाणेंच स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे

तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या; आणि पाहिजे तेव्हां लग्ने करून हवा तसा ससार करावा- अशी मोकळीक कालांतरानें सर्वांस मिळणार आहे, याची जरी आम्हास शंका नाहीं, तरी या निबंधाच्या आरंभी म्हटल्याप्रमाणें हिंदु स्त्रियांस वरिष्ठ शिक्षणाची द्वारें खुली असावीं की नाहीं, या प्रश्नाच्या चर्चेत आज विशेष वेळ दवडणें म्हणजे त्याचा थोडासा दुरुपयोग करण्यासारखेंच आहे; कारण, मध्यम प्रतीचे किंवा वरिष्ठ प्रतीचे शिक्षण स्त्रियांना देण्याचा प्रघात पडण्यापूर्वी, आमच्या विवाहकालात व विवाहपद्धतींत बराच फरक होणें अवश्य आहे. लग्न झालेले मुलगें हायस्कुलांत व कॉलेजांत असून मध्यम व वरिष्ठ प्रतीचें शिक्षण संपादित असतात हें खरे आहे; पण मुलींनां तसें करतां येणार नाहीं. बायकोला न्हाण आलें असो, बायको गर्भार असो, किंवा बायकोला मूल झाले असो, मुलाचें लक्ष विद्येकडे असेल तर त्याची ही विलक्षण गृहस्थिति त्याच्या मार्गात येत नाही. अल्पवयांत प्राप्त झालेली गृहस्थता किंवा पितृता विद्यार्थिपणास केवळ विघातक होत नाही, असा पुष्कळांचा अनुभव आहे. पण जर तेराव्या किंवा चौदाव्या वर्षांपासून मुलीच्या पाठीमागे गर्भारपण, बाळंतपण, व अपत्यसगोपन ही लचांडें लागली असतील तर तिने हायस्कुलांत किंवा कॉलेजांत जावें कसे? आणि मॅट्रिक्युलेशनची, बी. ए. ची, एल्. एम. ॲन्ड एस्. ची, एल्. सी. ई. ची, अथवा एल्. एल्. बी ची परीक्षा द्यावी कशी? मुलींकडून असल्या परीक्षांचा अभ्यास होण्यास त्या परीक्षा आटपतपर्यंत त्या अविवाहित राहिल्या पाहिजेत, किंवा विवाहित असून त्यास अविवाहितासारखे त्यांच्या नवऱ्यांनी व सासूसासऱ्यांनी राहूं दिलें पाहिजे. पण या पिढीत हें होणें शक्य दिसत नाहीं. रजोदर्शनापूर्वी साऱ्या मुलींचीं लग्नें झालींच पाहिजेत, व रजोदर्शन झाल्याबरोबर गर्भाधानविधि उरकलाच पाहिजे; तसें न केलें तर मुलीकडल्या व मुलाकडल्या चाळीस पिढ्यांस दुर्गति प्राप्त होते, अशा प्रकारच्या अधर्मी धर्मापुढें लोटांगणे घालणारे आणि त्याचे आज्ञापाश काळजाला जाऊन भिडले, तरी बिलकुल कांकू न करता, त्या क्लेशांलाच सुख मानणारे वेडेपीर जोपर्यंत नाहीसें झाले नाहीत, तोपर्यंत आमच्या मुलांप्रमाणे मुलींना मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण सपादितां येणार नाहीं. अगोदर हे सासुरवासाचें घोडें मुळीच नाहींसे झाले पाहिजे. लग्न झाल्यावर मुलीनें आईबापांचें घर सोडावें तें एकदम नवऱ्याच्या संसाराचें स्वतत्र आधिपत्य पत्करावें. तिला मध्यंतरी सासूसासऱ्याच्या हाताखाली म्हणजे सासुरवासांत उमेदवारी करण्याची मुळीच गरज पडूं नये; आणि खरेच पाहिलें तर आईबापांनीं मुलांच्या विद्येकडे व आपल्या सुखाकडे लक्ष द्यावयाचें सोडून, त्यांना लौकर

लौकर आईबाप करून टाकण्याचा, व त्यांच्या पोरांची नसती जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन सगळ्यांनाच हालांत पाडण्याचा, आग्रह कशासाठी धरावा, हें आम्हास समजत नाही. जातिविशिष्ट सुखाविषयीं आईबापांनीं व भटांनीं इतकी काळजी वहाण्याची गरज नाहीं. त्या सुखाचें बीज स्त्रीपुरुषाच्या प्रकृतींत विधात्यानें फार काळजीपूर्वक पेरलेलें आहे. या देशांतील दूष्य व निंद्य वैवाहिक संस्थांमुळें आणि आचारांमुळें मात्र त्याची प्रथम हवी तशी वाढ आणि पुढें पुष्ट फलनिष्पत्ति होत नाही. मुली व जावई यांचे अल्पवयांत सुखसोहळे पाहण्याची आम्हांस जी दुष्ट अभिरुचि किंवा खोड लागली आहे, तीमुळें आम्ही आपल्या मुलांमुलींचें आणि त्याबरोबर साऱ्या राष्ट्रांचें अतोनात नुकसान करीत आहों, हें आमच्या लक्षांत येऊं नये, ही मोठ्या दु:खाची गोष्ट आहे. आमची ही खोड गेल्याशिवाय या देशांत अनेक मोठ्या स्त्रिया किंवा मोठे पुरुष उत्पन्न होण्याचा संभव नाही; आणि तसल्या स्त्रीपुरुषांशिवाय कोणत्याही देशास चिरस्थाई मोठेपणा यावयाचा नाहीं. तेव्हां स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावें किंवा नाहीं; या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी आम्ही त्यांचा विवाहकाल वाढविण्यास तयार होणार किंवा नाही याचें उत्तर देण्यास तयार झालें पाहिजे!

✷

स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें, व तेंही एकत्र द्यावें!

आजच्या निबंधाचा मथळा दृष्टीस पडल्याबरोबर कित्येकांच्या चित्तवृत्तीत कल्होळ झाल्यावांचून रहाणार नाहीं. पण त्याला आमचा इलाज नाहीं. आम्हांस जें प्रशस्त वाटत आहे तेच लिहिणें भाग आहे. स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण दिल्यामुळें कित्येक पुरुषांस घरीं बसून मुलें खेळविण्याचें, लुगडी धुण्याचें, भांडी घासण्याचें, स्वयंपाक करण्याचें, दळणकांडण करण्याचें काम करावे लागतें तर त्याला आम्ही काय करणार? असली कामें स्त्रियांनींच करावीं हा कांहीं ईश्वरी नियम नाहीं! तसेच मुलें जीं होतात तीं स्त्रियांना होतात, म्हणून त्यांनींच तीं कामें केलीं पाहिजेत असेंही कोणास सिद्ध करून देतां येणार नाहीं! श्रीमंतांच्या बायकांस कितीही मुलें झालीं तरी त्यांना बहुधा असलीं कामें करावीं लागत नाहींत, हें आपण नित्यश: पहातो. साहेब लोकांत मुलें पाजण्याचें काम सुद्धा भाड्याच्या उपमातांकडून करविण्याचा प्रघात पुष्कळ रूढ आहे, हेंही आपणास ठाऊक आहे. तेव्हां मुलें फार होणें आणि प्रपंचांतील हलकीं कामें अवश्य करावी लागणें, यांचा अपरिहार्य संबंध आहे असें नाहीं. पण प्रत्येक स्त्रीला दहा किंवा बारा वेतें झालींच पाहिजेत, असें तरी आपण कां घेऊन चालावें? सध्यां स्त्रियांना जी इतकी मुलें होतात तीं त्यांच्या संतोषानें होतात असें आम्हांस वाटत नाहीं. यासंबंधानें पुरुषांकडून स्त्रियांवर जुलूम होतो असा आमचा समज आहे. बाळंतपणाच्या क्लेशांचीं यत्किंचित् झांक पुरुषांच्या स्वप्रत्ययास येण्यासारखी असती तर त्यांनीं आपल्या मनोविकारांस इतकें सईल सोडिलें नसतें! ''परदु:ख शीतळ'' या तत्त्वावर सध्यां त्यांचें वर्तन चाललें आहे. स्त्रियांप्रमाणेंच त्यांनाही कधीं कधीं प्रसूतिवैराग्य होण्याचा संभव असता, तर उभयतांच्या संयमानें बराच भूभार कमी होता. तथापि हा सांप्रतचा अन्याय फार दिवस चालेल असें दिसत नाहीं. जसजसा पुरुषांत विद्येचा अधिकाधिक प्रसार होत जाईल तसतसा स्त्रियांतही त्याचा उपक्रम होऊन तो वाढत जाणार. तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांस आपलें खरें हित कशांत आहे आणि तें साधावें कसें हे समजूं लागणार, आणि तें समजूं लागलें कीं, पुरुषांस हा आपला सांततिक जुलूम सोडून द्यावा लागणार! विवाहाच्या कामीं स्त्रीपुरुषांची संमति जितकी अवश्य आहे, तितकीच संमति विवाहाच्या अमलांतही दृष्टीस पडूं लागली

पाहिजे. तसें होऊं लागेल तेव्हांच स्त्रियांचीं पुष्कळ विपत्ति टळेल. हें सारें घडून येण्यास एकच उपाय आहे तो हा कीं, सध्यां ज्या प्रकारचें शिक्षण पुरुषांस मिळत आहे त्याच प्रकारचें शिक्षण स्त्रियांस मुबलक मिळालें पाहिजे. स्त्रियांस शिक्षण देण्याचा विचार निघाल्यापासून प्रत्येक देशांत त्यांस कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. लिहिणें, वाचणें व हिशेब करणें या तीन गोष्टी साऱ्या मुलांप्रमाणे साऱ्या मुलींस शिकविण्यास काहीं हरकत नाहीं, असें सामान्य मत आहे. पण येथून पुढें मतभेदास आरंभ होतो; व वरिष्ठ शिक्षणाच्या संबधानें त्याचा कळस होतो. प्राथमिक शिक्षण आटपलें म्हणजे मुलींना घरीं ठेऊन प्रपंचव्यवस्था शिकवावी असें कित्येकांचें मत आहे. तसें नच करावयाचें असेल आणि त्यांना शाळेंत पाठवाव्या असा आग्रहच असेल, तर निदान ज्या शाळेंत शिवणकाम, गायन, पाकसिद्धि, गृहव्यवस्था, रेशमांचीं, लोकरींची किंवा अशाच प्रकारच्या कसल्या तरी धाग्याचीं वस्त्रें विणण्याचें काम; वेत, गवत वगैरे तंत्वात्मक द्रव्यांनीं होणारीं करंड्या वगैरे नक्षींची व साधीं कामें; लहान मुलांचें संगोपन व रोगचिकित्सा; स्त्रियांचे रोग व त्यावर औषधोपचार इत्यादि विषय ज्या शाळांत शिकवितात अशातच त्यांस पाठवाव्या. भूगोल, इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, ज्योतिष वगैरे मेंदूचा खराबा करणारे विषय त्यांच्यापुढे कधींही आणूं नयेत. त्यांत त्यांचा जगाचा मुळींच फायदा नाहीं कोणतेंही शिक्षण देतांना ज्याला तें द्यावयाचें त्याच्या मानसिक व शारीरिक शक्ति जात्या कशा आहेत, याचा विचार केला पाहिजे. इतकेंच नाही, तर त्या व्यक्तीस आपलें आयुष्य कोणत्या स्थितींत घालवावें लागणार याचाही विचार केला पाहिजे. पुरुषांच्या विचारशक्तीपेक्षां स्त्रियांची विचारशक्ति स्वाभाविकपणें कमकुवत आहे, व मुलें होण्याचे आणि त्यांना वाढविण्याचें काम विधात्याने त्यांचेकडे ठेविले असल्यामुळें, त्यांना पुरुषांशीं स्पर्धा करू न देतां, त्यांच्या नैसर्गिक क्षीण बुद्धिमत्तेस व त्यांच्या वाट्यास आलेल्या स्वाभाविक कामास योग्य असेच शिक्षण त्यांस दिलें पाहिजे. ज्याला जें करता येणार आहे तेंच त्याला करूं देण्यांत कोणत्याही प्रकारचा अन्याय नाहीं; इतकेंच नाहीं, तर उलट त्याचें हित आहे. बायकांनीं विद्या शिकून बाहेरचीं कामें करावीं, आणि पुरुषांनीं अक्षरशून्य राहून घरचीं कामें करावीं, असा व्युत्क्रम करण्यांत दोघांचेंही नुकसान आहे. पुरुषांच्या सुदृढ हातांनीं व पायांनीं बाहेरचे धक्केबुक्के खावे; उन्हाचा, थंडीचा, व वाऱ्याचा त्रास सोसावा; तात्पर्य, बायकांच्या, मुलांच्या, व आपल्या चरितार्थाकरतां लागतील तितके मानसिक व शारीरिक कष्ट करून द्रव्य संपादावें हें जसें त्यांना उचित आहे, त्याप्रमाणेंच कोमलांगी स्त्रियांनीं सुखकर गृहछायेत राहून पुरुषांनीं कमावून आणिलेल्या जिनसांची व्यवस्था लावावी;

थकल्याभागलेल्या पतींस सुग्रास करून घालून त्याचे पादसंवाहन करावें; मुलांबाळांची खस्त खाऊन त्यांस चांगल्या रीतीनें वाढवावें, आणि प्राणप्रियाच्या इच्छेनुरूप अष्ट, दश, किंवा द्वादशपुत्रा सौभाग्यवती म्हणवून घेण्यास एका पायावर उभें असावें, यांतच स्त्रियांचे खरें हित व सुख आहे; म्हणजे सध्यां जी रूढ रहाटी आहे तीच उत्तम आहे; तींत फेरफार करणें इष्ट नाहीं, असें पुष्कळांचें मत आहे. या मतास अनेक डॉक्टर लोकांची संमति पडली असल्यामुळें कित्येकांच्या समजुतीने त्यास वेदवाक्याची प्रमाणता प्राप्त झाली आहे! परंतु असला आग्रह काय कामाचा? असल्या एकदेशीय तत्त्वज्ञानास कोण विचारतो? पाहिजे त्या पुरुषानें पाहिजे ती विद्या संपादावी, या मतास तरी साऱ्यांची अनुकूलता कोठें आहे? व जी आहे, ती तरी त्यास एकाएकी थोडीच प्राप्त झाली आहे! स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देण्यास हरकत नाहीं, येवढा रुकार पुरुषांकडून मिळण्यास काय थोडे रण करावें लागलें? सत्ता वापरण्याची अक्कल अंगीं असो अथवा नसो, ज्यांस ती प्राप्त झाली आहे, त्यांस ती सोडूं नये, असें वाटतें. अनेक कारणांमुळें स्त्रियांवर पुरुषाचे वर्चस्व स्थापण्यांत आलें आहे, व त्यांना त्याची गोडी समजून चुकली आहे. तेव्हा त्यांस ते आपल्या हातून जाऊं नये असें वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. स्त्रियांच्या संबंधानें पुरुषांस पॅट्रीशिअन्स आणि पुरुषांच्या संबधानें स्त्रियांस प्लिबिअन्स म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ज्याप्रमाणें जुन्या रोमन लोकांतील हा विलक्षण स्वामिसेवकसंबंध हळूं हळूं लयास गेला, त्याप्रमाणेंच स्त्रीपुरुषांतील सेव्यसेवक संबंध कालांतरानें नाहीसा होणार आहे. सध्यां पुरुष जी कामें करतात, तीं रोमन पॅट्रिशिअन्स म्हणजे उच्च कुलांतील लोक करीत असत; व सध्यां बायकांस जीं कामें करावीं लागतात, तीं प्लिबिअन्स म्हणजे तेथला दासवर्ग करीत असे. रोमन लोकांची प्राथमिक स्थिति सुटत जाऊन ते जसजसे उन्नतावस्थेप्रत जाऊं लागले तसतसा हा स्वामिसेवक संबंध कमी होत जाऊन अखेरीस बुद्धीनें, अनुभवानें कर्तबगारीनें जे श्रेष्ठ ठरले त्यांस संस्थानांतील अधिकार त्यांच्या योग्यतेप्रमाणें मिळूं लागले आणि प्लिबिअन्स व पॅट्रीशअन्स हा भेद शेवटीं नाहींसा झाला! होतां होतां स्त्रीपुरुषांसही ज्याच्या त्याच्या किंवा जिच्या जिच्या योग्यतेप्रमाणें अधिकार प्राप्त होऊं लागतील. पुरुषाच्या मेंदूपेक्षां स्त्रियांचा मेंदू सरासरीनें कमी वजनाचा आहे, आणि स्त्रीपुरुषांमधील कामाची वांटणी त्यांच्या मेंदूच्या वजनावर अवलंबून असावी हें योग्य आहे असें जरी मानिलें, तरी साऱ्या पुरुषांचे मेंदू साऱ्या स्त्रियांच्या मेंदूपेक्षां अधिक जड आहेत, असें प्रतिपादण्याचें धारिष्ट्य अत्यंत अधिकारलोलुप पुरुषास देखील करतां येणार नाहीं. अनेक स्त्रियांचे मेंदू अनेक पुरुषांच्या मेंदूहून जड भरतील यांत संशय

नाहीं. तेव्हा मेंदूच्या मुद्यावरच स्त्रियांनीं अमुक कामें करावीं आणि पुरुषांनीं अमुक कामे करावीं, असा निर्बंध करणें शुद्ध अन्याय व क्रूरपणा आहे. ज्याला जें काम साधेल त्यानें तें करावें अशी प्रत्येकास मोकळीस देण्यांत तें करणाराचा अथवा करणारीचा आणि जगाचा फायदा आहे. सध्यां पुष्कळ स्त्रियांच्या बुद्धिमत्तेची विनाकारण नासाडी होत आहे. ज्या कामास जे पुरुष बुद्धिसामर्थ्यानें योग्य नाहींत त्यांच्याकडून ती कामें होत असल्यामुळें व स्त्रियांस तीं करण्याची परवानगी नसल्यामुळें एकंदरींत तीं कामें व्हावीं तशी होत नाहींत, व तसें न झाल्यामुळें मनुष्यजातीच्या सुखास चट्टा बसत आहे. हरएक शास्त्रांत, कलेत, व धंद्यांत स्त्रीपुरुषांची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरूप व्यवस्था लागली पाहिजे. शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यास स्त्रिया असमर्थ असतील तर त्या तशा ठरतील. पण अनुभवानें तसें ठरेतोंपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करणें हा शुद्ध सुलतानी दांडगेपणा होय. अमेरिकेंत मुलांप्रमाणें मुलींस वरिष्ठ शिक्षण देण्यास उपक्रम केल्यापासून जे परिणाम घडून आले आहेत, त्यांचें अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं, जीं शास्त्रें व ज्या कला केवळ पुरुषांसच सुसाध्य आहेत असें आपणांस वाटत होतें, तीं शास्त्रे व त्या कला स्त्रियांसही तितक्याच सुसाध्य आहेत, व शास्त्रकलांच्या अभ्यासामुळे स्त्रियांचें नैसर्गिक चारुत्व कमी होऊन अपत्यसंगोपनाचें काम त्यांच्यानें बरोबर वठेनासें होईल अशी जी आपणास भीति होती; ती केवळ निराधार होती- या दोन गोष्टी उत्तम रीतीनें सिद्ध झाल्या आहेत. अमुक कामें स्त्रियांनीं करावीं आणि अमुक पुरुषांनीं करावीं, असा आपल्या बुद्धींत सध्यां जो आग्रह उत्पन्न होतो त्याचें बरेच कारण; कामाची वाटणी करण्याचें काम आमच्या हातीं आहे हें होय. ती बायकांच्या हातीं असती तर त्यांनींही अशीच एकदेशीय वाटणी करून आपणाकडे उच्च कामें आणि आम्हांस हलकी कामें ठेविली असतीं! कोणत्याही विद्वान् व विचारी स्त्रीचें मत घ्या. ती कधीहीं असें म्हणणार नाहीं कीं, स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण देण्यात स्त्रियांचें नुकसान आहे. हा; स्त्रीपुरुषांत चालत आलेला वाद नाहींसा करण्याचा एकच उपाय आहे तो हा कीं, मुलांना व मुलींना हव्या त्या शाळेत जाऊन हवें ते ज्ञान पाहिजे तितके संपादूं द्यावे. श्रीमंत सयाजीराव महाराजांस हें मत पसंत पडेल किंवा नाहीं याचीं आम्हांस बरीच शंका आहे. तथापि त्यांच्या कमिटीनें पुढें आणलेल्या प्रश्नास जें उत्तर देणें आम्हांस बरोबर वाटलें तें आम्हीं दिलें आहे. गायकवाडांच्या विद्याखात्याला रुचावें म्हणून तें दिलेलें नाहीं, तर आमच्या वाचकांच्या वाचण्यांत तें येऊन त्याविषयीं त्यांनी विचार करावा यासाठीं तें दिलें आहे. असो, आजच्या निबंधाचा उत्तरभाग पुढच्या

खेपेवर टाकणें किती अवश्य आहे हें वरील लेखाच्या लांबीवरून उघड होतच आहे, तेव्हां त्याबद्दल जास्त लिहिण्याची गरज नाहीं.

मागल्या अंकात स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण देणें कां योग्य आहे, हे दाखविलें आहे. आज त्यांना एकाच ठिकाणी शिकविणें योग्य आहें, हें दाखवावयांचे आहे.

गायकवाडी दरबाराला व खुद्द महाराजांना हें आमचे मत केवळ हास्यास्पद आहे असें प्रथमदर्शनीं वाटणार आहे. पण श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं युरोपखंडांत पुष्कळ दिवस घालविले असल्यामुळें व तेथील अनेक संस्था पाहिल्या असल्यामुळे, त्यांना हें मत इतकें विपरीत वाटण्याचीच गरज नाहीं. युरोपांतील समाजघटना अथवा समाजरहाटी येथील समाजरहाटीहून अगदीं निराळी आहे. आम्ही आपल्या भाषणांत स्त्रियांना अर्धांगी म्हणतों, व धर्म, अर्थ, काम वगैरे गोष्टींत त्यांस सहचारिणीत्व देतो. पण हीं दोन अर्धांगें बहुधा पोकळ धर्माज्ञांपलीकडे कधीही जात नाहींत. बायकांनीं घराबाहेरच्या पंचायतींत पडणें योग्य नाहीं, हें जें विलक्षण मत आम्हां पूर्वेकडील लोकांच्या मनांत हजारो वर्षे खिळून राहिलें आहे, त्यामुळें व आणखी कांहीं कारणांमुळें, स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज आम्हांस अगदी नापसंत वाटतो. स्त्रीपुरुषांस मोकळेपणीं एकत्र वागूं दिलें असतां समाजावर मोठा दुर्धर प्रसंग गुदरेल असा आमचा पक्का ग्रह होऊन गेला आहे. युरोपांत असा परिणाम घडत नाहीं ही गोष्ट प्रत्यक्ष आमच्यापुढें असून आम्ही इतके घाबरून जातों, हें तरी एक आमच्या अविचाराचे निदर्शनच आहे. पण त्यांतल्या त्यांत ध्यानांत ठेवण्यासारखी एक मौज अशी आहे कीं, ज्या युरोपखंडांत कोणताही ठळक सामाजिक समारंभ किंवा विधि स्त्रियांच्या सांनिध्यावांचून होत नाही त्या युरोपखंडांतही स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण द्यावें किंवा नाहीं याविषयीं मोठा मतभेद आहे. घोड्यांच्या शर्यती, चेंडूफळीचे खेळ, बक्षिसें वांटणे, पाये घालणें, इमारती उघडणें, व्याख्यानें देणें, लग्नसमारंभ, प्रेतसंस्कार, मोठमोठ्या मेजवान्या, प्रदर्शनें, नानाप्रकारच्या पार्ट्या व नाच- या व अशाच प्रकारच्या अनेक युरोपीय समारंभांस व विधींस स्त्रिया न येतील तर त्या लोकांस हे समारंभ व विधि मुळींच नकोसे वाटतील. युरोपीय समाजास जी एक प्रकारची उल्हासवृत्ति प्राप्त झाली आहे, ती त्याच्या मिश्रणामुळें प्राप्त झालीं आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मिश्र समाजाचें नीतिसत्र ढिले पडतें, असें कित्येकांचें म्हणणे आहे. पण ज्यांना मिश्र समाजाचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं त्यांचें हें मत आहे, येवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे. गोषाबाहेर किंवा झनान्याबाहेर नीति असण्याचा संभव नाहीं, हें बोलणें जितक्या शहाणपणाचें आहे; तितक्याच शहाणपणाचें वरील मत आहे. स्त्रीपुरुषांचे पाऊल वाकडें न पडणें यांत समाजाचें मोठें हित

आहे, हें आम्ही कबूल करतों. पण तें हित साधण्यासाठीं बायकांस मागल्यादारीं कोंडून घालण्याची अवश्यकता आहे, किंबहुना तसें केल्यानें नीतीचें रक्षण होणारच आहे, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. जी वस्तु दुष्प्राप्य असते तीविषयीं आपल्या मनांत नसतें महत्त्व उत्पन्न होऊन आपण तिच्या प्राप्तीविषयीं फार उत्सुक होतो. तीच हवी तेव्हां मिळण्यासारखी असेल तर तिची तुम्हांस आठवण देखील होणार नाहीं. एखाद्याला जर असें सांगितलें कीं तुला महिनाभर अमुक ठिकाणी जाण्याची मनाई केली आहे, तर त्याला त्या ठिकाणीं वर्षोंगणतीं जाण्याचें कांहींएक कारण नसून, या मनाईमुळें आपले स्वातंत्र्य गेलें व पराकाष्ठेचें नुकसान झालें, असें वाटूं लागणार आहे. निःपक्षपातदृष्टीनें विचार करतां कदाचित् असें कबूल करावें लागेल कीं, ज्या लोकांत स्त्रियांना झनान्यांत, पडद्यांत किंवा गोषांत कोंडून ठेवण्याची चाल आहे, त्यांतच युरोपीयन लोकांपेक्षां कमी नीतिमत्ता असण्याचा संभव आहे. क्षणोक्षणी, हरप्रसंगीं, सर्वत्र ठिकाणी स्त्रीपुरुषें एकमेकांस भेटूं लागली म्हणजे विषयवासनेचा विचार त्यांच्या मनांत फार क्वचित् येण्याचा संभव आहे. चैत्रमासीं हळदीकुंकवास जाणाऱ्या येणाऱ्या बायका, अक्षतीस किंवा पायघड्यांस निघालेल्या बायका, स्टेशनावर गाड्यांतून जाणाऱ्या बायका किंवा शाळेंत येणाऱ्या मोठ्या मुली यांकडे सभ्य म्हणविणारे लोक वांकड्या नजरेनें व निर्लज्ज लोक बेलाशक टक लावून पहातात, यांचें कारण येवढेंच आहे कीं, या खंडांतील इतर लोकांप्रमाणें आम्हां हिंदू लोकांस घडोंघडीं स्त्रियांचा समागम घडत नाहीं. तसें होईल, तर आमच्या या असभ्यपणाच्या खोडी जातील. इतकेंच नाहीं, तर आमच्या भाषणांत आणि वर्तनांत आतांपेक्षा पुष्कळ सभ्यपणा येईल. अत्यंत सहनशील दहापांच लोकांची गोष्ट सोडून द्या; शेंकडा नव्वद हिंदूंच्या- निदान महाराष्ट्रीयांच्या सामान्य भाषणांत बरीच अश्लीलता असते असें आम्हांस वाटतें. आमच्या समाजांत स्त्रीपुरुषांच्या गांठी वारंवार पडूं लागतील, तर ही अश्लीलता नाहींशी होईल याविषयी आम्हांस शंका नाहीं. युरोपांत प्रवास करून आलेल्या अनेक लोकांशीं आम्ही यासंबंधानें बोललों आहों व त्या सर्वांचें असें म्हणणें आहे कीं, येथील अत्युच्च वर्णांतील पुरुषांच्या व इतर वर्गांतील पुरुषांच्या व स्त्रियांच्या बोलण्यांत जो अमर्याद विचकटपणा दिसून येतो, त्याचा एक शतांश विचकटपणाही युरोपांतील कनिष्ठ प्रतीच्या लोकांच्या भाषणांत असत नाहीं. तात्पर्य, मिश्र समाजपद्धति आम्हांस वाटते त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या नीतिमत्तेस प्रतिकूल नसतां; उलट अनुकूल आहे यांत शंका नाहीं. तथापि मनुष्यांच्या शरीराप्रमाणेंच कांहीं अंशीं त्याच्या समाजाची स्थिति असते. शरीर वाढींत आहे तोंपर्यंत त्याला कसलेंही वळण लावणें कठीण पडत नाहीं. पण एकदा त्याची वाढ खुंटून त्याच्या अंगीं

ताठपणा आला म्हणजे त्याला नवीन वळण लावण्याची आशा खुंटली असें समजावें. समाजाची तशीच गत आहे. मुसलमानांप्रमाणे कित्येक लोकांस स्त्रियांना पुरुषदर्शन देखील होऊं देण्याची भीति वाटते! आम्हांस मिश्र समाजापासून घोर परिणाम घडतील अशी भीति आहे. स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण दिलें असतां त्याचा चांगला परिणाम घडेलच, अशी युरोपियन लोकांची खात्री झालेली नाहीं. अमेरिकन लोकांनाहीं ही शंका बरीच वर्षे होती; पण अलीकडील प्रत्यक्ष अनुभवावरून तिचा परिहार होत चालला आहे. ज्या खेड्यांत मुलांकरतां व मुलींकरता दोन स्वतंत्र शाळा घालण्याची सोय नाहीं, त्या खेड्यांत लोक लहान मुलींस व मुलांस एकाच शाळेत धाडण्याबद्दल युरोपांत व अमेरिकेत फारशी हरकत घेत नाहींत; व आमचे लोकही बहुधा तसें करणार नाहींत असे वाटतें. आठदहा वर्षांची मुलें एकत्र वागूं देण्यास कोणाच्याही मनांत विशेष शंका येत नाहीं व ती येण्याचे कारणही नाहीं; आणि याच वयाचीं मुलें बहुधा प्राथमिक शाळांत असावयाचीं; पण त्यांतही कित्येक दोष काढतात. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, ज्याअर्थीं स्त्रीपुरुषांचा आयुष्यक्रम अगदीं निराळा आहे, त्याअर्थीं त्यांना भिन्न शिक्षण भिन्न स्थळींच पहिल्यापासून दिलें पाहिजे. पण या दुराग्रहाच्या मताला अलीकडे कोणी जुमानीनासें झाल्यामुळें तें मंदगतीनें अस्ताचलास जात आहे! ही प्राथमिक शिक्षणाची हालहवाल झाली. मध्यम व वरिष्ठ शिक्षण संपादणाऱ्या विद्यार्थिनी व विद्यार्थी एका ठिकाणी असूंच नयेत, हें मत युरोपखंडांतील बहुतेक देशांत व युनायटेड स्टेट्सच्याहीं कांहीं भागांत कायम आहे. एकंदरीनें विचार करतां या मताची रचना अनुभवावर न करतां, लोक तर्कावर करतात असें आम्हांस वाटतें. तरुण स्त्रिया व तरुण पुरुष यांस एका वर्गांत बसवून त्यांना एकाच शिक्षकाकडून व्याख्यानें देवविण्याचा अनुभव प्रथम अमेरिकेनें घेऊन पाहिला व तो वाटला होता त्याहून अधिक फलप्रद दिसून आला. एकत्र शिक्षणाचे शत्रु बहुधा पुढील तीन मुद्द्यांवर भांडतात : १ ला- स्त्रीपुरुषांत नैसर्गिक मोठा भेद आहे, तेव्हां त्यांस एकत्र शिक्षण दिल्यानें त्या भेदानुरूप त्या शिक्षणांत जो फरक करणें जरूर आहे तो कधीही करतां येणार नाहीं. २ रा- मुलांच्या दांडग्या वर्तनाचा मुलींच्या मर्यादशील वर्तनावर मात्र दुष्परिणाम होतो. मुलींच्या सहवासानें मुलांस कांहीं फायदा होत नाहीं. ३ रा- अल्पवयांत मुलगे व मुली वारंवार एकत्र येऊ लागतील तर त्यांच्या विषयवासना लौकर जागृत होऊन त्यांचे दु:खकारक परिणाम त्यांच्या वर्तनावर घडूं लागतील. वयांत आलेल्या मुली व मुलगे एकाच वर्गांत बसत असून जर त्या वर्गांची व्यवस्था नीट रीतीनें ठेवण्यांत येत नसेल; तर कदाचित् वरच्यासारखे परिणाम क्वचित् प्रसंगीं घडून

येण्याचा संभव आहे. पण उत्तम व्यवस्था असली कीं फारच चांगले परिणाम घडून येतात असें विस्तृत अनुभवावरून सिद्ध झालें आहे. जे या पद्धतीचे अनुभवावरून मोठे कट्टे भक्त बनले आहेत, ते असें म्हणतात कीं (१) मुलांस व मुलींस एके ठिकाणीं शिकविल्यानें मुलांना धाक लावणें फार सोपें जातें. मुलांचा हट्टीपणा, उद्धटपणा, व दांडगेपणा, हा मुलींच्या सांनिध्यामुळें बराच कमी होतो. (२) मुलगे आणि मुली यांस एकेच ठिकाणीं पढवावयाचें असलें, म्हणजे उभयतांस समजेल अशा शिक्षणपद्धतीचा अंगीकार करणें अवश्य होऊन खुद्द मुलांकरितां शिक्षणाच्या ज्या विलक्षण पद्धति अस्तित्वांत आल्या आहेत; त्यांची निःसत्त्वता आणि एकदेशीयता व्यक्त होते. मुलगे आणि मुली नेहमीं एकत्र वागल्यानें त्यांच्या विषयवासनेवर अपायकारक परिणाम न घडतां उलट त्या शांत व गंभीर होतात, आणि उभयतांच्या मैत्रीचा पाया कोणत्याही बाह्यागांवर न घालतां, अंतरंगाची चांगली परीक्षा करून त्यावर तो घालण्याचा त्यांचा कल होतो.

*

वडिलपणाचे हक्क

ज्या देशांतील सुधारणेस खळ पडलेला नाहीं त्या देशांतील जुन्या व नव्या पिढीच्या लोकांत मतांतर असल्यावांचून रहात नाहीं; आणि ज्या मानाने हें मतांतर कमी अधिक असतें; त्या मानानें उभयतांत कमी अधिक कलह दृष्टीस पडतो. तथापि अशा प्रकारचा कलहच वाढत्या सुधारणेस अवश्यक आहे. ज्या ठिकाणी हा कलह दृष्टीस पडेनासा होतो, त्या ठिकाणीं सुधारणेची वाढ खुटते. पूर्वजांनीं किंवा वाडवडिलांनीं घालून दिलेल्या मार्गाचें डोळे मिटून अवलंबन करण्यापासून एक चांगला परिणाम होतो व एक वाईट परिणाम होतो. पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनें पुढें जाण्यात समाजाची स्थिरता रहाते. पण याच स्थिरतेपासून नवीन काळास योग्य अशा फेरफारास प्रत्यवाय घडतो. तेव्हां स्थिरतेपासून होणारा फायदा न गमावतां स्थित्यंतरामुळें अवश्य वाटूं लागलेला फेरबदल कसा करावा हा मोठा गूढ प्रश्न आहे. ज्या समाजाची साधारण सुस्थिति आहे; त्यांत हीं दोन परस्परविरुद्ध कामें, दोन प्रकारच्या लोकांकडून होत असतात. अशा समाजांतील जुन्या पिढींतले किंवा वृद्ध लोक जुन्या आचारविचारांचे कट्टे भक्त असून ते राखण्याबद्दल झटत असतात; व नव्या पिढींतले किंवा तरुण लोक समयानुरूप नवीन आचारविचारांचा उपक्रम करण्यासाठीं आपली पराकाष्ठा करीत असतात. एकाचें सामर्थ्य समाजाची स्थिरता राखण्याकडे लागलेले असतें; व दुसऱ्याचें सामर्थ्य त्याला गति देत असतें. ज्याप्रमाणें तारवांतील ओझ्यानें त्याला स्थिरता येतें व शिडानें गति मिळते, त्याप्रमाणे समाजरूप तारवावर नव्या जुन्या लोकांच्या सामर्थ्यांचे उलट परिणाम घडत असून, निरुपयोगी झालेल्या आचारविचारांचा लय आणि उपयुक्त अशा नवीन आचारविचारांचा प्रादुर्भाव होत असतो. समाजाच्या सुस्थितीस दोन्हीं सामर्थ्य अवश्य आहेत, व समंजस लोक उभयतांचाही प्रतिपाल करण्यास तयार असतात.

पण या सामोपचाराच्या गोष्टी ज्या समाजाच्या अंगांत कांहीं लवचिकपणा असेल, त्यासच लागू पडतात. जुने लोक जरठ लांकडाप्रमाणें किंवा दगडाप्रमाणें कठीण होऊन गेले असतील व नवीन पिढींतील लोकांच्या गरजांचा विचार करण्यास बिलकुल नाराज असतील; तर वर सांगितलेल्या बिनबोभाट रीतीनें

समाजाच्या स्थितींत फेरबदल होत जाणे अशक्य आहे. आमच्या समाजांत अशा प्रकारची अवश्यकता बऱ्याच गोष्टींत दृष्टीस पडूं लागली आहे. जुन्या लोकांस आपला हेका सोडावा असें वाटत नाहीं, नव्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणें चालतां येत नाहीं, जुन्यांना नवें आवडत नाहीं, व नव्यांना जुनें आवडत नाहीं! हरएक बाबतींत नव्यांचे विचार जुन्यांच्या विचाराहून अगदीं निराळे होत चालले आहेत, व आणखीं काहीं वर्षांनीं त्यांत केवढें अंतर पडेल हें कोणासही सांगतां येणार नाहीं. या अंतरास आमचें पाश्चिमात्य शिक्षण कारण झाले आहे हें आम्ही कबूल करतों. पण त्याबद्दल आम्हांस बिलकुल खेद वाटत नाहीं! ब्रिटिश अंमलामुळें या देशांत ज्या दोन सुधारणांचा एकाएकी संगम झाला आहे, त्यास एका दर्जाच्या दोन भिन्न सुधारणा म्हणण्यापेक्षां पाश्चिमात्य सुधारणेला फार पुढें गेलेली सुधारणा; आणि हिंदुस्थानच्या सुधारणेला मागें राहिलेली सुधारणा म्हटल्यास बरें होणार आहे. आमच्या मते सुधारणेंत जातिभेद नाहीं, अंशभेद मात्र आहे; ज्याच्या अंत:करणात पाश्चिमात्य विद्येचें खरे हृद्गत प्रतिबिंबित झालें आहे, त्यांचा आणि जुन्या लोकांचा खरा समेट होणें अशक्य आहे. पाश्चिमात्य ज्ञानरवीचे किरण ज्याच्या नेत्रपटलावर पडून ज्याच्या डोक्यांत प्रकाश झालेला नाहीं, त्याला अर्वाचीन विचारांचें व आचारांचे महत्त्व समजण्याचा संभवच नाहीं. असल्या मनुष्याचें मतांतर करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा त्याच्या विचाराप्रमाणें त्याला वागू द्यावें आणि पाश्चिमात्य सुधारणेचा उपक्रम अर्वाचीनांनीं आपल्या कुटुंबांत करावा, हें आम्हांस बरें दिसते. तथापि तसा दिवस येईतोंपर्यंत जेठा मारून केवळ स्वस्थच बसावें, असें आम्हीं सांगत नाहीं. पूज्य वडिलांचे डोकें फिरूं न देतां अथवा त्यांची अत्यंत अप्रीति करून न घेतां ज्यानें त्यानें नवीन सुधारणेचे घोडें आपल्या घरांत जितके घालवेल तितकें घातलेंच पाहिजे! हें अवघड काम विशेष त्रासावांचून करण्याचे दोन तीन मार्ग आहेत; ते असे-

ज्यांच्यावर आईबापांचे किंवा दुसऱ्या कोणत्याही निकट आप्तांचे विशेष उपकार असतील, त्यांना कृतज्ञतेमुळें त्यांस विशेष दुखावितां येणार नाहीं व त्यांनीं तसें न करावें हेंच बरे. ज्या आईबापांनीं आपल्या मुलांसाठीं विशेष खस्त खाल्ली आहे; ज्यांनीं त्यांच्या विद्याभ्यासासाठीं आपल्या सुखाकडे न पहातां माया जोडून ठेविली आहे- अशा आईबापांच्या मुलांचीं मतें त्यांच्या मतांहून कितीही निराळीं झालीं असलीं तरी त्यांना त्यांच्या मर्जीबाहेर विशेष जातां येणार नाहीं. असलीं मुले अथवा असले तरुण सुशिक्षित लोक हे नवीन सुधारणेचे मुख्य प्रचारक नव्हेत. यांच्यानें त्या सुधारणेचा उघडपणें अंगीकार होणें अशक्य आहे. तथापि आपल्या हातून ती थोडीबहुत व्हावी अशी त्यांची उत्कट इच्छा असेल;

तर त्यांनीं उद्योगाच्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी निमित्तानें आपला संसार दुसऱ्या ठिकाणी स्थापावा आणि तेथें आपल्या मर्जीप्रमाणें वर्तन करावें व त्याची बातमी दुसऱ्यांच्या तोंडून आपल्या वडिलांच्या कानीं जाऊं द्यावी! आपणांस वडिलांकडे जाण्याचा प्रसंग आल्यास किंवा ते आपल्या घरीं आल्यास तेवढ्यापुरतें त्यांच्या इच्छेप्रमाणें वागावें, पण त्यांचा समागम सुटला कीं, फिरून आपला पूर्वक्रम सुरू करावा! असें करणारांनीं आपणांस अति प्रिय अशा ज्या एक दोन सुधारणा असतील; त्यांशिवाय इतर बाबींत आपल्या वडिलांची मर्जी आपणांवर अत्यंत सुप्रसन्न राहील अशा प्रकारचें वर्तन त्यांशीं ठेवावें. फाजील पैसा त्यांच्या हवालीं करावा; खर्च त्याच्या विचाराने करावा; दागदागिने त्यांच्याकडून करवावे; त्यांच्याशीं ममतेचा पत्रव्यवहार ठेवावा; त्यांच्याशीं मोठ्या अदबीनें व प्रीतीनें वागावें; दुखण्याबाण्यांत त्यांची उत्तम प्रकारची बरदास्त स्वत: ठेवावी; त्यांनीं एखादें धर्मकृत्य आरंभिले असल्यास त्याला आपल्याकडून होईल तितकी मदत करावी- अशा रीतीनें बाकी साऱ्या गोष्टींत त्यांचे मन जितकें संतुष्ट ठेववेल तितकें ठेवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या मनांतही प्रेम व कृतज्ञता उत्पन्न होऊन तुमच्या अप्रिय वर्तनाकडे कानाडोळा करण्याची किंवा त्याबद्दल तुम्हास क्षमा करण्याची इच्छा त्यांस होईल; आणि एकदां ते तसे करू लागले म्हणजे तुम्हास बाताबेतानें हवें तसें पुढे सरतां येणार आहे! एकंदरींत हें मोठें नाजूक काम आहे, व तें फार जपून केलें पाहिजे. ज्या मुलांच्या आईबापांनी त्यांच्यासाठीं विशेष झीज सोसलेली नाहीं, त्यांना आपले विचार बऱ्याच सहज रीतीनें अमलांत आणितां येतात. आईबापांचा त्यांच्या कृतज्ञेवर म्हणण्यासारखा हक्क नसतो; आणि मुलांना त्यांच्या मर्जीविरुद्ध जाण्यास फारसें अवघड वाटत नाहीं, व त्यांनाही त्यांनीं तसे केल्याबद्दल फारसा विषाद वाटत नाहीं! ''आपण प्रीति दिली नाहीं तर ती आपणांस उलट मिळणार कोठून?'' असें म्हणून तीं आपलें समाधान करून घेतात! पण अशा प्रकारच्या आईबापांच्या मुलांनीही आपणांस ज्या सुधारणा अत्यंत अवश्यक वाटत असतील; तेवढ्याशिवाय इतर गोष्टींत त्याचे मन बिलकुल दुखवूं नये इतकेंच नाहीं, तर तें जितकें सुप्रसन्न ठेववेल तितके ठेवण्याचा प्रयत्न करावा. असें केल्याने असलीं आईबापें उपकृत झाल्यासारखीं होऊन आपल्या मुलाचें मन दुखविण्यास फार भितात, आणि कधी कधीं तर त्यांच्या मर्जीप्रमाणें आपणच वागू लागतात! एकाच कुटुंबातल्या माणसांपैकीं कुटुंबाधिपतीचे अथवा वडिल माणसांचे अशा प्रकारचे हक्क आहेत आणि त्यांचें तरुणांनीं होईल तितके संगोपन केलें पाहिजे. पण हें सारें ज्याच्या त्याच्या वडिल माणसांबद्दल झालें. समाजांतील एकदंर तरुणांनीं एकंदर वडिलांबद्दल कसें वागावें हा अगदीं निराळा प्रश्न आहे व त्याचे उत्तरही फार निराळें आहे! तें लवकरच देण्यांत येईल! ✱

आमचे दोष आम्हांला कधीं दिसूं लागतील?

अलीकडे देशाभिमान्यांची जी एक जात निघाली आहे, तिच्यापुढें इंग्रजांची किंवा दुसऱ्या कोणत्याही अर्वाचीन युरोपिअन लोकांची उद्योगाबद्दल, ज्ञानाबद्दल, किंवा राज्यव्यवस्थेबद्दल प्रशंसा केली कीं, तिचें पित्त खवळून जातें! या जातवाल्यांना दुसऱ्याचा उत्कर्ष किंवा त्यांची स्तुति साहण्याचें बिलकुल सामर्थ्य नाहीं पण करतात काय बिचारे! सूर्याला सूर्य म्हटल्याखेरीज जसें गत्यंतर नाहीं, तसे युरोपियन लोकांचें श्रेष्ठत्व या घटकेस नाकबूल केल्यास आपले हंसें झाल्यावांचून राहणार नाहीं, हे त्यांना पक्कें ठाऊक आहे! तेव्हां ते काय हिकमत करितात कीं, नेटिव-युरोपियनांची तुलना करण्याची वेळ आलीं कीं, ते आपल्या गतवैभवाचें गाणें गाऊं लागतात! इंग्रज लोक अंगाला रंग चोपडीत होते; इंग्रज लोक कच्चें मांस खात होते; इंग्रज लोक कातडी पांघरीत होते; इंग्रज लोकांस लिहिण्याची कला ठाऊक नव्हती; त्या वेळेस आम्ही मोठमोठाल्या हवेल्या बांधून रहात होतो; कापसाच्या किंवा लोकरीच्या धाग्यांपासून मोठ्या परिश्रमानें विणून तयार केलेली वस्त्रें वापरीत होतों; बैलांकडून जमीन नांगरून तींत नानाप्रकारचीं धान्यें, कदमुळें व फळें उत्पन्न करीत होतों; आणि रानटी लोकांप्रमाणें मांसावर अवलंबून न राहतां, आपला बराच चरितार्थ वनस्पत्यांवर चालवीत होतों. यावरून मांसाहार आम्हीं अगदींच टाकला होता असें कोणी समजूं नये. ज्या गाईच्या संरक्षणासाठीं सांप्रत काळीं जिकडे तिकडे ओरड होऊन राहिली आहे, व जें संरक्षण कित्येकांच्या मतें हिंदु-मुसलमानांचा बेबनाव होण्यास बऱ्याच अंशी कारण होत आहे, त्या गाईचा देखील आम्ही प्रसंगविशेषीं समाचार घेण्यास मागेंपुढें पहात नव्हतो! कोणी विशेष सलगीचा मित्र किंवा आप्त पाहुणा आला, आणि बाजारांत हवा तसा जिन्नस न मिळाला, म्हणजे लहानपणापासून चारा घालून व पाणी पाजून वाढविलेल्या गोऱ्ह्याच्या अथवा कालवडीच्या मानेवर सुरी ठेवण्यास आम्हांस भीति वाटत नव्हती! आता येवढें खरें आहे कीं, हे गोमांस रानटी लोकांप्रमाणें आम्ही हिरवे कच्चें खात नव्हतों! तर सुधारलेल्या लोकांप्रमाणें त्यांत निरनिराळ्या तऱ्हेचे मसाले घालून व त्याला नानाप्रकारच्या फोडण्या देऊन तें अत्यंत स्वादिष्ट करून खात होतों! मत्स्याशनही आम्हांस ठाऊक नव्हतें असें

नाहीं! कोणत्या माशाची रसई कोणत्या रीतीनें करावी, याबद्दल आम्हांपाशीं फार पुरातन नियम सांपडतात! मांसभक्षणानंतर उत्तम मद्यप्राशन केल्यावर फार मौज होते म्हणून सांगतात! आमच्या पूर्वजांस ही ठाऊक नव्हती असे नाहीं! सोमरस हा मादक पेय असो अथवा नसो; त्याशिवाय दुसरी कसली तरी मादक पेये येथे वहिवाटींत होनी; अशाबद्दल जुन्या ग्रंथांत भरपूर आधार सांपडतो. याप्रमाणें आम्ही खाण्यापिण्याच्या कामांत अगदीं पुरातनकालीं सुद्धा पुरे पटाईत होऊन गेलों होतों. लिहिण्यापुसण्यांत व कुटुंबव्यवस्थेंत आणि ग्रामव्यवस्थेतही आम्ही अगदीं अनभिज्ञ होतों असें नाहीं. लेखनकला आम्हांस केव्हां आली हें जरी खात्रीनें सांगतां येत नाहीं, तरी ती इतिहासकालापूर्वीच आम्हास प्राप्त झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेखनकला अभ्युदयास आणून नीति, न्याय, नाटक, अलंकार, व्याकरण, गणित व वैद्यक इत्यादि शास्त्रांतही आमची बरीच गति झाली होती. आम्हांमध्यें उत्तम प्रकारची कुटुंबव्यवस्था व ग्रामव्यवस्था स्थापण्यांत आली असून राष्ट्रे म्हणजे काय हें आम्हांस कळू लागले होतें. आमच्यांत स्वतंत्र व मांडलिक राजे असून त्यांच्या पदरी चतुरंग सेना असत. मोठमोठे दुर्ग बांधण्याची कला त्यांस अवगत होती. साम, दाम, दंड, भेद, इत्यादि शत्रूस वळणीस आणण्याचीं साधनें तें वारंवार उपयोगांत आणीत असत. यावरून काय दिसतें कीं, अलीकडल्या इंग्रज लोकांनीं किंवा युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही लोकांनीं कितीही शेखी मिरविली; तरी ज्या आम्हीं इतक्या पुरातनकालीं येवढी मोठी सुधारणा करून बसलो; त्या आमच्यापुढे त्यांची मात्रा बिलकुल चालावयाची नाहीं! न चालो बिचारी! पण या एककल्ली देशाभिमान्यांना आम्हीं असें विचारितों कीं, बाबांनों, तुम्ही अशा प्रकारें गतवैभवाचें गाणें गाऊं लागलां म्हणजे तुमच्या पक्षाचें मंडन न होतां उलट मुंडण होतें! इंग्रज लोक रानटी होते त्या वेळेस जर तुम्ही इतके सुधारपण तसे तर तुम्ही खचित नाहीं! तेव्हां हें सिद्ध आहे कीं, केव्हां तरी तुमच्या सुधारणेस खळ पडला असावा; किंबहुना ती मागेच हटूं लागली असावी; कारण सुधारणा ही स्थिर वस्तु नाहीं; ती पुढे चालेल किंवा मागें सरेल! आमची सुधारणा क्षणैक निश्चल होऊन मग तिची पिछेहाट होऊं लागली असावी, असें मानिल्याखेरीज ज्यांस आम्ही रानटी म्हणत होतों तीं राष्ट्रें, दोन हजार वर्षांच्या अवकाशांत आम्हांपुढें इतकी कशीं गेलीं याचा उलगडा होत नाहीं. सुधारणेच्या शर्यतींत जे एकदां आमच्या फार पाठीमागें होते, त्यांनीं आम्हांस गांठले. इतकेंच नाहीं, तर पाठीमागें टाकलें, असें आपल्या स्थितीवरून कबूल करावें लागणे यांत आमच्या मतें प्रतिष्ठा मारण्यासारखें कांहीं नाहीं. ''दुसरें लोक रानटी होते तेव्हां आम्ही फार सुधारलेले होतो!'' असाल कदाचित्. पुनः पुनः गत गोष्टीबद्दल

मिटक्या मारीत बसण्यांत काय अर्थ आहे? आम्हांस तर असल्या निरुपयोगी प्रतिष्ठेचा मनापासून कंटाळा येतो. असल्या प्रतिष्ठेमुळे स्वदोष दिसेनासे होतात. इतकेंच नाही, तर आपण सर्वगुणसंपन्न आहों, आपणांस कशाचीही उणीव नाहीं, असे वाटू लागून उद्योग करण्याची हौस नाहीशी होते, मानसिक व शारीरिक् श्रमाचा तिरस्कार येऊं लागतो, नुसत्या बढाईखोर गप्पा मारीत बसण्यांत मोठा आनंद वाटतो, आणि दिवसेंदिवस वाढत चाललेल्या दारिद्र्याचा व आपत्तीचा परिहार करण्याचा विचार देखील मनांत येईनासा होतो! पण या आत्मवंचक व परवंचक देशाभिमान्यांचा आम्हांस जो विशेष राग येतो; तो यासाठी कीं, आपल्या जुन्या सुधारणेची तुलना न करिता ते आपलीच सुधारणा सर्वांत श्रेष्ठ होती असें घेऊन चालून तिचे पवाडे गात सुटतात! लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांत ज्यांना दुसऱ्या देशाविषयीं कमीत कमी माहिती आहे; असे कोणी लोक असतील तर ते हिंदु लोक होत. त्यांना स्वतःस इतिहास लिहिण्याची अवश्यकता कधीही वाटली नाही, व लिहिण्याची अक्कल आली नाहीं. इतकेंच नाहीं, तर दुसऱ्यांचे इतिहास अवलोकन करून त्यांपासून आपली सुधारणा करण्याची पर्वाही त्यांनीं कधीं केली नाहीं. एकंदरींत त्यांना इतिहासाचें माहात्म्यच समजलें नाहीं असें तरी कां म्हणूं नये? अथवा त्यांना तें समजलें नाहीं यांत त्यांच्याकडे फारसा दोष नाहीं. इतिहास म्हणजे व्यक्तींनीं किंवा राष्ट्रांनीं केलेल्या मोठमोठ्या पराक्रमांचे वर्णन. आतां ज्या देशांतील व्यक्तींनीं किंवा व्यक्तिसमुदायांनीं केव्हांही मोठमोठे पराक्रम केलेले नाहींत, ते इतिहास लिहिणार कशाविषयीं आणि वाचणार काय? पौराणिक कालांत भारतीय आर्यांनीं जे पराक्रम केले त्यांची गाथा भारत-रामायणरूपानें व्यास वाल्मीकींनीं करून ठेविली आहे. अशाच प्रकारची ग्रीक आर्यांची गाथा होमर कवीनें रचिली आहे. पण या गाथांत काव्य आणि इतिहास यांचें इतकें संमिश्रण झालें आहे कीं, त्यांना काव्य अथवा इतिहास यांपैकी कोणती संज्ञा द्यावी याचा संशय पडतो. शिवाय आमच्या पुराणांत धर्म व वेदांत यांचा प्रवेश होऊन त्यांचें जें एक विलक्षण पडघम झालें आहे तें; पाहिजे तो पाहिजे त्या कामाला वापरतो. तथापि असल्या पुराणांचीं पारायणें करून अर्वाचीन विचारपद्धतीप्रमाणें त्यांपासून निघण्यासारखीं असतील तितकीं सारीं अनुमानें काढलीं आणि तीं एकवट केलीं; तरी त्यापासून आम्ही अगदी सुधारणाचलाच्या शिखरास पोंचलों होतों, आणि त्यापुढें जाण्यास आम्हास अवकाश राहिला नव्हता, असें सिद्ध होण्याचा कांहीं संभव नाहीं. आमच्या आणि ग्रीक लोकांच्या पौराणिक स्थितींत विशेष अंतर होतें, असें आम्हांस आमच्या पुराणांची आणि होमरच्या काव्याची जी जुजबी माहिती आहे तीवरून वाटतें. पण पौराणिक काल उलटून

गेल्यावर, ग्रीक लोकांनीं सुधारणेचे कामांत जो झपाटा मारिला, त्याच्या एक चतुर्थांश झपाटाही आमच्यानें मारवला नाहीं. जुन्या ग्रीक व रोमन लोकांच्या राज्यविषयक कल्पना अद्यापि आम्हांत आल्या नाहींत व आम्हांस कळूं लागल्या नाहींत; तेव्हां तीन हजार वर्षांपूर्वी त्या आमच्या स्वप्नांतही आल्या नसतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण इतर गोष्टींत तरी आम्ही ग्रीक लोकांच्याहून श्रेष्ठ किंवा त्यांच्या बरोबरीचे होतों का? आमच्या मतें, खचित नाहीं! त्या काली ठाऊक असलेल्या बहुतेक कलांत व शास्त्रांत ग्रीक लोकच सर्वांत श्रेष्ठ होते असा आमचा ग्रह झाला आहे, आणि तो साधार असेल तर जुन्याचें वृथा प्रस्थ माजविणाऱ्यांचा आम्हांस तिरस्कार येणें स्वाभाविक नाहीं काय?

पौराणिक कालांत आमची व ग्रीक लोकांची स्थिति सारखीच होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. वर्तमानपत्रांत अशा विषयांचा यथास्थितपणें ऊहापोह करतां येत नाही एवढीच नड आहे; नाही तर ग्रीक पुराणांतल्या अनेक कथा घेऊन त्यांचें साम्य दाखविलें असतें; व त्यावरून त्या लोकांचे आणि आमचे आचार व विचार किती एकसारखे होते हें वाचकांच्या डोळ्यापुढें उभे केलें असतें. तथापि होमरच्या महाकाव्याचा आणि वाल्मीकीच्या रामायणाचा येथें उल्लेख करण्यास हरकत नाहीं. या दोन महाकवींच्या मूळ कथानकांत इतकें साम्य आहे कीं, युरोपियन कवींचा स्वाभाविकपणें पक्षपात करूं इच्छिणाऱ्या कित्येक अर्वाचीन युरोपियन पंडितांनीं अशी शंका प्रदर्शित केली आहे कीं, रामायणाचें कथानक भारतीय कवीनें बहुधा ग्रीक कवीच्या 'इलिअड'पासून घेतलें असावें. रामायणांत ज्याप्रमाणें रामाची सीता रावणानें हरण करून नेली, व ती लंकेहून परत आणण्यासाठी रामानें राक्षसांशीं तुंबळ युद्ध केलें; त्याप्रमाणेंच इलिअडमध्येही एका राजानें दुसऱ्या राजाची सुंदर स्त्री पळवून नेली, व ती फिरून काबीज करण्यासाठीं त्या चंचल वनितेच्या नवऱ्यानें घनघोर युद्ध केलें, अशी मुख्य गोष्ट आहे. प्रधान कथानकांत एवढें साम्य दिसून आल्यावर तें एकानें दुसऱ्यापासून उचललें असावें, अशी शंका येणें स्वाभाविक आहे; आणि त्याप्रमाणें ती एका प्रसिद्ध जर्मन पंडिताला आली, यांत कांहीं नवल नाहीं. पण अशा प्रकारच्या वादांत मूळ रचना कोणाची असावी, आणि तिचें अनुकरण करणारा कोण असावा याचा निर्णय करण्याची मोठी मारामार पडते. कथानकाच्या साम्यावाचून दुसरा पुरावा नसेल तर वाचकांच्या किंवा टीकाकारांच्या तब्यतींप्रमाणें पाहिजे त्याकडे आद्यत्व देतां येतें! ज्या वेळेस जर्मन पंडितानें रामायण होमरपासून उतरलें असावें असें आपलें मत दिलें; त्या वाल्मीकीपासून इलिअड उतरलें असावें असें मत देणेंही तितकेंच योग्य होणार आहे, असा विचार त्याच्या मनांत कसा आला नाहीं

कोण जाणे! कै. ऑ. मि. जस्टिस तेलंग यांनी आपल्या मनाला हाच प्रश्न घातला; आणि पुष्कळ शोध करून असें सिद्ध करून दाखविलें कीं, होमर व वाल्मीकि यांपैकी एकानें दुसऱ्याची प्रत किंवा नक्कल केली असें म्हणणे शक्य असेल तर ती होमरनें म्हणजे ग्रीक कवीनें केली असावी, हें विशेष संभवनीय आहे! ज्यांना या वादाविषयीं विशेष माहिती हवी असेल, व तो करण्यांत मि. तेलंग यांनीं बुद्धीचें किती कुशाग्रत्व दाखविलें आहे पाहण्याची इच्छा असेल; त्यांनीं त्यांचा "Is Ramayana copied from Homer?" (रामायण होमरवरून उतरलें आहे काय?) या नांवाचा निबंध वाचावा.


असो; प्रस्तुत विषयाच्या संबंधानें ह्या गोष्टींचा आम्हीं येथे येवढ्यासाठींच उल्लेख केला कीं, पौराणिक कालांत आमचें ग्रीक लोकांशीं इतकें साम्य असतां पुढें आम्हां उभयतांत जें अंतर पडत गेलें त्यामुळें त्यांच्या व आमच्या इतिहासास पराकाष्ठेची विभिन्नता आली. काहीं कलांत व विद्यांत अजरामर कीर्ति संपादून व त्या कलांचें आणि विद्यांचे बीं नवीन लोकांत लावून, जुने ग्रीक लोक अंतर्धान पावले; आम्ही आमची थोडीबहुत पुंजी होती तिला घट्ट मिठी मारून काळाच्या तीव्र प्रहारांस न जुमानंता, आजपर्यंत कशी तरी प्राणयात्रा करीत आलों! अशा रीतीनें युगेंच्या युगें जगणें हें चांगलें, किंवा थोडींच शतकें कां होईना, पण स्वतःचे नांव अमर करून व जगाच्या इतिहासाला चांगलेपणाचें वळण लावून नाहिसें होणें चांगलें, याचा निश्चय करणें फार कठिण आहे! तथापि येवढें खास म्हणतां येईल कीं, आमच्या सुधारणेस खळ पडल्यापासून ज्या स्थितींत आम्ही कुजत पडलों आहों; त्याच स्थितींत आम्हांस युगेंच्या युगें लोटावयाचीं असतील तर आम्हीं एकदम नाहींसें व्हावें हे इष्ट आहे! ज्यांना कधींही चांगला दिवस येण्याची बिलकुल आशा नाहीं, त्यांनीं चैतन्याला बिलगून रहाणें हें शुद्ध पिसेपण नव्हे काय? पण गेल्या दोन हजार वर्षांचा आमचा जो इतिहास आहे, त्यावरून पहातां केवळ जीवरक्षणापलीकडे आम्ही कांहीएक केलें नाहीं, असें म्हणणें भाग पडेल! आणि पुढेंही जर अशाच रीतीनें वागण्याचा आमचा विचार असेल तर आम्ही मोठे अद्वितीय जंतु आहों, असें मानिलें पाहिजे.

पुष्कळ देशाभिमान्यांस अशा प्रकारचें लिहिणें आवडत नाहीं! पण आम्हीं त्याला काय करावें? जी गोष्ट उघडपणें बोलून न दाखविणें म्हणजे आजमितीस मोठा अपराध करणें आम्हांस वाटतें, ती बोलून टाकल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं, याला आमचा काय इलाज आहे? ज्या लोकांना आमची ही आत्मनिंदा रुचत नाहीं, त्यांनीं आम्हांस आत्मस्तुति करण्यासारखें आम्हीं गेल्या दोन हजार वर्षांत काय केलें आहे; हें दाखविण्याची कृपा करावी. ज्या देशांत प्रतिवर्षीं

कोट्यवधि मनुष्यप्राणी जन्मास येत आहेत व परलोकास जात आहेत, त्या देशाच्या एखाद्या कोपऱ्यांत, एखाद्या शतकांत एखाद्या व्यक्तीनें किंवा लहानशा व्यक्तिसमुदायानें थोडीशी चळवळ केली; तर तेवढ्यावरून येंवढें विस्तीर्ण राष्ट्र वास्तविकपणें सचेतन असून त्याची प्रगति होत आहे असें म्हणता येत नाहीं. चंद्रगुप्तापासून रावबाजीपर्यंत आमचा जो लांबच्यालांब इतिहास आहे; किंवा आम्ही जो लांबच्यालांब काळ घालविला त्यांत तोडरमल्ली, पूर्णय्या, किंवा भवभूति यांसारखे कांही पुरुष होऊन गेले, अथवा राजपुतान्यांतील रजपुतांसारखे किंवा महाराष्ट्रदेशांतील मराठ्यांसारखे कांही लढवय्ये होऊन गेले, असें सांगितल्यानें आमच्या ऐतिहासिक शून्यतेस विशेष बाध येतो, असें आम्हांस वाटत नाहीं. खरें म्हटलें तर चंद्रगुप्तापूर्वीच आमचा राष्ट्रचंद्र मावळला होता असें म्हणण्यास हरकत नाही. दोन किंवा अडीच हजार वर्षांपूर्वीं ज्या प्रकारच्या राज्यविचारांनी, धर्मविचारांनी, व सामाजिक विचारांनीं आम्ही निगडित झालों होतों; व त्या वेळी ज्या आचारांचें आम्ही गुलाम होतों, तेच विचार व तेच आचार अद्यापि आम्हांस बहुधा आपल्या कह्यांत ठेवीत नाहीत काय? कोणतीही सचेतन वस्तु बहुधा दोन हजार वर्षे टिकत नाहीं. पण टिकलीच तर तींत जमीन-अस्मानाचे अंतर झाल्याखेरीज राहावयाचें नाहीं. पण आम्ही पहा कसे आकाशासारखे अथवा समुद्रासारखे जसेच्या तसे! बिचाऱ्या आकाशाच्या किंवा समुद्राच्या स्थितीत देखील येवढ्या कालांतरानें शास्त्रज्ञ प्रेक्षकांच्या नजरेस येण्यासारखा फेरफार होत असेल किंवा झाला असेल. पण आमच्या शोचनीय राष्ट्रस्थितींत गेल्या दोन हजार वर्षांत म्हणण्यासारखा फेरफार झाला आहे, असें बहुधा कोणाही विचारी पुरुषास म्हणतां येणार नाहीं! येथें राहणाऱ्या पांच कोटी लोकांच्या जागीं दहा कोटी लोक झाले असतील, किंवा दहांचे जागीं वीस कोटी झाले असतील; सिथिअन लोकांनीं आमची मानगुटी सोडली असेल तर ती मुसलमानांनीं धरली असेल, व मुसलमानांनी ती सोडली असेल, तर ती इंग्रजांनी धरली असेल; जेथे पूर्वी जमिनीचा एक बिघा लागवडींत होता तेथें आता कदाचित् शंभर असतील; कधीं मुसलमानांपुढें घट्ट तुमान व लांब अंगरखा घालून कोंपरापासून सलाम करीत पळावें लागत असेल, तर कधीं पाटलून व बूट चढवून आणि कोट घालून विलायतेच्या गोऱ्यांपुढें धावावें लागत असेल; पूर्वी मर्जीविरुद्ध कर द्यावे लागत असले, तर आता कदाचित् ते कायद्यानें द्यावे लागत असतील; पूर्वीचे राज्यकर्ते उघड उघड पक्षपात करीत असले तर आतांचे कदाचित् न्यायाच्या पांघरुणाआड करीत असतील- पण असल्या स्थित्यंतरास स्थित्यंतर म्हणावें किंवा नाहीं; याचा आम्हास बराच संशय आहे. अगदीं अलीकडे लाखपन्नास हजार लोकांच्या

आचारविचारांत जें अंतर पडलें आहे ते सोडून द्या. तें पडूं लागेतोंपर्यंत आमच्या म्हणण्यासारखा काय फेरफार झाला होता, व या घटकेस देखील सामान्य लोकांच्या स्थितीत म्हणण्यासारखा काय फरक पडला आहें हें आम्हांस कोणी समजाऊन् सांगेल, तर आम्ही त्याचे मोठे आभारी होऊ. 'राजा कालस्य कारणम्', राजा आई, राजा बाप, राजा करील ती पूर्वदिशा, लोक राजाचे गुलाम- ह्या ज्या आमच्या नीच राजकीय कल्पना त्या जशा रामराज्यांत होत्या तशा अजूनही कायम आहेत. ज्याला ह्याचें प्रत्यंतर पाहिजे असेल त्यानें बडोदें, इंदूर, लष्करी, हैदराबाद, म्हैसूर वगैरे पाहिजे त्या लहान मोठ्या नेटिव संस्थानांची फेरी करून तेथील जुन्या पद्धतीच्या लोकांचे विचार व आचार कसे आहेत याची बारकाईनें चवकशी करावी. या संस्थानच्या शास्त्यांपैकीं एखाद्यानें आपल्या प्रजेपैकीं एखाद्याला केवळ चैनीखातर चाबकाचा खरपूस मार दिला, अथवा राखेचा तोबरा चढवून पाठीवर भला मोठा दगड दिला, किंवा प्रसंगविशेषीं एखाद्याचे नाहीं तसले हाल करून खूनही केला; तरी देखील भोगणाऱ्याचे आप्त किंवा इतर लोक आपल्या स्वामीविरुद्ध उठावयाचे नाहींत! ही आमची राजभक्ति आणि राजनिष्ठा! धिक्कार असो आम्हांला आमच्या राजभक्तीला, आणि आमच्या शास्त्यांला! सारेच एका माळेचे मणि! आजमितीस कोणत्याही नेटिव संस्थानांत ब्रिटिश पोलिटिकल एजंटच्या सान्निध्यांत असा प्रकार घडत असेल असें आम्ही म्हणत नाहीं. पण घडल्यास निदान आमचे लोक तरी आपण होऊन त्याबद्दल बोभाटा करणार नाहींत, अशी आमची पक्की खातरी आहे. अशा राजभक्तांनीं परक्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या देशांत येऊं दिल्या आणि एकाच्या जुलमांचें जूं निघाले नाहीं तोंच दुसऱ्याच्या जुलमाचें जूं आपल्या मानेवर घेतलें आणि आपल्या बायकांपोरांसह शतकेंच्या शतकें, हवे तसले हाल सोशीत हीन दास्यावस्थेंत काढलीं यांत नवल तें काय? ग्रीक लोकांना अशा स्थितींत एक वर्ष देखील काढवलें नसतें, मग शतकांचीं काय कथा?

*


निबंधसंग्रह भाग

अथवा

लोकशिक्षणावर गदा

"तुमच्या हायस्कुलावर होत असलेल्या खर्चांपैकीं दोन तृतीयांश खर्च तुम्ही देण्यास तयार व्हा, नाहींतर तुमचें हायस्कूल बंद केलें जाईल." अशा अर्थाचीं पत्रें शाळाखात्याचे डायरेक्टर यांजकडून प्रत्येक जिल्ह्याचे म्युनिसिपालटीस गेलीं आहेत; तसेंच येथील डेक्कन कॉलेजाची फी दहा रुपये केली आहे, असें म्हणतात. हा सर्व प्रकार खरा असेल, व त्याप्रमाणें आचरण करावयाचेंच, असा सरकारचा निश्चय झाला असेल, तर येथील लोकशिक्षणाची काय अवस्था होईल हें सांगतां येत नाहीं. आजपर्यंत आमच्या सरकारचा गर्व काय असे कीं, आम्हीं हिंदु लोकांसाठीं साऱ्या देशभर रस्ते केले. तारायंत्रें केलीं, आगगाड्या केल्या, न्यायाच्या कचेऱ्या स्थापिल्या, लोकांच्या मालमत्तेचें आणि जिवांचें उत्तम रीतीनें संरक्षण होईल अशा प्रकारचा पोलिसांचा बंदोबस्त केला; सैन्याची उत्तम व्यवस्था ठेऊन परचक्राची भीति दूर केली; व्यापारास उत्तेजन दिलें; नाना तऱ्हेच्या धंद्यांची लोकांस ओळख करून दिली; सारांश, हिंदुस्थानास आजपर्यंत अनवगत अशी सुधारणा व शांतता त्यास दिली. पण या सर्वांपेक्षा सरकारास ज्या गोष्टीविषयीं विशेष अभिमान वाटत असे; जीमुळें आमचें पारतंत्र्य आम्हांस सह्य होऊन इंग्लिश लोकांचें प्रभुत्व येथें चिरकाल असावें, असें वाटत असें; व जिच्या मदतीनें कधीं तरी आम्हांस स्वातंत्र्याचा सुदिन प्राप्त होईल, अशी आशा आमच्या अंतःकरणांत कधीं कधीं उद्भवत असे; त्या गोष्टींतून सरकार आज आपलें अंग काढून घेऊं पाहात आहे! लोकशिक्षणाच्या कामाचा बोजा ब्रिटिश सरकाराने झुगारून दिल्यास, ब्रिटिश लोकांस आपल्या अंमलाचे पवाडे गाण्यास काय राहिलें, हें आम्हास समजत नाहीं. "आम्हीं तुमचे स्वातंत्र्य नाहींसे केलें, पण त्याबद्दल पाश्चिमात्य ज्ञानांचे सारें भांडार आम्हीं तुम्हांस अर्पण केलें" ही जी इंग्लिश लोकांची आजपर्यंतची गर्वोक्ति; तिचें आतां काय होईल? हिंदुस्थानांत आजमितीस बसेच लोक शिकून तयार झाले आहेत, व त्यांना शिक्षणांचें महत्त्व समजून आलें आहे; तेव्हां येथून पुढें जो विद्याप्रसार व्हावयाचा त्याचें काम त्यांच्या हातून करविण्याचा सरकारानें निश्चय केला असता, तर त्याबद्दल सरकारास विशेष दोष देण्यास जागा न सापडती. लोकशिक्षणावर सध्यां होत

असलेला खर्च कायम ठेऊन शाळा व कॉलेजें चालविण्याची जबाबदारी सरकार लोकांवर टाकतें, आणि त्यांची देखरेख फक्त आपणांकडे ठेवतें, तर 'तुम्ही सर्वथैव वावगी गोष्ट करता,' असें आम्हांस म्हणतां न येतें. पण सध्यां सरकारानें जो क्रम आरंभिला आहे तो आमच्या मतें फारच दूषणीय आहे. ज्याप्रमाणें व्यसनी लोक आपल्या व्यसनांत तदनभिज्ञास घेरावयाचें असतां कांहीं दिवस आपली पदरमोड करून त्यास आपल्या व्यसनाची चटक लावतात, व ती त्याच्या अंगी पक्की खिळली असें दिसून येऊं लागले म्हणजे आपला हात आखडून धरतात इतकेंच नाहीं, तर आपल्या खर्चाचा बोजाही त्यावर लादूं लागतात, तसा प्रकार या विद्याव्यसनाच्या संबंधानें सरकारानें आरंभिला आहे. प्रथम मोठ्या खर्चाचीं शाळाखातीं प्रत्येक इलाख्यांत स्थापलीं; कनिष्ठ, मध्यम व वरिष्ठ प्रतीच्या शाळा घातल्या; त्यांत लोकांनीं आपलीं मुलें धाडावीं म्हणून कोठें त्यांस अगदीं फुकट व कोठें क्षुल्लक फीवर शिकविण्याचा प्रघात घातला; पगारी विद्यार्थ्यांच्या जागा निर्माण केल्या; बक्षिसें लाविलीं; परीक्षा घेण्यासाठीं युनिव्हर्सिट्या स्थापिल्या; ठिकठिकाणीं लहान लहान पुस्तकालयें केलीं;- याप्रमाणें लोकशिक्षणाची लोकांस गोडी लागण्यास्तव होण्यासारखे सारे उपाय करून ते त्याचा आस्वाद चाखूं लागताहेत नाहीं तो त्यांतून आमचें सुधारलेलें सरकार आपलें अंग सर्वांशीं काढूं पहात आहे. इतकेंच नाहीं, तर त्याकडे होत असलेला बराच खर्चही कमी करूं पहात आहे, हें आमचें केवढें दुर्भाग्य होय! व यामुळें सरकारास तरी केवढा धोका बसण्याचा संभव आहे? वाचकहो, ही सर्व चलबिचल ब्रह्मदेशांत चालूं असलेल्या लढाईमुळें व वायव्यप्रांतावर अफगाणिस्थानाच्या बाजूनें परचक्र येऊं नये, म्हणून ब्रिटिश सैन्य वाढविण्यांत आल्यामुळें जो खर्च वाढला आहे, त्यामुळें होत आहे, असें समजणें जरूर आहे. कोणत्याही खात्याचा खर्च कमी न करतां वरील गोष्टी करतां याव्या, म्हणून लॉर्ड **डफरीन** यांनीं **इन्कमटॅक्स** (प्राप्तीवरील कर) पुन: बसविला, मिठावरील कर वाढविला, व दुष्काळनिवारणार्थ बसविलेल्या कराचें सारें उत्पन्न वरील कृत्याकडे लावून दिलें, तरी त्यांचा खर्च भागत नसल्यामुळें, ही काटकसरीची धाड शाळाखात्यावर येऊं पहात आहे, हें उघड आहे. ब्रह्मदेशावर स्वारी करून तो खालसा करण्याचा निश्चय झाला, तेव्हां सरकारानें जे लेख प्रसिद्ध केले त्यांत असें दाखविण्याचा प्रयत्न केला होता कीं, ब्रह्मदेश जिंकण्यास व खालसा करण्यास फार झाले तर तीस लाख रुपये लागतील! पण तो एकदां खालसा होऊन ब्रिटिश राज्याचा घटकावयव झाला, म्हणजे त्यासंबंधानें हिंदुस्थानावर खर्चाचा भार पडणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट हिंदुस्थानच्या खजिन्यास ब्रह्मदेशापासून मदत होऊं लागेल! ही गोष्ट घडून

येण्याची आशा आतां उरली नाहीं! ब्रह्मदेशाशीं आरंभिलेला संग्राम, वायव्यदिशेचा बंदोबस्त, आणि रुप्याचा उतरलेला भाव- यांमुळें हिंदुस्थानचा खर्च सहा कोटींनीं वाढला आहे. पैकीं सुमारें तीन-साडेतीन कोटीं रुपये इन्कमट्याक्स, मिठावरील वाढलेला कर, व इतर किरकोळ बाबी यांतून भागविला जात आहे. बाकी उरलेले दोन अडीच कोटी रुपये कोठून काढावे, अशी पंचाईत पडल्यामुळें, प्रत्येक इलाख्यावर नवीन खंडणी बसवावी असा बेत करून, हिंदुस्थान सरकारानें मुंबई सरकारास असें पत्र लिहिलें आहे कीं, चालूं वर्षांत ''तुम्हांकडून मुख्य सरकारास एकोणीस लाख रुपये मिळाले पाहिजेत. हे उभे करण्यासाठीं तुम्ही पाहिजे ती काटकसर करा, नवीन कर बसवा, शाळांची फी वाढवा; सारांश, तुम्हांस वाटेल तें करा; पण तुमच्याकडून एकोणीस लाखांची कुमक झालीच पाहिजे! व तेथून पुढें इलाख्याच्या उत्पन्नाचा विवक्षित भाग तुम्हांकडे ठेऊन बाकीचें सारें उत्पन्न मुख्य सरकार आपले ताब्यांत घेईल; व तुमच्याकडे जो भाग ठेवायाचा, तो कमी अधिक करण्याचा अधिकारही मुख्य सरकाराकडे राहील. इंपीरीअल उत्पन्न व इंपीरीअल खर्च आणि प्रांतिक उत्पन्न व प्रांतिक खर्च- असा विभाग करणें बरोबर नाहीं. कसेंही झालें तरी ज्या गोष्टींबद्दल मुख्य सरकार जबाबदार आहे त्यांचा खर्च कसा तरी भागविलाच पाहिजे. त्याअर्थीं तो खर्च भागविल्यानंतर उरेल तेवढा पैसा प्रांतिक खर्चाकडे लावणें योग्य आहे. ज्या प्रांतिक सरकारांस आपापल्या प्रांतांत विशेष सुधारणा करावीशी वाटत असेल, त्यांनीं ती करण्यास्तव हवे तितके पैसे उत्पन्न करावे. पण त्या सर्वांनीं ही गोष्ट लक्षांत धरावी कीं, मुख्य सरकारास लागेल तेवढा पैसा पुरविणें, हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. हिंदुस्थानामुळें इंग्लंडांत होणारा सात आठ कोटींचा खर्च, सैन्याचा खर्च, मोठमोठ्या व्यापारी कंपन्यांस जें व्याज पोहोंचविण्याचा सरकारानें पत्कर घेतला आहे त्याचा खर्च, आणि अशाच प्रकारचे इतर खर्च मुख्य सरकाराकडून होतात; आणि ते केल्याशिवाय राज्यशकट सुरळित चालण्याचा संभव नाहीं. सबब हे खर्च भागविल्यावर जेवढी शिल्लक उरेल तेवढीच प्रांतिक सरकारांच्या ताब्यांत ठेवता येणार आहे.'' या नवीन तत्वाचा अर्थ असा होतो कीं, मुख्य सरकारानें पाहिजे तसा खर्च करावा; तो पुरविण्याचा मक्ता प्रांतिक सरकारांनीं आपणांकडे घ्यावा; आणि तो निभण्यास्तव लोकांवर हवे तेवढे कर बसवून त्यांस असंतुष्ट करण्याचें अपयश; मुख्य सरकाराकडे न जाऊं देता आपल्याकडे घेण्यास तयार असावें! या अनियंत्रित व अप्रशस्त व्यवस्थेचा अथवा अव्यवस्थेचा आरंभ झाला नाहीं, तोंच प्रांतिक सरकारांवर खर्चाच्या जबरदस्त गोण्या पडूं लागून अत्युपयोगी खात्यांचा खर्च कमी करण्यास सुरवात झाली आहे. दुर्दैवानें ही

व्यवस्था कायम होईल तर पुढें काय काय प्रकार पहावे लागतील, त्यांची आज कल्पना सुद्धां करवत नाही! राज्यविस्तार शक्तीबाहेर गेला, आणि उत्पन्नाचा बहुतेक भाग लष्करी खात्याकडे अडला जाऊन, न्याय, लोकशिक्षण वगैरे अत्यावश्यक कामांकडे दुर्लक्ष होऊं लागलें म्हणजे राज्यास उतरती कळा लागल्याचीं चिन्हे दिसूं लागलीं असें आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्ध झालें आहे. अलीकडे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाविषयीं पराकाष्ठेची आस्था दाखविली जाऊन, त्याच्यासाठीं अधिकाधिक खर्च करण्याची प्रवृत्ति पडूं लागली आहे. कनिष्ठ प्रतीचें शिक्षण तर सर्वांस फुकटच मिळावें, म्हणजे त्याचा सारा खर्च सरकारी उत्पन्नांतून व्हावा, असा वाद चालू आहे, आणि तो करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या देशांतील बहुतेक लोकांस लिहितां वाचतां येत आहे, त्या देशांत त्या संबंधानें अशा हालचाली सुरू आहेत. आमच्या देशांत दाट अज्ञानतिमीर जिकडे तिकडे पसरलें आहे. काँग्रेस ही लोकांची प्रतिनिधीसभा नव्हे, असें प्रतिपादणाऱ्यांचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, ज्या देशांतील शेंकडा पंचाण्णव लोकांस लिहितां वाचतां येत नाहीं, त्यांना काँग्रेससारख्या सभांचें महत्त्व समजण्याचा मुळीच संभव नाहीं; म्हणून लोकांत शिक्षणाचा बराच प्रसार होईतोंपर्यंत असल्या काँग्रेसांपासून फायदा न होतां नुकसान होण्याचा संभव आहे. तसेच प्रांतिक कौन्सिलांत व गव्हर्नर-जनरलाच्या कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असूं नयेत, असें ज्यांचें म्हणणें आहे तेही तसें न करण्यास लोकांचें अज्ञान हेंच कारण दाखवितात. असें असून गरीब बिचाऱ्या शाळाखात्याचा खर्च अविचारानें कमी करणें हें अगदीं उचित नाहीं. या खात्याचा खर्च कमी करणें म्हणजे उत्पन्नाचा झरा बंद करण्यासारखें होय, याचा सरकारानें नीट विचार करावा. काटकसर करणें जरूर असेल तर ती दुसऱ्या खात्यांत करावी. ती शाळाखात्यांत केल्यानें लोकांचें आणि सरकाराचें पुढें पराकाष्ठेचें नुकसान होणार आहे. यासंबंधाची ओरड थेट पार्लमेंटपर्यंत पोंचवून सरकारी उत्पन्नाचा विवक्षित भाग लोकशिक्षणाकडे अव्याहत लाविला जाईल, असें पार्लमेंटानें हिंदुस्थान सरकाराकडून बंधन करून घेतले पाहिजे.

✷

देवता

''व्याघ्रादि हिंस्र पशूंस देवतांची कल्पना आहे किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. पण असलीच तर त्यांच्या देवता पर्वतांच्या गुहांत दिवसां पडून राहणाऱ्या, रात्रीं भक्ष्य मिळविण्यासाठीं गोठ्यांवर, मेंढवाड्यावर, व कळपांतून चुकून मागें राहिलेल्या व इकडे तिकडे भटकणाऱ्या गैरसावध हरणावर व गाईम्हशींवर हल्ला करणाऱ्या, तीव्र दाढांच्या, प्रचंड सामर्थ्यांच्या, व प्रखरनखायुधाच्या स्वप्रतिमा असतील,'' असें एका ग्रीस देशांतील मूर्तिपूजेचा तिरस्कार करणाऱ्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांचे म्हणणे आहे. प्रस्तुत लेखांत या तत्त्ववेत्त्याप्रमाणें या देशांतील विचित्र मूर्तिपूजेवर टीका करण्याचा इरादा नाहीं. मनुष्यास देवतांच्या कल्पना प्रथम कशा सुचूं लागतात; पुढें त्यांची अभिवृद्धि कशीं होत जाते; आणि अखेरीस त्यांचा लय कसा होतो, हें मात्र येथें सांगावयाचें आहे. ज्याप्रमाणें व्यक्तिमात्रास बाल्यावस्थेत कित्येक विलक्षण कल्पना खऱ्या भासत असून, पुढें जसा त्यांचा लोप होत जातो, त्याप्रमाणें मनुष्यजातीच्या बाल्यावस्थेंत कित्येक विलक्षण कल्पनांचा उद्भव होऊन, पुढें ज्याप्रमाणें तींत ज्ञान आणि अनुभव यांची वृद्धि होत जाते, त्याप्रमाणें त्या मागें पडत जाऊन त्यांच्या ठिकाणीं शुद्धतर कल्पनांचा संभव होतो. तात्पर्य, मनुष्यांच्या विवक्षित स्थितींत त्याला विवक्षित कल्पना सुचल्या पाहिजेत, हें तत्त्वदृष्ट्या कबूल करणें भाग आहे. आणि म्हणून जे एका स्थितींतून पार पडून दुसऱ्या स्थितीत गेले असतील, त्यांनीं आपल्या पहिल्या स्थितींत असलेल्या व्यक्तीस मूढ म्हणणें किंवा त्यांच्या कल्पनांची विटंबना करणें बरोबर नाहीं. एखाद्या वाटोळ्या दगडास शेंदूर फासून त्यापुढें बकरीं मारणें; किंवा संगमरवरी पाषाणाची सुंदर मनुष्याकृति करून तिला पीतांबर नेसविणें; दागिने घालणें, पंच पक्वान्नांचे प्रतिदिवशीं नैवेद्य दाखविणें; व रात्रीं निजण्यासाठीं शय्या करून ठेवणें; अथवा ज्या मंदिरांत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष प्रार्थनाविषय पुढें ठेवण्यांत येत नाहीं अशा मंदिरांत मांड्या घालून किंवा गुडघे टेंकून आणि डोळे मिटून साक्षात् किंवा परंपरेनें निर्विकार व निर्गूढ अशा परब्रह्माची उपासना व चिंतन करणें; अथवा कोणत्याही मंदिरांत पाय न ठेवतां घरच्या घरीं एकांत स्थानीं विचारमग्न होऊन, विश्वाचा अफाट पसारा आणि आपले संकुचित बुद्धिसामर्थ्य,

हीं पुढें उभीं राहणें आणि आपणास विश्वाच्या दृश्य स्वरूपापलीकडे कधीही जातां येण्याचा संभव नाहीं, विश्वाचें आदिकारण कांही तरी असलें पाहिजे अशी खात्री झाली तरी जोंपर्यंत ज्ञानप्राप्ति इंद्रियावलंबी आहे तोंपर्यंत त्यांच्या द्वारें जेवढें व जसलें ज्ञान मिळेल तेवढ्यांतच समाधान करून घेतले पाहिजे; त्यापलीकडे भरारी मारणे, व मला जगदादिकारणांचे खरें ज्ञान झालें आहे, असें म्हणणें हा बुद्धीचा भ्रम किंवा आग्रह आहे असें वाटणे;- हे सारे निरनिराळ्या स्थितीत मनुष्यांच्या हातून घडणारे धर्माचार आणि त्याला सुचणारे धर्मविचार आहेत. कोणतीही लहान-मोठी जड वस्तु, वनस्पति, प्राणि, किंवा निराकार देवता यांपैकीं कोणाचेही पूजन मनुष्य करीत असला तरी त्याच्या सर्व प्रकारच्या पूजनांत एक गोष्ट साधारण असते ती ही कीं, ज्या वस्तूची तो पूजा करीत असतो, ती वस्तु निदान त्यावेळी तरी त्यास आपणाहून विशेष प्रबळ आणि आपलें हित किंवा अहित करण्यास समर्थ अशी आहे, असें तो मानीत असतो, यांत शंका नाहीं.कोणत्याही वस्तूस देवता कल्पून तिचें पूजन करण्यांत, तिनें केलेल्या उपकाराबद्दल आभार प्रदर्शित करावे, असा एक हेतु असावा, व अमुक अपकार करूं नये, अशासाठी तिची प्रार्थना करावी, असा दुसरा हेतु असावा. याहून कोणत्याही पूजकास आपल्या उपासनेचा आधारभूत तिसरा हेतु दाखवितां येईल असें वाटत नाहीं. सारांश, 'देवता' आणि 'पूजा' या शब्दांबरोबर एका बाजूस सामर्थ्याधिक्य आणि दुसऱ्या बाजूस बलहीनता; एका पक्षीं मनोरथ परिपूर्ण करण्याची शक्ति आणि दुसऱ्या पक्षीं उपकार करून घेण्याचें आणि अपकार टाळण्याचे औत्सुक्य दिसून येतात. हा सिद्धांत ज्यांनीं या संबंधानें विशेष विचार केला नसेल त्यांस सहसा मान्य होण्यासारखा नाहीं. तथापि तो खरा आहे, अशी खात्री पुढील विस्तृत विवेचनावरून झाल्याशिवाय राहणार नाही.

देवता अनेक प्रकारच्या आहेत. जळीं, काष्ठीं, व पाषाणीं देवता भरल्या आहेत. जिवंत झाडांत व जनावरांच्या शरीरांत अनेक देवतांचा संचार होत आहे. सारांश, अशी कोणतीही वस्तु नाहीं कीं जी देवता होऊं शकणार नाहीं, किंवा जिला कोणीतरी देवता करून सोडिलेलें नाहीं. सृष्टींतील सचेतन व अचेतन पदार्थांचे ठाईं प्रबल पुरुषांचे गुण कल्पून त्यांस देवता मानूं लागणें, हा देवतोत्पत्तीचा एक प्रकार; व प्रबल पुरुषांसच जिवंतपणीं आणि मरणोत्तर देव कल्पून त्यांचें पूजार्चन करणें हा देवतोत्पत्तीचा दुसरा प्रकार. नद्या, पर्वत, ग्रह, तारे, धान्यें, हत्यारें, वगैरेंची पूजा; तसेंच बेल, वड, उंबर, तुळस यांची पूजा; पुन: गाय, बैल, साप, हनुमंत, व गरुड यांची पूजा या देवतोत्पत्तीच्या पहिल्या प्रकारांत येतात; राम, कृष्ण, गणपति, ज्ञानदेव, देव मामलेदार, अक्कलकोटचे

स्वामी, यांच्या पूजा देवतोत्पत्तीच्या दुसऱ्या प्रकारांत येतात. या दोन देवतोत्पत्ती एका पाठीमागून एक होतात, असा नियम नाहीं; त्या समकालीनही असतात. त्यांत मुख्य भेद हा आहे कीं, पहिल्या प्रकारच्या देवतोत्पत्तींत मनुष्यांच्या गुणाचा आरोप मनुष्येतर वस्तूंवर होत असतो; दुसऱ्या प्रकारच्या देवतोत्पत्तींत मनुष्यच देव बनून जातो! प्रस्तुत निबंधांत मनुष्यास देव बनविण्याची प्रवृत्ति कशी पडते, हें सांगावयाचें आहे. हें सांगतांना हिंदुस्थानांतील लोकांशिवाय इतर लोकांचीं उदाहरणेंही देण्यांत येणार आहेत. त्यांवरून असें दिसून येईल कीं, धर्मसंबंधानें आमच्या लोकात जशा विचित्र कल्पना आहेत, तशा इतर लोकांतही आहेत; व ज्याप्रमाणे उत्तरोत्तर आमच्या धर्मकल्पना शुद्ध होत गेल्या त्याप्रमाणें इतरांच्याही होत गेल्या व चालल्या आहेत.

प्रथम ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, कीं मनुष्य आपल्या वन्यावस्थेत किंवा प्रथमावस्थेत बऱ्याच अंशीं अप्रबुद्ध पशूसारखा असतो. ज्याप्रमाणें परिचयांत नसलेली एखादी विलक्षण वस्तू या पशूंनीं पाहिली म्हणजे ते बुजतात, आणि घाबरून जातात, त्याप्रमाणेंच असाधारण वस्तूच्या दर्शनानें वन्य मनुष्याची स्थिति होते. त्याला ती वस्तू अमानुष किंवा दैविक वाटूं लागते. रानटी लोक आपल्याहून बुद्धीनें, चातुर्यानें, व बलानें श्रेष्ठ अशा मनुष्यासच देव म्हणतात असें नाहीं; अपरिचित पण विलक्षण निर्जीव वस्तूसही देव मानणें ही त्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असते. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांनीं कांहीं विलक्षण वस्तु किंवा पुरुष पाहिला, की तिला किंवा त्याला ते देव किंवा पिशाच्च म्हणतात! बेचुआना जातीच्या लोकांनीं जहाज कधी पाहिलें नसल्यामुळें, जेव्हां त्यांपैकीं दोघांस कांहीं इंग्रजांनीं आपल्या गलबतावर नेलें, तेव्हां ते आश्चर्यानें थक्क होऊन असें म्हणूं लागले कीं, 'ही वस्तु मनुष्यकृत नसावी, ही स्वयंभू असावी, ही खचित देव आहे!' रानटी लोकांत 'देव' ही संज्ञा त्यांस न समजणाऱ्या वस्तूस, व ज्या पुरुषाच्या शक्तीचा त्यांस तर्क होऊं शकत नाहीं अशा पुरुषास, लावण्यांत येते. **फिजियन** लोकांचा आणि **युरोपिअन** लोकांचा प्रथम समागम झाला तेव्हां **फिजियन** लोक छापण्याच्या यंत्रांस आणि तीं चालविणाऱ्या युरोपिअन लोकांस देव म्हणूं लागले! राजाला देव म्हणणें हा प्रघात सर्वत्र अवगत आहेच. **शिवाजी** शिवावतार होता, असें मानणारे गृहस्थ आपणांस या क्षणीं पाहिजे तितके सांपडतील! **मालगासकी** लोकांस जी नवीन व उपयोगी गोष्ट दिसेल तीस ते देव म्हणतात. रेशीम, तांदूळ, नाणीं, गडगडाट, वीज, भूकंप हे सारे त्यांचे देव होत! पूर्वज व नुकताच मेलेला राजा हेही त्याच कोटींत येतात! पोथ्यांना नमस्कार घालण्याचा मक्ता आमच्याकडेच आहे असें नाहीं; हे लोकही पुस्तकांस देवाप्रमाणें भजतात! मखमालीस हे लोक ईशतनय मानतात! याप्रमाणें असाधारण वस्तूस व मनुष्यास देव मानणाऱ्या लोकांचीं अनेक उदाहरणें देतां येतील, पण तसें करण्यास

येथें जागा नाहीं. ज्यांना तीं हवीं असतील त्यांनीं प्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता जो हर्बर्ट स्पेन्सर त्याचा **प्रिन्सिपल्स ऑफ सोशिऑलाजी** नामक ग्रंथ पहावा. या तत्त्ववेत्त्याच्या इतर ग्रंथांप्रमाणें हा ग्रंथही विद्वत्तेची आणि विचाराची अनुपम खाण आहे; व **सुधारकांच्या** द्वारे त्याची ओळख आमच्या लोकांस करून द्यावी, असा आमचा मानस आहे. प्रस्तुत निबंध वरील ग्रंथाच्या एका अध्यायाच्या आधारानें लिहिण्यास आरंभ केला आहे.

असो! वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून काय दिसून येईल कीं, रानटी लोक आपल्याहून श्रेष्ठ असा मनुष्य दिसला कीं त्याला देव म्हणूं लागतात. हें श्रेष्ठत्व अगदीं स्वल्प असलें तरी चालतें. **तोडा** जातीच्या लोकांत बहुश: गवळ्यांकडे उपाध्यायत्व किंवा धर्माधिकारित्व असतें; तेव्हां अर्थातच ते आपणांस देव समजतात. जर यांपैकीं एखाद्या पवित्र गवळ्यास कोणी असें विचारील कीं, ''कांहो, उपाध्यायबोवा, तुम्ही सूर्याची पूजा करीत असतां काय?'' तर त्यावर तो छातीला हात लाऊन असें उत्तर देईल कीं, ''अस्मादिक त्या सूर्याची पूजा कशासाठीं करतील? इतर गरीब लोकांनीं पाहिजे तर ती करावी. सूर्यासारखेच आम्हीही देव आहों; व सूर्याप्रमाणें इतरांनी आमची पूजा केली पाहिजे!'' तेव्हां 'ब्राह्मणं कुलदैवतं' या सूत्रांत ब्राह्मणाच्या जागी 'दोहक' असा शब्द घातल्यास, तें सूत्र **तोडा** लोकांस अत्यंत स्वीकरणीय होईल असें वाटतें. मध्य अमेरिकेतील टालटिक प्रांतांतल्या इंडियन लोकांविषयी **मौंटगोमरी** असें लिहितों कीं, हे लोक आपल्या देव मानलेल्या वृद्ध मनुष्यावर एका तऱ्हेचा पोषाख चढवून, त्याची एका खोपट्यांत स्थापना करतात, व त्या ठिकाणीं जाऊन ते त्याची पूजा करतात. आपापल्या शेतांतील फळें वगैरे नैवेद्य म्हणून त्याला अर्पितात; आणि त्याच्या समोर आपल्या पूर्व संप्रदायाप्रमाणें एका प्रकारचे धर्मविधि करतात!

यावरून काय झालें कीं, अज्ञानावस्थेंत मनुष्यास आपल्यापेक्षां किंचित् श्रेष्ठ अशा व्यक्तीविषयीं येवढी भीति उत्पन्न होऊन त्याची पूजा आरंभावी असें वाटूं लागलें. तर तो मेला असतां त्याचें पिशाच्च अधिक भीतिप्रद वाटून त्याला देऊळ बांधावें, प्रति दिवशीं, प्रति मासीं, किंवा प्रति वर्षीं त्याला देणें द्यावें, आणि जेणेंकरून त्याची मर्जी आपणावर सुप्रसन्न राहील, अशा प्रकारचे उपाय करावे असें वाटणें, हें किती साहजिक आहे बरें? आपणांमध्ये जो प्रचंड श्राद्धविधि माजला आहे त्याचें सर्व बीज या वृत्तींतच आहे. गतासु झालेल्या आप्तांच्या पिशाचांनीं आपणांवर कुपित न होतां, आपली कृपादृष्टि सदैव चालू ठेवावी, आणि पोराबाळांस त्रास देऊं नये, हें सारें श्राद्धविधीच्या आणि पितृतर्पणाच्या बऱ्याच भागाचें गुह्य आहे. तेव्हां आजच्या निबंधापासून ही गोष्ट लक्षांत ठेवायाची कीं, देवतात्वाचें पहिले पितृकत्व श्रेष्ठ मनुष्याकडे येते; म्हणजे श्रेष्ठ मनुष्य देवता बनतो.

*

देवतोत्पत्ति

तेविसाव्या अंकांत ;प्रबल मनुष्य हयातींत असतां व मरणोत्तर देवतात्वाप्रत कसा पावतो, हे दाखविलें आहे. आज सामान्य प्रबल मनुष्याशिवाय दुसऱ्या कोणत्या प्रकारचे पुरुष जिवंत असतां व मेल्यावर देवाप्रमाणें गणले जातात, हें दाखवावयाचें आहे.

हा किंवा अशा प्रकारचे दुसरे लेख वाचतांना वाचकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आजमितीस सुधारलेल्या राष्ट्रांतील अत्यंत बुद्धिवान् व सुशिक्षित मनुष्यांमध्यें परमेश्वराविषयीं जी कल्पना दृढ होऊन बसली आहे, ती मनुष्यांच्या सर्व प्रकारच्या स्थितीत त्यांना असते, किंवा होती, असें सिद्ध करून देण्यास पुरावा नाहीं. उलट ही कल्पना हळूं हळूं अस्तित्वांत आली आहे, असें दाखविण्यास पुष्कळ प्रमाणें आहेत. जो अनादि, जो अनंत, जो सृष्टीचें आदिकारण, जो सर्वगामी व सर्वज्ञ, जो निर्गुण व निराकार, ज्याच्या इच्छामात्रेंकरून कोट्यवधि ब्रह्मांडे उत्पन्न होतात आणि लयास जातात; जो सर्व सूक्ष्म वस्तूंहून सूक्ष्म व स्थूल वस्तूंहून स्थूल; जो अग्नीनें दग्ध होत नाहीं, शस्त्रानें तुटत नाहीं, वायूनें शोषत नाहीं आणि बुद्धीस ज्याचें खरें स्वरूप गम्य होण्याचा संभव नाहीं- अशा एका सृष्टिचालक जगदात्म्याची कल्पना; मनुष्यास फार काळानें व पुष्कळ विचारानंतर प्राप्त झाली आहे. व अजूनही ज्या देशांत व ज्या लोकांत जगदादिकारणाचें अशा प्रकारचें स्वरूप ग्राह्य झालें आहे, त्या देशांत व त्या लोकांतही अशा देवास देवाधिदेव किंवा अशा ईशास परमेश मानण्याचा प्रघात आहे. तात्पर्य काय कीं, जे आपणास एकेश्वरवादी म्हणवितात, त्यांच्या मनांतून सुद्धां अनेक देवतांची कल्पना अद्यापि समूळ नाहींशी झालेली नाहीं. विचारदृष्ट्या ज्यांना अशा प्रकारचें एकेश्वरी मत पसंत झालें आहे, पण देशांतील अनेक देवतांवरील ज्यांचा भरंवसा उडालेला नाहीं, व मूर्तिपूजेचें वैरूप्य ज्यांच्या मनांत पूर्णपणे बिंबलेलें नाहीं, ते असें म्हणतात कीं, ज्या अनेक देवतांचें सामान्य लोक पूजार्चन व उपासना करतात; त्या देवता मुख्य देवाच्या किंवा परमेश्वराच्या विभूति किंवा अंश होत. ज्याप्रमाणें नद्यांचें उदक परंपरेनें समुद्रांत जाऊन मिळतें, त्याप्रमाणें या अनेक देवतांची उपासना मुख्य देवाप्रत जाऊन पोहोंचते- किंबहुना

चंचल मनास स्थैर्य उत्पन्न करण्यासाठी निर्गुण परमेश्वराचीं हीं सगुण रूपें कल्पून त्यांची आराधना करण्याचा प्रघात पडला आहे. ही व्यवस्था मूढ जनासाठीं आहे; पण ज्या अर्थी तीत दूषणीय असें कांहीं नाहीं, त्या अर्थी विद्वानानीं सुद्धां तिचें अवलंबन करण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांनी तसें न केले तरी चालणार आहे; कारण खऱ्या ईशस्वरूपाचें ज्ञान त्यांना झालेलें असतें. पण तसे असलें तरी मूर्तिपूजेनें त्यांस कोणत्याही प्रकारचा कमीपणा येतो असें नाही. बुद्धि प्रसन्न असेल तेव्हा निर्गुण परमेश्वराची आराधना करावी; कोणत्याही कारणानें ती व्यग्र झाली असेल तेव्हां, किंवा सामान्य लोकांस उदाहरण घालून द्यावयाचें असेल तेव्हां, निर्गुण परमेश्वराची एखादी सगुण मूर्ति पुढें ठेऊन तिची उपासना करावी. या प्रकारें विद्वानांनी द्विप्रकारक उपासनाक्रम ठेविला असतां, अविद्वानास चांगलें वळण लागत राहून विद्वानांची धर्मश्रद्धाही क्षीण होण्याचा संभव राहणार नाही. अशा प्रकारचे मूर्तिपूजेचे मंडन अनेकांस नापसंत होऊन, त्यांनी थेट निराकार परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणासही भजावयाचे नाहीं, व अन्य देवतांच्या अंगी देवतात्व मानायाचे नाहीं, असा निर्धार करून तद्नुरूप धर्मस्थापना करण्याचा यत्न केला आहे; पण अद्यापि तो कोणत्याही देशांत पूर्णपणे तडीस गेलेला नाहीं, असे मानण्यास अनेक आधार आहेत. ख्रिस्ती धर्मांत मुसलमानी धर्मांत, बौद्ध धर्मात, सारांश एकेश्वरी मतापर्यंत जाऊन धडकलेल्या कोणत्याही प्राचीन किंवा अर्वाचीन लोकाच्या धर्मांत कशा तरी प्रकारची मूर्तिपूजा अद्यापि थोडीबहुत तरी दृष्टीस पडते! तात्पर्य काय कीं, पुष्कळाचा विचार जरी निराकार परमेश्वरापर्यंत जाऊन पोहोंचला आहे, तरी तो अद्यापि हवा तितका दृढ झाला नसल्यामुळें, त्यांच्या धर्माचारांतून मूर्तिपूजा पुरतेपणी निघत नाही! यावरून काय सिद्ध होतें कीं, मनुष्यास साकार देवाची कल्पना आधी सुचते, आणि निराकार देवाची कल्पना मागून येते; अगोदर पुष्कळ देवतांवर विश्वास असतो, पुढें तो एकीवर गोळा होतो; प्रथम जड पूजाद्रव्यांनींच देवता प्रसन्न करून घेतां येतील असें वाटत असतें, पुढें मानसिक पूजा पुरे आहे असें वाटूं लागते. सारांश, अनेकत्वानंतर एकत्वाची, स्थूलानंतर सूक्ष्माची, जडानंतर चिद्रूपाची, साकारानंतर निराकाराची, इंद्रियगोचरानंतर अतींद्रिय ज्ञानाची, व्यक्तानंतर अव्यक्ताची, व गम्यानंतर अगम्याची कल्पना, मनुष्यांच्या अधिकाधिक विकास पावत जाणाऱ्या बुद्धीस येणें, हेंच अत्यंत स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें लहानमोठ्या भोकांच्या चाळणी घेऊन धान्य पुन: पुन: चाळलें असतां अगदीं निवडक दाणे मात्र शेवटच्या चाळणींत राहतात; किंवा सोन्यारुप्याची अगदीं बारीक तार काढावयाची असली तर ती एकाहून एक लहान अशा भोंकांतून निघते, त्याप्रमाणे मनुष्याच्या विचाररूप

चाळणींत तेहतीस कोटी देव आणि त्यांविषयी अगणित कल्पना हजारों वर्षें चाळण्यास घातल्या असल्यामुळें, त्याचा अखेर परिणाम असा झाला आहे कीं, तेहतीस कोटी देवता आणि त्या संख्येच्या वर्गाइतक्या त्याविषयीं कल्पना; यापैकी फक्त एकीशिवाय बाकीच्या साऱ्या चाळांत सांपडून गेल्या आहेत! ज्या एकीची अशी दुर्दशा झाली नाहीं ती निर्गुणनिराकारादि विशेषणांनीं वर वर्णिलेली परमेश्वराची कल्पना होय. विचारवृद्धीबरोबर मनुष्यांच्या धर्मकल्पना जशा बदलत जातात तशा त्यांच्या अन्यविषयक कल्पनाही फिरत जातात. पदार्थविज्ञान, रसायन, वैद्यक, वनस्पतिशारीरक, प्राणिशारीरक, न्याय वगैरे सर्व शास्त्रांत असेच फेरफार होत गेले आहेत. मनुष्याची विचारशक्ति विशेष विकास पावलेली नसते तोंपर्यंत त्यांस कार्यकारणांचा बिनचूक निश्चय करतां येत नाहीं. कोणत्याही दोन संलग्न किंवा पूर्वोत्तर गोष्टीपैकीं पहिलीस दुसरींच कारण आणि दुसरीस पहिलीचें कार्य, असें मानण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति असते. पालींचे कुचकुचणें, घुबडांचें रडणें, मांजरांचे आडवें येणें, विधवांचे दर्शन होणे, ताऱ्यांचे पडणें, चंद्राभोवतीं खळे होणें, इंद्रधनुष्य दिसणें वगैरे गोष्टींचें अनिष्टत्व, आणि स्वप्नांत साप दिसणें, सवत्स स्त्री, किंवा गाय समोर येणें, भारद्वाजांचे दर्शन होणें, व्यक्तिभेदाप्रमाणें उजवा किंवा डावा डोळा लवणे, कोणाचें आकस्मिक येणें आणि त्याचवेळीं येणाराचें नाव निघत असणे वगैरे गोष्टींचे इष्टत्व- ही मोठ्या विचारानें स्थापित झालीं आहेत, असें कोणासही म्हणता येणार नाहीं तथापि सर्व ठिकाणच्या अज्ञान लोकांत अशा प्रकारचे चांगलेवाईट ग्रह विशेष स्थितींत होत असतात, आणि अनेक वर्षे त्यांचा अंमल चालत असतो. अशा प्रकारचे खोटें कार्य- कारणसंबंध नाहीसे होऊन त्यांच्या जागी खरे संबंध स्थापित होणें हे ज्ञानवृद्धीचे फल होय. न्यूटननें यच्चावत् परमाणूंस लागणारा गुरुत्वाकर्षणाचा धर्म स्थापित केल्याबरोबर सर्व ज्योतिःशास्त्रावर एकदम उजेड पडल्यासारखा झाला. घन, द्रव, आणि वायु या तीन स्थिति प्रत्येक जड पदार्थास भार आणि शीतोष्ण यांच्या साहाय्यानें आणिता येणार आहेत, येवढा सिद्धांत प्रस्थापित झाल्यापासून पदार्थविज्ञानांत केवढी क्रांति झाली आहे? रसशोषक असे एक प्रकारचे अत्यंत सूक्ष्म कोष प्रत्येक वनस्पतीचे व प्राण्याचे आद्य घटक आहेत, असें दिसून आल्यापासून वनस्पतिशारीरकांत व प्राणिशारीरकांत केवढा फेरफार झाला आहे! आपल्या जुन्या वैद्यांनीं सर्व रोगांचीं कारणें त्रिदोषांपासून उत्पन्न होतात, असें सिद्ध करण्याचा केलेला प्रयत्नही अशा प्रकारचाच होता. या सर्व उदाहरणांवरून काय दिसतें कीं, प्रत्येक शास्त्रांत कारणें निश्चित करून त्यांची संख्या होईल तितकी कमी करावी, व त्यांपासून पुढील सर्व कार्यें ठरीव नियमाप्रमाणें घडून येतात, असें स्थापित

करावें- अशा व्यासंगांत मनुष्याची बुद्धि आज हजारों वर्षें गढून गेली आहे; आणि या परिश्रमाचें फळ जसे इतर विषयांत तसे धर्मविषयांतही तिला आलें आहे. ज्याप्रमाणें अलीकडे जड सृष्टीच्या शास्त्रीय विचारांत गुरुत्वाकर्षण ठाम होऊन गेलें आहे, त्याप्रमाणें धर्मविचारांत सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ अशा एका परमेश्वराची कल्पना दृढ होऊन गेली आहे किंवा जात आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, अनादि कालापासून मनुष्यमात्रास अशा प्रकारच्या ईशशक्तीचें यथार्थ ज्ञान आहे, असें जें अनेक श्रद्धाळूंचें फार जुनें व आग्रहाचें म्हणणें आहे, तें साधार नाहीं मनुष्यांनीं निरनिराळ्या स्थितीत अनेक प्रकारच्या देवतांवर भरंवसा ठेविला आहे, आणि सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् परमेश्वराची जी कल्पना त्यांनी केली आहे, ती अखेरची आहे. ही कल्पना त्यांच्या मनांत येण्यापूर्वी ज्या अनेक देवतांस ते भजत होते, त्यांपैकीं काहींची कल्पना त्यांना पराक्रमी पुरुषांपासून करतां आली. या पराक्रमी पुरुषांत पूर्वकालीं राजे लोक विशेष पराक्रमी असत. रानटी लोकांचें धुरीणत्व किंवा नृपतित्व; ज्याच्या अंगीं असाधारण धैर्य, निश्चय, चातुर्य, व कष्टाळुत्व असतें त्यासच प्राप्त होऊं शकते. यामुळें, व एकदा राज्यपद प्राप्त होऊन बरीच सत्ता हातीं आल्यामुळें, अशा स्थितीतला राजा इतरांपेक्षां हरएक गुणांनी फारच मोठा दिसूं लागतो. असें होऊन एकदां एकाक पक्षास प्रतिष्ठा मिरविण्याची, आणि दुसऱ्या पक्षास लीनतेनें वागण्याची, खोड लागली म्हणजे पहिला पक्ष कोणत्या गुणास हक्क सांगेल, व दुसरा कोणत्या प्रकारच्या दास्याचरणास तयार होईल, हें सांगतां येणार नाही. अज्ञान, अविचारी, व भेकड लोकानीं राजास मातापितरांहून अधिक मान द्यावा यांत कांहीच नवल नाहीं. आजमितीस युरोपांतील सुधारलेल्या कांही देशांत असा प्रकार घडत आहे. राजास मातापितरांइतका मान देणें हें अज्ञान लोकांच्या राजनिष्ठेचे अगदीं पहिले कलम होय! यापुढें त्यांची मजल फार जाते. अज्ञान लोक आणि स्वार्थसाधू स्तुतिपाठक, राजासारख्या अद्वितीय व्यक्तीची स्तुति करूं लागले म्हणजे कोठपर्यंत जातील, हें सहसा सांगतां येणार नाहीं. हे लोक राजास देवाचा अंश, देवाचा मुलगा, देवाचा लाडका आप्त, देवाचा पिता, आणि साक्षात् देव करून टाकतात! राजा पाऊस पाडतो, राजा विजा चमकवितो, राजा समुद्र आटवितो, राजा चंद्रसूर्यास ग्रहण लावतो, राजा रोगांच्या साथी आणतो आणि त्या नाहीशा करतो; राजा सांगेल तें केले पाहिजे व मागेल तें दिलें पाहिजे; राजाबरोबर सती जाणें यांतच जीवितसाफल्य व परमार्थसाधन आहे; राजासाठीं आत्महत्या करून घेतली असतां देवयोनि प्राप्त होऊन स्वर्गलोकीं देवसमुदायांत देवांगनांबरोबर निरंतर विवाह करतां येतो, व अमृतसेवनानें अमरत्व संपादितां

येतें- अशा प्रकारच्या विलक्षण कल्पना अल्प काळांत रूढ होऊन जातात! ते जिवंतपणीं राजास नवस करूं लागतात; त्याच्या दर्शनास येऊं लागतात; रोग दूर होण्यासाठीं त्याच्या पादांघ्रिस्पर्शाविषयीं आतुर होतात; त्याला कौल लावतात; त्याला देवऋषी समजतात; आणि त्यांचें स्नानोदक तीर्थ समजून शुद्ध होण्यासाठी तें प्राशन करण्याविषयी उत्कंठ होतात! जिवंत राजाविषयीं अशा कल्पना झाल्या असल्या, आणि त्यांतल्या त्यांत तो बराच पराक्रमी असला म्हणजे मग तो मेल्यावर त्याला किती भ्यावें, त्याविषयीं आपली दृढ निष्ठा प्रदर्शित करण्याबद्दल काय करावे, आणि त्याला किती भजावें असें मुग्ध लोकांस होऊन जाते! त्यांच्या समजुतीप्रमाणें जो जिवंतपणींच देव असतो, तो मरणोत्तर महादेव होतो! मग काय विचारतां? जिवंत राजापेक्षा मेलेल्या राजाची विशेष आराधना करण्याचा प्रघात पडूं लागतो! वरिष्ठ योनीप्रत राजांची देवळें बांधलींच पाहिजेत; प्रत्येक दिवशीं त्यांची पूजा करून त्यांस नैवेद्य अर्पण केलेच पाहिजेत; कोणतेही महत्कृत्य करणें झालें की, त्यांचे स्मरण केलेच पाहिजे; विवाहादि मंगलकार्ये निर्विघ्नपणें तडीस जाण्यासाठीं त्यांची प्रार्थना करून त्यांस खुष राखण्यासाठी आपल्या समजुतीप्रमाणें मनुष्याचें, जनावराचें, शिजविलेल्या अन्नाचें, किंवा कोरड्या धान्याचें आणि नारळाचे तरी बळी दिलेच पाहिजेत; सारांश, कोणतेही महत्कृत्य करावयाचें झाले, तरी अशा रीतीनें अस्तित्वांत आलेल्या देवांचें साहाय्य मागितल्याशिवाय व त्याची प्रार्थना केल्याशिवाय तें करू लागण्याचा संभव नाहींसा होतो! पुढें जों जों श्रद्धा अधिकाधिक होत जातें; तों तो बारिक सारिक गोष्टीतही देवाचें स्मरण व चिंतन करण्याचा प्रघात पडूं लागतो. निजताना, उठतांना, बसतांना, जेवतांना, ढेकर आली असतां; शिंक आली असतां, जांभई आली असतां, पागोटे पडलें तर, कांस सुटली तर, ठेंच लागली तर, मुलें उपजल्यावर, स्त्रिया उपवर झाल्यावर, लहान किंवा थोर पुरुष अथवा स्त्री मेल्यावर, शेताची कापणी करणे झाल्यास, मुलास पाटीवर बसविणे झाल्यास, घरातून बाहेर पडावयाचें असल्यास- सारांश कांहींहीं झालें असता किंवा करावयाचे असतां खऱ्या भाविकाला देवास नमस्कार करून त्याची कृपा संपादिल्याखेरीज पाऊल टाकण्याची सोय नाहींशी होते! अशा प्रकारच्या देवांच्या प्रकृतीत आणि मनुष्यांच्या प्रकृतींत म्हणण्यासारखें अंतर नसते! मनुष्यास सुखदु:ख होत असतें, कामक्रोधादि वासनांचा मनुष्याप्रमाणें त्यांचे ठाईही वास असतो. मनुष्याप्रमाणें तेही युद्धें करतात, स्त्रीसक्त असतात, विश्वासघात करतात, खून करतात, ऐषआराम भोगतात, सोमरस पितात, लुगडीं नेसतात, नथी घालतात; दुखणेकरी होतात, वैद्याचे घरी जातात आणि काढे घेतात; त्यांना जखमा लागतात; दुखणेकरी होतात, आणि अमर असून कधीं कधीं ते मरतात,

किंवा निजधामास जातात! त्यांपैकीं कांहीं उदार, कांहीं परोपकारी, कांहीं दांडगे, कांहीं क्रूर, कांही खोडकर, कांहीं 'शिनळ', काहीं एकस्त्रीव्रत, कांहीं बहुपत्नीक, कांही दासीपुत्र आणि कांहीं कोष्टी, सोनार, सुतार, शिल्पी, चितारी, गवयी, झाडू, मोतद्दार, गाडीवान व बागवान असतात! सारांश ज्याप्रमाणें या मर्त्य लोकांत त्याप्रमाणें देवलोकांत थाट आहे! कांही कमी नाहीं! आणि कां कमी असेल? या आमच्या पृथ्वीवरचेच प्रबल पुरुष, राजे, वैद्य, सुवर्णकार, चित्रकार, शिल्पज्ञ, विद्वान, योद्धे, भविष्यज्ञ, हेच मरणोत्तर देव होऊन जात असल्यामुळे त्यांनीं आपला ऐहिक स्वभाव किंवा प्रकृति सर्वथैव टाकावी हें कांहीं संभवत नाहीं; किंवा तसें करणेंही शक्य असलें, तरी ज्या आम्हीं अत्रस्थ मर्त्यांनी त्यांच्या आयुष्यक्रमाची कल्पना करावयाची; त्या आम्ही आमच्या इंद्रियांचे व मनाचे जे धर्म आहेत त्यांच्या बाहेर कसें जावें? आमच्या देवांच्या आणि महादेवांच्या कल्पना, आमचे आचार, आमचे विकार, आणि आमचे विचार यांवरच अवलंबून असल्या पाहिजेत. कल्पनातुरगीवर आरोहण करून तिला कितीही भरधांव सोडिली तरी अंतर्बाह्येंद्रियविषयांस सोडून ती कोठें जाणार? ज्ञानेंद्रियांनीं व कर्मेंद्रियांनीं ज्या विषयांचें ज्ञान होते; त्या विषयांपैकी लहानांस थोर करणें, तुटलेल्यास जोडणें, दूरांस जवळ करणें, कुरूपांस सुरूप व सुरूपांस करूप करणें, सचेतनांचा व अचेतनांचा अन्योन्यांशीं किंवा ज्यांच्या त्यांशी मिलाफ करून नवीन तिरस्करणीय किंवा रमणीय सृष्टि निर्माण करणें हें काय तें कल्पनेचें काम होय. कल्पना झाली तरी फक्त इंद्रियांच्याच द्वारें ज्या विषयांचे ज्ञान होत असतें, त्यांच्या बाहेर जाऊं शकत नाहीं. तिनें पाहिजे तेवढी घडामोड करावी; पण नवीन विषय उत्पन्न करणें हें तिचें काम नव्हे. साराश, धार्मिक लोक पाहिजे तें म्हणोत, आमच्या देवता येथील प्रबल पुरुषांच्या, राजांच्या, वैद्यांच्या, कारागिरांच्या, किंवा योद्ध्यांच्या कल्पनेनें काढलेल्या मुळाहून कदाचित् कांहींशा श्रेष्ठ अशा प्रतिमा आहेत, व अशा प्रतिमा काढण्याची संवय तिला लागण्यास मनुष्यांतील स्वकुलांतील पूर्वज पूजेचा प्रघात कारण झाला आहे, असें कबूल करणें भाग आहे. आणि म्हणून सर्व धर्मकल्पनांच्या आणि देवतांच्या मुळास स्थूलमानानें पूर्वजपूजा आहे, असें म्हटल्याशिवाय कोणाही विचारी पुरुषास राहवणार नाहीं.

*

अथ आचारप्रकरणम्

पूर्ण एकांताशिवाय स्वेच्छाचार नाहीं. दोन मनुष्य एकत्र आले कीं एकानें दुसऱ्याशीं कसें वागावें, असा प्रश्न उत्पन्न होतो; आणि त्या दोहोंत ज्या प्रकारचा संबंध असेल तद्नुसार त्यांचें एकमेकांशीं वर्तन होतें. पण कसेही झालें तरी मनुष्य एकटा असतां तो ज्याप्रमाणें वागूं शकेल; त्याप्रमाणें त्याला दुसऱ्यासमक्ष कधींही वागतां येत नाहीं. दुसऱ्याच्या सांनिध्यामुळें स्ववर्तनांत जो भेद करावा लागतो, त्यास येथें सामान्यपणें आचार किंवा आचारपद्धती म्हटलें तरी चालेल समाजात अनेक प्रकारच्या व्यक्तीशी व्यवहार करावयाचा असल्यामुळें, या आचारपद्धतीस विलक्षण प्रकारचें बहुविधत्व आलें आहे. राजाप्रजा; पतिपत्नी; बहिणभाऊ; स्वामिसेवक; गुरुशिष्य; अग्रणीअनुयायी; ग्राहकविक्रेता; श्रेष्ठकनिष्ठ- असे समाजघटकांत अनेक प्रकारचे संबंध असतात; आणि या संबंधानुरोधानें स्थापित झालेल्या आचारनियमांप्रमाणें आजपर्यंत एकाचें दुसऱ्याशीं वर्तन होत आलें आहे. हे आचारनियम केवळ चिरस्थाई असतात असें नाही. देशकालमानाप्रमाणे त्यांत फेरफार होत जातात. तथापि ते कशातरी प्रकारचे असल्याखेरीज कोणताही समाज चालावयाचा नाहीं. समाज म्हणजे एकाहून अधिक व्यक्तींचा समुदाय. असा समुदाय चालू राहण्यास्तव त्याच्या घटकांचें अन्योन्यांशीं जें वर्तन व्हावयाचें; त्याचे कसले तरी नियम असलेच पाहिजेत. अशा नियमांशिवाय समाजाची कल्पनाच अशक्य आहे. हें म्हणणे केवळ मनुष्यसमुदायासच लागूं आहे असें नाहीं. मनुष्याहून बुद्धीनें, शरीरानें, सामर्थ्यानें बऱ्याच अशीं कमी अशा समाज करून राहणाऱ्या चतुष्पादांत, पक्ष्यांत, व सूक्ष्म कीटकांत सुद्धां हे आचारनियम दिसून येतात. श्रेष्ठाला वचकणे, बरोबरीच्यांशी सामना करणें, कनिष्ठावर चालून जाणें, आवडत्याला कुरवाळणें, संकटावस्थेत शरण जाणें, व कोणी उपकार केला असतां कृतज्ञता प्रदर्शित करणें- हे आचाराचे प्रकार खालच्या प्रतींच्या प्राण्यांतसुद्धा कमी अधिक प्रमाणानें सांपडतात, हे सर्वांस ठाऊक असेलच. तेव्हा ते मनुष्यसमाजांत सांपडतात, यांत काहीं नवल नाही. ज्याप्रमाणें कसल्यातरी दोऱ्याशिवाय निरनिराळे मणि एकत्र होऊन माळ व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें कसल्यातरी समाजबंधनाशिवाय समाज चालावयाचा नाहीं. कशा

तरी प्रकारचीं समाजाचारबंधनें स्थापित झाल्यानंतर, त्यांपासून समाजास विशेष वळण लागणारीं धर्मबंधनें व राज्यबंधनें उत्पन्न होतात, व या तिहींनी मिळून समाजास पुष्कळच बळकटी येते; पण धर्मबंधनाशिवाय किंवा राज्यबंधनांशिवाय वेडावाकडा समाज अस्तित्वांत यावयाचा नाहीं असें नाहीं. आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया यांच्या कांहीं भागांत असे समाज पाहण्यांत आले आहेत कीं, त्यांत सामान्य आचारबंधनांशिवाय समाजघटकांस एकत्र राखण्यास दुसऱ्या कोणत्याही प्रकारची बंधनें नाहीत. जुन्या राष्ट्रांत राहणाऱ्या आम्हा जुन्या लोकांची अशी समजूत आहे कीं, सामाजिक, धार्मिक, व राजकीय या तीन प्रकारच्या बंधनांशिवाय समाजघटना होऊं शकणारच नाहीं. पण ही आमची चूक आहे. ज्यांना कोणत्याही प्रकारचे धर्माचार आणि राज्याचार बिलकुल ठाऊक नाहींत, असें या क्षणी पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ रानटी लोक आहेत. पण हें मात्र खरे आहे कीं, ज्या समाजांत धर्मबंधने व राज्यबंधनें दिसूं लागली आहेत, त्या समाजांस आचारबंधनें दिसत नाहींत, असें मात्र कधींहि होत नाहीं. 'यत्र यत्र धूम: तत्र तत्र वन्हि:' या न्यायाप्रमाणें जेथें धर्म व राज्य दृष्टीस पडतात, त्या ठिकाणी सामाजिक आचारपद्धति दृष्टीस पडलीच पाहिजे. परंतु ज्याप्रमाणें अग्नि असेल तेथें धूर असलाच पाहिजे असें म्हणतां येणार नाहीं, त्याप्रमाणें सामाजिक आचारपद्धति स्थापित झाली असेल तेथे धर्म आणि राज्य या संस्था अस्तित्वात आल्या असल्याच पाहिजेत असें म्हणतां येणार नाहीं. मुलाशिवाय आईबापें असतील, पण जनकजननीशिवाय संतानोत्पत्तीचा संभव नाहीं. धर्माचार आणि राज्याचार यांची सामान्य आचारांपासून उत्पत्ति होते, आणि ज्याप्रमाणें सृष्ट्यनुक्रमानुरोधानें प्राण्यांच्या जाती होत असतां, ज्यांच्या शरीरात पृष्ठवंशास्थि (पाठीचा कणा) अस्तित्वांत आणण्यासारखे पदार्थ असतात; त्यांस कसलीही रूपें येत गेलीं तरी, त्यांत पाठीचा कणा हा दृष्टीस पडावयाचाच, असें मासे, साप, पाखरें, गायी-म्हशी वगैरे प्राण्यांच्या शरीररचनेवरून स्पष्ट दिसतें, त्याप्रमाणें समाजास कोणत्याही प्रकारचीं स्थित्यंतरे प्राप्त झालीं तरी त्यांत सामाजिक आद्याचारांची छाया पडल्याशिवाय रहात नाहीं. या सामाजिक आचारांहून आद्यतर किंवा पुराणतर असा दुसरा कोणताही आचार नाहीं; व यांपासून उत्पन्न झालेले आचार कितीहि मंदावत किंवा क्षीण होत गेले तरी सामाजिक आचार नाहीसे होत जाण्याचा संभव नाही. उलट यांपासून निघालेल्या आचारांस क्षीणता येत जाईल तसतशी त्यांची वृद्धिच होत जाण्याचा संभव आहे; आणि आजपर्यंत असेच होत आलें आहे. समाजास जसजशी उन्नतावस्था येत जाते, तसतशी त्यांतील धर्माचारांस आणि राज्याचारांस शिथिलता येत जाते, हें अनेक देशांच्या व समाजांच्या इतिहासांवरून सिद्ध करून देतां

येण्यासारखें आहे. पण कोणत्याही देशाच्या इतिहासावरून असें दाखवितां येणार नाहीं कीं, धर्माचार आणि राज्याचार शिथिल होत गेले म्हणून त्यांच्याबरोबर सामाजिक आचारांचीहि तीच वाट झाली. फार झालें तर येंवढेच दाखवितां येईल की, ज्ञानवृद्धीनें व ज्ञानप्रसारानें कोणत्याही समाजास उन्नतावस्था प्राप्त होऊन त्यांतील वेडेपणाच्या धर्माचारांचा व राज्याचारांचा लोप होत चालला, तर त्याबरोबर सामाजिक आचारांस सुस्वरूप येऊं लागतें व ते विशेष सभ्य आणि सुखावह असे होतात.

मनुष्यांची वन्यावस्था सुटत जाऊन त्यांची सुधारणा होऊ लागणें म्हणजेच त्यांमध्ये धर्म आणि राज्य या संस्थांची स्थापना होणें होय. या संस्थांची प्रथमावस्था केवळ आचारमय असते; म्हणजे मनुष्यांच्या आद्य धर्मपद्धतींत व राज्यपद्धतींत विवक्षित आचारांशिवाय दुसरे कांहीं नसतें. समाजांत जो पुरुष चातुर्यानें, धैर्यानें, व शरीरसामर्थ्यानें इतरांहून श्रेष्ठ असतो; तो प्रथम त्यांचा राजा होतो, आणि पुढें देव होतो, हें मागें एकदा सांगितेलच आहे. अशा रीतीनें राजत्वाप्रत व देवत्वाप्रत पावलेल्या व्यक्तीच्या हयातींत किंवा त्याच्या मरणोत्तर; त्याशीं वागण्याच्या ज्या पद्धति त्यास राज्याचार व धर्माचार म्हणतात. अनेक युगें जो राजा असतो तोच देव असतो; पण कालांतरानें राजेपणापासून देवपण वेगळें होतें, आणि राजपूजा व देवपूजा निराळ्या होतात. परंतु प्रथम राजत्व आणि देवत्व एकाच व्यक्तींत असल्यामुळें, तीं निराळीं झालीं तरी राजास आणि देवास भजण्याच्या पद्धति किंवा आचार एकसारखेच असतात. ज्याप्रमाणें राजाला राजवाडा त्याप्रमाणें देवाला देऊळ; राजाला वंदन त्याप्रमाणें देवाला वंदन; राजाला करभार द्यावयाचा, तसा देवाला करभार द्यावयाचा; शेतांतील उत्पन्नाचा पहिला भाग ज्याप्रमाणें राजपदीं अर्पण करावयाचा, त्याप्रमाणें तो देवपदीं अर्पण करावयाचा; राजाला चोपदार तसे देवाला चोपदार; राजाला पालखी तशी देवाला पालखी; राजाला मुकुट, दागिने, चौऱ्या, तसें देवालाही; राजाभोंवती मंत्रिगण तसा देवाभोंवतीं पूजकगण; ज्याप्रमाणें राजास स्तुतिपाठक असावयाचे, त्याप्रमाणे देवासही असावयाचे; ज्याप्रमाणें राजाच्या संतोषासाठीं बळी पडण्याची हौस त्याप्रमाणें देवाच्या संतोषासाठींही प्राणत्याग करण्याची हौस;- सारांश, पूर्वावस्थेंतील मनुष्यें राजा आणि देव यांच्यांत फारसा भेद समजत नाहींत, आणि म्हणून त्यासंबंधानें त्यांचें जें वर्तन असतें, त्यांतही फारसा भेद असत नाहीं. राजांच्या स्वाऱ्यांचा थाट आणि देवांचे छबिने यांत म्हणण्यासारखा भेद असत नाहीं.वाद्यें वाजताहेत, भाट गुण गाताहेत, लोक नमस्कार घालताहेत, बायका खिडक्यांतून लाह्या व रेवड्या फेंकताहेत- वगैरे प्रकार ज्याप्रमाणें राजाची स्वारी निघाली असतां होतात, त्याप्रमाणें

कोणत्याही देवाची पालखी निघाली असतां होतात; आणि हा प्रकार ज्याप्रमाणें या देशांत दृष्टीस पडतो, त्याप्रमाणें याच्याच तोडीचे जे जपान, चीन, तुर्कस्थान वगैरे देश आहेत त्यांतही दृष्टीस पडतो, आणि पूर्वी ग्रीस, इताली, स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही दृष्टीस पडत असे. अर्थात् देशपरत्वें राजास आणि देवास पूज्यता दाखविण्याची ही पद्धति किंचित् निराळी असते व आहे, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. पण सर्वत्र तिचें तत्त्व एकच आहे. ज्याप्रमाणें देवाच्या देवळांत पाहिजे त्याला प्रवेश करण्याची परवानगी नाहीं, त्याप्रमाणें राजवाड्यांतही पाहिजे त्याचा प्रवेश होण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणे देव गुरवाच्या ताब्यांत, त्याप्रमाणें राजा मंत्र्याच्या ताब्यांत. अद्यापि कित्येक ठिकाणीं कांहीं राजे आहेत; ते असे कीं, त्यांचें दर्शन लोकांस सहसा व्हावयाचें नाहीं. आमच्या इकडील पडदानशीन स्त्रियांप्रमाणें आफ्रिकेंतील कांहीं राजे पडद्याच्या आड बसून, किंवा जुन्या शिवालयाच्या गाभाऱ्यासारख्या एखाद्या अंधाऱ्या कोठडींत आपणास कोंडून घेऊन, तेथून भेटण्यास आलेल्या लोकांशीं मंदस्वरानें स्वत: किंवा दुभाषाच्या द्वारें थोडेंसे बोलतात! देवळांत गेलें असता देवास जी प्रार्थना करावयाची असेल, ती साष्टांग प्रणिपात केल्याशिवाय जशी करण्याची सोय नाहीं, त्याप्रमाणें पूर्वपद्धतीच्या राजास भेटण्यास गेलें असतां जमिनीपर्यंत लवून दहापांच मुजरे ठोकल्याशिवाय आणि गुडघे टेंकून तोंडाला पदर लावल्याशिवाय 'ब्र' काढण्याची सोय नाहीं! जीं आड प्रकरणें असतात त्यांना मर्त्यांस स्वत: उत्तर देण्यांत कमीपणा वाटत असल्यामुळें, भेटणाऱ्यानें दुभाषाकडे तोंड करून बोलावें, त्यानें 'जी जी' करत 'सरकाराकडे' तोंड करून त्याचा प्रतिध्वनि उठवावा, आणि मग सरकारांनी तोंडांतल्या तोंडात कांहींतरी गुळमुळावें, आणि मग दुभाषेबोवांनीं त्यांतील धरवतील तेवढे शब्द व वाक्यें धरून तीं भेटीस आलेल्या गृहस्थांपुढे वठवावी! ही राजेपणाची ऐट आणि हा राजकीय आचारांचा थाट! याचेंच अनुकरण राजाच्या सरदारांनीं आपल्या खालच्या लोकांशीं, आणि त्यांनीं त्यांहून खालच्या लोकांशीं करावयाचें! तिकडे धर्मसंबंधानेही तसाच प्रकार. जो कोणी धर्मगुरु किंवा शंकराचार्य किंवा परमहंस असेल तो एखाद्या देवतेचा काय तो दास; इतरांस तो साक्षात् देव. आणि अशी अधिकारपरंपरा पंचांगसांग्या गांवजोशापर्यंत किंवा श्राद्धभटापर्यंत असावयाची!

अशा प्रकारें राज्य आणि धर्म या संस्थांच्या पूर्वावस्थेंत आचारांस काय तें प्राधान्य असतें. जो त्याप्रमाणें वागेल तो राजनिष्ठ आणि धर्मनिष्ठ, आणि त्यावरच राजा आणि देव प्रसन्न! ज्याचें तदनुसार वर्तन नसेल त्यास जबर दंड! ज्यांनीं एकदोन पिढ्यांच्या मागील राजदरबारें पाहिली असतील, त्यांना वरील लेखांत

किती तथ्य आहे, हें दिसून येणार आहे. धर्मसंबंधी या प्रकारची यातायात; जे आमच्यासारखे पाश्चिमात्य शिक्षणानें बरेच निगरगट्ट झाले आहेत, त्यांना फारशी पीडा देत नाहीं; पण जे पहिल्या पद्धतीचे आहेत, त्यांचा श्रावणीसारख्या कवायतीपासून होणारा जाच अद्याप बिलकुल कमी झालेला नाहीं, व त्यांस तो 'जाच' असें वाटतही नाही! येथल्याप्रमाणेंच पूर्वी युरोपियन लोकांतही धर्माचारांची अशीच गर्दी व सक्ती असे; आणि आतांही आफ्रिकेंतील व अमेरिकेंतील कांहीं अर्धवट सुधारलेल्या लोकांत ती दृष्टीस पडते. हवाई बेटांत **टाबू** नांवाचा उत्सव कांहीं दिवस होत असतो. त्या प्रसंगीं पुढें लिहिल्याप्रमाणें व्यवस्था होत असते.

''हा उत्सव सुरू असतां या बेटांत किंवा त्याच्या आसमंतांतील प्रदेशांत कोठेही चूल पेटविण्याची किंवा दिवा लावण्याची सक्त मनाई असते. तसेंच कोणीही पाण्यांत होडी घालतां कामा नये, किंवा स्नान करतां कामा नये, असा प्रतिबंध असतो. तसेंच ज्या मनुष्यास देवळांत जावयाचें असेल त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही मनुष्यास आपल्या घराच्या दाराबाहेर पडण्याची मनाई असते. तसेंच कोठेंही कुत्रे भोंकतां कामा नये, की डुक्कर डुरकतां कामा नये, की कोंबडा आरवता कामा नये, असा प्रतिबंध असतो. याप्रसंगीं या बेटांतील लोक कुत्र्याचीं आणि डुकरांची तोंडें बांधतात, आणि कोंबडी वगैरे घरगुती पाखरें भोंपळ्यांच्या वाळलेल्या छकलांखालीं कोंडून घालतात, किंवा फडक्यांनी त्यांचें डोळे बांधतात.''

हे एक रानटी लोकांच्या धर्माचाराचें उदाहरण झालें. सुधारलेल्या युरोपखंडांतही थोड्या वर्षांपूर्वीं अशीच स्थिति होती. **सेंट कोलंबेनस** याची आज्ञा अशी आहे कीं, ''जो कोणी मंतरलेला पाव गमावील त्याला एक वर्षाचें प्रायश्चित्त; जो त्यास डोंगळा किंवा मुंगी लागू देईल त्याला सहा महिन्यांचें; जो त्यास लाल होऊं देईल त्याला वीस दिवसांचें; जो त्याला अवमानानें पाण्यांत झुगारून देईल त्याला चाळीस दिवसांचें; कोठ्याच्या हलकेपणामुळें ज्याकडून तो ओकून पडेल त्याला वीस दिवसांचें; पण जर आजारीपणामुळें तो वर येईल तर फक्त दहा दिवसांचें. तसेंच जो कोणी आशीर्वचन होत असतां 'तथास्तु' म्हणण्यास चुकेल, किंवा जो जेवताना बोलेल, किंवा जो चमच्यावर अथवा धाकट्या भावानें लावलेल्या कंदिलावर (ख्रिस्ताचा) **क्रूस** काढण्यास विसरेल त्याला सहा फटके दिले पाहिजेत.''

हा पाश्चिमात्य धर्माचार आणि ही त्याच्या उल्लंघनास सांगितलेली शिक्षा-यांचा विचार करतां, आमच्या येथें जीं शेंकडों व्रतें अस्तित्वांत आलीं आहेत, व ज्यांच्या भंगाबद्दल नानाप्रकारचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत, तीं पाहून त्यांविषयीं

आपणास वाटत असलेला तिरस्कार किंचित् कमी होईल, यांत कांहीं संशय नाहीं. निरनिराळ्या देशांतील व निरनिराळ्या स्थितींतील लोकांच्या सामाजिक, धार्मिक, व राजकीय आचारांविषयी माहिती मिळवून त्यांचा शांतपणे विचार केला असतां त्याच्यायोगानें आपल्या मनावर दोन प्रकारचे परिणाम होतात. एक, आपली अशी खात्री होऊन जातें कीं, सामान्यपणें कोणतेही लोक घेतले तरी त्यांना विवक्षित स्थिति प्राप्त झाली असतां त्यांच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक कल्पना व आचार साधारणपणें सारख्या तऱ्हेचे असतात; दुसरें, जसजशीं त्यांची सुधारणा होत जाते, तसतसा त्या कल्पनांत व आचारांत पालट होत जाऊन त्यांस विशुद्धत्व येत जातें. हें अवस्थांतर होण्यास ज्ञानवृद्धि व ज्ञानप्रसार कारण होतात. ज्यांना दुर्दैवानें सुशिक्षण मिळालें नसल्यामुळें अशा गोष्टींविषयीं शांतपणें विचार करण्याची सवय लागलेली नाहीं, व कोणत्या स्थितीपुढें कोणती स्थिती येते हें समजलेलें नाहीं, अशांनी असलेली स्थिती अत्युत्तम मानून वरिष्ठ स्थितीचे ज्ञान करून देणाऱ्याचा उपहास करावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण ज्याच्या मनावर सुविद्येचा चांगला परिणाम झाला असेल तो अशा अप्रबुद्धांनीं केलेल्या दुःशब्दांच्या पुष्पवृष्टीबद्दल त्यांचा राग न करता उलट त्याविषयीं अनुकंपा किंवा कींवच प्रदर्शित करील. "सोंवळ्या ओंवळ्याची मीमांसा" किंवा "देवतोत्पत्ति" अशा विषयावरील आमच्या लेखांसारखे लेख वाचून पूर्वपद्धतीच्या सामान्य वाचकांचें पित्त खवळून जात असेल; याविषयीं आम्हांस तिलप्राय शंका नाहीं. पण या गोष्टीस आमचा इलाज नाहीं. पण हितावह परंतु कडू न लागणारें असें भाषण नेहमी करणें केवळ दुरापास्त आहे. ज्याला आसमंतांतील स्थिति वाईट वाटत असेल, व ती बरी व्हावी अशी इच्छा असेल त्याचें, ती वाईट म्हटल्याखेरीज व तींतील चुका दाखविल्याखेरीज, कसें चालेल? यावर कित्येक असा आक्षेप घेतात कीं, अशिक्षित लोकांपुढें अशा प्रकारचा बुद्धिवाद मांडल्यानें त्यांच्या बुद्धीस भ्रंश होऊन "इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः" अशी त्यांची स्थिति होते, आणि तीमुळें समाजांत अनवस्था उत्पन्न होऊन त्याचें फार नुकसान होतें. आमच्या मतें या आक्षेपांत बराच अर्थ आहे. पण तेवढ्यावरून तो निरुत्तर आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. एक तर हें ध्यानात ठेविलें पाहिजे कीं, एक स्थिति जाऊन दुसरी स्थिति येण्यापूर्वी जो काळ जातो, त्यांत विशेष अव्यवस्था दृष्टीस पडणें हे साहजिक आहे. तसेंच हेंही लक्षांत वागविलें पाहिजे कीं, बुद्धीस बरे दिसण्यासारखे विचार पुढें आल्याबरोबर मनुष्य एका क्षणांत आपलें फार दिवस चालत आलेलें वर्तन टाकून देऊन त्या विचारांप्रमाणें नवीन वर्तन एकदम करूं लागला, असें बहुशः घडत नाहीं. अशा गोष्टींत लिहिणारांनीं लिहावें आणि

वाचणारांनी वाचावें, असें कांहीं वेळ झाल्यावर प्रथम लिहिणारांच्या वर्तनांत थोडाबहुत फेरफार होऊं लागतो, व त्यांचें उदाहरण वारंवार डोळ्यांपुढें येऊं लागलें म्हणजे वाचणारांच्या मनांतही, खात्री झाली असल्यास, लिहिणारांचे अनुकरण करावें असें येऊं लागतें. सारांश, समाजाची सुधारणा मुंगीच्या पायानें होत असते. म्हणून या पत्रासारख्या पत्रांत येणारे असामान्य विचार नवीन मंडळीच्या हातांत पडल्याबरोबर; ती आपले फार दिवसांपासून चालत आलेले धर्माचार, राज्याचार, किंवा सामाजिक आचार एकदम टाकील, अशी भीति क्षणभरसुद्धां बाळगण्याची गरज नाहीं. असें होण्याचा संभव असेल तर आम्हांस त्यापासून फार आनंद होणार आहे. पण तसें मुळींच नाहीं. तथापि कर्तव्य तें केलेंच पाहिजे असें समजून हा व्यवसाय आरंभिला आहे, आणि म्हणून, कोणास कांहीं वाटलें, तरी अशा विषयाविषयीं जें सत्य व योग्य दिसेल तें लिहिणें भाग आहे.

*

विजयलांछनें

मनुष्याच्या उपजत मनोवृत्तींपैकीं सामर्थ्यप्रदर्शनाची हौस ही एक असावी असें वाटतें. बहुश: जगाच्या आरंभापासून पुरुष स्त्रियांपुढें, विद्वान अविद्वानांपुढें, धनवान, निर्धनांपुढें; स्वतंत्र परतंत्रांपुढें, प्रबुद्ध अप्रबुद्धांपुढे, जेते जितांपुढें, व शास्ते शासितांपुढें आपल्या सामर्थ्याची प्रतिष्ठा मिरवून तीपासून आनंद करून घेत आहेत. प्राणिमात्रास, व विशेषत: मनुष्यास दुसऱ्यावर सत्ता, अधिकार किंवा अंमल गाजविण्यांत इतका आनंद कां होतो, याची मीमांसा येथें करीत बसण्याचें प्रयोजन नाहीं. सर्व स्थितींत व सर्व वर्गांत ही मनोवृत्ति दृष्टीस पडते, येवढ्यावरून ती जन्मागत आहे, असें येथें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. या एका वृत्तीमुळें मनुष्यसमाजांत अनेक आचार अस्तित्वांत आले आहेत. आज ज्या आचारांचा विशेष ऊहापोह करावयाचा आहे, ते याच वृत्तीपासून उत्पन्न झाले आहेत.

ज्याच्या अंगांत विशेष रग असते त्याला आपल्या शत्रूचा पराभव केल्यापासून तात्कालिक समाधान तर होतेंच, पण त्याच विजयाची कांहीं खूण जवळ बाळगून तिजकडे पुन:पुन: पहाण्यापासून, किंवा ती आपल्या आप्तास किंवा मित्रास दाखविण्यापासूनही पुष्कळ समाधान होतें. इंग्लंडसारख्या बेटांतील धीवरांनीं फार कष्टानें एखादा प्रचंड किंवा असामान्य मासा पकडला असतां, तो ते विकून न टाकतां बाळगून ठेवतात, आणि अभिमानपूर्वक तो इतरांस दाखवितात. परराज्यामुळें, रानें फस्त झाल्यामुळें, हत्याराच्या प्रतिबधक कायद्यामुळें, आणि कदाचित् भूतदयेच्या प्रसारामुळें लोकांचा मृगयेचा नाद अगदीं सुटल्यासारखा झाला आहे, व-

मिथ्यैव व्यसनं वदंति मृगयां ईदृग् विनोद: कुत:।

अशा प्रकारें पारधीची तारीफ करणारे राजे, सरदार, किंवा सामान्य लोक येथें अगदींच दिसेनासे झाले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडसारख्या देशांत या विनोदाचा नाद अद्यापि अनेकांच्या ठाई दृष्टीस पडतो. मृगया करून जी लूट कमाविली असेल, तिच्यापैकीं टिकण्यासारखा भाग आपल्या बसण्याउठण्याचा खोलींत प्रमुख स्थलीं मांडून ठेवण्याची चाल साहेब लोकांत आहे, हे ज्यांनीं शिकारी साहेबाच्या बंगल्यांत एक दोन वेळां प्रवेश केला असेल

त्यांच्या नजरेस आलेंच असेल. खुर्च्यांवर व बैठकीवर हरणांचीं मोठमोठीं कांतडी टांगलेलीं असतात, व कोठें कोठें शृंगविस्तारामुळें भव्य दिसणारी काळविटांचीं शिरें पेंढा भरून भिंतीवर किंवा दारावर अडकवलेली असतात. त्यांतल्या त्यांत ज्याला वाघाच्या किंवा अस्वलाच्या शिकारीचा नाद असेल त्याला वाघांची आणि अस्वलांची कांतडी ठिकठिकाणीं पसरून ठेवण्यांत मोठा पुरुषार्थ वाटतो.

अशा प्रकारें मृगयेंत संपादिलेल्या विजयाची लांछनें वापरण्याचा नाद सुधारलेल्या लोकांसच असतो असें नाहीं. रानटी लोकांस तर हा नाद सुधारलेल्या लोकांहूनही अधिक असतो. त्या लोकांत ज्यापाशीं अस्थिसंग्रह किंवा चर्मसंग्रह असतो तो विशेष शूर गणला जातो, आणि इतरांस त्याच्या पराक्रमाचा धाक वाटतो. यामुळें अशा लोकांच्या झोंपड्यांत जिकडे तिकडें हाडांची व कातड्यांची एकच गर्दी झालेली असते. आपण ज्याप्रमाणें कडीपाटास हांड्याझुंबरें लटकवून देतों, त्याप्रमाणें हे लोक आडव्या तुळवटास किंवा वाशांस मोठमोठ्या वाघांचे आणि अस्वलांचे सांगाडे व कांतडीं अडकवून ठेवितात! कित्येक रानटी लोकांच्या सरदारांची संपत्ति व भूषणें केवळ असल्या जनावरांच्या शिरांची व हाडांची झालेली असते. ही संपत्ति व भूषणें बापाकडून मुलास येतात, व त्यांचा त्याला मोठा अभिमान वाटतो. शोशून लोकांतील योद्धाच्या अंगावर अस्वलाचे पंजे आणि पाय दृष्टीस पडतात! फक्त राजाच्याच आढ्यावर सिंहाचें अथवा चित्त्यांचें शेंपूट लोंबत असावें, असा कोसास लोकांत प्रतिबंध आहे!

याप्रमाणें भक्ष्य किंवा हिंस्र पशूंवर आपला किती अंमल चालतो हें दाखविण्यासाठीं सुधारलेले आणि रानटी लोक काय करतात, हें वर सांगितलें. पण हें सर्व प्रस्तावनारूप आहे. मनुष्यांच्या अन्योन्य व्यवहारांत कशा प्रकारचे आचार पडत जातात, हें या निबंधांत दाखविण्याचा मुख्य उद्देश आहे. तो उद्देश चांगल्या रीतीनें सिद्धीस जाण्यासाठीं, म्हणजे पुढें जें सांगावयाचें आहे तें वाचकांच्या मनांत बरोबर रीतीनें उतरून देण्यासाठीं अशी प्रस्तावना केली आहे. रानटी, अर्धवट सुधारलेल्या व पूर्ण सुधारलेल्या लोकांचें हिंस्र पशूंशीं ज्या प्रकारचें वर्तन होत असतें, त्याच प्रकारचें वर्तन आपापसांतही होत असतें. रानटी लोकांतील एखादा वीर युद्धाला गेला आणि त्यानें परत येतांना आपल्याबरोबर कांही विजयचिन्ह आणिलें नाहीं, तर त्यास विजयशाली कोण म्हणणार व त्याला कोण वचकणार? तेव्हां अशा लोकांतील जे योद्धे कांहीं पराक्रम करून येतात ते त्या पराक्रमाची कांहीं तरी पक्की खूण आणण्यास कधींही चुकत नाहींत! लढाईत जिंकलेल्या शत्रूकडील बायका, पुरुष व मुलें यांस कैद करून आणण्याचा फार जुना प्रघात आहे. ज्या रानटी लोकांत नरमांससेवनाचा प्रकार चालू असतो

त्यांस अशा रीतीनें आणिलेली लूट नासूं न देतां उरवून पुरवून बरेच दिवस चरितार्थाकडे लावितां येते. पण अशा प्रकारची लूट संभाळणें फार कठीण असते. एक तर कैद केलेले इसम स्वजीवितरक्षणासाठी तुटून पडतील अशी भीति असते. शिवाय कैद्यांच्या मोठ्या समुदायांचे संरक्षण करण्यासही मोठी पंचाईत पडते. अशा अनेक अडचणींमुळें अनेक कैदी पकडून आणिलेच, तर त्यांपैकीं जेवढ्या बायका व पोरं हवी असतील तेवढ्यांशिवाय बाकीच्यांस मारून टाकण्याचा प्रघात असतो. जुने ग्रीक लोक असेंच करीत असत. सध्यांचे सर्व ठिकाणचे रानटी लोक असेच करतात. तैमूरलंगादि ज्या दुष्ट पराक्रमी लोकांनीं हिंदुस्थानावर व युरोपावर अनेक स्वाऱ्या करून लाखों लोक गुलाम केले; त्यांची त्यांनीं अशीच वाट लाविली! शत्रूच्या अंत:करणांत दहशत उत्पन्न करण्याचा व स्वजातीपुढें शौर्याची प्रतिष्ठा मिरविण्याचा हा अगदी जुना व रानटी प्रकार होय. याच्या खालोखाल युद्धांत जिंकलेल्या शत्रूच्या शरीराचे कांहीं भाग कांपून काढून त्यांचे प्रदर्शन करावयाचें हा दुसरा प्रकार. हा अद्यापि बऱ्याच ठिकाणीं दृष्टीस पडतो; व आमच्या राज्याचारांवर व धर्माचारांवर याचा बराच ठिकाणी परिणाम झाला आहे. मनुष्याच्या अनेक अवयवांत डोक्यास जें मुख्यांगत्व आलें आहे तें अत्यंत स्वाभाविक आहे, हें कोणासही समजणार आहे. प्रतिपक्ष्यांचे शीर कापून आणण्याहून त्याचा पराभव केल्याचा दुसरा सबल पुरावा तो काय देतां येणार? एक डोकें आणिल्यानें शत्रू जिवंत राहिला नाहीं, जो मारावयाचा तोच मारला आहे, अशी त्यापासून अनेक प्रमाणें मिळून हंत्याच्या विजयशालित्वाबद्दल आप्तांची, मित्रांची आणि न जिंकलेल्या शत्रूंची पूर्ण खात्री होऊन जाते. अशा प्रकारें कांपून आणिलेलीं शिरें काठ्यांवर घालून रानटी लोक मोठ्या आनंदानें नाचत सुटतात! त्यांच्या राजाच्या खोपटांपुढें वेळू पुरून त्यांवर असली डोकीं बसवून दिलेली असतात. **डहोमन** लोकांच्या राजाच्या घरांतील भिंतींत विटांच्या व तोडींच्या जागीं शत्रूंचीं शिरकमलें बसवून दिलेलीं असतात, आणि कधीं कधीं याच कमलांची फरशीही केलेली असते! खुंट्यांच्या जागीं हातांची व पायांचीं हाडें बसविलेलीं असतात! अशा रीतीनें शत्रूंच्या शिरकमलांवर नित्यश: पादसंचार करणाऱ्या राजास त्याची प्रजा पराकाष्ठेची भीत असेल व त्याचे शत्रू त्यापुढें थरथरा कांपत असतील, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. राजा स्वत: युद्धास न निघतां त्यानें तें काम आपल्या वजिराकडे किंवा दुसऱ्या कोणाकडे सोंपविले असलें तर त्या प्रतिनिधीस राजाची मर्जी आपणावर सुप्रसन्न करून घेण्यासाठीं जितकीं डोकीं मिळतील तितकीं मिळवून तीं राजपदी आणून अर्पण करावी अशी महत्त्वाकांक्षा सहज उत्पन्न होते, आणि तदनुसार त्यांचे वर्तन होतें. रानटी लोकांच्या राजाप्रमाणें

त्यांच्या देवताही रुधिरप्रिय असल्यामुळें, राजाप्रमाणें देवतांसही शत्रुशिरकमलें वाहण्याचा प्रघात पडतो; व अशा रीतीनें ज्या आचारांचा उद्गम प्रथम केवळ सामाजिक व्यवहारांत होतो त्यांचा अंमल पुढें राज्याचारांवर व धर्माचारांवर होऊं लागतो. असो! जिंकलेल्या शत्रुंस जिवत धरून नेण्यापेक्षां त्यांचीं शिरे कापून नेणें विशेष सोईचें असल्यामुळें तसें करण्याचा प्रघात लौकरच पडतो. पण पुढें तोही गैरसोईचा वाटूं लागतो. मनुष्याच्या साऱ्या अवयवांत डोकें फार जड; तशांत त्यावर बराच केशभार असला आणि त्यांतून रक्त गळत असलें म्हणजे तें घेऊन जाणें मोठें त्रासदायक आहे. म्हणून हळूं हळूं सगळीं डोकीं न नेतां दांत व दाढा उपटून काढून त्या नेण्याचा प्रघात पडतो. पुढें तोही बरासा न वाटून कान व नाकें कापण्याची चाल पडते. तैमूरलंगानें बगदाद आणि आलेपो येथें आपल्या शत्रूंच्या शिरांच्या पिरमिदी आणि कोट बांधले होते! झांझिखान पोलंडावर चालून गेला तेव्हां त्यापाशीं लाखों शिरें वाहून नेण्यापुरतीं जनावरें नसल्यामुळें त्यानें पोलिश लोकांच्या उजव्या कानांचीं नऊ पोतीं भरून घेतलीं, आणि त्यांसह स्वदेशास प्रयाण केलें! आफ्रिकेंतील कांहीं राजांस शत्रूंची नाकें फार प्रिय असल्यामुळें त्यांचे लढाऊ सरदार नाकांनीं भरलेलीं ताटेंच्या ताटें त्यास नजर करतात! तथापि कान, नाकें वगैरे कुजणारे भाग असल्यामुळें कित्येक रानटी लोक फक्त दांतच घेऊन जातात, आणि त्यांच्या माळा करून ठेवतात. समारंभाचे वेळी आणि सणाचे दिवशीं त्यांच्या बायका असल्या दातांचे दागिनें मोठ्या प्रेमानें वापरतात! डोकीं, दाढा, दांत, कान, नाकें यांशिवाय शरीराचे दुसरे भागही कांपून नेण्याचा प्रघात आहे. कांहीं रानटी लोक काळजें काढून घेतात; कांहीं उजवे किंवा डावे हात कांपतात; कांहींस मांसल असे कटिपश्चाद्भाग फार आवडतात; कांहींस तोंडाची कांतडीं व कांहींस सगळ्या शरीराची संबंध कांतडीं सोलून घेणें बरें वाटतें! तीं सहज निघून यावीं म्हणून ते जिवंत शत्रूंस वांग्याप्रमाणें निखाऱ्यांत बेतानें भाजून मग सोलतात! आणि अशा रीतीनें सोडविलेलें अखंड चोगे वापरण्यांत व त्यांसह राजास व मित्रास भेटण्यास जाण्यांत त्यांस मोठी प्रतिष्ठा वाटते! याप्रमाणें शरीरांतील बहुतेक सारे भाग व अवयव विजयलांछनें होऊं शकतात व होतात, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. एक मात्र भाग अद्यापि सांगितला नाहीं, पण मनुष्याची क्रूरता कोणत्या थरास जाते, हें त्यांस समजावें म्हणून तोही विजयलांछन करण्यांत येतो, हें येथें सांगणें जरूर आहे. इतर अवयवांप्रमाणें हा गोपनीय अवयवही कापण्याचा आणि सोलण्याचा प्रघात मागें युरोपांत व आशियांत रूढ होता, आणि प्रस्तुतकालीं आफ्रिकेंतील व अमेरिकेंतील काही रानटी लोकांत रूढ आहे. हाच आचार अन्यरूपानें एका मोठ्या सुधारलेल्या लोकांत अद्यापि रूढ

आहे, हें पुढील एका निबंधांत विशेष स्पष्ट होणार आहे.

राज्याचार व धर्माचार सामाजिक आचारांपासून उत्पन्न होत असल्यामुळें समाजाच्या प्रथमावस्थेंतील धर्म आणि राज्य यांचें स्वरूपही वर निर्दिष्ट केलेल्या रानटी सामाजिक आचारांच्या स्वरूपासारखेंच असतें. सध्यां आपणांस गुलाम, गुन्हेगार, आणि शत्रू यांतील भेद नीट समजतो, व एकाच्या जागी दुसरा समजणें अशक्य वाटतें. पण रानटी लोकांस अशा प्रकारचें वस्त्वंतर समजत नाहीं. ज्याच्याकडून त्यांना कांहीं अप्रिय घडेल अशी भीति असते; त्यास ते शत्रू किंवा गुन्हेगार समजून त्याचा पराभव करण्यास व त्याला गुलाम करण्यास उद्युक्त असतात. साक्षात् पोटच्या पोरांपासून त्यांस त्रास होऊं लागला, तर त्यांना मारून टाकण्याची त्यांस शंका वाटत नाहीं. मग इतरांची कथा काय? अशा स्थितींतील राजेही सामान्य मनुष्याप्रमाणेंच क्रूर असतात, व ज्याप्रमाणें सामान्य व्यक्ति आपल्या सामर्थ्याचा दुसऱ्यास वचक राहण्यासाठीं वर सांगितल्यासारखें निर्दयपणाचें वर्तन करण्यास प्रवृत्त होतात, त्याप्रमाणें राजेही आपल्या प्रजेस व आपल्या शत्रूस आपली दहशत पडण्यासाठीं अशाच प्रकारचें क्रूर वर्तन करतात. लढाईंत जिंकलेल्या लोकांचीं डोकीं उडविणें, हातपाय तोडणें, त्यांना मिरच्यांच्या धुऱ्या देणें, लिदींत पुरणें, तापल्या तोफांवर बांधणें, कडेलोट करणें, हत्तीच्या पायाखाली देणें, त्यांचीं नाकें व कान कापणें, आणि त्यांच्या घशांत शिसें तापवून ओतणें- हे निर्दयपणाचे प्रकार लढाईंत कैद केलेल्या शत्रूकडील लोकांचा छळ करण्याकरतां जसें योजण्यांत येतात, त्याप्रमाणें प्रजेपैकींही कोणी मनुष्यानें अपमान केला, हुकूम तोडला, किंवा बंडाचा घाट घातला तर त्याला शिक्षा करण्यांतही योजण्यांत येतात. राजापराधाकरतां सुळावर चढविणें, जेथें खून केला असेल तेथें सर्व लोकांसमक्ष फांशी देणें, भर चवाट्यावर फटके मारणें- हे सर्व सध्याही कित्येक ठिकाणी अंमलांत असलेल्या शिक्षेचे प्रकार सरकारच्या सामर्थ्याची दहशत लोकांस असावी, येवढ्यासाठींच आहेत. राजा सिंहासनरूढ होतो, म्हणजे तो मनुष्यांचा स्वामी होतो. येवढेंच नाहीं; तर सिंहासारख्या बलवान हिंस्त्र पशूसही जिंकून त्याच्या पाठीवर बसतो, असा या शब्दांत गर्भितार्थ आहे. सारांश काय कीं, अर्धवट सुधारलेल्या स्थितींत सामाजिक आचार जितके क्रूर असतात, तितकेच राज्याचारही क्रूर असतात, असें सहज सिद्ध करून देतां येतें; कारण दुसरे पहिल्यापासूनच निघालेले असतात. ज्यांना हे विचार आपल्या समाजाच्या संबंधानें किती खरे आहेत हें पहावयाचे असेल, त्यांनी महाभारतांतील कांहीं गोष्टी वाचून त्यांचें आपल्या मनाशीं शांतपणें चिंतन करावें. दु:शासनाच्या नरडीचा घोंट घेऊन त्याच्या विदारलेल्या वक्ष:स्थलापासून निघणाऱ्या रुधिरांत भिजविलेल्या हातानें

द्रौपदीची वेणी घालण्याचा भीमानें केलेला पण आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच! कदाचित् रा. ब. नि. ज. कीर्तने यासारखे हिंदूधर्माचे आणि पुराणांचे मंडनकर्ते असें म्हणतील कीं, ही गोष्ट रूपकात्मक आहे व तिचा गूढार्थ आध्यात्मिक असून तो सामान्य जनांस कळण्यासारखा नाहीं! अशाच रीतीनें वेदांचे अपौरुषत्व आणि गूढार्थत्व बरीच शतकें रूढ होऊन बसलें आहे! पण पश्चिमेकडून ज्ञानरवि या भारतखंडावर प्रकाशूं लागल्यापासून 'वेदार्थयत्न' होऊ लागले आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांचें पौरुषत्व स्थापण्याचा विडाही कित्येकांनी उचलला आहे, ही अत्यंत अभिनंदनीय स्थिती आहे.

मनुष्यांच्या प्रथमावस्थेंत सामाजिक व राजकीय आचार क्रूर असतात त्याप्रमाणें धर्माचारही क्रूर असतात, हें दाखविण्यासाठी येथें विशेष खल करीत बसण्याची गरज नाही. कारण आमचीं पुराणें, आमचीं मूर्तिपूजा, आमचे प्रेतादिकांचें संस्कार आणि आमच्यापैकी कनिष्ठ वर्गांत सुरू असलेली विलक्षण पाषाणपूजा यांचा क्षणभर विचार केला, तर असें दिसून येईल की, आमच्या देवतांच्या कल्पना मेलेल्या पूर्वजांपासून म्हणजे त्यांच्या पिशाचांपासून निघाल्या असल्यामुळे ज्या उपायांनी व कृतींनी रानटी व अर्धवट सुधारलेली माणसें आनंद पावतात, त्याच उपायांनी व कृतींनीं देवताही आनंद पावत असतील, असा आमचा भरंवसा ठरून गेल्यामुळें आमच्यांतील अज्ञ लोकांचा पूजाविधि अत्यंत उपहासास्पद झाला आहे! सांबासारख्या किंवा महिषासुरमथनीसारख्या देवतेचें रूपवर्णनच लक्षांत आणा म्हणजे आमच्या लिहिण्याचा अर्धा प्रत्यय येईल. हत्तीचें ओलें कांतडें पांघरून पिशाचगणासह नर्तन करणाऱ्या ''पंचतुंड नररुंडमालधर अशा पार्वतीशास' आम्ही नमन करणार! मग काय विचारतां? अशा भयंकर देवाची पूजाही भयंकरच असली पाहिजे! सांब हा थेट पिशाचवर्गांतून देववर्गांत आला असल्यामुळें त्याचें रूप आणि त्याची पूजाही पिशाचांचें रूप आणि पूजा यांसारखी झाली आहेत; व आमच्या पिशाचांच्या स्वरूपाच्या आणि त्यांच्या स्थितीच्या कल्पना आमच्या श्राद्धविधींत आणि गरूडपुराणांत पूर्णपणें नमूद झालेल्या आहेत! उत्कुंभ, शय्यादान, गोप्रदान, लोहदान, कार्पासदान- या सर्वांवरून काय व्यक्त होतें कीं, शरीरास या लोकीं ज्या अडचणी येतात त्याच मरणोत्तर आत्म्यास पिशाचयोनींत येतात, असें आमचे लोक मानतात! व अशाच प्रकारच्या पिशाचापासून देवतोत्पत्ति झाली असल्यामुळें, त्यांचीं स्वरूपें आणि स्वभावही तत्तुल्य मानिलीं आहेत, आणि म्हणून त्यांच्या पूजाही तत्समान झाल्या आहेत यांत नवल तें कोणतें?

*

व्यवच्छेदन

आपण संपादिलेली विजयश्री गाजविण्यासाठीं रानटी व अर्धवट रानटी लोक जिंकलेल्या शत्रूंस ठार न मारल्यास त्यांच्या शरीरांचे कांहीं भाग कांपून घेऊन त्यांचा संग्रह करतात, हें वरील लेखांत सांगितलें. आतां याच आचारापासून उत्पन्न झालेल्या व्यवच्छेदनाच्या आचाराविषयीं दोन शब्द लिहावयाचें आहेत.

व्यवच्छेदन म्हणजे कापणें. जोंपर्यंत जिंकलेल्या लोकांच्या जिवाची पर्वा नसते, तोंपर्यंत हा अस्तित्वांत येत नाहीं. डोक्याची नरटी काढणें, अबडा उपसणें, कांतडें सोलणें, काळीज सोडविणें वगैरे विजय मिरविण्याच्या पद्धति अत्यंत क्रूरपणाच्या आहेत, आणि त्या जेथें रूढ असतात, तेथें मनुष्याचा जीव घेणें ही वाईट गोष्ट आहे, असें कोणाच्या स्वप्नांत सुद्धां येत नसतें. पण पुढें आपापसांत युद्धें होतां होतां उभय पक्षांस असें दिसून येतें कीं, जिंकलेल्या शत्रूकडील लोकांस मारून टाकण्यापेक्षां गुलाम करणें बरें. त्यांस गुलाम करण्यानें त्यांच्याकडून निरंतर सेवा करून घेतां येईल. त्यांच्या वृत्तींत हा बदल होण्यास दोन कारणें होतात. सामान्य लोकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, रानटी लोक मोठे उद्योगी असतील. पण ही त्यांची चूक आहे. रानटी लोक पराकाष्ठेचे आळशी असतात. ज्याप्रमाणें सिंहव्याघ्रादि हिंस्त्र पशु भुकेनें कळवळूं लागल्याशिवाय आपल्या गुहा सोडून भक्ष्याच्या शोधासाठीं बाहेर पडत नाहींत, त्याप्रमाणें रानटी लोक चरितार्थास कांहीं नसलें तरच हातपाय हालविण्यास तयार होतात. भूक लागली म्हणजे हवें तें मारून ती भागवावी, आणि ती भागली म्हणजे पडून रहावें, अशी त्यांना खोड असते. तेव्हां भूक भागविण्यास लागणारे पदार्थ कोणी आयतेच आणून देईल तर त्यांस ते मनापासून पाहिजे असतात. लढाईंत पकडलेल्या लोकांस न मारतां गुलाम करून ठेविलें, आणि त्यांच्याकडून पारध करवून तिच्यावर चरितार्थ करतां आला, तर त्यांस तबियत लागेल तेव्हां मात्र थोडासा उद्योग करून बाकीच्या वेळांत विश्रांति घेण्यास सापडते. याच सुमारास गुरें पाळून त्यांच्या दूधदुभत्यावर किंवा शेतकी करून धान्यावर उपजीविका करण्याची कला समजून आली, तर लढाईतल्या कैद्यांस मारण्यापेक्षा त्यांना गुलाम करून ठेवण्याची इच्छा होण्यास विशेष कारण होते. एक धनगर जितकीं गुरे पाळूं शकतो तितक्या गुरांपासून

त्याचा निर्वाह होऊन शिवाय आणखीही पुष्कळांचा होण्यासारखा असतो. शेतकऱ्याचे श्रम याहीपेक्षां विशेष फायदेशीर असतात. यामुळें काय होतें कीं, रानटी लोकांस धनगरावस्था व कृषीवलावस्था प्राप्त झाल्या असतां, त्यांस माणसें मारण्याचा कंटाळा येऊं लागून त्यांना आपलें गुलाम करून ठेवणेंच अधिकाधिक प्रिय वाटूं लागतें. अशा स्थितींत समाजांतील व्यक्तींचे दोन स्थूल विभाग होतात. एक चाकरांचा किंवा गुलामांचा; आणि दुसरा स्वामींचा किंवा धन्यांचा. पहिल्या वर्गांत बायकांचाही समावेश केला पाहिजे. घरच्या मालकानें लढण्याचें काम करावें, आणि बायकांनीं घरचीं कामें करावीं अशा प्रकारचा श्रमविभाग उत्पन्न होतो, आणि त्यांपासून मिळूं लागलेलीं सुखें अधिकाधिक प्रिय वाटूं लागून ज्यांस गुलाम केलें असतें; त्यांस चांगल्या रीतीनें वागविण्याची सहज प्रवृत्ति होते. डोळे काढलेले, हात तोडलेले, लंगडे केलेले अनेक गुलाम पदरीं असून काय फायदा? गुलाम केलेल्या प्रत्येक इसमापासून जितका फायदा करून घेतां येईल तितका करून घेतां आला पाहिजे. काम करण्याचे अवयव तोडून टाकल्यास त्यांच्यापासून फायदा कसा होणार? तेव्हां तसें करणें बरोबर नाहीं. पण ते जिंकलेले लोक आहेत, असा कांहीं तरी शिक्का त्यांच्या अंगावर नेहमीं दिसत असला पाहिजे, त्याखेरीज आपण विजयशाली आहों असें आपल्या मित्रांस किंवा शत्रूंस कसें कळले, व त्यांवर आपला वचक कसा राहील? चिंता नाहीं; पण तसें होण्यास गुलामास ठार मारलेंच पाहिजे असें नाहीं. ते लढाईंत जिंकलेले लोक आहेत असें दाखविणारी एखादी कायमची निशाणी त्यांच्या अंगावर करून ठेविली म्हणजे झालें. अशा विचारानी **विजयलांच्छनार्थ** डोकीं उतरण्याचा, हातपाय तोडण्याचा, सबंध कांतडें सोलण्याचा- सारांश ज्या गोष्टीमुळें तत्क्षणीं जीव जाईल, किंवा स्थाईक लुळेपण अंगी जडेल, अशा प्रकारचा देहदंड करण्याचा प्रघात मागें पडून कोठें पायाचा आंगठा उतरणें, कोठे हाताची करंगळी तोडणें, कोठें शेंडी काढणें, कोठें सुंता करणें असे आचार पडतात. आणि अशा प्रकारचे सामाजिक आचार एकदां रूढ झाले म्हणजे राज्याचारांस व धर्माचारांसही त्यांचें वळण लागतें.

पूर्वी युरोपांत व इतर खंडांत एका गृहस्थास आपली जमीन दुसऱ्यास विकावयाची झाली तर तो आपल्या वकिलाकडून विकत घेणाऱ्या मनुष्याच्या वकिलाच्या हातावर, त्या जमिनींतील थोडीशी माती कांहीं साक्षीदारांसमक्ष पाडीत असे. जमीन हीं उचलून देण्यासारखी वस्तु नसल्यामुळें असा प्रघात पडला असावा हें उघड आहे. आपणांत उदक सोडण्याचा जो रिवाज आहे तोही अशाच अर्थाचा आहे. ज्या वस्तूवर आपण उदक सोडतों तीवरील आपलें स्वामित्व

आपण सोडतों, असा या संप्रदायाचा मूळ आशय आहे. स्थावर वस्तु उचलून देतां येत नाहीं, तेव्हां तिच्या संबंधानें अशा प्रकारचा तोडगा करणें भाग पडतें. पुढें ब्राह्मणभोजन घालावयाचें झालें, दक्षिणा द्यावयाची झाली, कन्यादान करावयाचें झालें तरी उदक सोडण्याचाच प्रघात पडतो; म्हणून स्थावरजंगम पदार्थांवरील स्वामित्व सोडण्याची एकच पद्धत पडते; व असें होणें फार सोईचें आहे. तसेंच पूर्वीचे लोक लढाई करावयास निघाले असतां, ज्या लोकांवर चालून जावयाचें असेल, त्यांच्याशीं प्रत्यक्ष संग्राम करूं लागण्यापूर्वी, माती आणि पाणी मागत; आणि त्या जिनसा त्यांच्याकडून आल्या तर लढाई न करतां ते आपले गुलाम होण्यास तयार आहेत असें समजत. या आचाराचा अर्थही उघड आहे. ज्यांनीं मागितल्याबरोबर माती आणि पाणी दिलें त्यांनी आपण होऊन आपला देश ताब्यांत देण्याची कबुली दाखविली, असें होतें, याप्रमाणेंच लढाईकरतां साहाय्य मागायचें झालें, तर एकमेकांकडे भाले पाठवून देण्याची चाल असे; तसेंच लढाई सुरू होऊन कांहीं कैदीही करण्यांत आले आहेत असें दाखविण्याकरितां, या मदतीसाठीं धाडण्यांत येणाऱ्या भाल्यांच्या फळांवर कैद केलेल्या लोकांचे हात किंवा बोटें टोंचून ते पाठविण्यांत येत असत. असेंच 'आम्ही शरण आलों' असें म्हणावयाचें असल्यास शस्त्रें उलट धरून किंवा हात बांधून घेऊन शत्रूच्या छावणींत जाण्याचा प्रघात असे. हात जोडणें, पायां पडणें, गुढगे टेकणें, तोंडांत मारून घेणें, कान उपटून घेणें, नाक घासणें वगैरे जे प्रकार आपण देवापुढें किंवा राजापुढें करतों त्या सर्वांचा इंगितार्थ हाच आहे.

पण कोणी असें म्हणतील कीं, मनुष्यांनी ठरविलेल्या ह्या कांहीं तरी खुणा आहेत. यावरून; पूर्वी स्वामिसेवक संबंध, राजाप्रजा संबंध किंवा देवपूजक संबंध दाखविण्यासाठीं ज्या आचारांच्या या खुणा आहेत असें आम्हीं म्हणतों, ते आचार अस्तित्वांत असतील असें अनुमान करणें बरोबर नाहीं. त्यावर उत्तर एवढेंच आहे कीं, पृथ्वीवर सध्यां जे रानटी किंवा अर्धवट रानटी लोक आहेत त्यांमध्यें असे आचार रूढ आहेत; आणि ज्या देशांतून ते नष्ट झाले आहेत, अशा देशांच्या इतिहासांत त्यांची उत्तम माहिती मिळण्यासारखी आहे. आमच्या देशांतील निरनिराळ्या वर्गांतले लोक निरनिराळ्या स्थितींत असल्यामुळें कोठे हे आचार प्रत्यक्ष आढळतात व कोठें त्यांची फक्त कवाईत दृष्टीस पडते. **विइलियम्स** नांवाच्या एका प्रसिद्ध इंग्लिश प्रवाशानें असें म्हटलें आहे कीं, एका प्रसंगीं **फिजी** लोकांचा एक राजा मेला असतां, त्याच्या दरबारानें त्याच्या प्रीत्यर्थ शंभर करंगळ्या तोडाव्या असा हुकुम फरमाविला; तसेंच एका मुलाचा आवडता बाप नुकताच वारला होता; तेव्हां त्याला गाडण्यापूर्वी त्याच्या मुलानें आपली पितृभक्ति

प्रदर्शित करण्यासाठीं आपलीं पांच बोटें तोडून त्यांस आपल्या पित्याच्या शवाबरोबर मूठमाती दिली! अमेरिकेंतही याप्रमाणेंच पितरांस व देवतांस अंगुलिच्छेद करून खुष करण्याचा प्रधात आहे. हाटेंटॉट लोकांत अशी चाल आहे कीं, एखाद्या बायकोचा नवरा मेला असता आणि तिच्या मनांत दुसरें लग्न करावयाचें असलें, तर तिनें आपल्या बोटाचें पहिलें कांडें तोडून घेतलें पाहिजे. हा दुसरा नवरा मरून तिसरा करावयाचा असल्यास त्याच्या खालचे दुसरे कांडे दुसऱ्याच्या पिशाचास अर्पिले पाहिजे. याप्रमाणें एका पाठीमागून एक हवे तितके नवरे करावे, प्रत्येका पाठीमागें बोटाचें एकेक कांडें गमविण्याची तयारी असली म्हणजे झालें! याप्रमाणें पितृभक्ती किंवा भर्तृप्रेम दाखविण्यासाठीं हाताचीं बोटें गमावणें; हें ज्या आमच्या लोकांत सतीचा प्रघात इंग्रजी होईतोंपर्यंत रूढ होता त्यांस हास्यास्पद किंवा क्रूर वाटण्याचा मुळींच संभव नाही. जिनें भर्तृशवाबरोबर अग्निप्रवेश केला, तिची काय थोरवी सांगावी? तिच्या पुण्यप्रतापानें सासरच्या व माहेरच्या मागल्या व पुढल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार होऊन, शिवाय खुद्द तिला त्याच भर्त्यांशी सात जन्म सहवाससुख! पण हिंदु लोकांनीं असें समजूं नये कीं, अशा प्रकारच्या प्रेमप्रदर्शनांत आपणांहून श्रेष्ठ असे दुसरे लोक नाहींत! हिंदुस्थानांत असा कोणताही आचार नाहीं किंवा नव्हता, कीं ज्याच्या प्रतिमा दुसरीकडे दाखवितां येणार नाहींत. काहीं बाबतींत तर हिंदुस्थानास लाज आणविणारे असे प्रकार इतर लोकांत रूढ आहेत. दूर कशाला, ही सतीची गोष्ट पाहिजे तर घ्या. माधवराव पेशव्याबरोबर फक्त रमाबाईच सती गेली. आफ्रिकेंत व अमेरिकेंत कांहीं रानटी लोक आहेत, त्यांचे राजे परलोकवासी झाले असता त्यांच्या बरोबर त्यांच्या बायकाच तोडून पुरण्याचा प्रघात आहे इतकेंच नाही, तर त्यांच्या समवेत त्यांच्या आवडत्या व निवडक भावांस, गुलामांस, मंत्र्यांस, व जनावरांसही सती घालविण्याची चाल आहे! मेलेल्या पितरांस आंथरुणें पाहिजेत, गाई पाहिजेत, वाडे पाहिजेत, तर घोडीं कां नकोत, कुत्रीं कां नकोत, गंजिफाच्या पेट्या आणि बुद्धिबळांचे आणि सोंगट्यांचे पट व त्या खेळण्यास लागणारे मित्र कां नकोत? खरी प्रीतीच दाखवायाची असेल, आणि मृताकरतां जें जें देण्यांत येतें तें तें त्याला पावतें, व त्याचा उपभोग त्याला घेतां येतो हें खरें असेल; तर अगोदर घरेंदारें जाळून टाकून मग आईबापांनीं मुलांबरोबर, मुलांनीं आईबापांबरोबर, बहिणींनीं भावांबरोबरच व भावांनी बहिणींबरोबर, राजानें प्रजेबरोबर आणि प्रजेनें राजाबरोबर, आणि मित्रांनीं एकमेकांबरोबर सती जावें, आणि येथल्यासारखाच पिशाचयोनींत सारा थाट उठवून द्यावा हें योग्य आहे! बायकोनें नवऱ्यासाठीं स्वत:स जाळून घेणें हें उत्तम प्रेमाचें निदर्शक असेल तर

त्याचें अनुकरण इतर सर्व संबंधांत होऊं लागणें यांत मनुष्यतेची केवढी उन्नति व्यक्त होणार आहे बरें? आणि अशा प्रकारची उन्नति सार्वत्रिक झाल्यास येथील मनुष्यवस्ती नाहींशी होऊन जन्ममरणाचे क्लेश या पृथ्वीतलावर मनुष्यमात्रांत तरी दृष्टीस पडूं न लागल्यामुळें तिच्यावरील दु:खाचा किती भार कमी होणार आहे? पण असें होत नाहीं. यावरून दिवसेंदिवस आम्ही नीच होत चाललों आहों, व खऱ्या प्रेमाचा आम्हांमधून लोप होत आहे, असें म्हणणें जरूर नाहीं काय? साक्षात् जाळून घेण्यानें ज्या प्रकारचें निकट प्रेम प्रदर्शित होतें, त्याचा एक कोट्यंश तरी आतां जे आचार रूढ आहेत, त्यांनीं होत असेल काय? असो! या सामाजिक आचारांचें राज्याचारांतही अनुकरण होऊं लागतें, हें पहावयाचें असेल तर प्रस्तुतकालीं चीनसारख्या जुन्या पद्धतीच्या देशांत अपराध्यांस कोणत्या प्रकारच्या शिक्षा देण्यांत येतात, हें पहावें व युरोपखंडांतील निरनिराळ्या देशांचे इतिहास वाचावे. कोणी खोटें केलें तर त्याचे हात तोडावयाचें, कोणीं खोटी साक्ष दिली तर त्याची जीभ कापावयाची, कोणी स्त्री चपला निघाली तर तिचें नाक कापावयाचें किंवा तिच्या शरीराच्या निरनिराळ्या भागांवर डाग द्यावयाचे; तसेच कांहीं गुन्ह्यांबद्दल कान कापावयाचे, कांहींबद्दल पाय कलम करावयाचे, कांहींबद्दल डोळे काढावयाचे- अशा अनेक प्रकारच्या शिक्षा सध्यां चिनांत सुरू आहेत, व पूर्वी येथें व युरोपांत अस्तित्वांत होत्या; आणि इंग्रजांचें राज्य येथें न होतें; तर त्यांपैकीं बऱ्याच येथें सध्यांही अंमलांत असलेल्या दृष्टीस पडत्या. पण उत्तरोत्तर अशा शिक्षा क्रूर वाटूं लागून सौम्य शिक्षा देण्यानें मनुष्यांची नीति लौकर सुधारत जाते, असा अनुभव हळूं हळूं येऊं लागतो, आणि असल्या शिक्षा अगदीं मागें पडून सौम्य शिक्षा सर्वत्र अंमलांत येतात. हा बदल क्रमाक्रमानें सर्व आचारांच्या संबंधानें होतो, व अखेरीस ज्या प्रकारानें कमींत कमी विकलांगता उत्पन्न होईल, व ती ज्याच्या कपाळी आली असेल; त्याला कमींत कमी वेदना सोसाव्या लागतील, असे प्रकार सामाजिक, धार्मिक व राजकीय आचारात रूढ होत जातात. अलीकडे लष्करी घोड्यांस खुणेसाठी डागतात, हें सर्वांस ठाऊक आहेच; पूर्वी गुलामाच्या अंगावर मालकाच्या नांवाचा डाग देत असत. हाच प्रकार धर्मांत शिरला तेव्हां त्याच्या तप्तमुद्रा झाल्या. मग अर्थात् जो स्वामीस अधिक पैसे देईल त्याला ओल्या फडक्यावरच्या मुद्रा, जो पैसा न सोडील त्याला लालभडक मुद्रा, जी कोमलांगी असेल तिला ओझरत्या मुद्रा, जी हेडंबा असेल तिला प्रशस्त मुद्रा, असा परिपाठ पडणें किती स्वाभाविक आहे? या मुद्रांप्रमाणेच नाकांतील व कानांतील भोकांची गोष्ट होय. कोणी असें म्हणतात कीं, स्त्रिया स्वभावत: फार चंचल आहेत, म्हणून त्यांना अल्लड बैलाप्रमाणें किंवा उंटाप्रमाणें थोड्या श्रमानें

वागविता येण्यासाठीं नथरूपी वेसणी त्यांच्या नाकांत घालवयाची चाल पडली! मुसलमान लोक आपल्या बायकांविषयी विशेष दक्ष असल्यामुळें ते बायकांच्या नाकपुड्यांतील पड्द्यांत खाशी काडी बसवून देऊन तिच्या चंद्राकार परिघाचा खळ तोंडावर होऊं देतात. ही नथ कधीं कधी इतकी जड असते कीं, तिच्या ओझ्याने नाकाचा पडदा तुटून जाण्याची भीति पडून ती सांवरण्यासाठी तिला एक दोरा लाऊन तो मागें बुचड्याला खेचून बांधलेला असतो! कोणी म्हणतात कानानाकांसही विंझें पाडण्याची पद्धत अलंकारशास्त्रप्रणीत आहे! असेल बापडी! येवढ्यानें अलंकारशास्त्राचें रहस्य पुरतें उमजत नसेल, तर खालच्या वरच्या ओठांस चार किंवा पांच भोकें पाडून त्यांत बाळयाबुगड्यांच्या व नथांच्या नवीन सवती अडकविण्याचा प्रघात पडेल, तर किती बहार होईल! तसेंच गुजराथी बायकांप्रमाणें दातांत सोन्यारुप्याच्या चुका मारून त्या ओठांतून बाहेर काढण्याचा प्रचार पडेल तर अलंकारशास्त्रांत एक-दोन नवीन उल्लास करून घातल्याचें श्रेय येणार नाहीं काय? असो! व्यवहारांत आम्ही या बायकांच्या नथांतून केव्हा सुटूं ते सुटूं; येथें पाहिजे तेव्हां त्यांतून निसटणें आमच्या ताब्यांत असल्यामुळें तसें करून, दुसऱ्या एका अंगवैकल्याकडे वळतों. हें वैकल्य जगत्प्रसिद्ध आहे. याचा आरंभही विजयलांछनापासूनच आहे. लढाईंत धरलेल्या कैद्यांपासून संतानवृद्धी न व्हावी, घरांत ते वावरूं लागले असतां त्यांपासून स्त्रियांस भीति न रहावी यासाठीं गुलामांस बैलाप्रमाणें हतपुंस्त्व करण्याचा प्रघात यहुदी, फिनीशियन, मिसर, फ्रिजियन, पारशी, मुसलमान वगैरे अनेक लोकांत फार वर्षे रूढ होता, व अजूनही तो अनेक रानटी लोकांत दृष्टीस पडतो. ज्याप्रमाणें तोडलेले हातपाय त्याप्रमाणें ही गुह्यांगें राजास नजर करणें हा आचार रानटी लोकांत पूज्य मानल्यामुळे, राजस्वरूप देवासही तो अत्यंत प्रिय होत असेल असा तर्क करून, भक्तांनी आपापल्या देवतांस आपण होऊन आपलीं किंवा दुसऱ्यांची सबंध गुह्यांगें किंवा त्यांचे कांहीं भाग अर्पण करण्यास तयार होणें, हें किती स्वाभाविक आहे? ज्या इंद्रियामुळें सर्व सुखांत अत्यंत प्रिय सुखाची प्राप्ति होत असून जातिप्रवाह अव्याहत चालतो, त्याहून देवतेला नजर करण्यास विशेष महत्त्वाची वस्तु कोणती असणार? आपल्याकडे कोणी सूर्यास हात वाहतात, कोणी पाय वाहतात, कोणी दुसरा कांहीं अवयव वाहतात, पण सुंतेवाल्यांनीं आम्हा सर्वांस हटविलें आहे असें कबूल केलें पाहिजे! युरोपियन लोकांत जसा बाप्तिस्मा, आमच्या लोकांत जशी मुंज, तसा मुसलमान व इतर लोकांत हा सुंत्याचा संस्कार प्रमुख होऊन बसला आहे. सुंता हा पूर्वीच्या कृत्रिम नपुंसकत्वाचें सौम्य रूप आहे. असो. विषयाच्या ओघांत या अमंगळ आचाराविषयीं आम्हांस इतकें स्पष्टपणें लिहावें

लागलें याबद्दल वाचकांची क्षमा मागून दुसरीकडे वळतों.

ज्याला आपण अलीकडे गोंदणें म्हणतों; तेंही पराभूत लोकांवर पराभव झाल्याचें एक चिन्ह कायम करण्याचा मार्ग होतें. अलीकडे हें गोंदणें भूषण होऊन बसलें आहे, ही गोष्ट आम्हांस नाकबूल नाही, पण याची वंशावळ वरील सर्व आचारांच्या वंशावळीसारखीच आहे. शूर लोकांस शरीरावर अनेक वार लागले असून त्यांपासून जे डाग पडलेले असतात, त्यांचें मोठें भूषण वाटतें, व अशा डागांपासून उत्पन्न झालेली कुरूपता पुरूषांच्या सौंदर्याची परीक्षा करण्याचा ज्यांचा विशेष अधिकार; त्या स्त्रियांना ती कुरूपता न वाटतां, उलट ते डाग भूषणांसारखे वाटतात, व वाटणें नीट आहे. कारण ज्यांत जो गुण नसेल त्याला त्या गुणाचें मोठें कौतुक वाटतें. हा प्रकृतिनियम फार पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांच्या नजरेस येऊन गेला होता. स्त्रियांच्या अंगीं शौर्यभाव असल्यामुळें ज्यांच्या शरीरावर शौर्याचीं चिन्हें ढळढळीत दिसत असतील त्याकडे स्त्रियांचें मन ओढणें हा नैसर्गिक प्रकृतिधर्म होय. असें नसतें तर **डेस्डेमोना** आणि **ऑथेल्लो** हे नाटक आपणांस पराकाष्ठाचें नीरस वाटलें असतें. असो. शरीरावर नानाप्रकारच्या रंगांच्या वेलबुट्ट्या काढण्याचा प्रकार आजमितीस रसिक लोकांत जरी भूषणावह मानिला असला, व 'प्रियाकुचतटी' 'पत्रावली' 'काढण्याची रुढि भगवान् श्रीकृष्णापासून जरी आम्हांपर्यंत आली असली, तरी गोंदण्याची मूळ पद्धत जिंकलेल्या लोकांवर पराभवाची कांहीं तरी टिकाऊ निशाणी ठेऊन देण्याच्या बुद्धीनें शोधून काढिली असावी, असें मानण्यास विपुल पुरावा आहे. आमची उभीं आडवी गंधें व आमच्या बायकांचीं निरनिराळ्या तऱ्हांचीं कुंकवें, आमच्या गोपीचंदनाचे टिळे, आमच्या वैष्णवांच्या कृष्णरेषा आणि आमच्या शैवांचे भस्मार्चन- ही सारीं दास्यसूचक चिन्हें आहेत, असें वाटतें.

आतां आणखी एका आचाराविषयी अल्प उल्लेख करून हें बरेंच लांबलेलें **व्यवच्छेदनप्रकरण** आटपतों. हा आचार केशवपनाचा. सध्यां या शब्दाचा विशिष्ट अर्थ होऊन गतभर्तृकांचे जें वपन त्यासच केशवपन म्हणण्याची चाल पडली आहे. बाकी पुरुषांच्या वपनास, केशवपन कां म्हणूं नये हें समजत नाहीं. तथापि त्याबद्दल आम्ही वाद करीत बसत नाहीं. क्षौर हा दुसरा सामान्य शब्द चालण्यासारखा आहे. मृतपूर्वजांविषयी व त्यांपासून उत्पन्न झालेल्या देवतांविषयीं, आणि अगदीं जवळचे आप्त मेले असतां त्यांविषयीं आपलें प्रेम प्रगट करण्याकरतां केशांचें मुंडन करण्याचा विधि फार पुरातन व सार्वत्रिक आहे. ग्रीक लोकांत, रोमन लोकांत, अलीकडील ख्रिस्ती लोकांत- सारांश बहुतेक सर्व लोकांत या मुंडनविधीचें लिंगभेदाप्रमाणें व आश्रमभेदाप्रमाणें कमी अधिक वर्चस्व दृष्टीस पडतें.

कोठें दर महिन्यास किंवा पंधरवड्यास नखशिखांत वस्तरा चालविण्याची पद्धत आहे; कोठें कांहीं अपराधाबद्दल भिंवया व पांपण्या काढण्याचीच चाल आहे; कोठें अर्धे डोके, एक मिशी व अर्धी दाढी काढण्यांतच मोठी शिक्षा होतें असें मानतात; कोठें डोक्याच्या मध्यावर एक चंद्र केला म्हणजे काम होतें; कोठें प्रति पौर्णिमेस व अमावस्येस एक बट ठेऊन बाकीचे सारें डोकें व तोंड साफ करण्याचा प्रघात आहे; एकंदरीनें पहातां असें दिसून येतें की, शरीरावर वाढणाऱ्या या चिजेवर हवे ते प्रयोग केले, तरी शरीराला म्हणण्यासारखी बाधा होण्याचा संभव नाहीं असें पाहून, तें करण्यास फारशी दगदग व खर्च पडत नाहीं असें मनांत आणून, आणि त्याचें पीक फिरून फिरून येणारे आहे असें जाणून, बरीच सुधारणा झाली असतां; प्रत्येक राष्ट्रांत क्षौराच्या निरनिराळ्या तऱ्हांनी जेवढें स्वामित्व, जेवढें प्रेम, आणि जेवढी धार्मिकता व्यक्त करतां येईल तेवढी करण्याचा प्रघात पडतो, असें दिसतें. मिशांवर ताव देऊन घर्षण करणें, किंवा 'आमच्या मिशा खालीं' असें म्हणून पड घेणें- या सामाजिक आचारांत पुष्कळच इतिहास आहे! तेव्हां स्त्रियांचा केशकलाप उतरून त्यांना पतिप्रेम प्रगटविण्यास लावणें किंवा पतींसमक्ष उत्तर हिंदुस्थानांत त्यांच्याकडून वेणीदान करविणें, या अज्ञानमूलक पद्धति भरतखंडविशिष्टच आहेत असें नाहीं!

*

उपायन, कर, व बलिदान

लॉर्ड लिटन् यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानच्या खजिन्यांत जी कोटी दीड कोटीची तूट पडली ती अफगाणिस्थानच्या लोकांस दिलेल्या देणग्यांमुळें पडली, असें म्हणतात. जनरल **रॉबर्टस्** यांनी कंदाहारावर कूच करून जात असतां, अफगाणी लोकांस जितकें आपल्या शौर्यानें तितकेंच आपल्या औदार्यानें जेरीस आणिलें; अशी त्या वेळेस लोकवार्ता होती. अफगाणिस्थानच्या डोंगराळ प्रदेशांतील लोक अगदीं निर्धन असल्यामुळें, जेव्हां आमचे कमँडर-इन-चीफ कंदाहारच्या वाटेवर दोहों बाजूस तोडे फेंकीत चालले तेव्हां त्या लोभी कडव्या लोकांचें लक्ष ते गोळा करण्यांत व वांटून घेण्यांत व्यग्र होऊन गेलें, आणि आमच्या सेनापतीस अडथळा न होतां आपला मार्ग सुधारतां आला! या कर्णोपकर्णीं आलेल्या वार्तेंत तथ्य असो किंवा नसो, तीवरून एक सामान्य सिद्धांत असा निघतो कीं, उपायनांनी शत्रूंस कांहीं अंशीं वश करून घेतां येतें; आणि असें होणें स्वाभाविक आहे. पारितोषिकें, वायनें, दानें, उपहार आणि नझरा- हीं सर्व कसल्या तरी उपभोग्य वस्तूंचीं झालेलीं असतात. या उपभोग्य वस्तु प्राप्त झाल्या असतां, ज्यांस त्या प्राप्त होतात; त्यांनीं त्या देणारांवर सुप्रसन्न किंवा मेहेरबान व्हावें, हें स्वाभाविक आहे. शिवाय, अशा प्रकारच्या देणग्यांपासून आणखी एक गोष्ट व्यक्त होत असते ती ही कीं, त्या देणारा आपणास वचकतो असें त्या घेणारास वाटूं लागतें, आणि कांहीं अंशीं तें खरेंही असतें. ज्या कुत्र्यास पारध करण्यास शिकविलेली असते त्याला एखादे दिवशीं कांहीं सांपडलें नाहीं, तर तो निदान झाडाचें वाळलेलें पान किंवा एखादें चिपाड तरी तोंडांत धरून शेंपूट हालवीत हालवीत मोठ्या लाडानें धन्यास खुष करण्याचा प्रयत्न करील. यावरून काय दिसतें कीं, अप्रबुद्ध प्राण्यांत सुद्धां अशा रीतीनें वरिष्ठाची मर्जी सुप्रसन्न ठेवण्यास आपणाकडून होण्यासारखी खटपट करण्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. आम्हीं मनुष्यें एकमेकांस ज्या देणग्या देतों त्या मुख्यत: दोन कारणांसाठीं देतों; तीं कोणतीं म्हणाल; तर कोपशमन आणि स्नेहसंपादन. ज्याला कांहीं द्यावयाचें तो आपला शत्रु असल्यास त्यानें वैर विसरून जाऊन कोणत्याही प्रकारची पीडा देऊं नये अशा हेतूनें, किंवा जो मित्र असेल त्यानें प्रसंगविशेषीं उपयोगी पडावें

म्हणून आपण पदरमोड करून व स्वतःस झीज लावून घेऊन कधीं कधीं शत्रूस व मित्रास नझरा पाठवितों. एकदां अशा कारणास्तव नझरा पाठविण्याची चाल रूढ झाली, म्हणजे त्या कितीही अल्प मोलाच्या किंवा शुष्क असल्या तरी चालतात. फार काय सांगावें, अशा कामास एखादा खडा, गवताची काडी, तुटलेला केंस, किंवा लांकडाची ढलपीसुद्धां बस्स होते. पेरू येथील डोंगरावर ओझीं चढवणारे हमाल डोंगराच्या माथ्यावर येऊन पोहोंचले म्हणजे ओझीं उतरून टाकतात, आणि शैलाधिपति पचकामक देवास अशी प्रार्थना करितात कीं, "हे प्रभो, त्वां आम्हांस या ओझ्यासकट सुरक्षितपणें वर आणिलें, याबद्दल आम्हीं तुझे फार आभारी आहों, व या तुझ्या उपकारांतून मुक्त होण्यासाठी हे आम्ही आपल्या भिंवईचे केंस तुला अर्पण करतों"- असें म्हणून प्रत्येकजण आपापल्या भिंवईचा एकेक केंस उपटून टाकतो! या देशांतही कित्येक ठिकाणी डोंगर चढून गेल्यावर खडा उचलून टाकण्याची वहिवाट आहे, व अशा खड्यांचे मोठमोठाले ढीग जमलेले आहेत, हें पुष्कळांच्या पाहण्यांत व ऐकण्यांत आलें असेल. देणग्या देणें आणि त्या घेणें, हा आचार प्रथम दोन अथवा अधिक विषम व्यक्तीत सुरू होतो, व पुढें तो समव्यक्तींतही पसरत जातो. कुळांनीं जमिनीच्या मालकांस, प्रजांनी राजांस, भक्तांनीं देवांस, शिष्यांनीं गुरूंस- अशा रीतीनें दक्षिणा देण्याचा आणि घेण्याचा प्रघात पडतो. पुढें एका दर्जाच्या मित्रमित्रांतही त्या देण्याघेण्याचा प्रचार पडतो. दसऱ्याचें शुष्क सोनें, थोर लहानांस व लहान थोरांस देतात व घेतात. संक्रांतीच्या 'शर्करावगुंठित' तिळांचीही तशीच स्थिति आहे. पण वाढणीं पाठविणें, लग्नास किंवा मुंजीस आहेर देणें, दिवाळीस ओंवाळण्या घालणें, आंब्यांच्या डाल्या धाडणें, एकमेकांच्या मुलांस फटाकड्याच्या पेट्या आणि गांठ्या पाठवून देणें- हे आचार बरोबरीच्या लोकांत चालतात. **सुधारकाच्या** एडिटरानीं **लॉर्ड रे साहेबांस** अफुसाचे कांहीं निवडक दाणे पाठविले आणि ते त्यांनीं स्वीकारिले, किंवा **लेडी रे** नें **मिसेस आगरकरणीस** बाळंतविडा पाठविला, असे होण्याचा संभव नाहीं! अशा प्रकारची देवघेव **सर जेम्स फर्ग्यूसन** आणि **सरदार रा. ब. रास्ते** किंवा **लेडी रे** आणि **अक्कलकोटच्या** किंवा दुसऱ्या एखाद्या संस्थानच्या राणीसाहेब- अशांच्या दरम्यानच होऊं शकणार. अशा प्रकारच्या देणग्या ज्यांच्यामध्यें चालतात; ते परस्परांस एका पदवीचे समजत असून, त्यांचा एकमेकांशीं पुष्कळ घरोबाही झालेला असतो. न्हाणाच्या हळदकुंकवाचे बोलावणें भलत्याच घरीं जावयाचें नाहीं, भलत्याच ठिकाणचें वाढणें यावयाचें नाहीं!

येथपर्यंत या आचाराच्या सामाजिक स्वरूपाचें दिग्दर्शन झालें. आतां याला

राज्यप्रकरणांत व धर्मप्रकरणांत कसें वळण लागतें हें थोडक्यांत दाखवूं. वर दर्शविल्यासारखे सामाजिक आचार रूढ झाले म्हणजे त्यांपासून समाजस्थितीस अनुसरून राज्याचार व धर्माचार पडूं लागतात. ज्या लोकांची स्थिति पशुतुल्य आहे व ज्यांना देवतांची किंवा पिशाचांची कल्पना नाहीं, अशांत देवतांस किंवा पिशाचांस बलि मिळण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे. पण त्यांच्या कल्पना येऊं लागल्या कीं, त्यांसंबंधीनें या आचारांचा प्रादुर्भाव होतो. देवता आणि राजा या दोहोंपैकी आधी उपायनें कोणास देण्यांत येऊं लागतात, याचा निश्चय बरोबर करतां येत नाहीं; तथापि केवळ वन्यावस्थेंतून पार पडलेल्या उत्तर ध्रुवाजवळच्या **एस्किमो** लोकांसारख्या लोकांच्या स्थितीवरून असे दिसतें कीं, मनुष्याच्या मनांत राज्याच्या आणि राजाच्या कल्पना येण्यापूर्वी पिशाचांच्या व देवतांच्या कल्पना येऊं लागणें शक्य आहे. म्हणून कर, खंडणी, करभार यांच्या अगोदर बलिप्रदानें अस्तित्वांत येण्याचा संभव आहे. तसेंच हेंही घ्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, ज्याप्रमाणें देवतांच्या व पिशाचांच्या कल्पना येण्यापूर्वी त्यांस बलि देण्याचा प्रचार पडण्याचा संभव नसतो, त्याप्रमाणें ज्या लोकांत 'राजा' म्हणून कोणी एक इतरांहून कमी-अधिक श्रेष्ठ मानिलेली अशी व्यक्ति जेथपर्यंत अस्तित्वांत आलेली नसते; तेथपर्यंत त्या लोकांत राजभाग, राजांश, सरकार देणें, कर, खंडणी, सरकारदंड- असल्या कल्पना किंवा तदनुरोधी विचार अस्तित्वांत येण्याचा संभव नाही. पुनः याच विचाराच्या ओघांत असतां वाचकांच्या लक्षांत हेंही येऊन जाईल कीं, ज्या देशांत एकसत्ताक राज्य कधींच स्थापण्यांत आलें नाहीं, किंवा आलें असून जेथें लोकसत्ताक राज्याची लौकरच स्थापना झाली, अशा देशांत या राजकीय देणग्यांची जी पद्धत असते; ती ज्या देशांत एकसत्ता फार प्रबल आहे अशा देशांतील राजोपहारपद्धतीहून पराकाष्ठेची भिन्न व क्षीण असते.पाटिलकुळकरण्यांनीं हप्ते गोळा करून नेमल्या तारखेस तालुक्याच्या मामलेदार कचेरींत पोतें हजर करणें- ही अलीकडील कर घेण्याची पद्धत पूर्वीपासून अंमलांत आहे, असें समजणें फार मोठी चूक आहे; तसेंच, असले कर गोळा करण्यासाठीं आतांच्या मामलतदारांसारखे दोन-दोनशें रुपये दरमहाचे अधिकारी फार प्राचीन कालापासून आपापल्या राजासाठीं कर गोळा करीत आहेत; असें समजणें, हेंही चूक आहे. समाज अत्यंत संकुचित किंवा मर्यादित असला, आणि त्याला नाण्याचा उपयोग ठाऊक नसला, म्हणजे त्यांत अशा प्रकारें राजभाग जमविण्याची चाल कोठून असणार? समाजाच्या प्रथमावस्थेंत राजा म्हणजे एक विशेष बलवान् व चतुर पुरुष असतो. समाजांतल्या समाजांत जे तंटेबखेडे होतील ते मध्यस्थ होऊन कधीं बुद्धिबलानें व कधी बाहुबलानें तोडणें, व दुसऱ्या जातीचा हल्ला आला असतां

स्वजातीचें पुढारीपण पत्करून त्या अरिष्टांतून तिचा बचाव करणें- हें राजाचें मुख्य कर्तव्य. अशा समाजांत; सामान्य प्रजेच्या आणि राजाच्या बाह्य स्थितींत म्हणण्यासारखें अंतर नसतें. राजाला तिऱ्हाइताचें व अग्रणीचें काम करावें लागत असल्यामुळें तो इतरांहून थोडासा श्रेष्ठ गणला जात असतो, व त्याच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या चरितार्थासाठीं समाजांतील प्रत्येक घरांतून कांहींना कांहीं तरी पोहोंचवावें लागत असतें. जो जें पिकवीत असेल, किंवा ज्याचा जो धंदा असेल त्यानें त्यानें आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग स्वसंतोषानें राजाला आणून द्यावा, अशी रीत प्रथम पडते; व पुढें या रीतींतील स्वातंत्र्य नाहींसें होऊन सत्ताधीनत्व येतें. तथापि जोंपर्यंत राष्ट्राचें क्षेत्रफल संकुचित असून त्यांतील लोकसंख्या एका जातीची व मर्यादित असते, तोंपर्यंत हें सत्ताधीनत्व फारसें कठिण वाटत नाहीं. परंतु एका जातीचा दुसऱ्या जातीशीं संग्राम होऊन मिश्र समाज उत्पन्न झाला, व राष्ट्र विस्तार आणि लोकसंख्या हीं वाढलीं म्हणजे ही सत्ताधीनता जाचूं लागते. अखेरीस जेव्हां हिंदुस्थानसारखा प्रचंड देश मोंगलांसारख्या एखाद्या शूर लोकांच्या अंमलांत येऊन त्यांत जिंकणारे आणि जिंकलेले असे दोन ठळक वर्ग होतात, तेव्हां राजास करभार देणें, हें स्वसंतोषावर बिलकुल अवलंबून राहीनासें होतें. बाबरासारख्या किंवा अकबरासारख्यासुद्धां एकट्या बादशहास येवढ्या देशावर राज्य करणें अशक्य असल्यामुळें त्याला ठिकठिकाणीं आपल्या प्रतिनिधींची स्थापना करावी लागते. या प्रतिनिधींनाही आपापले मुलूख आवरण्यासारखे नसल्यामुळें पोटप्रतिनिधि नेमावे लागतात. याप्रमाणें सार्वभौम बादशहापासून पेट्याच्या तहशीलदारापर्यंत एकाहून एक उतरत जाणाऱ्या अधिकाऱ्यांची परंपरा लागत जाते, आणि हे सर्व जिंकणाऱ्या लोकांपैकीं असल्यामुळें त्यांचा अंमल मोठ्या सक्तीनें चालतो. प्रत्येकास आपला व आपल्या तैनातीचा खर्च भागवून शिवाय वरच्या अधिकाऱ्यास बराच ऐवज प्रतिवर्षी भेट किंवा खंडणी म्हणून पोहोंचवायाचा असतो; व ज्याच्याकडून विशेष खंडणी येईल; त्याची बादशहाच्या दरबारांत तारीफ होऊन त्याची विशेष बढती होण्याचा संभव असल्यामुळें, व ज्याच्याकडून कमी खंडणी येईल त्यावर इतराजी होऊन त्याला बडतर्फी मिळण्याचा संभव असल्यामुळें; जो तो आपापल्या ताब्यांतील लोकांस जितकें नाडवेल तितकें नाडून आपली व बादशहाची तुंबडी जितकी भरवेल तितकी भरण्याचा प्रयत्न करीत असतो; आणि असें करण्यांत त्यास शस्त्रबलाचें भरपूर सहाय्य असल्यामुळे लोकांची पराकाष्ठेची जाचणूक होते. उत्पन्नाचा अमुक वाटा राजभाग, असा निर्बंध अशा स्थितींत बिलकुल चालत नाहीं. राजकिंकर, जितकी माया निघेल तितकी काढीत असतात. अशा प्रकारच्या संमिश्र समाजांत नाणें

चालूं असलें म्हणजे राजभाग उत्पन्नरूपाने न घेतां द्रव्यरूपानें घेण्याचा प्रघात पडतो, व या प्रघातामुळेंही प्रजेस फार त्रास होतो. राजाचें मागणें असेल तेवढी रक्कम जिवाच्या व भावी सुखाच्या आशेनें आपला माल जाईल त्या दरानें विकून उभी करावयाची, हें किती कष्टावह आहे बरें? तथापि अशा स्थितींतही मनुष्यें उत्पन्न करीत असतात व राजदेणें देत असतात! ब्रिटिश सरकारच्या पदरीं असलेल्या नोकरांचे पगार मोठे असल्यामुळें लांचलुचपतीचा प्रकार बेताबातानें चालतो. पूर्वी युरोपांत, अमेरिकेंत, व आशियांत सरकारी नोकरांस मुळींच पगार मिळत नसल्यामुळें किंवा अगदीं लहान मिळत असल्यामुळें त्यांना आपले पगार काढून शिवाय राजभाग काढावा लागत असे. यामुळें गांवच्या पाटलापासून थेट बादशहापर्यंत- ज्याला आपण अलीकडे लांच म्हणतो- तो सर्वत्र राजरोस घेण्यांत येत असे. प्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता लॉर्ड बेकन याची लांचखाऊपणाबद्दल प्रसिद्धी आहे. त्यावर स्पेन्सर साहेबाचें असें म्हणणें आहे कीं, ही त्यावेळची रीतच होती. साऱ्याच न्यायाधीशांस व इतर अधिकाऱ्यांस अशा रीतीने आपल्या पगाराची भरती करून घ्यावी लागत असे; व ती किती करावी, याला कोणत्याही प्रकारची ठरीव इयत्ता नसल्यामुळें कांहींकडून योग्य मर्यादेचें उल्लंघन होई, यांत कांहीं नवल नाहीं. आमचेकडील कांहीं नेटीव संस्थानांत व कित्येक रेल्वे कंपन्यांत आज या स्थितीचें जिवंत उदाहरण सांपडेल. तात्पर्य काय कीं, प्रथमावस्थेंत स्वसंतोषानें देण्याचीं जीं स्वल्प राजोपायनें असतात, त्यांपासून अखेरीस कर, तिजोरी, आणि नोकरांचें पगार या तीन गोष्टी उत्पन्न होतात.

हें राजकीय जमाबंदीचें प्रकरण नीट समजलें असतां, देवस्थानें आणि त्यांचीं उत्पन्नें कशीं अस्तित्वांत येतात, हें समजणें मुळीच कठीण नाहीं. सध्यां पृथ्वीच्या पाठीवर जे रानटी, अर्धवट सुधारलेले व पूर्ण सुधारलेले लोक आहेत, त्यांच्या सांप्रत स्थितीचा आणि पूर्वापार इतिहासाचा विचार केला असतां स्पष्टपणें असें दिसून येतें कीं, ज्याला आपण सध्यां बलि म्हणतों, म्हणजे देवताभाग म्हणतो, त्याची उत्पत्ति सामान्य उपायनांपासून म्हणजे सामाजिक देणग्यांपासून झाली आहे. देवतांची कल्पना महापुरुषांच्या पिशाचांपासून आली असल्यामुळें व पिशाचांचे व्यवहार जिवंत मनुष्याप्रमाणेंच चालतात असा प्राथमिक लोकांचा विश्वास असल्यामुळें, ज्याप्रमाणें बैल, घोडीं, कुत्रीं, ससे, कोंबडीं वगैरे जनावरें जिवंत राजास नजर करण्यांत येतात, त्याप्रमाणें तीं त्यांच्या थडग्यावर, त्यांच्या पिशाचांच्या चरितार्थासाठी कापण्यांत येतात; व त्याच पिशाचांपासून निर्माण झालेले जे महापिशाच म्हणजे देव; त्याच्या मंदिरांत म्हणजे देवळांतही या प्राण्यांचा संहार करण्यांत येतो. शिजलेल्या अन्नाच्या राजास मेजवान्या देतात; तें त्यांच्या

थडग्यांत किंवा चितेंत घालतात, आणि देवांपुढें नैवेद्यरूपानें मांडतात; सदर्हूप्रमाणें नव्या नवाळीची नजर जिवंत राजाला, मृतराजाला, व देवाला करतात. आवळे, चिंचा, मोहोर वगैरे देवास वाहण्याच्या प्रचाराची आंठवण वाचकांस दिली पाहिजे, असे नाहीं. दूध, तूप, मध, रस, ताडी, मदिरा, सोम इत्यादिकांचीं वायनें अशीं नृपतीला व मृतपितरांना, त्याप्रमाणेंच देवांनाही अर्पण करतात. ज्याप्रमाणें जिवंत राजापुढें व मृतपितरांपुढें, त्याप्रमाणेंच देवापुढेंही धूपदीप जाळायचें आणि गंधदान करावयाचें! सारांश राजा, राजवाडा आणि राजभाग; मेलेले पितर, थडगी किंवा चिता आणि श्राद्धान्न; व देव, देवालयें, आणि बलि अथवा नैवेद्य- या तीन त्रयींत पराकाष्ठेचें साम्य आहे. यांपैकीं पहिलीपासून दुसरीचे, आणि दुसरीपासून तिसरीचे विधि व आचार अनुकरणानें अस्तित्वांत आले आहेत. तेव्हां राजवाड्यांत ज्याप्रमाणें राजसेवकांची; त्याप्रमाणें देवांच्या भोंवतीं गुरवांची, बडव्यांची, आणि गयावळांची गर्दी असते, आणि राजस्थानाप्रमाणें देवस्थानांचाही थाट उठून जाऊन ती शेंकडों वर्षे अव्याहत चालतात, यांत कांहीं नवल नाहीं.

*

भेटी, देवदर्शनें व यात्रा

आपल्या भाषेंतील 'भेट' हा शब्द द्व्यर्थी आहे. 'भेट' म्हणजे एकानें दुसऱ्याकडे जाणें, हा एक अर्थ. तसेंच जातांना देण्याकरितां बरोबर घेतलेली किंवा न जातां एकानें दुसऱ्यास धाडून दिलेली जी वस्तु, तिलाही 'भेट' म्हणतात. मागल्या लेखांत या दुसऱ्या अर्थाच्या भेटी पाठविण्याचा प्रघात कसा पडत जातो, हें सांगितलें आहे. आतां 'भेटीच्या' पहिल्या अर्थाच्या संबंधाने थोडेसें लिहावयाचें आहे.

उपायनें; विशेषत: कनिष्ठाकडून वरिष्ठास देण्यांत येतात हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां हीं नेऊन देण्यासाठी कनिष्ठांनीं वरिष्ठाचे घरी जाण्याची चाल पडते हें स्वाभाविक आहे. राजाकडे किंवा देवाकडे रिक्त हस्तांनीं जाऊं नये, अशी सामान्य शास्त्राज्ञा किंवा फार प्राचीन कालापासून चालत आलेला संप्रदाय आहे. यावरून ज्या देशांत किंवा लोकांत राजसत्ता स्थापन झाली नाहीं, किंवा ज्यांना मेलेल्या आप्तांस किंवा त्यांपासून निर्माण होणाऱ्या देवतांस बलिसमर्पण केलें पाहिजे, असें वाटूं लागलेलें नाहीं, त्यांमध्यें एकानें दुसऱ्याकडे भेटण्यास जाण्याची चाल असण्याचा संभव नाहीं. आतां भेट घेण्यांत नेहमीं 'मी तुमचा किंकर किंवा आज्ञाधारक सेवक आहे' असें दाखविण्याचाच हेतु असतो असें नाहीं. कनिष्ठांनी वरिष्ठांविषयीं आपली निष्ठा प्रदर्शित करण्यासाठीं जाणें, हा भेटीचा मुख्य हेतु खरा. परंतु अलीकडे दुसऱ्याही अनेक कारणांसाठी एकमेकांच्या भेटी घेण्यांत येतात. आपणांपैकी एखादा जिज्ञासु मनुष्य इंग्लंडांत गेला असतां **स्पेन्सरसारखा** तत्त्ववेत्ता किंवा **ग्लॅडस्टनसारखा** लोकाग्रणी घरीं वागतो कसा, अभ्यास करतो कसा, सामान्य लोकांशीं बोलतो कसा, वगैरे गोष्टी प्रत्यक्ष पहाण्याच्या इराद्यानें त्याला भेटण्यास जाईल; तसेंच, कोणा एखाद्या मनुष्यास दुसऱ्याच्या वर्तनांत विशेष दोष असल्यास त्याला तो दाखविण्यासाठी त्याची भेट घेणें इष्ट वाटेल; किंवा एखाद्या परोपकारी सुखवस्तू गृहस्थाला कोणी मनुष्य संकटांत पडला आहे असें समजल्याबरोबर त्यास मदत करण्याची बुद्धि होऊन त्याच्या घरीं जावेसें वाटेल. तेव्हां अलीकडील प्रत्येक भेटींत प्रणिपातपूर्वक प्रभुभक्तिप्रदर्शनाचा आशय असतो, असें म्हणता येणार नाहीं. तथापि 'भेट'

घेण्याची मूळ चाल पडण्यास श्रेष्ठाला अभिवंदन करून त्याची मर्जी आपणावर सुप्रसन्न करून घेण्याची इच्छा कारण झाली असावी असें दिसते.

उत्तर ध्रुवाजवळच्या एस्किमोसारख्या ज्या लोकांत राजपुरुष अस्तित्वांत आलेला नाहीं, त्यांत भेटीचा संप्रदाय फार स्वल्प आहे किंवा मुळींच नाहीं, असें त्यांविषयीं चौकस प्रवाश्यांनी प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून दिसतें. एकंदरीनें पाहतां भेटी घेण्याचा प्रचार मिश्र समाजांत फार दृष्टीस पडतो. एकाच जातीच्या लोकांनीं आपल्यापैकीं एकास आपला राजा किंवा नायक केलें, तरी त्याविषयीं आपली निष्ठा प्रगट करण्यासाठीं त्याला वारंवार भेटण्यास जाण्याची चाल पडत नाही, व त्यालाही त्या गोष्टीची इतकी परवा वाटत नाहीं. पण मिश्र समाजाची तशी गोष्ट नाहीं. एका जातीच्या लोकांनीं दुसऱ्या जातीच्या लोकांस जिंकिलें असतां, जिंकणाऱ्या जातीच्या लोकांस, जितजातीचे लोक व विशेषत: त्यांचे नायक राजनिष्ठ आहेत किंवा नाहींत, हें पहाणें विशेष अगत्याचें असतें. यामुळें मिश्र समाजांत मुख्य नायकास म्हणजे राजास किंवा बादशहास उपनायकांनीं म्हणजे मांडलिकांनीं वारंवार भेटण्यास जाण्याचा प्रघात पडतो. दिल्लीचे मोंगल बादशहा किंवा पेशवे मोठमोठाले दरबार भरवून मांडलिकांकडून नजराणे घेत व त्यांना पोषाख देत, हे सर्वांस ठाऊक आहेच. सध्याही राणीच्या वाढदिवसास इलाख्यांचे गर्व्हनर व हिंदुस्थानचे व्हाइसरॉय दरबार भरवून कित्येकांस पोषाख व पदव्या देतात, आणि मधूनमधून नॉनऑफिशीअल लोकांच्या भेटी घेण्यासाठीं छोटेखानी दरबार किंवा लेव्ही करतात, त्यांचें इंगित तरी हेंच आहे. राजदरबारांत हजर राहून स्वामीस मुजरा करणें आणि नजराणा देणें यात 'मी तुमचा दास आहे, मला तुमचा अंमल मान्य आहे, व मी तुमच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची फंदफितुरी करण्यांत गुतलों नाहीं' असें दाखविण्यासारखें होय; निदान भेटीस येणाऱ्याच्या बाह्य वर्तनावरून तरी तसें अनुमान करणें भाग पडतें. त्याच्या उलट, बोलावणें गेलें असून जो दरबारास आला नाही, किंवा ज्यानें नजराणा पाठविला नाहीं अशाच्या मनांत कांहीं तरी पापबुद्धि उत्पन्न झाली आहे असा तर्क होऊं लागतो, व सर्व मांडलिकांस सक्तीनें दरबारांस बोलावून आणून त्यांच्याकडून नजराणे घेण्याचा आणि त्यास राजधानींत कांहीं दिवस रहाण्यास लावण्याचा प्रघात पडतो. या कामासाठी बादशहा व राजधिराजे पाहिजे तितका खर्च करण्यास तयार असतात; पण एकूण एक मांडलिकानें वर्षांतून एकदोन वेळ तरी राजदरबारीं येऊन आपली स्वामिभक्तीची हजीरी द्यावी, असें त्यांस वाटत असतें. पर्वांपर्यंत जपानांतील सरदारांस किंवा मांडलिकांस आपापल्या जहागिरींत वर्षांतील बारा महिन्यांपैकीं फक्त सहा महिने घालविण्याची परवागनी असे. दुसरे सहा महिने

त्यांनीं येड्डो येथें घालवून प्रपंचसुख अनुभवावें असा निर्बंध असे. प्रपंचसुख असें म्हणण्याचें कारण असें कीं, या सरदारांनीं बंडखोर न व्हावें म्हणून त्यांचीं बायकामुलें 'ओलीस' म्हणून नेहमीं राजधानींत ठेवलेली असत! आपल्या मिजासखोर मोंगल बादशहांच्या अंमलांत तर या प्रचाराच्या हास्यास्पदतेची कमाल होऊन गेली होती. या बादशहांपैकीं कित्येकांच्या अमदानींत ठरीव सरदारांनीं दिवसांतून दोन वेळां, म्हणजे सकाळीं अकरा वाजण्याचे सुमारास न्यायनिवाडा चालला असतां, व रात्रीचे दहाचे सुमारास राजकीय प्रकरणांची वाटाघाट होत असतां, तख्ताधिपतीस सलाम करण्यास आलेंच पाहिजे, असा नियम असे! कोणास ही कदाचित अतिशयोक्ति वाटेल; पण जम्मू व काश्मीर येथें ही प्रात्याहिक द्विवार प्रणिपातपद्धति आजमितीस जागृत आहे. तसेंच आमच्या एका मित्रानें एकदां आम्हांस असें सांगितल्याचें स्मरतें कीं, बडोद्यासारख्या इंग्रजी धर्तीवर आलेल्या संस्थानांतही असे कांहीं वृद्ध राजभक्त आहेत कीं, महाराज राजधानींत असोत किंवा नसोत, त्यांना वाड्यांत जाऊन महाराजांच्या गादीला, निदान वाड्याला तरी सकाळसंध्याकाळ मुजरा केल्याशिवाय अन्न गोड लागावयाचें नाहीं! असो. ज्या ठिकाणीं सर्वांनीं मुख्य नायकास किंवा राजास भेटण्यास येण्याची सोय नसते, त्याठिकाणीं त्यांनीं त्यांच्या प्रतिनिधींस व मंत्र्यांस भेटावें असें ठरविलेलें असतें; म्हणजे मांडलिकांनी महाराजांस भेटावें व सामान्य लोकांनीं मंत्र्यांस भेटावें, असा नियम होतो; व हाच नियम थोड्याशा भेदानें येथेंही जे दरबार प्रतिवर्षीं भरविण्यांत येतात, त्यांत दृष्टीस पडतो.

मोठमोठे राजे आणि त्यांचे मांडलिक यांच्या अन्योन्य भेटीचा हा प्रकार झाला. त्यांचेंच अनुकरण इतर पदवींचे लोक करतात. कनिष्ठानें वरिष्ठास भेटण्यास जावें हा साधारण नियम; जर वरिष्ठ कधीं कनिष्ठास भेटावयास गेला तर तो अनुग्रह समजावयाचा. कर्जदारांनीं सावकारास, कुळांनीं जमीनदारास, पक्षकारांनीं वकिलास, शिष्यांनीं गुरूस, धाकट्या भावांनीं वडील भावास, मुलांनीं मातापितरांस, खालच्या अधिकाऱ्यांनी वरच्या अधिकाऱ्यास व सांसारिकांनी परमार्थरतास भेटण्यास जावें, अशी पद्धत सर्वत्र पडली आहे, व हिचें उल्लंघन चांगल्या कारणांशिवाय कोठेंही होत नाहीं. दसऱ्यासारख्या किंवा संक्रांतीसारख्या सणास प्रत्येक वर्गांतील मोठमोठ्या लोकांनीं बिछायती घालून व उजव्या किंवा डाव्या बाजूस पानसुपारीचीं ताटें ठेवून भेटीस येणाऱ्या मंडळीची वाट पहात बसावें, हा या सणांस एकमेकांच्या भेटी घेण्याचा जुना प्रकार होय. यांत अलीकडे बरेंच अंतर झालें आहे, व पुढें याहूनही अधिक होण्याचा संभव आहे. कारण सुधारलेल्या किंवा सुधारूं लागलेल्या देशांत एक प्रकारची समता वाढत असते,

व या समतेमुळें एका पक्षाची पूजनीयता आणि दुसऱ्या पक्षाची पूजकता यांचा हळूं हळूं लोप होत असतो. समाजरचनेची आद्यबंधनें बलात्कारात्मक असतात, व जोंपर्यंत किंवा ज्या बाबतींत हें बलात्कारतत्व जारीनें अंमलांत असतें, तोंपर्यंत व त्या बाबतींत कनिष्ठांचा वरिष्ठांशी वर सांगितल्याप्रमाणें व्यवहार चालतो. युरोपांतील सुधारलेल्या देशांत आजमितीस लष्करी खात्यांतील अधिकाऱ्यांचे एकमेकांशी वागण्याचे जे नियम आहेत, ते इतर खात्यातील नियमांपेक्षां कमी सक्तीचे आहेत. ज्या देशांत एकसत्ता प्रबल असते त्यांतील आचारांची रहाटी बऱ्याच अंशीं लष्कराच्या रहाटीसारखी असते, असे म्हणण्यास हरकत नाहीं. एकसत्ता क्षीण होत जाऊन लोकसत्ता प्रबल होत गेली, आणि लोकांत ज्ञानाचा आणि संपत्तीचा बराच प्रसार झाला म्हणजे बलात्कारतत्व लयास जाऊन संमतितत्त्व तत्स्थानापन्न होतें, आणि तसें झालें म्हणजे सामाजिक व राजकीय आचारांस समतेचें वळण लागूं लागतें. धर्मासंबंधानेंही अशाच प्रकारची स्थित्यंतरें होत जातात, पण त्यांस थोडासा अधिक काळ लागतो. धर्माचार राज्याचारांच्या अगोदर अस्तित्वांत येऊन त्यांचें वैरूप्यही त्यापेक्षां सावकाशीनें नाहीसें होतें. राजाच्या अगोदर देवाची कल्पना येत असल्यामुळें व देव हा राजाहून मोठा मानिला असल्यामुळे; राजाविषयीं पूज्यबुद्धि नाहींशीं झाली तरी देवाविषयी ती नाहींशीं होत नाहीं, व राजे आणि राजवाडे पंचत्वाप्रत गेले तरी देवालयांत जाऊन प्रार्थना करण्याची पद्धत सुरू असते. धर्मसंबंधाचें बरेंच ज्ञान वाढलें तर एवढाच भेद होतो कीं, शुद्ध पाषाणास किंवा मनुष्याकृति पाषाणमूर्तीस देव कल्पून व त्यांचे ठाई मनुष्य स्वभावासारख्या देवस्वभावाची कल्पना करून, मनुष्याच्या अन्तर्बाह्येंद्रियांस ज्या गोष्टींनीं समाधान व आनंद होतात, त्याच गोष्टींनीं शिलाकर देवतांसही संतोष होत असेल, असें मानणें बरोबर नाहीं असे वाटूं लागून, सजीव व निर्जीव पदार्थांच्या बलिप्रदानानें त्यांचें अर्चन करून त्यांस सुप्रसन्न करून घेण्याचा प्रघात मागें पडत जातो, व मूर्तिशून्य अशा मंदिरांत नियमित काळीं व दिवशीं; निराकार परमेश्वरास प्रेमपूर्वक डोळे मिटून, हात जोडून, गुढगे टेंकून व प्रणिपात करून भजण्याची व स्तवण्याची पद्धति सुरू होते. ख्रिस्तीधर्म, मुसलमानी धर्म व इकडील कांहीं धर्मपंथ अशा प्रकारचे आहेत. मूर्तिपूजेचा लय होऊन निराकार ईश्वररूपाचें ध्यान होऊं लागणें, हें धर्माचें बरेंच उन्नत स्वरूप होय यात संशय नाहीं. तरी हें स्वरूप त्यास प्राप्त झालें असतांहीं, तद्नुयायांस मूर्तिपूजाकालांत लागलेल्या साऱ्या सवई नाहींशा होत नाहींत. ख्रिस्ती व मुसलमान लोकांनीं फक्त मूर्तिपूजा काय ती टाकली आहे; बाकी त्यांचे इतर धर्माचार बऱ्याच अंशीं आम्हा मूर्तिपूजकांच्या धर्माचारासारखे आहेत. जातमेतादिकांच्या संस्कारांचें

बंड जसें आम्हांत तसें त्यांतही अद्यापि बरेंच आहे. धर्माधिकाऱ्यांचें वर्चस्व जसें आमच्या इकडील अज्ञ लोकांवर व स्त्रियांवर अजून जबर आहे, तसें तिकडेही आहे. इकडील भाविक जसे प्रत्येक दिवशीं देवदर्शनास जातात, त्याप्रमाणें प्रत्येक दिवशीं मशिदींत जाऊन नमाझ पढणारे व चर्चात जाऊन प्रेअर करणारे भाविक त्यांच्यातही आहेत. ज्याप्रमाणें देवास भेटण्यास व भजण्यास घरापेक्षां देऊळ विशेष सोईचें आहे असें आम्हांस वाटतें, त्याप्रमाणें ख्रिस्त्यांस व मुसलमानांसही वाटतें. पवित्र भूमीस यात्रा करण्याची उत्कंठा क्रूसवाल्यांच्या अंत:करणांत एकदा जेवढी प्रबल होती, तेवढी आतां नाहीं हें कबूल केलें पाहिजे; पण श्रीकाशीस जाऊ इच्छिणाऱ्या भाविक हिंदूंची संख्या मक्केस जाऊं इच्छिणाऱ्या महंमदीयांच्या संख्येपेक्षां जास्त असेल असें आम्हांस वाटत नाहीं. कदाचित् जातिभेदाच्या व परधर्मीयांकडून धर्मांतर करविण्याच्या वगैरे संबंधानें मुसलमान व ख्रिस्ती धर्मांस विशेष श्रेष्ठत्व आलें आहे असें कित्येकांचें म्हणणें असेल, व कदाचित तें बरोबरही असेल; त्याविषयीं आम्हांस कांहीं एक म्हणावयाचें नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, धर्मसंबंधीं सारतत्त्वें, ठोकळ समजुती, आणि सामान्य आचार आम्हां तिन्ही लोकांत सारखेच आहेत व देवाच्या भेटीस जाण्याचा म्हणजे देवदर्शन घेण्याचा आचार आजमितीस आम्हांत जितका रूढ आहे, तितकाच त्या दोन, मूर्तीस न भजणाऱ्या, लोकांतही आहे. ख्रिस्ती लोकांत अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळे यात्रांचा नाद बराच कमी झाला आहे, व चर्चला जाणाऱ्यांची संख्याही प्रतिवर्षी कमी होत आहे. ह्या स्थित्यंतराच्या बरेवाईटपणाविषयीं अभिप्राय येथें देण्याचें कारण नाहीं. येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, ज्या ज्ञानामुळें ख्रिस्ती लोकांच्या धर्मवृत्तींत असा बदल झाला आहे, तेंच ज्ञान इकडे पसरलें, (व पसरणार याविषयी यत्किंचित् संशय दिसत नाही) तर या देशातील लोकांच्या धर्मवृत्तींतही तसें स्थित्यंतर होणें अपरिहार्य आहे.

*

पुण्याचे लोकांनो, सावध व्हा, सावध व्हा

आज सर्व महाराष्ट्रभर तुमची कीर्ति दुमदुमत आहे ती कां? तुमच्या अंगी स्वदेशाभिमान, बुद्धिमत्ता, वक्तृत्व, स्पष्टवक्तेपणा, स्वातंत्र्य इत्यादि अनेक गुण वास करीत होते म्हणून? कोणत्याही शहराची कीर्ति, त्यांतील जे पांचचार सुशिक्षित गृहस्थ असतात, त्यांवर अवलंबून असते. त्याप्रमाणें तुमचीही होती. परंतु आतां मात्र ती एका उदार, बुद्धिमान, सहिष्णू, सुशील, परोपकारी व तुमच्याविषयीं रात्रंदिवस कळकळ बाळगणाऱ्या पुरुषावर अवलंबून आहे. जर तुमच्या दुर्दैवानें अशा महंतास बाहेर जाणें भाग पडलें, तर तुमची स्थिति काय होणार? तुम्हांला तर चटोरपणाची, अपमान करण्याची, कृतघ्नपणाची इतकी संवय लागून गेली आहे कीं थेट वामनरावापासून तों विनाकारण बी. ए. पर्यंत असें करण्यांत तुम्हाला गौरव वाटतो. विद्येनें, अधिकारानें, संपत्तीनें, सहिष्णुत्वानें व इतर पुष्कळ नैसर्गिक गुणांनीं तुमच्याहून जे श्रेष्ठ त्यांची विटंबना करणें, अवहेलना करणें (व ती कोणाकडून? ज्या पोरांना विद्येचा गंध नाही, देशसुधारणा, देशसेवा, सामाजिक सुधारणा अशा विषयांवर ज्यांना मत देण्यास अधिकार पोहोंचत नाही अशा पोरांकडून) या सारखें महत् पातक दुसरें कोणतें? आज धडधडीत आपण डोळ्यांनी पाहतों कीं, पुण्यांतील एक हिरा जर गमावला तर तसा किंवा तशासारखा दुसरा मिळणें म्हणजे कोण पंचाईत! कृष्णशास्त्री, केरूनाना, विष्णुशास्त्री, माधवराव कुंटे असे लोक; निर्घृण काल एका पाठीमागून एक बलात्कारेंकरून नेत आहे. अशा लोकांच्या मरणाने समाजबंधनाच्या अत्यावश्यक साखळ्या अचानक गळून पडताहेत. अशी स्थिति असतां अजून देखील तुम्ही जागें होऊं नये काय?अशा खिण्डी तुमच्या शहरांत पडतांना पाहून तुम्ही स्वस्थ बसणें, किंवा झालेल्या स्थित्यंतराची कल्पना सुद्धां तुमच्या मनांत न येणें हें कोणच्या स्थितीचें दर्शक होय बरें? अशी कल्पना करा की, गांवांत एक परदेशाहून विद्वान मनुष्य आला व त्याला इकडील वादग्रस्त विषयावर माहिती करून घ्यावयाची आहे. तर तुमच्या गावात पांचचार लोक आहेत कां; कीं ज्यांचीं मतें कांहीं विषयावर ठाम झालीं आहेत? वाचाळपणा पुण्यांत तर इतका माजला आहे कीं, वाटेल त्यानें वाटेल त्या विषयावर बोलावें व यथेच्छ तोंडसुख घ्यावें. असा पुरुष

एखादा सांपडेल कीं, जो विषयासंबंधानें पूर्ण माहिती मिळवून बोलेल, बाकी केनसाहेबांसारखे गृहस्थ येवोत, आमची पुण्यांतील मंडळी त्यांच्याजवळ सुद्धां बाता झोडायला तयार! फॉरेस्टसंबंधानें माहिती विचारा, कीं उठलेच आमच्यांतले एखादे व दिली माहिती २-३ वाक्यांत ठोकून! अबकारी खात्यासंबंधानें काय, जमाबंदी काय, मिठासंबंधानें काय, माहिती म्हणजे ओतप्रोत. माहिती इतकी भरपूर कीं, वर्तमानपत्र चालविण्याची तर कधींच पंचाईत पडत नाहीं.

पुण्यांतील लोकांनो, ज्यांना ज्यांना म्हणून तुमची आंतली माहिती आहे ते सर्व तुमची दिखाऊ विद्वत्ता पाहून गालांतल्या गालांत हांसतात. कांहीं लोकांना तर तुमचा वृथाभिमान, पोकळ गर्व व वरकांती विद्या पाहून तिटकारा येतो. बरें इतकेंही असून बढाई कोण? ह्याला काय येतें, त्याला काय येतें, तो कोण शहाणा, त्याचेंच का ऐकावें, अशी तर घमंडी. विचारवैचित्र्य व विचारस्वातंत्र्य यांशिवाय मनुष्याची उन्नति व्हावयाची नाहीं हें खरें. परंतु एवढ्याचकरितां मनुष्यानें बहकत सुटणें, हें माणुसकीचें काम नव्हे. केवळ विषयांची पूर्ण माहिती म्हणजे विषयसर्वस्व नव्हे; हीही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ही झाली शिक्षण मिळालेल्या लोकांची स्थिति.

मध्यमप्रतीचे शिक्षण मिळालेल्या लोकांची स्थिति याहूनही भयंकर आहे. मोठ्या माणसास भरसभेंत बेजबाब करणें, वडील माणसांचा मान न राखणें, अश्लील शब्द उच्चारणें, अर्थाचा अनर्थ करणें ह्या गुणांचें आदिपीठ पुणें शहर होऊन बसलें आहे. पुण्यांतील लोकांनों, अजून तरी जागे व्हा, आम्ही पुण्यपत्तनवासी आहोंत, असें म्हणण्याची देखील लोकांस शरम वाटूं लागली. बाहेरगांवच्या लोकांना तुमची किंमत कळून चुकली. ऐरिश लोकांना जसा कोअर्शन आक्ट लावला, तसा येथील लोकांना लावला तर कांहीं चांगला परिणाम झाला तर होईल. कांहीं सुशिक्षित लोकांचा जसा समज आहे की, हा परिणाम शिक्षणाचा नव्हे! इतिहासांत हें शिक्षण मिळतें, कां गणितांत मिळतें, कां रसायन शास्त्रांत मिळतें, असें ते विचारतात. त्यांना उत्तर येवढेंच कीं, तें हिराबागेंत मिळतें. हल्लींची पुण्याची स्थिति आफ्रिकेंतील कोणच्याही रानटी शहरापेक्षा अधिक चांगली आहे असें म्हणावयाला आज कांहीं जागा नाहीं. कोणच्याही संभावित मनुष्याला किंवा स्त्रीला तुमच्या शहरच्या समाजापुढें येऊन बोलावें असें कधींही वाटणार नाहीं. तुम्ही ही आपली भयंकर स्थिति ओळखून सुधारण्याचा प्रयत्न जर न कराल; तर याचा परिणाम याहूनही भयंकर होईल. मुळीं, हीच स्थिति सुधारण्याला पांच चार वर्षें लागतील. ज्यांना ज्यांना म्हणून पंडिता रमाबाईचे हिराबागेंतील व्याख्यानाची आठवण होईल, त्यांच्या अंगांवर रोमांचच उभे

राहतील, व पुण्यातील उच्च प्रतीचे ब्राह्मणाला विद्येनें अतिशय मागसलेल्या लोकांत सांपडणाऱ्या अश्लील शब्दांचे बाळकडूच दिलें आहे, अशी पक्की खातरी होईल. स्त्रीशिक्षणास लोकांची संमति असो किंवा नसो. ६०-७० कोसांवरून ह्या विदुषी बाई इतर देशांत स्त्रियांनीं कसकसे पराक्रम केले हे सांगण्यास मुद्दाम आल्या; पण त्यांचें भाषण सावधान चित्तानें ऐकून घेण्याइतका देखील सभ्यपणा पुण्यांत (जें विद्येचें माहेरघर असें लोक म्हणतात!!) नसावा ही गोष्ट फार लाजिरवाणी आहे. शहाण्या लोकांची अशी समजूत आहे कीं, पुरुषसमाजामध्ये स्त्रिया असल्या म्हणजे पुरुषांवर एक प्रकारचा दाब असतो. अनीतीचे शब्द स्त्रियांपुढें उच्चारण्यास त्यास शरम वाटते. पण आमच्या पुण्याची स्थिति त्याहून अगदी उलट; कारण पुण्याचे लोक पडले फार शहाणे. अशा वेळी त्यांच्या नीतीला उमाळा फुटतो.

जोंपर्यंत स्त्रीजातीविषयीं व स्त्रियांच्या असाधारण गुणांबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नाही, जोंपर्यंत स्त्री म्हणजे प्रजाजननयंत्र होय, जोंपर्यंत स्त्री तुमची दासी होय, तोंपर्यंत हा उद्दामपणा व बेशरमपणा जाणें फार कठिण आहे. लोकशिक्षणाकरिता ज्यांचें जनन; अशी पुण्यांतील कांहीं वर्तमानपत्रें निलाजरेपणाच्या व तिरस्करणीय कृत्यांवर पांघरूण घालतात, व कांहीं तर पाठ थोपटतात व म्हणतात कीं, वाहवारे बच्च्यांनो, गाजिवलीत आज, राखलीत बाजू!! धन्य तुमची!! आज आपल्या शहराचा वा मातापितराचा उद्धार केलात. कोण भयंकर स्थिति ही! 'ज्ञानप्रकाश'सारखे म्हणतात कीं, जरी बागेत दाटीमुळें गडबड झाली तरी लोकांचें वर्तन काहीं वाईट नव्हतें. बरोबरच आहे. दाटी होती म्हणून अश्लील शब्द पोरें बोललीं व शहाणे लोक (!!) हासले!!! बाकी पुण्याचे लोक फार गरीब व नीतिमान!! असो. ज्ञानप्रकाश जेथें पडतो, तेथें ही स्थिति! जर लोकांना खरोखर त्या सर्व गोष्टींबद्दल वाईट वाटत असलें, जर त्यांना आपल्या मुलाबाळांची काळजी असली, व जर आपल्या जुनाट व नामांकित शहराची कीर्ति राखावयाची असली, तर लवकर जागे व्हा, व आपली शोचनीय स्थिति सुधारा.

*

आमची एक दुष्ट खोड : आळस

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः।

समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक व्यापारवृद्धि आहे, व तो होण्यास उत्पादक उद्योग वाढला पाहिजे, हे मागे सांगितलें. पण दुर्दैवानें आमच्या येथें उत्पादक उद्योगाविषयींच रड आहे असें नाहीं; अनुत्पादक उद्योगाची सुद्धां आम्हांस म्हणण्यासारखी हौस नाहीं. आपण ज्या स्थितींत उपजलों असूं, ती स्थिति कसेंही करून आपणांस कायम ठेवतां आली; म्हणजे आपण कृतकृत्य झालों असा आपल्यापैकीं बहुतेकांचा समज असतो. असलेल्या स्थितीहून चांगली स्थिति यावी, अशी इच्छा करणारे पुष्कळ आहेत, पण ती प्राप्त होण्यासारखे, परिश्रम करणारे इसम शेंकडा पांच सुद्धां मिळणार नाहींत. उत्पादक श्रम म्हणजे काय; राष्ट्राची संपत्ति वाढण्यास त्या श्रमांची अवश्यकता किती आहे; वगैरे गोष्टी सुधारलेल्या राष्ट्रांतील साऱ्याच लोकांस समजत असतात असें नाहीं. पण त्या सर्वांत एक विशेष दिसून येत असतो, तो हा; कीं येथील वयांत आलेला प्रत्येक इसम रात्रंदिवस कष्ट करण्यांत चूर होऊन गेलेला असतो. लोकांत उद्योग करण्याची हौस व संवय असली म्हणजे त्यांच्या उद्योगास चांगलें वळण लावून देऊन तो फायदेशीर होईल असें करणें कठिण नाही. तें काम विचारी लोकांचें आहे, व तें त्यांस सहज करतां येतें. पण सारी जी अडचण येऊन पडते ती आळसांत मौज वाटणाऱ्या लोकांस ती वाटेनाशी कशी होईल, येथें आहे. मागल्या लेखांत असें म्हटलें आहे कीं, आमच्या लोकांस अंमलदारीचा फार षोक आहे. केवळ उद्योगदृष्टीनेंच पाहिलें, तर हा षोक दूषणीय आहे असें नाहीं. जर्मन लोकांनाही सरकारी नोकऱ्यांचें असेंच वेड आहे. पण त्यांत व आम्हांत जो मोठा भेद आहे तो हा कीं, **व्हॉन जेफकेन्** सरकारी नोकर असला तरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत इराणीवारूप्रमाणें जिवाकडे न पहातां काबाडकष्ट करीत असतो! आमच्या लोकांची तशी गोष्ट नाहीं. आमच्या सेवाचिकीर्षु उमेदवारांत जी थोडीशी उद्योगपरायणता दिसून येते ती कोठपर्यंत? तर अंमलदारीचा हुकूम मिळेतोंपर्यंत. "अमक्या अमक्या ठिकाणीं तुम्हांस सबजज्ज किंवा मामलतदार नेमिलें आहे." असा हुकूम हातीं पडला कीं, आमच्या इकडील सरकारी नोकरांच्या रावसाहेबी

खाल्यास आरंभ झाला! नोकरीवर रुजूं होण्यापूर्वी पहिला विचार काय कीं, परीक्षेंत पसार होण्यासाठीं कुटून काढलेल्या पुस्तकांची वाट कशी लावावी? कां ती कोणांस देऊन टाकावीं, कां त्यांचा गठ्ठा करून तो कोठें तरी गाडून टाकावा, का त्यांची आताराच्या घरीं रवानगी करावी, कां त्यांचा पाण्यानें किंवा विस्तवानें मागमूस नाहींसा करावा? यांपैकीं एखाद्या पद्धतीनें ज्यांच्या समागमांत रात्रीच्या रात्री घालविल्या, व ज्यांना पोटच्या पोराप्रमाणें हातावर व पोटावर खेळविलें, आणि ज्यांच्या साहाय्यानें दोन पैसे कमाविण्याची अक्कल आली, त्यांची वाट लावल्यावर नोकरीवर हजर व्हावयाचें! आणि ही हजीरी मंजूर होऊन सरकारी ग्याझेटांत नांव दाखल झालें कीं, संसारसमरभूमींत आपण विजयाचा झेंडा लाविला, असें या नादान वीरास वाटतें. येथून पुढें केलेल्या कष्टांचें फळ भोगण्याशिवाय, आपणांस कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, अशी त्यांची वृत्ति होते आणि सुखोपभोगाशिवाय दुसरें कांहीं करावयाचें नाहीं असा त्यांचा निर्धार होतो. आधुनिक सुशिक्षित तरुण सरकारी नोकरांचें हें चित्र फाजील काढलें आहे, असें कोणास वाटणार आहे; आणि खरोखरीच तें तसें असेल तर आम्ही आपली चुकी कबूल करून ती केल्याबद्दल त्यांची क्षमा मागूं; पण तसें करण्यापूर्वी त्यांनीं ती आमच्या पदरांत घातली पाहिजे. कांहीं व्यक्तींचें वर्तन अपवादक असेल. पण आम्ही जें येथें लिहीत आहों तें व्यक्तींच्या संबंधानें नाहीं; वर्गाच्या संबंधानें आहे. आणि अशा रीतीनें या गोष्टीचा विचार केला असतां, वरील लिहिण्यांत अतिशयोक्ति आहे, असें कोणासही वाटणार नाहीं. सध्यां आमच्या न्यायखात्यांत आणि जमाबंदीखात्यांत खासे खासे अनेक सुशिक्षित तरुण आहेत, त्यांपैकीं पुष्कळांना, विशेषत: न्यायखात्यांतील इसमांना, युनिव्हर्सिटीच्या पदव्या मिळालेल्या आहेत. राष्ट्रोन्नति म्हणजे काय; ती होते कशानें; जीं राष्ट्रें लयास गेलीं तीं कशानें गेलीं; आमचें डोकें वर निघण्यास आम्हांस काय केलें पाहिजे, वगैरे गोष्टींचें ज्ञान ज्याला झालेलें नाहीं, असा मनुष्य या सेवाकुल तरुणांच्या समुदायांत एकही सांपडणार नाहीं. असें असून नोकरी कायम राहण्यास, किंवा फार झालें तर बढती होण्यास लागणाऱ्या अपरिहार्य उद्योगाशिवाय अधिक उद्योग करणारे इसम, येवढ्या सुशिक्षितांच्या तांड्यांत किती आहेत? कचेरींत पुढें आलेलें काम कसें तरी उडवून द्यावें; शिरस्तेदारांवर दरोबस्त जबाबदारी टाकून नि:शंकपणे पुढें आणिलेल्या प्रकरणावर लहान मोठीं कोंबडीं करावी; हुजुरांतून आलेल्या हुकमांची वाट जेमतेम लावावी, आणि वरिष्ठ अधिकारी तपासणीस आला असतां त्याच्या भोंवतीं भोंवतीं घिरट्या घालून, होईल तितक्या उत्तम रीतीनें त्याची सरबराई ठेऊन वेळ मारून न्यावी, ही यांची कर्तव्यकल्पना! अगोदर उशीरानें

उठावयाचें; नंतर शौचास जाण्यापूर्वी बराच वेळ विड्या फुंकण्यांत, चिलमी ओढण्यांत, किंवा तंबाखू चोळण्यांत जावयाचा! मुखमार्जन आटोपल्यावर संतानसमुदायासह तरुण कुटुंबिनीशीं सुखसंलाप करीत करीत चहापान करावयाचें किंवा कांहीं फराळ उरकावयाचा! हा प्रकार आटोपल्यावर पुन: एकदां पान तंबाखूचा बार भरावयाचा! तों कचेरींतला कोणी तरी कारकून प्रकरणें घेऊन येतो. मग बोलत बोलत त्यांवर सह्या करण्याच्या कामास सुरुवात व्हावयाची, व हें बरेंच वेळ चालावयाचें. हें चाललें असतां कोणी भेटावयास आलें तर त्याच्याशीं बोलणें; धोबी, कोष्टी, वाणी, मारवाडी, कडबेवाला, लाकुडवाला, वगैरे कोणी आला असल्यास किंवा बोलावून आणला असल्यास, त्याच्याशीं घासघीस चालावयाची! या घासाघिशींत मधून मधून अधिकाराची थोडीशी जरब दाखवावयाची, व तसें करण्यास पुढें असलेल्या कारकुनाकडून, शिपायाकडून, व इतर गृहस्थांकडून, अनुमोदन व प्रोत्साहन मिळत असावयाचें! अशा थाटांत तास दोन तास घालवून पुढें स्नानास उठावयाचें. स्नानभोजन व पानतंबाखू आटोपल्यावर बायकोमुलांशीं गप्पा मारीत कांहीं वेळ काढावयाचा, किंवा थोडीशी वामकुक्षी घ्यावयाची! नंतर कचेरीस जाण्याचा विचार! तेथलें काम करण्याच्या पद्धतीचा वर उल्लेख केलाच आहे. संध्याकाळीं घरीं परत आल्यावर जेवणाच्या अगोदर व मागून घरांतल्या किंवा बाहेरच्या माणसांशीं गप्पा मारावयाच्या, किंवा विशेष संघट्टनांतले येणारे जाणारे स्नेही असल्यास गंजिफांस, सोगट्यांस किंवा इस्पिकांस उदार आश्रय द्यावयाचा! अशा प्रकारें आमचे बहुतेक तरुण रावसाहेब आपला कालक्रम करीत असतात, असें आम्ही उघड उघड सांगतों. नाहीं म्हणण्यास कोणाची छाती असेल तर त्यानें नांवानिशीं पुढें यावें. फार झालें तर मामलतदारांच्या वतीनें या पद्धतींत आणखी एक कलम चढवावें लागेल, तें हें कीं, त्यांना घोड्यावर स्वार होऊन फिरावें लागतें; त्यामुळें त्यांचें उपभोगयंत्र मुनसिफांच्या यंत्राप्रमाणें एकसारखें चालत नाहीं. अशा प्रकारच्या आयुष्यक्रमांत सुख मानून तद्नुसार वागणाऱ्या आत्मवंचक रावसाहेबांचीं सुशिक्षित मनें गंजत असतात, व शरीरांस मांद्य येऊन त्यांना अनेक व्याधि जडत असतात, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत सुद्धां येत नाहीं! सतत स्त्रीसांनिध्यामुळें कोणाची कामवासना मंद झालेली असते, ती प्रज्वलित कोणत्या उपायांनीं होईल अशा पंचायतीत कांहीं जण पडलेले असतात; कित्येकांस अग्निमांद्यानें घेरलें असल्यामुळें क्षुत्क्षोभ कशानें होईल अशी चिंता लागलेली असते; सारांश, कोणास मधुमेह, कोणास जीर्णज्वर, कोणास मस्तकशूल, कोणास विस्तृत यकृत् याप्रमाणें या विषयसुखरत निरुद्योगी रावसाहेबांपैकीं, बहुतेकांच्या पाठीमागें कांहींना कांहीं तरी लचांड लागलेलें असतें!

अशापासून विशेष त्रास होऊं लागला कीं, घ्या 'सिक लिव्ह' आणि पळा पुण्यास अथवा मुंबईस! किंवा जे कोणी येथल्या किंवा मुंबईच्या प्रसिद्ध डॉक्टरांकडे वारंवार जात येत असतील, त्यांच्या पहाण्यांत असले दोंदील, फिकट, कृश, उत्साहशून्य, व किरकिर करणारे पुष्कळ रावसाहेब येत असतील असें आमचें अनुमान आहे, व तें बहुशः खोटें होणार नाहीं, अशी आमच्या स्वल्प माहितीवरून आमची खातरी आहे. सामान्य सुखांचा अभिलाष करणाऱ्या आमच्या तरुण सुशिक्षित अंमलदारांची ही गोष्ट झाली. हे बहुशः मोठ्या दुर्व्यसनापासून अलिप्त असतात. यांचे वर्तन निरुपद्रवी असतें. आपल्याकडून होईल तितका चोख न्याय करण्यास हे झटत असतात. बायकोपोरांस यांच्या सहवासांत मोठें सुख असतें. एकंदरींत निरुद्योगाशिवाय म्हणण्यासारखें व्यसन यांचे अंगी नसल्यामुळें त्यांची अंमलदारी लोकांस त्रासदायक होत नाही. पण याखेरीज अंमलदाराचा आणखी एक वर्ग आहे. त्यांत दोन तीन प्रकारचे लोक येतात; शिकलेले, अर्धवट शिकलेले, व मुळींच न शिकलेले, यांपैकीं शेवटले पहिल्या पिढींतले आहेत. या जुन्या खोडांपैकीं कांहींचें वर्तन अनुकरणीय असेल याबद्दल आम्हांस शंका नाहीं. पण सामान्यपणें हे सारे वृद्धकपी, आणि यांच्या जोडीचे कांहीं शिकलेले व कांहीं अर्धवट शिकलेले अंमलदार असे आहेत कीं, त्यांचे नांव काढले असतां भीति उत्पन्न होते. यांपैकीं कांहींस द्रव्यलोभानें वेडावून सोडिलेलें असते; कांहीं पराकाष्ठेचे कामुक असतात; व कांहींना कटिशूळाची जबरदस्त व्यथा असून, शिवाय बाटलीबाईची विशेष भक्ति असते. लक्ष्मी, स्त्री, आणि मदिरा यांपैकी एकीनें जरी एखाद्यास मनापासून धरले असले तरी देखील त्याची किती थोड्या काळांत धुळधाण होऊन जाते. हें सर्वांस ठाऊक आहेच. तेव्हां जे कोणी एकसमयावच्छेदेंकरून या तिन्ही हडळींच्या झपाट्यांत सांपडत असतील, त्यांची किती दुर्दशा होत असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. या तिघींनीं ज्यास गळ घातला आहे अशा कोणत्या मनुष्याची अब्रु, संपत्ति, किंवा शरीरप्रकृति फार वर्षें नीट राहिली आहे? क्राफर्डप्रकरणामुळें कांहीं शिकलेल्या मामलतदारांचीं नांवें पुढें येऊन त्यांचा मोठा दुर्लौकिक झाला आहे, व नानाप्रकारचे लोक त्यांस नानाप्रकारचे दोष देत आहेत. पण वास्तविक पाहिलें तर यांपैकीं बहुतेकांचा अपराध किती स्वल्प आहे बरें! आपली नोकरी राहण्यासाठीं लांच देण्यास सिद्ध होणें ही गोष्ट वाईट नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं. पण बेशरम व लोभी वरिष्ठ अधिकाऱ्यानें तो देण्याबद्दल चाप लाविला असतां, तो देत नाही असें साफ म्हणणाऱ्यांच्या अंगीं अमानुष धैर्यच असलें पाहिजे; आणि तें सामान्य मनुष्यांच्या अंगीं नसल्याबद्दल त्यांस विशेष दोष देणें न्याय्य नाहीं; कारण तशा प्रकारचें

धैर्य थोड्यांच्या अंगींच असतें. शिवाय, ही मंडळी पुढें न येती तर हें विलक्षण प्रकरण सरकारास आपल्या हातीं मुळींच न घेतां येतें, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. इतकें करून मग त्यांस जेवढा दोष लावणें योग्य असेल तेवढा लावण्यास आम्ही तयार आहों. पण जर कोणी हा स्वल्प अपराध करून, शिवाय लांच खाणारे व दुसऱ्यांच्या स्त्रीधनाचा अपहार करणारे मदिरासक्त अंमलदार रेव्हिन्यू खात्यात, जुडीशीयल खात्यांत किंवा दुसऱ्या कोणत्याही खात्यांत असतील, तर त्यांस काय शिक्षा करावी, हें कोण सांगूं शकणार आहे? असल्या राक्षसी अंमलदारांकडून उत्पादक श्रम होऊन देशाचा व्यापार व संपत्ति वाढण्याची कल्पना स्वप्नांत तरी आणितां येईल काय? यांच्या दुर्वर्तनामुळें यांच्या कुटुंबास व यांच्या ताब्यांतील रयतेस तर अनन्वित पीडा भोगावी लागतेच, पण कधीं कधीं इतरांस सुद्धां हे अनेक प्रकारें त्रासदायक होतात. असल्या अधिकाऱ्यांहून आळशी अधिकारी शेंकडोंपट बरे. सबब ज्यांच्या मनांत देशोन्नति व्हावी असें असेल त्यांनीं अशांचें निर्मूलन करण्यास अगोदर झटले पाहिजे. हे नाहीसे झाल्याशिवाय व्यापार व संपत्ति वाढण्याचा संभव नाहीं.

*

ही दगलबाजी नव्हे काय?

मुंबई सरकारानें क्राफर्डप्रकरण हाती घेतल्यापासून त्याचा शेवट होईपर्यंत जें करावयाचें तें सेक्रेटरी ऑफ स्टेट व हिंदुस्थान सरकार यांस कळवून करावयाचें, असा परिपाठ ठेवला होता. कांहीं विशेष करावयाचें झालें कीं तारा सुटत, व प्रत्येक डाकेला कच्च्या हकीकतीचें पुडकें इंग्लंडास रवाना होत असे. क्राफर्डविरुद्ध जे साक्षीदार आणावयाचे त्यांना त्यांच्या अपराधाची पूर्ण माफी करण्याचें अभिवचन दिल्याखेरीज ते पुढें येणार नाहींत, असें मुंबई सरकारास वाटल्याबरोबर, त्यांनी तसें करून ती गोष्ट तारेनें व डाकेनें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कानावर घातली. त्या वेळेस त्या हपिसरानें मुंबई सरकारच्या करण्यात कोणत्याही प्रकारच्या प्रतिषेध केला नाहीं. लांच दिला, असें आपण होऊन कबूल करणारे मामलतदार नोकरींत ठेवणें बरोबर नाहीं, असें सेक्रेटरी ऑफ स्टेटचें मत होतें, तर त्याच वेळेस त्यांनीं मुंबई सरकारास अशी उलट तार पाठवायाची होती कीं, अशा प्रकारें माफी देणें बरोबर नाहीं; कारण तसें केलें असतां आपल्या तोंडानें आपला अपराध कबूल करणारे मामलतदार नोकरीवर ठेवावे लागणार आहेत, व तसें होणें इष्ट नाहीं. पण त्यावेळेस सेक्रेटरीची स्वारी मूक राहिली. कारण त्या वेळेस मुंबई सरकारास तुम्ही अशी माफी देऊं नका, असें म्हणणें म्हणजे मागल्या तीन गव्हर्नरांनी जी बेबंदशाही व लुटालूट आणूनबुजून चालू दिली होती, ती पुढेही चालूं देण्यास सेक्रेटरी ऑफ स्टेटची संमति आहे, असें झालें असतें, आणि त्यामुळें इंडिआ हपिसाच्या नांवानें फारच मोठा गवगवा झाला असता. अशा कारणामुळें **लॉर्ड क्रॉस** यांनीं त्यावेळीं मुंबई सरकारास वाटेल तें करूं दिलें, मामलतदारांकडून होण्यासारखा फायदा करून घेतला, क्राफर्ड साहेबाची बाताबेताची वाट लाविली, आणि आतां दिलेलीं अभिवचनें अक्षरशः खरीं करून दाखविण्याचा प्रसंग आल्याबरोबर, क्राफर्डपक्षीयांनी पार्लमेंटात व त्याच्या बाहेर केलेल्या काहुरास भिऊन जाऊन, लॉर्ड क्रॉस मुंबई सरकारावर उलटून पडत आहेत, ही दगलबाजी नव्हे काय? पूर्वीप्रमाणे इंग्लंडास पत्र जाण्यास वर्षसहामहिने लागते तर निराळी गोष्ट होती. पण तशा प्रकारची अडचण सध्या मुळींच नाहीं. रोजच्या रोज येथील हवी ती गोष्ट इंग्लंडास पोहोंचत आहे, व तिकडील येथें पोहोंचत आहे. या

क्राफर्ड प्रकरणांतील प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टीच्या संबंधानें एकमेकांस तारा पाठविण्यांत आल्या होत्या. त्यावेळेस लॉर्ड क्रॉस यांची न्यायबुद्धि झोपीं गेली होती काय? किंवा तिला कसला भ्रम झाला होता काय? आमच्या मतें लॉर्ड क्रॉसकडून या कामात अतिशय अप्रयोजकपणाचा विश्वासघात होत आहे. अगोदर तीनशें साडेतीनशें वर्षांचा जुना इंग्रजी कायदा आज आजमितीस येथें लागूं करणें हें अगदीं अयोग्य होय; पण कायदेवाल्यांच्या मताप्रमाणें तो लागू केला पाहिजे, असें घेऊन चाललो, तरी तो कोठें लावावा, आणि कोठें न लावावा, याचा निर्णय करण्यास हिंदुस्थान सरकारास अधिकार नाहीं असें नाहीं. कायद्यांचें पालन करण्यानें एकंदरींत कल्याण होतें, म्हणून तें करावयाचें. कायद्याच्या ज्या पालनानें हिताहून अहित फार होणार, तो कायदा बदलूं कां नये? ब्रिटिश पार्लमेंटानें योग्य प्रसंगीं तो बदलल्याचें उदाहरण आहे, व हिंदुस्थान सरकारानेंही या प्रसंगीं तसें करणें उचित आहे. याउप्पर आपणांविषयीं लोकांत बेभरंवसा आणि अप्रीति उत्पन्न करून घेण्याचा त्यांचा निश्चयच झाला असेल तर आमचा नाइलाज आहे.

*

शनिदेव उर्फ साडेसातीचा देव

शनैश्वराची मूर्ति काळी॥
तो जातीचा होय तेली॥
चरणपंगु सुरत चांगली॥
पूजा करी काळभैरवानी॥१॥
त्याची दृष्टि पडे जयावर॥
करी तयाचा चकनाचूर॥
अथवा कृपा करी जयावर॥
तयासि सर्व आनंद प्राप्त होय॥२॥

तात्याजी महिपतीकृत शनीमाहात्म्य.

हे सूर्यतनया, ग्रहश्रेष्ठा, शनीश्वरा, तुझें उग्र व विशाल स्वरूप, तुझा भीमपराक्रम, व चराचरावर असलेला तुझा दरारा आम्हीं मर्त्य पामरांनी काय वर्णावा? स्वर्गस्थ देवगंधर्वापासून तों या क्षुद्र भूगोलावरील यःकश्चित् कीटकांपर्यंत तुझ्या झपाट्यांत सांपडला नाहीं असा कोण आहे? एका सव्वा प्रहरांत त्वां आपल्या पूज्य गुरूस कसा हात दाखविलास, हें कां आम्हांस अवगत नाही? फकिराचा वेष धारण करून त्वां गुरूस अर्पण केलेल्या खरबुजांचीं शिरकमलें झाल्यामुळें थोड्यांत चुकलें, नाहीं तर त्यावर सुळी जाण्याचाच प्रसंग येऊन बेतला होता! सर्वसंगपरित्याग करून, वैराग्याच्या वेषानें हिमाचलावर संचार करणारा गिरिजारमण तुझ्या भीतीनें दोन घटिका कैलासाच्या गूढ कंदरेंत लपून राहिला! श्रीरामचंद्रावर तुझी अवकृपा झाली तेव्हां त्याला वनवास प्राप्त झाला! भगवती जानकीस तुझी दशा आली तेव्हां लंकेश्वरानें तिला चोरून नेऊन तिच्या शुभ्र कीर्तिस लोकापवादकलंक लाविला! पुढें याच स्वारीवर तुझी वक्रदृष्टि झाली, तेव्हा कलहप्रिय नारदाच्या सांगण्यावरून त्यानें तुला उत्तान होऊं दिलें, व त्यासरशीं तुझ्या उरावरील त्याचा पाय निघून जाऊन तुझाच पाय त्याच्या उरावर बसला, व सहा महिन्यांत रामचंद्रानें परिवारासह त्याचें निर्दालन केलें! तूं हरिश्चंद्रास प्रतिकूल झालास, तेव्हां कौशिक मुनि हात धुऊन त्याच्या पाठीमागें लागल्यामुळें, तो राजा पदच्युत कसा झाला, त्यानें आपले स्त्रीपुत्र कसे विकले, व डोंबाच्या

घरीं त्यास किती दारुण यातना सोसाव्या लागल्या, हे पुराणांतही सुप्रसिद्ध आहे! तुझ्या अवकृपेमुळें नलदमयंतीस भोगावे लागलेले कष्ट ऐकून अद्यापिही अंगावर कांटा उभा राहतो! जेव्हां इंद्रावर आपली खैर मर्जी झाली, तेव्हां त्यास दुर्बुद्धि आठवून त्यानें गौतमाच्या जायेबरोबर कुकर्म केलें, आणि त्या पापाबद्दल ऋषीच्या शापानें आपली सुंदर काया भगांकित करून घेतली! तुझ्या तडाक्यांत सांपडल्यामुळें, चंद्राला गुरुपत्नीस स्पर्श करण्याची इच्छा झाली, व तीमुळें त्याने आपल्या पाठीमागें क्षयरोग लावून घेतला! तूं वसिष्ठास अनुकूळ नव्हतास, तेव्हां त्याचे शंभर पुत्र मृत्युमुखांत पडले, व पराशरास मत्स्यगंधोपभोगामुळें सुदुस्तर पीडा सोसावी लागली! जेव्हां पांडवास तूं द्वादशस्थानीं आलास, तेव्हां त्यांस द्यूतांत पडून स्त्री व राज्य गमावण्याची दुर्वासना झाली. इतकेंच नाहीं, तर बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगावा लागला! फार तर काय पण जेव्हां श्रीकृष्णपरमात्म्यावर तुझी करडी नजर फिरली तेव्हां त्यावर स्यमंतकमणि चोरल्याचा आळ आला!

वाचकहो, ज्या ग्रहानें देवदानवांची अशी दुर्दशा करून सोडिली त्यापुढें आम्हां मानवांची काय मात्रा चालणार आहे बरें? उपजल्याबरोबर अंजनीसुत पिकलें फळ म्हणून सूर्यास धरूं धांवला असें म्हणतात; हें राजश्री जनन्युदरांतून अवतरले नाहींत तोंच यांच्या **दृष्टीच्या** प्रचंड पराक्रमामुळें यांच्या पित्याच्या दिव्य शरीरलावण्याचा लोप होऊन, तें कष्टानें विकल झाले, त्याचा सारथी पांगळा झाला, व घोडे आंधळे झाले! आमचे राजे आम्हांस मोठे बलाढ्य वाटतात; पण ते एकदां शनीश्वराच्या साडेसातीच्या फेऱ्यांत सांपडले कीं कसे धुळीस मिळतात, हें ज्यास पहावयाचें असेल त्यानें **विक्रमचरित्र** वाचावें. या भाग्यशाली राजास जेव्हां शनीमहाराजांनी घेरलें तेव्हां त्यावर जसली संकटे ओढवली तसली आजपर्यंत कोणत्याही मर्त्यांवर ओढवली नसतील. बेअब्रू झालेल्या व बडतर्फ केलेल्या सगळ्याच मामलतदारांस बारावा शनी आला आहे, किंवा नाहीं हें आम्हांस ठाऊक नाहीं; पण त्यांपैकी एकाला तरी तो निष्ठुरतेनें छळीत आहे, व नोकरी जाण्याशिवाय आणखी अनेक दुःसह दुःखें त्यांवर आलीं आहेत; हें आम्हांस ठाऊक आहे. विक्रमाच्या दुःखांशीं त्याच्या दुःखांची तुलना केल्यास त्याच्या दुःखांस सुखेंच म्हणावें लागेल! विक्रमावर वैश्यकन्येचा मुक्ताहार चोरल्याचा आरोप शाबीत झाल्यामुळें तामलिंदापूरच्या चंद्रसेन राजानें त्याचे हातपाय तोडून त्यास वेशीबाहेर अन्नपाण्यावांचून उन्हांत होरपळत टाकावें, अशी शिक्षा दिली! मामलतदाराचे हातपाय कायम असून, त्यांस निदान पोटापुरते कॉंपिन्सेशन मिळणार आहे! पुढें विक्रमाची ग्रहदशा किंचित् फिरली तेव्हां

उज्जनींतील एका तेल्याची मुलगी तामलिंदापुरास आपल्या सासरीं जात असतां वेशीपाशीं तळमळत पडलेला विक्रम तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां तिनें त्याला ओळखून घरी नेलें आणि राजाज्ञेनें त्यास घाणा हाकण्याचें कामावर नेमिलें! आमच्या मामलतदारांची ग्रहदशा फिरली असल्यास, हिंदुस्थान सरकार त्यांस मेहतरकन्येनें विक्रमास सांगितलेल्या कामापेक्षां अधिक योग्यतेचें काम सांगेल, याविषयीं शंका नाहीं. शेवटीं विक्रमाची ग्रहदशा संपली. तेव्हां त्याचे हातपाय फिरून आले इतकेंच नाहीं; तर दीपरागाची तान घेतल्याबरोबर जिकडे तिकडे प्रकाशमय करून टाकणाऱ्या त्याच्या अलौकिक कंठमाधुर्यामुळें, राजा चंद्रसेनाची कन्या पद्मसेना एकाएकीं अनुरागबद्ध होऊन त्याची भार्या झाली, आणि तिच्यासह राजा विक्रम मालव प्रदेशीं परत येऊन, तीं उभयतां राज्योपभोग सुखानें घेऊ लागली! इकडे आपल्या मामलतदारांची ग्रहदशा संपली असेल, तर तेही पुन: अधिकाररूढ होऊन आपल्या मामलतींच्या स्वादुत्वाचें पुन: सेवन करूं लागतील अशी आम्ही आशा करतों! पण ही गोष्ट हटकून व्हावयाला पाहिजे असेल तर त्यांनीं शनी महात्म्यांत सांगितल्याप्रमाणें **सुधारकासारख्या** ब्राह्मणास दानभोजनादिकांनीं संतुष्ट केलें पाहिजे! कारण म्हटलें आहे:-

जप (पत्र?) कर्त्या ब्राह्मणांसी॥
शनैश्वररूप मानूनि त्यासी॥
दक्षिणा देऊनि पूजेसी॥
प्रसन्नचि करावें॥१॥
मग करावे ब्राह्मणभोजन॥
यथाशक्ति द्यावें दान॥
ब्राह्मण तृप्त होतां पूर्ण॥
संतोष पावे शनिदेव॥२॥

वाचकहो, किती झाला तरी तेलकट शनी ब्रह्मतेजापुढें काय करणार? निदान तात्या महिपतींनीं तरी त्याच्या माहात्म्यापेक्षां ब्राह्मणमाहात्म्य श्रेष्ठतर करून ठेविलें असल्यामुळें, ब्राह्मणकीस जो फायदा होत असेल, त्याबद्दल त्या वृत्तीवर अवलंबणाऱ्यांनी त्याचे उपकार मानून त्यास दुवा दिला पाहिजे हें उघड आहे!

असो, येथपर्यंत आम्हांसारख्या भाविक लोकांच्या ग्रहाविषयीं या ज्या समजुती आहेत, त्या थोडक्यांत सांगितल्या! आतां त्याच पद्धतीनें म्हणजे थोडक्यांतच अलीकडल्या सुधारलेल्या ज्योतिषांचे याविषयीं जें म्हणणें आहे तें सांगतो, आणि आरती करतों.

हा भूगोल सोडून जर आपण शनीवर गेलों तर येथें आपल्या मनाची जी

स्थिति कधीच होत नाहीं ती तेथें होईल. कां नाहीं होणार? शनी कांही सामान्य ग्रह नाहीं. आम्हांपासून त्याचें अंतर १०,००,००,००० मैल आहे, व आमच्या पृथ्वीसारख्या ७३४ पृथ्व्या एके ठिकाणीं कराव्या, तेव्हां त्याच्या विस्ताराची कल्पना होणार आहे! हा इतका मोठा आहे तरी आपल्या आंसाभोंवतीं इतक्या झपाट्यानें फिरत असतो कीं त्याची दिनप्रदक्षिणा **दहा तासांत** संपते! शनीच्या विषुववृत्तापासून सुमारें २०,००० मैलांवर त्याला वेष्टणारीं चापटीशीं व चकाकणारीं तीन वळीं किंवा वेढीं आहेत. या वेढ्यांस चापटीं असें म्हटलें आहे. कारण यांची जाडी दहापांच मैलांहून अधिक असेल असें वाटत नाहीं! इंग्रजींत या त्रिविध चक्रमालेस किंवा प्रभामंडलांस **रिंग्ज्** म्हणजे अंगठ्या म्हणतात. या आंगठ्यांचा व्यास १,६६,००० मैल आहे! या आंगठ्या स्थिर नाहींत. शनीच्या बिंबाबरोबर त्याही मोठ्या वेगानें परिभ्रमण करतात. या तीन विशाल प्रकाशपरिधींनींच शनीचा परिवार संपला असें नाही. आपणांस काय तो एक चंद्र आहे. शनीच्या निरनिराळ्या भागास निरनिराळ्या रात्रीं प्रकाशमय करणारे कमींतकमी आठ चंद्र आहेत! या अष्ट चंद्रांपैकीं जो शनीपासून अगदीं जवळ आहे तो त्याच्या मध्यापासून १,२०,००० मैलांवर आहे, व जो सर्वात दूर आहे, तो २२,९३,००० मैलांवर आहे. यावरून काय सिद्ध झालें कीं, कमींतकमी ४५ लक्ष मैलांचे व्यासाच्या वर्तलांत जें कांहीं सांपडेल त्यास शनी आपल्या आकर्षणपाशानें बद्ध करून, आपल्या सभोंवतीं अनंत काल घिरट्या घालण्यास लावणार!

भारतीय फलज्योतिष्यांनीं **गुरूस** ब्राह्मण व **शनीस** तेली असें म्हटलें आहे, यावरून जुन्या ज्योतिर्विदांपाशीं अलीकडील दुर्बिणीच्या भिंगासारखीं ''लहान वस्तु थोर'' दिसवणारीं भिंगें असावीं असा तर्क होतो. कारण अलीकडील मोठ्याशा दुर्बिणींतून गुरूकडे (Jupiter) पाहिलें असतां, त्याच्या बिंबावर तीन पदरी जानव्यासारखे तीन पट्टे दिसतात व शनीवार (Saturn) तर तेलाचा सारखा घाणा चालला असावा, असें दिसतें! शनीवर इतकें तेज व त्याच्या भोंवती फिरणारे इतके चंद्र असून, त्याच्या दूरत्वामुळें तो तेल्यासारख्या निस्तेज दिसतो, व मंदपणानें फिरतो, हें उघड आहे. **मिक्रोमेगस** नांवाचा कोणी एक प्रवासी शनीवरून पृथ्वीवर उतरला, तेव्हां त्याला ती वारुळाप्रमाणें दिसली, अशी जी ख्रिस्ती पुराणांत गोष्ट आहे, तीवरून या दोन गोलांच्या आकारांचें प्रमाण ध्यानांत येतें, सूर्याभोंवती शनीच्या प्रदक्षिणेस तीस वर्षें लागतात, म्हणजे आमच्यापेक्षां शनीवरील वर्ष तीसपट मोठें आहे, व त्याच मानांने तेथील ऋतुही मोठे आहेत. सात वर्षें चार महिनेपर्यंत पर्जन्यकाळ झाल्यावर तितक्याच लांबीचा हिवाळा येतो,

व तो आटपल्यावर, सुमारें सव्वासात सव्वासात वर्षे वसंत आणि ग्रीष्म यांचा अंमल असतो. शनी कन्याराशीस आला असतां अतिशय पीडा देतो, अशी युरोपांतील अडाणी लोकांचीही समजूत आहे.

येथपर्यंत या ग्रहाधिपतीचें तत्त्वविनोदात्मक जेवढें वर्णन या स्थलीं करणें उचित वाटलें तेवढें केलें. आतां पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्याची आरती करून त्याचा निरोप घेतो-

(जयदेव जयदेव जय पांडुरंगा- या चालीवर)

जय देव जय देव जय शनीराया॥
अज मज झाली बुद्धि तुजला वर्णाया॥जय.॥
भाविक शास्त्रज्ञांसी संमत अशि गाथा॥
गाउनि चित्ताकर्षी केली तव कथा॥
यास्तव प्रसन्न होऊनि 'वर माग आता' ॥
ऐसें म्हणशिल तरी दे हें तत्त्वतां॥जय.॥
जे न सुधारका पढतील त्यांसी॥
त्याची वा किंमत न देती त्यांसी॥
राशीस येऊनी छळावेंगा देवा!॥
वद नाहीं नामी कां पत्र हें राया॥जय.॥
येथें बारा आणे मुंबापुरिं रुपया॥
फक्त दीड रुपया दुसऱ्या गांवींया॥
बंगींत मागतां पोष्टेजासकट॥
फक्त अठरा आणे, हें कां संकट?॥जय.॥
वाचुनि यातें जोडी जो तत्त्वज्ञानाला॥
संतती, संपत्ती, उद्गति दे त्याला॥
तैसेंच, यांतील विचार ज्या मान्य॥
त्या महाराष्ट्रीयां दे दे सुखदान ॥जय.॥

*

स्वयंवर

विदुषी म्हणे म्हणा जा जरि कथिलें म्यां परोपरी पण ती।
प्रणति प्रभूसि करिती अनुकंप्या मी स्वयंवरा म्हणती।।
गांधर्वेण विवाहेन बह्व्यो राजर्षिकन्यका:।
श्रूयन्ते परिणीतास्ता: पितृभिश्चाभिनंदिता:।।

कालेंकरून जो आचार रूढ झाला, तो किती अभेद्य असतो याचें उत्कृष्ट उदाहरण आमची अलीकडील विवाहपद्धति आहे. आमचा पूर्वीचा इतिहास, परक्या लोकांचें वर्तन, व आमची सांप्रत जागृत झालेली विचारपद्धति, हीं सारीं या अप्रशस्त चालीस प्रतिकूल आहेत, तरी आम्हांस ती झुगारून देण्याचें धैर्य होत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय! किंवा आश्चर्य तरी कसलें? "हा आमच्या वडिलांचा कूप, असें म्हणून खारें पाणी पीत बसणारे" आम्ही लोक आहों, तेव्हां जें रूढ झालें तें आम्हांस टाकवत नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. तथापि आमची प्रस्तुतची निकृष्टावस्था आम्हांस नको असेल; तर सर्वांच्या अगोदर या अत्यंत अपायकारक प्रघाताचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या खटपटीपासून अनेक फायदे होणार आहेत. ज्याप्रमाणें युरोपांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट या ख्रिस्ती धर्माच्या दोन पंथांत उत्पन्न झालेल्या वादापासून पुढें महत्त्वाचे अनेक परिणाम घडून आले, त्याप्रमाणें आज जर आपण जाणूनबुजून बालविवाह रद्द करण्याच्या कामीं झटूं लागलों तर त्यापासून अनेक महत्त्वाच्या गोष्टी निष्पन्न होणार आहेत. विचारानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून, वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका बाबींत केला असतां जें धैर्य अंगीं येतें, तेंच पुढें तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करतें; आणि ही दुसरी गोष्ट करतांना धैर्याचें भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळें, पहिल्या प्रसंगाहून विशेष सुलभ रीतीनें यश:प्राप्ति होते. याप्रमाणें एका गोष्टींत यश आलें, दुसरींत आलें, तिसरींत आलें, असें होतां होतां नवीन नवीन गोष्टी करण्याचें धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन, त्याचा पाहिजे त्या कामीं उपयोग करण्यास उल्हास वाटूं लागतो. उन्हाळ्याच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेणीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे; तें प्रत्येक

दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट तें कमी होऊं लागलें म्हणजेही भूमितिश्रेणीनेंच कमी होतें! ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो, त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एखाद्या व्यक्तीच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिकच ग्राशीत जाते! तेव्हां; बालविवाहावर निकराचा हल्ला करण्यानें प्रथम आम्हांत मानसिक धैर्य उत्पन्न होईल, व उत्तरोत्तर त्याची वृद्धि होत जाऊन इतर कामांकडेही त्याचा उपयोग करतां येऊं लागेल.

याशिवाय याच खटपटीनें दुसरा एक फायदा होणार आहे. तो हा कीं, आज जे आम्ही चोहोंकडून धर्मपाशांनीं अगदी जखडल्यासारखे झालों आहों, त्या आम्हांस त्याच्या 'आज्ञा कोठवर पाळाव्या' हें समजूं लागेल. बालविवाहाचें पूर्ण निर्मूलन आणि स्वयंवराची प्रस्थापना यांच्या दरम्यान बराच धर्मवाद उपस्थित होणार आहे, व तो करण्यानें पुढें पुष्कळ हित होणार आहे. बापाच्या घरीं मुलगी ऋतुस्नात होतां कामा नये, व ऋतुस्नात झालेल्या मुलीचें यथासांग गर्भाधान झालेंच पाहिजे, नाहीं तर उभय कुलांतील चाळीस पिढ्यांस दुर्गति प्राप्त होते, असल्या अजागळपणाच्या धर्मसमजुतींचा ऱ्हास; होईल तितक्या त्वरेनें होणें फार इष्ट आहे. असल्या वेडेपणाच्या समजुतींचा मोक्ष करण्यास पूर्वेतिहास आणि पूर्वाचार हे पुनः पुनः पुढें आणून त्यांचें फिरून अवलंबन करा असें सांगत न बसतां, अलीकडील न्यायाच्या भात्यांतून तीव्र बाण काढून त्यांचा त्यांवर संपात केला पाहिजे. कोणतेही आचार घालण्यास पूर्वींच्या ऋषींस जितका अधिकार होता, तितकाच आम्हांसही आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती, तितकीच आम्हांवरही आहे; व त्याच्याशीं त्यांचा संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी, किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें, तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनी घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेंच आम्ही पालन करणार, व अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार- अशा धर्तीवर हा वाद नेला पाहिजे, व अशा धर्तीवर तो नेल्यासच त्यापासून फायदा होणार आहे. एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषि हुडकींत बसण्यांत, व साऱ्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तसलें काम वे. झळकीकरांसारख्या शास्त्र्यांनीं

जुन्या पद्धतीच्या लोकांसाठी खुशाल करीत बसावें! कोणत्याही विषयाचा ऐतिहासिक पद्धतीनें ऊहापोह करण्यांत फायदा आहे; नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धति म्हणजे काय, हें मुळींच ठाऊक नाहीं. त्यांना असें वाटतें कीं, जगांत म्हणून जेवढें कांहीं ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूंकडे अंधार आहे! व त्यांना असें वाटणें हें कांहीं अंशीं स्वाभाविकही आहे. ज्याअर्थी दुसऱ्या भाषेंतील ज्ञानभांडारांचा गंधही त्यांस लागलेला नाहीं, त्याअर्थी त्यांना त्यांची महती कोठून कळणार? तेव्हां अर्थात् त्यांनीं आपल्यापाशीं असलेल्या छोटेखानी डबोल्यासच अखिल विश्वांतील संपत्तसमूह समजून त्यांच्या महत्त्वाचे व अद्वितीयत्वाचे पवाडे गात सुटावे, हें साहजिक आहे. पण ज्या आमचे डोळे उघडले आहेत; ज्या आम्हांस हिंदुस्थानच्या बाहेर देश आहेत, व संस्कृत ग्रंथांच्या बाहेर विद्या आहे, हें पक्कें समजत आहे; त्या आम्हींही संकुचित दर्शनाच्या शास्त्रीवैदिकांप्रमाणें किंवा अगदीं मूढ जनांप्रमाणें वागत सुटावें, ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे. तेव्हां बालविवाहाचें निर्दालन करण्याचा प्रयत्न आपण मनापासून आरंभिल्यास, बऱ्याच धर्मकल्पनांचें संशोधनही आपणांस करावें लागणार आहे; व या कामीं हें संशोधन करण्यास आरंभ केला, म्हणजे इतर गोष्टींतही तें करण्याची इच्छा होऊं लागेल, व विचाराच्या भट्टींत, धर्मांत शिरलेल्या हीण धातू खाक होऊन त्यांतील सारतत्त्वरूप बावन्नकशी सोनें मात्र मागें उरेल!

बालविवाहाचें खंडन म्हणजे स्वयंवराचे मंडन. तेव्हां अर्थात् जे बालविवाहास प्रतिकूल असतील, त्यांना स्वयंवरास प्रतिकूल असलेल्या लोकांच्या मतांचें समर्पक खंडन करतां आलें पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, बालविवाहापासून एकदम स्वयंवरावरच उडी कशाला मारावयाला पाहिजे? त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, जीं स्वयंवरें नाहींत त्या सर्वांस आम्ही बालविवाहच समजतों! ज्याचें त्यानें लग्न करणें म्हणजे स्वयंवर! एकाचें दुसऱ्यानें करणें म्हणजे बालविवाह! अर्धें स्वयंवर आणि अर्धा बालविवाह, अशी लग्नाची पद्धत शक्य नाही. कोणी असें म्हणतात कीं, फ्रान्स देशांत अशा प्रकारची विवाहपद्धति कांहीं वर्षांमागें रूढ होती. बापानें मुलाकरितां मुलगी पाहून ठेवावी, आणि मुलास ती पसंत झाल्यास तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा. किंवा मुलानें आपल्या मनाजोगी मुलगी पाहून ठेवावी, आणि ती बापास पसंत झाल्यास, तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, ही दिसण्यांत मध्यगामी पद्धत दिसते, व जे लोक बालविवाहांतून निघून स्वयंवराकडे येण्यास निघाले असतील, त्यांना कांहीं वर्षे या पद्धतीपाशी मुक्काम करावा लागत असे, असें वाटतें! आम्हांत एके कालीं स्वयंवरपद्धति अत्यंत

प्रचलित होती, अशाबद्दल पुष्कळ आधार आहे. आम्हांपैकीं बहुतेकांची लग्नें अकराच्या आंतील वयाच्या मुलीशीं झालीं असल्यामुळें, सध्यां येथें बालविवाहाची पद्धत अंमलांत आहे, याबद्दल पुरावा देण्याची मुळीच गरज नाहीं! एकदां आम्ही विवाहपर्वताच्या शिखरावर होतों; प्रस्तुत त्याच्या पायथ्याशीं येऊन पडलों आहों. पुन्हां वर चढून जावें, अशी कित्येकांना इच्छा होऊं लागली आहे; पण कित्येकांना असें वाटत आहे कीं, तसें करण्याचा प्रयत्न केला असतां, आम्हांस घेरी येऊन, किंवा आमचा पाय निसटून, आम्ही पुन्हा पायथ्याशीं गडबडत येऊन पडूं! तेव्हां कित्येकांचें असे म्हणणें पडतें कीं, आपणांला पायथाही नको आणि शिखरही नको; आपण आपले या पर्वताच्या मध्यप्रदेशाला धरून असावें! प्रथमदर्शनी हा सल्ला मोठा नामी दिसतो; व त्याप्रमाणे आचरण करण्यासही आमची कांहीं हरकत नाहीं. पण मनुष्यस्वभावाचें ज्यास अगदीं सामान्य ज्ञान आहे तोही असें सांगूं शकेल की, मनुष्य हा प्राणी त्याला जी गोष्ट हितावह वाटूं लागली असेल तिची पक्का शहानिशा केल्याखेरीज रहाणारा नाही. मध्यप्रदेशाशीं येऊन ठेपल्यावर आणखी एक टप्पा वर जावें, असें त्यास साहजिकपणें वाटूं लागतें. तेथें येऊन पोहोचल्यावर पुन: तोच नाद! याप्रमाणें टप्प्याटप्प्यानें कां होईना, केव्हां तरी शिखरावर जाऊन थडकल्याखेरीज त्याचें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं! 'सामाजिक सुधारणापरिषदे' च्या मनांत जी बालविवाह निषेधकमंडळी स्थापावयाची आहे, तिच्या पुरस्कर्त्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत १०, १२, व १४ हे मुलींच्या वयाचे आंकडे दिले आहेत. ते आमच्या मतें केवळ टप्पे आहेत! यांपैकीं शेवटचा आंकडा आम्हांस बराच पसंत आहे. पण खरें स्वयंवर ज्यांना येथें पुन: स्थापित व्हावयाला पाहिजे आहे, त्यांना तो पसंत होण्यासारखा नाहीं. पण त्यांत एक विशेष आहे; तो हा कीं, त्या वर्षांपर्यंत जे आपल्या मुली अविवाहित ठेवण्यास राजी होतील त्यांनीं धर्मानें घातलेली अटकनदी उतरण्यांचें कांहीं तरी साधन आपल्या मनाशीं तयार करून ठेवलें असावें, हें उघड आहे. बहुतेक हिंदू मुली १४ वर्षांच्या आंत ऋतुमती होतात, हें निर्विवाद आहे. तेव्हा १४ च्या आंतील वयाच्या मुलीचें लग्न न करण्याबद्दल शपथ घेणें, म्हणजे नहाण आलेल्या मुलींचें लग्न करण्याविषयीं शपथ घेणें होय! पण असे त्या पत्रकांत किती आहेत?

*

सामाजिक सुधारणा आणि कायदा

सुधारणेचा शब्दांत:पुराच्या बाहेर संचार होऊं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करणाऱ्या, नानाविध धर्मकल्पनांशी तुमुल संग्राम करण्यास ज्यांस स्फुरण यावें, त्याच्या भोंवताली उभारलेल्या प्रचंड लोकमत-तटास ढांसळून पाडण्यास ज्ञानतोफांस ज्यांनीं सरबत्ती द्यावी, व त्यास गराडा घालणाऱ्या रुढिखंदकांवर क्रियासेतु बांधण्यास ज्यांनीं प्रवृत्त व्हावें, अशा विद्याचारसंपन्न लोकांनी दुराग्रहाच्या भरी भरून व शुष्क बाबतींत दुही माजवून आपल्या मुख्य कर्तव्याची हेळसांड होऊं द्यावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

'नवखंड पृथ्वी व दहावे खंड काशी' यापुढें ज्यांच्या भूगोलविषयक कल्पनांची धांव जात नाहीं, वेदाच्या अर्थ कालत्रयीं होणें नाहीं अशी दृढ समजूत असूनही त्यांतच मनुष्यास अवश्यक अशा सर्व ज्ञानाचा गठ्ठा आहे असा ज्यांचा पक्का ग्रह झाला आहे, व प्राचीन ऋषिप्रणित आचारांहून सुखकर असे आचार असूं शकतील अशा नुसत्या कल्पनेचाही विटाळ न होऊं देण्याविषयीं जे अत्यंत दक्ष आहेत, तात्पर्य 'पुराणमित्येव हि साधु सर्व' या महामंत्राच्या प्रभावापुढें पदोपदी येणाऱ्या असंख्य नडी ज्यास साह्य झाल्या आहेत; अशा लोकांनी नुसतें कायद्याचें नांव ऐकलें नाहीं तोंच, वेडावून जाऊन माधवबागेंतील सत्तेचाळीसेतरांवर ताण करून सोडावी, हें अगदीं साहजिक आहे. परंतु ही सीमा ओलांडून पुढें गेलेल्या ज्ञानविशिष्ट म्हणविणाऱ्या लोकांनीं कायद्याच्या विरुद्ध इतकें काहूर कां माजवावें याचा मात्र आम्हांस उमज पडत नाहीं. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांच्यामध्यें अपरिहार्य एकनाड असल्यामुळें त्यांचे जुग कधीही जमावयाचे नाहीं असें जें कित्येक सामुद्रिकांनीं गणित केलें आहे; त्यांत आमच्या मतें कांहीं चूक झाली आहे, व ती दाखविण्याचा प्रयत्न केला असतां तिकडे शांतपणानें नजर फेंकण्याची जर ते तसदी घेतील, तर हा वाद मिटून उभय पक्षांत समेट होणें केवळ दुरापास्त आहे असें आम्हांस वाटत नाहीं. सामाजिक सुधारणेंत कायद्याची मदत घेणें अनर्थावह आहे असें प्रतिपादणाऱ्या मंडळींच्या आजपर्यंतच्या वाटाघाटींत आम्हांस जितका दुराग्रहाचा भाग दिसून येतो तितका योग्यायोग्य विचार दिसून येत नाहीं, असें म्हटल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. सकृद्दर्शनीं

ज्यांत कांहीं अर्थ आहे असें भासतें, असें काय तें एकच कारण पुढें आलें आहे. बाकी सर्व शब्दजाल, हट्टवाद व पुराणप्रियतेच्या संस्काराची अवशिष्ट झांक यांचेंच अकांडतांडव आहे. व तें कारण हेंच कीं, आमचें सरकार परकें, त्याचा धर्म वेगळा, त्यांचे रीतिरिवाज भिन्न; तेव्हां अशा सरकारास आपल्या समाजव्यवस्थेंत हात घालूं देणें अत्यंत भयावह आहे. याचे परिणाम फारच अनिष्टकारक झाल्यावांचून रहाणार नाहींत, व याबद्दल मागाहून पस्ताव्यांत मात्र पडावें लागेल. आतां हा कोटिक्रम करणाऱ्यांस आमचा इतकाच प्रश्न आहे कीं, सामाजिक गोष्टींत आजपर्यंत सरकारने जें औदासीन्य पत्करलें आहे, त्याचें कारण तसें करण्यास आम्हीं त्यांस परवानगी देत नाहीं इतकेंच आहे काय? मुसलमान लोकांनीं एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन आम्हांपैकीं कित्येकांस बाटविलें त्यावेळीं तसें करण्याविषयीं आम्हीं त्यांस परवाना दिला होता काय? किंवा आमच्या समाजव्यवस्थेंत ढवळाढवळ करण्यास सरकारनें मनांत आणलें तर तें आज असमर्थ आहे असें तरी मानतां येईल काय? तात्पर्य, सरकार सामाजिक बाबतींत उदासीन असण्याचे कारण, तसें करण्यास आम्ही त्यास संधी देत नाहीं इतकेंच काय तें, बाकी आम्ही त्यास आमच्या घरगुती गोष्टींत हात घालण्यास केव्हां विनंती करूं म्हणून तें अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात आहे, व एकदां का त्यास आपणाकडून जराशी फूस मिळाली की, कायद्यामागून कायदे करून आमच्या सर्व सामाजिक व्यवस्थांचा भंडवडा करून आम्हांस ते त्राहि त्राहि करून सोडतील, वगैरे विचारांत जर कांहीं तथ्य असेल तर मग ''आपण कोंबडी झांकली कीं उजाडायाचें राहिलेंच'' असें मानणाऱ्या म्हातारीच्या समजुतींतही तथ्य नाहीं असें कोण म्हणेल?

दुसरें, सती जाण्याची चाल जी सरकारनें बंद केली; त्यापासून आमच्या धर्मांतही प्रसंगानुसार हात घालण्यास सरकार डगमगणारें नाहीं असें सिद्ध झालें नाहीं काय? किंवा जो पुनर्विवाह हिंदु धर्मशास्त्रानें बेकायदेशीर ठरविला होता, तोच कायदेशीर ठरविण्याविषयीं कित्येकांनीं आपण होऊन विनंती केल्यावरून, तो कायदेशीर ठरविल्यास आज ३४ वर्षें झालीं असून त्यावेळीं मिळालेल्या फुशीचा त्यांनीं अद्याप पावेतों फायदा घेतला नाहीं, हें कसें? इंग्लंड देशांत बारा वर्षांच्या आंत पुरुषाचें लग्न झाल्यास तें बेकायदेशीर आहे, परंतु येथें पाळण्यास बाशिंगें बांधणेंही कायदेशीर असून १० वर्षांच्या आंतील स्त्रियेशीं प्रत्यक्ष नवऱ्यानें संभोग केला असतां, त्याजवर जबरीसंभोगाचा आरोप शाबीत होतो असें कलम पीनल कोडांत कोठून आलें? तात्पर्य, सामाजिक गोष्टींत आधीच सरकारनें हात घातला आहे असें असतां, आणखी अमुक एक गोष्टींत असा असा कायदा करा

अशी सरकारास विनंती केल्यानें त्यास आमच्या सामाजिक गोष्टींत आयतीच ढवळाढवळ करण्यास फूस सांपडेल, अशा समजुतीवर कायद्याचा निषेध करीत बसणें म्हणजे वास्तविक पहातां आम्हांस पुढें जावयाचें नाहीं, हेंच जगास जाहीर करणें होय.

आतां आजमितीस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस इष्ट किंवा अवश्यक वाटतात; त्या सर्व कायद्याच्या मदतीनें सुसाध्य आहेत असें आमचें म्हणणें नाहीं, किंवा त्यांपैकीं कांहीं कायद्यानें सुसाध्य असल्या, तथापि त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंही आम्हीं इच्छित नाहीं. परंतु याचें कारण आमचें सरकार परकें आहे हें नव्हे; किंवा सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें गैरशिस्त आहे, अशा सामान्य सिद्धांताचा आम्ही अंगीकार करतों असेंही नव्हे. व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल, तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें तथापि त्यानें तें करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजबंधन या दोहोंसही मर्यादा आहेत. त्या मर्यादांचा अतिक्रम होईल तर त्यापासून एकंदर समाजाचेंच नुकसान होणारें आहे. व्यभिचार हा एक पुण्यमार्ग आहे, असें कोणत्याही धर्माचा मनुष्य प्रतिपादणार नाहीं; परंतु एवढ्यावरून व्यभिचार करणाऱ्यांस कायद्यानें शिक्षा ठरवावी किंवा नाहीं असा प्रश्न पुढें आला असतां, सर्वच विचारी लोक एकदम 'हो' म्हणण्यास तयार होणार नाहीत. त्या व्यभिचारापासून समाजाचें प्रत्यक्ष नुकसान होत आहे कीं काय? या प्रश्नाचा प्रथम विचार केला पाहिजे. तसेच दारू पिणें हें जरी वाईट आहे, तथापि ती पिणाऱ्या व्यक्तीपासून समाजास त्रास पोंचल्यावांचून त्याच्यावर कायदा लागू करणें, न्याय्य होणार नाहीं. तात्पर्य, एखादी गोष्ट आपणांस कितीही चांगली वाटली, तथापि दुसऱ्यांनीं तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा आपणांस अधिकार नाहीं. आपण पाहिजे तर त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा, परंतु यापुढें मात्र आपणांस जातां येणार नाहीं. वरील विचारावरून हेंही ध्यानांत येण्यासारखें आहे कीं, ज्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या आचारविचारापासून समाजाचें नुकसान नसतां तो आचारविचार बदलण्याची समाजास सक्ती करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें आधींच जर समाजानें सक्ती केली असेल, तर ती नाहींशी करणें हेंही समाजाचें कर्तव्य होय; व तें बजावण्यास समाज तयार नसेल तर समाजाचा विशेष जोरदार प्रतिनिधी जें सरकार; त्यानें पुढें झालें पाहिजे. पातिव्रत्यसंरक्षणार्थ स्त्रियांनीं आपणांस पतिचितेवर जिवंत जाळून घ्यावें हें अत्यंत मूर्खपणाचें, अविचाराचें व साहसाचें कृत्य होय असें समजून, लोकांची वाट न पहातां सरकारनें एकदम या

कामीं कायदा करून ती क्रूर चाल बंद केली. एखाद्या स्त्रीचा पति निवर्तला असतां तिनें दुसरा पति करूं नये, अशी जी पातिव्रत्यसंरक्षणार्थ दुसरी सक्ती समाजानें केली आहे तीही व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध आहे, हें सरकार जाणून होतें; परंतु सतीच्या चालीइतकी ती अमानुष नसल्यामुळें त्यांनीं कांहीं दिवस वाट पाहिली व योग्य काल आला असें दिसतांच तीही सक्ती दूर करून पुनर्विवाह कायदेशीर मानला जाईल म्हणून ठराव केला. आतां पातिव्रत्यसंरक्षणार्थ समाजानें केलेली तिसरी सक्ती म्हटली म्हणजे केशवपन होय. या केशवपनाच्या प्रघाताचें मंडन करणाऱ्या लोकांनीं त्यापासून किती जरी फायदे दाखविले व तो त्यास किती जरी समंत असला, तथापि ज्या स्त्रीचें वपन होणार तिची इच्छा नसतां व ती एकसारखा हंबरडा फोडून आपणास या ममताळू वैऱ्यांच्या तावडीतून कोणी सोडवील काय म्हणून गयावया होऊन चोंहीकडे दृष्टी फेंकीत असतां, तिला जुलमानें न्हाव्यापुढें बसविणें किती निंद्य आहे, व अशा रीतीने तिचें स्वातंत्र्य हिरावणें म्हणजें केवढा घोर जुलूम आहे हें सिद्ध करीत बसण्याची आमच्या मतें मुळींच अवश्यकता नाही. ज्यांच्यावर हा घोर प्रसंग गुदरतो त्या परावलंबी अबलांस ही विटंबना कितपत मानवते, हें त्यांचें हृद्गत जाणणाऱ्या समवयस्क मैत्रिणीवांचून दुसऱ्यास सहसा सांगतां येण्यासारखें नाहीं! तथापि त्याची अटकळ कल्पनेनें अगदींच बांधतां येणार नाहीं असें नाहीं. ज्यानें आपणांस जन्म दिला, आपणांस लहानाचें मोठें केलें, व आपल्याकरितां अनंत कष्ट साहिले, त्या बापाच्या नांवानें मिशा बोडण्याचा प्रसंग दुर्दैवानें आला असतां, केवळ चटावर काम उरकून घेण्यास पुरुष कसे तत्पर असतात; १५-२० दिवसांनीं मुंडन केल्याचा मागमूसही राहण्याचा संभव नसून तें टाळण्यास काय काय उपाय योजतात; व मुंडन केल्यावांचून गत्यंतर नाहीं असा प्रसंग आला असतां, आपल्या बापाविषयीं आपली पूज्यबुद्धि व्यक्त करण्याकरितां ज्यांनीं आपलें मुंडित मुख मोठ्या गर्वानें लोकांस दाखवीत फिरावें; तेच लोक अंधार कोठडींत कशी दडी देतात, हें ज्यांनी पाहिलें असेल त्यास स्त्रियांच्या मनाची स्थिती कशी होत असेल याची कल्पना करणें कठीण नाहीं! लहानपणापासून ज्यांची जोपासना केली, ज्यांस न्हाऊं माखूं घालून वाढविलें, ज्यास नाना भूषणांनीं शृंगारिले असे केश क्षणार्धात नाहींसे होऊन आपण सर्वांच्या तिरस्कारास पात्र होणार व पंधरा वीस दिवसांनी पूर्वस्थिति येण्याची तर आशा नाहींच, परंतु उलटें ज्यांचें मुखावलोकनही करावयास नको, अशा त्या परक्या नापितापुढें दर पंधरवड्यास मान वाकवावी लागणार, हे विचार मनांत येऊन या विटंबनेस सर्व स्त्रिया आपण होऊन राजी होतील अशी नुसती कल्पनाही करतां येत नाहीं. आपल्या अत्यंत जवळच्या आप्ताच्या किंवा आपल्या स्वतःच्या प्रिय

कन्येच्या अशा हालअपेष्टा पाहण्याचें ज्या हतभाग्यांच्या कपाळीं आलें असेल त्यांची अंत:करणें दु:खोद्वेगानें विव्हल झाल्यावांचून कदापि राहिलीं नसतील.

तात्पर्य, दुसरें लग्न करण्याची इच्छा असूनही तसें करण्यास कायद्याची आडकाठी असणें यांत जितका अन्याय आहे; त्याहूनही या विद्रूप करण्याच्या घोर चालींत अधिक अन्याय व प्रत्यक्ष जुलुमाचा प्रकार आहे, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे, व तो अन्याय नाहींसा करण्यास कित्येकांनीं अर्ज करून कायदा करून घेतला असतां त्याहून अधिक अन्यायाचा व जुलुमाचा प्रकार बंद करण्याकरितां 'अमुक वयाच्या आंत मुळींच वपन करूं नये व त्यापुढेंही तें स्त्रीच्या मर्जीविरुद्ध होऊं नये' असा कायदा मागणें हें केवळ परंपरेस धरून आहे; यांत नवीन असें कांहींएक नाहीं

सामाजिक सुधारणा आणि कायदा, नं.२

'म्हातारी मेल्याचें दु:ख नाहीं परंतु काळ सोकावतो' या न्यायावरच कायद्याचा प्रतिषेध करीत बसणें केवळ वेडगळपणाचें आहे, कारण सरकारनें सामाजिक गोष्टींत आधीच हात घातला आहे; तसेंच ज्या कांहीं सामाजिक गोष्टींत सरकारनें कायदे केले आहेत, व ज्या दुसऱ्या गोष्टींत कायदा असावा असें कित्येकांचें म्हणणें आहे, त्यामध्येंही त्या त्या गोष्टी सामाजिक या सदराखालीं मोडतात किंवा नाहीं हा वाद अप्रासंगिक होय; व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या ज्या योग्य मर्यादा आहेत त्यांचा अतिक्रम होतो कीं काय, एवढ्याच धोरणानें कायदा असावा कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे, व सरकाराने जो सती जाण्यास प्रतिबंध केला, किंवा विधवेचें बेकायदेशीर मानलें जाणारें लग्न कायदेशीर ठरविलें, तेंही वरील तत्त्वास अनुसरून केलें, व विधवावपनाची चाल बंद करण्यास कायद्याची मदत असावी म्हणून जें कित्येकांचें मत आहे; तेंही वरील तत्त्वावरच अवलंबून आहे, वगैरे विचार वरील लेखांत दाखविले. या लेखांत बालविवाहाची चाल बंद करण्यास कायद्याचें साह्य घ्यावें असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, त्याविषयीं दोन शब्द लिहिण्याचा आमचा विचार आहे.

बालविवाहाची चाल अत्यंत घातक आहे याविषयीं आतां बहुधा मतभेद राहिला नाहीं. तसेंच या दुष्ट चालीच्या तावडींतून आपण सुटलों असें म्हणतां येण्यास, मुलगी निदान १५-१६ वर्षांची होईपर्यंत व मुलगा २०-२२ वर्षांचा होईपर्यंत त्या उभयतांचाही 'नीतिशास्त्रांत' प्रवेश होऊ नये, हेंहीं पुष्कळांस संमत आहे. परंतु हें घडवून आणण्यास कोणते उपाय योजावेत याबद्दलच काय तो वाद राहिला आहे. एका पक्षाचें म्हणणें असें पडतें कीं, ही गोष्ट लोकांनींच आपल्या शिरावर घेतली पाहिजे; दुसऱ्या पक्षाच्या मतें केवळ लोकांवरच ही

जबाबदारी सोपविण्यापेक्षां, सरकार व लोक या उभयतांच्या साह्यानें हें काम शेवटास नेण्याचा प्रयत्न करणें नुसतें इष्ट आहे, इतकेंच नाहीं, तर तसे केल्यावांचून या बाबतींत आमचें पाऊल खात्रीनें पुढें जाण्याची फारशी आशा नाहीं. आतां सती जाण्याची चाल बंद करण्यास किंवा विधवाविवाह कायदेशीर ठरविण्यास जीं कारणें होतीं, किंवा विधवावपन बंद करण्यास जीं कारणें आहेत, तींच या बालविवाहाच्या चालीसही पूर्णपणें लागू होतात असें मात्र म्हणतां येणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या योग्य मर्यादांचा जसा प्रत्यक्ष अतिक्रम वरील गोष्टींत होतो, तसा बालविवाहाच्या चालींत उघडपणें भासत नाहीं. या बालविवाहाच्या चालीमुळें लक्षावधी मुलांचा १२ दिवसांच्या आंतच मोक्ष होत असला, १६-१७ वर्षांतच मुलें बाप बनल्यामुळें त्यांची तारुण्यांतील हिम्मत व महत्त्वाकांक्षा सर्व जागच्या जागीं जिरून जात असलीं, किंवा ७-८ वर्षांपासूनच आईबापांच्या ममतेस पारखी होऊन, सासरच्या माणसांच्या धाकानें मुलीचें सर्व व्यक्तित्व नाहींसें होऊन संसाराचा गाडा हांकण्यास ती सर्वतोपरी लंगडी होत असली, तथापि त्यांत काय झालें? त्यांत घोर अनर्थ तो कोठें घडला? व तो बंद करण्यास कायदा कशास पाहिजे? असा एक पक्ष करतां येण्यासारखा आहे हें आम्ही जाणून आहों. आतां 'कृतांत कटकामलध्वजजरा दिसों लागली। पुर:सरगदांसवें झगडतां तनू भागली' अशी स्थिती होऊन जाऊन ज्यास मृत्युपाशानें घेरल्याची चिन्हें स्पष्ट दिसत आहेत, अशा ९९ वर्षांच्या थेरड्यास 'नवरा मुलगा' सजवून एकाद्या ७-८ वर्षांच्या अल्लड लेंकरास बहुल्यावरच 'रंडकी' करण्यांत ज्यास अनीतीचा यत्किंचितही भाग दिसत नाहीं, व तिचा मात्र पुनर्विवाह झाल्यास 'अब्रह्मण्यम' 'अब्रह्मण्यम्' म्हणून दाही दिशा दणाणून सोडण्यास जे तयार, अशा लोकांस आईबापांनीं व सासूसासऱ्यांनीं, केवळ आपल्या हौसेखातर सजीव बाहुलाबाहुलींचीं लग्नें लावण्याचा खेळ खेळल्यापासून 'तुमचा खेळ होते, परंतु आमचा जीव जातो' असें म्हणण्यास कशी जागा सांपडते हें कळूं नये; हें अगदीं असावें तसेंच आहे. तसेंच एखाद्या चोरट्या सुनेस आळ लावण्याकरितां तापल्या पळीनें डागणें, किंवा तिला उलटी टांगून तिच्या पाठीची सालडी काढणें हें जसें सासूचें कर्तव्यच आहे, त्याप्रमाणें पुढें मागें वाईट पाऊल पडेल एवढ्या संशयाच्या आरोपावरून एखाद्या बालविधवेची न्हाव्याकडून धिंड काढविणें, हे केवळ यथान्याय आहे अशीच ज्यांची समजूत; अशा लोकांनीं बालविवाहाच्या कायद्याच्या आड यावें यांतही कांहीं विलक्षण नाहीं. व 'ही राष्ट्रीयसभा नुसत्या ब्राह्मणांचीच आहे व यापासून ब्राह्मणलोक आपलाच फायदा करून घेत आहेत' असे अजागळासारखे प्रलाप करणारे लोक वेडे आहेत म्हणून

जसें सरकारनें ते जमेस धरण्यासारखे नाहींत तसेंच वरील लोकांचीही सल्लामसलत घेण्याचें सरकारास कारण नाहीं. परंतु राजकीय गोष्टींत मत देण्यास ज्यांस अधिकार आहे, अशा सुशिक्षित लोकांत या बाबतींत केवळ एकमत जरी झालें नाहीं तरी कायदा असावा असें बहुमत झाल्यावांचून मात्र कायदा करणें योग्य होणार नाहीं हें उघड आहे.

आतां, ज्या गोष्टींत प्रत्यक्ष अन्याय किंवा जुलूम होत नसेल असे समाजांतील दोष कायद्यानें काढूं पहाणें योग्य नाहीं असें आम्हीं पूर्वी दर्शविलें असून या चालीच्या निरसनार्थ कायद्याची मदत घ्यावी असें कां म्हणतो, हें प्रथम सांगितले पाहिजे. बापानें मुलास, पंतोजीनें शिष्यास, किंवा भाडेकऱ्यानें आपल्या तट्टांस, ममतेनें, मन वळवून, चुचकारून मार्गास लावावे हा प्रथम पक्ष; परंतु तशानें सर्वच प्रसंगीं कार्यभाग होतो असें नाहीं. कधीं मुलास बागुलबोवाचें भय दाखवावें लागतें, कधी शिष्यास घोडीवर चढविणें भाग पडते, व तट्टास बाभळीच्या फोंकावांचून दुसरा उपाय अपुरा पडतो. तीच गोष्ट प्रस्तुत प्रसंगींही लागू आहे. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे, त्याचा व समाजाच्या हिताचा फार निकट संबंध आहे; तेव्हां एकदा कशी तरी पोरांचीं हाडें भाजून काढलीं कीं गंगेंत घोडें न्हालें असें समजून, काळ वेळ वगैरे कांहीं न पहातां, जीं आईबापें आपल्या मुलांमुलींस चतुर्भुज करण्याविषयीं अगदीं हावरीं झालेलीं असतात, त्यांनीं आपलें कर्तव्य जाणून स्वसंतोषानें हा 'पोरखेळ' सोडावा तर राजमार्ग. परंतु आईबापांच्या अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें तीं तसें करण्यास तयार नसतील, तर त्यांस कायद्याच्या बागुलबोवानें भिवविणें अर्थात अवश्य होतें. आतां नुसत्या आईबापांच्या धाकानें, किंवा शिक्षकाच्या दबकावणीनें मुलांची सर्व सुधारणा होणारी नाहीं, मुलानेंही कांहीं उमजलें पाहिजे हेंही खरें. परंतु चवदाव्या रत्नाच्या भीतीनें एकदां त्यास वळण लागलें, म्हणजे हळूंहळूं त्या वळणाच्या गोडीनेंच त्याची सुधारणा होत जाते. तसेंच बालविवाहाची चाल मोडून योग्य कालीं विवाह होऊं लागल्यास केवळ कायदा बस्स आहे असें आम्हीं मुळींच म्हणत नाहीं. कायद्यानें फारच थोडा टप्पा साधणार आहे, पुढचा सर्व मार्ग क्रमण्यास समाजाच्या पायांतच जोर पाहिजे, त्यावांचून तो आंवरणार नाहीं हें उघड आहे. कायदा फार झाले तर मुलीच्या बाबतीत १०-१२ वर्षापर्यंत मजल मारील, किंवा मुलाच्या बाबतीत १६-१७ वर्षांपर्यंत विवाहमर्यादा नेईल. परंतु एवढ्यानेंच आपणांस समाधान मानून बसतां येत नाहीं. आपणास त्याच्या पुष्कळ पुढें गेलें पाहिजे. कायद्याच्या योगानें इतकेंच होईल कीं, १०-१२ व १६-१७ ही मर्यादा तरी कायमची झाल्यासारखी होईल. आजमितीस ज्या लोकांस या दुष्ट चालीचे परिणाम

माहीत नाहींत, तेच याच्या पूर्वी लग्नें करतात असें नाहीं; ज्या लोकांस आपली चूक पूर्णपणें दिसत असते अशाही लोकांस मुलगी ७-८ वर्षांची झाली नाहीं तोंच व मुलास १२वें वर्ष लागलें नाहीं, तोंच त्यांच्या लग्नाच्या फिकीरींत पडावें लागतें. कारण, जातिभेदामुळें वधूवरांची निवड करण्यास फारच संकुचित प्रदेश असल्यामुळें, व त्यांतल्या त्यांत नवीन शास्त्रार्थ मध्यें घुसून ब्राह्मणांतल्या ब्राह्मणांतच देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, असे वर्ग उत्पन्न झाल्यामुळें आपण आपली मुलगी किंवा मुलगा वाढविला असतां, त्यास पुढें योग्य स्थळ कसें मिळेल, ही काळजी आईबापांपुढें दत्तासारखी उभी राहून त्यांचे सुधारणेचे सर्व विचार जागच्या जागीं थिजून जातात. एखाद्या मनुष्याचे हात बांधून टाकून तो कांही उद्योग करीत नाहीं म्हणून त्यास दोष देणें शहाणपणाचे नाहीं. तसेंच सुधारणा व्हावी असें इच्छिणाऱ्या व बोलून दाखविणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर करतां येण्यासारख्या असूनही त्या दूर न करितां 'क्रियेवीण गोष्ट वाचाळता व्यर्थ आहे'' असा मोठ्या आढ्यतेनें उपदेश करीत बसणें, व जी गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं, तीच दुसऱ्यांनीं न केल्याबद्दल त्यांचा उपहास करीत बसणें, केवळ चुकीचें होणार आहे. ज्या सुधारणेचा केवळ स्वतांपुरतांच परिणाम घडणारा असतो अशा गोष्टींत मनुष्यानें स्वतांस झीज लावून घेऊन, धैर्याचें उदाहरण जगास दाखवावें हें योग्य आहे. परंतु ज्या सुधारणेचा दुसऱ्याच्या हिताहिताशी प्रत्यक्ष संबंध पोहोंचतो अशा गोष्टींत, आपलें बोलणें खरें करून दाखविण्याकरितां, आपलें व आपणांवर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होणें, सर्वथा योग्य आहे असें खात्रीनें म्हणतां येण्यासारखें नाहीं. तात्पर्य, बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे, तथापि इतरांचाही तसा झाला आहे किंवा नाहीं याविषयीं साशंक असल्यामुळें, व आपल्या मुलाबाळांचें हिताहित पहाणें विशेष महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळें, त्या विचारांचा आचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण येते; ती ह्या कायद्यानें दूर होण्यासारखी आहे. सर्वच मुलींचीं लग्नें १०-१२ वर्षांच्या आंत होणार नाहींत किंवा सर्वच मुलांची १६-१७ वर्षांपूर्वी होणार नाहींत अशी कायद्यानें हमी घेतली असतां सर्वांचीच काळजी दूर होईल व आपलें एकतरी पाऊल पुढें पडलें असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाय १०-१२ वर्षांपर्यंत कांहीं मुली अविवाहित राहतात, व त्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहीं, येवढ्यावरून असा कायदा करण्यास लोकांची धर्मसमजूत आडवी येते, असेंही म्हणतां येणार नाहीं. तात्पर्य, अशा बाबींत सामान्य दृष्टीनें पहातां कायद्याची मदत घेणें जरी सर्वांशीं ग्राह्य नाहीं, तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास व सांप्रतची स्थिति ही मनांत आणतां हें

आमचें निगरगट्ट तट्टू कायद्याच्या फोंकावांचून सहसा हलणार नाहीं असें आम्हास वाटतें.

आपल्या सुशिक्षित मंडळीस खरोखर आपली सुधारणा व्हावी ही गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मतें त्यांनीं या कायद्याच्या आड येण्याचें कारण नाहीं. बाकी सुधारणाच नको असेल तर मग खुशाल 'थंडे सुधारक' व 'उतावळे सुधारक' वगैरे निरर्थक कोटिक्रम लढवून पांडित्य करीत बसावें. आम्ही जसा कायदा असावा असें सुचविलें आहे, त्यांत वावगें असें कांहीं एक नाहीं. त्याच्या योगानें समाजाच्या धर्मसमजुतीस धक्का पोहोंचण्याचें भय नाही, त्याच्या योगें पुष्कळांस इष्ट असणारी सुधारणा अनायासानें होणारी आहे, व तीही फारच नियमित असून सर्वांस संमत अशीच आहे. 'तुमच्या राष्ट्रीय सभेंत स्त्रियाही हजर आहेत, हें पाहून मला फार आनंद होतो' असे मि. ब्राडलाचे उद्‌गार ऐकून टाळ्यांचा गजर करून सोडणारे हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्यार जर अप्रामाणिक नसतील; तर या कायद्यानें विवाहमर्यादा कायमची १०-१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी, ज्यास जसें इष्ट असेल तसें मुलीस शिक्षण देण्याची सोय होणारी आहे, अशा विचारानें ते या कायद्याच्या आड येणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. १०-१२ वर्षांच्या पूर्वी विवाह न झाल्यानें पुष्कळ बालवधूंचें कुंकूं पुसलें जाणार नाहीं; अशा मुग्धवयांत सासरीं कसें वागावें हें न कळल्यामुळें त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्यांसही संधी राहणार नाहीं; व आईबापांच्या बेचाळीस कुळांचा उद्धार होण्याचें थांबून त्या लेकरांचाही पुष्कळ जाच अनायासें दूर होईल. पेनाच्या एका तडाख्यासरशीं सर्व सुधारणा करूं पहाण्याचा आरोपही या कायद्यावर आणतां येण्यासारखा नाहीं. बालविवाहाचा प्रघात खरोखर मोडण्यास समाजानेंच तयार झालें पाहिजे, ही गोष्ट हा कायदा विसरला नाहीं. बापाच्या घरीं मुलीस ऋतु प्राप्त झाला असतां बेचाळीस कुळ्या नर्कांत जाणार ही वेडगळपणाची समजूत दूर करणें, म्हणजे एकादा प्रचंड पर्वत जमीनदोस्त करण्यासारखें आहे, व या पर्वतावर आघात करीत बसण्याचें काम समाजासच केलें पाहिजे. तें मात्र कायद्यानें होणें अशक्य आहे. फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून गेलेल्या या आमच्या समाजास प्रथम गती देण्याचें काम मात्र कायद्यानें होणारें आहे. आगगाडी चालूं लागण्यापूर्वी जसा थोडासा धक्का सोसावा लागतो, तसाच हा कायद्याचा कडक उपाय गौण असला तथापि तो पत्करला पाहिजे. एखादा मनुष्य रोगानें जर्जर झाला असतां नुसत्या मात्रेच्या वेढ्यानें त्यास पूर्ण उतार पडून तो धट्टाकट्टा होतो असें नाहीं, तर त्याच्या योगानें केवळ प्राण मात्र बचावतो, तशीच केवळ या कायद्याची गोष्ट आहे. यांत उतावळेपणाचा गंधही नाहीं. ज्या सरकारच्या

न्यायप्रियतेवर आमचा इतका विश्वास आहे कीं, आम्ही सर्वस्वी गुलाम बनलों आहों, तथापि त्याच्याच मदतीनें आम्ही स्वतंत्र ज्ञानपद होऊं असा आमचा पूर्ण भरंवसा आहे, ज्यांच्या केवळ भूतदयेनें असंख्य गुलाम आज स्वातंत्र्य भोगीत आहेत, व आम्हांसारख्या परधर्मी, भिन्नवर्णी, व हजारों कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठी अश्रांत श्रम करणारे मि. ह्यूम, मि. ब्राडलॉ, ह्यांच्या सारखे शेंकडों उदार महात्मे ज्या लोकांत निपजतात, त्या लोकांनीं नियंत्रित अशा हिंदुस्थान सरकारापाशीं आम्ही कायदा मागितला असतां काय परिणाम ओढवतील कोण जाणे; म्हणून बळेंच आपण भ्याल्यासारखें दाखवून दुसऱ्या असंख्य लोकांस भिववण्याचा प्रयत्न करण्यांतच जर थंडी सुधारणा असेल तर अशा थंड्या सुधारकांपासून ईश्वर आम्हांस वाचवो! आम्हांस त्यांची ही प्राणघातक माया नको! ज्यांच्याकरितां एखादी सुधारणा करावयाची त्यांच्यावर त्या सुधारणेनें प्रत्यक्ष जुलूम होत असूनही ती सुधारणा कोणी करूं पाहील तर त्याच्या आड येणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. व अशा लोकांसच जर योग्य रीतीनें 'थंडे सुधारक' म्हणतां येईल तर मग बालविवाहाच्या दुष्ट प्रघातांत, लोकांवर प्रत्यक्ष जुलूम न करितां, अंशत: प्रतिबंध करण्यास साधनीभूत असा कायदा मागणाऱ्या लोकांस 'उतावळ्या सुधारकांत' ओढून, 'तुला न मला, घाल कुत्र्याला' असा प्रकार सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनी कां करावा, हें आम्हांस समजत नाहीं.

*

सामाजिक सुधारणा परिषदेचे निंदक

राष्ट्रसभेच्या पाठीमागून सामाजिक विषयाचा विचार करण्याकरितां गेलीं दोन वर्षे, दोन सामाजिक परिषदा झाल्या. राष्ट्रसभेसाठीं एकत्र जमणाऱ्या लोकांना अनायासे सामाजिक गोष्टींविषयीं चर्चा करण्यास सांपडून, त्यासंबंधाने एकमेकांचे विचार एकमेकांस कळविण्यास व ताडून पहाण्यास सांपडावे, आणि जमल्यास एखादी विशिष्ट सुधारणा अमलांत आणण्यासाठीं सर्वांनी एकत्र बसून एखादी तोड काढावी, या हेतूनें गेल्या दोन सामाजिक परिषदा भरविण्यांत आल्या, हें सांगावयाला पाहिजे असें नाही. अशा प्रकारच्या सभांपासून व्हावा तितका फायदा तत्काळ होण्याचा संभव नाहीं, हें स्वल्प विचाराअंती ध्यानांत येण्यासारखें असतां, शिंगें मोडून घेऊन वासरांत शिरणारे सुशिक्षित पण लोकरंजनपरायण, लौकिकाभिलाषी, दुराग्रही, व कांहीं अंशीं भेकड असे कित्येक लोक, अशा परिषदांचें आपणाकडून होईल तितकें अभिनंदन करण्याचें सोडून देऊन, त्यांवर तुटून पडूं लागले आहेत, हें पाहून कोणत्या समंजस मनुष्यास विस्मय व खेद होणार नाहीं? सामाजिक परिषदेचें काम नीट न झालें तर त्याबद्दल लाज कोणाला? ज्यांनीं ती स्थापून तिच्या द्वारें कांहीं सामाजिक हित झालें तर पहावें, म्हणून आपणांकडून होईल तितकी खटपट चालविली आहे; त्यांना? किंवा जे त्याला आणवेल तेवढा व्यत्यय आणतात त्यांना? 'अमुक प्रकारचे लोक अमुक रीतीनें सुधारणा करूं पहात आहेत, पण त्यांची ती रीत आम्हांस मान्य नाहीं,' असें म्हणून कांहींच न करणें, किंवा उपहास करीत सुटणें, हें फार सोपें आहे! शंका कोणाला घेतां येत नाहींत? दोष कोणाला दाखवितां येत नाहींत? पाडापाड व मोडतोड करण्याला कोणाला कष्ट पडतात? असलीं कामें कोणीही करूं शकेल! शंकांचें समाधान करणें, दोषयुक्त वस्तूंतील चांगला भाग ओळखून त्याला बळकटी आणण्याचा प्रयत्न करणें, व जें पडलें मोडलें असेल त्याची डागडुजी करणें किंवा कांहीं तरी नवीन बांधणें हें किती कठिण आहे? जो हें करील तोच खरा कसबी. अशाला 'दुर्धारक' म्हणून, जे आपणांस व्यंग्योक्तीनें 'खरे सुधारक' ही संज्ञा लाऊन घेतात, व दुर्धारकांवर दु:शब्दांचा प्रहार करीत सुटतात; त्यांनीं आजपर्यंत काय दिवे लाविले आहेत? आजकाल सामाजिक गोष्टींत जी जागृति

दृष्टीस पडूं लागली आहे, तींत यांचें किती अंग आहे? व तीबद्दल त्यांनी काय केलें आहे? स्त्रीशिक्षणासाठीं मुलींचीं हायस्कुलें घालणें चांगलें नसेल, पण या 'मित' सुधारकांनीं आपल्याच पद्धतीनें कां होईना, यासंबंधानें काय केले आहे? पाहिजे त्या वयाच्या गतभर्तृकेनें पुनर्विवाह करण्यास हरकत नाहीं, असें जर कधीं कोणी म्हटलें असेल तर त्यास अधीर ठरवून, या 'माफक' सुधारकांनी ऋतुस्नात होण्यापूर्वी जेवढ्यांस वैधव्य प्राप्त झालें असेल, तेवढ्या अनाथ कन्यकांस तरी सनाथ करण्याचा प्रयत्न कां केला नाहीं? लग्नाच्या वयाच्या इयत्तेविषयीं कायद्याचें बंधन करून घेणें हितावह नसेल, पण दहा वर्षांहून लहान वयाच्या मुलीचें लग्न करणें बरोबर नाही, हें जर या 'खऱ्या' सुधारकांस संमत असेल, तर दहा वर्षांच्या आंतील वयाच्या कोणत्याही मुलीच्या भालप्रदेशावरील कुंकुमांकास धक्का न पोहचूं देण्याविषयीं यांनी काय खबरदारी ठेविली आहे? ऋतु प्राप्त न झालेल्या स्वस्त्रीशीं गमन करणाऱ्या उतावीळ नवऱ्याला पीनल कोडाने अपराधी समजून शिक्षा ठोठावावी, असें म्हणणें अविचार असेल, पण जर अशा प्रकारचा संभोग निंद्य आहे, असें समाजाच्या या निष्कपट हितचिंतकांस वाटत असेल, तर त्यांनीं अशा प्रकारचा अनाचार न होऊं देण्याबद्दल आजपर्यंत काय तजविजी केल्या आहेत, त्या आज ते जगापुढें मांडूं शकतील काय? सर्वच गतभर्तृकांना वपन करून घेऊन कुरूप होणे सकटावह वाटत नसेल, पण ज्यांवर तो प्रसंग मूर्ख मातापितराच्या किंवा निर्दय सासूसासऱ्यांच्या जुलमामुळें येत असेल, त्यांना त्यांतून सोडविण्याबद्दल दुर्धारकांच्या या निंदक सुधारकांनीं कोणते उपाय केले आहेत? मांडीवर मांडी ठोकून वल्गना करीत सुटणें, दुसऱ्याची व्यंगें काढणें, मूढ अविचारी लोकांकडून पाठ थोपटून घेण्यासारखा प्रलाप करणें, व कांहीं न करतां आपणांस देशहिताची मोठी कळकळ आहे, व ते साधण्यासाठीं आपण नेहमी झटत आहो, असे दाखविणे फार सोपें आहे. जर असें नसते, व अनेक युगें रूढ होऊन बसलेल्या अपायकारक आचाराविरूद्ध जाणे हें किती अवघड आहे, हें सहज समजण्यासारखें असतें, तर सामाजिक सुधारणा परिषदेसारख्या संस्थेच्या न्यूनत्वाची टिमकी वाजवीत न बसतां तें काढून काढून टाकून, तिला सुरूपता व हितकर्तृकता आणण्याचा प्रयत्न या 'माफक' व 'खऱ्या' सुधारकांनीं खचित केला असता!

*

अजून तरी सावध व्हा

गेल्या दीनबंधूंतील लेखकानें अन्वर्थ काम केलें. अनाथ, दीन, अबला गाईंस वैधव्याची जन्मभर आठवण देणारा जो न्हाव्यांचा वर्ग; त्यांस चार गोष्टी सांगून त्यांच्या हातून प्रत्यहीं जें अघोर कर्म होत आहे, तें स्वत: होऊन बंद करण्याचा उपदेश केला आहे. अहो, धर्मसमता ठेवणारे, वेदोक्त धर्माचे अभिमानी आचार्य दीक्षितांनो! आतां तरी कांहीं लाज धरा. तुमच्या लेकी, सुना, व भगिनी यांची दया तुमच्या शूद्र बंधूंस येऊन त्यांनीं सद्वासना धरली व अशरण स्त्रियांस तुमच्या धर्माच्या- अधर्माच्या असेंच म्हणणें सयुक्तिक आहे- चिखलांतून बाहेर काढून टाकण्याचें मनांत आणलें आहे, तें पाहून माना खालीं घाला. न्हाव्यांकडून कट झाला असतां, ब्राह्मण लोक भादरण्याचा धंदा पत्करून विधवावपनाची चाल कायम ठेवतील असें आम्हांस वाटत नाहीं. वेळेवर जागे व्हाल तर बरी गत आहे, नाहीं तर सुधारणेचा शकट आज जो ब्राह्मणांकडून बऱ्याच अंशानें हांकला जात आहे, तें सर्व फिरून आजपर्यंत अडाणी मानलेल्या लोकांकडे त्याचें धुरीणत्व जाईल, हें ध्यानांत धरा. ब्राह्मण स्त्रियांची दैना पाहून शूद्र लोकांस गहिंवर यावा व स्वलाभाची संधी सोडून म्हणजे आपल्या पोटावर बिब्बा घालून ब्राह्मण भगिनींचा उद्धार करण्याची खटपट करावी; अशीं उदाहरणें आपल्या डोळ्यादेखत घडत असतां, अजून कलियुगच आहे, या युगांत लोक नीतिभ्रष्ट होत जाणार, इत्यादी वृथा जल्पना करणाऱ्यांचे दांत त्यांच्या घशांत घातलेसें होत नाहीं काय? दीनबंधूनें सुचविल्याप्रमाणें न्हाव्यांत जर कट झाला, तर किती बरें मजा होईल?

धर्मांधकारांत लोळणाऱ्या स्त्रिया, पैशाच्या लालचीनें हजामत करणारे न्हावी, व अपवादभयानें नातेवाईक लोक, इतके सर्व पापाचरणामध्यें बुडत आहेत. यांपैकीं दोघांनी मन घट्ट केलें असतां, तिसऱ्याचें कांहीं न चालून त्यास गप्प बसावें लागेल. स्त्रियांनीं आपल्या संरक्षणाकरितां पुढाकार घेऊन या राक्षसी रीतीविरुद्ध बंड करावयाची वेळ येण्यास अजून बराच अवकाश आहे. राहतांपैकीं राहिले दोन वर्ग. ज्या लोकांत केशवपनाची चाल आहे त्या जातींतील, म्हणजे ब्राह्मणवर्गांतील बरेच लोक आधुनिक शिक्षणाच्या जोरानें; स्त्रियांवर होणारा जुलूम पाहण्यास दिवसानुदिवस नाखुष होत आहेत, हा काय तो संतोषाचा भाग आहे?

आतां ह्याच अमानुष कृत्यांत ज्यांचा हात आहे, असा तिसरा वर्ग न्हाव्यांचा. दीनबंधूनें लिहिल्याप्रमाणें खरोखरच त्या वर्गाची हलाखी असल्यास, आपल्या दुष्कर्माचरणानें फिदा होणारी अक्काबाई त्याने लवकर लाथ मारून बाहेर घालवावी. कारण पतिशोकानें गताधार झालेल्या स्त्रीलतेवर वज्रभेदी शस्त्रानें तिच्या सौंदर्याचा विध्वंस करणाऱ्या कठोरहृदय न्हाव्यांच्या हातून प्रतिदिनी पातक होत नाहीं काय? तिचे ते पाषाणासही द्रव आणणारे करुण शब्द ऐकून त्याच्या-तो मनुष्यच आहे-मनाची काय स्थिति होत असेल? संसारापासून कोणाची निवृत्ति करावयाची असल्यास त्यास हा धंदा सांगावा म्हणजे झालें! असो. याप्रमाणें संसार असार आहे, अशी खातरी होत जाणाऱ्या नापितवर्गाची या मर्त्यलोकीं चलती चालत नाहीं, यांत काय आश्चर्य आहे? आपल्यावर पडणारी ही गदा घालविणे नापित वर्गाच्या हातांत आहे. त्यांनीं कट करून अनाथ गाईचा आम्ही छल करणार नाहीं अशी सर्व जातीसमक्ष शपथ घेतल्यास काय गंमत होईल? दिवसानुदिवस मानसोन्नति होत जाणाऱ्या श्रेष्ठ लोकांचा, या पापकृत्यापासून होणारा संताप जर सद्धर्मानें वर्तन करूं इच्छिणाऱ्या धनाभिलाषी न्हाव्यांच्या तिरस्कारास मिळाला; तर फार दिवसांपासून इष्ट वाटत असलेली सुधारणा सुरूं केल्याचें आपल्यास श्रेय येणार नाही काय? लोकापवाद कमी झाला व केशकर्तनकारांचा कट झाला तर गरीब बिचाऱ्या गाईंस धर्माचें पांघरूण घेणाऱ्या या भुताटकी चालीला, स्मशानभूमी दिसण्याचा दिवस जवळ जवळ येणार नाहीं काय?

सरकाराकडून कायदा मागण्याचा तरी हेतु हाच आहे. यामध्यें कोणत्याही विशिष्ट वर्गास दुखविण्याचें आमचें मानस नाहीं. जशी आपल्यामध्यें कांहीं कांहीं गोष्टींमध्यें सुधारणा करण्याचें बऱ्याच लोकांच्या मनांत येत आहे, त्याचप्रमाणें इतर वर्गांच्याही मनांत निष्पाप वर्तन करण्याचें आल्यास, या कामीं तरी सरकाराकडे जावें लागण्याचें कांहीं कारण राहील असें आम्हांस वाटत नाहीं.

सारांश, तात्पर्य इतकेंच घ्यावयाचें कीं, आमच्या श्रेष्ठ वर्गांतील स्त्रियांची सुटका करण्याचें इतर जातींच्या मनांत येत असतांनाही जर ज्यांचें नुकसान होत आहे अशा समजूतदार व श्रेष्ठ वर्णाच्या जातींत आपल्या येथील घाणेरडा तबेला धुण्याचें मनात येणार नाहीं; तर मात्र सरकाराकडे गाऱ्हाणें न्यावयास आम्हीं कधींही कमी करणार नाहीं. देवदयेनें सध्यांचा प्रसंग चांगला आहे; तेव्हां सगळ्यांनी सावध व्हावें.

*

अनाथाचा वाली कोणी नाहीं!

अलीकडे आमच्या युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत जे फेरबदल होत आहेत त्याकडे पाहिलें असतां, त्या मंडळींत जे जबरदस्त आहेत त्यांनीं हवें तें करावें, व लोकांचें खरें हित ज्या अभ्यासांत आहे. त्याकडे कोणीच लक्ष देऊं नये, असा प्रकार घडत आहे, असें दिसून आल्यावांचून राहणार नाही. थोड्या वर्षांपूर्वी सर रिचर्ड टेंपल यांस आर्ट्स् कोर्समधील दोन परीक्षांच्या ऐवजीं तीन कराव्या असें वाटलें. खुद्द गव्हर्नराच्या व चॅन्सेलराच्या, व त्यांतही सर रिचर्डसारख्या गव्हर्नराच्या व चॅन्सेलराच्या मनांत कांहीं हुक्की आल्याबरोबर ती तडीस जाण्यास काय कठीण पडणार? युनिव्हर्सिटीचे लोक आपणांस मोठे सुशिक्षित व स्वतंत्र म्हणवितात, व जे त्यांवर जुलूम करीत नाहीत, त्यांपुढे ते आपल्या स्वतत्रतेची ऐट मिरवितातही! पण सर रिचर्डपुढें त्यांचे कांहीं एक चालले नाहीं. सेनेटच्या एका बैठकीला दोन परीक्षा मोडून त्यांचे जागी तीन केल्या, व आर्टस् कोर्स जितका कंटकमय करणें शक्य होते, तितका करून सोडिला. ही तीन परीक्षांची व्यवस्था झाल्यापासून बी.ए. चा अभ्यास करणाऱ्यास कॉलेजांत प्रवेश केल्यापासून त्यांतून बाहेर पडेतोंपर्यंत दम टाकण्यात, एक दिवसाची फुरसत मिळेल तर ज्याचे नांव तें! एका परीक्षेच्या चरकांतून पार पडावे तों दुसरी 'दत्त' करून पुढे उभी आहेच! पूर्वी दीड वर्षानें एकेक परीक्षा घेतली जात असे, त्यामुळें अभ्यास मुरवण्यास वेळ सापडे इतकेच नाहीं, तर विद्यालयस्थ आयुष्यक्रम आतांहून अनेक प्रकारांनी विशेष सुखावह करून घेता येत असे. पहिल्या कोर्समध्यें पहिली व चौथी टर्म; विद्यार्थ्यास खेळणें, पोहणें, हिंडणें, अभ्यासाच्या क्रमाच्या बाहेरची पुस्तकें वाचणे, नवीन ओळखी करणें वगैरे गोष्टींत घालवितां येत असे. सध्यां तसें मुळींच करतां येत नाहीं; कारण प्रत्येक वर्षाच्या अखेरीस एकेक परीक्षा ठेऊन दिली असल्यामुळे, कॉलेजाच्या संवत्सराच्या वर्षप्रतिपदेपासून त्याच्या फाल्गुन वद्य अमावस्येपर्यंत पुस्तकाच्या समागमांत अहोरात्र दंग असावें लागतें. याप्रमाणें विश्रांति न सांपडतां तीन वर्षेपर्यंत सारा वेळ मानसिक श्रम करावे लागत असल्यामुळें, हा कॉलेजांतर्गत त्रिवार्षिक शिक्षणक्रम अत्यंत कष्टावह झाला आहे, हें अशा प्रकारच्या गोष्टीकडे बिलकुल ढुंकून न पाहणाऱ्या लोकांशिवाय बाकीच्यांस पूर्ण विदित झालें आहे.

हें सर्व रिचर्ड टेंपल यांच्या आग्रहाचें फळ!

टेंपल व फर्ग्युसन साहेब जाऊन लॉर्ड रे आले. लोकशिक्षणाविषयीं यांनीं फार विचार केलेला, असा याचा लौकिक; यांचे पाय या देशास लागण्यापूर्वी येथे येऊन थडकला असल्यामुळें, हे आमच्या युनिव्हर्सिटींत कांहीं तरी विलक्षण फेरफार करतील असें वाटलें होतें. पण सुदैवानें तसें त्यांनीं केलें नाहीं. युनिव्हर्सिटीच्या अधिकारांत किंवा व्यवस्थेंत लार्ड रे यांनीं बिलकुल ढवळाढवळ केली नाहीं. सर्व परीक्षांचें अभ्यासक्रम व त्यांच्या मुदती जशा ते येण्यापूर्वी होत्या तशाच बहुश: अजून आहेत; व त्यांत जे अल्पस्वल्प फेरफार झाले आहेत, ते युनिव्हर्सिटीनें आपले आपण केलेले आहेत.

मध्यम व वरिष्ठ शिक्षणास लॉर्ड रे यांनीं बाहेरून जितकी मदत करवली तितकी केली. त्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत त्यांनीं हात घातला नाहीं. यांत्रिक शिक्षण वाढले पाहिजे; त्यात लोकांचें खरें हित आहे; अशी त्यांची पक्की खातरी होऊन गेली होती. पण या कामीं युनिव्हर्सिटीकडून म्हणण्यासारखी मदत मिळण्याचा संभव नाहीं, असें त्यांस तेव्हांच दिसून आल्यामुळें त्यांनीं तिचा नादच सोडून दिला, आणि मग स्वतंत्र यांत्रिक शाळा स्थापण्याकडे आपलें लक्ष्य लावलें. व्हिक्टोरिआ ज्यू. टेक्निकल इन्स्टिट्यूट ही त्या हेतूनें त्यांनीं केलेल्या दीर्घ परिश्रमाचे फळ होय. शास्त्रीय विषयांकडेही लोकांचें लक्ष विशेष लागावें, असें त्यास वाटत होतें; पण ते घडवून आणण्यांतही त्यांनीं बाहेरून बाहेरून जितकें करवले तितकेंच केलें. सर रिचर्डप्रमाणें युनिव्हर्सिटींत आपली चॅन्सेलरगिरी बजावली नाही! सरकारी नोकरीवर जे लोक ठेवायाचें, त्यांत कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळालेले असावे याचा निश्चय करण्याचा अधिकार वाजवी रीतीनें सरकाराकडे येतो. या योग्य अधिकाराचा फायदा घेऊन, त्यांनी आमच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेस बिलकुल न दुखवितां युनिव्हर्सिटीकडून सरकारासाठीं युनिव्हर्सिटी- स्कूलफायनल नांवाची नवीन परीक्षा अस्तित्वांत आणविली, व तिच्या द्वारे आपला हेतू नेववेल तितका स्वतंत्रपणे तडीस नेण्याचा प्रयत्न केला. तसेंच, मेडिकल व सायन्स कॉलेजांस हवी तितकी मदत करून, व व्हाईस चॅन्सेलरच्या जागेवर रे मि म्याकिकन यांची नेमणूक करून शास्त्रज्ञानप्रसाराविषयीं आपली दीर्घ उत्कंठा त्यांनी होईल तितकी व्यक्त केली. यापलीकडे त्यांचा व युनिव्हर्सिटीचा प्रत्यक्ष संबंध घडला नाही असें म्हटलें तरी चालेल. युनिव्हर्सिटीच्या कॉन्व्होकेशनांत त्यानीं केलेलें भाषण व युनिव्हर्सिटीच्या बिलाविषयीं मुंबई सरकारचा अभिप्राय; यांचा युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता, हें कोणास सांगितले पाहिजे असें नाहीं.

पण वारंवार होतें काय कीं, मूळ विचार करणारांपेक्षां अनुकरण करणारेच मोठी धांदल करून सोडतात! लॉर्ड रे गव्हर्नर झाले आहेत, व ते मोठे शास्त्रप्रसारेच्छू आहेत, असें दिसून आल्याबरोबर, ज्या त्या परीक्षेंत जमल्यास थोडेंबहुत पदार्थशास्त्र ढकलून देण्याविषयीं कित्येकजण उत्सुक झाले, व युनिव्हर्सिटीच्या आर्ट्स् शाखेचा अभ्यासक्रम बदलण्याविषयीं चर्चा सुरू झाली. हिला आरंभ होतांच ज्यांचे जे आवडते फेरफार होते, ते त्यांनी पुढें आणिले. इतिहास, अर्थशास्त्र, देशी भाषा वगैरेंचें बरेंच ज्ञान असल्याखेरीज कोणाला बी.ए. म्हणणें उचित नाहीं, अशी साधारण कल्पना झाल्यामुळें, बी. ए. चा अभ्यासक्रम वाढवा अशा सूचना येऊं लागल्या. या सूचनांबरोबरच वर्षांची संख्याही वाढविणें जरूर असल्यामुळें, तिहींच्या जागीं चार वर्षें असावी, असा बूट निघाला; व तो बहुतेकांस पसंत झाल्यासारखा होऊन नवीन अभ्यासक्रमाचा एक मसुदा तयार करण्यांत आला. या मसुद्यांत अर्थशास्त्र, इतिहास, पदार्थशास्त्र, व देशीभाषा यांची बरीच सोय केली होती. पण जें चांगलें; तें एकाएकीं प्राप्त झालें तर जगाची सुधारणा होऊन जाऊन करण्यासारखें पुढें कांहीं उरणार नाहीं, व उगीच माशा मारीत बसावें लागेल, अशी भीति कित्येकांस उत्पन्न होऊन, व आमच्या खंगूं लागलेल्या शरीरशक्तीकडे त्यांचें लक्ष जाऊन, अभ्यास वाढविण्यास त्यांनीं अशी हरकत घेतली कीं, आहेत त्याच अभ्यासांचें ओझें विद्यार्थ्यांस निभेनासें झालें असून त्यांवर अधिक ओझें लादण्यास तुम्ही प्रवृत्त होतां, याचा अर्थ काय? बी. ए. चा क्रम चार वर्षांचा असून त्याचा अभ्यास प्रस्तुत कालीं आहे तितकाच असला, तर तो त्रास न पडतां पक्का होईल. ही प्रतिसूचना मताधिक्यानें ठाम होऊन पहिले सारे बेत मागें पडले, व आज संध्याकाळीं सेनेटपुढेंजो वाद होणार आहे; त्यांत चतुर्वार्षिक बी.ए. च्या परीक्षेसाठीं तयार केलेल्या नवीन मसुद्याची चर्चा व्हावयाची आहे. या मसुद्यांत बी.ए. च्या प्रस्तुतच्या अभ्यासक्रमांतील कांहीं विषय कमी करून इतिहास, अर्थशास्त्र, व इंग्रजी निबंध लिहिणें या विषयांस जागा केली आहे, व देशी भाषांस गचांडी देऊन अजिबात हुसकून लाविलें आहे. तिहींची चार वर्षें झालीं असून व इंग्रजी, संस्कृत, आणि गणित यांतील कांहीं पुस्तकें कमी करण्याचा विचार असून, हा मसुदा करणाऱ्यांस देशी भाषांस पाय ठेवण्यापुरती सुद्धां जागा करतां आली नाहीं काय? किंवा यांत त्यांच्याकडे तरी काय दोष काय आहे? अनाथाला कोण वाली मिळणार? ज्याप्रमाणें पूर्वीं एका ग्रांटानें या देशी भाषांचा पिच्छा पुरवून त्यांस युनिव्हर्सिटीतून पिटाळून लाविले, त्याप्रमाणें दुसरा एक ग्रांट अवतरून तो यांचा पक्ष घेईतोंपर्यंत त्यांस असेंच बाहेर भटकत रहावें लागणार, असें आम्हांस वाटतें! सिंडिकेटांतील महादेवास ही

अतिशय महत्त्वाची बाब आहे, असें अद्यापि न वाटू लागलें असल्यामुळें सेनेटांतील वामनदेवाचे कांहीं एक चालत नाहीं! देशांतील शिक्षणक्रम देशी भाषांत चालणें किती उचित आहे, हें ध्यानांत आणून तसें होण्याची खटपट करीत असणें हें एकीकडेच राहिलें; पण बाकीच्या विषयांप्रमाणें देशी भाषांस युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमाचा एक विषयही आम्हांस करतां येत नाहीं, यावरून आमची आस्था, धमक, निश्चित विचार, देशकल्याणाची खरी कल्पना आणि कोणत्याही गोष्टींत यश येईपर्यंत तिचा पाठलाग न सोडण्याचा निर्धार, हीं व्यक्त होतात! युनिव्हर्सिटी आपल्या अभ्यासक्रमांत देशी भाषांस घालीत नाहीं! युनिव्हर्सिटी अमकें करीत नाहीं! युनिव्हर्सिटी तमकें करीत नाहीं! असें रडगाणें आतां आम्ही किती दिवस गात बसणार? युनिव्हर्सिटी, सिंडिकेट, सेनेट, अभ्यासक्रम, शिक्षणालयें हीं सारी निश्चयानें परिश्रम केल्यास आपल्या हातीं येणार आहेत, व आपणांस त्यांना पाहिजे तें वळण लावितां येणार आहे, हें तुम्हांस केव्हां कळूं लागणार? अगोदर देशी भाषांचा अभ्यास होऊं लागण्यांत व पुढें त्या भाषांतच अभ्यास होऊं लागण्यांत या देशाचें खरें हित आहे अशी तुमची पक्की खात्री झाली असेल; तर युनिव्हर्सिटीचें नाक धरून तिच्याकडून या अप्रिय औषधीचा स्वीकार करविणें अशक्य आहे काय? ती मोठी सामर्थ्यवती आहे हें आम्ही कबूल करतों. पण अशीला जेरीस आणण्याचा खरा उपाय, तिच्यापुढें पदर पसरून 'यांत आम्हास भिक्षा घाल' अशी तिची दीनस्वरानें प्रार्थना करीत बसणें हा नव्हे. असें करूं लागलांत कीं, तिला अधिकच ताठा भरला म्हणून समजा. अभिमानाचा काटा अभिमानानेंच काढला पाहिजे. युनिव्हर्सिटीचीं सूत्रें सध्यां ज्यांचे हाती आहेत, त्यांना देशी भाषांचा किंवा देशी भाषांत वरिष्ठ प्रतीचा अभ्यास होऊं लागल्यानें पाश्चिमात्य ज्ञानभांडारावर हल्ला करणें, व त्या हल्ल्यांत सापडलेल्या लुटीपासून आपलें हित करून घेणें- या गोष्टीस किती साहाय्य होणार आहे, हें अद्यापि नीट दिसूं लागलें नाही, कितीही समजाऊन सांगितलें तरी समजत नाहीं, कानाशीं कितीही ओरडलें तरी ऐकूं येत नाहीं? असल्या लोकांस समजविण्यास, पाहविण्यास, व ऐकविण्यास, लेचेपेचे प्रयत्न उपयोगी नाहीत. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चळवळ करून तिच्या दंग्यानें यांचीं डोकीं भणाणून सोडिलीं पाहिजेत; 'देशी भाषा युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत घातल्याच पाहिजेत व ज्यांना जे विषय त्यांच्याद्वारें शिकविण्याची इच्छा असेल त्यांना ते शिकविण्याची परवानगी दिली पाहिजे', अशा अर्थाचे अर्ज प्रत्येक खेड्यातून, तालुक्यातून, व जिल्ह्यातून मुंबईस रवाना होऊन, त्यांचे प्रर्वतप्राय भारे युनिव्हर्सिटीच्या हॉलांत येऊन पडले पाहिजेत, व लोकमत न पहाणाऱ्या

प्रस्तुत अधिकाऱ्यांना जातां येतां त्यांचे धक्के बसले पाहिजेत, म्हणजे ते डोळे उघडून पाहूं लागतील! अशा रीतीनें त्यांचे डोळे व कान यासंबंधानें आपापले व्यापार नीट करूं लागले म्हणजे त्यांचे मेंदूही स्वाभाविकपणें आपलें काम नीट करूं लागतील! पण त्या भरंवशावर केवळ स्वस्थ राहणें नीट नाहीं. त्यांच्यापुढें या विषयांची चर्चा करून त्यांची खात्री सोडण्यासाठी दूरदर्शी, विद्वान, बहुश्रुत, तारतम्यज्ञ व वाग्विदग्ध अशा प्रतिनिधींस हा कज्जा युनिव्हर्सिटीच्या कोर्टांत चातुर्यानें व नेटानें चालविण्याबद्दल वकीलपत्रें दिलीं पाहिजेत.

✷

न करत्याचा वार शनवार

राजकीय हक्क संपादन करण्यास आम्हांस जितक्या नडी आहेत; तितक्या समाजसुधारणेस नाहींत. परंतु चमत्कार असा कीं, तेथेंही पहावें तों आपलें गुडघाभरच पाणी. आतां असें कां व्हावें यास पुष्कळ कारणें आहेत, व त्यांपैकीं कित्येक सयुक्तिकही आहेत. परंतु खऱ्या अडचणीमुळें आमचें पाऊल जितकें थबकून राहते त्यापेक्षां खोट्या अडचणीमुळें आम्हांस अधिक माघार खावी लागते. ज्या वर्गावर सर्व प्रकारच्या सुधारणेचा बोजा साहजिकपणें येऊन पडला आहे, त्याच्यात जर कर्तव्यपराङ्मुखता नसती, तर खऱ्या अडचणी दूर करणें अशक्य नाही. परंतु एकतर आमच्या सुशिक्षित वर्गापैकी कित्येकांस आपली जबाबदारी मुळीच कळत नाहीं, व दुसरें, ज्यास ती कळते; त्यांच्यापैकीं कित्येक लोक विशेष स्वार्थपरायण असल्यामुळें, परोपकारार्थ आपल्या स्वतांस अप्रिय करून घेण्याचे त्यास कधीही सुचत नाहीं. सुधारक मानलेल्या लोकांनीं ज्या ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्या सर्व अप्रयोजक आहेत, असें म्हणावें तर तें आपल्या विद्वत्तेस शोभत नाहीं. तशानें सुशिक्षित लोकांत आपला सर्वथैव उपहास होणार. बरें, त्यांचेच मनोभावानें साह्य करावें तर सामान्य लोकसमुदायाकडून कांहीं काळपर्यंत तरी निंदा होणार. तेव्हां अशा स्थितींत काय करावें? दोहोंकडचा लोभ तर सुटत नाहीं. अर्थात त्यास उपाय एकच. ढोंगी बनावें म्हणजे झालें.

अशी आमच्या कित्येक सुशिक्षितांची अवस्था असल्यामुळें, आणलेल्या सोंगाची बतावणी करण्यास, त्यांस बऱ्यावाईट सर्व मार्गांचें अवलंबन करण्याची अर्थात् पाळी येते. आपली लबाडी उघडकीस येऊं नये म्हणून गारोडी जसा हरतऱ्हा करीत असतो, तसा याचा प्रकार एकसारखा चालूं असतो. 'करून कां दाखवीत नाहीं?' म्हणून जो एक अशा लोकांकडून प्रश्न येतो, त्यांचें इंगितही यांतच आहे असें आम्ही मागेंच एकदां दाखविलें आहे. आता यावर जर कोणी त्यांस उलट प्रश्न केला कीं, 'बरें, दुसरे मूर्ख ठरले तर ठरेनात. तुम्ही स्वतःच काहीं दिग्विजय करून कां दाखवीत नाहीं?' तर त्यावरही त्याच्या पोतडींत शक्कल तयार आहेच. ''काय करावें हो! या पहिल्या मंडळींनीं अगदीं घाण करून टाकली. भलभलत्या गोष्टी विचार न करतां यांनी केल्या. लोकांचा विश्वास

उडाला. आतां फिरून लोकांचा आमच्यावर विश्वास बसण्यास फार काळ गेला पाहिजे. ही उतावळी सुधारक मंडळी आमचे पुढारी नव्हेत, हे आमचे कट्टे शत्रू आहेत, आमचा यांच्यावर अगदीं विश्वास नाहीं, अशी जेव्हां आम्ही लोकांची खातरी करूं, व या सर्वांस हुसकून लावूं, तेव्हां लोकांचा आमच्यावर विश्वास बसूं लागेल. मग पहा! 'चल चल' म्हणतां सुधारणाच सुधारणा! उगाच घाई करून सगळी घाणच करून टाकावयाची कीं नाहीं? दमादमानें घेतलें पाहिजे. 'पी हळद कीं हो गोरी' असें कोठें झालें आहे!''

वरील शक्कल खरोखर योग्य आहे किंवा 'आपल्याला कांहीं करावयाला नको' याचेंच हें सुधारलेलें भाषांतर आहे, हें ज्यांस पहाणें असेल, त्यांनीं 'ज्ञानदीप' मासिक पुस्तकाचे १८८७ सालचे शेवटचे दोन अंक नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत, ते पहावे. त्यामध्ये पुनर्विवाहाच्या प्रसारार्थ झालेल्या उद्योगाचा संक्षिप्त इतिहास दिला आहे. यामध्यें दिलेला इतिहास जर खरा असेल, व तो तसा आहे असें आम्हांस वाटते, तर मग या पुनर्विवाहाच्या बाबतींत आमच्या पूर्वीच्या पिढींतील लोकांनीं भलभलते प्रकार केले, असा त्यांच्यावर आणलेला आक्षेप वाजवी नाहीं असें आम्हांस म्हणावें लागते. हा पुनर्विवाहाचा विषय पुढे आल्यास आज ५०-६० वर्षें झालीं. परंतु तेव्हांपासून आतांपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टीचा उल्लेख करण्याची आम्हांस अवश्यकता नाहीं. आमचा उद्देश इतकाच आहे कीं, मागल्या पिढीतील पुढारी लोकांस उतावळे सुधारक हें नांव किती अंशानें लागूं होण्यासारखे आहे, हें या इतिहासांतील काहीं ठळक गोष्टींच्या साह्यानें वाचकांस दाखवावें. याप्रांती पुनर्विवाहाविषयीं विशेष प्रयत्न करणारे विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचें नाव सर्व आबालवृद्धांस माहीत आहे.पुनर्विवाहाचा प्रचार पाडणें युक्तिदृष्ट्या कितीहि अवश्यक असलें, व तो करण्याची स्त्रियांस परवानगी नसणें म्हणजे केवळ अन्याय होय ही गोष्ट जरी कितीही उघड असली, तथापि या गोष्टीचा संबंध धर्माशीं पोंचत असल्यामुळें पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, अशी लोकांची खात्री करून देणें अवश्य आहे, ही गोष्ट शास्त्रीबोवा विसरले नव्हते. प्रथमत: पुस्तकरूपानें व वर्तमानपत्रद्वारा लोकांची समजूत घालण्याचे प्रयत्न त्यांनी केले, व नंतर याविषयीं कोणास शंका असेल तर त्यांनीं वादास उभे रहावें, अशा अर्थाचे जाहीरनामे शहरोशहरीं स्वत:च्या सहीनिशी लावले. परंतु उपयोग झाला नाहीं. विधवेचें गोत्र कोणतें धरावें, तिचें दान कोणी करावें, अशौचाचा निर्णय कसा, दायभागाचा निर्णय कसा, वगैरे बारीक शंकांचीं उत्तरें देण्याची जी शास्त्रीबोवांनीं मेहनत घेतली, ती उतावळेपणाचीच साक्ष असली तर नकळे! इतकेंच करूनही विरुद्धपक्षाची मंडळी वाद करण्यास उभी राहीनात. तेव्हां अर्थात् ज्या प्रचाराच्या

सशास्त्रतेबद्दल त्यांची खात्री झाली होती, तो प्रचार सुरू करण्याचा 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी'नें निश्चय केला, हेंही साहजिकच झालें. १८६९ सालीं जो प्रसिद्ध विवाह, सदर मंडळीनें घडवून आणला; त्यांतील वधूचें वय १६ वर्षांचे असून, तिच्या दोन बंधूंच्या विचारानें ती विवाहास तयार होती. विवाह होण्याच्या अगोदर दोन दिवस 'हिंदुधर्म व्यवस्थापक सभे'कडून पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेबद्दल वाद करून, सशास्त्र ठरल्यास हा विवाह व्हावा, व तोपर्यंत तो तहकूब ठेवावा, अशा अर्थाचें पत्र आलें होतें हें खरें. पण इतक्या दिवस विधिपक्षाची मंडळी वादास तयार असून कोणी वादास आलें नाही, व आयत्या वेळीं ही मंडळी वादास बोलावतात, त्या अर्थी कोणीकडून तरी या विवाहास विघ्न आणावें असा त्यांचा उघड हेतु दिसतो, असें समजून मंडळीनें विवाह करण्याचा निश्चय कायम ठेवला यांत नवल नाहीं. लोक आपणांस वाळींत टाकणार याविषयीं जरी विधिपक्षास संशय नव्हता, तथापि शास्त्रीबोवांनीं एकंदर विवाह हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें चालविला, व यावरूनही त्या मंडळींचा उतावळेपणा सिद्ध होत नाहीं. उलटपक्षाच्या मंडळींनीं शास्त्रीबोवास 'तुमच्या छापखान्यास आग लावूं' अशी धमकी दिली असतां, मॅजिस्ट्रेटाकडून त्यांनीं त्यांचे मुचलके घेतले यांतही त्यांचा दोष दिसत नाहीं. परंतु मुचलके घेण्यापलीकडे शास्त्रीबोवा गेले नाहींत. उलटपक्षाच्या मंडळींनीं तर रा. ब. विष्णु परशराम रानडे, रा. बाळ मंगेश वागळे, नारायण महादेव परमानंद वगैरे मंडळींवर सभेमध्ये मारामारी केल्याबद्दल कोर्टांत फिर्याद लावली. परंतु कांहीं निष्पन्न झालें नाहीं. विवाहपत्रिकेवर सह्या करणारे ७ गृहस्थ, वधूवर, व वधूचे दोनही बंधू यांस हिंदुधर्म व्यवस्थापक मंडळीनें बहिष्कार घातला. पुनर्विवाह अशास्त्र आहे असें ठरेंपर्यंत हा बहिष्कार आम्हांस मान्य नाहीं म्हणून पुण्यांतील सुशिक्षित मंडळींनीं आपल्या सह्यांनिशीं वर्तमानपत्रांतून जाहीर केलें. या सह्यांची संख्या १७२ पर्यंत येऊन ठेपली, तेव्हां विरुद्ध पक्षास भीति वाटूं लागली, व त्यांनीं १८७० च्या मार्च महिन्यांत श्रींची स्वारी पुण्यांत आणली. प्रत्येक पक्षास पांच पांच पंच होते. त्यांच्या बहुमतावर निकाल ठरावयाचा होता. निषेधपक्षाकडील पांचही पंच पुनर्विवाहाच्या विरुद्धच होते. पैकीं एका पंचानें तर भरसभेंत असें बोलून दाखविलें कीं, आम्हांस सत्यासत्य पाहण्याची गरज नाहीं. आम्हांस कोणीकडून तरी प्रतिपक्षाचा पाडाव करावयाचा! परंतु इतकें झालें तरी पुनर्विवाह अशास्त्र ठरण्यास बहुमत झालें नव्हतें. तेव्हां येनकेनप्रकारेण तें करण्याचा निषेधपक्षानें प्रयत्न केला. वे. व्यंकटशास्त्री हे मोठे सत्त्वस्थ गृहस्थ होते. त्यांनीं स्वतः शास्त्रीबोवास पुनर्विवाहाबद्दल शास्त्राधार काढून दिला होता. त्यावरून अर्थात त्यांचे मत विधिपक्षास अनुकूल होतें. परंतु कित्येक

शास्त्री मंडळींनीं व खुद्द शंकराचार्यांनीं त्यांस उलट मत देण्याविषयीं आग्रह केला. धर्मराज देखील खोटें बोलले, मग अशावेळीं तुम्हांस खोटें बोलण्यास काय हरकत आहे, असा त्या भोळ्या म्हाताऱ्यास उपदेश करून त्यांच्याकडून स्वामींच्या पायांची शपथ वाहून घेतली. तेव्हां अशा निर्लज्जपणानें पुनर्विवाह अशास्त्र ठरविण्याचा झालेला प्रयत्न पाहून विधिपक्षाच्या मंडळीस पराकाष्ठेचा राग यावा, व सरकारदरबार व्हावेत व कित्येक मंडळींच्या मनांतून शंकराचार्यांवर फिर्याद करण्याचा विचार यावा, ह्यांत विलक्षण असें आम्हांस कांहींच दिसत नाहीं.

वरील सर्व गोष्टींवरून पुनर्विवाहाचा एक प्रचार पाडतांना त्यांतल्या त्यांत जातिभेद मोडावा, हिंदुधर्मशास्त्रांतील वेडगळ विवाहपद्धतीस झुगारून द्यावें, गणगोत पाहूं नये वगैरे उतावळेपणामुळें लोकांस चीड आली, ही गोष्ट सर्वथैव खोटी होय. १६ वर्षांच्या कोंकणस्थ विधवेचा २५ वर्षांच्या कोंकणस्थ वराशीं तिच्या स्वत:च्या भावांनी विवाह लावण्यास तयार असावें, सर्व विधि धर्मशास्त्राप्रमाणें व्हावा, यांत सर्व सुधारणा एकदम करूं पाहण्यासारखें कांहींच झालें नाहीं. आतां इतका प्रयत्न करूनही व इतकी खबरदारी घेऊनही प्रतिपक्षाचा दुराग्रह सुटत नाहीं. आपलें म्हणणें (मग तें वाकड्या मार्गानें का होईना) सिद्ध करण्याचा निश्चय करून त्यांनीं तो शेवटास नेला, ही गोष्ट जेव्हां ठरल्यासारखी झाली, तेव्हां त्यापुढें जे पुनर्विवाह झाले त्यांत लौकिकाचा फारसा विचार न करितां, ज्यांस जो प्रकार योग्य व निर्दोष वाटला तो त्यांनीं केला. एवीतेंवी लोकांची मदत मिळत नाहीं, आपणास वेगळी जात तर करावी लागते, व बहिष्काराची पूर्ण छलना सोसावी लागते ती लागतेच. मग इतक्या अडचणी सोसण्याचें ज्यांनीं धैर्य केलें, त्यांनीं लोकांची खुशामत करण्यास कबूल कां व्हावें? त्यांस जर जातिभेद, विवाहविधि, गणमैत्री वगैरे प्रकार ईश्वरकृत नसून मनुष्याच्या अज्ञानापासून झालेले आहेत हें उघड दिसत असलें, तर मग लोकांची पर्वा कां ठेवावी? हें आम्हांस कळत नाहीं. समाजानें जर त्यांस थोडीशी मदत केली असती, तर समाजाच्या समजुतीस मान देण्यास तेही तयार झाले असते. जेव्हां समाजानें त्यांस टाकून दिलें, तेव्हां त्यांनींही तो धिक्कारिला, हें यथास्थितच झालें. तात्पर्य, सुधारकांनीं या गोष्टींविषयीं चर्चा सुरू करण्यापासून शेवटपर्यंत जितकें करून समाजांत फूट पडणार नाहीं, तितके प्रयत्न केले; परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं; याचा दोष त्यांच्याकडे नाहीं, बाकीच्या समाजाकडेच आहे. अमुक एकानें पुनर्विवाह कां केला नाहीं? हा प्रश्नही वरच्या माळकेपैकीच होय. नुसती हजामत करावयाची झाली तरीही 'छे, आज एकादशी आहे, बाबा रागावतील' अशी ज्यांची स्थिति, त्यांनीं दुसऱ्या एखाद्यानें पुनर्विवाह न करण्यास अशीच

कांहीं कारणें असतील हा विचार कां करूं नये? बरें, एकाच्या हातून चूक झाली, त्याच्या अंगीं बोलण्याप्रमाणें चालण्याचें धैर्य नाहीं; परंतु त्याशिवाय ज्यांनीं बोलण्याप्रमाणें आचरण करण्याकरतांच उतार वय झाले असूनही पुनर्विवाह केला, अशी शास्त्रीबोवांसारखीं उदाहरणें लोक पुढें कां आणीत नाहींत? उलट तेवढेंच उदाहरण पुढें कां आणतात?

आतां; कोणतीही गोष्ट मनुष्य करूं लागला असतां चुका ह्या होणारच. मागच्या लोकांनीं त्या चुका पाहून पाहिजे तर शहाणपण शिकावें व कमी चुका करण्यास झटावें. परंतु आपण कांहीं न करतां दुसऱ्यांवर नुसती टीका करण्याचें काम नामर्दपणाचें आहे. सगळेच पुराणिक चातुर्मासांत वांगीं सोडतात असें नाहीं. कित्येकांस अनेक कारणांमुळें पुराणांतलीं वांगीं पुराणांत ठेवावीं लागतात. वैराग्याचा उपदेश करणारे सर्वच हरदास दिगंबर नसतात. म्हणून तेवढ्यावरून सर्व पुराणिक व सर्व हरदास जनसमुदायाचे शत्रू आहेत, असें कोणी मानीत नाहीं; मग मागल्या पिढीतील लोकांनीं एकादी चूक केली असली, तथापि त्यांनीं केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले, असे म्हणतां येणार नाहीं. त्यापासून आपल्या पुढील कार्यभागास मदतच झाली पाहिजे. त्यांनीं आमची हानि केली म्हणून आम्हांस हातपाय बांधून बसावें लागतें, हें म्हणणें 'न करत्याचा वार शनवार' यापैकींच आहे.

असो. वर निर्दिष्ट केलेल्या निबंधांत जितका इतिहास दिला आहे, तेवढ्यावरून आजपर्यंत या बाबतींत कसकसे व काय काय प्रयत्न झाले, याची बरीच चांगली अटकळ होते. तथापि याहून सविस्तर माहितीचें पुस्तक झाल्यास नव्या पिढीस अधिक फायदा होण्याचा संभव आहे, व तसें करण्यास निबंधकारास बरींच साधनें आहेत, असे आम्हांस वाटतें. म्हणून पुढें मागें जमल्यास त्यानीं हा प्रयत्न अवश्य करावा, इतके सुचवून आम्ही तूर्त हा लेख संपवितों.

*

हलवायाचे दुकानावर ब्रह्मार्पण

येथील सरकारी नोकरींत जे इंग्लिश लोक आहेत त्यांचे सनदी व बिनसनदी असे दोन वर्ग आहेत, हें आमच्या वाचकांस ठाऊक असेलच. यांपैकीं पहिल्या वर्गांतील नोकर आमचे व सरकारचे शुद्ध जांवई आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांच्या जागा, यांचे पगार, यांच्या बढत्या, यांच्या बदल्या, व यांची पेन्शनें यांविषयीं जे नियम ठरलेले आहेत, त्यांचें उल्लंघन करण्यास कोणीही समर्थ नाहीं! अलीकडे दुसऱ्या वर्गांतील लोकही या जावयाचे हक्क कमावूं पहात आहेत! या कामांत यश येण्यासाठीं त्यांनीं जे भगीरथ प्रयत्न चालविले आहेत, ते पाहून या इंग्लिश लोकांच्या दीर्घोद्योगाची तारीफ न करणें अशक्य आहे. दोन-तीन वर्षांच्या खटपटीनें येथून इंग्लंडापर्यंत त्यांनीं असा घाट उडवून दिला आहे कीं, पहावें तें वर्तमानपत्र, घ्यावा तो मुत्सद्दी, व म्हणावा तो पार्लमेंटचा सभासद यांच्या मुठींत आल्यासारखा दिसतो! हिंदुस्थानांतील रुपयाची किंमत उतरली असल्यामुळें आपल्या पगारापासून आपला जितका व्हावा तितका फायदा होत नाहीं; इंग्लंडास पैसे धाडण्यांत जी हुंडणावळ द्यावी लागते तीमुळें आपलें फार नुकसान होतें, व पेन्शनास तर फारच मोठा छाट बसतो, अशी यांची तक्रार आहे. जे लोक यांच्या वतीनें बोलतात; ते असें म्हणतात कीं, सरकारच्या अशा इमानी नोकरांस असंतुष्ट ठेवण्यांत सरकारचा बिलकुल फायदा नाहीं. सरकारानें आपल्या नोकरांच्या पाठीवर हवे तितकें कोरडे ओढून पाहिजे तितकें काम खच्चून करून घ्यावें, पण त्यांच्या पोटावर मारूं नये. या सर्व बिनसनदी नोकरांचा संतोष राखण्यास फार झालें तर तीन चार लाख रुपये लागणार आहेत. येवढी रक्कम सरकारास पाहिजे तेथून काढतां येईल. हिची काटकसर करणें म्हणजे काडीसाठीं पाडी गमावण्यासारखें होय! हें सर्व एका दृष्टीनें बरोबर आहे. पण हे तीन लाख रुपये उत्पन्न होणार कोठून? याचा विचार कोणीच करीत नाहीं. गेल्या वर्षी सेक्रेटरी ऑफ् स्टेटनें या लोकांस असें उत्तर दिलें कीं, तुमची तक्रार बिलकुल ऐकली जाणार नाही. कारण अमुक किंमतीच्या रुपयांनीं तुमचे पगार व पेन्शनें दिलीं जातील, असें सरकारानें बंधन करून घेतलेलें नाहीं. हिंदुस्थानांत जो व जसला रुपया चालू असेल, तो व तसला रुपया तुम्हाला पत्करला पाहिजे. तुमची

तक्रार ऐकणें म्हणजे हिंदुस्थानच्या गरीब प्रजेवर नवीन बोजा लादणें होय. हें सेक्रेटरी ऑफ स्टेटचे गतवर्षीचें उत्तर. यावर्षी तोच अधिकारी असें म्हणतो कीं, तुमची तक्रार वाजवी आहे व तिची चौकशी करण्याकरितां लौकरच पार्लमेंटरी कमिटी नेमण्याचा आमचा विचार आहे! काय करील बापडा? बाकीचे प्रधान, पार्लमेंटचे सभासद, वजनदार वर्तमानपत्रें, देशांतील ठळक लोक, व हिंदुस्थानांतील मोठमोठे अंमलदार, इतक्यांनीं तुमची तक्रार विचारणीय आहे, असें आश्वासन दिल्यावर ती तशी नाहीं, असें म्हणण्याची हिंदुस्थान सेक्रेटरीची प्राज्ञा आहे काय? ज्याप्रमाणें बैलाची वेंसण धरून किंवा गाढवाचा कान धरून आपण त्यास पाहिजे तसें वागवितों, त्याप्रमाणें इंग्लंडासारख्या देशांत लोकमत सरकारी अधिकाऱ्यांस वागवितें. थोड्या दिवसांत या बिनसनदी नोकरांच्या खटपटीला निदान थोडें तरी यश येईल, याबद्दल आम्हांस बिलकुल शंका नाहीं. आतां आमची स्थिति पहा. जीं कामें बिनसनदी नोकर करतात, तीं आमच्यानें होण्यासारखी असून आम्ही सरकारास असें विचारीत नाहीं कीं, असले तक्रारी नोकर तुम्ही लावता तरी कशासाठीं? देऊं केलेल्या पगारांत यांचें समाधान होत नसेल तर त्यांचे काका दुसरे कां लावीत नाहीं? रुपयाची किंमत कमी न होऊं देणें ही सरकारच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. तेव्हां तीपासून जें नुकसान होईल तें सर्वांनी निमूटपणें सोसलें पाहिजे. रुपयाची किंमत उतरल्यानें आम्हां नेटिवाचें नुकसान होत नाहीं काय? युरोपिअन लोकांसच पैशाची किंमत कळते, व ऐषआरामाची लज्जत समजते, असें तर नाहींना? मग या बिनसनदी नोकरांचीच तक्रार ऐकणें हा पक्षपात नव्हे काय? व या पक्षपाताबद्दल गरीब रयतेचें तट्टू हवें तसें ताबडीत सुटणें हा अन्याय व पाप नव्हे काय? पण हें सारें पहातो कोण? नेटिव्ह लोकांस उच्च प्रतीचीं कामें करतां येत नाहींत, व त्यांच्या खर्चास फार पैसे लागत नाहीत, हीं दोन प्रमेयें प्रत्येक युरोपिअनाच्या मनांत वज्रलेप होऊन गेलीं आहेत, व आम्ही नेटिव्ह त्यांचे निराकरण करण्याचा मुळींच प्रयत्न करीत नाही. तेव्हां आमचे कोणी ऐकत नाहीं, व मुक्या रयतेवरील कराचा बोजा प्रतिवर्षी वाढत आहे, हे कांही आश्चर्य करण्यासारखें नाहीं. वास्तविक पाहतां, या बिनसनदी नोकरांच्या चळवळीबरोबर आम्हां लोकांतही चळवळ सुरू व्हावयाला पाहिजे होती. पण आम्हीं पडलों कर्णाचे कर्ण! जे आम्हीं साऱ्या राज्यावर उदक सोडून बसलों आहों ते आम्ही पांचचार लाख रुपयांसाठीं अनुदारता प्रगट करण्यास तयार होऊं काय? ही उदारता व ही शांती आम्हांस किती भोंवणार आहे हें कोणाच्यानेंही सांगवणार नाहीं!

*

राजकीय संनिधानाचें अपायकारकत्व

मनुष्य हा एकांतवासप्रिय प्राणी नाहीं; समाज करून राहिल्याशिवाय त्याला सुख होण्याचा संभव नाहीं. समाज संस्थापनास श्रमसंयोगाची अवश्यकता आहे, व श्रमसंयोग होऊं लागल्यास समाज पाहिजे, म्हणजे त्या उभयतांचे अन्योन्यावलंबन आहे; श्रमसंयोग चांगला चालण्यास सामाजिक संनिधान (Social organization) पाहिजे; हे संनिधान दोन प्रकारचें आहे- एक स्वायत्त, व दुसरे परायत्त; स्वायत्त संनिधानापासून व्यक्तीचें हित होतें; समाजाचें हित प्रथम साधणें हा परायत्त संनिधानाचा मुख्य उद्देश होय; समाजाच्या आद्य स्थितीत परायत्त संनिधानाशिवाय समाजाचें संरक्षण व प्रगति व्हावयाची नाही; परायत्त संनिधानापासून राजकीय संस्थांची उत्पत्ति होते, व समाजाच्या प्रथमावस्थेत या संस्थांचा अंमल सक्तीनें चालविणें अवश्य असतें; तसें न झाल्यास समाजाची वाताहात होऊन, कोणाचेंच कल्याण होत नाहीं; वगैरे गोष्टीचेविवरण मागल्या लेखांत केलें आहे. राजकीय संस्थांच्या सक्त अमलामुळे लोकांचे कोणत्या प्रकारचें नुकसान होतें हें आज दाखविण्याचा विचार आहे.

हवा, पाणी, व अन्न ही शरीररक्षणास अवश्य लागणारीं द्रव्ये आहेत; पण यांचें फाजील सेवन झालें असता तीं अपायकारक होतात, याचा प्रत्येकास अनुभव आहे. एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीशीं व एका पोटसमुदायाने दुसऱ्या पोटसमुदायाशीं सलोख्याने वागून समाजांत श्रमसंयोग उत्पन्न होऊं द्यावा, व तो होण्यासाठीं कोणाचा तरी सर्वांवर सक्त अंमल चालावा, ही गोष्ट निर्विवाद आहे; व अशा प्रकारच्या सक्त अंमलापासून होणारा फायदा आम्हांस पूर्णपणे मान्य आहे. पण यावरून असे समजतां कामा नये कीं, ही सक्ती जेवढी अधिक करावी तितकी समाजसुधारणेस अधिक मदत होते. या सक्तीसही सीमा आहे. या सीमेचें उल्लंघन केलें असतां ती समाजहितवर्धक न होतां, समाजहितविघातक होते. सारांश, समाजाचे आकलन करण्यास कोणत्याही प्रकारचें सरकार नसल्यामुळे जे परिणाम होतात, तेच सरकारच्या फाजील सक्तीपासून होऊं लागतात. सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ आणि ते जीं कामें करतात त्यांचा खर्च प्रजेनें दिलेल्या करांपासून होत असतो. हे कर जर प्रजेच्या सामर्थ्याबाहेर गेले, किंवा ते; तीपासून

काढण्यापासून सरकारी अंमलदार तीस दु:सह पीडा देऊं लागले, तर जिकडे तिकडे मारामाऱ्या, दंगेधोपे, व तंटे सुरूं होऊन सर्वत्र अनवस्था होणार नाहीं काय? प्रजा कितीही राजनिष्ठ असली तरी अचेतन वस्तूप्रमाणें पाहिजे तसली वागणूक ती हवा तेवढा वेळ सहन करील, असें समजणे हे शुद्ध मूर्खपण होय. कांही केलें तरी जाचांतून सुटण्याची आशा नाहीं, अशी खात्री झाली असतां, अगदीं क्षुद्र व क्षीण व्यक्ती देखील बिथरून जाऊन आपला छल करणारास शासन करण्यासाठी, बेफाम होऊन त्याच्या नरडीचा घोट घेण्यास धाऊन जाते, असे अनेक प्रसंगी दिसून येतें. हा एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीवर केलेल्या फाजील जुलमाचा परिणाम होय. जेव्हां कोणत्याही देशातील सरकार आपल्या प्रजेशीं अशा प्रकारचे वर्तन करतें, तेव्हां तीही कितीही सहनशील असली तरी अंमलदारांचा जुलूम दु:सह झाला असता, राजनिष्ठा झुगारून देऊन, त्यांस दंड करण्यासाठी बंड करण्यास प्रवृत्त होते. सरकारी अंमलदारांचा जुलूम असह्य झाल्यामुळे लोकांनी हत्यारांस हात घालून छल करणाऱ्या राजास आणि त्याच्या साथ्यांस कंठस्नान घातल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. सरकारी अंमलदारांच्या जुलमापासून होणारे दुष्परिणाम या आशिया खंडांतील प्रत्येक देशांत पूर्वीपासून दृष्टीस पडताहेत. युरोपखंडाच्या सुधारणेपेक्षां आशियाखंडांतील सुधारणेस आरंभ अगोदर झाला असून ती आजमितीस इतकी मागें पडली आहे, याचें बऱ्याच अंशी येथील राजांचा जुलूम; हें कारण आहे असें म्हणण्यास हरकत नाही पूर्वेकडील राजांचा अनियंत्रितपणा सर्व पृथ्वीवर गाजत आहे. या अनियंत्रितपणामुळें होणारी विपत्ति अनवस्थेपासून उत्पन्न होणाऱ्या विपत्तीपेक्षां कधी कधी अधिक असते, यांत संशय नाही. रोमन लोकांनीं मिसरदेश काबीज केल्यावर, तेथे जो सक्तीचा अंमल बसविला, त्याची गोष्टही अशीच आहे. ज्याप्रमाणें सध्यां आम्हांस हिंदुस्थान सरकारच्या व प्रांतिक सरकारांच्या खर्चाबद्दल नानाप्रकारचे कर द्यावे लागतात, त्याप्रमाणें इजिप्तच्या लोकांसही द्यावे लागत असत. तसेच, आतां ज्याप्रमाणें इंग्लिश लोकांनीं आपल्या फायद्यासाठीं ब्रह्मदेशांत, अफगाणिस्थानांत, व चीनांत, युरोपांत, किंवा आफ्रिकेंत युद्ध मांडिलें असतां आम्हांस मनुष्यांचा व पैशाचा पुरवठा करावा लागतो, व आम्हीं त्याबद्दल कितीही ओरडा केला तरी त्याकडे हिंदुस्थान सरकार किंवा ब्रिटिश पार्लमेंट लक्ष देत नाहीं, त्याप्रमाणें रोमन लोक जीं जीं युद्धे करीत, त्यांबद्दल इजिप्शीयन लोकांस भुर्दंड करावा लागे. वरचे अधिकारी खालच्या अधिकाऱ्यांपासून इतका पैसा उकळीत की, त्यांस आपल्या जागांचा राजीनामा देणे किंवा सदसद्विवेक एकीकडे गुडाळून ठेऊन तरवारीच्या धारेवर प्रजेपासून होईल तेवढी माया

काढण्यास तयार होणें भाग पडत असे. मांडलिकांनीं एक वर्षी स्वसंतोषानें दिलेला नझराणा पुढल्या वर्षी करभार होऊन बसे, व तो कोणी न दिल्यास त्यावर रोमन पलटणी चाल करून जात! ठरींव कर तर निमुटपणें द्यावे लागतच; पण त्याशिवाय सैन्याच्या अन्नपाण्याचा, वस्त्रपात्राचा, व सामानासुमानाचा पुरवठा प्रजेस करावा लागे! अशा स्थितींत प्रजेचे किती हाल होत असतील, याची वाचकांनींच कल्पना करावी. तथापि रोमन पादशाहीस उतरता पाया लागला असतां रोमन अधिकाऱ्यांनीं फ्रान्स देशांतील लोकांचा जो छल केला, त्याचा इतिहास याहूनही हृदयद्रावक आहे. त्या कालीं त्या देशांत रोमन अधिकाऱ्यांचा सुळसुळाट इतका झाला होता, व करांचें ओझें इतकें वाढलें होतें कीं, मजूर लोकांच्या अंगांत काडीचा देखील तक्वा राहिला नाहीं, सुपीक प्रांत ओसाड पडले, व ज्या ठिकाणीं नेहमीं नांगर चालत असत; त्या ठिकाणीं भयंकर रानें वाढली! प्रत्येक प्रांतावर व शहरावर अंमलदारांचा येवढा वर्षाव होत असे कीं, त्यांच्या संख्येचें अनुमान करणें अशक्य होऊन गेलें होतें. चाबकाच्या 'चप चप' शब्दानें आणि ज्यांच्या पाठीवर ते झडत आहेत त्यांच्या आक्रोशानें वातावरण सर्वकाळ भरून गेलेलें असे. विश्वासू गुलामानें आपल्या धन्याविरुद्ध, बायकोनें आपल्या नवऱ्याविरुद्ध, व मुलानें आपल्या बापाविरुद्ध पुरावा द्यावा, म्हणून त्यास चांप लावण्यांत येत असत. एक तालुकदार पाठवावा व त्यानें कांहींएक जमाबंदी करावी; ती पुरेशी न वाटून त्यास बडतर्फ करावें, आणि त्याहून अधिक खरमरीत दुसरा तालुकदार त्याच्या पाठीमागून पाठवावा; व असें किती वेळां करावें आणि त्यांनीं किती जुलूम करावा, याला कांहींच सुमार नसे. अशा जाचामुळें गुरें आणि माणसें पटापट मरत; पण जे मागें राहत त्यांस आपल्या वांट्याचे व मेलेल्यांच्या वांट्याचे कर दिल्याशिवाय गत्यंतर नसे! अशा संकटावस्थेंत रोमन प्रजेस कर गोळा करणारापेक्षां शत्रूच बरा वाटे, व संधि सापडल्याबरोबर ते अंमलदारांस सोडून शत्रूस जाऊन मिळत, हें किती स्वाभाविक होतें बरें? रोमन पादशाहीचा ऱ्हास झाल्यावर फ्रान्स, स्पेन वगैरे देशांत व्हॅन्डाल्स, गॉथ्स वगैरे लोकांनीं लहान लहान स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. प्रथमारंभीं या स्वल्प संस्थानांच्या नायकांची सत्ता फार संकुचित असे. त्यांना आपल्या सरदारांचा नेहमीं धाक असे. कालांतरानें या सरदारांचें अधिकार नष्ट होऊन राजांची सत्ता प्रबल झाली, व रोमन पदपादशाहीचा इतिहास आणखी एकवार घडून आला. या प्रबल झालेल्या गॉथिक बादशहांनीं किंवा राजांनीं रोमच्या बादशहांप्रमाणें आपल्या प्रजेस छळण्यास व नाडण्यास आरंभ केला. ज्या त्या गोष्टींत सरकार हात घालूं लागलें. कोणीं कोणता धंदा करावा, कोणीं कोणता पेहराव वापरावा, कोणीं कोणत्या प्रकारें ईश्वरपूजा करावी,

कोणत्या शेतकऱ्यांनीं कोणता जिन्नस किती उत्पन्न करावा, कोणत्या कारखानदारांनीं किती मजूर पदरीं ठेवावे, किती मजुरी द्यावी, किती भांडवल कोणत्या व्यापारांत घालावें, व कोणता माल किती उत्पन्न करावा, याविषयीं सरकारी नियमांवर नियम व कायद्यांवर कायदे होऊं लागले, व त्याचा अंमल करण्यासाठीं नवीं नवीं खातीं आणि नवे नवे अधिकारी अस्तित्वांत आणून त्यांच्या पोषणासाठीं नानाप्रकारचे दु:सह कर बसविण्यांत येऊं लागले. रयतेच्या तक्रारींची कोठेंही दाद लागेनाशी झाली, व जिकडे तिकडे अन्याय माजून राहिला. कराच्या बोजाखालीं सारे लोक चीत होऊन गेले, आणि त्यांतून सुटण्यास काय उपाय करावे, हें कोणास कळेनासें झालें! याप्रमाणें सारी प्रजा बेजार होऊन गेल्यावर काय प्रसंग गुदरतो, याचें उदाहरण फ्रान्स देशांत १७८९ सालीं जी प्रचंड राज्यक्रांती झाली; ती देत आहे! शंभर वर्षांपूर्वी फ्रान्स देशांत लोकसंतापाग्नीचें जें भयंकर होमकुंड पेटलें त्यांत कित्येक शतकेंपर्यंत अनाथ प्रजेवर जुलूम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आणि सिंहासनस्थ राजाराणीच्या आहुती पडल्या! तात्पर्य, सामाजिक संनिधानास नियामक अशी राजसत्ता जरी अवश्यक आहे, तरी या सत्तेचा अंमल फाजील तीव्र झाल्यास समाजघटकांचें कल्याण न होतां अकल्याण होणें शक्य आहे. फ्रान्स देशांत १७८९ सालीं जो भडका पेटला त्याचें इंगित ज्यांस समजून घेण्याची इच्छा असेल, त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, दोनशें वर्षांच्या आंत फ्रेंच राजांनीं आपली जमाबंदी ११ कोटींपासून ३ अब्ज ११ कोटी केली! प्रस्तुत कालींही अशा प्रकारच्या जुलमाचीं उदाहरणें दृष्टीस पडण्यासारखीं नाहींत, असें नाहीं. जो कोणी नैल नदीच्या कांठानें थोडाबहुत प्रवास करील त्याला असें दिसून येईल कीं, जेथें जेथें सुलतानाचा अंमल नीट चालत नाहीं; तेथील प्रजा त्याचा अंमल चांगला चालत आहे अशा प्रांतांतील प्रजेहून विशेष सुखी आहे. पण या गोष्टीच्या सिद्धतेसाठीं या रानटी तुर्क लोकांकडेच पहावयास पाहिजे असें नाहीं. ब्रिटिश लोकांनीं कितीही बढाया मारल्या तरी येथील नेटिव संस्थानांतील प्रजा ब्रिटिश अंमलांतील प्रजेपेक्षां एकंदरीनें अधिक सुखी आहे, असें दाखविणें फारसें कठिण पडणार नाहीं. मि. लीवार्नरसारखे एककल्ली लोक ब्रिटिश राज्याचे कितीही पवाडे गावोत, एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपाल मि. वर्डस्वर्थ यांसारखे विचारी गृहस्थ असें कबूल करतात कीं, इंग्लिश लोकांनीं येथें जी स्वराज्यव्यवस्था स्थापिली आहे, तीबद्दल आम्हां हिंदु लोकांस जबरदस्त किंमत द्यावी लागत आहे.

यासंबंधानें स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांतील एक वाक्य, खालीं फूट नोटेंत

जसेंच्या तसेंच दिलें आहे.[१] कोणी असें म्हणतील की, हें लिहिणें इंग्लंडांत बसून लिहिणाऱ्या तत्त्ववेत्त्याचें आहे; म्हणून त्याला विशेष वजन देतां येत नाहीं. नसेल कदाचित्! पण डॉ. हन्टरसारख्या अधिकाऱ्याचा अभिप्राय तरी सर्वांस मान्य असला पाहिजे. या सरकारी प्रमुख स्टॅटिस्टिकवाल्याचें असें म्हणणें आहे की, हिंदुस्थानांतील अर्ध्या लोकांस प्रति दिवशीं अर्धपोटीं झोंपीं जावें लागतें! यावरून टापटिपीचा अंमल हटकून सुखावह असेलच, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. आगगाड्या, तारायंत्रें, गिरण्या, हायकोर्टें, तार ऑफिसें, पोस्ट ऑफिसें, वर्तमानपत्रें, कॉलेजें, प्रदर्शनें, टोलेजंग इमारती, प्रचंड बाजार, दरारा उत्पन्न करणारा फौजफांटा, हे आणि अशा प्रकारचे सुधारणेचे दुसरे दागिने घालून हिंदुस्थानासारखा परकी अंमलांतला देश कितीही नटला; तरी तो अंतर्यामीं सुखी असेलच, असें खात्रीनें म्हणवणार नाहीं. एखादे प्रसंगीं मयासुरानें निर्माण केलेल्या मायावी बाजारांत खरेदी करून बनलेल्या गिऱ्हाईकाप्रमाणें आमची स्थिती होण्याचा संभव आहे!

*

1. Notwithstanding the boasted beneficence of our rule in India, the extra burdens and restraints it involves, have the effect that the people find adjacent countries preferable; the ryots in some parts have been leaving the homes and setting in the territory of the Nizam and in Gualior.

सामाजिक घडामोड

एका घराचे दगड काढून दुसऱ्या घरास लावायचे असले तर किती त्रास पडतो, हे सर्वांस माहित आहेच. पण हेच दगड चुन्यात पक्के बसविलेले असले तर फारच त्रास पडतो, आणि त्यांतही पहिली इमारत बांधल्यापासून बरीच वर्षें लोटलीं असलीं, व चुन्याचा आणि दगडांचा एकजीव होऊन गेला असला, तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते, हे कोणास सांगावयाला पाहिजे, असें नाहीं, तात्पर्य, कोणत्याही जड द्रव्यांचा संनिकट संयोग करून त्यांपासून एक पिंड केला असतां, तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणें हें अतिशय कष्टाचे काम आहे, हें प्रत्येकानें कबूल केलें पाहिजे.

सामाजिक घडामोडीचाही असाच प्रकार आहे. प्रथम व्यक्तीच्या शरीररचनेचा विचार करा. आरंभीं हें शरीर समजातीय द्रव्यांचें झालेलें असून, पुढे तें जसजसें वाढत जातें तसतसें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें; व ज्या मानाने त्यात विषमजातित्व उत्पन्न होतें, त्या मानानें त्यांत अधिकाधिक दाढर्च उत्पन्न होऊन बाह्य संस्कारांस तें अधिकाधिक प्रतिबंध करूं लागतें. कोळे वेळू, लहान झाडांच्या खांद्या, किंवा तरुण मुलांचे अवयव यांत किती लवचिकपणा असतो बरें; वाढ खुंटून प्रत्येक अवयवांत काठिण्य आल्यावर, कोणत्याही मनुष्यास चागली कसरत शिकतां येत नाहीं, ही प्रत्येकाच्या पाहण्यांतली गोष्ट आहे. सामाजिक शरीरातही परिणतीमुळें अशाच तऱ्हेचें काठिण्य उद्‌भूत होतें. कोणताही समाज एकदां वाढीस लागला, आणि श्रमविभागामुळें त्यास भिन्नावयावित्व प्राप्त झाले व त्यांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळ्या क्रिया करूं लागले म्हणजे त्याचे रुपांतर करूं पाहाणाऱ्या गोष्टींस त्याकडून मोठा प्रतिबंध होऊं लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार यासंबंधानें ज्या रीति एकदां रूढ होऊन जातात, त्यांत फिरून बदल करणें अत्यंत दुरापास्त होऊं लागतें. पूर्वापार चालत आलेल्या चालींत विचारदृष्ट्या कितीही विसंगतता दिसली तरी त्या सोडणे किती जिवावर येतें, हें बालविवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चालींचा विचार करतां, तेव्हाच लक्षांत येणार आहे. समाजांतील शेकडा नव्याण्णव लोकांची स्थिति अंधपरंपरेप्रमाणे असते. मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानें

सुद्धां आपणांवर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल, असा धाक त्यांस क्षणोक्षणीं वाटत असतो.

याच संबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती अशी:- ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें पृथक्पणानें करून एकमेकांस साहाय्य करतात, त्याचप्रमाणें सामाजिक शरीरांतील निरनिराळे भागही आपापलीं कार्यें स्वतंत्रपणें करून इतरांस मदत करीत असतात. पण पुढें असाही प्रकार घडनू येतो कीं, समाजाच्या एका स्थितींत ज्या वर्गाची अवश्यकता असते तो वर्ग समाजाचें स्थित्यंतर झाल्यामुळें अगदीं निरुपयोगी झाला तरी सहसा नाहींसा होत नाहीं. उदाहरणार्थ बडोद्यासारख्या संस्थानांतील बारगीर घ्या. यांचें आतां कांहीं एक प्रयोजन नाहीं; पूर्वी यांच्याकडून जी कामगिरी होत असे तिची आतां गरज राहिली नाहीं. तथापि त्यांचा चरितार्थ चालविणें संस्थानास भाग पडत आहे. या बारगिरांप्रमाणेंच आमच्या बहुतेक संस्थानिकांची, जहागीरदारांची, त्यांच्या सैन्यांची, निरनिराळ्या ठिकाणच्या देवस्थानांची, धर्माधिकाऱ्यांची व त्यांच्या मठांची, कित्येक धंदेवाल्यांची, आणि अनेक आचारांची गोष्ट आहे. ज्याप्रमाणें वार्धक्यामुळें श्रम करण्यास अयोग्य ठरलेल्या लोकांस नोकरीवरून दूर करून त्यांचे जागीं नवीन लोकांची योजना केली, तरी पेन्शनदार करून ठेवावें लागतें, त्याप्रमाणें समाजाचे स्थित्यंतर होऊन त्यांतील कोणताही वर्ग निरुपयोगी ठरला तरी त्याचा बोजा बरींच वर्षें समाजास वहावा लागतो. कारण ज्याप्रमाणें कोणत्याही व्यक्तीस आपण होऊन पंचत्वास मिळणें आवडत नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या कोणत्याही अवयवास तें आवडत नाहीं. व्यक्तीप्रमाणेंच समाजाचे अवयवही आपापलें अस्तित्व दीर्घतम करण्याविषयीं झटत असतात.

येथपर्यंत सांगितलेल्या गोष्टीं वरून समाजाचें रूपांतर होण्यास किती प्रत्यवाय असतात, हें वाचकांच्या लक्षांत बरेंच आलें असेल. तथापि ज्यांच्या मनांत ही गोष्ट अजून बरोबर उतरली नसेल त्यांच्या समजुतीसाठीं आणखी एकदोन गोष्टी सांगतों. समाजांतील लोकांचें नियामक आणि नियत किंवा शास्ते आणि शासित असे मुख्य दोन भाग असतात, हें मागें सांगितलेंच आहे. या भागांपैकीं नियामक भाग समाजाच्या परिणतीबरोबर विस्तृत होत गेला तर त्या मानानें नियत भाग क्षीण होत गेला पाहिजे हें उघड आहे. ज्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांची संख्या आणि सरकारनें चालविलेलीं खातीं वाढत जातात; त्या देशांतील प्रजा अधिकाधिक दुर्बल व परतंत्र होत जाते. सरकारी अधिकारी कोणत्याही खात्यांतले असले तरी त्या सर्वांचा चरितार्थ प्रजेनें दिलेल्या करांवर होत असतो. त्यामुळें होईल तितकी जमाबंदी वाढविणें आणि सक्तीचा अंमल

चालविणें वगैरे गोष्टींत त्या सर्वांचे विचार सामान्यपणें एकसारखे असतात. खात्याखात्यांचा केवढाही विरोध असला तरी प्रजेशीं तंटा करण्याचा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां तीं पटदिशी एक होतात, आणि प्रजेशीं उद्भवलेला तंट्यांत यशस्वी होणें हें सर्वांसच हितकारक आहे, असें तेव्हांच लक्षांत आणून एकमेकांस साहाय्य करतात. शिवाय, निरनिराळीं खाती परस्परांस कितीही विरुद्ध असलीं तरी प्रत्येक खात्यांतील खालच्या अधिकाऱ्यांचे वरच्या अधिकाऱ्यांशीं व मुख्य सरकारशीं जे संबंध असतात ते सारे एकसारखे असतात, व त्या सरकारचा आणि त्याबरोबर आपला अंमल उत्कृष्ट रीतीनें चालावा, असेंही प्रत्येकास वाटत असतें; यामुळें साऱ्या प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वभावांत एका प्रकारचें साम्य तेव्हांच उत्पन्न होतें, आणि ''समानशीलेषुव्यसनेषु सख्यं'' या न्यायानें प्रजेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष न देतां, आपल्या वर्गाचें हित साधण्याविषयीं तें पराकाष्ठेचे तत्पर होऊन, त्या कामीं ते एकमेकांस अंतःकरणपूर्वक मदत करतात. ज्यानें सरकारी नोकरी धरली तो पूर्वीचा कितीही सज्जन असला तरी त्याच्या वृत्तींत जो एकदम एक प्रकारचा पालट होतो, त्याचें हें गुह्य आहे. स्वसरंक्षणपरायणता व स्वहितसाधनरति यांनीं प्रत्येकास घेरलें आहे आणि तसें होणें स्वाभाविक आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ व चैन प्रजेच्या श्रमाच्या फळावर अवलंबून असल्यामुळें, त्याचा होईल तितका अपहार करण्याकडे त्यांची प्रवृत्ति किती होत जाते, हें कधीं कधीं त्यांच्या ध्यानांत सुद्धां येत नाहीं!

अधिकारी आणि प्रजा यांत उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वास केवळ अधिकारीच कारण होतात, असें नाहीं. प्रजेकडूनही त्या कामांत बरीच मदत होते! मनुष्यमात्राचा असा स्वभाव आहे कीं, लहानपणापासून जी स्थिति, ती कितीही वाईट असली तरी तीच बरी वाटत असते. ज्यांना जन्मापासून स्वातंत्र्याचा उपभोग मिळत आहे त्यांना पारतंत्र्यांचा जसा कंटाळा असतो, त्याप्रमाणें जे जन्मापासून पारतंत्र्यांत वाढलेले असतात, त्यांना स्वातंत्र्य आपणांस उचित नाहीं, असें वाटूं लागतें. आजमितीस आपणांपैकीं शिकलेले अनेक लोक स्त्रियांस स्वातंत्र्य देण्यास तयार आहेत. पण त्याचा उपयोग घेण्यास आमच्या स्त्रीवर्गाची कोठें तयारी आहे? आम्ही तें त्यांना जबरीनें देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना त्यापासून सुख न होतां, उलट त्रास होतो. जे हौशी लोक आपल्या बायका नाटक पहाण्यास किंवा हवा खाण्यास बरोबर घेऊन जातात, त्यांच्या डोळ्यापुढें वरील विधानाचें याथार्थ्य आल्याशिवाय रहाणार नाहीं! अशा प्रसंगीं स्त्रियांच्या तोंडावरील कावरेबावरेपणा, डोळे वर करून पाहण्याची व स्पष्टपणें बोलण्याची भीति, पुरुषांच्या मागोमाग चालण्यास वाटणारी शंका, वगैरे गोष्टींमुळें त्यांची जी विलक्षण वृत्ति होते; तीवरून

अशा रीतीनें समाजांत येण्यापेक्षां घरांतल्या घरांतच राहणें बरें, असे त्यांस वाटत असावें असें स्पष्टपणें दिसत असतें. यावरून कोणीं असे समजूं नये कीं, जी गोष्ट आमच्या स्त्रियांनीं पूर्वी कधींच न केल्यास आज त्यांना ती अवघड वाटत आहे, ती आपण त्यांच्याकडून कधींच करवूं नये! तसें करणें हे आपण प्रो. जिन्सिवाल्यांसारख्यांवरच सोपविलें पाहिजे! तथापि ज्या गोष्टीविषयीं आपण अपरिचित असतों ती प्रथम करूं लागताना किती संकटावह होते, हें दाखविण्यासाठीं मात्र वरचें उदाहरण दिलें आहे; त्याहून येथें त्याचा दुसरा हेतु नाहीं. तात्पर्य, जन्मादारंभ्य ज्या गोष्टींची आपणांस सवय लागलेली असते, त्या गोष्टी इतरांस कितीही वावग्या वाटत असल्या, व त्यांपासून अखेरीस आपले केवढेही नुकसान होण्याचा संभव असला, तरी त्या आपणांस बऱ्या वाटतात, आणि त्या टाकणें आपणांस सहसा रुचत नाही दूर कशाला, आपल्या लोकांच्या राजकीय विचारांकडेच क्षणभर पहा. आम्ही पहिल्यापासून अनियंत्रित एकसत्तात्मक राज्यपद्धतींत वाढलेलीं असल्यामुळे 'राजा कालस्य कारणम्' अशी आमची पक्की समजूत, व ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पाहण्याची आम्हास खोड! लोकशिक्षण असो; व्यापारवृद्धि असो; यांत्रिक शोध असो; मादकद्रव्यसेवननिषेध असो; सामान्य नीतिप्रसार असो—काय पाहिजे तें असो; अगदी शुष्क गोष्टीपासून मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत सरकारापुढें तोंड वेंगाडल्याशिवाय, व राज्यकर्त्यांची मदत मागितल्याशिवाय, आमचे हातून काहीएक होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. केशवपन किंवा बालविवाह कायद्यानें बंद करा, असें कोणीं म्हटले की, येवढा अनर्थ करून सोडावयाचा की जशी काहीं स्वातंत्र्यवृक्षावर आकाशांतील कुऱ्हाडच पडत आहे! म्हणजे काय की, बायकांच्या व मुलांच्या पारतंत्र्याचा विच्छेद करणाऱ्या कायद्यास, स्वातंत्र्यापहारक कुऱ्हाड म्हणावयाचें, आणि ज्या गोष्टींनीं खरोखर स्वातंत्र्यापहार होत आहे, त्यांस स्वातंत्र्यसंरक्षक म्हणून प्रेमाने कवटाळावयाचें- अशी आमची शोचनीय अवस्था होऊन गेली आहे. पण कांही अशी ही अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत ज्यांची अनेक शतकें गेलीं आहेत त्याना स्वातंत्र्याचा बाऊच वाटावयाचा! आणि पारतंत्र्यच सुखावह वाटावयाचे! आम्हां अर्धवट सुधारलेल्या लोकांची तर काय कथा? पण फ्रान्स व जर्मनी अशा सुधारलेल्या देशांतील तत्ववेत्त्यांसही न कळत अशा प्रकारची भूल पडते, हें आश्चर्य नव्हे काय? सामाजिक नियंत्रण बलात्कारतत्त्वावर न होता संमतितत्त्वावर होऊं लागेल तेव्हाच सामाजिक सुखाची परमावधि होण्याचा संभव आहे, हें सिद्ध करण्यासाठीं प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता ऑगस्ट कोंट बसला असून वाहतां वाहतां भलतीकडेच जाऊं लागला! संमतितत्वावर फ्रेंच समाजाची

स्थापना करण्याकरतां त्यानें जी राज्यपद्धत वर्णिली आहे; ती फ्रान्स देशांत आजपर्यंत रूढ असलेल्या राज्यपद्धतीहून अधिक सक्तीची आहे! जर्मनींतील अलीकडल्या सामाजिक तत्त्ववेत्त्यांची विचारपद्धतीही अशाच प्रकारची आहे. यांनीं लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें ज्या राज्यपद्धतीचें विवरण केलें आहे, ती खरोखरीच अंमलांत आल्यास, व्यक्तिस्वातंत्र्य कोठें दृष्टीस पडेल किंवा नाहीं, याचीच शंका आहे! तात्पर्य, हाडामांसांस खिळलेले आचार सामान्य लोकांसच बरें वाटतात असें नाहीं, तर त्यांतील दोष विचारी विद्वानांस देखील सहसा दिसत नाहीत, व दिसले तरी त्यांचा अव्हेर करणें हें त्यांच्यानेंही सहन होत नाहीं. यामुळें ज्या ठिकाणीं सरकारी अंमल मोठ्या जुलमाचा असतो, त्या ठिकाणीं तो वाढत जाण्यास प्रजेचें वर्तनही बऱ्याच अंशीं कारण होतें. जों जो सरकारी अधिकारी अधिकाधिक सक्ती करितात, तों तो प्रजेच्या अंगी अधिकाधिक सहनशीलता येत जाते, व जों जों ही वाढत जाते तों तों अधिकाऱ्यांस अधिकाधिक जुलूम करण्यास सवड होते अशा रीतीनें एका बाजूनें औद्धत्य आणि दुसऱ्या बाजूने नम्रता; एका बाजूनें चैन व दुसऱ्या बाजूनें कष्ट; एका बाजूनें स्वामित्व आणि दुसऱ्या बाजूनें गुलामगिरी यांची अधिकाधिक वाढ होत गेल्यास, उत्पादक लोकांची संख्या आणि त्यांनीं केलेलें उत्पन्न ही दोनही संपुष्टांत येऊं लागतात. हळूं हळूं साऱ्यांसच कमी-अधिक भिकारपण येऊन लोकसंख्येची वाढ खुंटतें; आणि असाच प्रकार अधिकाधिक होत गेल्यास ती कमी होऊं लागून अखेरीस समूळ ऱ्हासाच्या पंथास लागते! तेव्हां लक्षांत काय गोष्ट ठेवायची कीं, समाजाची उन्नति होण्यास एका प्रकारची नियामक व्यवस्था जरी अत्यावश्यक आहे, तरी ती फाजील होतां कामा नये. नियामक व्यवस्था अस्तित्वांत आली म्हणजे समाजाच्या अंगी एका प्रकारचें दार्ढ्य येऊं लागतें, व जों जों ती व्यवस्था वाढत जाईल, तों तों ते दार्ढ्य अधिकाधिक प्रबल होत जाऊन, समाजांतील लवचिकपणा अगदीं नाहींसा होतो, व ज्या मानाने हा लवचिकपणा नाहींसा होत जातो, त्या मानानें समाजाच्या पुढील सुधारणेस प्रतिबंध होतो. म्हणून ज्यांच्या हातीं राज्यसूत्रें असतील त्यांनीं वरील विचार रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेऊन, सरकारी अंमल अगदीं बेतापुरता चालवावयाचा असा निश्चय केला पाहिजे. ज्या देशांतले लोक चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणें हातपाय हालविण्यास अगदीं असमर्थ झाले असतील; अशांस गाळांतून बाहेर पडून दोन पावलें टाकतां येण्यापुरती मदत सरकारानें अवश्य केली पाहिजे; पण त्यापुढें त्यांना आपल्या पायांनीं चालूं न देणें म्हणजे त्यांस निरंतर पंगू करून ठेऊन त्यांचें आणि त्याबरोबर आपलेंही नुकसान करू घेणें होय, हें अंमलदारांनीं कधींही विसरतां कामा नये.

*

भारतीय कलांचें पुराणत्व

अलीकडे आम्हांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली आहे, तीमुळें आम्ही पूर्वीपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय, असें परकीयांसच नव्हे, तर आमचें आम्हांस देखील वाटूं लागलें आहे. असें सांगतात की, इंग्लंडचा प्रसिद्ध बृहस्पति एडमंड बर्क जेव्हां वारेन हेस्टिंग्सविरुद्ध पार्लमेंट सभेंत गर्जूं लागला; तेव्हां त्याच्या वाग्वज्रानें पार्लमेंटच्या सामान्य सभासदांचीं अंत:करणें रागानें व शोकानें विदारून गेलीं; येवढेंच नाहीं, तर ज्या हतभाग्य हेस्टिंग्सवर त्याच्या वाणीचे आघात होत होते, त्या खुद्द हेस्टिंग्ससाहेबाचें पाषाणहृदय देखील उकलून जाऊन क्षणभर त्यास असें वाटलें कीं, ''मी मोठा कर्मचांडाल दुरात्मा असलों पाहिजे!'' बर्कच्या वाक्प्रभावामुळें हेस्टिंग्सची जशी दशा झाली तशीच आमचीही अलीकडे होऊं लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, धाडस, शरीरसामर्थ्य, मानसिक शक्ति वगैरे कोणत्याही गोष्टींत आम्हीं आपली युरोपिअन लोकांशीं, मुख्यत्वेंकरून इंग्लिश लोकांशीं, तुलना करूं लागलों, कीं त्यांच्या आमच्यांत जमीनअस्मानाचें अंतर स्पष्टपणें निदर्शनास येऊन, त्यांचें पारडें पृथ्वीवर बसल्यासारखें व आमचें आकाशांत लोंबत असल्यासारखें दिसतें! इंग्लिश लोकांत व आम्हांत खरोखरींच येवढें अंतर असतें, तर आमच्या मनाची जी सध्यां स्थिति झाली आहे, व तीविषयीं दुसऱ्यांस जें वाटत आहे त्याबद्दल इतका खेद करण्याची गरज नव्हती. अनेक गोष्टींत आम्ही आजमितीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आम्ही त्यांपासून शिकण्यासारख्या अनेक वस्तू आहेत, हें निर्विवाद आहे. पण येवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, ज्याचा आम्ही अभिमान मानावा, किंवा ज्याच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें, असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाहीं, हें प्रत्येक नि:पक्षपाती हिंदूस कबूल केलें पाहिजे. पण यहुदी, मिसर, पारसीक, किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे, असें मानण्याची

गरज नाहीं, असें दाखविणें कठिण पडणार नाहीं. मंहमदीय लढवय्यांप्रमाणें धर्मवेडानें युरोप व आशिया खंडांतील मोठमोठाले देश आम्हीं उध्वस्त केले नाहींत, व राज्यलोभानें लाखों लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूरनिष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं, ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं, त्यासंबंधानें आजमितीससुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पहाण्याची अवश्यकता नाहीं. शिल्पकलेकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून, त्या कलेंत प्रचंड क्रांति झाली आहे, व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढे दीडफूट लांबीच्या हाडमांसाच्या हाताचें कांहींएक चालेंनासें झालें आहे, हें खरें आहे. पण यंत्रानें केवढींही अचाट कामें केलीं, तरी यंत्रें हातांनींच करावीं लागतात, व यंत्रांनीं जी करामत करावयाची ती प्रथम हातानें साधण्यासारखी लागते. यंत्रांत नाना प्रकारच्या वेलबुट्ट्यांचें काम निघते; पण जर हातानें वेलबुट्ट्या काढतां येत नसल्या व नकाशे तयार करतां येत नसले तर वेलबुट्ट्यांचें काम यंत्रावर काढतां येणार आहे काय? ज्याप्रमाणें दुर्बिणीनें डोळसाच्या दर्शनशक्तीस साहाय्य होतें, पण आंधळ्यास तिचा कांहींएक उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जे हस्तकलेंत प्रवीण असतील त्यांसच यंत्रकला साधणार आहे; ज्यांचे हात थोटे आहेत, त्यांना यंत्रापासून म्हणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, यंत्रावर काम करणारीं बहुतेक मनुष्यें यंत्रांसारखींच असतात; नवीन यंत्रें तयार करण्याची किंवा तीं बिघडली तर दुरुस्त करण्याची कला फार थोड्यांसच साधलेली असते. हा विचार हस्तकलेसही तितकाच लागू आहे. चांगल्या कारागिरीनें एखादा सुरेख नमुना घालून दिला, म्हणजे त्याचें अनुकरण करणारेच शेंकडा नव्याण्णव लोक असावयाचे. विशाल कल्पकता ही नैसर्गिक देणगी फार थोड्यांसच प्राप्त झालेली असते. बहुतेक जनता तेल्याच्या घाण्याभोंवतीं डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें श्रेष्ठ लोकांनीं घालून दिलेल्या वाटांनीं भ्रमण करीत असते, आणि तिनें असें हेच करणें फायदेशीर आहे. ज्यांना स्वतःची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कांस धरून चालावें, हेंच नीट आहे. तात्पर्य, अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपिअन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यांपासूनच आम्हीं शिकली पाहिजे, हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों, तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकलाप्राविण्याची अवश्यकता असते, ती हस्तकलाही आम्हांस सर्वांशीं युरोपिअन लोकांपासून उचलली पाहिजे, हें मत आम्हांस मान्य

नाहीं. तथापि आम्ही लौकर जागे झालों नाहीं, तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाहीं इतकेंच नाहीं, तर सुमारे तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें उदयास आलेली जी आमची भव्य हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदां तिचा लोप झाला म्हणजे अर्वाचीन यंत्रकलाही आम्हांस संपादितां येणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकलाप्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करून तीं येथें आणून मांडिलीं, आणि त्यावर माल काढण्यास सुरुवात केली, म्हणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें, असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्रांचे कारखाने स्थापणें तर जरूर आहेच. पण त्याबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत; त्या ह्या- आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खातरी केली पाहिजे, व जे त्या कलेत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्तत्वाला कारणीभूत होईल, अशा उपायांची योजना केली पाहिजे. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वी जी चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें, व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं व ऐषआरामासाठी करीत, तीच कामें यंत्रांच्या साहाय्यानें स्वल्प आयासानें, खर्चानें, व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यांपासून सुख व ऐषाआराम प्राप्त होऊं लागेल, तेव्हाच आमच्या जुन्या हस्तकलेचें रक्षण झालें, व पाश्चिमात्य यंत्रकलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें, असें म्हणतां येणार आहे.

येथील श्रीमान लोक, धनाढ्य शेटसावकार, किंवा पैसेवाले जहागीरदार व संस्थानिक पूर्वीच्या कामासारखीं टोलेजंग कामें हिंदु कारागिरांकडून अलीकडे करवीत नाहीत, हें पाहून कित्येक पाश्चिमात्य लोक असे म्हणतात की, हिंदु लोकांत हस्तकौशल्याची अभिवृद्धि कधींच झाली नाहीं. नांवाजण्यासारख्या ज्या थोड्याबहुत इमारती किंवा कोरींव लेणीं दिसतात, त्यांवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, कांहीं कारणांमुळें हस्तकौशल्यांत आम्हांहून फार श्रेष्ठ अशा ग्रीक, रोमन, व मुसलमान लोकांचा आणि आमचा संबंध घडून आल्यामुळें आम्हांस तीं कामें करतां आलीं. त्यांचा आमचा संबंध न घडतां, तर हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पहाण्यासारखें किंवा वाखणण्यासारखें कांहींएक नसतें. आमच्या मतें हें म्हणणें फार चुकीचें आहे; व तें चुकीचें आहे, असे अनेक रीतीनीं सिद्ध करून देतां येणार आहे.

प्रथम असा विचार केला पाहिजे कीं, शिल्पकलेची व इतर कलांची उत्पत्ति

व अभिवृद्धि होण्यास कोणत्या गोष्टींची अनुकूलता असणें जरूर आहे; व त्या गोष्टी इताली, ग्रीस, व तुर्कस्थान या देशांपेक्षां हिंदुस्थानांत पूर्वीपासून अधिक विपुलतेनें दृष्टीस पडत आहेत किंवा नाहीं? जो कोणी थोड्या बारकाईनें या प्रश्नाचा विचार करील, त्याच्या लक्षांत हें तेव्हांच येईल कीं, कोणत्याही देशांत कलांची वृद्धि होण्यास त्यांतील लोकांस चरितार्थासाठीं अहोरात्र खपावें लागतां कामा नये; शिवाय अशीं कामें करण्यास लागणाऱ्या जड द्रव्यांचेंही वैपुल्य असलें पाहिजे. बर्फाच्छादित उत्तर ध्रुवाकडील प्रदेशांतील खुज्या लोकांत, किंवा सैबेरिया प्रांतांतील थंडीनें नित्य कांकडत असणाऱ्या लोकांत, हस्तकौशल्याची वृद्धि कशी व्हावी, हें आम्हांस समजत नाहीं. ज्यांना केवळ उदरपोषणासाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत समुद्रोदरस्थ मत्स्य जातींशीं, अरण्यवासी भक्ष्य जनावरांशीं, अथवा हवेंत संचार करणाऱ्या विहंगमांशीं झगडा करावा लागतो, व त्यांवर आपली उपजीविका चालवावी लागते, अशा लोकांस भव्य मंदिरें बांधण्यास, नानाप्रकारचे कपडे विणण्यास, व ऐषआरामाचे इतर तऱ्हांचे पदार्थ उत्पन्न करण्यास फुरसत कोठून सांपडणार? अशा लोकांना कॉडसारख्या माशाच्या, रेनडिअरसारख्या जनावराच्या, किंवा कोंबड्यांसारख्या गृहपक्ष्यांच्या चरबीवर, मांसावर, व अंड्यांवर चरितार्थ चालवून संकटावह असें आयुष्क्रमण करणें भाग आहे. शिवाय, ज्या ठिकाणीं सूर्य फारसा प्रकाशत नाहीं, मोठमोठ्या नद्या वहात नाहींत, ठरींव ऋतूंत पाऊस पडत नाहीं, व जमीन बहुधा उघडी असत नाहीं, अशा ठिकाणीं मृदु, कठिण, लवचिक, किंवा दाणेदार अशा वनस्पतींची वाढ होऊन, इमारतीस लागणारें सुरेख लाकूड मिळावें कसें? तसेंच, जिकडे तिकडे सफाईदार व टिकाऊ दगडाच्या खाणी लागत नसल्या, व लोखंडासारख्या अत्यंत उपयुक्त धातू सांपडत नसल्या, तर दगडी कामें व हत्यारें व्हावी कशीं, हा मोठा प्रश्न आहे. इजिप्तसारख्या स्वाभाविक सुपीक देशाची लॅपलंडसारख्या ओसाड भूखंडाशीं तुलना करतां येत नाहीं. एकांत मनुष्यांच्या उपजीविकेस लागणाऱ्या गोष्टी सहज उत्पन्न होतात. दुसऱ्यांत त्या प्राप्त होण्यासाठीं तेथील लोकांस साऱ्या दिवसभर खपावें लागते. नैल नदीच्या उथळ व रुंद पात्रांत जो गाळ वाहत असतो; तो तिच्या दोनही किनाऱ्यांवरील प्रदेशांत कित्येक मैल आपोआप पसरला जाऊन त्यांस खत घातल्याप्रमाणें सुपीकपणा आणितो! अशा प्रकारच्या क्षेत्रांत पूर येऊन गेल्यावर एकदां कसेंतरी थोडेंबहुत बीं फेंकून द्यावें, आणि सात-आठ महिने लोटल्यावर खंडोगणती धान्य घेऊन यावें- असा प्रकार चालतो. अशा देशांतील लोकांत मनुष्यसुधारणेचा आरंभ झाला, निरनिराळीं शास्त्रें अस्तित्वांत आलीं, व काळाच्या विघातक सामर्थ्यास न जुमानणाऱ्या व आकाशाचें चुंबन

करूं पहाणाऱ्या पिरमिदी उठल्या; यांत कांहीं नवल आहे काय? ज्या कारणामुळें मिसर देशांत सर्वांआधीं सुधारणेस आरंभ झाला असें म्हणतात, तींच कारणें हिंदुस्थानांत आलेल्या आर्यशाखेची सुधारणा प्रथम येथें होऊं लागण्यास पुरें होतीं व त्याप्रमाणें ती तेथें झालीं, असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून समाधान होण्यासारखें सिद्ध करून देतां येणार आहे. प्रथम हिंदुस्थानच्या बाह्य स्वरूपाकडे क्षणभर लक्ष द्या. येथें कशाची तरी वाण आहे काय? उष्ण, शीत किंवा समशीतोष्ण कटिबंधात पैदा होणारी प्रत्येक चीज येथें हवी तितकी सांपडते. थंड व डोंगरी प्रदेशांत होणाऱ्या जिनसा नगाधिराज हिमालय हव्या तितक्या देण्यास कालाच्या आरंभापासून एकसारखा उभा आहे! नैल नदीच्या सुपीक व रेताड मैदानांत लीलेनें होणारी धान्यें पाहिजे असतील तर सिंधूच्या व गंगेच्या दोन्ही थड्यांनीं त्यांची हवी तितकी विपुलता आहे. तांबड्या व काळ्या जमिनीतील व खारट आणि खडकाळ अशा प्रदेशांतील उत्पन्नें हवीं असतील, तर दक्षिण हिंदुस्थानास वेष्टणाऱ्या समुद्रमेखलेपासून घांटापर्यंत पसरलेल्या पूर्वपश्चिम कोकणपट्ट्यांकडे, व घाटावरील मोठमोठ्या नद्यानीं चित्रविचित्र व सुपीक करून सोडलेल्या सुखावह भूमिकांकडे अवलोकन केलें म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील उंच डोंगरी प्रदेश वड, पिंपळ, खदीर, पळस, ताड, कळक वगैरे अत्यंत उपयोगी वृक्षांनीं आच्छादिलेले असून त्यांत व्याघ्र, सिंह, माकडे व मोर वगैरे हिंस्त्र आणि अहिंस्त्र प्राणी यथेच्छ संचार करितांना दृष्टीस पडतात. याहून सखल प्रदेशांत हत्ती, कृष्ण सारंग, तांबडीं हरणें, रानडुक्करें, साळुंक्या, ससे व चकोरादि पक्षी स्वच्छेनें विहार करीत असतात. हे दोन प्रकारचे प्रदेश सोडून जेव्हां आपण सपाट मैदानांत येतों तेव्हां जिकडे तिकडे नाना तऱ्हेच्या धान्यांचीं शेतें, उंसाचे फड, भाताचीं खाचरें, व नाना प्रकारच्या फळझाडांनीं, वेलांनीं, आणि फुलांनी भरून गेलेल्या बागा दृष्टीस पडतात. अशा प्रकारच्या रम्य व संपन्न देशांतील लोकांस, चरितार्थ चालविण्याची आरंभीं येवढी तरी पंचाईत पडली असेल काय? व जर पडली नसेल तर ज्ञानवृद्धि आणि कलाबुद्धि करण्याकडे त्यांचें लक्ष सहज वेधलें नसेल काय? पण हे सारे या पुण्य आर्यभूमीच्या बाह्य स्वरूपाच्यासंबंधानें झाले. पुढल्या लेखांत हिच्या अंत:स्थितीचा विचार करून, मग आम्हांस येथील कलांच्या पुराणत्वाबद्दल जो अभिप्राय द्यावयाचा आहे, तो उघडपणें देऊं.

*

भारतीय कलांचें पुराणत्व

नं. २

कोणत्याही देशांत कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास त्याची बाह्य स्थिति कोणत्या प्रकारची असली पाहिजे हें प्रथम सांगून, मग या भरतखंडाची स्थिति पूर्वीपासून तशी आहे, हें मागल्या लेखांत सांगितलें. तेव्हां इजिप्त देशाप्रमाणें या देशातही कलांचा अभ्युदय फार प्राचीन कालीं झाला असला पाहिजे, असें अनुमान करण्यास काही हरकत नाहीं. इंग्रज लोकांचा अंमल येथें स्थाईक होण्यापूर्वीच बाष्पशक्ति त्यांच्या हस्तगत होऊन गेल्यामुळें, व त्यांच्या अंमलानें येथील कलांच्या पुरस्कर्त्यांची व आश्रयदात्यांची संख्या अत्यंत संकुचित झाल्यामुळे, येथील कारागिरी सांप्रतकालीं अगदीं लयास गेल्यासारखी झाली आहे, हे निर्विवाद आहे. तथापि ज्यांचें अवलोकन वस्तूंच्या केवळ पृष्ठभागासच धरून राहात नाही, तर त्याच्या खालीं व पलीकडे जातें, त्यांना अजूनही असें कबूल करावें लागेल कीं, आज जें कलाचातुर्य हिंदुस्थानात उपलब्ध आहे, त्याची उत्पत्ति व अभिवृद्धि आजकालची नाहीं, तर फार जुनी आहे. हा त्यांचा जुनेपणा ज्या दोन प्रमाणांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात, त्यांपैकीं त्यांची सांप्रत स्थिती या प्रमाणावर आक्षेप घेणारे असे पुष्कळ लोक आहेत. या लोकांत अनेक युरोपिअनांचा व बिलकुल शोध न करतां दुसरे म्हणतील त्यास 'हो' म्हणणाऱ्या किंवा केवळ बाह्य स्थितीवरून सिद्धांत बांधणाऱ्या एतद्देशीयांचा समावेश केला पाहिजे, हिंदु लोकांची राजकीय व सामाजिक अनुकंप्य स्थिति पाहून कलाखात्यातही ते पूर्वीपासून असेच असले पाहिजेत, व आजमितीस या देशांत जी थोडाबहुत कारागिरी दृष्टीस पडते ती त्यांनी अन्य लोकांपासून उचलली असली पाहिजे, असें अनुमान करून तिचें सूत हे हेकेखोर लोक ग्रीक किंवा मुसलमान लोकांकडे लावूं पाहतात. पण ही त्यांची मोठी चूक आहे, हें पुढील विवरणावरून सहज लक्षांत येईल.

मनुस्मृति हा ग्रंथ कमीत कमी म्हटला तरी ख्रिस्ती शकाच्या अगोदर किंवा पाठीमागून जो दोनशें वर्षांचा काळ लोटला त्यांत लिहिला गेला असावा, ही

गोष्ट आतां सर्व शोधक विद्वान मान्य करतात. याविषयीं आतां मतभेद राहिलेला नाहीं. मनुस्मृतींत ज्या कलांचीं व कारागिरांचीं अप्रत्यक्ष रीतीनें वर्णनें आलीं आहेत त्याच प्रकारच्या कला व कारागीर अद्यापी उपलब्ध आहेत. तेव्हां जर कोणी आम्हांस कलाशिक्षण दिलें असेल तर तें मनुस्मृति अस्तित्वांत येण्यापूर्वी दिलें असलें पाहिजे, असें मानणें भाग आहे. परंतु मनुस्मृतींत पूर्वीच्या स्मृतींचा व इतर ग्रंथांचा कला व कारागीर यांच्या संबंधाने उल्लेख केला आहे. तेव्हां आणखी असें कबूल करणें भाग पडतें कीं, ज्याअर्थी मनुस्मृतीच्या मितीपासून इतकीं शतकें लोटलीं असून व स्थित्यंतर करण्यास अत्यंत अनुकूल अशा अनेक गोष्टी घडल्या असून; जर आमच्या कला व कारागीर त्या कालापासून आतांपर्यंत विशेष फेरफार न होता एकाच स्थितींत दृष्टीस पडत आहेत, तर मनूच्या पाहण्यांत ज्या कला व जे कारागीर आले ते तत्कालीन स्थितींत अनेक शतकें असले पाहिजेत; व हें अनुमान योग्य असले तर भारतीय कलांचे पुराणत्व तीन हजार वर्षांवर नेऊन बसवितां येतें! मनुस्मृतींत आलेग्झांडराच्या किंवा शिकंदराच्या स्वारीविषयीं बिलकुल उल्लेख नाहीं; तेव्हां ती स्वारी स्मृति झाल्यावर असावी, असें म्हणणें कांही वावगें नाहीं; तसेंच मनुस्मृति ख्रिस्ताच्या अगोदर दोनशें वर्षे लिहिली गेली असावी असें म्हणा, किंवा त्यानंतर दोनशें वर्षांनी लिहिली गेली असावी असें म्हणा, कसेंही म्हटलें तरी ती अस्तित्वांत येण्यापूर्वी मुसलमानांचा पाय पुण्यभूमीस लागला होता, असें कोणासही म्हणतां येणार नाही. तेव्हां आम्ही आमच्या कला मुसलमान किंवा ग्रीक लोकांपासून उचलल्या असाव्या, असें सूक्ष्म विचाराअंतीं कोणाच्यानेंही प्रपादवणार नाहीं. आतां मनुस्मृतींत तरी अप्रत्यक्ष रीतीनें काय काय सांपडतें तें पाहूं. अप्रत्यक्ष रीतीने असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, अर्वाचीन एंजिनीअरच्या ग्रंथासारखा मनुस्मृति कांहीं कलाग्रंथ नाहीं. तो धर्मग्रंथ आहे. तथापि निरनिराळ्या अध्यायांत निरनिराळ्या वर्गांच्या कर्तव्यांचा व बंधनांचा विचार करीत असतां, तत्कालीन कलांचा व कारागिरांचा उल्लेख करणें त्यास भाग पडलें आहे. तेव्हां अशा प्रकारच्या ग्रंथांत प्राकृत विषयाच्यासंबंधानें जें कांहीं सांपडेल त्यांत यत्किंचित्‌ही व्याज असण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे. मनूस त्यासंबंधाची जशी स्थिति दृष्टीस पडली, तशीच त्यानें वर्णिली असावी, असें मानणें हेंच योग्य आहे. स्थलसंकोच नसता, तर सबंध श्लोकच्या श्लोक येथें उतरून घेतले असते. पण जागेच्या अडचणीमुळें तसें करतां येत नाहीं. फक्त अध्यायाचा व श्लोकसंख्येचा उल्लेख करण्यांत समाधान करून घ्यावें लागत आहे. (अध्याय ८ श्लोक २४८ व अध्याय ९ श्लोक २८०, २८५) यांत देवालयाविषयीं उल्लेख आहे; (४, ४६- येथून पुढें अध्यायाचा आंकडा जाडा व श्लोकाचा

बारका असें समजावें) यांत मोडक्या देवळांचा उल्लेख आहे; आणि (४, ३९, १३० व ८, ८७, व ९, २८५) यांत मूर्तीचा उल्लेख आहे; (९, २४८, ९, २७९) त तळीं, हौद, विहिरी, व जिवंत टांकीं यांचा आहे; (९, २८५)त पुलांचा आहे; (७, ७०, ७६, व ९, २५२) त भुइकोट किल्ल्यांचा व डोंगरी किल्ल्यांचा आहे; (७, ७०, ७६, व ९, २८५) त राजवाड्यांचा आणि त्यांवर मोठमोठ्या कांठ्यावर फडकणाऱ्या निशाणांचा आहे; (९, २८०) त कोठारांचा आणि हत्यारखान्यांचा आहे; (४, १६०) त धनुष्यबाणांचा आहे; (९, ९०) त सर्व प्रकारच्या मारक शस्त्रांचा आहे; (९, २८०) त रथांचा आहे; (४, २०२, २३२, व ८, २९१)त बसण्याच्या गाड्यांचा आहे; (८, २०९) त ओझ्याच्या गाड्यांचा किंवा खटाऱ्यांचा आहे; (८,२३१) त पांढऱ्या पोषाखांचा आहे; (१०,८७,१२,६६) त लोकर, कापूस व ताग यांच्या रंगीत वस्त्रांचा आहे; (५, १२०, व ११, १५९) त रेशमी कपड्यांचा आहे; (४, ६६, १८८, २३१ व ९, ७०, २१९) त हरएक तऱ्हेच्या तंतुपटांचा आहे; (७, ९०) त नीळ आणि (१०, ८२) त लाख यांचा आहे, (४, ६६) त जोड्यांचा आहे; (२, २४६, व ७, ९६) त छत्र्यांचा आहे; (११, १६८, ७, २१८,८, १००, ३२३) त पोळी, मोती व इतर रत्ने यांचा आहे; (४, ३६) त कानांतील सोन्यांच्या दागिन्यांचा व (२, १९४, ३, ५९) त बाकीच्या दागिन्यांचा आहे; (३, २०९, ४, २५०, १२, ६५) त निरनिराळ्या अत्तरांचा आहे; (४, २०२) त आसनांचा व (४, २५०) त मंचकांचा आहे; (३, २३४) त नेपाळच्या शय्यास्तरणांचा आहे; (४,२२९) त दिव्यांचा; (७,१३२) त दगडांच्या वस्तूचा व (७, १२१) त हस्तिदंत आणि शिंगें यांचा आहे; (४, २३०, ५,११२ व ११, ११८) त रुप्याच्या साध्या आणि कोंदणांच्या दागिन्यांचा आहे; (५, १११) त चमच्यांचा, (२, ६५, ७, १३२, ८, ३१९) त पाण्याच्या भांड्यांचा, (४, ७४, ७, ५०) त फाशांचा, (४, २०२, २३२) त बिछान्यांचा व (५, १२०) त घोंगड्यांचा आहे. ही मनुस्मृतींत आढळणाऱ्या वस्तूंची अध्यायवार व श्लोकवार याद झाली. याचप्रमाणें कारागिरांचीही याद देऊं लागलों तर वाचकांस ती कंटाळवाणी होईल, म्हणून इतकेंच सांगतों कीं, मनुस्मृतींत सुतार, बुरुड, लोहार, सोनार, शिंपी, कोष्टी, तेली, साळी वगैरेचा उल्लेख केला आहे; व जरी या सर्वांस त्यानें खालच्या वर्णांत गोंविले आहे, तरी त्यांच्या धंद्यांची उपयुक्तता ध्यानांत आणून असा अभिप्राय दिला आहे कीं, कारागीर कोणत्याही जातीचा असला तरी ज्या हातानें तो उपयुक्त वस्तू बनवितोतो ह ात कांहीं अपवित्र नाहीं। तसेंच, विवाहित स्त्रियांनीं कारागिरांशी भाषण करणें निषिद्ध नाहीं. यावरून निवृत्तिमार्गाकडे ज्याचा

विशेष ओघ त्या मनूला सुद्धां या कारागिरांचें महत्त्व आणि त्यांपासून जीवित सुखावह करण्यास होणारें साहाय्य यांची किती उत्कृष्ट कल्पना होती, हें सिद्ध होतें. तसेंच मनूच्या अमदानींत नाणें चालत होतें असेंही स्पष्ट दिसतें. कारण या वैराग्यभक्तानें एका ठिकाणीं असें म्हटले आहे कीं, "तांबें, रुपें, आणि सोनें यांच्या ज्या विशिष्ट वजनांस नाणें अशी पारिभाषिक संज्ञा आहे, व ज्याच्या योगानें जगाचा व्यवहार सुकर होतो, तीं नाणीं अगदीं निर्दोष आहेत, असें माझें मत आहे." याच रीतीनें त्यानें दुसऱ्या एका स्थलीं ऋण, करार, सारा, परमुलखांतल्या मालावरील कर, समुद्रप्रयाण, परदेशाशीं व्यापार यांविषयीं उल्लेख करून, शेवटच्या दोन गोष्टी ब्राह्मणांस निखालस वर्ज्य आहेत, असें म्हटलें आहे! यावरून काय उघड होतें कीं, परदेशांशीं हिंदुस्थानाचा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालत होता, व त्यामुळें जें दळणवळण सुरू झालें होतें, त्यामुळें ब्राह्मण धर्मास लागलेली उतरती कळा व बौद्ध धर्माचा प्रसार यांच्या योगानें त्याचें चित्त उद्विग्न होऊन जाऊन, ब्राह्मण धर्माची पूर्वपदावर स्थापना करण्यासाठीं, तो आपणांकडून होतील तेवढे निर्बंध घालीत होता. प्रस्तुत स्थलीं आम्हांस या संबंधांत विशेष पडण्याची गरज नाहीं. तथापि मनुस्मृतीवरून येवढें सिद्ध करण्यास हरकत नाहीं कीं, मनूच्या कारकीर्दीत म्हणजे ख्रिस्ती शकाच्या अव्वल कारकीर्दीत किंवा त्याच्या पूर्वी पांचसातशे वर्षे, म्हणजे आज सुमारें तीन हजार वर्षे, हिंदुस्थानच्या कला आणि कारागीर बहुतेक अंशी आहेत तसे आहेत; त्यांना ग्रीक लोकांनीं किंवा मुसलमान लोकांनी विशेषसें दुखावलेंहीं नाहीं, व सुधारलेंही नाहीं, व थोडी काळजी घेतल्यास आणखी अनेक शतकें त्या कला आणि ते कारागीर तसेच तगून राहतील! पण हें घडावे कसें? इंग्रजांनीं आणिलेल्या बाष्पशक्तीपुढें व राक्षसी यंत्रशक्तीपुढें आमच्या हातकारागिरांनीं टिकाव धरावा कसा? आणि आमच्या कलांचें नांव चालावें कसें? अथवा आमच्या कारागिरांचा उदरनिर्वाह व्हावा कसा? याला एकच उपाय दिसतो; तो हा कीं, आमच्या हस्तकौशल्याचा युरोपीय बाष्पशक्तीशीं व यंत्रशक्तीशीं विवाह होऊन, त्यांच्या समागमापासून उत्पन्न झालेलीं संतानें जिकडे तिकडे फडकूं लागलीं पाहिजेत!

*

भारतीय कलांचें पुराणत्व

नं. ३

मनुस्मृतीच्या साहाय्यानें आमच्या कलांचें पुराणत्व सिद्ध करण्यास अप्रत्यक्ष जातीचा किती पुरावा मिळतो, याचे दिग्दर्शन मागल्या लेखांत केलें आहे. आमचीं महापुराणेंही यासंबंधानें बरींच उपयोगी पडण्यासारखीं आहेत. मनुस्मृती आणि रामायण व महाभारत हे अगदीं निराळ्या प्रकारचे ग्रंथ आहेत. तथापि त्यांमध्यें कालदूरता विशेष नसल्यामुळें, कलादि मुख्यविषयबाह्य गोष्टींचे जे उल्लेख त्यांत आढळतात, ते परस्परांशी सदृश असून एकमेकांचें समर्थन करणारे आहेत. आमच्या शोचनीच स्थितीमुळें, या महापुराणांचा अभ्यास आमच्या हातून असा व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पूर्वपद्धतीचे कांहीं लोक तीं पोथीपुढील तांदुळासाठीं, व्यासपूजेच्या प्राप्तीसाठीं, सप्ताहाच्या फायद्यासाठीं, किंवा बिदागीसाठीं वाचतात! अलीकडील तरुण लोक तीं परीक्षा पास होण्यासाठीं वाचतात! इतिहासदृष्टीनें त्यांच्याकडे अवलोकन करून ज्याने त्यांच्या वाचनास आरंभ केला आहे, व तें तडीस नेलें आहे, असा बहुधा एकही अर्वाचीन विद्वान सांपडणार नाहीं. एखादा बुद्धिवान व कल्पक विद्वान या दोन ग्रंथांचा यथास्थित रीतीनें अभ्यास करील तर भारतीय आर्यांच्या पौराणिक कालांतील स्थितीचें प्रत्येक बाबतींत विश्वसनीय, मनोरंजक, व बोधावह असें चित्र त्यास काढतां येणार आहे! पण असलें काम नीट रीतीनें होण्यास लागणारा राजाश्रय किंवा लोकाश्रय आम्हांस मिळत नसल्यामुळें यांचें जितकें मंथन व्हावयाला पाहिजे आहे तितकें अद्यापि कोणींही केलेलें नाहीं, व पुढेंही तें अशाच स्थितींत करण्यास कोणी झटेल, असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्लिश लोकांनीं असलीं कामें हातीं घरल्यास, त्यांस खुद्द सरकाराकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षात् किंवा परंपरेनें पुष्कळ मदत होते. इतिहासदृष्टीनें या ग्रंथांकडे पाहून त्यांच्या मदतीनें येथील जुनी स्थिति कशी असावी; राज्यपद्धति कोणत्या प्रकारची असावी; राजा आणि प्रजा यांचे अन्योन्य संबंध कसे होते; वर्णावर्णांत द्वेषभाव असे कीं संतोषवृत्ति असे; राजावर लोक प्रीति करीत किंवा त्याला नाखूष असत; कायदे कोण करी; कर कोणत्या प्रमाणानें

कशावर, व केव्हां घेत; सैन्याची व्यवस्था कशी काय ठेविली जात असे; स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देऊन परकी देशाचा माल स्वदेशांत येऊं न देण्याबद्दल निर्बंध करीत असत किंवा नाहीं; व्यापाराची मुख्य ठिकाणें कोणतीं होतीं; कोणकोणत्या जिनसा विशेष पिकत, अथवा कोणता जिन्नस कोणत्या ठिकाणीं विशेष सुबक होत असे, आणि त्याला काय किंमत पडे; लोकशिक्षणाची व स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिति कशी होती; स्त्रियांस, नोकरास, व इतर परोपजीवी लोकांस कोणते हक्क असत, व त्याचा सांभाळ कोणत्या रीतीनें होत असे वगैरे गोष्टीविषयीं उत्कृष्ट माहिती या दोन पुराणांत खचित सांपडेल, अशी आमची खात्री आहे. पण इतका शोधक व सुखवस्तू वाचक येथें कोठून पैदा होणार? व झाला तरी तो आम्हांस लाभणार कसा? फटदिशीं तो एखादे ठिकाणीं रावसाहेब होऊन बसावयाचा, किंवा कोठें वकिलीची 'प्रॅक्टीस' करूं लागावयाचा, अथवा एखाद्या नेटिव संस्थानिकाच्या पदरीं चार दोनशे रुपयांवर पडून राहावयाचा! सध्यां आमच्या संबंधानें हें बिकट काम युरोपिअन लोक करीत आहेत, व ते आमच्या हातून नीट होऊं लागेतोपर्यंत, युरोपिअन लोकांच्या शोधांवर व कांहीं अंशीं त्यांच्या कल्पनांवर, आम्हांस अवलंबून असलें पाहिजे. प्रस्तुत निबंधही **सर जॉर्ज बर्डवुड** यांनीं हिंदुस्थानच्या कलांच्या पुराणत्वाचें जें मंडन केलें आहे, त्याच्या अनुरोधानें लिहिले जात आहेत. ज्यांना सर जॉर्ज यांचा इंग्रजींत लिहिलेला अस्सल लेख पहावयाचा असेल, त्यांनीं बॉंबे ग्याझेट पत्राचा १३ जून १८९० चा अंक पहावा; असो.

रामायण आणि भारत हीं इतिहासाचीं पुस्तकें नाहींत हें जरी खरें आहे, तरी जो ऐतिहासिक दृष्टीनें त्यांकडे पाहील, त्याला त्यांपासून तत्कालीन व त्यापूर्वीच्या समाजाच्या अंतर्बाह्य स्थितीविषयीं बरीच माहिती मिळणार आहे. प्रस्तुत विषयाच्या समर्थनासाठी सर जॉर्ज यांनी रामायणांतून एकच उदाहरण घेतलें आहे; पण तेवढ्यावरूनसुद्धां पौराणिक कालांत आमच्या कलांची व कारागिरांची स्थिति कशी होती, हें सहज समजण्यासारखे आहे रामायणाच्या दुसऱ्या कांडांतील एकोणिसाव्या अध्यायांत, अयोध्येंतील लोक भरतासह जो रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्याचें वर्णन आहे. रामशोधार्थ काढलेली ही भरताची स्वारी मोठ्या थाटाने व व्यवस्थेनें निघाली होती. हींत प्रत्येक धंद्याचे लोक असून, धंद्याच्या महत्त्वाच्या अनुरोधानें त्यांच्या रांगा लाविल्या होत्या, व त्या त्या धंद्यांतील प्रमुख इसमांना त्याचे पुढारी किंवा नायक नेमिले होते. या प्रसंगी हजर असलेल्या लोकांत अग्रस्थान जवाहिऱ्यांस दिलें होतें, जवाहिऱ्यांच्या पाठीमागून कासार चालले होते, व कासाराच्या मागून हस्तिदंती काम करणारे, गंधी, सोनार, कोष्टी,

लोकर विणणारे, सुतार, पितळेचें काम करणारे, चितारी, गायनाची वाद्यें करणारे, शस्त्रें करणारे, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कापणारे, कांच करणारे आणि असेच इतर कारागीर अनुक्रमानें जात होते. ही यादी पाहून रामायणकालीं हे धंदे हिंदु लोकांस माहित नव्हते, असें कोण म्हणूं शकेल? हिंदुस्थानास मुसलमानांचा वारा सातव्या शतकापर्यंत मुळींच लागला नाहीं. रामायण व भारत यांतील राजे ख्रिस्ती शकाच्या पूर्वीची पांचशें आणि त्यानंतरचीं पांचशें वर्षे यांच्या दरम्यान होऊन गेले असावे, असें हिंदु लोकांच्या सुधारणेविषयीं ज्यांचें म्हणण्यासारखें अनुकूल मत नाहीं, असे पंडित देखील कबूल करतात. तसेच रामायणांत धंद्यांची जी यादी दिली आहे तीच कोणी झाला तरी आज करील. फार तर काय पण सेन्सस रिपोर्ट घेतला आणि त्यांतील वर्गीकरणाकडे पाहिलें तर धंद्याच्या कोष्टकांत म्हणण्यासारखा फरक करावा लागणार नाहीं. तेव्हां काय सिद्ध झालें कीं, रामायणकालीं या भरतभूमींत जे धंदे येथे चालत होते तेच अद्यापिही चालत आहेत व ग्रीक लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनीं त्यांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि वास्तविक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभव नव्हता. ग्रीक लोक तर येथें एखाद्या सांथीसारखे, वावटळीसारखे किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले! हिंदुस्थानांत त्यांनीं कायमचें ठाणें कधींही दिलें नाहीं, व त्यामुळें त्यांच्याकडून येथील कलाकौशल्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. 'म्हणण्यासारखा' असें बुद्ध्या लिहिण्याचें कारण असें कीं, ग्रीक लोकांनीं आम्हांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली असें जरी उपलब्ध इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांचें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं लोकांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या उभय देशांत बरेंच दळणवळण होत असावें, असें मानण्यास हरकत नाहीं. पण या दळणवळणावरून हिंदुस्थानांतील कारागिरी हिंदू लोकांनीं ग्रीक लोकांपासून उचलली असावी, असें अनुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट हिंदु व ग्रीक या उभयतांनींही आपापल्या कारागिरीचीं मूलतत्त्वें आपल्याहून जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावीं, असें मानण्यास बराच आधार आहे. तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, त्यांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याबद्दलही बराच पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्या संबंधानें जर ग्रीक लोकांचें सुद्धां आम्ही कांहीं कर्ज लागत नाहीं; तर त्यांच्या पाठीमागून ज्यांनीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या मुसलमानांचें लागतो, असें म्हणणें शुद्ध साहस आहे. शिवाय मुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें

आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस नाहींसा करावा, असा त्यांचा अधिकारही नव्हता. मुसलमान लोक आम्हांहून विशेष शूर, विशेष मिजासी, व धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत, कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें म्हणण्यास बिलकुल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षे आपली बादशाही चालविली हें कबूल आहे; पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अमलानें आमच्या अंतर्बाह्य स्थितींत जें जमीन अस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुसलमानांस सहाशें वर्षांच्या एकछत्री अंमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरीचे श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अंमलांत आमच्या घरच्या सुधारणेचा मागमूसही न राहता. आपणाहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केलें, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपलीं कायमचीं राज्यें स्थापिलीं; त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतां पत्ताही लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथे आपली गादी स्थापिली, व अनेक वर्षे त्याचें अव्याहत राज्य केलें, तरी त्यांच्या हातून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा बीमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं नियम काढिला आहे, तोच आम्हांसही लागूं होतो. याच गोष्टीचा दुसरा प्रत्यय असा आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थाईक अंमल कधीच झाला नाहीं, व पश्चिम हिंदुस्थानांत तो फार स्वल्पकालीन होता. यामुळें पश्चिम हिंदुस्थानांतील कलाकौशल्यावर मुसलमानांच्या अंमलाची झांक यत्किंचित् दिसते, पण कर्नाटकांतील व म्हैसूर प्रांतांतील कारागिरीस म्लेंच्छस्पर्श कधींही झाला नाहीं, असें त्या त्या प्रांतांतील कारागिरीच्या आजच्या स्थितीवरून म्हणणें भाग पडतें. उलट, अहमदाबाद, हैदराबाद (दक्षिण) अशा थेट मुसलमानी शहरांत सुद्धां आमची कारागिरी मशीदीपर्यंत व जनानखान्यापर्यंत जाऊन भिडली आहे, असें दिसून येईल!

*

भारतीय कलांचें पुराणत्व

नं. ४

गेल्या तीन लेखांत मनुस्मृति, महाभारत, व रामायण या तीन ग्रंथांच्या साहाय्यानें भारतीय कला किती जुन्या आहेत, हे थोडक्यांत दाखविलें. आज याहूनही एका जुन्या ग्रंथाच्या मदतीने त्याच गोष्टीचें पुष्टीकरण करून, मग थोडासा बाहेरचा पुरावा देण्याचा मानस आहे.

सर्व ग्रंथांत वेद हा अत्यंत पुराण ग्रंथ आहे, असें आम्ही हिंदु लोक म्हणतों इतकेंच नाहीं, तर युरोपांतील अत्यंत शोधक अशा प्रत्येक देशांतील विद्वानांचें मत आहे. यासंबंधानें मॅक्स म्युलर साहेबांनीं कोठेंसें असें म्हटलें आहे कीं, पृथ्वीवरील मनुष्यांचा, निदान आर्यशाखेंतील मनुष्यांचा आद्य इतिहास दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांत मिळण्याचा संभव नाहीं. आपल्या मनांतील विचार दुसऱ्यास कळविणें हा भाषेचा मुख्य उपयोग होय. अशा प्रकारची भाषा आर्यशाखेंतील मनुष्यांमध्यें अस्तित्वांत येऊन, चिरस्थाई होण्यासारखे जे विचार त्यांनी छान्दस वृत्तांत प्रथम गोंविले, ते वेदांत दृष्टीस पडतात. वेदांतील ऋचा ज्या वेळेस रचल्या गेल्या त्या वेळेस आर्यलोकांस लेखनपद्धति माहित नसावी, असें आन्तर्बाह्य प्रमाणांवरून कित्येक पंडित अनुमान करितात. तात्पर्य, मनुष्यांच्या बुद्धीचा विकास होऊं लागला; बाह्य सृष्टीचा चमत्कार त्यांस वाटूं लागला; सूर्यचंद्रादि आकाशस्थ तेजोमय गोलक एका दिशेनें दिसूं लागतात, व कांहीं वेळ आकाशपंथ आक्रमून पुनः नाहींसे होतात; कधींकधीं नभोमंडल अभ्रांनीं व्याप्त होऊन जिकडे तिकडे पर्जन्यवृष्टि होऊं लागते; पर्वतांच्या बाजूवरून पाण्याचे मोठमोठे लोट वाहूं लागतात; विजा चमकतात; गडगडाट होतात; फिरून वृष्टि थांबते; आकाश निरभ्र होतें; गगनस्थ कोट्यवधि लहानमोठे तारकापुंज चमकूं लागतात; प्राणिमात्रांची भीति नाहींशी होऊन ते पुनः जिकडे तिकडे संचार करू लागतात; नद्यांचें, सरोवरांचें, व सागरांचें उदक फिरून स्वच्छ होतें; झाडांस पालवी फुटून तीं टवटवीत दिसूं लागतात; व पुनः कांहीं महिन्यांनीं सृष्टि आपलें उग्र स्वरूप धारण करते- असा विलक्षण चमत्कार पाहून कधीं भयानें, कधीं आनंदानें, व कधीं

आशेनें आणि निराशेनें चकित होऊन सृष्टींतील भव्य वस्तूंस प्रबुद्ध प्राणी कल्पणाऱ्या, व त्यांचा कोप शांत होऊन त्यांची मर्जी आपणांवर सुप्रसन्न करून घेण्यासाठीं त्यांची प्रार्थना करणाऱ्या बाल्यावस्थेंतील मनुष्यजातीचे वेद, हे अव्याज उद्‌गार होत, ही कल्पना कांहीं वावगी नाहीं. तथापि जडसृष्टींतील चमत्कारांचें इतकें कौतुक व आश्चर्य वाटून, त्यांचे ठाई बुद्धिमत्तेची, शक्तिमत्तेची, व मनुष्याला सुखदु:ख देण्यास सामर्थ्य असल्याची कल्पना येण्यापूर्वी, व त्यांचें स्तवन करण्याची मनांत स्फूर्ति होऊन ती करतां येऊं लागण्यापूर्वी, बरीच सुधारणा झाली असावी असे अनुमान करणें अवश्य आहे. इंद्र, चंद्र, वरुण, सूर्य इत्यादिकांस देवता कल्पून "अमक्या देवा, तूं आम्हांस पाऊस दे; तमक्या देवा, तूं आमच्या गाईंचें संरक्षण कर; अमुक देवा, तूं आमचा राजा आहेत, तूं आमचा पिता आहेस, तूं आमचा पालक आहेस; तू चोरांस दंड करतोस; तूं मित्रांचें पालन करतोस; तूं लढाईत मदत करतोस; तूं सज्जनांस मरणोत्तर सद्‌गति देतोस; तूं औषधींचा स्वामी आहेस; तूं धातूंचा उत्पादक आहेस; तूं मनुष्यांस कला ज्ञान देतोस; तुझ्या कृपेनें आमचा व्यवहार व्यवस्थित चालतो" - अशा प्रकारचे स्तव ज्यांनीं केले त्यांना अनेक वस्तूंचे धर्म समजले असावे, व वन्यावस्थेंतून पार पडून राज्यधर्म व समाज या संस्थांची उत्पत्ति व अभिवृद्धि त्यांत बरीच झाली असावी; असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. वेदरूपदर्पणांत अशा प्रकारच्या प्रथमावस्थेचें उत्कृष्ट प्रतिबिंब आहे, व जो कोणी इतिहासदृष्टीनें त्यांकडे पाहील त्यास तें सहज स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. अशा दृष्टीनें ज्यानें रा. ब. शं. पां. पंडितकृत वेदार्थयत्नाचे कांहीं अंक पाहिले; अशा आमच्या एका शोधक व कलाभिज्ञ मित्रानें केलेलें एक टिपण मेहेरबानी करून आमच्याकडे पाठवून दिलें आहे, त्यावरून वेदकालींही या भरतखंडांत कलांचा किती प्रसार झाला होता हें सहज दिसून येणार आहे. निदान वेद तरी आम्हीं कोणापासून मागून किंवा चोरून आणिले नाहींत, हें आमच्या दीर्घशत्रूसही कबूल केलें पाहिजे! तसेंच, वेदांहून जुना आणि दुसरा ग्रंथ जगांत उपलब्ध नाहीं हेंही अजूनपर्यंत निर्विवाद आहे. तेव्हां वेदांत ज्या कलांचा व कारागिरांचा उल्लेख आहे, त्या कला व ते कारागीर तरी आर्यशाखेंत निर्माण झाले असले पाहिजेत, असें प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

वेदार्थयत्न

वस्तूचे नाव	वे. य. पा.	श्लोक	ऋचा
पेले	१०४	४	१५
"	११२	२	५

वस्तूचे नाव	वे. य. पा.	श्लोक	ऋचा
भांडी	११४	५	१५
मातीची भांडी	११६	९	१५
सोने	१६८	५	२२
	४२८	५	३५
सोन्याचे रथ	३०६	१६	३०
होमाच्या पळ्या	३२२	५	३१
चिलखते	३३	१५	३१
,,	८५०	९	५८
वज्र	३४६	१	३२
,,	६	३	५१
बाणांचे भाते	७२६	६	९२
धनुष्ये	३७२	३	३३
सोन्याच्या खिळा	३७२	४	३३
मोत्यांचे हार	४१६	४	३५
सोन्याचे वज्र	,,	,,	,,
नांगर	८२४	२	५७
वस्त्रे	४६	१५	२३
चुना	२४८	१	२६
,,	२७	२-३	४
घुसळण्याची रवी	५	७	२८
नगारा	२७०	४	२८
घागरी	२७६	५	२८
आंस व चाके	२८	९	,,
मध	३०४	१४-१५	३०
तांबे (कलश)	३९४	२	३४
हातोडा	४०४	८	३४
हत्यारे	४५६	१६	३६
भाले, कुऱ्हाडी	३१	५	६३
	५०६	२	३९
चाबूक	४६८	२	३७

वस्तूचे नाव	वे. य. पा.	श्लोक	ऋचा
लगाम	४७०	३	३७
कोयता	४९८	१२	३८
सुतार	८४	४	५८
आयुधे	८८०	४	६१
घरे आणि वाडे	८९६	१३	६१
शहरे व किल्ले	५२८	७	४७
फासे (शंखाचे)	४३४	३	४१
ध्वज (निशाण)	५४५	९	४१

मागे जी यादी दिली आहे, तीवरून वेदकालीं आर्यलोकांना सोनें, रुपें, लोखंड वगैरे धातूंचा उपयोग समजला होता; ते शेतकी करूं लागले होते; गाई, घोडे वगैरे जनावरें माणसाळून त्यांनीं त्यांस आपल्या कामास लाविलें होतें; धनुष्यबाण, खड्ग, रथ वगैरे जिनसा त्यांस करतां येत होत्या; गरीब व श्रीमंत आपल्या मगदुराप्रमाणें लहानमोठीं घरें बांधून राहत होते; यज्ञयागादि क्रिया होऊं लागल्या होत्या; शहरें व किल्ले बांधण्यास आरंभ झाला होता- इत्यादि गोष्टी चांगल्या रीतीनें सिद्ध होतात. तेव्हां सांप्रतकालीं आपल्या देशांत ज्या जुन्या कला दृष्टीस पडत आहेत त्यांचा उगम आर्यशाखेंतील लोकांत वेदाच्या पूर्वी झाला असावा, असें अनुमान होतें. म्हणून भारतीय कलांच्या पुराणत्वास कमीत कमी पांच हजार वर्षें झालीं असावीं, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां याचसंबंधानें बाहेरून जो विपुल पुरावा मिळतो, त्याचा स्वल्प उल्लेख करूं. शके १३०त जन्मलेल्या **ॲप्युलिअस** ग्रंथकार 'फ्लारिडा' नांवाच्या ग्रंथांत असें म्हणतो कीं, 'हिंदुस्थानांतून युरोपांत हस्तिदंताच्या राशी, मिऱ्याच्या गोण्या, दालचिनीचे गठ्ठे आणि सोन्यारुप्याचे डाग येत असत'! पहिल्या शतकांतील 'पेरिप्लस' नांवाच्या ग्रंथांत असें म्हटलें आहे, कीं केप गार्डाफ्यूच्या आसपासचे लोक हिंदुस्थानांतून तांदूळ, तूप, तीळ, साखर, सुटा व विणलेला कापूस, आणि रेशमी कापड आणीत असत. अरबस्थान व तुर्कस्थान यांतील लोक हिंदुस्थानचें केशर, हळद, निळें कापड, शेवरीचा कापूस, मलमल, रेशमी कापड आणि अरबी तऱ्हेचे पेहराव घेऊन जात. इराणांत हिंदुस्थानांतून साग, शिश्वि, शिंगें वगैरेचें कोरींव सामान जात असे. बार्बरी संस्थानांतील लोक कराचीशीं व्यापार करीत आणि तेथून पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांतील उत्तम प्रकारचें सुती कापड,

नाना प्रकारचे अंबर, स्फटिकादि मौल्यवान् पाषाण, काचेचीं भांडीं, व सोन्यारुप्याचीं ताटें व तबकें नेत. भडोच आणि मच्छलीपट्टण या ठिकाणीं फार मोठा व्यापार चालत असे. कोणी असें म्हणतात कीं मुसलमानांनीं मच्छलीपट्टण येथें चिटाचा कारखाना प्रथम सुरू केला. पण हें म्हणणें बरोबर दिसत नाहीं; कारण, 'पेरिप्लस'मध्येंच असें म्हटलें आहे कीं, ख्रिस्तीशकाच्या पहिल्या शतकांतच मच्छलीपट्टण सुताच्या कारखान्यांत पहिल्या प्रतीचें होऊन बसलें होतें. आणि त्यापूर्वी बरींच वर्षे इराणचें आखात आणि तांबडा समुद्र यांशीं त्याचा कापडाचा व्यापार चालत होता, असें दिसतें. तेव्हां जे हिंदू लोक बाहेरच्या पुराव्यावरून सुद्धां ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमारास इतके कलानिपुण होऊन बसले असें सिद्ध होतें, त्या हिंदु लोकांस, मध्य आशियांतून रानटी मुसलमान लोकांच्या ज्या झुंडी हिंदुस्थानांत आल्या; त्यांनीं कोणत्या प्रकारचें कलाज्ञान दिलें असेल, हें समजणें अशक्य आहे.

खरोखरींच पाहिलें; तर युरोपखंडाशीं हिंदुस्थानचा व्यापार सुरू झाल्यास किती वर्षे झालीं, याचा बरोबर निर्णय करणें फार कठिण आहे. एका जर्मन शोधकास ट्रॉय येथें शिश्वीचें कोरीव लाकूड सांपडलें. विचार करतां तें हिंदुस्थानचें असावें, असें त्याचें म्हणणें आहे. म्हणजे ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें हजार वर्षे आम्ही भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील शहरांशी व्यापार करू लागलों होतों, असें सिद्ध होतें. क्यालडिआ प्रांतातील ऊर येथील जुन्या देवालयाच्या पडक्या मालमसाल्यांत हिंदुस्थानच्या सागाच्या तुळ्या सांपडल्या आहेत, व त्यासंबंधानें इतकाच प्रश्न निघाला आहे कीं, ख्रिस्ती शकाच्यापूर्वी दोन हजार वर्षे हें देऊळ प्रथम बांधलें गेलें; त्या वेळेस त्या (तुळ्या) हिंदुस्थानांतून नेल्या असाव्या, किंवा ख्रिस्तीशकापूर्वी सहाव्या शतकांत प्रसिद्ध नेबुचाड्नेझर नांवाच्या राजानें त्याचा जो जीर्णोद्धार केला, त्याकरितां नेल्या असाव्या. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी १८ व्या शतकांत इजिप्त देशांत ज्या घराण्यांतील राजे राज्य करीत होते; त्यांच्या थडग्यांत हिंदुस्थानातील नीळ, कापूर, व चिंचेच्या पेट्या सांपडतात! नोहाचें गलबत हिंदुस्थानच्या सागाचें बांधलें असावें, असें आलेग्झांड्रिआच्या एका जुन्या शोधकाचें म्हणणें आहे. बायबलांत सांगितलेले ऊस वगैरे जुने पदार्थ हिंदुस्थानांत व ब्रम्हदेशांत उत्पन्न होणारे आहेत. कोंबडा हा ख्रिस्ती शकाच्या पूर्वी ५०० किंवा ६०० वर्षे युरोपांत गेला असावा, असें दिसतें. आमचा मोर ग्रीस देशांत ख्रिस्ती शकापूर्वी ४४० वे वर्षी गेल्याबद्दल बेमालूम पुरावा आहे. सालोमन नांवाच्या राजानें या भव्य व रमणीय पक्ष्यास ख्रिस्ती शकाच्या पूर्वी १००० व्या वर्षी यरूशलेम येथें दक्षिण हिंदुस्थानांतून आणविलें असावें, असें वाटतें; कारण

'टोक्की' हें त्याचें तामील भाषेंतील मूळचें नांव बराच अपभ्रंश होऊन युरोपांतील निरनिराळ्या देशांत पसरलें आहे, असें मानण्यास पुष्कळ आधार आहे.

पूर्वपश्चिम समुद्रांचें वेष्टण; सह्य, विंध्य, व हिमालय अशा पर्वतांच्या रांगा; कृष्णा, नर्मदा, सिंधू, भागीरथी, व ब्रह्मपुत्रा अशा नद्यांचे प्रवाह; वसंत ग्रीष्मादि ऋतूंची अस्खलित परंपरा; सर्व प्रकारच्या धातूंचें, पाषाणांचें व वनस्पतींचें अस्तित्त्व; प्रचंड अरण्यें; विस्तृत व सपाट मैदानें; शीत, उष्ण व समशीतोष्ण हवेचे प्रदेश- इत्यादि कारणांनीं कलांच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशा या भरतखंडांत, त्यांचा आरंभ केव्हां झाला आणि हिंदुस्थानचा इतर देशांशीं व्यापार किती वर्षें सुरू आहे, याचा निर्णय करणें बऱ्याच अंशीं अशक्य आहे. जितकें मागें जावें तितके कमीच गेलों असें वाटतें. तात्पर्य, भारतीय कलांच्या उत्पत्तीचा कालनिर्णय कल्पनाबाह्य व शोधातीत आहे असें मानून, ज्या साधनांनीं ही आपली वडिलोपार्जित कमाई आपणांस व इतरांस अत्यंत हितकारक होईल; अशांची योजना करावयास लागणें, हेंच आपलें आजमितीस मुख्य कर्तव्य आहे, हें ध्यानांत धरणें फार अवश्य आहे. तसें आपण केलें नाहीं, तर काळाच्या झपाट्यांतून इतकीं सहस्र वर्षें तगून राहिलेल्या आमच्या कलांचा मागमूस नाहींसा होऊन, आपण अन्नास मोताद होऊं, व अखेरीस त्यांच्याप्रमाणेंच आमचीही दशा होईल, हें रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेऊन; जें करणें असेल तें समजंस व सुशिक्षित लोकांनीं करावें.

*

हा कलंक कसा जाणार?

बालविवाहापासून होणाऱ्या अनर्थांत घोडनवऱ्यानें अल्पवयस्क स्वस्त्रीवर केलेल्या जुलमापासून होणाऱ्या दुष्परिणामांचाही समावेश होतो. अशा प्रकारच्या अमानुष कामवासनेपासून स्त्रीला मृत्यु येणें, याहून भयंकर असें काय असेल कोण जाणे! 'मी तुला सहधर्मचारिणी करीन व संसारयात्रा तुझ्या विचारानें चालवीन' अशी देवब्राह्मणासमक्ष शपथ घेऊन, आपल्या अनावर कामाच्या होमकुंडांत आपल्या सहधर्मचारिणीची आहुती टाकणारे नराधम जरी थोडे असले, तरी आमरण तिला छळील अशी एखादा व्याधी तिच्या पाठीस लावून देणारे, किंवा प्राण जाईपर्यंत ज्याच्यापासून तिला अहोरात्र पीडा होईल, असें एखादें व्यंग तींत उत्पन्न करणारे भ्रताररूपी राक्षस, अनेक असतील यांत संशय नाहीं. बंगाल्यांतील हरी मोहन हा या नरपशूंचा एक मासला आहे. वास्तविक पहातां अशा व्यक्तीला पशू म्हणणें हें बरोबर नाहीं; कारण त्या अप्रबुद्ध प्राण्यांतही अशा अघोर क्रूरतेचा अनाचार घडत नाहीं. हा लज्जास्पद प्रकार आम्हां मनुष्यांकरतांच राखून ठेविला आहे. हरी मोहन आपल्या सासुरवाडीस राहत होता; त्याची निजण्याची खोली त्याच्या बायकोच्या खोलीपासून दूर होती. एके दिवशीं मध्यरात्रींच्या सुमारास आपली पुमोनी मोठमोठ्याने ओरडत आहे, असें वाटून तिची आई घाबऱ्या घाबऱ्या तिच्या खोलीत धांवत गेली, तों निश्चेष्ट पडलेली पुमोनी आणि भिऊन गेलेले जांवई तिच्या दृष्टीस पडले! पुमोनीचें अंथरूण रक्ताने भरून गेलें होतें! 'जांवईबापू, हा काय प्रकार आहे', असें सासूबाईंनीं विचारल्यावरून त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, 'हें असें कसे झालें, हें मला कांहीं ठाऊक नाहीं; पण हिचें ओरडणें ऐकून मी आपल्या खोलींतून या खोलींत आलों. आणि पाहतों तों हा प्रकार! हें कसें झालें असेल, तें मला ठाऊक नाहीं, पण दहाव्या वर्षानंतर नवऱ्यानें बायकोकडे जाणें हें बेकायदेशीर होत नाहीं, हें मात्र मला ठाऊक आहे!' अशी या निंद्य प्रकरणाची हकीकत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. आजपर्यंत आम्हीं त्याविषयीं उल्लेख केला नाहीं. कारण त्यांतील खरा निराळाच प्रकार असेल, असें आम्हांस वाटत होतें. अजूनही खोटा ठरल्यास हरी मोहनाची क्षमा मागण्यास आम्हीं तयार आहों. पण तसें होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. हरी मोहनास देहान्त

देहान्त प्रायश्चित्त न मिळालें, तरी बरींच वर्षें काळ्या पाण्यात जावें लागणार आहे. ईश्वरकृपेनें हरी मोहनाच्या हातून हें अघोर पातक घडलें नसेल तर त्याच्या व आमच्या तोंडास लागणारा हा काळोख चुकणार आहे. हरी मोहनाच्या वयास तिशी उलटून गेली आहे, व त्याच्या परलोकवासी बायकोला फक्त अकरावें वर्ष लागलें होतें, या गोष्टी वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत!

ही हृदयभेदक गोष्ट खरी असो किंवा नसो; अशा तोडीच्या गोष्टी, या भरतखंडांत कोठें कोठें या बालविवाहामुळें घडत असतील, याविषयीं कोणासही शंका येतां येणार नाहीं. तेव्हां असल्या गोष्टी कधींही कानीं न येतील अशाबद्दल काय उपाय करावे, हा मुख्य प्रश्न आहे. यासंबंधानें कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, बायकोच्या बारा वर्षांच्या आंत तिच्या नवऱ्यानें जरी तिच्याशी संभोग केला तरी तो असंमत संभोग मानून त्याला शिक्षा करण्याचा अधिकार असावा. सध्याच्या पीनल कोडात दहा वर्षांपुढें विवाहित स्त्रीशीं नवऱ्यानें केलेल्या संभोगास जबरीचा संभोग मानिलेला नाहीं. त्यामुळें कोर्टापुढें असला खटला आला असतां, अशा प्रकारची आगळिक करणाऱ्या नवऱ्यास जबरीच्या संभोगास ठेवलेली शिक्षा देतां येत नाहीं. फार झालें तर दुखापत करणारास सांगितलेली शिक्षा, त्यास देतां येते. पण बायकोस दहावें वर्ष लागण्यापूर्वी जो तिच्याशीं संभोग करून तीस दुखापत करील त्यानें तिच्याशीं जबरीचा संभोग केला, असें होऊन त्याला त्या अपराधास ठेवलेली शिक्षा ठोठावतां येते. तेव्हां दहाच्या ठिकाणी बारांची यत्ता घातली असतां कांहीं बरें होणार आहे, असें ही सूचना करणारांचें म्हणणें आहे. हा फेरफार करण्यास आमचा कोणत्याही प्रकारचा अडथळा नाहीं. पण त्यापासून म्हणण्यासारखा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. मुलगा आणि मुलगी यांचें लग्न होण्यापूर्वी किती वय असावें, अशाविषयीं आमच्या कायद्यांत मुळींच निर्बंध नसल्यामुळें, जरी पांच वर्षांच्या विवाहित मुलीकडे आठ वर्षांचा किंवा अडतीस वर्षांचा तिचा नवरा गेला आणि तें त्याचें करणें उघडकीस आलें नाहीं, तर त्यानें तें कर्म केलेंच नाहीं, असें घेऊन चालावें लागतें. किती वर्षांचा कोण मनुष्य आपल्या बायकोकडे केव्हां जातो, हें पाहण्यास कोणत्याही प्रकारचे पोलीस ठेवतां येणार नाहींत, व ते ठेवले तरी त्यांना असले गुन्हे पकडतां येणार नाहींत. खुद्द मुलगी, तिचे आप्त, आणि तिच्या नवऱ्याचे आप्त व मित्र असला गुन्हा आपणांकडून होईल तितकें करून बाहेर न पडूं देण्याविषयीं पराकाष्ठेची काळजी घेत असतात. कारण तो उघडकीस आल्यानें सर्वांच्याच तोंडाला काळोख लागण्याचा संभव असतो. पण जेव्हां तो फारच अनावर होतो, व त्यापासून कांहीं भयंकर परिणाम उत्पन्न होतो, तेव्हां तो त्यांच्या इच्छेविरुद्ध बाहेर पडतो, आणि

सर्वांस खालीं पाहण्यास लावतो. ज्यानें अशा प्रकारचा केलेला संभोग कोणत्याही कारणामुळें बाहेर पडला, त्या दुखापतीबद्दल शिक्षा होणें किंवा जबरीच्या सभोगाबद्दल शिक्षा होणें, यांत विशेष अंतर आहे, किंवा कमी-अधिक बेअब्रू आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. समजा कीं, एका मुलीचें बारावें वर्ष फाल्गुन वद्य अमावास्येस संपते, व दुसरीस त्याच दिवशीं तेरावें वर्ष लागतें. कायद्याप्रमाणें एकीस 'बारा वर्षांची' आणि दुसरीस 'तेरा वर्षांची' असें म्हटलें पाहिजे. समजा कीं दोघींच्याही घोडनवऱ्यांनीं दोघींवर बलात्कार केल्यामुळें एकाच प्रकारचा परिणाम घडून येऊन, दोनही खटले कोर्टापुढें आले; अशा स्थितींत वर सुचविलेला फेरफार पीनल कोडांत केला असल्यास, पहिलीच्या नवऱ्यास कायद्याप्रमाणे दुखापतीबद्दल व दुसरीच्यास जबरीच्या संभोगाबद्दल येवढाच भेद काय तो होणार आहे. पण या भेदामुळें या दोघा कल्पित राक्षसांच्या निर्दयपणांत, कामांधतेंत, किंवा बेअब्रूंत काय अंतर दाखवितां येईल, हें आम्हांस कळत नाहीं. पाहिजे त्या वयाच्या मुलींची लग्नें करण्याची मोकळीक असण्यापासून घडणारे अनर्थ सभोगाच्या कायद्यांत लहान लहान फेरफार केल्यानें टळण्याचा संभव नाहीं. ज्या उल्लूंस हा गुन्हा करावयाचा असतो ते जबरीचा संभोग आणि दुखापत यांतील भेद पाहून तदनुसार वर्तन करणारे नसतात! जे अत्यंत निंद्य किंवा क्रूर कर्म करण्यास प्रवृत्त होतात; ते त्यांना ठेवलेल्या शिक्षांतील अंतर पाहण्यास कधीही थांबत नाहींत! असें कर्म करतांना ते बेफाम होऊन गेलेले असतात, व त्यांच्या मद उतरेतोपर्यंत ते कामातुर पशूप्रमाणें वागत सुटतात. अशांच्या ताब्यांत स्त्रीच्या रूपाने लहान मुली देण्याचा प्रघात जोंपर्यंत चालू राहील तोंपर्यंत सुधारलेल्या लोकानीं आमच्या तोंडावर थुंकण्यासारखे किंवा त्यांत शेण घालण्यासारखे असले निंद्य प्रकार घडल्याशिवाय राहणार नाहीत! आणि विवाहकालाची मर्यादा तर कायद्यानें वाढवून घेण्यास आम्ही तयार नाहीं. तींत परक्या सरकारानें हात घालतां कामां नये. शिक्षणानें लोकांची मनें विकसित होऊन, ती जसजशी वाढत जाईल तसतशीच वाढूं दिली पाहिजे. दहा किंवा बारा वर्षांच्या आत मुलींचीं लग्नें करूं नये, असा कायदा करून घेतला, तरी असले अनर्थ कसे टाळतां येणार आहेत? वरातीहून घरीं आल्याबरोबर आपल्या बारा वर्षांच्या बायकोशीं एखादा घोडा असें कर्म करण्यास कशावरून प्रवृत्त होणार नाही? पण इतकें तरी कशाला? स्त्रिया ऋतुस्नात झाल्यावर जरी त्यांचे विवाह होऊं लागले तरी ज्याला असलें कर्म करावयाचें असेल त्याच्या तावडींत कोणी तरी मुलगी सांपडेलच. तेव्हां यासंबंधानें कायद्याचा कांहींएक उपयोग नाहीं, असें या बेकायदेवाल्यांचें म्हणणें आहे. धन्य त्यांच्या अकलेची, कोटिक्रमाची, स्वातंत्र्याभिमानाची आणि कर्तृत्वाची!!! *

समजत नाहीं तें हें

'तिशी उलटलेला हरी मोहन अत्युत्कट विषयवासनेमुळें बेफाम होऊन पुमोनीवर चालून गेला, व ज्याप्रमाणें भुकेनें अत्यंत क्षुब्ध झालेला एखादा क्रूर व्याघ्र कोठें तरी निःशंकपणें फिरत असलेल्या किंवा पडून राहिलेल्या शेळीवर उडी घालून आपल्या तीक्ष्ण दंष्ट्रांनीं तिच्या शरीराचें विदारण करतो आणि आपली क्षुधा भागवितो; त्याप्रमाणें हरी मोहनानें आपल्या कौमारावस्था धर्मपत्नीशीं राक्षसी आचार करण्यास सुरुवात केली, व त्याच्या दुःसह यातना न सहतां आल्यामुळें तिनें फोडलेला हंबरडा ऐकून, तिला सोडविण्यास निघालेली तिची आई तिच्यापाशी येऊन पोहोचण्यापूर्वीच त्यानें आपल्या भडकलेल्या कामकुंडांत तिची आहुती टाकली, आणि तिच्या जीविताबरोबरच आपल्या लौकिकाची रांगोळी केली-' वगैरे प्रकार ऐकून सदय मनुष्याच्या अंतःकरणांत त्या हतभाग्य कुमारिकेविषयीं करुणा उत्पन्न होणें, आणि हरी मोहनासारखे जे अधम असतील त्यांस फाडून खावें किंवा हाल हाल करून मारून टाकावें, असे वाटणें हें फार साहजिक आहे; तसेंच अशा प्रकारचा पुण्य प्रकोप खवळून गेला असतांही, ज्यांच्या वृत्तींतील विचारशीलतेचा निरालस लय होऊं शकत नाहीं, अशांनी अशा प्रकारच्या भयानक गोष्टीचा विचार क्षणभर एकीकडे ठेवून, असे प्रकार पुनः पुनः न घडूं देण्याबद्दल काय करावें, याच्या विचारास लागणें हेंही अत्यंत स्वाभाविक आहे; पण जगाची जी खरी स्थाईक सुधारणा होते, ती विपत्तीच्या दर्शनानें उत्पन्न होणाऱ्या आकस्मिक हल्लक्षोभानें; किंवा त्या विपत्तीच्या निरसनार्थ आवेशाच्या भरांत कांहीं तरी सुचविलेल्या उपायानें होत नसते. विपत्तीचें निर्मूलन करण्याची प्रवृत्ति होण्यास ती पाहून खेद झाला पाहिजे, व त्या खेदाबरोबर ती घालविण्याचा कांहीं तरी उपाय करावा, असें वाटलें पाहिजे, व त्या दोन गोष्टी प्रथम झाल्याखेरीज मनुष्याच्या हातून कोणत्याही प्रचंड विपत्तीचें निर्मूलन होणार नाहीं हें खरें आहे. पण येवढ्या दोन गोष्टी झाल्या म्हणजे तें निर्मूलन होईलच असेंही खात्रीनें सांगतां येत नाहीं. आपण ज्या जगांत आहों तें अनेक प्रकारच्या दारुण विपत्तीनीं ओतप्रोत भरलें आहे, हें खरें आहे, आणि त्या विपत्तींची संख्या थोडी कमी झाल्याखेरीज आमची येथील वस्ती सुखावह होण्याचा संभव नाहीं, हेंही

खरें आहे. पण येवढ्यावरून विपत्ति दृष्टीस पडली कीं, ती नाहीशी करण्यासाठीं प्रथमदर्शनीं जो उपाय सुचेल तो करीत सुटावें, असें सिद्ध होत नाहीं. कधीं कधीं अशा प्रकारच्या उपायांनीं नफा न होतां उलट नुकसान होतें. सगळ्या झाडाला कीड लागून जाऊन तें अगदी वठून गेलें असलें, व त्याचीं फळे आळ्यांनीं भरून जात असलीं तरी त्याच्या वरच्या सालीवर किंवा फळांवर औषधोपचार करून काय फायदा होणार आहे? क्षारोदकादि ज्या उपायांची योजना करावयाची असेल त्यांचा परिणाम त्यांच्या अंतर्सालीवर किंवा मुळावर झाला, तरच त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव आहे. ज्याप्रमाणें हाडापर्यंत जाऊन भिडलेला व्रण त्याच्या तोंडावर चोपडलेल्या तेलांनीं किंवा मलमाच्या पट्ट्यांनीं बरा होण्याची आशा नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या हाडापर्यंत जाऊन खिळलेल्या व शेंकडों वर्षे वहात असलेल्या अमंगलाचाररूप व्रणांचें निराकरण भलत्याच प्रकारच्या कायद्यांनीं होण्याचा संभव नाहीं. फुमोनीचें हृदयद्रावक वर्तमान ऐकल्यापासून परमपूज्य रघुनाथरावाप्रमाणें, आमचें अंतःकरणही कळवळत आहे. असला भयंकर मृत्यु कोणत्याही आर्यकुमारिकेस इतउपर न यावा, असें हिंदूप्रमाणें सुधारकासही नाभिमूलापासून वाटत आहे; पण ज्या उपायांनीं अप्राप्तयौवन कन्यकांवर येणारें हे विघ्न टाळतां येईल असे त्या मद्रपूरस्थ सुधारकाग्रणीस किंवा पत्राग्रणीस वाटत आहे, ते उपाय फारसे फलद्रूप होणार नाहींत, अशी सुधारकास भीति पडली आहे; हें त्याचें मोठें दुर्दैव होय!

मद्रास येथील विवाहपरिषदेचें (Marriage Association) असें म्हणणें आहे कीं, दुर्दैवी वंगकन्येचें हें खेदजनक उदाहरण लोकांच्या डोळ्यापुढें आहे तोंपर्यंत सर्व सुधारणेच्छू सुशिक्षितांनीं व इतर सदस्य लोकांनीं सरकारकडे अर्ज करून, 'जो नवरा आपल्या बायकोशीं १४ वर्षांच्या आंत (म्हणजे बायकोस चवदावें वर्ष लागण्यापूर्वीं) संभोग करील, त्यानें तिच्याशीं जबरीचा संभोग केला असा आरोप त्याच्यावर ठेवून, त्याला जबरीच्या संभोगास सांगितलेली शिक्षा देण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटास येईल, अशा प्रकारचा फेरफार पीनल कोडांत करून घ्यावा' आमच्या मतें असा अर्ज करण्यास फार लोक तयार होणार नाहींत, झाले तरी सरकार तो मान्य करून त्याप्रमाणें पीनल कोडाचें कलम फिरवणार नाहीं, व त्यांनीं तें फिरविलें तरी त्यापासून म्हणण्यासारखा फायदा न होतां, बराच त्रास होईल. कसा तो पहा. या देशांतील मुली बहुधा बारापासून चवदा वर्षांपर्यंत ऋतुमती होतात. त्यापुढें अस्नात रहाणाऱ्या अशा मुली फार आढळणार नाहींत. मुली ऋतुमती झाल्या कीं त्यांचेंगर्भाधान केलेंच पाहिजे, असा प्ररूढ आचार आहे, व शेंकडा नव्याण्णव बाबींत त्याचें परिपालन होत आहे. तिजवराची, बिजवराची,

किंवा घोडनवऱ्याची तर गोष्ट राहूं द्या. कारण 'माझी प्रिया पातळ नेसून मला भेटेल केव्हां' असें त्यास झालेलें असतें, व ऋतुशांतीचा मुहुर्त फार तर नाहींच, पण एका आठवड्याच्या लांबणीवर टाकण्याची भीड खुद्द ब्रह्मदेवानें घातली तरी देखील ती मान्य करण्यास तो तयार नसतो! तेव्हां नहाण आल्यावर, पण चवदा वर्षांच्या आंत, अशांनीं स्वस्त्रियांशीं केलेला जो संभोग; त्यास तुम्ही आपल्या कायद्यांत 'संमत संभोग' म्हणा, किंवा 'असंमत संभोग' म्हणा, ते म्हणून त्याचा अनुभव घेतल्याशिवाय राहवयाचे नाहींत! प्रबुद्ध कामवासना, सुखोपभोगाची उत्कंठा, धर्मबंधन, रूढाचार, व लोकमत इत्यादि कारणांनीं असे लोक एकांतप्रियादर्शनाविषयीं मोठे आतुर झालेले असतात! पण ज्या मुलाची अजून शाळा सुटली नाहीं, ज्याला 'अरे' वाचून कोणी बोलत नाहीं, ज्याच्या पाठीमागचा मास्तराचा धाक सुटलेला नाहीं, ज्याच्या तोंडावर यौवनारंभाचें कोणतेंही चिन्ह दिसूं लागलें नाही, ज्याच्या निद्रेचा विषयचिंतेनें भंग होऊं लागला नाहीं, व ज्याला त्या सुखाची खरी गोडी समजण्याचा संभव नाहीं, अशा लुस्कान पोरास देखील, गर्भाधानाचा सुखसोहळा पाहण्याविषयीं कासावीस झालेल्या आया, सास्वा, नणंदा, भावजया, जावा, व इतर स्त्रिया जबरीनें मदनपाशांत बद्ध करून टाकतात, हें आपण नित्य पहात असून, चवदा वर्षांच्या आंतील संभोगास जबरीचा संभोग म्हणावें, आणि त्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा न्हाणवलीच्या नवऱ्यास देण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटाला असावा; अशा अर्थाचें कलम पीनल कोडांत घालून द्या, अशी सरकारास पदर पसरून प्रार्थना करणारे किती हिंदु निघतील कोण जाणे! जे असें करण्यास तयार होणार असतील त्यानीं सरकाराकडे तरी जाण्याची काय गरज आहे? त्यांनीं चवदा वर्षांपर्यंत आपल्या मुलीचीं लग्नेंच करू नयेत किंवा तसें होणें शक्य नसल्यास तें वर्ष उलटतोपर्यंत निदान त्यांना त्यांच्या सासरीं तरी पाठवूं नये. पण तेंही न घडल्यास त्या अवधीच्या आंत, त्या आपल्या नवऱ्याच्या तावडींत न सांपडतील, अशाविषयीं तरी पक्का बंदोबस्त करावा म्हणजे झालें! पाहिजे त्या वयांत मुलीचीं लग्नें करण्याची चाल ज्या देशांत रूढ आहे, व जेथें ऋतुमती झालेल्या स्त्रीचें गर्भाधान करण्याचा धर्माचार व लोकाचार प्रचलित आहे, अशा देशांत चवदा वर्षांच्या आंत नवऱ्यानें ऋतुस्नान स्वस्त्रीशीं केलेल्या संभोगास जबरीचा संभोग म्हणावें, अशी सूचना कोणीं केली असतां, ती ऐकून वरच्या सारखा विनोद करण्याची प्रवृत्ति होणें स्वाभाविक नाही काय? पीनल कोडांत असें कलम घातल्यास तें केवळच 'मृताक्षर' होऊन बसणार नाहीं असें जे कित्येक लोक मनांतल्या मनांत म्हणत आहेत, ते आमचे ध्यानांत केव्हांच येऊन चुकलें आहे! ज्या मुली तेराव्या वर्षी ऋतुमती होऊन चवदाव्या

वर्षी गर्भवती किंवा अपत्यवती होतील, त्यांच्या नवऱ्यावर जबरीच्या संभोगाचे खटले करण्यास त्यांचीं अपत्यें बेमालूम पुरावा होतील, यांत शंका नाही! मात्र अशा प्रकारचे खटले करण्याचें श्रेय पोलिसांनें आपल्या शिरावर घेण्यास तयार झालें पाहिजे; कारण नुकत्याच अपत्यवती झालेल्या किंवा होण्याचीं चिन्हे दिसूं लागलेल्या मुलींच्या किंवा सुनांच्या नवऱ्यांवर जबरीच्या संभोगाच्या फिर्यादी लावणारे मुलींच्या सासरचे किंवा माहेरचे आप्त उत्सुक असतील, असें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां तो बोजा सर्व प्रकारें लोकांच्या नीतीचें व कायद्यांचे संरक्षण करण्यास नेमिलेल्या पोलिसाच्या डोक्यावर येऊन पडणार आहे. व तो उचलतांना भल्या गृहस्थांची अब्रू घेण्याची किंवा बेकायदेशीरपणें दोन पैसे मिळविण्याची त्यांस चांगली सवड होणार आहे! ही सत्यवती आणि अपत्यवती मुलींची व त्यांच्या नवऱ्यांची गोष्ट झाली. यांच्या संबंधाने न छापविण्यासारखा पुरावा पोलिसाच्या हातीं येण्याचा संभव असल्यामुळें असलीं दंपत्यें कोर्टापुढें खेंचून आणून त्यांपैकीं गुन्हेगारांस शिक्षा ठोठावतां येणार आहे, हें कबूल आहे. पण चवदाव्या वर्षापर्यंत, नहाण आले नसून किंवा तें आल्यावर, जे कच्चे किंवा पक्के युवे आपापल्या स्त्रियांशीं बिनबोभाट समागम करीत असतील, त्यांचा समाचार हें पोलिस कसा घेणार? नवरा केवढाही असला तरी नहाण आल्यावर पुमोनीसारखा त्याच्या स्त्रीचा परिणाम होण्याचा संभव नाहीं;व तो तितक्या विकोपास गेला नाहीं तर तो बाहेर येण्याचाही संभव नाहीं; व तो बाहेर आला नाहीं म्हणजे पोलिसाच्या हातून कांहींएक होणार नाहीं! पुमोनीच्या प्रकारासारखा प्रकार उघडकीस आला म्हणजे संताप येणें व कांहीं निर्बंध करावा, असें वाटणें वाजवी आहे पण तो करण्यापूर्वी त्यांचा उपयोग कितपत होणार आहे, हें शांतपणे पाहिलें पाहिजे. आपलें "फूल नाहीं तर फुलाची पाकळी" या न्यायानें विवाहकाल तर वाढवितां येतच नाहीं, तेव्हा जबरीच्या संभोगाची घालवेल तितकी दहशत घालून जेवढा फायदा होईल; तितक्यांतच समाधान मानून घ्यावयाचें असेल तर मग आमचें कांहींएक म्हणणें नाहीं. "माझ्या बायकोच्या वयास चवदावें वर्ष लागलें नसून, मी तिच्याकडे जाण्यास निघालों आहे, पण जर करतां माझी वासना मला आयत्या वेळी अनावर होऊन माझ्या हातून दुखापतीचा प्रकार घडला व तो बाहेर आला, तर मला दुखापत केल्याबद्दल शिक्षा न होतां जबरीचा संभोग केल्याबद्दल शिक्षा देऊन माझी सर्व जगभर बेअब्रू होणार आहे; तेव्हां तें चवदावें वर्ष लागेतोंपर्यंत त्या वाटेलाच जाऊं नये, हा उत्तम मार्ग," असा विचार करून जे अशा कर्मापासून पराङ्मुख होतील, ते या तुमच्या पीनल कोडांतील कलमाच्या भीतीनें तर झाले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण तुमच्या त्या कलमाचा असा परिणाम कोर्टीतून

एकावर तर होईल किंवा नाहीं, याचा संशय आहे! अशा कलमानें कोटि मुलींतून फार झालें तरी एका मुलीच्याच अब्रूचा व जीविताचा बचाव होणार आहे, यासाठीं तें कलम पीनल कोडांत घालूं नये असें आमचें म्हणणें नाहीं. खुशाल घालावें. पण त्यापासून किती उपयोग होणार आहे, हें नीट ध्यानांत आणून घालावें, म्हणजे तें घातलें गेल्यास आपण मोठी फुशारकी मिरविण्याजोगी किंवा कृतकृत्यता मानण्याजोगी सुधारणा केली, असा वृत्तींत गर्व उत्पन्न होणार नाहीं, व पुढें अजून विपत्तीचा पर्वत आहे; असें ध्यानांत वागेल. वारंवार होत काय असतें कीं, जी सुधारणा आपण हातीं घेतलेली असते, किंवा जिचें आपणांस मोठें महत्त्व वाटत असतें, ती घडून आली असतां बहुतेक विपत्ति नाहींशी होईल असा आपणास भ्रम होत असतो, व तसेंच यासंबंधानेंही होण्याचा फार संभव आहे. तसें न व्हावें, म्हणून पुनरुक्तीच्या दोषास न भितां, आम्हीं आणखी एक वेळ असा प्रश्न विचारतों कीं, वर निर्दिष्ट केलेला फेरफार पीनल कोडांत करून टाकला असें मानिलें, तरी आजमितीस जे लहान किंवा थोर नवरे आपापल्या चवदा वर्षांच्या आंतल्या नहाण आलेल्या किंवा न आलेल्या बायकांकडे बिनबोभाट जात आहेत, जे पूर्वी गेले व आपल्या मूर्खपणाचा परिणाम करून चुकले व जे येथून पुढें गुपचिपपणाने जातील, त्यांचा बंदोबस्त कसा करावयाचा? ज्यांना अतींद्रिय ज्ञान आहे, असे पोलिस पैदा झाल्याशिवाय, अशा प्रकारचें अपायकारक पण बिनबोभाट संभोग-जबरीचे संभोग- बंद करतां येणार नाहींत, किंवा कोर्टापुढें आणितां येणार नाहींत. असा प्रकारचे संभोग प्रतिदिवशीं हजारों होत आहेत, हें कोणत्याही सत्यशील हिंदूंस नाहीं म्हणतां येणार नाहीं. तेव्हां जर ते बंद व्हावे अशी खरोखर इच्छा असेल, तर या जबरीच्या संभोगाच्या सुधारलेल्या कलमावर फारसा भरंवसा ठेवण्यांत अर्थ नाहीं. ते बंद करण्यास निदान आम्हांस तरी एकच उपाय दिसतो, तो हा कीं, **विवाहकालाची मर्यादा वाढविणें. ही पाहिजे** तितकी वाढविण्यास आम्ही पाहिजे तसला कायदा करून घेण्यास तयार आहों; व ही वाढल्यानें आमच्या अनेक रोगांस उतार पडणार आहे, अशी आमची खातरी आहे. मुली बापाच्या घरी लग्नाआधी बरींच वर्षे राहिल्या, तर ममतेनें त्यांना शिक्षण देण्यास पुष्कळ अवधी सापडेल; प्रपंचाचें लगडें त्यांच्या पाठीमागें अल्प वयांत न लागल्यामुळें त्यांची वाढ चांगली होऊन पुढें त्यांचीं मुलें सुदृढ निपजतील; प्रपंचाचा भार त्यांस सहज वाहतां येईल; पुष्कळांच्या कपाळाचें वैधव्य टळेल; स्वयंवरपद्धति, गांधर्वविवाह, किंवा स्वाभिमतविवाह यांचा प्रघात हळूं हळूं पडूं लागेल; पुरुषांस साहसाचीं कामें करण्यास उमेद राहील; संतती अधिकाधिक कार्यक्षम निपजत जाईल; सर्वत्र उद्योग उत्साह यांची वृद्धि होईल- सारांश, ज्या

कारणांनीं ऐहिक संसारयात्रा सुखावह होते त्यांपैकीं बरींच कारणें या मंदभाग्य देशांत दिसू लागतील! पण हें सारें व्हावें कसें? पीनल कोडांतील जबरीच्या संभोगाच्या कलमांत फरक केल्यानें खचित नाहीं; केव्हां ना केव्हां तरी मुलींचीं लग्नें चवदापंधराच्या पुढें होऊं लागलीं पाहिजेत. हें होण्यास्तव आम्हीं धर्मबंधनाकडे दुर्लक्ष करण्यास, किंवा त्यांनीं आम्हांस आपल्या पोटांत घेण्यास तयार झालें पाहिजे! हें घडवून आणण्यांस साम आणि संग्राम असे दोन उपाय आहेत. सामानें हेतु सिद्ध होणार असेल तर वर्दळीस येण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सामाच्या बाजूनें प्रयत्न करण्यास आरंभ करणें म्हणजे निदान दहा वर्षांच्या आंत मुलीचीं आणि सोळा वर्षांच्या आत मुलांचीं लग्नें करण्याविषयीं कायद्याचा प्रतिबंध करून घेणें, व या शेवटच्या पायरीवरून पुढें निभेल त्या रीतीनें चढत जाणें, असें जें राजे सर टी. माधवराव यांचे म्हणणें आहे; तें आम्हांस प्रशस्त वाटतें. एवढेंही करण्यास जे तयार नसतील, ते कपटी समाजहितचिंतक किंवा मिथ्या सुधारक होत!

*

आमच्या स्त्रियांचा पेहराव

विशेष बदल न होतां ज्या अनेक गोष्टी आमच्या लोकांत पुरातन कालापासून चालत आल्या आहेत त्यांतच आमच्या स्त्रियांच्या पेहरावाची गणना करतां येईल, असें वाटतें. पूर्वीच्या ऋषिपत्न्या ज्या प्रकारचीं पातळें किंवा वल्कलें वापरीत आहेत, त्याच प्रकारचीं पातळें किंवा लुगडीं वानप्रस्थाश्रमाचें आचरण करणाऱ्या आमच्या गतभर्तृका वापरीत असत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. देशपरत्वें व जातिपरत्वें येथील स्त्रियांच्या पोषाखांत थोडाबहुत फरक आहे, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे. पण कोणत्याहि विवक्षित प्रांतांतील किंवा जातींतील स्त्रियांच्या वस्त्रांचा इतिहास पाहिला तर त्यांत विशेष अंतर पडलें आहे, असें दाखविणें फार कठिण होईल.

पोषाखांत वस्त्रें आणि अलंकार या दोहोंचा समावेश होतो. प्रस्तुत निबंधांत स्त्रियांच्या फक्त वस्त्रांचा विचार करण्याचा इरादा आहे.

या निबंधाच्या मथळ्यावरील शब्द वाचूनच कित्येकांचें पित्त खवळून जाईल, हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे. पण आम्हांस त्याची भीति कशाला पाहिजे? सुलतानी किंवा मोगलाई अंमल असता, आणि पथ्यकारक पण अप्रिय भाषण करणारास दंड होत असता, तर अशा प्रकारचे लेख लिहिण्यांत किती धाडस करावें, हा विचारणीय प्रश्न झाला असता. पण सांप्रत कालच्या उदार व सुधारलेल्या राज्यांत मतस्वातंत्र्याचा अलौकिक उपभोग आम्हांस मिळत असल्यामुळें, ज्यांनीं **सुधारक** हे नांव धारण केलें आहे त्यांनीं लोकापवादभयानें लोकांच्या आचरणांतील दोष न दाखविणें, व सुधारणेचे नवीन मार्ग न सुचविणें, हें भित्रेपणाचें काम होय. रूढ गोष्टींच्या चांगलेवाईटपणाचा यत्किंचित् विचार न करतां, त्या रूढ आहेत येवढ्यासाठींच त्यांचें मंडन करणे, आणि नवीन सुधारणा नवीन आहेत, येवढ्यासाठींच त्या सुचविणारावर तुटून पडणें, हें अविचारीपणाचे कृत्य कोणत्या देशांतील असमंजस व हट्टी लोकांच्या हातून घडत नाहीं? फेर म्हणून कोणत्याही गोष्टींत फेर करावा, असें आमचें म्हणणें नाहीं. पण जर कोणत्याही फेरापासून अधिक सुख होण्याचा संभव असेल, तर त्याच्या आड येणें यासारखें वेडेपण नाहीं. आज कित्येक वर्षे अव्याहत चालत आलेल्या

आमच्या स्त्रियांच्या पोषाखांत म्हणण्यासारखें दोषस्थल नाहीं, व असलें तरी तें काढून टाकण्यासारखें नाहीं, असें जर कोणी समाधानकारक रीतीनें सिद्ध करून देईल; तर आम्ही यासंबंधानें जे लिहिणार आहों, तें आनंदानें परत घेऊं. पण तसें न झाल्यास आम्ही ज्या सुधारणा सुचविणार आहों, त्या हळू हळूं अंमलांत आणण्याचा विचार लोकांनीं अवश्य केला पाहिजे.

प्रथम, स्त्रियांप्रमाणें पुरुषांचा पोषाख कायम राहिलेला नाहीं, हें अगोदर लक्षांत आणिलें पाहिजे. उद्योगाच्या, पदवीच्या व राजकर्त्यांच्या सोयीप्रमाणें पुरुषाच्या पेहरावांत फरक झाले आहेत व होत आहेत. आंगरखा आमचा नव्हे; मुसलमानांचा आहे, हें उघड आहे. तसेंच रामायणांतील किंवा महाभारतांतील योद्धे तुमान घालीत होते किंवा नाहीं, याची शंका आहे! श्रुतिस्मृतिकालांत किंवा पुराणकालांत निरनिराळ्या वर्गांतील स्त्री-पुरुषें कोणत्या प्रकारचीं वस्त्रें परिधान करीत होतीं व कोणत्या प्रकारच्या भूषणांनीं आपलीं शरीरें नटवीत होतीं, हें जर कोणी पुराणविद्याविद् साधार दाखवून देतील, तर त्यांनीं एक मोठी उपयुक्त कामगिरी बजावली असें खचित होणार आहे. पण जोंपर्यंत तशा प्रकारचा लेखक पुढें आला नाहीं तोंपर्यंत भरंवसा अनुमानांवरच ठेवणें भाग आहे; व हीं अनुमानें बहुश: खोटीं ठरण्याचा संभव नाहीं. कारण आमचा नाइलाज झाल्याखेरीज कोणत्याही गोष्टीत आपण होऊन फेरबदल करणारे आम्ही लोक नाहींत. हिंदुस्थानच्या सभोंवतीं उल्लंघन न करण्यासारखा खंदक किंवा भिंती असत्या, आणि दुसऱ्या कोणत्याही लोकांचा आणि आमचा संबंध न घडता, तर वेदकालापासून आतांपर्यंत व आतांपासून कालांतापर्यंत आम्ही जसेच्या तसेंच असतों, यांत काडीयेवढा संशय नाहीं. कारण विचारशक्ति असून विचारशक्ति नसलेल्या व केवळ उपजत बुद्धीच्या धोरणानें आचरण करणाऱ्या मनुष्येतर प्राण्यांप्रमाणें आमची वृत्ति आहे. आमच्या वस्त्रप्रावरणांत किंवा आचारविचारांत मधून मधून जे कांही फरक झाले आहेत, ते दुसऱ्या लोकांचें आमच्याशीं संघटन झाल्यामुळें झाले आहेत; व सध्यां जे होत आहेत तेही त्याच कारणामुळें होत आहेत. आम्ही म्हणजे अमुक एक गोष्ट चांगली नाहीं, असें आपण होऊन ठरवून ती रद्द केली आहे, आणि तिच्या जागीं दुसरी कोणती तरी करूं लागलों आहों, असे सहसा आढळणार नाहीं; असो.

स्त्रियांच्या पेहरावाचा विचार करतांना उपयुक्तता आणि दर्शनीयता हे दोन गुण डोळ्यांपुढें ठेविले पाहिजेत. तसें न केलें तर त्यावरील टीकेंत अनेक प्रमाद होणार आहेत. उपयुक्ततेच्या दृष्टीनें पहाता निरनिराळ्या धंद्यांतील स्त्रियांचे पोषाक निरनिराळ्या तऱ्हांचे पाहिजे आहेत, हें उघड आहे. पण ही गोष्ट आजपर्यंत

कोणाच्याही लक्षांत आली नाहीं, असें वाटतें. भंगीण, सुतारीण, कासारीण, परटीण, शेतकरीण, स्वयंपाकीण, दळपीण, कांडपीण, गौळण, कुंभारीण, भटीण—सारांश, ईणप्रत्ययांत पाहिजे ती धंदेवालीण घ्या, 'लुगडेचोळी' हा साऱ्यांचा, साऱ्या ऋतूंतला व सार्वकालिक पोषाख! यांत कोणी कोणी अल्पस्वल्प फेरफार करतात, पण त्यास फेरफार म्हणावे की काय, हें आम्हांस समजत नाही. कित्येक प्रांतातील खालच्या प्रतीच्या बायका चोळया मुळींच घालीत नाहीत, हा एक फेरफार आहे! तसेच कित्येक प्रांतांतील कुणब्यांच्या बायका कासोटा मुळीच घालीत नाहींत, हा दुसरा एक फेरफार आहे! पण या किंवा अशा प्रकारच्या इतर फेरफारांस फेरफार म्हणणें म्हणजे मिठांत तिखट व तिखटांत मीठ घातल्यानें नवीन तोंडीलावणे झालें, असे म्हणण्यासारखें होय! पोषाख असा असावा की, जो घातला असतां कोणतेंही काम करतांना हस्तपादादि अवयवाचे चलनादि व्यापार सहज होऊन, शरीरास कोणत्याही प्रकारचे कष्ट होऊं नयेत, किंवा त्यांत वैरूप्यता दिसूं नये. जो पोषाख क्षणोक्षणीं सावरला नाहीं, तर ज्यापासून हाती घेतलेल्या कामांत वारंवार हरकत होणार किंवा शरीर उघडें पडणार, असा पोषाख काय कामाचा? स्त्रीची मान आणि कंबर यांमधील मागला पुढला भाग नीटपणें झाकला जाऊन, कोपरापासून त्यांचे दोनही हात पाहिजे तें काम करण्यास हवे तिकडे फिरवितां येण्यासारखे असावें, या गोष्टीस बहुधा कोणीही 'ना' म्हणणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. हें जर खरें असेल तर आम्ही आपल्या वाचकांस व इतरांस त्यांच्या गळयाची शपथ घालून असे विचारतो कीं, हात सव्वाहात खणाची चोळी आणि डाव्या खांद्यावरून उजव्या खाद्यावर अथवा उजव्या खांद्यावरून डाव्या खांद्यावर घेतलेल्या पदरानें हें काम होण्यासारखें आहे काय? आपल्या बायकांचा पदर सावरण्यांत किती वेळ जातो, व तो वरचेवर अंगावरून सरत असल्यामुळें त्यांना किती त्रास पडतो, हें ज्यांच्या पाहण्यांत आलें असेल, त्यांच्याने वरील प्रश्नास 'हो' म्हणवणार नाहीं असा आमचा समज आहे. ही, चोळीलुगडें वापरण्याचा ज्यांना अधिकार आहे; अशा सभर्तृकांची गोष्ट झाली. पण आमच्या गतभर्तृकांची स्थिती याहूनही विशेष शोचनीय आहे. त्यांच्या पदराला चोळीचें सुद्धां पाठबळ नाहीं! त्यानें दगा दिला कीं, त्या उघड्या पडल्याच! शिवाय, गतभर्तृकांच्या पदरास त्यांचें डोकें झांकून ठेवण्याचें आणखी एक फाजील काम असतें! यासंबंधानें या हतभाग्य स्त्रिया एकसारख्या कांचणींत असतात, असें म्हटलें तरी चालेल. आपल्या अंगाचा पाहिजे तो भाग उघडा पडला तरी हरकत नाहीं, पण आपलें डोकें उघडे पडतां कामा नये, कारण तें उघडें पडलें असतां आपल्या छलकांचा निर्दयपणा व आपल्या धर्माचा अधर्मीपणा उघडा पडेल,

अशी भीती त्यांच्या मनांत सर्वकाळ वागत असते. यामुळें अडचणीच्या वेळीं अशा स्त्रियांच्या पाठी दिसतात, पण डोकीं कधींही दिसत नाहींत. यासंबंधानें परवां आम्ही एक मित्राशीं बोलत असतां, त्याचें असें म्हणणें पडलें कीं, गतभर्तृकांच्या केशकलापावर न्हाव्यांची लोखंडी फणी चालू न देण्याचें सामर्थ्य आम्हांस येईल तेव्हां येवो, पण तें येईतोंपर्यंत त्यांना तेवढ्या चोळ्या घालूं देण्याचा प्रघात जरी पडला, तरी देखील त्यांची पुष्कळ दैना वांचणार आहे.

आतां कोणी असें म्हणतील कीं, लुगड्याचा पदर उर:स्थलावर मोकळा खेळूं दिल्यानें त्यास ज्या सुरकुत्या पडतात, त्यामुळें युरोपिअन स्त्रियांच्या वक्ष:स्थलांप्रमाणें आमच्या स्त्रियांचीं वक्ष:स्थलें उठून दिसत नाहींत, आणि हा या ढिल्या पदरापासून होण्या एक मोठा फायदा आहे; तसेंच, ज्या वेळेस स्त्रियांना आपले दोनही हात विशेष रीतीनें अव्यापृत ठेवण्याची गरज असते, त्या वेळेस त्या आपले पदर एका खांद्यावरून मागें नेऊन दुसऱ्या हाताखालून पुढें आणितात. आणि डाव्या बाजूस त्यांचें शेवट घट्ट खोंचून ठेवतात. यावर आमचे असें म्हणणें आहे कीं, कोणत्याही कारणाने स्त्रियांचीं वक्ष:स्थलें उठून दिसणें हा आमच्यांत मर्यादेचा गौण प्रकार मानिला असता तर कांडतांना, न्हाऊं घालतांना, मोठमोठ्या मेजवान्यांत वाढतांना किंवा अशाच प्रकारच्या इतर प्रसंगी आमच्या स्त्रियांची जी नीटनेटकी व ठाकठीक आकृति दिसते, ती आम्हांस कधींच रुचली नसती! तसेंच, मोठमोठ्या भारतीय कवींनीं आर्यमहिलांच्या उरोजविस्तारांची केलेलीं असंख्य वर्णनें आम्हीं मिटक्या मारीत कधींच वाचलीं नसतीं! तेव्हां या बाबतींत युरोपिअन लोकांत व आम्हांत रुच्यंतर नाहीं, हें उघड आहे. तथापि, स्त्रियांचे हे प्रांत अस्पष्ट असणें हेच उत्कृष्ट शिष्टसंप्रदायास उचित आहे असें मानिलें, तरी पदराच्या सुरकुत्यांचें घसरतें 'हाफजाकिट' बनविण्यापेक्षां, चोळी न घालतां किंवा घरच्या घरी तयार केलेलें प्रत्यक्ष हाफजाकिट घालण्यास काय हरकत आहे? हीं हाफजाकिटें दोन प्रकारचीं असावीं, एक काम करतांना घालण्याचीं, व दुसरीं बाहेर जातांना घालण्याचीं. बाहेर जातांना घालावयाच्या जाकिटांच्या अस्तन्या बऱ्याच लांब असाव्या, आणि त्यांचा रंग बहुधा लुगड्यांच्या रंगासारखा असून, त्यांचीं शेवटें लुगड्यावर पडावीं. पण यासंबंधानें कदाचित् मतभेद होण्याचा संभव आहे! जाकिटें घालण्याचा प्रघात पडल्यावर, पदर काढण्याची मुळींच गरज पडणार नाहीं, व त्यामानानें लुगड्यांची लांबी कमी केली तरी हरकत नाहीं. लुगड्यांच्या पदरांवरील नकशीचें काम कमरेसभोंवतीं खुलेल अशा रीतीनें दाखवितां येणार आहे. खोटा देशाभिमान एकीकडे ठेऊन चोळीपदराच्या जागीं, किंवा चोळीच्या वरतीं ही जाकिट घालण्याची पद्धत पाडिली असता अनेक फायदे होणार आहेत.

पदर सांवरण्याचें काम वारंवार हातांनीं न करावें लागल्यामुळें ते मोकळे राहून स्त्रियांच्या अंगीं कार्यक्षमता अधिक येईल; कमरेवरील त्यांचा कोणताही भाग उघडा पडण्याची भीति राहणार नाही; थंडीच्या दिवसांत चौघडीचें अवजड पांघरून घेण्यापेक्षां, फलाणीची बंडी घातल्यानें पाठीच्या व पोटाच्या हाडांतील ऊब सहज राखतां येणार आहे. लुगड्याच्या पदरापेक्षां जाकिटावर हरतऱ्हेच्या नकशीचें काम करून, तें सुलभ रीतीनें दाखवितां येणार आहे. पण या सर्वाहून मोठा फायदा हा आहे कीं, बायकांच्या गळ्यांतले एकूणएक दागिने घटवेकऱ्यांच्या कसबासकट मागेंपुढें सबंध दाखवितां येऊन, दुसऱ्यांनीं आपणास श्रीमंत म्हणावें, आणि आपलें स्वरूप खुलून दिसावें, हा जो दागिने घालण्याचा मुख्य उद्देश; तो पूर्णपणे सफल होईल! सध्यांच्या पदरामुळें आमच्या बायकांच्या गळ्यांतील दागिन्यांचा जेवढा भाग उजवा खांदा आणि मान यांच्या दरम्यान दिसतो, तेवढ्यांतच आम्हांस आपले समाधान करून घ्यावें लागतें! पण यापुढें जाकिटें घालण्याचा प्रचार पडल्यास, टिका, तुशा, सरी पुतळ्यांच्या माळा, कंठा, तन्मणी, पेट्या, चंद्रहार वगैरे अलंकारानीं आमच्या प्रियकरणींची वक्ष:स्थलें मंडित होऊन आतांपेक्षां शेंकडोपट आल्हादजनक होतील, यांत काय संशय आहे? तसेंच खुद्द जाकिटेंही ताप्त्याची, मखमालीची, किंवा अशाच एखाद्या उंची कपड्याची करून, त्यांच्या अस्तन्यांवर व पुढील भागावर जरीच्या किंवा रेशमाच्या वेलबुट्टीचें कारागिरीचें काम केलें तर त्यानें दागिन्यांची शोभा दुणावेल, किंवा त्यांच्या अभावीं तेंच काम अत्यंत शोभादायक होईल! बोलून चालून नटण्याचें काम सर्व लोकांनीं स्त्रियांकडे सोपविलें आहे. तेव्हां जोंपर्यंत हें त्यांना व आम्हांस संमत असेल तोंपर्यंत त्यांचें लावण्य जितक्या थोड्या खर्चांत त्यांना जितकें अधिक सुखावह व आमच्या दृष्टीस जितकें अधिक रमणीय होईल, तितकें करणें हेंच आमच्या प्रबुद्धत्वास उचित आहे. यावरून कोणीं असें समजूं नये कीं, मडमांचा पोषाख आम्हांस मान्य आहे, व त्याचें अनुकरण आमच्या स्त्रियांनीं करावें, असें आम्ही सुचवीत आहों. मडमांच्या पेहरावाचा बराच भाग, विशेषत: त्यांचा झगा आम्हांस बिलकुल पसंत नाहीं. तथापि त्यासंबंधानें व आमच्या स्त्रियांच्या पोषाखाच्या इतर भागांच्या संबंधानें आजच लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

*

आमच्या स्त्रियांचा पेहराव

नंबर २

मागल्या लेखांत आमच्या स्त्रियांच्या पदराविषयीं चर्चा करून तो आम्ही नापसंत ठरविला आहे, व त्याचे जागीं जाकिट घालण्याचा प्रघात पडेल तर फार बरें होईल, अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. आतां आमच्या स्त्रियांच्या पोषाखाच्या इतर भागांविषयीं विचार करून, सवड असल्यास दागिन्यांचाही थोडा विचार करावयाचा, असा इरादा आहे.

पदर लुगड्याचा काढतात; तेव्हां पदरानंतर स्वाभाविकपणें लुगड्याचा विचार करणें जरूर आहे. हें आमचें लुगडें आम्हांस पूर्ण संमत आहे. याच्या जागीं लहंगा, परकर, झगा किंवा दुसरें कोणतेंही अधोवस्त्र वापरण्याचा प्रघात पडावा, असें आम्हांस वाटत नाहीं. हें आमचें लुगडें दिसण्यास व शोभेस जितकें चांगलें असावें, तितकें आहे. शिवाय, त्यापासून दुसरा असा एक फायदा आहे कीं, हें नेसण्यास मुळींच पंचाईत पडत नाहीं. एक लुगडें सोडून दुसरें लुगडें नेसणें ही गोष्ट आमच्या स्त्रियांस शरीराचा कोणताही भाग उघडा पडूं न देतां पाहिजे तेथें करतां येण्यासारखी आहे. झग्याची व इतर अधोवस्त्रांची तशी गोष्ट नाहीं. तसलीं वस्त्रें वापरण्यास स्त्रियांना एकांतस्थलीं जावें लागतें. झगे वापरणाऱ्या स्त्रियांस आमच्या स्त्रियांप्रमाणें नदीच्या काठी, लग्नमंडपांत किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं स्त्रीपुरुषांच्या समक्ष वस्त्रांतर करतां येत नाहीं; कोणताही पोषाख असा असावा कीं, तो वापरणाराच्या ताब्यांत असावा; वापरणाराला त्याचें गुलामपण काढण्यास न लागावें. या दृष्टीनें युरोपियन स्त्रियांच्या झग्याहून गैरसोईचें वस्त्र शोधून काढूं म्हटल्यास सांपडावयाचें नाहीं. आमच्या कलावंतिणींचे झगे किंवा मारवाडणींचे लहंगे याच धर्तीचे आहेत; पण ते त्यांपेक्षां पुष्कळ बरे. युरोपीय स्त्रियांच्या झग्यांस फाजील कापड लागून हिंडण्याफिरण्यास त्यांना मोठा त्रास पडतो. थोडेसें झपाट्यानें चालावयाचें म्हटलें, किंवा ज्या जमिनीवरून चालावयाचें ती साफ नसली कीं, हे झगे एका हातानें किंवा दोन हातांनीं वर सांवरून धरावे लागतात! जों जों श्रीमंती अधिक तों तों या झग्याचा विस्तार

मोठा! साऱ्या मडमा आपापले झगे वर उचलून न धरतां जमिनीवर पडूं देतील, तर घरांत व रस्त्यांवर केरसुण्यांचें काम फारसें पडणार नाहीं. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील बहुतेक खेड्यांतल्या भंग्यांचें काम कुत्रीं करतात, त्याप्रमाणें युरोप खंडांतल्या झाडूंचें काम या झग्यांच्या फरपटण्यानें होऊं लागेल! शिवाय, एक झगेवाली स्त्री यथास्थितपणें बसावयाची म्हणजे तिला किती तरी जागा लागते! पुरुष हा उद्धट प्राणी आहे, तेव्हां त्याला होईल तितक्या दूर अंतरावर ठेवावें, अशा बुद्धीनें तर पाश्चिमात्य स्त्रियांनीं या लहानशा कापडी कोटांत आपणांस कोंडून घेण्याचा प्रघात पाडला नसेल ना? एकंदरींत स्त्रियांनी इतकी जागा अडवावी, हें आम्हास बरें दिसत नाहीं. परंतु युरोपिअन लोक आम्हांहून स्त्रियांस विशेष मान देणारे व भजणारे आहेत; तेव्हां कदाचित् त्यांनीं जाणूनबुजून त्यांचा या कामांत वरचष्मा होऊं दिला असेल! किंवा बाहेरून दिसण्यांत ''आम्ही तुम्हांस अधिक जागा व्यापूं देतों; म्हणून स्वत:पेक्षां आमचें तुम्हावर विशेष प्रेम आहे.'' असें त्यांस आमिष दाखवून सर्वकाळ त्या आपल्या ताब्यांत राहण्यासाठीं त्यानीं, ही त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याची तर युक्ति काढली नसेल ना? आम्ही असें ऐकतों कीं, या झग्यांचा त्रास त्यांच्या विस्तारानेच संपत नाहीं. त्याच्या आंत चोळण्यासारखें किंवा चड्डीसारखें दुसरें एक वस्त्र वापरण्याची सभ्य स्त्रियांची चाल आहे. असें असले तर मग फारच त्रास! अशा स्त्रियांना वस्त्रांतर करतांना केवढा अट्टाहास करावा लागत असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी आणि येवढें कशासाठीं, तर कंबर बारीक दिसावी म्हणून! आमच्याप्रमाणे युरोपिअन लोकांतही सिंहकटीचे मोठें महत्त्व आहे. पण आम्ही ती दाखविण्यासाठीं विशेष खटपट करीत नाहीं. युरोपियन लोकांत जी जात्या मृदंगकटी असेल तिला देखील सिंहकटी दाखविण्याचे अनेक उपाय काढले आहेत, असे म्हणतात! कमरेखालीं झगे फुगविण्यासाठीं व कमरेचा परिध जेवढा लहान होईल तेवढा करण्यासाठीं, कमरेभोवती कित्येक स्त्रिया लोखंडाचा पट्टा करकचून आंवळतात, असें सांगतात! हें खरे असेल तर लोहबंधनामुळे कोठा आणि कूस यांच्यावर दाब पडून, अन्नपचन होण्यास व गर्भाचें संवर्धन होण्यास अडथळा होत असेल, व सुइणीच्या मदतीशिवाय प्रसूत होणें फार कठिण पडत असेल. खेरीज नेहमी नेहमीं कंबर फारच आंवळली तर कुबड निघण्याचा संभव असतो, हें एक निराळेंच अरिष्ट! तसेंच या झगेदार बायकांस पुरुषांप्रमाणें किंवा आमच्या स्त्रियांप्रमाणें दोहोंकडे दोन पाय सोडून घोड्यावर बसतां येणें बहुतेक अशक्य असल्यामुळें, एकाच बाजूस दोनही पाय सोडून बसण्यासारखीं खोगरें तयार करणें त्या लोकांस भाग पडलें! या खोगरांस साइड सॅडल्स असें म्हणतात. या खोगरावर बसण्यास

शिकणें म्हणजे एका प्रकारची बिकट कसरत करण्यास शिकण्यासारखेंच आहे! या प्रकारच्या आरोहणापासून घोडा व बसणारीण या उभयतांसही मोठा त्रास पडत असेल, असा आमचा तर्क आहे. खरें काय असेल तें त्या मडमांच्या व घोड्यांच्या जीवाला ठाऊक! एकंदरींत, हा झगा आमच्या स्त्रियांच्या बिलकुल कामाचा नाहीं, असें आम्हांस वाटतें. तसेंच, युरोपिअन स्त्रियांत जाकिटें घालण्याची चाल जरी रूढ आहे, तरी विशेष थाटाच्या प्रसंगी त्या ज्या प्रकारचीं जाकिटें वापरतात, तींही आम्हांस नको आहेत. ऐन थंडीच्या दिवसांत रात्रीच्या प्रसंगी उर:स्थलाचा बराच भाग व खांद्याखालचा हातांचा बराच भाग अनावृत्त ठेवण्यांत काय सुख किंवा मौज आहे, हें आम्हांस समजत नाहीं. या प्रचारामुळें थंडीच्या दिवसांत तिकडील स्त्रियांस मोठे क्लेश होतात, व कधींकधीं त्यांना त्यापासून शीतविकार जडतात, असें आम्ही ऐकतों. असें असून शेंकडों शतकें हा प्रघात तिकडे रूढ असेल तर 'बलवान लोकाचारा, तुला साष्टांग नमस्कार असो,'' याशिवाय दुसरें काय म्हणावें? तात्पर्य, युरोपखंडांतील लोकांनीं आपल्या स्त्रियांच्या पाठीमागें जो पोषाख लाविला आहे, त्यांत त्यांनीं त्यांच्या सुखाकडे किंवा सोईकडे न पाहतां, त्या आपल्या नजरेस खूप मौजेच्या कशा दिसतील येवढ्याच गोष्टीचा विचार केला असावा असें दिसतें. नाहीं तर इतका बोजड किंवा अवजड पेहराव ते कधींही मान्य न करते. सामान्यपणें आम्हीं आपल्या पाषाणाच्या देव्यांस ज्याप्रमाणें सजवितों, त्याप्रमाणें ते आपल्या स्त्रियांस सजवितात, असें वाटतें. गंगा, लक्ष्मी, अंबिका वगैरे देवतांच्या मूर्तीचे पोषाख बांधावयाचे आहेत असें आम्ही म्हणतों, व ते बांधण्यांत पदराचा झोळ, निऱ्यांची गर्दी, चापचोपी वगैरे गोष्टींकडे आम्ही जितकें लक्ष देतों, तितक्या या चालत्याबोलत्या मडमा आपल्या पेहरावाकडे देत असाव्या, आणि तसें करणं त्यांच्या पुरुषांच्या आग्रहामुळें त्यांस भाग पडत असावें, असें आमचें अनुमान आहे.

युरोपिअन स्त्रियांच्या पोषाखावर वास्तविक पाहतां येथें इतकी टीका करीत बसण्याची गरज नव्हती. पण अलीकडे ''आपलें तें सारें चांगलें'' असें प्रतिपादणाऱ्या कित्येक आग्रही व अविचारी लोकांनीं सत्यास पराङ्मुख होऊन, ''सुधारकमंडळीस जेवढें भारतीय तेवढें ओंगळ वाटतें, व जेवढें पाश्चात्य तेवढें अनुकरणीय वाटतें'' असा जो पुकारा रात्रंदिवस चालविला आहे, तो किती मिथ्या आहे, हें अनेक उदाहरणांपैकीं एका उदाहरणानें वाचकांच्या नजरेस आणण्यासाठीं आम्हीं हें यत्किंचित् विषयांतर करण्यास प्रवृत्त झालों. बाकी, युरोपिअन लोकांवर या टीकेचा कांहींएक परिणाम होण्याचा संभव नाहीं, हें आम्हीं पक्कें जाणून आहों. कारण, ज्या लोकांस जो पोषाख मानवलेला असतो, व ज्याच्याशी त्यांच्या

सुरेखपणाच्या कल्पना खिळून गेलेल्या असतात, ते दुसऱ्या लोकांच्या टीकांनीं त्यांत फेरबदल करण्यास कधींही राजी होत नाहींत. शिवाय, त्यांच्या पोषाखांत ज्या गैरसोई आहेत त्या त्यांच्यापैकींच कांहींच्या नजरेस येऊं लागल्या आहेत, व त्या आपल्या लोकांच्या नजरेस आणण्यास तिकडील टीकाकार हवे तितके खबरदार आहेत! त्यांना आमच्या मदतीची बिलकुल गरज नाहीं. तथापि येथें येवढें म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, युरोपिअन स्त्रिया आपला झगा टाकून देऊन आमच्या स्त्रियांच्या लुगड्यासारखें एखादें वस्त्र वापरूं लागतील, तर त्यांचा पोषाख कमी खर्चाचा आणि कमी त्रासाचा होईल. इतकेंच नाहीं, तर सौंदर्य व सुख या कल्पनांत साऱ्या मनुष्यतेस पसंत पडेल असा कांहीं भाग असेल तर त्याकडे त्यांची थोड्याबहुत प्रमाणानें प्रवृत्ति झाली असें होऊन, इतर खंडांतील लोकांच्या, व कदाचित् युरोपखंडांतील लोकांच्याही दृष्टीस, त्या आतांहून रमणीय वाटूं लागण्याचा संभव आहे.

येथपर्यंत आमच्या स्त्रियांच्या चोळीलुगड्याचा विचार झाला; आणि हाच मुख्य महत्त्वाचा होता. आतां थोडा वेळ त्यांच्या डोक्याकडे आणि पायांकडे पाहूं म्हणजे झालें. आमच्या साहेबलोकांच्या मडमांप्रमाणें आमच्या बायकांच्या डोक्यांवर शिप्तरी टोप्या चढविण्याची कांहीएक गरज नाहीं. तथापि उन्हांत पावसांत, किंवा वाऱ्यांत जातांना त्यांच्या डोक्यास कांहींतरी शिरस्त्राण घालण्याची चाल पडेल, तर बरें होणार आहे. सध्यां पदराशिवाय दुसरें कांहींही असत नाहीं. फारच झाले तर पदरावर शालजोडी किंवा शेला घेण्यांत येतो. पण सर्वांचें पर्यवसान हात आडवून ठेवणें आणि सर्व शरीर एखाद्या उंच कापडाच्या पोत्यांत गुंडाळण्यासारखें करणें- अशावर होतें. हें कांहीं प्रशस्त नाहीं. बुरखा घेण्याचे दिवस गेले. ऊन व पाऊस यांपासून संरक्षण करण्याचा जो सामान्य उपाय तो आम्हीं स्त्रियांस करूं देत नाहीं, ही मोठ्या शरमेची गोष्ट होय. आम्ही धट्ट्याकट्ट्या पुरुषांनीं काश्मिरी चोगे घालावे. बूटस्टॉकिंग्स चढवावे, कानास रुमाल गुंडाळावे किंवा पागोट्यावरून कानपट्ट्या बांधाव्या, सकलादीच्या टोप्या घ्याव्या, आणि या सर्वांच्यावर छत्र धरावें, आणि त्या बिचाऱ्या अबलांनीं भर पावसांत एखाद्या चौघडीनिशीं किंवा शालजोडीनिशीं अथवा नुसत्या पदरावरच रस्त्यानें अनवाणी भिजत जावें, ही आम्हांस मर्यादेची अमानुष कल्पना वाटते. उन्हांत व पावसांत स्त्रियांनीं छत्री वापरण्यास आम्हांस बिलकुल हरकत दिसत नाहीं. तसेंच त्यांस घरांतील स्वच्छ जमिनीशिवाय दुसऱ्या कोठेंही चालण्याची संवय नसल्यामुळें, उन्हानें तापलेल्या किंवा पाण्यानें किंवा थंडीनें गारठलेल्या जमिनीवरून चालतांना त्यांना पराकाष्ठेचे क्लेश होऊन, कधीं कधीं उष्णाचे आणि थंडीचे विकार होतात.

हे टाळण्यासाठीं सर्व स्त्रियांनीं घराबाहेर पडतांना जोडे वापरण्यास काय हरकत आहे, हें आम्हांस समजत नाहीं. तसेंच, मोठ्या थंडीत प्रवास करावयाचा असल्यास, त्यांनीं हातमोजे व पायमोजे घालण्यास आणि घोड्यावर बसावयाचें असल्यास किंवा लांबीची मजल मारावयाची असल्यास, मऊ कातड्याचे बूट घालण्यास आम्हीं त्यांस अडथळा कां करावा, हें सांगतां येणें फार कठिण आहे. पण **शास्त्रात् रूढिर्बलीयसी** या न्यायाचे आम्हीं सारे गुलाम होऊन गेलों आहों. लोकांच्या कानाशीं कटकट करतां करतां हिच्या शृंखला झुगारून देऊन, जो मार्ग सुखावह व सुगम असेल त्यानें जाण्याचें धैर्य ज्या दिवशीं आमच्या अंगीं येऊं लागेल; तो सुदिन म्हणावयाचा. कोणीं कांहीं केलें व म्हटलें तरी तो एकदां येणार आहे, याविषयीं आम्हांस शंका नाहीं. अविचाराच्या व दुराग्रहाच्या प्रत्यवायामुळें तो थोडासा दुरावणार आहे, येवढेंच काय तें!

*

अलंकारमीमांसा

मनुष्यांच्या हातून ज्या अनेक असंबद्ध किंवा परस्परविरोधी गोष्टी होत असतात, त्यांतच अलंकारांचा समावेश करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. बोलण्यांत साधेपणाची तारीफ करीत नाहीं, असा कोण आहे? तथापि मौल्यवान वस्त्रें परिधान करून, व जेथल्या तेथें नानाप्रकारचे अलंकार चढवून ठुमकत जाणारी तरुण रमणी नेत्रपथांत आली असतां, ज्यानें अभिलाषपूर्वक तिजकडे पाहिलें नाहीं, किंवा पाहून ज्याचा अंतरात्मा क्षणभर आनंदित झाला नाहीं, असा कोण पुरुष आहे? दागिन्यांत कांहीं अर्थ नाहीं; दागिने घालण्यासाठीं नाकाला, ओठाला, कानाला भोंकें पाडणें हा रानटीपणा होय; दागिन्यामुळें चोरांपासून त्रास होतो; लहान मुलांच्या अंगावर सोनें घातल्यानें त्यांच्या जिवास अपाय घडतो; दागिन्यांत पैसे अडवून ठेवल्यानें देशांतील उत्पादक भांडवलापासून व्हावा तितका फायदा होत नाहीं- वगैरे पोकळ वेदांताच्या गप्पांत आम्हांस बिलकुल हांशील वाटत नाहीं. दागिने घालावयाचे नाहींत, चांगलीं वस्त्रें वापरावयाचीं नाहींत, सुग्रास अन्न खावयाचें नाहीं. सुरेख घरांत राहावयाचें नाहीं, तर करावयाचें तरी काय? सकाळपासून संध्याकाळपर्यंत जे कष्ट करावयाचे ते ओलीकोरडी भाकर, जाडाभरडा कपडा आणि थंडीवाऱ्याचें निवारण होण्यासारखें एखादें मजबूत खोपट, यासाठींच काय? यावर कोणी असें उत्तर देतील की, कोणतीही गोष्ट फाजील करूं नये. फाजीलपणापासून नुकसान आहे. पण यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं, या उपदेशाची विशेष गरज नाहीं. एखादा मनुष्य अत्यंत उपयोगी वस्तूंकडे दुर्लक्ष करून, अलंकारांकडे आपली सर्व प्राप्ती लावीत असला, म्हणून अलंकार घालण्याच्या पद्धतीवर चाल करून जाणें अगदीं अप्रशस्त आहे. सर्व ठिकाणचे रानटी लोक, सुधारलेल्या राष्ट्रांतील सर्व अज्ञान लोक, सुशिक्षित कुटुंबांतील स्त्रिया व मुलें - या साऱ्यांस अलंकारांची मोठी हौस असते, हें अल्प अवलोकनावरून दिसून येणार आहे. उतार वय झालेल्या कांहीं मोठमोठ्या व विचारी विद्वानांस मात्र प्रत्यक्ष आपल्या अंगावर अलंकार घालण्यांत मोठीशी हौस वाटत नाहीं. तेव्हां जी गोष्ट अनादिकालापासून सर्व प्रकारच्या, सर्व स्थितींतल्या व सर्व वयांच्या स्त्रीपुरुषांस कमी अधिक प्रमाणानें प्रिय होऊन बसली आहे, तींत

कांहीं तात्पर्य नाहीं, असें म्हणणें व तिच्यापासून जे क्वचित अनर्थ घडतात ते न घडण्यासाठीं ती अजिबात टाकून द्या, असा मंत्रोपदेश करीत सुटणें म्हणजे मनुष्यस्वभावाचें आणि मनुष्यसुधारणेचें पूर्ण अज्ञान प्रकट करण्यासारखें होय. कोणी काय पाहिजे ते म्हणो, अलंकारांची हौस समूळ नाहींशी होण्याचा संभव नाहीं. एका प्रकारचे अलंकार नाहीसें केलें तर दुसऱ्या प्रकारचे अस्तित्वांत येतील. उच्च धातू वापरण्याचा प्रघात कमी झाल्यास लत्ताकपड्यावर अधिक खर्च होऊं लागेल; व दोहोंच्याही फेऱ्यांतून सुटलों तरी घरांवर, घोड्यांवर, नोकरांवर, किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्या तरी ताब्यांतल्या वस्तूंवर अलंकार व वस्त्रें चढवून त्या आपल्या सभोंवतीं ठेवण्यांत व त्यांकडे पाहण्यांत मनुष्यांना आनंद वाटत राहील.

ज्याच्या योगानें वस्तूचें रूप विशेष खुलल्यासारखें वाटतें, त्यास आपण अलंकार असें म्हणतों. या व्याख्येप्रमाणें शोभा देणाऱ्या प्रत्येक वस्तूची अलंकारांतच गणना केली पाहिजे. पण प्रस्तुत लेखांत अलंकारांची थोडी मर्यादित व्याख्या करणें जरूर आहे; नाहीं तर विषयप्रतिपादनाची मोठी पंचाईत पडेल. मूळचें स्वरूप अधिक चांगलें दिसण्यासाठीं मौल्यवान् धातूंच्या व पाषाणांच्या ज्या नानातऱ्हेच्या चिजा स्त्रीपुरुषें अंगावर घालतात, त्यांसच येथें अलंकार असें समजून त्याविषयीं थोडी चर्चा करूं.

अलंकारांपासून स्वाभाविक सौंदर्याच्या मोहकपणांत भर पडते, असा सर्वांचा अनुभव आहे. प्रत्येक पाश्चिमात्य व पौर्वात्य कवींनीं नग्नसौंदर्याची मोठी प्रशंसा केली आहे. पण सध्यां आमचीं जीं मनें आहेत त्यांनीं वस्त्ररहित आणि अलंकाररहित अशा अत्यंत लावण्यवती स्त्रीचें किंवा सुंदर पुरुषाचें रूप डोळ्यापुढें आणण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना तें रूप हिडिस वाटतें! "नष्टनंदनवनांतील" लतामंडपांतल्या पुष्पशय्येवर विलास करतांना, मनुष्यांच्या आद्यमातेस आपल्या पतीचें नग्नसौंदर्य पाहून काय वाटलें असेल तें असो, किंवा मनुष्यांच्या आद्य पूर्वजास आपल्याच हाडामांसापासून निर्माण केलेल्या नग्न रमणीस दृढालिंगन देतांना काय आनंद झाला असेल तो असो; आतांच्या मनास नग्न स्त्री-पुरुषांची कल्पना ओंगळ वाटते, आणि नग्नसौंदर्याच्या मनोहारित्त्वाविषयीं कोणी केवढ्याही थापा मारल्या, तरी ॲडॅम ईव्ह यांचें अनुकरण करण्यास अर्वाचीन माणसें कधींही तयार होणार नाहींत. अलंकारांविषयीं लोकांचीं मतें स्थिर नाहींत व सारखीं नाहींत, हें कबूल आहे. देशकालाप्रमाणें त्यांत फरक असतो व होत जातो. तिसऱ्या किंवा चौथ्या शतकांतील दागिन्यांत आणि आतांच्या दागिन्यांत बराच बदल झाला असला पाहिजे; तसेंच, कोणत्याही दोन राष्ट्रांतील लोकांच्या दागिन्यांत फारच

थोडें साम्य असतें, हें कोणास सांगावयाला पाहिजे, असें नाहीं. पण जेथें दागिन्यांची बिलकुल हौस नाहीं, असें एक देखील राष्ट्र मिळावयाचें नाहीं. आपण दुसऱ्याला प्रिय व्हावें, अशी मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. पण ह्या प्रवृत्तीचें विशेष प्रदर्शन स्त्रीपुरुषांकडून एकमेकांस प्रिय होण्यासाठीं चालविलेल्या वर्तनांत दिसून येतें. सौंदर्याला सर्वत्रच मान आहे. पण पुरुषांच्या सौंदर्याला स्त्रियांत आणि स्त्रियांच्या सौंदर्याला पुरुषांत विशेष मान असल्यामुळे, त्या सौंदर्याला खुलवणारे अलंकार वापरण्याची इच्छा उभयतांतही स्वभावसिद्ध होऊन बसल्यासारखी झाली आहे. दागिन्यांमुळें स्वाभाविक सौंदर्यात खरोखरीच भर पडेनाशी होईल, निदान पडत नाहीं असें वाटूं लागेल, तेव्हांच हा मनुष्यास लागलेला दागिन्यांचा नाद सुटण्याचा संभव आहे. मोठ्या प्रयासानें हा थोडासा कमी अधिक करतां येईल, पण जोंपर्यंत स्त्रीपुरुषें एकमेकांस प्रिय होण्याचा प्रयत्न करीत असतील, तोंपर्यंत दागिन्यांचा थोडाबहुत नाद सर्वत्र दृष्टीस पडल्यावांचून राहणार नाहीं.

दागिन्यांवर मनुष्यांचें इतकें प्रेम बसण्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, त्यांमुळें आपण श्रीमंत आहों, असें इतरांस सहज रीतीनें दाखवितां येतें. दहापांच हजारांच्या नोटा आंगरख्यावर किंवा लुगड्यावर चिकटवल्या तर तो हेतु सिद्धीस जाणार आहे, हें खरें आहे. पण तसें केल्यानें सौंदर्यांत भर न पडतां, तें उलट विद्रूप दिसण्याचा संभव आहे. तेव्हां सौंदर्याला मदत होऊन पुन: श्रीमंती दाखवितां येण्यास अलंकार घालण्यासारखें दुसरें साधन नाहीं. शिवाय, एकदा दागिन्यांचा पक्का नाद लागला म्हणजे काटकसर करण्याची सवय लागते, आणि तीमुळें दुर्व्यसनांत किंवा दुसऱ्या कोणत्याही वाईट गोष्टीकडे खर्च करण्याची इच्छा होत नाहीं, हा आणखी एक फायदा आहे. तसेंच, एखादा प्रसंग गुदरला असतां दागिने जसें उपयोगी पडतात, तसें दुसरें कांहीं एक उपयोगास येण्याचा संभव नाहीं. व्यापारांत घातलेला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येऊं शकत नाहीं; इतकेंच नाहीं, तर बुडण्याची भीति असून, त्याचे योगानें रूपाला मोहकता आणण्यास काहींच साहाय्य मिळत नाहीं. ब्यांकेतला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येण्यासारखा असतो, पण ठुशीच्या जागीं कां 'ब्यांकबुक'' घालतां येणार आहे? तात्पर्य, दागिने ही एक प्रकारची अत्युत्तम ठेव आहे. ह्या ठेवीपासून सौंदर्यवृद्धि होत असून खेरीज अनेक फायदे होतात. म्हणून दागिने वापरण्याची हौस मनुष्यांतून सहसा जाण्याचा संभव नाहीं, हें सिद्ध आहे.

कोणी असें म्हणतात कीं, दागिन्यांत पैसा घालण्यापेक्षां तो वस्त्रप्रावरणांत खर्चणें विशेष इष्ट आहे; कारण कापड दागिन्यापेक्षां विशेष उपयोगाचें व सुखाचें आहे. पण यास एक असें उत्तर आहे कीं, शीतकटिबंधांतले लोक अवश्यकतेमुळें

आपल्या पैशांचा चूर पेहरावांत करतात, म्हणून आम्हीं उष्ण कटिबंधांतील लोकांनींही तसेंच करीत सुटावें; हें योग्य नाहीं अवश्य असेल तेवढा पैसा कपड्यांत खर्च करण्यास आमची हरकत नाहीं. पण अवश्यकतेबाहेर जितका पैसा वाचेल तितका सारा कपड्यांपेक्षां असंख्यपट अधिक टिकाऊ आणि उपयोगी अशा अलंकारांत खर्चणें हेंच प्रशस्त आहे. यावर कोणी असें म्हणतात कीं, कपड्यावर केलेल्या खर्चानें दागिन्यांवर केलेल्या खर्चापेक्षां व्यापारास अधिक उत्तेजन मिळते. पण आमच्या मतें ही विचारसरणी चुकीची आहे. कापडखरेदी केल्यानें कोष्ट्यांस व शेतकऱ्यांस उत्तेजन मिळतें; दागिने करविल्यानें खाणींतून मौल्यवान् धातू काढणारांच्या आणि सोनारांच्या धंद्यास आश्रय देण्यांत येतो! तेव्हां दागिने घाला किंवा उंची लत्ता कपडा वापरा, कोणत्या तरी व्यापारास उत्तेजन हें मिळतेंच! पण कपड्यांत पैसा, उधळून बसण्यापेक्षां तो दागिन्यांत वेंचण्यांत विशेष फायदा आहे. तो असा कीं, कपडा दागिन्यांइतका टिकाऊ नसल्यामुळें त्यांतील पैशाचा व्यय लौकर होतो व दागिन्यांतील पैसा फार दिवस टिकतो. वस्त्र जुनें झालें म्हणजे त्यांपैकीं कांहींच हातीं लागत नाहीं; जुन्या दागिन्यांपासून रुपयाचे आठ आणे तरी मिळतात! तेव्हा वस्त्रावर फार खर्च न करितां तो दागिन्यांत करणें विशेष प्रशस्त आहे, हें सहज लक्षांत येणार आहे.

दागिन्यांमुळें चोऱ्या व खून होतात म्हणून दागिने घालूं नये, असें म्हणणें म्हणजे आगगाड्या व आगबोटी यांस अपघात होऊन प्राणहानि होते, म्हणून प्रवासाच्या कामीं त्यांचा कधीं उपयोग करूं नये, असें प्रतिपादण्यासारखेंच होय. लोकांच्या दृष्टीस पडणार नाहीं, चोरतां येणार नाहीं, व कोणत्याही अपघातानें नष्ट होणार नाही, अशा रीतीनें संपत्तीचें रक्षण करणें बहुधा अशक्य आहे. सर्व पैसा व्यापारांत किंवा जमिनींत घालून बसून, आयत्या वेळेस त्याची गरज लागली तर कोणाच्या तोंडाकडें पहावें? व्यापारांत तोटा आला किंवा शेत पिकलें नाहीं म्हणजे जें नुकसान होतें तें चोरीच्या नुकसानापासून फारसें निराळे नाहीं, असें वाटतें. शिवाय, ज्या घरीं व ज्या माणसाच्या अंगावर कांहीं माया असेल त्यावर उड्या पडण्याचा संभव आहे, हें जरी खरें आहे, तरी लोकांची गरिबी, अज्ञान, व स्वाभाविक दुर्गुणप्रवृत्ति या गोष्टीही चोऱ्या व खून या अरिष्टांस कांहीं कमी कारण नाहींत. लोक दरिद्री नसतील व सुशिक्षित आणि सद्गुणी असतील, आणि पोलिसाचा बंदोबस्तही चांगला असेल, तर सुदाम्याच्या घराप्रमाणेंच कुबेराचें घर व शरीर कां सुरक्षित असूं नये, हें सांगतां येणार नाहीं. ऐषआरामाच्या वस्तूंत दागिन्यांचा समावेश होतो. जेथें राष्ट्र आहे तेथें थोडाबहुत ऐषआराम असलाच पाहिजे. देशकालानुरोधानें या ऐषआरामाची तऱ्हा निराळी असेल; पण जेथें मुळींच

ऐषआराम नाहीं, असें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं. आम्ही हिंदु लोक दागिन्यांत म्हणजे एका प्रकारच्या ऐषआरामांत थोडाबहुत पैसा खर्च करतो, हें खरें आहे. पण हा खर्च प्राप्तीच्या मानानें इतर लोकांच्या ऐषआरामाकडे होत असलेल्या खर्चाहून फार कमी असून, प्रसंग पडेल त्या वेळेस या खर्चाच्या बऱ्याच भागाचा पैसा करतां येतो, हा यांत एक विशेष फायदा आहे, असें प्रसिद्ध दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या एका निबंधांत सिद्ध करून दाखविलें आहे. ''काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरपर्यंत सुरक्षितपणें प्रवास करतां येण्यासारखा'' पोलिसाचा बंदोबस्त सरकार ठेवील, तर चोऱ्यांच्या आणि खुनांच्या हरकतीमुळें दागिने वापरूं नयेत, असें म्हणता येणार नाहीं, हें उघड आहे.

तथापि, या वादग्रस्त विषयाच्या संबंधानें आम्ही थोड्याबहुत समयास येण्यास, म्हणजे आमच्या प्रतिपक्ष्यांस रुचेल तर त्यांशीं तह करण्यास, तयार आहों. कारण, कांहीं म्हटलें तरी जनसमूहास एकाएकीं सुशिक्षित, सुवृत्त व निर्लोभी करणें जितकें अशक्य आहे, तितकेंच 'काठीला बांधलेल्या सोन्यास' कोणीं हात लाऊं नये असा बंदोबस्त होणेंही अशक्य आहे. तेव्हां दागिन्यापासून होणारा फायदा तेवढा साधून नुकसान टाळतां येईल अशा युक्ती कोणी सुचविली, तर ती स्वीकारण्यास लोकांनीं एका पायावर उभें असलें पाहिजे. ही युक्ति फार सोपी आहे. **'खरे दागिने न घालतां खोटे दागिने घालावे म्हणजे झालें!'** असें केलें असतां, श्रीमंतापासून गरीबापर्यंत पाहिजे त्याला दागिन्यांपासून सौंदर्यास होणाऱ्या मदतीचा फायदा घेतां येऊन, शिवाय आपापल्या मगुदराप्रमाणें लत्ताकपड्यावर अधिक खर्च करण्यास सवड सांपडेल इतकेंच नाहीं, तर देशांतील बरेंच धन दागिन्यांत अडकून पडल्यामुळें त्याचें नुकसान होत आहे असें ज्यांचें म्हणणें आहे, त्यांची ही दागिने वापरण्यास असलेली बहुतेक हरकत दूर करतां येणार आहे! एकदां हा खोटे दागिने घालण्याचा प्रघात रूढ झाला, म्हणजे त्यांसाठीं घरें फोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें चोरलोकांस समजून येईल, आणि मारवाड्यासारखे द्रव्यलोलुप लोक लहान मुलांचे खून करण्यास प्रवृत्त होणार नाहींत! यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, लहानथोरांच्या बायका सारख्याच श्रीमंत दिसूं लागल्या, तर धनाढ्यांनीं आपली श्रीमंती कशी दाखवावी? खोटे दागिने घातल्यानें सौंदर्यास होणारें साहाय्य साधेल खरें, पण श्रीमंती दाखविण्याचा व ती दाखविल्यापासून मनास होणाऱ्या आनंदाचा लाभ खोट्या दागिन्यांपासून कसा करून घेतां येईल? या प्रश्नास आमचें प्रत्युत्तर येवढेंच आहे कीं, अलंकारांनीं देह अलंकृत करणें हा त्यांचा आद्य उपयोग आहे. त्यांपासून होणारीं इतर कामें केवळ आनुषंगिक आहेत. तेव्हां त्यांचेकडून मुख्य काम करून घेऊन, बाकीचीं

कामें साधण्यास दुसऱ्या तोडी काढाव्या, हें योग्य आहे. श्रीमंतांनीं पाहिजे तर आपल्या लत्त्याकपड्यानें आपली श्रीमंती दाखवावी, अथवा लोंकर व कापूस आणि यंत्रें यांच्या समृद्धीमुळे श्रीमंती दाखविण्याचें तें द्वारही बंद झालें असेल तर त्या लोकांनीं आपल्या कपाळावर ''आमच्यापाशीं इतकी माया आहे'', अशा अर्थाचीं अक्षरें गोंदून घ्यावीं, किंवा त्यांना सुचेल तसला दुसरा एखादा उपाय काढावा, अथवा जबाबदारी पतकरून खरे दागिने वापरीत राहावे! मात्र तसें करतांना इतकें ध्यानांत ठेवावें कीं, दिसण्यांत खऱ्या व खोट्या दागिन्यांत म्हणण्यासारखा फरक दिसत नाहीं, इतकेंच नाहीं, तर सौंदर्याची उठावणी करण्यांतही दोहोंचा सारखाच उपयोग असल्यामुळें, गरीबांच्या बायका श्रीमंतांच्या बायकांप्रमाणें कसले बसले सारे दागिने वापरूं लागल्या, म्हणजे श्रीमंतांच्या बायकांच्या अंगावर असलेल्या खऱ्या दागिन्यांपासून त्यांस म्हणण्यासारखा कोणताही फायदा होणार नाहीं! असो; पुढें एखादे प्रसंगी ह्याच विषय पुनः हातीं घेऊन, आपल्या दागिन्यांपैकी त्याज्य व रक्ष्य किती आहेत या मुद्याचा आणखी कांहींसा विचार करूं.

*

म्हणण्यासारखा उपयोग नाहीं

हव्या तेवढ्या वयाच्या वराशीं हव्या तितक्या लहान वयाच्या वधूचा विवाह करावा, व मग त्या घोडनवऱ्यानें उतावीळ होऊन आपल्या ऋतु प्राप्त न झालेल्या भार्येशीं राक्षसी विलास करून, तिच्या प्राणांचा किंवा प्रकृतीचा आणि आपल्या लौकिकाचा होम करावा, आणि त्यामुळें लोकांचीं मनें उदास होऊन त्यांना अगदीं लहानपणीं लग्नें करणें बरोबर नाही, असें वाटूं लागावें; पण तीं एकाएकीं बंद करण्याची छाती होत नसल्यामुळें तीं तशींच कायम ठेऊन, त्यापासून होणारे घोर परिणाम न घडूं देण्याबद्दल प्रथम बारीकसारीक कायदेशीर प्रतिबंध करीत रहावे-असा या प्रश्नाचा सार्वत्रिक इतिहास असेल, व याहून दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें ही बालविवाहाची दुष्ट चाल नाहींशी करणें शक्य नसेल, तर कित्येक सामाजिक सुधारकांनी संमति वयाची इयत्ता वाढविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास अर्ज करण्याचा जो विचार केला आहे, तो केवळ वावगा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. ‘‘बारा वर्षांच्या आंत आपण आपल्या बायकोशीं समागम केला, आणि त्यापासून भयंकर परिणाम होऊन तो जगापुढें आला, तर आपणांस असंमत उपभोगास सांगितलेली शिक्षा भोगावी लागेल; करतां आपण त्या समागमसुखाविषयीं उत्कंठ होऊं नये’’ असा परिणाम जितक्या घोडनवऱ्यांच्या मनांवर होईल, तितक्या मानानें संमतिवय वाढविल्यापासून फायदा होणार आहे, यांत बिलकुल संशय नाहीं. पण हें मान पराकाष्ठेचें क्षुल्लक आहे. येवढ्यासाठींच कायदा करण्याची मोठीशी आवश्यकता नाहीं. यावर कोणाचा असा आक्षेप येईल कीं, संमतिवयाचें प्रमाण दहापासून बारा केल्यानें असंमत उपभोगांचा म्हणण्यासारखा प्रतिबंध होण्याचा संभव नाहीं. हें जरी खरें आहे, तरी जे उतावीळ नवरे हा गुन्हा करतील, त्यांना दोन वर्षांहून अधिक शिक्षा ठोठावण्याचा न्यायाधीशास अधिकार असणें जरूर आहे. कामवासना अनावर होऊन वयाचा व प्रकृतीचा मगदूर न पहातां, अल्प वयाच्या मुग्ध कन्येवर बलात्कार करून तिच्या शरीराची, अब्रूची, आणि प्राणांची दुर्दशा करणाऱ्या मनुष्याचा अपराध फार मोठा आहे, व अशा मोठ्या अपराधास मोठी शिक्षा असणें हें योग्य आहे. यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं, कोणत्याही अपकृत्यास जी शिक्षा ठरवायची

ती त्यापासून होणाऱ्या परिणामांच्या अनुरोधानेंच नेहमीं ठरवितां येत नाहीं. ज्याच्या हातून तें अपकृत्य घडलें त्याचा हेतु कसा होता, हें पाहणें अनेक प्रसंगीं अवश्य असतें. असें समजा कीं, एखाद्या अचरट मनुष्यानें घरांतल्या घरांत पिस्तुलानें गोळी घालण्याचा नेम शिकण्याचा विचार करून, आपल्या परमप्रिय बायकोशीं लडिवाळपणाने खेळत असलेल्या घराच्या भाटीवर कांहीं छर्रे सोडले, आणि ते त्या प्रियकरणीस लागून तिचा अंत झाला, तर अशा भावी गोलंदाजास बायकोचा खून केल्याबद्दल फांशीं देणें बरोबर होईल काय? अर्थात् नाहीं.त्याप्रमाणेंच जो घोडनवरा वयांत न आलेल्या आपल्या बायकोशीं राक्षसीं वर्तन करतो, तो तिचा प्राण जावा किंवा तिच्या शरीरास आमरण दु:सह व्यथा जडावी, अशा बुद्धीनें तें करीत नाहीं. ज्याप्रमाणें दारूनें झिंगलेला मनुष्य पाहिजे तें करीत सुटतो त्याप्रमाणें उत्कट कामवासनेनें बेफाम होऊन गेलेला मनुष्य तसें कर्म करण्यास प्रवृत्त होतो. बायको मरावी असा त्याचा हेतु मुळींच नसतो; कसेंही करून आपली वासना तृप्त करावी, येवढाच त्याचा विचार असतो. सबब, अशा अपराधाबद्दल पराकाष्ठेच्या वाईट अविचाराच्या कृत्यास जी शिक्षा सांगितली असेल, तीच देणें योग्य आहे. पंचवीस तीस वर्षांच्या दांडग्या मनुष्याच्या ताब्यांत आठदहा वर्षांची पोर बायको म्हणून द्यावयाची, आणि त्यानें अविचाराचा प्रकार केला म्हणजे, त्याच्या पाठीमागें दहाबारा वर्षांचा कारागृहवास किंवा काळें पाणी लावायचें, हें फारच शहाणपणाचें कृत्य होय! वास्तविक पाहतां, अशा रीतीनें मुलींचा विक्रय करणाऱ्या आईबापांस किंवा पालकास आणि विकत घेणाऱ्या सासूसासऱ्यास किंवा नवऱ्यास चांगलासा दंड करणें न्याय्य आहे! आठनऊ वर्षांच्या मुली पंचेचाळीस वर्षांच्या घोड्यांना अगोदर देतां कां? आणि मग रडत बसतां कां? बारा वर्षांच्या करूनच कां देत नाहीं?

यासंबंधाने हिंदुस्थान सरकारास पाठविण्यासाठीं जें पत्र तयार झालें आहे, त्याचा मसुदा आमच्या पाहण्यांत आला आहे. या मसुद्यांत संमतिवय वाढविणें इष्ट आहे, असें सिद्ध करण्यासाठी जितकी कुशलता दाखविणें शक्य होतें; तितकी दाखविली आहे, व आजमितीस दहांच्या जागीं बारा वर्षे केलीं असतां लोकमतावर चांगला परिणाम होऊन, चौदाव्या वर्षापर्यंत नवऱ्याने आपल्या बायकोकडे जाऊं नये, असा प्रतिबंध करून घेण्यास त्यांच्या मनाची हळूंहळूं तयारी होणार आहे, वगैरे गोष्टींचा यांत मोठ्या चातुर्यानें जातां जातां उल्लेख केला आहे. परंतु प्रश्नांतील वादाचें जे मुख्य स्थल त्यांत प्रवेश न करतां, त्याच्या सभोंवतालच्या अवांतर गोष्टींची मुद्देसूद व सप्रमाण चर्चा करून त्या दूष्य ठरविल्यानें, हिंदुस्थान सरकारास किंवा इतरांस असला कायदा करणें जरूर आहे,

असें वाटण्याचा विशेष संभव नाहीं. बारा वर्षांच्या आंतील मुलीचा किंवा कोणत्याही वयाच्या मुलीचा; नवऱ्यानें केलेल्या जुलमाच्या संभोगानें उपहास होऊं नये, ही गोष्ट जितकी कायदा मागणाऱ्या लोकांस इष्ट आहे; तितकीच ती न मागणाऱ्यांस, किंवा त्यापासून फायदा होणार नाहीं, असे म्हणणाऱ्यांस इष्ट आहे. तेव्हां जेणेंकरून कामांध नवऱ्यास आपल्या बायकोची अशा तऱ्हेनें विटंबना करतां येणार नाहीं, अशी कांहीं तोड निघाल्यांस ती सर्व पक्षांस मान्य होईल, असें वाटतें.सरकारनें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें आमच्या धर्मांतर्गत विवाहपद्धतींत एक दोन महत्त्वाचे कायदे करून हात घातला आहे, म्हणून या बाबतींतही तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें म्हणून सरकारचें किंवा या भावी कायद्याच्या प्रतिपक्ष्यांचें समाधान होणार नाहीं. सती जाऊं न देणें, गतभर्तृकांनीं, पुनर्विवाह केला असतां त्यामुळें त्यांचें किंवा त्यांच्या संततीचें कोणत्याही प्रकारचें नुकसान न होऊं देणें, धर्मांतरामुळें वडिलोपार्जित संपत्तीचा योग्य वांटा मिळण्यास हरकत न होणें, वगैरे गोष्टी सरकारास बऱ्या वाटत होत्या, व म्हणून त्यांनी लोकमताकडे विशेष लक्ष न देतां, त्यासंबंधाने तेव्हाच कायदे केले. संमतिवयाच्या संबंधाने त्यांना जेवढा निर्बंध उचित व अवश्य वाटला, तेवढा त्यांनीं आमच्या अभिप्रायाची विशेष पर्वा न करतां केव्हांच घालून टाकला. पारशांनीं व खोजांनीं अमुक कायदा आम्हांस करून द्या, असें बहुमतानें विचारल्यावरून त्यांना तो करून देण्यात आला, यांतही कांहीं नवल नाही. या सर्व उदाहरणांवरून संमतीचें वय सध्यांप्रमाणें दहा न राहूं देता बारा करावें, या म्हणण्यास विशेष आधार मिळत नाही. आजची मागणी लोकांकडून सरकारकडे जात आहे, व तीही साऱ्या किंवा बहुतेक लोकांकडून जात आहे, असें नाहीं. तसेंच, हा फेरफार केल्यानें म्हणण्यासारखा फायदा होण्याचाही संभव नाहीं. फार झालें, तर ज्या वेळी असंमत उपभोगाचा एखादा खटला कोर्टापुढें येईल; तेव्हां अपराध्यास आतापेक्षां अधिक कडक शिक्षा देतां येईल येवढेंच कायतें. या फेरफारापासून अपराधप्रवृत्ति कमी होऊं शकत नाहीं, व ती होणें हा तर कायदे करण्याचा मुख्य हेतु असतो. दुसऱ्या बाबींत मुलीचें वय बारा किंवा चौदा वर्षांचें असल्याखेरीज ती कायद्यांत आली असें मानीत नाहींत, म्हणून बारा वर्षांच्या आंत नवऱ्याला तिने जो रुकार दिला तोही कायदेशीर मानूं नये, हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, पाहिजे त्या वयांत लग्नाला रुकार देणें हें जर कायदेशीर आहे, तर ज्या गोष्टीसाठीं लग्न करावयाचे तीं गोष्ट नवरा करूं लागल्यास ती कायदेशीर नाहीं, असें कसें म्हणतां येईल?बारावें वर्ष हा मुलींच्या ऋतुदर्शनाचा सामान्य काल होय, असें सुश्रुतादि तुमच्या अत्यंत पूज्य भिषक्प्रमुखांचें म्हणणें असतां, व मन्वादि आद्यस्मृतिकार आणि पाराशर,

बृहस्पति, येम वगैरे इतर धर्मशास्त्रकर्ते हे बारा किंवा चौदा वर्षांच्या आंत नवऱ्यांनीं आपापल्या बायकांशी संबंध ठेऊ नये, असें सांगत असतां, व या वयाच्या मुलींचीं लग्नें झाली नाहींत तरी हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें असतां, तुम्ही आठदहा वर्षांच्या पोरी आपण होऊन विवाहपाशानें बद्ध करून टाकता कां, आणि मग त्या पाशापासून होणारा त्रास चुकविण्यासाठीं विशेष फायदा न होणारे कायदे मागत बसतां कां? तुमच्या मुलीचा, तुमचा, आणि तुमच्या जावयाचा भंडवडा कशानें होतो, हें तुम्हांस पूर्णपणें कळून आलें आहे. तेव्हां शहाण्या माणसाप्रमाणें रोगाच्या मुळास हात घालाल, की वरवर लेप आणि मलमपट्ट्या लावीत बसाल? हिंदुस्थानांतील दोन प्रांतांत एका चाळीस वर्षांच्या अवकाशांत असंमत संभोगाचे शंभर खटले कोर्टापुढें आले, आणि त्यांपैकीं सुमारें निम्म्या खटल्यांत दहापासून तेरा वर्षांच्या आंतील वयाच्या मुलींवर त्यांच्या नवऱ्यांकडून जुलूम झाला, असें सांगण्यांत, व या प्रसिद्ध जुलमांच्या मागें शेकडों अप्रसिद्ध जुलूम झाले असतील असे म्हणण्यांत, 'संमतीचे वय वाढवा' या प्रार्थनेस विशेष पुष्टि मिळते, असें आम्हांस वाटत नाही. संमतीचे वय वाढविल्यानें प्रतिवर्षी ज्या अडीच अपराध्यांस आजपर्यंत दुखापतीबद्दल शिक्षा द्यावी लागली, तिचे जागीं, संमतीचें वय वाढविल्यास, जबरीच्या संभोगाची शिक्षा देतां येईल, यापलीकडे कोणताही फायदा या कायद्याने होणार नाहीं. कदाचित् फांशीचीच शिक्षा ठेविली तर मात्र काय होईल तें सांगवत नाही; पण त्या शिक्षेहून दुसऱ्या कोणत्याही हलक्या शिक्षेनेप्रसिद्ध गुन्ह्यांच्या मागे होत असलेल्या अप्रसिद्ध गुन्ह्यांची संख्या दहापांच अंकानी तरी स्वल्प होईल किंवा नाहीं, याची आम्हांस बरीच शंका आहे. अशा प्रकारचे जे गुन्हे कोर्टापुढें येतात ते बऱ्याच अंशीं नाइलाजास्तव येतात. जे हजारों मुलगे हजारो मुलीकडे पाहिजे त्या वयास जात आहेत, पण ज्यांच्या समागमापासून भयंकर परिणाम होऊं शकत नाहीं, त्याचा प्रतिबंध या तुमच्या कायद्यानें कसा होणार? किंवा चाळीस पंन्नेचाळीसपुढें विवाह केल्यानें कोणत्याही वयाच्या मुलीस घोर अपाय होईल अशा रीतीनें तीवर आपलें पौरुष गाजविणें ज्यांस अशक्य झालें आहे; अशांनीं आपल्या दशद्वादशसांवत्सरिक धर्मपत्न्यांशीं केलेल्या क्रीडा दंड्य कशा होणार! पंचविशीच्या पुढले व चाळिशीच्या आंतले जे उल्लू व दांडगे प्रथमवर, बिजवर, तिजवर किंवा पाहिजे त्या खेपेचे वर, शुभमंगल झाल्यापासून आपले उपभोगस्थान कायदेशीरपणें आपल्या हस्तगत झाले, तेव्हां त्याचा उपभोग तब्यत लागेल तेव्हां करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें समजून त्यावर झडप घालण्यासाठी टपून बसलेले असतात, व सारी लज्जा एकीकडे गुंडाळून ठेऊन, संधि सांपडल्याबरोबर जसा बुभुक्षित लांडगा मेंढीवर उडी घालतो,

त्याप्रमाणें जे दिवसा ढवळ्या किंवा पूर्वरात्रीं आपल्या अर्धांग्यांस अंथरुणासकट सभोंवती निजलेल्या स्त्रियांतून उचलून नेऊन, त्यास योग्य वाटलेल्या एखाद्या एकांत स्थलीं, किंवा तेथल्या तेथेंच अमानुष सुखाचा घुटका घेण्याचें धाडस करतात, अशा साहसी, उतावीळ, दांडग्या, क्रूर लांडग्यांच्या हातीं गरीब मेंढ्या न पडाव्या हा जर मूळ उद्देश असेल; तर तुम्ही मागत आहां त्या कायद्यानें तो कधींही सिद्धीस जावयाचा नाहीं, व ज्या प्रचारामुळें तुमच्या तोंडांत सारीं सुधारलेली राष्ट्रें शेण घालीत आहेत, त्याचा निखालस लय या कायद्यानें कधींच होणार नाहीं. तो व्हावा अशी तुमची खरी इच्छा असेल तर बारा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नेंच करूं नका म्हणजे झालें. पण ही सुधारणा इतक्यांत तुमच्यानें होण्यासारखी नसेल, तर सरकारापासून असा तरी कायदा करून घ्या कीं, **पंचवीसपासून चाळीस वर्षांपर्यंत लग्न करूं इच्छिणाऱ्या कोणत्याही वयाच्या वरानें बारा वर्षांचें आंतील वयाच्या मुलीशीं लग्न करूं नये.** हिंदुस्थान सरकाराकडे धाडण्यासाठीं तयार केलेल्या पत्राच्या मसुद्यांत चाळीस वर्षांत जे जबरीचे शंभर संभोग हिंदुस्थानांतल्या दोन प्रांतांत झाले म्हणून म्हटले आहे, व ज्यांपैकीं सुमारें निम्मे दहापासून तेरा वर्षांच्या आंतील वयांचे मुलींशीं झाले, असें सांगितलें आहे, ते संभोग करणाऱ्या नवऱ्यांचीं वयें देण्यांत येतील तर फार बरें होतें. तसें करणें त्या पत्राच्या चतुर लेखकास इष्ट कां वाटलें नाहीं, कोण जाणे. पण जर तीं वयें पुढें येतील तर ते सारे जबरीचे संभोग पंचविशी उलटलेल्या आणि पंचेचाळिशीच्या आंतल्या अविचारी प्रथम वरांनीं, बिजवरांनीं, किंवा तिजवरांनी केले असावे, असें दिसून येईल, असें आमचें अनुमान आहे. विवाहपटावर वाघशेळीचा खेळ होऊं दिला असतां, तुम्हीं केवढीही खबरदारी ठेवलीत, तरी एखादे वेळीं वाघ शेळीला खाऊन बसेल आणि तुम्हांस राग, लज्जा, व ममता या विकारांपासून होणारा अनिर्वाच्य त्रास सोसावा लागेल! तेव्हां सरकारकडे सध्यां जी मागणी घालण्याचा विचार चालविला आहे, तिचा नाद सोडून द्या, आणि पंचविशीच्या पुढल्या आणि पंचेचाळिशीच्या आंतल्या कोणत्याही विवाहेच्छु वरानें बारा वर्षांचे आंतील वयांचे वधूशीं विवाह करूं नये, असा कायदेशीर निर्बंध सरकारकडून करून घ्या, म्हणजे तुमचा इष्ट हेतु तेव्हांच तडीस जाईल, व तुमच्या तोंडचा कलंक पुसेल. पण जर तुमच्या अंगांत खरोखरींच कांहीं रग असेल, व पूर्व ऋषींनीं घालून दिलेल्या नियमांची जी दृढ भक्ति तुम्हांस आहे म्हणून वरकरणीं तुम्हीं नेहमीं म्हणत असतां; तिचा एक शतांश जर तुमच्या अंगांत खरोखरींच वास करीत असेल, व त्या मर्द आर्यांचे केवळ मिथ्याभिमानी वंशज तुम्ही नसाल; तर त्यांच्याप्रमाणें आपल्या हातून पौरुषाची कृत्यें होण्यासाठीं सोळा वर्षेंपर्यंत

बापानें आपणास वाटेल तशा रीतीनें स्नेहपूर्वक आपल्या घरीं आपल्या मुलीचें संगोपन करावयाचें, आणि तिला तें वय प्राप्त झाल्यावर, आपल्या व तिच्या संमतीनें योग्य वर पाहून त्याच्या स्वाधीन तीस करावयाचें- अशी चाल घाला; आणि येथून पुढें होणाऱ्या संततीच्या मानास आणि कृतज्ञतेस पात्र व्हा! एकदां असें करण्याचा निश्चय कराल तर साऱ्याच कटकटींतून सुटाल; आणि एकवार जिवाचा घडा करुन अशी रूढि उघडपणें पाडण्यास प्रवृत्त व्हाल, तर ज्याना अलीकडे कित्येकांनीं 'प्रतिगामीं अथवा प्रतिकारी' (reactionists) असें नाव ठेविलें आहे, त्यांपैकीं जे खऱ्या वास्तविक उपयुक्त सुधारणेस मुळींच प्रतिकूल नाहींत, असे इसम तुम्हांस येऊन मिळतील, आणि 'थंडे व गरम', 'उतावीळ आणि मठ्ठ', 'सुधारक आणि दुर्धारक' वगैरे संज्ञांनीं अलीकडील वादांत व्यक्त होऊं लागलेल्या मतभेदाचा निरास होऊन, आपण सारे एक दिलानें स्वोन्नति व राष्ट्रोन्नति करण्यास लागूं.

*

कायदा मागतां ते जात कां करीत नाहीं?

ज्या लोकांची अद्याप समजूतच अशी आहे कीं, पाश्चात्यांपासून राजकीय गोष्टींत मात्र आपणांस काय तें शिकण्यासारखें आहे, बाकी जी आमची गृहस्थिति आज अनादिकालापासून चालत आली, जिनें मोठाल्या क्रांत्यांशीं टक्कर मारिली, व जिचे पाय भक्कम खडकावर भरले आहेत, तींत ढवळढवळ करून पाश्चात्य गृहपद्धतीच्या धर्तीवर ती अंशत:ही नेण्याचा प्रयत्न करणारे झाडून सारे, वेड्यांच्या इस्पितळांत पाठविण्याच्या योग्यतेचे आहेत. त्या लोकांनीं ''आम्हांस ही तुमची सुधारणा नको व तुम्हांस आमचे ऐकावयाचेच नसेल तर, करा वेगळी जात आणि व्हा मोकळे'' असा सल्ला द्यावा, यांचे आम्हांस नवल वाटत नाहीं. परंतु ज्यांचीं मतें वरच्यासारखीं नाहींत, व इंग्रजी राज्यव्यवस्थेप्रमाणें त्यांचीं गृहस्थितीही बऱ्याच गोष्टींत अनुकरणीय आहे, अशी ज्यांची खात्री झाली आहे, व ती ज्यांनी स्पष्ट शब्दांनीं व्यक्तही केली आहे, अशा लोकांनीही ''कायदा नको'' असे आपण एकदां प्रतिपादिलेलें सोडावयाचें नाहीं, एवढ्याच दुराग्रहावर ''बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा'' या न्यायाचा अवलंब करावा; व ''कायद्याचें तरी नांव सोडून द्या, नाहींतर वेगळी जात तरी करा'' असा मोठ्या गंभीरपणानें उपदेश करण्यास प्रवृत्त व्हावें, याचें आम्हास राहून राहून आश्चर्य वाटतें. त्यांस हें कळत नाहीं कीं-

श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृति:
योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद्द्विज:
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दक:

या मनूच्या कायद्याची अंमलबजावणी सर्व कालीं व सर्व स्थळीं होत राहणें अशक्य असल्यामुळें ''बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा'' हेंहि तर्कशास्त्र नेहमीं व चोहींकडे निर्दोषच मानलें जाईल, असें नाहीं. तसेंच ''सामाजिक गोष्टींत कायदा नसावा'' हें युरोपियन ऋषींचें सूत्रही सर्वच स्थितींत लागू पडण्यासारखें नाहीं. त्यासही अपवादस्थलें आहेत. ''एखाद्या पदार्थास गति मिळाली म्हणजे ती तशी सतत चालू असते'' हा पदार्थविज्ञानशास्त्राचा नियम सामान्यत: जरी खरा आहे, तथापि त्यास पदोपदीं अपवाद दिसतात. मग जड पदार्थही जर एका सृष्टिनियमानें बांधले जात नाहींत, तर हवापाणी, चालीरीति, आचारविचार, धर्मसंस्था,

शिक्षणक्रम वगैरे असंख्य कारणांनी प्रतिक्षणीं भेद पावणाऱ्या सचेतन मानवी प्राण्यांच्या समाजास सर्व स्थितीत एकाच सूत्रानें बांधूं पाहणें किती हास्यास्पद आहे, हें अधिक स्पष्ट करून दाखविण्याची मुळींच अवश्यकता नाहीं.

आतां ''जात करा'' हा आमच्या बंधूंचा उपदेश जर खरोखरच खोडसाळपणाचा नसेल, व कायदा मागण्यापेक्षां जात केल्यानें सुधारणा जर अधिक त्वरित, अधिक व्यापक, व सुखकर होणें शक्य असेल, तर या आमच्या मित्रांनी, ''जात करा'' अशी आम्हांस मसलत देण्याचें सोडून ''चला आपण जात करूं या'' असाच उपदेश केला असता; कारण कीं, बोलण्याप्रमाणें करून दाखविण्याचें धैर्य नसल्यामुळें जसे कायदेवाले भेकड ठरतात, व त्यांचें पुढारित्व जसें त्यांच्यापासून हिसकावलें जाते, त्याप्रमाणेंच सुधारणा पाहिजे म्हणणारे बेकायदेवालेही उदाहरण घालून देईपर्यंत भेकड कां मानले जाऊं नयेत? व त्यांच्या जवळचे तेवढे पुढारित्वाचे पदक कां राहू द्यावें? याची आमचे बेकायदेवाले फोड करतील काय? हो अलबत! याची फोड पुष्कळ वेळा केली गेलीं आहे. ती काय बरे? ती इतकीच कीं, ज्यांस लोकनायकाचें काम करावयाचें असेल त्यांनीं लोकांचेही कांहीं ऐकलें पाहिजे. प्रत्येक गोष्टीत आपलाच हेका चालवून उपयोग नाही, काहीं काही गोष्टीत त्यांच्याच धोरणानें घेतलें पाहिजे. बरें, ठीक. आमच्याही मते वरील उपदेश खचित गृहणीय आहे, व आम्हास तर वाटतें कीं, आम्हीही त्यांस सोडून वागत नाही. वा:! मग कायदा का मागतां? लोक कायद्याच्या विरुद्ध असतां, तो मागत बसणें म्हणजे काही लोकांच्या धोरणाने चालणें नव्हे! यावर आम्ही असे उत्तर देतो की, लोकनायकांनीं कांहींसें लोकाच्या धोरणानें घेतलें पाहिजे, हें जरी आम्हास पूर्णपणे समत आहे, तथापि कायदा हा शब्द तोंडावाटें काढला कीं, लागलाच लोकांच्या धोरणानें न वागण्याचा आरोप आम्हांवर कसा लागू होतो, हें मात्र दुराग्रहाच्या तर्कशास्त्रावांचून सिद्ध करून देतां येईल असें आम्हास वाटत नाही. लोकनायकानीं जसा अंशत: लोकमताचा आदर केला पाहिजे, त्याप्रमाणें लोकांनीही नायकाच्या मताचा अंशत: अंगिकार केला पाहिजे, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. परंतु सर्व तंटा काय तो वरील वाक्यांतील ''अंशत:'' या अज्ञात संख्येची किंमत ठरविण्यांत पडला आहे. बालविवाहाच्या दुष्ट प्रचारापासून होणारे सर्व अनर्थ टळण्यास, मुलीची विवाहमर्यादा निदान सोळा वर्षांपर्यंत तरी गेली पाहिजे हें, विचार करण्याची इच्छा असल्यास, कोणासही सहज समजण्यासारखें आहे. परंतु रजोदर्शनानंतर कन्येचा विवाह करणें म्हणजे नरकाची सामुग्री करणे होय, हा आमच्या लोकांचा समज जोंपर्यंत शिथिल झाला नाहीं, तोंपर्यंत १६ वर्षांपर्यंत कायद्यानें मुळींच लग्नें बंद करूं पाहणें म्हणजे

अत्यंत जुलूम होय, ही गोष्ट कायदा मागणारे पूर्णपणें जाणून आहेत, व असा कायदा करावा, असें कोणीही सुचविलें नाहीं. कायद्याची इयत्ता काय ती १० पासून १२ वर्षांच्या दरम्यानच सुचविली जात आहे; व बारा वर्षांपर्यंत मुली अविवाहित राहणें हें कांहीं लोकाचाराच्या विरुद्ध आहे, असें कोणास प्रतिपादितां येणार नाहीं. तेव्हां अशा रीतीनें कायदेवाल्यांची परमावधीची इयत्ता जर बारा वर्षांपुढें गेली नाही, तर लोकांच्या समजुतीचा आदर करीत नाहींत, व लोकांच्या धोरणानें चालत नाहींत, हें बेकायदेवाल्यांनीं कोणत्या आधारानें ठरविलें, याचा आम्हांस उमज पडत नाहीं. असो, इसापनीतिंतील लांडगा आणि कोकरूं या गोष्टींतल्या लांडग्याप्रमाणें "तू नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील" या न्यायानेंच कांहीं तरी दोष कायदेवाल्यांच्या माथीं मारण्याचा बेकायदेवाल्यांनीं निश्चयच केला असल्यास, "ब्रह्मापि तं नरं न रंजयति" असेंच म्हटलें पाहिजे. दुराग्रहाच्या तर्कशास्त्रांतील दोष दाखविण्यास दुसरा मार्ग नाहीं. कायदा करून घेतला असतां नुकसान होईल, असे दाखवितां येईना, म्हणून वाटेल तें बहकत सुटावें हा तर या बेकायदेवाल्यांचा नित्याचा क्रम. "या पारशानें आपल्या जातीची सुधारणा करण्याचे सोडून हिंदूंच्या सुधारणेची उठाठेव कां करावी?" हा मुद्दाही सरच्याच मालेंतील आहे. पण या आमच्या मलबारींच्या द्वेष्ट्यांस आम्ही असें विचारतों कीं, हिंदुस्थानांतील मद्यसेवनाचा दुष्ट प्रघात नाहीसा करण्याकरितां एकदा केन, देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आपणास उपदेश करीत फिरला, व त्या घातक व्यसनाचा बिमोड करण्यास कायदा मागू लागला तर त्यांत मात्र आम्हांस कांहीं वावगें दिसून येत नाहीं, आणि बिचारा मलबारी तेवढाच आमच्या तिरस्कारास पात्र होतो, याचें इंगित काय? केनसाहेबास जर कोणी असें म्हणता की, "अरे बाबा, आपल्या स्वत:च्या देशांतलें दारूचें व्यसन नाहींसें करण्याचें सोडून तूं आमच्या कां वाटे जातोस?" तर आम्हीं त्याची काय किंमत केली असती? व तोच आक्षेप मलबारींवर आणणारांचीही किंमत तीच होते, हें कां नव्यानें सांगितलें पाहिजे?

असो; आतांपर्यंत आम्हीं जें लिहिलें आहे तेवढ्यावरून कायदा मागणारे लोक समाजाच्या धोरणानें वागत नाहींत, समाजास अज्ञातपूर्व व अरूढ अशा गोष्टींबद्दल कायदे करवून त्यांच्यावर मोठा जुलूम करीत आहेत, व यांना सारी सुधारणा एकदम करायला पाहिजे आहे वगैरे आक्षेपांस ते पात्र नाहींत, व म्हणून त्यांस वेगळी जात करा असा उपदेश करण्याचें प्रयोजन नाहीं, असें दिसून येणार आहे. आतां "जात करा" असें न म्हणतां, "जात करूं या" असें म्हणणारांविषयीं दोन शब्द लिहून आम्ही हा विषय संपवितों, व त्यावरूनही जात करण्यापेक्षां

कायदा मागणें हेंच इष्ट आहे असें दिसून येईल. ''जात करूं या'' असा सल्ला देणारे सुधारणेच्छु व ''जात करा'' असें म्हणणारे बेकायदेवाले, यांच्यांत फार अंतर आहे. बेकायदेवाल्यांच्या मते आम्ही जी आमच्या गृहस्थितीविरुद्ध ओरड करितों, ती जणू काय त्यापासून आमचें स्वतःचें व्यक्तिशः नुकसान होत आहे म्हणून करतों. परंतु ''जात करूं या'' म्हणणारे लोक या गृहस्थितीपासून एकंदर देशाचे मोठें नुकसान होत आहे, व तें बंद करण्यास जात करणें हा एक उत्तम उपाय आहे, असें म्हणणारे आहेत. ते म्हणतात कीं, जरी आपण एक बालविवाहाचा कायदा केला, तथापि त्याचे योगानें फार तर १२ वर्षेपर्यंत मुलगी अविवाहित राहील. परंतु ऋतुप्राप्तीपुढेही तिला अविवाहित ठेवण्यास वेगळी जातच केली पाहिजे. तसेंच विधवांवर होत असलेला जुलूम दूर करणें, ही जर सुधारणेच्या अनेक गोष्टींपैकीं एक गोष्ट असेल; तर तीही वेगळी जात केल्यावांचून होणार नाहीं. परंतु या वर्गांतील लोकांनीं आमच्या मतें जात करण्याच्या सर्व अडचणींचा विचार केला नाहीं. ज्या कारणांकरितां आम्ही कायदा मागतों, त्याच कारणांकरितां जात करणें योग्य नाहीं. बालविवाहाची चाल वाईट आहे, अशी पूर्ण समजूत असणारे लोक ८ व्या किंवा ९ व्या वर्षीं आपल्या मुलींचीं कां लग्नें करतात बरें? याचें कारण इतकें कीं, यापुढें मुलगी अविवाहित राहिल्यास लोक संशय घेतात, व तेणेकरून मुलीस योग्य स्थळ मिळेल कीं नाहीं अशी भीति उत्पन्न होते. कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे हे ब्राह्मण असूनही त्यांच्यांत परस्पर बेटीव्यवहार होत नसल्यामुळें, निवडणुकीचा प्रदेश आधींच संकुचित झाला आहे तो अधिक संकुचित होऊं न देण्याविषयीं झटणें, हें प्रत्येक पित्याचें कर्तव्य होऊन बसतें. दुसरें, कदाचित् कांहीं तजविजीनें मुलीचें नुकसान न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेणें शक्य असलें, तथापि वडील माणसांच्या इच्छेविरुद्ध जातां येत नाहीं. तेंच कायदा असला म्हणजे मुली १२ वर्षांपर्यंत अविवाहित राहिल्यामुळें, योग्य स्थळ मिळण्याची काळजीही दूर होईल, व वडिल माणसेंही नाखुष होण्याची भीति नाहीं. आतां, अशा रीतीनें वडील माणसांचीं तोंडें बंद करणें म्हणजे केवळ भेकडपणा आहे, असें कित्येकांस वाटतें; परंतु काळ्या रंगाची, आखूड शिंगाची, व पुष्कळ दूध देणारी गाय मिळेपर्यंत दूधच घ्यावयाचें नाहीं, असा सर्वांनीं निश्चय केल्यास कसें होईल हें सांगत बसण्याची अवश्यकता नाहीं. कायद्यानें मनें दुखवतात, तो करूं नये; अवज्ञा केल्यानें मनें दुखावतात, तेव्हां तसें करूनही त्यांची मर्जी मोडूं नये; फार दिवसांच्या रूढीनें त्यांचे विचार निश्चित झाले असल्यामुळें त्याविरुद्ध त्यांच्याशीं वाद करणें म्हणजेही, त्यांचीं मनें दुखवण्यासारखें आहे, म्हणून त्याच्याही भरीस पडूं नये, असाच वाद घालीत

बसल्यास त्यास आमच्याजवळ उत्तर नाही. प्रवाशास जसा नेहमीच सपाट रस्ता मिळणें अशक्य आहे, व नेहमींच प्रात:काळचा शीतल मंद वारा अनुभवितां येणें शक्य नाहीं, तशीच सुधारकाचीही गोष्ट आहे. सारासार विचार केला पाहिजे एवढें मात्र खरें! असो.

तेव्हां जोंपर्यंत मनुष्यस्वभाव बदलला नाहीं तोंपर्यंत वडिलांची मर्जी होईल तितकी संभाळण्यास झटणें, व आपल्या पोटच्या गोळयांची काळजी वाहणें या गोष्टी नाहीशा होणार नाहीत, व यांपासून सुधारणेस येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या म्हणूनच कायदा पाहिजे हें जर खरे असेल, तर जात कशी करतां येईल ही शंका आहे. कारण जात केल्याने आपल्या सर्व व्यवहाराचा प्रदेश फारच संकुचित होणारा आहे, व तेणेकरून फार त्रास भोगावा लागेल, व वडिलांची मर्जी मोडतां न आल्यामुळें, मुलीस एखादेदुसरें वर्ष अविवाहित ठेवण्यास जर फारसे लोक तयार नाहींत, व देशस्थ, कोकणस्थ व कऱ्हाडे यांच्यांतही परस्परविवाह होण्यास जर अद्याप आरंभ झाला नाहीं, तर वेगळी जात करण्यास कितीसे लोक तयार होतील, हा एक प्रश्न आहे. बरें, इतक्याही अडचणी सोसून आपण जात केली, तर लोकसमाज लवकरच आपल्या मागून येईल अशी तरी खात्री आहे काय? व अशी खात्री देण्याजोगी जर वस्तुस्थिति नाहीं, तर वेगळी जात केल्यानें, धड ना स्वार्थ ना परमार्थ असा प्रकार होणार आहे. एकंदर समाजाचें पाऊल पुढें पडावें हा तर आपला मुख्य उद्देश, व तो जर साधत नाही, तर आपण स्वतांस ताप करून घेऊन आपल्या मुलाबाळांच्या भावी कल्याणाविषयी बेफिकीर राहणें, हें सर्वथा अयोग्य होय. शिवाय जात करण्यापासून केवळ स्वतांचें हित साधावयाचे नसल्यामुळें व सर्वच सुधारणा एका घावानें करूं पाहण्यानें आपल्याविषयीं लोकांच्या मनांत अविश्वास उत्पन्न होतो, असा कित्येकांचा आक्षेप असल्यामुळें, ब्राह्मण सुधारकांची एक जात, शेणवी सुधारकांची दुसरी जात, परभूंची तिसरी जात असे अनेक भेद मात्र होणार; व इतकेही करून समाज तर अनुकरण करण्यास तयार नसणार. मग जात करणें म्हणजे आपलें व आपल्या पुढील पिढ्यांचें जाणूनबुजून नुकसान करणें व आधींच एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस असें करून टाकणाऱ्या दुष्ट जातिभेदाचें बंड, निरर्थक वाढविण्याच्या पातकाचें भागीदार होणें नाहीं काय? कन्या ऋतुमती झाल्यावर तिचा विवाह करण्यानें जातीबाहेर जावें लागण्याचें कारण नाहीं. तसें झाल्यास गोप्रदान करावें, किंवा तिच्या जितक्या पाळया झाल्या असतील, तितक्या ब्राह्मणांस भोजन घालून दक्षिणा द्यावी, असें 'संस्कारकौस्तुभांत' सांगितलें आहे. आतां पुनर्विवाहास जरी शास्त्राधार आहे, तथापि रूढीच्या बलवत्तर प्रभावामुळें लोक दुराग्रहानें तो कबूल करीत

नाहींत, हें खरें आहे; व हा अन्याय दूर झाला पाहिजे हेंही खरें आहे. परंतु पांच पन्नासांची जात करू म्हणजे हा अन्याय खात्रीनें बंद होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. बालविवाहाच्या कायद्यानें जसें निदान १२ वर्षांच्या आंतील सर्व कन्यांचें वैधव्य खात्रीनें बंद करतां येईल, तसे जात करून समाजाच्या बऱ्याच भागांतून हा कलंक नाहींसा होण्याची आशा नाहीं. केशवपन केलें नाहीं तर कोणी जातीबाहेर टाकतो असें थोडेच आहे. शारदासदनासारख्या ठिकाणीं त्यांस ठेवून, दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्याच्या दीनस्थितीतून त्यांची सुटका केल्यास कोणी बहिष्कार घालतो असे नाहीं; पण तेंहि करण्यास समाज तयार नाहीं, मग असें ढळढळीत आपणांस दिसत असून वेगळी जात केल्यानें हा अन्याय दूर होईल असें आपण कसें मानावें? हजारों वर्षांच्या सवयीनें आमचीं मनें या गोष्टीसंबंधानें इतकी घट्ट होऊन गेलीं आहेत कीं, त्यांच्यावर कितीहि आघात केले तरी त्यांस कांहींही होत नाहीं. ''बोलणें फार झालें'' ही हाकाटी ''जो उठला तो इंग्रजी शिकतो'' या हाकाटीप्रमाणेंच भ्रामक आहे. या गोष्टींतील अन्याय लोकांस कळून येऊन तो बंद करण्याकडे त्यांची साक्षात प्रवृत्ति होण्यास झालें हें बोलणें व लिहिणें कांहीच नाहीं. प्रत्येक शहरांत, प्रत्येक गांवांत, खेड्यांत यासंबंधानें लोकमत तयार करण्यास झटलें पाहिजे. प्रत्येक सभागृहांत, बाजारांत, चव्हाट्यावर, व्यासपीठावर, कीर्तनांत, पुस्तकगृहांत, जिकडेतिकडे याविषयीं एकसारखी चर्चा चालू झाली पाहिजे, व अशी चळवळ करणाऱ्या सुधारक मिशनरींची जात होईपर्यंत, वेगळी जात करण्यापासून फलप्राप्ती होण्याचा संभव नाहीं.

*

हिच्या नांवानेंही तीच रड

आमच्या वाचकांच्या पारतंत्र्याविरुद्ध, अज्ञानाविरुद्ध, ढिल्या पोषाखाविरुद्ध, तऱ्हेवाईक बहुमोली दागिन्यांविरुद्ध, किंवा आमच्या धर्मातील कित्येक हास्यास्पद आचारांविरुद्ध कोणी कांहीं लिहिलें तर ज्यांचें माथें फिरून जातें असे लोक व्यापारीय किंवा राजकीय विषयांच्या चर्चेचे मोठे चहाते असतील, व व्यापारीय आणि राजकीय खटपटींत आपलें मन घालून त्यासंबंधानें आपल्या पदरास कांहीं खार लावून घेत असतील, असें म्हणावें तर त्याची मोठी शंका आहे. कारण, धार्मिक व सामाजिक सुधारणेविषयीं आमच्या लोकांत जितकी अनास्था व विरोधबुद्धि दिसते, तितकी आस्था व कर्मोद्युक्तता व्यापारीय व राजकीय सुधारणेविषयीं दृष्टीस पडती तर आजमितीस सर्व देशभर येवढी अन्नान्नदशा आणि इतकी परवशता कां दृष्टीस पडती? कोण काय पाहिजे तें म्हणो, आम्हांस तर आलीकडे असें वाटूं लागलें आहे कीं, क्षुद्र स्वार्थसाधनाविषयीं पराङ्मुख होऊन, केवळ राष्ट्रीय किंवा केवळ सार्वजनिक हिताच्या कोणत्याही लहान किंवा थोर गोष्टीसाठीं निरपेक्षबुद्धीनें व निरलसतेनें झटणारा मनुष्य लाखांत एक सुद्धां आढळणार नाहीं! आज ज्या राजकीय हक्कांचा उपभोग आम्ही घेत आहों, किंवा यांत्रिक शिक्षण आणि व्यापारबुद्धि यांविषयीं ज्या थोड्याबहुत सोई करण्यांत आल्या आहेत, त्यांपैकीं एक तरी आमच्या परिश्रमाचें फळ आहे, असें कोणी छातीवर हात देऊन म्हणूं शकेल काय? आपल्या व परक्या राजांपुढें आणि बादशहांपुढें, किंवा धर्मगुरूंपुढें जे आम्ही हजारों वर्षें डोकीं व गुडघे घांशीत आहों, व **'राजा कालस्य कारणम्'** हें परावलंबसूची राजकीय तत्त्व ज्या आमच्या हाडामासांत खिळून गेलें आहे, त्या आम्हीं कोणतीही सुधारणा स्वपराक्रमानें करण्याची व्यर्थ वल्गना कशासाठीं करावी? ज्या जुन्या पद्धतीच्या लोकाना आपल्या गांवाबाहेर किंवा प्रांताबाहेर काय चाललें आहे याची नीट कल्पना नाहीं, अशांनीं जुन्या विचाराला मगरमिठी घालून बसून, त्याविरुद्ध अलीकडील सुशिक्षितानें किंवा सरकारानें येवढेंसें कांहीं करावयाचें म्हटलें कीं, गयावया करीत सुटावें, हें नीटच आहे. जुन्यांपैकीं एखादा महामहोपाध्याय कां घ्या ना? तो म्हणजे तुमच्या राष्ट्रसभेस अनुकूल असेल, आणि संमतीचें वय वाढविण्यास मात्र प्रतिकूल

असेल, असें सहसा व्हावयाचें नाहीं, हें निदान पुण्याच्या लोकांना तरी सांगावयास नको आहे. जितका सामाजिक विचारांचा तितकाच राजकीय अथवा व्यापारीय विचारांचा संस्कार त्यांच्या बुद्धीवर झालेला असतो! अर्वाचीन कालांतील हरएक प्रकारची चळवळ याच्या संकुचित दर्शनामुळें व अज्ञानामुळें त्यास विनाशक व भयप्रद वाटत असल्यामुळें, तो तिचा संसर्ग टाळण्यासाठी तीपासून होईल तितका दूरदूर पळत असतो, आणि आपल्या भेकडपणावर आणि पुराणप्रियतेवर मिथ्या देशाभिमानाचें आणि लोकहितवादित्वाचें अवगुंठन घालीत असतो! असें नसेल तर वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य, स्थानिक स्वराज्य, ज्यूरीची पद्धत किंवा अशाच प्रकारच्या इतर गोष्टींपैकीं अमुक एक गोष्ट संपादण्याविषयीं यानें खटपट केली व ती याच्या मेहनतीनें आम्हांस प्राप्त झाली, असें कोणीं तरी सिद्ध करू दिलें पाहिजे. तात्पर्य, आमचे जुने व बडे लोक जितके सामाजिक सुधारणेविषयीं तितकेच राजकीय व व्यापारीय सुधारणेविषयीं अज्ञान व उदासीन आहेत, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. **असें नसतें तर राष्ट्रसभेच्या नांवानेंही पुनः पुनः तीच रड कां ऐकावी लागती!** पण या राजकीय परिषदेचें महत्त्व तरी कळतें आहे कोणाला? मांडलिकांना, छोटेखानी राजेराजवाड्यांना, व मोठमोठ्या जहागीरदारांना असें वाटत आहे कीं, ही सामान्य लोकांची सभा महाराणीसरकारची दुस्मानगिरी करणारी आहे, आणि म्हणून तीस आपली अनुकूलता आहे असें दाखविणें, किंवा कोणत्याही प्रकारें तिला मदत करणें, हें पोलिटिकल अधिकाऱ्यास आपल्या राजनिष्ठेविषयीं अंदेशा येण्यास कारण होणार आहे. सबब, तीपासून आपणांस जितकें अलिप्त राहवेल तितकें आपण राहिलों तरच आपल्या गाद्या व आपले मुलूख कायम राहून, प्रजेच्या जिवावर आपली चैन चालणार आहे! हिंदुस्थानांत लहान मोठीं मिळून पांचशें संस्थानें तरी असतील. इतक्यांनीं राष्ट्रसभेस प्रतिवर्षी अगदीं स्वल्प मदत केली तरी तिची किती दगदग चुकणार आहे. पण जर या संस्थानिकांस असें वाटत असेल कीं, या सभेस आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें साहाय्य दिलें तर लाट साहेब आपणांस फांशीं देतील! अथवा आपला मुलूख खालसा करून आपल्या हातीं चौपदरी देतील, तर राष्ट्रसभेच्या फंडास एक रुपया तरी देण्याची त्यांची छाती कोठून होणार? या आमच्या लिहिण्यास मुळींस अपवाद नसेल, असें आमचें म्हणणें नाहीं. पण असला तरी तो इतका स्वल्प आहे कीं, त्यामुळें आमच्या सामान्य विधानास क्षीणता न येतां, उलट त्यांचें पुष्टीकरणच होतें. ही या धनाढ्य बड्या लोकांची दशा! आतां सरकारी नोकर; ते तर बोलून चालून सरकारी नोकर! ते केवढेही पगारवाले व अक्कलवाले असले म्हणून राष्ट्रसभेच्या कामास उघडपणें मदत करतील कीं

काय? करतील, तर दुसरे दिवशीं आपल्या अधिकारास मुकतील व अन्नास मोताद होतील! आपला नोकर राष्ट्रसभेस अनुकूल झाला, आणि तिच्या प्रीत्यर्थ कांहीं हालचाल करूं लागला तर आपली घडगत होणार नाहीं, अशी सरकारास दहशत पडून, त्यानें म्युनिसिपॅलिटया आणि लोकल बोर्ड्स् यांतील गरीब मेंढरांच्या संबंधानेंही खरमरीत ठराव करून सोडिले आहेत. राहतां राहिले शहाणेसुर्ते शेटसावकार. हे तुमच्या जुन्या लोकांप्रमाणेंच राष्ट्रसभेविषयीं गूढ अज्ञानांत आहेत. राष्ट्रसभेत मदत करण्यानें प्राप्तीवरील कर झद्दिशी कमी होता, किंवा एखाद्या मोठ्या जिनसावरील जकात उठती; तर त्यांनीं तुमच्या राष्ट्रसभेत रुपयामागें दमडीटोलीची मदत केली असती. पण तसें करून दाखविण्दाचें सामर्थ्य सभेच्या अंगांत नसल्यामुळें, हे लोक तीविषयीं अगदीं बेफिकीर आहेत, असें म्हटलें तरी चालेल. बाकीं, राहिलेल्या नांगऱ्यांचा इतर विचार करण्याचीच गरज नाहीं. ते बोलून चालून नांगरे! हवी तितकीं राज्यांतरें व धर्मांतरें झालीं तरी त्यांचा संसर्ग त्यांपर्यंत अद्यापि कधींच जाऊन न पोहोंचल्यामुळें ते वैदिक कालापासून आहेत त्या स्थितींत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. येणेंप्रमाणें येथील अनेक प्रकारच्या वर्गांतील लोकांची हालहवाल असल्यामुळें इतर संस्थांप्रमाणें आमची राष्ट्रसभाही अशी तशीच चालली आहे, व दुर्दैवानें ह्यूम तिचें चिटणीसपण सोडतील, तर ही आणखी दहा-पांच वर्षें चालेल किंवा नाहीं, याची शंका आहे! तर मग आतां करावें तरी काय? निरुपाय म्हणून स्वस्थ बसावें कीं, कांही धडपड करून पाहावी? अर्थात् ज्याला अर्वाचीन सुशिक्षणाचा कांहीं संस्कार झाला असेल तो कांहीं धडपड करून पाहावी असें म्हणेल हें उघड आहे. पण ही धडपड कोणीं करावी? आमच्या मतें ती करणें सद्यःस्थितींत आमच्या वकिलांचें व पत्रकर्त्यांचें कर्तव्य आहे. पैकीं पहिल्यांकडून तें थोडेबहुत बजावलें जाते; पण दुसऱ्यांकडून मात्र तें हवें तसें वढूं लागलें नाहीं. या आरोपाचा पुरावा पुढेंमागें दिला पाहिजे, नाहींतर बेअब्रूची फिर्याद करून घेण्यास तयार झालें पाहिजें, हें आम्ही जाणून आहों!

✱

मूळ पाया चांगला पाहिजे

धर्मसुधारणा, आचारसुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे वर्ग केवळ व्यवस्थेकरितां केलेले आहेत. त्यांपैकीं अमुकास पहिला नंबर, अमुकास दुसरा नंबर, अमुकास तिसरा नंबर, असें कांहीं ठरवितां येणार नाहीं. ते सर्व मनुष्यांच्या वेगळाल्या व्यवहारांचे व्यंजक होत, व त्या सर्वांची एकसमयावच्छेदेंकरून सुधारणा होत जाणें, म्हणजेच मनुष्यांची किंवा त्यांनीं वसविलेल्या राष्ट्रांची सुधारणा झाली, असे म्हणतां येईल, हें आम्हीं वेळोवेळीं दाखविलेंच आहे. परंतु तें सर्वांस संमत नाहीं, असें भोंवतालच्या स्थितीवरून दिसतें. कित्येकांस वाटतें कीं, राजकीय सुधारणा सोपी आहे. सामाजिक सुधारणेविषयीं जशीं रणें पडतात, तशी या राजकीय सुधारणेची गोष्ट नाहीं. त्याविषयीं सर्व लोकांचें एकमत आहे. याकरितां सामाजिक सुधारणेविषयीं व्यर्थ खटपट करून, लोकांच्या शिव्याशापास पात्र होण्यापेक्षां, व आपसांत कलह माजवीत बसण्यापेक्षां, सर्वांनी एकदिलानें राजकीय सुधारणेच्या मागें लागावें, हा उत्तम पक्ष होय. वरील उपदेश योग्य आहे; अशी आमची खात्री असूनही लोकसमुदायास न रुचणाऱ्या गोष्टी आम्ही आग्रहानें पुढें आणीत असतों, तर त्यांत आमचाच दोष झाला असता. परंतु वरील उपदेश करणारांनीं नुसती वर वर नजर दिली आहे. त्यांनीं शांतपणानें खोल विचार केला असतां, त्यांचें मत खचित आमच्याप्रमाणें झाल्यावांचून राहणार नाहीं, व तें होईपर्यंत, ज्या राजकीय सुधारणेपासून आपले सर्व पुरुषार्थ आपणांस प्राप्त होतील अशी कित्येकांची समजूत आहे, ती राजकीय सुधारणाहि होणें शक्य नाहीं, हें आम्ही दाखविणार आहों.

राजकीय सुधारणा आम्हांस पाहिजे, असें आम्ही कां म्हणतों? तर त्यापासून नफा होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. सामाजिक सुधारणा आम्हांस कां नको? त्यापासून आमचें नुकसान होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. तात्पर्य कोणती गोष्ट इष्ट आहे, व कोणती गोष्ट इष्ट नाही, हें आपण केवळ नफ्यातोट्याच्या तारतम्यावरूच ठरवितों व येथेंच चूक होते. हें आमचें म्हणणें सकृतदर्शनीं चमत्कारिक असें भासेल, व तें तसें भासावें यांतही नवल नाहीं. कारण कीं, आजपर्यंत जगाचे सर्व व्यवहार नफातोट्यावर दृष्टी देऊनच झाले आहेत. हल्लींही

होत आहेत, व पुढेंही होत राहतील, याविषयीं आम्हासही शंका नाहीं. मग असें असून, येथेच चूक होते असें आम्ही कसें म्हणतों, अशी पृच्छा सहज होणारी आहे, व त्यांचें उत्तर देण्याच्या ऐवजीं आम्हीही वाचकांस कांहीं उलट प्रश्न करतों, व त्यांचें जें उत्तर; तेंच वरील प्रश्नाचें उत्तर होय. 'धर्म' या सदराखालीं ज्या शेंकडों बऱ्यावाईट गोष्टी आपण करतों, त्यांपैकीं बहुतेक फायद्याच्या दृष्टीनेंच आपण करतों. अमुक झाल्यास अमुक करीन, तमुक झाल्यास तमुक करीन, अशा अटीवरच शेंकडा नव्याण्णव लोकांचे शेंकडा नव्याण्णव धर्माचार होत असतात हें आपणा सर्वांस माहीत आहेच. बायकांचें वपन कां करावें? तर त्यांच्या कबरीबंधानें नवऱ्यास बांधलें जाऊं नये म्हणून. ऋतुप्राप्तीपूर्वीच कन्येचा विवाह कां केला पाहिजे? तर आपल्या ४२ कुळ्या नरकांत जाऊं नयेत म्हणून. सती कां जावें? तर तसें केल्यानें अनंत कालपर्यंत स्वर्गसुख मिळेल म्हणून. तात्पर्य, काहींना कांहीं फायदा होईल; अशी खरी किंवा खोटी समजूत झाल्यावांचून, तो तो मनुष्य तें तें धर्माचरण करीत नाहीं. परंतु असें असूनही निष्काम भक्तीचा महिमा अधिक कां वर्णिला जावा; या प्रश्नाचें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास आमच्याही म्हणण्याचा अर्थ समजेल. अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर तें माझें कर्तव्य आहे म्हणून, व अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर त्यापासून मला फायदा होतो म्हणून, या दोन गोष्टींत फारच मोठा भेद आहे. आपलें कर्तव्य समजून एखादी गोष्ट करणारा मनुष्य जसा नेटानें व निश्चयानें ती करतो; तसा फायद्यावरच नजर देणारा मनुष्य करूं शकणार नाहीं.

वरील गोष्टी आतां आपण लोकांस प्रिय असणाऱ्या राजकीय सुधारणेसच लावून पाहूं. कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत असें राष्ट्रीय सभेचे चालकही म्हणतात, व इतर सर्व लोकही म्हणतात. परंतु या दोघांची दृष्टी अगदीं वेगळी आहे. ज्या कायद्याचा अंमल अमुक एका लोकसमुदायावर होत असेल, तर कायदे करणें हा केवळ त्याच लोकसमुदायाचा हक्क आहे; ते करण्याचा दुसऱ्या कोणासही अधिकार नाहीं, हें प्रमेय पुढें ठेऊन वर्तन करणें, व ज्याचे त्यानें कायदे केल्यास त्यापासून अधिक सुख होतें; हा सिद्धान्त पुढें ठेऊन वागणें यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. पुराणांतरीं वर्णन केलेल्या रामचंद्रापेक्षांही अधिक न्यायी, अधिक प्रजाहितैषी असा राजा असून, त्यानें केलेल्या कायद्यापासून प्रजेस कितीही सुख होत असलें, तथापि ते करण्याचा त्यास अधिकार पोंचत नाहीं, या तत्त्वावर नजर देऊन फायद्याकडे दृष्टी न देतां आपले गेलेले हक्क योग्य उपायांनीं मिळण्याकरितां जे लोक, हें आपलें कर्तव्य समजून निश्चयानें यत्न करीत आहेत, ते सामाजिक सुधारणा नको व राजकीय

सुधारणा पाहिजे, असा आग्रहही धरीत नाहींत.

इंग्रज गुन्हेगाराचा न्याय इंग्रज न्यायाधीशानेंच करावा व नेटिव्ह गुन्हेगाराचा न्याय तेवढा वाटेल त्या न्यायाधीशानें करावा, असा पक्षपात कां? गुन्हेगाराचा न्याय तोडणें हें कांहीं त्याच्या रंगावर अवलंबून नाहीं. काळ्या रंगाच्या मनुष्यानें एखादा गुन्हा केल्यास त्याचा न्याय करण्याची ज्यास योग्यता आहे, तोच न्यायाधीश; तोच गुन्हा करणाराचा रंग गोरा असला कीं, त्याचा न्याय करण्यास अपात्र कसा होतो? हे प्रश्न सर्वांस सुचणें अवघड नाहीं. परंतु त्यांचा योग्य निकाल होण्यास नुसतें त्या प्रश्नांचें शाब्दिक ज्ञान उपयोगी नाहीं. प्रश्न करणारांचें अंत:करण व ओठ यांच्यांत विसंगतता असेल, तर त्यानें कितीही आक्रोश केला तथापि व्यर्थ होय. परंतु त्या दोहोमध्यें संगती असेल तर, विशेष आक्रोश करण्याचीही जरूर पडत नाहीं. अंत:करण व ओठ यांच्यांत तारायंत्र सुरूं असेल, तर हळू उच्चारलेल्या शब्दासही विलक्षण जोर येतो व त्यांपुढें सर्वांस मान डोलवावी लागते. खऱ्या साध्वीच्या ईषत् वक्रदृष्टीनें मोठमोठ्या बलाढ्य कामाधांची गाळण उडून जाते. आपण स्वतां अन्यायाचें वर्तन करणारास दुसऱ्याच्या अन्यायाबद्दल बोलण्याचा अधिकार पोचत नाहीं इतकेंच नाहीं; तर उलट त्याची जीभ कचरूं लागते, त्याचा शब्द तोंडांतल्या तोंडांत घोंटाळूं लागतो, व असें झालें म्हणजे सिंहाचें कातडें पांघरणाऱ्या गर्दभाच्या, बाहेर डोकावूं पाहणाऱ्या लंबकर्णावरून, त्याची परीक्षा होते, व त्यास दुसरे भीत नाहींत. इतकेंच नाहीं; तर स्वत:ची फजिती उडण्याची मात्र पाळी येते.

महाराची सावली पडली असतांही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून 'आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झालें? रंगावर कांहीं मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाहीं' वगैरे गोष्टी प्रतिपादूं लागले, तथापि त्यांच्या शब्दांस जोर येण्याचा संभव नाहीं, व त्याचा परिणामही होणें नाहीं. त्या शब्दांस जोर येऊन, इतरांनीं ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, ''ब्राह्मणोऽस्य मुखमासीत'' हे पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून बसण्यात महारास मोकळीक दिली पाहिजे. पुरुषाची बायको मेल्यास त्यास जशी पुनर्विवाह करण्यास मोकळीक आहे, त्याप्रमाणें विधवांसही दुसरा नवरा करण्याची परवानगी पाहिजे. बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नवऱ्याच्या गळ्यास फांस बसतो, तर पुरुषाच्या शेंडीचाही मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये? व एकास जर कोणी संन्याशी करीत नाहीं तर दुसरीला मात्र न्हाव्यापुढें कां बसवावी? पुरुषाला बायको आवडत नाहीं, येवढ्याच शुष्क कारणावरून वस्तुत: काडी मोडून देण्याचा त्यास जर अधिकार

आहे, व तसें करून तो जर धर्मबाह्य होत नाहीं, तर एखाद्या स्त्रीला नवरा आवडत नसल्यास, तिनेही त्याला काडी मोडून दिली, तर तिच्या नांवानें मात्र खडे कां फोडावेत? अटकाव करणे असेल तर दोघांसही करा, नसेल तर दोघांसही मोकळीस द्या. महार आणि ब्राह्मण, विधवा आणि विधुर व स्त्री आणि पुरुष यांच्यामधील अन्यायमूलक व्यवहार बंद करणें, आपल्या स्वत:च्या हातीं असून तें करण्याचो ज्यांना नुसती वासनाही झाली नाहीं, अशा लोकांनीं जिंकणारे व जिंकलेले यांच्यांतील भेद मोडून टाकण्याचा विचार मनात तरीं कशास आणावा? व आणला तरी तो सिद्धीस कसा जावा?

तात्पर्य, लोकानीं आपल्याशी जसें वागावें असे आपणास वाटते, तसेच आपणही दुसऱ्याशीं वागण्यास तयार व्हावयाचें. त्यापासून हित असो वा अहित असो, त्याविषयी विचार करीत बसावयाचे नाहीं. खरें बोलल्यापासून नफा होवो, नुकसान होवो. परंतु तसे करणे हे आपलें कर्तव्य होय, म्हणून जसें खरे बोलावयाचें किंवा नीतीनें वागलें असतां तोटा होईल अशी भीति असूनही जसे नित्याचरण सोडावयाचे नाहीं, तसेंच कोणतीही गोष्ट असो, त्यापासून न्याय होत आहे, किंवा ती करणें आपले कर्तव्य आहे, एवढ्या विचारावर तिच्या मागें लागावयाचें. त्यापासून होणाऱ्या सुखदु:खाची भवतिनभवति करीत बसावयाचे नाहीं, असा पूर्ण निश्चय करून जर लोक सुधारणेची कास धरतील तर ही सुधारणा पाहिजे व ती नको हा तटा मिटणार आहे, व सर्वच सुधारणा एकसमयावच्छेदेकरून होऊं लागतील. हल्लीं राजकीय सुधारणेस सर्व लोक अनुकूल आहेत, असें जरी बाह्यात्कारें दिसलें, तथापि त्यांत जीव नाहीं. राष्ट्रीय सभेसंबंधानें अंत:करणापासून ज्यांनी श्रम केले आहेत, व आपल्या पदरास ज्यांनी खार लावून घेतला आहे, अशा सर्व इलाख्यांतील लोकांची याद केली असतां, ते एकूणएक लोक जितके राजकीय सुधारणेचे चहाते आहेत, तितकेच सामाजिक सुधारणेचे व धर्मसुधारणेचेही चहाते आहेत, असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं; व सुधारक आमचे पुढारी नाहीत म्हणून कंठशोष करणारे लोक जसे सामाजिक सुधारणेच्या विरुद्ध आहेत, त्याप्रमाणेच राजकीय सुधारणेंतही त्यांचें पाठबल तितक्यापुरतेंच आहे, हेंही सिद्ध करून दाखविणें कठीण नाहीं, व यावरून पाहतां सामाजिक परिषदेची उत्तरोत्तर भरभराट हाणें, हेंच राष्ट्रीयसभेच्या खऱ्या भरभराटीचें चिन्ह होय.

*

हे तुमचे पुढारी नव्हत

जुन्या लोकास आम्ही विनयपूर्वक व खात्रीपूर्वक असें कळवितो कीं त्यांनी **प्रो. जिन्सिवाले** व **प्रो. टिळक** अशा लोकांस आपले पुढारी समजू नये. ज्याप्रमाणें आमच्या मतांत व त्याच्या मतांत थोडासा फरक असल्यामुळें, त्यांची सुधारकांत गणना करतां येत नाही असे नाही, त्याप्रमाणे जुन्या लोकाच्या आणि त्यांच्या मतांत जी अल्प साम्यता आहे, तीमुळे ते जुन्या लोकांचे अग्रणी होऊं शकत नाहीत. जर जुने लोक मिथ्या भ्रमाने अशास आपले पुढारी समजून तदनुषंगाने वागू लागतील, तर अखेरीस गोत्यांत पडून पश्चाताप पावतील, याचा आम्हांस बिलकूल संशय नाही। वेद पौरुष आहेत, असा प्रो. जिन्सिवाले यांचा आग्रह आहे. या मताचे ते आज कित्येक वर्षे उघडपणे प्रतिपादन करीत आहेत; व ज्याप्रमाणे गेल्या उन्हाळ्यात त्यांनीं प्रतिपादिलेल्या विशिष्ट मतामुळें त्यांना आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागला तरी त्यांनी त्याची पर्वा केली नाहीं, त्याप्रमाणे पूर्वपद्धतीच्या यच्चावत ब्राह्मण लोकांनीं जर असा आग्रह धरिला कीं, तुम्ही वेद अपौरुष म्हणा, नाहीं तर आम्ही तुम्हांस वाळीत टाकूं, तर प्रो. जिन्सिवाले सगळ्या आचारवान ब्रह्मवृंदांस न जुमानतां, त्यांच्या मताने वेदाच्या अस्तित्वाविषयीं जो ग्रह झाला आहे, तो कधीही सोडणार नाहीत; अशाविषयीं आम्ही पाहिजे तसली पैज मारण्यास तयार आहों! प्रो जिन्सिवाले थोडेसे कर्मठ आहेत, येवढ्यामुळे जुन्या लोकांना त्यांच्या वेदविषयक विलक्षण मताचा राग येत नाहीं, याचा आम्हांस मोठा अचंबा वाटतो! वेदांचें अपौरुषत्व काढून घेतल्यावर वैदिक धर्माचा पायाच नाहीसा झाला, हें त्या धर्माच्या कैवाऱ्यांच्या लक्षांत येऊं नये काय? वेद हे मनुष्यकृत ग्रंथ आहेत, असें प्रतिपादणाऱ्या गृहस्थास; पाहिजे तर अजागळ पत्रकर्ते त्याच्या बाह्याचरणास भुलून जाऊन ते हिंदुधर्माचे या युगांतील आधारस्तंभ आहेत, असे त्यांचे पवाडे गावोत, व त्यांचा स्तुतिपाठक चांगला खुलण्यासाठीं आमच्यासारख्यांचीं हवी तितकी निंदा करोत; पण जे विद्वान शास्त्री किंवा आचारसंपन्न वैदिक आहेत, त्यांनीं श्रीधरपंतांच्यासारख्यांत आणि आमच्यांत विशेष भेद आहे, असे समजणे हा मोठा प्रमाद होय. कांहीं विशेष कारणामुळें आमच्या त्यांच्यांत कितीही अंतर क्षणभर दृष्टीस पडलें, तरी त्यांचें आमचें शिक्षण

एकाच पद्धतीचें असल्यामुळें, सूक्ष्म विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, एकंदरीत ते आम्हांस जितके जवळ आहेत, तितके जुन्या लोकांस नाहींत! प्रो. जिन्सिवाले यांचें असें म्हणणें आहे कीं, ज्याला अनुकूल असेल त्यानें आपल्या बायकोकडून बी. ए. च्या परीक्षेचा देखील अभ्यास करविण्यास हरकत नाहीं. एकदां खुद्द स्वत:च्या पत्नीस पहिली लेडी ग्रॅजुएट करण्याचा त्यांचा विचार होता. तसेच **'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं'** या पंथाचे ते अनुयायी असल्यामुळें, आपल्या बायकोस आपल्याबरोबर हिंडावयाला घेऊन जाणे, ही गोष्ट जरी त्यांच्या हातून होण्यासारखी नाहीं, तरी ज्या बायकांस घरांतील काम करावें लागत नसल्यामुळें कोणत्याही प्रकारचा व्यायाम होत नाहीं; अशांनीं आपल्या नवऱ्यांबरोबर किंवा चाकरांबरोबर सकाळसंध्याकाळ उघड्या हवेत सहल करण्यास जाण्यास हरकत नाहीं, असें त्यांनीं स्पष्टपणें म्हणून दाखविलें आहे. जुन्या पद्धतीच्या किती सुशिक्षित लोकांस प्रो. मजकुरांचीं ही मतें मान्य होणार आहेत? किंवा जर श्रीधरपंत आमच्या बरोबर उद्यां म्हणूं लागले कीं, रामकृष्ण हे कांहीं देवावतार नाहींत; आधुनिक राजांसारखे ते या भरतखंडांत पूर्वकालीं होऊन गेलेले राजे होत; महाभारत व रामायण हे केवळ इतिहासग्रंथ आहेत; भगवंतांनीं अर्जुनास जी भगवद्‌गीता सांगितली, ती प्लेटो किंवा ॲरिस्टॉटल यांच्या नीतिविषयक व वेदांतविषयक ग्रंथाप्रमाणें व्यासांच्या विचाराचें बाड आहे, दुसरें कांहीं नाहीं; एका हिंदु राजानें दक्षिणेकडील मूळच्या लोकांस जिंकून गोदेपासून कावेरीपर्यंत अथवा लंकेपर्यंत आर्य लोकांच्या ज्या वसाहती केल्या त्यांचा इतिहास हेंच रामायण होय; आणि वाल्मिकी हा त्याचा कर्ता होय, अशा प्रकारचे अभिप्राय जर आमच्या पुराणांविषयी ते देऊं लागले, आणि-ते देऊं लागले तर ते असेच देतील याविषयीं आम्हांस बिलकूल शंका नाहीं- तर आमचे शास्त्री व वैदिक त्यांस काय म्हणतील? तेव्हां या भोळ्या जुन्या लोकांस आम्ही येवढेंच सांगतो कीं, दुर्दैवानें आम्हां नवीन पद्धतीच्या लोकांत सध्यां जो स्वल्प मतभेद झाला आहे, तेवढ्यावरून त्यांनीं प्रो. जिन्सिवाले किंवा त्यांसारखेच इतर अर्वाचीन विद्वान् आपल्या पंथाचे आहेत, व त्यांस आपलें धुरीणत्व देण्यास कांहीं हरकत नाहीं, अशा मोहांत त्यांनीं पडूं नये. हा इशारा त्यांनी विशेषत: प्रो. टिळक यांच्या संबंधानें मनांत ठेवण्यासारखा आहे; कारण **रा. रा. बाळ गंगाधर टिळक** हे, प्रसंग पडल्यास, प्रो. जिन्सिवाले यांच्यापुढें जातील, इतकेंच नाहीं, तर जातिबाहुल्यामुळें अगोदरच जेरीस आलेल्या या हतभाग्य देशांत अधिक जाती होऊं नयेत, म्हणून कायद्यानें किंवा लोकमतानें जेवढ्या सुधारणा साऱ्या लोकांस ग्राह्य होतील, अशाच करण्याचे हे दिवस आहेत, असें म्हणणाऱ्या

आमच्यासारख्यांपुढेंही दोन पावलें जाण्यास हे डरणारे नाहींत, हें थोड्या दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या स्वदस्तूरच्या विनंतीपत्रावरून कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. या लेखकाच्या मतांत आणि रा. टिळक यांच्या मतांत, कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें, जमीनअस्मानाचें अंतर असतें, तर नोकरीचा मार्ग सोडून सामान्य देशकार्यासाठीं आम्ही एके ठिकाणीं कधीच आलों नसतों, व बऱ्यावाईट रीतीनें गेलीं दहा वर्षे आमच्या हातून एकत्र निघालीं नसतीं. पण वारंवार होते काय कीं, जसजसें वय वाढत जातें तसतसा मताभिमान आणि आग्रह वाढत जातो म्हणून म्हणा, किंवा कोणत्याही दोन व्यक्तींत केवढेंही मतसादृश्य असलें तरी तीं मतें अंमलांत आणण्यासाठीं ज्या उपायांची योजना करावयाची, त्यांविषयीं त्यांत जो मतभेद उत्पन्न होतो; तो कधीं कधीं मूळ मतांच्या सादृश्याहून प्रबलतर होऊन बसतो म्हणून म्हणा, जे एकदा सामान्य संकल्प करून, स्वार्थाचें किंवा परमार्थाचें कांहीं कृत्य हातीं घेतात, त्यांचा पुढे बेबनाव होऊं लागतो, व शेवटीं त्यांची फुटाफूट होण्याचाही प्रसंग येतो! ज्या **केसरीसाठीं** या लेखकास कारागृहवास सोसावा लागला, व जो त्यानें उदार महाराष्ट्रीयांच्या गुणग्राहित्वामुळें आनंदानें साहिला; त्या पत्राचा आणि याचा वियोग होऊन, हा नवीन **सुधारक** अस्तित्वांत येण्यास, किंवा येथें बऱ्याच प्रतिष्ठेस आलेल्या एका लोकोपयोगी संस्थेच्या मुख्य चालकांपैकीं दोघा गृहस्थांनीं, विशेषत: रा. टिळकांनीं, आपल्या कामाचा राजीनामा देण्यास, अशा प्रकारचा साधनसंबंधक मतभेद कारण झाला आहे, दुसरें कांहीं नाहीं. थोड्याच दिवसांत तुळशीबागेंतील सभेच्या बहुतेक पुरस्कर्त्यांस स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, रा. टिळक हे एका गोष्टीशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें त्यांचे पुढारी होण्यासारखे नाहींत. ज्या सुधारणा आम्हीं कायद्यानें कराव्या, असें म्हणत आहों, त्या लोकांच्या लोकांनींच कराव्या; हें काय तें गरम व थंड्या सुधारकांतील मतभेदाचें मूळ कारण आहे. स्त्रीशिक्षण, बालविवाहनिषेध, वपननिषेध, बालावृद्धविवाहप्रतिबंध, पुनर्विवाह, कन्याविक्रियनिषेध, मदिरापाननिषेध वगैरे सर्व सुधारणा जशा एका पक्षास पाहिजे आहेत, तशा दुसऱ्यासही पाहिजे आहेत. असें असून सध्या उभयतांत जें रण माजलें आहे तें, त्या अंमलांत कोणत्या साधनांनीं आणाव्या, याविषयीं मतभेद असल्यामुळें माजलें आहे. कदाचित् कांहीं दिवसांनीं हें भेदकारण नाहीसें होऊन, सर्व सुधारकांची एकच फळी होण्याचा संभव आहे. आणि सुदैवानें असें झालें तर तुळशीबागेंतल्या सभेचे बहुतेक पुरस्कर्ते काय करतील? ज्या सुधारणांस रा. टिळक अत्यंत अनुकूल आहेत, त्यांचा त्यांनीं कायदेवाल्या सुधारकांविरुद्ध खवळून गेलेल्या तुळशीबागेंतील श्रोतृसमुदायापुढें, इष्ट हेतु साधण्यासाठीं बुद्ध्या

बिलकुल उल्लेख केला नाहीं, व त्या समुदायास मान्य होईल अशा प्रकारची टीका **मि. मलबारी** व **सुधारक** यांवर केली, येवढ्यावरून त्या सभेच्या बहुतेक पुरस्कर्त्यांनीं असे समजूं नये कीं, सामाजिक सुधारणेच्या कामीं सरकारनें सर्व लोकांस लागूं पडणारा कायदा करूं नये, यापलीकडे रा. टिळक यांच्या मतांत आणि आपल्या मतांत कोणत्याही प्रकारचे साम्य आहे. सोळा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नें होऊं नयेत, कोणीं कोणास हुंडा देऊं नये, विधवांचें वपन करूं नये. चाळिसाव्या वर्षांपुढे मुळींच लग्न करू नये, किंवा करणे झाल्यास विधवेशी करावे, मद्याला स्पर्श करूं नये, प्राप्तीचा दहावा हिस्सा सार्वजनिक कामाकडे द्यावा वगैरे गोष्टी ज्यांस मान्य असतील त्यांनी एक मंडळी स्थापून, तिनें त्या अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा; व जो गृहस्थ एकदा अशा मंडळीचा सभासद होईल, तो तीतून पुढे बाहेर पडण्याची इच्छा दाखविल, किंवा हे नियम मोडील तर त्याला सरकारकडून कडक शिक्षा करविता यावी, म्हणून अशी मंडळी रजिष्टर करावी- वगैरे. रा. टिळक याचे विचार तुळशीबागेतील सभेसाठी काढलेल्या निमंत्रणचिठ्ठीवर सह्या घालणाऱ्या गृहस्थांपैकीं कित्येकांस रुचणार आहेत, कोण जाणे! अशा प्रकारची मंडळी स्थापण्याच्या प्रयत्नात रा. टिळक खरोखरीच गुंतले आहेत, असे आम्ही ऐकतो, व ती स्थापण्यात आल्यास ते तिचे सभासद होतील, आणि आतांच बारावे वर्ष लागलेल्या आपल्या मुलीचें लग्न, तिच्या सोळाव्या वर्षांपर्यंत करणार नाहींत याविषयीं आम्हांस काडीयेवढा संशय नाहीं. कारण, रा. टिळकांच्या आणि त्याच्या प्रतिपक्ष्यांच्या विचारात व स्वभावांत केवढाही भेद असला, तरी त्यांना येवढे कबूल करणें भाग आहे कीं, जी गोष्ट एकदां टिळकांच्या मनास रास्त अशी वाटली; तिचा ते कितीही नुकसान झालें किंवा केवढाही लोकापवाद आला, तरी प्रत्यादेश करणार नाहींत हा त्यांचे अगीं प्रशंसा करण्यासारखा गुण आहे. तेव्हां जुन्या पद्धतीच्या लोकांस आम्ही असें विचारतों कीं, टिळकांचे वर निर्दिष्ट केलेले सुधारणाविषयक विचार आणि ते अंमलांत आणण्यासाठीं त्यांनी चालविलेले प्रयत्न तुळशीबागेतील 'प्रचंड' श्रोतृसमुदायापैकीं किती इसमांस अभिमत आहेत, व रजोदर्शनोत्तरही आपल्या मुलीस अविवाहित ठेवणाऱ्या मंडळीचे सभासद किंवा पुढारी टिळक झाले; तर त्या समुदायापैकीं किती वजनदार शास्त्री, किती वैदिक, किती जहागीरदार, नोकरीवर असलेले किंवा पेन्शनदार, किती रावबहादुर व किती सामान्य लोक त्यांस आपल्या सभांचे चिटणीस करण्यास किंवा त्यांवर समाजाचें पुढारीपण सोंपविण्यास तयार आहेत? आम्हांस तर असें वाटतें कीं, ज्यांना आपला पूर्वापार चालत आलेला धर्म, आपल्या रीतीभाती आणि आपले आचार निर्दोष वाटत आहेत, व त्यांत सरकाराने

किंवा सुधारकांनीं फेरफार करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांचे ठाई वैरूप्यता आणून देशाचें नुकसान करणे असें वाटत आहे, त्यांनी वेळीच जागे होऊन, असें समजूं लागावे कीं, प्रो. जिन्सिवाले, प्रो. टिळक, रा. रा. म. चिं. आपटे यांसारख्या अर्वाचीन विद्वान गृहस्थांनीं प्रसंगविशेषीं विशेष कारणासाठी एकाद्या नाबीत जुन्या लोकांच्या छंदाप्रमाणें वर्तन केलें, किंवा जुन्या लोकांच्या एखाद्या मतास आपली अनुकूलता दाखविली, तर तेवढ्यावरून ते आपले पुढारी होण्यास व अर्वाचीन सुधारणांविरुद्ध आपली सेना नेण्यास योग्य आहे हे गृहस्थ खचित नाहींत. जर या गोष्टीचा जुने लोक शांतपणे विचार न करतील, व अशा गृहस्थांकडून मिळणाऱ्या क्षणिक मदतीस भुलून जाऊन त्यांची ते कास धरतील, तर अखेरीस ठार बुडतील, असें आम्हास वाटतें!

*

तर मग जुन्यांचे पुढारी असावे तरी कसे?

अर्थात् ज्यांत जुन्या पद्धतीचे सद्‌गुण पूर्णपणें भरले आहेत व जुन्या लोकांनीं निषिद्ध मानलेल्या गोष्टींपासून जे अत्यंत अलिप्त आहेत, अशा गृहस्थांनींच त्यांचें पुढारीपण पतकरल्यास जुन्या मतांस व जुन्या आचारांस कांहीं वर्षें टिकाव धरतां येणार आहे. 'कांहीं वर्षें असें आम्हीं जाणूनबुजून म्हणतों. कारण, जुन्या लोकांनीं आपले भीष्माचार्यांसारखे योद्धे जरी पुढें घातले तरी अगोदरच मन्वंतर इतकें बदलून गेलें आहे, व इतउत्तर तें इतक्या झपाट्यानें बदलत जाणार आहे कीं, त्यापुढें भीष्मद्रोणकृपादिकांसारख्या पूर्वपद्धतीच्या योद्ध्यांचे कांहींएक चालेनासें होऊन त्यांचा शस्त्रसंपात निष्फल होईल, व कांहींवर तर प्रत्यक्ष डोळयासमोर प्रतिपक्ष्यांनी हस्तगत केलेली विजयश्री पहाण्याची पाळी येऊन, निराशेनें या जगद्रणांगणांतून खेद करीत परलोकास जाण्याचा प्रसंग गुदरेल, असा प्रसंग बराच टाळतां येण्यास एकच उपाय आहे, तो हा कीं पुढारी निवडतांना फार चांगली खबरदारी घेणें. यांत चुकी झाली कीं निवडणारे लोक जुने असोत किंवा नवे असोत, ते उपहास्यतेस पात्र होणारच. समाजाग्रणींत कोणत्याही प्रकारचा दुर्गुण असतां कामां नये. इतकेंच नाहीं तर त्याचे अंगीं प्रशंसनीय सद्‌गुणांचा संकर असला पाहिजे. कित्येक लोकांची अशी समजूत असते कीं, ज्याच्या अंगी एक दोन चांगले गुण आहेत, त्याच्या अंगीं पांच-चार वाईट गुण असले तरी त्याला समाजाचें पुढारीपण देण्यास कांहीं हरकत नाहीं. पण आमच्या मतें ही समजूत फार गैर आहे.ज्याचें सारें आयुष्य द्रव्यार्जनांत किंवा वरिष्ठांची हांजी हांजी करण्यांत गेलें, जो स्वहितासाठीं लोकांचें हवें तितकें नुकसान करण्यास भीत नाहीं, बाटलाबाई ज्याची सखी झाली आहे, ज्याच्या कामुकतेला कशाचाही निर्बंध नाहीं, खोटें बोलण्यांत कांहीं दोष आहे असें ज्यास वाटत नाहीं, जो सत्कृत्यासाठीं उदार हात कधींही पुढें करीत नाहीं, ज्ञान संपादण्याचा ज्याला पराकाष्ठेचा तिटकारा आहे, खोटी मिजास व खोटी प्रतिष्ठा हीं ज्यास अत्यंत प्रिय आहेत, शुष्क वाचालता करण्यांत ज्यास पराकाष्ठेचा आनंद वाटतो, आपल्या थोड्या फायद्यासाठीं गांवाचें किंवा राष्ट्राचें नुकसान करण्यास जो तयार असतो, त्याला दुसऱ्याचें बोलणें ऐकून घ्यावेसें वाटत नाहीं, दुष्कर्मांनीं संपादिलेल्या द्रव्यापासून

उत्पन्न झालेल्या पापाचे क्षालन ब्राह्मणभोजनें घालून देवालयें बांधून, किंवा व्रतवैकल्यें अथवा यात्रा करून होतें, असें जो समजतो; न्याय, सत्य, शांति अनुकंपा वगैरे गुण त्याच्या अंतःकरणांत वसत नाहींत- सारांश ज्याचें नांव ऐकल्याबरोबर किंवा मूर्ति पाहिल्याबरोबर श्रोत्याच्या किंवा प्रेक्षकाच्या मनांत भीति, प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न होत नाहींत- असा मनुष्य लोकाग्रणी होण्यास अगदीं उपयोगी नाहीं. जुन्या लोकांचा पक्ष पडता आहे. तेव्हा निदान त्यांनीं तरी अशा प्रकारच्या दुर्गुणांपासून जो अत्यंत अलिप्त असेल, त्यासच आपला पुढारी नेमण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे.

✷

आम्हाला 'हलकट' कां म्हटले?

गेल्या लेखांत तुळशीबागेंतील सभेची हकीकत देत असतां, एका ठिकाणी कांहीं कारणानिमित्त दोनतीन विशेषणे योजण्यांत आलीं आहेत. त्यांपैकीं 'हलकट' या विशेषणानें बऱ्याच लोकांचें पित्त खवळून गेलें असावे, असें दिसते. त्यासंबंधानें आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, त्या सभेचे पुरस्कर्ते फक्त बेकायदेवाल्यांचीच सभा भरविते, आणि कायदेवाल्यांस किंवा 'कायदेबाजांस' आपण होऊन बोलावून आणून त्यांचा उपमर्द न करते, तर तें विशेषण योजण्याचीच काय, पण त्या सभेविषयीं कोणत्याही प्रकारचा उल्लेख करण्याचीही गरज न पडती. शिवाय, रा. टिळक यांचें सुधारकांच्या संबंधाने उपहासपर भाषण चाललें असतां, ज्यांनीं आनंदप्रदर्शक टाळ्या पिटल्या तेवढ्यांसच आमची विशेषणें लागूं असतां, तुळशीबागेंत जेवढे लोक जमले होते तेवढ्या साऱ्यांस उद्देशून आम्हीं तीं विशेषणें योजिलीं असावीं, असा तर्क करून पोकळ रागाचें अवडंबर घालण्यांत काय अर्थ आहे? तुळशीबागेंत ज्याप्रमाणें रामशास्त्र्यासारखी एका प्रकारची मंडळी होती; त्याप्रमाणेच आ. रा. म. ब. नूलकर, आ. रा. ब. रानडे, व डॉक्टर भांडारकर यांसारखी दुसऱ्या प्रकारचीही मंडळी होती. या मंडळींस आमच्याकडून कालत्रयींही असलीं विशेषणें लागण्याचा सभव नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां तुळशीबागेंतील समग्र श्रोतृजनास तीं विशेषणें लावण्याचा इरादा नव्हता हेंही उघड आहे. तथापि गांवभर ढोलकीं वाजवून गोळा केलेल्या येवढ्या मोठ्या समाजांतील व्यक्तीन् व्यक्ती ज्याअर्थी या सभेच्या पुरस्कर्त्यांस सभ्य किंवा 'हलकटा' चा प्रतिभावी दिसत असावा, असें त्यांच्या मनाचा प्रतिध्वनि काढणाऱ्या कित्येक स्थानिक पत्रांतील लेखांवरून व आम्हांकडे आलेल्या पत्रांवरून अनुमान करण्यास जागा होत आहे; त्याअर्थीं त्यांच्या सभ्यतेची व्याख्या आमच्या सभ्यतेच्या व्याख्येहून फार निराळी असावी, असें वाटतें. तथापि, जर या पत्रांत त्यांच्यासंबंधानें अशा तीव्र विशेषणांची योजना न व्हावी अशी त्यांची इच्छा असेल, तर त्यांनींही सुधारकांच्या संबंधानें कोठेंही बोलतांना किंवा लिहितांना तोंड आटोपून बोलत जावें म्हणजे झाले! जोपर्यंत त्यांचेकडून असें होणार नाहीं; तोपर्यंत क्रियाप्रतिक्रियेचे नियमास खळ पडेल असें आम्हांस वाटत नाहीं! अशा

संबंधाने बेअब्रूच्या फिर्यादीचा बागुलबोवा आम्हांस दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यास आम्ही पक्के जाणून आहो! उभ्या वर्गांतील कांही इसमांस उद्देशून अशी भाषा सकारण लिहिण्याबद्दल शेंडीजानवें टाकून देण्याचा प्रसंग ज्यावेळेस आम्हांवर येईल; त्यावेळेस निदान चारदोन वृद्धतरुण पत्रकर्त्यांस तरी येरवड्याच्या आनंदगृहांत सामाजिक विषयांची मनमुराद चर्चा करण्याकरतां आम्ही आपल्या बरोबर घेऊन जाऊं, अशी आमची पक्की खातरी आहे! कोठेंही असलेल्या चांगलेपणास दुखविण्याची आमची इच्छा नाहीं. पण वाईटाला वाईट म्हणण्यास असल्या दटावण्याने सुधारक केव्हांही भिईल, असें दिसत नाहीं!

*

बोलके सुधारक, वागते सुधारक व सुधारणानिंदक

हे लोकांचे तीन वर्ग सुधारणापंथास लागलेल्या प्रत्येक देशांत केव्हाही दृष्टीस पडतात. ज्याअर्थी मनुष्यास चांगल्यावाईटाची निवडानिवड करण्याची बुद्धि व जें वाईट असेल त्याचा त्याग आणि चांगल्याचें संपादन करण्याचें मानसिक व शारीरिक सामर्थ्य आहे; त्याअर्थी पशूप्रमाणें त्याची स्थिति स्थिर न राहतां, कालमानाप्रमाणें तींत कमी-अधिक बदल होत जाणें स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें कालाचा क्रम थांबविणें अशक्य आहे, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या स्थित्यंतरास खळ पाडणें अशक्य आहे. तथापि हें सत्य अज्ञ लोकांच्या लक्षांत नीट न येत असल्यामुळें, व आपण ज्या स्थितींत आहों तीच स्थिति अत्युत्तम असें अप्रबुद्ध जनावरांप्रमाणे त्यांस वाटत असल्यामुळें, कोणत्याही रीतीनें त्या स्थितींत बदल करूं पाहणारांचा ते द्वेष करतात, आणि त्यांचे श्रम निष्फळ होण्याचा आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करतात. अशा नित्य कलहामुळें समाजांतील अवयवांचे प्रथम दोन स्थूल विभाग होतात; एक पुराणप्रियांचा व दुसरा सुधारकांचा. पुढें दुसऱ्याचे दोन पोटभेद होतात; एक बोलक्या सुधारकांचा व दुसरा वागत्या सुधारकांचा. ज्या वेळेस कांहीं केलें तरी समाजांतील बहुतेक लोक चांगल्या गोष्टीचा विचार करावयाचे नाहींत; इतकेंच नाहीं, तर जो ती करण्यास प्रवृत्त होईल, त्याचा ते छल करण्यासही सोडीत नाहींत अशी स्थिति असते; त्या वेळेस बहुधा अनेक प्रकारचे हाल व जाचणुकी सोसून व गरज पडल्यांस निराळीं जात करून घेण्यास किंवा मरण्यासही तयार होऊन, आपल्या विचाराप्रमाणें आचरण करण्यास प्रवृत्त होणारे मताभिमानी सुधारक फार निघतात. आजपर्यंत नवीन धर्मपंथाचे जे स्थापक झाले आहेत, त्यांचा इतिहास बहुधा अशा प्रकारचा आहे. साक्रेतीस, बुद्ध, महंमद, ख्रिस्त, ल्यूथर, राममोहन किंवा दयानंद यांपैकीं लहानमोठ्या प्राचीन किंवा अर्वाचीन पाहिजे त्या महत्पुरुषाचें चरित्र घ्या, त्यावरून असें दिसून येईल कीं, ज्या सुधारणा झाल्याच पाहिजेत असा त्यांच्या मनाचा दृढ ग्रह झाला होता, त्या सुधारणांस तत्कालीन बहुजनसमाज अत्यंत प्रतिकूल असल्यामुळें, एक तर आपला हेका आपण सोडावा, किंवा लोक जेवढा त्रास देतील तेवढा सहन करण्यास तयार होऊन आपला हेका आपण चालवावा- याशिवाय त्यांना दुसरा मार्ग नव्हता.

अशा स्थितींत लोकांच्या निष्ठुर दुराग्रहामुळें सुधारकांच्या अंत:करणांत पेटलेली ज्वाला लोकांच्या उपरोधक फुंकरांनीं न विझतां, अधिक जोरानें भडकूं लागते, आणि ती त्या सुधारकास मनाप्रमाणें आचरण करू लागल्याशिवाय चैन पडूं देत नाहीं. मनाची अशी अवस्था झाली असतां, विचाराप्रमाणें न वागण्यापेक्षां लोकांनीं केलेला छल सोसणें हेंच अधिक सह्य व सुखावह वाटतें; आणि म्हणून अशा काळांत वागते किंवा करते सुधारक निपजतात.

परंतु ज्या वेळेस ज्ञानप्रसारामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें लोकांची दुराग्रहबुद्धि किंचित शिथिल झालेली असते, व चर्चा केल्यानें, समजुतीच्या दोन गोष्टी बरेच दिवस सांगत राहिल्यानें, आणि अशाच प्रकारचे सामोपचाराचे दुसरे उपाय केल्यानें ते आपणांस हळूं हळूं हवें तसें वागूं देतील इतकेंच नाहीं, तर आपले अनुकरणही करू लागतील, अशीं चिन्हें दिसत असतात, त्यावेळेस लोकांपासून तुटून निघून किंवा त्यांचे यथेच्छ 'छी थू' करून घेऊन, आपली जात निराळी करण्यास किंवा लोकांशीं रक्तस्रावाचें रण माजविण्यास प्रवृत्त होणारे सुधारक निघत नाहींत. तात्पर्य, अशा दोन प्रकारच्या सुधारकांचे दोन वर्ग निघण्याच्या विशिष्ट वेळा आहेत. सध्यां आमच्या देशांत विशेषत: बोलके सुधारकच निघण्याची वेळ आहे; म्हणून जे बोलके सुधारक आहेत त्यांस सुधारणानिंदकांनीं किंवा वागत्या किंवा करत्या सुधारकपणाची फुकट ऐट मिरविणारांनीं "तुम्ही करून किंवा वागून कां दाखवीत नाहीं? स्वतंत्र जात कां करीत नाहीं?" असले अडाणीपणाचे प्रश्न विचारूं नये! फार कशाला? तुमच्या वागत्या किंवा करत्या टिळक सुधारकाचेंच उदाहरण घ्या. ज्यानें उपप्रतिसूचनेंत १६ वर्षांच्या आंत मुलीचें लग्न करूं नये, व प्राप्तीचा एक दशांश सार्वजनिक कामाकडे द्यावा, अशीं कलमें घातलीं; त्यालाच त्यासंबंधानें साक्षात् कांहीं करण्याच्या हेतूनें लोकांपुढें येण्याची बुद्धि झाली, तेव्हां सोळाचा आंकडा चौदावर व एक दशांशाचा एक विसांशावर आणून ठेवणें जरूर आहे, असें वाटलें किंवा नाहीं तें पहा! तसेंच, अशा रीतीनें स्थापलेल्या मंडळींपैकीं कोणत्याही इसमानें प्रतिज्ञाभंग केला असतां त्याला दंडण्याकरितां सरकारची मदत घेणें अवश्य आहे, असें वाटलें किंवा नाहीं तेंही पहा! तात्पर्य, या वागत्या किंवा करत्या सुधारकास प्रत्यक्ष क्रियेचा विचार मनांत आणिल्याबरोबर जर इतकी पीछेहाट करावी लागली, व "विधि, विकल्प, आणि निषेध" या त्रयीचें रडगाणें गावें लागलें, तर यासंबंधानें खरोखरींच कांहीं करून दाखविण्याचा प्रसंग आला असतां, बोलक्या सुधारकांप्रमाणें ते दहा-सोळा किंवा अकरा-सतरा तरी कबूल करतील किंवा नाहीं, याची मोठी शंका आहे! व अशी शंका येण्यास थोडासा आधारही

झाला आहे. कारण चौदा म्हणजे संपूर्ण तेरा असा अर्थ आधींच निघूं लागला आहे, असें ऐकतों! तेव्हां या कालांत बोलक्या सुधारकांची आणि पोकळ डौलाखातर स्वत:स वागते **सुधारक** म्हणवून घेणारांची वास्तविक स्थिति एकच आहे, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां सुधारणानिंदकांकडे किंचित् वळूं. यांची गतही पहिल्या दोघांप्रमाणेंच आहे. हें आपल्या बोलण्याच्या ऐटींत आपण समाजाचे स्थिरस्थाणू आहों, समाजास कल्याणकारक गोष्टी कोणत्या त्या आपणांसच समजतात, व त्यांचे संरक्षणकर्ते आपणच आहों, अशी आपल्या मनांतल्या मनांत व उघडपणें फुशारकी मिरवीत असतात. पण ज्याप्रमाणें पंचाक्षऱ्यानें भारलेलें भूत त्याच्या पाठीमागें, आरडाओरड करीत कां होईना, पण कसें तरी जातच असते व त्याला वाटेल त्याप्रमाणें वागत असतें, याप्रमाणें इंग्रजांसारख्या परक्या लोकांचा अंमल; सुधारणाविषयक त्यांचे विचार; त्यांकडून आम्हांस मिळत असलेलें शिक्षण; कामधामाच्या निमित्तानें प्रत्येक दिवशीं त्यांशीं होत असलेला व्यवहार; त्यांनीं आपल्याबरोबर इकडे आणिलेल्या नानाप्रकारच्या यांत्रिक सुधारणा आणि स्थानांतराचीं साधनें- वगैरे गोष्टींनीं पंचाक्षऱ्याच्या मंत्राप्रमाणें भारून टाकलेला आमचा सुधारणानिंदकगण; डॉक्टरांची औषधें नि.शंकपणें घेऊन अप्रत्यक्ष रीतीनें मदिरा सेवन करीत आहे, आगगाडींत व आगबोटींत प्रवास करतांना हव्या त्या जातीच्या लोकांशीं चिकटून बसून जातीचे पाश शिथिल करीत आहे, साहेब लोकांशीं नित्य 'शेक हँड' करून किंवा त्यांच्या टेबलापाशीं खरडे घाशीत बसून पाहिजे तसला विटाळ प्रतिदिवशीं घरीं आणीत आहे, आगगाड्यांच्या किंवा आगबोटींच्या वेळा साधण्यासाठीं आणि लांबीचे प्रवास झपाट्यासरशीं उरकून घेण्यासाठीं स्नानसंध्येचा प्रत्याहार करीत आहे किंवा तीस कधीं कधीं मुळींच फांटा देत आहे, वर्तमानपत्रांत किंवा इतर ठिकाणीं होत असलेल्या चर्चेमुळें न कळत लग्नाचे वय हळूं हळूं वाढवित आहे, स्त्रीस अधिकाधिक स्वातंत्र्य देऊं लागला आहे, स्वेच्छेविरुद्ध धर्मविनाशक शाळांत आपलीं मुलें पाठवीत आहे, कामकाजाच्या संबंधानें हव्या त्या जातीच्या लोकांशीं स्नेह व व्यवहार करीत आहे, श्राद्धश्रावण्यादि धर्मकर्मांपासून कांहीं तरी प्राप्ति व्हावी, येवढ्यासाठीं सुधारकांच्या तब्येतीप्रमाणें त्यांस हव्या त्या कलावर नेत आहे, व कधीं कधीं त्यांचेकडून कांहीं कामें करून घेण्यासाठीं आपले हेके सोडीत आहे, हें त्यांचें लक्षांत न यावें, व जे लोक जाणूनबुजून अमुक सुधारणा केल्याच पाहिजेत असें उघडपणें प्रतिपादित आहेत, किंवा त्या स्वशक्तीप्रमाणें अमलांत आणीत आहेत, त्यांची थट्टा करण्यास त्यानें प्रवृत्त व्हावें, हें आश्चर्य नव्हे काय? अथवा यांत आश्चर्य तरी कसलें? अंतर्दृष्टि करून न

पाहणाऱ्या अज्ञ जनांनीं असें वागणें व बोलणें हेंच त्यांस उचित आहे. त्यांच्या स्थितींत जें अंतर पडत आहे तें त्यांना न समजतां घडून असल्यामुळें, आपली स्थिति कायमच आहे, असें यांस वाटणें, हें फार स्वाभाविक आहे! पण हा त्यांचा भ्रम आहे, हें कोणाही समजंस पुरुषाच्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे. या सुधारणानिंदकांचा आणखी एक असा भ्रम आहे कीं, **बोलके सुधारक** काय ते अलीकडेच दृष्टीस पडूं लागले आहेत. पण खरी गोष्ट तशी नाहीं. सुधारकांची ही जात पूर्वीपासून आहे! उदाहरणार्थ, आपले पुराणिक, हरिदास, भिक्षुक, कर्मठ शास्त्री, जोशी किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही वर्गांतील लोक घ्या. लोकांस धर्मोपदेश करावा, त्यांस नीति पढवावी, व स्वतःच्या पवित्र व शुद्ध आचरणानें लोकांस उदाहरण घालून द्यावें- हें या पूर्वपद्धतीच्या सुधारकाचें कर्तव्य होय. पण हें कर्तव्य नीट बजावणारे असले किती सुधारक निघतील बरें? स्त्रियांस मंत्रोपदेश करण्याच्या निमित्तानें त्यांस व्यभिचारपंकांत गूढ गोंवून टाकणारे, पोथीपुढे ठेवलेल्या तांदुळाचे गाठोडें बाजारी अंगवस्त्राच्या घरीं नेऊन सोडणारे, लोकांस नीतीच्या व निर्लोभाच्या गोष्टी सांगून घरांतल्या घरांत किंवा परक्याच्या घरीं हवा तसला अनाचार करणारे, किंवा पैशासाठीं प्राण सोडणारे, अथवा भस्माचे लांबलचक पट्टे, मुद्रांचे छाप, दर्भाच्या मुष्टी, शालजोड्यांचे लपेट, रेशीमकाठीं धोतरांच्या निऱ्या, रुद्राक्षांच्या व स्फटिकांच्या माळा, टाळ व करताल इत्यादि वाद्यें, नाना प्रकारचीं भजनें व नाच व गीत, व जीवात्मा आणि परमात्मा यांतील भेदाभेदाविषयीं कधीं कधीं समजणारी व कधीं न समजणारी चर्चा; इत्यादि धार्मिकपणाच्या दिखाऊ साधनांनीं बायाबापड्यांस व अज्ञ पुरुषांस बुचाडणारे पहिल्या चालीचे दुर्वृत्त दांभिक सुधारक काय थोडे आहेत? पण त्यांना शेणमार करण्याची, अपंक्त करण्याची, किंवा अलीकडील बोलक्या सुधारकांवर जी वाक्यशरांची वृष्टि होत असते, तशा प्रकारची वृष्टि त्यांवर करण्याची इच्छा कधीं कोणास झाली आहे काय? कधीं नाहीं. कारण चांगली गोष्ट हातून प्रत्यक्षपणें न घडली तरी ती सांगत फिरणें कांहीं दोष नाहीं, असा मनुष्यांचा पक्का समज होऊन गेला आहे, असें त्यांच्या अशा प्रकारच्या आचरणावरून उघड होते. तेव्हां सुधारणानिंदकांनी सध्यांच्याच बोलक्या सुधारकांवर इतकें तुटून पडणें शुद्ध वेडेपण होय. वाद करतां करतां ज्या चांगल्या गोष्टी ठरतील त्यांचा अंगीकार त्यांच्याकडूनच काय, खुद्द सुधारणानिंदकांकडूनही हळूं हळूं होत जाईल, अशी आमची पक्की खातरी आहे!

*

मि. अशबरनर आणि अनाथ हिंदू विधवा

मि. अशबरनर यांची आमच्या वाचकांस बहुधा बरीच चांगली ओळख असेल. तथापि 'न्याशनल रिव्ह्यू' नांवाच्या मासिक पुस्तकांत त्यांनीं नुकताच जो लेख लिहिला आहे, त्यांत आमच्या हतभाग्य हिंदु विधवांवर त्यांनीं जे असभ्य, खोडसाळ, व असत्यप्रचुर आरोप लादले आहेत, ते लादण्याइतक्या नीचतरपदावर साहेबमजकूर घसरतील, असें कोणासही वाटलें नसेल! नेटिव्ह लोकांच्या अलीकडील चळवळीपासून आपल्यावर मोठा अनर्थ कोसळेल, म्हणून वेडावून जाऊन, नेटिव्हांवर अद्वातद्वा आरोप आणणारे इंग्रजबहादूर आमच्या पुष्कळ पाहण्यांत आहेत. परंतु या द्वेषामुळें नेटिव्ह स्त्रियांची, व विशेषेंकरून निराश्रित असलेल्या हिंदु विधवांची, विटंबना करण्यास ते प्रवृत्त झालेले फारसे कोठें पाहण्यांत येत नाहीं. **इलबर्ट** बिलाच्या वेळी प्रसिद्धीस आलेले वक्तृशिरोमणी **ब्रानसन्** हेही इतक्या पल्ल्यापर्यंत पोंहोचले नव्हते. तेव्हां स्त्रीदाक्षिण्याविषयीं ज्यांची योग्य प्रकारें जगभर ख्याती आहे, अशा इंग्रजांपैकीं मि. अशबरनरसारख्या अक्कलवंत, हुशार व नाणावलेल्या साहेबबहादुरांनीं आपल्या पेनाच्या शिंतोड्यांनीं आमच्या अनाथ गतभर्तृकांच्या अब्रूस डाग लावण्यास उद्युक्त व्हावें, व न्याशनल रिव्ह्यूच्या प्रकाशकासारख्यांनी त्याजविषयीं एक अक्षरहि न लिहितां, असल्या घाणेरड्या लेखास प्रसिद्धि द्यावी, हें पाहून कोणास आश्चर्य व खेद वाटणार नाहीं! 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या स्मृतिवाक्याचा अंमल ज्या देशांत जारीनें सुरू आहे, तेथील लोकांनीं, इंग्रज स्त्रियांस पुरुषांसमवेत सहल करतांना, पुरुषसमुदायांतून बसतां उठतांना व परपुरुषांशी निःशंकपणे भाषण करतांना पाहून, व अडाणी व हलकट लोकांच्या मनोरंजनार्थ लिहिलेल्या घाणेरड्या कादंबऱ्या वाचून, व प्रत्यक्ष इंग्लंडचा प्रवास तर दूरच राहिला, परंतु येथील इंग्रज अधिकाऱ्यांच्या गर्विष्ठपणामुळें, त्यांच्या बंगल्याच्या आंतही पाऊल घालण्याची मारामार पडत असल्यामुळें, त्यांच्या नोकरचाकरांपासून निघणाऱ्या कंड्या ऐकूनच, इंग्रज स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयीं भलभलत्या कल्पना केल्या, तर त्यांत विशेष नवल वाटण्यासारखें कांहीं आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु अशा लोकांनींही इंग्रज स्त्रियांविषयीं कोठे प्रसिद्धपणें जरा हूं कां चूं केलें कीं, इंग्रज लोक कसे

खवळून जातात, हें कोणास माहित नाही? मग आपल्या स्त्रीवर्गाच्या अब्रूची ज्यांना इतकी आस्था, त्याच इंग्रज लोकांनीं हिंदु विधवांविषयीं आपण वाटेल तसे प्रलाप केले असतां, त्यापासून हिंदूंच्या अंत:करणासही तसेंच दु:ख होईल, ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत वागवूं नये काय? किंवा 'पद्भ्यां शूद्रोऽजायत' या श्रुतीच्या जोरावर, ब्राह्मणादि उच्चवर्णांची सेवा करण्याकरितांच ईश्वरानें शूद्रांस निर्मिलें आहे, म्हणून जशी आमचीं शास्त्रें मानतात; अथवा अग्निहोत्रीस खळ पडेल, या मिषानें आपली अनिवार कामेच्छा तृप्त करण्याकरितां, मृत स्त्रीस जाळून आल्यावर लागलीच पांढऱ्या केसांच्याही पुरुषांनीं पुनर्विवाह करावा, परंतु विधवेनें आपल्या तरुणपणींही, ''मृतं भर्तारमादाय ब्राह्मणी वन्हिमाविशेत्। जीवन्ति चेत् त्यक्तकेशा तपसा शोधयेद्वपु:।'' म्हणून जसा आमच्या पुरुष शास्त्रकारांनीं निर्णय ठरविला आहे; अथवा गुलामांचा व्यापार सुरू ठेवण्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या कांहीं इंग्रज मुत्सद्यांनीं, काळ्या कातड्याचे लोक गोऱ्यांच्या सेवेकरतांच ईश्वरानें सृजिले आहेत, म्हणून जसें एक महत्तत्व शोधून काढलें होतें, त्याप्रमाणेंच काळ्या कातड्यांच्या आंतील अंत:करणें अपमानबधिर असतात, किंवा सुधारलेल्या गोऱ्या लोकांच्या थट्टेकरितांच ईश्वरानें हिंदु स्त्रियांस वैधव्य आणिलें आहे, असें एखादें अपूर्व तत्त्व, एखाद्या हिंदुद्वेष्ट्या अपूर्व तत्त्वज्ञान्यानें नवीन शोधून तर काढलें नाहीं ना? असें नसतें तर ''हिंदु विधवांस वाटेल तसा अनाचार करण्यास हिंदु समाजानें पूर्ण सनद दिली आहे, तिच्या पापाचरणाकडे समाज जाणूनबुजून दुर्लक्ष्य करितो, तेव्हां अशी अत्यंत स्पृहणीय, व अप्रतिबंध अशी स्वच्छंदीपणाची आयती मिळालेली वृत्ति सोडून देऊन, त्यांच्या कल्याणार्थ केलेल्या कायद्याचा आश्रय घेऊन, त्या आपल्या स्वेच्छाचाराविहारास अडचण काय म्हणून आणतील?'' असे शब्द साहेबबहादुरांच्या पेनांतून खचित निघाले नसते, किंवा असें तर नसेल ना, कीं आपला पुरुषार्थ गाजविण्यास दुसरीकडचे सर्व मार्ग बंद झाले असल्यामुळें, ज्यांच्याविषयी स्वत:चे देशबंधूही अनुकंपा व्यक्त करीत नाहींत, अशा निराश्रित हिंदु विधवांवर आपण आपली तिरंदाजी चालविली असतां आपणांस जयश्री खचित वरील, असा साहेबबहादुरांनीं तर्क केला असावा! व असें असले तर मात्र साहेबमजकुरांचा तर्क खोटा नाहीं, असें आम्हांस कबूल केलें पाहिजे. कारण कीं, उन्नतावस्थापन्न इंग्रज स्त्रिया, आपल्या अब्रूस धक्का पोंचवणारा नेटिव्ह वक्ता किंवा पत्रकर्ता यांची त्रेधा उडवून दिल्याशिवाय जशा आपल्या पुरुषवर्गास स्वस्थ बसूं द्यावयाच्या नाहींत, ती योग्यता आमच्या बिचाऱ्या विधवांच्या आंगीं नाहीं, व त्यांची बाजू घेऊन भांडणारा पुरुषवर्गही नियमितच आहे. तेव्हां साहेबमजकुरांचा तर्क खरा ठरून, त्यांनीं अजिंक्यपत्र मिळविले, याविषयीं आम्हांस संशय नाहीं.

परंतु समंजस लोक या विजयाबद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांची पाठ थोपटण्याऐवजीं त्यांस लज्जेनें खालीं मानच घालण्यास लावतील, यांतही शंका नाहीं.

असो. 'असंमत वैधव्य' या एका शब्दापासून ध्वनित होणाऱ्या असंख्य क्लेशांच्या दडपणानें आधींच चूर होऊन गेलेल्या हिंदु विधवांच्याविषयीं कोणी अनुदार प्रलाप केल्यास तो जर आमच्या अंत:करणास दु:सह होणें साहजिक आहे, तर मग त्या स्वेच्छाचारी आहेत असा निरर्गल आरोप मि. अशबरनर यानीं हिंदु विधवावर्गावर आणलेला पाहून आमचे अंत:करण क्षुब्ध व्हावें, व 'जल तुंबता तडागीं फोडावा लागतो जसा पाट' या न्यायाने मनाच्या शांतवनार्थ आम्हीं आपल्या क्षुब्ध मनोवृत्तीस कांहींसा अनियंत्रित संचार करूं द्यावा, यांत विशेष नवल नाहीं. बाकी एकंदर इंग्लिश राष्ट्र अजूनपर्यंत स्त्रीदाक्षिण्यभ्रष्ट झाले नाहीं, इतकेंच नाहीं, तर तें त्यांचे स्त्रीदाक्षिण्य इतकें समर्थ आहे कीं, ते लोक जेथें जातील तेथें त्यांचा प्रादुर्भाव झाल्यावाचून खचित राहणार नाही, असा आम्हांस पक्का भरंवसा आहे; व मि. दादाभाई नवरोजीस 'काळा' म्हणणाराची ज्यांनी फटफजिती उडवून दिली, ते उदार इंग्रज अशा खोडसाळ लेखाची योग्य तीच किंमत करतील, व अनेक शतकेंपर्यंत मागासलेल्या आमच्या लोकांची अनुदारपणें विटंबना न करितां सर्व दिशांनी आमची उन्नती होण्याकरितां आपली मनापासूनची कळकळ, हितप्रद असा उपदेश, व प्रसंगविशेषीं हाती असलेला अधिकार याचा उपयोग करण्यास मोठ्या आनंदानें प्रयत्न करतील, यांविषयीं आम्हांस तिळमात्र संदेह नाहीं.

मि. अशबरनर यांनीं आणलेला आरोप सर्वथैव मिथ्या आहे, हें विशेष खुलासेवार सिद्ध करण्याची आम्हांस विशेष अवश्यकता भासत नाहीं. तथापि ज्या देशांत पतिव्रतापदप्राप्त्यर्थ लक्षावधि तरुण स्त्रियांनीं पतिचितेवर आपणांस जिवंत जाळून घेण्याचें लोकोत्तर धैर्य दाखविलें, व त्याच्या अभावींही 'विवर्णा दीनवदना देहसंस्कारवर्जिता' होऊन संन्यास वृत्तीचें अवलंबन करून, उपासातापासांनी देह वाळविण्याचें व्रत अनेक युगें चालविलें, त्या देशातील स्त्रियांस 'chartered libertines' (सनदी स्वेच्छाचारिणी) हा किताब देणारानें, आपण काय म्हणतो, याचा त्रिवार विचार करावयास पाहिजे होता. 'स्त्रीणां पतिरेव दैवतं' या सूत्राचा वाटेल त्या स्थितींत अवलंब करणे चुकीचें असेल, सती जाणें हें अमानुष कृत्य असेल, व असंमत वैधव्यही अन्यायाचें असेल; परंतु या सर्व संस्थांपासून स्त्रीजातीवर जसा जुलूम झाला आहे, त्याप्रमाणेंच त्यांची पातिव्रत्यासक्ति इतर राष्ट्रांहून दृढतर झाली आहे, हेंहि प्रत्येक विचारी मनुष्यास

कबूल केले पाहिजे. ज्या इंग्रज लोकांनी हिंदु स्त्रियांच्या चालचलणुकीबद्दल विशेष माहिती मिळविण्याची खटपट केली होती, त्यांचे तरी विचार साहेबमजकुरांनी प्रस्तुत लेख लिहितांना मनात आणावयाचे होते. कर्नल मन्रो हे आमच्या स्त्रियांविषयी असे म्हणतात की 'It would be no slight praise to the women of any nation, even to the ladies of England to have it said that the correctness of their conduct was not inferior to that of Brahmin women and the Hindu women of the higher classes.' (कोणत्याही देशांतील स्त्रियांस, व इंग्लंडच्याही स्त्रियांस, त्यांचे वर्तन ब्राह्मणी किंवा वरिष्ठ हिंदु स्त्रियांहून कमी शुद्ध नाहीं, असा दाखला मिळणें म्हणजे आपली मोठी वाखाणणी झाली, असे मानण्यास हरकत नाहीं.) आणि दुष्ट लोकांच्या भुलथापीने किंवा प्रसंगविशेषीं मनोनिग्रह न झाल्याने वैधव्यव्रतापासून भ्रष्ट झालेल्या काही विधवा असतील, हे जरी खरें आहे, तथापि एकदर विधवांच्या वर्गाविषयीं विचार करितां त्यांचें आचरण एकंदरींत वर निर्दिष्ट केलेल्या सामान्य स्त्रीवर्गाप्रमाणें शुद्ध व स्तुत्यर्हच आहे, हें त्यांच्या शत्रूंसही कबूल करावें लागेल.

परतु यासंबंधाने विशेष चमत्काराची गोष्ट ही कीं, वर सांगितल्याप्रमाणें आमच्या एकदर समाजाची व विधवांची विटबना करणाऱ्या साहेबबहादुरास आमचेच कांही व्यवसायबंधू आपले मित्र समजतात, व पहा 'अशबरनर साहेब देखील कायद्याच्या विरुद्ध आहेत' असे विधान करून आपला पक्ष सबळ करूं पाहतात. त्यास ही गोष्ट कळून येत नाही कीं, विधवांनीं पुन्हां लग्न करण्यास हरकत नाहीं, किंवा त्यांनीं विवाह करण्यास त्यांस अमुक उत्तेजन मिळावें वगैरे कायदे मागणें जर वाईट, तर मग त्यांनी फिरून लग्न करूं नये, किंवा त्या तें करितील या भीतीनें त्यांचें मुंडन करविणें याविषयीं तेवढा कायदा कां पाहिजे? व या कायद्याचा तर आजमितीस प्रत्यक्ष अंमल होत आहे. मि. अशबरनर म्हणतात तसा जर खरोखर प्रकार असता, तर नुसतें उत्तेजन काय, परंतु सक्ती करूनही त्यांच्याकडून पुनर्विवाह केला पाहिजे, असें एक वेळ एकाद्या नीतिभक्तास म्हणतां आले असते. परंतु तशी मुळीच गोष्ट नाहीं. हिंदु विधवा अगदीं अनाचारांत गढून गेल्या आहेत, म्हणून त्यास पुनर्विवाहाची मोकळीक पाहिजे असें कोणी प्रतिपादन करीत नाहीं. एकाद्या मनुष्यास सक्तीनें सद्‌गुणी करण्यांत अर्थ नाहीं व त्या सद्‌गुणातें विशेष मोलही नाहीं. पतिमरणोत्तर वैधव्यव्रताचें आचरण करण्याइतकी ज्यांची मनोनिग्रहशक्ति नाहीं, त्यांस मारून मुटकून संन्यासी करण्यापेक्षां व त्यापासून संभवणाऱ्या पापाचरणास कारणीभूत होण्यापेक्षां त्यांस विवाह करण्याची

परवानगी दिली असतां पापाचरणाची मुळींच भीति राहणार नाहीं, व खऱ्या सद्गुणांचें योग्य मोल लोकांस कळूं लागेल, असो; यासंबंधानें आम्हीं वेळोवेळी अनेक प्रकारें लिहिलें आहे, तेव्हां याविषयीं सध्यांच विशेष विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं.

*

आणखी एक शहाण्याचा कांदा

मागील लेखांत मि. ॲशबर्नर यांनीं आमच्या गतर्भृकांविषयीं ठोकून दिलेल्या अभिप्रायाविषयीं जे चार शब्द लिहिले आहेत, ते वाचकांच्या ध्यानांत असतीलच. हा गृहस्थ या इलाख्यांतील मुलकी खात्यांत तीस वर्षांहून अधिक वर्षें नोकरीवर होता. असिस्टंट कलेक्टरच्या जागेपासून कौन्सिलदाराच्या जागेपर्यंत ज्यानें लहान मोठ्या साऱ्या हुद्यांचीं कामें केलीं, व त्या कामाच्या निमित्तानें नेटिव लोकाशीं ज्यांचें संघटन नित्य घडत असे त्यानें आपल्या तीस वर्षांच्या अनुभवावरून व माहितीवरून "हिंदु विधवा सनदी स्वेच्छाचारिणी" असतात असें आपलें मत स्पष्टपणें ठोकून दिलें आहे! तेव्हां ज्यानें इतकी वर्षें येथें काढलेलीं नाहींत, ज्याला आपल्या विशेष तऱ्हेच्या कर्तव्यामुळें हिंदु लोकांच्या भेटी वारंवार घेतां आल्या नाहीत व ज्याला वाचण्याचा किंवा लिहिण्याचा विशेष नाद असण्याचा संभव नाहीं, अशा एखाद्या लष्करी लढवय्यानें जर असा अभिप्राय दिला कीं, बहुतेक हिंदू स्त्रिया पातिव्रत्यपराङ्मुख आहेत, तर त्याबद्दल त्याला काय म्हणावें? दुसरें काय म्हणावयाचें? अशा बृहस्पतीच्या तोंडांतून पडलेल्या शब्दकुसुमांचा दुर्गंध दुःसह झाल्यास, ती तिरस्काराच्या उकिरड्यावर फेंकून द्यावीं आणि स्वस्थ बसावें हेंच योग्य आहे! पण जर त्या ठिकाणाहूनही त्यांचा किळस आणणारा दर्प घरांत भरूं लागला, तर तो नाहींसा करण्यासाठीं, ज्याप्रमाणें वाख्याची सांथ आली असता शहर सफाई ठेवणारे म्युनिसिपॅलिट्यांचे अधिकारी रस्तोरस्तीं रोगविनाशक तांबडी पूड टाकीत जाऊन तीवर संसर्गप्रतिरोधक अशा एका प्रवाही द्रव्याचें प्रोक्षण करितात, त्याप्रमाणें त्यावर टीकारूप दुर्गंधविध्वंसक द्रव्याचें सिंचन केलें पाहिजे; दुसरा उपाय नाहीं!

लॉर्ड वुइलियम बेंटिक यांचे कारकीर्दीत कॅप्टन ऑगस्टस वुईलर्ड म्हणून एक उत्तर हिंदुस्थानांत लष्करी अधिकारी होता. याच्या ग्रंथांवरून त्याला गाण्याचा शोक फार असावा, असें दिसतें. यानें आमच्या गायनशास्त्राविषयीं जो अभिप्राय दिला आहे, त्यावरून त्याची शोधकबुद्धी व्यक्त होते इतकेंच नाहीं, तर त्याला आपल्या गाण्याचें मर्महीं बरेंच समजलें होतें असें दिसतें. यानें आमच्या गायकांविषयी, वाद्यांविषयी व संगीतकलेविषयीं जें लिहिलें आहे तें वाचून

त्याविषयीं आपल्या अंत:करणांत कृतज्ञता उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं. पण तो येवढेंच करून स्वस्थ बसला नाहीं, हें फार वाईट झालें, **'हिंदुस्थानचे संगीत'** या नावाच्या ग्रंथात त्याला आमच्या गाण्याविषयीं जें लिहावेसें वाटलें तें लिहून गेल्यावर, अनेक संगीतांच्या भाषांतरापासून आमच्या जुन्या चालीरीती कशा प्रकारच्या असाव्या, यांचे अनुमान करण्याचा प्रयत्न त्यानें केला आहे व त्यांत तो अगदीं फसला आहे. कोणत्याही देशांतील लोकांच्या काव्यांवरून किंवा तालसुरांत बसविलेल्या पद्यांवरून त्या लोकांच्या नीतीविषयीं, विशेषत: लिंगविषयक नीतीविषयीं, अभिप्राय देणें मोठें साहस होय, असें आम्हांस वाटतें. कारण 'शृंगार' हा काव्याचा प्रधान विषय असल्यामुळें आणि अतिशयोक्ति ही काव्यरसात्मा होऊन बसल्यामुळें, काव्यांतर्गत स्त्रीपुरुषांच्या उद्गारांवरून कोणत्याही लोकांच्या नीतिमत्तेविषयीं अटकळ करूं गेल्यास तींत प्रमाद होण्याचा फार संभव असतो. **'मिस्टरीज ऑफ धी कोर्ट ऑफ लंडन'** या रेनॉल्डकृत ग्रंथमालिकेवरून इंग्लिश लोकांच्या नीतीविषयीं मत देणें न्याय्य होईल काय? संभावित इंग्लिश लोक उघडपणे ही कादंबरी वाचीत नाहींत, व लोकांच्या दृष्टीस पडतील अशा ठिकाणी तिचीं 'व्हाल्में' ठेवीत नाहीत; कारण बीभत्स शृंगार त्यांत ओतप्रोत भरला आहे, असे सांगतात! तेव्हां ज्याप्रमाणे **मिस्टरीचीं** पुस्तकें आंग्ल नीतीवर निबंध लिहिण्यास बसले असतां आधारभूत मानितां येणार नाहींत, त्याप्रमाणेंच उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान गवय्ये आणि नायकिणी ज्या चिजा गातात किंवा वाजवितात त्यांवरून हिंदु लोकांच्या नीतीचें प्रमाण बांधितां येणार नाहीं. पण असें करण्याचे धाडस आमच्या आजच्या निबंधाच्या नायकानें केलें आहे, व तें आमच्या मते अगदीं चुकलें असल्यामुळें या निबंधाच्या शिरोभागीं आम्हीं त्यास **आणखी एक शहाण्याचा कांदा** असें म्हणून **ॲशबर्नर साहेबांच्या** पंक्तीस बसविलें आहे. आमच्या संगीतशास्त्रांतील स्वररचनेविषयीं व स्वरमेळाविषयीं जे म्हणावयाचे होतें तें म्हटल्यावर, या ग्रंथकर्त्यानें आपलें मन गीतांच्या किंवा चिजांच्या अर्थांत घातले, व तसें केल्याबरोबर त्याच्या लेखणींस स्फुरण येण्यासारखा नवीन विषय त्याचे हातीं लागला! अनेक चिजांच्या अर्थाचें मंथन केल्यावर आमच्या संगीतांत बहुधा ज्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला असतो असें त्याच्या नजरेस आलें, त्या ह्या होत:-

१ अनुकूल होण्याविषयीं वल्लभाची प्रार्थना.
२ वल्लभाच्या विरहामुळें कामिनीस होणारा शोक.
३ प्रतिस्पर्धिनी कामिनीविषयीं द्वेषोद्गार.
४ सासू, नणंदा, किंवा जावा यांचा डोळा चुकवून प्राणेशाची मुलाखत

घेण्याची पंचाईत, व मेखलांतील क्षुद्रघंटांच्या आवाजामुळें कोणास समजूं न देतां घरांतून बाहेर पडण्याची, किंवा रस्त्यांतून जाण्यायेण्याची अडचण.

५ दयितावर ठेवलेल्या प्रेमास सासू व नणंदा यांकडून होणाऱ्या प्रत्यूहाच्या संबंधानें कामिनींचे दुःखोद्‌गार.

६ सखीपाशीं हितगुजाच्या गोष्टींचें कथन, आणि इष्ट मनोरथ पूर्ण करण्याच्या कामीं तिनें सहाय्य करावें, यासाठीं तिची विनवणी.

७ संकेत चुकूं न देण्याविषयीं व प्रेमबंध शिथिल न होऊं देण्याविषयी सख्यांचा उपदेश.

हें आमच्या संगीतपद्याच्या मंथनापासून वुड्लर्ड साहेबांनीं काढलेलें सार किंवा नवनीत! कदाचित् हें त्यांस स्वल्प आयासानें काढितां आलें असेल, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे. पण तसें बिलकुल झालेलें नाहीं. तें काढतांना त्यांस भगीरथ प्रयत्न करावा लागला! हिंदु लोकांच्या गाण्यांतच असे विषय येतात, किंवा आशिया खंडांतील इतर लोकांच्या गाण्यांतही अशाच विषयांचा भरणा आहे, अशी शंका त्यांस उत्पन्न होऊन, आरबी व फारशी चिजांकडे त्यांनी आपली नजर फेंकली, व त्यांवरून त्यांस असें दिसून आलें कीं, हिंदुस्थानांतील स्त्रियांप्रमाणें आरबी स्त्रियांवर मदनाच्या बाणांचा प्रहार होत नसल्यामुळें, त्यांना वश करण्यासाठीं आरबी पुरुष नेहमी उत्कंठ झालेले असतात, व म्हणून आरबी काव्यांत जागोजाग पुरुष स्त्रियांची विनवणी करीत आहेत असें दिसून येतें! फारशी किंवा परशिअन काव्यांत भलताच प्रकार दिसून येतो, त्यांत स्त्रीपुरुषांतील प्रेमास दुय्यम स्थान देऊन, जेथें तेथें पुरुषाभिलाषाचाच उल्लेख केलेला आढळतो. या अमानुष अनुच्चारणीय पापाची आसक्ति या लोकांस कशी लागली असेल ती असो; हें खरें आहे कीं, यांच्या काव्यांत या दुष्ट व्यसनासच आद्यपद दिलें आहे! हिंदूंच्या कवितेंत आरबी कवितेचा व्युत्क्रम आढळतो. हिंदूंच्या संगीत पद्यांवरून हिंदू स्त्रिया अत्यंत कामातुर आहेत, व इष्ट पुरुषास वश करण्याच्या इराद्यानें त्या नानाप्रकारचे उपाय योजीत आहेत, असें दिसून येतें!

याप्रमाणें हिंदुस्थानांतील नायकिणींच्या तोंडीं असलेल्या चिजांच्या अर्थावरून आमच्या बायकांस कामातुर ठरविल्यावर त्या इतक्या कामातुर कशामुळें होतात, यांचा छडा काढण्याकडे वुड्लर्ड साहेब वळले, व त्या कामित्वाचीं त्यांनीं जीं तीन कारणें शोधून काढलीं तीं हीं :- १. हिंदुस्थानांतील पूर्वीची अनवस्था; २. अनेक बायका करण्याची चाल; व ३. हिंदू स्त्रियांचें अज्ञान. या तीन कारणांमुळे पूर्वी हिंदू स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होत, असें वुड्लर्ड साहेबांचें म्हणणें आहे!

हिंदुस्थानच्या सांप्रत स्थितीवरून त्याच्या पूर्वस्थितीचें अनुमान करणें फार चुकीचें होणार आहे, असें या गृहस्थाचें म्हणणें आहे. ती पूर्वस्थिति बरोबर लक्षांत येण्यास सध्यां डोळ्यापुढें ज्या गोष्टी दिसतात त्या अगदीं विसरून गेलें पाहिजे, व इतिहासापासून, काव्यापासून, व इतर ग्रंथांपासून जी माहिती मिळते तीवरून, तत्कालीन स्थितीचें चित्र काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जे कोणी अशा प्रकारचा प्रयत्न करतील त्यांस असें दिसून येईल कीं, त्या वेळची हिंदुस्थानची स्थिति फारच शोचनीय होती. आतांप्रमाणे तेव्हां कोठेही शांतता दृष्टीस पडत नसे; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पायवाटांनीं जावें लागे; साऱ्या देशांत चार दोन देखील मोठ्या सडका नव्हत्या. मार्गांत चोरांचें भय मोठें असे; रस्ते सांपडण्याची मारामार पडे; वाटेंत भेटेल त्यास रस्ता विचारून पुढें चालूं लागावें तर कदाचित् त्याच्या सांगण्यावरून चोराच्या हातांत आपण होऊन पडूं कीं काय, अशी दहशत वाटत असे; जिकडे तिकडे दाट झाड्या, ओसाड रानें किंवा चिखलाच्या दलदली असत, व त्यांत भयंकर श्वापदें संचार करीत असत; यामुळें कोणालाही आपला गांव सोडून एकट्यादुकट्यानें फार लांब जाववत नसे, रात्रीं प्रवास करणें बहुधा अशक्यच असे; ज्याप्रमाणें जमीनीवरचा त्याप्रमाणें पाण्यावरचा प्रवासही अत्यंत संकटावह असे. अशा स्थितींत दूरचा प्रवास करावयाचा म्हटला त्याचे बेत पूर्वी वर्ष दोन वर्षें चालत; व तो करण्याकरितां निघण्याचा प्रसंग येऊन ठेपला म्हणजे कुटुंबांतील माणसांत, विशेषत: ज्या तरुणींचे पति प्रवासावर निघालेले असत, त्यांच्या अंत:करणांत दु:खाचा अनिर्वाच्य कल्होळ होत असे.

अशा रीतीनें प्रवास करण्यासाठीं घर सोडून गेलेल्या तरुणांच्या तरुण पत्न्या चिंतेनें व विरहव्यथेनें व्याकुळ होत्सात्या मोठ्या कष्टानें आपले दिवस कंठीत. त्यांच्या नणंदा व जावा सकाळी उठून वेणीफणी करीत आहेत, दागदागिने घालीत आहेत, व एकमेकींचा विनोद करीत आहेत, हें पाहून या विरहव्यथेनें पीडलेल्या तरुणींस फार खेद असे. तथापि बऱ्यावाईटानें त्या आपला दिवसाचा वेळ कसा तरी काढीत. पण रात्र येऊन जिकडे तिकडे सामसूम झालें व त्या आपल्या आंथरुणावर पडल्या म्हणजे पतिचिंतेंत त्या इतक्या व्यग्र होऊन जात कीं, उभ्या रात्रींत त्यांचा डोळा लागत नसे. अशा स्थितींत उन्हाळा गेल्यावर पावसाळ्याच्या आरंभास तरी आपले पति परत येतील, आणि आपली त्यांची गांठ पडून आपणास आनंदाचा दिवस दिसेल, अशा आशेवर त्या वसंत व ग्रीष्म ऋतूंतील अत्यंत प्रखर दिवस व रमणीय रात्री मोठ्या कष्टानें लोटीत असत. हे ऋतु निघून जाऊन पावसाळ्याच्या आरंभास त्यांचे पति परत आले, तर सारें ठीकच असे; पण दुर्दैवानें जर तसें घडलें नाहीं, तर मात्र त्यांच्या दु:खास व चिंतेस पारावार नसे.

याप्रमाणें अनेक वर्षें वाट पाहिल्यावर, पति परत येत नाहींत, असें पाहून कामाग्नीनें करपून गेलेल्या या तरुणीची काय अवस्था होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. अशा संकटांत सांपडलेल्या तरुण कन्यका अखेरीस निराश होऊन वांकडें पाऊल टाकण्यास तयार होत, आणि सखीच्या साहाय्यानें संकेतस्थानीं पाहिजे तसलें धाडस करून वल्लभांच्या गांठीं घेत, आणि अप्रशस्त रीतीनें आपले मनोरथ पूर्ण करीत; व अशी स्थिति अनेक कुटुंबांत दृष्टिगोचर होत असल्यामुळें तिचें प्रतिबिंब तत्कालीन काव्यांत व संगीतांत पडलें आहे, असें वुइलर्ड साहेबांचें म्हणणें आहे.

याशिवाय आम्हांत रूढ असलेलें बहुपत्नीकत्व हें आमच्या स्त्रिया व्यभिचारी असण्याचें दुसरें कारण आहे, असें या गृहस्थाचें मत आहे, व तें कांहीं खोटें नाहीं. ''एका पुरुषा दोघी नारी। पाप वसे त्याचे घरीं'' ही तुकारामोक्ती जर आमच्या लोकांस मान्य असेल, तर एकाच पुरुषानें तीन किंवा चार बायका करण्याची चाल ज्यावेळी रूढ असेल; त्यावेळेस प्रत्येक स्त्री आपल्या पतीचें सारे प्रेम आपणावर असावें म्हणून खटपट करीत असल्यामुळें, सापत्न मत्सर विकोपास जाऊन कुटुंबांतील शांततेचा नाश होत असेल. इतकेंच नाहीं, तर ज्या दुर्दैवी तरुणी आपल्या पतींच्या नजरेंतून उतरल्या जात असतील, त्यांचें मन त्यांच्या संसाराकडे न लागतां बाह्यसुखाकडे जाऊं पाहत असेल असें मानण्यास हरकत आहे?

व्यभिचाराचें तिसरें कारण आमच्या स्त्रियांचें अज्ञान होय, असें हे साहेब म्हणतात, व त्याविषयीं आम्हांस थोडी शंका आहे. ज्ञान आणि सद्‌गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे, हे अद्यापि चांगलेसें ठरलेलें नाहीं. ज्ञानाचा प्रसार झाल्यानें खून, दरवडे, मारामाऱ्या वगैरे मोठमोठ्या गुन्ह्यांची संख्या कमी होते असें पुष्कळ विचारी लोक कबूल करतात. पण खोटें बोलणें, बनावट कागद करणें, खोट्या साक्षी देणें, चतुराईनें दुसऱ्यास फसविणें, लांच खाणें, व्यभिचार करणें, खोट्या शपथा घेणे, वगैरे कमी दुष्टपणाचे गुन्हे वाढतात किंवा कमी होतात याविषयीं जितका संशय ॲरिस्टॉटल यास होता; तितकाच हर्बर्ट स्पेन्सर यासही आहे. तेव्हां अज्ञानामुळें आमच्या स्त्रिया विशेष व्यभिचारी होत्या, व आतां त्यांस थोडेंबहुत लिहितां वाचतां येऊं लागलें आहे, म्हणून आमच्यांतील व्यभिचार कमी होऊं लागला असला पाहिजे, असें जर कोणी इंग्रज आम्हांस सांगू लागेल तर त्यांचें आम्हांस हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं! कोणत्याही देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये, म्हणून आम्ही इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयीं कांहींएक म्हणत नाहीं; तथापि जर ते आपण

होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें आणूं लागतील, तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें, इतक्या त्या पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्ही कधीही सोडणार नाहीं! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशांत सांपडणार नाही.

*

संमतीचें वय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा

संमतीचें वय सरकारनें वाढवूं नये, म्हणून जुन्या लोकांनीं जी ओरड चालविली आहे, तींतील खोटेपणा पाहून कोणत्याही सत्यशील मनुष्यास जुन्या लोकांचा आणि सुशिक्षित म्हणविणाऱ्या त्यांच्या पुढाऱ्यांचा तिरस्कार व संताप आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांची पहिली लबाडी ही आहे कीं, संमतीचें वय बारा वर्षांपर्यंत वाढविलें असतां सरकारनें हिंदुधर्मांत लोकांच्या मर्जीविरुद्ध हात घातला असें होईल. १८५८च्या जाहिरनाम्यात सरकारनें असें फर्माविलें आहे कीं, आम्ही आमच्या हिंदु प्रजेच्या धर्मांत कोणत्याही प्रकारें हात घालणार नाहीं; नवऱ्यानें, आपल्या बायकोस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी तिच्याकडे जाऊं नये, असा निर्बंध केला असतां, या लोकांच्या म्हणण्याप्रमाणें सरकारानें धर्मांत हात घालण्यासारखा होतो; तेव्हां जर हा कायदा पसार झाला, तर सरकारानें वचनभंग केला, असें होणार, अशी यांच्या वाचाळ पुढाऱ्यांनीं बडबड चालविली आहे. विवाहित स्त्रीचा संभोग तिच्या नवऱ्यानें तिला तेरावें वर्ष लागेतोंपर्यंत घेऊं नये, घेतल्यास तो संभोग दंड्य होईल, असें कलम **पीनल कोडांत** घातलें असतां जर हिंदुधर्मांत सरकारनें हात घातला असें होत असेल, तर त्या वयाचे पूर्वी नवऱ्यानें बायकोकडे जावे, अशा अनुज्ञा हिंदुधर्मशास्त्रांत असल्या पाहिजेत. पण त्या आम्हांस तर कोठें आढळल्या नाहींत, व हिंदुधर्मशास्त्राचीं पानें रात्रंदिवस चाळणाऱ्या जुन्या लोकांच्या पुढाऱ्यांनींही त्या पुढे आणिलेल्या नाहींत. तेव्हां या निर्बंधामुळें सरकारानें हिंदुधर्मांत हात घातला असें होतें, असें सांगणारांची ही शुद्ध लबाडीची ओरड आहे, असें म्हणणें भाग आहे. यावर कोणी असें प्रत्युत्तर देतील कीं, तेराव्या वर्षापूर्वी नवऱ्यानें बायकोकडे जावें अशी जरी स्पष्ट शास्त्राज्ञा नाहीं, तरी कन्या ऋतुमती झाल्याबरोबर तिचें गर्भाधान करावें, अशी शास्त्राज्ञा आहे, व ज्या अर्थीं कित्येक मुली बाराव्या वर्षी ऋतुमती होतात असें दिसून आलें आहे; त्या अर्थी या कायद्याचें उल्लंघन न करणें म्हणजे ज्या मुलीस बाराव्या वर्षी ऋतु प्राप्त होईल, त्यांच्या गर्भाधानाची स्थिति कांही अंतरावर टाकून पाल्य धर्माज्ञेचे उल्लंघन करणें, व बेचाळीस पिढ्या अधोगतीस जाण्यासारखें वर्तन करणें होय! यावर आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, **मुलगी कोणत्याही स्थितींत**

असो, किंवा ती कोणत्याही वयाची असो, तिला ऋतु प्राप्त झाला की, सोळा दिवसांच्या आंत नवऱ्याला गर्भाधान करण्याकरिता तिच्याकडे पाठविलेंच पाहिजे. अशी शास्त्राज्ञा कोठें आहे ती या धर्माभिमान्यांनीं आम्हास दाखवावी, आणि तिचे पालन सर्व ठिकाणीं सर्वांकडून चालले आहे कीं काय, हे आम्हांस सांगावें; तसेंच, सोळा दिवसांच्या आंत ज्यांनीं गर्भाधान उरकून घेतले नाहीं, त्यांस वाळींत टाकण्याचा किंवा त्यांना जबरदस्त प्रायश्चित्त देण्याचा परिपाठ आहे कीं काय, त्याविषयींहि जो खरा प्रकार असेल, तो या लोकांनी यावेळीं प्रसिद्ध करणें अवश्य आहे. बरेवाईट न पहातां प्रतिपक्ष्यांचा पाडाव करण्यासाठी हवें तें बहकत सुटणें, ज्या गोष्टी धर्मांशीं विसंगत तर नाहींतच, पण उलट धर्मसाहाय्यकारी आहेत; अशा गोष्टी धर्मविरोधक आहेत, अशी खोटी ओरड करून आपल्या प्रतिपक्ष्यांवर व सरकारावर तुटून पडणें, हें धर्मशील म्हणविणाऱ्या लोकांस अत्यंत लज्जास्पद आहे. स्त्री ऋतुस्नात असो किंवा नसो, तिला तेरावे वर्ष लागण्यापूर्वी तिच्याशीं समागम करणे हा मोठा अन्याय होय, अशा आमच्या धर्मशास्त्राच्या व वैद्यकशास्त्राच्या स्पष्ट आज्ञा आहेत; पण त्यांचा आमच्याकडून व्हावा तसा प्रतिपाल होत नसल्यामुळें कित्येक कन्यकांवर भयंकर प्रसंग गुदरत आहेत. तेव्हां समतीचें वय बारा वर्षेपर्यंत वाढविण्याच्या हेतूने आ. मि. स्कोबल यांनीं जे बिल मुख्य का. कौन्सिलापुढें आणिले आहे, तें पसार झाल्यास ज्या राक्षसी कामुकांच्या कामवासना अनावर होतील, त्यांस कडक शिक्षा देण्यास सांपडेल. इतकेच नाही, तर हिंदु धर्मशास्त्रांत अल्पवयस्क कन्यकावर त्यांच्या उतावीळ नवऱ्यांकडून जुलूम न होण्याबद्दल जे प्रतिबंध सांगितले आहेत, ते ब्रिटिश सरकारानें सक्त अमलांत आणिल्यासारखें होणार आहे.

या नवीन होणाऱ्या प्रतिबंधाविरुद्ध व सुधारकांविरुद्ध अज्ञान लोकांचीं मने क्षुब्ध करण्यासाठी जुन्या लोकांचे सत्यपराङ्मुख पुढारी त्यांस असें सांगत फिरतात कीं, असा प्रतिबंध करणें म्हणजे कायद्यानें विवाहकालाची मर्यादा वाढविण्यासारखेंच होय! व विवाहसंबंध तर धर्मांतर्गत विधि आहे; तेव्हां संभोगकालाची मर्यादा वाढविणें हें हिंदु धर्मावर स्वारी करण्यासारखें आहे! असल्या भ्रामक कल्पना लोकांत पसरणारांस काय म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. असले खोटे लपंडाव करून सरकाराविरुद्ध लोकांचीं मनें कलुषित करणारांस व खऱ्या धर्मापासून व सुधारणेपासून त्यांना फितुर करणारांस राजनिष्ठ व धर्मनिष्ठ म्हणण्यापेक्षां राजद्रोही, धर्मद्रोही, लोककल्याणशत्रु म्हणणें बरें दिसतें! तेराव्या वर्षापर्यंत संभोगाची मनाई केल्यानें जन्म झालेल्या मितीपासून बाराव्या वर्षाच्या अखेरच्या दिवसांपर्यंत पाहिजे त्या वेळीं मुलीचें लग्न लावल्यास, संमतीच्या या

नवीन कायद्यानें कशी हरकत येते, कोण जाणे! पण ज्यांना कांहीं तरी बडबड करुन चांगल्या गोष्टींविरुद्ध लोकाची उठावणी करावयाची आहे, व आपल्या बरोबर इतरांनांही दुष्ट आचारांच्या चिखलांत लोळत पाडावयाचें आहे, त्यांना सत्यासत्य पाहण्याची काय गरज आहे?

पुन: या लोकांचे असे एक तुणतुणें चाललेलें असतें कीं, बारा वर्षांच्या आंत स्त्रीपुरुषाचा समागम होणें जरी इष्ट नाहीं, तरी तो समागम एकाएकी कायद्यानें बंद करणे बरे नाहीं; कारण त्याला लोकमत अनुकूल नाही. शिक्षणाचा प्रसार होऊन लोकमत सिद्ध झाल्याखेरीज अशा प्रतिबंधापासून फायदा न होतां उलट नुकसान होणार आहे. कारण कायदा करून ठेवल्यानें व मोठ्या शिक्षेची भीति घातल्याने उल्लू मनुष्य आपली अनावर झालेली कामवासना तृप्त करण्यास मागेपुढे पाहणारा नसतो; त्याच्या मनाने उचल खाल्ली कीं, तो तुमचें हवें तसलें कायदे गुंडाळून ठेऊन पापाचरण करण्यास प्रवृत्त होतो; सबब अशा वासनाच त्याचे अत:करणांत उद्भवणार नाही, अशा प्रकारचे शिक्षण त्याला दिलें म्हणजे झालें! यावर आमची दोन उत्तरे आहेत पहिलें, या कोटिक्रमांत बिलकुल अर्थ नाहीं; असेल तर खून करणारास फांशीं देण्याचा जो अधिकार ठेविला आहे तोही पीनल कोडांतून काढून टाकला पाहिजे! कारण उत्कट द्रव्यलोभाने किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाने जो खून करण्यास निघतो, तो त्या अपराधास पीनल कोडांत काय शिक्षा सांगितली आहे, हे पाहण्यांत गुतणारा नसतो. सबब खून करणारास देहान्त शिक्षा देण्यापेक्षां ज्या शिक्षणानें त्याला खून करण्याची बुद्धीच होणार नाहीं, असें शिक्षण त्यास द्यावें म्हणजे झाले! या विचारसरणीप्रमाणें आजच सारें पीनल कोड रद्द करण्यास सिद्ध झाले पाहिजे! पण प्रस्तुत कायद्याचे शत्रू तसें करण्यास तयार असतील असें आम्हांस वाटत नाहीं. शिवाय **शिक्षण** म्हणजे तरी काय? सदुपदेश करणें व श्रीमुखांत दोन चापट्या लगावणें यालाच शिक्षण कशासाठीं म्हणावे? सक्त मजुरी करावयास लावणें, फटके मारणें, खोड्यांत घालणें, सुळीं देणे, फांशीं चढवणें वगैरे शिक्षांसही शिक्षणाचे प्रकार कां मानूं नये? अपराधाच्या मानानें हे सुशिक्षणाचेच प्रकार आहेत असें आम्हांस वाटतें. तेव्हां समंतीच्या संबंधानें आज जो कायदा हिंदुस्थान सरकार करूं पाहत आहे; त्यापासून म्हणण्यासारखा तात्कालिक उपयोग न झाला तरी तो शिक्षणावह होईल, असें जें ऑ. मि. **स्कोबल** यांचें म्हणणें आहे, तें यथार्थ आहे.

आतां, लोकमताच्या संबंधाने हे हट्टी जुने लोक जो आग्रह घरून बसूं लागले आहेत, त्याविषयीं मुळींच विचार करण्याची गरज नाहीं. कारण सुधारकांना आपल्या बाजूस जितकें लोकमत आहे, असें म्हणण्याचा अधिकार आहे, त्याहून

फारच कमी अधिकार या लोकांना तें आपल्या बाजूस आहेत, असें म्हणण्याचा आहे. या कायद्याशी आपल्या स्त्रियांचा विशेष संबंध आहे, व त्या त्याला प्रतिकूल आहेत, असें म्हणण्याची छाती या सत्यापलाप करणाऱ्या वाद्यांसही होणार नाहीं, तसेंच, खालच्या जातीचे लाखो अज्ञान लोकहि यांचे बाजूस आहेत असें नाहीं; कारण एक तर असल्या संभोगाचा प्रकार त्यांच्यांत सहसा घडत नाहीं, व दुसरे ज्याप्रमाणें इतर गोष्टींविषयीं त्यांचा अभिप्राय कोणी घेत नाहीं, त्याप्रमाणें या गोष्टींतही त्यांचें मत कोणीं विचारलेलें नाहीं. शिवाय, लोकमताचें आजच येवढें स्तोम माजविणाऱ्या जुन्या लोकांस आम्हीं असें विचारतों कीं, हिंदु राजे व हिंदु शास्त्रकार लोकमतांची पर्वा करीत असत, किंवा आपणांस योग्य वाटतील ते निर्बंध त्या मताचा विचार मनांत न आणता बेलाशक करीत असत! तसे नसेल तर **''राजा कालस्य कारणम्''** ही म्हण कोठून आली? आ. रा. ब. नूलकर या कायद्यास प्रतिकूल आहेत म्हणून जी बातमी आली आहे, ती खरी नसावी; कारण सुधारकांनी येथून धाडलेल्या मेमोरियलावर (अर्जावर) त्याची सही आहे. तथापि कौन्सिलांतील भाषणाचा कच्चा 'रपोट' येईपर्यंत त्यावर कोणत्याच प्रकारची टीका न करणें हेंच उचित आहे.

*

आतां मात्र खचित होणार

काय? संमतीचा कायदा!!

आजपर्यंत ज्या गोष्टीची इतकी 'भवति न भवति' झाली ती आतां फलद्रूप होण्याचा समय येऊन ठेपला आहे; यासाठी हिंदू धर्माचा वृथा अभिमान धरणाऱ्या आग्रही व सत्यापलाप करणाऱ्या लोकानी आपली असेल तेवढी पुण्याई खर्च करून त्या गोष्टीविरुद्ध आपल्या हातून जे होणे असेल तें करावें, बायकोस बारावे वर्ष लागण्यापूर्वी तिचा नवरा तिच्याकडे गेला तर त्यानें तिच्यावर 'रेप' केला, किंवा असंमत रत्युपभोग घेतला, असा कायदा करून, जे कामी पुरुष त्याच्या तावडीत सापडतील त्यास जन्मठेपेची काळ्यापाण्याची शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाही पण असा कायदा केल्याने अशाच प्रकारच्या अपराधांची सख्या म्हणण्यासारखी कमी होण्याचा सभव नाहीं, असें आमचें मत पूर्वीपासून असल्यामुळे आम्ही या कायद्याचा पक्ष घेऊन मोठ्या वीरश्रीच्या वादांत कधींच पडलो नाही. तेव्हां हा कायदा पसार झाल्यास (व होईल याविषयीं आतां आम्हास मुळींच शंका राहिली नाही) त्याबद्दल विशेष आनंद मानण्याचे किंवा फुशारकी मिरविण्याचे कारण विचारी सुधारकास नाही, असे आम्हांस वाटतें. तथापि या कायद्याचा मसुदा मुख्य कौन्सिलापुढे येऊं नये, व आल्यास त्याला कायदेपण प्राप्त होऊं नये, म्हणून जुन्या पद्धतीच्या ज्या लोकानी सत्यपराङ्मुख होऊन हवी तसली बडबड चालविली आहे व पोकळ दटावणीच्या गप्पा मांडल्या आहेत, त्यांतील कपट व लबाडी बाहेर पडून त्यांचा मोड होणार, हें पाहून आम्हांस सानंद खेद होत आहे! मागल्या लेखांत या बिलाविषयीं आम्ही विशेष चर्चा करण्याच्या भरीस पडलो नाहीं, कारण त्या वेळेस त्या संबंधानें आलेल्या तारांतील मजुकारावरून लोकांचा गैरसमज होण्याचा संभव होता; व कित्येक पत्रानीं तो करून सोडण्यास मागेपुढें पाहिलेंही नाहीं. त्या तारांतील अस्पष्ट व त्रोटक माहितीवरून कित्येकांनी असा अर्थ काढला कीं, ज्या आ. रा. ब. नूलकरांनीं येथील सुधारकांनीं धाडलेल्या अर्जावर आपली सही दिली; ते नूलकरसुद्धां या संमतीच्या वयाचे बिलास आयत्यावेळीं प्रतिकूल झाले! या सहजगत्या उठलेल्या

किंवा कोणीतरी बुद्ध्या उठविलेल्या अफवेवर आम्ही त्यावेळेस बिलकुल विश्वास ठेविला नाही; आणि ठेवला असता तर आमच्या हातून मोठा प्रमाद घडला असता, असें आतां हिंदुस्थान सरकारकडून प्रसिद्ध झालेल्या **एक्स्ट्राऑर्डिनरी ग्याझेटांतील रिपोर्टावरून** उघड होत आहे. या रिपोर्टापैकीं म्हणजे संमतीचें वय वाढविण्याविषयी आ. सर.ए. स्कोबल यांनीं कौन्सिलापुढें बिल आणिलें; त्या वेळेस जीं भाषणें झालीं त्यांपैकीं दोन भाषणें आम्हास फार आवडली; एक खुद्द आ. ए. स्कोबल यांचें, व दुसरें आ. रा. ब. नूलकर यांचें. लॉर्ड लॅन्स्डौन यांचें भाषण आपलें सरासरीच होते. पण सर रोमेशचंद्र यांच्या भाषणाच्या बाजूस तें मांडण्याची मुळींच सोय नाहीं, कारण इतक्या मोठ्या विद्वानाकडून झालेलें 'इतकें' गचाळ भाषण आमच्या पाहण्यांत कधींच आलें नाहीं. पण एका प्रकारें हे पेन्शनदार हायकोर्ट जज्ज जसें बोलले तसें बोलणेंच त्यांस योग्य होतें. जॉन स्टुअर्ट मिल्ल यांचे नेहमीं असें म्हणणें असें कीं, ज्याच्या अंगांत जो दुर्गुण विशेष असतो तो, तो दुर्गुण काढून टाकण्यास फार प्रतिकूल असतो. अडाणी लोकांस जबरीच्या शिक्षणाचा, वस्ताद दारू पिणारास दारू पिण्याच्या बंदीचा, अल्पवयांत अपत्यांचें विवाह करणारांस बालविवाहनिषेधाचा व अप्राप्तयौवनकुमारिकांचा त्यांच्या संमतीविरुद्ध संभोग करणारांस संमतीचें वय वाढविण्याचा कायदा सहसा पसंत पडावयाचा नाहीं! यावरून खुद्द सर रोमेशचंद्र यांनीं आपल्या तारुण्यांत तसें केलें असेल, किंवा आधुनिक तरुणांनीं तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें असेल, असे आम्हांस प्रतिपादितां येणार नाहीं, हें आम्ही कबूल करतों. त्यांनीं असलें पाप स्वत: केलें नसेल, व त्यांना तें नकोही असेल; पण ज्या देशांत त्यांचा जन्म झाला आहे, व ज्या देशांत त्यांचें बहुतेक वय गेलें आहे, त्या देशांतील वैवाहिक आचारांचें अस्पष्ट प्रतिबिंब तरी त्यांच्या विचारसरणींत पडल्यावांचून कसें राहणार? मुली उपवर होण्यापूर्वी, म्हणजे त्यांना ऋतु प्राप्त होण्यापूर्वी, त्यांचे लहान-मोठे नवरे कौतुकानें किंवा जबरीनें त्यांचेकडे पाठविणें, किंवा अस्नात मुलींस त्यांच्या नवऱ्यांच्या खोल्यांत जबरदस्तीने कोंडून घालणें, हा प्रघात जितका वंगदेशांत रूढ आहे, तितका हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही भागांत नाहीं, असें अलीकडे बाहेर आलेल्या पुराव्यावरून निर्विवाद सिद्ध झालें आहे. हे बंगाली लोक पूर्वीपासूनच अत्यंत विषयासक्त असावे, असें दिसतें. पूर्वीच्या लोकांच्या गोष्टींत कधीं कधीं निघणारें स्त्रीराज्य कोठें तरी बंगाल्यांत असावें, असा इकडील अडाणी लोकांचा अद्यापपावेतों समज आहे! वंगवासी स्त्रियांस घराच्या बाहेर पडण्याची किंवा संनिकट आप्तांवाचून कोणत्याही पुरुषाचें मुखावलोकन करण्यास सक्त मनाई असल्यामुळें, शेंकडों वर्षें

गृहकारागृहांत खितपत व कुजत पडलेल्या त्या दुर्दैवी आर्यमहिलांस अनेक व्यासंगांच्या व करमणुकींच्या अभावामुळें, ज्या एका पुरुषाचें मुखावलोकन करण्याची व ज्या एका पुरुषाशीं संगती करण्याची साऱ्या जन्मांत सवड मिळणार, त्या एका पुरुषाशीं आपलें होईल तितकें लौकर संघटन व्हावें, असें त्यांस वाटत असेल. तसेंच या भयंकर गोषाच्या चालीचा साधारणपणें असलाच परिणाम तिकडील पुरुषांच्या मनावरही होत असेल, यांत संशय नाहीं. तेव्हां ज्या कायद्यानें नवराबायलें एकत्र होण्याचा काळ उभ्या दोन वर्षांनीं दुरावणार, तो कायदा तिकडील बहुतेक लोकांस भीतिप्रद वाटावा, यांत कांहीं नवल नाहीं. बंगाल्यांतील बहुतेक पुढारी लोक आणि बहुतेक वर्तमानपत्रें या कायद्याविरुद्ध एकसारखा गिल्ला करीत आहेत; तेव्हां सर रोमेशचंद्र यांच्या विचारांवरही त्याची थोडीशी झांक न पडती तर मात्र मोठें आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती. संमतीचें वय वाढविण्यांत कांहीं अर्थ नसून, त्यापासून लोकांत असंतोष मात्र निष्कारण उत्पन्न होणार आहे, असे जें त्यांनीं म्हटलें हेच व्हावें तसें झालें! कारण, मनुष्य कितीही शहाणा असो, तो थोडाबहुत तरी आपल्या उपजत स्वभावावर गेल्याशिवाय राहावयाचा नाहीं. पृथ्वीवरील पक्ष्यांनीं किंवा वैमानिकांनीं कितीही उंच भराऱ्या मारल्या तरी पृथ्वीचें आकर्षण ते कसें चुकविणार व पृथ्वीस वेष्टणाऱ्या वातावरणाच्या बाहेर कसे पडणार?

या कायद्याविरुद्ध आजपर्यंत आणिलेल्या सर्व आक्षेपांस आ. ए. स्कोबल यांनीं फार थोडक्यांत पण अतिशय खणखणीत उत्तरें दिलीं आहेत. या कायद्यानें नवीन अपराध अस्तित्वांत येत नाहीं, म्हणजे जें वर्तन पूर्वी सदोष मानलें जात नव्हतें, तें हा कायदा पास झाल्यावर सदोष होणार आहे असें नाहीं; मुलींस ऋतु प्राप्त होण्यापूर्वी तिचा विवाह करावा, अशा हिंदुधर्मशास्त्रांत आज्ञा आहेत, तरी त्या कालापूर्वी जे दुष्ट पुरुष त्यांच्याशीं संभोग करतील; त्यांस कडक शासनें सांगितलीं आहेत; तेव्हां कन्येस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी ज्याप्रमाणें परक्या पुरुषानें त्याप्रमाणेंच तिच्या नवऱ्यानेंही तिच्याकडे गमन केलें असतां तो असंमत रत्युपभोग होतो, असें समजून उभयतांसही सारखी शिक्षा देण्यास ज्याप्रमाणें आम्हांस हरकत नाहीं, त्याप्रमाणें पूर्वीच्या ऋषींसही वाटली नसती; म्हणून जे लोक त्या ऋषींच्या आज्ञांचें उल्लंघन करण्याकरितां या कायद्यास धर्माची खोटी हरकत सांगत आहेत त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची गरज नाहीं; ज्यानें हा गुन्हा केला आहे असा संशय आला असेल तर त्याला वारंटानें कैद करण्याचा अधिकार पोलिसास ठेवला नसल्यामुळें, व जामीन घेऊन व समन्सें काढून असल्या आरोपांची चौकशी करावी, असें कलम घातलें असल्यामुळें, पोलिस लोक घरांत शिरून भल्या

लोकांची अब्रू घेण्यास, धाक दाखवून पैसे खाण्यास, किंवा दांडगाई करून संभावित कुलांत एकच कल्होळ करून सोडण्यास प्रवृत्त होतील, अशी जी कित्येक लोकांस भीती पडली आहे, ती निष्कारण आहे. इंग्लंडांतील मुलींस बहुधा तेराव्या वर्षी व येथील मुलींसही बहुधा तेराव्या वर्षी ऋतु प्राप्त होतो, तेव्हां संमतीच्या वयाची इयत्ता बारा वर्षांवर आणून ठेवण्यास यत्किंचित् हरकत नाहीं; तसेंच जरी या कायद्यानें हा अपराध करणाऱ्या एकूणएक गुन्हेगारांस कोर्टापुढें आणून शिक्षा ठोठावतां येईल, व हें पाप निखालस निर्मूळ करतां येईल असें म्हणतां येत नाहीं, तरी ज्या थोड्या अपराध्यांस कडक शिक्षा देतां येईल; त्यांच्या उदाहरणानें या अपराधाकडे प्रवृत्त असलेल्या कामुकांस जबर दहशत पडेल, व सामान्य लोकांच्या मनावर त्याचा अत्यंत शिक्षणावह परिणाम होईल; याविषयीं अणुमात्र शंका नाही, असें आ. स्कोबल साहेब म्हणाले, व कोणत्याही निःपक्षपाती व विचारी मनुष्यास त्यांचें म्हणणें यथार्थ आहे असें म्हटले पाहिजे असें आम्हांस वाटतें. आ. ए. स्कोबल यांचें भाषण झाल्यावर सर रोमेशचंद्र यांनीं या प्रश्नाची उलट बाजू आपणांकडून होईल तेवढ्या चतुराईने फुगवून दाखविली, त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, नवऱ्याला बायकोकडे गेल्याबद्दल कोणत्याही देशांत शिक्षा करीत नाहींत. नवऱ्यानें स्वस्त्रीकडे जाणें हाच या विषयसुखाचा प्रशस्त मार्ग होय. असल्या सुखासाठी नवऱ्याला दंड करणें, हें अत्यंत विपरीत होय. ही विपरीतता फक्त हिंदुस्थानच्या पीनल कोडांत मात्र आढळते. हिंदुस्थानच्या पीनल कोडावर टीका करतांना या बड्या न्यायाधीशानें जी एक गोष्ट लपवून ठेविली; ती, त्यास उत्तर देतांना कोणीच पुढे आणिली नाहीं, हा मोठा चमत्कार आहे. ज्या देशांत स्त्रीशीं अकालीं संभोग केल्याबद्दल नवऱ्यास शिक्षा मिळत नाहीं, त्या देशांत कोणत्याही नवऱ्याला आपल्या स्त्रीशीं अकाली संभोगच करतां येत नाहीं, म्हणून ती मिळत नाहीं. हा संभोग न करतां येण्याचें कारण असे आहे कीं, त्या देशांतील मुली बाराव्या वर्षांपूर्वीं कोणाच्या बायकाच होऊं शकत नाहीत; म्हणजे या वयाचें आंत मुलींचीं लग्ने करूं नयेत, असे त्या देशांत निर्बंध केलेले आहेत. पाहिजे त्या वयास मुलींचीं लग्नें करण्याची चाल येथल्याप्रमाणें युरोप खंडात रूढ असती, तर बायकोस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी नवऱ्यानें तिच्यांकडे जाणें म्हणजे तिच्याशीं असंमत रत्युपभोग घेणें असें त्यांनीं केव्हांच ठरवून टाकून, असल्या राक्षसी नवऱ्यास जन्मठेपेची-काळ्यापाण्याची-शिक्षा योजून ठेवली असती! तात्पर्य, लग्नाची कमींत कमी इयत्ता घालून दिल्यानें जें काम होत आहे, तें येथें संमतीचे वय बारापर्यंत वाढवून साधण्याची खटपट चालली आहे, तेरावें वर्ष लागण्यापूर्वी कोणत्याही मुलीचें लग्न करूं नये, व तेरावें वर्ष लागण्यापूर्वी

कोणत्याही बायकोकडे तिच्या नवऱ्याने जाऊं नये, या दोन निर्बंधांपैकीं पहिला समाजास विशेष हितकारक आहे, हें उघड आहे. तथापि, ज्या अर्थी लग्नाच्या वयाची इयत्ता ठरविणे म्हणजे आमच्या धर्मांत हात घालणें, व लोकमताविरुद्ध जाणे अशी सरकारास आजमितीस भीती वाटत आहे, त्या अर्थी संमतीच्या वयांत तें आज जेवढा फेरफार करण्यास तयार झाले आहेत, तेवढ्यांतच समाधान मानून घेतलें पाहिजे. वस्तुत: लोकांनी किंवा सरकाराने अमुक वर्षांपूर्वी मुलींचीं लग्नें होतांच कामा नयेत, असा ठराव करून तो पाहिजे त्या साधनांनीं अंमलात आणिल्याखेरीज, उल्लू नवऱ्याच्या उत्कट कामवासनांपासून बाल्यावस्थेत असलेल्या कित्येक मुलीस होणाऱ्या घोर यमयातना सर्वथैव टळण्याचा संभव नाहीं. या वरील पोकळ मुद्याशिवाय प्रस्तुत बिलास रोमेशचंद्र यांनी अशी हरकत घेतली कीं, कित्येक मुलीस बारावे वर्ष लागण्यापूर्वी नहाण येतें; नहाण आल्याबरोबर गर्भाधानसंस्कार केलाच पाहिजे, असा बंगाल्यात परिपाठ आहे; तेव्हां हा संमतीचा कायदा पाळणे म्हणजे धर्मोल्लंघन करणें, व धर्माज्ञा पाळणे म्हणजे या कायद्याचें उल्लंघन करणें असा पेंच येऊन पडतो. म्हणून सरकारानें या कायद्याच्या भरीस पडूं नये. आम्ही तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं असें १८५८ च्या जाहिरनाम्यांत सरकारचें अभिवचन आहे. पण त्या वचनास या कायद्यानें सरकार हरताळ लाऊं पहात आहे, हें वाईट आहे. यामुळें हिंदुस्थानच्या श्रद्धावान लोकात मोठा असंतोष उत्पन्न होणार आहे. यावर नूलकर त्यांनी खूप सणसणीत उत्तर दिलें. ते असें म्हणाले कीं मुलीस कोणत्याही वयास ऋतु प्राप्त झाला, तरी तिचें गर्भाधान ताबडतोब केलेंच पाहिजे; असा आचार सर्व हिंदुस्थानांत रूढ आहे असें नाहीं. शिवाय या आचाराच्या संबधानें धर्मशास्त्रकारांतही पुष्कळ मतभेद आहेत. पण तो नाहीं, असें वादाकरितां क्षणभर मानिलें तरी, जर आपल्या अंत:करणांत कांहीं भूतदया असेल तर बारा वर्षांच्या आंतील मुलींस विषयकर्दमांत लोटून देण्यासाठीं जेवढें धर्मोल्लंघन करणें भाग पडेल, तेवढे करण्यास आपण तयार झालें पाहिजे. या स्पष्टोक्तीबद्दल रा. ब. नूलकर यांची तारीफ केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. नहाण आल्याबरोबर गर्भाधान करणें हा जर धर्म असेल तर, विषयोपभोगास जिचे अवयव योग्य झालेले नाहींत, अशा अल्पवयस्क मुलीचा उतावळ्या नवऱ्यास हवा तसा छल करूं न देणें हाही तितकाच मोठा किंवा त्याहूनही मोठा आईबापांचा व सासूसासऱ्यांचा धर्म नाहीं काय? पण आमच्या आधुनिक नीच स्थितींत या गोष्टींचा शांतपणें विचार कोण करणार? कामाच्या गुलामांना आणि त्यांच्या वकिलांना आम्ही असें विचारतों कीं, बारा वर्षांच्या आंत नहाण आलेल्या मुलींच्या गर्भाधानास उभें न राहणें हें मोठें पाप?

कीं उभें राहून तिच्या अवयवांची आणि शरीरसंपत्तीची राखरांगोळी करण्यास प्रवृत्त होणें, आणि तिच्या व आपल्या कुलांस अक्षय्य कलंक लाऊन घेणें, हें मोठें पाप? जर तुमच्या डोक्यांत काहीं धड विचारतंतू असतील तर या प्रश्नाचें तुमच्या मनास खाणार नाहीं व सज्जनांस अप्रशस्त वाटणार नाहीं, असें उत्तर द्या; आणि वरील दोन धर्मांपैकीं पाहिजे त्या धर्माचा प्रतिपाल करा, आणि वरील दोन पापांपैकीं पाहिजे तें पाप टाळा! रा. ब. नूलकर आणखी असें म्हणाले (आणि त्यांच्या त्या म्हणण्यांत बराच तथ्यांश आहे) कीं अलिकडील कांहीं सुधारक मंडळी ज्या त्या गोष्टीकरितां कायदा करून घ्यावा, असें मोठ्या दिमाखानें वारंवार प्रपादूं लागल्यामुळे, जुन्या पद्धतीच्या लोकांचीं माथी फिरून जाऊन 'कायदा' म्हटला की, त्यांच्या अंगावर कांटा उभा राहूं लागला, व कित्येक गोष्टींत कायद्याचा चांगला उपयोग करून घेतां येतो, याचें भान त्यांस न राहून, ते आपले जें कांहीं सुधारक करावें असे म्हणतील त्यास विरोध करूं लागले आहेत! वस्तुतः तीस वर्षांपूर्वीं हें संमतीचें वय बारा वर्षांवरच काय, पण चौदा वर्षांवर जरी नेऊन ठेविलें असतें, तरी त्याविषयीं बहुधा कोणीं चकारशब्दहि काढिला नसता.

रा. ब. नूलकर यांचें भाषण झाल्यावर **लॉर्ड लॅन्सडौन** यांचे शेवटचे भाषण झालें. या भाषणांत त्यांनीं समतीच्या बिलाविषयीं फारसा पाल्हाळ केला नाहीं. या बिलामुळें १८५८ च्या जाहीरनाम्याविरुद्ध सरकार जात आहे असें होत नाहीं, कारण धर्मांतर्गत लग्नसंस्काराशीं याचा कोणत्याही प्रकारें संबंध पोहोचत नाहीं, शिवाय, बारा वर्षांच्या अविवाहित कन्येकडे कोणी पुरुष जाईल, तर त्याला कडक शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाहीं, पण तेंच कर्म नवऱ्याने स्वस्त्रीशीं केले तर त्याला कोणतीही शिक्षा करूं नये, किंवा फक्त दुखापतीच्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा देऊन सोडून द्यावें, हे अत्यंत अश्लाघ्य आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या भाषणाचा विशेष कटाक्ष ज्या सामाजिक सुधारणांसाठी मि. मलबारी यांनीं इग्लंडांत स्थापिलेल्या बड्या कमिटीनें 'सेक्रेटरी ऑफ स्टेट'च्या द्वारें हिंदुस्थान सरकारावर वजन व भीड घालण्यास आरंभ केला आहे; त्यावर होता. पण प्रस्तुत विषयाशीं त्यांचा निकट संबंध नसल्यामुळें व आजचें हें पुराण नित्याच्या मर्यादेबाहेर बरेंच गेलें असल्यामुळे, लेखणीस विश्रांती देऊन व्हाइसरायांच्या भाषणाच्या त्या भागाचा विचार आज तहकूब करणें भाग पडत आहे.

*

विवाहकाल व संभोगकाल

संमतीचें वय वाढविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें जे बिल काढलें आहे, त्याला अडथळा करणाऱ्या धर्मनिष्ठ लोकांचे असे म्हणणें आहे कीं, हें बिल पास झालें असतां, हिंदुस्थान सरकारने हिंदु धर्मात हात घातला असें होऊन, ह्या बिलांतील कलमांचे उल्लंघन न करण्यासाठीं, त्यांस धर्मोल्लंघन करावें लागणार आहे. धर्माचें घोडे पुढें ढकलून अहितकारक रूढ आचारांचें मंडन करण्यांत प्रतिष्ठा मानणारे धर्मभीरू किंवा पापभीरू लोक खरा धर्म काय आहे हें नीट समजत असते किंवा निदान तो समजून घेण्यास तरी तयार असते तर बरें झालें असते. पण ज्याना अमुक गोष्ट रूढ आचाराच्या विरुद्ध आहे येवढ्यासाठींच तीवर तुटून पडावयाचें आहे; ते त्या आचाराविषयीं खऱ्या धर्माज्ञा काय आहेत, हें कशाला पाहावयाला बसले आहेत? शिवाय, ज्याप्रमाणे आमच्या इतर गोष्टींत त्याचप्रमाणे आमच्या धर्मशास्त्रांतही इतकी बजबजपुरी माजली आहे कीं, पाहिजे त्या प्रकारच्या अत्याचारास किंवा अनाचारास आधारभूत अशी वाक्यें त्यांतून काढून देतां येणार आहेत! अमुक एक स्मृति किंवा अमुक एक ऋषि प्रधान मानून त्याच्या आज्ञेप्रमाणे आपले धर्माचार करावयाचे, असा नियम असता, तर या संमतीच्या नवीन कायद्यास धर्माची नड सांगणें नीट झालें असतें. पण तसें करून आम्हास मनसोक्त वर्तन करावयास कसे सांपडणार? ज्या गोष्टीविषयी ज्या ऋषीचें किंवा ज्या स्मृतीचें मत अनुकूल असेल तो ऋषि आणि ती स्मृति त्या गोष्टीच्या संबधानें प्रधान मानणार! व ज्या अर्थी हवी ती गोष्ट धर्मदृष्ट्या प्रशस्त आहे असें म्हणणारा धर्माचार्य किंवा शब्दचलाखीने ती तशी आहे असें भासविणारा टीकाकार कोणत्याही देशांत हव्या त्यावेळीं पैदा होण्यास कधींच पंचाईत पडत नाहीं, त्याअर्थी विवाहित स्त्रीशीं हव्या त्या वेळीं संभोग करण्यास कोणाचे तरी वचन आमच्या धर्मशास्त्रांतून काढून देतां येणार नाहीं, असें कसें होणार? लोकांत जो आचार रूढ असेल तद्नुसार एखादा संस्कृत अनुष्टुभ रचून तो जुन्या पोथींत घुसडून देणें; आणि त्यांतील आज्ञा अमक्या तमक्या ऋषीची, आचार्याची, किंवा भटाची आहे, असें सांगून तात्कालिक स्वार्थ साधणें, हें अगदीं सामान्य मनुष्याच्यानें होण्यासारखें काम आहे, हें कोणीही कबूल करील. आम्हांस तरी

निदान असें वाटतें कीं, अशा प्रकारच्या लोकानुछंदी लेखकांच्या धार्मिक लबाड्यांमुळें आमच्या धर्मशास्त्राची गति नंदीबैलाच्या झुलीसारखी किंवा कुणब्याच्या वाकळीसारखी झाली आहे! तेव्हां आ. रा. नूलकर यानी सुचविल्याप्रमाणें, संमतीच्या बिलाविरुद्ध काहीं शास्त्रकारांची मतें कोणीं धर्माभिमान्यांनी काढून दाखविली; तर सरकारानें आपल्या स्तुत्य हेतूवर नजर देऊन त्यांकडे दुर्लक्ष करावें, हेंच आम्हांस बरें वाटते. तथापि आपण जे बिल लोकांपुढें आणिलें आहे तें त्यांच्या धर्माविरुद्ध नाही, असे सांगितल्याने व सिद्ध करून दाखविल्याने त्या बिलास अडथळा करणाऱ्या लोकांचें समाधान होईल अशी सरकारास आशा असल्यास त्यांनी तो प्रयत्नही करून पाहावा. त्यापासून म्हणण्यासारखा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाही कारण आजमितीस ज्यांनी सामान्य लोकाचे पुढारीपण घेतले आहे, त्याचा असा निश्चय झालेला दिसतो कीं, सुधारक आणि सरकार यानीं मनात आणिलेली गोष्ट कितीही सशास्त्र असली, किंवा देशाचे तीपासून केवढेंही हित होण्यासारखे असले, तरी तीं सुधारकांकडून व त्याच्या मतासारखींच ज्यांची मतें आहेत; अशा सरकारकडून पुढें आली असेल, तर शास्त्राशास्त्रतेचा, सत्यासत्याचा, किंवा हिताहिताचा विचार न करतां, हवी ती खटपट करून ती हाणून पाडलीच पाहिजे! असल्या वृथा धर्माभिमानामुळे व मिथ्या देशाभिमानामुळे नव्या व जुन्या पिढ्यातील कलह अधिकाधिक वाढत जाऊन, नवीन पिढ्यातही दोन तट होणार आहेत, व त्यापासून देशाचें अपरिमित नुकसान होणार आहे, हे या हट्टी लोकाच्या ध्यानांत कसे येत नाही कोण जाणे! तथापि, या संमतीच्या कायद्यात आपल्या लोकानीं पूज्य मानिलेल्या धर्मशास्त्राकारांची पूर्ण संमति आहे, असे सिद्ध करून दाखविल्याने हा प्रस्तुत वाद मिटण्यासारखा असेल तर तेवढी कामगिरी आपले परमपूज्य धर्मनिष्ठ गुरु डॉक्टर भांडारकर यांनी वेळी बजावली आहे. त्यानीं यासबधाने नुकताच लिहिलेला लेख त्यांच्या परवानगीनें सुधारकाच्या गेल्या अंकात साद्यंत प्रसिद्ध केला आहे, व शिवाय पुस्तकरूपानें त्यानीं तो निराळा छापविलाही आहे जे कोणी हा निबंध निरभिमानाने लक्षपूर्वक वाचतील; त्यांस स्पष्टपणे असे दिसून येईल कीं, विवाहकालाची व संभोगाची जी मर्यादा अलीकडील समजंस व सुशिक्षित लोकांस प्रशस्त वाटूं लागली आहे; तीच मर्यादा आमच्या पुरातन प्रमुख स्मृतींस व ऋषींस पूर्ण मानवली होती. इतकेंच नाहीं, तर त्या मर्यादेचें उल्लंघन करणें हें त्यांनीं मोठें पाप मानिलें होतें. तथापि या दोन गोष्टींच्या संबंधाने आम्हीं जसजसे ढिले होत गेलों, तसतसे भ्रष्ट आचारास धर्मशास्त्रांत गोवून, त्यास शास्त्राधार दाखविणारे लोकाराधनतत्पर धर्मलेखक निघाले, व त्यांच्या लेखांमुळें

आमच्या धर्माच्या बटव्यांत मोहर, पुतळ्या, होन, रुपये, चवल्यापावल्या, बिल्ली, खुर्दा व फद्ये, आणि कवड्या यांची एकच खिचडी होऊन गेली! या अनवस्थेचा आजमितीस असा परिणाम झाला आहे की, ज्याच्या हातीं जें लागेल त्यास तो उत्तम नाणें समजून, त्याच्या जिवावर सुधारकापुढें आणि सरकारापुढें ''अहो अनाचार! अहो धर्मातिक्रम! अहो अध:पात!'' असा आक्रोश करून त्यास होईल तेवढा विरोध करूं लागला आहे! तथापि येवढ्या थोरल्या जनसमुदायांत खरोखरीच काही भाविक व धर्मभोळे लोक असतील, व सुनेला किंवा कन्येला ऋतु प्राप्त झाला असून तिचे गर्भाधान केलें नाहीं तर आपल्या हातून मोठें पाप घडेल, असे त्यास वाटतही असेल; अशा लोकांपैकी जे वयातीत झाले असतील, व ज्यांना फार वर्षांच्या प्रमाणप्रणीत वर्तनामुळे स्वत: विचार करून तदनुसार वागण्याची अशक्यता झाली असेल त्याच्या समाधानासाठीं डॉक्टर भांडारकर यांच्या पुस्तकांतून कांहीं वचने येथे उतरून घेऊन त्यांचे भाषांतर देतों. या वचनावरून त्याची अशी खात्री होईल की, पूर्वीच्या प्रमुख ऋषींनीं व स्मृतिकारांनीं प्रथम स्त्रीसभोगाची जी इयत्ता घातली आहे, तीच हिंदुस्थान सरकार घालूं पाहत आहे इतकेच नाही, तर त्यांनीं विवाहकालाची जी मर्यादा सांगितली आहे तिचें उल्लघन न केल्यास, सध्यां सुधारकांत व सुधारणानिंदकांत जो वाद चालला आहे, तो देखील नाहींसा होणार आहे. मात्र एखाद्या भिकार ग्रंथकारानें रूढीस जुळण्यासारखे दिलेलें मतच आम्हांस ग्राह्य आहे, असा असंमजपणाचा हट्ट त्यांनीं धरून बसता कामा नये. डॉ. भांडारकर हे अनेक उद्योगात व्यापृत असून त्यांनीं या ऐन गर्दीच्या प्रसंगास, वेळांत वेळ करून हे अनेक शास्त्राधार गोळा केले, व त्यांच्या वाचनानें धर्मनिष्ठ लोकाचा गैरसमज दूर व्हावा या हेतूनेंत्यांचा लहानशा पुस्तकात सग्रह करून ते स्वत:च्या खर्चानें प्रसिद्ध केले याबद्दल सार्‍या सुधारणेच्छूनीचसे काय, खुद्द हिंदुस्थान सरकारानेंही त्यांचे आभार मानिले पाहिजेत. कारण, यांच्या व्यासंगाइतका गीर्वाणवाणीचा व इतर भाषांचा व्यासग, निदान या इलाख्यांत तरी दुसर्‍या कोणी गृहस्थानें केला आहे असें आम्हांस वाटत नाही; तसेंच यथार्थ धर्मनिष्ठा, सत्यप्रीति व स्वदेशोन्नतीविषयीं खरी कळकळ इत्यादि गुणांत यांहून श्रेष्ठ असा दुसरा गृहस्थ या प्रांतांत आम्हांस दिसत नाहीं; म्हणून अशा वादग्रस्त विषयाविषयी अभिप्राय देण्यास यांच्याइतका दुसरा कोणास अधिकार नाहीं, असें आम्हांस वाटतें. ज्यांना आमच्या या लिहिण्याचा प्रत्यय घ्यावयाचा असेल, त्यांनीं येथील दुसर्‍या एका पत्रांत प्रसिद्ध केलेलीं एकदेशीय वचनें आणि प्रसिद्ध करणाराचें त्यावरील व्याख्यान पाहावें, म्हणजे त्यांची खात्री होणार आहे.

काममामरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि।
न चैवेनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ।।

मनु. अ. ९, श्लो. ८९

अर्थ:- ऋतु प्राप्त झाला असूनही कन्या बापाच्या घरीं राहिली तरी हरकत नाहीं; पण गुणहीन अशा वराला त्याने ती कधींही समर्पू नये.

या मनुवचनावर **मेधातिथि** नांवाच्या सर्वांत जुन्या टीकाकारानें अशी टीका केली आहे:-

प्रागृतो: कन्याया न दानम्। ऋतुदर्शनेपि
न दद्याद्यावद् गुणवान वरो न प्राप्त:।।

अर्थ:- न्हाण येण्यापूर्वीं मुलीचे लग्न करू नये; व तें आल्यावरही चांगला वर मिळेतोंपर्यंत करूं नये.

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्युतुमती सती।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम्।।

मनु. अ. ९, श्लोक ९०

अर्थ:- ऋतु प्राप्त झाल्यावर मुलीनें तीन वर्षें वाट पाहावी; त्यानंतर आपला आपण योग्य वर पाहून त्याशीं तिने विवाह करावा.

त्रीणि वर्षाण्युतुमती काङ्क्षेत पितृशासनम्।
ततश्चतुर्थे वर्षे तु वन्देत सदृशं पतिम्।।

बौधायन, ४. १. १४

अर्थ:- ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेंपर्यंत मुलीनें बापाच्या आज्ञेची वाट पाहावी; नंतर चौथे वर्षीं तिने आपण होऊन योग्य वराशीं विवाह करावा.

वसिष्ठसूत्रांतही अशा अर्थाचेच श्लोक आहेत.

नग्निकां तु वेदत्कन्यां यावन्नर्तुमती भवेत्।।
ऋतुमती त्वनग्निका तां प्रयच्छेत्त्वनग्निकाम्।।

गोभीलीय गृह्यसूत्र, बि. इं. पा. ८३९

अर्थ:- मुलीला ऋतु प्राप्त झाला नाहीं, तोंपर्यंत तिला **नग्निका** म्हणतात; त्यानंतर **अनग्निका** म्हणतात. मुलगी **अनग्निका** झाल्यावर म्हणजे तिला ऋतु प्राप्त झाल्यावर (बापानें) तिचें लग्न करावे.

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम्।

मनु. अ. ९, श्लोक. ९४.

अर्थ:- तीस वर्षांच्या मनुष्यानें त्यास पसंत अशा बारा वर्षांच्या कन्येशीं विवाह करावा.

या सर्व वचनांवरून मुलीस ऋतु प्राप्त होईतोपर्यंत किंवा बारावें वर्ष लागेतोपर्यंत अविवाहित ठेवण्यांत कांहीं दोष नाहीं, इतकेंच नाहीं, तर तसे करणेंच प्रशस्त आहे, असें होत नाहीं काय? बारावें वर्ष उलटून गेलें व ऋतुदर्शन होऊन तीन वर्षें लोटली, तरी देखील मुलीच्या अविवाहित राहण्यानें धर्मोल्लंघन होतें असें ज्यांस वाटत नाहीं, अशा धर्मकर्त्यांच्या वचनांप्रमाणे आम्ही वागत असतो तर सुधारकदुर्धारकांतले रण कशाला माजलें असतें? व आ. ए. स्कोबल साहेबांस संमतीच्या वयाचें बिल **सुप्रीम कौन्सिलपुढे** आणावें लागून त्याबद्दल सर्व हिंदुस्थानभर इतकी वाटाघाट व बाचाबाची कशाला झाली असती? अगदीं ''मी मी'' म्हणणाऱ्या सुधारकासही या ऋषिवचनापलीकडे जाण्याची इच्छा नाही. ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेपर्यंत अविवाहित राहण्याची व त्यानतर स्वत:स पसत पडेल असा वर वरण्याची परवानगी मुलीना देण्यांत येईल तर यासंबधाने सुधारकांना सुधारणेसाठीं कज्जा करीत बसण्यास म्हणण्यासारखे कांहींएक कारण नाहीं, हें उघड आहे! पण कलियुगाच्या प्रभावामुळें विषयलंपट, अविचारी, व नामर्द झालेल्या आम्हां भारतीय आर्यांस हा उत्साहजनक, हा विषयसुखवर्धक, हा संतानसामर्थ्यदायक, हा पुण्य स्वयंवरपंथ कोठून रुचणार?

अशा रीतीनें म्हणजे ऋतु प्राप्त झालेली कन्या विवाह होऊन भर्तृगृही गेली असता, शास्त्रोल्लघन न करतां पतिसमागम केल्याशिवाय तिला किती दिवस राहतां येईल, या संबंधाने डॉ. भांडारकर यांनीं जी वचने काढिलीं आहेत, त्यांवरून हा समागम तिला तीन दिवसांपासून तीन वर्षेपर्यंत तहकूब करण्याचा अधिकार शास्त्राने दिला आहे. तेव्हां मुलीला ऋतुदर्शन झाल्यापासून सोळा दिवसांच्या आंत तिचा गर्भधानविधि केलाच पाहिजे, असें जें कित्येकाचें म्हणणे आहे, तें बरोबर दिसत नाही. पण सर रोमेशचंद्रांचा रघुनंदन असें म्हणतो कीं, तसें झालेंच पाहिजे, नाहीं तर ब्रह्महत्येचें किंवा भ्रूणहत्येचें महापातक नवऱ्याच्या बोकांडीस बसणार! पण असें सांगण्यास **रघुनंदनच** कशाला पाहिजे? मन्वादि ऋषींच्या युगांत लोकांच्या अंगांत असलेल्या पौरुषाचा लोप झाल्यावर, रघुनंदनासारखे नि:सत्त्व धर्मकर्ते बंगाल्याप्रमाणें इकडेही झाले आहेत, व त्यांनीं हवा तसा बाष्कळपणा केला आहे. भेद इतकाच कीं, ज्याप्रमाणें स्त्रीमत्सरी व स्त्रीपारतंत्र्येच्छू वंगवासी लोक अगदीं स्त्रैण होऊन जाऊन रघुनंदनाच्या आज्ञेचें अतिक्रमण करण्यास असमर्थ झाले आहेत, तशीच केवळ आम्हां महाराष्ट्रीयांची स्थिती नाहीं; या गोष्टीचा विशेष खुलासा करण्यासाठीं या विषयाकडे आणखी एक वेळ वळणें जरूर आहे, म्हणून आज येथेंच मुक्काम करतों.

*

संमतिबिलास धर्मशास्त्र बाधक नाहीं

संमतीचे बिल कौन्सिलापुढें आणितांना **सर ऑ. स्कोबल** यांनीं असें म्हटलें आहे कीं, या बिलास हिंदुधर्मशास्त्र प्रतिकूल नाहीं. या त्यांच्या स्वल्प उल्लेखामुळें आमच्या वृथाधर्मवाद्यांस शब्दजाल पसरण्यास उत्तम सवड सांपडून, त्यांनी त्याच मुद्यावर आतां आपला प्राण ठेविला आहे! बी.ए.च्या परीक्षेला लागणाऱ्या पांचचार संस्कृत पुस्तकांपलीकडे ज्यांचें संस्कृताचे अध्ययन गेलेलें नाहीं, असे लोक आपणांस पट्टीचे शास्त्री समजून, डॉक्टर भांडारकरांसारख्या विद्वानांस श्रुतींचा व स्मृतींचा अर्थ बरोबर करतां येत नाही, किंवा त्यांनीं तो बुद्ध्या केला नाहीं, अशी बडबड करीत आहेत, आणि जुने शास्त्री त्यास ''धर्मरक्षक'' समजून त्यांच्या अज्ञानमय वादास आपली संमती देत आहेत! पण अशा प्रकारची ढिलाई करण्याबद्दल या जुन्या शास्त्रीमंडळीस विशेष दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, एक तर अलीकडे निव्वळ संस्कृत विद्येचा अभ्यास फायदेशीर होईनासा झाल्यामुळें, आजिमितीस नांव घेण्यासारखा एकही शास्त्री या इलाख्यांत सांपडावयाचा नाहीं. असल्या शास्त्र्यांनी शास्त्रार्थ देण्यांत व बाकीच्यानीं तो पतकरण्यांत मुळींच अर्थ नाहीं. शिवाय, प्रसंग पडेल त्याप्रमाणें ओढून ताणून हवा तो अर्थ काढण्याची या शास्त्र्यांची पूर्वापार चाल आहे; तेव्हां ते या वेळीच त्या आपल्या जुन्या शीलास अनुसरणास नाहींत, असें कोठून होणार? ब्राह्मणांनीं वस्तरा हातीं घेऊन, न्हाव्यांची रग जिरविण्यास कांही हरकत नाहीं, असा शास्त्रार्थ थोड्या वर्षांपूर्वी ज्यांनीं या पुणे शहरात साफ ठोकून दिला, त्यांना पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, असें धर्मशास्त्राचे स्पष्ट म्हणणें आहे, असा आग्रह धरण्यास कोठून शंका येणार? पाश्चिमात्य शिक्षणाच्या वाढत जाणाऱ्या प्रसारामुळें आमच्या शास्त्री- वैदिकांचा धंदा अगदीं उठावणीस आला आहे व ते अन्नास मोताद झाले आहेत; तेव्हां अशा संकटावस्थेंत दोन पैसे मिळणारे संस्कार त्यांनीं आपल्या हातून जाऊं न देण्याविषयीं धडपड करावी, व कधीं न मिळालेली प्रतिष्ठा दोन दिवस भोगून घ्यावी, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण अशा आपत्कालीं देखील त्यांनीं इतके पाखंडवादी व्हावें, हें त्यांच्या जुन्या विद्येस सुद्धां चांगलेसें शोभत नाहीं, असें आम्हांस वाटतें. बाकी संमतीचें बिल

पास होणें किंवा न होणें हें या शास्त्रार्थावर थोडेंच अवलंबून आहे! हें बिल पास करण्यांत ब्रिटिश सरकारास अमुक एक स्वहित साधावयाचें आहे, असें या वाक्पटु शास्त्र्यांसही म्हणतां येणार नाहीं; तसेंच हजार पांचशें सुधारकांस खुष करण्यासाठीं कोट्यवधि लोकांस नाखुष करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं, हेंही तें सरकार पक्कें समजून आहे.तथापि त्या सरकारास हें पक्कें ठाऊक आहे कीं, हिंदुस्थानांतील बरेच लोक आपल्या बायका वयांत येण्यापूर्वी त्यांवर जुलूम करीत असल्यामुळें, त्यांसी आज कित्येक शतकें अनिर्वचनीय यातना भोगाव्या लागत आहेत; त्यांच्या यातनांच्या उपशमनार्थ होईल तितका प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे; या कर्तव्यास हिंदू धर्माची अनुकूलता किंवा संमती नसली तरी प्रत्येक सदय, समंजस, व विचारी मनुष्याच्या अंत:करणांत वास करणारा जो साऱ्या धर्मांचा धर्म; त्याची पूर्ण संमती आहे इतकेंच नाहीं, तर तें कर्तव्य इतकी वर्षें न बजावल्याबद्दल त्यानें एकसारखी टोंचणी लाविली आहे; तेव्हां अडाणी, अविचारी, वृथाधर्माभिमानी, व आपमतलबी हिंदूंनीं केवढाही गवगवा केला, तरी दहा अकरा वर्षांच्या मुग्ध कन्या अधीर भर्त्यांच्या अतिशय भडकलेल्या कामकुंडांत आहुती पडून जळून खाक होणार नाहींत अशाबद्दल कांहीं तरी उपाय केलाच पाहिजे, असें लक्षात येऊन त्यांनीं हें संमतबिल हातीं घेतलें आहे. तेव्हां आम्हीं आपल्या आक्रोशांनीं जरी सारें ब्रह्मांड हालवून सोडिलें तरी हें बिल पास करण्यास हिंदुस्थान सरकार अणुमात्रही भिणार नाहीं, अशी आमची बालंबाल खात्री झाली आहे. तथापि, ज्या रोग्यांना जें औषध द्यावयाचें तें त्यांचें नाक धरून व त्यांना पायावर उताणें पाडून, बोंडल्यानें त्यांच्या घशांत घालण्यापेक्षां, त्या औषधाचे गुण त्यांस समजावून देऊन, तें ते आपण होऊन आपल्या हातानें पितील, तर बरें होणार आहे, असें वाटून हिंदुस्थान सरकारनें आपल्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें त्याची चर्चा चालू दिली आहे, व ज्याला जीं वाटतील तीं साधक बाधक प्रमाणें त्यांनें खुशाल दाखवावीं, अशी नोटीस दिली आहे! या नोटिशीचा फायदा घेऊन, कांहीं "नाकाडोळ्यांचे नाडीपरीक्षक" वैद्य; हें औषध तुम्हास सुखावह होणार नाहीं, अशी भीति भाबड्या लोकांस घालीत आहेत, ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे बरें? हे झोळीवाले "रसशेंदूरमात्रा वैद्य" अज्ञान लोकांस असें सांगत फिरत आहेत कीं, हें बिल पास झाल्यास, बारा वर्षांच्या आंत जितक्या मुलींस ऋतुदर्शन होईल तितक्यांचें गर्भाधान तावडतोब न करण्यास सांपडल्यामुळें त्यांच्या व त्यांच्या नवऱ्यांच्या कपाळीं भ्रूणहत्या येणार आहे! तेव्हां या पापांत हीं नवराबायलें खरोखरींच पडतात कीं काय, हें थोडक्यांत पाहूं.

स्त्रीस नहाण आल्याशिवाय तिच्याकडे तिच्या नवऱ्यानें जाऊं नये, अशी

आमच्या धर्मशास्त्राची सक्त ताकीद आहे. तेव्हां बारावें वर्ष लोटल्यावर ज्या मुली ऋतुमती होतील, त्यांना व त्यांच्या नवऱ्यांना हें बिल लागू पडत नाहीं, हें उघडच आहे. नहाण न आलेल्या तेरा वर्षांच्या मुलीकडे तिचा नवरा गेल्यास आमचें धर्मशास्त्र त्यास काय शिक्षा करीत असेल किंवा करूं शकेल ती खरी; संमतीच्या बिलामुळें त्याला कोणत्याही प्रकारें उपसर्ग लागणार नाहीं. बारा वर्षांच्या आंत फार झालें तर शेंकडा चार मुली ऋतुमती होतात, असें दिसून आलें आहे. तेव्हां संमतीच्या बिलामुळें गर्भाधान थोड्याशा लांबणीवर टाकावें लागलें, तर ते या चार मुलींकरितां टाकावें लागणार, व पंचवीस मुलींपैकीं एका मुलीच्या संबंधानें हें बिल आमच्या धर्मास बाधक झालें असें होणार. पण ही गोष्ट कबूल करण्यापूर्वी पहिला ऋतु प्राप्त झाल्यावर गर्भाधान केलेंच पाहिजे, असा शास्त्राधार दाखविण्यांत आला पाहिजे, इतकेंच नाहीं, तर तें न केलें असतां, जे दंड सांगितले आहेत त्यांची मातब्बरी आणि तें न करण्यापासून होणारे फायदे यांचा शांतपणें विचार करून, शास्त्रकर्त्यांस कोणता मार्ग विशेष संमत आहे, हें नि:पक्षपातानें ठरविलें पाहिजे. जो कोणी इतकी खटपट प्रामाणिकपणानें करील त्याला आमचें वेडेंवाकडें धर्मशास्त्र देखील संमति बिलाचे तत्त्वास बिलकूल प्रतिकूल नाहीं, असें खचित दिसून येणार आहे. कारण, पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, अशा अर्थाचें फक्त एक वाक्य आहे, व तें कोणी तरी अलीकडे धर्मशास्त्रांत घुसडून दिलें असावें, असें स्पष्ट दाखवितां येत आहे. कसें तें पहा. आश्वलायनाच्या नांवावर विकणाऱ्या स्मृतींत पुढील वाक्य आढळतें:-

गर्भाधानं द्विज: कुर्यादृतौ प्रथम एव हि।
चतुर्थदिवसादूर्ध्वं पुत्रार्थी दिवसे समे॥

अर्थ- "प्रथम ऋतुदर्शन होऊन ४ दिवस लोटल्यावर, ब्राह्मणानें गर्भाधान करावें, पुत्र पाहिजे असल्यास सम दिवशीं करावें" अनंतदेवानें "आश्वलायनाचें म्हणून" हें वाक्य आपल्या ग्रंथांत उतरून घेतलें आहे. अनंतदेवाखेरीज इतर अनेक निबंधकारांनीं यासंबंधानें व इतर संबंधानें आश्वलायनस्मृतींतील अनेक उतारे घेतले आहेत; पण त्यांपैकीं एकाच्या ग्रंथांतही हें वाक्य उतरून घेण्यांत आलेलें नाहीं. इतकेंच नाहीं, तर ज्या आश्वलायनस्मृतींत अनंतदेवानें उतरून घेतलेलीं दुसरीं वाक्यें सांपडतात, त्या आश्वलायनस्मृतींत अनंतदेवाखेरीज इतर निबंधकारांनीं आश्वलायनाची म्हणून आपल्या ग्रंथांत उतरून घेतलेलीं वाक्येंही सांपडत नाहींत! तेव्हां अनंतदेवाची आश्वलायनस्मृति आणि इतर निबंधकारांची आश्वलायनस्मृति हे भिन्न ग्रंथ असले पाहिजेत, हें सिद्ध होतें. या भानगडीवरून निदान आमचा तरी असा तर्क होत आहे की, ही अनंतदेवास सापडलेली

आश्वलायनस्मृति त्याच्याच डोक्यांतून निघाली असावी, व कांहीं विशेष हेतु साधण्यासाठीं त्यानें हें **पुण्यछद्म** ऊर्फ **धर्मकपट** केलें असावें! या खोट्या अथवा बनावट **आश्वलायनस्मृतीची** एक प्रत डॉ. भांडारकर यांचेजवळ आहे. अनंतदेवाखेरीज दुसरे सात आठ निबंधकार ज्या आश्वलायन स्मृतीचा उल्लेख करतात; तिच्याशीं ही ताडून पाहिली असतां उभयतांत कांहींच साम्य दृष्टीस पडत नाहीं. तेव्हां बाकीच्या निबंधकारांचा **आश्वलायन खरा** आणि अनंतदेवाचा **आश्वलायन तोतया** असें समजणें भाग आहे! आमच्या समजुतीनें डॉ. भांडारकर यांची ही विचारशैली निरुत्तर आहे, व टिळक वगैरे जे लोक आश्वलायनाच्या स्मृतीवर म्हणजे या अविश्वसनीय साक्षीदाराच्या बनावट ग्रंथावर आपल्या पक्षाचा व्यूह रचीत आहेत, ते जाणूनबुजून किंवा चिवट मूर्खपणामुळें असत्यपंथास लागले आहेत, असें वाटतें. सामर्थ्य असेल तर त्यांनीं ही **आश्वलायनस्मृति** खरी आहे, हें अगोदर सिद्ध करून द्यावें, आणि मग वादास उभें रहावें.

या एका बनावट स्मृतीशिवाय दुसऱ्यां कोणत्याही सर्वमान्य स्मृतींत किंवा प्रसिद्ध निबंधकारांच्या ग्रंथांत गर्भाधान पहिल्या ऋतूंत केलेंच पाहिजे, असे धर्मवादी सिद्ध करून दाखवतील, तर त्यांचा आग्रह किंचित् विचारणीय होणार आहे. अगदीं अलीकडील ग्रंथांत आणखी असें एक वाक्य सापडतें कीं, ''**प्रत्येक ऋतूस नवऱ्यानें आपल्या बायकोकडे जावें**'' नवऱ्याला बायकोकडे जावयाचें असल्यास त्यानें ऋतुकालीं जावें अशी जी सामान्य धर्माज्ञा होती; तिचा टीकाकारांनीं पुढें असा अर्थ काढला कीं, प्रत्येक ऋतूस आपल्या स्त्रीकडे गेलेंच पाहिजे; न गेल्यास भ्रूणहत्त्येचें पातक त्याच्या कपाळीं येतें! अर्थात् साऱ्याच ऋतूंविषयीं हें विधान करून टाकल्यामुळें, पहिल्या ऋतूंत स्त्रीगमन न करणाराही गर्भघातक होतो, हें उघडच आहे. तेव्हां जुन्या लोकांच्या समजुतीप्रमाणें पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, व न करील त्याला भ्रूणहत्या गांठणार, हें निर्विवाद झालें! पण हें संकट केवळ अपरिहार्य नाहीं. गर्भधानसंस्काराचीं दोन अंगें आहेत, एक प्राजापत्य म्हणजे होम वगैरे; दुसरें, खरें गर्भाधान म्हणजे रात्रीं ऋतुमती स्त्रीकडे तिच्या नवऱ्यानें जाणें. ज्याला धर्माप्रमाणें सर्व संस्कार करावयाचे असतील त्यानें पहिल्या ऋतूस अनुकूल दिवस पाहून तेवढा प्राजापत्य होम तरी उरकून घेतला पाहिजे. गर्भाधान पुढल्या कोणत्याही पाळीस अनुकूल रजनी पाहून करण्यास हरकत नाहीं, अशी स्पष्ट शास्त्राज्ञा आहे. पण प्रस्तुत वादांतील टिळकप्रभृति हट्टी लोकांस हा शास्त्राधार फारच बाधक असल्यामुळें हे दोनही विधी एकेच दिवशीं उरकले पाहिजेत, असें निराधार प्रतिपादन ते करीत आहेत. त्यांच्या प्रतिपादनास कांहीं आधार असल्यास तो चालू संप्रदायाचा आहे; शास्त्राचा नाहीं. शास्त्रांत

प्राजापत्य आणि गर्भाधान हे पृथक् विधि समजून ते पृथक् दिवशीं करावे, असें स्पष्ट सांगितलें आहे. **'अथर्तुमत्यः प्राजापत्यमृतौ प्रथमेऽनुकूलेऽहनि'** असें म्हणून पुढे **'अथ गर्भलभनमृतौ अनुकूलायां निशि'** असें म्हटले आहे. **हे आश्वलायन गृह्याच्या** नारायणभट्टकृत परिशिष्टांतील वाक्य आहे. नारायणभट्टानें गर्भाधानसंस्काराचे दोन भाग कल्पून पाहिल्यास प्राजापत्य व दुसऱ्यास गर्भलभन अशीं नांवें दिली आहेत, आणि नंतर त्यांतील विधींचें वर्णन केलें आहे. तें करतांना "आतां प्राजापत्याविषयीं:- हा विधि पहिला ऋतु प्राप्त झाला असतां अनुकूल दिवस पाहून करावा" याप्रमाणें याचें वर्णन झाल्यावर "आता गर्भलभनाविषयीं :- हा विधी ऋतुकालीं अनुकूल रात्र पाहून करावा" असें म्हटलें आहे. यावरून प्राजापत्यहोम पहिल्या ऋतूस योग्य मुहूर्तावर केलाच पाहिजे; गर्भाधान म्हणजे स्त्रीपुरुषांचा संयोग कोणत्याही पाळीस सवडीप्रमाणें करण्यास हरकत नाहीं, असा उत्तान अर्थ असून टिळक वगैरे लोकांनीं व्याकरणाकडे, वाक्यरचनेकडे, किंवा वाचनाच्या ओघाकडे लक्ष न देतां, चालू संप्रदायाशीं त्याची संगति जुळवून देण्यासाठीं ओढून ताणून त्याचा अर्थ केला आहे कीं, ज्या दिवशीं प्राजापत्य करावयाचें, त्याच दिवशीं गर्भाधान झालें पाहिजे. या वचनाचा असा अर्थ असता तर "अथ" व "अनुकूल" या शब्दांचा पुनरुच्चार करावयाला नको होता; तसेंच "ऋतु" शब्द मुळींच घालायाला नको होता, किंवा त्याच्या पाठीसागें "प्रथम" हें विशेषण तरी फिरून घालायला पाहिजे होतें. हे दोनही विधि चालू संप्रदायाप्रमाणें एकेच दिवशीं झाले पाहिजेत, असें लिहिण्याचा नारायणभट्टाचा आशय असता, तर "योग्य दिवस पाहून", व "योग्य रात्र पाहून" अशी द्विरुक्ति त्यानें केली नसती; हे किंवा दोनही विधि एकेच दिवशीं व्हावे अशी त्याची इच्छा असती, तरी "योग्य दिवस" आणि "योग्य रात्र" असा भेद तो कशाला करता? आपण असा भेद सध्यांच्या प्रचारांत मुळींच करीत नाहीं. अमुक मुहूर्त गर्भाधानाला चांगला आहे, असें ठरविलें म्हणजे तो दोनही विधि उरकण्यास ठीक आहे असें आपण समजतों. म्हणतांना "चांगला दिवस पहा" येवढेंच म्हणतों; व होमाला जो दिवस प्रशस्त असेल त्याचीच रात्र गर्भाधानाला प्रशस्त असें समजून फक्त "दिवस" हुडकण्याबद्दल पंचांग चाळतों. त्याच दिवसाची "रात्र" गर्भाधानास अनुकूल असेल किंवा नाहीं, अशी शंकाही आमच्या मनांत येत नाहीं, म्हणून आम्ही रात्रीविषयीं कधींच उल्लेख करीत नाहीं. पण नारायणभट्टाचें तसें म्हणणें नाहीं. त्यावर लोकसांप्रदायाची थोडीथोडी छाया पडूं लागली होती, पण तो आमच्या इतका त्याचा बंदा गुलाम होऊन गेला नव्हता. सुश्रुतवाग्भटादि-शारीरकोविदांची वाक्यें त्याच्या डोळ्यापुढें उभीं असल्यामुळें,

सुपुत्रेच्छु पुरुषांनीं पहिल्याच ऋतुकालीं गर्भाधानासाठीं रतिगृहात संगत व्हावे, हें त्यास बरें वाटलें नसावें, व म्हणूनच त्यानें होमविधि, प्रथम ऋतूस एखाद्या चांगल्या दिवशीं उरकून टाकून, पुढें योग्य वाटेल त्या पाळीस स्त्रीपुरुषांनीं चांगली रात्र पाहून रत्युपभोगासाठीं संगत व्हावें, असा शास्त्रार्थ दिला असावा, हे उघड आहे. असें केल्यानें धर्मशास्त्राचें उल्लंघन न करतां शारीरकशास्त्राच्या आज्ञा पाळण्याची सवडही त्यानें करून ठेवली, असें डॉक्टर भांडारकर याचे जे म्हणणें आहे, त्यावर धर्मशास्त्रदृष्ट्या किंवा व्याकरणदृष्ट्या प्रतिकूल कोटिक्रम करणें अशक्य आहे. पण ज्यांना खोट्या धर्माभिमानानें पक्कें घेरले आहे, किंवा ज्यांना चालू संप्रदायास शास्त्राधार आहे असें दाखवून, अडाणी लोकास सरकाराविरुद्ध क्षुब्ध करावयाचें आहे, त्यांना व्याकरणाशी, संगतीशीं, किंवा शास्त्रार्थाशीं हवें तसे बागडणारांच्या पदरीं अप्रमाणिकपणा किंवा मूर्खपणा येतो, हे कसें समजणार? व समजले तरी ते आपली चूक कोठून कबूल करणार?

यावरून पहिल्या पाळीसच गर्भाधान केले पाहिजे, किंवा होम आणि गर्भाधान हे विधि पृथक्कालो करता येणारच नाहींत असें नाहीं, हे उघड होतें. पण आमच्या प्रतिपक्ष्यांस ती गोष्ट कोठून रुचणार? त्यांना बारा वर्षांच्या आंतील वयाचे मुलीस नहाण आलें असलें तरी पहिल्याच खेपेस तिचें गर्भाधान केलें पाहिजे, न केल्यास शास्त्रोल्लघन होतें, असें स्थापण्याची आवश्यकता आहे; तसें केल्याखेरीज सरकाराने आमच्या धर्मांत हात घातला अशी ओरड त्यांस करतां येत नाहीं; तेव्हां त्यानी कित्येक लोकांत व प्रांतांत पहिल्या पाळीसच होम व गर्भाधान करण्याची जी चाल पडली आहे तीच पूर्णपणें शास्त्रसंमत आहे, व त्या चालीच्या विरुद्ध जाणें हें केवळ अशास्त्र नसलें तरी गौण आहे, आणि आपत्कालाखेरीज तसें करणें उचित नाहीं, व जेव्हां निरुपायास्तव तसें करणें भाग पडेल तेव्हां प्रायश्चित्ताशिवाय मुक्ति नाहीं, असें दाखविण्याची खटपट चालविली आहे. आमच्या मतें या प्रकरणांत शास्त्र व रूढि यांची उत्कृष्ट संगति कोणासही घालून देतां येणार नाहीं. संमतीच्या बिलास रूढीपेक्षां शास्त्र विशेष अनुकूल आहे, तरी रूढीही सर्वांशीं प्रतिकूल नाहीं.कारण पुष्कळ लोकांत गर्भाधानविधी मुळींच करीत नाहीत, किंवा तो पाहिजे तेव्हां करितात असें असून त्यांस कोणी वाळीत टाकीत नाही, किंवा प्रायश्चित्त घेण्यास लावीत नाहीं. पण हा सर्व खरा प्रकार धर्माच्या नांवावर गिल्ला करून अडाणी लोकांस सरकाराविरुद्ध चिथाविणाऱ्या भोंदू धर्मनिष्ठांस कोठून मानवणार? कोणाच्याही हातून वेळच्या वेळीं गर्भाधान न घडल्यास जें पाप होतें त्याचें क्षालन पांचचार आण्यांनीं किंवा शेंपन्नास प्राणायामांनीं करतां येण्याची ज्यांनीं सवड ठेविली आहे त्यांच्या दृष्टीनें तें पाप किती दर्जाचें

असेल, हें कां या भोंदूस समजण्याची अक्कल नाहीं? हवी तितकी आहे! पण त्यांना कोठें खरें समजण्याची गरज आहे? शास्त्रांतून हुसकून लाविलें म्हणजे रूढीच्या आड दडावे, व रूढीच्या मैदानांत चोप बसला कीं, शास्त्राच्या पाठीमागें दडी द्यावी, असा यांनीं पळापळीचा व लपंडावीचा प्रकार चालविला आहे, येवढें सुज्ञ वाचकांच्या नजरेस आले असेल, तर या संबंधानें आम्हीं आपलें कर्तव्य बजावलें, असें आम्हांस वाटणार आहे. यापलीकडे या धर्मवादांत पडण्याची आमची इच्छा नाहीं; कारण, संमतीच्या बिलाचें लीलेनें मंडन करतां येण्यासारखे आमच्या भात्यांत याहून खाशा नेमाचे दुसरे पुष्कळ बाण आहेत!

*

महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र

प्रिय देशबांधवहो, संमतीच्या बिलाच्या संबंधानें **सुधारकांत** अलिकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचीं मनें त्यावर रुष्ट झालीं असतील यांत संशय नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्यूसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थांची स्थापना व उत्कर्ष, त्याप्रमाणेच **मराठा** आणि **केसरी** पत्रांचा अवतार, प्रसार, आणि करवीर प्रकरण वगैरे गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध ज्यांना ठाऊक आहे; व हे दोघे इसम बरींच वर्षे एकमेकांशी कसें वागत होते हें ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना **सुधारकासारख्या** नवीन पत्राचें जनन, रा. टिळक व पाटणकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विश्लेष, व प्रस्तुत वादांत **सुधारक** आणि **केसरी** पत्राच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडिमार पाहून, या उभयतांच्या बेबनावास व फुटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें, विषाद वाटणें हें फार स्वाभाविक आहे. पण रा. टिळकांस तीं कारणें अवगत असतां, ज्या पत्राचें आधिपत्य त्यांचेकडे आहे त्याच्या गेल्या अंकांत ''ज्यांना वादांत स्वपक्षाची उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर, आणि विशेषत: त्यांतील एकदोन व्यक्तींवर, अपशब्दरूपी गोळीबार करणें हीनपणाचें वाटत नाहीं; त्यांची कानउघाडणी करण्याच्या नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषानें खासगी द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि क्वचितच मिळते.'' अशीं दोन वाक्यें आहेत. हीं वाक्यें जेव्हां आमच्या नजरेस पडलीं तेव्हां मात्र आम्हांस मोठा विस्मय वाटला! टिळक आणि आगरकर यांचा **खासगी द्वेष**! आणि तो कशासाठीं? टिळक आगरकरांचे किंवा आगरकर टिळकांचे कांहींएक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा ''खाजगी द्वेष'' करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं निदान एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघांचा बेबनाव व फुटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते; त्या संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयी व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनांविषयी कोणत्याही रीतीनें

एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला, व याच मतभेदामुळें प्रस्तुत वादांत ते एकमेकांची मुर्वत न ठेवतां, आपापल्या मतांचा आणि पक्षाचा विजय होण्यासाठी अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं! अशा रीतीनें आपापल्या देशाविषयक विचारांचे प्राबल्य स्थापण्यासाठीं अंत:करणपूर्वक झुंजणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पाहत राहून व कौतुक करावयाचें तें विसरून जाऊन, अशा युद्धप्रसंगीं केवळ कर्णकटु टणत्कारांच्या श्रवणावरूनच प्रेक्षकांनीं 'एकाला दुसऱ्याचा मत्सर उत्पन्न झाला आहे' किंवा कोणी कोणाचे 'खासगी द्वेषाचें उट्टें काढून घेत आहे' असा कुतर्क करणे, अत्यंत अनुदार होय. एका जननीच्या उदरातून अवतरलेल्या सहोदरांत देखील जर भाडण किंवा मतभेद झाल्याशिवाय राहत नाही, तर ज्यांचा एकमेकाशी कोणत्याही प्रकारचा कुलसंबंध नाही, व ज्यानी राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीने; आपल्या हयातींत आपल्या हातून होईल तेवढे देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्याचे विचार सर्वांशी न जुळणे, व ज्याला त्याला प्रसंगविशेषी आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतानी आरंभिलेल्या सामान्य गोष्टीस आमरण चिकटून राहणें; स्वत:स किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणार नाहीं, अशी खात्री झाल्यामुळे ज्याच्या मनास जी दिशा अत्यंत आक्रमणीय वाटेल त्याने ती धरणे, यात नवल वाटण्यासारणे काय आहे, हे आम्हांस समजत नाही. बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठी भिता? दुष्ट आचाराचे निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धी, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत. आजपर्यंत या देशात हा कलह माजावा तितका कधीच न माजल्यामुळे, व बहुधा आमचे लोक 'गतानुगतिक'च असल्यामुळे, हे भरतखंड इतकी शतकें अनेक प्रकारच्या विपत्तीत खितपत पडले आहे। हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊ न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेवली पाहिजे. नाहीतर त्यापासून पुढे खऱ्या लढाया आणि रक्तस्राव होण्याचा संभव असतो. सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक आणि मंद सुधारक, थंडे सुधारक आणि गरम सुधारक अथवा नानाप्रकारच्या मतांचे नवे आणि जुने लोक; यामध्ये सांप्रतकालीं जी दुही माजून राहिली आहे, ती पाहून घाबरून जाण्याचें किंवा देशावर कांहीं तरी प्रचंड संकट गुदरणार आहे, असें मानण्याचें बिलकूल कारण नाही! पाश्चिमात्य शिक्षणामुळें ज्या दिवशी या वादास आरंभ झाला; तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल. त्या दिवशीं अनेक शतकें गाढ निद्रेत घोरत पडलेला हिंदुस्थान देश किंचित् जागा होऊन चावळूं

लागला, किंवा प्रेतावस्थ झालेल्या त्याच्या विस्तीर्ण देहांत ईशकृपेने पुनः एकवार चैतन्यावतार झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवशीं त्याचे स्थाणुत्व नाहीसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली; ती प्रतिवर्षी अगदीं नव प्रमाणांत कां होईना, पण सारखी वाढत आहे, व जों जों हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तों तों ती झपाट्याने होऊं लागणार आहे. आतां किती झालें, तरी कलह तो कलह! तो कशाही प्रकारचा आणि कितीही सौम्य असला तरी त्यांत अप्रिय असें कांहींच नाही, असें कोठून होणार? ज्या दोन मनुष्यांचा परस्परांशी संबंध आहे, त्यांपैकीं एक दुसऱ्याच्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे कधी त्या दोघांस एकमेकांशीं वर्दळीस यावे लागेल, कधी एकमेकांवर शब्दप्रहार करावे लागतील; कधी उभयतांनी आरंभिलेल्या कामांतून अंग काढून घेऊन विलग व्हावे लागेल; कधी पदराला बराच खार लावून घ्यावा लागेल; किंवा जिवाकडे न पाहतां अहोरात्र मानसिक शारीरिक कष्ट करावे लागतील; पण जोपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठी व प्रसारासाठीं भांडत आहों, असे प्रत्येकाच्या मनांत वागत राहील; तोपर्यंत न्यायसभेत पक्षकाराचें भांडण भांडणाऱ्या वकिलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाही, व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं; असे निदान त्यांपैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जे अंतर पडले आहे, तें कमी न होतां कदाचित् अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे; तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळयांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस, व जेव्हां टिळकांचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हां आगरकरांस, विशेष वाईट वाटून डोळ्यास पाणी येईल, व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून, एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल!

धर्म, राज्य, व समाज यासंबंधाने अलीकडे हे औपपत्तिक सिद्धांत सर्वमान्य होऊन बसले आहेत. त्यांविषयीं आम्हां उभयतांत म्हणण्यासारखा मतभेद नाहीं. मनुष्याच्या बुद्धीचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीस ब्रह्मांडाच्या आदिकारणांचे किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं, हें धर्मतत्त्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि इंग्लिश लोकांचें साहाय्य असल्याशिवाय आमचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं, या करितां

राजनिष्ठा यत्किंचित् ढळूं न देतां, राजकीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आम्हीं केलें पाहिजे; नीतिप्रसार, संपत्युत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें, लोकशिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्याने चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे; स्त्री-पुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यांत जेवढें अंतर राहूं देणें अपरिहार्य असेल, तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, म्हणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे- वगैरे धार्मिक, राजकीय व सामाजिक विषयासंबंधानें स्थूल औपपत्तिक सिद्धांत जसे एकाला तसे दुसऱ्याला संमत आहेत. दोघांत जो मतभेद पडतो; तो आज तारखेस ते सिद्धांत अंमलांत आणण्यासाठीं काय करतां येईल व ते कोणत्या साधनानें करतां येईल, या संबंधानें पडतो. या घटकेस साध्य असलेल्या सुधारणेची इयत्ता आणि तिचीं साधनें याविषयीं टिळकांचे बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे असल्यामुळें, किंवा त्यांस मान्य असलेल्या विचाराबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें, त्यांचें वर्तन **भवभूतीनें** रामचंद्राकडून वदविलेल्या-

स्नेहं दयां च सौख्यंच यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा॥

अर्थ:- 'स्नेह, दया, सौख्य, फार तर काय; लोकांच्या संतोषासाठीं मला जानकीचा देखील त्याग करावा लागला, तरी त्याबद्दल खेद वाटणार नाहीं!' या श्लोकार्थाप्रमाणें होत आहे, व या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून, प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें, लोकछंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे; इतकेंच नाहीं, तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुनः त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान **विकटोपर्यंत** जाऊन पोहोंचलें आहे, व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान त्या कामास सरकाराचें किंवा कायद्याचें साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या श्रद्धालू, पंडितंमन्य, व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान, त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसतां, श्री. शिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पाचशें रुपयांची नोकरी ज्यानें ''मला नको'' म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां, आज

दहा अकरा वर्षे, जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां, ज्यानें सात आठ वर्षे सर्वत्र प्रसिद्ध **केसरी** पत्राचे बऱ्या वाईट रीतीनें "रकानें" भरून काढले; इतकेंच नाहीं, तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, येवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधीशास अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा त्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध वाटेल ते लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर; त्यांच्या धमकावण्याकडे बिलकूल लक्ष न देतां समानशीलाच्या व विचारांच्या मित्राचें प्रोत्साहन व साहाय्य मिळतांच, सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या **सुधारणेचा** आणि **सुधारकांचा** पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्याचेंच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां, व लोकमत धडधडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेला शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यासाठीं, आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाचसा काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर व खांद्यावर खेळवून, ज्यांनीं लहानाचें थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आप्तांचाही दीर्घ रोष ज्यानें आपणांवर करून घेतला आहे- अशा मनुष्याच्या लेखांत कितीही प्रमाद होत असेल व केवढीही कटुता असली; तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरांस, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. "हा वेडापीर इतके हाल, संकटें व लोकापवाद सोसून ज्या अर्थी इतकी धडपड करीत आहे, त्या अर्थी ती लोकांस अंतीं हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री झाली असावी," असा विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं त्याच्या दोषाबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलं तर ठीकच आहे; पण नाहीं केलें, तरी त्यास विशेषसें वाईट वाटण्याचा संभव नाहीं; कारण सारे जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम्।
जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः।।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा।

कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी।।

अर्थ:- खरोखरींच जे या गोष्टींत आमची निर्भर्त्सना करतात, त्यांना कांहींच समजत नाहीं, व त्यांच्याकरितां हा आमचा प्रयत्नही नाहीं. माझ्या शीलाचा एखादा इसम कोठें तरी असेल किंवा निपजेल: पृथ्वी अफाट आहे व काल अनंत आहे!

✷

बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठी भितां? स्पष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादी मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहीत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें, व बहुधा आमचे लोक 'गतानुगतिक'च असल्यामुळें, हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे! हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेवली पाहिजे.

—गो. ग. आगरकर

सुधारक आणि सुधारणा या शब्दांचा विपरीत अर्थ करून, त्याच्या भरांत तुम्ही त्यांविरुद्ध हवें तसें बहकूं लागलां आहांत; पण हें पक्कें ध्यानांत ठेवा कीं, मांसाहार, मदिरापान, व्यभिचार, अनृत भाषण, विश्वासघात, अप्रामाणिकपणा, क्रूरपणा वगैरे गोष्टी खऱ्या सुधारकांस तुम्हांपेक्षां अधिक निंद्य वाटतात. पण ही महापातकें कितीहि वाढलीं तरी त्याची तुम्हांस विशेष काळजी वाटत नाहीं. अशा प्रकारच्या पातकांत रात्रंदिवस पोहणारा मनुष्य तुमच्या दृष्टीनें अत्यंत धर्मनिष्ठ असून, त्याच्याशीं अन्नोदकव्यवहार करण्यासच काय,पण त्याच्या अंगुष्ठाचें तीर्थ घेऊन, आपल्या पापाचें क्षालन करून घेण्यास देखील तुम्ही तयार व्हाल! पण या घोर पातकांपैकी ज्याला एकाचाहि स्पर्श झाला नाहीं, असा एखादा ब्राह्मण, प्रभू किंवा सारस्वत शूद्राच्या हाताचें उघडपणें पाणी पिईल, एखाद्या ख्रिस्ती स्नेह्याच्या घरचीं चारदोन बिस्कुटें आणि पेलाभर चहा यांचें सेवन करील, किंवा अडचणीच्या वेळीं एखाद्या मुसलमानानें तयार केलेला भात खाईल, तर मात्र तुम्ही त्यास वाळींत टाकणार, व पंधरा पावल्या दिल्या कीं त्यावरील बहिष्कार काढून घेणार! काय धर्म! काय प्रायश्चित!! काय धर्मशास्त्रे!!! धिक् तुमच्या धर्माला, तुमच्या प्रायश्चित्ताला आणि तुम्हांला!

—गोपाळ गणेश आगरकर